श्रीवाल्मीकि

रामायण

प्रथम खंड

१ बालकांड, २ अयोध्याकांड, ३ अरण्यकांड,
४ किष्किंधाकांड.

या प्रथम खंडाची नवी किंमत रुपये पंधरा फक्त.

व

प्रथम, द्वितीय व तृतीय खंडाच्या संपूर्ण सेटची सवलतीची
नवी किंमत रुपये चाळीस फक्त.

प्रकाशक :
ग. वि. चिपळूणकर आणि मंडळी, पुणें.

श्रीवाल्मीकिरामायण.

बालकांड.

सर्ग पहिला.

उपोद्धात.

रामाय रामभद्राय रामचंद्राय वेधसे ।
रघुनाथाय नाथाय सीतायाः पतये नमः ॥
ध्येयं सदा परिभवघ्नमभीष्टदोहं ।
तीर्थास्पदं शिवविरिञ्चिनुतं शरण्यम् ॥
भृत्यार्तिहं प्रणतपालभवाब्धिपातं ।
वन्दे महापुरुष ते चरणारविन्दम् ॥
त्यक्त्वा सुदुस्त्यज सुरेप्सितराज्यलक्ष्मीं ।
धर्मिष्ठ आर्यवचसा यदगादरण्यम् ॥
मायामृगं दयितयेप्सितमन्वधावत् ।
वन्दे महापुरुष ते चरणारविन्दम् ॥
कूजन्तं रामरामेति मधुरं मधुराक्षरम् ।
आरुह्य कविताशाखां वन्दे वाल्मीकिकोकिलम् ॥

ध्ययनरूप तपश्चर्येचे ठिकाणीं तत्पर, शब्दब्रह्मतत्त्ववेत्त्यांमध्यें श्रेष्ठ आणि ष्ठ अशा नारदांना वाल्मीकि मुनींनीं प्रश्न केला, "हे महर्षे, वर्त- ह्या भूलोकावर बहुगुणसंपन्न असा कोण आहे? अर्थात् वीर्यवान, वेत्ता, कृतज्ञ, सत्यवचनी, धर्माकरितां स्वीकारिलेल्या व्रताचा आपत्का- ाग न करणारा, सदाचरणसंपन्न, प्राणिमात्रांच्या हिताविषयीं तत्पर, षा, समर्थ, दर्शन झालें असतां लोकांना अत्यंत आनंद देणारा, मनो- ी, क्रोधादिकांचें संयमन करणारा, तेजस्वी, परोत्कर्षाविषयीं मत्सर न धर- आणि युद्धकालीं क्रुद्ध झाला असतां देवांनाहि भीति उत्पन्न करणारा कोण आहे, हें श्रवण करण्याची माझी इच्छा आहे; इतकेंच नव्हे, परंतु

तें श्रवण करण्याविषयीं मला पराकाष्ठेची उत्सुकता आहे; आणि आपणहि अशा प्रकारचा पुरुष कोण आहे, हें जाणण्यास समर्थ आह

हें वाल्मीकि मुनींचें भाषण श्रवण करून तिन्ही लोकांतील वृत्तां णारे नारद मुनि आनंदित झाले आणि " ऐकावें " म्हणून सावधान विषयीं सुचवून त्यांना म्हणाले:—आपण विचारलेले गुण बहुत अस् भच आहेत; तथापि हे मुने, त्या गुणांनीं संपन्न कोण आहे, ह्यां करून मी आपणांला कथन करितों; आपण त्या गुणांनीं युक्त असले कोण, तो श्रवण करा.

रामगुणवर्णन.

इक्ष्वाकुवंशांत जन्मलेला आणि राम ह्या नांवानें प्रसिद्ध असलेला व पुरुष लोकविख्यात आहे; आणि त्याच्याच ठिकाणीं एकसमयावच्छेदानें विचारलेले सर्व गुण आहेत. तो मनोनिग्रही, महावीर्यवान, तेजस्वी, जितेंद्रिय, बुद्धिमान, नीतिज्ञ, वक्ता, वैभवशाली आणि शत्रुनाशक आहे स्कंध, महाबाहु, तीन रेषांनीं युक्त असलेला कंठ, मांसल हनुवटी, वक्षःस्थल, मोठें धनुष्य, अदृश्य स्कंधसंधि, आजानुबाहु, उत्कृष्ट मस्तक ललाट व प्रशस्त गति ह्यांनीं तो शत्रुविजयी संपन्न आहे; आणि त्याच तो प्रतापी व लक्ष्मीवान असून प्रमाणांकित देह, परस्परांशीं समान आ स्परांपासून भिन्न असे नेत्रप्रभृति अवयव, स्निग्ध वर्ण, पुष्ट व उन्नत असें स्थल आणि विशाल नेत्र ह्यांनीं युक्त आहे व म्हणून शुभ लक्षणांनीं आहे; तसाच तो धर्मज्ञ, सत्यप्रतिज्ञ, प्रजाजनांच्या हिताविषयीं तत्पर, य ज्ञानसंपन्न आणि पवित्र व विनयी असून चित्तस्वास्थ्यानें युक्त आहे; प्रमाणें तो ब्रह्मदेवासमान असून ऐश्वर्यसंपन्न, प्रजापालक व शत्रुनाशक आणि वर्णाश्रमधर्मरक्षक असून प्राणिसमूहाचें प्रतिपालन करणारा आहे केंच नव्हे, परंतु विशेषेंकरून स्वधर्म आणि भक्त ह्यांचें रक्षण करण वेद आणि वेदांगें ह्यांचें तत्त्व जाणणारा व धनुर्वेदामध्यें प्रवीण अ त्याचप्रमाणें स्मृति आणि समयस्फूर्ति ह्यांनीं तो युक्त असून सर्व शास्त्र तत्त्व जाणणारा, सर्व लोकांना हितावह, सौम्य, उदार आणि सर्व क कुशल आहे; तसाच तो सर्वमान्य व सर्वांशीं सारखा वागणारा असल सर्वदा लोकांना त्याचें दर्शन प्रिय असतें; आणि म्हणूनच, नद्या ज्या समुद्राकडे येत असतात त्याप्रमाणें सर्व कालीं सज्जन त्याचे संनिध

असतात. सारांश, कौसल्येचा आनंद वृद्धिंगत करणारा तो राम सर्वगुणसंपन्न आहे; गंभीरपणामध्यें तो समुद्रासारखा आहे; धैर्यांत हिमालय पर्वताप्रमाणें आहे; वीर्यासंबंधानें विष्णूशीं बरोबरी करणारा आहे; चंद्राप्रमाणें त्याचें दर्शन सर्वांना प्रिय आहे; क्रोधामध्यें प्रलयकालच्या अग्नीशीं त्याचें साम्य आहे; क्षमेनें तो पृथ्वीची बरोबरी करणारा आहे; धनाचा व्यय करण्याविषयीं तो कुबेरासमान आहे; आणि सत्यवचनासंबंधानें तर तो दुसरा धर्मच आहे.

रामचरित्रकथन.

ह्याप्रमाणें बहुगुणसंपन्न, अमोघपराक्रमी, श्रेष्ठगुणांनीं युक्त आणि प्रजाजनांना हितावह असलेलीं कृत्यें करण्याविषयीं तत्पर असा जो ज्येष्ठ व प्रिय पुत्र राम, त्याला—प्रजाजनांचा मनोरथ परिपूर्ण करण्याकरितां—दशरथ भूपतीनें यौवराज्याचा अभिषेक करण्याचें आनंदानें मनामध्यें आणलें. परंतु त्याच्या अभिषेकाला अवश्य असलेलें साहित्य जुळविलेलें पाहून, पूर्वीं जिला वर देण्याचें आश्वासन मिळालें होतें,[१] त्या कैकेयी नामक भार्येनें रामाला वनवास आणि भरताला अभिषेक असा वर त्या दशरथ राजापाशीं मागितला. तेव्हां सत्यवचनी असल्यामुळें धर्मपाशानें बद्ध होऊन त्या दशरथ राजानें आपल्या प्रियपुत्र रामाला वनामध्यें पाठविलें; आणि तो वीर रामहि पित्यानें कैकेयीला वर देण्याविषयीं केलेली प्रतिज्ञा सत्य करण्याकरितां आणि कैकेयीचाहि मनोरथ पूर्ण करण्याकरितां पित्याची आज्ञा झाल्यावर वनामध्यें गेला. त्या वेळीं विनयसंपन्न, सुमित्रेचा आनंद वृद्धिंगत करणारा, रामावर स्वाभाविकपणेंच प्रेम करणारा, रामालाहि प्रिय असलेला आणि आपल्या वर्तनानें बंधुप्रेम दर्शविणारा त्याचा भ्राता लक्ष्मण, राम जाऊं लागला असतां पित्याची आज्ञा वगैरे नसतांना केवळ बंधुप्रेमामुळेंच त्याच्या मागोमाग वनामध्यें गेला. त्याचप्रमाणें जनकाच्या कुलामध्यें उत्पन्न झालेली, देवमायेप्रमाणें निर्माण झालेली, सर्व लक्षणांनीं संपन्न असलेली, स्त्रियांमध्यें उत्कृष्ट असलेली आणि रामाला प्राणासमान प्रिय असून त्याचें हित करण्याविषयीं नित्य तत्पर असलेली जी रामाची भार्या सीता, तीहि चंद्राच्या मागोमाग जाणाऱ्या रोहिणीप्रमाणें रामाच्या बरोबर गेली.

राम वनांत जाऊं लागला असतां नगरवासी जन आणि पिता दशरथ हे दूरपर्यंत त्याच्या मागोमाग गेले. नंतर शृंगवेरपुरामध्यें इष्ट अशा गुह नामक निषादाधिपतीची भेट झाल्यावर वनवासांत पोहोंचविण्याकरितां रथ घेऊन

१ ही कथा पुढें अयोध्याकांडाच्या नवव्या सर्गांत पहा.

आलेल्या सारथ्याला रामानें गंगातीरीं सोडिलें. नंतर गुह, लक्ष्मण व सीता ह्यांसहवर्तमान राम वनामध्यें चालला. पुढें ते त्रिवर्ग ह्या वनांतून त्या वनांत अशा प्रकारें अगाध जलानें युक्त असलेल्या नद्या तरून चालले; आणि नंतर भरद्वाज मुनींच्या आज्ञेवरून चित्रकूट पर्वताला आल्यावर, वनामध्यें आनंदानें विहार करणारे ते देवगंधर्वांसारखे असलेले त्रिवर्ग म्हणजे राम, सीता आणि लक्ष्मण रम्य पर्णशाला करून त्या ठिकाणीं सुखानें राहिले. राम चित्रकूट पर्वतावर गेला तों इकडे पुत्रशोकानें व्याकुळ झालेला दशरथ राजा पुत्राकरितां विलाप करीत करीत स्वर्गलोकीं गेला. ह्याप्रमाणें तो दशरथ परलोकीं गेल्यानंतर वसिष्ठप्रभृति द्विज भरताला राज्याचा स्वीकार करण्याविषयीं सांगूं लागले; परंतु महाबलाढ्य असल्यामुळें राज्य करण्यास समर्थ असूनहि राज्याची इच्छा न धरितां रामचरणांचा प्रसाद प्राप्त करून घेण्याकरितां तो वीर भरत वनामध्यें गेला. नम्र वेषानें महात्म्या रामासमीप गेल्यानंतर त्यानें वनांतून परत येण्याविषयीं त्याची प्रार्थना केली; आणि " तूंच राजा आहेस व सर्व गुणांनीं श्रेष्ठ असा ज्येष्ठ भ्राता असतांना कनिष्ठाला राज्याचा अधिकार नाहीं, हेंहि तूं धर्मज्ञ असल्यामुळें जाणतच आहेस " असेंहि तो म्हणाला. परंतु प्रसन्न मुख, अपार यश आणि प्रचंड बल ह्यांनीं संपन्न असलेला राम जरी याचकांची हवी ती इच्छा तृप्त करण्यासारखा पराकाष्ठेचा उदार होता, तरी पित्याच्या आज्ञेमुळें भरताच्या प्रार्थनेप्रमाणें त्यानें राज्याचा स्वीकार करण्याचें मनांत न आणतां, वनांतून निवृत्त होण्याविषयीं वारंवार याचना करीत असलेल्या भरताला राज्यरक्षणाचें सामर्थ्य यावें एतदर्थ ठेव म्हणून आपल्या पादुका दिल्या; आणि नंतर भरताहून ज्येष्ठ असलेल्या त्या रामानें त्याला तेथून परत फिरविलें. ह्याप्रमाणें आपला मनोरथ पूर्ण न होतांच तो भरत रामचरणीं प्रणाम करून परत फिरला आणि चवदा वर्षेपर्यंत रामाच्या आगमनाची वाट पहात पहात त्यानें नंदिग्रामामध्यें राहून राज्य केलें. असो.

भरत गेल्यानंतर चित्रकूट पर्वत फार दूर नसल्यामुळें कदाचित् नगरवासी जन आणि भरत ह्यांचें आगमन पुनरपि इकडे होण्याचा संभव आहे, असें समजून तो सत्यवचनी, जितेंद्रिय व वैभवशाली राम दंडकारण्यामध्यें मोठ्या सावधपणानें प्रविष्ट झाला. त्या महावनामध्यें गेल्यानंतर कमलनयन रामानें विराध राक्षसाचा वध केला. पुढें शरभंग, सुतीक्ष्ण, अगस्त्य आणि अगस्त्य नांवानेंच प्रसिद्ध असलेला अगस्त्यभ्राता ह्या मुनींची भेट घेतली.

नंतर इंद्रानें वरुणापासून अगस्त्य मुनीपाशीं आणून ठेविलेलें वैष्णव धनुष्य, खड्ग आणि अक्षय बाणांनीं भरलेले भाते ह्यांचा अगस्त्य मुनींच्या आज्ञेवरून रामानें मोठ्या आनंदानें स्वीकार केला. ह्याप्रमाणें तो राम वनचरांसहवर्तमान वनामध्यें वास्तव्य करूं लागला असतां, कबंधप्रभृति असुर आणि खरदूषण-प्रभृति राक्षस ह्यांच्या वधाविषयीं विनंति करण्याकरितां सर्व ऋषि त्याचे समीप आले; आणि रघुवंशजश्रेष्ठ रामानेंहि त्या दंडकारण्यनिवासी अग्नितुल्य तेजस्वी ऋषींचे संनिध युद्धामध्यें राक्षसांचा वध करण्याची प्रतिज्ञा केली. पुढें त्या दंडकारण्य देशामध्येंच पंचवटी नामक आश्रमांत रहात असतांना जनस्थानांत[1] वास्तव्य करणारी कामरूपिणी शूर्पणखा राक्षसी हिचा कर्ण व नासिका ह्यांचा छेद करून त्यानें तिला विरूप केली. नंतर शूर्पणखेच्या सांगण्यावरून युद्धास तयार झालेल्या सर्व जनस्थाननिवासी राक्षसांचा, खर, त्रिशिरा व दूषण ह्यांचा आणि त्यांच्या चवदा हजार अनुयायांचा रामानें संग्रामामध्यें वध केला. तेव्हां स्वजातीयांच्या वधाचें वृत्त श्रवण करून रावण क्रोधानें अगदीं व्याप्त झाला आणि मारीच नामक राक्षसाला सीताहरणार्थ आपणाला सहाय्य होण्याविषयीं विनंति करूं लागला. तेव्हां "रावणा, त्या बलवानाशीं विरोध धरणें तुला योग्य व हितकारक होणार नाहीं" असें सांगून मारीच वारंवार त्याचा निषेध करीत असतांनाहि कालाची प्रेरणा झाल्यामुळें त्याच्या सांगण्याचा अनादर करून, तो रावण मारीच्यासहवर्तमान रामाच्या आश्रमस्थानाला गेला. नंतर त्या मायावी मारीच राक्षसाच्या योगानें राजकुमार राम-लक्ष्मणांना आश्रमांतून दूर नेववून आणि जटायु गृध्राचा वध करून त्यानें रामाची भार्या हरण केली. तदनंतर मरणोन्मुख होऊन पडलेल्या गृध्र जटायूला अवलोकन करून आणि त्याजकडून सीता हरण करून नेल्याचें श्रवण करून रघुवंशज राम शोकानें संतप्त झाला आणि अन्तःकरण शोकाकुल झाल्यामुळें विलाप करूं लागला. नंतर त्या शोकानें व्याप्त असतांनाच जटायु गृध्राचें त्यानें दहन केलें; आणि तो वनामध्यें सीतेला शोधूं लागला, तों शरिरानें विद्रूप आणि दिसण्यांतहि भयंकर असा कबंध नामक राक्षस त्याच्या दृष्टीस पडला. पुढें महापराक्रमी रामानें कबंधाचा वध केल्यावर तो स्वर्गास गेला व जातां जातां, "हे राघवा, धर्मानें वागणाऱ्या आणि धर्मज्ञ अशा शबरी नामक तापसीची तूं भेट घे." म्हणून त्यानें त्याला सांगितलें. तेव्हां तो महातेजस्वी शत्रुनाशक राम शबरीची

---

१ दंडकारण्यामध्यें रावणाचें सैन्य राहण्याचें जें ठिकाण तें.

भेट घेण्याकरितां गेला. पुढें शबरीनें उत्तम प्रकारें पूजन केल्यानंतर तो दशरथपुत्र राम पंपासरोवराचे तीरीं गेला असतां हनुमान वानराची त्याची भेट झाली आणि नंतर कबंधाप्रमाणें हनुमानानेंहि सांगितल्यावरून त्या बलाढ्य रामानें सुग्रीवाची भेट घेतल्यावर, जन्मापासून जसें घडलें होतें तसें वर्तमान आणि विशेषत: सीतेसंबंधानें जें वर्तमान घडलें होतें तें सर्व त्यानें सुग्रीवाला सांगितलें.

नारद म्हणतात:– रामाची ती सर्व हकीगत श्रवण करून सुग्रीव वानर प्रसन्न झाला व त्यानें प्रत्यक्ष अग्नीलाच साक्षी ठेवून रामाशीं सख्य केलें. नंतर वालीशीं पडलेल्या वैरासंबंधानें रामानें विचारलेल्या प्रश्नाचें सर्व उत्तर त्या दु:खित सुग्रीवानें त्याला मन मोकळें करून सांगितलें असतां त्याच वेळीं रामानें वालीचा वध करण्याची प्रतिज्ञा केली. तेव्हां त्या (ऋष्यमूक पर्वताचे) ठिकाणीं वालीचे बल किती हें सुग्रीवानें रामाला सांगितलें. रघुवंशज रामाचे ठिकाणीं वालीसारखें सामर्थ्य आहे किंवा नाहीं ह्याविषयीं सुग्रीवाला नेहमीं शंका येत असल्यामुळें, रामाच्या बलाची प्रतीति पहाण्याकरितां मोठ्या पर्वतासमान असलेलें दुंदुभि नामक दैत्याचें वालीनें फेकून दिलेलें प्रचंड शरीर त्यानें रामाला दाखविलें. तेव्हां अमोघ पराक्रमी व महाबलाढ्य रामानें तो अस्थिपंजर अवलोकन करून हास्यपूर्वक पादांगुष्ठानेंच पक्कीं दहा योजनें (चाळीस कोसपर्यंत) उडवून दिला आणि पुनरपि स्वबलाविषयीं सुग्रीवाचा विश्वास बसण्याकरितां, त्यानें एकच मोठा बाण सोडिला त्याच्या योगानें सात ताल वृक्ष, त्यांच्या समीप असलेला एक पर्वत आणि भूलोकाखालीं असलेल्या सप्तपाताललोकांपैकीं वरच्या पांचांसहवर्तमान सहावें रसातल भेदून दाखविलें. (तात्पर्य, आपलें बल वालीपेक्षां कमी आहे किंवा काय अशी शंका सुग्रीवाला पुनरपि येऊं नये, म्हणून रामानें एक मोठा बाण मारिला असतां तो ओळीनें असलेल्या सात तालवृक्षांचा भेद करून त्यांच्याच पलीकडे असलेल्या पर्वतालाहि फोडून गेला आणि पर्वत फोडून ज्या ठिकाणीं खालीं पडला तेथून खालीं जात जात तो अध:प्रदेशीं असलेल्या सप्तपातालांपैकीं सहाव्या रसातलालाहि भेदून गेला.) ह्याप्रमाणें रामानें स्वसामर्थ्याची प्रतीति आणून दिल्यानंतर त्या महावानराला त्याच्या बलाविषयीं विश्वास आला व तो रामासहवर्तमान किष्किंधा नगरीस व नंतर त्या नगरीसमीप असलेल्या गुहेमध्यें गेला. किष्किंधा नगरीला गेल्यावर सौवर्ण व पिंगटवर्णानें युक्त असलेल्या त्या वानरश्रेष्ठ सुग्री-

वानें गर्जना केली. तेव्हां तो महाध्वनि श्रवण करून वानरराज वाली युद्धाकरितां बाहेर निघाला. निघतांना, 'जाऊं नका' म्हणून त्याची स्त्री तारा त्याचें निवारण करूं लागली; पण " मी अपकार केला नसतां राम विनाकारण मला अपकार करणार नाहीं " इत्यादि भाषणांनीं तिची अनुमति घेऊन तो सुग्रीवाशीं येऊन भिडला. तेव्हां त्या युद्धामध्यें रामानें एका बाणानें वालीचा वध केला आणि त्याच्या राज्यावर त्यानें सुग्रीवाचीच स्थापना केली. नंतर वानरश्रेष्ठ सुग्रीवानें सर्व वानर एकत्र जमविले आणि जनककन्या सीता हिचा शोध लावण्याकरितां त्यांना चहूंकडे पाठविलें.

पुढें लंकेमध्यें सीता दीन होऊन वास्तव्य करीत आहे असें संपाति नामक गृध्र पक्ष्यानें सांगितल्यावरून बलाढ्य हनुमानानें शंभर योजनें विस्तीर्ण असलेल्या क्षारसमुद्राचें उल्लंघन केलें आणि रावणानें परिपालित असलेल्या लंका नगरीला गेल्यानंतर अशोक वनामध्यें रामाचें ध्यान करीत बसलेली सीता त्या ठिकाणीं त्यानें अवलोकन केली. नंतर रामानें दिलेली खूण सीतेला देऊन, सुग्रीवाशीं रामाचें सख्य झाल्याचें वगैरे वर्तमान तिला कळवून आणि तिला धीर देऊन हनुमानानें तेथील वेशींचाहि नाश केला, आणि पांच सेनाधिपति व सात मंत्रिपुत्र ह्यांचा वध करून व त्याचप्रमाणें अक्ष नामक शूर रावणपुत्राचें पीठ करून हनुमान आपण होऊन इंद्रजितानें टाकलेल्या ब्रह्मास्त्ररूप पाशाचे अधीन झाला. पुढें ब्रह्मदेवाच्या वरानें अस्त्रापासून आपली सुटका झाल्याचें समजूनहि बांधून नेणाऱ्या राक्षसांची त्यानें त्या वेळेपुरती क्षमा केली व तो वीर कांहीं दुसऱ्याच कार्याच्या उद्देशानें त्या राक्षसांबरोबर रावणासमीप गेला. नंतर मिथिलाधिपति जनक राजाची कन्या सीता ज्या ठिकाणीं बसली होती, तें ठिकाण वर्ज करून रावणाची लंका नगरी दग्ध केल्यावर रामाला प्रिय वर्तमान कथन करण्याकरितां पुनरपि तो महाकपि रामासमीप गेला आणि त्याला प्रदक्षिणा घातल्यावर त्या महात्म्यानें ' दिसली सीता ' येवढें सार रामाला निवेदन केलें. असो.

पुढें सुग्रीवासहवर्तमान महासागराचे तीरीं गेल्यावर सूर्यासारख्या तेजस्वी बाणांनीं रामानें समुद्र क्षुब्ध करून टाकला असतां, नद्यांचा अधिपति जो समुद्र त्यानें रामाला दर्शन दिलें. तेव्हां त्याच्या सांगण्यावरूनच रामानें नलाकडून सेतु बांधविला आणि त्या सेतूवरून लंका नगरीला जाऊन व त्या ठिकाणीं युद्धामध्यें रावणाचा वध करून रामानें सीता प्राप्त करून घेतली;

परंतु ‘ राक्षसाच्या घरीं पुष्कळ दिवस राहिलेल्या सीतेचा पुनरपि स्वीकार केला ’ असा लोकापवाद आपणांकडे येण्याचा संभव आहे असें मनांत आल्याकारणानें तो अतिशय लज्जित झाला. नंतर जनसमुदायाप्रमाणें सीतेला उद्देशून रामानें मर्मभेदक भाषण केलें असतां तें सहन न झाल्यामुळें ती साध्वी अग्नीमध्यें प्रविष्ट झाली. तदनंतर सीता निष्कलंक आहे असें अग्नीच्या वचनावरून समजून आल्यावर रामानें तिचा स्वीकार केला. या महत्कृत्याच्या योगानें देवगण, ऋषिसमुदाय आणि चराचर प्राणी ह्यांसहवर्तमान सर्व त्रैलोक्य महात्म्या रघुवंशज रामावर संतुष्ट झालें आणि संतोष दाखविण्यानेंच सर्व देवतांनीं मान दिलेला तो राम आनंदित झाला. नंतर लंकेमध्यें राक्षसाधिपति बिभीषणाला अभिषेक करून राम कृतकृत्य झाला आणि निश्चिंत असल्यामुळें आनंदित होऊं लागला. ‘ युद्धांत पडलेले वानर झोंपेंतून उठल्याप्रमाणें जिवंत होऊन उठोत ’ असा वर देवतांपासून प्राप्त झाल्यानंतर वानरांना उठवून सुहृज्जनांनीं परिवेष्टित असलेला राम पुष्पक विमानामध्यें बसून अयोध्या नगरीकडे निघाला; आणि भरद्वाज मुनींच्या आश्रमाला गेल्यानंतर अमोघ पराक्रमी रामानें भरताकडे हनुमानाला पुढें पाठविलें. नंतर सुग्रीवादिकांसहवर्तमान पुनरपि सर्व वृत्तांतासंबंधानें भाषण करीत करीत तो त्याच पुष्पक विमानामध्यें आरूढ होऊन नंदिग्रामीं गेला; आणि नंदिग्रामामध्यें जटा टाकल्यावर व म्हणूनच सीतेला अनुरूप असें रूप धारण केल्यावर भ्रात्यांसहवर्तमान असलेल्या त्या रामाला पुनरपि राज्य प्राप्त झालें. असो.

रामराज्यकालची लोकस्थिति.

ह्याप्रमाणें रामावतारामध्यें वृत्तांत होणार आहे. राम राज्य करीत असतांना लोक हर्ष व आनंद ह्यांनीं युक्त, संतुष्ट, पुष्ट, मानसिक दुःख व शारीरिक व्याधि ह्यांपासून अलिप्त, दुर्भिक्षभयरहित आणि अत्यंत धर्मनिष्ठ असे होतील. पुरुषांना कोठेंहि पुत्रमरण पहाण्याची पाळी येणार नाहीं; स्त्रिया नेहमीं पतिव्रता व वैधव्यरहित होतील; अग्नीपासून यत्किंचित्‌हि भय उत्पन्न होणार नाहीं; उदकांमध्यें बुडून प्राणी मरणार नाहींत; वात, ज्वर, क्षुधा आणि चोर यांपासून भय उत्पन्न होणार नाहीं; नगरें व राष्ट्रें धनधान्यांनीं संपन्न होतील; कृतयुगाप्रमाणें सर्व लोक नित्य आनंदित राहतील; विपुल सुवर्णरूप दक्षिणांनीं युक्त असे शेंकडों अश्वमेध करून विद्वान् ब्राह्मणांना विधिपूर्वक एक निखर्व गाई दान देऊन आणि इतरहि असंख्य धन ब्राह्मणांना अर्पण करून महा-

यशस्वी रघुवंशज राम अनेक गुणांची वृद्धि होईल अशा रीतीनें राजवंशाची स्थापना करील; ह्या भूलोकांतील चारहि वर्णांना आपापल्या धर्माचे ठिकाणीं नियुक्त करील; आणि अकरा हजार वर्षें राज्य करून तो राम ब्रह्मलोकाप्रत गमन करील.

रामायणमहात्म्य.

मुनिवर्य नारद आणखी सांगतात:—मुने! पवित्र, पापनाशक, पुण्यकारक आणि म्हणूनच वेदतुल्य असलेलें हें रामचरित्र जो पठण करितो, तो सर्व पापांपासून मुक्त होतो. सारांश, आयुर्वर्धक असलेलें हें रामायणरूप आख्यान पठण करणारा पुरुष ह्या लोकाचा त्याग केल्यानंतर सेवकगण व पुत्रपौत्र ह्यांसहवर्तमान स्वर्गामध्यें तेथील रहिवाशांच्या सत्काराला पात्र होऊन आनंदांत राहतो. ब्राह्मण जर हें रामायण पठण करील, तर तो शब्दब्रह्मामध्यें निष्णात होईल; क्षत्रिय पठण करील तर त्याला पृथ्वीचें आधिपत्य प्राप्त होईल; वैश्य पठण करील तर त्याला व्यापारामध्यें फलप्राप्ति होईल; आणि श्रवण करणारे शूद्रप्रभृति लोकहि महत्त्वास चढतील.

सर्ग दुसरा.

रामायणरचना.

नारद मुनींचें तें भाषण श्रवण करून संभाषणामध्यें निष्णात व शिष्यगणांसहवर्तमान असलेल्या धर्मात्म्या वाल्मीकि मुनींनीं महामुनि नारदांचें यथाविधि पूजन केल्यानंतर त्यांचा निरोप घेऊन देवर्षि नारद आकाशमार्गानें चालते झाले. नारद मुनि देवलोकीं गेल्यानंतर क्षणभर आश्रमामध्यें बसून वाल्मीकि महामुनि जान्हवीचे समीप असलेल्या तमसा नदीच्या तीरीं गेले आणि तें निर्मल तीर्थ पाहून समीप असलेल्या शिष्याला म्हणाले, "हे भरद्वाजा, कर्दमरहित असलेलें हें तीर्थ अवलोकन कर. अरे, सज्जनांच्या मनाप्रमाणें यांतील उदक स्वच्छ असल्यामुळें हें रमणीय आहे. ह्यास्तव, बा भरद्वाजा, कलश खालीं ठेवून परिधान करण्याकरितां मला वल्कल दे. मध्यान्हकालाचें अतिक्रमण होत असल्यामुळें गंगातीरीं न जातां आतां ह्या उत्कृष्ठ तमसा तीर्थामध्येंच मी स्नान करितों."

ह्याप्रमाणें महात्म्या वाल्मीकि मुनींनीं भरद्वाजाला सांगितलें असतां, सेवे-विषयीं तत्पर असलेल्या त्या शिष्यानें आपल्या त्या गुरुस्वरूप वाल्मीकि मुनींना वल्कल दिलें. तेव्हां शिष्याच्या हातांतून वल्कल घेऊन ते जितेंद्रिय वाल्मीकि स्नानसंध्येला योग्य असा प्रदेश पहाण्याकरितां सर्व बाजूंनीं प्रचंड वन अवलोकन करीत करीत चालले असतां, त्या वनासमीप आधिव्याधिरहित आणि म्हणूनच मधुर स्वरानें युक्त असें एक क्रौंच पक्ष्यांचें जोडपें संचार करीत असलेले भगवान वाल्मीकि मुनींच्या दृष्टीस पडलें. तेव्हां ते मुनी अवलोकन करीत असतांनाहि त्याची पर्वा न करितां, पापबुद्धि आणि म्हणूनच निष्कारण वैराचा आश्रय करणाऱ्या एका निषादानें त्या जोडप्यापैकीं नराला वेध केला. इकडे निषादानें वेध केल्यामुळें सर्वांग रक्तानें भरून जाऊन भूतलावर तडफडत असलेल्या त्या पतीला अवलोकन करून त्याची भार्या करुण स्वरानें ओरडूं लागली. कारण, मस्तकीं आरक्त वर्ण तुऱ्यानें युक्त, विषयोपभोगामध्यें गुंग झाल्यामुळें मत्त आणि म्हणूनच पसरलेल्या पंखांनीं युक्त असा जो स्वतःशीं संगत झालेला व अहोरात्र आपल्याबरोबर असणारा आपला पति, पक्षी त्याचा तिला वियोग झालेला होता. असो. निषादानें पाडिलेला तो पक्षी तशा प्रकारें तडफडत असल्याचें अवलोकन करून धर्मात्म्या वाल्मीकि ऋषींना करुणा आली आणि रोदन करीत असलेल्या क्रौंच पक्षिणीला पाहून तिची दया आल्यामुळें, " काममोहित झालेल्या पक्ष्याचा वध करणें हा अधर्म आहे " असें समजून त्या द्विज वाल्मीकि मुनींनीं, " हे निषादा, ज्या अर्थीं क्रौंच पक्ष्यांच्या जोडप्यापैकीं काममोहित झालेल्या एका पक्ष्याचा तूं वध केला आहेस, त्या अर्थीं तुझे पाय फारशीं वर्षें भुईला लागणार नाहींत " अशा आशयाचें

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।
यत्क्रौञ्चमिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥

हें पद्य उच्चारिलें; आणि अशीं अक्षरें तोंडाबाहेर निघताहेत न निघताहेत तोंच, ' ह्या पक्ष्याच्या शोकानें पीडित झाल्यामुळें मीं हें काय भाषण केलें ' म्हणून विचार करूं लागलेल्या त्या मुनींच्या अंतःकरणांत चिंता उत्पन्न झाली, आणि तपश्चर्येचा विघात करणारा शाप तोंडांतून गेला, हें आपल्या हातून चांगलें कृत्य झालें नाहीं असें चिंतन करितां करितां त्या बुद्धिमान व विचारी मुनिश्रेष्ठ वाल्मीकींच्या अंतःकरणामध्यें एक विचार आला आणि " चरणबद्ध, अक्षरांनीं सम म्हणजे छंदःशास्त्रोक्त अक्षररचनादोषरहित आणि वीणा लावून

वाद्यांसहवर्तमान गाण्यास योग्य असा जो श्लोक, मी शोकाकुल झाल्यामुळें माझ्या तोंडांतून सहज बाहेर पडला, तो अकीर्तिरूप न होतां कीर्तिरूपच होवो" असें त्यांनीं शिष्याला सांगितलें; तेव्हां संभाषण करणाऱ्या त्या मुनींच्या उत्कृष्ठ वाक्याला शिष्यानें मान डोलविली व तें पाहून वाल्मीकि मुनिहि त्या शिष्यावर संतुष्ट झाले. असो. तदनंतर तमसा तीर्थाचें ठिकाणीं यथाविधि स्नान करून त्याच गोष्टीचें चिंतन करीत करीत वाल्मीकि मुनि परत फिरले असतां विनयसंपन्न आणि बहुश्रुत असा तो भरद्वाज नामक शिष्यहि भरलेला कलश घेऊन गुरूंच्या पाठोपाठ निघाला. परत फिरल्यावर ते धर्मवेत्ते वाल्मीकि मुनि शिष्यांसहवर्तमान आश्रमामध्यें प्रविष्ठ झाले आणि आसनावर बसून मनामध्यें तो शापविषयक श्लोक घोळत असतांनाच ते दुसऱ्या गोष्टी सांगूं लागले. इतक्यांत स्वत:सिद्ध आणि म्हणूनच पृथिव्यादि लोक निर्माण करणारे महातेजस्वी चतुर्मुख ब्रह्मदेव त्या मुनिश्रेष्ठांना भेटण्याकरितां आले. तेव्हां त्यांना अवलोकन केल्याबरोबर मौन धारण करून वाल्मीकि मुनि एकाएकीं आसनावरून उठले आणि हात जोडून अत्यंत नम्र होऊन व पराकाष्ठेचे विस्मयचकित होऊन उभे राहिले. नंतर आरोग्यप्रश्नपूर्वक प्रणाम करून पाद्य, अर्घ्य, आसन आणि वंदन ह्यांच्या योगानें वाल्मीकि मुनींनीं ब्रह्मदेवाचें पूजन केलें. तदनंतर अत्यंत सत्कारपूर्वक अर्पण केलेल्या आसनावर भगवान ब्रह्मदेव बसल्यानंतर त्यांनीं वाल्मीकि मुनींनाहि आसनावर बसण्याला अनुज्ञा दिली. तेव्हां ते मुनिहि आसनावर बसले. नंतर त्या क्रौंच पक्ष्याकडेच मन लागलें असतांना वाल्मीकि मुनि चिंताक्रांत झाले आणि वैरयुक्त बुद्धीनें युक्त असलेल्या दुरात्म्या निषादानें—तशा प्रकारच्या मंजुल स्वरानें संपन्न असलेल्या क्रौंच पक्ष्याचा निष्कारण वध केला—हें वाईट केलें म्हणून त्या अवशिष्ट राहिलेल्या क्रौंच पक्षिणीला उद्देशून शोक करितां करितां ब्रह्मदेवासमीपच त्यांनीं (मा निषाद) हा श्लोक उच्चारिला आणि पुनरपि श्लोकाच्या अर्थाकडेच लक्ष्य लावून ते शोकाकुल होऊन बसले. तेव्हां त्या मुनिश्रेष्ठ वाल्मीकींना ब्रह्मदेव हंसत हंसत म्हणाले, "हा तूं ग्रथित केलेला श्लोक यशोरूपच होईल, ह्याविषयीं संशय घेण्याचें प्रयोजन नाहीं. कारण हे ब्रह्मन्, माझ्या इच्छेनेंच तुझ्या ठिकाणीं ही सरस्वती प्रवृत्त झाली आहे. म्हणून हे ऋषिश्रेष्ठा, तूं रामाचें संपूर्ण चरित्र वर्णन कर. कारण जगतामध्यें तोच मनोहर असून विचारी, धर्मात्मा व भगवान असा तोच आहे. ह्यास्तव नारदापासून श्रवण केल्याप्रमाणें तूं त्या बुद्धिप्रेरक रामाचें वृत्त कथन कर. लक्ष्मणासहवर्त-

मान तो विचारी राम, सर्व राक्षस आणि विदेहदेशाधिपतीची कन्या सीता ह्यांचें प्रसिद्ध अथवा अप्रसिद्ध असें जें कांहीं चरित्र होईल, तें इतरांना जरी विदित नसलें तरी तुला विदित होईल. ह्यासंबंधानें तुझी वाणी यत्किंचित्‌हि असत्य होणार नाहीं. तस्मात्, मनोहर व पुण्यदायक अशी श्लोकबद्ध रामकथा तूं वर्णन कर. जोंपर्यंत पर्वत व नद्या भूतलावर राहतील, तोंपर्यंत रामायणकथा लोकांमध्यें प्रचारांत राहील; आणि जोंपर्यंत तूं ग्रथित केलेली रामकथा लोकांमध्यें राहील तोंपर्यंत (क्रोध केल्यामुळें) अधोभागीं राहण्यासच योग्य असलेलाहि तूं सर्वांचे ऊर्ध्वभागीं असलेल्या माझ्या लोकांमध्यें वास्तव्य करशील." ह्याप्रमाणें सांगून भगवान ब्रह्मदेव तेथेंच अंतर्धान पावले असतां शिष्यांसहवर्तमान भगवान वाल्मीकि मुनींना आश्चर्य वाटलें. नंतर वारंवार आनंदित होत असलेल्या त्या मुनींच्या सर्व शिष्यांनीं (मा निषाद) हा श्लोक पुनरपि म्हटला आणि अत्यंत विस्मत होऊन ते म्हणाले, "सारख्या अक्षरांनीं युक्त अशा चार चरणांमध्यें जो गाइला, तो अत्यंत शोकोत्पत्तीनंतर गाइल्यामुळें विपुल झालेला शोकच श्लोकत्व पावला; आणि अशा प्रकारच्या श्लोकांनीं आपण संपूर्ण रामायणकाव्य ग्रथित करावें अशी त्या शुद्धांतःकरणानें युक्त असलेल्या महर्षीला इच्छा झाली आहे." असो. ब्रह्मदेवाची आज्ञा झाल्यानंतर उदारचरितरूप अर्थाचीं बोधक पदें आणि सम अक्षरें ज्यांमध्यें आहेत अशा शेंकडों मनोहर श्लोकांच्या योगानें, उदारबुद्धि व कीर्तिमान वाल्मीकि मुनींनीं ह्या यशस्वी रामाची कीर्ति वृद्धिंगत करणारें असें काव्य ग्रथित केलें आहे. करितां समास व संधि ह्यांची योजना ज्यांमध्यें यथाशास्त्र केलेली आहे व न्यूनाधिक्यदोषरहित, माधुर्यगुणप्रधान आणि प्रसादगुणानें संपन्न अशा अर्थाचा बोध करणाऱ्या वाक्यांनीं जें ग्रथित केलें आहे, असें वाल्मीकिमहर्षी-प्रणीत रघुकुलश्रेष्ठरामचरितरूप व दशाननवधरूप काव्य तुम्ही श्रवण करा.

सर्ग तिसरा.

रामायणांतील कथा.

धर्म, अर्थ व काम ह्यांनीं युक्त व हितावह असें संपूर्ण चरित्र नारदापासून वाल्मीकि मुनींनीं श्रवण केलें आणि नंतर तें प्रसिद्ध करण्याकरितां ते मुनि उद्युक्त झाले. तदनंतर यथाविधि आचमन करून व हात जोडून वाल्मीकि मुनि

पूर्वाग्र दर्भावर बसले असतां, योगधर्मामुळें श्रीरामचरित्राचें ज्ञान त्यांना होऊं लागलें. राम, लक्ष्मण, सीता, राजा दशरथ, त्याच्या भार्या आणि त्याच्या राष्ट्रांतील लोक ह्यांच्या संबंधाचें जें खरें वृत्त, म्हणजे त्यांचें हास्य, भाषण, गमन व इतरहि सर्व आचरण, तें सर्व योगरूपधर्मबलानें वाल्मीकि मुनींच्या अगदीं जसेचें तसें दृष्टीस पडलें. त्याप्रमाचणें, लक्ष्मण व सीता ह्यांसहवर्तमान वनामध्यें संचार करीत असलेल्या सत्यवचनी रामाचें जें चरित्र, तेंहि सर्व वाल्मीकि मुनींच्या ध्यानांत आलें. सारांश, त्या रामावतारामध्यें जें घडलें, तें सर्व योगाचें अवलंबन केलेल्या धर्मात्म्या वाल्मीकि मुनींच्या लक्ष्यांत करतलामलकवत् पूर्वींच येऊन चुकलें; आणि ह्याप्रमाणें सौंदर्यसंपन्न रामाचें तें सर्व चरित्र योगरूप धर्माच्या योगानें महामति वाल्मीकि मुनींनीं यथार्थ अवलोकन केल्यावर कामरूप पुरुषार्थफलानें युक्त, धर्मार्थरूप पुरुषार्थफलानें विस्तृत (धर्म, अर्थ व काम ह्या त्रिवर्गांचें प्रतिपादक व प्रापक), समुद्राप्रमाणें रत्नांनीं भरलेलें व म्हणूनच कोणाच्याहि कानाला मधुर लागणारें अशा प्रकारचें त्या सर्व चरित्रासंबंधानें एक काव्य करण्यास ते उद्युक्त झाले आणि महात्म्या नारदांनीं पूर्वीं सांगितल्याप्रमाणें भगवान वाल्मीकि मुनींनीं रघुवंशामध्यें अवतीर्ण झालेल्या रामाचें चरित्र ग्रथित केलें. सारांश, रामाची उत्पत्ति, प्रचंड पराक्रम, सर्वांशीं अनुकूल वर्तन, लोकप्रियता, सहनशीलता, सौम्यपणा, सत्यनिष्ठा, विश्वामित्रमुनींसहवर्तमान जाते वेळीं झालेल्या आश्चर्यकारक गोष्टी व इतर कथा, जानकीचा विवाह, धनुर्भंग, रामपरशुरामसंवाद, दाशरथि रामाचे गुण, रामाभिषेक, कैकेयीचा दुष्टपणा, अभिषेक हाणून पाडणें, रामाला वनामध्यें पाठविणें, दशरथ राजाचा शोक व विलाप आणि त्यानें केलेला परलोकाचा आश्रय, प्रजाजनांना झालेलें दुःख, त्यांचें अयोध्येप्रत परावर्तन, गुहनामक निषादराजाशीं झालेला संवाद, सुमंत्र नामक सारथ्याला परत पाठविणें, गंगा तरून जाणें, भरद्वाज मुनींचें दर्शन, त्यांच्या संमतीनें चित्रकूट पर्वताचें दर्शन, त्या पर्वतावर गृह निर्माण करून राहणें, भरताचें आगमन, भरतानें रामाला प्रसन्न करून घेणें, पित्या दशरथाची उदकक्रिया, रामाच्या श्रेष्ठ पादुकांना भरतानें केलेला राज्याभिषेक, त्याचें नंदिग्रामीं वास्तव्य, दंडकारण्यामध्यें रामाचें गमन, विराध राक्षसाचा वध, शरभंगदर्शन, सुतीक्ष्णाशीं समागम, अनुसूयेचें सीतेला उटणें देणें, अगस्त्य मुनींचें दर्शन, त्यांच्यापासून धनुष्याची प्राप्ति, शूर्पणखेशीं संवाद व तिला विद्रूप करणें, खर आणि त्रिशिरा यांचा वध, राव-

णाचें उत्थान, मारीच राक्षसाचा वध, सीताहरण, रामविलाप, गृध्रराज जटायूचा वध, कबंधदर्शन, पंपा सरोवराचें दर्शन, शबरीची भेट, तेथें फलमूलभक्षण, पंपा सरोवरावर शोक, हनुमानाची भेट, ऋष्यमूक पर्वताप्रत गमन, सुग्रीवाची भेट, स्वसामर्थ्याविषयीं रामाचा सुग्रीवाचे ठिकाणीं विश्वास उत्पन्न करणें, त्याच्याशीं सख्य, वालि आणि सुग्रीव यांचें युद्ध, वालीचा वध, सुग्रीवाला राज्यावर बसविणें, तारेचा विलाप, पर्जन्यकाल संपेपर्यंत मी ह्या प्रस्रवण पर्वतावर वास्तव्य करीन म्हणून रामानें सुग्रीवाशीं केलेला संकेत व त्याप्रमाणें त्याचें प्रस्रवण पर्वतावर वास्तव्य, रामाचा कोप, सेनासंग्रह, वानरांना चोहोंकडे पाठविणें व त्यांना पृथ्वीवरील स्थलें सांगणें, रामाचें हनुमानाला अंगठी देणें, ऋक्षबिलदर्शन, वानरांचें प्रायोपवेशन म्हणजे कांहींएक न खातां समुद्रासमीप वास्तव्य, संपातीची भेट, हनुमानाचें महेंद्र पर्वतावर आरोहण, समुद्राचें उल्लंघन, समुद्राच्या सांगण्यावरून त्याला मैनाक पर्वताचें दर्शन, सुरसा नामक नागमातेनें राक्षसीचें रूप धारण करून हनुमानाला दाखविलेली भीति, छायेनें आकर्षण करण्यास प्रवृत्त झालेल्या सिंहिका राक्षसीचें हनुमानाला झालेलें दर्शन, त्याच्याकडून तिला आलेलें मरण, लंका आणि मलय पर्वत यांचें हनुमानाला झालेलें दर्शन, रात्रीं लंकेमध्यें त्याचा झालेला प्रवेश, एकटा असतांना त्याचा आपल्याशींच चाललेला विचार, पानभूमीप्रत गमन, अंत:पुरदर्शन, रावणदर्शन, पुष्पकविमानदर्शन, अशोक वनामध्यें गमन, त्या ठिकाणीं सीतेचें दर्शन, रामानें दिलेली खूण सीतेला देणें, तिच्याशीं संभाषण, राक्षसींनीं सीतेला दाखविलेले भय, त्रिजटा नामक राक्षसीला पडलेलें स्वप्न, 'खुणेकरितां हनुमानापाशीं सीतेनें केलेलें रत्नप्रदान, वृक्षभंग, राक्षसींची धांवाधांव, रावणसेवकांचा वध, रावणसेवकांचें मारुतीला धरणें, लंकादहन झाल्यामुळें तेथील रहिवाशांची रडारड, पुनरपि समुद्रोल्लंघन, मधुहरण, रामाश्वासन, सीतेनें दिलेलें रत्न रामाला अर्पण करणें, समुद्राशीं समागम, नलकृत सेतुबंधन, सेनेचें समुद्र तरून जाणें, रात्रीं लंकेला वेढा देणें, बिभीषणाची भेट, वधोपायकथन, कुंभकर्णाचें मरण, मेघनादाचा वध, रावणाचा वध, रावणरूप शत्रूच्या नगरामध्यें सीतेची प्राप्ति, बिभीषणाचा राज्याभिषेक, पुष्पक विमानदर्शन, अयोध्येकडे गमन, भरद्वाज मुनींचा समागम, मारुतीला पुढें पाठविणें, भरतभेट, रामाभिषेकोत्सव, सर्व सैन्याला जाण्याची अनुज्ञा देणें, स्वराष्ट्राला आनंदित करणें व सीतेचा त्याग करणें, हें आणि ह्याशिवाय भूतलावर जें कांहीं रामचरित्र व्हावयाचें होतें, तें सर्व भगवान वाल्मीकि मुनींनीं उत्कृष्ट काव्यामध्यें ग्रथित केलें.

सर्ग चौथा.

कुश-लवांची प्रशंसा व सत्कार.

आश्चर्यकारक शब्दांनीं युक्त आणि अर्थानें भरलेलें असें भगवान वाल्मीकि मुनींनीं राज्यावर आलेल्या रामाचें संपूर्ण चरित्र प्रतिपादन करणारें काव्य केलें. त्या काव्यामध्यें वाल्मीकि मुनींनीं चोवीस हजार श्लोक ग्रथित करून त्यांचे पांचशें सर्ग, सहा कांडें आणि त्याचप्रमाणें सातवें उत्तरकांड असे विभाग केले; आणि त्या महाबुद्धिमान् वाल्मीकि मुनींनीं भविष्य आणि उत्तरकांड यांसह-वर्तमान तें काव्य ग्रथित केल्यावर, 'हें पठण करून सभेमध्यें सभासदांच्या कानांवर घालण्यास कोण समर्थ आहे' म्हणून ते चिंतन करूं लागले. असो. शुद्धांतःकरणानें युक्त असलेले महर्षि वाल्मीकि ह्याप्रमाणें चिंतन करीत आहेत तोंच मुनिवेष धारण करणाऱ्या कुश-लवांनीं "आम्ही गाणारे आहों" असें म्हणून त्यांचे पाय धरिले असतां धर्मज्ञ, यशस्वी, मधुर स्वरानें युक्त, बुद्धिमान् आणि वेदपारंगत असे ते आश्रमवासी राजपुत्र कुश-लव असल्याचें अवलोकन करून, समर्थ वाल्मीकि मुनींनीं वेदाचें पुष्टीकरण होण्याकरितां त्यांना हें रामायण काव्य पढविलें. सारांश, संपूर्ण रामचरित्र व सीताचरित्र प्रतिपादन करणारें असें पौलस्त्यवध नांवाचें मोठें काव्य तपोनिष्ठ वाल्मीकि मुनींनीं केलें. पठण व गायन होऊं लागलें असतां मधुर लागणारें द्रुत, मध्य व विलंबित हीं तीन प्रमाणें, सप्तस्वर, तंतुवाद्यांचा मेळ आणि त्याचप्रमाणें शृंगार, करुण, हास्य, रौद्र, भयानक, वीर इत्यादि रस यांनीं युक्त असलेलें हें काव्य त्यांनीं गाइलें. सारांश, संगीतशास्त्रतत्त्वज्ञ, स्थान[१] व मूर्च्छना[२] यांविषयीं निपुण, स्वरमाधुर्यसंपन्न, गंधर्वाप्रमाणें रूपवान्, देहस्थ शुभ लक्षणांनीं युक्त, मधुर वाणीनें भाषण करणारे आणि सूर्यादिकांच्या बिंबापासून निघणाऱ्या प्रतिबिंबाप्रमाणें साक्षात् रामदेहापासून उत्पन्न झालेले प्रतिरामदेहच कीं काय असे ते निर्दोष व तत्त्ववेत्ते राजपुत्र, धर्माला अनुसरून असलेलें तें उत्कृष्ट काव्य सर्व तोंडपाठ करून ऋषि, द्विज आणि भगवद्भक्त यांच्या समाजांमध्यें सावधानचित्तपूर्वक पढविल्याप्रमाणें गाऊं लागले.

---

१ हृदयग्रंथि व कपोलफलक ह्यांमध्यें असलेल्या प्राणसंचाराच्या जागेला 'स्थान' असें म्हणतात. २ ज्या गीतामध्यें स्वर पूर्ण असतात त्याला 'मूर्च्छना' असें म्हणतात.

एकदां शुद्धांतःकरणानें युक्त अशा एकत्र जमलेल्या ऋषींच्या सभेमध्यें ऋषींसमीप बसून ते सर्वलक्षणसंपन्न महात्मे व महाभाग्यवान कुश-लव हें काव्य गाऊं लागले. तेव्हां तें श्रवण करितांक्षणीं सर्व मुनींचे नेत्र अश्रूंनीं भरून आले आणि अत्यंत विस्मित होऊन "शाबास, शाबास" असें ते त्यांना म्हणाले. तात्पर्य, अंतःकरणामध्यें प्रसन्न झालेल्या त्या धर्मनिष्ठ मुनींनीं, "कायहो, हें गायन मधुर आहे! आणि विशेषेंकरून श्लोक तरी कितीहो मधुर आहेत! अहो, या गोष्टी घडून आज पुष्कळ दिवस झाले आहेत तरी त्या जणूं प्रत्यक्ष घडतच आहेत असें यांनीं दर्शविलें! अहो, सभेमध्यें बरोबर प्रविष्ठ झालेल्या या उभयतांनीं सप्तस्वरांमध्यें गाण्यास योग्य व मधुर असें ह्या काव्याचें इतक्या कांहीं मजेनें गायन केलें आहे कीं, त्यांतील अभिप्राय श्रोत्यांच्या अंतःकरणांत ठसून त्यांचें अंतःकरण तन्मय होऊन गेलें आहे." अशा रीतीनें प्रशंसेस पात्र असलेल्या कुश-लवांची गातांना स्तुति केली. ह्याप्रमाणें तपाच्या योगानें स्तुतीस पात्र झालेले महर्षी त्यांची प्रशंसा करूं लागले असतां त्यांनीं अत्यंत मधुर असें फारच खुलवून गायन केलें. तेव्हां तेथें बसलेल्या एका मुनींनीं संतुष्ट होऊन त्यांना आपला कलश अर्पण केला; दुसऱ्या एका महाकीर्तीमान मुनींनीं प्रसन्न होऊन आपलें वल्कलच त्यांना देऊन टाकिलें; एकांनीं कृष्णाजिन दिलें; एकांनीं यज्ञोपवीत अर्पण केलें; कोणीं कमंडलु दिला; दुसऱ्या एका महर्षींनीं मौंजी देऊन टाकिली; एकांनीं आपलें आसन दिलें; दुसऱ्या एका मुनींनीं आपली लंगोटीच त्यांना देऊन टाकिली; एका मुनींनीं आनंदित होऊन आपली कुऱ्हाडच त्यांना दिली; एकांनीं आपली छाटीच दिली; दुसऱ्या एका मुनींनीं आपणापाशीं असलेलें फडकेंच त्यांना देऊन टाकिलें; एकांनीं आपलें जटाबंधन दिलें; दुसऱ्या एकांनीं आनंदित होऊन आपली काष्ठें आणण्याची दोरी त्यांना दिली; एका ऋषींनीं आपलीं यज्ञपात्रेंच त्यांना अर्पण केलीं; एकांनीं आपल्यापाशीं असलेलें काष्ठांचें ओझेंच त्यांना दिलें; आणि एकांनीं आपला बसावयाचा उंबराचा पाटच त्यांना देऊन टाकिला. ज्यांच्यापाशीं त्या सभेंतल्यासभेंत देण्याला कांहीं नव्हतें, त्यांनीं 'कल्याण, कल्याण' म्हणून नुसते आशीर्वादच दिले; आणि तशाच प्रकारच्या दुसऱ्या कांहीं अकिंचन महर्षींनीं 'तुह्मांला दीर्घायुष्य प्राप्त होवो' म्हणून मोठ्या आनंदानें त्यांना सांगितलें. सारांश, ज्यांची वाणी कधींहि असत्य होणार नाहीं अशा सर्व मुनींनीं ह्याप्रमाणें त्यांना वर दिले आणि पुनरपि ते त्यांना म्हणाले, "हे कुमारहो,

तुम्ही सर्व प्रकारच्या गायनामध्यें निपुण आहां. वाल्मीकि मुनींनीं केलेलें हें आख्यान आश्चर्यकारक असून कवींना सर्वोत्कृष्ट आधार होण्याजोगें आहे. त्याचप्रमाणें गायनाला योग्य असेंच हें आख्यान आहे. तुम्हींहि याचें चांगलें गायन करून क्रमानें समाप्त केलें आहे व हें आख्यान कोणींहि ऐकिलें असतां त्याला मनोहर लागणारें असून आयुर्वर्धक व अभ्युदयकारक असें आहे.

ह्याप्रमाणें लहानमोठया रस्त्यांतून सर्व ठिकाणीं अयोध्येमध्यें ज्यांची प्रशंसा होत आहे अशा त्या गायकांना भरताग्रज रामानें अवलोकन केलें आणि पूजेला पात्र असलेल्या त्या भ्रात्या कुश-लवांना आपल्या घरीं आणून शत्रुनाशक रामानें त्यांचें पूजनहि केलें. नंतर समीप बसलेल्या मंत्र्यांनीं व भ्रात्यांनीं युक्त असलेला तो प्रभु राम, सुवर्णमय अशा दिव्य सिंहासनावर बसला असतांना नम्र व रूपवान् अशा त्या उभयतां भ्रात्यांना अवलोकन करून, " देवांप्रमाणें तेजस्वी असलेल्या ह्या उभयतांचें आश्चर्यकारक अर्थ व शब्द ह्यांनीं युक्त असलेलें हें आख्यान श्रवण करा " म्हणून लक्ष्मण, शत्रुघ्न व भरत ह्यांना म्हणाला; आणि तें गाण्याविषयीं त्यानें त्या गायकांना सांगितलें. त्यांनींहि आपल्या बलाचें अतिक्रमण न होऊं देतां श्रोत्यांच्या चित्ताला आल्हाद होईल अशा रीतीनें मधुर, प्रसादानें परिपूर्ण, तंतुवाद्यांशीं जुळण्यास योग्य आणि अत्यंत उत्तानअर्थानें युक्त असें तें आख्यान गाऊन दाखविलें. गायनाला विषयभूत असलेलें तें आख्यान त्या जनसमाजामध्यें लोकांच्या गात्रांवर रोमांच उठविणारें, मनाला आणि आत्म्याला आनंद देणारें व श्रवणेंद्रियाला सुखावह असें झालें. असो. गायन सुरू होण्याचे पूर्वीं राम पुनरपि लक्ष्मणादिकांना म्हणाला, " राजचिन्हांनीं युक्त असलेले हे महातपस्वी कुश-लव मुनि शब्दार्थालंकारादिविषयक महावैभवानें संपन्न असलेलें चरित्र गात आहेत आणि हें काव्य व त्याचें श्रवण माझ्याहि अभ्युदयाला कारणीभूत होणारें आहे, म्हणून वृद्धजन सांगत आहेत; करितां आदरपूर्वक तुम्ही हें श्रवण करा. तदनंतर रामाच्या तोंडची आज्ञा झाल्यावर ते कुश-लव मार्गसंज्ञक[१]गायनपद्धतीला उपयुक्त अशा सामग्रीनें गायन करूं लागले असतां, आपलें चरित्र चिरकाल रहावें ह्या इच्छेनें सभेमध्यें असलेल्या रामाचेंहि मन तें गायन श्रवण करण्याविषयीं आसक्त झालें.

१ देशी आणि मार्ग असें दोन प्रकारचें गायन असतें. पैकीं प्राकृत भाषेंतील गायनाला देशी असें म्हणतात व संस्कृत गायनाला मार्ग असें म्हणतात.

सर्ग पांचवा.

रामायणाचा आरंभ.

अयोध्यावर्णन.

ऐहिक व पारलौकिक असें सर्व प्रकारचें अपूर्व फल प्राप्त होण्याला साधन असलेली ही संपूर्ण पृथ्वी, पूर्वीं प्रजाधिपति वैवस्वत, मनु आदिकरून होऊन गेलेल्या जयशाली राजांच्या ताब्यांत होती. सागर खणिलेला सगर हा त्यांच्या वंशामध्यें राजा होऊन गेला. तो जाऊं लागला असतां साठ हजार पुत्र त्याचे बरोबर जात असत. त्या महात्म्या इक्ष्वाकुवंशज राजांच्या वंशासंबंधानें रामायण ह्या नांवानें प्रसिद्ध असलेलें मोठें आख्यान उत्पन्न झालेलें आहे; व तेंच सर्वांगांनीं परिपूर्ण असलेलें हें रामायण आम्ही अगदीं प्रथमपासून पूर्णपणें कथन करणार आहों. तें धर्म, काम व अर्थ ह्यांसहवर्तमान मोक्षाला कारणीभूत होणारें असल्यामुळें निर्मत्सर पुरुषानें श्रवण करण्यास योग्य आहे. सरयू नदीचें तीरीं कोशल म्हणून एक मोठा देश आहे. त्यांत धनधान्याची समृद्धि आहे. त्यांतील लोक आनंदित आहेत व उत्तरोत्तर त्या देशाची अभिवृद्धि होत आहे. त्या देशामध्यें मानवाधिपति मनूनें स्वत: निर्माण केलेली अशी एक अयोध्या नांवाची जगद्विख्यात नगरी आहे. त्या मोठ्या नगरीची लांबी अठ्ठेचाळीस कोस असून रुंदी बारा कोस आहे. आणि ती नगरी वैभवसंपन्न असून स्पष्ट अशा बाह्य मार्गांनीं युक्त आहे. प्रत्यहीं उदक सिंचन करून ज्यावर मोतीं व फुलें उधळलीं जातात, अशा मोठ्या भव्य राजमार्गानें तिला शोभा आलेली आहे. स्वर्गामध्यें ज्याप्रमाणें देवाधिपति इंद्रानें अमरावती नगरी बसविली, त्याप्रमाणें प्रचंड राष्ट्राचें पालनपोषण करणाऱ्या दशरथ राजानें त्या मनुनिर्मित नगरीमध्यें पूर्वीपेक्षां अधिक लोकवस्ती केली आणि तिला शोभा आणिली. त्या नगरीला सर्व बाजूंनीं वेशी व कमानी आहेत. एकमेकांपासून चांगल्या नियमित अंतरांनीं युक्त असे बाजार तिच्यामध्यें आहेत. आणि सर्व प्रकारचीं यंत्रें व आयुधें यांनीं ती युक्त असून सर्व प्रकारच्या कारागिरांनीं तिच्यामध्यें वास्तव्य केलेलें आहे. स्तुतिपाठक आणि भाट त्या भव्य नगरीमध्यें भरलेले आहेत. उंच उंच वाडे व ध्वज तिच्यामध्यें आहेत. आणि अतुल शोभेनें युक्त असलेली ती नगरी शेंकडों तोफांनीं गजबजलेली आहे. स्त्रियांच्या नृत्यशाला त्या नगरीमध्यें

जिकडे तिकडे आहेत. बागा आणि आंबराया ह्यांनीं ती युक्त आहे. आणि सभोंवतीं त्या नगरीला तटबंदी आहे. किल्ले आणि अगाध खंदक ह्यांनीं युक्त असल्यामुळें स्वकीयांनाहि ती प्रवेश करण्यास कठीण असून शत्रूंना तर समीप जाण्यासहि अशक्य आहे. अश्व व गज ह्यांनीं ती भरलेली असून बैल, उंट, गर्दभ आणि कर देण्याकरितां आलेले मांडलिक राजांचे समुदाय यांनीं गजबजलेली आहे. देशोदेशींच्या व्यापाऱ्यांनीं तिला शोभा आलेली असून रत्नखचित अशा पर्वतप्राय देवालयांनीं ती सुशोभित आहे. आणि इंद्राच्या अमरावतीप्रमाणें स्त्रियांच्या क्रीडाभुवनांनीं ती परिपूर्ण आहे. तिचा आकार अष्टपैलू असून उत्तम स्त्रीसमुदायांनीं ती युक्त आहे. आणि त्याचप्रमाणें सर्व रत्नांनीं ती भरलेली असून सात सात मजली घरांनीं सुशोभित झालेली आहे. तिच्यामध्यें घरांची अगदीं खेचाखेच झाली असून मोकळी जागा कोठेंहि राहिलेली नाहीं. सपाट भूमीवर तिची रचना केलेली आहे. शालितंडुलांनीं ती परिपूर्ण आहे. आणि इक्षुरसासारख्या स्वादिष्ट उदकानें ती युक्त आहे. दुंदुभि, मृदंग, वीणे व नगारे ह्यांनीं ती एकसारखी अत्यंत नादित झालेली असते. तपश्चर्येनें स्वर्गामध्यें सिद्ध लोकांना प्राप्त झालेलें विमानच कीं काय अशा प्रकारें ती नगरी सर्व पृथ्वीमध्यें अनुपम असून, तिच्यांतील घरांच्या अंतस्थ व बाह्य प्रदेशांची रचनाहि चांगली व्यवस्थित केलेली आहे. आणि उत्तम पुरुषांच्या योगानें ती व्याप्त झालेली आहे. इतकेंच नव्हे, परंतु मत्त होऊन अरण्यामध्यें गर्जना करणारे सिंह, व्याघ्र व वराह ह्यांचा, केवळ तीक्ष्ण शस्त्रांनींच नव्हे तर बाहुबलाचें अवलंबन करून स्वसामर्थ्यानेंच वध करण्यास समर्थ आणि धनुर्विद्येमध्यें निपुण असल्यामुळें शीघ्रवेधी—परंतु जो सहाय्यरहित झालेला आहे, पुढेंमागें कोणी नसल्यामुळें जो अनाथ आहे, भीतीनें दडून बसल्यामुळें केवळ शब्दानुमानावरूनच ज्याला वेध होण्याचा संभव आहे आणि युद्धांतून जो पलायन करीत आहे त्यावर बाण न टाकणारे—अशा प्रकारचे जे हजारों महारथी, त्यांच्या योगानें परिपूर्ण होती व ती दशरथ राजानें आणखी जास्त वसविली. सारांश, अहिताग्नि व वेदवेदांगपारंगत असे गुणवान ब्राह्मण, सत्यनिष्ठ व आचरणानें महार्षींसारखे असून याचकांना हजारांनीं दान करणारे महात्मे क्षत्रिय, आणि श्रेष्ठ श्रेष्ठ ऋषि ह्यांनीं व्याप्त असलेली ती नगरी दशरथ राजानें अधिक वसविली.

सर्ग सहावा.

अयोध्यावासी लोकांचें वर्णन.

त्या अयोध्या नगरीमध्यें दशरथ राजा होऊन गेला. तो वेदवेत्ता, सर्व वस्तूंचा संग्रह करणारा, दूरदर्शी, महाप्रतापी, लोकप्रिय, इक्ष्वाकुवंशजांतील अतिरथि, यथाविधि यज्ञयाग केलेला, धर्मनिष्ठ, मनोनिग्रही, महर्षितुल्य, त्रैलोक्यामध्यें प्रख्यात असा राजर्षि, बलाढ्य, शत्रु नाहींतसे केलेला, मित्रांनीं युक्त व जितेंद्रिय असून द्रव्य व इतर धान्यादि संचय ह्यांच्या योगानें तर इंद्र व कुबेर ह्यांच्याशीं बरोबरी करणारा होता. तो दशरथ राजा महातेजस्वी मनूप्रमाणें लोकांचें सर्वस्वी रक्षण करीत असे. सारांश, धर्म, अर्थ व काम ह्या त्रिवर्गांचें अवलंबन करणाऱ्या त्या सत्यवचनी दशरथ राजानें, इंद्रानें रक्षण केलेल्या अमरावती नगरीप्रमाणें त्या श्रेष्ठ नगरीचें रक्षण केलें होतें. त्या श्रेष्ठ राजधानींतील लोक आनंदित, धर्मनिष्ठ, बहुश्रुत, स्वतःपाशीं असलेल्या द्रव्यावर संतुष्ट, निर्लोभी आणि सत्यवादी असे होते. अल्पसंचयी, ऐहिक व पारलौकिक फल प्राप्त न झालेला आणि गायी, अश्व वगैरे पशु व धनधान्य ह्यांची समृद्धि नसलेला असा एकहि कुटुंबी गृहस्थ त्या श्रेष्ठ नगरीमध्यें नव्हता आणि त्याचप्रमाणें विषयलंपट, दुष्ट, अविद्वान अथवा नास्तिक असाहि कोणी पुरुष अयोध्येमध्यें कोठेंहि दृष्टीस पडणें शक्य नव्हतें. कारण, तेथील सर्व पुरुष व स्त्रिया शील आणि आचरण ह्यांच्या योगानें महर्षींप्रमाणें निर्मल असून धर्मनिष्ठ, उत्कृष्ठ इंद्रियनिग्रही आणि आनंदित असत. कर्णकुंडलविरहित, मुकुटरहित, मालाहीन, घामट, चंदनाची वगैरे उटी न लावलेला, सुगंधरहित अथवा भोग्य वस्तु ज्याच्यापाशीं कमी आहेत असा एकहि पुरुष तेथें नसे. अस्वच्छ अन्न भक्षण करणारा, दातृत्वहीन, बाहुभूषणें आणि उरोभूषणें धारण न करणारा, हस्तभूषणरहित अथवा मनोनिग्रह न केलेला असा कोणीहि त्या ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येत नसे. अग्नि सिद्ध न ठेविलेला, सोमयाग न केलेला, क्षुद्र, चोर, सदाचरणरहित अथवा परस्त्रीशीं गमन करणारा असा कोणीहि अयोध्येमध्यें नव्हता. तेथील ब्राह्मण जितेंद्रिय, दान व अध्ययन ह्यांविषयीं तत्पर, प्रतिग्रह करण्याविषयीं संकोच धरणारे आणि नेहमीं स्वकर्मांवर निष्ठा ठेवणारे असे होते. नास्तिक, असत्य भाषण करणारा, बहुश्रुत नसलेला, मत्सरी, अशक्त अथवा अविद्वान असा कोणीहि द्विज तेथें नसे.

वेदाचीं सहा अंगें माहीत नसलेला, व्रतवैकल्यांचें अवलंबन न करणारा, थोडकें अध्ययन केलेला, दीन, अस्वस्थचित्त अथवा व्याधिग्रस्त असा कोणीहि तेथें नव्हता. दरिद्री, कुरूप अथवा राजाचे ठिकाणीं भक्ति नसलेला असा कोणीहि पुरुष अथवा स्त्री अयोध्येमध्यें दृष्टीस पडणें शक्य नव्हतें. ब्राह्मणप्रभृति चारहि वर्णांतील लोक देव आणि अतिथि ह्यांचें पूजन करणारे, कृतज्ञ, उदार, शूर आणि पराक्रमी असे होते. त्या श्रेष्ठ राजधानींतील सर्व लोक दीर्घायु असून पुत्र, पौत्र आणि स्त्रिया ह्यांसहवर्तमान सर्वच धर्म व सत्य ह्यांचा आश्रय करून राहणारे होते. क्षत्रिय ब्राह्मणांच्या आज्ञेंत असत वैश्य क्षत्रियांना अनुसरून वागत आणि शूद्र स्वकर्माविषयीं तत्पर असत; म्हणजे तीन वर्णांची सेवा करीत असत. सारांश, पूर्वींच्या विचारी मानवाधिपति मनूप्रमाणें त्या विवेकी इक्ष्वाकुकुलाधिपति दशरथ राजानें त्या नगरीचें संरक्षण केलें होतें. तेजानें अग्नितुल्य, स्वभावानें सरळ, अपमान सहन न करणारे आणि शस्त्रास्त्रादि विद्यांमध्यें प्रवीण अशा योद्धयांनीं भरलेली ती नगरी सिंहाची गुहाच कीं काय अशी भासत असे. कांबोज, बाल्हीक, वनायुज आणि सिंधुनदासमीपचा प्रदेश ह्या ठिकाणच्या उत्कृष्ट अश्वांनीं ती नगरी परिपूर्ण होती, व ते अश्व इंद्राच्या उच्चैःश्रवा नामक अश्वाप्रमाणें उत्तम होते. विंध्याद्रि व हिमालय ह्या प्रदेशांत उत्पन्न झालेल्या आणि मदस्राव चालला असल्यामुळें मत्त असलेल्या अशा पर्वतप्राय अतिबलाढ्य गजांनीं ती नगरी परिपूर्ण होती. ऐरावत, महापद्म, अंजन व वामन ह्या दिग्गजांच्या वगैरे कुलांत उत्पन्न झालेल्या गजांनींहि ती नगरी भरलेली होती; आणि भद्र[1], मंद्र[2], मृग[3], भद्रमंद्रमृग[4], भद्रमंद्र[5], भद्रमृग, व मृगमंद्र अशा सर्वदा मत्त आणि पर्वतासारख्या धिप्पाड गजांनींहि ती नगरी नेहमीं भरलेली असे; व युद्धामध्यें जिंकली जाणें सर्वस्वी अशक्यच असल्यामुळें ' अयोध्या ' हें नाम अगदीं यथार्थ धारण करणारी ती नगरी आसपास आठ-आठ कोसपर्यंत प्रकाशत असे. असो. नक्षत्रलोकांवर अंमल करणारा चंद्रच कीं काय असा तो शत्रु नाहींतसे झालेला महातेजस्वी दशरथ राजा त्या नगरीवर अधिकार चालवीत असे. सारांश, यथार्थ नाम धारण करणारी, बळकट कमानी व अडसर यांनीं युक्त असलेली, चित्रविचित्र घरांनीं सुशोभित झालेली आणि

---

१ हिमालय पर्वतावरील गज. २ विंध्याद्रीवरील गज. ३ सह्याद्रीवरील गज. ४ तीनहि जातींतील गुण ज्यांमध्यें आढळनात असे गज. ५ दोन जातींतील गुण ज्यांमध्यें दृष्टोत्पत्तीस येतात असे गज.

हजारों लोकांनीं गजबजून गेलेली जी कल्याणकारक अयोध्या नगरी, तिचें, गुणांनीं इंद्रासमान असलेल्या दशरथ भूपतीनें परिपालन केलें.

सर्ग सातवा.

दशरथाच्या अमात्यांचें वर्णन.

त्या महात्म्या इक्ष्वाकुवंशज दशरथ राजाचे अमात्य स्वकर्माला उपयोगी पडणाऱ्या अशा गुणांनीं युक्त होते; म्हणजे कोणत्या वेळीं काय करावें हें त्यांना चांगलें समजत असे. दुसऱ्याच्या मनांतील अभिप्राय ते ओळखीत असत आणि स्वतःला प्रिय जो दशरथ राजा, त्याचें हित करण्याविषयीं ते तत्पर असत. त्या यशस्वी व वीर दशरथ राजाचे अमात्य आठ असून ते आचरणानें शुद्ध व राजकार्याविषयीं नित्य तत्पर असे असत. धृष्टि, जयंत, विजय, सुराष्ट्र, राष्ट्रवर्धन, अकोप, धर्मपाल आणि आठवा सुमंत्र हे ते अमात्य होत. ऋषिश्रेष्ठ वसिष्ठ व वामदेव हे दोन त्याचे मुख्य ऋत्विज होते व ह्या अमात्यांशिवाय त्याचे इतरहि मंत्री होते. सुयज्ञ, जाबालि, काश्यप, गौतम, दीर्घायु मार्कंडेय आणि कात्यायन ह्या ब्रह्मर्षींशीं त्याच्या परंपरागत ऋत्विजांचा नित्य समागम होत असे. त्या दशरथ राजाचे अमात्य विद्या व विनय ह्यांनीं संपन्न, अन्नूची चाड बाळगणारे, राजकार्याविषयीं कुशल, जितेंद्रिय, वैभवशाली, मनाचे मोठे, शास्त्रवेत्ते, अमोघ पराक्रमी, कीर्तिमान, दक्ष, राजाज्ञेनुरूप वर्तन करणारे, तेज, कांति व यश ह्यांनीं युक्त, हास्यपूर्वक भाषण करणारे आणि काम, क्रोध अथवा द्रव्य (लोभ) ह्यांना वश होऊन कधींहि अनृत भाषण न करणारे असे होते. स्वकीयांकडे अथवा परकीयांकडे काय चाललें आहे, काय झालें आहे आणि काय उद्दिष्ट आहे तें सर्व त्यांना हेरांच्या योगानें विदित असे. व्यवहारामध्यें ते निपुण होते. सौहृदाविषयीं ते राजाच्या परीक्षेला उतरलेले होते. आणि वेळ आली म्हणजे पुत्रांनाहि यथायोग्य दंड करण्यास ते मागेंपुढें पाहणारे नव्हते. कोश व सैन्य ह्यांचा संग्रह करण्याविषयीं ते तत्पर असत आणि अपराधी नसेल तर शत्रूलाहि धक्का लावीत नसत. ते दशरथ राजाचे अमात्य शूर, उत्साहसंपन्न, नीतिशास्त्रानुसार वागणारे आणि आपल्या देशांत राहणाऱ्या सदाचरणी लोकांचें नित्य रक्षण करणारे असे होते. ते अमात्य जरी अपराध्याला चांगला कडक दंड करणारे असत तरी अपराधी पुरुषाचें बलाबल पाहून दंड

करीत; आणि ब्राह्मण, क्षत्रिय वगैरे प्रजेला उपद्रव न देतां द्रव्यभांडाराची भर करीत असत. आचरणानें शुद्ध व एकमतानें वागणारे असे ते सर्व अमात्य राजधानींतील आणि राष्ट्रांतील वृत्तांताचा विचार करूं लागले असतां राष्ट्रांत अथवा राजधानींत कोणीहि असत्यवादी पुरुष असल्याची हकीकत त्यांच्यांत निघत नसे. परस्त्रीविषयीं आसक्त असा कोणीहि दुष्ट पुरुष त्या ठिकाणीं नव्हता. राजधानी व सर्व राष्ट्र ह्यांमध्यें जिकडेतिकडे शांतता होती. दशरथ राजाचे ते सर्वहि अमात्य उज्ज्वल वस्त्रें व उत्तम वेष धारण करणारे असून आचरणानें शुद्ध होते. आणि राजाचें हित हाच एक उद्देश मनांत धरून नीतिरूप दृष्टीनें ते सारखे जागत होते. गुरु व राजा ह्यांना ते गुणवान म्हणून अभिमत असत. स्वपराक्रमानें ते प्रख्यात असत. आणि कोणत्याहि विषयासंबंधानें बुद्धीला संशय नसल्यामुळें परदेशामध्यें त्यांची ख्याति असे. ते कधींहि गुणरहित नसून सर्वदा गुणवान असत. ते संधि आणि विग्रह यांचें तत्त्व जाणीत असत. आणि सात्त्विक, राजस व तामस अशा त्रिगुणसंपत्तीनें ते युक्त असत. सल्लामसलत अगदीं गुप्त ठेवण्याविषयीं ते दक्ष असत. सूक्ष्म विचार करण्यास ते समर्थ असत. नीतिशास्त्रांतील विशेष गोष्टी त्यांना चांगल्या अवगत असत आणि ते नेहमीं प्रिय भाषण करीत असत. अशा प्रकारच्या त्या गुणी अमात्यांनीं युक्त असलेल्या निष्पाप दशरथ राजानें पृथ्वीचें राज्य केलें. त्रैलोक्यामध्यें विख्यात, उदार, सत्यवचनी आणि हेरांच्या योगानें चोहोंकडे दृष्टि देत असलेल्या त्या पुरुषश्रेष्ठ दशरथ राजानें धर्मतः प्रजांचें रक्षण व्हावें—अधर्मवर्जनपूर्वक प्रजापालन व्हावें—एतदर्थ ह्या पृथ्वीचें राज्य केलें. स्वतःची बरोबरी करणारा अथवा स्वतःपेक्षां अधिक असा एकहि रिपु त्याच्या आढळण्यांत आला नाहीं. तो सुहृदांनीं युक्त असे. मांडलिक राजे त्याला नमून असत. त्याच्या प्रतापामुळें सर्व प्रजापीडकांचा नायनाट झालेला असे आणि म्हणूनच स्वर्गामध्यें राज्य करणाऱ्या देवाधिपति इंद्राप्रमाणें तो राजा ह्या जगताचें राज्य करीत असे. ह्यामुळें, तेजोमय किरणांनीं युक्त असा उदय पावलेला सूर्यच कीं काय अशा रीतीनें, विचारसाध्य, हिताविषयीं तत्पर, प्रभूविषयीं अनुरक्त, राजकार्यनिपुण आणि तें पार पडण्याविषयीं समर्थ अशा मंत्र्यांनीं परिवेष्ठित असलेला तो राजा देदिप्यमान दिसत असे.

सर्ग आठवा.

पुत्रकामेष्टियज्ञाविषयीं दशरथाचा निश्चय.

ह्याप्रमाणें प्रतापी, धर्मज्ञ आणि उदार अंतःकरणानें युक्त असा दशरथ राजा पुत्राकरितां तपश्चर्या करीत असतांहि त्याला वंश चालविणारा पुत्र प्राप्त झाला नाहीं. तेव्हां पुत्रप्राप्तीकरितां मी अश्वमेध याग कां करूं नये अशी गोष्ट विचार करितां करितां त्याच्या मनामध्यें आली; आणि शुद्ध अंतःकरणानें युक्त असलेल्या सर्व मंत्र्यांसहवर्तमान त्या धर्मात्म्या व विचारी दशरथ राजानें "अश्वमेधयाग करावा" असा पक्का विचार केला. नंतर त्या महातेजस्वी राजानें सुमंत्र नामक अमात्याला 'पुरोहितासहवर्तमान सर्व गुरूंना सत्वर माझ्याकडे घेऊन ये' म्हणून सांगितलें असतां, शीघ्र गमन करणारा सुमंत्र सत्वर गेला आणि सर्व गुरूंना व सुयश, वामदेव, जाबालि, काश्यप, पुरोहित, वसिष्ठ आणि इतरहि श्रेष्ठ वेदपारंगत अशा द्विजांना बरोबर घेऊन आला. तेव्हां त्यांचें पूजन करून धर्मात्म्या दशरथ राजानें धर्म व अर्थ ह्यांना अनुलक्षून असलेलें स्पष्ट भाषण त्यांच्याशीं केलें.

दशरथ म्हणाला:—"पुत्राकरितां शोक करीत असलेल्या मला सुख होत नाहीं. ह्यास्तव पुत्रप्राप्ति होण्याकरितां अश्वमेध याग करावा असा माझा विचार आहे व त्याप्रमाणें यथाशास्त्र अनुष्ठानानें याग शेवटास नेण्यास मी उत्सुकहि झालों आहें. तेव्हां कोणत्या प्रकारानें माझा मनोरथ सिद्धीस जाईल, याविषयीं आपण कांहीं विचार करा."

राजाच्या ह्या भाषणाची वसिष्ठप्रभृति सर्व ब्राह्मणांनीं "उत्तम उत्तम" म्हणून प्रशंसा केली; आणि अतिशय प्रसन्न होऊन ते सर्व ब्राह्मण दशरथाला म्हणाले, "यज्ञाच्या साहित्याची जुळवाजुळव होऊं द्या व अश्व सोडून - सरयू नदीचे उत्तरतीरीं यज्ञभूमि तयार होऊं द्या. राजा, ज्या अर्थी पुत्रप्राप्तीकरितां हा धार्मिक विचार तुझ्या मनामध्यें आला आहे, त्या अर्थी तुला खरोखर मनाप्रमाणें पुत्र प्राप्त होतील."

ह्याप्रमाणें द्विजांचें भाषण श्रवण करून राजा संतुष्ट झाला आणि आनंदाश्रूंनीं डोळे भरून आले असतां आपल्या अमात्यांना म्हणाला, "गुरूंनीं सांगितल्याप्रमाणें साहित्याची जुळवाजुळव होऊं द्या, अश्व धरणाऱ्यांचा पराभव करण्यास समर्थ अशांच्या देखरेखीखालीं व उपाध्याय बरोबर देऊन अश्व सुटूं

द्या, सरयू नदीच्या उत्तरतीरीं यज्ञभूमि तयार होऊं द्या आणि सूत्रांत सांगितल्याप्रमाणें विघ्ननिवारणार्थ शांतिकर्में यथाविधि होऊं द्या. अहो, सर्वगुणसंपन्न जरी राजा झाला, तरी त्याच्या हातून हा अश्वमेध याग शेवटास जाणें शक्य आहे काय ? ह्या श्रेष्ठ क्रतूच्या अनुष्ठानामध्यें जर मोठासा प्रमाद नच झाला, तर मात्र कदाचित् तो शेवटास जाण्याचा संभव आहे. कारण, विद्वान् विद्वान् ब्रह्मराक्षस ह्या क्रतूमध्यें कोठें न्यून पडेल हें पहात असतात आणि त्यामुळें यज्ञानुष्ठान अविधि झालें असतां कर्त्याचा तत्काल नाश होतो. ह्यास्तव हा माझा याग यथाविधि शेवटास जाईल अशा रीतीनें तुम्ही यत्न करा. तुम्ही साधनें जुळविण्याविषयीं समर्थ आहां."

याप्रमाणें नृपश्रेष्ठ दशरथ राजाचें भाषण श्रवण करून ते सर्व राजमान्य मंत्री 'ठीक आहे' असें म्हणाले. नंतर त्या सर्व धर्मवेत्त्या ब्राह्मणांनीं नृपश्रेष्ठ दशरथाला आशीर्वाद दिले आणि राजाची अनुज्ञा झाल्यावर ते सर्व पुनरपि आल्या मार्गानें चालते झाले. त्या विप्रांना जाण्याची अनुज्ञा दिल्यावर, "ऋत्विजांनीं सांगितल्याप्रमाणें याग यथाविधि शेवटास नेण्याच्या उद्योगाला लागा" असें त्या राजानें पुन: आपल्या मंत्र्यांना सांगितलें; आणि नंतर त्यांना जाण्याची अनुज्ञा देऊन तो महाविचारी नृपश्रेष्ठ दशरथ अंत:पुरामध्यें प्रविष्ट झाला. 'मी पुत्रप्राप्तीकरितां अश्वमेध याग करणार आहें, ह्यास्तव तुम्ही यज्ञदीक्षा घ्या' असें त्यानें आपल्या प्रिय पत्नींना सांगितलें. तेव्हां आधींच उत्तम कांतीनें युक्त असलेल्या त्या स्त्रियांचीं मुखकमलें, त्या अत्यंत प्रिय भाषणाच्या योगानें शीतकाल संपल्यानंतर प्रफुल्लित होणाऱ्या पद्माप्रमाणें शोभूं लागलीं.

सर्ग नववा.

ऋष्यशृंगाची कथा.

याप्रमाणें राजाचें भाषण श्रवण करून सुमंत्र मंत्री त्याला एकांतीं म्हणाला:— "महाराज, पुराणामध्यें मीं श्रवण केलेला पुरातन इतिहास आपण श्रवण करा. हा इतिहास ऋत्विजांनीं सांगितलेला मीं पूर्वीं श्रवण केला आहे. राजा, भगवान सनत्कुमार मुनींनीं ऋषींचे सन्निध तुझ्या पुत्रप्राप्तीविषयीं भविष्यद्विषयक कथा.

१ 'यज्ञानुष्ठान अविधि झालें असतां' वगैरे मागील पानांतील दशरथाचें भाषण.

पूर्वींच सांगून ठेविली आहे. ती अशी—काश्यपाचा पुत्र विभांडक म्हणून प्रसिद्ध आहे. त्याला ऋष्यशृंग या नांवानें प्रसिद्ध असा एक पुत्र होईल. तो जन्मापासून वनांत वाढणारा असल्यामुळें नित्य वनामध्येंच संचार करील. आणि तो विप्रश्रेष्ठ मुनि नित्य पित्याच्या अनुरोधानें वर्तन करणार असल्यामुळें व 'येथून तूं कोठेंहि जाऊं नको' अशी त्याला पित्याची आज्ञा होणार असल्यामुळें वनावांचून तो दुसरें कांहींहि जाणणार नाहीं. अजिनादिधारणरूप मुख्य आणि ऋतुकालीं स्त्रीगमनरूप गौण असें दोन्ही प्रकारचें ब्रह्मचर्य त्या महात्म्या ऋष्यशृंग मुनीचें लोकांमध्यें प्रसिद्ध होईल. आणि राजा, ब्राह्मण त्या ब्रह्मचर्याची नित्य प्रशंसा करतील. ह्याप्रमाणें अग्नि व यशस्वी पिता यांची शुश्रुषा करून असणाऱ्या त्या ऋष्यशृंग मुनीचा बराच काल जाईल. असो. ह्या ऋष्यशृंग मुनीच्याच वेळीं अंगदेशामध्यें रोमपाद म्हणून एक प्रतापी व महाबलाढ्य असा राजा प्रसिद्धीस येईल; आणि त्या राजाच्या हातून होणाऱ्या धर्मातिक्रमणामुळें सर्व लोकांना भयावह, दुःसह व अत्यंत घोर असें अवर्षण पडेल. अशा प्रकारें अवर्षण पडलें असतां राजा दुःखी होईल आणि ज्ञानवृद्ध ब्राह्मणांना बोलावून आणून, 'आपण लोकव्यवहारज्ञ असल्यामुळें या अनावृष्टीला कारणीभूत असें जें माझें पापकर्म असेल तें आपण जाणतच आहां. तेव्हां त्या माझ्या पातकाची निष्कृति होईल, अशा रीतीनें आपण मला अनुष्ठान करण्यास सांगा' असें त्यांना म्हणेल, व राजानें असें सांगितलें असतां ते सर्व श्रेष्ठ व वेदपारंगत ब्राह्मण त्या भूपालाला सांगतील कीं, 'राजा, सर्व उपायांनीं विभांडकपुत्राला इकडे आण; आणि हे भूपाला, अत्यंत सत्कारपूर्वक त्या ऋष्यशृंग नामक विभांडकपुत्र वेदपारंगत ब्राह्मणाला आणवून अतिशय प्रसन्न मनानें आपली कन्या शांता त्याला यथाविधि अर्पण कर.' ह्याप्रमाणें त्या ब्राह्मणाचें वचन श्रवण केल्यावर त्या जितेंद्रिय ऋष्यशृंग मुनीला कोणत्या उपायानें येथें आणणें शक्य आहे असें तो राजा चिंतन करूं लागेल आणि नंतर मंत्र्यांसहवर्तमान पक्का निश्चय करून त्या मुनीला आणण्याकरितां पुरोहित व अमात्य ह्यांना तो सत्कारपूर्वक पाठवून देईल. परंतु राजाचें भाषण श्रवण केल्यावर ते अमात्यप्रभृति पंचाईतींत पडून आपल्या माना खालीं घालतील आणि विभांडक मुनीला भीत असल्यामुळें 'आम्ही तिकडे जाणार नाहीं' असें सांगून ती आज्ञा न पाळण्याबद्दल राजाचें मन वळवूं लागतील. ऋष्यशृंग मुनीला आणण्याविषयीं शक्य उपाय कोणते आहेत ह्याचा विचार करून ते शक्य उपाय अमात्य-

प्रभृति राजाला सांगतील; आणि-ह्या उपायांनीं आम्ही त्या विप्राला येथें आणूं, ह्यांत चूक होणार नाहीं—असें राजाला म्हणतील. ह्याप्रमाणें अंगदेशाधिपति रोमपाद राजानें गणिकांकडून त्या ऋषिपुत्राला आणविलें असतां पर्जन्यवृष्टि झाली आहे आणि रोमपाद राजानें त्या ऋष्यशृंग मुनीला आपली शांता नामक कन्याहि अर्पण केली आहे. आतां तो जामाता ऋष्यशृंग तुला पुत्र होण्याची तजवीज करील. असो. ह्याप्रमाणें सनत्कुमार मुनींनीं ऋषींचें सन्निध तुझ्या पुत्रप्राप्तीविषयीं सांगून ठेविलेलें भविष्य मीं तुला कथन केलें आहे." ह्याप्रकारें सुमंत्र नामक मंत्र्यानें सांगितलें असतां दशरथ राजा आनंदित झाला, आणि 'जो उपाय योजून ऋष्यशृंग मुनीला रोमपाद राजानें आणिलें त्याविषयींची हकीगत मला सांग' म्हणून त्याला म्हणाला.

सर्ग दहावा.

ऋष्यशृंग व शांता यांच्या विवाहाचें वृत्त.

ह्याप्रकारें दशरथ राजानें सांगितलें असतां सुमंत्र मंत्री म्हणाला:—"रोमपाद राजाच्या मंत्र्यांनीं ऋष्यशृंग मुनि कसा व कोणत्या उपायांनीं आणिला हें सर्व मीं सांगितलें असतां मंत्र्यांसहवर्तमान श्रवण करा. अमात्यांसहवर्तमान पुरोहित रोमपाद राजाला म्हणाला, 'हा निर्दोष उपाय आम्ही मनामध्यें आणिला आहे. तप व वेदाध्ययन ह्यांनीं युक्त असलेला ऋष्यशृंग मुनि केवळ वनामध्यें संचार करणारा असल्यामुळें स्त्रीसंबंधीं शब्दादि विषय आणि सुख ह्यांची त्याला कांहीं एक माहिती नाहीं. ह्याकरितां पुरुषाच्या अंतःकरणाला मोह पाडणारे असे जे प्राणिमात्राला प्रिय असलेले विषय, त्यांच्या योगानें आम्ही त्याला नगरामध्यें आणवूं. ह्यास्तव आम्ही सांगतों तें करण्याचा सत्वर यत्न होऊं द्या. उत्तम उत्तम अलंकार घातलेल्या सुंदर सुंदर वेश्या त्या ठिकाणीं जाऊं द्या. कारण, त्यांना सत्कारपूर्वक तिकडे पाठविलें असतां नानाप्रकारच्या उपायांनीं त्याचे ठिकाणीं लोभ उत्पन्न करून त्या त्या मुनीला येथें घेऊन येतील.' ह्याप्रमाणें पुरोहिताचें भाषण श्रवण केल्यावर 'ठीक आहे' म्हणून राजानें त्याला प्रत्युत्तर दिलें असतां, पुरोहित व मंत्री यांनीं राजाच्या अनुज्ञेप्रमाणें केलें. तदनंतर मंत्र्यांचें म्हणणें ऐकून घेऊन मुख्य मुख्य वेश्या त्या महावनामध्यें प्रविष्ट

झाल्या आणि त्या ह्या शेजारच्या बनामध्यें विभांडक मुनीच्या आश्रमाचे सन्निध उभ्या राहून त्या आश्रमामध्यें नित्य वास्तव्य करीत असलेल्या त्या ज्ञानी ऋषि-पुत्राचें दर्शन घेण्याविषयीं यत्न करूं लागल्या; परंतु पित्याच्या लालनादिकांमुळें नित्य संतुष्ट असलेला तो ऋषिपुत्र ऋष्यशृंग आश्रमांतून बाहेर आला नाहीं. पित्यावांचून इतर स्त्री, पुरुष आणि नगरांत व राष्ट्रांत असणारे इतर प्राणी ह्यांपैकीं त्या तपस्वी ऋषिपुत्रानें जन्मापासून कांहींच अवलोकन केलेलें नव्हतें. असो. असें होतां होतां ज्या ठिकाणीं त्या वेश्या होत्या, त्या ठिकाणीं एकदां तो विभांडक मुनीचा पुत्र ऋष्यशृंग सहज आला आणि तेथें त्यानें त्या उत्कृष्ठ स्त्रिया अवलोकन केल्या. तेव्हां आश्चर्यकारक वेष धारण करून मधुर स्वरानें गायन करीत असलेल्या त्या सर्व तरुण वेश्या ऋषिपुत्रासमीप गेल्या आणि ‘ तूं कोण, काय करीत असतोस, आणि एकटा असतांना ग्रामापासून दूर असलेल्या ह्या निर्जन वनामध्यें तूं कशाकरितां संचार करीत आहेस, हें जाण-ण्याची आमची इच्छा आहे. ह्यास्तव हे ब्रह्मन्, तें तूं आम्हांला कथन कर ’ असें त्याला विचारूं लागल्या. पूर्वीं अशा प्रकारच्या स्त्रिया बनामध्यें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आल्या नव्हत्या, आणि त्या स्त्रियांनींहि मोहक रूपें धारण केलेलीं होतीं, म्हणून त्यांचे ठिकाणीं त्या ऋषिपुत्राचें प्रेम उत्पन्न झालें आणि त्यामुळें आपला पिता कोण हें त्यांना सांगण्याची त्याला इच्छा झाली असतां तो म्हणाला, ‘ आमचा पिता विभांडक असून त्याचा मी औरस पुत्र आहें व ऋष्यशृंग हें माझें नांव आणि तपोरूप कर्म पृथ्वीमध्यें प्रसिद्ध आहे. हे शुभ-दर्शनी जनहो! येथें समीपच आमचा आश्रम आहे. करितां तुम्हां सर्वांचें मी ह्या ठिकाणीं यथाविधि पूजन करितों. ’ ह्याप्रमाणें ऋषिपुत्राचें म्हणणें ऐकून घेत-ल्यावर तो आश्रम अवलोकन करण्याविषयीं त्या सर्वांनाच इच्छा झाली आणि तेथून त्या सर्व स्त्रिया तो आश्रम अवलोकन करण्याकरितां चालत्या झाल्या. नंतर त्या आश्रमाला गेल्या असतां, ‘ हें अर्घ्य, हें पाद्य आणि हीं आमचीं फळेंमुळें तुम्ही स्वीकारा ’ असें म्हणून ऋषिपुत्रानें त्यांचें पूजन केलें. तेव्हां मोठ्या उत्सुकतेनें त्या पूजेचा सर्व स्त्रियांनीं स्वीकार केला आणि विभांडक मुनीना भीत असल्यामुळें तेथून सत्वर गमन करण्याचें मनामध्यें आणून त्या म्हणाल्या, ‘ हे द्विज, आमचेपाशींहि हीं उत्तम फळें आहेत, त्यांचा हे विप्रा, तूं स्वीकार कर आणि विलंब न करितां तूं तीं भक्षण कर, म्हणजे तुझें कल्याण होईल. ’ ह्याप्रमाणें सांगितल्यानंतर हर्षयुक्त झालेल्या सर्व वेश्यांनीं

त्याला आलिंगन दिलें आणि मोदक व इतरहि नाना प्रकारचे शुभ भक्ष्य पदार्थ त्याला अर्पण केले. तेव्हां त्यांनीं दिलेलीं तीं फळें भक्षण केल्यावर, वनामध्यें नित्य वास्तव्य करणाऱ्यांनीं पूर्वीं या फळांचा कधींहि आस्वाद घेतलेला नाहीं असें त्या तेजस्वी ऋष्यशृंग मुनीला वाटलें. नंतर त्या ऋष्यशृंगाचा निरोप घेऊन, त्याच्या पित्याला भीत असलेल्या त्या स्त्रियांनीं 'आम्हांला कांहीं व्रत कर्तव्य आहे' असें त्याला खोटेंच सांगितलें आणि त्या मिषानें त्या तेथून निघून गेल्या. ह्याप्रमाणें त्या सर्व स्त्रिया निघून गेल्या असतां त्या काश्यपपुत्र द्विज ऋष्यशृंगाचें अंतःकरण अस्वस्थ झालें आणि दुःखामुळें तो इकडे तिकडे फेऱ्या घालूं लागला. तदनंतर तो वैभवशाली व वीर्यवान विभांडकपुत्र ऋष्यशृंग वारंवार मनामध्यें त्या स्त्रियांविषयीं चिंतन करीत करीत दुसऱ्या दिवशीं त्या ठिकाणीं आला असतां, त्या उत्कृष्ट व मनोहर वेश्या उत्तम प्रकारें भूषित झालेल्या त्या ठिकाणीं त्याच्या दृष्टीस पडल्या. तो विप्र ऋष्यशृंग इकडे येत आहे असें आढळून आल्याबरोबर त्या स्त्रियांच्या अंतःकरणाला आनंद झाला आणि जवळ जाऊन त्या सर्व त्याला म्हणाल्या, 'हे सौम्या, तूं आमच्या आश्रमाला चल. अरे, या ठिकाणीं जरी मुळें व फळें पुष्कळ असलीं तरी त्या आमच्या आश्रमांत तर हा प्रकार निःसंशय अधिक होईल.' (सारांश ह्या ठिकाणापेक्षां आमच्या आश्रमामध्यें तुला अधिक फळें व मुळें मिळतील.) ह्याप्रमाणें अंतःकरणाला रुचणारें त्यांचें भाषण श्रवण करून त्या विप्रानेंहि त्यांच्याबरोबर जाण्याचें मनामध्यें आणिलें व त्यांच्या इच्छेप्रमाणें त्या स्त्रियाहि त्याला तिकडे घेऊन गेल्या. अंगदेशाकडे त्या स्त्रिया त्या महात्म्या विप्राला आणूं लागल्या असतां एकदम पर्जन्यवृष्टि होऊन जगताला आनंद झाला. इकडे पर्जन्यवृष्टि बरोबर घेऊन आलेल्या त्या विप्राला तो अंगदेशाधिपति रोमपाद राजा नम्र होऊन सामोरा गेला आणि त्यानें त्याला साष्टांग नमस्कार घातला. इतकेंच नव्हे, परंतु अगदीं स्वस्थचित्त होऊन त्यानें त्याचें यथाविधि पूजन केलें आणि 'विप्रकोप होऊं नये एवढी कृपा व्हावी' असें त्या श्रेष्ठ विप्रापाशीं त्यानें मागणें मागितलें. तदनंतर त्याला अंतःपुरांत नेऊन स्वस्थांतःकरणपूर्वक राजानें आपली कन्या शांता यथाविधि अर्पण केली आणि त्यामुळें त्या राजाला आनंद झाला. असो. ह्याप्रमाणें सर्व इच्छा परिपूर्ण करून उत्तम प्रकारें मानमान्यतेनें रहात असलेला तो महातेजस्वी ऋष्यशृंग शांता नामक भार्येसहवर्तमान त्या ठिकाणीं राहिला."

सर्ग अकरावा.

ऋष्यशृंगाला अयोध्येंत आणणें.

हे राजाधिराज दशरथा, त्या बुद्धिमान सुरश्रेष्ठ सनत्कुमारांनीं जें कथन केलें, तें हितकारक भाषण माझ्यापासून तूं पुनरपि श्रवण कर. सनत्कुमार म्हणालेः— "इक्ष्वाकुवंशजाच्या कुलामध्यें अत्यंत धार्मिक, वैभवशाली आणि सत्यप्रतिज्ञ असा दशरथ म्हणून राजा उत्पन्न होईल व त्या दशरथाचें अंगराजाशीं सख्य होईल. अंगराजाला शांता म्हणून एक महाभाग्यवती कन्या होईल आणि रोमपाद म्हणून प्रसिद्ध असा एक पुत्रहि त्याला होईल. त्या अंगराजाकडे महाकीर्तिमान दशरथ राजा जाईल आणि 'हे धर्मात्म्या अंगराजा, मी निपुत्रिक आहें, ह्यास्तव शांतेच्या भर्त्यानें माझ्या कुलाच्या संतानाकरितां तुझ्या अनुज्ञेनें माझ्या यज्ञाचें अनुष्ठान करावें' असें त्याला म्हणेल. ह्याप्रमाणें दशरथ राजाचें बोलणें ऐकून घेऊन व त्याविषयीं मनामध्यें विचार करून विचारी अंगराजा शांतेच्या पुत्रवान भर्त्याला त्याचे स्वाधीन करील. नंतर त्याचा स्वीकार करून तो दशरथ राजा निश्चित होईल आणि प्रसन्न मनानें तो पुत्रकामेष्टिरूप याग करील. प्रथमतः तो कीर्तीची इच्छा करणारा धर्मज्ञ दशरथ राजा हात जोडून, संतान आणि स्वर्ग ह्यांची प्राप्ति व्हावी एतदर्थ पुत्रकामेष्टिरूप यज्ञ करण्याविषयीं त्या द्विजश्रेष्ठ ऋष्यशृंगाला अध्वर्यु म्हणून वरील आणि तदनंतर त्या द्विजश्रेष्ठाच्या योगानें त्या प्रजाधिपति दशरथ राजाचा तो मनोरथ सिद्धीस जाईल. सारांश, तो पुत्रकामेष्टिरूप यज्ञ केल्यानंतर सर्व प्राण्यांमध्यें विख्यात व वंशाची अविच्छिन्नता कायम राखणारे असे अतुल पराक्रमी चार पुत्र त्या दशरथाला होतील. ह्याप्रमाणें पूर्वीच्या सत्ययुगामध्यें भगवान सुरश्रेष्ठ सनत्कुमार प्रभूंनीं हा वृत्तांत कथन करून ठेविलेला आहे. करितां हे पुरुषश्रेष्ठा महाराजा, तूं सैन्य व वाहनें ह्यांसहवर्तमान स्वतः जा आणि उत्कृष्ठ सत्कारपूर्वक त्या ऋष्यशृंग मुनीला घेऊन ये." हें सुमंत्र नामक मंत्र्याचें भाषण श्रवण करून दशरथ आनंदित झाला. आणि वसिष्ठांना तें त्या सूतजातीय मंत्र्याचें म्हणणें कळवून व ऋष्यशृंग मुनीला आणण्याविषयीं त्यांची अनुमति घेऊन, अंतःपुर आणि अमात्य ह्यांसहवर्तमान जिकडे तो द्विज होता तिकडे जाण्याकरितां निघाला; व वनें आणि नद्या ह्यांचें हळूहळू उल्लंघन करून जेथें तो मुनिश्रेष्ठ ऋष्यशृंग होता त्या रोमपाद राजाच्या राष्ट्रामध्यें गेला असतां, अग्नी-

प्रमाणें देदीप्यमान असा तो द्विजश्रेष्ठ ऋषिपुत्र रोमपाद राजाचे समीप असलेला त्याच्या दृष्टीस पडला. तदनंतर त्या अंगराजाशीं मैत्री असल्यामुळें प्रसन्न मनानें दशरथ राजानें त्याचें अत्यादरपूर्वक यथाविधि पूजन केलें. तेव्हां त्या बुद्धिमान ऋषिपुत्राला रोमपाद राजानें असलेलें आपलें सख्य व संबंध हीं सांगितलीं असतां त्या ऋषिपुत्रानें त्याचा उलट सत्कार केला. ह्याप्रमाणें अत्यंत मानमान्यतेनें तो पुरुषश्रेष्ठ दशरथ राजा त्या अंगराजासहवर्तमान सातआठ दिवस राहून मग त्याला म्हणाला, 'राजा, हे प्रजाधिपते, तुझी कन्या शांता भर्त्यासहवर्तमान माझ्या नगराला येऊं दे; माझें मोठें कार्य उपस्थित झालें आहे.' तेव्हां त्या बुद्धिमान ऋषिपुत्राच्या गमनाविषयीं दशरथाला वचन देऊन त्या रोमपाद राजानें 'तूं भार्येसहवर्तमान दशरथ राजाच्या बरोबर जा' असें त्या विप्राला सांगितलें असतां ऋषिपुत्रानेंहि तें ऐकून घेतल्यावर 'ठीक आहे' म्हणून राजाला सांगितलें; आणि राजानें अनुज्ञा दिल्यावर तो भार्येसहवर्तमान दशरथाबरोबर जाण्याकरितां निघाला. त्या वेळीं एकमेकांना नमस्कार करून व स्नेहामुळें एकमेकांची कडकडून भेट घेऊन वीर्यवान रोमपाद आणि दशरथ हे दोघेहि आनंदित झाले. तदनंतर आपल्या सुहृदांचा निरोप घेऊन रघुनंदन दशरथ राजा निघाला, आणि 'सर्व नगर सत्वर सुशोभित करा, जिकडे तिकडे धूप लावा, सडा टाकून झाडून काढा आणि पताकांनीं तें अलंकृत करा' असा निरोप सांगून सत्वर गमन करणारे दूत त्यानें नगरवासी जनांकडे पाठवून दिले. नंतर राजाचा निरोप कळल्यावर ते सर्व नगरवासी लोक दशरथ राजा ऋष्यशृंगाला घेऊन आला आहे असें ऐकल्याबरोबर आनंदित झाले व राजाच्या निरोपाप्रमाणें तें सर्व त्यांनीं केलें. नंतर शंख, दुंदुभि इत्यादि वाद्यांच्या घोषासहवर्तमान द्विजश्रेष्ठ ऋष्यशृंगाला पुढें घालून दशरथ राजा आपल्या सुशोभित केलेल्या नगरामध्यें प्रविष्ट झाला. तदनंतर देवराज इंद्र वामनाला स्वर्गामध्यें घेऊन येत आहे असें अवलोकन केल्याबरोबर ज्याप्रमाणें स्वर्गवासी देव आनंदित झाले होते, त्याप्रमाणें इंद्रतुल्य दशरथ राजा सत्कारपूर्वक ऋष्यशृंग नामक द्विजाला नगरामध्यें घेऊन येत आहे असें अवलोकन करून सर्व नगरवासी जन आनंदित झाले. नंतर ऋष्यशृंगाला अंतःपुरांत नेऊन त्याचें यथाशास्त्र पूजन केल्यावर दशरथ राजानें त्या ऋषिपुत्र ऋष्यशृंगाला स्वतःचे सन्निध आणिल्याबद्दल आपणांला कृतकृत्य मानिलें. असो. विशाल नेत्रांनीं युक्त असलेली शांता,

त्याप्रमाणें भर्त्यासहवर्तमान आनंदानें आल्याचें अवलोकन करून दशरथ राजाच्या सर्व अंतःपुरांतील स्त्रियांना आनंद झाला; आणि स्त्रियांकडून व विशेषतः राजाकडून जिचा आदरसत्कार होत आहे, अशी ती शांता आपल्या भर्त्यासहवर्तमान कांहीं दिवसपर्यंत त्या ठिकाणीं सुखानें राहिली.

सर्ग बारावा.

यज्ञाच्या तयारीविषयीं दशरथाची अमात्यांना आज्ञा.

ह्या गोष्टीला बरेच दिवस झाल्यानंतर एकदां अत्यंत मनोहर असा वसंतसमय प्राप्त झाला असतां पुत्रकामेष्टिरूप याग करण्याचें दशरथ राजाच्या मनामध्यें आलें; आणि नंतर कुलसंतान व्हावें एतदर्थ याग करण्याकरितां देवासारख्या तेजस्वी असलेल्या त्या ऋष्यशृंग विप्राला मस्तकानें प्रणाम करून याग शेवटास नेण्याविषयीं राजानें त्याची प्रार्थना केली. तेव्हां ‘ ठीक आहे ’ असें सांगून तो त्या पृथ्वीपति दशरथ राजाला म्हणाला, ‘ यज्ञाच्या सामग्रीची जुळवाजुळव करा, अश्व सोडा आणि सरयू नदीचे उत्तरतीरीं यज्ञभूमि तयार करा. ’ ह्याप्रमाणें ऋष्यशृंगानें सांगितल्यानंतर दशरथ राजा सुमंत्र नामक मत्र्याला म्हणाला, “ हे सुमंत्रा, वेदपारंगत ब्राह्मणांना आणि वेदवेत्त्या ऋत्विजांना सत्वर निमंत्रण कर. सारांश सुयज्ञ, वामदेव, जाबालि, काश्यप, पुरोहित वसिष्ठ व इतरहि श्रेष्ठ द्विज ह्यांना निमंत्रण कर. ” ह्याप्रमाणें राजाची आज्ञा झाल्यानंतर शीघ्र गमन करणारा सुमंत्र त्वरित गेला आणि त्या सर्व वेदपारंगत ब्राह्मणांना घेऊन आला. तेव्हां त्यांचें पूजन करून धर्मात्म्या दशरथ राजानें धर्म व अर्थ ह्यांना अनुसरून असलेलें असें योग्य व स्पष्ट भाषण त्यांच्याशीं केलें.

तो म्हणाला:—“पुत्राकरितां काळजी करीत असलेल्या मला सुख होत नाहीं. ह्यास्तव पुत्रप्राप्ति होण्याकरितां अश्वमेधाचें अनुष्ठान करण्याची माझी इच्छा आहे आणि ह्या ऋष्यशृंग नामक ऋषिपुत्राच्या प्रभावानें माझे मनोरथ पूर्ण होणार आहेत. ” ह्याप्रमाणें राजानें भाषण केल्यानंतर वसिष्ठप्रभृति सर्व ब्राह्मणांनीं ‘ उत्तम उत्तम ’ म्हणून राजाच्या मुखांतून निघालेल्या त्या भाषणाची प्रशंसा केली. तदनंतर ऋष्यशृंगप्रभृति ऋत्विजांनीं त्या राजाला प्रत्युत्तर

केलें. ते म्हणाले, " अश्वमेधयज्ञाच्या साहित्याची जुळवाजुळव होऊं द्या व अश्व सोडून सरयू नदीचे उत्तरतीरीं यज्ञभूमि तयार होऊं द्या. राजा, ज्याअर्थी पुत्रप्राप्तीकरितां हा धार्मिक विचार तुझ्या मनामध्यें आला आहे, त्याअर्थी तुला अतुल पराक्रमी असे चार पुत्र निःसंशय प्राप्त होतील. "

ह्याप्रमाणें द्विजांचें भाषण श्रवण करून दशरथ राजा संतुष्ट झाला आणि शुभशब्दांनीं भरलेलें असें भाषण अमात्यांशीं करूं लागला. दशरथ राजा म्हणाला, " अमात्यहो, गुरूंनीं सांगितल्याप्रमाणें अश्वमेधक्रतूच्या साहित्याची जुळवाजुळव करा, अश्व धरणाऱ्यांचा पराभव करण्यास समर्थ अशांच्या देखरेखीखालीं व उपाध्याय बरोबर देऊन अश्व सोडा, सरयू नदीचे उत्तरतीरीं यज्ञभूमि तयार करा आणि सूत्रांत सांगितल्याप्रमाणें विघ्ननिवारणार्थ शांतिकर्में यथाविधि होऊं द्या. अहो, सर्वगुणसंपन्न जरी राजा झाला, तरी त्याच्या हातून हा अश्वमेध याग शेवटास जाणें शक्य आहे काय ? ह्या श्रेष्ठ क्रतूच्या अनुष्ठानामध्यें जर मोठासा प्रमाद नच झाला, तर मात्र कदाचित् तो शेवटास जाण्याचा संभव आहे. कारण, विद्वान विद्वान ब्रह्मराक्षस ह्या क्रतूमध्यें कोठें न्यून पडेल हें पहात असतात, आणि त्यामुळें यज्ञानुष्ठान अविधि झालें असतां याग करणाऱ्यांचा तत्काल नाश होतो. ह्यास्तव हा माझा याग यथाविधि शेवटास जाईल अशा रीतीनें तुम्ही यत्न करा. ह्या यज्ञाला अवश्य असलेलीं साधनें जुळविण्याविषयीं तुम्ही समर्थ आहां. " ह्याप्रमाणें नृपश्रेष्ठ दशरथानें आज्ञा केल्यानंतर त्याच्या त्या भाषणाची सर्व मंत्र्यांनीं प्रशंसा केली; आणि त्याच्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं सर्व तयारी केली. तदनंतर त्या ब्राह्मणांनींहि त्या धर्मज्ञ नृपश्रेष्ठ दशरथाची स्तुति केली आणि त्याची अनुज्ञा घेऊन ते सर्व पुनरपि आल्या मार्गानें चालते झाले. ते विप्र गेल्यानंतर त्या मंत्र्यांना निरोप देऊन तो महाविचारी दशरथ राजाहि आपल्या अंतःपुरामध्यें प्रविष्ट झाला.

सर्ग तेरावा.

यज्ञसमारंभाची तयारी.

वसंतामध्यें अश्व सोडल्यानंतर पुनरपि वसंत ऋतु प्राप्त झाला असतां संवत्सर पूर्ण झालें. तेव्हां तो वीर्यवान दशरथ राजा संतानप्राप्त्यर्थ अश्वमेध यागाची दीक्षा घेण्याकरितां वसिष्ठांकडे गेला आणि अभिवंदनपूर्वक प्रथमतः यथाविधि

पूजन करून संतानाकरितां त्या द्विजश्रेष्ठ वसिष्ठ मुनींना विनयानें म्हणाला, "हे ब्रह्मन्, माझा याग आपण यथाशास्त्र शेवटास न्या; आणि हे मुनिश्रेष्ठ, यज्ञांगामध्यें ब्रह्मराक्षसप्रभृति विघ्नें आणणार नाहींत अशा रीतीनें आपण तें अनुष्ठान पार पाडण्याची तजवीज ठेवा. स्नेहयुक्त असे माझे सुहृद् आपणच असून मुख्य गुरुहि आपणच आहां. तेव्हां हें हातीं घेतलेलें यज्ञाचें ओझें शेवटास नेण्याची जोखीम आपल्याच शिरावर आहे." ह्यावर ते द्विजश्रेष्ठ वसिष्ठ मुनि म्हणाले, "ठीक आहे. तुझ्या प्रार्थनेप्रमाणें मी हें सर्व कांहीं करीन."

नंतर यज्ञानुष्ठानामध्यें प्रवीण असे वृद्ध वृद्ध द्विज, कलाकौशल्याच्या कामामध्यें निपुण आणि अत्यंत धार्मिक असे वृद्ध वृद्ध शिल्पी व निरवानिरव करणारे मजूर, सुतार, खणणारे, ज्योतिषी व कारागीर आणि त्याचप्रमाणें सूत्रधार, नृत्य करणारे व तसेच चांगले बहुश्रुत, शास्त्रज्ञ व आचरणांनीं शुद्ध असे लोक ह्यांना ते म्हणाले, "तुम्ही राजाच्या आज्ञेवरून यज्ञानुष्ठान पार पाडण्याची तजवीज ठेवा. पुष्कळ हजार विटा प्रथम आणा आणि बहुगुणसंपन्न असे राजवाडे तयार करा. त्याचप्रमाणें अनेक प्रकारच्या भक्ष्य, भोज्य व पेय पदार्थांनीं युक्त आणि पर्जन्याला वगैरे न जुमानण्यासारखीं बळकट अशीं ब्राह्मणांकरितां शेंकडों शुभ वसतिस्थानें तयार करा. नगरवासी जनांना राहण्याकरितांहि चांगलीं विस्तृत घरें तयार करा. फार लांबून आलेल्या राजांकरितां पृथक् पृथक् अश्वशाला, गजशाला आणि शय्यागृहें तयार ठेवा. मोठमोठ्या लोकांना राहण्याला योग्य अशीं वसतिस्थानें तयार करा आणि परदेशांतील योद्ध्यांकरितां सर्व भोग्य वस्तूंनीं संपन्न आणि विपुल भक्ष्य पदार्थांनीं युक्त अशीं वसतिस्थानें तयार ठेवा. नगरवासी जन व इतर सामान्य लोक यांचींहि वसतिस्थानें उत्तम प्रकारें बनवा. अनादर न करितां म्हणजे सर्व वर्णांच्या लोकांची सत्कारपूर्वक मानमान्यता होईल अशा रीतीनें आदरपूर्वक यथाविधि अन्नदान करा. काम आणि क्रोध ह्यांच्या तावडींत सांपडण्यासारखा जरी प्रसंग असला, तरी कोणाचीहि अवज्ञा होतां उपयोगी नाहीं. यज्ञकर्मामध्यें जे पुरुष गढून गेलेले असतील त्यांचीच केवळ नव्हे परंतु शिल्पी लोकांचीहि योग्यतेच्या क्रमाला अनुसरून विशेषेंकरून मानमान्यता राहिली पाहिजे. धन आणि भोजन ह्यांच्या योगानें सर्वांची मानमान्यता राहील अशा रीतीनें आनंदयुक्त अंतःकरणानें तुम्ही सर्व तजवीज ठेवा, म्हणजे सर्व यथास्थित होऊन कशाचीहि उणीव पडणार नाहीं." ह्याप्रमाणें वसिष्ठांनीं

सांगितल्यानंतर सर्वजण त्यांचे जवळ येऊन म्हणाले, "आपण जसें मनामध्यें आणिलें आहे, तसें सर्व यथास्थित होईल, कांहीं कमी पडणार नाहीं."

ह्याप्रमाणें त्यांनीं सांगितल्यानंतर वसिष्ठांनीं सुमंत्राला हांक मारून सांगितलें, "पृथ्वीमध्यें जे कोणी धार्मिक राजे असतील त्यांना निमंत्रण कर. हजारों ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे सर्व देशांतील लोक सत्कारपूर्वक यज्ञसमारंभाकरितां बोलावून आण. शूर आणि सत्यवादी असा जो महाभाग्यवान मिथिलाधिपति जनक, त्याला उत्तम सत्कारपूर्वक तूं स्वतः घेऊन ये. तो संबंधी होणार आहे असें पूर्वींच मला समजून आलें असल्यामुळें त्याला निमंत्रण करण्याविषयीं मी तुला प्रथम सांगत आहें. त्याचप्रमाणें आपणांविषयीं प्रेम धरणारा, प्रियवादी आणि सदाचरणी असा जो देवासारखा तेजस्वी काशीराजा, त्याला तूं स्वतःच घेऊन ये. त्याप्रमाणें अत्यंत धार्मिक व वृद्ध असा जो नृपश्रेष्ठ दशरथाचा श्वशुर केकय राजा, त्याला पुत्रासहवर्तमान तूं येथें घेऊन ये. तसाच दशरथाचा मित्र जो महाधनुर्धारी अंगदेशाधिपति रोमपाद, त्याला पुत्रासहवर्तमान चांगल्या सत्कारानें तूं येथें आण. तसेंच कोसलाधिपति भानुमानाला सत्कारपूर्वक घेऊन ये. त्याचप्रमाणें शूर, सव शास्त्रांमध्यें निपुण, समय जाणणारा आणि अत्यंत उदार अशा पुरुषश्रेष्ठ मगधराजालाहि घेऊन ये व राजाची आज्ञा घेऊन इतरहि नृपश्रेष्ठांना इकडे येण्याविषयीं प्रेरणा कर. पूर्व देशांतील, दक्षिण देशांतील आणि त्याचप्रमाणें सिंधु, सौवीर व सौराष्ट्र ह्या देशांतील सर्व राजांना तूं घेऊन ये. त्याचप्रमाणें दशरथाशीं प्रेमानें वागणारे जे आणखी राजे भूतलावर असतील, त्यांना सेवक आणि बांधव ह्यांसहवर्तमान जसें सत्वर आणितां येईल तसें आण. सारांश, ह्यांना मोठ्या योग्यतेचे दूत पाठवून राजाच्या आज्ञेनें तूं घेऊन ये."

वसिष्ठांचें तें भाषण श्रवण करून सुमंत्रानें राजांना आणण्याकरितां आचरणानें पवित्र अशा पुरुषांना सत्वर आज्ञा केली आणि वसिष्ठ मुनींच्या आज्ञेप्रमाणें तो धर्मात्मा महाविचारी सुमंत्र कांहीं राजांना आणण्याकरितां सत्वर स्वतः गेला. नंतर ते सर्व काम करणारे लोक वसिष्ठ महर्षींकडे आले व 'यज्ञासंबंधानें जें कांहीं साहित्य जुळविण्यास सांगितलें होतें तें जुळविलें' म्हणून त्यांनीं त्यांना निवेदन केलें. तेव्हां ते द्विजश्रेष्ठ वसिष्ठ मुनि संतुष्ट होऊन त्या सर्वांना म्हणाले, "तुम्ही अनादर करून अथवा अश्रद्धेनें कोणाला कांहीं देऊं नका, हें मी आणखी एकदां सांगून ठेवितों. कारण, अवज्ञेनें

केलेलें दान दात्याचा नाश करितें, ह्यांत संशय नाहीं." ह्यानंतर बोलाविलेले राजे कांहीं दिवसांनीं पुष्कळ रत्नें बरोबर घेऊन दशरथ राजाकडे आले असतां वसिष्ठ सुप्रसन्न होऊन त्याला म्हणाले, "हे पुरुषश्रेष्ठा, तुझ्या आज्ञेवरून राजे आले आहेत आणि योग्यतेनुरूप मीं सर्वांचा सत्कारहि केला आहे. आपापल्या कामाविषयीं अतिशय दक्ष असलेल्या लोकांनीं यज्ञाला लागणाऱ्या सर्व पदार्थांची सिद्धता ठेविली आहे. ह्यास्तव यजन करण्याकरितां तूं यज्ञभूमीसमीप सत्वर जा आणि इष्ट पदार्थांनीं अत्यंत युक्त झालेली आणि म्हणूनच मनाच्या योगानें निर्माण केल्यासारखी असलेली यज्ञभूमि, हे राजाधिराज, तूं चोहोंबाजूंनीं अवलोकन कर.' तदनंतर वसिष्ठ आणि ऋष्यशृंग ह्या उभयतांनीं सांगितल्यावरून शुभ नक्षत्रांनीं युक्त अशा दिवशीं भूपति दशरथ यज्ञभूमीकडे जाण्याकरितां निघाला. तेव्हां वसिष्ठप्रभृति सर्व द्विजश्रेष्ठ ऋष्यशृंगाला पुढें करून यज्ञमंडपामध्यें गेले आणि त्या सर्वांनीं सूत्र आणि शास्त्र ह्यांना अनुसरून यज्ञकर्माला आरंभ केला असतां पत्न्यांसहवर्तमान त्या वैभवशाली राजानें यज्ञदीक्षा घेतली.

सर्ग चौदावा.

यज्ञसमारंभ.

तदनंतर संवत्सर पूर्ण होऊन तो सोडलेला अश्व पुनरपि प्राप्त झाला असतां सरयू नदीचे उत्तरतीरीं दशरथ राजाच्या यज्ञाला आरंभ झाला. त्या महात्म्या दशरथ राजाच्या अश्वमेध नामक महाक्रतूमध्यें ऋष्यशृंग मुनींना मुख्य आर्त्विज्य (ब्रह्मत्व) देऊन द्विजश्रेष्ठांनीं अनुष्ठान केलें. वेदपारंगत याजक हे यज्ञाचें अनुष्ठान यथाविधि करूं लागले आणि श्रुति (पूर्वमीमांसारूप) न्याय आणि शास्त्र ह्यांना अनुसरून आपापलें अनुष्ठान करण्याविषयीं ते प्रवृत्त झाले. प्रवर्ग्य[1], उपसद[2], इष्टि आणि इतरहि जें कांहीं अधिक सांगितलेलें होतें तें सर्व कर्म, शास्त्र आणि श्रुति ह्यांचें अतिक्रमण न करितां ब्राह्मणांनीं केलें. ज्या ज्या कर्माची जी जी देवता, तिचें तिचें पूजन करून आनंदित झालेल्या श्रेष्ठ मुनींनीं प्रातःसवनप्रभृति सर्व कर्में यथाविधि केलीं. इंद्र-

१ सोमयज्ञाच्या पूर्वी करावयाचें कृत्य.

२ हा ज्योतिष्टोमाचाच एक भाग आहे व हा पुष्कळ दिवसपर्यंत चाललेला असतो.

देवतेला उद्देशून यथाविधि हविर्भाग दिला. पवित्र सोमवल्ली कुटून तिचा रस काढिला आणि नंतर क्रमाला अनुसरून मध्यंदिनसवन ह्या नांवाचें अनुष्ठान सुरू झालें व तें झाल्यावर त्या राजाच्या अश्वमेधसंबंधीं तृतीयसवनसंज्ञक कर्महि श्रेष्ठ ब्राह्मणांनीं शास्त्रांत अवलोकन करून यथाविधि केलें. शिक्षेनुरूप वर्णोच्चारानें युक्त असलेल्या मंत्रांच्या योगानें ऋष्यशृंगप्रमुख ऋत्विजांनीं त्या क्रतूमध्यें इंद्रप्रभृति श्रेष्ठ देवांचें आवाहन केलें. मधुर सोम आणि भक्तियुक्त समंत्रक आव्हानें ह्यांच्या योगानें होत्यांनीं ज्याच्या त्याच्या मनाप्रमाणें देवांना आवाहनपूर्वक हविर्भाग दिले. त्या क्रतूमध्यें प्रमाद अथवा अविधि हवन यत्-किंचित्‌हि न होतां ऋत्विजांनीं तें सर्व अनुष्ठान समंत्रक व निर्विघ्नपणें तडीस नेलें. तें अनुष्ठान जितके दिवस चाललें होतें, तितक्या दिवसांत त्या यज्ञमंडपामध्यें श्रांत, क्षुधित, अविद्वान आणि शंभर खटपटी ज्याच्या हाता-खालीं नाहींत असा कोणीहि ब्राह्मण दृष्टोत्पत्तीस आला नाहीं. ब्राह्मण ज्यांना प्रभु आहेत असे इतर शूद्र, तापस आणि श्रमण (बौद्ध संन्यासी) हे त्या ठिकाणीं भोजन करीत असत. वृद्ध, व्याधिग्रस्त, स्त्रिया व बालक हे एकसारखे भोजन करीत असतांनाहि यजमान दशरथ राजाला त्यांना भोजन घालणें पुरेसें झालें नाहीं. ‘ अन्न द्या आणि नानाप्रकारचीं वस्त्रें देऊन टाका ’ अशी आज्ञा अनेक वेळां त्या यज्ञमंडपामध्यें अधिकारी पुरुषांना होत असे व ते त्याप्रमाणें करीत असत. पाकशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें तयार केलेल्या अन्नाचे पर्वतासारखे असंख्य ढीग प्रत्यहि त्या ठिकाणीं दृष्टीस पडत असत. देशोदेशींहून आलेले पुरुष आणि स्त्रीसमुदाय ह्यांची त्या महात्म्या दशरथाच्या यज्ञामध्यें अन्नपानाच्या योगानें उत्तम प्रकारची व्यवस्था ठेविली जात असे. त्या मिष्ट अन्नाची द्विजश्रेष्ठ प्रशंसा करीत असत आणि त्यामुळें, ‘ राजा, आम्ही तृप्त झालों, तुझें कल्याण असो. ’ असे आशीर्वाद रघुवंशज दशरथाच्या कानीं येत असत. उत्तम उत्तम भूषणें धारण केलेले पुरुष ब्राह्मणांना वाढीत असत, आणि अत्यंत उज्ज्वल रत्नकुंडलें धारण केलेले असे इतर लोक त्यांचा समाचार घेत असत. एका कर्माची समाप्ति होऊन दुसऱ्या कर्माचा आरंभ होईपर्यंत असणाऱ्या मधल्या वेळांत एकमेकांना जिंकण्याच्या इच्छेनें मोठमोठ्या विद्वान वक्त्यांचे हेतुपुरःसर अनेक प्रकारचे वाद चालत असत.

त्या यज्ञामध्यें अनुष्ठानाविषयीं निपुण असलेले ब्राह्मण यथाशास्त्र (प्रेषप्रभृति)' प्रेरणा झाली असतां प्रत्यहीं सर्व कर्में करीत असत. त्या राजाच्या यज्ञमंडपा-

मध्यें अनुष्ठान पाहणारे जे सदस्य होते, त्यांत (शिक्षाप्रभृति) षडंगांचें ज्ञान नसणारा, व्रतस्थ न राहणारा, बहुश्रुत नसणारा आणि त्याचप्रमाणें वादामध्यें कुशल नसणारा असा कोणीहि ब्राह्मण नव्हता. यूप[1] उभारण्याचा समय प्राप्त झाला असतां सहा बेलाचे, सहा खैराचे आणि एकेका बेलाच्या यूपासमीप एकेक असे सहा पळसाचे यूप त्या ठिकाणीं आणिले होते. यूपांमध्यें श्लेष्मातक वृक्षाचा एक यूप होता; परंतु देवदारु वृक्षाचा यूप केवळ एकच नसून वेंगेंत बसण्यासारखे स्थूल असे दोन यूप होते. हे सर्व यूप यज्ञानुष्ठानामध्यें निष्णात अशा शिल्पशास्त्रवेत्याकडून करविलेले होते. त्या क्रतूला शोभा येण्याकरितां त्यांना सुवर्णाचे अलंकार घातलेले होते. एकवीस एकवीस हात लांब असलेले ते यूप एकवीस एकवीस वस्त्रांनीं एक एक ह्याप्रमाणें अलंकृत केलेले होते. त्या सर्वच यूपांची ठेवण मनोहर असून ते सर्व अष्टकोनाकृति होते. शिल्पी लोकांनीं ते चांगले व मजबूत तयार केलेले होते. असो. त्यांची यथाविधि स्थापना करून वस्त्रांच्या योगानें त्यांचें आच्छादन व गंधपुष्पांनीं पूजन झालें असतां, स्वर्गामध्यें शोभत असलेल्या देदीप्यमान सप्तर्षींप्रमाणें ते शोभूं लागले. कल्पसूत्रांत सांगितल्याप्रमाणें प्रमाणाला अनुसरून इष्टका (विटा) तयार करविल्या होत्या; आणि त्यांच्या योगानें शिल्पकर्मामध्यें कुशल ब्राह्मणांनीं अग्नीला आधारभूत असें स्थान रचून तयार केलें होतें. शिल्पकर्मामध्यें निष्णात असलेल्या ब्राह्मणांनीं तयार केलेला तो त्रिगुणित व अष्टदशात्मक असा नृपश्रेष्ठ दशरथ राजाचा चयन, सुवर्णपक्षांनीं युक्त अशा गरुड पक्ष्याच्या आकृतीसारखा झाला. त्या त्या देवतेच्या उद्देशानें त्या ठिकाणीं पशु बांधून ठेविले होते व विधीनें सांगितल्याप्रमाणें सर्प व पक्षी ह्यांचीहि त्या ठिकाणीं यथाशास्त्र योजना केलेली होती. इतकेंच नव्हे, परंतु शामित्रसंज्ञक[3] कर्माकरितां अश्व आणि त्याचप्रमाणें विहित असलेले जलचर प्राणी त्या ठिकाणीं योजून ठेविले होते. सारांश, ऋषींनीं शास्त्राच्या अनुरोधानें हें सर्व योजून ठेविले होते. दशरथाच्या त्या यज्ञमंडपामध्यें यूपांचें ठिकाणीं तीनशें पशु बांधून ठेविले होते. त्याचप्रमाणें उत्कृष्ट अश्वांमध्यें उत्कृष्ट असा अश्वहि बांधून ठेविला होता. नंतर कौसल्येनें त्या मंडपामध्यें त्या अश्वा-

---

१ बलिस्तंभ; या स्तंभाला बलिदानसमयीं बलि बांधितात.

२ वृक्षविशेष.

३ मारणें, फाडणें इत्यादि.

भोंवती प्रदक्षिणा केली, अतिशय आनंदानें तीन तरवारीनें त्याला फाडिलें आणि नंतर धर्मकामना मनामध्यें आणून स्वस्थांतःकरणपूर्वक त्या गरुडासारख्या वेगवान अश्वासमीप त्या कौसल्येनें एक रात्र वास्तव्य केलें. होता, अध्वर्यु आणि उद्गाता ह्यांनीं महिषी[1], परिवृक्ति[2] आणि तिसरी वावाता[3] ह्यांचा त्या अश्वांशीं समागम करविला. नंतर त्या अश्वाची वपा अर्थात् चंद्रनामक मेद काढून प्रयोगचातुर्यानें संपन्न अशा एका जितेंद्रियानें ऋत्विजानें ती यथाशास्त्र शिजविण्यास आरंभ केला असतां, स्वतःच्या पापाचें निरसन करण्याकरितां त्या दशरथ राजानें योग्य कालीं यथाविधि वपेचा धूमगंध घेतला. नंतर अश्वाचीं जीं हवनीय अंगें, त्या सर्वांचें त्या संपूर्ण सोळाहि ऋत्विज ब्राह्मणांनीं यथाविधि अग्नीमध्यें हवन केलें. असो.

इतर यज्ञामध्यें प्लक्ष वृक्षाच्या शाखांवर पाशुक हवि ठेवून अवदान देत असतात; परंतु अश्वमेध यज्ञामध्यें हविर्भाग वेतस वृक्षाच्या शाखेवर ठेवून द्यावा लागतो. कल्पसूत्रामध्यें आणि ब्राह्मणांमध्यें अश्वमेधाला त्र्यह (तीन सवनीय दिवसांनीं युक्त) असें म्हटलें आहे; तिहींपैकीं अग्निष्टोम हा त्यांतील प्रथम दिवस ठरविलेला आहे, उक्थ्य क्रतु हा दुसरा दिवस सांगितला आहे; आणि त्याचप्रमाणें अतिरात्र हा तिसरा दिवस उक्त आहे. शास्त्रांत दृष्ट असल्यामुळें आणखीहि पुष्कळ क्रतु विहित म्हणून उक्त आहेत. ज्योतिष्टोम, आयुष्टोम, दोन अतिरात्र, दोन आप्तोर्याम, अभिजित् आणि विश्वजित् ह्या अश्वमेधामध्यें विहित असलेल्या महाक्रतूंचें अनुष्ठान झालें.

ऋत्विजादिकांना दक्षिणादान.

नंतर आपलें कुल वृद्धिंगत करणाऱ्या धर्मात्म्या दशरथ राजानें होत्याला पूर्व दिशा दक्षिणा म्हणून दिली, अध्वर्यूला पश्चिम दिशा दिली, ब्रम्ह्याला दक्षिण दिशा अर्पण केली आणि उत्तर दिशा उद्गात्याचे स्वाधीन केली. कारण, ब्रह्मदेवानें पूर्वी उत्पन्न केलेल्या अश्वमेध महाक्रतूला कल्पसूत्रामध्यें ही दक्षिणा विहित आहे. ह्याप्रमाणें तो क्रतु यथाविधि समाप्त करून कुल वृद्धिंगत करणाऱ्या पुरुषश्रेष्ठ दशरथ राजानें ती पृथ्वी ऋत्विजांना अर्पण केली. ह्याप्रमाणें पृथ्वी अर्पण केल्यावर तो वैभवशाली इक्ष्वाकुवंशज दशरथ राजा आनंदित झाला. तेव्हां त्या पापरहित झालेल्या राजाला सर्व ऋत्विज म्हणाले, “संपूर्ण पृथ्वीचें रक्षण करण्यास तूंच एक योग्य आहेस. आम्ही पालन करण्यास समर्थ

---

१ राजाची क्षत्रिय जातीची स्त्री. २ राजाची वैश्य जातीची स्त्री. ३ राजाची शूद्र जातीची स्त्री.

नाहीं; आणि म्हणूनच पृथ्वीशीं आह्मांला कांहीं कर्तव्य नाहीं. हे भूपाला, वेदाध्ययन करण्याविषयीं मात्र आम्ही नेहमीं तत्पर असतों. कारितां ह्या पृथ्वीबद्दल कांहीं तरी निष्क्रय तूं दे म्हणजे झालें. एखादें उत्कृष्ठ रत्न, सुवर्ण, गाई अथवा जें कांहीं तुझ्यापाशीं देण्यासारखें असेल, तें आम्हांला दे. हे नृपश्रेष्ठा, पृथ्वीचें आम्हांला कारण नाहीं." ह्याप्रमाणें वेदपारंगत ब्राह्मणांनीं त्या राजाला सांगितलें असतां राजानें त्यांना दहा लक्ष गाई दिल्या, दहा कोटि भार सुवर्ण दिलें आणि चाळीस कोट रुपयेहि त्यानें त्यांना दिले. तेव्हां सर्व ऋत्विजांनीं एकत्र जमून तें द्रव्य बुद्धिमान् वसिष्ठ व ऋष्यश्रृंग मुनि ह्यांच्याकडे नेलें. नंतर त्याची यथान्याय वांटणी करून ते सर्वहि द्विजश्रेष्ठ अंतःकरणामध्यें अत्यंत प्रसन्न झाले; आणि 'आम्ही पराकाष्ठेचे आनंदित झालों आहों' असें त्यांनीं राजाला सांगितलें. तदनंतर तेथें आलेल्या इतरहि ब्राह्मणांना दशरथ राजानें अत्यंत स्वस्थांतःकरणपूर्वक उत्तम कांतीनें युक्त असें एक कोटिभार सुवर्ण दिलें. कोणी एक दरिद्री ब्राह्मण याचना करूं लागला असतां त्या रघुवंशज दशरथानें आपलें उत्कृष्ठ हस्तभूषणच त्याला अर्पण केलें. नंतर ब्राह्मण प्रसन्न झाले असतां त्या द्विजवत्सल दशरथ राजाचें अंतःकरण हर्षानें अगदीं व्याकुल झालें आणि त्यानें त्या ब्राह्मणांना यथाविधि प्रणाम केला. तेव्हां धरणीवर पडलेल्या त्या उदार पुरुषवीराला ब्राह्मणांनीं नानाप्रकारचे आशीर्वाद दिले. ह्याप्रमाणें श्रेष्ठ श्रेष्ठ राजांच्या हातूनहि पार पडण्यास कठीण असा तो पापनाशक व स्वर्गदायक उत्कृष्ठ क्रतु संपूर्ण झाल्यावर राजाचें मन प्रसन्न झालें, नंतर 'हे सदाचरणसंपन्न, आपण आतां कुलवृद्धीला कारणीभूत होणारें जें कर्म तें करा' म्हणून त्या दशरथ राजानें ऋष्यशृंग मुनीची प्रार्थना केली असतां, त्या द्विजश्रेष्ठ ऋष्यशृंग मुनींनीं राजाला सांगितलें, 'राजा, ठीक आहे. कुल चालविणारे चार पुत्र तुला होतील.' त्या मुनीचें तें मधुर भाषण श्रवण करून त्या राजाधिराज दशरथानें त्यांना प्रणाम केला, आणि त्याला पराकाष्ठेचा हर्ष होऊन त्या महात्म्यानें पुनरपि पुत्रप्राप्तीविषयीं त्या ऋष्यशृंग मुनीची प्रार्थना केली.

सर्ग पंधरावा.

अवतारनिश्चय.

ह्याप्रमाणें दशरथ राजानें प्रार्थना केल्यावर त्या बुद्धिमान् वेदवेत्त्या ऋष्यशृंग मुनींनीं समाधि लावून किंचित् विचार केला. समाधि उतरल्यावर ते त्या राजाला म्हणाले, ' अथर्ववेदोक्त मंत्राच्या योगानें मी तुजकडून पुत्रप्राप्ति होण्याकरितां कल्पसूत्रामध्यें प्रसिद्ध असलेली पुत्रप्राप्तिसाधनभूत इष्टि करवीन. ' ह्याप्रमाणें राजाला सांगितल्यानंतर पुत्राकरितां ती पुत्रप्राप्तिसाधनभूत इष्टि करण्याचा त्या तेजस्वी ऋष्यशृंग मुनींनीं उपक्रम केला; आणि समंत्रक कर्म करून अग्नीमध्यें हवन केलें. तेव्हां गंधर्वांसहवर्तमान देव, सिद्ध आणि महर्षि प्रेमपूर्वक यथाविधि प्रतिग्रह करण्याकरितां तेथें एकत्र जुळले आणि त्या यज्ञमंडपामध्यें यथायोग्यरीतीनें (अंतर्धान शक्तीच्या योगानें इतरांच्या दृष्टीस न पडतां) एकत्र जुळल्यावर जगत्स्रष्ट्या ब्रह्मदेवाला ते म्हणाले, " हे भगवन्, आपल्या प्रसादानें रावण नामक राक्षस उन्मत्त होऊन आपल्या स्वतःच्या सामर्थ्यानें आम्हां सर्वांना पीडा देत आहे. आम्ही त्याचें शासन करण्यास समर्थ नाहीं. हे भगवन्, आपण प्रसन्न होऊन त्याला वर दिला. तेव्हांपासून आपल्या वचनाला मान देऊन आम्ही नेहमीं त्याचें सर्व कांहीं सहन करीत आहों. तो दुर्मति त्रैलोक्याला त्रास देत असून स्वतःपेक्षां संपत्तीनें वगैरे अधिक असलेल्यांचा द्वेष करीत आहे. इतकेंच नव्हे, परंतु स्वर्गाधिपति इंद्रालाहि जिंकण्याची तो इच्छा करीत आहे. आपलें वरदान झाल्यामुळें त्याला कसलाहि सुमार राहिला नाहीं आणि त्यामुळें कोणाच्याहि हातून पराभव पावण्यास शक्य नसलेला तो राक्षस, ऋषि, गंधर्वांसहवर्तमान यक्ष, ब्राह्मण आणि असुर ह्यांचें अतिक्रमण करीत आहे. सूर्य ह्याला ताप देत नाहीं, वायु त्याचे समीप जोरानें वहात नाहीं आणि चंचल तरंगसमुदायांनीं युक्त असलेला समुद्रहि त्याला पाहून क्षुब्ध होत नाहीं. ह्यामुळें दिसण्यांतहि भयंकर असलेल्या त्या राक्षसापासून आम्हांला मोठें भय उत्पन्न झालें आहे. करितां हे भगवन्, त्याच्या वधाचा उपाय आपण योजा. "

ह्याप्रमाणें सर्व देवांनीं प्रार्थना केली असतां क्षणभर विचार केल्यानंतर ब्रह्मदेव त्यांना म्हणाले, " अरे हो ! त्या दुरात्म्याचा वध होण्याला हा एक उपाय सुचला आहे. ' गंधर्व, यक्ष, देव आणि राक्षस ह्यांना मी अवध्य

असावें ' असा त्यानें वर मागितला असतां मी 'ठीक आहे' म्हणून त्याला म्हटलें आहे. मनुष्यांची त्याला मुळींच पर्वा नसल्यामुळें त्यानें त्या वेळीं मनुष्यांचा उल्लेख केला नाहीं. तस्मात्, मनुष्यापासूनच त्याचा वध होणें शक्य आहे; ह्याला मारणारा दुसरा कोणी नाहीं. " ब्रह्मदेवाचें तें प्रिय भाषण श्रवण करून सर्व देव आणि महर्षि आनंदित झाले. इतक्यांत पीतांबरधारी आणि महातेजस्वी जगदीश विष्णु उज्ज्वल सुवर्णांनीं युक्त अशीं बाहुभूषणें व शंख, चक्र, गदा हीं आयुधें धारण करून, मेघांवर आरोहण करणाऱ्या सूर्याप्रमाणेंच कीं काय, गरुडावर आरूढ होऊन त्या ठिकाणीं आले. ते आले असतां सुरश्रेष्ठांनीं त्यांना वंदन केलें व नंतर ब्रह्मदेवाची भेट घेऊन ते त्या ठिकाणीं स्वस्थ बसले असतां, सर्व देव प्रणामपूर्वक स्तुति करून त्यांना म्हणाले, "हे विष्णो, लोकांच्या हिताची इच्छा धरून आम्ही आपली एका कार्याकडे योजना करणार आहों. हे सर्वव्यापी भगवन्, धर्मवेत्ता, उदार आणि महर्षिप्रमाणें तेजस्वी असा जो हा अयोध्याधिपति दशरथ राजा, याच्या अनुक्रमें ऱ्ही, श्री आणि कीर्ति ह्यांप्रमाणें असलेल्या तीन भार्यांचे ठिकाणीं स्वतःचे चार अंश करून आपण पुत्ररूपानें अवतीर्ण व्हां. सारांश, हे प्रभो, आपण मनुष्यरूपानें त्या ठिकाणीं अवतीर्ण होऊन देवांना अवध्य आणि म्हणूनच मदानें चढून गेलेल्या ह्या लोककंटक रावणाचा समरांगणामध्यें वध करा. तो मूर्ख राक्षस वीर्याचा गर्व झाल्यामुळें गंधर्वांसहवर्तमान देव, सिद्ध आणि श्रेष्ठ ऋषि ह्यांना पीडा देत आहे. त्या भयंकर राक्षसानें नंदनवनामध्यें क्रीडा करीत असलेल्या गंधर्वांसहवर्तमान अप्सरांचा आणि ऋषींचा अगदीं नाश करून टाकला आहे. तेव्हां त्याचा वध व्हावा ह्या उद्देशानें मुनींसहवर्तमान आम्ही आणि त्याचप्रमाणें सिद्ध, गंधर्व व यक्ष असे आपणांला शरण आलों आहों. हे महातेजस्वी देवा, आम्हां सर्वांचा मुख्य आधार आपणच आहां. देवशत्रूंचा वध करण्यास्तव आपण मनुष्यलोकामध्यें अवतीर्ण होण्याचें मनांत आणा."

ह्याप्रमाणें सुरश्रेष्ठ देवाधिपति विष्णूची देवांनीं स्तुति केली असतां ते सर्वलोकवंद्य विष्णु त्या यमधर्मासहवर्तमान जुळलेल्या ब्रह्मदेवप्रभृति सर्व देवांना म्हणाले, 'तुमचें कल्याण असो; तुम्ही भय सोडा. देव आणि ऋषि ह्यांना भयावह आणि जिंकण्यास कठीण अशा त्या क्रूर रावणाचा—पुत्र, पौत्र, अमात्य, मंत्री आणि ज्ञातिबांधव ह्यांसहवर्तमान, तुमच्या कल्याणाकरितां—संग्रामामध्यें

वध करून ह्या पृथ्वीचें परिपालन करीत करीत मी अकरा हजार वर्षें मनुष्य-लोकांमध्यें वास्तव्य करीन.' ह्याप्रमाणें देवांना वर देऊन त्या जितेंद्रिय देवाधिदेव विष्णूंनीं देवांनीं सांगितल्याप्रमाणें आपणांला अनुरूप अशी जन्मभूमि मनुष्यलोकामध्यें दशरथ राजाच्या भार्याच आहेत, असें मनामध्यें आणिलें; आणि नंतर आपले चार अंश करून त्या कमलनयन विष्णूंनीं पिता होण्यास दशरथ राजा योग्य आहे असें ठरविलें. तेव्हां रुद्रगण आणि अप्सरांचे समुदाय ह्यांसहवर्तमान देव, ऋषि आणि गंधर्व हे दिव्य स्तुतींनीं मधुसूदनाला संतुष्ट करूं लागले. "हे देवाधिदेवा, सज्जनांना व तपस्व्यांना नुसता भयावहच नव्हे, परंतु कंटकाप्रमाणें असून त्रैलोक्याला त्रास देणारा असा जो उग्र तेजानें आणि पराकाष्ठेच्या गर्वानें युक्त असलेला सुरद्वेष्टा मदमत्त रावण, त्याचा समूळ नाश करा. आणि हे सुरेश्वरा, भयंकर सामर्थ्यानें युक्त असलेल्या त्या त्रैलोक्यपीडक रावणाचा सैन्य व बांधव ह्यांसहवर्तमान वध केल्यानंतर निश्चित होऊन स्वतःच्या योगानें चिरकाल सुरक्षित आणि रागादि दोषरूप कल्मषानें रहित अशा स्वर्गलोकाप्रत परत या."

सर्ग सोळावा.

पायसप्राप्ति.

ह्याप्रमाणें सुरश्रेष्ठांनीं प्रार्थना केल्यानंतर सर्वव्यापी नारायण स्वतः जाणीत असूनहि देवांना सौम्य शब्दांनीं विचारूं लागला, 'देवहो, त्या राक्षसाधिपतीच्या वधाचा उपाय कोणता, तो मला कथन करा म्हणजे मी त्याचें अवलंबन करून ऋषींना त्रास देणाऱ्या त्या राक्षसाचा वध करीन.'

ह्याप्रमाणें विचारल्यावर सर्व देव त्या अविनाशी विष्णूला म्हणाले, "मनुष्यजन्म घेऊन संग्रामामध्यें आपण रावणाचा वध करा. त्या शत्रुदमन करणाऱ्या रावणानें पूर्वीं पुष्कळ वेळपर्यंत तीव्र तपश्चर्या केली. तेव्हां लोकांचे मूळ उत्पादक ब्रह्मदेव संतुष्ट झाले आणि 'मनुष्यावांचून इतर कोणत्याहि प्राण्यापासून तुला भीति नाहीं' असा त्या प्रभूंनीं त्या राक्षसाला वर दिला. कारण, त्या राक्षसानें वरप्रदानसमयीं मनुष्यांची गणनाच केली नव्हती. ह्याप्रमाणें ब्रह्मदेवापासून वरप्राप्ति झाल्यामुळें तो गर्विष्ठ झाला आहे आणि त्रैलोक्य

उच्छिन्न करीत असून लोकांच्या स्त्रियाहि तो ओढून नेऊं लागला आहे. तस्मात् हे शत्रुतापना, मनुष्यापासूनच त्याचा वध होणार, हें निश्चित आहे."

देवांचें हें भाषण ऐकून दशरथ राजा पिता होण्याला योग्य आहे असें जितेंद्रिय विष्णूंनीं मनामध्यें आणिलें. त्या वेळीं महातेजस्वी दशरथ राजालाहि पुत्र नव्हता; आणि पुत्रप्राप्तीकरितां तो शत्रुनाशक पुत्रसाधनभूत यागहि करीत होता. असो. ह्याप्रमाणें अवतार घेण्याविषयीं निश्चय करून व ब्रह्मदेवाला विचारून सुरश्रेष्ठ विष्णु, देव आणि ऋषि पूजन करीत असतांनाच अंतर्धान पावले. तदनंतर पुत्रकामेष्टिनामक याग करीत असलेल्या दशरथ राजाच्या अग्नींतून एक महापुरुष निघाला. तो कांतीनें अनुपम होता. त्याचें वीर्य मोठें होतें आणि बलहि प्रचंड होतें. तो कृष्णवर्णानें युक्त होता. त्यानें आरक्तवर्णवस्त्र परिधान केलेलें होतें. त्याचें मुख आरक्तवर्ण होतें. स्वर दुंदुभीसारखा गंभीर होता. शरीरावरील लव, मुखावरील श्मश्रु आणि मस्तकावरील केंस हे सिंहाच्या केंसाप्रमाणें तुळतुळीत होते. तो शुभ लक्षणांनीं संपन्न होता. दिव्य भूषणांनीं भूषित झालेला होता. पर्वतशिखराप्रमाणें उंच होता आणि चालण्याची ढब मत्त व्याघ्राप्रमाणें होती. त्याची प्रभा सूर्याप्रमाणें होती. त्याचें स्वरूप प्रदीप्त अग्नीच्या ज्वालेप्रमाणें उग्र होतें. आणि मायारूप प्रिय पत्नीच कीं काय अशी, रुप्याचें झांकण घातलेली एक मोठी दिव्य पायसानें परिपूर्ण असलेली सुवर्णमय स्थाली त्यानें आपल्या हातामध्यें घेतली होती. अशा प्रकारें पायस घेऊन अग्नींतून निघालेला तो पुरुष यज्ञमंडपामध्यें दृष्टि देऊन दशरथ राजाला म्हणाला, "राजा, प्रजाधिपति विष्णूनें पाठविलेला पुरुष मी येथें आलों आहें, असें तूं समज." ह्याप्रमाणें त्या पुरुषानें सांगितलें असतां दशरथ राजानें हात जोडून विचारलें, 'भगवन् आपलें स्वागत असो. मीं आपलें काय प्रिय करावें?' तेव्हां प्रजापतीसंबंधी पुरुष राजाला पुनः म्हणाला, "राजा, देवांचें अर्चन करीत असल्यामुळें आज तुला हें प्राप्त झालें आहे. हे नृपश्रेष्ठा, धनदायक, आरोग्यवर्धक आणि संतानकारक असें हें देवनिर्मित पायस तूं ग्रहण कर आणि 'भक्षण करा' असें सांगून तूं आपल्या प्रिय पत्नींना तें अर्पण कर. म्हणजे राजा, ज्याकरितां तूं याग करीत आहेस ते पुत्र तुला त्या पत्नींचे ठिकाणीं प्राप्त होतील." ह्यावर 'ठीक आहे' असें म्हणून प्रसन्न झालेल्या दशरथ राजानें देवनिर्मित अन्नानें भरलेली ती देवदत्त सुवर्णमय स्थाली शिरसा मान्य करून आश्चर्यकारक आणि मनोहर स्वरूपानें

युक्त अशा त्या पुरुषाला अभिवंदन केलें; आणि पराकाष्ठेच्या आनंदानें युक्त होऊन त्यानें त्याला प्रदक्षिणाहि केली. संपत्ति प्राप्त झाली असतां ज्याप्रमाणें दरिद्री पुरुषाला पराकाष्ठेचा आनंद होतो, त्याप्रमाणें तें देवनिर्मित पायस प्राप्त झालें असतां दशरथ राजा पराकाष्ठेचा आनंदित झाला. नंतर अद्भुत् स्वरूपानें युक्त असलेला तो अत्यंत उज्ज्वल पुरुष तें (पायस देण्याचें) कार्य संपूर्ण झाल्यावर तेथेंच अंतर्धान पावला. असो.

पायस प्राप्त झालें असतां, शरदृतूंतील मनोहर चंद्राच्या किरणांनीं ज्याप्रमाणें आकाश प्रकाशित होतें, त्याप्रमाणें दशरथ राजाच्या अंतःपुरांतील स्त्रिया हर्षजन्य मुखकांतीच्या योगानें चमकूं लागल्या. अंतःपुरांत प्रविष्ट झाल्याबरोबर तो दशरथ राजा, ‘ स्वतःला पुत्रप्राप्ति करून देणारें हें पायस तूं ग्रहण कर ’ असें कौसल्येला म्हणाला; आणि त्या भूपतीनें संपूर्ण पायसांतील अर्धें पायस कौसल्येला दिलें. नंतर कौसल्येला दिलेल्या पायसांतील चवथा हिस्सा त्या भूपतीनें तिच्याकडून सुमित्रेला देवविला. तदनंतर प्रथम संपूर्ण पायसांतील अर्धें कौसल्येला दिल्यावर जें अर्धें पायस अवशिष्ट राहिलें होतें, तें त्यानें पुत्रप्राप्तीकरितां कैकेयीला दिलें; आणि कैकेयीला दिलेल्या अर्ध्या पायसांतील अमृतोपम असा चतुर्थांश भाग त्या महामति दशरथ राजानें विचार करून पुनरपि सुमित्रेला देवविला. तात्पर्य, कौसल्येला तीनअष्टमांश, कैकेयीला तीनअष्टमांश आणि सुमित्रेला दोनअष्टमांश ह्याप्रमाणें दशरथ राजानें त्या भार्यांना वेगळें वेगळें पायस दिलें. ह्याप्रकारें पायस प्राप्त झाल्यावर दशरथ राजाच्या त्या तिन्ही उत्कृष्ठ स्त्रियांचें अंतःकरण हर्षानें प्रफुल्लित झालें आणि आपला सन्मान झाला असें त्यांना वाटलें. तदनंतर दशरथ भूपतीच्या त्या उत्कृष्ठ स्त्रियांनीं तें उत्कृष्ठ पायस वेगळें वेगळें प्राशन केलें. आणि अग्नि व सूर्य ह्यांप्रमाणें तेजस्वी गर्भ त्यांना प्राप्त झाले. नंतर ज्यांचे गर्भ वृद्धिंगत झाले आहेत अशा त्या आपल्या स्त्रियांना अवलोकन करून राजाचें अंतःकरण स्वस्थ झालें; आणि स्वर्गामध्यें देवराज इंद्र, सिद्ध आणि ऋषिगण ह्यांनीं पूजित असलेल्या श्रीहरीप्रमाणें त्या राजाला आनंद झाला.

सर्ग सतरावा.

देवांशभूत वानरांची उत्पत्ति.

ह्याप्रमाणें विष्णूंनीं त्या महात्म्या दशरथ राजाचें पुत्रत्व स्वीकारिलें असतां भगवान ब्रह्मदेव सर्व देवतांना म्हणाले, “ सत्यप्रतिज्ञ आणि वीर असा जो आपणां सर्वांचें हित इच्छिणारा विष्णु, त्याला यथेष्ट रूप धारण करणारे व बलाढ्य असे साहाय्यकर्ते तुम्ही उत्पन्न करा ते साहाय्यकर्ते राक्षसी माया जाणणारे, शूर, वेगामध्यें वायूच्या वेगाची बरोबरी करणारे, नीतिशास्त्रवेत्ते, बुद्धिमान, विष्णूसारखे पराक्रमी, शत्रूंना अवध्य, सामादि उपाय जाणणारे, देवांप्रमाणें दिव्य शरिरानें युक्त व प्रयोग, उपसंहार इत्यादि अस्त्रसंबंधीं सर्व गुणांनीं संपन्न असे असावे. सारांश, मुख्य अप्सरा, गंधर्वपत्न्या, यक्ष आणि नाग ह्यांच्या कन्या, ऋक्ष आणि विद्याधर ह्यांच्या स्त्रिया, किन्नरांच्या स्त्रिया आणि वानरस्त्रिया ह्यांचे ठिकाणीं हरिरूपानें तुह्मी एकसारखे पराक्रमी पुत्र उत्पन्न करा. अस्वलांमध्यें श्रेष्ठ असा जांबवान् मीं पूर्वीं उत्पन्न केलेला आहे. कारण, मी जांभई देऊं लागलों असतां एकाएकीं तो माझ्या मुखांतून उत्पन्न झाला आहे.

ह्याप्रमाणें भगवान ब्रह्मदेवांनीं सांगितल्यावर देवांनीं त्यांची आज्ञा मान्य करण्याविषयीं वचन दिलें; आणि त्याप्रमाणें त्यांनीं वानररूपी पुत्र उत्पन्न केले. महात्मे ऋषि, सिद्ध, विद्याधर, उरग आणि चारण ह्यांनीं वनामध्यें संचार करणारे असे वीर वानरपुत्र उत्पन्न केले. दिसण्यांत इंद्रासारखा आणि वानरांचा अधिपति असा वाली नांवाचा पुत्र इंद्रानें उत्पन्न केला; आणि तेजस्व्यांमध्यें श्रेष्ठ असलेल्या सूर्यानें सुग्रीव नामक पुत्र उत्पन्न केला. बृहस्पतीनें तार नामक महावानर उत्पन्न केला. तो सर्व श्रेष्ठ श्रेष्ठ वानरांमध्यें अनुपम व बुद्धिमान होता. गंधमादनसंज्ञक वैभवशाली वानर कुबेराचा पुत्र असून विश्वकर्म्यानें नल नामक श्रेष्ठ वानर उत्पन्न केला. प्रभेनें अग्नीसारखा असलेला वैभवशाली नील अग्नीचा पुत्र असून त्या वीर्यवान नीलानें तेज, कीर्ति आणि वीर्य ह्यांमध्यें अग्नीलाहि मागें सारिलें. सौंदर्यरूप संपत्तीनें युक्त आणि रूपवान म्हणून सर्व लोकांना संमत अशा अश्विनीकुमारांनीं मैंद व द्विविद ह्या वानरांना स्वतः उत्पन्न केलें. सुषेण नामक वानर वरुणानें उत्पन्न केला आणि महाबलाढ्य पर्जन्यानें शरभाला जन्म दिला. सर्व मुख्य मुख्य वानरांमध्यें बुद्धिमान आणि

बलाढ्य, वेगामध्यें गरुडाची बरोबरी करणारा, कीर्तिमान आणि वज्रदेही असा हनुमान म्हणून प्रसिद्ध असलेला वानर वायूचा पुत्र होय. असो.

वानरांचें सामर्थ्यवर्णन.

अशाप्रकारें अतुल बलानें युक्त, वीर, यथेष्ठ रूप धारण करणारे आणि रावणाच्या वधाविषयीं उद्युक्त असे ते हजारों वानर उत्पन्न झाले. सारांश, ऋक्ष, वानर आणि गोपुच्छ ह्या योनींचे अवलंबन करून गज व पर्वत ह्याप्रमाणें विप्पाड व महाबलाढ्य असे ते देवपुत्र ब्रह्मदेवाची अनुज्ञा झाल्यावर सत्वर जन्मास आले. ज्या देवाचें जें रूप, जो वेष व जो पराक्रम असे, त्यांसहवर्तमान त्या त्या देवांपासून पथक् पथक् पुत्र उत्पन्न झाला. देवांपेक्षांहि पराक्रमामध्यें किंचित् अधिक असे कांहीं योगांगुलसंज्ञक वानरांमध्यें उत्पन्न झाले. त्याचप्रमाणें अस्वलाचें रूप धारण केलेल्या किन्नर स्त्रियांचे ठिकाणींहि कांहीं उत्पन्न झाले. तात्पर्य, देव, यशस्वी महर्षि, गंधर्व, तार्क्ष्यवंशज आणि यक्ष, नाग, किन्नर, सिद्ध, विद्याधर आणि उरग इत्यादि अनेकांनीं आनंदित होऊन हजारों पुत्र उत्पन्न केले व चारणांनींहि वनामध्यें संचार करणारे असे वीर पुत्र उत्पन्न केले. ते वानरपुत्र शरिरानें फारच विप्पाड असून सर्वहि वनामध्यें संचार करणारे होते. आणि वानररूप धारण केलेल्या मुख्य मुख्य अप्सरा, विद्याधर स्त्रिया, नागकन्या आणि गंधर्वपत्न्या ह्यांचे ठिकाणीं ते उत्पन्न झाले होते. यथेष्ठ रूप व बल ह्यांनीं ते युक्त असून इच्छेस येईल त्याप्रमाणें ते संचार करणारे होते. प्रौढि आणि बल ह्यांच्या योगानें ते सिंह आणि व्याघ्र ह्यांची बरोबरी करणारे होते. ते सर्वहि शिलांनीं प्रहार करणारे होते. इतकेंच नव्हे, परंतु सर्वहि पर्वतांनीं युद्ध करणारे होते. नखें आणि दाढा हीं त्या सर्वांचीं आयुधें होतीं. इतकेंच नव्हे, परंतु इतर सर्व प्रकारच्या अस्त्रांमध्येंहि ते निष्णात होते. तात्पर्य, मोठमोठ्या पर्वतांना हालवून सोडणारे, अचल वृक्षांना मोडून पाडणारे, नदीपति समुद्रालाहि वेगानें क्षुब्ध करून टाकणारे, पायांनीं पृथ्वी विदारण करणारे, महासागरांतून पोहून जाणारे, आकाशामध्यें प्रविष्ठ होऊन मेघांचाहि निग्रह करणारे, वनामध्यें संचार करीत असलेल्या मदमत्त गजांनाहि आवरून धरणारे, आणि गर्जना करणाऱ्या पक्ष्यांना आपल्या गर्जनेनें खालीं पाडणारे असे कोटि वानर उत्पन्न झाले ते महात्मे यथेष्ठ रूप धारण करणारे असून समुदायांचें परिपालन करणारे होते. ते वानरांच्या मुख्यमुख्य समुदायामध्यें वानरसेनांचे रक्षक होते. आणि वानरसमुदाय रक्षण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ आणि शूर असा

इतर वानरांना त्यांनीं जिंकिलें होतें. हजारों वानर ऋक्षवान पर्वताच्या शिखरांचा आश्रय करून राहिले आणि दुसरे नानाप्रकारचे पर्वत आणि वनें ह्यांना धरून राहिले. सूर्यपुत्र सुग्रीव आणि इंद्रपुत्र वाली ह्या उभयतां भ्रात्यांची ते सर्व वानरसेनानायक सेवा करूं लागले. त्याचप्रमाणें नल, नील, हनुमान व इतरहि वानरसेनानायक ह्यांची ते सेवा करूं लागले. गरुडाप्रमाणें बलाढ्य असलेले ते सर्व युद्धामध्यें निपुण होते; आणि संचार करितां करितां सिंह, व्याघ्र व मोठमोठे भुजंग ह्या सर्वांना ते पीडा देत होते. महाबलाढ्य, महाबाहु आणि महापराक्रमी वालीनें आपल्या बाहुबलाच्या योगानें ऋक्ष आणि गोपुच्छ ह्या वानरजातींचें रक्षण केलें. असो. नानाप्रकारच्या आकृतींनीं व नानाप्रकारच्या भेदव्यंजक लक्षणांनीं युक्त असलेल्या, मेघपटल अथवा पर्वतशिखरें यांप्रमाणें भयंकर शरीर व रूप धारण केलेल्या आणि रामचंद्राचें साहाय्य करण्याकरितां अवतीर्ण झालेल्या शूर वानरसेनानायकांनीं पर्वत, वनें आणि समुद्र ह्यांसहवर्तमान ही सर्व पृथ्वी व्यापून टाकिली.

सर्ग अठरावा.

श्रीरामादिकांचे जन्म.

महात्म्या दशरथ राजाचा तो अश्वमेध यज्ञ समाप्त झाल्यावर आपापले हविर्भाग घेऊन देव आपल्या मार्गानें परत गेले; आणि यज्ञदीक्षेसंबंधीं नियम ज्यानें समाप्त केले आहेत असा तो राजा, स्त्रिया आणि सेवक, सैन्य, वाहनें ह्यांसहवर्तमान राजधानीमध्यें प्रविष्ट झाला. त्या राजानें इतर भूपतींचें यथायोग्य रीतीनें पूजन केलें व ते भूपति मुनिश्रेष्ठ वसिष्ठ मुनींना व ऋष्यशृंग मुनींना प्रणाम करून आनंदानें स्वदेशीं परत गेले. ते वैभवशाली राजे दशरथ राजाच्या नगरांतून आपापल्या घरीं जाऊं लागले असतां उज्ज्वल आणि आनंदित अशीं त्यांचीं सैन्यें झळकूं लागलीं. असो. भूपति गेल्यानंतर वैभवशाली दशरथ राजा द्विजश्रेष्ठांना पुढें करून आपल्या राजधानीमध्यें प्रविष्ट झाला. प्रथम ज्यांची अत्यंत मान्यता ठेविली आहे असे ऋष्यशृंग मुनि शांतेसहवर्तमान अयोध्येंत प्रविष्ट झाले. त्यांच्याच मागोमाग विचारी दशरथ राजा सैन्यासहवर्तमान प्रविष्ट झाला. असो. ह्याप्रमाणें त्या सर्वांना जाण्याची अनुज्ञा देऊन मनोरथ सिद्धीस गेलेला तो राजा पुत्रोत्पत्तीविषयीं विचार करीत करीत त्या

ठिकाणीं सुखानें राहिला. अश्वमेध क्रतु समाप्त झाल्यानंतर सहा ऋतु लोटले असतां व बारावा महिना प्राप्त झाला असतां चैत्रांतील नवमीचे दिवशीं पुनर्वसु नक्षत्रावर पांच ग्रह उच्चीचे असतांना आणि त्यांतूनहि चंद्र व गुरु लग्नीं असतांना कर्क लग्नावर दिव्य लक्षणांनीं युक्त आणि सर्व लोकांना पूज्य असा जगदीश्वर राम कौसल्येच्या ठिकाणीं उत्पन्न झाला. तो ईक्ष्वाकुवंशज महाभाग्यवान पुत्र विष्णूचा जवळजवळ अर्धा अंश होता. त्याचे नेत्र व ओंठ आरक्तवर्ण होते आणि शब्द दुंदुभीप्रमाणें गंभीर असून बाहु दीर्घ होते. असो. सुरश्रेष्ठ वज्रपाणी इंद्राच्या योगानें शोभणाऱ्या अदितीप्रमाणें त्या अत्यंत तेजस्वी पुत्राच्या योगानें कौसल्या शोभूं लागली. कैकेयीचे ठिकाणीं भरत म्हणून अमोघ पराक्रमी पुत्र झाला. तो साक्षात् विष्णूचा चवथा अंश असून सर्व गुणांनीं संपन्न होता. नंतर सुमित्रेला लक्ष्मण व शत्रुघ्न असे दोन वीर पुत्र झाले. ते विष्णूचे अंश असून सर्व अस्त्रांमध्यें प्रवीण होते. निर्मल बुद्धीनें युक्त असलेला भरत पुष्य नक्षत्र असतांना मीन लग्नावर उत्पन्न झाला आणि मघा नक्षत्र व उच्चीचा सूर्य असतांना कर्क लग्नावर सुमित्रेचे दोघे पुत्र जन्मास आले. महात्म्या दशरथ राजाला वेगवेगळ्या गुणांनीं युक्त असे चार पुत्र झाले. ते गुणी व राजाला अनुरूप असेच असून कांतीनें पूर्वाभाद्रपदा व उत्तराभाद्रपदा ह्या नक्षत्रांप्रमाणें[१] होते.

जन्ममहोत्सव.

ह्याप्रमाणें दशरथ राजाला पुत्र झाले असतां गंधर्व गायन करूं लागले, अप्सरांचे समुदाय नृत्य करूं लागले, देवदुंदुभि नादित होऊं लागल्या आणि आकाशापासून पुष्पवृष्टि होऊं लागली. अयोध्येमध्यें लोकांची अगदीं खेचाखेच होण्यासारखा मोठा उत्सव झाला. त्या वेळीं नट व नर्तक ह्यांनीं नगरांतील मार्ग व्याप्त झाल्यामुळें लोकांचीहि त्या मार्गांतून फार गर्दी झाली. सारांश, गायन आणि वादन ह्यांच्या योगानें नादित झालेले आणि सर्व रत्नांनीं युक्त झालेले ते भव्य मार्ग शोभूं लागले. असो.

---

१ पूर्वाभाद्रपदा आणि उत्तराभाद्रपदा ह्या नक्षत्रांचे दोन दोन तारे असतात. ह्यास्तव दोन दोन ताऱ्यांचें एकेक नक्षत्र असल्यामुळें चार तारे जसे दोन नक्षत्रांमध्यें विभागिलेले असतात, तसे दशरथ राजाचे चार पुत्र एकेका ठिकाणीं दोन दोन ह्याप्रमाणें म्हणजे रामलक्ष्मण व भरत-शत्रुघ्न ह्याप्रमाणें स्वभावतःच विभागिले असल्यामुळें त्यांना ताराचतुष्टयानें होणाऱ्या ह्या दोन नक्षत्रांची उपमा दिली आहे.

नामकरण.

ह्याप्रमाणें पुत्रप्राप्ति झाली असतां पौराणिक, भाट आणि स्तुतिपाठक ह्यांना राजानें देणग्या दिल्या आणि ब्राह्मणांनाहि वित्तासहवर्तमान हजारों गाई अर्पण केल्या. अकरा दिवस झाल्यानंतर दशरथ राजानें महात्म्या ज्येष्ठ पुत्राचें राम असें नामकरण करून कैकेयीच्या पुत्राचें भरत असें नांव ठेविलें. त्याचप्रमाणें लक्ष्मण व शत्रुघ्न अशीं सुमित्रेच्या पुत्रांचीं त्यानें नांवें ठेविलीं. असो. अत्यंत आनंदित झालेल्या वसिष्ठ मुनींनीं त्या राजकुमारांचा नामकरण-संस्कार करून ब्राह्मणांना व नगरांत आणि राष्ट्रांत राहणाऱ्या इतरांनाहि भोजन घातलें व उज्ज्वल असा मोठा रत्नसमुदाय त्यांनीं ब्राह्मणांना अर्पण केला. सारांश, वसिष्ठ मुनींनीं त्या राजपुत्रांचें नामकरणप्रभृति सर्व संस्कार राजाकडून करविले. त्या चारहि पुत्रांमध्यें वंशध्वजच कीं काय असा ज्येष्ठ पुत्र राम पित्याला आनंद देणारा होऊन ब्रह्मदेवाप्रमाणें सर्व प्राण्यांना फारच मान्य झाला.

बालपणांतील वर्तन

ते सर्वहि राजपुत्र वेदवेत्ते व शूर असून सर्वहि लोकहिताविषयीं तत्पर होते. त्याचप्रमाणें सर्वहि ज्ञानी असून सर्वहि गुणी होते. चौघांमध्यें महातेजस्वी व अमोघ पराक्रमी असा राम निर्मळ चंद्राप्रमाणें सर्व लोकांना प्रिय होता. गजारोहण, अश्वारोहण व रथचर्या ह्यांमध्यें तो निपुण असून धनुर्वेदाविषयीं आणि पितृशुश्रूषेविषयीं अगदीं तत्पर होता. लक्ष्मीला वृद्धिंगत करणारा लक्ष्मण, लोकांना आनंद देणाऱ्या आपल्या रामनामक ज्येष्ठ भ्रात्याशीं लहानपणापासून नेहमीं फारच प्रेमानें वागत असे. आपल्या शरिराचीहि पर्वा न करितां रामाला प्रिय असलेली हवी ती गोष्ट तो वैभवशाली लक्ष्मण करीत असल्यामुळें, त्या रामाचा तो एक दुसरा बाह्य प्राणच होऊन बसलेला होता. लक्ष्मणा-वांचून त्या पुरुषश्रेष्ठ रामाला निद्रा येत नसे व समीप आणलेलें मिष्टान्नहि त्या-वांचून तो भक्षण करीत नसे. रघुवंशज राम जेव्हां अश्वावर आरूढ होऊन मृगयेला जात असे, तेव्हां त्याचें रक्षण करण्याकरितां धनुष्य घेऊन त्याच्या मागोमाग लक्ष्मण जात असे. लक्ष्मण ज्याप्रमाणें रामाला प्रिय होता, त्याच-प्रमाणें लक्ष्मणाचा कनिष्ठ बंधु शत्रुघ्नहि भरताला नेहमीं प्राणापेक्षां प्रिय होता, त्याचप्रमाणें शत्रुघ्नालाहि तो भरत तसाच प्रिय होता.

विश्वामित्र ऋषींचें आगमन.

याप्रमाणें प्रभावानें व उज्ज्वल तेजानें युक्त अशा त्या महाभाग्यवान चार प्रिय पुत्रांच्या योगानें, देवांच्या योगानें आनंदित होणाऱ्या ब्रह्मदेवाप्रमाणें, दशरथ राजा अत्यंत आनंदित झाला. ते सर्व ज्ञानसंपन्न झाले असतां गुणांनीं युक्त झाले आणि ते सर्वज्ञ व दूरदर्शी होऊन विनयशील आणि कीर्तिमान झाले. ते पुरुषश्रेष्ठ वेदाध्ययनविषयीं आणि पित्याच्या शुश्रूषेविषयीं तत्पर होऊन धनुर्वेदामध्यें पारंगत झाले असतां, उपाध्याय आणि बांधव ह्यांसहवर्तमान दशरथ राजाच्या मनामध्यें त्यांच्या विवाहाविषयीं विचार येऊं लागला. तो महात्मा दशरथ राजा मंत्रिमंडळामध्यें पुत्रांच्या विवाहाविषयीं विचार करीत आहे तोंच महातेजस्वी विश्वमित्र महर्षि तेथें आले आणि 'राजाची भेट घेण्याच्या उद्देशानें मी गाधिपुत्र कौशिक प्राप्त झाल्याचें सत्वर कळवा' म्हणून द्वारपालांना म्हणाले. तेव्हां तें त्यांचें भाषण श्रवण केल्याबरोबर द्वारपाल मनामध्यें अगदीं गोंधळून गेले, आणि त्या आज्ञेनें प्रेरित होऊन ते सर्वहि राजगृहाकडे सत्वर गेले. राजगृहीं गेल्यानंतर त्यांनीं इक्ष्वाकुवंशज दशरथ राजाला विश्वामित्र मुनि प्राप्त झाल्याचें निवेदन केलें.

द्वारपालाचें भाषण श्रवण करतांच, ब्रह्मदेवाला सामोरा जाणाऱ्या इंद्राप्रमाणें पुरोहितांसहवर्तमान तो दशरथ राजा स्वस्थांतःकरणपूर्वक मोठ्या आनंदानें त्यांना सामोरा गेला. सारांश, तेजानें जाज्वल्यमान आणि निर्मल आचरणानें युक्त अशा त्या तपोनिधांना अवलोकन करण्याबरोबर दशरथाचें मुख हर्षानें आनंदित झालें व त्यानें वसिष्ठांकडून पूजा करण्याकरितां पूजासाहित्य आणविलें. नंतर राजाच्या पूजेचा शास्त्रविहित विधीनें स्वीकार केल्यावर विश्वामित्र मुनींनीं दशरथ राजाला क्षेम आणि अभ्युदय ह्यांविषयीं प्रश्न केला. नंतर त्या अत्यंत धार्मिक मुनींनीं नगर, कोश, देशबांधव आणि मित्र ह्यांच्याहि कुशलाविषयीं राजापाशीं विचारपूस करून, 'सन्निध असलेले तुझे सर्व जित शत्रु तुला नमून आहेत ना? आणि तुझें दैव व मानुष कर्म चांगल्या प्रकारें चाललें आहे ना?' असेंहि त्याला विचारिलें. नंतर त्या मुनिश्रेष्ठ महाभाग्यवान विश्वामित्रांनीं वसिष्ठांची व इतर ऋषींची भेट घेऊन त्यांच्याशीं योग्यतेप्रमाणें भाषण केलें. तदनंतर ते सर्व ऋषि आनंदानें त्या दशरथ राजाच्या घरीं गेले आणि त्यांनीं पूजन केल्यावर ते योग्यतेप्रमाणें तेथें बसले. नंतर पराकाष्ठेचा उदार असलेला दशरथ राजा

करण्याकरितां मनामध्यें आनंदित होऊन त्यांना म्हणाला, "अमृताचा लाभ, निर्जल प्रदेशामध्यें पर्जन्यवृष्टि, आपणाला अनुरूप अशा स्त्रीचे ठिकाणीं निपुत्रिकाला झालेली पुत्रप्राप्ति, हरवलेल्या वस्तूचा पुनरपि लाभ अथवा महोत्सव-मूलक हर्ष ह्याप्रमाणें मी आपलें आगमन समजत आहें. करितां, हे महामुने, आपलें स्वागत असो. मी मोठ्या आनंदानें आपलें कोणतें मुख्य कार्य करूं, तें मला सांगा. हे ब्रह्मन्, हे मान्य, सर्व प्रकारच्या सेवेला आपण पात्र आहां. आपण आलां ही मोठी सुदैवाचीच गोष्ट आहे. आज माझ्या जन्माचें व जीविताचें सार्थक झालें, आणि आपणां विप्रश्रेष्ठांचें दर्शन झाल्यामुळें आज मला हा सुदिनच उगवला. राजर्षि ही पदवी येण्यास कारणीभूत होणाऱ्या तपाच्या योगानें पूर्वी आपण झळकत असून नंतर ब्रह्मर्षि झालां आहां. तेव्हां आपण मला पुष्कळच प्रकारांनीं पूज्य आहां. अत्यंत पवित्र असें आपलें आगमन माझ्या घरीं झालें हें मोठें आश्चर्य आहे. हे प्रभो, आपल्या दर्शनामुळें पुण्यक्षेत्राला गेल्याचें मला फळ आलें आहे. आपलें आगमन कोणत्या उद्देशानें झालें आहे, हें कथन करा. आपलें काय कार्य असेल तें सांगून आपण मजवर अनुग्रह करावा अशी माझी इच्छा आहे. हे सदाचरणसंपन्न मुने, आपलें कांहींहि कार्य असलें तरी तें मला सांगण्याला आपण मुळीच शंका मनामध्यें आणूं नका. मी तें सर्वस्वी शेवटास नेईन. आपण माझें दैवतच आहां. हे द्विज, आपल्या आगमनामुळें माझें कांहीं पराकाष्ठेचें अत्युत्कृष्ठ पुण्य संपूर्णपणें उदयाला आलें आहे."

जितेंद्रिय दशरथ राजानें नम्रपणें केलेलें हें चित्ताल्हादकारक व कानाला मधुर लागणारें भाषण श्रवण करून शमदमादि गुणांनीं संपन्न आणि इतर गुण व यश ह्यांच्या योगानेंहि विख्यात असलेल्या त्या महर्षींना अतिशय हर्ष झाला.

सर्ग एकोणिसावा.

मखरक्षणार्थ रामयाचना.

तें अद्भुत व अर्थविस्तारानें युक्त असलेलें नृपश्रेष्ठ दशरथाचें भाषण श्रवण करून महातेजस्वी विश्वामित्र मुनींच्या अंगावर आनंदाचे रोमांच उठले आणि ते म्हणाले, " हे नृपश्रेष्ठा, थोर कुळांत जन्मास येऊन वसिष्ठांच्या आज्ञेप्रमाणें

बागणाऱ्या तुलाच आज पृथ्वीमध्यें हें बोलणें योग्य आहे; इतर कोणालाहि योग्य नाहीं. म्हणून, हे राजेंद्रा, माझ्या मनांतून जें कांहीं सांगावयाचें आहे तें सिद्धीस नेण्याविषयीं तूं आधीं निश्चय कर आणि आपलें वचन खरें कर. हे पुरुषश्रेष्ठा, मी यज्ञाकरितां दीक्षा घेतली असतांना यथेष्ठ रूप धारण करणारे दोन राक्षस त्या यज्ञाला विघ्न करीत आहेत. मीं अनेक वेळां तें दीक्षाव्रत संपविण्याच्या बेतांत आणिलें असतांना समाप्तिसमयीं मारीच व सुबाहु हे पराक्रमी व सुशिक्षित राक्षस मांस आणि रक्त ह्यांचा त्या वेदीमध्यें सडा करीत असतात, आणि ती यज्ञदीक्षा व तो यज्ञ ह्यांचा ह्याप्रमाणें नाश झाला असतां श्रांत व निरुत्साह होऊन मी त्या प्रदेशांतून निघून जात असतों. राजा, तें यज्ञकर्म करणाऱ्या पुरुषानें शाप देण्यास उद्युक्त होणें योग्य नसल्यामुळें शाप देऊन राक्षसांचा नाश करण्याला माझें मन घेत नाहीं. करितां हे नृपश्रेष्ठा, अमोघ पराक्रमी आणि झुलपें धारण करणाऱ्या अशा आपल्या रामनामक वीर ज्येष्ठ पुत्राला तूं माझ्या स्वाधीन कर. मी ह्याचें रक्षण करीत असतांना, स्वत:च्या दिव्य तेजानें हा त्या यज्ञविघातक राक्षसांचाहि नाश करण्यास समर्थ आहे. मी ह्याचें नानाप्रकारें नि:संशय कल्याण करीन व त्याच्या योगानें हा तिन्ही लोकांमध्यें प्रख्यात होईल. रामाची गांठ पडली असतां ते राक्षस त्याच्यापुढें टिकाव धरण्यास समर्थ होणार नाहींत आणि रामावांचून कोणाहि इतर पुरुषाची त्यांच्याशीं युद्ध करण्याची छाती नाहीं. हे नृपश्रेष्ठा, कालपाशाच्या अधीन झालेले आणि वीर्याविषयीं गर्व वाहणारे ते दुष्ट राक्षस महात्म्या रामापुढें टिकाव धरण्यास समर्थ नाहींत. म्हणून राजा, तूं ह्या वेळीं पुत्रसंबंधीं लोभ धरूं नको. मी तुला प्रतिज्ञेनें सांगतों कीं, त्या राक्षसांचा वध झालाच असें समज. अमोघ पराक्रमी महात्म्या रामाला मी जाणीत असून महातेजस्वी वसिष्ठ व हे तपोधनहि जाणीत आहेत. तेव्हां हे राजाधिराज, धर्म संपादन होऊन पृथ्वीवर आपली उत्कृष्ट कीर्ति चिरकाल रहावी अशी तुला इच्छा असेल, तर तूं रामाला माझे स्वाधीन कर. हे ककुत्स्थकुलोत्पन्ना दशरथा, तुझे वसिष्ठप्रभृति सर्व मंत्री अनुमोदन देत असतील, तर तूं रामाला देऊन टाक. सारांश, प्रिय आणि तुझे ठिकाणीं विशेष आसक्ति न धरणारा कमलनयन राम यज्ञाचे दहा दिवस होईपर्यंत तूं मला दे. हे रघुकुलोत्पन्ना, माझ्या यज्ञाचा कालातिक्रम होणार नाहीं अशा रीतीनें तूं तजवीज कर आणि मनामध्यें वाईट वाटूं देऊं नको. असें करण्यांत तुझें कल्याण होईल. ”

ह्याप्रमाणें धर्म आणि अर्थ ह्यांना धरून असलेलें संभाषण करून ते धर्मात्मे महातेजस्वी व महाविचारी विश्वामित्र मुनि स्वस्थ बसले. असो. तें विश्वामित्र मुनींचें शुभ भाषण श्रवण केल्याबरोबर राजाधिराज दशरथ फारच शोकाकुल झाल्यामुळें कंपित होऊन मूर्च्छित झाला. नंतर सावध झाल्यावर तो उठला. तथापि राक्षसांच्या भीतीनें तो अगदींच हताश होऊन बसला. सारांश, हृदय आणि मन ह्यांना अगदीं विदीर्ण करून टाकणारें तें विश्वामित्रमुनींचें भाषण श्रवण करून महाबुद्धिमान दशरथ महाराज मनामध्यें दुःखित झाला आणि मूर्च्छित होऊन स्वस्थानापासून खालीं पडला.

सर्ग विसावा.

दशरथाच्या मनाचा खेद.

विश्वामित्र मुनींचें तें भाषण श्रवण करून नृपश्रेष्ठ दशरथ राजा क्षणभर मूर्च्छितच झाला, आणि सावध झाल्यावर म्हणाला, 'ह्या कमलनयन रामाचें वय सोळा वर्षांपेक्षांहि अजून चार वर्षें कमी आहे. ह्यास्तव राक्षसांशीं युद्ध करण्यास हा योग्य आहे, असें मला वाटत नाहीं. हें एक अक्षौहिणी सैन्य असून ह्याचा रक्षक व अधिपति मी आहें. तेव्हां ह्या सैन्यासहवर्तमान जाऊन मी त्या राक्षसांशीं युद्ध करीन. हे शूर, पराक्रमी व अस्त्रांमध्यें निपुण असे माझे सेवक राक्षसांच्या सैन्यांशीं युद्ध करण्यास योग्य आहेत. म्हणून आपण रामाला नेऊं नका. मीच समरांगणामध्यें हातांत धनुष्य घेऊन आपल्या यज्ञाचें रक्षण करीन आणि प्राण आहेत तोंपर्यंत राक्षसांशीं युद्ध करीन. मी तिकडे जातों, म्हणजे ती आपली यज्ञदीक्षा सुरक्षित होऊन निर्विघ्नपणें पार पडेल. आपण रामाला नेऊं नका. हा अगदीं बाळ असून ह्याची विद्याहि संपलेली नाहीं. हा बलाबल जाणीत नसून अस्त्रबलानेंहि युक्त नाहीं. युद्धामध्यें निपुण नाहीं आणि म्हणूनच राक्षसांशीं युद्ध करण्यास हा योग्य नाहीं. राक्षस कपटानें युद्ध करणारे आहेत. रामाचा वियोग झाला असतां मला क्षणभरहि जिवंत राहण्याची आशा नाहीं. ह्यास्तव हे मुनिश्रेष्ठ, आपण रामाला नेऊं नका. अथवा हे सदाचरणसंपन्न ब्रह्मनिष्ठ मुने, आपणाला जर रघुवंशज रामाला नेण्याची इच्छा असेल, तर चतुरंग सैन्यासहवर्तमान मला बरोबर

घेऊन त्याला न्या. हे कौशिक मुने, माझ्या जन्माला साठ हजार वर्षें होऊन गेल्यानंतर मोठ्या प्रयासानें मला हा प्राप्त झालेला आहे. ह्यास्तव, आपण ह्या रामाला नेऊं नका. चारहि पुत्रांमध्यें वयानें ज्येष्ठ आणि धर्मदृष्ट्याहि श्रेष्ठ अशा रामाचे ठिकाणीं माझें पराकाष्ठेचें प्रेम आहे. म्हणून आपण ह्या रामाला नेऊं नका. त्या राक्षसांचें सामर्थ्य किती आहे? ते कोण आहेत? कोणाचे पुत्र आहेत? त्यांच्या शरिराचें प्रमाण तरी काय आहे? हे मुनिश्रेष्ठ, त्या राक्षसांचें रक्षण करणारे तरी कोण आहेत? हें समजूं द्या. हे विप्र, कपट-युद्ध करणाऱ्या त्या राक्षसांचा प्रतिकार रामाच्या हातून, माझ्या सैन्याच्या हातून अथवा माझ्या हातून कसा होणार? कारण हे भगवन्, राक्षस वीर्यानें मत्त झालेले असतात. तेव्हां त्या दुष्ट बुद्धि राक्षसांच्या रणामध्यें मी तरी कसा टिकाव धरावा? हें सर्व आपण मला कथन करा."

ह्याप्रमाणें दशरथाचें भाषण ऐकून विश्वामित्र मुनि त्याला म्हणाले, "रावण नामक राक्षस पौलस्त्यवंशामध्यें उत्पन्न झाला आहे व त्याला ब्रह्मदेवानें वर दिला असल्यामुळें तो त्रैलोक्याला अतिशय पीडा देत आहे. तो राक्षसाधिपति रावण राजा महाबलाढ्य, महावीर्यवान् आणि असंख्य राक्षसांनीं युक्त असल्याचें प्रसिद्ध आहे. तो प्रत्यक्ष कुबेराचा भ्राता असून विश्रवस मुनींचा पुत्र आहे. स्वतः जाण्यांत विशेष महत्त्व नाहीं असें समजून जेव्हां तो महाबलाढ्य रावण स्वतः यज्ञाला विघ्न करण्याचें मनामध्यें आणीत नाहीं, तेव्हां त्याची आज्ञा झालेले ते महाबलाढ्य राक्षस मारीच आणि सुबाहु यज्ञाला विघ्न करीत असतात."

ह्याप्रमाणें त्या विश्वामित्र मुनींनीं सांगितलें असतां दशरथ राजा म्हणाला, "मुनिवर्य, संग्रामामध्यें त्या दुरात्म्यापुढें टिकाव धरण्यास मी समर्थ नाहीं. म्हणून हे धर्मज्ञ, माझ्या पुत्रावर आपण दया करा. मज भाग्यहीनाचे गुरु व दैवत आपणच आहां. देव, दैत्य, गंधर्व, यक्ष, पक्षी व पन्नग हेहि युद्धामध्यें रावणाचा पराक्रम सहन करण्यास समर्थ नाहींत; मग मानवांची तर गोष्ट कशाला पाहिजे? तो रावण युद्धामध्यें सामर्थ्यवानांचेंहि वीर्य हरण करितो. ह्यास्तव, हे मुनिश्रेष्ठ, त्याच्याशीं अथवा त्याच्या सैन्याशीं युद्ध करण्यास मी सैन्यासहवर्तमान अथवा आपल्या पुत्रांसहवर्तमानहि समर्थ नाहीं. तस्मात्, हे ब्रह्मन्, संग्रामाविषयीं अनभिज्ञ आणि बालवयी व रूपानें देवतुल्य असलेल्या अशा आपल्या पुत्राला मी देणारच नाहीं. त्यांतूनहि युद्धामध्यें यमाप्रमाणें अस-लेले सुंदोपसुंदाचे पुत्र जे मारीच आणि सुबाहु, ते जर आपल्या यज्ञाला विघ्न

करणारे असतील तर मी पुत्राला देण्याची गोष्टच नको. कारण, मारीच आणि सुबाहु हे सामर्थ्यवान असून युद्धाविषयीं चांगले शिकलेले आहेत. त्यांच्यापैकीं कोणाशींहि युद्ध करण्याकरितां मी मित्रगणांसहवर्तमान जाईन आणि हें आपणाला जर रुचत नसेल, तर रामाला न नेण्याविषयीं बांधवांसहवर्तमान मी आपली प्रार्थना करीन."

ह्याप्रमाणें दशरथ राजानें भाषण केल्यामुळें कुशिकपुत्र द्विजश्रेष्ठ विश्वामित्रांना फार राग आला, आणि यज्ञामध्यें घृतसिंचनपूर्वक हवन केलेल्या अग्नीप्रमाणें त्या विश्वामित्र महर्षींचे ठिकाणीं क्रोधरूप वन्हि प्रज्वलित झाला.

सर्ग एकविसावा.

वसिष्ठांचा दशरथाला उपदेश.

पुत्रस्नेहामुळें ज्यांतील वर्णोच्चार नीट होत नाहींत असें त्याचें तें भाषण श्रवण केल्यावर क्रुद्ध झालेले विश्वामित्र मुनि त्या भूपतीला म्हणाले, "पूर्वी प्रतिज्ञा करून तूं तिचा भंग करण्याची इच्छा करीत आहेस; परंतु ह्या कुलाच्या नाशाला कारणीभूत होणारी ही गोष्ट रघुवंशजांना योग्य नाहीं राजा, असें करणें जर तुला योग्य असेल, तर मी आल्या मार्गानें चालता होतों. हे काकुत्स्था, तूं आपली प्रतिज्ञा असत्य करून सुहृदांसहवर्तमान सुखी हो."

ह्याप्रमाणें ते बुद्धिमान विश्वामित्र मुनि क्रोधानें व्याप्त झाले असतां संपूर्ण पृथ्वी हादरून गेली आणि देवांना मोठें भय प्राप्त झालें. तेव्हां सर्व जगत् अतिशय त्रस्त झाल्याचें अवलोकन करून ज्ञानवान आणि सदाचारसंपन्न वसिष्ठमहर्षि दशरथाला म्हणाले, "इक्ष्वाकुवंशजांच्या कुलामध्यें तूं साक्षात् दुसरा धर्मच कीं काय असा उत्पन्न झाला असून धैर्यवान, सदाचारसंपन्न आणि वैभवशाली आहेस. याकरितां धर्माचा त्याग करणें तुला योग्य नाहीं. 'हा रघुवंशज धर्मात्मा' म्हणून त्रैलोक्यामध्यें तुझी ख्याति आहे. म्हणून तूं धर्माचें अवलंबन कर, अधर्माचें अवलंबन करूं नको. अरे, 'करीन' अशी प्रतिज्ञा करून जो आपल्या म्हणण्याप्रमाणें करीत नाहीं त्याला इष्ट आणि पूर्त ह्यांचें फल प्राप्त होत नाहीं. तस्मात्, रामाला तूं देऊन टाक. अरे, अग्नीनें रक्षित असलेल्या अमृताप्रमाणें ह्या कुशिकपुत्रानें ह्याचें संरक्षण केलें असतां, हा अस्त्रनिपुण असो वा नसो, राक्षस ह्याचें तेज सहन

करण्यास समर्थ होणार नाहींत. अरे, हा मूर्तिमान धर्म असून वीर्यवानांमध्यें हा श्रेष्ठ आहे; आणि त्याचप्रमाणें विद्येमध्यें हा सर्व जगतांत अधिक असून तपाचें तर हा मुख्य आश्रयस्थानच आहे. नानाप्रकारच्या अस्त्रांचें ह्याला ज्ञान आहे. ह्याच्या सारखें अस्त्रज्ञान चराचर त्रैलोक्यामध्यें सांप्रत कोणालाहि नाहीं व पुढेंहि देव, ऋषि, अमर, राक्षस, श्रेष्ठ श्रेष्ठ गंधर्व आणि यक्ष, किन्नर व महोरग ह्यांपैकीं कोणाला देखील प्राप्त होण्याचा संभव नाहीं. हा विश्वामित्र राज्य करीत असतांना पूर्वीं शिवानें अत्यंत धार्मिक असे कृशाश्वाचे पुत्र सर्व प्रकारचीं अस्त्रें म्हणून ह्याला दिले. दक्षकन्यांचे ठिकाणीं जन्मास आलेले ते कृशाश्वाचे पुत्रहि देदीप्यमान, विजयशाली व महावीर्यवान असून नानाप्रकारचीं रूपें धारण करणारे होते. जया व सुप्रभा ह्या उभयतां सौंदर्यसंपन्न स्त्रिया दक्षप्रजापतीच्या कन्या असून, त्यांना पुत्ररूपानें अत्यंत तेजस्वी अशीं शंभर अस्त्रें व शस्त्रें प्राप्त झालीं. पैकीं वर प्राप्त झालेल्या जयेला असुरसैन्याचा वध करण्याकरितां अचिंत्य आणि अदृश्य असे पन्नास श्रेष्ठ पुत्र प्राप्त झाले असून, सुप्रभेला दुसऱ्यांना सहन होण्यास अशक्य व अजिंक्य असे संहारनामक पन्नास बलाढ्य पुत्र प्राप्त झाले. असो. तीं अस्त्रें हा कुशिकपुत्र सांगोपांग जाणीत असून आणखी दुसरीं अपूर्व अस्त्रें उत्पन्न करण्यासहि हा धर्मवेत्ता समर्थ आहे. ह्यामुळें, हे रघुवंशजा दशरथा, ह्या महात्म्या धर्मवेत्त्या श्रेष्ठ मुनीला भूत आणि भविष्य ह्यांपैकीं अज्ञात असें कांहींहि नाहीं. तात्पर्य, महातेजस्वी आणि महायशस्वी विश्वामित्र मुनींचें वीर्य अशा प्रकारचें आहे. म्हणून राजा, रामाच्या गमनाविषयीं तुला संशय येण्याचें कारण नाहीं. हा कुशिकनंदन विश्वामित्र त्या राक्षसांचें पारिपत्य करण्यास स्वतः समर्थ आहे; परंतु केवळ तुझ्या पुत्रांवर अनुग्रह करण्याकरितां हा तुझ्यापाशीं येऊन त्यांची याचना करीत आहे." ह्याप्रमाणें वसिष्ठ मुनींनीं सांगितलें असतां रघुवंशजश्रेष्ठ दशरथ राजाचें चित्त प्रसन्न होऊन त्याला आनंद झाला आणि रामाचें गमन त्याला रुचून तो प्रसिद्ध कीर्तिमान दशरथ विश्वामित्र मुनींना रामाला देण्याविषयीं मनामध्यें विचार करूं लागला.

सर्ग बाविसावा.

राम-लक्ष्मणांचें विश्वामित्राबरोबर गमन.

ह्याप्रमाणें वसिष्ठ मुनि भाषण करूं लागले असतां दशरथ राजाचें मुख आनंदित झालें आणि त्यानें स्वतः लक्ष्मणासहवर्तमान रामाला बोलाविलें. नंतर माता कौसल्या व पिता दशरथ ह्यांनीं त्याच्याकरितां मंगल केलें आणि पुरोहित वसिष्ठ मुनींनीं मंगलसूचक मंत्राच्या योगानें त्याचें अभिमंत्रण केलें. तदनंतर दशरथ राजानें मस्तकाचे ठिकाणीं पुत्राचें अवघ्राण केल्यावर सुप्रसन्न अंतःकरणानें रामाला विश्वामित्र मुनींच्या स्वाधीन केलें. तेव्हां कमलनयन राम विश्वामित्र मुनींबरोबर गेल्याचें अवलोकन करून स्पर्श झाला असतां सुखावह असा वायु निर्मल होऊन वाहूं लागला. तो महात्मा मार्गाला लागला असतां मोठी पुष्पवृष्टि झाली आणि देवदुंदुभींसहवर्तमान शंख व दुंदुभि ह्यांचा घोष सुरू झाला. विश्वामित्र मुनि पुढें जाऊं लागले, त्यांच्या मागोमाग झुलपें राखलेला आणि धनुष्य धारण केलेला असा महायशस्वी राम जाऊं लागला आणि सुमित्रापुत्र लक्ष्मण त्या रामाचे मागून चालला. धनुष्य आणि भाते हातांत घेतले असल्यामुळें तीन फणांनीं युक्त असलेल्या नागांप्रमाणें दिसणारे आणि आपल्या तेजाच्या योगानें दशदिशा प्रकाशित करणारे ते उदार राम-लक्ष्मण विश्वामित्र मुनींच्या मागोमाग जात असतां, देदीप्यमान कांतीनें युक्त असलेले ते निर्दोष राम-लक्ष्मण, ब्रह्मदेवाच्या मागोमाग जाणाऱ्या अश्विनीकुमारांप्रमाणें विश्वामित्र मुनींना शोभा देत होते. सारांश, अचिंत्य व स्वयंप्रकाश अशा शंकराला शोभा देणारे षडाननच कीं काय असे ते कांतीनें देदीप्यमान, मनोहर रूपानें युक्त, निर्दोषी, धनुष्य, खड्ग व गोधचर्ममय अंगुलित्राण धारण केलेले आणि उत्तम प्रकारें भूषित झालेले महातेजस्वी बालवयी भ्राते राम-लक्ष्मण, कुशिकपुत्र विश्वामित्र मुनींना शोभवूं लागले. असो.

श्रीरामचंद्रास बला व अतिबला ह्या विद्यांचा उपदेश.

सुमारें दीड योजन गेल्यानंतर सरयू नदीच्या दक्षिणतीरावर विश्वामित्र मुनि मधुर वाणीनें म्हणाले, "वत्सा रामा, आचमन कर. कालातिक्रमण होणें योग्य नाहीं. बला आणि अतिबला एतत्संज्ञक मंत्रसमुदाय तूं ग्रहण कर, म्हणजे श्रम अथवा ज्वर तुला होणार नाहीं. तुझ्या स्वरूपामध्यें पालट पडणार नाहीं आणि निद्रिस्थ अथवा असावध असतांनाहि राक्षस तुझ्यासमीप येणार नाहींत.

बाहुबलामध्यें तुझी बरोबरी करणारा पृथ्वींत आज कोणीहि नाहीं. आणि हे रामा, त्रैलोक्यांतहि तुझी बरोबरी करणारा पुढें कोणी निघणार नाहीं. हे राघवा, बला आणि अतिबला ह्या विद्या तूं पठण करूं लागलास, म्हणजे भाग्य, सरलता, ज्ञान, ऐहिक विषय व प्रत्युत्तर देणें ह्यांमध्यें तुझी बरोबरी करणारा जगतांत कोणीहि उरणार नाहीं. सारांश, हे निष्पापा रामा, ह्या दोन विद्या प्राप्त झाल्या असतां तुझी बरोबरी कोणीहि करणार नाहीं. बला आणि अतिबला ह्या विद्या कोणत्याहि प्रकारच्या ज्ञानाचें उत्पत्तिस्थान आहेत. हे पुरुषश्रेष्ठा रामा, बला आणि अतिबला तूं पठण करूं लागलास, म्हणजे तुला क्षुधा व तृषा लागणार नाहीं. बा रघुवंशजा, ह्या दोन विद्यांचें तूं अध्ययन करूं लागलास म्हणजे पृथ्वीमध्यें तुझी कीर्ति होईल. तेजानें युक्त अशा ह्या विद्या ब्रह्मदेवाच्या कन्या आहेत; आणि ह्यांचें दान करण्याला हे ककुत्स्थकुलोत्पन्ना राजपुत्रा, तूंच योग्य पात्र आहेस. कारण, ह्या विद्यांचें दान स्वीकारण्याला योग्य असे सर्व गुण तुझ्या ठिकाणीं आहेत, ह्यांत संशय नाहीं. ह्या विद्या तपानें युक्त झाल्या असतां नानाप्रकारें फलप्रद होतील."

ह्याप्रमाणें विश्वामित्र मुनींनीं सांगितल्यानंतर प्रसन्न मुद्रेनें युक्त झालेला राम आचमन करून शुचिर्भूत झाला आणि त्या जितेंद्रिय महर्षीपासून त्यानें त्या विद्या ग्रहण केल्या. नंतर हजारों किरणांनीं युक्त असलेला भगवान सूर्य ज्याप्रमाणें शरदृतूमध्यें शोभूं लागतो, त्याप्रमाणें तो प्रचंड पराक्रम करणारा राम त्या विद्यांनीं युक्त झाला असतां शोभूं लागला. असो. त्या विद्यांचा उपदेश केल्यानंतर कुशिकनंदन विश्वामित्र मुनींनीं रामाला गुरुसंबंधीं सर्व कृत्यांविषयीं उपदेश केला. नंतर त्या तिघांनींहि शरयू नदीचे तीरीं ती रात्र सुखानें घालविली. सारांश, राजकुमार असल्यामुळें कधींहि न अनुभविलेल्या अशा तृणमय शय्येवर ते दशरथ राजाचे सज्जनश्रेष्ठ पुत्र पडले असतांनाहि, विश्वामित्र मुनींच्या संभाषणानें त्यांचें लालन झाल्यामुळें त्यांची ती रात्र सुखानें गेली.

सर्ग तेविसावा.

भर्गाश्रमीं वास्तव्य.

रात्र उजाडल्यावर विश्वामित्र महर्षि पर्णास्तरणावर शयन करीत असलेल्या ककुत्स्थकुलोत्पन्न राम-लक्ष्मणांना उद्देशून म्हणाले, "रामा, तुज पुत्राच्या योगानें कौसल्या उत्तम पुत्रवती झाली आहे. ह्यास्तव प्रातःसंध्येचा काळ सुरू

झाला असतां निद्रिस्थ राहणें तुला योग्य नाहीं. करितां हे पुरुषश्रेष्ठा, ऊठ आणि ईशचिंतन व आन्हिक कर." ह्याप्रमाणें त्या विश्वामित्र ऋषींचें तें अतिशय उत्कृष्ठ भाषण श्रवण केल्यावर त्या पुरुषश्रेष्ठ वीरांनीं स्नान करून अर्घ्य दिले आणि सर्वोत्कृष्ठ असा गायत्री जप केला. तदनंतर आन्हिक आटोपल्यावर त्या महावीर्यवान राम-लक्ष्मणांनीं अतिशय आनंदित होऊन तपोधन विश्वामित्र ऋषींना अभिवंदन केलें, आणि मार्गाचें आक्रमण करण्याकरितां ते त्यांच्यासमोर उभे राहिले. नंतर जातां जातां त्या महावीर्यवान राम-लक्ष्मणांना भागीरथीचें दर्शन झालें आणि सरयू व भागीरथी ह्यांच्या पवित्र संगमावर अनेक सहस्र वर्षें उत्कृष्ठ तपश्चर्या करीत असलेल्या जितेंद्रिय मुनींचें पुण्य आश्रमस्थान त्यांनीं अवलोकन केलें. तो पवित्र आश्रम अवलोकन केल्यावर ते रघुवंशज राम-लक्ष्मण अत्यंत संतुष्ट झाले आणि त्या महात्म्या विश्वामित्र मुनींना विचारूं लागले, "भगवन्, हा पवित्र आश्रम कोणाचा व ह्या आश्रमामध्यें कोण पुरुष वास्तव्य करीत असतो, हें श्रवण करण्याची आमची इच्छा आहे. आणि ह्याविषयीं आम्हांला पराकाष्ठेची उत्कंठा प्राप्त झाली आहे." ह्याप्रमाणें त्यांचें भाषण श्रवण केल्यावर मुनिश्रेष्ठ विश्वामित्र किंचित् हास्य करून म्हणाले, "रामा, हा प्राचीन आश्रम कोणाचा, हें श्रवण कर. ज्ञानी लोक ज्याला काम असें म्हणतात, तो कंदर्प पूर्वी मूर्तिमान होता. पुढें ह्या आश्रमामध्यें एकाग्र चित्त करून नियमपूर्वक तपश्चर्या करीत असलेले देवाधिदेव रुद्र, समाधि उतरल्यावर मरुद्गणासहवर्तमान जाऊं लागले असतां दुर्बुद्धि मदनानें मनामध्यें विकार उत्पन्न करून त्या देवाधिदेवाला घेरून टाकिलें. ह्यामुळें हे रघुनंदना, त्या महात्म्यानें त्याला हुंकारून टाकून त्याच्याकडे वक्र दृष्टीनें पाहिलें. तेव्हां त्या दुर्बुद्धि मदनाच्या शरिरापासून त्याचे सर्व अवयव तुकडे तुकडे होऊन खालीं पडले. सारांश, क्रोधाग्नीनें दग्ध झालेल्या त्या महात्म्या कामाचें शरीर ह्या आश्रमामध्यें नाहींसें झालें. ह्याप्रमाणें देवाधिदेवानें क्रोधामुळें काम शरीररहित केला असतां, तेव्हांपासून अनंग ह्या नांवानें तो प्रख्यात झाला; व ज्या प्रदेशामध्यें कामानें शरिराचा त्याग केला, तो वैभवसंपन्न प्रदेश अंग नामक देश झाला. त्या देवाधिदेव शंकराचा हा पवित्र आश्रम असून हे मुनि त्याचे पूर्वीचे धर्मनिष्ठ शिष्य होत. हे वीरा, ह्या मुनींचे ठिकाणीं पाप नाहीं. करितां हे शुभदर्शना रामा, आज रात्रभर आपण ह्या पवित्र नद्यांमध्यें वास्तव्य करूं आणि उद्यीक पलीकडे जाऊं. अरे, ह्या

पुण्य आश्रमाप्रत आपण सर्व शुचिर्भूत होऊन जाऊं. ह्या ठिकाणीं आपलें वास्तव्य उत्तम प्रकारचें होणार आहे. करितां, हे पुरुषोत्तमा, स्नान, जप व होम आटोपून आपण ही रात्र ह्या ठिकाणीं सुखानें काढूं."

ह्याप्रमाणें त्यांचा संवाद चालला असतां तपःसामर्थ्यानें प्राप्त झालेल्या अतींद्रिय ज्ञानाच्या योगानें राम वगैरे आले आहेत असें समजल्यावर, अत्यंत संतुष्ट झालेल्या तेथील मुनींना हर्ष झाला, आणि लगेच अर्घ्य व पाद्य निवेदन करून आणि त्याचप्रमाणें विश्वामित्रांना भोजन देऊन नंतर त्यांनीं रामलक्ष्मणांचें आदरातिथ्य केलें. ह्याप्रमाणें योग्य सत्कार झाल्यावर त्या रामप्रभृतींनीं कथांच्या योगानें त्या आश्रमांतील ऋषींचें चित्तरंजन केलें असतां त्या ऋषींनीं स्वस्थ चित्तानें संध्यावंदन केलें. नंतर ते आश्रमवासी मुनि सदाचरणी ऋषींसहवर्तमान त्या रामादिकांना आश्रमांत घेऊन गेले असतां, हवी ती इच्छा परिपूर्ण करणाऱ्या त्या भर्गाश्रमामध्यें सुखानें राहून त्या धर्मात्म्या मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांनीं मनोहर कथांच्या योगानें त्या सौंदर्यसंपन्न राजकुमारांचें चित्तरंजन केलें.

सर्ग चोविसावा.

सरयू नदीची उत्पत्ति.

नंतर चांगलें उजाडल्यावर स्नानसंध्या आटोपलेल्या विश्वामित्र मुनींना पुढें करून, शत्रूंचें दमन करणारे ते राम-लक्ष्मण नदीतीरीं गेले. मग ते सर्व महात्मे व निर्मल तपश्चर्या करणारे मुनि शुभावह नाव आणवून विश्वामित्रांना म्हणाले, "आपण राजकुमारांना पुढें करून ह्या नौकेवर आरूढ व्हां आणि निर्विघ्नपणें मार्गाचें अवलंबन करा. आतां वेळ जाऊं देऊं नका." ह्यावर विश्वामित्रांनीं 'ठीक आहे' असें म्हणून त्या ऋषींना मान दिला व राम-लक्ष्मणांसहवर्तमान ते गंगानदींतून उतरून जाऊं लागले. तेव्हां उदकाचे मध्यभागीं आल्यावर जलक्षोभानें वृद्धिंगत झालेला असा एक ध्वनि रामाचे कानीं आला असतां, तो कोणाचा आहे, हें निश्चयानें जाणण्याची त्या महातेजस्वी रामाला कनिष्ठ भ्रात्या लक्ष्मणासहवर्तमान इच्छा झाली. तेव्हां 'नावेच्या योगानें दुभंग होत असलेल्या उदकामध्यें हा प्रचंड ध्वनि होत आहे, हें काय?' म्हणून रामानें मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांना प्रश्न केला असतां, उत्कंठेनें युक्त असें त्या रघुवंशज

रामाचें भाषण श्रवण करून, धर्मात्म्या विश्वामित्र मुनींनीं तो शब्द कशाचा हें निश्चयपूर्वक रामाला सांगण्यास आरंभ केला. ते म्हणाले, "हे पुरुषश्रेष्ठा रामा, कैलास पर्वतावर ब्रह्मदेवानें मनाच्या योगानें एक उत्कृष्ट सरोवर निर्माण केलें व तें मनानेंच निर्माण केलें असल्यामुळें मानस ह्याच नांवानें प्रसिद्ध झालें. त्या सरोवरापासून जी नदी निघाली, ती अयोध्येसमीप वहात आहे. सारांश, अयोध्येसमीप असलेली पवित्र नदी (ब्रह्मदेवानें निर्माण केलेल्या) सरोवरापासून निघाल्यामुळें ती सरयू ह्या नांवानें प्रसिद्ध झाली. त्या नदीचा हा अतुल ध्वनि जान्हवीच्या ध्वनीशीं संयुक्त होत आहे व तो उदकाच्या क्षोभामुळें होत आहे. रामा, तिला तूं शुद्ध मनानें प्रणाम कर."

ह्याप्रमाणें विश्वामित्र मुनींनीं सांगितलें असतां अत्यंत धार्मिक अशा त्या उभयतां राम-लक्ष्मणांनीं गंगा आणि सरयू ह्यांना प्रणाम केला, आणि दक्षिण तीराला आल्यावर लवकर लवकर पाऊल उचलून ते जाऊं लागले. जातां जातां त्या पुरुषश्रेष्ठ दशरथनंदन इक्ष्वाकुवंशज रामानें, लोकांचा संचार नसल्यामुळें तुडवलें न गेलेलें आणि दिसण्यांत भयंकर असें वन अवलोकन करून मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांना प्रश्न केला, "कायहो हें गहन वन! हें झिल् झिल् शब्द करणाऱ्या कीटकसमुदायांनीं युक्त असून ह्यांत भयंकर श्वापदें जिकडे तिकडे पसरलेलीं आहेत. त्याचप्रमाणें दारुण शब्द करणारे भास पक्षी, स्वभावतःच भयंकर शब्दानें युक्त आणि त्यांतूनहि अति भयंकर शब्द करणारे असे नानाप्रकारचे इतर पक्षी आणि तसेच सिंह, व्याघ्र, वराह व गज ह्यांच्या योगानें तें सुशोभित असून, धव, अश्वकर्ण, ककुभ, बिल्व, तिंदुक, पाटल आणि बदरी ह्या वृक्षांनीं तें गजबजलेलें आहे. खरोखर हें वन इतकें भयंकर होण्याचें कायहो कारण असावें?"

ताटकारण्याचा वृत्तांत.

ह्याप्रमाणें रामानें प्रश्न केला असतां महातेजस्वी विश्वामित्र महामुनि त्याला म्हणाले, "वत्सा रामा, हें भयंकर वन कोणाचें, तें ऐक. हे पुरुषश्रेष्ठा, मलद आणि करूष असे हे देवांच्या यत्नानें निर्माण झालेले दोन देश पूर्वी मोठे समृद्ध होते. पूर्वी वृत्रासुरवधसमयीं अशुद्ध आवरण आणि क्षुधा ह्यांनीं इंद्र व्याप्त झाल्यामुळें ब्रह्महत्या त्याच्या मागें लागली. तेव्हां त्या मलिन इंद्राला देव आणि तपोधन ऋषि ह्यांनीं गंगाजलानें भरलेल्या कलशांच्या योगानें स्नान घालून त्याचा मल काढून टाकिला. सारांश, ह्या भूमीचे ठिकाणीं देवांनीं मई-

द्राच्या शरिरांतील मल व त्याचा बुभुक्षितपणा टाकून दिला. तेव्हां त्यांना आनंद झाला, आणि मल व बुभुक्षितपणा ह्यांनीं इंद्र वियुक्त झाल्यामुळें पूर्वीप्रमाणें शुद्ध झाला. तदनंतर इंद्र त्या प्रदेशावर फारच संतुष्ट झाला, आणि ' माझ्या शरिराचा मल व माझी क्षुधा धारण करणारे हे प्रदेश मलद व करूष ह्या नांवांनीं प्रसिद्ध होऊन नेहमीं समृद्ध होतील आणि पृथ्वीमध्यें ह्यांची मोठी ख्याति होईल ' असा त्यानें अत्युत्कृष्ट वर दिला. तेव्हां विचारी इंद्रानें केलेला तो देशाचा सन्मान अवलोकन केल्यावर 'उत्तम उत्तम' म्हणून देवांनीं इंद्राला अनुमोदन दिलें. सारांश, हे शत्रुदमना रामा, हे समृद्ध देश मलद व करूष पुष्कळ काळ लोटेपर्यंत धनधान्यांनीं संपन्न होते. पुढें कांहीं काल लोट त्यानंतर स्वेच्छेप्रमाणें रूप धारण करणारी एक यक्षिणी उत्पन्न झाली. रामा, तुझें कल्याण असो. ती यक्षिणी सहस्र गजांचें बल धारण करणारी असून सुंदाची भार्या आहे व तिचें नांव ताटका असें असून इंद्रतुल्य पराक्रमी मारीच नामक राक्षस तिचा पुत्र आहे. त्या धिप्पाड राक्षसाचे बाहु गरगरीत असून मस्तक, मुख व शरीर हीं प्रचंड आहेत; आणि त्याची मुद्राहि भयंकर असून तो राक्षस प्रजाजनांना नित्य त्रास देत आहे. हे रघुवंशजा रामा, दुराचरण करणारी ती ताटका ह्या मलद व करूप देशांची नेहमीं नासधूस करीत असते, आणि हा मार्ग आडवून धरून, अर्धयोजनापेक्षां जास्त प्रदेशावर ती वास्तव्य करीत आहे. तेव्हां आतां ज्या अर्थीं आपणांला ताटकेच्या वनामध्यें जावयाचेंच आहे, त्या अर्थीं आपल्या बाहुबलाचें अवलंबन करून तूं ह्या दुराचारिणीचा माझ्या आज्ञेनें वध कर, आणि पुनरपि हा प्रदेश निष्कंटक करून सोड. कारण, रामा, असह्य अशा घोर यक्षिणीनें उच्छिन्न करून टाकिलेल्या ह्या अशा प्रकारच्या प्रदेशामध्यें कोणीहि येण्यास समर्थ नाहीं. असो. हें वन दारुण कसें झालें, हें सर्व मीं तुला सांगितलें. यक्षिणीनें हें जें सर्व उध्वस्त करून टाकिलें आहें, तें अद्यापहि पूर्वस्थितीवर येत नाहीं. "

सर्ग पंचविसावा.

ताटकेचा वृत्तांत.

ज्यांचा प्रभाव अतर्क्य आहे अशा त्या विश्वामित्र मुनींचें उत्कृष्ट भाषण श्रवण करून, पुरुषश्रेष्ठ राम शुभ वाणीनें त्यांना पुनरपि विचारूं लागला, "हे मुनिश्रेष्ठा, पुराणादिकांमध्यें यक्षजाति वीर्यानें अल्प असल्याचें श्रुत आहे. तेव्हां त्या जातींतील अबला सहस्र गजांचें बल कसें धारण करीत आहे ?"

ह्याप्रमाणें अपरिमित सामर्थ्यवान् रघुवंशज रामानें प्रश्न केला असतां, लक्ष्मणासहवर्तमान त्या शत्रुदमन रामाला मधुर वाणीनें आनंदित करीत करीत विश्वामित्र म्हणाले, "ती यक्षिणी बलाढ्य कशी झाली, तें ऐक. ही अबला वरप्रदानामुळें असलें बल व वीर्य धारण करीत आहे. पूर्वी सुकेतु म्हणून एक मोठा यक्ष होऊन गेला. तो वीर्यवान असतांनाहि त्याला अपत्य नव्हतें. पुढें त्या सदाचरणसंपन्न यक्षानें अपत्यप्राप्तीकरितां मोठी तपश्चर्या केली. तेव्हां ब्रह्मदेवानें अतिशय संतुष्ट होऊन त्या यक्षाधिपतीला, नांवानें ताटका म्हणून प्रसिद्ध असलेलें एक कन्यारत्न दिलें. ह्या कन्येला ब्रह्मदेवानें सहस्र गजांचें बल दिलें. परंतु त्या महाकीर्तिमान् ब्रह्मदेवानें त्या यक्षाला पुत्र तर दिलाच नाहीं. असो. ती बाला वाढीस लागून सौंदर्य व यौवन ह्यांनीं शोभूं लागली असतां, जंभपुत्र सुंदाला त्या यक्षानें ती यशस्विनी भार्या करून दिली. ह्या गोष्टीला कांहीं दिवस लोटल्यानंतर त्या यक्षिणीला अजिंक्य असा एक मारीच नामक पुत्र झाला. तो पुढें शापामुळें राक्षस बनला. रामा, अगस्त्य मुनींनीं शाप दिल्यामुळें सुंदाचा वध झाल्यावर, ती ताटका ऋषिश्रेष्ठ अगस्त्य मुनींना घेरण्याची पुत्रासहवर्तमान इच्छा करूं लागली; आणि क्रुद्ध होऊन गर्जना करीत करीत त्यांना भक्षण करण्याच्या उद्देशानें त्यांच्याकडे धांवली. तेव्हां ती पुत्रासहवर्तमान आपल्याकडे चाल करून येत आहे असें पाहून भगवान अगस्त्य ऋषींनीं, 'राक्षस हो' म्हणून तिच्या मारीच नामक पुत्राला शाप दिला. इतकेंच नव्हे, परंतु त्या अत्यंत क्रुद्ध झालेल्या अगस्त्य मुनींनीं, 'हें तुझें रूप नाहींसें होऊन तुला सत्वर घोर रूप प्राप्त होईल, आणि तूं महायक्षिणी शरिरानें व चेहऱ्यानें अक्राळविक्राळ होऊन माणसांना खाणारी राक्षसी होशील' असा त्या ताटकेलाहि शाप दिला. ती ही शापामुळें क्रुद्ध झालेली राक्षसी क्रोधाच्या अगदीं अधीन झाली आहे, आणि अगस्त्य मुनींचा संचार असलेला हा पवित्र देश उध्वस्त करीत आहे."

ताटकावधाविषयीं प्रेरणा.

विश्वामित्र पुढें म्हणतात:—"हे रघुवंशजश्रेष्ठा रामा, अत्यंत भयंकर, दुराचरणी आणि अनर्थावह, पराक्रमानें युक्त अशा त्या यक्षिणीचा, गोब्राह्मणांच्या हिताकरितां तूं वध कर. हे रघुनंदना, शापग्रस्त झालेल्या ह्या ताटकेचा वध करण्यास त्रैलोक्यामध्यें तुझ्यावांचून इतर कोणत्याहि पुरुषाचें सामर्थ्य नाहीं. हे पुरुषश्रेष्ठा, स्त्रीवध करावा लागत आहे, म्हणून तूं मनामध्यें दया आणूं नको. कारण चारहि वर्णांचें हित करण्याकरितां आणि प्रजारक्षण करण्याकरितां जें कांहीं करणें अवश्य असेल, तें बरें असो, वाईट असो, पातकावह असो किंवा सदोष असो, राजपुत्रानें केलेंच पाहिजे. कारण, राज्यभार ज्यांच्यावर सोंपविलेला आहे, त्यांचा हा सनातन धर्मच आहे. म्हणून, हे ककुत्स्थकुलोत्पन्ना, ह्या अधर्मनिष्ठ ताटकेचा वध कर. हिचे ठिकाणीं धर्म कसला तो मुळींच नाहीं. हे राजपुत्रा, पूर्वी विरोचन दैत्याची कन्या मंथरा पृथ्वीचा घात करण्याची इच्छा करूं लागली असतां इंद्रानें तिचा वध केल्याचें श्रुत आहे; आणि त्याचप्रमाणें रामा, इंद्रशून्य स्वर्गलोक करण्याची इच्छा करणारी जी भृगुपत्नी व शुक्रमाता, तिचा विष्णूनें वध केल्याचेंहि ऐकण्यांत आहे. सारांश, ह्यांनीं आणि इतरहि महात्म्या अनेक पुरुषश्रेष्ठ राजपुत्रांनीं अधर्मनिष्ठ स्त्रियांचा वध केला आहे. तस्मात् हे राजपुत्रा, तूं दया सोडून देऊन माझ्या आज्ञेनें हिचा वध कर."

सर्ग सव्विसावा.

ताटकावध.

ह्याप्रमाणें विश्वामित्र मुनींचें शौर्ययुक्त भाषण श्रवण करून निर्मल आचरणानें युक्त असा पुरुषश्रेष्ठ दशरथपुत्र रघुवंशज राम हात जोडून म्हणाला, "'विश्वामित्र मुनींची आज्ञा कांहीं एक शंका न घेतां पाळावी' अशी पित्याची प्रत्यक्ष आज्ञा झाली आहे, आणि पित्याचें वचन मला अत्यंत प्रमाणभूत आहे. अहो, 'विश्वामित्र मुनींच्या भाषणाची अवज्ञा करूं नको' अशी महात्म्या पित्या दशरथानें अयोध्येंत असतांना वसिष्ठ-वामदेवप्रभृति गुरूंसमक्ष मला आज्ञा केली आहे. तेव्हां मी पित्याची आज्ञा शिरसा मान्य करून, मनामध्यें कांहींएक संदेह

न आणितां ब्रह्मवेत्याच्या आज्ञेनें उत्कृष्ठ धर्माला कारणीभूत होणारा ताटकेचा वध करीन. तात्पर्य, गोब्राह्मणांच्या हिताकरितां आणि देशाच्या कल्याणाकरितां अतर्क्य प्रभावानें युक्त जे आपण, त्यांच्या आज्ञेप्रमाणें वागण्यास मी तयार आहें."

याप्रमाणें भाषण करून शत्रुदमन रामानें धनुष्याच्या मध्यभागीं मूठ वळून ध्वनीनें दशदिशा नादित करीत करीत प्रत्यंचेचा प्रचंड टणत्कार केला. त्या टणत्कारानें ताटकेच्या वनांत राहणारे सर्व प्राणी कावेरबावरे झाले, आणि त्या शब्दानें व्याकुळ होऊन ताटकाहि अतिशयच क्रुद्ध झाली. नंतर तो ध्वनि श्रवण करितांक्षणीं क्रोधानें अगदीं व्याप्त झालेली ती क्रुद्ध राक्षसी, जिकडून तो ध्वनि-आला होता त्या प्रदेशाला अनुलक्षून धांवत चालली. तेव्हां शरिरानें व चेहऱ्यानें आक्राळविक्राळ असून प्रमाणानें फारच प्रचंड असलेल्या त्या राक्षसीला अवलोकन करून तो रघुवंशज राम लक्ष्मणाला म्हणाला, "हे लक्ष्मणा, ह्या यक्षिणीचें भयंकर आणि घोर असें रूप अवलोकन कर. अरे, हिला पाहून, भित्र्या लोकांची तर असूं देच, परंतु शूरांचींहि हृदयें फुटून जातील. अरे, पहा—मायाबलानें युक्त आणि म्हणूनच जिंकण्याला अशक्य अशा ह्या यक्षिणीचे कान व नाक कापून घेऊन मी हिला आज परावृत्त करितों. स्त्रियांचा वध करणें उचित नाहीं म्हणून ही स्त्रीजाति ह्या दृष्टीनेंच वधापासून सुरक्षित असल्यामुळें, मला हिचा वध करावा असें वाटत नाहीं. म्हणून हिचें सामर्थ्य आणि गति ह्यांचा नाश करावा असा माझा विचार आहे."

ह्याप्रमाणें राम बोलूं लागला असतां ताटका क्रोधानें अगदीं व्याप्त झाली, आणि गर्जना करीत करीत हात उगारून थेट रामाकडे धांवली. तेव्हां विश्वामित्र ब्रह्मर्षींनीं हुंकारानें तिची निर्भर्त्सना करून, 'रघुवंशजांचा जय असो व ह्यांचें कल्याण होवो' असें म्हटलें. इतक्यांत भयजनक अशी धूळ उडवीत उडवीत ती ताटका उभयतां रघुवंशजांकडे चालली, आणि धूलिपटलरूप प्रचंड मेघांच्या योगानें क्षणभर तिनें त्या राम-लक्ष्मणांना अगदीं गोंधळून टाकिलें. नंतर मायेचें अवलंबन करून फारच मोठ्या पाषाणवर्षावानें तिनें त्या उभयतांना भरून काढिलें असतां रघुवंशज राम क्रुद्ध झाला, आणि मोठ्या बाणवृष्टीच्या योगानें तिच्या पाषाणवृष्टीचें निवारण करून, ती आपणाकडे धांवून येऊं लागली असतां बाणांच्या योगानें त्यानें तिचे हातहि तोडून टाकिले. तेव्हां ती हाततुटकी ताटका थकून जाऊन लक्ष्मणासमीप गर्जना करूं लागली असतां, सुमित्रपुत्र लक्ष्मणानें रागारागानें तिचे कान व नाक कापून काढिले. तदनंतर इच्छेप्रमाणें रूप धारण

करण्यास समर्थ असलेली ती यक्षिणी नानाप्रकारचीं रूपें धारण करून अदृश्य झाली, आणि आपल्या मायेनें राम-लक्ष्मणांना मोह पाडण्याचा विचार करूं लागली. इतकेंच नव्हे, परंतु भयंकर पाषाणवृष्टि करीत करीत ती संचारहि करूं लागली. तेव्हां पाषाणवृष्टीनें राम-लक्ष्मण सर्व बाजूंनीं भरून जात आहेत असें अवलोकन करून वैभवशाली गाधिपुत्र विश्वामित्र मुनि म्हणाले, 'रामा, आतां तुझी दया पुरे. दुराचारिणी व पापी अशी ही यज्ञविघ्न करणारी यक्षिणी मायेनें प्रबळ झाली नाहीं तोंच म्हणजे संध्यासमय झाला नाहीं तोंच हिचा वध केला पाहिजे. कारण, संध्यासमय झाला असतां राक्षस जिंकण्याला फार जड जातात.'

ह्याप्रमाणें विश्वामित्र मुनींनीं सांगितलें असतां शब्दवेधित्व दर्शविणाऱ्या त्या रामानें पाषाणवृष्टीनें वर्षाव करणाऱ्या त्या यक्षिणीला बाणांनीं जखडून टाकिलें. तेव्हां बाणसमुदायानें जखडून गेलेली व मायाबलानें युक्त असलेली ती यक्षिणी आपलें रूप प्रकट करून गर्जना करीत करीत ककुत्स्थकुलोत्पन्न राम आणि लक्ष्मण ह्यांच्या अंगावर धांवून जाऊं लागली. विद्युल्लतेप्रमाणें वेगावेगानें ती पराक्रमी यक्षिणी चाल करून येत आहे तोंच रामानें तिच्या वक्षस्थलावर बाण मारिला व ती बाणानें विद्ध होतांक्षणीं भूमीवर पडून मरण पावली.

ह्याप्रमाणें त्या उग्ररूपी यक्षिणीचा वध झाल्याचें पाहून इंद्र व इतर देव 'उत्तम उत्तम' म्हणून ककुत्स्थकुलोत्पन्न रामाची प्रशंसा करूं लागले. नंतर अत्यंत प्रसन्न झालेला असा सहस्राक्ष इंद्र आणि आनंदित झालेले सर्व देव विश्वामित्र मुनींना म्हणाले, "कौशिक मुने, तुझें कल्याण असो. सर्व देवगण इंद्रासहवर्तमान तुझ्या ह्या कृत्यानें संतुष्ट झाले आहेत. तूं आतां रघुकुलोत्पन्न रामाचे ठिकाणीं खराखरा स्नेह दाखीव. हे ब्रह्मन्, प्रजापति कृशाश्वाचे तपः-सामर्थ्यानें युक्त असलेले अमोघ पराक्रमी पुत्र तूं रघुवंशज रामाला अर्पण कर. हे ब्रह्मन् तुझी शुश्रूषा करण्याविषयीं तत्पर असलेला राम तुझ्या दानाला पात्र आहे, आणि त्या राजकुमाराला देवांचें फारच मोठें कार्य कर्तव्य आहे."

ह्याप्रमाणें विश्वामित्रांना सांगून त्यांची प्रशंसा करीत करीत सर्व देव आकाशमार्गानें चालते झाले, व इतक्यांत संध्यासमयहि प्राप्त झाला. देव गेल्या-नंतर ताटकेच्या वधानें संतुष्ट व प्रसन्न झालेले मुनिश्रेष्ठ विश्वामित्र रामाचे मस्तकीं अवघ्राण करून म्हणाले, 'हे शुभदर्शन रामा, आजची रात्र आपण येथेंच काढूं. आणि उद्यां उजाडल्यावर त्या माझ्या आश्रमाला जाऊं.' विश्वामित्र मुनींचें भाषण श्रवण करून दशरथपुत्र राम आनंदित झाला आणि ती रात्र

त्या ताटकेच्या वनामध्यें त्यानें सुखानें घालविली. तेव्हां शापमुक्त झालेलें तें वन इंद्राच्या चैत्ररथ वनाप्रमाणें रमणीय होऊन त्याच दिवशीं शोभूं लागलें. सारांश, त्या ताटका नामक यक्षकन्येचा रामानें वध केला असतां देवगण आणि सिद्धसमुदाय त्याची प्रशंसा करूं लागले; आणि प्रभातसमय प्राप्त झाला असतां विश्वामित्र मुनि ज्याला जागा करीत असत, तो राम त्या वनामध्यें मुनींसहवर्तमान राहिला.

सर्ग सत्ताविसावा.

श्रीरामाला अस्त्रोपदेश.

त्या रात्रीं त्या ठिकाणीं वास्तव्य केल्यानंतर, महाकीर्तिमान विश्वामित्र मुनि हास्यपूर्वक मधुर स्वरानें युक्त असें भाषण रघुवंशज रामाशीं करूं लागले. ते म्हणाले, "हे महायशस्वी राजपुत्रा, तुझें कल्याण असो. मी तुझ्यावर संतुष्ट झालों आहें आणि अत्यंत प्रसन्न होऊन तुला मी सर्व अस्त्रें देत आहें. त्या अस्त्रांच्या साहाय्यानें तूं पृथ्वीवरील गंधर्व आणि उरग ह्यांसहवर्तमान शत्रुभूत देवदैत्यगणांना संग्रामामध्यें जेरीस आणून जिंकशील. हे रघुवंशजा, तुझें कल्याण असो. मी तीं सर्व दिव्य अस्त्रें व त्याचप्रमाणें दिव्य असें मोठें दंडचक्र तुला देईन. तसेंच हे वीरा, धर्मचक्र, कालचक्र, विष्णुचक्र आणि अत्यंत उग्र असें इंद्रचक्र मी तुला देईन. हे पुरुषश्रेष्ठा रघुवंशजा रामा, वज्रास्त्र, शैवास्त्र, शूलवत नामक अस्त्र, ब्रह्मशिरो नामक अस्त्र आणि ऐषीकास्त्र मी तुला देईन. हे महापराक्रमी रामा, अनुपम असें ब्रह्मास्त्र मी तुला देईन. आणि त्याचप्रमाणें, हे ककुत्स्थकुलोत्पन्ना, मोदकी आणि शिखरी ह्या दोन उज्ज्वल गदा व धर्मपाश आणि कालपाश मी तुला देईन. हे रघुनंदना, वारुणपाश हें अनुपम अस्त्र आणि शुष्क व आर्द्र अशीं दोन अशनीसंज्ञक अस्त्रें मी तुला देईन. हे निष्पापा, पैनाकास्त्र, नारायणास्त्र, अग्नीला प्रिय आणि शिखर ह्या नांवानें प्रसिद्ध असें आग्नेयास्त्र व मुख्य वायव्यास्त्र मी तुला देईन. हयशिरो नामक अस्त्र, क्रौंचास्त्र आणि दोन शक्ति मी तुला देईन. कंकाल, मुसल, उग्र असें कापाल, किंकिणी इत्यादि राक्षसांचा वध करण्यास समर्थ असलेलीं हीं सर्व अस्त्रें मी तुला देईन. हे महापराक्रमी राजपुत्रा, नंदन ह्या नांवानें प्रसिद्ध असलेलें मोठें वैद्याधरास्त्र, उत्कृष्ट खड्ग, मोहन ह्या नांवानें प्रसिद्ध व गंधर्वांना

प्रिय असें गांधर्वास्त्र, प्रस्वापन, प्रशमन, सौम्य, वर्षण, शोषण, संतापन व विलापन हीं अस्त्रें मी तुला देतों. हे पुरुषश्रेष्ठ महायशस्वी राजपुत्रा, मदनाला प्रिय आणि सहन करण्यास फारच अशक्य असें मादन नामक अस्त्र, मानव ह्या नांवानें प्रसिद्ध आणि गंधर्वांना प्रिय असें गांधर्वास्त्र आणि मोहन ह्या नांवानें प्रसिद्ध व पिशाच्चांना प्रिय असें पैशाच अस्त्र तूं घे. तामस, महाबलाढ्य सोमन, दुःसह असें संवर्त, मौसल, सत्यसंज्ञक अस्त्र, मायामय असें एक दुसरें अस्त्र, शत्रुतेजोनाशक असें तेजःप्रभसंज्ञक सूर्याचें अस्त्र, चंद्राचें शिशिर नामक अस्त्र, अत्यंत भयंकर असें त्वाष्ट्र अस्त्र आणि शत्रूंचा पराजय करणारें असें भगदेवाचें भयंकर शीतेषु नामक अस्त्र तूं ग्रहण कर. हे पराक्रमी राजपुत्रा, यथेष्ट रूप धारण करणारे असे हे महाबलाढ्य व अत्यंत उदार अस्त्ररूपी कृशाश्वपुत्र तूं सत्वर घे."

ह्याप्रमाणें सांगितल्यावर ते मुनिश्रेष्ठ विश्वामित्र प्राङ्मुख झाले, आणि अत्यंत प्रसन्न होऊन त्यांनीं रामाला अत्युत्कृष्ठ असा अस्त्रविषयक मंत्रसमुदाय उपदेशरूपानें अर्पण केला. तात्पर्य, ज्यांचा सर्व प्रकारचा संग्रह देवांनाहि दुर्लभ आहे, तीं अस्त्रें त्या विप्र विश्वामित्रांनीं रघुवंशज रामाला त्या वेळीं अर्पण केलीं. सारांश, ते बुद्धिमान विश्वामित्र मुनि त्या अस्त्रविषयक मंत्रांचा जप करूं लागले असतां सर्व अमूल्य अस्त्रें रघुवंशज रामासमीप मूर्तिमंत येऊन उभीं राहिलीं. नंतर मूर्तिमान येऊन उभे राहिलेले ते सर्व अस्त्ररूप कृशाश्वपुत्र हात जोडून आनंदानें त्याला म्हणाले, 'हे अत्यंत उदार राघवा, हे आम्ही तुझे दास आलों आहों. तुझें कल्याण असो. तूं जें जें मनामध्यें आणिशील, तें तें सर्व आम्ही शेवटास नेऊं.'

ह्याप्रमाणें त्या महाबलाढ्य कृशाश्वपुत्रांनीं रामाला सांगितलें असतां त्याचें मन प्रसन्न झालें आणि हातानें स्पर्श करून त्यांचा स्वीकार केल्यावर 'तुम्ही मंत्ररूपानें माझ्या मनामध्यें सर्वदा वास्तव्य करीत जा,' अशी त्या ककुत्स्थकुलोत्पन्न रामानें त्यांना आज्ञा केली. तदनंतर मनामध्यें प्रसन्न झालेला तो तेजस्वी राम महामुनि विश्वामित्रांना अभिवंदन करून पुढें जाण्यास उद्युक्त झाला.

सर्ग अठ्ठाविसावा.

अस्त्रांचा स्वीकार.

तदनंतर अस्त्रांचा स्वीकार केल्यावर प्रसन्न मुद्रेनें युक्त व शुचिर्भूत असलेला तो ककुत्स्थकुलोत्पन्न राम जातां जातांच विश्वामित्र मुनींना म्हणाला, 'हे भगवन्, मीं अस्त्रांचा स्वीकार केला आहे व त्यामुळें मी आतां देवांनाहि अजिंक्य झालों आहें; परंतु हे मुनिश्रेष्ठ, अस्त्रांचा उपसंहार कसा करावा हें जाणण्याची मला इच्छा आहे.' ह्याप्रमाणें ककुत्स्थकुलोत्पन्न राम बोलूं लागला असतां धैर्यवान, सदाचरणसंपन्न आणि शुचिर्भूत अशा महातपस्वी विश्वामित्र मुनींनीं अस्त्रांचे उपसंहार रामाला सांगितले आणि नंतर ते म्हणाले, "सत्यवान, सत्यकीर्ति, धृष्ट, रभस, प्रतिहारतर, पराङ्मुख, अवाङ्मुख, हे लक्ष्य आणि अलक्ष्य, दृढनाभ, वसुनाभ, दशाक्ष व शतवक्त्र, दशशीर्ष व शतोदर, पद्मनाभ व महानाभ, दुंदुनाभ व स्वनाभ, ज्योतिष, शकुन, उभयतां नैरास्य व विमल, दैत्यनाशक, योगंधर व विनिद्र हे अस्त्ररूप कृशाश्वपुत्र मी तुला देत असून, शुचिबाहु, महाबाहु, निष्कली, विरुच, सार्चिमाली, धृतिमाली, वृत्तिमान, रुचिर, पित्र्य, सौमनस, आणि हे राघवा, उभयतां विधूत व मकर हे मी तुला देतों. शिवाय परवीर, रति, धन व धान्य, कामरूप, कामरुचि, मोह, आवरण, जृंभक, सर्पनाथ आणि पंथान व वरुण हे यथेष्ट रूप धारण करणारे व तेजोमय असलेले अस्त्ररूप कृशाश्वपुत्र तूं घे. राघवा, तूं माझ्या दानाला पात्र आहेस. तुझें कल्याण असो."

ह्याप्रमाणें विश्वामित्र मुनींनीं सांगितलें असतां 'होय' येवढेंच म्हणून ककुत्स्थकुलोत्पन्न रामानें प्रसन्न मनानें त्यांचा स्वीकार केला. तेव्हां दिव्य आणि उज्ज्वल देहानें युक्त व सुखप्रद असे ते अस्त्ररूप कृशाश्वपुत्र मूर्तिमान तेथें आले. सारांश, कांहीं अंगारासारखे, कांहीं धूमसदृश आणि कांहीं चंद्र-सूर्याप्रमाणें तेजस्वी असे ते मधुर भाषण करणारे अस्त्ररूप कृशाश्वपुत्र नम्र होऊन व हात जोडून तेथें उभे राहिले आणि रामाला म्हणाले, 'हे पुरुषश्रेष्ठा, हे आम्ही आलों आहों, आम्हीं आपलें काय कार्य करावें त्याची आपण आज्ञा करा.' ह्याप्रमाणें त्यांनीं प्रार्थना केली असतां राम म्हणाला, 'आपण सांप्रत यथेष्ठ गमन करा आणि कार्यसमय प्राप्त झाला असतां माझ्या मनामध्यें मंत्ररूपानें स्थित असलेले आपण मला साहाय्य करा.' ह्याप्रमाणें रामानें त्यांना

सांगितल्यावर 'ठीक आहे' असें म्हणून त्यांनीं रामाचा निरोप घेतला, आणि त्या ककुत्स्थकुलोत्पन्न रामाला प्रदक्षिणा करून ते आल्या वाटेनें चालते झाले.

सिद्धाश्रमसंबंधीं पृच्छा.

अशा प्रकारें अस्त्रांचें ज्ञान झाल्यानंतर रघुवंशज राम जातां जातांच महामुनि विश्वामित्रांना मधुर आणि स्पष्ट अशा वाणीनें प्रश्न करूं लागला, "हे भगवन्, पर्वतापासून दूर नसलेला हा मेघतुल्य वृक्षसमूह मला दिसत आहे, तो आश्रमसंबंधी आहे किंवा वनसंबंधी आहे हें आपण मला सांगा. त्याविषयीं मला पराकाष्ठेची उत्सुकता उत्पन्न झाली आहे. हा वृक्षसमुदाय दिसण्यांत उत्तम असून मनोहर आहे, मृगांनीं व्याप्त झालेला आहे आणि मधुर शब्द करणाऱ्या नानाप्रकारच्या पक्ष्यांनीं ह्याला शोभा आणिलेली आहे. हे मुनिश्रेष्ठा, आपण आतां शरिरावर कांटा आणणाऱ्या अशा भयंकर वनमार्गांतून बाहेर पडलों आहों, आणि ह्या प्रदेशाच्या सुवृत्तेवरून हें आश्रमस्थान असावें असें मला वाटत आहे. करितां, भगवन्, हें कोणाचें आश्रमस्थान आहे, तें सर्व आपण मला सांगा. ज्या ठिकाणीं ते ब्रह्मघातकी, दुराचारी, पापी आणि दुरात्मे राक्षस आपल्या यज्ञाला विघ्न करण्यास प्रवृत्त झाले आहेत, आणि ज्या ठिकाणीं आपल्या त्या यज्ञकर्माचें संरक्षण व राक्षसांचा वध मला कर्तव्य आहे, त्या आपल्या आश्रमाचा प्रदेश कोणता, तो आपण मला सांगा. हे ब्रह्मन्, हे मुनिश्रेष्ठ, हे प्रभो, हें सर्व श्रवण करण्याची माझी इच्छा आहे.'

सर्ग एकुणतिसावा.

सिद्धाश्रमाची कथा.

नंतर ते प्रश्न विचारणाऱ्या त्या अतर्क्य रामाचें भाषण श्रवण करून महातेजस्वी विश्वामित्र मुनि विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर देऊं लागले. ते म्हणाले, "हे महापराक्रमी रामा, देवांना वंद्य अशा अत्यंत महातपस्वी विष्णूनें, तपश्चर्येकडे लोकांची प्रवृत्ति व्हावी एतदर्थ तपश्चर्या करण्याकरितां, पुष्कळ वर्षेंच नव्हे, परंतु शेंकडों युगें या ठिकाणीं वास्तव्य केलेलें आहे. वीरा रामा, वामनावतार घेण्यापूर्वीं तपश्चर्या करण्याकरितां सुरश्रेष्ठ महात्म्या विष्णूनें या आश्रमाचा स्वीकार केला होता, व ते महातपस्वी विष्णु या ठिकाणीं तपानें सिद्ध झाल्यामुळें सिद्धाश्रम म्हणून हा आश्रम प्रसिद्ध आहे. ह्या आश्रमांत विष्णु

तपश्चर्या करीत असतांनाच इंद्र आणि मरुद्गण ह्यांसहवर्तमान देवगणांना जिंकून विरोचनपुत्र बलिराजानें तें इंद्रादिकांचें राज्य स्वत: करण्यास आरंभ केला, व त्रैलोक्यामध्यें विख्यात असलेल्या त्या महाबलाढ्य व अतिप्रचंड दैत्यराजानें एक यज्ञहि केला, परंतु बलि यज्ञ करीत असतांना अग्निप्रभृति देव ह्या आश्रमामध्यें स्वत: विष्णूकडे आले आणि म्हणाले, ‘ हे विष्णो, विरोचनपुत्र बलि उत्तम यज्ञ करीत आहे. करितां तें व्रत संपूर्ण होण्यापूर्वी आपण आपलें कार्य करून घ्यावें इकडल्या तिकडल्या प्रदेशांतून तेथें जाऊन जे याचक त्याच्यापाशीं जें जें मागतात, तें तें सर्व तो त्यांना यथायोग्य रीतीनें अर्पण करितो. ह्यास्तव हे विष्णो, देवहिताकरितां मायेचें अवलंबन करून आपण वामनत्व स्वीकारा आणि आमचें चांगलें कल्याण करा.’

विश्वामित्र पुढें सांगतात:—“रामा, हें त्यांचें भाषण चाललें आहे तोंच अग्नितुल्य प्रभेनें युक्त आणि म्हणूनच तेजानें देदीप्यमान अशा भगवान काश्यप मुनींनीं अदितीसहवर्तमान सहस्र दिव्य वर्षेंपर्यंत चालविलेली तपश्चर्या समाप्त केली, आणि त्या देवीसहवर्तमान ते वरप्रद मधुसूदनाची स्तुति करूं लागले. ‘ हे प्रभो, तपोमय, तपोराशी, तपोमूर्ति व ज्ञानस्वरूप अशा तुज पुरुषश्रेष्ठाला मी आचरिलेल्या तपाच्या योगानें अवलोकन करीत आहें. हे प्रभो, तुझ्या शरिराचे ठिकाणीं मी हें सर्व जगत् अवलोकन करीत आहें. तूं अनादि असून अतर्क्य आहेस. मी तुला शरण आलों आहें. ’ ह्याप्रमाणें स्तुति झाल्यावर, ‘ वर माग, तुझें कल्याण असो. तूं वराला योग्य आहेस, असें मी समजतों. ’ म्हणून श्रीहरींनीं प्रसन्न होऊन पापक्षालन झालेल्या कश्यप मुनींना सांगितलें असतां, ते मरीचिपुत्र विष्णूला म्हणाले, ‘ हे वरप्रद, अदिति, देवता आणि मी ह्यांनीं प्रार्थित असा वर आपण प्रसन्न होऊन मला द्या. सारांश, हे सुव्रत, हे भगवन्, हे निष्पाप, माझे व अदितीचे आपण पुत्र व्हां. हे दैत्यनाशक, आपण इंद्राचे कनिष्ठ बंधु व्हा, आणि शोकाकुल झालेल्या देवांना साहाय्य करा. आपल्या प्रसादामुळें हा प्रदेश सिद्धाश्रम म्हणून प्रसिद्ध होईल. हे भगवन्, ही तपश्चर्या संपूर्ण झाली आहे. करितां, देवाधिदेव, आतां देवकार्याकरितां आपण येथून उठा. ’

ह्याप्रमाणें काश्यप मुनींनीं प्रार्थना केली असतां महातेजस्वी विष्णु अदितीचे ठिकाणीं जन्मास आले, आणि वामनरूप धारण करून ते विरोचनपुत्र बलीकडे गेले. नंतर त्रैलोक्य व्यापण्याची इच्छा धरून सर्व लोकांच्या हिताविषयीं

तत्पर असलेल्या विष्णूंनीं बलीपाशीं त्रिपादभूमीची भिक्षा मागितली. त्याप्रमाणें त्या भूमीचा प्रतिग्रह केला आणि तीन पदांनीं तिन्ही लोक व्याप्त करून व आपल्या सामर्थ्यानें बलीचा निग्रह करून पुनरपि त्यांनीं तें त्रैलोक्य महेंद्राला अर्पण केलें. सारांश, त्या महातेजस्वी विष्णूंनीं पुनरपि त्रैलोक्य इंद्राधीन करून टाकिलें. असो. ह्या श्रमपरिहार करणाऱ्या आश्रमामध्यें पूर्वीं त्या वामनावतार धारण करणाऱ्या ईश्वरानेंच वास्तव्य केलें होतें आणि मीहि त्या वामनाच्याच प्रसादानें ह्या आश्रमाचा उपभोग घेत आहें. विघ्न करणारे राक्षस ह्या आश्रमामध्यें येत असतात. करितां हे पुरुषश्रेष्ठा, त्या दुराचारी राक्षसांचा ह्या ठिकाणीं वध करणें योग्य आहे. रामा, आज आपण त्या सर्वोत्कृष्ट सिद्धाश्रमाला जाऊं. बा वीरा, हें आश्रमस्थान जसें माझें आहे, तसें तुझेंहि आहे.

सिद्धाश्रमीं गमन.

अशा प्रकारें अत्यंत प्रसन्न झालेले महामुनि विश्वामित्र लक्ष्मणासहवर्तमान रामाला घेऊन त्या आश्रमामध्यें प्रविष्ट होऊं लागले असतां, पुनर्वसुसंज्ञक दोन ताऱ्यांनीं युक्त असलेला अभ्ररहित चंद्रमा ज्याप्रमाणें शोभतो, त्याप्रमाणें ते शोभूं लागले. त्यांना अवलोकन केल्याबरोबर सिद्धाश्रमनिवासी सर्व मुनींनीं एकदम उठून प्रथम विश्वामित्राचें यथायोग्य पूजन केलें; आणि नंतर त्याचप्रमाणें त्या राजपुत्रांचेंहि त्यांनीं आदरातिथ्य केलें. असो. आश्रमांत गेल्यावर एक मुहूर्तभर विश्रांति घेतल्यानंतर ते रघुनंदन शत्रुनाशक राजपुत्र हात जोडून मुनिश्रेष्ठ विश्वामित्राला म्हणाले, "हे मुनिश्रेष्ठ, आपलें देव बरें करो. आपण आजच दीक्षा घ्या. आपला यज्ञ सिद्ध होऊन म्हणजे शेवटास जाऊन ह्या आश्रमाचें सिद्धाश्रम हें नांव अन्वर्थक होवो आणि आपलें वचन खरें होवो." ह्याप्रमाणें रामानें प्रार्थना केली असतां मन व इंद्रियें ह्यांचा निग्रह केलेल्या महातेजस्वी विश्वामित्र मुनींनीं त्या वेळीं यज्ञदीक्षा घेतली. असो. शिवपुत्र दोन स्कंदच कीं काय असे शोभत असलेले ते राजकुमार स्वस्थांतःकरणपूर्वक त्या रात्रीं त्या सिद्धाश्रमामध्यें राहिले, आणि प्रभात काळीं उठल्यानंतर अतिशय शुचिर्भूत असलेल्या त्या राजकुमारांनीं प्रातःसंध्या करून आणि नियमानें कर्तव्य जो उत्कृष्ट जप तोहि समाप्त करून, होम देऊन बसलेल्या विश्वामित्र मुनींना वंदन केलें.

सर्ग तिसावा.

मखरक्षण

ह्याप्रमाणें वंदन केल्यानंतर देश व काल जाणणारे आणि संभाषणामध्यें निपुण असलेले शत्रुनाशक राजपुत्र योग्य स्थळीं आणि योग्य वेळीं विश्वामित्र मुनीला म्हणाले, 'भगवन्, यज्ञसंरक्षण करण्याकरितां त्या निशाचरांचें निवारण केव्हां केलें पाहिजे तें आपण सांगा, म्हणजे ती वेळ टळणार नाहीं.' ह्याप्रमाणें ककुत्स्थकुलोत्पन्न राम-लक्ष्मण युद्धाच्या उत्कंठेनें आज्ञा करण्याविषयीं विश्वामित्र मुनींना त्वरा करूं लागले असतां, त्या सिद्धाश्रमांतील ते सर्व मुनी संतुष्ट झाले आणि प्रशंसापूर्वक त्या राजकुमारांना म्हणाले, 'रघुकुलोत्पन्न राजपुत्रहो, आजपासून सहा दिवसपर्यंत तुह्मी रक्षण करा. ह्या मुनींनीं यज्ञदीक्षा घेतली असल्यामुळें हे तेथपर्यंत मौन धारण करतील. ह्याकरितां तुमच्या प्रश्नाचें उत्तर आम्हीं दिलें आहे.'

त्या मुनींचें तें भाषण श्रवण केल्यावर त्या यशस्वी राजपुत्रांनीं निद्रा न घेतां सहा दिवसापर्यंत एकसारखें त्या तपोवनाचें रक्षण केलें. सारांश, ते श्रेष्ठ धनुर्धारी राजपुत्र सज्ज झाले आणि समीप राहून शत्रुनाशक मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांच्या यज्ञाचें रक्षण करूं लागले. असें चाललें असतां तो सहावा दिवस उजाडल्यावर, 'तूं सावधपणें तयार रहा' म्हणून लक्ष्मणाला रामानें सांगितलें. त्याप्रमाणें युद्धाविषयीं उत्सुक झालेला राम लक्ष्मणाला सांगत असतांना ब्रह्मा, उपद्रष्टा आणि इतरहि ऋत्विज ह्यांसहवर्तमान वेदि एकाएकीं प्रज्वलित होऊं लागली. तात्पर्य दर्भ, चमस व स्रुचा आणि समिधा व पुष्पें ह्यांच्या राशी ह्यांनीं युक्त असलेली ती वेदि विश्वामित्र व ऋत्विज ह्यांसहवर्तमान एकाएकीं पेट घेऊं लागली. त्या यज्ञाचें अनुष्ठान समंत्रक व यथाविधि चाललें आहे तोंच आकाशामध्यें मोठा भयंकर शब्द होऊं लागला आणि आकाश व्याप्त करून ज्याप्रमाणें मेघ वर्षाकालीं मोठी गर्जना वगैरे करितांना दृष्टीस पडतात, त्याप्रमाणें माया प्रकट करणारे ते राक्षस तेथें धावून आले. मारीच, सुबाहु आणि त्यांचे अनुयायी अशा त्या भयंकर राक्षसांनीं तेथें येऊन रक्तप्रवाहांची वृष्टि केली. तेव्हां त्या रक्तप्रवाहानें सिंचित झालेली ती वेदि अवलोकन केल्याबरोबर राम एकाएकीं यज्ञशालेच्या भोंवतीं धावूं लागला, तों आकाशामध्यें ते राक्षस

---

१ ही राक्षसी माया!

त्याच्या दृष्टीस पडले. त्या राक्षसांपैकीं मारीच आणि सुबाहु हे उभयतां एकदम आपल्या आंगावर धांवून येत आहेत असें अवलोकन करून कमलनयन राम लक्ष्मणाकडे पाहून म्हणाला, " लक्ष्मणा, पहा! वायूच्या योगानें ज्याप्रमाणें मेघ उडून जातात, त्याप्रमाणें ह्या मांसभक्षक दुराचारी राक्षसांना मी मानवास्त्राच्या योगानें निःसंशय उडवून लावितों. अशा दुर्बलांचा वध करण्याला माझें मन घेत नाहीं."

ह्याप्रमाणें लक्ष्मणाला सांगून त्या वेगवान रामानें धनुष्याला बाण लाविला आणि अत्यंत श्रेष्ठ व उज्ज्वल अशा मानवास्त्राचें अभिमंत्रण करून, तो बाण त्या अत्यंत क्रुद्ध झालेल्या रघुवंशज रामानें मारीच राक्षसाच्या वक्षःस्थलावर टाकिला. तेव्हां त्या श्रेष्ठ मानवास्त्राच्या योगानें ताडित झालेला तो राक्षस समुद्रामध्यें पुरीं शंभर योजनें लांबपर्यंत फेंकला गेला. ह्याप्रमाणें शीतेषुसंज्ञक मानवास्त्राच्या बलानें पीडित झाल्यामुळें मूर्च्छित झालेला तो मारीच राक्षस समुद्रांत फेंकला जाऊन तडफडत आहे असें पाहून लक्ष्मणाला राम म्हणाला, " लक्ष्मणा, पहा मनूनें प्रथम योजिलेलें हें शीतेषुसंज्ञक मानवास्त्र ह्याला मोह पाडून लांब नेत आहे; परंतु हें ह्याचे प्राण घेत नाहीं. असो. ह्या दुराचारी, पापकर्माविषयीं रत, यज्ञघातकी आणि रक्त प्राशन करून असणाऱ्या निर्दय राक्षसांचाहि आतां मी वध करितों." याप्रमाणें लक्ष्मणाला सांगून आपलें हस्तलाघव दर्शवीतच कीं काय, रघुनंदन रामानें अतिशय प्रचंड असें आग्नेयास्त्र सत्वर धारण करून, सुबाहु नामक राक्षसाच्या वक्षःस्थलावर फेंकिलें असतां त्या अस्त्रानें ताडित झालेला तो राक्षस भूमीवर पडला. असो. नंतर अत्यंत उदार अशा त्या महायशस्वी रघुवंशज रामानें वायव्यास्त्र घेऊन इतरहि यज्ञघातकी राक्षसांचा वध केला असतां, त्या सिद्धाश्रमनिवासी मुनींना आनंद झाला; आणि विजयसमयीं पूर्वीं ऋषींनीं ज्याप्रमाणें इंद्राचें पूजन केलें, त्याप्रमाणें त्या सिद्धाश्रमनिवासी मुनींनीं त्याचें पूजन केलें. असो. नंतर यज्ञ समाप्त झाल्यावर, सर्व प्रदेश पीडारहित झाल्याचें अवलोकन करून, महामुनि विश्वामित्र ककुत्स्थकुलोत्पन्न रामाला म्हणाले, " हे महाबाहो, माझा मनोरथ सिद्धीस गेला. गुरूचें म्हणणें तूं शेवटास नेलेंस आणि हे महायशस्वी वीरा, ह्या आश्रमाचेंहि तूं सिद्धाश्रम हें नांव सत्य करून दाखविलेंस." ह्याप्रमाणें रामाची प्रशंसा केल्यावर ते विश्वामित्र मुनि त्यांच्यासहवर्तमान संध्यावंदन करूं लागले.

सर्ग एकावन्नसावा.

मिथिला नगरीकडे प्रयाण.

संध्यावंदन झाल्यानंतर, ज्यांच्या मनांतील उद्देश शेवटास गेला आहे असे ते आनंदित झालेले वीर राम-लक्ष्मण त्या रात्रीं सुप्रसन्न अंतःकरणानें त्या आश्रमामध्यें राहिले. रात्र उजाडल्यावर पूर्वाण्हसंबंधीं स्नानसंध्या आटोपून ते उभयतां, विश्वामित्र आणि इतरहि ऋषी ह्यांच्या समीप गेले. नंतर अग्नीप्रमाणें देदीप्यमान असलेल्या मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांना अभिवंदन करून, ते मधुर भाषण करणारे राम-लक्ष्मण अत्यंत उदात्त वाणीनें विश्वामित्र मुनींना म्हणाले, "मुनिश्रेष्ठ, हे आम्ही दास आलों आहों. आतां आम्ही आपली काय आज्ञा शेवटास न्यावी, ह्याचा हुकूम व्हावा." ह्याप्रमाणें त्यांनीं भाषण केलें असतां विश्वामित्राला पुढाकार देऊन ते ऋषि रामाला म्हणाले, "हे पुरुषश्रेष्ठा, मैथिलाधिपति जनक राजाच्या घरीं अत्यंत धर्मयुक्त असा यज्ञ होणार असून तिकडे आम्ही जाणार आहों. ह्यास्तव हे पुरुषश्रेष्ठा, तूंहि आम्हांसहवर्तमान तेथें चल, आणि तें अद्भुत श्रेष्ठ धनुष्य त्या ठिकाणीं तूं अवलोकन कर. हे पुरुषश्रेष्ठा रामा, देवरात नामक जो पूर्वीचा जनक राजा होता, त्याचा यज्ञ सुरू असतांना अत्यंत उज्ज्वल आणि अतर्क्य सामर्थ्यानें युक्त असें तें घोर धनुष्य देवांनीं यज्ञमंडपामध्यें त्याला दिलेलें आहे. देव, गंधर्व, दैत्य आणि राक्षस ह्यांपैकीं कोणीहि त्या धनुष्याला प्रत्यंचा चढविण्यास समर्थ नाहींत; मग मानव तर सर्व प्रकारें समर्थ नाहींतच नाहींत. महाबलाढ्य राजपुत्रांनीं व राजांनीं त्या धनुष्याचें वीर्य जाणण्याकरितां त्याला चढविण्याची खटपट केली; परंतु ते समर्थ झाले नाहींत. हे पुरुषश्रेष्ठा ककुत्स्थकुलोत्पन्ना रामा, त्या महात्म्या मैथिलाधिपतीचें ते धनुष्य आणि अत्यंत अद्भुत यज्ञ तूं अवलोकन करशील. यज्ञामध्यें देव प्रसन्न झाले असतां त्या मैथिलाधिपतीनें यज्ञाचें फल म्हणून तें उत्कृष्ठ धनुष्य त्यांचेपाशीं मागितलें व त्याचप्रमाणें शंकरासहवर्तमान सर्व देवांनीं तें सुनाभ (उत्कृष्ठ प्रकारच्या मुष्टिबंधनस्थानानें युक्त असलेलें) धनुष्य त्याला अर्पण केलें. तेव्हांपासून हे रघुवंशज रामा, त्या राजाच्या गृहामध्यें त्या यज्ञदेवतांच्या स्थानीं असलेल्या धनुष्याचें, नानाप्रकारचीं गंधें आणि अगुरु गंधांनीं युक्त असलेले धूप, ह्यांच्या योगानें पूजन होत असतें."

ह्याप्रमाणें रामाला सांगितल्यावर मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांनीं ककुत्स्थकुलोत्पन्न राम-लक्ष्मण आणि ऋषिसमुदाय ह्यांसहवर्तमान, 'तुमचें कल्याण असो. माझा मनोरथ सिद्धीस गेला आहे आणि आतां मी ह्या सिद्धाश्रमांतून निघून जान्हवीच्या उत्तरतीरीं असलेल्या हिमालय पर्वतावर जात आहें' असें वन-देवतांना सांगून व त्यांचा निरोप घेऊन, ते कुशिकवंशज तपोधन मुनिश्रेष्ठ विश्वामित्र उत्तर दिशेला जाण्याच्या उद्देशानें चालूं लागले. ते मुनिश्रेष्ठ विश्वामित्र जाऊं लागले असतां त्यांचे अनुयायी जे इतर ब्रह्मवेत्ते मुनी, त्यांच्या यज्ञ-पात्रांनीं वगैरे भरलेले शंभर गाडे त्यांच्या मागोमाग गेले. (सारांश, अग्नि-होत्राचें वगैरे शंभर गाडे सामान बरोबर घेऊन विश्वामित्रानुयायी मुनी त्यांच्या मागोमाग गेले.) इतकेंच नव्हे, तर त्या सिद्धाश्रमांत राहणारे मृग व पक्षी ह्यांचे समुदायहि त्या महात्म्या सिद्धाश्रमनिवासी मुनींबरोबर तपोधन विश्वा-मित्र मुनींच्या मागोमाग गेले; परंतु ऋषिसमुदायासहवर्तमान जात असलेल्या विश्वामित्र मुनींनीं त्या पक्ष्यांना वगैरे परत फिरविलें.

असो. नंतर बराच रस्ता चालून गेल्यावर सूर्य कलला असतां त्या मुनि-गणांनीं सावध राहून शोणा नामक नदीच्या तीरीं वास्तव्य केलें. नंतर सूर्यास्त होऊं लागला असतां त्या मुनींनीं स्नान केलें आणि अग्निहोत्र होम आटो-पल्यावर विश्वामित्र मुनींना अग्रणीत्व देऊन ते अपरिमित तेजस्वी मुनी तेथें बसले. तेव्हां लक्ष्मणासहवर्तमान रामहि त्या मुनींना अभिवंदन करून विवेकी विश्वामित्र मुनींच्या समोर बसला. ह्याप्रमाणें सर्वजण बसल्यानंतर मुनिश्रेष्ठ तपोधन विश्वामित्रांना महातेजस्वी रामानें, "हे भगवन्, समृद्ध वनानें शोभित असलेला हा प्रदेश कोणता, तें श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. मुनिश्रेष्ठ, आपलें देव बरें करो. ह्या विषयींची यथार्थ हकीकत आपण मला कथन करा." असा प्रश्न केला व ह्याप्रमाणें रामानें प्रार्थना केली असतां त्या सदाचरणसंपन्न महातपस्वी विश्वामित्र मुनींनीं ऋषींमध्यें त्या देशासंबंधीं सर्व कांहीं कथन केलें.

सर्ग बत्तिसावा.

कुशनाभ व त्याच्या कन्या ह्यांचें वृत्त.

विश्वामित्र म्हणाले:—" सज्जनांना मान देणारा, निर्मल तपश्चर्या करणारा आणि धर्मवेत्ता असा एक महातपस्वी कुश म्हणून मोठा ब्रह्मपुत्र होऊन गेला. त्या महात्म्यानें क्षात्रधर्म वृद्धिंगत होण्याची इच्छा धरून कुलीन आणि आचरणानें शुद्ध अशा विदर्भ राजाच्या कन्येचे ठिकाणीं फारच मोठे बलिष्ठ, देदीप्यमान आणि मोठे उत्साही असे कुशांब, कुशनाभ, असूर्तरजस आणि वसु ह्या नांवाचे आपणासारखे चार पुत्र उत्पन्न केले. पुढें त्या धर्मिष्ठ व सत्यवचनी पुत्रांना, ' हे पुत्रहो, प्रजापालन करा, म्हणजे तुम्हांला मोठें पुण्य लागेल ' असें तो कुश म्हणाला असतां, त्याचें भाषण श्रवण करून त्या पुरुषश्रेष्ठ व लोकोत्तर अशा चारहि पुत्रांनीं नगरें वसविलीं.महातेजस्वी कुशांबानें कौशांबी नगरी वसविली. धर्मात्म्या कुशनाभानें महोदय नामक नगराची स्थापना केली.महामति असूर्तरजसानें धर्मारण्य वसविलें आणि वसुराजानें गिरिव्रज नामक श्रेष्ठ नगर स्थापिलें. तें जें गिरिव्रज नामक नगर, तीच त्या महात्म्या वसुराजाची सांप्रत वसुमती म्हणून प्रसिद्ध असलेली नगरी होय. ह्या नगरीच्या आसमंतात हे पांच श्रेष्ठ पर्वत शोभत आहेत; आणि सुमागधी म्हणून प्रसिद्ध असलेली जी रम्य नदी मगध देशामध्यें वहात गेलेली आहे, ती ह्या पांच श्रेष्ठ पर्वतांमध्यें मालेप्रमाणें शोभत आहे. रामा, ती ही त्या महात्म्या वसुराजाची मगधी म्हणून प्रसिद्ध असलेली शोणा नदी होय. ही नदी पूर्वेकडे वहात जाणारी आहे. हिच्या दोन्ही तीरांवर प्रदेश चांगला सुपीक आहे व त्यामुळें हिच्या तीरांवर धान्याची समृद्धि आहे. हे रघुनंदना, धर्मात्म्या कुशनाभ राजर्षीला सर्वोत्कृष्ट अशा शंभर कन्या घृताची नामक अप्सरेच्या ठिकाणीं झाल्या. पर्जन्यकालीं मेघमंडळांतून बाहेर पडणाऱ्या प्रतिविद्युल्लताच कीं काय अशा त्या रूपवती व उत्तम प्रकारचे अलंकार धारण केलेल्या तरुण कन्या एकादां उपवनामध्यें गेल्या आणि उत्तम प्रकारच्या आभरणांनीं भूषित होऊन गायन, नृत्य व वादन करितां करितां पराकाष्ठेच्या आनंदांत निमग्न झाल्या. सारांश, प्रत्येक अवयव सुंदर असल्यामुळें पृथ्वीमध्यें रूपानें अप्रतिम असलेल्या त्या कन्या उपवनामध्यें आल्या असतां मेघामध्यें असलेल्या चांदण्याप्रमाणें चमकूं लागल्या. तेव्हां सौंदर्य आणि यौवन ह्यांनीं युक्त असलेल्या त्या गुणसंपन्न सर्व कन्यांना अवलोकन करून सर्वात्मक वायु त्यांना म्हणाला, ' तुह्मांवर माझें मन

गेलें आहे. करितां तुम्ही सर्वजणी माझ्या भार्या व्हा, म्हणजे मनुष्यत्वाचा त्याग होऊन तुम्हांला दीर्घ आयुष्य प्राप्त होईल विशेषत: मनुष्यांमध्यें यौवन हें नेहमीं अगदीं चंचलच असतें. तस्मात् तुम्ही अक्षय यौवन प्राप्त करून घेऊन अमर व्हां.'

ह्याप्रमाणें त्या महापराक्रमी वायूचें भाषण श्रवण केल्यावर, त्याच्या भाषणाचा उपहास करून त्या शंभर कन्या त्याला म्हणाल्या, "हे सुरश्रेष्ठा, तूं प्राणिमात्रामध्यें संचार करणारा आहेस, आणि आम्ही सर्वहि तुझा प्रभाव जाणणाऱ्या आहों. तस्मात् तूं उगीच आमची अवहेलना कशाकरितां करीत आहेस? हे देवा, आह्मी कुशनाभाच्या कन्या आहों, आणि हे सुरश्रेष्ठा, आमचा उपमर्द करण्यास प्रवृत्त झालेल्या तुझ्यासारख्या देवालाहि देवत्वापासून च्युत करण्यास आम्ही समर्थ आहों; परंतु आम्हीं तपाचें रक्षण करीत आहों आणि शाप दिला असतां तपाचा क्षय होईल म्हणून आम्ही ती गोष्ट मनांत आणीत नाहीं. हे दुर्बुद्धे, सत्यवादी पित्याचा अवमान करून विषयवासना उत्कट झाल्यामुळें स्वेच्छेनें पति वरण्यास आम्ही प्रवृत्त व्हावें असा प्रसंग आमच्यावर कधींहि न येवो. अरे, पिता हा आमचा प्रभु असून आमचें परम दैवतहि तोच आहे. ह्यास्तव ज्या पुरुषाला आमचा पिता आम्हांला देईल, तोच आमचा भर्ता होईल."

हें त्या कन्यांचें भाषण ऐकून भगवान समर्थ वायु पराकाष्ठेचा क्रुद्ध झाला आणि त्या कन्यांच्या सर्व गात्रांमध्यें प्रविष्ट होऊन त्यानें त्यांना मोडून टाकिल्या. ह्याप्रमाणें वायूच्या योगानें अंगभंग झालेल्या त्या कन्या राजाच्या घरांत प्रविष्ट झाल्या आणि मनामध्यें अतिशयच गोंधळून गेलेल्या त्या कन्या लज्जित होऊन डोळ्यांमध्यें अश्रु आणूं लागल्या असतां, स्वत:ला प्रिय आणि फारच सुंदर अशा त्या कन्या भग्न व म्हणूनच दीन झालेल्या अवलोकन केल्याबरोबर राजा गोंधळून जाऊन त्यांना म्हणाला, 'मुलींनो, हें काय तें सांगा. धर्माचें अतिक्रमण कोण करीत आहे, तें मला कळूं द्या. तुम्हां सर्वांना कुबड्या कोणी करून टाकिल्या व तुम्ही विव्हळत असून माझ्याशीं कां भाषण करीत नाहीं, हें मला सांगा.' ह्याप्रमाणें त्यांना विचारून व दु:खाचा सुस्कारा टाकून त्यांचें उत्तर ऐकण्याकरितां राजा एकाग्र चित्त करून बसला.

सर्ग चौतिसावा.

कुशिकवंशाचें वृत्त.

"हे रघुवंशजा रामा, विवाह करून तो ब्रह्मदत्त गेल्यावर त्या निपुत्रिक कुशनाभ राजानें पुत्रप्राप्तीकरितां पुत्रकामेष्टि याग करण्याचें मनामध्यें आणिलें. पुढें तो याग सुरू झाल्यावर कुशनाभ भूपतीला अत्यंत उदार असा कुश नामक ब्रह्मपुत्र म्हणाला, 'मुला, अत्यंत धार्मिक आणि तुला योग्य असा पुत्र प्राप्त होईल. सारांश गाधिनामक पुत्र तुला प्राप्त होईल आणि त्याच्या योगानें तुझी अक्षय कीर्ति राहील.' ह्याप्रमाणें कुशनाभ भूपतीला सांगितल्यावर आकाशामध्यें प्रविष्ट होऊन तो कुश सनातन ब्रह्मलोकाला चालता झाला. पुढें ह्या गोष्टीला कांहीं दिवस लोटल्यावर अत्यंत धर्मनिष्ठ असा गाधिनामक पुत्र विचारी कुशनाभाला झाला. हे ककुत्स्थकुलोत्पन्ना, तो परम [1]धार्मिक गाधि माझा पिता होय. हे रघुनंदना, कुशाच्या वंशामध्यें उत्पन्न झालों असल्यामुळें मी कौशिक आहें. हे राघवा, उत्तम आचरणानें युक्त अशी एक माझी सत्यवती नामक ज्येष्ठ भगिनी असून ती ऋचीकाला दिलेली होती. सर्वस्वी भर्त्याच्या मताप्रमाणें वागणारी ती भगिनी देहासहवर्तमान स्वर्गाला गेली. तेव्हां फारच भव्य अशी ही कौशिकी नामक महानदी तिच्या रूपानें ह्या पृथ्वीवर प्राप्त झाली. सारांश, दिव्य व पवित्र उदकानें युक्त आणि रमणीय अशी माझी भगिनी हिमालयाचें अवलंबन करून लोकांचें हित करण्याकरितां प्रवृत्त झालेली आहे. असो. हे रघुनंदना, भगिनीचे ठिकाणीं माझें फारच प्रेम असल्यामुळें हिमालयावर कौशिकी नदीचे सन्निध मी नित्य सुखानें रहात असतों. नद्यांमध्यें श्रेष्ठ असलेली ही कौशिकी माझी सत्यवती नामक भगिनी असून ती पतिव्रता, महाभाग्यवती, पवित्र आणि सत्यधर्माचें अवलंबन करून राहणारी आहे. रामा, मी कांहीं सिद्धीच्या उद्देशानें तिला टाकून आलों आहें, म्हणजे ह्या सिद्धाश्रमाप्रत प्राप्त झालों आहें. आणि तुझ्या तेजाच्या योगानें ती माझी कार्यसिद्धीहि झालेली आहे. ही मी आपली व माझ्या वंशाची उत्पत्ति तुला कथन केली; आणि हे पराक्रमी रामा, ह्या देशाचा जो इतिहास तूं मला विचारिला होतास तोहि मीं तुला

१ हा कुशनाभाचा पिता.

कथन केला. हे ककुत्स्थकुलोत्पन्ना रामा, मी गोष्टी सांगतां सांगतां मध्यरात्र होऊन गेली. तेव्हां आतां तूं झोंप घे. बाबारे, जागरण वगैरे झाल्यामुळें आपल्या मार्गाला ह्या ठिकाणीं विघ्न न येवो. हे रघुनंदना, सर्व वृक्षांचीं पानेंहि अगदीं हलतनाशीं झालीं आहेत; सर्व पशुपक्षी निद्रेमध्यें लीन होऊन गेले आहेत; आणि सर्व दिशा रात्रीच्या अंधकारानें व्याप्त झाल्या आहेत. असेंच गोष्टी सांगत बसलों तर हळूहळू संध्येचाहि समय होऊं लागेल. नक्षत्रें आणि तारका ह्यांनीं भरलेलें आकाश ज्योतींच्या योगानें नेत्रांनीं आच्छादित झाल्यासारखें भासत आहे. जगांतील अंधकार नाहींसा करणारा हा शीतकिरणांनीं युक्त असलेला चंद्र स्वतःच्या प्रभेनें जगांतील प्राण्यांच्या मनाला आल्हाद देत देत उदय पावत आहे; आणि घोर व मांसभक्षक असे यक्षराक्षसांचें समुदाय आणि इतरहि सर्व प्रकारचे निशाचर प्राणी इकडून तिकडे व तिकडून इकडे संचार करीत आहेत."

ह्याप्रमाणें सांगून ते महातेजस्वी महर्षि विश्वामित्र स्तब्ध राहिले असतां 'फार उत्तम' असें म्हणून सर्वहि मुनींनीं त्यांची प्रशंसा केली आणि म्हणाले, "हा कुशिकांचा वंश नेहमींच मोठा धर्मनिष्ठ आहे. कुशवंशामध्यें उत्पन्न झालेले सर्वहि पुरुष श्रेष्ठ, महात्मे व ब्रह्मतुल्य आहेत; आणि हे महायशस्वी विश्वामित्र मुने, विशेषतः आपण तर तसेच असून नद्यांमध्यें श्रेष्ठ असलेली ही कौशिकी तर आपल्या कुलाचा उद्धार करणारी आहे." ह्याप्रमाणें आनंदित झालेल्या ऋषिश्रेष्ठांनीं प्रशंसा केली असतां अस्तंगत झालेल्या सूर्याप्रमाणें कुशिकनंदन विश्वामित्र महर्षि झोंपी गेले व किंचित् आश्चर्यचकित झालेल्या रामानेंहि लक्ष्मणासहवर्तमान मुनिश्रेष्ठ विश्वामित्राची प्रशंसा करून निद्रेचा स्वीकार केला.

सर्ग पस्तिसावा.

जान्हवीतीरीं वास्तव्य.

ती राहिलेली रात्र महर्षींसहवर्तमान शोण नदीचे तीरीं घालवून उजाडल्यावर विश्वामित्र म्हणाले, 'रामा, रात्र उजाडली. अरे, पूर्वेकडे तांबडें फुटलें. तुझें कल्याण असो. ऊठ ऊठ आणि आतां पुढें जाण्याचें मनांत आण.' ह्याप्रमाणें

त्यांचें भाषण श्रवण केल्यावर प्रातःकालचें आन्हिक आटोपून रामानें पुढें जाण्याचें मनांत आणून त्यांना विचारिलें, 'पवित्र जलानें युक्त व वालुकेनें भूषित असा हा अगाध शोण नद आहे. ह्यांतत्र हे ब्रह्मन्, आतां आपण कोणत्या मार्गानें ह्यांतून तरून जावें?' ह्याप्रमाणें रामानें प्रश्न केला असतां, ह्या मार्गानें जाण्याचें मीं मनामध्यें योजिलें आहे; कारण महर्षि ह्याच मार्गानें जात असतात' असें विश्वामित्रांनीं त्याला सांगितलें. तेव्हां लांबपर्यंत रस्ता चालून जाऊन दोन प्रहर दिवस आला असतां मुनींनीं सेवित आणि नद्यांमध्यें श्रेष्ठ अशी जान्हवी त्यांनीं अवलोकन केली. हंस आणि सारस पक्षी ह्यांनीं आश्रित व पवित्र जलानें युक्त अशी ती जान्हवी अवलोकन केल्याबरोबर रघुवंशज राम-लक्ष्मणांसहवर्तमान सर्व मुनि आनंदित झाले. पुढें तिचे तीरीं सडासंमार्जन वगैरे करून वास्तव्य करण्याची तजवीज केल्यानंतर स्नान करून, पितरांचें व देवांचें यथाविधि संतर्पण करून, अग्निहोम देऊन व पंचयज्ञावशिष्ट आणि म्हणूनच अमृततुल्य असें अन्न भक्षण करून ते सर्वहि पवित्र मुनि प्रसन्न अंतःकरणानें जान्हवीच्या तीरीं राहिले. नंतर महात्म्या विश्वामित्र मुनींच्या आसमंताद्भागीं गराडा घालून ते सर्व मुनि व रघुवंशज रामलक्ष्मण आपापल्या योग्यतेप्रमाणें यथान्याय बसले असतां, प्रसन्न अंतःकरणानें युक्त झालेला राम विश्वामित्रांना विचारूं लागला, 'भगवन्, तीन मार्गांनीं गमन करणारी ही गंगा नदी त्रैलोक्य व्यापून सागराकडे कशी गेली, हें श्रवण करण्याची माझी इच्छा आहे.' ह्याप्रमाणें महामुनि विश्वामित्र रामाच्या भाषणानें प्रेरित झाले असतां

गंगेची उत्पत्ति व वृद्धि

कथन करण्याचाच त्यांनीं उपक्रम केला. ते म्हणाले, "रामा, धातूंची मोठी खाणच असलेला जो पर्वतराज हिमालय, त्याला पृथ्वीमध्यें रूपानें अप्रतिम अशा दोन कन्या आहेत. मेना म्हणून जी अत्यंत सुंदर व मनोहर अशी मेरु पर्वताची कन्या, ती हिमालयाची प्रिय पत्नी असून त्यांची माता होय. त्या मेनेचे ठिकाणीं हिमालयाची ज्येष्ठ कन्या ही गंगा उत्पन्न झाली; आणि हे रघुवंशजा, उमा म्हणून दुसरी एक कन्या त्या हिमालयाचीच होय. पुढें देवकार्य सिद्धीस नेण्याकरितां सर्व देवांनीं मिळून तीन मार्गांनीं जाणारी जी गंगा नदी—ज्येष्ठ कन्या, तिची पर्वतराज हिमालयापाशीं मागणी केली असतां हिमालयानें—त्रैलोक्याचें हित व्हावें एतदर्थ, स्वेच्छेस येईल त्या मार्गानें गमन करणारी व जगताला पावन करणारी आपली गंगा नामक कन्या धर्मानें देवाला दिली. तेव्हां त्रैलोक्याचें हित

करण्याची इच्छा धरून असलेले ते देव, त्रैलोक्याच्या हिताकरितां त्या गंगेचा स्वीकार करून मनामध्यें कृतकृत्य झाले आणि तिला घेऊन गेले. हे रघुनंदना रामा, दुसरी जी पर्वताची तपस्वी कन्या होती, ती कडकडीत नियमाचें अवलंबन करून तपश्चर्या करीत होती. ती जगद्वंद्य तपस्वी कन्या उमा अतुल अशा रुद्राला पर्वतराज हिमालयानें अर्पण केली. हे रघुवंशजा, नद्यांमध्यें श्रेष्ठ असलेली गंगा आणि उमा देवी ह्या पर्वतराज हिमालयाच्या जगद्वंद्य कन्या मीं तुला कथन केल्या. सारांश, रामा, हें मीं तुला सर्व कथन केलें. आतां गंगा त्रिपथगामिनी कशी म्हणशील तर विपापा व जलवाहिनी अशी ती गंगा प्रथम आकाशमार्गाला जाऊन नंतर देवलोकीं आरूढ झाली."

सर्ग छत्तिसावा.

उमेचें वृत्त.

ह्याप्रमाणें विश्वामित्र मुनींनीं प्रश्नाचें उत्तर दिलें असतां, उभयतां वीर रामलक्ष्मण त्या कथेचें अभिनंदन करून मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांना म्हणाले, 'ब्रह्मन्, अत्यंत धर्मयुक्त असें हें वृत्त आपण कथन केलें. आतां पर्वतराजाच्या ज्येष्ठ कन्येचें, देवलोक व मनुष्यलोक एतत्संबंधीं चरित्र सविस्तर कथन करा. आपण सविस्तर हकीकत जाणणारे आहां. हे धर्मज्ञ, ही लोकपावनी गंगा कोणत्या कारणामुळें तीन मार्ग व्याप्त करूं लागली? तशीच ही श्रेष्ठ नदी त्रिपथगा म्हणून कशी विख्यात झाली? आणि त्रैलोक्यामध्यें हिचीं कर्में तरी काय काय आहेत?' ककुत्स्थकुलोत्पन्न रामाचें हें भाषण श्रवण करून, तपोधन विश्वामित्र हे ऋषींमध्यें ती सर्व कथा संपूर्णपणें निवेदन करूं लागले.

ते म्हणाले:—"रामा, पूर्वीं महातपस्वी भगवान शंकर विवाह झाल्यानंतर उमा देवीला अवलोकन करून तिच्याशीं समागम करण्यास प्रवृत्त झाले, आणि देवाधिदेव, विचारी व शितिकंठ अशा महादेवाची रतिक्रीडा चालली असतां शंभर दिव्य वर्षें लोटलीं. तथापि हे शत्रुतापना, त्या उमा देवीचे ठिकाणीं पुत्रोत्पत्ति प्रकट झाली नाहीं. तेव्हां ब्रह्मदेवप्रभृति सर्व देव, ह्या संयोगापासून जो प्राणी उत्पन्न होईल त्याला कोण सहन करील, म्हणून उद्विग्न झाले आणि ते सर्वजण शंकराकडे येऊन प्रणामपूर्वक म्हणाले, 'हे

देवाधिदेवा महादेवा, आपण ह्या जगताचें हित करण्याविषयीं तत्पर आहां. प्रणिपात करीत असलेल्या ह्या देवांवर आपण कृपा करा. हे सुरश्रेष्ठ, आपलें तेज धारण करण्यास लोक समर्थ होणार नाहींत. कारण, आपण ब्रह्मतपानें युक्त आहां, आणि उमा देवीसहवर्तमान तप करणारे आहां; म्हणून त्रैलोक्याचें हित करण्याची इच्छा धरून आपण आपलें तेज तेजाच्याच योगानें धारण करा आणि ह्या सर्व लोकांचें रक्षण करा. आपण हें जगत् जनशून्य करूं नका.'

ह्याप्रमाणें देवतांचें भाषण श्रवण केल्यावर 'ठीक आहे' असें म्हणून ते सर्व लोकाधिपति शंकर पुनरपि त्यांना म्हणाले, 'मी तेजाच्या योगानें उमेसहवर्तमान तेज धारण करीन. ह्यास्तव देव आणि पृथ्वी ह्यांना सुख होवो. परंतु हे सुरश्रेष्ठ, स्वस्थानापासून जें हें माझें अनुपम तेज क्षुभित झालें आहे, तें कोण धारण करील, हें आपण मला सांगा.' हें ऐकून देवांनीं त्या वृषभध्वजाला उत्तर दिलें, 'जें तेज क्षुभित झालें आहे, तें आज पृथ्वी धारण करील.' हें ऐकतांच देवाधिपति महाबलाढ्य शंकरानें आपलें तेज सोडिलें. तेव्हां त्या तेजाच्या योगानें पर्वत व वनें ह्यांसहवर्तमान सर्व पृथ्वी व्याप्त झाली. तदनंतर 'हे महातेजस्वी अग्ने, वायूसहवर्तमान तूं ह्या रुद्रसंबंधीं तेजामध्यें प्रविष्ठ हो' म्हणून देवांनीं पुनरपि अग्नीला सांगितलें असतां, अग्नीनें व्याप्त झालेलें तें तेज श्वेतपर्वतरूप बनलें; आणि श्वेतपर्वतरूप बनलेलें तें तेज ज्या प्रदेशामध्यें प्रविष्ठ झालें, त्या प्रदेशांत अग्नि आणि सूर्य ह्यांसारखें तेजस्वी असें एक शरांचें दिव्य वन झालें. त्या ठिकाणीं अग्निसंभव महातेजस्वी असा कार्तिकेय उत्पन्न झाला.

देवांना व पृथ्वीला पार्वतीचा शाप

त्यावेळीं ऋषिगणांसहवर्तमान सर्व देवांचीं मनें अत्यंत सुप्रसन्न झालीं व त्यांनीं उमा आणि शिव ह्यांची अतिशयच प्रशंसा केली. तेव्हां पार्वती देवांशीं रागारागानें बोलली. इतकेंच नव्हे, परंतु क्रोधाच्या योगानें जिचे नेत्र आरक्तवर्ण झाले आहेत, अशा त्या पार्वतीनें सर्व देवांना शाप दिला कीं, 'पुत्रप्राप्तीच्या इच्छेनें मी पतीशीं संगत झालें असतां ज्या अर्थी तुह्मीं मला समागमापासून निवृत्त केलें, त्या अर्थी तुम्हांला आपल्या स्त्रियांचे ठिकाणीं अपत्योत्पत्ति होणार नाहीं. आजपासून तुमच्या स्त्रिया संतानरहित होतील.' ह्याप्रमाणें सर्व देवांना शाप देऊन तिनें पृथ्वीलाहि असा शाप दिला कीं, 'हे पृथ्वी, तुझें एकच

स्वरूप कायम राहणार नाहीं. तूं पुष्कळांची भार्या होशील. हे दुर्मति पृथ्वी, ज्या अर्थी मला पुत्र नसावा अशी तूं इच्छा केलीस, त्या अर्थी माझ्या क्रोधानें कलुषित झालेल्या तुला पुत्रसुख प्राप्त होणार नाहीं. '

ह्याप्रमाणें पार्वतीचा शाप झाल्यामुळें ते सर्व देव दुःखित झालेले अवलोकन करून, देवाधिपति महेश्वर वरुणरक्षित पश्चिम दिशेकडे जाण्याकरितां निघाले. त्या हिमालय पर्वताच्या उत्तर प्रदेशावर जाऊन हिमवत्प्रभव नामक शिखराचे ठिकाणीं देवी पार्वतीसहवर्तमान ते महेश्वर तपश्चर्या करूं लागले. असो. रामा, पार्वतीसंबंधानें ही सविस्तर हकीकत मीं तुला कथन केली. आतां तूं माझ्यापासून गंगेची उत्पत्ति श्रवण कर. "

सर्ग सदतिसावा.

कार्तिकेयाचें जन्मवृत्त

देवाधिदेव शंकर तपश्चर्या करूं लागले असतां अग्निप्रभृति देव इंद्रासहवर्तमान सेनापति प्राप्त होण्याच्या इच्छेनें ब्रह्मदेवाकडे गेले, आणि भगवान ब्रह्मदेवाला प्रणाम करून म्हणाले, ' देवा ज्या भगवानानें पूर्वी आम्हांला बीजरूपानें सेनापति दिला, तो भगवान उत्कृष्ट मौन धारण करून तपश्चर्या करीत आहे. तेव्हां, हे विधानज्ञ, अशा प्रसंगीं जें काय कर्तव्य असेल तें, लोकांचें हित करण्याची इच्छा धरून करा; आपणच आमचा उत्कृष्ट आधार आहां.' ह्याप्रमाणें देवतांचें भाषण श्रवण केल्यावर लोकपितामह ब्रह्मदेव सांत्वन करीत करीत मधुर वाक्यांनीं देवांना म्हणाले, ' स्वपत्नींचे ठिकाणीं तुम्हांला संतान प्राप्त होणार नाहीं, असें जें पर्वतकन्येनें म्हटलें आहे, तें तिचें वचन अमोघ असल्यामुळें सत्य होणारच आहे, ह्यांत संशय नाहीं. असो. ही आकाशगंगा आहे व हिचे ठिकाणीं शत्रूचें दमन करणारा असा देवसेनापति पुत्र अग्नि उत्पन्न करील. पर्वतराजाची ज्येष्ठ कन्या स्वतःच्या अपत्याप्रमाणें त्या पुत्राला मान देईल आणि उमेलाहि तें अगदीं संमत होईल, ह्याविषयीं संशय नाहीं.'

ब्रह्मदेवाचें तें भाषण श्रवण करून देव कृतकृत्य झाले आणि प्रणिपातपूर्वक त्या सर्व देवांनीं ब्रह्मदेवाचें पूजन केलें. नंतर धातूंनीं भूषित अशा सर्वोत्कृष्ट कैलास पर्वतावर जाऊन पुत्रोत्पत्तीकरितां त्या सर्व देवतांनीं अग्नीची

प्रार्थना केली कीं, 'हे देवकार्य आहे, ह्यास्तव हे महातेजस्वी हुताशना, पर्वतकन्यका जी गंगा, तिचे ठिकाणीं तूं शंकराचें तेज नेऊन ठेव.' नंतर सांगितलेलें कार्य करण्याविषयीं देवांना वचन देऊन अग्नि गंगेसमीप आला आणि म्हणाला, 'हे देवी, तूं गर्भ धारण कर. हें देवतांना प्रिय आहे.' अग्नीचें भाषण श्रवण करून गंगेनें दिव्य रूप धारण केलें. तेव्हां तिचें तें सौंदर्यवैभव अवलोकन केल्याबरोबर तो पारदरूप शिवतेजोराशी आसमंताद्भागीं उचंबळून पडला. तेव्हां अग्नीनें चोहोंकडून गंगा देवीला शिववीर्यरूप पारदानें अभिषेक केला. गंगेच्या आसमंताद्भागीं अग्नीनें तो पारद ठेविला असतां, गंगेचे सर्व ओघ त्यानें भरून गेले. नंतर त्या सर्वदेवाग्रणी अग्नीला गंगा म्हणाली, 'हे देवा, तूं ठेविलेलें हें अत्यंत उग्र तेज धारण करण्यास मी समर्थ नाहीं. त्या तेजोरूप अग्नीच्या योगानें माझ्या शरिराचा अगदीं भडका होत असल्यामुळें मला फारच मूर्च्छा येऊं लागली आहे. ह्यावर सर्व देवांच्या उद्देशानें हवन केलेल्या द्रव्याचें भक्षण करणारा अग्नि गंगेला म्हणाला, 'ह्या हिमालयाच्या पार्श्वभागीं हा गर्भ ठेव.' त्याचें हें भाषण श्रवण करून तो अत्यंत उज्ज्वल गर्भ त्या महातेजस्वी गंगेनें आपल्या प्रवाहापासून हिमालयावर नेऊन ठेविला. गंगेपासून निघालेलें तें तेज तापलेल्या सुवर्णासारखें होतें, आणि म्हणून ज्या भूप्रदेशावर तें ठेविलें गेलें, तो भूप्रदेश अतुल कांतीनें युक्त असें सुवर्ण बनला. त्या तेजाच्या तीक्ष्णपणामुळें पलीकडे असलेला कांहीं भूप्रदेश ताम्र व लोह बनून राहिला. त्या गर्भाचा मल कथिल व शिसें बनला. ह्याप्रमाणें भूमीवर प्राप्त झालेलें तें तेज अनेक धातूंच्या रूपानें वृद्धिंगत झालें. गर्भ हिमालयावर ठेवितांक्षणीं त्याच्या तेजाच्या योगानें रंजित झालेलें तें पर्वतसंबंधीं वन सर्व सुवर्णाचें झालें. हे पुरुषश्रेष्ठा राघवा, तेव्हांपासून अग्नीसारखें तेजोरूप असलेलें सुवर्ण जातरूप म्हणून प्रख्यात झालें. तदनंतर रुद्रतेजापासून उत्पन्न झालेल्या त्या कुमाराला दुग्धपान मिळावें एतदर्थ मरुद्गण व इंद्र ह्यांसहवर्तमान सर्व देवांनीं कृत्तिकांची योजना केली. तेव्हां 'हा आमचा सर्वांचा पुत्र होईल' असा उत्कृष्ठ ठराव करून व त्याप्रमाणें आपल्या मनाचा निश्चय करून त्या कृत्तिकांनीं तो कुमार उत्पन्न होतांक्षणीं त्याला दुग्धपान दिलें. तदनंतर 'हा तुमचा पुत्र कार्तिकेय म्हणून त्रैलोक्यामध्यें विख्यात होईल, ह्यांत संशय नाहीं' म्हणून सर्व देवता त्यांना म्हणाल्या. शिवपार्वतीपासून प्रथम स्कन्न म्हणजे च्युत झालेल्या आणि गंगेच्या गर्भापासून स्राव झाल्यावर पराकाष्ठेच्या कांतीनें

अग्नीप्रमाणें देदीप्यमान असलेल्या त्या गर्भाला कृत्तिकांनीं त्या देवतांचें भाषण श्रवण केल्यावर स्नान घातलें. हे ककुत्स्थकुलोत्पन्न रामा, कार्तिकेय प्रथमतः स्कन्न म्हणजे शिवपार्वतीच्या शरिरापासून च्युत होऊन गंगेच्या गर्भांतून स्राव झाल्यानंतर जन्मास आला असल्यामुळें (सावयव झाला असल्यामुळें) देवांनीं स्कंद असें त्याचें नांव ठेविलें. असो. नंतर कृत्तिकांचे ठिकाणीं उत्कृष्ठ दुग्धाचा प्रादुर्भाव झाला असतां सहा मुखांनीं युक्त होऊन त्या कुमारानें त्या सहाहि कृत्तिकांचें स्तनपान केलें. एक दिवस स्तनपान केल्यावर सुकुमार शरिरानें युक्त असलेल्या त्या समर्थ कार्तिकेयानें स्वतःच्या वीर्याच्या योगानें दैत्यसेनासमुदाय जिंकून टाकिले. तेव्हां अग्निप्रभृति सर्व देवांनीं एकत्र जुळून त्या महातेजस्वी कार्तिकेयाला देवसेनापति ह्या नात्यानें अभिषेक केला. असो. रामा, धनदायक व पुण्यकारक असा कुमारजन्म आणि गंगेसंबंधीं साविस्तर वृत्त हें मीं तुला कथन केलें. हे ककुत्स्थकुलोत्पन्ना, ह्या भूतलावर जो मानव कार्तिकेयाविषयीं भक्ति धारण करितो, तो चिरायु होऊन पुत्रपौत्रांसहवर्तमान स्कंदलोकीं जातो. ”

सर्ग अडतिसावा.

सगर राजाचें वृत्त.

ह्याप्रमाणें ती कथा कुशिकवंशज विश्वामित्रांनीं मधुर शब्दांनीं रामाला कथन केल्यावर ते पुनरपि त्या ककुत्स्थकुलोत्पन्न रामाला म्हणाले, “हे वीरा, सगर म्हणून पूर्वीं एक अयोध्याधिपति धर्मात्मा राजा होऊन गेला. तो संतानरहित असल्यामुळें संतानप्राप्तीविषयीं उत्सुक होता. विदर्भराजाची केशिनी म्हणून एक कन्या होती. ती धर्मिष्ठ व सत्यवचनी असून सगराची ज्येष्ठ पत्नी होय. अरिष्टनेमीची कन्या आणि सुपर्णाची भागिनी सुमति म्हणून सगराची दुसरी पत्नी होती. त्या पत्नीसहवर्तमान हिमालयासन्निध भृगुप्रस्रवण पर्वतावर त्या महाराजानें तपश्चर्या केली. नंतर शंभर वर्षें पूर्ण झाल्यावर त्या तपश्चर्येच्या योगानें भृगु मुनि संतुष्ट झाले. सत्य भाषण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ असलेल्या भृगु महर्षींनीं सगराला असा वर दिला कीं, ‘ हे निष्पापा, तुला मोठा अपत्यलाभ होईल, आणि हे पुरुषश्रेष्ठा, लोकांमध्यें तुझी अप्रतिम कीर्ति होईल. बा सगरा, तुझ्या एका पत्नीला वंश चालविणारा पुत्र होईल आणि दुसऱ्या पत्नीचे ठिकाणीं

साठ हजार पुत्र उत्पन्न होतील.' ह्याप्रमाणें ते पुरुषश्रेष्ठ भृगु महर्षि सांगूं लागले असतां, त्यांना प्रसन्न करून घेऊन स्वतः अत्यंत संतुष्ट झालेल्या राजकन्यांनीं हात जोडून विचारिलें, 'हे ब्रह्मन्, एक पुत्र कोणाला होईल आणि पुष्कळ कोणाला होतील, हें ऐकण्याची आमची इच्छा आहे. हे ब्रह्मन्, आपलें भाषण सत्य होवो.' त्यांचें हें भाषण श्रवण करून अत्यंत धार्मिक भृगु उत्कृष्ठ वाणीनें त्यांना म्हणाले, 'ह्या विषयीं तुमची इच्छा काय आहे, ती कळूं द्या. सारांश, वंश चालविणारा पुत्र पाहिजे असल्यास एकच होईल आणि कीर्तिमान, मोठे उत्साही व महाबलाढ्य असे पुष्कळ पुत्रहि होतील. तेव्हां कोणता वर कोणाला पाहिजे, तें समजूं द्या.'

विश्वामित्र सांगतातः—"रामा, मुनींचें तें भाषण ऐकून केशिनीनें वंश चालविणारा असा एकच पुत्र राजाचे सन्निध मागून घेतला. आणि सुपर्णभगिनी सुमतीनें मोठे उत्साही व कीर्तिमान असे साठ हजार पुत्र मागून घेतले. नंतर हे रघुनंदना, त्या मुनींना प्रदक्षिणा करून व मस्तकानें प्रणाम करून तो सगर राजा त्या भार्यांसहवर्तमान आपल्या नगरला परत गेला. पुढें कांहीं काल लोटल्यावर ज्येष्ठ पत्नी जी केशिनी, तिला राजापासून असमंज म्हणून पुत्र झाला. हे पुरुषश्रेष्ठा रामा, सुमतीला एक गर्भतुंब झाला; व तो तुंब फुटून त्यांतून साठ हजार पुत्र बाहेर निघाले. घृतानें भरलेल्या कुंभाचे ठिकाणीं दायांनीं ते वाढविले व पुष्कळ काल लोटल्यावर ते सर्व यौवनावस्थेमध्यें आले. असो. ह्याप्रमाणें उत्पत्तीनंतर पुष्कळ काळ लोटल्यावर रूप व यौवन ह्यांनीं ते सगराचे साठ हजार पुत्र युक्त झाले. हे रघुनंदना, सगराचा तो पुरुषश्रेष्ठ ज्येष्ठ पुत्र असमंज त्या बालकांना घेऊन जाऊन सरयू नदीच्या उदकांत नेहमीं टाकीत असे, आणि ते गटंगळ्या खाऊं लागले असतां त्यांजकडे पाहून हंसत असे, ह्याप्रमाणें सज्जनांना पीडा देणारा तो दुराचारी पुत्र नगरवासी जनांचें अहित करण्याविषयीं तत्पर राहूं लागला असतां पित्यानें त्याला नगरांतून घालवून दिलें. त्या असमंजाचा अंशुमान् म्हणून एक वीर्यवान पुत्र होता. तो सर्व लोकांना संमत असून सर्वांना प्रिय असेंच भाषण करणारा होता. असो. तदनंतर बराच काल लोटल्यावर, 'आपण अश्वमेध नामक याग करावा' असा दृढ विचार सगराच्या मनामध्यें आला आणि यज्ञानुष्ठानाविषयीं उपाध्यायगणांसहवर्तमान निश्चय करून तो वेदवेत्ता राजा यज्ञाच्या उपक्रमाला लागला."

सर्ग एकुणचाळिसावा.

सगराच्या यज्ञाचें वृत्त.

ह्याप्रमाणें विश्वामित्र मुनींचें भाषण श्रवण केल्यावर, कथा चालतां चालतां अत्यंत संतुष्ट झालेला रघुनंदन राम अग्नीप्रमाणें देदीप्यमान असलेल्या विश्वामित्र मुनींना म्हणाला, 'ब्रह्मन्, माझ्या पूर्वजानें कसा यज्ञ केला, ती कथा सविस्तर श्रवण करण्याची माझी इच्छा आहे.'

ह्याप्रमाणें रामाचें म्हणणें ऐकून घेऊन सांगण्याविषयीं उत्सुक झालेले विश्वामित्र मुनि हंसत हंसत ककुत्स्थकुलोत्पन्न रामाला म्हणाले, "रामा, महात्म्या सगराच्या यज्ञाविषयीं सविस्तर वर्तमान तूं श्रवण कर. हिमवान ह्या नांवानें प्रसिद्ध असलेला शंकराचा श्वशुर आणि विंध्य पर्वत हे उंचीमध्यें जवळजवळ एकमेकांची बरोबरी करणारे असून, दोहोंमध्यें मोठासा पर्वत नसल्यामुळें ते एकमेकांकडे जसे कांहीं पहात असतात. रामा, त्या पर्वतांमध्यें तो यज्ञ झाला. कारण, तो प्रदेश यज्ञकर्माला प्रशस्त आहे. असो. महाधनुर्धारी व महारथी असा सगराच्या मतानें वागणारा (त्याचा नातू) अंशुमान हा त्या यज्ञसंबंधीं अश्वाचें रक्षण करीत होता. ह्याप्रमाणें सगराचा तो यज्ञ चालला असतां पर्वदिवशीं इंद्रानें राक्षसरूप धारण करून त्या अश्वाचा अपहार केला. तेव्हां रामा, ते सर्व महात्मे उपाध्यायगण यजमानाला म्हणाले, 'पर्वसमयींच ह्या यज्ञसंबंधीं अश्वाचा सत्वर अपहार होत आहे. ह्यास्तव हे ककुत्स्थकुलोत्पन्ना सगरा, ह्या अपहार करणाऱ्यांचा वध करून तूं आपला अश्व परत आण. कारण यज्ञामध्यें आम्हां सर्वांच्या अकल्याणाला कारणीभूत होणारें असें हें विघ्न होत आहे. ह्यास्तव राजा, यज्ञ निर्विघ्नपणें पार पडेल अशी तजवीज कर.' ह्याप्रमाणें उपाध्यायांचें भाषण श्रवण केल्यावर सगर राजा आपल्या साठ हजार पुत्रांना म्हणाला, 'हे पुरुषश्रेष्ठ पुत्रहो, राक्षसांच्या मायेनें जर हें विघ्न प्राप्त होईल, तर मंत्रपूत अशा मोठमोठ्या ऋत्विजांनीं हा महाक्रतु युक्त असतांनाहि आपली धडगत होईल, असें मला वाटत नाहीं. तस्मात् तुम्ही जा आणि अश्व शोधून आणा. एकेकजण एकेक योजनपर्यंत लांब जा आणि अशा रीतीनें ही सर्व पृथ्वी हुडकून काढा. इतकेंच नव्हे, परंतु भूमीवर जर अश्व उपलब्ध न होईल, तर माझ्या आज्ञेनें तुम्ही अश्व दृष्टीस पडेपर्यंत पृथ्वी खणून काढा. यज्ञदीक्षा घेतलेला असा मी पौत्र,

आणि उपाध्यायगण ह्यांसहवर्तमान, अश्व दृष्टीस पडेपर्यंत येथेंच थांबून राहीन. तुमचें कल्याण असो.'

पृथ्वीखनन.

ह्याप्रमाणें पित्याची आज्ञा झाल्यावर त्या महाबलाढ्य राजपुत्रांच्या मनाला उल्हास झाला; आणि पित्याच्या आज्ञेनें बद्ध झालेले ते राजपुत्र भूतलावर गेले. एकएक योजन लांबपर्यंत एकएकजण भूतलाचे ठिकाणीं हिंडल्यावर ते पुरुषश्रेष्ठ, स्पर्शाविषयीं वज्रासमान असलेल्या आपल्या बाहूंच्या योगानें आणि अत्यंत भयंकर नांगर व वज्रप्राय शूल ह्यांच्या योगानें पृथ्वी खणूं लागले असतां राक्षस, नाग, असुर इत्यादि प्राण्यांचा वध होऊं लागल्यामुळें ते भयंकर गर्जना करूं लागले. साठ हजार योजनेपर्यंत त्यांनीं अनुपम रसातल खणून काढिलें. ह्याप्रमाणें खणतां खणतां, पर्वतांनीं गजबजलेल्या जंबुद्वीपाभोंवतीं सर्व बाजूंनीं ते राजपुत्र हिंडूं लागले. तेव्हां गंधर्व, असुर व पन्नग ह्यांसहवर्तमान सर्व देव मनामध्यें अगदीं घाबरून जाऊन ब्रह्मदेवाकडे गेले आणि त्या महात्म्या ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतल्यावर पराकाष्ठेचे त्रस्त व खिन्न वदन झालेले ते देव त्याला म्हणाले, 'भगवन्, सगराचे पुत्र सर्व पृथ्वी खणून काढीत आहेत, आणि पुष्कळ महात्म्यांचा व जलचर प्राण्यांचा ते वध करीत आहेत. सारांश, हाच यज्ञविघातक आहे व ह्यानेंच आमचा अश्व नेला आहे असें समजून ते सगरपुत्र सर्व प्राण्यांची हिंसा करीत आहेत."

सर्ग चाळिसावा.

सगरपुत्रांचा नाश.

"ह्याप्रमाणें देवतांचें भाषण श्रवण केल्यावर अत्यंत त्रस्त व कालसामर्थ्यानें मोहित झालेल्या त्या देवांना भगवान ब्रह्मदेव म्हणाले, 'ज्या विवेकी वासुदेवाची ही संपूर्ण पृथ्वी आहे म्हणजे ज्या माधवाची ही भार्या आहे, तोच आमचा प्रभु भगवान कपिलरूपाचें अवलंबन करून सर्वदा पृथ्वी धारण करीत आहे. तेव्हां त्याच्या क्रोधाग्नीनें ते राजपुत्र दग्ध होऊन जातील. कारण, पृथ्वीचा भेद आणि सगराच्या पुत्रांचा नाश हीं प्रत्येक कल्पामध्यें अवश्य ठरलेलींच आहेत, म्हणून अतींद्रियवेत्त्यांना समजून चुकलेलेंच आहे.'

ह्याप्रमाणें ब्रह्मदेवाचें भाषण श्रवण केल्यावर शत्रुदमन करणारे तेहतीस कोटी देव पराकाष्ठेचे आनंदित झाले आणि आपल्या वाटेनें परत गेले. असो. सगराच्या पुत्रांमुळें पृथ्वीचा भेद होऊं लागला असतां निर्घात ध्वनीसारखा मोठा ध्वनि होऊं लागला. तदनंतर सर्व पृथ्वी भेदून आणि तिला प्रदक्षिणा करून परत आल्यावर ते सर्व सगरपुत्र एकत्र जुळून आपल्या पित्याला म्हणाले, 'आम्हीं सर्व पृथ्वी धुंडिली आणि बलाढ्य असे देव, दानव, राक्षस, पिशाच्च, उरग व पन्नग ह्यांचाहि नाश केला; परंतु आपला अश्व अथवा त्या अश्वाला नेणारा आमच्या कोठें आढळांत आला नाहीं. आतां आम्हीं काय करावें, ह्याविषयीं आपण कांहीं तरी उपाय मनांत आणा.'

पुत्रांचें हें भाषण ऐकून, तो नृपश्रेष्ठ सगर क्रोधयुक्त होऊन म्हणाला, 'तुमचें कल्याण असो. तुम्ही पुनरपि खणा आणि भूतलाचा भेद करून व अश्वाचा अपहार करणाऱ्याला गांठून कार्य झाल्यावर परत या.' पित्याची ही आज्ञा मान्य करून ते साठ हजार पुत्र रसातलावर धांवले, आणि तें रसातल खणूं लागल्यावर उग्र नेत्रांनीं युक्त असा एक पर्वतप्राय दिग्गज महीतल धारण करीत असलेला त्यांनीं पाहिला. रामा, आळस जाऊन श्रमपरिहार होण्याकरितां ज्या वेळीं तो महागज मस्तक हालवीत असतो, त्या वेळीं भूकंप होत असतो. त्या दिक्पाल महाराजाचा मान राखण्याकरितां त्यांनीं त्याला प्रदक्षिणा केली आणि नंतर ते रसातलाचा भेद करून आंत गेले. ह्याप्रमाणें पूर्व दिशेस पृथ्वी भेदून दक्षिण दिशा भेदिली असतां दक्षिण दिशेसहि त्यांनीं एक महागज अवलोकन केला. त्या महात्म्या महापद्म नामक गजाचें शरीर प्रचंड पर्वतासारखें असून तो मस्तकानें पृथ्वी धारण करीत होता. तेव्हां त्याला अवलोकन केल्यावर त्या सगरपुत्रांना फारच विस्मय झाला. असो. महात्म्या सगराचे ते साठ हजार पुत्र त्याला प्रदक्षिणा करून पश्चिम दिशेस भेद करूं लागले. नंतर पश्चिम दिशेसहि पर्वतप्राय असा एक सौमन नामक दिक्पाल महागज त्या महात्म्या महाबलाढ्य सगरपुत्रांनीं अवलोकन केला. त्यांनीं प्रदक्षिणापूर्वक त्याला 'बरें आहे ना' म्हणून विचारिलें; आणि उत्तर दिशा खणण्याकरितां ते चालले. नंतर उत्तर दिशेसहि स्वतः बर्फासारखा शुभ्रवर्ण असलेला

---

* वायुना निहतो वायुर्गगनाच्च पतत्यधः । प्रचंडघोरनिर्घोषो निर्घात इति कथ्यते ॥ वाऱ्यावर वारा आपटून आकाशांतून खालीं आला असतां जो प्रचंड व भयंकर नाद होतो त्याला 'निर्घात' असें म्हणतात.

भद्र नामक गज कल्याणकारक शरिरानें युक्त असूनहि पृथ्वी धारण करीत असलेला त्यांनीं पाहिला. तेव्हां सर्वांनीं त्याला स्पर्श करून प्रदक्षिणा घातली, आणि नंतर ते साठ हजार सगरपुत्र पृथ्वीचा भेद करूं लागले. तदनंतर ते सगरपुत्र प्रसिद्ध ईशान्य दिशेस गेले, आणि सर्वहि रागारागानें पृथ्वी खणूं लागले. तेव्हां भयंकर वेग व प्रचंड बल धारण करणाऱ्या त्या महात्म्या सगरपुत्रांनीं कपिलरूप धारण करून बसलेल्या सनातन वासुदेवाला अवलोकन केलें. नंतर त्या देवाच्या समीपच चरत असलेला अश्व दृष्टीस पडतांक्षणीं त्यांना पराकाष्ठेचा आनंद झाला. तदनंतर तो कपिलच यज्ञविघात करणारा आहे, असें समजून कुदळी, नांगर आणि अनेक प्रकारचे वृक्ष व पाषाण धारण करणारे ते सगरपुत्र क्रुद्ध झाले आणि 'थांब थांब' असें म्हणून त्याच्या अंगावर धांवले. 'आमचा यज्ञीय अश्व तूंच हरण केला आहेस, परंतु हे दुर्बुद्धे, आम्ही हे सगरपुत्र येथें आलों आहों, हें तूं समजून ठेव.' असें त्याला पुनरपि म्हणाले. रामा, हें त्यांचें भाषण श्रवण करून तो कपिल फारच क्रुद्ध झाला व त्यानें रागारागानें नुसतें 'हुं:' केलें! त्याबरोबर त्या महात्म्या अतर्क्य कपिलानें ते सर्वहि सगरपुत्र भस्मराशी बनवून सोडिले."

सर्ग एकेचाळिसावा.

अश्वप्राप्ति.

विश्वामित्र सांगतात:—"रामा, पुत्रांना जाऊन फार दिवस झाले असें समजून आल्यावर सगर राजा स्वतःच्या तेजानें देदिप्यमान असलेल्या आपल्या नातवाला म्हणाला, 'तूं शूर व विद्वान असून तेजानें आपल्या पूर्वजांची बरोबरी करणारा आहेस. तेव्हां पितरांचा आणि अश्व नेणाऱ्याचा तूं शोध लाव. पृथ्वीमध्यें असणारे प्राणी मोठे व वीर्यवान असतात. तस्मात् त्यांचा घात करण्याकरितां तूं खड्गासहवर्तमान धनुष्य घे, वंद्य असतील त्यांना अभिवंदन कर, विघ्न करणाऱ्यांचा वध कर आणि माझा यज्ञ शेवटास नेण्याला समर्थ असलेला असा तूं कार्य करून परत ये.'

ह्याप्रमाणें महात्म्या सगरानें उत्तम प्रकारानें अंशुमानाला सांगितलें असतां धनुष्य व खड्ग घेऊन तो सत्वर चालता झाला, आणि पितरांनीं भूमीमध्यें

म्हणून ठेविलेल्या मार्गापाशीं आला असतां त्या महातेजस्वी अंशुमानानें देव, दानव, राक्षस, पिशाच, पक्षी व उरग ज्याची पूजा करीत आहेत असा दिग्गज अवलोकन केला. तेव्हां त्याला प्रदक्षिणा करून कुशल प्रश्न केल्यावर पितर व अश्व नेणारा ह्यांविषयीं त्यानें त्या दिग्गजाला विचारिलें असतां तो महाविचारी दिग्गज म्हणाला, 'हे असमंजस पुत्रा, तुझी कार्यसिद्धि होऊन तूं अश्वासह सत्वर परत येशील.' ह्याप्रमाणें त्याचें भाषण श्रवण केल्यावर सर्वहि दिग्गजांना त्यानें क्रमाक्रमानें हाच प्रश्न केला असतां भाषणतत्त्वज्ञ व योग्य भाषण करण्यास समर्थ अशा सर्वहि गजांनीं त्याचा मान राखिला, आणि 'अश्वासहवर्तमान तूं सत्वर परत येशील' म्हणून त्याला सांगितलें. तेव्हां त्यांचें तें भाषण श्रवण केल्यावर, ज्या ठिकाणीं त्याचे पितर कपिलांनीं भस्मराशी करून टाकिले होते, त्या ठिकाणीं तो शीघ्रगति अंशुमान आला आणि पितरांचा वध झाल्याचें समजून आल्यामुळें पराकाष्ठेचा व्याकुळ व अत्यंत दुःखित झालेला तो असमंजस पुत्र अगदीं दुःखाधीन होऊन शोक करूं लागला. तों इतक्यांत समीपच तो यज्ञीय अश्व संचार करीत आहे असें दुःख व शोक ह्यांनीं व्याप्त झालेल्या त्या पुरुषश्रेष्ठ अंशुमानाच्या दृष्टीस पडलें. नंतर त्या राजपुत्रांच्या उदकक्रिया करण्याची त्याला इच्छा झाली. परंतु तो महातेजस्वी अंशुमान उदकाची इच्छा करीत असतांना त्याला कोठें जलाशय दिसेना. तेव्हां दूरचा पदार्थ अवलोकन करण्यास समर्थ अशी आपली दृष्टि त्यानें चोहोंकडे फेंकिली असतां, वेगानें वायुतुल्य असलेला पित्यांचा मातुल गरुड त्यानें अवलोकन केला.

अंशुमानाला गरुडाचा उपदेश.

नंतर तो महाबलाढ्य गरुड अंशुमानाला म्हणाला, 'हे पुरुषश्रेष्ठा, तूं शोक करूं नको. हा तुझ्या पितरांचा वध लोकांच्या हिताला कारणीभूत होणारा आहे. अचिंत्य शक्तिमान कपिलानें ह्या महाबलाढ्य सगरपुत्रांना दग्ध केलें आहे. ह्यास्तव हे प्राज्ञ, तूं ह्यांना सामान्य उदक देऊं नको. हे पुरुषश्रेष्ठा, हिमालयाची ज्येष्ठ कन्या जी गंगा तिचे ठिकाणीं तूं पितरांची उदकक्रिया कर. ती लोकपावनी गंगा भस्मराशी करून टाकिलेल्या ह्या सगरपुत्रांना पावन करील. ह्यास्तव हे महाभाग्यवंता, तूं चालता हो. हे वीरा, हा अश्व घे आणि आपल्या आजाचा अश्वमेध याग तूं शेवटास ने.'

हें गरुडाचें भाषण श्रवण केल्यावर तो महावीर्यवान व महातपस्वी अंशुमान

अश्व घेऊन सत्वर परत गेला. घरीं गेल्यानंतर यज्ञदीक्षा घेतलेल्या राजाजवळ जाऊन त्यानें तें झालेलें वर्तमान व गरुडाचें म्हणणें त्याला निवेदन केलें. अंशुमानापासून ती भयंकर वार्ता श्रवण केल्यावर सगर राजानें सूत्राला अनुसरून तो याग यथाविधि शेवटास नेला. असो. यज्ञ आटोपल्यावर तो वैभवशाली भूपति आपल्या नगराला आला; परंतु पुत्राच्या उद्धाराला कारणीभूत होणारी गंगा येण्याला खात्रीचा उपाय कोणता, ह्याविषयीं त्याची अटकळ झाली नाहीं; आणि अशा प्रकारें बराच काळ लोटल्यावर म्हणजे तीस हजार वर्षें राज्य केल्यावर तो सगर महात्मा राजा स्वर्गास गेला."

सर्ग बेचाळिसावा.

गंगाप्राप्त्यर्थ तपश्चर्या.

विश्वामित्र म्हणतातः—"हे रघुवंशजश्रेष्ठा रामा, सगर मरण पावल्यावर अमात्यवर्ग अत्यंत धार्मिक अंशुमानाला राजा समजूं लागले. तो अंशुमान राजा फारच थोर होता व त्यालाहि दिलीप म्हणून प्रसिद्ध असलेला मोठा पुत्र झाला. हे रघुनंदना, त्या दिलीपाला राज्य देऊन तो अंशुमान हिमालय पर्वताच्या रम्य शिखरावर दारुण तपश्चर्या करूं लागला. ह्याप्रमाणें तपश्चर्या चालली असतांना बत्तीस हजार वर्षे लोटल्यावर तपोधन व तपोवनस्थ असा तो फारच मोठा कीर्तिमान राजा स्वर्गास गेला.

असो. पितामहांचा वध झाल्याचें ऐकल्यावर दिलीप राजाचें मन दुःखाकुळ झालें व ह्यामुळें अमुकच उपाय केला असतां गंगा येईल ह्याचा त्याला निश्चय होईना. तेव्हां गंगेचें खालीं आगमन कसें होईल? त्या पितामहांची उदकक्रिया गंगोदकानें कशी होईल? आणि आपल्या हातून त्यांचा उद्धार कसा होईल ह्यांविषयीं तो चिंताग्रस्त झाला. पुढें धर्मानें प्रसिद्धीस आलेला तो राजा तसाच चिंताग्रस्त असतांना त्याला भगीरथ म्हणून एक अत्यंत धार्मिक पुत्र झाला. महातेजस्वी दिलीप राजानें पुष्कळ यज्ञ केले आणि तीस हजार वर्षेंपर्यंत त्यानें राज्य केलें. परंतु पितामहांचा उद्धार करण्याला गंगेला आणण्याविषयीं खात्रीचा उपाय इतक्या कालामध्येंहि त्याला सुचला नाहीं. तेव्हां तशाच स्थितींत शेवटीं तो व्याधीच्या योगानें मरण पावला.

सारांश, भगीरथ नामक पुत्राला राज्यावर बसवून तो पुरुषश्रेष्ठ दिलीप राजा स्वतः केलेल्याच कर्माच्या योगानें इंद्रलोकीं गेला.

पुढें संतानाची इच्छा करणाऱ्या त्या निपुत्रिक व धर्मनिष्ठ महाराज भगीरथ राजर्षीनें आपली प्रजा व राज्य हीं मंत्र्यांचे स्वाधीन केलीं व गंगेला आणण्याविषयीं उत्सुक होऊन, त्या राजर्षीनें गोकर्णामध्यें दीर्घ तपश्चर्येला आरंभ केला. पंचाग्निसाधन करून एक महिन्यानें आहार करणारा तो जितेंद्रिय भगीरथ वर हात करून तपश्चर्या करूं लागला. त्या महात्म्या राजाची तशा प्रकारची घोर तपश्चर्या चालली असतां हजारों वर्षें लोटलीं. तेव्हां प्रजाधिपति व समर्थ असे भगवान ब्रह्मदेव फारच संतुष्ट झाले; आणि देवगणांसहवर्तमान सन्निध येऊन तप करीत असलेल्या त्या महात्म्या भगीरथाला म्हणाले, 'हे प्रजाधिपते भगीरथ महाराजा, उत्कृष्ठ प्रकारें आचरिलेल्या तपाच्या योगानें मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें. हे सदाचरणसंपन्न नृपश्रेष्ठा, तुला अपेक्षित असेल तो वर तूं मागून घे.'

ब्रह्मदेवाचें हें भाषण ऐकून महातेजस्वी व महापराक्रमी भगीरथ हात जोडून उभा राहिला आणि त्या सर्व लोकांच्या पूर्वजाला म्हणाला, 'भगवान जर माझ्यावर प्रसन्न झाले असतील, आणि माझ्या तपाचें जर कांहीं फल मला प्राप्त व्हावयाचें असेल, तर सर्व सगरपुत्रांची माझे हातून उदकक्रिया व्हावी. ह्या महात्म्यांचें भस्म गंगोदकामध्यें भिजलें म्हणजे ह्या सर्व प्रपितामहांना अक्षय्य स्वर्गप्राप्ति होईल. देवा, आमचें कुल उच्छिन्न होऊं नये एतदर्थ मी संतानाची याचना करीत आहें. करितां हे देवा, इक्ष्वाकुवंशराजांच्या कुलामध्यें उत्पन्न झालेल्या मला हा दुसरा एक वर आपणांपासून प्राप्त व्हावा.'

ह्याप्रमाणें राजा बोलला असतां मधुर शब्द व मधुर स्वर ह्यांनीं युक्त असलेल्या शुभ वाणीचें अवलंबन करून सर्वलोकपूर्वज ब्रह्मदेव म्हणाले, 'हे महारथी, ही तुझी इच्छा मोठी आहे. हे इक्ष्वाकुकुलवर्धना, तुझ्या म्हणण्याप्रमाणें होईल. राजा, हिमालय पर्वताची ज्येष्ठ कन्या ही जी हैमवती गंगा, तिला धारण करण्याकरितां शंकराची योजना केली पाहिजे. कारण राजा, पृथ्वीला गंगापात सहन होणार नाहीं आणि ह्या गंगेला धारण करणारा शूलपाणी शंकरावांचून मला तर दुसरा कोणी दिसत नाहीं.' ह्याप्रमाणें त्या भगीरथ राजाला सांगून व गंगेलाहि त्याच्यावर योग्य कालीं अनुग्रह करण्यास सांगून ब्रह्मदेव मरुद्गणांसह सर्व देवांबरोबर स्वर्गाला गेले."

सर्ग त्रेचाळिसावा.

गंगावतरण.

विश्वामित्र म्हणतात:—" रामा, देवाधिदेव ब्रह्मदेव गेल्यानंतर केवल एका अंगुष्ठाग्रावर उभें राहून भगीरथानें एक वर्षभर तपश्चर्या केली. तेव्हां संवत्सर पूर्ण झाल्यावर सर्वलोकवंदित उमाकांत पशुपति राजाला म्हणाले, 'हे पुरुषश्रेष्ठा, मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें. तुझा मनोरथ मी सिद्धीस नेईन. सारांश, मी पर्वतकन्या गंगा मस्तकीं धारण करीन.'

ह्याप्रमाणें शंकरांनीं सांगितल्यावर ती हिमालयाची ज्येष्ठ कन्या सर्वलोकवंदित गंगा फारच मोठें रूप व दुःसह वेग धारण करून कल्याणरूप अशा शिवमस्तकावर पडली, आणि धारण करण्यास फारच कठीण असलेली ती गंगा, 'प्रवाहानें मी शंकराला ओढून नेऊन पातालामध्यें प्रवेश करीन' असें मनामध्यें आणूं लागली असतां, तिला गर्व झाल्याचें जाणून भगवान शंकर क्रुद्ध झाले; आणि तिला अदृश्य करून टाकण्याचें त्या त्र्यंबकांनीं मनांत आणिलें.

विश्वामित्र पुढें सांगतात:—" रामा, जटामंडलांमुळें आंत शिरण्यास कठीण असलेल्या आणि आकारानें हिमालय पर्वताप्रमाणें असलेल्या त्या पवित्र शिवमस्तकावर ती गंगा पडली असतां, यत्न करूनहि तिला बाहेर पृथ्वीवर येण्यास मार्ग सांपडला नाहीं. ह्याप्रमाणें बाहेर पडण्यास मार्गच जेव्हां सांपडेना, तेव्हां ती गंगा देवी पुष्कळ संवत्सरसमुदाय लोटेपर्यंत त्या जटामंडलांतच भटकत होती. पुढें उत्कृष्ठ तपश्चर्या करणाऱ्या भगीरथानें तिला त्या ठिकाणीं अवलोकन केलें; आणि त्यानें तपाच्या योगानें शंकराला अत्यंत संतुष्ट केलें असतां, शंकरांनीं ती गंगा बिंदुसरोवरामध्यें सोडिली. तेव्हां सोडतां सोडतां तिचे सात प्रवाह झाले. पैकीं ल्हादिनी, पावनी व नलिनी अशा तीन पवित्र उदकानें युक्त असलेल्या शुभ गंगा पूर्व दिशेला गेल्या. सुचक्षु, सीता व महानदी सिंधु ह्या तीन शुभ गंगा पश्चिम दिशेला गेल्या; व त्यांपैकीं सातवी महाभाग्यवान राजर्षि धर्मात्म्या भगीरथाच्या रथाचे मागोमाग गेली. सारांश, महातेजस्वी भगीरथ राजर्षि दिव्य रथावर आरूढ होऊन पुढें जाऊं लागला असतां गंगाहि त्याच्या मागोमाग जाऊं लागली. प्रथमतः आकाशापासून ती

गंगा शिवमस्तकीं पडली, तेथून पृथ्वीवर आली आणि नंतर प्रचंड ध्वनीनें युक्त असें तें गंगोदक भगीरथाच्या मागोमाग जाऊं लागलें. गंगेबरोबर पृथ्वीवर पडणाऱ्या व पडलेल्या शिशुमारसंज्ञक जलचरसमुदायांनीं आणि मत्स्य व कच्छ यांच्या समुदायांनीं पृथ्वी सुशोभित दिसूं लागली. तेव्हां देव, ऋषि व गंधर्व आणि यक्ष व सिद्ध यांचे गण काय आहे म्हणून पाहूं लागले असतां आकाशांतून पृथ्वीवर आलेली गंगा त्यांच्या दृष्टीस पडली. नगरासारखीं विमानें अश्व आणि उत्कृष्ठ गज यांवर आरूढ होऊन आणि पारिप्लवसंज्ञक यानांत बसून देव त्या ठिकाणीं आले होते. कारण स्वर्गापासून पृथ्वीवर उत्तम प्रकारें गंगा अवतीर्ण झाली, हें लोकांमध्यें पराकाष्ठेचें आश्चर्य झालें होतें व तें अव-लोकन करण्याकरितां अपरिमित सामर्थ्यवान देवगण एकत्र जुळून तेथें आले होते. त्या ठिकाणीं लोटत असलेल्या त्या देवगणांच्या योगानें आणि त्यांच्या भूषणांच्या तेजानें स्वच्छ असलेलें आकाश शेंकडों सूर्यांनीं भरल्यासारखें दिसत होतें. शिशुमार आणि सर्प यांचे समुदाय व चंचल मत्स्य हे विद्युल्लतेप्रमाणें चोहोंकडे पसरले असून त्यांच्या योगानें आकाश व्याप्त झालें होतें व वायूच्या वगैरे योगानें हजारों प्रकारांनीं उसळत असलेल्या श्वेतवर्ण जलफेनाच्या योगानें आकाश शरदृतूंतील अभ्रांनीं अथवा हंसपक्ष्यांच्या समुदायांनीं व्याप्त झाल्या-सारखें दिसत होतें. कांहीं ठिकाणांहून तें गंगोदक सत्वर जात होतें, कांहीं ठिकाणीं वक्र होऊन वहात होतें, कांहीं ठिकाणीं विस्तृत झालें होतें, कांहीं ठिकाणीं संकुचित झालेलें दिसत होतें, कांहीं ठिकाणीं उसळत होतें व कोठें हळूहळू चाललें होतें. कोठें उदकावर उदक आपटून तें पुष्कळ उंच उडत असे व पुनरपि भूमीवर पडत असे. असो.

तें शिवमस्तकीं पडलेलें गंगाजल पुनरपि भूतलावर पडलें असतां निर्मल व निष्कल्मष असल्यामुळें शोभूं लागलें. तेव्हां भूतलावर राहणाऱ्या ऋषिगणांनीं व गंधर्वांनीं शिवशरिरापासून पडलेलें तें उदक पवित्र आहे असें समजून त्या-मध्यें स्नान केलें. शापामुळें जे स्वर्गापासून भ्रष्ट होऊन भूतलावर पडलें होतें, ते त्या गंगाजलामध्यें स्नान करून निष्पाप झाले. इतकेंच नव्हे, परंतु पाप-क्षालन झालेले लोक त्या जलाच्या योगानें पुण्यवान झाले आणि पुनरपि स्वर्गा-रोहण करून आपापल्या स्थानाप्रत गेले. त्या उज्ज्वल उदकाच्या योगानें लोकांना मोठा आनंद झाला व ते आनंदित झालेले लोक गंगेमध्यें स्नान करून पापरहित झाले. असो.

गंगेला जान्हवी हें नांव मिळण्याचें कारण.

महाराज भगीरथ राजर्षि दिव्य रथावर आरूढ होऊन पुढें चालला असतां गंगा त्याच्या मागोमाग गेली. इतकेंच नव्हे, परंतु ऋषिगणांसहवर्तमान सर्व देव, दैत्य, दानव, राक्षस, मुख्य मुख्य गंधर्व, यक्ष, किन्नर, महोरग, सर्प, आणि अप्सरा ह्यांनींहि भगीरथाच्या रथामागून गमन केलें व सर्व जलचर प्राणी आनंदित होऊन गंगेबरोबर गेले. जिकडे भगीरथ राजा गेला, तिकडे नद्यांमध्यें श्रेष्ठ आणि सर्व पापनाशक अशी यशस्विनी गंगा गेली. जातां जातां यज्ञयाग करीत बसलेल्या अद्भुत व पराक्रमी महात्म्या जन्हूचा यज्ञमंडप गंगेनें बुडविला. तेव्हां तिला गर्व झाला आहे असें जाणून जन्हु क्रुद्ध झाला आणि त्यानें अत्यंत अद्भुत असें तें सर्वहि गंगाजल प्राशन करून टाकिलें. असा प्रकार झाल्यावर देव, गंधर्व आणि ऋषी विस्मित होऊन महात्म्या पुरुषश्रेष्ठ जन्हूची स्तुति करूं लागले, आणि कन्या या नात्यानें गंगेचा स्वीकार करण्याविषयीं त्यांनीं त्या महात्म्याची विनंति केली. तेव्हां तो महातेजस्वी समर्थ जन्हु संतुष्ट झाला व त्यानें आपल्या कर्णांतून गंगेला सोडून दिलें. यामुळें गंगेला जन्हुसुता व जान्हवी असें म्हणूं लागले. जन्हूपासून सुटल्यावर गंगा पुनरपि भगीरथाच्या रथाचे मागोमाग जाऊं लागली असतां ती श्रेष्ठ नदी सागराला (सगरानीं केलेल्या खड्ड्याला) जाऊन पोहोंचवून, त्या भगीरथाचे वंशोद्धाररूप कर्म सफल होण्याकरितां रसातलाला गेली. ह्याप्रमाणें यत्नानें गंगेला घेऊन रसातलाप्रत गेल्यावर भगीरथ राजर्षीनें भस्मीभूत होऊन पडलेले आपले पितामह अवलोकन केले, ते अवलोकन करितांक्षणीं त्याला कांहीं सुचेनासें झालें. नंतर त्या भस्मराशीवर गंगाजलाचें सिंचन केलें असतां, ते भस्म होऊन पडलेले भगीरथाचे पितामह निष्पाप होऊन स्वर्गाप्रत गेले. ”

सर्ग चव्वेचाळिसावा.

गंगाख्यानाचा उपसंहार.

ज्याच्या मागोमाग गंगा येत आहे असा तो भगीरथ राजा सगरपुत्रांनीं खणून ठेविलेल्या खड्ड्यापाशीं गेल्यावर भूतलामध्यें, ज्या ठिकाणीं ते सगरपुत्र भस्मीभूत होऊन पडले होते, त्या ठिकाणीं प्रविष्ट झाला. पुढें गंगाजलाच्या योगानें

तें भस्म सिंचित झालें असतां सर्वलोकाधिपति ब्रह्मदेव भगीरथ राजाला म्हणाले, ' हे पुरुषश्रेष्ठा, या महात्म्या सगराच्या साठ हजार पुत्रांचा तूं उद्धार केलास आणि ह्यामुळें ते देवांप्रमाणें स्वर्गास गेले. राजा, जोंपर्यंत जगतामध्यें सागराचें उदक कायम राहील, तोंपर्यंत सर्व सगरपुत्र स्वर्गामध्यें देवांप्रमाणें राहतील. ही गंगा तुझी ज्येष्ठ कन्या होईल आणि तूं ठेविलेल्या नांवांनीं म्हणजे त्रिपथगा, दिव्या, भागीरथी या नांवांनीं ही जगतामध्यें विख्यात होऊन राहील. ही तीन मार्ग व्यापणारी असल्यामुळें हिला त्रिपथगा असें म्हणतात. हे प्रजाधिपते भगीरथ राजा, आपल्या सर्व पितामहांची तूं या ठिकाणीं उदकक्रिया करून आपली प्रतिज्ञा शेवटास ने. तुझा पूर्वज सगर अत्यंत कीर्तिमान व धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ असतांनाहि त्याचा हा मनोरथ सिद्धीस गेला नाहीं. त्याचप्रमाणें वत्सा, जगतामध्यें अंशुमान अप्रतिम तेजस्वी होता व गंगा आणण्याविषयीं तो उत्सुकहि होता; परंतु त्यालाहि आपली प्रतिज्ञा शेवटास नेतां आली नाहीं. तेजानें महर्षींची व तपानें माझी बरोबरी करणारा व अगदीं क्षात्रधर्माप्रमाणें वागणारा असा जो तुझा अतितेजस्वी व गुणवान पिता राजर्षि दिलीप, तोहि गंगा आणण्याची इच्छा करीत होता. परंतु हे महाभाग्यवंता, तो समर्थ झाला नाहीं सारांश, हे पुरुषश्रेष्ठा, तुझ्या पूर्वजांना जी प्रतिज्ञा शेवटास नेतां आली नाहीं, ती तूं शेवटास नेलीस आणि म्हणूनच जगतामध्यें सर्वलोकसंमत असें उत्कृष्ट यश तूं प्राप्त करून घेतलेंस. हे शत्रुदमना, तें गंगावतरण तूं शेवटास नेलेंस, आणि यामुळें धर्मानें प्राप्त होणारें एक मोठें ब्रह्मलोकरूप स्थानच तूं प्राप्त करून घेतलेंस. हे पुरुषश्रेष्ठा, सर्व काल स्नानाला योग्य अशा या गंगाजलामध्यें तूं स्नान कर, आणि शुचिर्भूत होऊन पुण्यफलाचा वांटेकरी हो व आपल्या सर्व पितामहांची उदकक्रिया उरकून घे. तुझें कल्याण असो. मी आपल्या लोकाप्रत जातों आणि तूंहि जलक्रिया आटोपून आपल्या नगराला परत जा.'

ह्याप्रमाणें भगीरथाला सांगितल्यावर ब्रह्मदेव आल्या मार्गानें देवलोकीं परत गेले. इकडे महायशस्वी भगीरथ राजर्षिहि सगरपुत्रांची अनुक्रमानें यथाविधि उत्तम प्रकारें जलक्रिया करून, आणि नंतर पुनरपि स्नानानें शुचिर्भूत होऊन आपल्या नगरामध्यें प्रविष्ट झाला. रामा, याप्रकारें कृतकृत्य होऊन तो आपलें राज्य करूं लागला. तो राजा प्राप्त झाल्यामुळें लोकहि आनंदित झाले आणि शोकरहित व चिंतारहित होऊन ते धनसमृद्ध बनले. रामा, हें मीं गंगेचें आख्यान तुला सविस्तर कथन केलें. आतां संध्यावंदनाच्या कालाचें अतिक्रमण

होत आहे. धनदायक, यशस्कर, आयुर्वर्धक पुत्रदायक आणि स्वर्गप्रापक असें हें आख्यान जो ब्राह्मणांना, क्षत्रियांना अथवा वैश्यांना कथन करितो, त्याच्यावर देव आणि पितर प्रसन्न होतात. हें गंगावतरणरूप शुभ व आयुर्वर्धक आख्यान जो श्रवण करितो, त्याच्या सर्व कामना परिपूर्ण होतात आणि त्याची सर्व पातकें नष्ट होऊन तो चिरायु आणि महाकीर्तिमान होतो."

सर्ग पंचेचाळिसावा.

समुद्रमंथनाची कथा.

विश्वामित्र मुनींचें हें भाषण ऐकून लक्ष्मणासह राम अत्यंत विस्मित झाला आणि म्हणाला, 'ब्रह्मन्, सगरपुत्रांनीं खणून ठेविलेल्या खड्ड्याचेंहि पूरण ज्यानें केलें, असें हें पवित्र गंगावतरण अत्यंत आश्चर्यावह असलेलें आपण उत्कृष्ट प्रकारें कथन केलें. आपण सविस्तर सांगितलेल्या या सर्व कथेच्या चिंतनामध्यें आम्हांलाहि सर्व रात्र एका क्षणासारखी झाली.'

नंतर चांगलें उजाडल्यावर स्नानसंध्या आटोपून बसलेल्या विश्वामित्र मुनींना राम म्हणाला, 'अत्यंत अद्भुत आख्यान श्रवण करण्यास सांपडल्यामुळें पूज्य झालेली ती रात्र निघून गेली. आतां आपण नद्यांमध्यें श्रेष्ठ व पवित्र असलेली ही त्रिपथगामिनी तरून जाऊं. हे मुनिश्रेष्ठ, आपण येथें आलां आहां असें समजून उत्कृष्ट आस्तरणांनीं युक्त असलेली ही पुण्यवान महर्षींची नौका सत्वर इकडे आली आहे.' रामाचें हें भाषण श्रवण केल्यावर कुशिकवंशज विश्वामित्र मुनि ऋषिगणांसहवर्तमान गंगा तरून गेले. नंतर उत्तरतीरावर येऊन तेथील ऋषिगणांचें पूजन केल्यावर ते गंगातीरीं राहिले असतां विशाला नामक नगरी त्यांनीं अवलोकन केली. तेव्हां मुनिश्रेष्ठ विश्वामित्र राम-लक्ष्मणांसहवर्तमान सत्वर त्या दिव्य, रम्य व स्वर्गतुल्य विशाला नगरीमध्यें गेले. नंतर महाबुद्धिमान राम हात जोडून त्या उत्कृष्ट विशाला नगरीसंबंधानें महर्षि विश्वामित्रांना विचारूं लागला, 'हे महामुने, विशाला नगरीमध्यें हा कोणत्या राजाचा वंश आहे, हें श्रवण करण्याची माझी इच्छा आहे; इतकेंच नव्हे, पण याविषयीं मला पराकाष्ठेची उत्सुकता आहे.'

रामाचें हें भाषण ऐकून मुनिश्रेष्ठ विश्वामित्र विशाला नगरीविषयीं पुरातन-

वृत्तांत सांगूं लागले. ते म्हणाले, "रामा, इंद्र कथन करीत असतांना मीं ऐकलेली ही कथा तूं श्रवण कर; आणि या देशांत काय वर्तमान घडलें तें तूं खरें खरें ऐकून घे. रामा पूर्वी कृतयुगामध्यें दितीचे पुत्र महाबलाढ्य असून अदितीचेहि पुत्र महाभाग्यवान, वीर्यवान व परम धार्मिक होते. एकदां 'आपण निरोगी व अजरामर कसें होऊं' म्हणून त्या महात्म्यांच्या मनामध्यें विचार उत्पन्न झाला. तेव्हां विचार करितां करितां, 'क्षीरसागराचें मंथन करून अमृतरूप रस प्राप्त करून घ्यावा' असें त्या बुद्धिमानांना सुचलें असतां, त्यांनीं समुद्रमंथनाचा निश्चय केला. नंतर वासुकीची दोरी करून व मंदर पर्वताची रवी करून त्या अत्यंत पराक्रमी देव-दैत्यांनीं समुद्रमंथनाला आरंभ केला. मंथन सुरू होऊन हजार वर्षें झाल्यावर रज्जुरूप बनलेल्या वासुकीच्या मुखांतून भयंकर विष बाहेर पडूं लागलें व दंतांच्या योगानें त्या सर्पाच्या मस्तकांनीं शिलांना दंशहि केले. पाषाणांना दंश झाल्यावर अग्नीसारखें जाज्वल्य हलाहल महाविष उत्पन्न झालें असतां देव, दैत्य, मानव ह्यांसहवर्तमान सर्व जगत् त्याच्या योगानें दग्ध होऊं लागलें. तेव्हां कल्याण करणाऱ्या सुरश्रेष्ठ पशुपति रुद्राला देव शरण गेले आणि 'त्राहि त्राहि' म्हणून त्यांनीं त्याला संतुष्ट केलें. ह्याप्रमाणें देवांनीं देवदेवेश्वर प्रभू शंकराची स्तुति केली असतां शंख व चक्र धारण करणारे श्रीहरीहि त्या ठिकाणीं प्रकट झाले. नंतर शूलपाणि रुद्राला श्रीहरि हास्यपूर्वक म्हणाले, 'हे सुरश्रेष्ठ, देव मंथन करीत असतांना जें प्रथम उत्पन्न झालें, तें आपलें आहे. कारण आपण देवांमध्यें श्रेष्ठ आहां. ह्याकरितां हे प्रभो, येथें राहून आपण ह्या अग्रपूजेचा म्हणजे विषाचा स्वीकार करा.'

ह्याप्रमाणें बोलून सुरश्रेष्ठ विष्णू तेथेंच अदृश्य झाले. तेव्हां देवतांचें भय पाहून व विष्णूचें भाषण श्रवण करून शंकरानीं अमृताप्रमाणें हलाहलसंज्ञक घोर विषाचा स्वीकार केला. नंतर देवांचा निरोप घेऊन ते देवाधिपति भगवान हर तेथून निघून गेले. तदनंतर सर्व देवदैत्य मंथन करूं लागले असतां तो श्रेष्ठ पर्वतरूप मंथा पातालामध्यें प्रविष्ट झाला. तेव्हां 'तूं सर्व प्राण्यांचा आणि विशेषत: देवांचा आधार आहेस. यास्तव हे पराक्रमी विष्णो, तूं हा खालीं खचलेला पर्वत वर काढ आणि आमचें रक्षण कर' म्हणून गंधर्वांसहवर्तमान देवांनीं मधुसूदनाचें स्तवन केलें असतां, तें श्रवण करून हृषीकेशानें कूर्मरूप धारण केलें. नंतर पर्वत पाठीवर घेऊन श्रीहरीनें त्या महासागरामध्यें शयन केलें. इतकेंच नव्हे, पण पर्वताचें अग्र हातानें धरून

तो जगदात्मा पुरुषश्रेष्ठ केशव देवांमध्यें उभा राहून समुद्राचें मंथन करूं लागला. तदनंतर एक हजार वर्षांनीं अत्यंत धर्मात्मा असा धन्वंतरी नामक आयुर्वेदमय पुरुष दंडकमंडलूंसहवर्तमान समुद्रांतून उत्पन्न झाला व अत्यंत तेजस्वी अशा अप्सराहि त्यांतूनच निघाल्या.

रामा, अपाचें (जलाचें) मंथन चाललें असतां त्या रसापासून ज्या अर्थी त्या उत्कृष्ट स्त्रिया निघाल्या, त्या अर्थी त्यांना अप्सरा ही संज्ञा प्राप्त झाली. त्या अतितेजस्वी अप्सरा मुख्य मुख्य मिळून साठ कोटी होत्या व त्यांच्या परिचारिका ज्या गौण अप्सरा उत्पन्न झाल्या, त्यांची तर गणना करणेंहि अशक्य आहे. असो. समुद्रमंथन करणाऱ्या त्या देवदानवांपैकीं कोणींहि त्यांचा स्वीकार केला नाहीं. तेव्हां स्वीकार न केल्यामुळेंच त्या सर्वसाधारण झाल्या. नंतर वरुणाची कन्या महाभाग्यवती वरुणी अर्थात् सुरा ही उत्पन्न झाली, आणि आपला परिग्रह करणारा कोणी आहे कीं नाहीं हें हुडकूं लागली. रामा, दितीच्या पुत्रांनीं त्या वरुणकन्येचा स्वीकार केला नाहीं, परंतु अदितीच्या पुत्रांनीं म्हणजे देवांनीं त्या अनिंदित वरुणकन्येचा स्वीकार केला. तेव्हां सुरेचा परिग्रह न केल्यामुळें दितीचे पुत्र असुर झाले, तिचा स्वीकार केल्यामुळें आदितीचे पुत्र सुर झाले व त्या वरुणकन्येचा स्वीकार केल्यामुळें सुर हर्ष व आनंद यांनींहि युक्त झाले. हे पुरुषश्रेष्ठा, नंतर श्रेष्ठ अश्व उच्चैःश्रवा, उत्तम रत्नकौस्तुभ आणि उत्कृष्ट अमृत त्यांतून निघालें. तेव्हां रामा, त्या अमृताकरितां देव व असुर ह्यांचा जवळजवळ मोठा कुलक्षयच झाला. अदितीचे पुत्र दितीच्या पुत्रांशीं युद्ध करूं लागले. तेव्हां असुरांनीं सर्वहि राक्षसांशीं ऐक्य केलें व नंतर त्रैलोक्याला मोह पाडणारें असें त्यांच्यामध्यें महाघोर युद्ध झालें. पुढें युद्ध होतां होतां त्या उभयतांचाहि जेव्हां प्रायः सर्वस्वी क्षय झाला, तेव्हां मायेनें मोहिनीचें रूप धारण करून महाबलाढ्य विष्णूंनीं तें अमृत सत्वर हरण केलें. अचल अशा पुरुषश्रेष्ठ विष्णूचे अंगावर जे धावून गेले, त्या सर्वांचें त्या महाप्रभावी विष्णूनें युद्धामध्यें अगदीं पीठ करून टाकिलें. देवदैत्यांच्या या अत्यंत घोर महायुद्धामध्यें अदितीपुत्राच्या वीर पुत्रांनीं दितीपुत्रांचा वध केला. ह्याप्रमाणें दितीपुत्रांचा वध करून राज्य मिळविल्यावर इंद्रानें आनंदित होऊन ऋषिगण व चारण यांसहवर्तमान लोकांचें परिपालन केलें.

सर्ग सेहेचाळिसावा.

मरुद्गणांचें जन्मवृत्त.

"त्या पुत्रांचा वध झाला असतां दिति अत्यंत दुःखित होऊन आपल्या भर्त्याला—कश्यपाला म्हणाली, 'भगवन्, आपल्या महापराक्रमी पुत्रांनीं माझ्या पुत्रांचा वध केला. ह्यास्तव दीर्घ तपश्चर्येच्या योगानें आपणांपासून इंद्रघातक पुत्र प्राप्त करून घेण्याची माझी इच्छा आहे. करितां मी तपश्चर्या करीन, आपण मला गर्भ द्या. सारांश, इंद्रघातक असा त्रैलोक्याधिपति पुत्र तपश्चर्येनें प्राप्त करून घेण्याविषयीं आपण मला अनुज्ञा द्या.'

हें तिचें भाषण श्रवण केल्यावर अत्यंत दुःखित झालेल्या त्या दितीला ते महातेजस्वी मरीचिपुत्र कश्यप म्हणाले, 'हे तपोधने, तुझें कल्याण असो. तूं शुचिर्भूत रहा, म्हणजे संग्राममध्यें इंद्राचा वध करणारा पुत्र तुला प्राप्त होईल. सहस्र संवत्सर पूर्ण होईपर्यंत जर तूं शुचिर्भूत राहशील, तर माझ्यापासून त्रैलोक्याधिपति इंद्राचा वध करणारा पुत्र तुला प्राप्त होईल.'

याप्रमाणें बोलून महातेजस्वी कश्यपांनीं तिच्या अंगावरून हात फिरविला, आणि नंतर तिच्याशीं समागम केल्यावर 'कल्याण असो' असें म्हणून ते तपश्चर्येकरितां निघून गेले. कश्यप मुनि गेल्यावर दितीला अत्यंत हर्ष झाला व कुशप्लवसंज्ञक तपोवनामध्यें जाऊन तिनें फारच उग्र तपश्चर्येला आरंभ केला. ती तपश्चर्या करूं लागली असतां इंद्रानें फारच उत्कृष्ठ रीतीनें तिची सेवा चालविली. अग्नि, कुश, काष्ठें, उदक, फळें, मुळें आणि इतरहि जें कांहीं तिला हवें असेल, तें इंद्रानें दिलें. इतकेंच नव्हे, परंतु श्रमपरिहार होण्याकरितां हातपाय वगैरे चेपूनहि इंद्र सर्व काल दितीची सेवा करूं लागला. असें होतां होतां, दहा कमी हजार वर्षें पूर्ण झाल्यावर दिति अत्यंत हर्षयुक्त होऊन इंद्राला म्हणाली, 'हे वीर्यवानांमध्यें श्रेष्ठ इंद्रा, माझ्या तपःश्चर्येचीं आतां दहा वर्षें उरलीं आहेत. तुझें कल्याण असो. हीं दहा वर्षें लोटल्यावर तूं भ्रात्याला अवलोकन करशील. पुत्रा, तुझ्या नाशाकरितां म्हणून जो पुत्र मीं मागून घेतला, तो तसा उत्पन्न न करितां मी तुला जय देण्याविषयीं उत्सुक असाच पुत्र उत्पन्न करीन; आणि त्या आपल्या भ्रात्यासहवर्तमान तूं त्रैलोक्यविजयजन्य सुखाचा निश्चित होऊन उपभोग घेशील. हे सुरश्रेष्ठा,

तुझ्या पित्याची प्रार्थना केली असतां ' हजार वर्षांनीं तुला पुत्र होईल ' म्हणून त्या महात्म्यानें मला पुत्रप्राप्तीसंबंधानें वर दिला आहे. '

ह्याप्रमाणें इंद्राला सांगितल्यावर, सूर्य मध्यान्हीं आला असतां उशाकडे पाय करून ती दिति निद्रिस्थ झाली. तेव्हां मस्तक ठेवण्याचे ठिकाणीं पाय ठेविल्यामुळें अशुचि झालेल्या त्या दितीला अवलोकन करून इंद्राला आनंद झाला. आणि फारच सावध असलेल्या त्या इंद्रानें तिच्या शरिरामध्यें प्रविष्ठ होऊन तिच्या गर्भाचे सात तुकडे केले. परंतु शेकडों धारांनीं युक्त असलेल्या वज्राच्या योगानें तुकडे होऊं लागले असतां तो गर्भ सुस्वर रडूं लागला. तेव्हां रामा, दिति जागी झाली. नंतर ' रडूं नको, रडूं नको ' असें त्या गर्भाला उद्देशून इंद्र म्हणाला, आणि तो रडत असतांनाहि त्या महातेजस्वी इंद्रानें त्याचे तुकडे केलेच. नंतर ' मारूं नको, मारूं नको ' असेंच एकसारखें दिति म्हणूं लागली असतां मातेच्या वचनाला मान देऊन इंद्र लगेच बाहेर पडला; आणि हात जोडून तो वज्रपाणी इंद्र तिला म्हणाला, ' हे देवी, पाय ठेवण्याचे ठिकाणीं मस्तक ठेवून निद्रिस्थ असल्यामुळें तूं अशुचि झालीस. तेव्हां हें छिद्र पाहून, संग्रामामध्यें इंद्राचा वध करणाऱ्या तुझ्या पुत्राचे मी सात तुकडे केले. तस्मात्, तूं मला क्षमा कर. '

सर्ग सत्तेचाळिसावा.

मरुद्गणांचे जन्म.

इंद्रानें त्या गर्भाचे सात तुकडे केल्यावर दिति अत्यंत दुःखित झाली, आणि सांत्वनपूर्वक अजिंक्य इंद्राला म्हणाली, ' हे देवाधिपते, माझ्या अपराधामुळें ह्या गर्भाचे सात तुकडे झाले आहेत. यांत तुझा अपराध नाहीं. आतां, माझ्या गर्भाच्या नाशाकरितां तूं जें कृत्य केलेंस तें उभयतांनाहि प्रिय व्हावें अशी माझी इच्छा आहे. करितां हे सात पुत्र सात मरुद्गणांच्या स्थानांचे रक्षण करणारे होवोत. हे पुत्रा, आकाशामध्यें जे सात वायुप्रवाह आहेत. त्यांचे ठिकाणीं मारुत म्हणून विख्यात असलेले हे माझे दिव्यरूपी पुत्र संचार करोत. हे महायशस्वी इंद्रा, माझ्या पुत्रांपैकीं एक गण ब्रह्मलोकामध्यें संचार करो, दुसरा इंद्रलोकांत संचार करो, तिसरा दिव्य वायु म्हणून प्रसिद्ध अस-

लेल्या स्वर्गामध्यें राहो आणि हे सुरश्रेष्ठा, बाकीचे चार तुझ्या आज्ञेनें चारी दिशांचे ठिकाणीं योग्य कालीं संचार करोत. तुझें कल्याण असो. (मा रुदः मा रुदः–म्हणजे रडूं नको, रडूं नको–असें ज्या अर्थी तूं म्हणाला आहेस, त्याअर्थी) तूंच ठेविलेल्या नांवानें हे पुत्र मारुत म्हणून प्रसिद्ध होवोत."

ह्याप्रमाणें तिचें भाषण श्रवण केल्यावर सहस्रनयन इंद्र हात जोडून तिला म्हणाला, 'तूं म्हटल्याप्रमाणें हें सर्व कांहीं होईल, ह्यांत संशय नाहीं. तुझें कल्याण असो. तुझे देवरूप पुत्र तुझ्या म्हणण्याप्रमाणें संचार करतील.' ह्याप्रमाणें तपोवनामध्यें ठरवून तीं मायलेकरें कृतार्थ होऊन स्वर्गाला गेलीं, असें आमच्या ऐकण्यांत आहे. असो. हे काकुत्स्था, तोच हा देश असून ह्या ठिकाणीं पूर्वी महेंद्रानें वास्तव्य केलें होतें. कारण तपश्चर्येच्या योगानें सिद्ध झालेल्या दितीची इंद्रानें सेवा केली, ती याच ठिकाणीं. असो."

विशाला नगरीचें वृत्त.

विश्वामित्र पुढें सांगतातः–"हे रघुकुलदीपका, हा प्रदेश कोणता, हें मी तुला सांगितलें. आतां ही विशाला नगरी कोणीं स्थापिली, तें सांगतों, ऐक. इक्ष्वाकूला अलंबुषेचे ठिकाणीं विशाल म्हणून प्रख्यात असलेला एक अत्यंत धार्मिक पुत्र झाला असून, त्यानें ह्या ठिकाणीं विशाला म्हणून नगरी स्थापन केली. रामा, विशालाला हेमचंद्र म्हणून एक महाबलाढ्य पुत्र झाला. पुढें त्या हेमचंद्रालाहि सुचंद्र म्हणून विख्यात असलेला एक पुत्र झाला. धूम्राश्व म्हणून सुचंद्राचा पुत्र प्रसिद्ध आहे. त्या धूम्राश्वालाहि सृंजय म्हणून एक पुत्र झाला. वैभवशाली व प्रतापी सहदेव हा सृंजयाचा पुत्र होय; आणि अत्यंत धार्मिक कुशाश्व हा सहदेवाचा पुत्र होय. कुशाश्वाला महातेजस्वी व प्रतापी असा सोमदत्त म्हणून पुत्र झाला. सोमदत्तालाहि काकुत्स्थ म्हणून एक प्रख्यात पुत्र झाला. त्या काकुत्स्थाचा पुत्र हा महातेजस्वी सुमति सांप्रत या पुरीमध्यें वास्तव्य करीत आहे. हा फारच प्रख्यात असून जिंकण्याला कठीण आहे. इक्ष्वाकूच्या प्रसादानें विशाला नगरींतील सर्वहि राजे दीर्घायुषी, महात्मे, वीर्यवान व अत्यंत धार्मिक झालेले आहेत. असो. हे पुरुषश्रेष्ठा रामा, आज एक रात्र आपण ह्या ठिकाणीं सुखानें शयन करूं. उद्यां उजाडल्यावर तूं जनकाला अवलोकन करशील."

ह्याप्रमाणें उभयतांचें संभाषण चाललें असतां, विश्वामित्र मुनि सन्निध आल्याचें श्रवण करून तो महायशस्वी व महातेजस्वी नृपश्रेष्ठ सुमति त्यांना

सामोरा आला आणि उपाध्याय व बांधव ह्यांसहवर्तमान विश्वामित्र मुनींचें उत्कृष्ट प्रकारें पूजन करून कुशल प्रश्न केल्यावर तो हात जोडून विश्वामित्राला म्हणाला, ‘मुने, मी धन्य आहें व माझ्यावर मोठाच अनुग्रह झालेला आहे. कारण माझ्या प्रदेशामध्यें आपण आलां आहां व मला आपल्या दर्शनाचाहि लाभ झाला आहे. तस्मात् आपण माझ्यापेक्षां धन्य नाहीं.’

सर्ग अठ्ठेचाळिसावा.

अहल्येचें वृत्त.

नंतर परस्परांची भेट व कुशल प्रश्न झाल्यावर संभाषण सुरू झालें असतां सुमति राजा महामुनि विश्वामित्राला म्हणाला, ‘आपलें देव बरें करो. हे पुत्र वीर, देवांसारखे पराक्रमी, गजाप्रमाणें धीर—व सिंहाप्रमाणें अप्रतिहत—गतीनें युक्त असून आकारानें अनुक्रमें व्याघ्र व वृषभ ह्यांप्रमाणें दिसत आहेत. यांचे नेत्र कमलपत्रांप्रमाणें विशाल असून खड्ग, भाते व धनुष्य हीं यांनीं धारण केलेलीं आहेत. रूपानें हे अश्विनीकुमारांप्रमाणें दिसत असून ह्यांना यौवनावस्था प्राप्त झाली आहे, आणि प्रत्यक्ष देवच देवलोकापासून पृथ्वीवर प्राप्त झाल्याप्रमाणें हे दिसत आहेत. तेव्हां ह्या ठिकाणीं हे पायांनीं कसे आले, कशाकरितां आले आणि हे कोणाचे पुत्र आहेत, हें आपण मला सांगा. आकाशाला भूषित करणाऱ्या चंद्रसूर्यांप्रमाणें हे हा प्रदेश भूषित करीत आहेत; आणि शरीरमान, इंगित व चेष्टित ह्यांच्या योगानें हे एकमेकांसारखे आहेत. तस्मात् ह्या दुर्गम मार्गामध्यें हे महाधनुर्धारी पुरुषश्रेष्ठ वीर कशाकरितां प्राप्त झाले आहेत, हें ऐकण्याची माझी इच्छा आहे.’

सुमति राजाचें हें भाषण श्रवण केल्यावर विश्वामित्र मुनींनीं त्याला इत्थंभूत वर्तमान निवेदन केलें. तेव्हां विश्वामित्राचें भाषण श्रवण करून राजा पराकाष्ठेचा विस्मित झाला, आणि अत्यंत सत्कारास पात्र अशा त्या अतिथि म्हणून प्राप्त झालेल्या महाबलाढ्य दशरथपुत्रांचें त्यानें यथाविधि पूजन केलें. तदनंतर सुमतीनें केलेल्या त्या उत्कृष्ट प्रकारच्या आदरातिथ्याचा स्वीकार करून एक रात्रभर ते रघुवंशज राम-लक्ष्मण तेथेंच राहिले. आणि नंतर मिथिला नगरीला निघाले. पुढें जनकाची ती शुभ नगरी अवलोकन केल्यावर ‘उत्तम उत्तम’

म्हणून सर्व मुनींनीं मिथिलेची प्रशंसा केली. तदनंतर मिथिलानगरीसमीप असलेल्या वनामध्यें जुनाट, निर्जन परंतु रम्य असा एक आश्रम अवलोकन करून रघुवंशज राम मुनिश्रेष्ठ विश्वामित्राला म्हणाला, 'मुनिरहित असें हें आश्रमासारखें काय दिसत आहे? हे भगवन्, हा पूर्वीचा कोणाचा आश्रम होता, हें ऐकण्याची माझी इच्छा आहे.'

रघुवंशज रामाचें हें भाषण श्रवण केल्यावर संभाषण करण्यामध्यें प्रवीण असलेले महातेजस्वी विश्वामित्र महामुनि म्हणाले, "रामा, कोणत्या महात्म्याच्या कोपामुळें ह्या आश्रमाला शाप झाला आहे, तें मी तुला सांगतों, तूं श्रवण कर. स्वर्गांतील आश्रमाप्रमाणें असलेला हा आश्रम पूर्वीं महात्म्या गौतम मुनींचा होता. हा देवांनाहि चांगल्या प्रकारें मान्य आहे. पूर्वीं गौतम मुनींनीं अहल्येसहवर्तमान ह्या ठिकाणीं अनेक संवत्सरसमूहपर्यंत तपश्चर्या केली. असें होतां होतां, गौतम मुनि आश्रमांत नाहींत अशी संधी पाहून सहस्रनयन शचीपति गौतम मुनींचा वेष घेऊन आश्रमांत आला आणि अहल्येला म्हणाला, 'हे अत्यंत सुंदरी, हे कृशोदरि, रतिसुखाची इच्छा करणारे लोक ऋतुकालाची परवा बाळगीत नसतात. तुझ्याशीं समागम करावा, अशी माझी इच्छा आहे.'

विश्वामित्र पुढें सांगतातः—"रामा, नंतर हा गौतम मुनींचा वेष धारण करून इंद्र आलेला आहे असें अहल्या समजली; परंतु देवराज इंद्र माझा अभिलाष धरीत आहे, ह्याचें कौतुक वाटून त्या दुर्मति स्त्रीनें त्याच्याशीं समागम होण्याचें मनांत आणिलें. समागम झाल्यानंतर प्रसन्न मनानें ती त्या सुरश्रेष्ठ इंद्राला म्हणाली, 'हे प्रभु सुरश्रेष्ठा, मी कृतकृत्य झालें. आतां आपण येथून सत्वर जा आणि गौतम मुनींपासून आपल्या स्वतःचें व माझें सर्व प्रकारें रक्षण करा.' ह्यावर 'हे सुंदरी, मी संतुष्ट झालों आहें. आतां मीं आपल्या मार्गानें परत जातों' असें इंद्र हंसत हंसत अहल्येला म्हणाला, आणि त्या पर्णकुटिकेंतून बाहेर पडला. रामा, गौतम मुनींची भीति मनांत बाळगून तो लगबगीनें जात आहे तोंच महामुनि गौतम आश्रमांत प्रविष्ट होतांना त्याच्या दृष्टीस पडले. देवदैत्यांनाहि दुर्धर, तपःसामर्थ्यानें युक्त आणि अग्नीप्रमाणें देदीप्यमान असे मुनिश्रेष्ठ गौतम तीर्थोदकामध्यें स्नान करून समिधा व दर्भ घेऊन आल्याचें अवलोकन केल्याबरोबर भयभीत झालेल्या देवराज इंद्राचें मुख अगदीं म्लान झालें. असो. आश्रमांत प्रविष्ट होतांना आपला वेष धारण करणाऱ्या दुराचारी इंद्राला पाहून सदाचारसंपन्न गौतम मुनि रागारागानें त्याला म्हणाले, 'हे,

दुर्बुद्धे, माझा वेष धारण करून ज्या अर्थी तूं हें निंद्य कृत्य केलें आहेस, त्या-अर्थीं तूं वृषणरहित होशील.'

ह्याप्रमाणें अत्यंत क्रोधयुक्त झालेल्या महात्म्या गौतमांनीं इंद्राला म्हटल्या-बरोबर त्याचें वृषण तत्क्षणीं भूमीवर गळून पडलें. ह्याप्रमाणें इंद्राला शाप दिल्यावर गौतम मुनींनीं आपल्या भार्येलाहि शाप दिला कीं, 'इतर कसल्याहि प्रकारचा आहार न करितां केवळ वायुभक्षण करून व राखेंत पडून राहून तूं हजारों वर्षें ह्या ठिकाणीं पीडायुक्त होऊन राहशील. इतकेंच नव्हे, परंतु स्वतःच्या रूपानें कोणत्याहि प्राण्याच्या दृष्टोत्पत्तीस न येतां तूं ह्या आश्रमांत पडून राहशील. दशरथ पुत्र दुर्धर्ष राम, जेव्हां ह्या घोर वनामध्यें येईल, तेव्हां हे दुराचारिणी, लोभमोहरहित बनलेली अशी तूं त्याच्या आदरा-तिथ्यानें शुद्ध होशील आणि शुद्ध झाल्यावर स्वतःचें रूप धारण करून आनंदानें माझ्यासमीप राहशील.' ह्याप्रमाणें आपल्या दुराचारिणी भार्येला सांगितल्यावर ते महातेजस्वी व महातपस्वी गौतम मुनि हा आश्रम सोडून सिद्ध-चारणांनीं सेवित अशा हिमालय पर्वताच्या एका रम्य शिखरावर तपश्चर्या करूं लागले."

सर्ग एकुणपन्नासावा.

अहल्योद्धार.

"तदनंतर वृषणरहित झालेला इंद्र मुद्रा भयभीत करून सिद्ध, गंधर्व, चारण व अग्निप्रभृति देव ह्यांना म्हणाला, 'महात्म्या गौतमाच्या तपामध्यें विघ्न यावें एतदर्थ त्याला क्रोध आणून मीं हें देवकार्य केलें आहे; नाहीं तर उग्र तपश्चर्येच्या योगानें त्यानें सर्व देव स्थानभ्रष्ट करून टाकिले असते. क्रोधामुळें त्यानें मला निष्फल करून टाकून तिचाहि शापपूर्वक त्याग केला आहे व अशा रीतीनें त्याला मोठा शाप देण्याला लावून मीं त्याचें तप हरण केलें आहे. तस्मात्, ऋषीसमुदाय व चारण ह्यांसहवर्तमान मज देवकार्य करणाऱ्याला तुह्मी वृषणयुक्त करा.'

इंद्राचें भाषण श्रवण केल्यावर अग्निप्रभृति सर्व देव मरुद्गणांसहवर्तमान कव्यवाहनप्रभृति पितृदेवांकडे जाऊन म्हणाले, 'हा मेष वृषणयुक्त आहे, आणि गौतमानें इंद्राला वृषणरहित केलें आहे. करितां मेषाचें वृषण घेऊन तुह्मी सत्वर इंद्राला द्या. तुमचें हविर्द्रव्य म्हणून कल्पिलेल्या वृषणरहित मेषाच्या

योगानें तुह्मांला पराकाष्ठेचा संतोष होईल. तुमच्या संतोषाकरितां जे मानव तुम्हांला वृषणरहित मेष अर्पण करितील, त्यांनाहि तुम्ही मोठें अक्षय फल द्या.'

हें अग्नीचें भाषण श्रवण केल्यावर पितृदेव एकत्र जुळले व मेषाचें वृषण उपटून त्यांनीं इंद्राचे ठिकाणीं लाविलें. तेव्हांपासून रामा, पितृदेव एकत्र होऊन वृषणरहित मेषांचा स्वीकार करीत असतात. कारण त्यांचें वृषण काढून यांनीं इंद्राला दिलें. राघवा, महात्म्या गौतमाच्या प्रभावानें व तपानें तेव्हांपासून इंद्र मेषवृषण बनला. करितां हे महातेजस्वी रामा, पुण्यकर्मी गौतमाच्या आश्रमामध्यें चल आणि तुझ्या पादस्पर्शामुळें शापमुक्त होऊन देवरूप धारण करणाऱ्या ह्या अहल्येचा उद्धार कर."

हें विश्वामित्र मुनींचें भाषण श्रवण केल्यावर रघुवंशज राम विश्वामित्राला पुढें घालून लक्ष्मणासहवर्तमान त्या आश्रमामध्यें गेला व तपाच्या योगानें जिची प्रभा चोहोंकडे फांकली आहे अशा त्या महाभाग्यवती अहल्येला त्यानें अवलोकन केलें. देवदैत्यांशींहि मिळून आलेल्या कोणाला सुद्धां तिचें दर्शन होणें दुर्घट होतें. सारांश, ब्रह्मदेवानें मोठ्या प्रयत्नानें निर्माण केलेली दिव्य माया, धूमानें व्याप्त झालेली उज्ज्वल अग्निज्वाला, तुषारांनीं व्याप्त झालेली व अभ्रयुक्त असलेली पूर्णचंद्रप्रभा अथवा मेघांमध्यें असलेली उज्ज्वल सूर्यप्रभाच कीं काय अशी ती दिसत होती. असो. गौतम मुनींनीं सांगितल्यावरून रामदर्शन होईपर्यंत त्रैलोक्यामध्यें कोणालाहि तिचें दर्शन होणें दुर्घट झालें होतें; परंतु रामदर्शनानें शापमोक्ष झाल्यावर ती सर्व लोकांच्या दृष्टीस पडूं लागली. दर्शन झाल्यानंतर रघुवंशज राम-लक्ष्मणांनीं तिचे आनंदानें पाय धरिले असतां गौतम मुनींनीं सांगितल्याचें स्मरून तिनेंहि त्यांना स्पर्शपूर्वक अभिवंदन केलें. नंतर स्वस्थ अंतःकरण करून तिनें अर्घ्यपाद्यपूर्वक यथाविधि कर्मानें त्यांचें आतिथ्य केलें असतां, ककुत्स्थकुलोत्पन्न रामानें लक्ष्मणासहवर्तमान त्याचा स्वीकार केला. तेव्हां देवदुंदुभींच्या गर्जनांसहवर्तमान रामावर व अहल्येवर मोठी पुष्पवृष्टि झाली. गंधर्व व अप्सरा ह्यांमध्येंहि मोठा उत्सव झाला आणि गौमत मुनींच्या अर्ध्या वचनांत राहून तपोबलानें शरीरशुद्धि झालेल्या त्या अहल्येची 'उत्तम उत्तम' म्हणून देवांनींहि प्रशंसा केली. तदनंतर महातेजस्वी गौतम मुनि अहल्येसहवर्तमान सुखी झाले व रामाचें यथाविधि पूजन करून ते महातपस्वी मुनि तपश्चर्या करूं लागले. नंतर रामहि महामुनि गौतमांच्या उत्कृष्ठ पूजेचा स्वीकार करून मिथिला नगरीस चालता झाला.

सर्ग पन्नासावा.

मिथिला नगरीप्रत गमन.

तदनंतर ईशान्येस गेल्यावर विश्वामित्र मुनींना पुढें करून लक्ष्मणासहवर्तमान राम यज्ञमंडपामध्यें गेला, आणि लक्ष्मणासहवर्तमान त्या मुनिश्रेष्ठांना म्हणाला, 'महात्म्या जनकाची यज्ञसंपत्ति चांगली आहे. कारण हे महाभाग्यवान मुने, वेदाध्ययनाविषयीं तत्पर असलेले देशोदेशचे हजारों ब्राह्मण व शेंकडों शकटांनीं गजबजून गेलेलीं ऋषींचीं वसतिस्थानें ह्या ठिकाणीं दिसत आहेत. करितां आतां कोणती ती जागा ठरवा, म्हणजे आपण त्या ठिकाणीं उतरूं.'

हें रामाचें भाषण श्रवण केल्यानंतर महामुनि विश्वामित्रांनीं उदकानें युक्त व शांत अशा प्रदेशावर वास्तव्य करण्याचें ठरविलें. इकडे विश्वामित्र आल्याचें ऐकतांक्षणीं अनिंदित असा नृपश्रेष्ठ जनक शतानंद नामक पुरोहिताला व महात्म्या ऋत्विजांना पुढें करून, सत्वर पूजासाहित्य घेऊन आणि विनययुक्त होऊन एकदम त्यांना सामोरा गेला व धर्मबुद्धीनें त्यानें तें पूजासाहित्य विश्वामित्रांना अर्पण केलें. तेव्हां महात्म्या जनकाच्या त्या पूजेचा स्वीकार करून स्वतः राजाविषयीं व यज्ञाविषयीं त्यांनीं त्याला कुशल वर्तमान विचारिलें. नंतर उपाध्याय व पुरोहित ह्यांसहवर्तमान जनकाबरोबर आलेल्या त्या सर्व मुनींना कुशल प्रश्न विचारल्यावर, योग्यतेप्रमाणें सर्व ऋषींची विश्वामित्रांनीं आनंदानें भेट घेतली. नंतर 'भगवानांनीं आसनावर बसावें' म्हणून जनक राजानें हात जोडून मुनिश्रेष्ठ विश्वामित्राची प्रार्थना केली असतां, राजाचें म्हणणें ऐकून महामुनि विश्वामित्र आसनावर बसले. ते बसल्यावर पुरोहित, ऋत्विज आणि मंत्र्यांसहवर्तमान जनक राजा हेहि योग्यतेप्रमाणें त्यांच्या भोंवतीं बसले. नंतर विश्वामित्राकडे पाहून तो जनक राजा म्हणाला, "देवांनीं आज माझ्या यज्ञसंपत्तीचें सार्थक केलें. आपल्या दर्शनानें आज मला यज्ञफल प्राप्त झालें. खरोखर मी धन्य असून देवतांचा माझ्यावर अनुग्रह झालेला आहे. कारण हे मुनिश्रेष्ठ, माझ्या यज्ञमंडपामध्यें आज आपण मुनींसहवर्तमान प्राप्त झालां आहां. हे ब्रह्मर्षे, यज्ञदीक्षेचे बारा दिवस अवशिष्ट राहिले आहेत, असे विद्वान ऋत्विज म्हणतात. तेव्हां हे कौशिक मुने, हविर्भागाची इच्छा करणारे देव आपण नंतर ह्या यज्ञामध्यें अवलोकन कराल."

ह्याप्रमाणें प्रसन्न मुद्रेनें युक्त झालेल्या जनक राजानें मुनिश्रेष्ठ विश्वामित्राला सांगितलें. नंतर हात जोडून तो जितेंद्रिय राजा पुनरपि त्यांना म्हणाला, 'आपलें देव बरें करो. हे पुत्र देवांसारखे पराक्रमी वीर, गजाप्रमाणें धीर—व सिंहाप्रमाणें अप्रतिहत—गतीनें युक्त असून आकारानें अनुक्रमें व्याघ्र व वृषभ ह्यांप्रमाणें दिसत आहेत. रूपानें हे अश्विनीकुमारांप्रमाणें दिसत असून ह्यांना यौवनावस्था प्राप्त झाली आहे, आणि प्रत्यक्ष देवच देवलोकापासून पृथ्वीवर प्राप्त झाल्याप्रमाणें हे दिसत आहेत. तेव्हां ह्या ठिकाणीं हे पायांनीं कसे आले? कशाकरितां आले? आणि हे मुने, हे कोणाचे पुत्र आहेत? आपण मला हें सांगा. आकाशाला शोभा आणणाऱ्या चंद्रसूर्यांप्रमाणें ह्या प्रदेशाला शोभा आणणारे आणि उत्कृष्ट आयुधें धारण करणारे हे वीर पुत्र, हे महामुने, कोणाचे आहेत? शरीरमान, इंगित व चेष्टित ह्यांमध्यें एकमेकांसारखे व मस्तकावर झुलपे असलेले असे जे हे वीर ह्यांची खरी खरी हकीकत ऐकण्याची माझी इच्छा आहे.' हें त्या महात्म्या जनक राजाचें भाषण श्रवण केल्यावर महात्म्या विश्वामित्र मुनींनीं त्या दशरथपुत्रांची हकीकत त्याला सांगितली, आणि सिद्धाश्रमामध्यें वास्तव्य, राक्षसांचा वध, त्या ठिकाणीं निर्भयपणें जाणें, विशाला नगरीचें दर्शन, अहल्येचें दर्शन, गौतम मुनींची भेट, महाधनुष्य पहाण्याविषयीं रामाची इच्छा आणि तें सज्ज करण्याकरितां त्याचें आगमन हें सर्व महात्म्या जनकाला सांगून, महातेजस्वी महर्षि विश्वामित्र स्वस्थ बसले.

सर्ग एकावन्नावा.

शतानंदाचें भाषण.

विचारी विश्वामित्र मुनींचें तें भाषण श्रवण केल्यावर महातेजस्वी व महातपस्वी शतानंदाच्या शरिरावर रोमांच उठले. नंतर तपाच्या योगानें ज्याचें तेज पडलें आहे, असा तो गौतम मुनींचा ज्येष्ठ पुत्र शतानंद रामाला अवलोकन केल्याबरोबरच पराकाष्ठेचा विस्मित झाला; आणि ते राजकुमार राम-लक्ष्मण स्वस्थपणें आसनावर बसलेले पाहून तो मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांना म्हणाला, 'हे मुनिवर्या, दीर्घ तपश्चर्येचें अवलंबन करून राहिलेली माझी यशस्विनी माता आपण रामाला दाखविली ना? सर्व प्राण्यांना पूज्य असलेल्या ह्या रामाची,

माझ्या यशस्विनी व तेजस्वी मातेनें वन्य पदार्थांनीं पूजा केली ना? मुने, इंद्राशीं माझ्या मातेचें जें दुराचरण झालें, तें पूर्वीचें वृत्त आपण रामाला कथन केलें ना? हे कुशिकवंशज मुनिश्रेष्ठ, रामदर्शन झाल्यावर माझ्या मातेचा माझ्या पित्याशीं समागम झाला ना? हे कुशिकनंदन मुने, माझ्या पित्यानें रामाचें पूजन केलें ना? त्या महात्म्याच्या पूजेचा स्वीकार करून हा महातेजस्वी राम येथें आला आहे ना? आणि त्याचप्रमाणें, हे कुशिकनंदन मुने, सत्कार होऊन येथें आलेल्या रामानें शांत मनानें माझ्या पित्याला अभिवंदन केलें ना?'

हें त्याचें भाषण श्रवण केल्यावर संभाषणज्ञ महामुनि विश्वामित्र हे भाषणाचें मर्म जाणणाऱ्या शतानंदाला म्हणाले, 'हे मुनिश्रेष्ठा, मी कांहीं विसरलों नाहीं. जें करावयाचें होतें, तें मीं केलें; आणि भृगुवंशज जमदग्नीशीं संगत झालेल्या रेणुकेप्रमाणें गौतम मुनीशीं त्यांच्या पत्नीचा समागम झाला.' हें त्या विचारी विश्वामित्र मुनींचें भाषण श्रवण करून महातेजस्वी शतानंद रामाला म्हणाला, 'हे पुरुषश्रेष्ठा, तुझें स्वागत असो. हे रघुवंशजा रामा, पराजयरहित अशा विश्वामित्र महर्षींना पुढें घालून तूं प्राप्त झालास, हें खरोखर आमचें भाग्यच उदयास आलें. ह्या महातेजस्वी विश्वामित्र मुनींचीं कर्में अचिंत्य असून ह्या ब्रह्मर्षींची प्रभा तपाच्या योगानें अपरिमित झालेली आहे, आणि हे जगताचें पराकाष्ठेचे हित करणारे आहेत, असें मी जाणतों. हे रामा, मोठी तपश्चर्या केलेले कुशिकपुत्र विश्वामित्र ज्या अर्थी तुझें रक्षण करणारे आहेत, त्या अर्थी तुझ्याहून धन्य असा ह्या भूतलावर दुसरा कोणीहि नाहीं. ह्या महाभाग्यवान व खडतर तपश्चर्या करणाऱ्या

कौशिक मुनींचें वृत्त

मी सांगतों, तें श्रवण कर. सारांश रामा, ह्यांचें तपोबल कशा प्रकारचें आहे व ह्यांना ब्रह्मर्षित्व कसें प्राप्त झालें, हें मी तुला निवेदन करीत आहें, तें तूं श्रवण कर. धर्मात्मा, धर्मवेत्ता, विद्यासंपन्न आणि प्रजाहिताविषयीं दक्ष असा हा शत्रूंचें दमन करणारा पुष्कळ काळपर्यंत राजा होता. प्रजापतीचा पुत्र एक कुश म्हणून राजा होता व त्या कुशाचा पुत्र बलाढ्य व अत्यंत धार्मिक असा कुशनाभ म्हणून होता. गाधि म्हणून प्रख्यात असलेला कुशनाभाचा पुत्र होता, आणि हा महातेजस्वी विश्वामित्र महामुनि त्या गाधीचा पुत्र होय. ह्या महातेजस्वी विश्वामित्र राजानें पुष्कळ हजार वर्षें पृथ्वीचें परिपालन करून

राज्य चालविलें. एकदा हा महातेजस्वी राजा सेना तयार करून व एक अक्षौहिणी सेना बरोबर घेऊन पृथ्वीपर्यटन करूं लागला असतां नगरें, राष्ट्रें, नद्या, मोठमोठे पर्वत आणि आश्रम ह्यांवरून क्रमानें जातां जातां वसिष्ठ मुनींच्या आश्रमामध्यें आला व नानाप्रकारच्या पुष्पवेली व वृक्ष ह्यांनीं युक्त, अनेक प्रकारच्या मृगसमुदायांनीं भरलेला, सिद्ध व चारण ह्यांनीं सेवित, देव, दानव, गंधर्व आणि किन्नर ह्यांनीं शोभित, शांत हरिणांनीं गजबजलेला, पक्षिसमुदायांनीं आश्रय केलेला, ब्रह्मर्षिगणांनीं भरलेला, देवर्षिसमुदायांनीं सेवित, तपश्चर्येच्या योगानें सिद्ध झालेल्या अग्नितुल्य महात्म्यांनीं आणि ब्रह्मतुल्य महात्म्यांनीं नेहमीं भरलेला, संपन्न, जलप्राशन, वायुभक्षण, गलितपत्रभरण अथवा फलमूलाशयन करून राहिलेल्या निर्दोष, दमपरायण, जितेंद्रिय व जपहोमाविषयीं तत्पर अशा वालखिल्य ऋषींच्या योगानें आणि इतरहि वैखानस महर्षींच्या योगानें आसमंताद्भागीं सुशोभित असलेला व प्रतिब्रह्मलोकाप्रमाणें दिसत असलेला वसिष्ठ मुनींचा आश्रम ह्या विजयश्रेष्ठ व महाबलाढय विश्वामित्र राजानें अवलोकन केला.

सर्ग बावन्नावा.

विश्वामित्रांचें वसिष्ठाश्रमीं आगमन.

तपोनिष्ठांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या वसिष्ठ मुनींना अवलोकन करून महाबलाढ्य व वीर असा विश्वामित्र राजा अत्यंत प्रसन्न झाला आणि विनयानें त्यानें त्यांना प्रणाम केला. तेव्हां महात्म्या वसिष्ठ मुनींनीं ‘ तुझें स्वागत असो ’ म्हणून त्याला सांगितलें, आणि ‘ ह्याला आसन द्या ’ म्हणून वरिष्ठ मुनींनीं (शिष्यांना) आज्ञा केली. नंतर विचारी विश्वामित्र राजा बसल्यावर मुनिश्रेष्ठ वसिष्ठांनीं योग्यतेप्रमाणें त्याला फलमूलें अर्पण केलीं. वसिष्ठ मुनींच्या त्या आदरातिथ्याचा स्वीकार केल्यावर नृपश्रेष्ठ विश्वामित्रानें प्रथमतः त्यांना तप, अग्निहोत्र आणि शिष्य ह्यांविषयीं कुशल वर्तमान विचारिलें. तदनंतर महातेजस्वी विश्वामित्रानें वृक्षांविषयीं त्यांना कुशल प्रश्न केला. तेव्हां वसिष्ठ मुनींनीं त्या श्रेष्ठ राजाला ‘ सर्वत्र कुशल आहे ’ म्हणून सांगितलें. नंतर तपस्वीश्रेष्ठ महातेजस्वी ब्रह्मपुत्र वसिष्ठांनीं स्वस्थ बसलेल्या विश्वामित्र राजाला प्रश्न केला कीं, ‘ राजा, तुझें कुशल आहे ना ? हे धार्मिक राजा, राजवर्तनानें

प्रजेचें पालन करून धर्मानें तूं त्यांचें रंजन करीत आहेस ना? तुझ्या सेवकांना वेळेवर पगार मिळून ते तुझी आज्ञा पाळण्याविषयीं तत्पर असतात ना? हे शत्रुनाशका, तुझे सर्व रिपु जिंकिलेले आहेत ना? हे शत्रुतापना, निष्पापा पुरुषश्रेष्ठा, सेना, कोश, मित्र व तुझी पुत्रपौत्रादि संतति हीं सर्व कुशल आहेत ना?

ह्याप्रमाणें प्रश्न झाल्यावर महातेजस्वी विश्वामित्र राजानें विनयसंपन्न अशा श्रेष्ठ वसिष्ठ मुनीला 'सर्वत्र कुशल आहे' म्हणून सांगितलें. नंतर इकडल्या तिकडल्या गोष्टी पुष्कळ वेळपर्यंत सांगून अत्यंत संतुष्ट झालेल्या त्या उभयतां धर्मिष्ठांनीं परस्पराला आनंदित केलें. तदनंतर गोष्टी चालतां चालतां भगवान वसिष्ठ मुनि हंसत हंसत विश्वामित्राला म्हणाले, 'हे महाबलाढ्य राजा, अपरिमित सामर्थ्यानें युक्त असलेल्या तुजसहवर्तमान ह्या तुझ्या सैन्याचें यथायोग्य आतिथ्य करावें, अशी माझी इच्छा आहे. करितां तूं त्या आतिथ्याचा स्वीकार कर. सारांश, राजा, तूं श्रेष्ठ अतिथि असल्यामुळें प्रयत्नपूर्वक तुझें आदरातिथ्य करणें योग्य आहे. म्हणून मी करीत असलेल्या ह्या सत्काराचा तूं स्वीकार कर.'

ह्याप्रमाणें वसिष्ठांनीं सांगितलें असतां पुढें महामुनि बनलेला विश्वामित्र राजा वसिष्ठांना म्हणाला, 'मी आदरातिथ्य करितों' ह्या आपल्या, म्हणण्यानेंच माझा सत्कार झाला आहे. शिवाय हे भगवन्, आपल्या आश्रमामध्यें असलेलीं फळें, मुळें, पाद्य, आचमन आणि आपलें दर्शन ह्यांच्या योगानें आपण माझें सर्व प्रकारें उत्कृष्ठ पूजन, स्वतः माझ्या पूजेस आपणच पात्र असतांना केलें आहे. आतां आपणांला नमस्कार असो. मी येथून गमन करितों. आपण मजवर कृपादृष्टी ठेवावी.' ह्याप्रमाणें विश्वामित्र राजा म्हणत असतां धर्मात्म्या व उदारबुद्धि वसिष्ठ मुनींनीं फिरून फिरून त्याला निमंत्रण केलें. तेव्हां 'ठीक आहे, हे मुनिश्रेष्ठ, आपली मर्जी असेल त्याप्रमाणें होऊं द्या' असें गाधिपुत्र विश्वामित्रानें वसिष्ठांना सांगितलें.

विश्वामित्रानें असें सांगितल्यावर तपस्वीश्रेष्ठ वसिष्ठांनीं प्रसन्न होऊन किल्मिषरहित अशा आपल्या चित्रवर्णसंपन्न धेनूला हांक मारिली कीं, 'हे शबले, इकडे ये आणि माझ्या सांगण्याप्रमाणें सत्वर तजवीज ठेव. सैन्यासह वर्तमान ह्या राजर्षींचा मोठ्या मौल्यवान भोजनानें सत्कार करण्याचा मीं निश्चय केला आहे, तो तूं सिद्धीस ने. सारांश, सहा रसांमध्यें ज्याला ज्याला जें जें प्रिय असेल तें तें, तूं माझ्याकरितां ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें उत्पन्न कर.'

सर्ग त्रेपन्नावा.

विश्वामित्रांचा सत्कार व धेनुयाचना.

शतानंद म्हणतातः—' हे शत्रुनाशका रामा, ह्याप्रमाणें वसिष्ठांनीं शबलेला सांगितलें असतां, ज्याला ज्याला जें जें प्रिय होतें त्या त्या प्रमाणें सर्व इष्ट पदार्थ त्या कामधेनूनें उत्पन्न केले. ऊंसापासून आणि मधापासून होणारे पदार्थ, लाह्या, मैरेयसंज्ञक उत्कृष्ट आसवें, मोठमोठ्या किंमतीचीं पेयें आणि लहानमोठीं भक्ष्यें तिनें उत्पन्न केलीं. ऊन ऊन भाताच्या त्या ठिकाणीं पर्वतप्राय राशी पडल्या आणि मिष्टान्नें, वरणें, दधिकुल्या (दह्याचे पाट) व नानाप्रकारच्या स्वादुरसानें युक्त असलेल्या खांडवांनीं भरलेलीं रुप्याचीं हजारों भोजनपात्रें तिनें उत्पन्न केलीं. तेव्हां त्या अन्नाच्या योगानें वसिष्ठांनीं तृप्त केलेलें विश्वामित्राचें सर्व सैन्य अत्यंत संतुष्ट झालें; आणि त्यांतील लोक आनंदित व पुष्ट आहेत, असें दिसूं लागलें. सारांश, ब्राह्मण, पुरोहित, अंतः-पुरांतील स्त्रिया, अमात्य, मंत्री आणि सेवक ह्यांसहवर्तमान विश्वामित्र राजर्षींचा सत्कार होऊन तो आनंदित व पुष्ट झाला आणि पराकाष्ठेचा हर्ष-युक्त होऊन वसिष्ठांना म्हणाला, " ब्रह्मन्, आपलें पूजन माझ्या हातून होणें योग्य असतांना आपण माझा उत्तम रीतीनें सत्कार करून पूजन केलें आहे. करितां हे संभाषणज्ञ मुने, मी काय म्हणत आहें, इकडे आपण लक्ष्य द्यावें. हे भग-वन्, एक लक्ष गाई घेऊन आपण मला शबला द्यावी. कारण रत्नें जवळ ठेवण्याची योग्यता राजाचीच आहे. आणि हें रत्न आहे. तस्मात्, हे द्विज, आपण मला शबला द्या, धर्मानें ही माझी आहे. "

विश्वामित्रांचा निषेध.

ह्याप्रमाणें विश्वामित्रानें सांगितलें असतां मुनिश्रेष्ठ धर्मात्मे वसिष्ठ त्या भूपतीला म्हणाले, " राजा, एक लक्ष गाईंची तर गोष्टच नको, परंतु शेंकडों कोट गाई अथवा रुप्याच्या राशी घेऊनहि मी शबला देणार नाहीं. हे शत्रु-दमना, माझ्यापासून त्याग होण्यास ही योग्य नाहीं. कारण, आत्मवानाच्या कीर्तीप्रमाणें ही शबला नेहमीं माझ्यापाशींच राहणारी आहे. माझें हव्यकव्य, उपजीविका, अग्निहोत्र, भूतबलि, होम, श्रौतस्मार्त कर्मे आणि नानाप्रकारच्या विद्या हें सर्व राजर्षे, हिच्यावरच अवलंबून आहे, ह्यांत संशय नाहीं. हेंच माझें

सर्वस्व असून हीच माझा संतोष करणारी आहे. सारांश, राजा, अनेक कारणांमुळें मी तुला शबला देणार नाहीं. "

वसिष्ठांचें हें भाषण ऐकून विश्वामित्र राजा अत्याग्रहानें म्हणाला, "हे सुव्रत, सुवर्णशृंखला व कंठभूषणें आणि सुवर्णाचे अंकुश ह्यांनीं भूषित असलेले चौदा हजार गज, चार चार श्वेतवर्ण अश्व जोडलेले आणि घंटाजालानें भूषित असलेले आठशें सोन्याचे रथ व मूळ प्रदेशांत उत्पन्न झालेले आणि महावेगवान असे अकरा हजार जातिवंत घोडे मी आपणांला देतों, व अनेक वर्णांमुळें एकमेकींपासून भिन्न आणि तरुण अशा एक कोट गाई मी आपणांला देतों. आपण मला शबला द्या. हे द्विजश्रेष्ठ, फार तर काय, परंतु रत्नें, सुवर्ण वगैरे जें पाहिजे असेल तें सर्व मी आपल्या इच्छेप्रमाणें आपणांला देतों. मला आपण शबला द्या. "

बुद्धिमान विश्वामित्र राजाची ही प्रार्थना ऐकून तपस्वी श्रेष्ठ भगवान वसिष्ठ मुनि त्याला म्हणाले, "राजा, कांहीं झालें तरी मी शबला देणार नाहीं. कारण, हेंच माझें रत्न, हेंच माझें धन व हेंच माझें जीवित असून दर्श व पौर्णमास हे याग, विपुल दक्षिणेनें युक्त असे ऋतु आणि इतरहि नानाप्रकारचीं माझीं कर्में हें सर्व हीच आहे. राजा, माझीं सर्व कर्में हिच्यावरच अवलंबून आहेत, ह्यांत संशय नाहीं. तेव्हां फार बोलून काय कर्तव्य आहे? मी ही कामधेनु देणार नाहीं. "

सर्ग चोपन्नावा.

धेनुहरण.

शतानंद सांगतातः—"रामा, वसिष्ठहि जेव्हां कामधेनूला सोडीना, तेव्हां विश्वामित्र राजा त्याची ती शबला बलात्कारानें नेऊं लागला. तेव्हां रामा, ती शबला दुःखित झाली, आणि शोकाकुल होऊन रडत रडत मनामध्यें चिंतन करूं लागली कीं, 'हे राजसेवक अत्यंत दुःखित व दीन झालेल्या मला ओढून नेत आहेत. तेव्हां महात्म्या वसिष्ठानेंच माझा त्याग केला कीं काय? मी ह्यांच्या सेवेविषयीं दक्ष असून निरुपद्रवी आहें. हें जाणूनहि ज्या अर्थीं हा

धार्मिक वसिष्ठ मुनि माझा त्याग करीत आहे, त्याअर्थी त्या महर्षींचा माझ्या हातून काय बरें अपराध झाला आहे ?'

ह्याप्रमाणें चिंतन करून व वारंवार सुस्कारे टाकून ती शबला वेगावेगानें महासामर्थ्यवान् वसिष्ठ मुनींकडे निघाली; आणि हे शत्रुनाशका, शेंकडों राजसेवकांना हिसडून टाकून वायुवेगानें ती त्या महात्म्या वसिष्ठ मुनींच्या चरणांपाशीं गेली. मेघासारख्या गंभीर ध्वनीनें युक्त असलेली ती शबला वसिष्ठ मुनींसमोर उभी राहून रुदन व आक्रोश करील करीत त्यांना म्हणाली, 'भगवन्, हे ब्रह्मपुत्र, आपण माझा त्याग केला आहे कीं काय? कारण, हे राजसैनिक मला आपणांजवळून ओढून नेत आहेत.'

ह्याप्रमाणें तिनें ब्रह्मर्षि वसिष्ठांना सांगितलें असतां दुःखित झालेली आपली भगिनीच कीं काय अशा रीतीनें ते ब्रह्मर्षि शोकानें हृदयसंतप्त झालेल्या त्या कामधेनूला म्हणाले, 'हे शबले, मी तुझा त्याग करीत नाहीं व तूं माझा कांहीं अपराधहि केला नाहींस. बलानें मत्त झालेला हा महाबलाढ्य राजा तुला नेत आहे. माझ्यापाशीं राजासारखें बल नाहीं. हा बलिष्ठ राजा क्षत्रिय व पृथ्वीपति असल्यामुळें मला अवध्य आहे; आणि विशेषतः मी आज त्याचें आदरातिथ्य केलें असल्यामुळें तर तो अवध्य आहेच आहे. हत्तीवरील निशाणें, गज, अश्व आणि रथ ह्यांनीं भरलेलें हें संपूर्ण अक्षौहिणी सैन्य त्याच्यापाशीं असल्यामुळें तो अत्यंत बलाढ्य आहे.'

वसिष्ठांचें हें भाषण ऐकून वचनाचें इंगित जाणणारी ती कामधेनू नम्र होऊन त्या अतुल तेजस्वी ब्रह्मर्षींना म्हणाली, 'ब्रह्मन्, क्षत्रियाचें बल अल्प असून ब्राह्मण क्षत्रियांपेक्षां बलवत्तर आहेत, असें म्हणतात. तेव्हां क्षात्रबलापेक्षां दिव्य ब्रह्मबल श्रेष्ठ आहे. आपलें बल अमर्याद आहे व आपलें तेजहि कोणाला जवळ येऊं देणारें नाहीं. सारांश, महावीर्यवान विश्वामित्र आपणांपेक्षां बलाढ्य नाहीं. हे महातेजस्वी मुने, मी आपल्या ब्रह्मबलानें युक्त आहें. तेव्हां मला आज्ञा करा म्हणजे मी त्या दुष्टाचा गर्व, बल आणि यत्न नाहींसा करितें.'

शतानंद पुढें म्हणतातः—"रामा, ह्याप्रमाणें तिनें प्रार्थना केली असतां, महायशस्वी वसिष्ठांनीं, 'शत्रूच्या बलाचा पाडाव करणारें बल तूं उत्पन्न कर' म्हणून तिला आज्ञा केली. तेव्हां त्यांची ती आज्ञा झालेली ऐकून सुरभीनें सैन्य उत्पन्न केलें. म्हणजे रामा, ती हंबरण्याबरोबर शेंकडों पल्हवसंज्ञक

म्लेंच्छ उत्पन्न झाले. आणि विश्वामित्राच्या समक्ष ते त्याच्या सर्व सैन्याचा नाश करूं लागले. हें पाहून तो राजा अत्यंत क्रुद्ध झाला, आणि क्रोधानें डोळे वटारून लहानमोठ्या शस्त्रांनीं त्या पल्हवांचा नाश करूं लागला. तेव्हां विश्वामित्रानें शेंकडों पल्हव जर्जर केलेले पाहून त्या कामधेनूनें पुनरपि यवनासहवर्तमान भयंकर शक उत्पन्न केले असतां उग्र तेज, प्रचंड वीर्य आणि सुवर्णतुल्य कांति ह्यांनीं युक्त असलेल्या त्या यवनमिश्रित शकांच्या योगानें तेथील सर्व भूमि व्याप्त झाली. आणि तीक्ष्ण तरवारी व पट्टे घेऊन पीतवस्त्र परिधान केलेल्या आणि म्हणूनच प्रज्वलित अग्नीप्रमाणें दिसत असलेल्या त्या यवनमिश्रित शकांनीं विश्वामित्राचें तें सर्व सैन्य दग्ध करून टाकिलें. तेव्हां महातेजस्वी विश्वामित्रानेंहि अस्त्रें सोडिलीं असतां त्यांच्या योगानें ते यवन, कांबोज, बर्बर वगैरे कामधेनूपासून उत्पन्न झालेले म्लेंच्छ व्याकुल झाले."

सर्ग पंचावन्नावा.

विश्वामित्रांचा पराभव.

"नंतर ते यवनप्रभृति विश्वामित्राच्या अस्त्रानें मोहित होऊन व्याकुल झालेले अवलोकन केल्यावर वसिष्ठांनीं कामधेनूला आज्ञा केली, 'हे कामधेनु, योगसामर्थ्यानें तूं आणखी सेना उत्पन्न कर.' तेव्हां तिच्या हंबरण्यापासून सूर्यासारखे तेजस्वी कांबोज उत्पन्न झाले आणि सडांपासून शस्त्रपाणी बर्बर उत्पन्न झाले. तसेंच योनिप्रदेशापासून यवन, गुदप्रदेशापासून शक आणि रोमकूपापासून म्लेंच्छ, हारित व किरात उत्पन्न झाले. पायदळ, हत्ती, अश्व व रथ ह्यांसहवर्तमान विश्वामित्राचें तें सर्व सैन्य त्यांनीं तत्क्षणीं नाहींसें करून टाकिलें. तेव्हां महात्म्या वसिष्ठानें सर्व सैन्याचा नाश केला, असें अवलोकन करून विश्वामित्राचे शंभर पुत्र अत्यंत क्रुद्ध झाले आणि नानाप्रकारचीं आयुधें धारण करून तपस्वीश्रेष्ठ वसिष्ठावर धावून गेले; परंतु त्या महर्षीनें हुंकारानेंच ते सर्व दग्ध करून टाकिले. सारांश, अश्व, रथ व पायदळ ह्यांसहवर्तमान ते विश्वामित्राचे पुत्र महात्म्या वसिष्ठानें एका क्षणांत भस्मरूप करून टाकिले. तेव्हां सर्व पुत्रांचा व सैन्याचा नाश झालेला पाहून महाकीर्तिमान विश्वामित्र राजा लज्जेनें खालीं मान घालून चिंताक्रांत झाला आणि

वेगरहित झालेला सागर, भग्नदंत झालेला सर्प अथवा राहुग्रस्त झालेला सूर्यच कीं काय असा तो एकाएकीं निस्तेज झाला. सारांश, पुत्र, सैन्य व उत्साह ह्या सर्वांचा नाश झाल्यामुळें पंख उपटलेल्या पक्ष्याप्रमाणें दीन झालेला तो विश्वामित्र खिन्न झाला आणि 'क्षात्रधर्मानें पृथ्वीचें परिपालन कर' असें सांगून आपला एक पुत्र राज्यावर बसविल्यानंतर तो वनामध्यें चालता झाला.

वनामध्यें जातांच किन्नर आणि उरग ह्यांनीं आश्रित असलेल्या हिमालयाच्या एका प्रदेशावर जाऊन तो महातपस्वी विश्वामित्र महादेव प्रसन्न होण्याकरितां तप करूं लागला. असें होतां होतां कांहीं काल लोटल्यावर, वर देण्यास उत्सुक होऊन देवाधिदेव वृषभध्वज शंकरांनीं महामुनि विश्वामित्राला दर्शन दिलें, आणि ते म्हणाले, 'हे राजा, तूं कशाकरितां तप करीत आहेस? तुला काय पाहिजे आहे? मी वर देण्यास उद्युक्त झालों आहें. तेव्हां तूं इच्छिला असशील तो वर मागून घे.'

विश्वामित्राला अस्त्रप्राप्ति व त्यांचा वसिष्ठांवर प्रयोग.

ह्याप्रमाणें देवांनीं सांगितलें असतां महातपस्वी विश्वामित्र महादेवाला साष्टांग नमस्कार घालून म्हणाला, 'हे महादेव, हे निष्पाप, आपण जर संतुष्ट झालां असाल, तर अंगें, प्रत्यंगें, मंत्र आणि रहस्य ह्यांसहवर्तमान मला धनुर्वेद द्या; आणि हे निष्पाप, देव, दानव, महर्षि, गंधर्व, यक्ष आणि राक्षस ह्यांचेपाशीं जीं अस्त्रें असतील त्यांची मला स्फूर्ति होवो. हे देवाधिदेव, आपल्या प्रसादानें माझी ही इच्छा परिपूर्ण व्हावी.' ह्याप्रमाणें विश्वामित्रानें वर मागितल्यावर 'ठीक आहे' असें म्हणून देवाधिदेव शंकर चालते झाले. तेव्हां अस्त्रें प्राप्त झाल्यावर आधींच महागर्विष्ठ असलेला बलाढ्य विश्वामित्र दर्पानें अगदीं भरून गेला आणि पर्वदिवशीं क्षुब्ध होणाऱ्या समुद्राप्रमाणें वीर्याच्या योगानें उचंबळूं लागलेला तो विश्वामित्र, ऋषिश्रेष्ठ वसिष्ठाचा नाश झालाच असें समजूं लागला. असो. तदनंतर वसिष्ठांच्या आश्रमाला गेल्यावर, आपल्या तेजाच्या योगानें तें तपोवन दग्ध करून टाकतील अशीं अस्त्रें त्या राजानें सोडिलीं. तेव्हां बुद्धिमान विश्वामित्राचा अस्त्रप्रयोग होत आहे असें पाहून शेंकडों मुनी भयभीत झाले आणि चोहोंकडे धावूं लागले. सारांश, वसिष्ठांचे शिष्य आणि त्या आश्रमांतील पशुपक्षी हे सर्वच भयभीत झाले आणि अनेक दिशांकडे पळत सुटले. ह्यामुळें महात्म्या वसिष्ठांच्या आश्रमांत अगदीं शुकशुकाट झाला, आणि माळाप्रमाणें एक क्षणभर त्यांत अगदीं सामसूम

झालें. तात्पर्य, ' धुकें नाहींसें करणाऱ्या सूर्याप्रमाणें आज ह्या गाधिपुत्र विश्वामित्राचा मी नाश करितों, भिऊं नका, ' असें वसिष्ठ मुनि वारंवार म्हणत असतांनाहि तिकडे लक्ष्य न देतां त्यांच्या आश्रमांतून सर्वजण निघून गेले. असो. ह्याप्रमाणें आश्रमांतील लोकांना सांगून महातेजस्वी तपस्वीश्रेष्ठ वसिष्ठ विश्वामित्रांना रागानें म्हणाले, ' पुष्कळ दिवसांपासून मीं वृद्धिंगत केलेल्या ह्या आश्रमाचा तूं नाश केला आहेस, त्याअर्थीं तूं मूढ व दुराचारी असल्याचें उघड होत आहे. ह्यास्तव, तूं आतां कायम राहणार नाहींस. ' ह्याप्रमाणें बोलून धूमरहित कालाग्निप्रमाणें अत्यंत क्रुद्ध झालेले वसिष्ठ साक्षात् यमदंडच कीं काय असा दंड सत्वर उगारून उभे राहिले.'

सर्ग छप्पन्नावा.

विश्वामित्रांच्या अस्त्रांचा नाश.

"ह्याप्रमाणें वसिष्ठांनीं सांगितल्यावर आग्नेय अस्त्र सोडण्याचा उद्देश मनांत आणून महाबलाढ्य विश्वामित्र 'उभा रहा, उभा रहा' असें वसिष्ठांना म्हणाले. तेव्हां दुसरा कालदंडच कीं काय असा ब्रह्मदंड उगारून भगवान वसिष्ठ क्रोधानें त्याला म्हणाले, ' हे क्षत्रियाधमा, हा मी उभा राहिलोंच आहें. आतां आपलें काय बल असेल तें दाखीव. हे गाधिपुत्रा, आज तुझा व तुझ्या शस्त्रांचा गर्व नाहींसा करून टाकितों. अरे, तुझें क्षत्रियबल कोणीकडे ! आणि हें प्रचंड ब्रह्मबल कोणीकडे ! हे क्षत्रियकलंका, माझें दिव्य ब्रह्मबल पहा. '

असें बोलून स्थित असलेल्या वसिष्ठ मुनींच्या ब्रह्मदंडानें त्या गाधिपुत्र विश्वामित्राचें घोर व अनुपम असें आग्नेयास्त्र, जलानें शांत होणाऱ्या अग्नीच्या वेगाप्रमाणें शांत झालें. तेव्हां वारुणि, रौद्र, ऐंद्र, पाशुपत व ऐषिक हीं अस्त्रें त्या क्रुद्ध झालेल्या गाधिपुत्र विश्वामित्रानें वसिष्ठांवर टाकिलीं. इतकेंच नव्हे, परंतु मानव, गांधर्व, स्वापन, जृंभण, मोहन, संतापन व विलापन, शोषण, दारण, अत्यंत दुर्जय असें वज्रास्त्र, ब्रह्मपाश, कालपाश, वरुणपाश, शिवाला प्रिय असलेलें पिनाक अस्त्र, शुष्क आणि आर्द्र ह्या नांवाचीं अशनिसंज्ञक अस्त्रें, दंडास्त्र, पैशाच, क्रौंचास्त्र, धर्मचक्र, कालचक्र, विष्णुचक्र, वायव्यास्त्र, मथनास्त्र, हयशिर:संज्ञक अस्त्र, कंकाल आणि मुसल ह्या दोन शक्ति,

महास्त्र, वैद्याधर, दारुण कालास्त्र, घोर असें त्रिशूल अस्त्र, आणि कपाल आणि कंकण हीं सर्व अस्त्रें गाधिपुत्र विश्वामित्रानें तपस्वीश्रेष्ठ वसिष्ठांवर टाकिलीं. तेव्हां फारच मोठें आश्चर्य झालें ! कारण ब्रह्मपुत्र वसिष्ठांनीं आपल्या दंडाच्याच योगानें तीं सर्व अस्त्रें ग्रासून टाकिलीं.

ह्याप्रमाणें तीं अस्त्रें व्यर्थ झाल्यावर गाधिपुत्र विश्वामित्रानें ब्रह्मास्त्र सोडिलें. तेव्हां तें अस्त्र सुटलेलें पाहून अग्निप्रभृति देव, देवर्षि, गंधर्व आणि महोरग हे अगदीं भांबावून गेले आणि तें ब्रह्मास्त्र सुटल्यावर सर्व त्रैलोक्य अगदीं त्रस्त झालें; परंतु हे रघुवंशजा रामा, ब्रह्मतेजानें युक्त असलेल्या ब्रह्मदंडाच्या योगानें तें महाघोर ब्रह्मास्त्रहि वसिष्ठांनीं ग्रासून टाकिलें. महात्मे वसिष्ठ ब्रह्मास्त्र ग्रासून टाकूं लागले असतां त्यांचें अतिभयंकर व उग्र रूप त्रैलोक्याला मूर्च्छित करूं लागलें. कारण महात्म्या वसिष्ठांच्या सर्व रोमछिद्रांतून धूमग्रस्त ज्वालांनीं युक्त असलेल्या अग्नीच्या ठिणग्या निघूं लागल्या, आणि दुसरा यमदंडच कीं काय असा हातामध्यें उगारलेला वसिष्ठांचा ब्रह्मदंड धूमरहित कालाग्नीप्रमाणें प्रज्वलित होऊं लागला. तेव्हां मुनिगण तपस्वीश्रेष्ठ वसिष्ठांची स्तुति करूं लागले कीं, ‘ ब्रह्मन्, तुमचें बल निष्फल होणारें नाहीं. आतां आपल्या तेजाच्याच योगानें आपण हें तेज आवरून धरा. हे ब्रह्मन्, महाबलाढ्य विश्वामित्राला आपण जिंकिलें. हे श्रेष्ठ, आपलें बल अमोघ आहे. आतां हे सर्व लोक निर्भय होवोत. ’

ह्याप्रमाणें मुनिगणांनीं प्रार्थना केली असतां महातेजस्वी व महातपस्वी वसिष्ठांनीं शमाचें अवलंबन केलें. नंतर सर्व प्रकारें वसिष्ठांनीं जेरीस आणिलेला विश्वामित्र सुस्कारा टाकून म्हणाला, ‘ धिक्कार असो त्या क्षत्रियबलाला. ब्रह्मतेजोबल हेंच खरें खरें बल होय. अरे, एका ब्रह्मदंडानें माझ्या सर्व अस्त्रांचा चुराडा होऊन गेला. तस्मात् हा सर्व प्रकार अवलोकन करून मी आतां आपलीं इंद्रियें व मन शांत करितों आणि ब्रह्मणत्व येण्यास कारण होईल असें प्रचंड तप करितों. ’

सर्ग सत्तावन्नावा.

विश्वामित्रांची तपश्चर्या.

"तदनंतर आपल्या पराजयाचें स्मरण होत असल्यामुळें अंतःकरण संतप्त झालेला आणि उस्मारून उस्मारून महात्म्या वसिष्ठांशीं वैर धरून राहिलेला महातपस्वी विश्वामित्र पत्नीसहवर्तमान दक्षिण दिशेस गेला, आणि तेथें फारच भयंकर तपश्चर्या करूं लागला. फलमूलें भक्षण करून त्या जितेंद्रिय विश्वामित्रानें उत्कृष्ठ तपश्चर्या केली. नंतर सत्य आणि धर्म ह्यांविषयीं तत्पर असलेल्या त्या विश्वामित्राला हविष्पंद, मधुष्पंद आणि महारथी दृढनेत्र म्हणून पुत्र झाले. असो. तपश्चर्येला हजार वर्षें पूर्ण झाल्यावर लोकपितामह ब्रह्मदेव तपोधन विश्वामित्राला मधुर शब्दांनीं म्हणाले, 'हे कुशिकपुत्रा, तूं आपल्या तपाच्या योगानें राजर्षींना प्राप्त होणारे लोक जिंकिले आहेस. ह्या तपाच्या योगानें 'राजर्षि' असें आम्ही तुला समजत आहों.'

ह्याप्रमाणें विश्वामित्राला सांगून ब्रह्मदेव देवांसहवर्तमान स्वर्गाला जाऊन ब्रह्मलोकाप्रत गेले. इकडे ब्रह्मदेवाचें तें भाषण श्रवण करून विश्वामित्रानें लज्जेमुळें किंचित् खालीं मान केली, आणि अत्यंत दुःखाकुल होऊन रागागारानें तो आपल्याशीं म्हणाला, 'अरे, मी फारच मोठें तप केलें असतांनाहि ऋषि-गणांसहवर्तमान हे सर्व देव ज्या अर्थीं मला राजर्षिच समजत आहेत, त्या अर्थीं ब्रह्मणत्व देण्याला योग्य होणारें ह्या तपाचें फल नाहीं, असें मला वाटतें. रामा, ह्याप्रमाणें मनाचा निश्चय झाल्यावर, पराकाष्ठेचा धैर्यवान असलेला तो महातपस्वी धर्मात्मा विश्वामित्र पुनरपि तपश्चर्या करूं लागला."

त्रिशंकूचें वृत्त

शतानंद सांगतात:—"रामा, त्याच वेळेला सत्यवादी आणि जितेंद्रिय असा त्रिशंकु म्हणून विख्यात असलेला इक्ष्वाकुकुलवर्धक राजा राज्य करीत होता. रामा, 'आपण यज्ञ करावा आणि देवतांचें उत्कृष्ठ स्थान जो स्वर्ग त्याप्रत स्वशरीरासहवर्तमान गमन करावें' असें त्या राजाच्या मनांत आलें. तेव्हां वसिष्ठांना हांक मारून त्यानें आपला उद्देश कळविला असतां, 'असें होणें अशक्य आहे' म्हणून महात्म्या वसिष्ठांनीं त्याला सांगितलें. वसिष्ठांनीं नाकारिल्यावर तो दक्षिण दिशेस गेला. नंतर शरिरासहवर्तमान स्वर्गाची प्राप्ति करून

देणारें कर्म सिद्ध होण्याकरितां तो राजा दीर्घ तपश्चर्या करणारे महातपस्वी वसिष्ठपुत्र तप करीत होते, त्यांच्याकडे गेला, आणि त्या महात्म्या सर्वांहि गुरुपुत्रांना क्रमानें त्यानें अभिवंदन केलें. नंतर लज्जेमुळें मुख किंचित् खालीं करून व हात जोडून तो त्या सर्वहि महात्म्यांना म्हणाला, 'इतरांचें रक्षण करण्यास मी समर्थ असतांनाहि माझें रक्षण करण्यास योग्य असलेल्या आपणांकडे मी शरण आलों आहें. आपलें कल्याण असो. महाक्रतु करण्याचें माझ्या मनांत असून महात्म्या वसिष्ठांनीं मला नाकारिलें आहे. करितां आपण तो महाक्रतु करण्याची अनुज्ञा द्या. सर्व गुरुपुत्रांना प्रणामपूर्वक मी शरण आलों आहें, आणि मस्तकानें प्रणाम करून आपणासारख्या तपोनिष्ठ ब्राह्मणांपाशीं मी याचना करीत आहें. ह्यास्तव शरिरासहवर्तमान स्वर्गाप्रत मला जातां यावें, एतदर्थ आपण स्वस्थांतःकरणपूर्वक माझ्याकडून यज्ञ करवा, म्हणजे मी शरिरासहवर्तमान देवलोकाप्रत जाईन. हे तपोधनहो, वसिष्ठांनीं मला नाकारिलें आहे. ह्यास्तव सर्व गुरुपुत्रांना शरण गेल्यावांचून मला कोणतीहि गति दिसत नाहीं. कारण, पुरोहित हाच काय तो सर्वांहि इक्ष्वाकुवंशजांचा मुख्य आधार होय. तस्मात् वसिष्ठांनंतर सर्व आपणच माझें दैवत आहां.'

सर्ग अठ्ठावन्नावा.

त्रिशंकूला शाप.

शतानंद सांगतातः—" रामा, त्रिशंकूचें तें सक्रोध भाषण ऐकून वसिष्ठांचे शंभर पुत्र त्या राजाला म्हणाले, 'हे दुष्टबुद्धे, सत्यवादी गुरूनें त्याग केला म्हणून तूं त्याचें अतिक्रमण करून आश्रयाकरितां दुसऱ्याकडे कसा गेलास? अरे, सर्व इक्ष्वाकुवंशजांना पुरोहित हाच मुख्य आश्रय आहे, आणि सत्यवादी वसिष्ठांच्या वचनाचें उल्लंघन होणें शक्य नाहीं. करितां, भगवान वसिष्ठ ऋषींनीं अशक्य म्हणून ज्या यज्ञाविषयीं सांगितलें, त्या यज्ञाचें अनुष्ठान करण्यास आम्ही कोणत्याहि प्रकारें समर्थ नाहीं. हे पुरुषश्रेष्ठा, तूं मूर्ख आहेस. आपल्या नगराप्रत परत जा. राजा, त्रैलोक्यप्राप्त्यर्थहि यज्ञ करण्याला भगवान वसिष्ठ आहेत, तेव्हां हा यज्ञ करण्याला ते समर्थ नाहींत, असें समजून आम्ही त्यांचा अवमान करण्यास कसें समर्थ होऊं?'

वसिष्ठपुत्रांचें तें सक्रोध भाषण श्रवण करून तो त्रिशंकु राजा पुनरपि त्यांना म्हणाला, 'हे तपोधनहो, ज्या अर्थी गुरु आणि गुरुपुत्रहि माझा त्याग करीत आहेत, त्या अर्थी मी आतां दुसऱ्याचा आश्रय करितों. तुमचें कल्याण असो.' नंतर ज्यांतील उद्देश भयंकर आहे असें तें राजाचें भाषण श्रवण केल्याबरोबर ते गुरुपुत्र अतिशय क्रुद्ध झाले आणि 'तूं चांडाल होशील' म्हणून त्यांनीं त्याला शापहि दिला. ह्याप्रमाणें शाप देऊन ते महात्मे आपापल्या आश्रमांत प्रविष्ठ झाले व ती रात्र उजाडल्यावर त्रिशंकु राजाहि चांडाल बनला. त्याचें वस्त्र नीलवर्णाचें झालें. शरिराची कांति रुक्ष होऊन मस्तकावरील केंश आंखुड झाले. पुष्पें आणि भस्मरूप उटी त्याच्या शरिराचे ठिकाणीं दिसूं लागली आणि अंगावरील भूषणेंहि लोहमय झालीं !"

त्रिशंकूचें विश्वामित्रांकडे आश्रयार्थ गमन.

शतानंद पुढें सांगतातः—"रामा, तेव्हां त्या चांडालरूपी राजाला अवलोकन करितांक्षणींच सर्व मंत्री, नगरवासी जन व त्यांचे अनुयायी एकत्र होऊन निघून गेले. असें झालें असतां, रात्रंदिवस मनामध्यें जळत असलेला तो महाधैर्यवान राजा तपोधन विश्वामित्राकडे गेला. तेव्हां जन्म निरर्थक झालेल्या त्या चांडालरूपी राजाला पाहून विश्वामित्र मुनींना दया आली, आणि ते महातेजस्वी अत्यंत धार्मिक मुनि दयेमुळें, त्या उग्र दिसणाऱ्या राजाला म्हणाले, 'हे महाबलाढ्य राजपुत्रा, तुझें कल्याण असो. शापामुळें चांडालत्व प्राप्त झालें असतांना तूं कशाकरितां येथें आला आहेस ?' विश्वामित्राचें हें भाषण ऐकून भाषणाचें मर्म जाणणारा तो चांडाल बनलेला राजा संभाषण करण्यामध्यें निपुण असलेल्या विश्वामित्रांना हात जोडून म्हणाला, 'गुरूनें व त्याचप्रमाणें गुरुपुत्रांनींहि माझी पर्वा ठेविली नाहीं. ह्यामुळें ज्या उद्देशानें मी त्यांच्याकडे गेलों होतों, तो उद्देश सिद्धीस न जातां उलटा हा जातिभ्रंशरूप विपरीत प्रकार मात्र झाला आहे. हे सौम्यदर्शन, शरिरासहवर्तमान स्वर्गास जावें अशी माझी इच्छा आहे, आणि त्याकरितां मीं शंभर क्रतूहि केले आहेत. परंतु त्या क्रतूंचें सदेहस्वर्गप्राप्तिरूप फल मला प्राप्त होत नाहीं. हे सौम्य, मीं अनृत भाषण आजपर्यंत कधीं केलें नाहीं व संकटांत सांपडलों असतांहि पुढें कधीं करणार नाहीं, हें मीं आपणाला क्षत्रधर्म स्मरून सांगत आहें. मीं नानाप्रकारचे यज्ञ केले. धर्मानें प्रजांचें परिपालन केलें व आपल्या सच्छील आचरणानें महात्म्या गुरूला संतुष्ट केलें. परंतु हे मुनिश्रेष्ठ, धर्माविषयीं उद्युक्त राहून सांप्रत मला यज्ञ करण्याची इच्छा

झाली असतांनाहि गुरूंना त्यापासून संतोष होत नाहीं. तेव्हां प्रयत्न व्यर्थ असून दैवच श्रेष्ठ आहे, असें मला वाटतें. कारण दैवानेंच सर्व कांहीं व्यापून टाकिलें आहे, आणि म्हणूनच दैव हाच पुरुषाचा मुख्य आधार आहे. तस्मात् दैवामुळेंच ज्याचें कर्म हाणून पडलें आहे अशा मज अत्यंत दुःखित कृपाभिलाष्यावर आपली कृपा व्हावी. मी आतां दुसऱ्या कोणाचेंहि अवलंबन करणार नाहीं. ह्या प्रसंगीं आपणावांचून माझें रक्षण करणारा दुसरा कोणी नाहीं. करितां यत्नानें आपण माझें दैव हाणून पाडावें."

सर्ग एकुणसाठावा.

त्रिशंकूच्या यज्ञाला ऋषींना निमंत्रण.

साक्षात् चांडालत्व प्राप्त झालेल्या त्या राजानें ह्याप्रमाणें भाषण केलें असतां कुशिकवंशज विश्वामित्र दयेमुळें त्याला म्हणाले, 'हे इक्ष्वाकुवंशजा, तुझें स्वागत असो. वत्सा, तूं अत्यंत धार्मिक आहेस, हें मी समजत आहें. हे नृपश्रेष्ठा, भिऊं नको, मी तुझें रक्षण करीन. मी पुण्यकर्म करणाऱ्या सर्व महर्षींना यज्ञाला साहाय्य करण्याकरितां निमंत्रण करीन. आणि असें झालें असतां तूं सुखानें आपला याग शेवटास नेशील. गुरुशापामुळें जें रूप तुला प्राप्त झालें आहे, त्या रूपासह तूं सदेह स्वर्गास जाशील. राजा, ज्या अर्थी तूं शरण जाण्यास योग्य अशा कुशिकवंशज विश्वामित्राला शरण आला आहेस, त्याअर्थी तुला स्वर्ग प्राप्त होणें ही गोष्ट अगदीं हातची आहे, असें मी समजत आहें.'

ह्याप्रमाणें राजाला सांगून त्या महातेजस्वी विश्वामित्रानें आपल्या बुद्धिमान व अत्यंत धार्मिक पुत्रांना यज्ञसामुग्री जुळविण्याविषयीं आज्ञा केली, आणि सर्व शिष्यांना हांक मारून त्यांना सांगितलें कीं, 'वसिष्ठपुत्रांसहवर्तमान सर्व ऋषींना माझ्या आज्ञेनें येथें घेऊन या, आणि चांगले बहुश्रुत असे जे माझे सुहृद असतील, त्यांनाहि ऋत्विज व शिष्य ह्यांसहवर्तमान येथें आणा, आणि माझा निरोप ऐकल्यावर बोलण्याची स्फूर्ति होऊन जो कोणी काय बोलेल, तें निंदात्मक असलें तरी सर्व माझ्यापाशीं उलट येऊन सांगा.'

वसिष्ठपुत्रांना शाप.

हें विश्वामित्राचें भाषण श्रवण करून ते शिष्य त्याच्या आज्ञेप्रमाणें चोहोंकडे

गेले असतां सर्व देशाहून ब्रह्मवेत्ते मुनी आले. नंतर परत आलेले ते शिष्य उज्ज्वल तेजानें युक्त असलेल्या विश्वामित्र मुनींची गांठ घेऊन त्या सर्व ब्रह्मवेत्त्यांचें सर्व कांहीं भाषण त्याला सांगूं लागले कीं, 'हे मुनिश्रेष्ठ, आपला निरोप ऐकून सर्व ब्राह्मण येत आहेत. महोदय[1] ऋषीखेरीज सर्व देशांतील मुनी आलेच असें आपण समजा. मुने, क्रोधामुळें ज्यांतील वर्णोच्चारहि स्पष्ट होत नव्हता, असें वसिष्ठ मुनींच्या शंभरहि पुत्रांनीं जें आपणांला उद्देशून भाषण केलें, तें सर्व आपण ऐका.' ते म्हणाले, 'ज्याचा आणि विशेषेंकरून ज्या चांडालाचा याजक क्षत्रिय आहे, त्याच्या यज्ञामध्यें देव व ऋषी हविर्भाग कसा ग्रहण करतील? अथवा विश्वामित्र जरी पालन करणारा असला, तरी चांडलाचें अन्न भक्षण करून महात्मे ब्राह्मण तरी स्वर्गाला कसे जातील?' तें त्या सर्व शिष्यांचें भाषण श्रवण केल्यावर मुनिश्रेष्ठ विश्वामित्राचे नेत्र क्रोधानें आरक्तवर्ण झाले आणि रागारागानें ते म्हणाले, 'ज्या अर्थीं उग्र तपःश्चर्येचें अवलंबन करून असलेल्या मज निर्दोष मुनीला हे दोष लावीत आहेत, त्या अर्थीं ह्या दुरात्म्यांचें निःसंशय भस्म होऊन जाईल. आज कालपाशाच्या योगानें ते यमसदनीं पोहोंचते होतील, आणि मृतावर उपजीविका करून सातशें जन्मपर्यंत ते राहतील. सारांश, श्वानमांस हाच त्यांचा आहार होईल; आणि निर्दय, कुरूप व अक्राळविक्राळ असे ते डोंब होऊन ह्या लोकांमध्यें संचार करतील. त्याचप्रमाणें मी दूषणास योग्य नसतांनाहि ज्या अर्थीं दुर्बुद्धि महोदयानें मला दूषण दिलें आहे, त्या अर्थीं सर्व लोकांमध्यें दूषित होऊन तो निषादाचे जन्मास जाईल. निर्दय बनल्यामुळें प्राण्यांचा प्राण घेण्याविषयीं तो उद्युक्त राहील. अशा रीतीनें माझ्या क्रोधामुळें पुष्कळ काल लोटेपर्यंत त्याला दुःखद स्थिति प्राप्त होईल.' याप्रमाणें ऋषींमध्यें बोलून महातपस्वी व महातेजस्वी कुशिकवंशज विश्वामित्र स्वस्थ बसले.

सर्ग साठावा.

त्रिशंकूचें सदेह स्वर्गगमन.

आपल्या तपःसामर्थ्यानें महोदयासहवर्तमान वसिष्ठपुत्रांचा नाश झाला असें समजून महातेजस्वी विश्वामित्र ऋषींमध्यें म्हणाले, 'त्रिशंकु म्हणून विख्यात

१ वसिष्ठपुत्रांपैकीं एक.

असलेला हा इक्ष्वाकुवंशज धर्मनिष्ठ व उदार असून हा आपल्या शरिरासहवर्तमान देवलोकप्राप्ति होण्याच्या उद्देशानें मला शरण आलेला आहे. करितां हा स्वशरिरासहवर्तमान देवलोकीं गमन करील. अशा रीतीनें आपण माझ्याबरोबर यज्ञाला आरंभ करावा.' हें विश्वामित्रांचें भाषण श्रवण करून ते सर्वहि धर्मज्ञ मुनी एके ठिकाणीं जुळले, आणि धर्माला अनुसरुन अशा रीतीनें आपापसांत म्हणूं लागले कीं, 'हा कुशिकवंशज मुनि पराकाष्ठेचा कोपी आहे. तेव्हां यानें जें सांगितलें आहे, तें नीट रीतीनें आपणांला तडीस नेलें पाहिजे, ह्यांत संशय नाहीं. कारण आपण जर असें न केलें, तर अग्नितुल्य भगवान विश्वामित्र क्रोधानें आपणांला शाप देईल. तस्मात् विश्वामित्राच्या तेजानें हा इक्ष्वाकुवंशज त्रिशंकु शरिरासहवर्तमान स्वर्गास जाईल. अशा रीतीनें यज्ञाला आरंभ करणें अवश्य आहे. तेव्हां यज्ञाला आरंभ करा आणि आपण सर्वजण आपापल्या अनुष्ठानाला लागा.'

ह्याप्रमाणें आपापसांत बोलून त्या महर्षींनीं यज्ञकर्मांना आरंभ केला. त्या यागामध्यें महातेजस्वी विश्वामित्र अध्वर्यु झाला व मंत्रवेत्त्या ऋत्विजांनींहि सर्व कर्में समंत्रक, यथाशास्त्र व यथाविधि केलीं. तदनंतर बऱ्याच वेळानें महातपस्वी विश्वामित्रानें हविर्भाग ग्रहण करण्याकरितां सर्व देवतांना आवाहन केलें; परंतु हविर्भागाकरितां एकहि देवता तेथें येईना. तेव्हां महामुनि विश्वामित्र कोपानें व्याप्त झाले आणि स्रुवा हातांत घेऊन रागारागानें त्रिशंकूला म्हणाले, 'राजा, स्वतः संपादन केलेल्या माझ्या तपाचें सामर्थ्य आतां पहा. हा मी आपल्या सामर्थ्याच्या योगानें स्वतःच्या शरिरासहवर्तमान तुला स्वर्गाला नेतों. राजा, स्वशरिरासहवर्तमान प्राप्त होण्याला दुर्घट असलेल्या स्वर्गाला तूं जा. तपाचें फल मीं कांहीं स्वसंपादित करून ठेविलें आहे. करितां, त्याच्या तेजानें तूं शरिरासहवर्तमान स्वर्गास गमन कर.'

त्रिशंकूचें स्वर्गाहून पतन.

शतानंद पुढें सांगतातः—"रामा, ह्याप्रमाणें विश्वामित्र मुनींनीं शब्द उच्चारिले असतां, इतर मुनींचे समक्ष तो राजा, शरिरासह स्वर्गाला गेला. असो. इकडे त्रिशंकु स्वर्गलोकाला आल्याचें अवलोकन करून इंद्र सर्व देवगणांसह त्याला म्हणाला, 'हे त्रिशंको, तूं पुनरपि खालीं चालता हो. स्वर्गामध्यें राहण्याची तुझी योग्यता नाहीं. अरे, गुरुशापानें तूं दग्ध झाला आहेस. करितां हे मूढा, अधोमुख होऊन तूं भूमीवर पड.'

प्रतिसृष्टीची उत्पत्ति.

ह्याप्रमाणें महेंद्रानें सांगितलें असतां, तपोधन विश्वामित्रांना उद्देशून, 'त्राहि त्राहि' म्हणून आक्रोश करीत करीत त्रिशंकु पुनरपि खालीं आला. परंतु आक्रोश करीत खालीं येणाऱ्या त्रिशंकूचे ते शब्द ऐकतांक्षणीं कुशिकवंशज विश्वामित्र अत्यंत क्रुद्ध झाले, आणि 'उभा रहा, उभा रहा' असें त्याला म्हणाले. नंतर प्रतिब्रह्मदेवच कीं काय अशा त्या तेजस्वी विश्वामित्रानें प्रति-सृष्टी निर्माण करण्याच्या उद्देशानें दक्षिणमार्गस्थ असे दुसरे सप्तर्षिहि उत्पन्न केले. क्रोधानें व्याप्त होऊन ऋषींमध्यें असलेल्या त्या महातपस्वी विश्वामित्र मुनीनें दाक्षिण दिशेचें अवलंबन करून नक्षत्रमाला उत्पन्न केली. नक्षत्रमाला उत्पन्न केल्यावरहि क्रोधानें कलुषित झालेला तो विश्वामित्र मुनि 'मी दुसरा इंद्र उत्पन्न करीन अथवा माझी सृष्टि इंद्ररहितच कां असेना' असें म्हणत म्हणत रागारागानें देवताहि दुसऱ्या उत्पन्न करूं लागला. तेव्हां ऋषिगणां-सहवर्तमान देव व दैत्य पराकाष्ठेचे घाबरून गेले आणि महात्म्या विश्वा-मित्राला सांत्वनपूर्वक म्हणाले, 'हे महाभाग्यवान तपोधन, गुरुशापानें हा राजा दग्ध झाला असल्यामुळें शरिरासहवर्तमान स्वर्गाप्रत गमन करण्यास हा योग्यच नाहीं.'

हें त्या देवांचें भाषण श्रवण करून कुशिकवंशज मुनिश्रेष्ठ विश्वामित्रानें त्या सर्व देवतांना फारच मोठ्या निश्चयाचे शब्द सांगितले. तो म्हणाला, 'तुमचें कल्याण असो. शरिरासहवर्तमान ह्या त्रिशंकुराजाच्या स्वर्गारोहणाची जी मीं प्रतिज्ञा केली आहे, ती असत्य करण्याची माझी इच्छा नाहीं. करितां शरिरासहवर्तमान ह्या त्रिशंकु राजाला अक्षय स्वर्गप्राप्ति झालीच पाहिजे; आणि हीं माझीं सर्व नक्षत्रें त्रैलोक्य कायम राहीपर्यंत सर्व प्रकारें कायम राहिलीं पाहिजेत. सारांश, देवहो, ज्या त्रिशंकु राजाकरितां हीं मीं उत्पन्न केलीं आहेत, त्याकरितां तीं कायम राहण्याविषयीं तुम्हां सर्वांची अनुज्ञा असावी.'

ह्याप्रमाणें विश्वामित्रानें सांगितलें असतां सर्व देव त्या मुनिश्रेष्ठ विश्वामित्राला म्हणाले, 'असें होईल. तुझें कल्याण असो. वैश्वानरसंज्ञक ज्योतिश्चक्रमार्गाचे बाहेर आकाशामध्यें हीं तुझीं नक्षत्रें सर्व प्रकारें कायम राहतील व त्या नक्षत्रां-मध्यें हा देवतुल्य त्रिशंकु अधोमुख होऊन झळकत राहील. इतकेंच नव्हे, परंतु हीं तुझीं नक्षत्रें स्वर्गलोकाप्रत प्राप्त झाल्याप्रमाणें कृतार्थ झालेल्या ह्या कीर्तिमान नृपश्रेष्ठ त्रिशंकूची अनुयायी होतील.' असें सांगितल्यावर धर्मात्म्या

विश्वामित्राची सर्व देवांनीं ऋषींमध्यें प्रशंसा केली असतां 'ठीक आहे' म्हणून त्या महातेजस्वी विश्वामित्रानें देवतांना सांगितलें. नंतर यज्ञ समाप्त झाल्यावर ते महात्मे देव व तपोधन ऋषी हे सर्व आल्या मार्गानें परत गेले."

सर्ग एकसष्टावा.

शनुःशेपाचें वृत्त.

शतानंद म्हणतात:—"रामा, ते ऋषी चालूं लागलेले पाहून, महातेजस्वी विश्वामित्र तपोवनांत राहणाऱ्या त्या सर्वांना म्हणाला, 'अहो, दक्षिण दिशा व्याप्त करून राहिलेला हा त्रिशंकु एक आपल्या तपाला मोठें विघ्नच होऊन बसला आहे. ह्यामुळें आतां हा प्रदेश तपश्चर्येला योग्य नाहीं. करितां आपण दुसऱ्या दिशेला जाऊं आणि तेथें तपश्चर्या करूं. ह्या अफाट पश्चिम दिशेस पुष्कर तीर्थाचे तीरीं आपण सुखानें तपश्चर्या करूं. कारण, तें तपोवन सुखावह आहे.' ह्याप्रमाणें त्यानें सांगितल्यावर तो महातेजस्वी मुनिश्रेष्ठ विश्वामित्र फलमूलांवर उपजीविका करून इतरांना अशक्य असें घोर तप करूं लागला. असो. ह्याच वेळीं अंबरीष म्हणून प्रसिद्ध असलेल्या महात्म्या अयोध्याधिपतीनें यज्ञाला आरंभ केला होता. त्याचा यज्ञ चालला असतांना इंद्रानें पशु हरण करून नेला. तेव्हां पशु दिसेनासा झाल्यावर पुरोहित राजाला म्हणाला, 'राजा, तुझ्या पातकामुळें पशु कोणीं हरण केला आहे, तो दिसत नाहीं. हे प्रजाधिपते, प्रजांचें परिपालन न करणाऱ्या राजाला दोष लागत असतात. हे पुरुषश्रेष्ठा, अरे ही गोष्ट म्हणजे मोठेंच प्रायश्चित्त पाडणारी आहे. ह्यास्तव, ह्या पशूच्या ऐवजीं नरपशु तरी सत्वर घेऊन ये, म्हणजे अनुष्ठान सुरूं होईल.' हें उपाध्यायाचें भाषण श्रवण करून तो पुरुषश्रेष्ठ महाविचारी अंबरीष राजा, गेलेल्या पशूचे अभावीं द्रव्य घेऊन कोणी आपला पुत्र देत असल्यास पहावा एतदर्थ हजारों गाई बरोबर घेऊन नरपशु मिळविण्याकरितां निघाला. तो भूपति नानाप्रकारचे देश, नगरें, वनें आणि पवित्र आश्रम धुंडीत चालला असतां, भृगुतुंग पर्वतावर पुत्र व भार्या ह्यांसहवर्तमान बसलेल्या ऋचीक मुनींना त्यानें अवलोकन केलें. तेव्हां अतुल प्रभेनें युक्त असलेला तो महातेजस्वी अंबरीष राजर्षि तपानें देदीप्यमान असलेल्या ऋचीक महर्षींना प्रणाम

करून सर्व प्रकारें प्रश्न विचारल्यावर त्यांना प्रसन्न करून घेऊन म्हणाला, 'हे भगवन्, हे भार्गव, एक लक्ष गाई घेऊन जर आपण पशूकरितां आपला पुत्र विकत देत असाल, तर मी कृतकृत्य होईन. मीं सर्व देश धुंडिला, परंतु नाहींसा झालेला यज्ञीय पशु मला मिळत नाहीं ह्यास्तव किंमत घेऊन आपण ह्या पुत्रांपैकीं एक पुत्र मला द्यावा.'

ह्याप्रमाणें अंबरीष राजानें प्रार्थना केली असतां महातेजस्वी ऋचीक मुनि त्याला म्हणाले, 'हे पुरुषश्रेष्ठा, कांहीं झालें तरी मी ज्येष्ठ पुत्र विकणार नाहीं.' हें ऋचीक मुनींचें भाषण श्रवण केल्यावर त्या पुत्रांची माता पुरुषश्रेष्ठ अंबरीषाला म्हणाली, 'भगवान, भार्गव मुनींनीं ज्येष्ठ पुत्र विकावयाचा नाहीं म्हणून सांगितलें; आणि हे प्रभो, हा कनिष्ठ पुत्र शुनक तर माझा आवडता आहे, असें तूं समज. तस्मात् राजा, मी कनिष्ठ पुत्र तुला देणार नाहीं. हे पुरुषश्रेष्ठा, प्रायः ज्येष्ठ पुत्र पित्यांना प्रिय असतात आणि कनिष्ठ पुत्र मातांना प्रिय असतात. तस्मात् मी कनिष्ठ पुत्रा राखून ठेवणार.'

ह्याप्रमाणें ऋचीक मुनींनीं व त्यांच्या पत्नीनें सांगितलें असतां, मधला पुत्र शुनःशेप स्वतःच म्हणाला, 'ज्येष्ठ पुत्र विकावयाचा नाहीं म्हणून पिता म्हणत आहे, आणि कनिष्ठ पुत्र विकावयाचा नाहीं, म्हणून माता म्हणत आहे. ह्यावरून मधला पुत्र विकण्याला हरकत नाहीं, असें मला वाटतें. करितां हे राजपुत्रा, तूं मला ने.' ह्याप्रमाणें त्या ब्रह्मवेत्त्या शुनःशेपानें सांगितल्यावर, उत्तम प्रभेनें युक्त असलेलें क्रोडोगणती सुवर्ण, रत्नांच्या राशी व एक लक्ष गाई शुनःशेपाकरितां अंबरीष राजानें ऋचीक मुनींना दिल्या; आणि अत्यंत प्रसन्न झालेला तो महातेजस्वी व महायशस्वी अंबरीष राजर्षि शुनःशेपाला रथावर घालून विलंब न करितां चालता झाला."

सर्ग बासष्टावा.

शुनःशेपाचें वृत्त. (पुढें चालू)

शतानंद म्हणतातः—"हे रघुनंदना, शुनःशेपाला घेऊन निघालेल्या त्या महायशस्वी अंबरीष राजानें पुष्कर तीर्थासमीप विश्रांति घेतली. तीर्थांमध्यें श्रेष्ठ अशा पुष्कर तीर्थासमीप येऊन तो अंबरीष राजा विश्रांतीकरितां उतरून

लागला असतां, अत्यंत दुःखित झालेल्या महायशस्वी शुनःशेपानें तेथें ऋषीं-सहवर्तमान तपश्चर्या करीत असलेल्या आपल्या मातुल विश्वामित्राला अवलोकन केलें, आणि तृषेनें व श्रमानें अगदीं म्लानवदन होऊन दीन झालेला तो शुनःशेप विश्वामित्राच्या मांडीवर पडून त्याला म्हणाला, 'हे मुने, मला माता नाहीं व पिताहि नाहीं. तेव्हां नातेवाईक आणि बांधव कोठून असणार? हे सौम्य, हे मुनिश्रेष्ठ, धर्मानें आपण माझें रक्षण करा. हे पुरुषश्रेष्ठा, माझा रक्षक तूंच असून शरण आलेल्या सर्वांचें पालन करणाराहि तूंच आहेस. राजा कृतकृत्य व्हावा आणि मीहि अक्षय्य दीर्घायु राहून व उत्कृष्ठ तपश्चर्या करून स्वर्गलोकाप्रत जावें. ह्यास्तव उदार अंतःकरणानें आपण मज अनाथाचे नाथ व्हां आणि हे धर्मनिष्ठ, पुत्राचें रक्षण करणाऱ्या पित्याप्रमाणें आपण माझें ह्या संकटापासून रक्षण करा.'

हें त्याचें भाषण श्रवण करून महातपस्वी विश्वामित्रांनीं त्याचें नानाप्रकारें सांत्वन केलें; आणि आपल्या पुत्रांना ते म्हणाले, 'ज्या पारलौकिक हित-संपादनाकरितां शुभेच्छु पितर पुत्र उत्पन्न करीत असतात, त्याचा हा काल प्राप्त झाला आहे. हा बालक ऋषिपुत्र माझ्या हातून रक्षणाची इच्छा करीत आहे. ह्यास्तव हे पुत्रहो, जीवदान देऊन तुम्ही ह्याचा मनोरथ शेवटास न्या. तुम्ही सर्व सत्कर्म करणारे असून धर्मनिष्ठ आहां. तस्मात् तुम्ही पशू बनून अंबरीष राजाचा अग्नि तृप्त करा, म्हणजे शुनःशेप सनाथ होईल, यज्ञ निर्विघ्न-पणें पार पडेल, देवता तृप्त होतील आणि माझीहि आज्ञा तुम्ही पाळल्या-प्रमाणें होईल.'

शतानंद पुढें सांगतात:—"हे पुरुषश्रेष्ठा रामा, विश्वामित्र मुनींचें हें भाषण श्रवण केल्यावर त्याचे मधुच्छंदप्रभृति पुत्र अभिमानानें हंसत हंसत त्याला म्हणाले, 'हे प्रभो, तूं आपल्या पुत्रांना खर्चीं घालून दुसऱ्याच्या पुत्राचें कसें रक्षण करीत आहेस? हें तुझें करणें भोजनामध्यें श्वानाचें मांस स्वीकारल्या-प्रमाणें आम्हांला अयोग्य दिसत आहे.' पुत्रांचें हें भाषण श्रवण केल्यानंतर मुनिश्रेष्ठ विश्वामित्र क्रोधानें नेत्र आरक्त करून त्यांना बोलूं लागले, 'तुम्हीं जें हें माझ्या आज्ञेचें उल्लंघन करून अंगावर कांटा येण्यासारखें भयंकर भाषण केलें आहे, तें माझें भय न बाळगितां केलें आहे, व धर्मदृष्टीनेंहि हें तुमचें भाषण निंद्य आहे. ह्यास्तव तुम्ही सर्व श्वानमांस भक्षण करून मुष्टिक जाती-

मध्यें रहाल, आणि वसिष्ठ पुत्रांप्रमाणें एक हजार वर्षें पूर्ण होईपर्यंत ह्या पृथ्वीवर वास्तव्य कराल.'

ह्याप्रमाणें पुत्रांना शाप दिल्यावर आणि सर्वदु:खनाशक रक्षामंत्रानें त्या शुन:शेपाचें रक्षण केल्यावर तो मुनिश्रेष्ठ विश्वामित्र त्या दु:खिताला म्हणाला, 'दर्भरज्जूंनीं बद्ध आणि रक्तपुष्पें व रक्तगंध ह्यांनीं युक्त होऊन तूं विष्णुदैवत्य यूपापाशीं आलास, म्हणजे मंत्रांनीं अग्नीचें स्तवन कर. हे ऋषिपुत्रा, ह्या महाराज अंबरीषाच्या यज्ञामध्यें तूं हे दोन गाथामंत्र म्हण, म्हणजे तुझा मनोरथ पूर्ण होईल.'

ह्याप्रमाणें विश्वामित्रानें सांगितल्यावर स्वस्थचित्त होऊन शुन:शेपानें त्या दोन गाथामंत्रांचा स्वीकार केला. नंतर त्वरेनें त्या नृपश्रेष्ठ अंबरीषापाशीं येऊन तो म्हणाला, 'हे महाबुद्धिमंता, आतां आपण सत्वर जाऊं. राजेंद्रा, तूं यज्ञमंडपाकडे चल आणि यज्ञदीक्षा शेवटास ने.' हें त्या ऋषिपुत्राचें भाषण श्रवण केल्यावर अंबरीष राजाला आनंद झाला, व तो अगदीं दक्ष राहून सत्वर यज्ञमंडपाकडे गेला. नंतर सदस्यांच्या अनुमतानें, ज्याचे ठिकाणीं पवित्र अशा दर्भरज्जूंनीं चिन्ह केलेलें आहे व ज्याला रक्तवस्त्रांनीं वेष्टिलेलें आहे अशा त्या शुन:शेपाला पशु बनवून अंबरीष राजानें यूपाशीं (यज्ञस्तंभाशीं) बांधिलें. तदनंतर त्या ऋषिपुत्र शुन:शेपानें इंद्र आणि विष्णु ह्या देवांची उत्कृष्ट मंत्रांनीं यथायोग्य स्तुति केली. तेव्हां गुप्त स्तुतीच्या योगानें इंद्र संतुष्ट झाला व शुन:शेपावर प्रसन्न होऊन त्या इंद्रानें त्याला दीर्घायुष्य दिलें. इंद्राच्या कृपेनें त्या अंबरीष राजालाहि त्या यज्ञाचें फल पुष्कळपटीनें प्राप्त झालें. असो. तदनंतर महातपस्वी धर्मात्म्या विश्वामित्रानेंहि पुष्कर तीर्थावर आणखी एक हजार वर्षेंपर्यंत तपश्चर्या केली."

सर्ग त्रेसष्टावा.

विश्वामित्रांना महर्षिपदप्राप्ति.

"पुष्कर तीर्थाचे ठिकाणीं विश्वामित्राची पूर्ण हजार वर्षें तपश्चर्या झाल्यावर, तपोव्रत समाप्त करून स्नान केलेल्या महामुनि विश्वामित्राकडे सर्व देव तपाचें फल देण्याकरितां आले. तेव्हां ब्रह्मदेव फारच मधुर वाणीनें विश्वामित्राला

म्हणाले, 'स्वसंपादित अशा पुण्यकर्मांच्या योगानें तूं ऋषि झाला आहेस. तुझें कल्याण असो.'

ह्याप्रमाणें सांगून ब्रह्मदेव स्वर्गास गेल्यावर महातेजस्वी विश्वामित्रानें पुन: मोठी तपश्चर्या आरंभिली. रामा, त्याची तपश्चर्या सुरू होऊन बराच काल लोटल्यावर मेनका नामक श्रेष्ठ अप्सरा पुष्कर तीर्थावर येऊन स्नान करूं लागली. तेव्हां मेघांतील विद्युल्लताच कीं काय अशा प्रकारें रूपानें अप्रतिम असलेल्या त्या मेनकेला विश्वामित्रानें अवलोकन केलें, आणि मदनाच्या कचाट्यांत सांपडून तो मुनि तिला म्हणाला, 'हे अप्सरे, तुझें स्वागत असो. तूं येथें माझ्या आश्रमामध्यें रहा. तुझें कल्याण असो. मदनानें मोहित झालेल्या मजवर तूं अनुग्रह कर.'

विश्वामित्राचें हें भाषण ऐकून ती सुंदरी मेनका तेथें राहिली व तें एक तपश्चर्येचें मोठें विघ्नच विश्वामित्राला प्राप्त झालें. रामा, विश्वामित्राच्या शांत आश्रमामध्यें ती वास्तव्य करूं लागली असतां विश्वामित्राचीं दहा वर्षें सुखानें गेलीं. तिच्या समागमामध्यें तितका काल लोटल्यावर महामुनि विश्वामित्र चिंता व शोक ह्यांनीं अगदीं व्याप्त होऊन लज्जित झाल्यासारखा झाला, आणि क्रुद्ध झालेल्या त्या मुनीच्या मनामध्यें असा विचार आला कीं, 'हें सर्व तपोनाशक महाकर्म देवांचेंच आहे. अरे, काममोहानें मी ग्रस्त झाल्यामुळें दहा वर्षें एका दिवसाप्रमाणें निघून गेलीं अं! अरे, ही अप्सरा हें एक विघ्नच उपस्थित झालें आहे.' ह्याप्रमाणें उस्मारत असलेला तो मुनिश्रेष्ठ विश्वामित्र पश्चात्तापानें अतिशय दु:खित झाला आणि मेनका अप्सरा भयभीत होऊन कांपत कांपत हात जोडून उभी राहिली आहे, असें अवलोकन केल्यावर मधुर शब्दांनीं तिला निरोप देऊन उत्तर पर्वतावर चालता झाला."

शतानंद सांगतात:—"रामा, नंतर काम जिंकण्याकरितां कडकडीत ब्रह्मचर्य पाळण्याविषयीं निश्चय करून, तो महायशस्वी विश्वामित्र कौशिकी नदीचे तीरीं जाऊन इतरांना होण्यास अशक्य असें तप करूं लागला. ह्याप्रमाणें तो हजारों वर्षें उत्तर पर्वतावर घोर तपश्चर्या करूं लागला असतां देवतांना भय उत्पन्न झालें आणि ऋषिगणांसहवर्तमान त्या सर्व देवांनीं एकत्र जुळून ठरविलें कीं, 'ह्या कुशिकवंशजाला "महर्षि" ही पदवी खुशाल प्राप्त होवो.' देवांचें हें भाषण श्रवण करून सर्व लोकांचे उत्पादक ब्रह्मदेव तपोधन विश्वामित्राला मधुर वाणीनें म्हणाले, 'हे महर्षे, तुझें स्वागत असो. वत्सा, तुझ्या

उग्र तपश्चर्येनें मी संतुष्ट झालों आहें. हे कुशिकवंशजा, मी तुला महत्त्व आणि ऋषिमुख्यत्व—श्रेष्ठ महर्षि ही पदवी देतों.'

ब्रह्मदेवाचें हें भाषण श्रवण केल्यावर तपोधन विश्वामित्रानें हात जोडून ब्रह्मदेवाला प्रणाम केला आणि तो त्याला म्हणाला, 'ज्या अर्थी स्वसंपादित पुण्यकर्मांच्या योगानें आपण मला ब्रह्मर्षि ही अनुपम पदवी प्राप्त झाली असें म्हणत नाहीं, त्याअर्थी मी जितेंद्रिय नाहीं कीं काय?' ह्याप्रमाणें विश्वामित्रानें विचारिलें असतां ब्रह्मदेवांनीं त्याला उत्तर दिलें, 'तूं अद्यापि जितेंद्रिय बनला नाहींस. हे मुनिश्रेष्ठा, जितेंद्रिय बनण्याचा प्रयत्न कर.'

ह्याप्रमाणें ब्रह्मदेवांनीं सांगितल्यानंतर देव चालते झाले असतां, कशाचाहि आधार न धरितां हात वर करून आणि वायु भक्षण करून महामुनि विश्वामित्र तपश्चर्या करूं लागला. ग्रीष्म ऋतूमध्यें पंचाग्निसाधन करून तो तपश्चर्या करूं लागला. पर्जन्यकाळीं केवळ आकाशाचेंच अवलंबन करून म्हणजे वस्त्रप्रावरणांची पर्वा न करितां उघड्या जागेमध्यें बसून तपश्चर्या करूं लागला; आणि शीतकालामध्यें तर रात्रंदिवस उदकांत पडून तो तपोधन विश्वामित्र तप करूं लागला. ह्याप्रमाणें घोर तपश्चर्या करितां करितां एक हजार वर्षें लोटलीं, तरी तो महामुनि विश्वामित्र तप करीतच होता. तेव्हां देव व देवाधिपति इंद्र ह्यांना अतिशय संताप झाला, आणि सर्व मरुद्गणांसहवर्तमान इंद्र हा रंभानामक अप्सरेशीं कुशिकवंशज विश्वामित्राच्या अहिताचें आणि स्वतःच्या हिताचें असें भाषण करूं लागला."

सर्ग चौसष्टावा.

विश्वामित्रांचा तपोभंग.

शतानंद सांगतातः—"रामा, इंद्र म्हणाला, 'रंभे, कुशिकवंशज विश्वामित्राला लुब्ध करून विषयमोहानें युक्त करणें हें फारच मोठें देवकार्य तुला केलें पाहिजे.' हे इक्ष्वाकुकुलनंदना, ह्याप्रमाणें बुद्धिमान इंद्रानें सांगितलें असतां रंभा लज्जित झाली आणि हात जोडून म्हणाली, 'हे देवाधिपते, हा महामुनि विश्वामित्र भयंकर आहे. तेव्हां हा माझ्यावर आग पाखडण्याला कमी करणार नाहीं. ह्यास्तव मला आपण सांगतां हें कार्य करण्याला भय वाटत आहे. करितां देवा, आपण मजवर कृपा करावी.'

रामा, ह्याप्रमाणें त्या भयभीत झालेल्या रंभेनें भीत भीत इंद्राला सांगितलें असतां इंद्र तिला म्हणाला, ' रंभे तूं भिऊं नको. तुझें कल्याण असो. माझ्या आज्ञेनें तूं ही गोष्ट कर. वृक्षसौंदर्ययुक्त अशा वसंत ऋतूमध्यें मनोहर कोकिल पक्ष्याचें रूप धारण करून मी मदनासहवर्तमान तुझ्या सन्निध तत्पर राहीन. तूं अत्यंत उज्ज्वल आणि बहुगुणसंपन्न असें रूप धारण कर, आणि त्या कुशिकवंशज तपोनिष्ठ ऋषीला तपश्चर्येपासून निवृत्त कर.' हें इंद्राचें भाषण श्रवण केल्यावर त्या सुहास्यवदना सुंदरी रंभेनें अनुपम रूप धारण करून विश्वामित्राला मोहित केलें. प्रथमत: मंजुल शब्द करीत असलेल्या कोकिल पक्ष्याचा ध्वनि प्रसन्न अंत:करणानें विश्वामित्रानें श्रवण केला, तों इतक्यांत रंभाहि त्याच्या दृष्टीस पडली. तेव्हां त्याच्या त्या ध्वनीनें, अप्रतिम गायनानें आणि रंभेच्या दर्शनानें विश्वामित्र मुनींना संशय आला कीं, हिला इंद्रानें पाठविली आहे किंवा माझी तपश्चर्या भग्न करण्याकरितां ही आपण होऊनच येथें आली आहे. नंतर हें सर्व इंद्राचें कृत्य आहे, असें समजून आल्यावर विश्वामित्रानें क्रुद्ध होऊन रंभेला शाप दिला कीं, 'हे रंभे, मी काम आणि क्रोध जिंकण्याची इच्छा करीत आहें. असें असतां ज्या अर्थीं मला तूं लुब्ध करीत आहेस, त्याअर्थीं, हे दुर्भगे, दहा हजार वर्षेपर्यंत तूं पाषाण बनून राहशील, आणि माझ्या क्रोधानें ग्रस्त केलेल्या तुझा उद्धार तप:सामर्थ्यानें युक्त आणि फारच तेजस्वी असा एक ब्राह्मण करील.' ह्याप्रमाणें महामुनि विश्वामित्रानें रंभेला शाप दिल्यावर, क्रोध जिंकण्यास आपण समर्थ झालों नाहीं, म्हणून त्याला पश्चात्ताप झाला. त्याच्या त्या प्रचंड शापानें रंभाहि तत्काळ पाषाण होऊन पडली व त्या महर्षींचें शापरूप भाषण श्रवण केल्यावर मदनहि तेथून चालता झाला."

शतानंद सांगतात:—"रामा, ह्याप्रमाणें इंद्रियदमन झालें नसल्यामुळें क्रोधाच्या योगानें तपश्चर्येचा व्यय झाला असतां विश्वामित्राच्या मनाला स्वस्थता वाटेना. तेव्हां त्याच्या मनामध्यें असा विचार आला कीं, ' यापुढें अशा प्रकारें मी कधींहि क्रोधयुक्त होणार नाहीं, आणि आतां कांहीं झालें तरी भाषणहि करणार नाहीं. अथवा इतकी पंचाईत कशाला? शेंकडों वर्षें लोटेपर्यंत मी मुळीं श्वासोच्छ्वासच करणार नाहीं. अशा रीतीनें जितेंद्रिय राहून मी आपला देह शुष्क करून टाकीन. तात्पर्य, तप:संपादित असें ब्राह्मण्य प्राप्त होईपर्यंत मी श्वासोच्छ्वास व आहार न करितां अनंत वर्षें तप करीत राहीन. तप-

श्चर्या करीत असल्यामुळें माझे अवयव नाहींतसे होण्याची भीति नाहीं.' ह्याप्रमाणें रामा, हजार वर्षेपर्यंत तपश्चर्येची दीक्षा घेण्याविषयीं, जगतांत जिला तोड नाहीं अशी प्रतिज्ञा त्या मुनिश्रेष्ठ विश्वामित्रानें केली."

सर्ग पासष्टावा.

विश्वामित्रांना ब्रह्मर्षिपदप्राप्ति.

शतानंद सांगतातः—"रामा, नंतर महामुनि विश्वामित्रानें उत्तर दिशा सोडून देऊन पूर्व दिशेचें अवलंबन केलें, आणि त्या ठिकाणीं अत्यंत उग्र तपश्चर्येला आरंभ केला. रामा, प्रथमतः सहस्र संवत्सरपर्यंत सर्वोत्कृष्ठ मौनव्रत पाळण्याचा संकल्प करून इतरांना अत्यंत दुष्कर असें अप्रतिम तप त्यानें केलें. तपाला आरंभ होऊन सहस्र संवत्सर पूर्ण झाल्यानंतर काष्ठवत् झालेल्या त्या महामुनीवर पुष्कळ विघ्नांचा जरी गहजब झाला, तरी त्याचे ठिकाणीं क्रोधाचा प्रवेश झाला नाहीं. कारण रामा, क्रोध जिंकण्याविषयीं निश्चय करून त्यानें अमोघ तपश्चर्येला आरंभ केला होता. असो. हजार वर्षेपर्यंत संकल्प करून केलेल्या तपाचें अनुष्ठान पूर्ण झाल्यावर त्या महाव्रतस्थ विश्वामित्रानें अन्न भक्षण करण्याचा उपक्रम केला. परंतु ब्राह्मणरूप घेऊन आलेल्या इंद्रानें तें अन्न तयार झालेलें मागितलें. तेव्हां क्रोधसंयमनाविषयीं निश्चय केलेल्या विश्वामित्रानें तयार झालेलें तें सर्व अन्न ब्राह्मणाला दिलें. ह्याप्रमाणें ब्राह्मणाला देऊन अन्न निःशेष झाल्यावर भोजन न करितांच राहिलेल्या महातपस्वी भगवान विश्वामित्रानें ब्राह्मणाला चकारशब्दहि न बोलतां पुनरपि मौनव्रताचें अवलंबन केलें. सारांश, श्वासोच्छ्वास न सोडितां त्यानें त्याचप्रमाणें मौनधारण करून पुनरपि तपश्चर्येला आरंभ केला. अशा प्रकारें एक सहस्र संवत्सरपर्यंत जेव्हां श्वासहि न सोडितां मुनिश्रेष्ठ विश्वामित्रानें तपश्चर्या चालविली, तेव्हां उच्छ्वासरहित असलेल्या त्या मुनीच्या मस्तकाचे ठिकाणीं धूम उत्पन्न झाला. त्या धूमानें सर्व त्रैलोक्य गोंधळून जाऊन संतप्त झाल्यासारखें झालें. तेव्हां त्याच्या तपोरूप तेजाच्या योगानें तेजोहीन, मोहित व मूर्च्छित झालेले सर्व देव, ऋषी, गंधर्व, पन्नग, उरग व राक्षस ब्रह्मदेवाला म्हणाले, 'हे देव, अनेक प्रकारांनीं महामुनि विश्वामित्राला लुब्ध व क्रुद्ध करण्याचा यत्न केला

असतांनाहि त्याची पर्वा न करितां तपाच्या योगानें त्याचें माहात्म्य वाढतच आहे. त्याचे ठिकाणीं कामक्रोधादिविषयक असा कोणताहि दोष सूक्ष्मबुद्धी दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. तेव्हां यानें मनांत इच्छिलेलें जर दिलें नाहीं, तर तपश्चर्येच्या योगानें स्थावरजंगमात्मक प्राण्यांसहवर्तमान ह्या त्रैलोक्याचा नाश करील. सांप्रत सर्व दिशा धुंद झाल्या असून प्रकाश असा कोठेंहि नाहीं. सर्व समुद्र खवळून गेले आहेत, पर्वत मोडून पडत आहेत, भूमि कंपित होत आहे व वायु अतिशय क्षुब्ध होऊन वहात आहे. ब्रह्मन्, आम्हांला ह्या प्रसंगीं कांहीं सुचत नाहीं. जगत्क्षोभ होऊं लागल्यामुळें लोक स्वधर्मानुष्ठानाचा त्याग करून नास्तिक बनत चालले आहेत. सारांश, त्रैलोक्यांतील प्राण्यांचीं मनें क्षुब्ध झालेलीं असून ते अगदीं गोंधळून गेले आहेत. त्या महर्षीच्या तेजानें सूर्यहि निस्तेज झाला आहे. ह्यास्तव महामुनि विश्वामित्रानें जगताचा नाश करण्याचें मनामध्यें आणिलें नाहीं, तोंच ह्या अग्नितुल्य ऋषीला प्रसन्न करून घ्यावें. पूर्वीं युगांतकालीं ज्याप्रमाणें कालाग्नीच्या योगानें संपूर्ण त्रैलोक्याचा दाह होत होता, त्याप्रमाणें सांप्रत सर्व त्रैलोक्याचा दाह होत आहे. ह्यास्तव देवराज्याची जरी ह्याला इच्छा असली, तरी सुद्धां ती आपण पूर्ण करा.'

ह्याप्रमाणें देवांनीं ब्रह्मदेवाची विनंति केल्यानंतर ब्रह्मदेवप्रभृति ते सर्वहि देवगण महात्म्या विश्वामित्राला मधुर शब्दांनीं म्हणाले, 'हे ब्रह्मर्षे, तुझें स्वागत असो. तुझ्या तपानें आम्ही फारच संतुष्ट झालों आहों. हे कुशिकवंशजा, उग्र तपाच्या योगानें तुला ब्राह्मण्य प्राप्त झालें आहे. हे ब्रह्मन्, मी मरुद्गणांसहवर्तमान तुला दीर्घ आयुष्य देतों. हे सत्त्वगुणसंपन्न मुने, तुला सुखप्राप्ति होवो. तुझें कल्याण असो. तपश्चर्या समाप्त करून तूं आतां खुशाल पाहिजे तिकडे जा.'

ह्याप्रमाणें सर्व देवांकरितां ब्रह्मदेवानें केलेलें भाषण श्रवण केल्यावर महामुनि विश्वामित्रांनीं आनंदित होऊन सर्व देवांना प्रणाम केला आणि ते त्यांना म्हणाले, 'ब्राह्मण्य आणि त्याचप्रमाणें दीर्घ आयुष्य जर मला प्राप्त झालें असेल, तर ॐकार, वषट्कार आणि वेद मला वरोत. सारांश अध्यापन, याजन वगैरे कर्में करण्याचा मला अधिकार येवो आणि धनुर्विद्या जाणणाऱ्यांमध्यें व ब्रह्मविद्या जाणणाऱ्यांमध्येंहि श्रेष्ठ असलेला ब्रह्मपुत्र वसिष्ठ मला ब्राह्मण म्हणो. अशा प्रकारें माझा मुख्य मनोरथ जर सिद्धीस गेला असेल, तर हे सुरश्रेष्ठहो, आपण स्वस्थानीं जावें.'

ह्याप्रमाणें विश्वामित्रांनीं सांगितलें असतां त्यांना 'ब्रह्मर्षि' म्हणण्याविषयीं देवांनीं तपस्वीश्रेष्ठ वसिष्ठ मुनींचें मन वळविलें. तेव्हां त्या ब्रह्मर्षि वसिष्ठांनींहि 'तुमच्या म्हणण्याप्रमाणें हा ब्रह्मर्षि असो' असें म्हणून विश्वामित्राशीं सख्य केलें. नंतर 'तूं ब्रह्मर्षि झालास, ह्यांत संशय नाहीं. ब्राह्मण्यप्राप्तीला जें कांहीं आवश्यक आहे, तें सर्व तुला प्राप्त झालें आहे' असें विश्वामित्राला म्हणून सर्व देवहि परत गेले. अशा प्रकारें सर्वोत्कृष्ठ ब्राह्मण्य प्राप्त झाल्यावर धर्मात्म्या विश्वामित्र मुनींनींहि ब्रह्मर्षि वसिष्ठांचें पूजन केलें, आणि कृतकृत्य झालेले हे विश्वामित्र मुनि तपोनिष्ठ राहून सर्व पृथ्वीवर संचार करूं लागले. रामा, ह्या महात्म्या विश्वामित्र मुनींनीं अशा प्रकारें ब्राह्मण्य प्राप्त करून घेतलें. रामा, हे मुनींमध्यें श्रेष्ठ आहेत. हे मूर्तिमंत तप आहेत. हे उत्कृष्ठ धर्मच आहेत आणि वीर्याचेंहि हे नित्य स्थानच आहेत."

ह्याप्रमाणें सांगून तो महातेजस्वी शतानंद स्वस्थ बसला. तेव्हां रामलक्ष्मणांसन्निध झालेलें तें शतानंदाचें भाषण श्रवण केल्यावर जनक राजा हात जोडून विश्वामित्रांना म्हणाला, 'हे मुनिश्रेष्ठ, मी धन्य आहें. ज्या अर्थीं ककुत्स्थकुलोत्पन्न राम-लक्ष्मणांसहवर्तमान आपण येथें माझ्या यज्ञाप्रत आलां आहां, त्या अर्थीं माझ्यावर आपला अनुग्रहच झाला आहे. हे ब्रह्मन्, हे महामुने, दर्शन देऊन आपण मला आज पवित्र केलें. आपलें दर्शन झाल्यामुळें आपल्या अनेक प्रकारच्या गुणांचें मला ज्ञान झालें. आणि आपलें मोठें तपहि शतानंद सविस्तर सांगत असतांना मीं श्रवण केलें. हे महातेजस्वी मुने, मी, महात्मा राम आणि सदस्य ह्यांनीं यज्ञमंडपामध्यें येऊन आपले अनेक गुण श्रवण केले. आपलें तप अमर्याद आहे. आपलें सामर्थ्य अतर्क्य आहे. आपले गुणहि सर्वदा असंख्य आहेत. हे प्रभो, आपल्या आश्चर्यावह गोष्टी ऐकणें मला कधींच पुरेसें व्हावयाचें नाहीं; परंतु आता कर्मकालाचें अतिक्रमण होईल. रविमंडल अस्ताचलाकडे कललें आहे. हे महातेजस्वी मुने, आपण उदयीक प्रातःकालीं माझी पुनरपि भेट घ्यावी. आपलें स्वागत असो. मला आपण आतां अनुज्ञा द्यावी.'

ह्याप्रमाणें जनक राजानें प्रार्थना केली असतां मनामध्यें प्रसन्न झालेल्या मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांनीं संतुष्ट झालेल्या जनकाची प्रशंसा करून त्या पुरुषश्रेष्ठाला सत्वर अनुज्ञा दिली. असो. नंतर मिथिलाधिपति विदेहराज जनक उपाध्याय आणि बांधव ह्यांसहवर्तमान स्वतः मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांना प्रदक्षिणा

करून सत्वर चालता झाला. मोठमोठे प्रशंसा करीत असतांना धर्मात्मे विश्वामित्रहि राम-लक्ष्मणांसहवर्तमान आपल्या वसतिस्थानाकडे गेले.

सर्ग सहासष्टावा.

त्र्यंबक धनुष्याचें वृत्त.

तदनंतर चांगलें उजाडल्यावर जनक राजानें स्नानसंध्या आटोपून महात्म्या विश्वामित्राला राघवांसहवर्तमान बोलावून आणिलें, आणि सशास्त्र विधीनें त्या मुनींचें व रघुवंशज राम-लक्ष्मणांचें पूजन करून तो धर्मात्मा जनक राजा त्यांना म्हणाला, ' भगवन्, आपलें स्वागत असो. हे निष्पाप, मीं आपलें काय कार्य करावें, ती आपण आज्ञा करावी. मी आपला आज्ञाधारक आहें. ' ह्याप्रमाणें जनकानें प्रार्थना केली असतां विश्वामित्र म्हणाले, ' हे जगद्विख्यात क्षत्रिय आहेत, हे दशरथाचे पुत्र आहेत आणि तुझ्यापाशीं असलेलें श्रेष्ठ धनुष्य पहाण्याची त्यांची इच्छा आहे. करितां तूं त्यांना तें दाखीव. त्या धनुष्याच्या दर्शनानें हे राजकुमार कृतकृत्य होतील आणि खुशाल परत जातील. तुझें कल्याण असो. '

ह्याप्रमाणें विश्वामित्रांनीं जनकाला सांगितलें असतां तो त्या महामुनींना म्हणाला, " ह्या धनुष्याची हकीकत आपण श्रवण करावी. तें येथें कशाकरितां आलें, तेंहि श्रवण करावें. देवरात म्हणून निमीचा ज्येष्ठ पुत्र राजा होऊन गेला. भगवन्, त्या महात्म्याच्या हातामध्यें ही चापरूप ठेव दिलेली आहे. पूर्वी दक्षयज्ञनाशाचे समयीं वीर्यवान रुद्र हा हें धनुष्य सहज वांकवून रागारागानें देवांची धूळदाण उडवून म्हणाला, ' देवहो, मी हविर्भाग इच्छीत असतांनाहि ज्या अर्थीं तुम्ही मला यज्ञभाग दिला नाहीं, त्या अर्थी धनुष्याच्या योगानें मी तुमचीं महापूज्य मस्तकें तोडून टाकितों. ' ह्याप्रमाणें रुद्रानें सांगितल्यावर सर्व देव अगदीं दीन झाले आणि ते देवाधिदेव शंकराला प्रसन्न करून घेऊं लागले. तेव्हां शंकरहि त्यांच्यावर प्रसन्न झाले आणि प्रसन्न होऊन त्या सर्व महात्म्यांना तें संहारार्थ धारण केलेलें धनुष्य त्यांनीं देऊन टाकिलें. तें हें महात्म्या देवाधिदेव शंकराचें श्रेष्ठ धनुष्य आमच्या समर्थ पूर्वजांपाशीं देवांनीं ठेव म्हणून त्या वेळीं ठेविलें आहे. असो. मी अग्निचयनाकरितां क्षेत्र शुद्ध करण्याच्या उद्दे-

आणि विश्वामित्र मुनि ह्यांनीं त्याला सांगितल्यावर, मुनींच्या वचनावरून त्यानें तें धनुष्य मध्यें धरून सहज उचलिलें, आणि पुष्कळ म्हणजे हजारों राजे पहात असतांना त्या धर्मात्म्या रामानें त्या धनुष्याला सहज प्रत्यंचा चढविली. ह्याप्रमाणें प्रत्यंचा चढविल्यानंतर तें धनुष्य त्या पुरुषश्रेष्ठ महायशस्वी रामानें कानापर्यंत ओढिलें आणि मध्यें मोडून टाकिलें! त्या वेळीं वीज कडकडल्याप्रमाणें त्याचा मोठा शब्द झाला, आणि विदीर्ण होणाऱ्या पर्वतांचे समीप जसा भूकंप होतो, तसा फारच मोठा भूकंप झाला. त्या शब्दाच्या योगानें मुनिश्रेष्ठ विश्वामित्र, जनक राजा आणि ते रघुवंशज राम लक्ष्मण ह्यांवांचून इतर सर्व लोक मूर्च्छित होऊन पडले. नंतर लोक सावध झाल्यावर, कन्या अविवाहित राहण्याच्या भीतींतून मुक्त झालेला संभाषणज्ञ जनक हात जोडून मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांना म्हणाला, ' भगवन्, दशरथपुत्र रामाचें वीर्य मीं अवलोकन केलें. ही अत्यंत अद्भुत गोष्ट ह्याच्या हातून होईल, असें माझ्या गांवींहि नव्हतें व माझा तर्कहि नव्हता. जनक राजाच्या कुलामध्यें ही माझी कन्या सीता दशरथपुत्र रामाला भर्ता प्राप्त करून घेऊन कीर्ति संपादन करील. मुने, सीता वीर्यशुल्का म्हणून जी माझी प्रतिज्ञा होती, ती शेवटास गेली. आतां प्राणापेक्षांहि प्रिय असलेली ही माझी कन्या रामाला द्यावयाची. तेव्हां रथ बरोबर घेऊन माझ्या मंत्र्यांना आपल्या अनुमतानें अयोध्येप्रत सत्वर जाऊं द्या व सविनय शब्दांनीं प्रार्थना करून दशरथ राजाला माझ्या नगराप्रत त्यांना घेऊन येऊं द्या. सारांश, वीर्यशुल्का कन्येच्या दानासंबंधानें येथें घडलेला सर्व वृत्तांत त्यांना तेथें कथन करूं द्या. राम-लक्ष्मणांचें रक्षण मुनींनीं केलें आहे, म्हणून त्यांना राजाला निवेदन करूं द्या आणि प्रसन्न झालेल्या दशरथ राजाला त्या अत्यंत शीघ्र गमन करणाऱ्या मंत्र्यांना आणूं द्या.' जनकाचें हें भाषण ऐकून विश्वामित्रांनीं 'ठीक आहे' म्हणून सांगितलें. तेव्हां त्यानें आपल्या आज्ञाधारक मंत्र्यांना तसें सांगितलें, आणि घडलेला वृत्तांत राजाला निवेदन करून त्याला आणण्याकरितां त्यांना अयोध्येप्रत पाठविलें.

सर्ग अडुसष्टावा.

मिथिला नगरीस जाण्याची तयारी.

जनक राजाचे ते दूत वाहनें थकून गेल्यामुळें मार्गामध्यें त्रिरात्र राहून नंतर अयोध्या नगरीमध्यें गेले. राजाच्या सांगण्यावरून तेथें गेल्यावर राजवाड्यामध्यें द्वारपालांनीं त्यांचा प्रवेश करविला असतां, देवतुल्य व वृद्ध दशरथ राजाला त्यांनीं अवलोकन केलें आणि निर्भय झालेले ते सर्वजण हात जोडून मधुर शब्दांनीं राजाला विनयपूर्वक म्हणाले, 'हे महाराजा, ऋत्विजांसहवर्तमान असलेला मिथिलाधिपति जनक राजा उपाध्याय, पुरोहित आणि सेवक ह्यांसहवर्तमान स्निग्ध व मधुर वाणीनें तुला वारंवार अखंड कुशल विचारीत आहे, आणि स्वस्थांतःकरणपूर्वक कुशल प्रश्न करून त्या विदेहदेशाधिपति मिथिलाधिपतीनें विश्वामित्र मुनींच्या अनुमतानें आपणांला असा निरोप सांगितला आहे कीं, 'माझी कन्या वीर्यशुल्का ही माझी प्रतिज्ञा आपणांला विदितच आहे. तेव्हां निर्वीर्य राजे मीं नाकारिल्यामुळें क्रुद्ध होऊन परत गेलेले आहेत. ती ही माझी कन्या विश्वामित्र मुनींसहवर्तमान सहज आलेल्या आपल्या चिरंजीवांनीं जिंकिली. कारण महात्म्या रामानें लोकांच्या प्रचंड समाजांत दिव्य धनुष्य मध्यें मोडून टाकिलें. तस्मात्, आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें वीर्यशुल्का सीता मी ह्या महात्म्या रामाला देणार. तर या गोष्टीला आपलें अनुमोदन असावें. महाराज, आपलें देव बरें करो. आपण उपाध्याय आणि पुरोहित ह्यांसहवर्तमान रामलक्ष्मणांना भेटण्याकरितां सत्वर चला. हे राजाधिराज, माझी आज्ञा आपण शेवटास न्यावी आणि उभयतांहि पुत्रांचें विवाहसुख आपण अनुभवावें.'

ह्याप्रमाणें विश्वामित्रांची अनुज्ञा घेऊन, शतानंदाच्या मताप्रमाणें वागणाऱ्या जनक राजानें मधुर शब्दांनीं दूतांपाशीं सांगितलेला निरोप ऐकून घेऊन दशरथ राजाला पराकाष्ठेचा हर्ष झाला, आणि वसिष्ठ, वामदेव व इतरहि मंत्री ह्यांना तो म्हणाला, 'कौसल्येचा आनंद वृद्धिंगत करणाऱ्या रामाचें कुशिकवंशज विश्वामित्र मुनींनीं रक्षण केलें असून भ्रात्या लक्ष्मणासहवर्तमान तो विदेह देशामध्यें वास्तव्य करीत आहे. महात्म्या जनकानें ह्या ककुत्स्थकुलोत्पन्न रामाचें वीर्य अवलोकन केलें आहे आणि म्हणूनच तो ह्या रघुवंशज रामाला आपली कन्या देऊं इच्छीत आहे. आपणांला जर महात्म्या जनकाची चालचलवणूक

शरीरसंबंध करण्याला योग्य वाटत असेल, तर आपण सत्वर त्याच्या नगरीप्रत जाऊं. कालातिक्रमण होणें योग्य नाहीं.'

ह्याप्रमाणें दशरथ राजानें विचारिलें असतां सर्व महर्षींसहवर्तमान मंत्र्यांनीं त्याला 'ठीक आहे' म्हणून म्हटलें. तेव्हां अत्यंत प्रसन्न झालेल्या दशरथ राजानें 'उदईक प्रयाण' म्हणून सांगितलें, व दशरथ राजाला परममान्य असलेले ते सर्वगुणसंपन्न मंत्री रात्रभर आनंदामध्यें राहिले.

सर्ग एकुणसत्तरावा.

मिथिला नगरींत आगमन.

नंतर ती रात्र गेल्यावर उपाध्याय आणि बांधव ह्यांसहवर्तमान दशरथ राजा आनंदित होऊन सुमंत्राला म्हणाला, 'आज सर्व खजिनदारांना नानाप्रकारचीं रत्नें व विपुल द्रव्य बरोबर घेऊन मोठ्या बंदोबस्तानें पुढें चालूं लागूं द्या, चतुरंग सैन्य सर्व प्रकारें सत्वर बाहेर पडूं द्या आणि मी आज्ञा केल्याबरोबर शिबिका, अश्व वगैरे उत्कृष्ट वाहनें वसिष्ठादिकांकरितां तयार असूं द्या. वसिष्ठ, वामदेव, जाबालि, कश्यप, दीर्घायु मार्कंडेय ऋषि व कात्यायन ह्या ब्राह्मणांना पुढें जाऊं द्या व तूंहि माझा रथ जोड. विलंब होतां उपयोगी नाहीं. हे दूत मला घाई करीत आहेत.'

ह्याप्रमाणें दशरथ राजानें सांगितल्यावरून ऋषींसहवर्तमान निघालेल्या राजाच्या मागोमाग चतुरंग सेना चालती झाली. चार दिवस मार्गामध्यें काढिल्यानंतर दशरथ राजा विदेह देशाला जाऊन पोहोंचला. तो आल्याचें ऐकतांच वैभवशाली जनक राजानें त्याचा आदरसत्कार केला, व वृद्ध दशरथ राजाची भेट झाल्यावर आधींच आनंदित झालेल्या जनक राजाला पराकाष्ठेचा हर्ष झाला. तो श्रेष्ठ जनक राजा आनंदयुक्त झालेल्या पुरुषश्रेष्ठ दशरथ राजाला म्हणाला 'हे पुरुषश्रेष्ठा, तुझें स्वागत असो. हे रघुवंशजा, तूं या ठिकाणीं आलास, ही गोष्ट फारच चांगली झाली शौर्यामुळें उभयतां पुत्रांविषयीं तुझें ठिकाणीं प्रेम उत्पन्न होईल. देवांसहवर्तमान येणाऱ्या इंद्राप्रमाणें सर्व द्विजश्रेष्ठांसहवर्तमान महातेजस्वी भगवान वसिष्ठ ऋषि आले, हें फार चांगलें झालें. वीर्यवानांमध्यें श्रेष्ठ व महाबलाढ्य अशा रघुवंशजांबरोबर माझा संबंध

झाल्यामुळें सुदैवानें माझीं सर्व विघ्नें टळलीं असून ईशकृपेनें माझ्या कुलाचाहि उद्धार झाला आहे. राजा, उदयीक प्रातःकाळीं यज्ञ समाप्त झाल्यावर ऋषिश्रेष्ठांसहवर्तमान आपण विवाह उरकून घ्यावा.'

हें त्या जनकाचें भाषण श्रवण केल्यावर संभाषण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ दशरथ राजा त्याला म्हणाला, 'प्रतिग्रह दात्यावर अवलंबून आहे, हें मीं पूर्वी ऐकिलेलें आहे. आतां हे धर्मज्ञ, तूं जसें सांगशील तसें आम्ही करूं.' धर्मिष्ठ व यशस्कारक असें सत्यवादी दशरथाचें हें भाषण श्रवण केल्यावर विदेहदेशाधिपति जनक राजा पराकाष्ठेचा विस्मित झाला. तदनंतर ऋषिगणांना एकमेकांच्या भेटी झाल्यामुळें मोठा हर्ष होऊन त्यांनीं ती रात्र सुखानें काढिली. जनकानें ज्याची मानमान्यता ठेविली आहे, व पुत्रांना अवलोकन करून जो पराकाष्ठेचा आनंदित झालेला आहे, असा तो दशरथ राजा तेथें राहिला; व महातेजस्वी तत्त्ववेत्ता जनक राजाहि धर्माप्रमाणें यज्ञसंबंधीं अवशिष्ट राहिलेलीं कर्में संपवून पुत्रांसहवर्तमान त्या रात्रीं तेथेंच राहिला.

सर्ग सत्तरावा.

कुशध्वजाचें मिथिलेंत आगमन.

तदनंतर प्रभातकाल झाल्यावर स्नानसंध्या आटोपून संभाषणज्ञ जनक राजा महर्षींसहवर्तमान शतानंद नामक पुरोहिताला म्हणाला, 'कुशध्वज म्हणून प्रसिद्ध असलेला असा माझा एक महातेजस्वी, वीर्यवान आणि अतिधार्मिक भ्राता आहे. तो पुष्पक विमानाप्रमाणें मनोहर, तटबंदी व यंत्रसामुग्री ह्यांनीं युक्त, स्वर्गतुल्य, आणि इक्षुमति नदीचे कांठीं असलेल्या पवित्र अशा सांकाश्यानामक नगरीमध्यें रहात आहे. त्याची भेट घेण्याची माझी इच्छा आहे. कारण मी त्याला यज्ञरक्षक म्हणून समजत आहें. करितां त्या महातेजस्वी कुशध्वजालाहि ह्या मंगलसंबंधी आनंदाचा उपभोग घेण्यास सांपडला पाहिजे.'

ह्याप्रमाणें शतानंदाला जनकानें सांगितलें असतां सेवेविषयीं तत्पर असे कांहीं लोक तेथें आले, व त्यांना त्या जनकानें कुशध्वजाकडे जाण्यास सांगितलें. तेव्हां राजाच्या आज्ञेवरून ते सेवक, इंद्राच्या आज्ञेनें विष्णूला आणण्याकरितां जाणाऱ्या सेवकांप्रमाणें पुरुषश्रेष्ठ कुशध्वजाला आणण्याकरतां शीघ्र

गमन करणाऱ्या अश्वांवर आरूढ होऊन गेले, व सांकाश्या नगरीमध्यें जाऊन कुशध्वजाची भेट घेतल्यावर जनकाचा उद्देश त्यांनीं त्याला इत्थंभूत कथन केला. तें वर्तमान ऐकून कुशध्वज राजा जनक राजाच्या आज्ञेप्रमाणें त्या महावेगवान श्रेष्ठ दूतांसहवर्तमान निघून आला. नंतर धर्मवत्सल महात्म्या जनकाचें दर्शन झाल्यावर शतानंद व अत्यंत धार्मिक जनक ह्यांना अभिवंदन करून तो राजाला योग्य अशा उत्कृष्ठ दिव्य आसनावर बसला. ह्याप्रमाणें जनक व कुशध्वज हे उभयतां अत्यंत तेजस्वी भ्राते आसनावर बसले असतां त्या वीरांनीं सुदामा नामक श्रेष्ठ मंत्र्याला निरोप सांगितला कीं, 'हे मंत्रिपते, सत्वर जा आणि अत्यंत तेजस्वी व अजिंक्य अशा इक्ष्वाकुवंशज दशरथाला पुत्र आणि मंत्री ह्यांसहवर्तमान घेऊन ये.' अशी त्यांची आज्ञा झाल्यावर तो सुदामा मंत्री दशरथाच्या शिबिरामध्यें गेला, आणि रघुकुलवर्धक दशरथाला अवलोकन केल्यावर मस्तकानें प्रणाम करून त्याला म्हणाला, 'हे अयोध्याधिपते, विदेहराज मिथिलाधिपति, उपाध्याय आणि पुरोहित ह्यांसहवर्तमान आपली भेट घेण्याकरितां वाट पहात बसला आहे.'

हें त्या श्रेष्ठ मंत्र्याचें भाषण श्रवण केल्यावर दशरथ राजा ऋषीगण आणि बांधव ह्यांसहवर्तमान जिकडे जनक होता तिकडे गेला, आणि जनकाला म्हणाला, 'हे महाराज इक्ष्वाकुवंशजांचें कुलदैवत वसिष्ठ हें आपणांला विदितच आहे. आमच्या कोणत्याहि कार्यासंबंधानें काय बोलावयाचें तें बोलणारे भगवान वसिष्ठ ऋषि आहेत. तेव्हां सर्व महर्षींसहवर्तमान विश्वामित्र मुनींची अनुज्ञा घेऊन हे धर्मात्मे वसिष्ठ मुनि माझी वंशपरंपरा कथन करतील.'

दशरथाची वंशपरंपरा.

ह्याप्रमाणें सांगून दशरथ स्वस्थ बसला असतां संभाषण कसें करावें हें जाणणारे भगवान वसिष्ठ ऋषि पुरोहितांसहवर्तमान बसलेल्या विदेहराज जनकाला म्हणाले, "मायोपाधिक ब्रह्मापासून शाश्वत, नित्य आणि अव्यय असा चतुर्मुख ब्रह्मदेव उत्पन्न झाला. त्या भगवान ब्रह्मदेवापासून मरीचि झाला व महात्म्या मरीचीचा पुत्र कश्यप होय. कश्यपापासून विवस्वान् झाला व मनु हा विवस्वानाचा पुत्र होय. मनु हा पूर्वीचा प्रजाधिपति होय. महात्म्या मनूला इक्ष्वाकु हा पुत्र झाला, व तोच इक्ष्वाकु अयोध्या नगरींतील पहिला राजा होय. इक्ष्वाकूला एक वैभवशाली पुत्र झाला. तो कुक्षि म्हणून प्रसिद्ध होता. कुक्षीपासून तसाच वैभवशाली विकुक्षि

म्हणून पुत्र झाला. महातेजस्वी व प्रतापी बाण हा विकुक्षीचा पुत्र होय. महातेजस्वी व प्रतापी अनरण्य हा बाणाचा पुत्र होय. अनरण्यापासून पृथु झाला. पृथूपासून त्रिशंकु झाला. आणि त्रिशंकूला धुंधुमार म्हणून एक महाकीर्तिमान पुत्र झाला. धुंधुमाराला महातेजस्वी महारथी असा युवनाश्व पुत्र झाला, व पृथ्वीपति मांधाता हा युवनाश्वाला पुत्र झाला. मांधात्यापासून सुसंधि म्हणून वैभवशाली पुत्र झाला, त्या सुसंधीलाहि ध्रुवसंधि आणि प्रसेनजित् असे दोन पुत्र झाले. ध्रुवसंधीला भरत ह्या नांवानें प्रसिद्ध असलेला एक यशस्वी पुत्र झाला. त्या भरतापासून महातेजस्वी असित उत्पन्न झाला. त्या असिताला हैहय, तालजंघ आणि शूर शशबिंदु हे राजे शत्रु उत्पन्न झाले. त्यांच्याशीं युद्ध करितां करितां संग्रामामध्यें असित राजाला त्यांनीं हांकून लाविलें. तेव्हां तो आपल्या उभयतां भार्यांसहवर्तमान हिमालय पर्वतावर जाऊन राहिला, व तो अशक्त असित राजा तेथें परलोकीं गेला."

वसिष्ठ पुढें म्हणतातः—"असित राजाच्या अंतकालीं त्याच्या दोन्ही भार्या गर्भिणी होत्या, असें ऐकण्यांत आहे. त्यांपैकीं एकीनें आपल्या सवतीच्या गर्भाचा नाश व्हावा ह्या हेतूनें तिला सविष अन्न घातलें. त्या वेळीं त्या रमणीय श्रेष्ठ पर्वतावर च्यवन भार्गव म्हणून एक मुनि त्या हिमालयाचा आश्रय करून आनंदांत रहात होते. त्या ठिकाणीं ती सविष अन्न भक्षण केलेली महाभाग्यवती असिताची भार्या गेली, आणि उत्कृष्ठ पुत्र प्राप्त व्हावा असा उद्देश मनांत धरून त्या कमलपत्राक्षीनें त्यांना वंदन केलें. तेव्हां त्या कालिंदीला[1] त्या ब्रह्मर्षींनीं असा आशीर्वाद दिला कीं, 'हे महाभाग्यवती, अत्यंत बलाढ्य, महावीर्यवान आणि महातेजस्वी असा एक वैभवशाली सत्पुत्र लवकरच विषासहवर्तमान तुझ्या उदरीं येईल. हे कमलनयने, तूं शोक करूं नको.'

ह्याप्रमाणें आशीर्वाद मिळाल्यावर च्यवन भार्गव मुनींना त्या पतिव्रता राजकन्येनें नमस्कार केला, आणि पुढें त्या पतिविरहित असलेल्या राजपत्नीला त्या मुनींच्या आशीर्वादानें पुत्र झाला. गर्भाचा नाश करण्याच्या उद्देशानें सवतीनें जें तिला विष घातलें होतें, त्या विषासहवर्तमानच तो पुत्र उत्पन्न झाला, आणि म्हणूनच सगर ह्या नांवानें तो प्रसिद्ध झाला. असो. सगराचा असमंज पुत्र होय. असमंजसापासून अंशुमान म्हणून पुत्र झाला. अंशुमानाला दिलीप म्हणून पुत्र झाला व भगीरथ दिलीपाचा पुत्र होय. भगीरथापासून

१ हें तिचें नांव.

ककुत्स्थ झाला. ककुत्स्थापासून रघु झाला. रघूला प्रवृद्ध म्हणून एक तेजस्वी पुत्र झाला. तो पुढें राक्षस बनून पाय चित्रविचित्र वर्णाचे झाल्यामुळें कल्माषपाद म्हणून प्रसिद्ध झाला. त्या कल्माषपादापासून शंखण झाला. शंखणाला सुदर्शन म्हणून पुत्र झाला. सुदर्शनाला अग्निवर्ण म्हणून पुत्र झाला. शीघ्रग हा अग्निवर्णाचा पुत्र असून मरु हा शीघ्राचा पुत्र होय. मरूपासून पशुश्रुक झाला व पशुश्रुकापासून अंबरीष झाला. नहुष राजा हा अंबरीषाचा पुत्र होय. ययाति हा नहुषाचा पुत्र होय व नाभाग हा ययातीचा पुत्र होय. नाभागाला अज म्हणून पुत्र झाला. अजापासून दशरथ झाला, आणि या दशरथापासून भ्राते राम-लक्ष्मण झाले. सारांश, राजा, ब्रह्मदेवापासून वंशानें शुद्ध, अत्यंत धार्मिक आणि इक्ष्वाकुवंशज असे सत्यवचनी व वीर राजे होऊन गेले. त्यांचे संबंधीं जे राम-लक्ष्मण, त्यांच्याकरितां मी तुझ्या कन्या मागत आहें, आणि योग्य अशा राम लक्ष्मणांना अनुरूप अशा ह्या कन्या देणें तुलाहि योग्य आहे."

सर्ग एकाहत्तरावा.

जनकाची वंशपरंपरा.

ह्याप्रमाणें वसिष्ठ बोलले असतां जनक हात जोडून त्यांना म्हणाला, "आपलें देव बरें करो. आतां आम्ही आपल्या कुलाची परंपरा सांगतों, ती आपण श्रवण करा. हे मुनिश्रेष्ठ, कन्यादानसमयीं कुलीन पुरुषानें आपलें कुल इत्थंभूत सांगितलें पाहिजे. ह्यास्तव हे महामते, आपण आमचें कुल श्रवण करा. आपल्या पराक्रमानें त्रैलोक्यामध्यें प्रख्यात, अत्यंत धर्मात्मा आणि सर्व सामर्थ्यवानांमध्यें श्रेष्ठ असा एक निमि म्हणून राजा होऊन गेला. त्याचा पुत्र मिथि होय. जनक म्हणून त्या मिथीला पुत्र झाला. तोच आमच्या कुलांतील पहिला जनक राजा होय. त्याच्यामुळें पुढले सर्व राजे जनक म्हटलें जातात. जनकापासून उदावसु झाला. उदावसूपासून नंदिवर्धन म्हणून एक धर्मात्मा पुत्र झाला. त्या नंदिवर्धनाला सुकेतु ह्या नांवानें प्रसिद्ध असलेला एक शूर पुत्र झाला. सुकेतूलाहि पुढें महाबलाढ्य व धर्मनिष्ठ असा देवरात म्हणून पुत्र झाला. त्या देवरात राजर्षीचा बृहद्रथ पुत्र होय. बृहद्रथाला महावीर

म्हणून एक शूर व प्रतापी पुत्र झाला, व त्या महावीराला सुधृति म्हणून एक धैर्यवान व अमोघ पराक्रमी पुत्र झाला. सुधृतीला अत्यंत धार्मिक व धर्मात्मा असा धृष्टकेतु म्हणून पुत्र झाला. त्या धृष्टकेतु राजर्षीला हर्यश्व म्हणून प्रख्यात असलेला पुत्र झाला. हर्यश्वाचा पुत्र मरु, मरूचा पुत्र प्रतींधक आणि प्रतींधकाचा पुत्र धर्मात्मा राजा कीर्तिरथ. कीर्तिरथाचा पुत्र देवमीढ म्हणून प्रसिद्ध होता. देवमीढाचा पुत्र विबुध होय. महीध्रक हा विबुधाचा पुत्र होय. महाबलाढ्य कीर्तिरात राजा विबुधाचा पुत्र असून राजर्षि कीर्तिरातला महारोम म्हणून पुत्र झाला. महारोम्याला स्वर्णरोमा म्हणून एक धर्मात्मा पुत्र झाला. त्या राजर्षि स्वर्णरोम्याला ऱ्हस्वरोमा म्हणून पुत्र झाला. त्या महात्म्या व धर्मवेत्त्या ऱ्हस्वरोम राजाचे दोन पुत्र मी ज्येष्ठ आणि माझा कनिष्ठ भ्राता वीर कुशध्वज. माझ्या पित्यानें मी ज्येष्ठ म्हणून मला राज्याभिषेक केला, आणि 'ह्याचें संरक्षण कर' म्हणून कुशध्वजाला माझ्या स्वाधीन करून तो माझा पिता वनांत चालता झाला."

जनक राजा पुढें सांगतो:--- "पिता वृद्ध होऊन स्वर्गाला गेल्यावर देव-तुल्य कुशध्वज भ्रात्याकडे प्रेमदृष्टि ठेवून धर्मानें मी राज्य करूं लागलों. ह्याला कांहीं दिवस लोटल्यावर सांकाश्य नगरापासून वीर्यवान सुधन्वा राजा मिथिला नगरीला वेढा देण्याकरितां आला व 'अत्युत्कृष्ट त्र्यंबक चाप व कमलनयना कन्या सीता ही मला द्यावी' म्हणून त्यानें मला निरोप पाठविला. परंतु ही दोन्हीहि मीं त्याला न दिल्यामुळें त्याचें माझ्याशीं युद्ध झालें. संग्रामामध्यें तो सुधन्वा राजा पराजित होऊन माझ्या हातून मारला गेला. हे मुनिश्रेष्ठ, ह्याप्रमाणें त्या सुधन्वा राजाचा वध झाल्यावर मी आपल्या कुशध्वज नामक शूर भ्रात्याला सांकाश्य नगराचा अधिपति केला. हे महामुने, हा माझा कनिष्ठ भ्राता असून मी ह्याचा ज्येष्ठ भ्राता आहें. आतां हे मुनिश्रेष्ठ, मी अत्यंत प्रसन्न होऊन ह्या कन्या आपल्या स्वाधीन करितों. सीता रामाला आणि ऊर्मिला लक्ष्मणाला मी देतों. देवकन्येप्रमाणें असलेली माझी वीर्यशुल्का कन्या सीता मी रामाला देतों, आणि दुसरी ऊर्मिला लक्ष्मणाला देतों. हें मी तीन वेळां निःसंशय सांगत आहें. हे मुनिश्रेष्ठ, मी आपल्या कन्या अत्यंत आनंदानें आपल्या स्वाधीन करितों. असो. राजा दशरथा, आतां आपण राम-लक्ष्मणांचा गोदानसंस्कार करावा. नंतर आपण नांदीश्राद्ध वगैरे करा, आणि मग विवाहसंस्कार होऊं द्या. आपलें कल्याण असो. हे महापराक्रमी प्रभो, आज मघा

नक्षत्र आहे. तेव्हां आजपासून तिसऱ्या दिवशीं म्हणजे उत्तराफाल्गुनी नक्षत्रावर आपण विवाहसंस्कार करावा, आणि राम-लक्ष्मणांचा अभ्युदय होण्याकरितां अशीं कांहीं दानेंहि आपण करावींत."

सर्ग बहात्तरावा.

वाङ्निश्चय.

ह्याप्रमाणें जनक राजानें सांगितलें असतां वसिष्ठांसहवर्तमान महामुनि विश्वामित्र त्या वीर राजाला म्हणाले, 'हे पुरुषश्रेष्ठा, विदेह आणि इक्ष्वाकू ह्यांचीं कुलें अतर्क्य व अत्यंत योग्य आहेत. ह्यांची बरोबरी करणारा कोणीहि नाहीं. राम-लक्ष्मणांचा अनुक्रमें सीता व उर्मिला ह्यांच्याशीं संबंध होणें हें उभय कुलांना योग्य असून सौंदर्यसंपत्तीनेंहि अनुरूपच होणार आहे. आतां हे पुरुष-श्रेष्ठा, मला कांहीं बोलावयाचें आहे, तें तूं ऐकून घे. हा धर्मवेत्ता कुशध्वज राजा तुझा कनिष्ठ भ्राता होय. हे पुरुषश्रेष्ठा राजा, ह्या धर्मात्म्या कुशध्वजाच्या दोन कन्या रूपानें पृथ्वीमध्यें अप्रतिम आहेत. ह्या आम्ही पत्नीकरितां मागत आहों. सारांश, राजा, राजकुमार भरत आणि बुद्धिमान शत्रुघ्न ह्या महात्म्यां-करितां मी तुझ्या भ्रात्याच्या कन्या मागत आहें. सौंदर्य व यौवन ह्यांनीं संपन्न असलेले हे दशरथाचे पुत्र देवतुल्य पराक्रमी असून सर्वहि लोकपालांची बरोबरी करणारे आहेत. हे राजाधिराज, तुमचें पुण्यवानांचें कुल आणि इक्ष्वाकुकुल हीं दोन्ही कुलें मनापासून शरीरसंबंधानें एकमेकांशीं संबद्ध होऊं द्या.'

हें वसिष्ठांच्या अनुमतीनें विश्वामित्रांनीं केलेलें भाषण श्रवण केल्यावर जनक राजा हात जोडून त्या उभयतां मुनिश्रेष्ठांना म्हणाला, 'ज्यांच्या कुलाचा संबंध योग्य अशा इक्ष्वाकुकुलाशीं आहे तो करण्याविषयीं मुनिश्रेष्ठ स्वतः आज्ञा करीत आहेत. त्यांचें हें कुल आज मी धन्य समजत आहें. आपल्या आज्ञेप्रमाणें होऊं द्या. आपलें कल्याण असो. उभयतां भरत-शत्रुघ्नांनीं ह्या कुशध्वज राजाच्या कन्यांचा भार्या म्हणून स्वीकार करावा. आणि हे महामुने, एकाच दिवशीं महाबलाढ्य चारहि राजपुत्रांनीं चारहि राजकन्यांचें पाणिग्रहण करावें. ब्रह्मन्, उत्तराफाल्गुनी नक्षत्रावर म्हणजे भग ही ज्या नक्षत्राची देवता आहे, त्या नक्षत्रावर विद्वानांनीं विवाह प्रशस्त मानिला आहे.'

ह्याप्रमाणें सौम्य भाषण केल्यावर जनक राजा उठला आणि हात जोडून त्या उभयतां मुनिश्रेष्ठांना म्हणाला, 'इक्ष्वाकुकुलाशीं संबंध करविल्यामुळें आपण मला पराकाष्ठेचें पुण्य संपादन करून दिलें आहे. दशरथाप्रमाणें मीहि आपल्या कनिष्ठ भ्रात्यासहवर्तमान आपला शिष्य आहें. करितां तिन्ही राज्यांचें आधिपत्य स्वीकारून आपण उभयतां मुनिश्रेष्ठांनीं ह्या तिन्ही सिंहासनांचा स्वीकार करावा. ज्याप्रमाणें दशरथ राजा ह्या मिथिला नगरीचा पाहिजे तसा विनियोग करण्यास समर्थ आहे, त्याचप्रमाणें मीहि अयोध्या नगरीचा यथेष्ट विनियोग करण्यास मुखत्यार आहे. सारांश, तिन्ही राज्यांचे प्रभु आपण आहां, ह्याविषयीं संशय नाहीं. करितां आपण योग्य रीतीनें ह्या राज्यांचें आधिपत्य स्वीकारावें.'

ह्याप्रमाणें विदेहाधिपति जनक विनंति करूं लागला असतां रघुवंशज दशरथ राजा आनंदित होऊन जनकाला म्हणाला, 'तुम्ही उभयतां मिथिलाधिपति भ्राते असंख्य गुणांनीं संपन्न आहां, व आपल्या कुलांतील ऋषितुल्य राजसमुदायाचा तुम्ही ह्या विनयानें उद्धार केला आहे. तुला सुखप्राप्ति होवो व तुझें कल्याण असो. आम्ही आतां स्वस्थानीं जातों, आणि यथाविधि नांदीश्राद्ध वगैरे करितों.' असें म्हणून त्या महाकीर्तिमान दशरथानें त्याचा निरोप घेतला. त्या मुनिश्रेष्ठांना पुढें घालून तो सत्वर तेथून निघाला. नंतर स्वगृहीं गेल्यावर त्यानें यथाविधि नांदीश्राद्ध केलें, आणि दुसरे दिवशीं प्रभातकालीं उठून प्रातःकालामध्यें कर्तव्य असा आपल्या पुत्रांचा उत्कृष्ट गोदानसंस्कार त्यानें केला, व आपल्या पुत्रांकरितां त्या प्रजाधिपति दशरथानें धर्मबुद्धीनें प्रत्येक पुत्राबद्दल एक लक्ष अशा गायी ब्राह्मणांना दिल्या. सारांश, त्या पुरुषश्रेष्ठ दशरथानें सुवर्णशृंगें व विपुल दुग्ध ह्यांनीं युक्त असलेल्या चार लक्ष सवत्स गायी कांस्य धातूच्या दोहनपात्रांसहवर्तमान ब्राह्मणांना दिल्या. इतकेंच नव्हे, परंतु पुत्रांच्या गोदानसंस्काराबद्दल त्या पुत्रवत्सल दशरथानें ब्राह्मणांना आणखीहि इतर विपुल द्रव्य दिलें. गोदानसंस्कार झालेल्या पुत्रांनीं तो दशरथराजा परिवेष्टित झाला असतां लोकपालांनीं परिवेष्टित असलेल्या सौम्य प्रजापतीप्रमाणें दिसूं लागला.

सर्ग त्र्याहत्तरावा.

श्रीरामादिबंधूंचे विवाह.

ज्या दिवशीं दशरथ राजानें आपल्या पुत्रांचा गोदानसंस्कार केला, त्याच दिवशीं वीर युधाजित् तेथें आला आणि केकयराजाचा पुत्र व प्रत्यक्ष भरताचा मातुल असा तो युधाजित् राजाची भेट झाल्यानंतर कुशल प्रश्न करून त्याला म्हणाला, 'केकयदेशाधिपति राजानें तुला प्रेमपूर्वक कुशल प्रश्न विचारिला आहे; आणि ज्यांचें कुशलवृत्त समजण्याची तुला इच्छा आहे, त्यांचें सांप्रत कुशल आहे, असेंहि त्यानें सांगितलें आहे. हे रघुनंदना, माझ्या भाच्याला भेटण्याची केकयराजाला इच्छा झाली आहे. आणि त्याकरितां मी अयोध्या नगरीलाहि आलों; परंतु अयोध्येमध्यें आल्यावर विवाहाकरितां आपले पुत्र आपणांबरोबर मिथिला नगरीला गेले असें ऐकून आपल्या भाच्याला भेटण्याकरितां मी सत्वर येथें आलों.'

ह्याप्रमाणें युधाजितानें सांगितल्यावर प्रिय अतिथि आला आहे, असें मनांत आणून दशरथ राजानें त्याचें परमसत्कारपूर्वक पूजन केलें. नंतर महात्म्या पुत्रांसहवर्तमान ती रात्र काढल्यावर प्रभातकालीं दशरथ राजा उठला आणि नित्य कर्में करून तो तत्त्ववेत्ता राजा ऋषींना पुढें घालून यज्ञशाळेसमीप आला. इतक्यांत सर्व प्रकारचे अलंकार धारण केलेल्या भ्रात्यांसहवर्तमान मंगलकारक असें स्वस्तिवाचन झालेला रामहि वसिष्ठ आणि इतर महर्षि पुढें घालून योग्य अशा विजयमुहूर्तावर तेथें आला. ह्याप्रमाणें तेथें आल्यावर भगवान वसिष्ठ विदेहराज जनकाला म्हणाले, 'राजा, हे पुरुषश्रेष्ठा, श्रेष्ठ दशरथ राजा मंगलकारक स्वस्तिवाचन वगैरे झालेल्या पुत्रांसहवर्तमान कन्यादान करणाऱ्याची वाट पहात आहे. कारण देणारे व घेणारे जुळल्यावर सर्व कांहीं गोष्टी तडीस जात असतात. तेव्हां उत्कृष्ठ विवाहसंस्कार करून तूं आपलें कर्तव्य शेवटास ने.'

ह्याप्रमाणें महात्म्या वसिष्ठांनीं त्याला सांगितलें असतां तो परम उदार, महातेजस्वी व मोठा धर्मवेत्ता जनक राजा त्यांना म्हणाला, 'सध्यां माझ्या दारावर द्वारपाल कोण आहे? आणि तो कोणाच्या आज्ञेची वाट पहात आहे? अहो, आपल्या घरामध्यें प्रवेश करण्याला विचार तो कसला? हें राज्य जसें माझें आहे, तसें आपलेंहि आहे. हे मुनिश्रेष्ठ, वन्हीच्या दीप्तज्वालाप्रमाणें तेजस्वी असलेल्या माझ्या कन्या विवाहसंबंधीं पुण्याहवाचन वगैरे सर्व आटो-

पून वेदीसमीप आल्या आहेत. आणि मीहि ह्या वेदीमध्यें आपलीच वाट पहात बसलों आहें. तस्मात् आतां सर्व निर्विघ्नपणें होऊं द्या. विनाकारण विलंब कशाकरितां ? '

ह्याप्रमाणें जनकानें केलेलें भाषण श्रवण केल्यावर दशरथ राजानें आपले पुत्र व सर्व ऋषीगण आंत घेतले. तदनंतर जनक वसिष्ठांना म्हणाला, ' हे धर्मनिष्ठ ऋषे, हे प्रभो, ऋषींसहवर्तमान आपण ह्या जगन्मोहक रामाचा संपूर्ण विवाहसंस्कार करावा. ' ह्यानंतर भगवान वसिष्ठ ऋषींनीं ' ठीक आहे ' असें जनकाला सांगितलें; आणि विश्वामित्र व धर्मनिष्ठ शतानंद ह्यांना पुढाकार देऊन यज्ञमंडपामध्यें महातपस्वी वसिष्ठांनीं यथाविधि वेदी तयार करून ती सभोंवती गंधपुष्पांनीं भूषित केली. नंतर सोन्याच्या मुठींच्या सुच्या चित्रविचित्र वर्णांच्या अंकुरासहवर्तमान कुंभ, अंकुरांनीं युक्त असे परळ, धूपयुक्त धूपपात्रें, शंखपात्रें, स्रुवे, दर्व्या, अर्घ्यादिकांनीं युक्त अशीं पात्रें, लाह्यांनीं भरलेलीं पात्रें व क्षतरहित आणि संस्कृत असे सारखे दर्भ हीं त्या वेदीवर यथाविधि समंत्रक ठेवून यथाविधि व समंत्रक अग्नि सिद्ध करून मुनिश्रेष्ठ महातेजस्वी वसिष्ठांनीं अग्नीमध्यें हवन केलें. तदनंतर सर्व अलंकार धारण केलेली अशी सीता आणून, आणि तिला अग्नीसमक्ष रामापुढें उभी करून, कौसल्येचा आनंद वृद्धिंगत करणाऱ्या रामाला जनक राजा म्हणाला, ' ही माझी कन्या सीता तुझी सहधर्मचारिणी आहे. तुझें कल्याण असो. तूं हिचा स्वीकार करून आपल्या हातानें हिचें पाणिग्रहण कर. ही महाभाग्यवती पतिव्रता छायेप्रमाणें सर्वदा तुला अनुसरून वागेल. '

ह्याप्रमाणें रामाला सांगून जनक राजानें कन्यादानाचें समंत्रक उदक सोडिलें. तेव्हां देव आणि ऋषी ' उत्तम उत्तम ' म्हणून म्हणूं लागले असतां मोठ्या पुष्पवर्षावाबरोबर देवदुंदुभींचा ध्वनि होऊं लागला.

ह्याप्रमाणें समंत्रक व उदकपूर्वक सीतानामक कन्येचें दान करून हर्षानें उचंबळूं लागलेला जनक म्हणाला, ' लक्ष्मणा, ये, तुझें कल्याण असो. मीं पुढें केलेल्या ह्या ऊर्मिलेचा तूं स्वीकार कर, आणि हिचें पाणिग्रहण कर. कालातिक्रमण होणें योग्य नाहीं. ' ह्याप्रमाणें लक्ष्मणाला सांगितल्यावर जनक राजा भरताला म्हणाला, ' हे रघुनंदना, तूं आपल्या हातानें ह्या मांडवीचें पाणिग्रहण कर.' असें भरताला सांगितल्यानंतर तो धर्मात्मा मिथिलाधिपति जनक राजा शत्रुघ्नालाहि म्हणाला, ' हे महापराक्रमी शत्रुघ्ना, आपल्या हातानें

तूं ह्या श्रुतकीर्तीचें पाणिग्रहण कर. तुम्ही सर्व सौम्य असून सर्वांनींहि उत्तम रीतीनें ब्रह्मचर्य व्रत परिपालन केलेलें आहे. ह्याकरितां आतां तुम्हीं ककुत्स्थ-कुलोत्पन्नांनीं सपत्नीक असावें. आतां कालविलंब नको.'

ह्याप्रमाणें जनक राजाचें भाषण श्रवण केल्यावर वसिष्ठ मुनींच्या आज्ञेत असलेल्या त्या चारहि दशरथपुत्रांनीं चारहि कन्यांचें पाणिग्रहण केलें; आणि अग्नि, वेदि, जनक राजा व ऋषी ह्यांना त्या महात्म्या रघुवंशजांनीं भार्यांसह-वर्तमान प्रदक्षिणा केली. नंतर शास्त्रोक्त प्रकारानें त्यांनीं विधिपूर्वक विवाहकृत्य समाप्त केलें. तेव्हां फारच उज्ज्वल अशी मोठी पुष्पवृष्टि आकाशांतून झाली, दिव्य दुंदुभींचा घोष कानीं येऊं लागला आणि गायन व वादन ह्यांचेहि ध्वनि ऐकूं येऊं लागले. इतकेंच नव्हे, परंतु अप्सरांचे समुदाय नृत्य करूं लागले आणि रघुवंशजश्रेष्ठांच्या विवाहसमयीं गंधर्वहि मधुर गायन करूं लागले. तेव्हां तो सर्वहि प्रकार अद्भुत वाटूं लागला. ह्याप्रमाणें जिकडेतिकडे वाद्य-घोषांनीं दुमदुमून गेलें असतां त्या महातेजस्वी रघुवंशजांनीं भार्यांशीं विवाह केला, आणि नंतर ते रघुनंदन भार्यांसहवर्तमान शिबिरामध्यें गेले असतां ऋषिसमुदाय व बांधव ह्यांसहवर्तमान दशरथ राजाहि त्यांचे मागोमाग शिबिरामध्यें गेला.

सर्ग चौऱ्याहत्तरावा.

दशरथादिकांची बोळवण.

तदनंतर रात्र निघून गेल्यावर महामुनि विश्वामित्र त्या उभयतां राजांचा निरोप घेऊन उत्तर पर्वतावर गेले. विश्वामित्र गेल्यानंतर भूपति दशरथ राजाहि मिथिलाधिपति विदेहराज जनकाचा निरोप घेऊन सत्वर आपल्या नगरी-कडे गेला. तेव्हां विदेहराज मिथिलाधिपति जनकानें त्या कन्यांबरोबर विपुल द्रव्य दिलें, लक्षावधि गायी दिल्या, लक्षावधि उत्तम उत्तम ऊर्णावस्त्रें दिलीं, रेशमी वस्त्रेंहि पुष्कळ दिलीं, सामान्य वस्त्रेंहि क्रोडोगणती दिलीं व दिसण्यांत उत्कृष्ट आणि अलंकार घातलेले असे गज, अश्व, रथ व पदाति पुष्कळ दिले. त्या चौघींपैकीं प्रत्येकीबरोबर सख्या म्हणून शंभर शंभर कन्या आणि उत्कृष्ट दास व दासी दिल्या. रौप्य, सुवर्ण, मोत्यें आणि पोवळीं हीं तर क्रोडोगणती दिलीं. ह्याप्रमाणें त्या जनक राजानें अत्यंत संतुष्ट होऊन आणखीहि उत्कृष्ट उत्कृष्ठ धन कन्यांना देऊन व दशरथ राजाला निरोप देऊन तो मिथिलाधिपति

जनक राजा स्वस्थानीं म्हणजे मिथिलेमध्यें प्रविष्ठ झाला. तेव्हां अयोध्याधिपति दशरथ राजाहि महात्मे सर्व पुत्र बरोबर घेऊन व सर्व ऋषींना पुढें घालून सैन्यासहवर्तमान तेथून निघाला.

परशुरामाचा कोप.

याप्रमाणें ऋषिगण आणि रामप्रभृति पुत्र ह्यांसहवर्तमान तो पुरुषश्रेष्ठ दशरथ राजा जाऊं लागला असतां त्याच्या आसमंताद्भागीं पक्षी भयंकर शब्द करूं लागले व पृथ्वीवरील सर्व पशु त्याला उजवी घालूनहि जाऊं लागले. तें पाहून दशरथ वसिष्ठांना म्हणाला, ' पक्षी भयंकर शब्द करीत आहेत व घोर पशुहि उजवी घालून जात आहेत. तेव्हां हृदय कंपित करणारें असें हें काय आहे ? माझ्या मनाला तर कांहीं सुचत नाहीं. ' हें दशरथ राजाचें भाषण श्रवण करून महर्षि वसिष्ठ मधुर शब्दांनीं त्याला म्हणाले, ' ह्यांचें काय फल आहे, हें श्रवण कर. पक्ष्यांच्या तोंडून जो हा अंतरिक्षामध्यें शब्द निघाला, त्यानें घोर भय सुचविलें; परंतु उजवी घालून जाणारे हे पशु तें भय शांत करीत आहेत. तेव्हां तूं हें भय सोडून दे. '

ह्याप्रमाणें त्यांचा संवाद चालला आहे तोंच सर्व पृथ्वी कंपित करणारा व मोठमोठे वृक्ष उलथून पाडणारा असा वारा सुटला; सूर्य अंधकारानें आच्छादित झाला; दिशांचें भान कोणालाहि राहिलें नाहीं; तें बरोबर असलेलें सैन्य तर सर्व धुराळ्यानें आच्छादित होऊन अगदीं मूर्च्छित झाल्यासारखें झालें. वसिष्ठ, इतर ऋषी व पुत्रांसहवर्तमान दशरथ राजा एवढेच काय ते त्या ठिकाणीं शुद्धीवर असल्यासारखें दिसत होतें, बाकी सर्व मूर्च्छित झाले होते. त्या घोर अंधकारामध्यें ती सेना तर धुराळ्यानें आच्छादित झाल्यासारखीच दिसत होती. इतक्यांत क्षत्रियनाशक व दिसण्यांतहि भयंकर असा जटाधारी भार्गवपुत्र राम दशरथानें अवलोकन केला. तो कैलास पर्वताप्रमाणें धिप्पाड होता. तेजानें त्याच्या संमुख जाणेंहि अशक्य होतें. प्रलयकालाच्या अग्नीप्रमाणें तो दु:सह होता. तेजानें जळत असल्यामुळें सामान्य जनांनीं तर त्याच्याकडे पाहणेंहि शक्य नव्हतें. त्यानें खांद्यावर परशु टाकलेला होता, आणि विद्युल्लतांच्या समुदायाप्रमाणें अत्यंत तेजस्वी धनुष्य हातांत घेतलें असल्यामुळें त्रिपुरासुरनाशक धनुष्य धारण केलेल्या शिवाप्रमाणेंच तो दिसत होता. प्रज्वलित अग्निच कीं काय अशा त्या उग्रस्वरूप परशुरामाला अवलोकन केल्यावर वसिष्ठप्रभृति विप्र जप, होम वगैरेंच्या उद्योगाला लागले, आणि इतर सर्व

मुनी एकत्र जमून आपापल्यामध्यें पुटपुटूं लागले कीं, 'अहो, पित्याचा वध सहन न करणारा हा परशुराम क्षत्रियांचा उच्छेद करण्याच्या उद्देशानें तर येथें आला नाहीं ना? अहो, पूर्वीं क्षत्रियांचा वध केल्यामुळें ह्याचा क्रोध व संताप नाहींसा झाला होता. तथापि पुनरपि क्षत्रिय जाति उच्छिन्न करून टाकण्याचें तर ह्यानें मनामध्यें आणिलें नाहीं ना?' ह्याप्रमाणें आपापसांत बोलून, ऋषींनीं दिसण्यांत उग्र असलेल्या त्या भार्गव रामाचें पूजासाहित्य आणून पूजन केलें; आणि 'हे राम, हे राम' असे मधुर शब्द ते त्याला उद्देशून उच्चारूं लागले. तेव्हां प्रतापी जमदग्निपुत्र रामानें ऋषींनीं केलेल्या त्या पूजेचा स्वीकार केला, आणि नंतर दाशरथि रामाशीं तो बोलूं लागला.

सर्ग पंचाहत्तरावा.

परशुरामाचें भाषण.

परशुराम म्हणाला:—" वीरा रामा, हे दाशरथे, तुझें वीर्य अद्भुत आहे, म्हणून माझें ऐकण्यांत आहे. धनुष्य मोडणें वगैरे प्रकारहि सर्व माझ्या कानावर आलेला आहे. तूं जें त्याप्रमाणें अनायासानें धनुष्य मोडून टाकिलेंस, तें कृत्य सामान्य जनाला मोठें अद्भुत व अतर्क्य वाटण्यासारखें झालें असल्यामुळें, तें ऐकल्यानंतर दुसरें चांगलें धनुष्य घेऊन मी आलों आहें. करितां दिसण्यांतहि घोर असलेल्या ह्या प्रचंड जामदग्न्य धनुष्याला बाण लावूनच तूं आपलें सामर्थ्य मला दाखीव. सारांश, ह्या धनुष्याला बाण लावण्यावरून तुझें सामर्थ्य माझ्या अवलोकनांत आलें म्हणजे मी तुझ्याशीं द्वंद्वयुद्ध करीन व वीर्याच्या दृष्टीनें तें द्वंद्वयुद्ध तुझ्या प्रशंसेसच पात्र होईल."

परशुरामाचें हें भाषण श्रवण केल्यावर दशरथ राजा खिन्नवदन होऊन दीन झाला, आणि हात जोडून त्याला म्हणाला, 'क्षत्रियांसंबंधानें जो तुझे ठिकाणीं क्रोध होता, तो क्षत्रियांच्या वधानें नाहींसा करून तूं महातपस्वी ब्राह्मण शांत झाला आहेस. ह्यास्तव माझ्या बालवयी पुत्रांना अभयदान दे. वेदाध्ययनरूप व्रतानें संपन्न अशा भार्गवांच्या कुलामध्यें तूं उत्पन्न झालेला आहेस, आणि अतःपर शस्त्र धारण करणार नाहीं अशी इंद्राचें सन्निध प्रतिज्ञा करून तूं शस्त्राचा त्याग केला आहेस. तस्मात् धर्माचरणाविषयीं तत्पर होऊन तूं कश्यप मुनीला पृथ्वी दिलीस, आणि वनामध्यें जाऊन महेंद्र पर्वताचा आश्रय

करून राहिलास; परंतु असें असतांनाहि माझा सर्वस्वी नाश करण्याकरितां तूं प्राप्त झाला आहेस. अरे, एका रामाचा तूं वध केलास तर आमच्यापैकीं कोणीहि जिवंत राहणार नाहीं.'

वैष्णव धनुष्याचें वृत्त.

ह्याप्रमाणें दशरथ राजा विनंति करीत असतांना ते प्रतापी जमदग्निपुत्र त्याच्या विनंतीचा अव्हेर करून रामाशींच बोलूं लागले. ते म्हणाले, "हीं दोन श्रेष्ठ दिव्य धनुष्यें लोकमान्य, दृढ, बलाढ्य पुरुषालाच लंवणारीं व उत्कृष्ठ अशीं विश्वकर्म्यानें मोठ्या यत्नानें निर्माण केलीं होतीं. त्यांपैकीं युद्धाची इच्छा करणाऱ्या त्र्यंबकाला त्रिपुरनाशक असें एक धनुष्य देवांनीं पूर्वीं दिलें होतें; आणि रामा, त्याचाच तूं भंग केलास. हें दुसरें धनुष्य दुःसह असून सुरश्रेष्ठांनीं विष्णूला दिलें होतें. तें हें वैष्णव धनुष्य शत्रुसमूहाचा पराजय करणारें असून, सामर्थ्यानें हें रुद्राच्या धनुष्याची बरोबरी करणारें आहे. त्रिपुरासुराचा वध झाला तेव्हां सर्व देवांनीं शिव आणि विष्णु ह्यांचें बलाबल समजण्याच्या उद्देशानें ब्रह्मदेवाला प्रश्न केला असतां, देवांचा अभिप्राय जाणून सत्यवानांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या ब्रह्मदेवानें त्या उभयतांमध्यें विरोध उत्पन्न केला; आणि मग परस्परांचा पराजय करण्याच्या इच्छेनें शिव आणि विष्णु ह्यांमध्यें शरिरावर रोमांच उठविणारें असें प्रचंड युद्ध सुरू झालें. तेव्हां विष्णूनें हुंकारानें तें भयंकर पराक्रम करणारें रुद्रधनुष्य जर्जर करून त्रिलोचन महादेवाचेंहि स्तंभन केलें. तेव्हां ऋषिगण आणि चारण ह्यांसहवर्तमान सर्व देवांनीं एकत्र होऊन त्या उभयतां सुरश्रेष्ठांची प्रार्थना केली असतां ते शांत झाले, आणि विष्णूच्या पराक्रमांनीं तें शैवधनुष्य जर्जर झाल्याचें अवलोकन करून ऋषिगणांसहवर्तमान देव विष्णूला अधिक मानूं लागले."

परशुराम पुढें सांगतातः—"तें जर्जर झालेलें धनुष्य क्रुद्ध झालेल्या महाकीर्तीमान रुद्रानें विदेह देशामध्यें असलेल्या राजर्षि देवराताच्या हातीं बाणांसहवर्तमान दिलें. असो. रामा, शत्रुसमूहाचा पराजय करणारें हें वैष्णव धनुष्य त्या विष्णूनें भृगुपुत्र ऋचीकाला उत्कृष्ठ ठेव म्हणून दिलें. पुढें महातेजस्वी ऋचीकानें, कोणालाहि उलट दुःख न देणारा असा जो त्याचा पुत्र व माझा पिता महात्मा जमदग्नि, त्याला हें दिव्य धनुष्य दिलें. पुढें त्या वैष्णव चापरूप शस्त्राचा त्याग केल्यावर तपःसामर्थ्यानें युक्त असलेल्याहि माझ्या पित्याला यःकश्चित् समजून कार्तवीर्य अर्जुनानें त्याचा वध केला. तेव्हां अत्यंत

दारुण व अयोग्य असा पित्याचा वध झाल्याचें ऐकतांक्षणीं मीं फिरून फिरून उत्पन्न झालेली क्षत्रियजाति अनेक वेळां उच्छिन्न करून टाकिली, आणि ही संपूर्ण पृथ्वी प्राप्त झाल्यावर महात्म्या पुण्यकर्मी कश्यपाला ती यज्ञाचे शेवटीं दक्षिणा म्हणून देऊन टाकिली. कश्यपाला पृथ्वी देऊन टाकून तपःसामर्थ्यानें युक्त असलेला मीं महेंद्र पर्वताचा आश्रय करून राहिलों. परंतु तूं धनुष्याच्या भंग केलास, हें ऐकतांक्षणीं मी तेथून सत्वर आलों आहें. सारांश, रामा, हें प्रचंड वैष्णव धनुष्य पितृपितामहपरंपरेनें मला प्राप्त झालेलें आहे. करितां, क्षत्रधर्माला स्मरून तूं हें उत्कृष्ठ धनुष्य घे, आणि ह्या श्रेष्ठ धनुष्याला शत्रुसमूहनाशक असा बाण तूं लाव. ह्या धनुष्याला बाण लावण्यास तूं समर्थ झालास, म्हणजे मी तुझ्याशीं द्वंद्वयुद्ध करीन."

सर्ग शहात्तरावा.

श्रीरामाचें भाषण.

ह्याप्रमाणें जमदाग्निपुत्र परशुरामाचें भाषण श्रवण केल्यावर दाशरथि राम, पिता सन्निध असल्यामुळें उच्चस्वरानें न बोलतां, नम्रपणानें परशुरामाला म्हणाला, "हे भार्गवा, हे ब्रह्मन्, मी त्र्यंबक चाप मोडिल्याचें तूं ऐकिलें असशील, आणि पित्याच्या ऋणांतून मुक्त होण्याकरितां तूं जें कर्म केलेंस, तेंहि आम्हांला कबूल आहे; परंतु हे भार्गवा, तूं मला वीर्यहीन अशक्ताप्रमाणें समजून, क्षत्रधर्मानें संपन्न असलेल्या माझा अवमान करीत आहेस, हें मात्र आम्हांला खपत नाहीं. तेव्हां आज माझें तेज व पराक्रम तूं पहा."

ह्याप्रमाणें सांगून त्या क्रुद्ध झालेल्या शीघ्रपराक्रमी रघुवंशज रामानें भार्गवाचें धनुष्य व बाण ह्यांचा स्वीकार केला, आणि धनुष्याला प्रत्यंचा चढवून त्याला बाणहि लाविला. नंतर दाशरथि राम क्रुद्ध होऊन त्या जमदग्निपुत्र परशुरामाला म्हणाला, "तूं ब्राह्मण आहेस म्हणून मला पूज्य आहेस एतदर्थ, आणि विश्वामित्रांच्या भगिनीचा पौत्र आहेस म्हणून मी तुझ्यावर प्राणघातक बाण सोडण्यास असमर्थ आहें. तेव्हां हे भार्गवा, ही तुझी गति म्हणजे पाय अथवा तपःसामर्थ्यानें संपादित केलेले अप्रतिम लोक नाहींतसे करावे, असें मला वाटतें. कारण स्वसामर्थ्यानें शत्रूंचा बलाविषयींचा गर्व नाहींसा करून शत्रुसमूहांचाहि नाश करणारा हा दिव्य वैष्णव बाण व्यर्थ पडणार नाहीं."

परशुराम अवताराची समाप्ती.

ह्याप्रमाणें दाशरथि राम परशुरामाला उद्देशून भाषण करीत असतांना, तें श्रेष्ठ वैष्णव धनुष्य धारण केलेल्या रामाला अवलोकन करण्याकरितां ऋषीगणांसहवर्तमान सर्व देव ब्रह्मदेवाला पुढें करून त्या ठिकाणीं आले. तो मोठा अद्भुत प्रकार अवलोकन करण्याकरितां गंधर्व, अप्सरा, सिद्ध, चारण, किन्नर, यक्ष, राक्षस आणि नाग हेहि तेथें जुळले. नंतर श्रेष्ठ धनुष्य धारण करणाऱ्या दाशरथि रामाचे ठिकाणीं भार्गवरामामध्यें असलेलें तेज प्रविष्ट झाल्यामुळें, भार्गवराम केवल जड झाला, आणि नंतर निर्वीर्य बनलेला तो जमदग्निपुत्र राम दाशरथि रामाकडे पाहूं लागला. सारांश, तेज रामाचे ठिकाणीं गेल्या कारणानें निर्वीर्य झालेला आणि म्हणूनच जड बनलेला जमदग्निपुत्र परशुराम कमलनयन रामाला हळू हळू म्हणाला, "मी जेव्हां पूर्वी कश्यपाला पृथ्वी दिली, तेव्हां हा रात्रीं पृथ्वीवर राहिला असतां क्षत्रियांना झोंप येणार नाहीं असें समजून 'माझ्या प्रदेशामध्यें तूं राहूं नको' म्हणून मला कश्यपानें सांगितलें. तेव्हांपासून हे ककुत्स्थकुलोत्पन्ना रामा, गुरूची आज्ञा परिपालन करण्याकरितां मी रात्रीं पृथ्वीवर वास्तव्य करीत नाहीं. कारण कश्यपासन्निध मीं तशीच प्रतिज्ञा केलेली आहे. तस्मात् ती ही माझी गति तूं नाहींशी करूं नको. म्हणजे राघवा, मी मनोवेगानें महेंद्र नामक श्रेष्ठ पर्वतावर जाईन. रामा, तपश्चर्येच्या योगानें मीं अप्रतिम लोक संपादन केलेले आहेत, ते तूं या श्रेष्ठ बाणानें खुशाल नाहींतसे कर कसा. आतां विलंब नको. हें धनुष्य ग्रहण केल्यावरून मी तुला अक्षय्य असा सुरश्रेष्ठ विष्णु समजत आहें. हे शत्रुतापना, तुझें कल्याण असो. हे सर्व देवगण येथें आले आहेत व संग्रामामध्यें ज्याला प्रतियोद्धा नाहीं व ज्याच्या पराक्रमालाहि तोड नाहीं अशा तुला अवलोकन करीत आहेत. हे ककुत्स्थकुलोत्पन्ना रामा, तूं त्रैलोक्यनाथानें मला पराजित केलेस म्हणून तुझ्या संबंधानें मला लाज बाळगण्याचें कारण नाहीं. हे सदाचरणसंपन्न रामा, तूं आतां हा अप्रतिम बाण सोड. तो तूं सोडिलास म्हणजे मी महेंद्रसंज्ञक श्रेष्ठ पर्वतावर चालता होईन."

ह्याप्रमाणें जमदग्निपुत्र परशुराम सांगत असतांना प्रतापी व वैभवशाली दाशरथि रामानें तो उत्कृष्ठ बाण सोडिला. तेव्हां तपानें संपादन केलेले आपले लोक रामानें नाहींतसे केलेले पाहून जमदग्निपुत्र परशुराम श्रेष्ठ अशा महेंद्र पर्वतावर सत्वर चालता झाला. तदनंतर सर्व दिशा व उपदिशा अंध-

काररहित झाल्या, आणि ऋषिगणांसहवर्तमान देवांनीं धनुर्धारी रामाची प्रशंसा केली. नंतर दाशरथि रामानें परशुरामाचें पूजन केल्यावर तो समर्थ परशुरामहि दाशरथि रामाला उजवी घालून स्वस्थानीं गेला.

सर्ग सत्याहत्तरावा.

अयोध्याप्रवेश.

परशुराम गेल्यावर दाशरथि रामाचें मन शांत झालें, व त्या महाकीर्तिमान रामानें तें धनुष्य तेथें आलेल्या अचिंत्य व सामर्थ्यवान वरुणाच्या हातांत दिलें. नंतर वसिष्ठप्रभृति ऋषींना अभिवंदन केल्यावर खिन्न झालेल्या पित्याला अवलोकन करून रघुनंदन राम म्हणाला, ' जामदग्न्य राम गेला. आतां आपण प्रभूंनीं रक्षण केलेली ही चतुरंग सेना अयोध्येकडे वळून चालूं लागूं द्या. ' हें रामाचें भाषण श्रवण केल्यावर दशरथ राजानें आपल्या गुणवान पुत्राला बाहूंनीं आलिंगन देऊन त्याचें मस्तक हुंगिलें. कारण, परशुराम गेला हें ऐकल्याबरोबर दशरथ राजाला हर्ष व आनंद झाला, आणि पुत्राचा व आपला पुनर्जन्म झाला असेहि त्याला वाटलें. तदनंतर सेनेला चालू लागण्याची आज्ञा करून तो दशरथ सत्वर आपल्या अयोध्या नगरीकडे चालता झाला. ती रम्य नगरी पताका व ध्वज ह्यांनीं युक्त असून वाद्यघोषानें दुमदुमून गेलेली होती. राजमार्गावर सडा घातलेला असल्यामुळें आणि पुष्पांचे ढीग ठिकठिकाणीं पसरले असल्यामुळें ती मनोहर दिसत होती. राजाचा प्रवेश होणार असल्यामुळें ज्यांचीं मुखकमलें प्रफुल्लित झालीं आहेत व ज्यांनीं आपल्या हातांमध्यें मंगलकारक पदार्थ घेतलेले आहेत, अशा नगरवासी जनांनीं ती परिपूर्ण असून इतरहि जनसमुदायांनीं ती भूषित झालेली होती. अशा त्या नगरीमध्यें राजानें प्रवेश केला. नगरांत राहणारे द्विज आणि इतरहि नगरवासी जन हे दूरपर्यंत ज्याला सामोरे गेले आहेत, आणि ज्याच्या मागोमाग वैभवशाली पुत्र येत आहेत, असा तो महाकीर्तिमान व श्रीमान राजा, हिमालय पर्वताप्रमाणें असलेल्या आपल्या प्रिय गृहामध्यें प्रविष्ट झाला. गृहामध्यें स्वजनांनीं इष्ट वस्तु देऊन त्याचा उत्तम प्रकारें सन्मान केल्यामुळें तो आनंदित झाला; आणि कौसल्या, सुमित्रा व सुंदरी कैकेयी आणि इतरहि राजभार्या स्नुषांचें स्वागत

करण्याकडे गुंतल्या. तदनंतर महाभाग्यवती सीता, यशस्विनी ऊर्मिला आणि मांडवी व श्रुतकीर्ति ह्या ज्या उभयतां कुशध्वज राजाच्या कन्या, त्यांचें राजभार्यांनीं स्वागत केलें आशीर्वाद प्राप्त झालेल्या व गृहप्रवेशनीय होम झाल्यामुळें कल्याणसंपन्न होऊन सोवळीं परिधान केलेल्या सर्वहि राजकन्यांनीं देवस्थानांना सत्वर प्रणाम केले. नंतर पूज्यांना अभिवंदन करून त्या सर्वहि राजकन्या आनंदित झाल्या, आणि भर्त्यांसहवर्तमान एकांतामध्यें आनंद पावूं लागल्या. भार्या, अस्त्रें, धन आणि सुहृद ह्यांनीं युक्त असलेले ते पुरुषश्रेष्ठ रामप्रभृति दशरथपुत्र पित्याच्या सेवेमध्यें तत्पर राहून त्याच्या आज्ञेप्रमाणें वागत असत.

ह्याला कांहीं दिवस लोटल्यावर कैकेयीपासून झालेल्या आपल्या भरतनामक पुत्राला रघुनंदन दशरथ राजा म्हणाला, 'मुला, हा केकयराजाचा पुत्र वीर युधाजित् तुझा मातुल तुला नेण्याकरितां येथें येऊन राहिला आहे.' हें दशरथाचें भाषण श्रवण केल्यावर कैकेयीपुत्र भरत-शत्रुघ्नाला बरोबर घेऊन जाण्यास निघाला. आणि पिता, कोणाला कधींहि न दुखविणारा राम व सर्व माता ह्यांचा निरोप घेऊन तो पुरुषश्रेष्ठ शूर भरत शत्रुघ्नासहवर्तमान चालता झाला. तेव्हां शत्रुघ्न बरोबर असल्यामुळें युधाजिताला हर्ष झाला, आणि तो वीर आपल्या नगरांत प्रविष्ट झाल्यावर त्याचा पिताहि संतुष्ट झाला. असो. भरत गेल्यावर राम व महाबलाढ्य लक्ष्मण हे उभयतां आपल्या देवतुल्य पित्याची मानमान्यता ठेवूं लागले आणि पित्याच्या आज्ञेनें राम हा प्रिय आणि हितावह अशी सर्व लोकांचीं कामें सर्व प्रकारें करूं लागला. मातांचीं जीं कार्यें असतील तीं तो त्यांच्याकरितां करूं लागला. आणि श्रुतिस्मृतींची मर्यादा यत्किंचित्‌हि उल्लंघन न करणारा तो राम गुरुसंबंधीं शुश्रूषा वगैरे कृत्यांकडेहि वेळोवेळीं लक्ष्य पुरवूं लागला. ह्याप्रमाणें तो वागूं लागला असतां त्याच्या सुशील वर्तनानें दशरथ, ब्राह्मण, उदमी आणि देशांमध्यें राहणारे इतरहि सर्व संतुष्ट झाले. त्या चार पुत्रांपैकीं अमोघ पराक्रमी राम जगतामध्यें अत्यंत कीर्तिमान झाला, आणि प्राण्यांमध्यें ब्रह्मदेवाप्रमाणें अत्यंत गुणी झाला. सीतेचे ठिकाणीं ज्याचें मन आसक्त होऊन राहिलेलें आहे व सीतेनेंहि ज्याला आपल्या मनामध्यें ठेविलें आहे, अशा विचारी रामानें पुढें पुष्कळ ऋतु (बारा संवत्सर) सीतेसहवर्तमान आनंदामध्यें काढिले. पित्यानें दिलेली भार्या म्हणून रामाला सीता आधींच प्रिय झाली होती व तिच्या अंगच्या गुणांमुळें आणि तिचे ठिकाणीं असणाऱ्या सौंदर्यरूप गुणामुळें त्याचें प्रेम अधि-

कच वृद्धिंगत होत होतें. सीतेकडे रामाच्या मनाचा जितका ओढा असे, त्यापेक्षां सीतेच्या मनाचा रामाकडे दुप्पट ओढा असे. आणि रूपामध्यें देवतांची बरोबरी करणारी व मूर्तिमंत लक्ष्मीप्रमाणेच असलेली ती जनककन्या मैथिली रामाच्या अंतःकरणांतील अभिप्राय आपल्या अंतःकरणानें स्पष्टपणें फारच अधिक जाणीत असे. (रामाला मात्र तिच्या अंतःकरणांतील अभिप्राय तितका स्पष्ट रीतीनें कळत नसे. कारण, सीतेला जितका रामाचा ध्यास असे तितका रामाला तिचा ध्यास नसे.) सारांश, तो राजर्षिपुत्र राम, प्रीतीस पात्र असलेल्या त्या उत्कृष्ट राजकन्येचा समागम झाल्यावर, लक्ष्मीशीं संगत झालेल्या देवाधिपति प्रभु विष्णूप्रमाणें आनंदित होऊन शोभूं लागला.



श्रीवाल्मीकिरामायण.

अयोध्याकांड.

सर्ग पहिला.

श्रीरामचंद्राचें आचरण.

भरत मातुलगृहीं जाऊं लागला असतां कामक्रोधादि नित्य रिपूंचा नाश करणाऱ्या निरुपद्रवी शत्रुघ्नाला तो प्रेमपूर्वक आपल्या बरोबर घेऊन गेला. त्या ठिकाणीं तो भ्रात्यांसहवर्तमान वास्तव्य करूं लागला असतां, अश्वपति मातुल त्याचा चांगला सत्कार करीत असे, व पुत्रप्रेमानें त्याचें लालन करीत असे. परंतु अशा प्रकारच्या मातुलगृहीं ते रहात असतांनाहि, आणि इष्ट वस्तु प्राप्त होऊन त्यांचे मनोरथ तेथें सिद्धीस जात असतांनाहि, त्या वीर भ्रात्यांना वृद्ध दशरथ राजाचें स्मरण होत असे; व महातेजस्वी राजालाहि परदेशांत गेलेल्या आपल्या उभयतां इंद्र वरुणतुल्य भरत शत्रुघ्न पुत्रांचें स्मरण होत असे. कारण, स्वतःच्या शरिरांतून निघालेल्या चार हातांप्रमाणेंच कीं काय त्या दशरथ राजाला ते चारहि पुरुषश्रेष्ठ पुत्र एकसारखेच प्रिय होते. त्या चौघांमध्येंहि महातेजस्वी राम पित्याला विशेष आनंद देणारा असून, प्राण्यांमध्यें ब्रह्मदेवाप्रमाणें अधिक गुणवान होता. कारण मत्त झालेल्या रावणाचा वध व्हावा हा उद्देश मनांत धरून देवांनीं सनातन विष्णूची प्रार्थना केली असतां भगवान विष्णूनें मनुष्यलोकांमध्यें रामावतार धारण केलेला होता. ह्यास्तव सुरश्रेष्ठ इंद्रामुळें शोभणाऱ्या अदितीप्रमाणें या अपरिमित तेजस्वी पुत्राच्या योगानें कौसल्या शोभत होती. जगतामध्यें अनुपम असलेला तो दशरथपुत्र राम गुणांनीं दशरथाप्रमाणें असून, रूपवान, वीर्यवान व निर्मत्सर होता. त्याचें अंतःकरण नेहमीं शांत असे. त्याच्या भाषणांत मार्दव असे. कोणी त्याला टोंचून बोलूं लागला असतांहि तो त्याला कठोर उत्तर देत नसे. एखाद्यानें कधीं काळीं त्याच्यावर एखादा यःकश्चित उपकार केलेला असला, तरी तेवढ्यानें तो त्याच्यावर

संतुष्ट असे, आणि अंतःकरण स्वाधीन असल्यामुळें शंभर अपराधांचेंहि त्याला स्मरण होत नसे. अस्त्राभ्यासाचा समय असतानांहि शीलवृद्ध, ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध सज्जनांची गांठ पडली असतां त्यांच्याशीं तो नित्य बोलत बसत असे. तो बुद्धिमान राम कोणी आला असतां त्याच्याशीं प्रथम प्रिय व मधुर भाषण करीत असे, आणि वीर्यवान असूनहि स्वतःच्या प्रचंड वीर्याचा त्याला कधीं अचंबा वाटत नसे. अनृत भाषण कधींहि न करितां तो ज्ञानी राम वृद्धांचा मान राखीत असे, आणि प्रजाजन त्याच्यावर प्रेम करीत असून तोहि प्रजाजनांवर प्रीति करीत असे. सदय, क्रोधसंयमन केलेला आणि दीनांवर कृपा करणारा तो धर्मवेत्ता ब्राह्मणांचा सत्कार करीत असून नेहमीं जितेंद्रिय व शुचिर्भूत असे. आपल्या कुलाला योग्य अशीच त्याची मति असे. स्वतःचा क्षात्रधर्मच तो श्रेष्ठ समजत असे, आणि स्वर्गरूप महाफल क्षात्रधर्माच्या अवलंबनानेंच साध्य आहे, असें त्याला अगदीं मनापासून वाटत असे. श्रेयस्कर न होणारें कर्म करण्याकडे त्याचा कधींच कल नसे. धर्मविरुद्ध भाषणाची त्याला कधीं अभिरुचि नसे, व बृहस्पतीप्रमाणें तो उत्तमोत्तम भाषण करीत असे. असो. आरोग्यसंपन्न, तरुण, वक्ता, सुलक्षण देहधारी, देशकालज्ञ आणि कोणत्या पुरुषाचे अंगीं कोणता गुण आहे हें जाणणारा तो राम, ब्रह्मदेवानें सर्वगुणसंपन्न असा एकटा तेवढाच निर्माण केलेला होता. ह्यास्तव उत्कृष्ठ गुणांनीं संपन्न असलेला तो राजकुमार राम अंगच्या गुणांमुळें प्रजाजनांना—शरिराबाहेर संचार करणारा प्राणच कीं काय असा—प्रिय झाला. ज्या ज्या विद्येला जें जें व्रत अवश्य असेल, तें तें आचरिल्यानंतर समावर्तन संस्कार झालेला आणि म्हणूनच योग्य रीतीनें सांग वेद जाणणारा तो भरताग्रज शस्त्रास्त्रांमध्यें तर पित्यापेक्षांहि अधिक झाला. असो. तो राम कल्याणांचें उत्पत्तिस्थान, सज्जन, सत्यवचनी व सरळ असून धर्मार्थवेत्त्या वृद्ध द्विजांपासून त्याला शिक्षण प्राप्त झालें होतें. धर्म, अर्थ आणि काम ह्यांचें तत्त्व जाणणारा तो राम स्मरण व समयस्फूर्ति ह्या गुणांनीं युक्त असून लोकव्यवहारामध्यें प्रवीण व धर्मशास्त्रामध्येंहि निष्णात होता. त्या विनयसंपन्न रामाचा अभिप्राय इतरांना समजत नसे. गुप्त मित्रांचें त्याला साहाय्य असे. त्याचा क्रोध आणि हर्ष हे कधींहि व्यर्थ जात नसत, आणि दान करण्याचा व मिळविण्याचा काल कोणता, हें तो जाणीत असे. गुरु वगैरेंचे ठिकाणीं निश्चल भक्ति करणारा, स्थिर बुद्धीनें युक्त असलेला, निंद्य गोष्टींचें कधींहि अवलंबन न करणारा, दुसऱ्याला उद्वेग उत्पन्न होईल असें भाषण न

करणारा, आलस्यरहित आणि दक्ष असा तो राम स्वकीय आणि परकीय दोष जाणीत असे. शास्त्रज्ञ, कृतज्ञ व लोकांचा अभिप्राय जाणण्याविषयीं आणि निग्रह व अनुग्रह यथायोग्य रीतीनें करण्यामध्यें तो निपुण असे. सज्जनांचा संग्रह करून आपलें रक्षण केव्हां करावें, आणि दुष्टांचा निग्रह कोठें व केव्हां करावा, हें तो जाणीत असे; आणि तो द्रव्यार्जनाचा उपाय जाणीत असून शास्त्रोक्त कर्महि जाणीत असे. अस्त्रसमुदाय आणि नाटक वगैरे कवींच्या मिश्र कृति ह्यांमध्यें तो निपुण असून, आळशी नसलेला तो राम धर्म आणि अर्थ ह्यांना बाध न येईल अशा रीतीनें सुखाच्या मागें लागलेला असे. गज आणि अश्व ह्यांच्यावर बसावें कसें आणि त्यांना शिकवावें कसें, हें त्याला चांगलें अवगत असे. आणि क्रीडाविषयक शिल्पकर्मांचा तो ज्ञाता असून द्रव्यव्यवस्था कशी करावी, हेंहि तो जाणीत असे. धनुर्वेदवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ, जगतांतील अतिरथ्यांनाहि संमत, शत्रूंवर चालून जाणारा आणि प्रहार करणारा तो राम सेनेला युद्धशिक्षण देण्यांतहि प्रवीण असे. क्रुद्ध झालेल्या देवदैत्यांचीहि संग्रामामध्यें त्याच्यापुढें जाण्याची छाती नसून असूयारहित व क्रोधसंयमन केलेला तो राम कधीं गर्व वहात नसे आणि मत्सरहि धरीत नसे. कोणताहि प्राणी त्याची अवज्ञा करीत नसे, आणि तोहि कालाच्या अधीन होऊन रहात नसे. ह्याप्रमाणें तो राजकुमार राम श्रेष्ठ गुणांनीं युक्त होता. त्रैलोक्यांतील लोकांना तो संमत असे. क्षमाप्रभृति गुणांनीं तो पृथ्वीची बरोबरी करणारा असे. बुद्धीनें बृहस्पतीसारखा असे आणि वीर्यामध्येंहि इंद्राप्रमाणें असे. किरणांच्या योगानें ज्याप्रमाणें देदीप्यमान सूर्य शोभत असतो, त्याचप्रमाणें सर्व प्रजाजनांना इष्ट आणि पित्याला आनंद देणाऱ्या अशा गुणांच्या योगानें तो रघुवंशज श्रेष्ठ राम शोभूं लागला.

रामाला अभिषेक करण्याविषयीं दशरथाचा विचार.

अशा प्रकारच्या आचरणानें संपन्न आणि अजिंक्य पराक्रमानें युक्त असा तो जगदीशतुल्य राम प्रभु असावा म्हणून पृथ्वीवरील प्रजा इच्छा करूं लागली आणि अनेक अनुपम गुणांनीं संपन्न असलेल्या त्या पुत्राला अवलोकन करून शत्रुतापन दशरथ राजाहि (पुत्राला राज्याभिषेक करण्याचें) मनामध्यें आणूं लागला. सारांश, पुष्कळ काळपर्यंत राहिलेल्या त्या वृद्ध दशरथ राजाला, ‘ मी जिवंत असतांना राम कसा तरी राजा होवो ’ अशी इच्छा उत्पन्न झाली. हीच उत्कट इच्छा त्याच्या हृदयामध्यें एकसारखी घोळत असे; आणि म्हणूनच

'मी आपल्या प्रिय पुत्राला राज्याभिषेक झालेला केव्हां अवलोकन करीन? कारण, लोकांच्या अभ्युदयाची इच्छा धरून जलवृष्टियुक्त पर्जन्याप्रमाणें प्राणिमात्रावर दया करणारा हा राम पृथ्वींतील लोकांना माझ्यापेक्षांहि प्रिय आहे. वीर्यामध्यें यम व इंद्र ह्यांप्रमाणें असलेला, बुद्धीमध्यें बृहस्पतीची बरोबरी करणारा आणि धैर्यासंबंधानें पर्वततुल्य असलेला हा राम माझ्यापेक्षांहि गुणी आहे. तस्मात् ह्या संपूर्ण पृथ्वीचें राज्य चालवितांना मी त्या पुत्राला ह्या वयामध्यें अवलोकन करून योग्य कालीं स्वर्गप्राप्ति करून घेईन.' असे विचार तो मनामध्यें आणूं लागला. जगतामध्यें इतर राजांचे ठिकाणीं आढळण्यास दुर्लभ अशा ह्या निर्दिष्ट केलेल्या नानाप्रकारच्या गुणांनीं आणि निर्दिष्ट न केलेल्या अशाहि लोकोत्तर असंख्य गुणांनीं युक्त असलेल्या, (युक्त व अनुकूल अशा सर्व गुणांनीं संपन्न असलेल्या) त्या पुत्राला अवलोकन करून, आणि मंत्र्यांसहवर्तमान निश्चय करून रामाला यौवराज्याचा अभिषेक करण्याचा दशरथानें विचार केला; आणि स्वर्ग, अंतरिक्ष व भूमि ह्यांचे ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस आलेलें उत्पातजन्य घोर भय, व स्वतःच्या शरिराचे ठिकाणीं प्राप्त झालेली जरा हें त्या बुद्धिमान दशरथ राजानें पुत्राला राज्याभिषेक करण्याचें कारण सांगितलें. नंतर पूर्ण चंद्राप्रमाणें ज्याचें मुख आल्हादकारक आहे अशा महात्म्या रामाला अभिषेक केला असतां, आपली काळजी दूर होऊन जगतालाहि आनंद होईल असें त्याला समजून आलें. तेव्हां आपलें कल्याण होऊन प्रजाजनांचा इष्ट हेतु सिद्धीस जावा, एतदर्थ रामाला राज्याभिषेक करण्याचा काल प्राप्त झाला आहे असें समजून त्याविषयीं दशरथ राजानें मंत्र्यांना मनःपूर्वक त्वरा केली. नंतर नानाप्रकारच्या नगरांमध्यें वास्तव्य करणाऱ्या आणि भिन्न भिन्न देशांमध्यें राहणाऱ्या पृथ्वींतील राजांना भूपति दशरथ राजानें मंत्र्यांकडून बोलावून आणिलें, आणि उतरण्याला घरें व नानाप्रकारचीं भूषणें देऊन यथायोग्य रीतीनें त्यांचा आदरसत्कार झाल्यावर प्रजाजनांची भेट घेणारा ब्रह्मदेवच कीं काय अशा त्या दशरथ राजानें अलंकार धारण करून त्यांची भेट घेतली. परंतु इच्छिलेलें कार्य सिद्धीस नेण्याची त्वरा असल्यामुळें, 'ह्यांना नंतर प्रिय वार्ता समजेल' असें मनांत आणून त्या दशरथानें केकय राजाला अथवा जनकाला त्या वेळीं आणविलें नाहीं. असो. शत्रूंच्या नगरांना पीडा देणारा तो दशरथ राजा सभेमध्यें येऊन बसल्यानंतर, केकय आणि जनक ह्यांशिवाय इतर लोकमान्य राजे सभेंत प्रविष्ट झाले. नंतर दशरथ राजानें नानाप्रकारचीं आसनें

दाखवून दिल्यावर ठरीव प्रदेशावरच अंमल चालविणारे ते राजे दशरथ राजाच्या संमुख बसले, आणि सत्कार झालेले विनयी राजे व अयोध्या नगरींतील आणि देशांतील दाटीदाटीनें बसलेले लोक ह्यांच्या योगानें परिवेष्टित झालेला तो राजा, देवांनीं परिवेष्ठित झालेल्या भगवान इंद्राप्रमाणें शोभूं लागला.

सर्ग दुसरा.

दशरथाचें भाषण.

नंतर सर्व सभेला अवधान देण्यास सांगून, भूपति दशरथ हा श्रेयस्कर, उत्कृष्ठ, हर्षजनक व सुश्राव्य असें भाषण करूं लागला. सारांश, दुंदुभीच्या ध्वनीप्रमाणें गंभीर असल्यामुळें ज्याचा प्रतिध्वनि उठत आहे अशा मोठ्या स्वरानें दशरथ राजा मेघाप्रमाणें दशदिशा नादित करूं लागला. आणि राजलक्षणांना योग्य, इष्ट आणि अनुपम अशा अद्भुत रसानें संपन्न असलेल्या स्वरानें तो दशरथ राजा सभेंत बसलेल्या राजांना म्हणाला, " माझ्यापूर्वी होऊन गेलेल्या राजाधिराजांनीं ह्या माझ्या उत्कृष्ठ राज्याचें पुत्राप्रमाणें परिपालन केलें, हें तुम्हांस विदितच आहे. तेव्हां सर्व इक्ष्वाकुवंशज राजानीं पालन केल्यामुळें सुख भोगण्यासच योग्य झालेल्या ह्या संपूर्ण जगताचें कल्याण करण्याची माझी इच्छा आहे. पूर्वजांनीं घालून दिलेल्या मार्गाचें आक्रमण करून मींहि हें राज्य चालविलें आहे. आणि नित्य दक्ष राहून प्रजाजनांचें यथाशक्ति रक्षण केलेलें आहे. सारांश, संपूर्ण जगताचें हित करण्याचा उद्देश मनांत धरून मीं हें शरीर शुभ्रवर्ण छत्राच्या छायेखालीं अगदीं जीर्ण करून टाकिलें आहे. ह्याकरितां, हजारों वर्षें म्हणजे पुरुषांचीं अनेक आयुष्यें होईपर्यंत जगून जीर्ण झालेल्या ह्या शरिराला विश्रांति द्यावी अशी माझी इच्छा आहे. ज्याला शौर्यप्रभृति राजप्रभावांची अपेक्षा आहे, आणि इंद्रियाधीन पुरुषांना जें रेटणें दुर्घट आहे, तें जगताचें धर्मरूप जूं वहातां वहातां मी श्रांत झालों आहें. तस्मात्, सन्निध असलेल्या ह्या सर्व द्विजश्रेष्ठांच्या संमतीनें प्रजाहिताविषयीं पुत्राची योजना करून विश्रांति घेण्याचें माझ्या मनांत आहे. माझा पुत्र सर्व गुणांनीं माझ्यासारखाच निपजला आहे, आणि शत्रुसमूह जिंकणारा राम वीर्यामध्यें इंद्राची बरोबरी करणारा आहे. तेव्हां पुष्य नक्षत्रानें युक्त असलेल्या चंद्राप्रमाणें कोणतेंहि कार्य सिद्धीस नेण्याविषयीं दक्ष आणि धर्मनिष्ठांमध्यें उत्कृष्ठ अशा

पुरुषश्रेष्ठ रामाला मी उद्यीक प्रातःकालीं यौवराज्याचा अभिषेक करणार. कारण, लक्ष्मणाहून थोर असलेला तो वैभवशाली राम तुम्हांला योग्य प्रभु आहे. इतकेंच नव्हे, परंतु तो अधिपति झाला असतां सर्व त्रैलोक्यालाहि पहिल्यापेक्षां अधिक चांगला प्रभु मिळाल्यासारखें होणार आहे. ह्यास्तव माझ्यापेक्षांहि प्रशस्त असलेल्या ह्या रामाला मी विलंब न करितां ह्या पृथ्वीचा अधिपति करणार, आणि त्या पुत्राचे ठिकाणीं पृथ्वीपालनाचा भार टाकून मी आतां ह्या प्रजापालनाच्या क्लेशांतून मुक्त होणार. मी मनांत आणिलेला हा विचार चांगला आहे, असें जर तुम्हांला वाटत असेल आणि असें होणें जर तुम्हांला अनुकूल असेल, तर आपण मला अनुमोदन द्यावें. हें आपणांला संमत नसेल, तर क्लेशांतून मुक्त होण्याविषयीं मीं काय करावें, तें आपण मला कथन करावें. अहो, अशी जरी माझी उत्कृष्ट इच्छा आहे, तरी लोकांचें हित होण्याचा दुसरा कांहीं उपाय असल्यास त्याचाहि आपण विचार करावा. कारण, तिऱ्हाईतपणानें केलेल्या विचाराची गोष्ट वेगळी आहे. दोन्ही पक्षांचा खल होऊन जो विचार ठरतो, तो अधिक फायदेशीर असतो."

ह्याप्रमाणें दशरथ राजा भाषण करूं लागला असतां, मयूरपक्षी ज्याप्रमाणें जलवृष्टि करणाऱ्या मोठ्या मेघाचें गर्जना करीत करीत अभिनंदन करितात, त्याप्रमाणें त्या सभेंतील राजांनीं आनंदित होऊन त्याचें अभिनंदन केलें असतां त्यांच्या हर्षाचा सुखावह असा प्रतिध्वनि होऊं लागला. आणि जनसमूहांच्या आनंदघोषाचा ध्वनि तर पृथ्वी कंपित करीत आहे कीं काय असा होऊं लागला. नंतर त्या धर्मार्थवेत्त्या दशरथ राजाचा अभिप्राय पूर्णपणें लक्ष्यांत घेऊन ब्राह्मण आणि सेनानायक भूपति, नगरांतील व देशांतील लोकांसहवर्तमान एकत्र जुळून एकमतानें विचार करूं लागले आणि आपल्या मनानें काय तो निश्चय करून ते वृद्ध दशरथाला म्हणाले, ' राजा तूं हजारों वर्षांचा वृद्ध आहेस, तेव्हां तूं आपल्या युवराज रामाला राज्याभिषेक कर. छत्रानें मुख आच्छादून गेलें असतां मोठ्या गजावर आरूढ होऊन महाबलाढ्य व महापराक्रमी रघुवीर राम जातांना पाहण्याची आमची इच्छा आहे. '

हें त्यांचें भाषण श्रवण केल्यावर, त्यांच्या मनाला कोणती गोष्ट प्रिय आहे हें माहीत नसल्यासारखें दाखवून त्यांच्या मनांतील उद्देश समजून घेण्याच्या हेतूनेंच कीं काय दशरथ राजा त्यांना म्हणाला, ' हे नृपहो, माझें भाषण श्रवण करून ज्या अर्थीं तुम्ही रघुवंशज राम प्रभु होण्याची इच्छा करीत आहां,

त्या अर्थी मला हा एक संशय आहे, त्याचें तुम्ही खरें खरें उत्तर द्या. अहो, मी धर्मानें पृथ्वीचें राज्य करीत असतांना महाबलाढ्य राम युवराज होण्याची तुम्ही कां बरें इच्छा करीत आहां ? '

याप्रमाणें दशरथ राजानें विचारिल्यानंतर नगरांतील आणि देशांतील लोकां-सहवर्तमान ते महात्मे राजे त्याला म्हणाले, " हे भूपते, ज्यांच्या योगानें प्रजेचें कल्याण होईल असे पुष्कळच गुण तुझ्या पुत्राच्या ठिकाणीं आहेत. राजा, गुणी, देवतुल्य आणि बुद्धिमान अशा तुझ्या पुत्राचे इष्ट व आनंदकारक सर्व गुण आम्ही आतां सांगतों, ते तूं श्रवण कर. हे प्रजाधिपते दशरथा, अमोघ-पराक्रमी राम दिव्य गुणांनीं इंद्राची बरोबरी करणारा असल्यामुळें सर्वहि इक्ष्वाकुवंशजांपेक्षां वरचढ आहे. ह्या जगतांमध्यें सत्यावलंबी रामच खरा सत्पु-रुष असून अर्थासहवर्तमान धर्महि साक्षात् रामापासूनच निघालेला आहे. (सारांश, धर्म व अर्थ हे दोन्हीहि रामावरच अवलंबून आहेत.) प्रजाजनांना आनंद देण्याविषयीं राम चंद्राची बरोबरी करणारा आहे. क्षमाप्रभृति गुणांनीं तो पृथ्वीसारखा आहे; बुद्धीनें तो बृहस्पतीशीं तुल्य आहे; आणि वीर्यामध्यें तर तो प्रत्यक्ष इंद्राप्रमाणें आहे. धर्मवेत्ता, सत्यप्रतिज्ञ, सुशील, कोणाचा मत्सर न करणारा, क्षमाशील, इतरांचें दुःख निवारण करणारा, मधुरभाषणी, कृतज्ञ, जितेंद्रिय, मृदु, दृढनिश्चयी, सर्वदा दृष्टीस पडणारा आणि इतरांच्या मत्सरास पात्र नसलेला रघुवंशज राम हा प्राणिमात्राशीं प्रिय व सत्य भाषण करणारा असून, बहुश्रुत वृद्ध ब्राह्मणांचा समागम करणारा आहे; आणि त्यामुळें ह्या जगतामध्यें त्याची कीर्ति, ख्याति आणि शौर्य ह्यांची अभिवृद्धि होत आहे. देव, असुर आणि मनुष्य ह्यांच्या सर्व अस्त्रांमध्यें निपुण, ज्या ज्या विद्येला जें जें व्रत आवश्यक तें तें उत्तम रीतीनें आचरिल्यानंतर समावर्तन झालेला आणि यथायोग्य रीतीनें सांग वेद जाणणारा तो भरताग्रज राम संगीतशास्त्रांतहि ह्या पृथ्वीमध्यें श्रेष्ठ झालेला आहे. तो महाबुद्धिमान व सज्जन राम कल्याणांचें तर केवळ निवासस्थानच आहे. क्षोभ उत्पन्न होण्यासारखा प्रसंग असतांनाहि त्याचें अंतःकरण कधींहि क्षुब्ध होत नाहीं. धर्म व अर्थ ह्यांमध्यें निपुण असलेल्या द्विजांनीं शिक्षण दिलेला तो तुझा ज्येष्ठ पुत्र—राम ग्रामाच्या अथवा नगराच्या रक्षणार्थ जेव्हां लक्ष्मणासहवर्तमान संग्रामामध्यें जातो, तेव्हां शत्रूला जिंकल्यावांचून माघारा फिरतच नाहीं; आणि गजावर अथवा रथामध्यें आरूढ होऊन संग्रामांतून परत आल्यानंतर, स्वजनांप्रमाणें पौरजनांना—पुत्र, अग्नि, स्त्रिया,

सेवकजन आणि शिष्यगण ह्यांविषयीं पूर्ण रीतीनें क्रमाक्रमानें औरस पुत्रांना विचारणाऱ्या पित्याप्रमाणें–कुशल प्रश्न करीत असतो. ‘ शिष्य आपली शुश्रूषा करीत असतात ना? सेवक आपल्या रक्षणाविषयीं दक्ष असतात ना? ’ असें तो पुरुषश्रेष्ठ राम अनुक्रमें ब्राह्मणांना व क्षत्रियांना सर्वदा विचारीत असतो. मनुष्यावर दुःखाचे प्रसंग आले असतां तो अत्यंत दुःखित होतो, आणि प्रजाजनांमध्यें कोणताहि उत्सव सुरू झाला असतां पुत्राच्या सुखानें संतुष्ट होणाऱ्या पित्याप्रमाणें तो संतुष्ट होत असतो. तो सत्यवचनी, महाधनुर्धारी, वृद्धांचा समागम करणारा, जितेंद्रिय आणि स्मितपूर्वक भाषण करणारा असून अगदीं मनापासून धर्माचें अवलंबन करून राहिलेला आहे. तो प्रजाजनांचें उत्तम प्रकारें कल्याण करणारा आहे. लोकांमध्यें कलह लावून एकमेकांचीं भांडणें ऐकण्याची त्याला आवड नाहीं. उत्तमोत्तम संभाषणासंबंधानें तर तो बृहस्पतीप्रमाणेंच वक्ता आहे. उत्कृष्ठ भिवया आणि विशाल व आरक्तवर्ण नेत्र ह्यांनीं युक्त असलेला तो त्रैलोक्यसुंदर, शौर्य, वीर्य आणि पराक्रम ह्यांच्या योगानें प्रत्यक्ष विष्णूची बरोबरी करणारा आहे. तो प्रजापालनाविषयीं अतिशय दक्ष असून त्याचीं इंद्रियें विषयेच्छेच्या अधीन कधींहि होत नाहींत. तस्मात् त्रैलोक्याचाहि उपभोग घेण्यास हा समर्थ आहे. मग ह्या पृथ्वीचा उपभोग घेण्याची गोष्ट कशाला पाहिजे? ह्याची अवकृपा अथवा कृपा कधींहि व्यर्थ होत नाहीं. शास्त्राच्या नियमाला अनुसरून हा वध्यांचा वध करीत असतो. अवध्यांचे ठिकाणीं क्रोध करीत नाहीं; आणि ज्याच्यावर संतुष्ट होतो त्याला हा हर्षयुक्त होऊन द्रव्यसंपन्न करून सोडितो. सारांश, मनोनिग्रही, सर्व प्रजाजनांना इष्ट आणि मनुष्यांना आनंददायक अशा गुणांनीं युक्त असलेला हा राम किरणांच्या योगानें देदिप्यमान असलेल्या सूर्याप्रमाणें प्रकाशत आहे; आणि म्हणूनच अशा प्रकारच्या गुणांनीं संपन्न असलेला, अमोघ पराक्रमी व लोकपालतुल्य राम आपला नाथ असावा, अशी पृथ्वीला इच्छा झाली आहे. आमच्या भाग्यामुळें हा तुझा पुत्र प्रजाजनांचें रक्षणरूप कल्याण करण्याविषयीं समर्थ झाला आहे, आणि आमच्या भाग्यामुळेंच हा मरीचिपुत्र कश्यपाप्रमाणें गुणांनीं युक्त आहे. देव, असुर, गंधर्व आणि उरग ह्यांच्यामध्यें, राष्ट्रामध्यें व ह्या श्रेष्ठ नगरामध्यें असणारा जो तो जन ह्या रामाला बल, आरोग्य आणि आयुष्य चिंतीत असतो. सेवक नगरांत व देशांत राहणारे बाहेरील लोक आणि सर्व वृद्ध व तरुण स्त्रिया विचारी रामाकरितां सकाळ-संध्याकाळ एकाग्र अंतःकरण करून देवांना नम-

स्कार करीत असतात. तेव्हां राजा, तुझ्या कृपेनें त्यांच्या मनांतील उद्देश सिद्धीस जावो. हे नृपश्रेष्ठा, नीलकमलाप्रमाणें श्यामवर्ण असा तुझा पुत्र सर्वशत्रुनाशक राम यौवराज्यावर बसल्याचें आम्ही पाहूं. तस्मात् हे वरप्रद भूपते, सर्व लोकांच्या हितविषयीं तत्पर व उदार गुणांनीं संपन्न अशा आपल्या देवाधिदेव विष्णुतुल्य रामाला आमच्या हिताकरितां तूं आनंदानें राज्याभिषेक कर."

सर्ग तिसरा.

अभिषेकनिश्चय.

आपल्या मस्तकाशीं राजांनीं जीं अंजलिरूप कमलें लाविलीं होतीं, त्यांचा सर्व प्रकारें यथायोग्य मान राखून दशरथ राजा त्यांना प्रिय व हितकारक अशा शब्दांनीं म्हणाला, 'अहो, ज्या अर्थी माझा ज्येष्ठ प्रिय पुत्र यौवराज्यावर बसावा अशी तुम्ही इच्छा करीत आहां, त्याअर्थी मी अत्यंत प्रसन्न झालों असून मी आपला प्रभावहि अतुल समजत आहें.' ह्याप्रमाणें त्यांना मान दिल्यावर तें ऐकत असतांनाच दशरथ राजा वसिष्ठ, वामदेव इत्यादि ब्राह्मणांना म्हणाला, 'हा वनें प्रफुल्लित झालेला श्रीमान चैत्रमास पवित्र आहे. तेव्हां तुम्ही रामाला यौवराज्याचा अभिषेक करण्याविषयीं सर्व तयारी करा.' राजाचें हें बोलणें समाप्त झाल्यावर लोकांनीं मोठा आनंदघोष केला. तो घोष हळूहळू शांत झाल्यावर प्रजाधिपति दशरथ राजा मुनिश्रेष्ठ वसिष्ठांना म्हणाला, 'भगवन्, रामाच्या अभिषेकाकरितां काय कर्म केलें पाहिजे व त्याला साहित्य काय पाहिजे, हें सर्व आपण आम्हांला सांगा.'

हें दशरथ भूपतीचें भाषण श्रवण केल्यावर मुनिश्रेष्ठ वसिष्ठ हे हात जोडून राजाच्या पुढें उभे राहिलेल्या सेवादक्ष मंत्र्यांना म्हणाले, "सुवर्णप्रभृति रत्नें, पूजाद्रव्यें, सर्व प्रकारच्या औषधि, श्वेतपुष्पें, लाह्या, वेगवेगळ्या पात्रांत मध व घृत, कोरीं वस्त्रें, रथ, सर्व प्रकारचीं आयुधें, चतुरंग सेना, सुलक्षणी गज, चौरी व मोर्चेल हीं दोन्ही, ध्वज, श्वेतछत्र, अग्नीप्रमाणें उज्ज्वल असे शंभर सुवर्णकुंभ, सुवर्णशृंगी वृषभ, सबंध व्याघ्रचर्म आणि इतरहि हळदकुंकू वगैरे लागणारें सामान हें सर्व जमवा. आणि प्रातःकालीं राजाच्या होमशालेमध्यें ठेवा. अंतःपुराच्या आणि सर्व नगराच्या द्वारांचें गंधपुष्पांनीं व घ्राणेंद्रिय तल्लीन करणाऱ्या धूपांनीं पूजन करा. दधि व पय ह्यांनीं युक्त असलेलें प्रशस्त व गुण-

वान अन्न एक लक्ष ब्राह्मणांना अगदीं हवें तितकें पुरेसें होईल इतकें तयार करा. आणि उदईक प्रभातकालीं तें द्विजश्रेष्ठांना सत्कारपूर्वक द्या. त्याबरोबर घृत, दधि, लाह्या आणि विपुल दक्षणा द्या. उद्यां सूर्योदय होतांक्षणीं स्वस्तिवाचन होणें आहे; त्याकरितां ब्राह्मणांना निमंत्रणें करून आसनांची तजवीज ठेवा, आणि जिकडे तिकडे पताका बांधून राजमार्गावर सडे टाका. सर्व प्रकारचा ताल धरणारे आणि उत्तम अलंकार धारण केलेल्या नायकिणी राजवाड्याच्या दुसऱ्या चौकांमध्यें येऊन बसूं द्या. देवालयें आणि मार्गावरील वृक्ष ह्यांचे ठिकाणीं ओदन, भक्ष्य व दक्षिणा ह्यांसहवर्तमान येणाऱ्या ब्राह्मणांकरितां पूजासाहित्य वेगळें वेगळें ठेवून द्या. लांब लांब तरवारी घेऊन अंगुलित्राण धारण केलेले व उज्ज्वल वस्त्र परिधान केलेले वीर सज्ज होऊन महोत्सवसमारंभ ज्यांत चाललेला आहे,अशा महाराजांच्या चौकामध्यें प्रविष्ट होऊं द्या."

ह्याप्रमाणें अधिकाऱ्यांना आज्ञा करून त्या राजवाड्यामध्यें असलेल्या विप्र वसिष्ठ-वामदेवांनीं आपापलीं कार्यें केलीं आणि राजानें सांगितल्याशिवाय जें कांहीं अवश्य कर्तव्य होतें, तेंहि राजाला निवेदन करून त्यांनीं केलें. नंतर 'सांगितल्याप्रमाणें तयारी झाली' असें त्या सुप्रसन्न व हर्षयुक्त द्विजश्रेष्ठ वसिष्ठ-वामदेवांनीं भूपति दशरथापाशीं येऊन सांगितल्यावर 'धर्माकडे बुद्धि असलेल्या रामाला सत्वर घेऊन ये' म्हणून दशरथानें सुमंत्राला सांगितलें. तेव्हां 'ठीक आहे' असें म्हणून त्या सुमंत्रानें रथ्यांमध्यें श्रेष्ठ असलेल्या रामाला राजाच्या आज्ञेवरून रथांत घालून आणिलें. दशरथानें सुमंत्राला आज्ञा केल्यानंतर त्या राजवाड्यामध्यें एकत्र बसलेले पूर्व, उत्तर, पश्चिम व दक्षिण ह्या चारहि दिशांकडील म्लेंच्छ व आर्य राजे, आणि वनामध्यें व पर्वतासमीप वास्तव्य करणारे इतरहि भूपती, हे सर्व इंद्रासमीप बसणाऱ्या देवांप्रमाणें त्या दशरथासमीप बसले. देवांमध्यें असलेल्या इंद्राप्रमाणें त्या भूपतींमध्यें राजवाड्यांत बसलेल्या दशरथ राजर्षीनें आपल्या पुत्राला येतांना अवलोकन केलें. त्या पुत्राची कांति गंधर्व राजाप्रमाणें असून त्याचा पराक्रम जगतामध्यें प्रख्यात होता. आणि त्या महाधैर्यवान व आजानुबाहु रामाची गति मत्त गजाप्रमाणें होती. चंद्राप्रमाणें मुख सुंदर असल्यामुळें त्या रामाचें दर्शन अत्यंत प्रिय होतें. रूप व औदार्य एतद्विषयक गुणांनीं तो मनुष्यांची दृष्टि व चित्त आपणाकडे वेधून टाकीत होता; आणि उष्णतेनें संतप्त झालेल्या लोकांना आल्हाद देणाऱ्या

पर्जन्याप्रमाणें तो आपल्या प्रजाजनांना दर्शनानें आल्हाद देत होता. ह्यामुळें आपणांकडे येत असलेल्या रामाला अवलोकन करून भूपति दशरथाची तृप्ति झाली नाहीं.

श्रीरामाला दशरथाचा उपदेश.

रघुवंशज रामाला त्या श्रेष्ठ रथांतून उतरविल्यानंतर तो सुमंत्र सारथि पित्याजवळ चाललेल्या रामाच्या मागोमाग हात जोडून जाऊं लागला. रथांतून उतरल्यावर कैलासशिखराप्रमाणें असलेल्या त्या राजवाड्यामध्यें राजाचें दर्शन घेण्याकरितां रघुनंदन राम त्या सारथ्यासहवर्तमान वर चढून गेला, व हात जोडून आणि नम्र होऊन पित्याचे समीप गेल्यानंतर 'मी राम' असें म्हणून त्यानें त्याच्या चरणांना वंदन केलें. नंतर साष्टांग नमस्कार घालून बाजूला हात जोडून उभ्या राहिलेल्या आपल्या त्या प्रिय पुत्राला अवलोकन केल्यावर दशरथ राजानें त्याला अंजलि धरून जवळ घेतलें व कवटाळून धरिलें. नंतर रत्नें व सुवर्ण यांनीं भूषित असें एक तेथें आणून ठेविलेलें मनोहर व उत्कृष्ट आसन दशरथ राजानें त्या रामाला देण्यास सांगितलें. तेव्हां तें श्रेष्ठ आसन प्राप्त झालें असतां, उदयकालीं निर्मल रवि ज्याप्रमाणें स्वतःच्याच प्रभेनें मेरु पर्वताला शोभा आणितो, त्याप्रमाणें रामानें स्वतःच्याच प्रभेनें त्या श्रेष्ठ आसनाला शोभा आणिली. इतकेंच नव्हे, परंतु ज्यांतील ग्रह व नक्षत्रें निर्मल आहेत, असें शरदृतूंतील आकाश ज्याप्रमाणें चंद्राच्या योगानें शोभा पावतें, त्याप्रमाणें रामानें प्रकाशित केलेली ती सभाहि शोभूं लागली. आरशामध्यें प्रतिबिंबित झालेलें आपलें भूषित स्वरूपच कीं काय अशा त्या आपल्या प्रिय पुत्राला अवलोकन करितांना दशरथ भूपति संतुष्ट झाला. नंतर इंद्राशीं भाषण करणारा कश्यपच कीं काय असा तो पुत्रवानांमध्यें श्रेष्ठ असलेला दशरथ राजा स्वस्थ बसलेल्या आपल्या पुत्राला 'हे रामा' असें संबोधून म्हणाला, "हे रामा, माझ्या योग्य व ज्येष्ठ पत्नीचे ठिकाणीं तूं मला अनुरूप असा पुत्र झालेला आहेस. तूं गुणांनीं ज्येष्ठ आहेस, आणि म्हणूनच मला प्रिय आहेस. तूं ह्या प्रजांचें आपल्या गुणांनीं रंजन केलेलें आहेस. तस्मात्, पुष्य नक्षत्रावर तूं यौवराज्य प्राप्त करून घे. पुत्रा, तूं स्वभावतःच जरी अत्यंत गुणवान म्हणून ठरलेला आहेस, आणि जरी खरोखरीच गुणवान आहेस, तरी प्रेमामुळें मी तुला हिताची गोष्ट सांगतों. तूं विनयशील जरी आहेस, तरी आणखी विनयाचें अवलंबन करून नेहमीं जितेंद्रिय असत जा. काम व क्रोध ह्यांपासून उत्पन्न होणारीं व्यसनें टाकून दे आणि धान्याचीं कोठारें व शस्त्रगृहें ह्यांसहवर्तमान

रत्नादिकांचीं पुष्कळ भांडारें भरून आपल्या अंतर्बाह्य वर्तनानें तूं अमात्यप्रभृति प्रजाजनांना संतुष्ट ठेव. स्वतःला प्रिय असलेल्या प्रजा ज्याचे ठिकाणीं अनुरक्त असतात, अशा भूपालाच्या मित्रांना अमृतप्राप्ति झालेल्या देवांप्रमाणें आनंद होत असतो. तस्मात् हे पुत्रा, तूं आत्मसंयमन करून ह्याप्रमाणें वागत जा."

दशरथ राजाचें हें भाषण श्रवण केल्यावर रामाच्या इच्छेप्रमाणें वागणारे त्याचे सुहृद सत्वर कौसल्येकडे आले, आणि त्यांनीं तो वृत्तांत तिला निवेदन केला असतां, त्या उत्कृष्ठ स्त्रीनें सुवर्ण, गायी आणि नानाप्रकारचीं रत्नें त्या प्रिय वार्ता सांगणाऱ्यांना देण्याची आज्ञा केली. दशरथ राजानें उपदेश केल्यानंतर इकडे रघुवंशज रामहि राजाला अभिवंदन करून आणि रथारूढ होऊन जन-समुदायांचे मुजरे घेत घेत आपल्या सुशोभित गृहामध्यें गेला. तेथें जमलेले ते नगरवासी जनहि प्रिय वस्तूच्या लाभाप्रमाणें असलेलें राजाचें तें भाषण श्रवण केल्यावर त्याचा निरोप घेऊन घरीं गेले, आणि आपला मनोरथ सिद्धीस जाण्याचा समय आला आहे, असें समजून त्यांनीं आनंदानें देवतांचें अर्चन केलें.

सर्ग चौथा.

दशरथाचें रामाशीं भाषण.

नगरवासी जन गेल्यानंतर कालदेशवर्तमान जाणणाऱ्या त्या प्रभु दशरथ राजानें पुनरपि मंत्र्यांसहवर्तमान वाटाघाट करून, 'उद्यांच पुष्य नक्षत्र आहे. तेव्हां उद्ईकच माझ्या कमलनयन रामाला युवराज म्हणून राज्याभिषेक करावयाचा' असा निश्चय केला. नंतर घरांत गेल्यावर 'रामाला पुनरपि इकडे घेऊन ये' म्हणून दशरथ राजानें सारथ्याला सांगितलें असतां, त्याची आज्ञा शिरसामान्य करून सारथि रामाला पुनः घेऊन येण्याकरितां रामाचे घरीं गेला. तेव्हां द्वारपालांनीं तो आल्याचें वर्तमान रामाला निवेदन केलें असतां, तो पुन-रपि प्राप्त झाला आहे असें ऐकतांक्षणीं राम शंकित झाला, आणि त्या सारथ्याला सत्वर आंत घेऊन, 'पुनरपि तुझ्या येण्याचें कारण काय, तें पूर्णपणें सांग' असें त्याला विचारूं लागला. सारथ्यानें म्हटलें, 'राजाला आपणांला भेटण्याची इच्छा आहे. ह्यास्तव हें ऐकून घेऊन तिकडे जाण्याविषयीं अथवा न जाण्या-विषयीं आपण मुकत्यार आहां.'

हें त्या सारथ्याचें भाषण श्रवण करून रामहि पुनरपि दशरथ राजाची भेट घेण्याकरितां सत्वर राजवाड्यामध्यें गेला. तो आला असें समजल्यावर आपणांला प्रिय अशी कांहीं उत्कृष्ठ गोष्ट सांगण्याचा उद्देश मनांत धरून दशरथ राजानें त्याला आंत येण्याला आज्ञा दिली. वैभवशाली रामानेंहि पित्याच्या गृहामध्यें प्रविष्ठ होतां होतांच हात जोडिले, आणि पित्याचें दर्शन होतांक्षणीं दुरूनच त्याला प्रणाम केला. तेव्हां प्रणाम करणाऱ्या त्या रामाला उठवून दशरथ भूपतीनें त्याला कवटाळून धरिलें, आणि हातानें त्याला बसण्याकरितां आसन दाखवून तो पुनरपि त्याला म्हणाला, 'रामा, मी आतां वृद्ध झालों आहें. मी दीर्घायुषी आहें, यथेष्ट विषयोपभोग मी घेतले आहेत आणि ब्राह्मणभोजन व विपुल दक्षिणा ह्यांसहवर्तमान शेंकडों क्रतूंनीं मीं देवांचें यथाविधि पूजन केलें आहे. हे पुरुषोत्तमा, पृथ्वीमध्यें अनुपम असें प्रिय अपत्य तूं आज मला प्राप्त झाला आहेस. मीं दान, यजन आणि अध्ययन केलें आहे. हे वीरा, मी पाहिजे त्या सुखाचा उपभोग घेतला आहें. याग, अध्ययन, प्रजोत्पादन, दान आणि उपभोग ह्यांच्या योगानें मी देव, ऋषी, पितर, विप्र आणि आत्मा ह्यांच्या ऋणांतून मुक्त झालों आहें. तुझ्या अभिषेकावांचून माझें आतां कांहीं एक कर्तव्य उरलें नाहीं. ह्यास्तव मी जें तुला सांगतों, तें तूं कर. बाबारे, आज सर्व प्रजा तूं प्रभु होण्याची इच्छा करीत आहेत. तस्मात् मी तुला यौवराज्याचा अभिषेक करणार आहें. परंतु बा रामा, मी आजच अशुभ स्वप्नें अवलोकन केलीं आहेत, आणि विद्युत्पातासहवर्तमान आकाशांतून मोठ्या गर्जनेनें युक्त असे उल्कापातहि होत आहेत. इतकेंच नव्हे तर सूर्य, मंगळ आणि राहु हे क्रूर ग्रह आज माझ्या नक्षत्राला आले आहेत, असें ज्योतिषी सांगत आहेत. अरे, अशा प्रकारचीं निमित्तें झालीं असतां प्रायः राजाला प्रथम घोर विपत्ति प्राप्त होऊन मृत्यु येत असतो. म्हणून बाळा रामा, माझ्या चित्ताला मोह पडला नाहीं, तोंच तूं आपल्याला अभिषेक करून घे. कारण प्राण्याची बुद्धि अस्थिर आहे. आज पुष्याचे पूर्वींच्या नक्षत्रावर म्हणजे पुनर्वसु नक्षत्रावर चंद्र आहे, आणि चंद्राचा पुष्य नक्षत्राशीं योग गणितानें निश्चित होत असल्याचें ज्योतिषी सांगत आहेत. तेव्हां त्या पुष्य नक्षत्रावर अभिषेक कर म्हणून मन मला त्वरा करीत आहे. तस्मात् हे शत्रुतापना, मी उदयीक तुला यौवराज्याचा अभिषेक करीन. ह्याकरितां आतांपासून ही रात्र तूं आज दर्भास्तरणावर पडून व जितेंद्रिय राहून भार्येसहवर्तमान घालीव, आणि तुझे सुहृद् सभोंवती राहून आज

तुम्ही दक्षतेनें रक्षण करोत. कारण अशा प्रकारच्या कार्यांना पुष्कळ विघ्नें येत असतात. भरत या नगरांतून बाहेर गेला आहे तोंच तुझ्या अभिषेकाचा योग्य काल आहे, असें मला वाटतें. जरी तुझा भ्राता भरत सज्जनांच्या वर्तनाचें अनुकरण करीत असून तुज ज्येष्ठ भ्रात्याच्या अनुरोधानें वागणारा आहे, आणि जरी तो धर्मात्मा, दयाळु व जितेंद्रिय आहे, तरी ज्या अर्थी धर्माविषयीं नित्य तत्पर असलेल्या सज्जनांचेंहि चित्त रागद्वेषादि कारणामुळें विकारवश होऊन जात असल्याचें दिसतें, त्या अर्थी मनुष्यांचें चित्त अस्थिरच आहे असें मला वाटतें.'

ह्याप्रमाणें रामाला सांगून 'जा' म्हणून दशरथ राजानें त्याला अनुज्ञा दिल्यावर, आणि अभिषेक उद्यींक होणार ही आज्ञा झाल्यावर राम पित्याचा निरोप घेऊन घरीं गेला. राजानें अभिषेकाची आज्ञा केल्यावर आपल्या घरीं गेल्यानंतर राम तत्क्षणींच तेथून निघून मातेच्या अंतःपुरामध्यें गेला, तों ती देवघरामध्यें त्याच्या दृष्टीस पडली. ती सोंवळें नेसून देवपूजनामध्यें गढलेली होती आणि, मौन धारण करून रामाला राज्यलक्ष्मी प्राप्त होण्याविषयीं देवांची प्रार्थना करीत होती. त्या ठिकाणीं सुमित्रा आणि लक्ष्मण ह्यांचें आगमन प्रथमच झालेलें असून आपणांला प्रिय असलेला रामराज्याभिषेक श्रवण केल्याबरोबर कौसल्येनें सीतेलाहि तेथें आणविलें होतें. राम आला त्या वेळीं कौसल्या डोळे मिटून बसलेली होती, आणि सुमित्रा, सीता व लक्ष्मण हीं तिच्या शुश्रूषेमध्यें तत्पर होतीं. सारांश, पुष्य नक्षत्रावर आपल्या पुत्राला यौवराज्याचा अभिषेक होणार, असें ऐकून ती कौसल्या श्वासोच्छ्वास न करितां भक्तजनांचें दुःख निवारण करणाऱ्या पुराणपुरुषाचें ध्यान करीत होती. असो.

याप्रमाणें ती नियम करून बसली असतांनाच तिचे समीप जाऊन अभिवंदनपूर्वक तिला आनंद देणाऱ्या रामानें तिच्याशीं उत्कृष्ठ भाषण केलें. तो म्हणाला, 'माते, प्रजापालनरूप कार्याचे ठिकाणीं पित्यानें माझी योजना केली आहे, आणि पित्याच्या आज्ञेप्रमाणें मला उद्यां अभिषेक होणार आहे. माझ्यासहवर्तमान सीतेलाहि ही रात्र आत्मसंयमनपूर्वक दर्भास्तरणावर पडून काढिली पाहिजे, असें उपाध्यायांनीं सांगितलें असून, पित्यानेंहि मला ह्याप्रमाणें सांगितलें आहे. ह्यास्तव उद्यां होणाऱ्या अभिषेकाला ज्या ज्या कांहीं मांगलिक गोष्टी योग्य असतील, त्या माझ्या करितां व विदेह राजाच्या कन्येकरितां तूं आज करीव.'

फार दिवसांपासून मनांत योजिलेलें कृत्य श्रवण केल्यानंतर कौसल्येचा कंठ

सद्गदित झाला, आणि ती त्या रघुकुलनंदन रामाला म्हणाली, ' वत्सा रामा, तूं चिरंजीवी हो, तुझ्या शत्रूचा नाश होवो आणि तूं वैभवसंपन्न होऊन माझ्या व सुमित्रेच्या नातेवाईकांना आनंदित कर. बाळा, तूं खरोखर शुभ नक्षत्रावर मला झाला आहेस, आणि म्हणूनच आपल्या गुणांनीं पित्या दशरथाचें तूं आराधन केलें आहेस. बा रामा, ज्या अर्थीं ही इक्ष्वाकुकुलाची राज्यलक्ष्मी तुझा आश्रय करणार आहे, त्या अर्थीं कमलनयन पुराणपुरुषाचें मीं जें कांहीं व्रत आचरिलें तें सफल झालें.

मातेनें याप्रमाणें रामाला सांगितल्यावर, नम्र होऊन व हात जोडून बसलेल्या आपल्या भ्रात्याला अवलोकन करून स्मितहास्यपूर्वक राम त्याला म्हणाला, ' हे लक्ष्मणा, माझ्यासहवर्तमान तूं ह्या पृथ्वीचें राज्य कर. तूं माझा दुसरा अंतरात्मा आहेस, आणि तुला राज्यवैभव अलेलें आहे. बा लक्ष्मणा, तूं पाहिजे त्या प्रिय गोष्टींचा उपभोग घे व राज्याची उत्कृष्ठ फलें भोग. ह्या राज्याची आणि जीविताची तुझ्याकरितांच मी इच्छा करीत आहे. ' ह्याप्रमाणें लक्ष्मणाला सांगून रामानें उभयतां मातांना अभिवंदन केलें, आणि आपणाला व सीतेला जाण्याची अनुज्ञा देववून तो आपल्या निवासस्थानामध्यें गेला.

सर्ग पांचवा.

अभिषेकाच्या पूर्वदिवशींचें वृत्त.

दुसऱ्या दिवशीं होणाऱ्या अभिषेकासंबंधानें रामाला आज्ञा केल्यावर दशरथ राजा पुरोहित वसिष्ठांना बोलावून आणून म्हणाला, ' हे तपोधन, हे व्रतस्थ मुने, राज्यलाभरूप कल्याण होण्याकरितां भार्येसहवर्तमान ककुत्स्थकुलोत्पन्न रामाकडून आपण आज उपवास करवावा ' ह्यावर ते वेदवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ असलेले भगवान वसिष्ठ मुनि ' ठीक आहे ' म्हणून राजाला म्हणाले, आणि धरिलेलें व्रत अत्यंत निश्चयपूर्वक चालविणारे ते मंत्रवेत्ते वसिष्ठ मुनि, ब्राह्मणाला योग्य अशा अश्व जोडलेल्या श्रेष्ठ रथावर आरूढ होऊन मंत्रवेत्त्या वीर रामाला उपवास घालण्याकरितां रामाच्या निवासस्थानाकडे गेले, व श्वेत मेघाप्रमाणें हुबेहुब दिसत असलेल्या रामाच्या निवासस्थानापाशीं जाऊन पोहोंचल्यावर ते मुनिश्रेष्ठ रथांत बसूनच तीन दरवाजे ओलांडून आंत गेले. तेव्हां त्या मान्य ऋषींचा मान राखण्याकरितां राम घाईघाईनें सत्वर घरांतून बाहेर आला, आणि त्वरेनें त्या विचारी वसिष्ठांच्या रथासमीप येऊन त्यानें स्वतः हात धरून वसि-

ष्ठांना रथांतून उतरवून घेतलें. नंतर प्रिय भाषणालाच योग्य असा राम नम्र झालेला पाहून वसिष्ठांनीं संबोधनपूर्वक त्याची स्तुति केली, आणि त्याला हर्ष उत्पन्न करीत करीत ते पुरोहित वसिष्ठ त्याला म्हणाले, 'बा रामा, तुझ्यावर पिता प्रसन्न झाला आहे, आणि त्यामुळें तुला राज्य प्राप्त होणार आहे. करितां, सीतेसहवर्तमान तूं आज उपवास कर. ययातीला अभिषेक करणाऱ्या नहुषा-प्रमाणें तुझा पिता दशरथ राजा उद्यींक प्रातःकालीं तुला यौवराज्याचा अभिषेक करणार आहे.'

ह्याप्रमाणें सांगून त्या शुचिर्भूत व व्रतस्थ वसिष्ठ मुनींनीं सीतेसहवर्तमान रामाकडून समंत्रक उपवास करविला, आणि नंतर रामानें त्या राजगुरूंचें यथाविधि पूजन केल्यावर, ते वसिष्ठ मुनि रामाला सांगून तेथून निघाले. तेव्हां प्रिय भाषण करणाऱ्या सुहृदांसहवर्तमान बसलेल्या रामाचा त्या सुहृदांनीं सत्कार केल्यावर, त्या सर्वांना अनुज्ञा देऊन तो गृहामध्यें प्रविष्ठ झाला. त्या वेळीं रामाचें निवासस्थान जिकडे तिकडे आनंदित स्त्रीपुरुषांनीं युक्त झालें, आणि ज्यांतील कमलें प्रफुल्लित झालीं आहेत व ज्याच्यावरील पक्षिगण मत्त झाले आहेत अशा सरोवराप्रमाणें दिसूं लागलें. असो. राजवाड्याप्रमाणें असलेल्या त्या रामाच्या निवासस्थानापासून निघाल्यावर वसिष्ठांनीं मार्गावर लोकांची खेंचाखेंच झालेली आहे, असें अवलोकन केलें. कारण, रामाभिषेकोत्सव पहाण्याकरितां उत्सुक झालेल्या लोकांच्या झुंडीच्या झुंडींनीं अयोध्येंतील राजमार्ग अगदीं गजबजून गेलेले होते. असो. जनसमुदायरूप लाटांच्या संघर्षणाच्या योगानें आणि हर्षाच्या योगानें उत्पन्न झालेला जो शब्द, त्यानें राजमार्ग युक्त झाल्यामुळें त्याचा सागराप्रमाणें ध्वनि होऊं लागला. त्या दिवशीं अयोध्येंतील मार्गावर झाडून सडे टाकिलेले होते, ठिकठिकाणीं तोरणें लाविलेलीं होतीं आणि जिकडे तिकडे घरामध्यें गुढया उभारलेल्या होत्या. इतकेंच नव्हे, परंतु बायकामुलांसहवर्तमान आनंदानें भांबावून गेलेले अयोध्येंतील लोक, रामाभिषेकसमारंभ पाहण्याची उत्सुकता असल्यामुळें सूर्योदयाची वाट पाहत बसले होते. सारांश, प्रजेला भूषणभूत आणि लोकांचा आनंद वृद्धिंगत करणारा असा तो अयोध्येंतील महोत्सव पाहण्याकरितां प्रजाजन उत्सुक झाले होते.

ह्याप्रमाणें लोकांनीं गजबजून गेलेल्या राजमार्गानें पुरोहित वसिष्ठ मुनि हळूहळू त्या जनसमुदायाला आणखी एकत्र जुळवीत जुळवीतच कीं काय राजवाड्यामध्यें गेले आणि श्वेतवर्ण मेघाप्रमाणें दिसणाऱ्या हिमालय पर्वताच्या

शिखरासमान असलेल्या त्या राजवाड्यांत चढून गेल्यावर, इंद्राकडे जाणाऱ्या बृहस्पतीप्रमाणें ते दशरथ राजाच्या समीप गेले. ते आलेले पाहून दशरथ राजा सिंहासनावरून उठला आणि 'माझ्या मताप्रमाणें झालें का?' म्हणून त्यानें विचारिलें असतां त्यांनींहि त्याला 'होय' म्हणून सांगितलें. राजा सिंहासनावरून उठूं लागला असतां त्याच्या बरोबर बसलेले सभासदहि पुरोहित वसिष्ठ मुनींची मानमान्यता राखण्याकरितां आपापल्या आसनावरून उठले होते. असो. सर्व तयारी झाल्यामुळें विश्रांति घेण्याविषयीं गुरूनीं अनुज्ञा दिली असतां त्या जनसमुदायाला निरोप देऊन दशरथ राजा पर्वताच्या गुहेंत जाणाऱ्या सिंहाप्रमाणें अंतःपुरामध्यें गेला. सारांश, उत्कृष्ठ वेष धारण केलेल्या स्त्रियांनीं गजबजलेल्या आणि इंद्राच्या मंदिराप्रमाणें असलेल्या त्या मनोहर स्थानाला शोभा आणीत आणीत, तारागणांनीं व्याप्त झालेल्या आकाशामध्यें प्रविष्ठ होणाऱ्या चंद्राप्रमाणें दशरथ राजा त्यांत प्रविष्ठ झाला.

सर्ग सहावा.

अयोध्यावासी लोकांचा आनंद.

पुरोहित वसिष्ठ मुनि गेल्यानंतर मनःसंयमन केलेला राम आपल्या विशालनयन स्त्रीसहवर्तमान स्नान करून नारायणाचें ध्यान करूं लागला. नंतर प्रणामपूर्वक त्यानें आज्यस्थाली घेतली आणि प्रज्वलित अग्नीमध्यें सर्वोत्कृष्ठ नारायण देवतेला उद्देशून त्या घृताचा होम केला. नंतर शेष राहिलेलें आज्य प्राशन करून आपणाला प्रिय असलेली गोष्ट सिद्धीस जाण्याविषयीं त्यानें ईश्वराची प्रार्थना केली. नारायण देवतेचें चिंतन करीत करीत, तो पुरुषश्रेष्ठ दशरथ राजाचा पुत्र भव्य अशा देवगृहामध्यें व्यवस्थित रीतीनें पसरलेल्या दर्भास्तरणावर सीतेसहवर्तमान वाङ्नियम आणि आत्मसंयमन करून पडला. नंतर एक प्रहर रात्र राहिल्यावर जागृत होऊन सडासंमार्जन वगैरे करवून आणि गुढ्या, तोरणें वगैरेंची व्यवस्था लाववून त्यानें आपल्या निवासस्थानाला उत्तम प्रकारानें शोभा आणविली. पौराणिक, भाट व स्तुतिपाठक ह्यांचे मधुर शब्द कानावर येऊं लागले असतां प्रातःसंध्या करूं लागलेल्या त्या रामानें अत्यंत स्वस्थांतःकरणपूर्वक जप केला. आणि मस्तकानें प्रणाम करून मधु-

सूदनाची स्तुति केल्यावर उज्ज्वल पीतांबर परिधान केलेल्या त्या रामानें ब्राह्मणांकडून पुण्याहवाचन करविलें. तेव्हां वाद्यांच्या घोषाबरोबर गंभीर आणि मधुर अशा त्या ब्राह्मणांच्या पुण्याहघोषानें (म्हणजे 'पुण्याहं' ह्या शब्दाच्या ध्वनीनें) अयोध्या नगरी दुमदुमून राहिली. तदनंतर सीतेसहवर्तमान रामानें अभिषेकाकरितां उपवास केल्याचें श्रवण केल्यावर अयोध्येमध्यें राहणारे सर्व लोक आनंदित झाले; आणि रामाला अभिषेक होणार असें ऐकून आनंदित झालेल्या त्या सर्व नगरवासी जनांनीं रात्र उजाडलीसें पाहून नगरीला शोभा आणण्याचें मनामध्यें आणिलें. श्वेतमेघतुल्य हिमालय पर्वताच्या शिखरांप्रमाणें असलेलीं देवालयें, चौक, मोठमोठे रस्ते, पार, बुरूज, अनेक प्रकारचा माल भरलेलीं उदम्यांचीं दुकानें, कुटुंबी लोकांचीं समृद्ध आणि भव्य गृहें, सर्व सभास्थानें आणि चोहों बाजूंनीं दृष्टोत्पत्तीस येणारे उंच उंच वृक्ष ह्यांचे ठिकाणीं निशाणें व पताका चांगल्या रीतीनें उभारल्या गेल्या. नट आणि नृत्य करणारे ह्यांचे समुदाय आपापलीं कामें करूं लागले असतां आणि गवई गाऊं लागले असतां मनाला आणि श्रवणेंद्रियाला सुखावह असे शब्द जनसमुदायाला ऐकूं येऊं लागले. ह्याप्रमाणें रामाला अभिषेक होण्याचा समय प्राप्त झाला असतां चवाठ्यावरून आणि घरांतून लोक रामाभिषेकासंबंधानेंच आपापसांत गोष्टी बोलूं लागले; घरांच्या दारांशीं ठिकठिकाणीं बालकांचे समुदाय जुळून खेळूं लागले व रामाच्या अभिषेकासंबंधानेंच आपापसांत वाटाघाटी करूं लागले. नगरांतील लोकांनीं रामाच्या अभिषेकाकरितां फुलांच्या आराशी करून व जिकडे तिकडे धूपाचा सुवास करून राजमार्गाला शोभा आणिली. समारंभ होतां होतां कदाचित् रात्र पडेल अशी शंका येऊन, उजेड करण्याकरितां त्यांनीं लहान लहान रस्त्यांतून सुद्धां अगदीं चोहोंकडे दीपवृक्ष तयार करून ठेविले. ह्याप्रमाणें रामाला यौवराज्याचा अभिषेक होण्याची इच्छा करणारे त्या नगरींतील लोक नगरी सुशोभित करून चवाठ्यावर आणि सभांतून सर्व समुदायांनीं जुळले, आणि आपापसांत गोष्टी बोलतां बोलतां दशरथ राजाची प्रशंसा करूं लागले कीं, 'कायहो तरी हा महात्मा इक्ष्वाकुवंशज दशरथ राजा! अहो, आपण वृद्ध झालों असें समजून हा रामाला राज्याभिषेक करणार आहे. आतां जगांतील सर्व बरा वाईट प्रकार जाणणारा रामराजा पुष्कळ दिवसपर्यंत आपला पालक होणार, हा आपणां सर्वांवर खरोखर ईश्वराचा अनुग्रह झाला आहे. विनयशील अंतःकरणानें युक्त, ज्ञाता, धर्मनिष्ठ आणि भ्रातृवत्सल

असा हा रघुवंशज राम भ्रात्याप्रमाणें आम्हांवरहि प्रेम करणारा आहे. ज्याच्या कृपेमुळें आज आम्हांला रामाला राज्याभिषेक झालेला पाहण्याचा प्रसंग येणार आहे, तो बिचारा धर्मात्मा दशरथ राजा दीर्घायु होवो.' ह्याप्रमाणें राजधानींतील लोक आपापसांत बोलूं लागले असतां रामाच्या अभिषेकाचा वृत्तांत श्रवण केल्यावर चोहोंकडून आलेल्या देशांतील इतर लोकांनीं तें बोलणें ऐकिलें, आणि रामाचा अभिषेक पाहण्याकरितां चोहोंकडून राजधानीमध्यें आलेल्या त्या देशांतील लोकांनीं तर रामाची ती नगरी अगदीं भरूनच काढिली. तेव्हां त्या राजधानीकडे चाललेल्या जनसमुदायांना पर्वदिवशीं मोठ्या वेगानें युक्त झालेल्या सागराच्या ध्वनीप्रमाणें अयोध्या नगरींतील गडबड ऐकूं येऊं लागली, आणि समुद्रांतील जलचरांच्या योगानें ज्याप्रमाणें समुद्राचें उदक सशब्द व क्षुब्ध होऊन जातें, त्याप्रमाणें अभिषेकमहोत्सव पाहण्याकरितां आलेल्या देशांतील लोकांच्या योगानें इंद्रभुवनाप्रमाणें असलेलें तें नगर चोहोंकडून क्षुब्ध व ध्वनियुक्त झालें.

सर्ग सातवा.

मंथरेचा संताप.

कोठें तरी जन्मास आलेली आणि कैकेयीसहवर्तमान राहिलेली तिच्या माहेरची दासी मंथरा, चंद्राप्रमाणें शुभ्र असलेल्या वाड्यावर स्वेच्छेनें आरूढ होऊन अयोध्या नगरीकडे पाहूं लागली असतां, चोहोंकडे राजमार्गावर सडे टाकिलेले आहेत, कमलपुष्पें पसरून दिलेलीं आहेत, राजांना योग्य अशा पताका आणि ध्वज ह्यांच्या योगानें नगरी सुशोभित केलेली आहे, जेथें जागा उंच व सखल आहे अशा मार्गावरहि ती सुशोभित केलेली आहे, लोकसमुदायाला जाण्यायेण्याकरितां इमारती वगैरे पाडून केलेल्या मोठमोठ्या मार्गांनीं ती व्याप्त झालेली आहे, तिच्यांतील लोकांनीं अभ्यंग स्नान केलेलें आहे, पुष्पें व मोदक हातांत असलेल्या द्विजश्रेष्ठांच्या घोषांनीं ती दुमदुमून गेलेली आहे, तिच्यांतील देवालयांच्या द्वारांना शुभ्र रंग दिलेला आहे, सर्व प्रकारच्या वाद्यांनीं ती नादित झालेली आहे, जिकडे तिकडे लोकांना हर्ष झाला आहे, वेदघोषाच्या ध्वनीनें ती नगरी नादित झालेली आहे, उत्कृष्ठ गज आणि अश्व यांनाहि हर्ष झाला आहे, गायी व बैलहि आनंदानें डरक्या फोडीत आहेत, आणि आनंदित झालेल्या नगरींतील लोकांनीं ध्वजपंक्ति उभारिल्या आहेत, असें

तिच्या दृष्टीस पडलें. अशा प्रकारें सुशोभित झालेली अयोध्या नगरी अवलोकन करून तिला अत्यंत विस्मय झाला. तेव्हां हर्षानें जिचे नेत्र प्रफुल्लित झालेले आहेत, आणि जिनें शुभ्रवर्ण शालू नेसलेला आहे अशी रामाची दाई जवळच उभी होती. तिला पाहून मंथरा म्हणाली, 'पराकाष्ठेचा हर्ष होऊन मनोरथ सिद्धीस गेल्याप्रमाणें दिसत असलेली ही राममाता लोकांना द्रव्य कशाकरितां देत आहे? ह्या लोकांना अतिशय हर्ष कशाकरितां झालेला आहे? आणि दशरथ राजा तरी अत्यंत हर्षयुक्त होऊन काय करविण्याच्या बेतांत आहे, हें मला सांग.' याप्रमाणें मंथरेनें विचारिलें असतां अंतःकरणांत हर्ष मावेनासा झाल्यामुळें त्याच्या योगानें जशी कांहीं विदीर्ण होत असलेली ती दासी, अत्यंत आनंदानें त्या कुबडीला रामाच्या राज्यलक्ष्मीविषयीं सांगूं लागली कीं, 'मंथरे, उदयीक पुष्य नक्षत्रावर क्रोध जिंकलेल्या निष्पाप रघुवंशज रामाला दशरथ अभिषेक करणार आहे.' हें दाईचें भाषण श्रवण करतांक्षणीं ती कुबडी क्रुद्ध झाली व कैलास पर्वताच्या शिखराप्रमाणें असलेल्या गच्चीवरून खालीं उतरली. उतरतांक्षणीं क्रोधानें जळत असलेली ती पापबुद्धि मंथरा कैकेयी निजली असतांनाच तिला म्हणाली, 'हे मूढे, ऊठ; निजतेस काय? तुला भय प्राप्त झालें आहे, आणि स्वतः दुःखसागरांत तूं बुडून गेली असतांनाहि तुला पत्ता नाहीं. दिसण्यांत मात्र चांगली असून अप्रिय गोष्ट करणारे अगे कैकेयी, 'पतीचें माझ्यावर प्रेम आहे' म्हणून फुशारक्या मारीत असतेस; परंतु ग्रीष्मऋतूंतील नदीच्या प्रवाहाप्रमाणें तुझ्यावर असलेलें पतिप्रेम अशाश्वत् आहे.'

ह्याप्रमाणें त्या पापदृष्टि कुबडीनें रुष्ट होऊन कठोर भाषण केलें असतां कैकेयीला पराकाष्ठेचा खेद झाला; आणि ती त्या कुबडीला म्हणाली, 'मंथरे, माझें बरें नाहीं कीं काय? तूं अत्यंत दुःखित झाली असून तुझें मुखहि अगदीं खिन्न झालेलें मला दिसत आहे.' हें कैकेयीचें मधुर शब्दांनीं युक्त असलेलें भाषण श्रवण केल्यावर बोलण्यामध्यें पटाईत असलेली ती क्रुद्ध मंथरा पहिल्यापेक्षांहि जास्त खिन्न झाली. कैकेयीचें हित इच्छिणारी ती कुबडी रामाविषयीं कैकेयीच्या अंतःकरणांत भेदभाव उत्पन्न करण्याच्या उद्देशानें तिला खेद उत्पन्न करीत करीत म्हणाली, "हे राजपत्नि, दशरथ राजा रामाला यौवराज्याचा अभिषेक करणार, हा एक फार प्रचंड आणि अक्षय असा तुझा नाशच होण्याचा समय आला आहे. हें ऐकतांक्षणीं अगाध भयामध्यें मी बुडून गेलें, आणि दुःख व शोक ह्यांनीं व्याप्त होऊन अग्नीनें दग्ध होत असलेलीच कीं

काय, तुझ्या हिताकरितां येथें आलें आहें. हे कैकेयी, तुला दुःख झालें असतां मला फारच दुःख होईल, आणि तुझा अभ्युदय झाला असतां माझाहि निःसंशय अभ्युदय होईल. तूं राजकुळामध्यें जन्मास आलेली असून राजाची भार्या आहेस. इतकें असून राजधर्माचें उग्र स्वरूप तूं कसें जाणीत नाहींस? धर्माच्या गोष्टी सांगून गोडगोड थापा मारणारा तुझा पति शठ व भयंकर असतांना तूं त्याला शुद्ध मनाचा समजत आहेस, आणि म्हणूनच सर्व प्रकारें तुला त्यानें फसविलें आहे. तुझ्याशीं नुसतें पोकळ गोडगोड भाषण करीत असून कौसल्येचें कल्याण करण्याविषयीं तत्पर असलेला तुझा भर्ता आज कौसल्येचाच मनोरथ सिद्धीस नेणार आहे. तो दुरात्मा तुझा भर्ता भरताला तुझ्या माहेरच्या माणसांकडे हाकून लाऊन उदयीक प्रभातकालीं निष्कंटक राज्यावर रामाची स्थापना करणार. अग पोरी, माता ज्याप्रमाणें बालकाचें हित करण्याची इच्छा धरिते, त्याप्रमाणें हित करण्याची इच्छा धरून पतीच्या मिषानें तूं हा सर्पासारखा भयंकर शत्रु आपल्या शरिरावर धारण केला आहेस. उपेक्षा केली असतां शत्रु अथवा सर्प ज्याप्रमाणें करीत असतो, त्याप्रमाणें दशरथ राजानें आज पुत्रासहवर्तमान तुझी अवस्था करून टाकिली आहे. अग, रामाला राज्यावर बसविणाऱ्या ह्या दशरथ राजानें दुष्टपणा व कपट ह्यांनीं भरलेल्या गोडगोड भाषणानें पुत्रपौत्रादि परंपरेसहवर्तमान तुझा घात केला आहे. तेव्हां कैकेयी, ह्या समयाला योग्य अशी जी हिताची गोष्ट असेल ती तूं सत्वर कर. आणि चाललेला प्रकार आपल्या हिताचाच चालला आहे, असें समजून विस्मयचकित होणारे हे कैकेयी, पुत्राचें, माझें आणि आपल्या स्वतःचें रक्षण कर."

हें मंथरेचें भाषण श्रवण केल्यावर, हर्षानें व्याप्त झाल्यामुळें शरदृतूंतील चंद्रकलाच कीं काय अशा रीतीनें प्रसन्न मुद्रेनें युक्त झालेली कैकेयी शय्येवरून उठली. अतिशय संतुष्ट व विस्मययुक्त होऊन तिनें त्या कुबडीला 'शुभ' असें एक दिव्य भूषण दिलें; आणि त्या कुबडीला भूषण दिल्यावर हर्षयुक्त झालेली ती सर्वोत्कृष्ट स्त्री कैकेयी मंथरेला पुनरपि म्हणाली, 'हे मंथरे, ही पराकाष्ठेची प्रिय वार्ता तूं मला सांगितलीस. खरोखर ही प्रिय वार्ता तूं मला सांगितली आहेस. आतां ह्याबद्दल मी आणखी तुला काय बरें देऊं? राम व भरत ह्यांमध्यें मला कांहीं भेद दिसत नाहीं. ह्यास्तव राजा रामाला राज्याभिषेक करणार म्हणून मीं संतुष्ट झालें आहें. हे प्रियदानयोग्यमंथरे, ह्या

तुझ्या प्रिय वार्तेपेक्षां मला कोणतेंहि चांगलें भाषण अधिक प्रिय नाहीं. कारण, तूं अशीच कांहीं अमृततुल्य वार्ता मला कथन केली आहेस. ह्याकरितां प्रिय वार्ता श्रवण केल्यानंतर मी तुला श्रेष्ठ वर देतें, तो तूं मागून घे.'

सर्ग आठवा.

कैकेयीचा बुद्धिभेद.

मंथरेला कैकेयीचें भाषण सहन न झाल्यामुळें कैकेयीनें दिलेलें तें भूषण तिनें टाकून दिलें आणि कोप व दुःख ह्यांनीं व्याप्त झालेली ती मंथरा कैकेयीला म्हणाली, "हे मूढे, भलत्याच प्रसंगीं तूं कशाकरितां आनंदित झाली आहेस? तूं स्वतः शोकसागरामध्यें आहेस, हें जाणीत नाहींस. अग, भयंकर संकट प्राप्त होऊन शोक करण्याचा समय आला असतांना तूं आनंदित झाली आहेस. ह्याविषयीं मी दुःखाकुल होऊन मनापासून तुझा निषेध करीत आहें. तुझ्या मूढपणाबद्दल मला वाईट वाटत आहे. मृत्यूप्रमाणें सवतीच्या पुत्राचा अभ्युदय प्राप्त झाल्याचें पाहून कोण बरें शहाणी स्त्री आनंदित होईल? राज्य हें सर्वांनाच साधारण असल्यामुळें भरतापासूनच रामाला भय आहे. तेव्हां ह्याचा विचार करून मीं खिन्न झालें आहें. कारण, जो एक पुरुष ज्या दुसऱ्या पुरुषाला भीत असतो, तो अधिकारापन्न झाला असतां त्या दुसऱ्या पुरुषाला त्याच्यापासून भय प्राप्त होतें. महापराक्रमी लक्ष्मण सर्वस्वी रामाच्या तंत्रानें वागणारा आहे. आणि लक्ष्मण ज्याप्रमाणें ककुत्स्थकुलोत्पन्न रामाच्या तंत्रानें वागत आहे, तसा शत्रुघ्नहि भरताच्या तंत्रानें वागत आहे. दशरथ राजा नेहमीं तुझ्या सन्निधच असतो, ह्या कारणानें भरतालाच राज्य प्राप्त होणें उचित दिसतें; परंतु ते भरत-शत्रुघ्न वयानें लहान असल्यामुळें त्यांना राज्य प्राप्त होणें दूरच राहिलें आहे. सर्वशास्त्रवेत्ता, क्षत्रविद्येमध्यें निपुण आणि विलंब न करितां समयोचित कर्तव्य गोष्ट करणारा जो राम, त्याच्यापासून तुझ्या पुत्राला अनर्थ प्राप्त होणार, असें समजून मी त्याच्या भयानें कांपत आहें. उद्यांक पुष्यनक्षत्रावर द्विजश्रेष्ठांकडून जिच्या पुत्राला श्रेष्ठ यौवराज्याचा अभिषेक होणार, ती कौसल्या खरोखर भाग्यवती आहे. उद्यां पृथ्वी प्राप्त होऊन कौसल्या आनंदित झाली असतां, आणि तुम्हांसारख्या प्रति-

पक्ष्यांचा घात करून ती प्रसिद्धीला आली असतां, तुला हात जोडून दासीप्रमाणें तिच्या सेवेमध्यें तत्पर राहणें भाग पडेल. ह्याप्रमाणें तूं आम्हांसहवर्तमान तिची दासी होशील. आणि तुझा पुत्र रामाचा दास होईल. सीतेच्या सख्या सुद्धां आनंदित होतील. राज्यप्राप्तीक्रमांतून भरताचें नांव नाहींसें झालें असतां तुझ्या स्नुषा दुःखित होऊन राहतील." ह्याप्रमाणें रामविषयीं अतिशय असंतुष्ट होऊन भाषण करीत असलेल्या त्या मंथरेला अवलोकन करूनहि राजपत्नि कैकेयी

रामाच्या गुणांची प्रशंसा

करूं लागली. ती म्हणाली, "राम हा धर्मवेत्ता, गुणवान, आत्मसंयमी, कृतज्ञ, सत्यनिष्ठ आणि आचरणानें निर्मल असून राजाचा ज्येष्ठ पुत्र असल्यामुळें, त्यालाच यौवराज्य प्राप्त होणें योग्य आहे. तो दीर्घायु राम, पुत्रांचें परिपालन करणाऱ्या पित्याप्रमाणें भ्रात्यांचें आणि दासांचें पालन करील. तेव्हां रामाला अभिषेक होत आहे, हें ऐकून तुझ्या अंगाचा कशाकरितां संताप झाला आहे? पुरुषश्रेष्ठ भरतहि जर राज्यप्राप्तीची इच्छा धरीत असेल, तर रामानें शंभर वर्षें राज्य केल्यानंतर पितृपितामहादि परंपरेनें चालत आलेलें राज्य निःसंशय त्यालाहि प्राप्त होईल. तेव्हां मंथरे, रामाभिषेकरूप उत्सव प्राप्त झाला असून भरताभिषेकरूप श्रेयःप्राप्तिहि कांहीं कालानें होण्याचे निश्चित असतांना, तूं अगदीं होरपळल्यासारखी कशाकरितां संतप्त होत आहेस? मला जसा भरत मान्य आहे, तसा राम तर त्याच्याहिपेक्षां अधिक मान्य आहे; आणि तोहि कौसल्येपेक्षां माझ्याच शुश्रूषेमध्यें फार तत्पर असतो. शिवाय रामाला जर आज राज्य प्राप्त होत आहे, तर तें भरतालाहि होतच आहे. कारण तो स्वतःप्रमाणें आपल्या भ्रात्यांना समजत आहे.'

हें कैकेयीचें भाषण श्रवण करून मंथरा अतिशय संतप्त झाली, आणि दीर्घ व ऊष्ण असा सुस्कारा टाकून कैकेयीला म्हणाली, "भलतेंच मनांत घेऊन बसलेली तूं शोक आणि संकट ह्यांनीं व्याप्त झालेल्या दुःखसागरामध्यें बुडत असतांनाहि मूर्खपणामुळें तुला स्वतःचें भान राहिलें नाहीं. रघुवंशज राम उद्यां राजा झाला म्हणजे त्याचाच पुत्र पुढें राजा होणार, आणि राजवंशापासून भरत च्युत होणार. हे स्त्रिये, राजाचे सर्वच पुत्र कधीं राज्य करीत नसतात. कारण, सर्वच पुत्र राज्य करूं लागले तर फारच मोठा अनर्थ होईल. तस्मात्, हे सुंदरी, इतर पुत्र गुणवान असतांनाहि ज्येष्ठ पुत्रालाच राजे राज्याचे अधि-

कार देत असतात. सारांश, हे दयाशीले, हा तुझा पुत्र अनाथाप्रमाणें राजवंशाला आणि सर्व सुखांना अगदीं शेवटपर्यंत मुकणार. मी तुझ्याकरितां येथें आलें असून तूं तर मला ओळखीतहि नाहींस. इतकेंच नव्हे, परंतु सवतीचा अभ्युदय होत आहे, म्हणून तूं मला देणगी देण्यास उद्युक्त झाली आहेस. रामाला निष्कंटक राज्य प्राप्त झालें असतां तो भरताला परदेशीं अथवा परलोकींहि निःसंशय पाठवून देणार. भरताला तर तूं बालपणीं मातुलगृहीं पाठवून दिलें आहेस; परंतु वृक्षलतादिकांचे ठिकाणीं सांनिध्यामुळें जसें परस्परसंयोगरूप प्रेम वाढत असतें, तसें मनुष्यांमध्येंहि सांनिध्यामुळेंच प्रेम वाढत असतें. सारांश, वृक्ष, लता वगैरे जवळ जवळ असल्यामुळें जशीं एकमेकांना कवटाळून धरितात, तशीच मनुष्यांची स्थिति असल्यामुळें प्रथमपासून भरत जर पित्याचे सन्निध असता तर त्यालाहि आज राज्याचा विभाग प्राप्त झालाच असता. शत्रुघ्न येथें असता तर कदाचित् भरताचा घात झाला नसता. परंतु तोहि भरताच्या तंत्रानें वागणारा असल्यामुळें त्याच्या बरोबर चालता झाला. कारण लक्ष्मण जसा रामाच्या अनुरोधानें वागणारा आहे, तसा हा भरताच्या अनुरोधानें वागणारा आहे. वनामध्यें उपजीविका करणाऱ्यांना एक वृक्ष तोडावयाचा होता; परंतु त्याच्या भोंवतालीं असलेल्या कांटेरी झुडपांनीं त्या परकाष्ठेच्या भीतीपासून त्या वृक्षाला मुक्त केलें, असें ऐकण्यांत आहे. सुमित्रापुत्र लक्ष्मण रामाचें रक्षण करणारा, असून राम लक्ष्मणाचें रक्षण करणारा आहे. कारण त्या उभयतांतील भ्रातृप्रेम अश्विनिकुमारांच्या भ्रातृप्रेमाप्रमाणें लोकप्रसिद्ध आहे ह्यामुळें लक्ष्मणाचें राम यत्किंचित्हि वाईट करणार नाहीं; परंतु भरताचें निःसंशय वाईट करणारच. तस्मात् राजवाड्यांतूनच आज रामानें वनांत चालतें व्हावें, हें मला रुचत आहे, आणि तुझेंहि ह्यामध्यें अतिशय हित आहे. ह्याप्रमाणें भरताला जर धर्मतः पित्याचें राज्य प्राप्त झालें, तर तुझ्या माहेरच्या माणसांचेंहि कल्याण होईल. तात्पर्य, रामाला राज्यलक्ष्मी प्राप्त झाली असतांना, सहज शत्रु असलेला तुझा बालक अभ्युदयापासून च्युत झाला असतां कसा बरें त्याच्या आज्ञेमध्यें वागून जिवंत राहील? तस्मात् अरण्यामध्यें सिंह पाठीस लागलेल्या गजेंद्राप्रमाणें रामांच्या योगानें पादाक्रांत होऊन जाणाऱ्या भरताचें तूं रक्षण कर. पतिप्रेमाच्या जोरावर पूर्वीं तूं गर्वानें रामाच्या मातेला जुमानिलेलें नाहींस. तेव्हां ती तुझी सवत आतां त्या वैराचा कां बरें सूड उगवून घेणार नाहीं? हे प्रिये, विशाल समुद्र आणि पर्वत ह्यांसहवर्तमान पृथ्वी जेव्हां रामाला प्राप्त होईल, तेव्हां भरतासह-

वर्तमान तूं अनाथ होऊन तुझी फारच शोचनीय हानि होणार आहे. तात्पर्य, रामाला पृथ्वी प्राप्त झाली असतां भरताचा निःसंशय घात होईलच. ह्यास्तव आपल्या पुत्राला राज्यप्राप्तीचें कारण आणि शत्रूला बाहेर घालविण्याचें कारण तूं मनामध्यें योज."

सर्ग नववा.

मंथरेची युक्ति.

ह्याप्रमाणें मंथरा म्हणाली असतां कैकेयीची मुद्रा क्रोधानें लाल झाली, आणि दीर्घ व उष्ण सुस्कारा टाकून ती कैकेयी मंथरेला म्हणाली, 'तर मग आज मी रामाला सत्वर वनामध्यें पाठवितें, आणि भरताला आजच्या आजच सत्वर यौवराज्याचा अभिषेक करवितें परंतु हे मंथरे, रामाला कांहीं केलें तरी राज्य प्राप्त न होतां भरतालाच राज्य प्राप्त व्हावें, ही गोष्ट कोणत्या उपायानें मला साधितां येईल, ह्याचा तूं विचार कर.'

ह्याप्रमाणें राजपत्नी मंथरेला म्हणाली असतां, वाईट चिंतणारी ती मंथरा रामाभिषेक हाणून पाडण्याच्या उद्देशानें कैकेयीला म्हणाली, "हे कैकेयी, आतां माझें सामर्थ्य पहा, आणि फक्त तुझ्या भरत नामक पुत्रालाच कसें राज्य प्राप्त होईल ह्यासंबंधानें तूं आतां माझें बोलणें ऐकून घे. अग, तो उपाय तुला स्मरतच नाहीं का? किंवा स्मरत असूनहि तूं लपवून ठेवीत आहेस. कारण, ज्या अर्थी आपला मनोरथ सिद्धीस नेणारा तो उपाय तूं अनेक वेळां मला सांगितला असूनहि मला 'सांग' म्हणून म्हणत आहेस, त्या अर्थी माझ्या तोंडांतून वदविण्याचाच तुझा उद्देश दिसतो. हे विलासिनी, माझ्या तोंडून ऐकण्याचीच जर तुझी इच्छा असेल, तर ऐकून घेऊन तूं त्याप्रमाणें वाग."

हें त्या मंथरेचें भाषण ऐकून घेतल्यावर उत्कृष्ठ रीतीनें घातलेल्या शय्येपासून कैकेयी किंचित् उठली आणि म्हणाली, 'मंथरे, रामाला कांहीं केलें तरी राज्य प्राप्त न होतां भरतालाच कोणत्या उपायानें राज्य प्राप्त होईल, तो उपाय तूं मला सांग.'

ह्याप्रमाणें राजपत्नी कैकेयी बोलली असतां दुसऱ्याचें वाईट चिंतणारी ती मंथरा रामाचा अभिषेक हाणून पाडण्याचा उद्देश मनांत धरून कैकेयीला म्हणाली, "पूर्वी देवदैत्यांच्या युद्धामध्यें राजर्षींसहवर्तमान तुझा पति देवराज

इंद्राला साहाय्य करण्याकरितां तुला बरोबर घेऊन गेला होता. कैकेयी, दक्षिण दिशेस असलेल्या दंडकारण्य देशामध्यें वैजयंत म्हणून प्रसिद्ध राजधानीचें शहर असून त्या ठिकाणीं तिमिध्वज राजा होता. तोच शंबर म्हणून प्रसिद्ध आहे. शेंकडों मायांनीं युक्त असलेल्या त्या अनिंदित महादैत्यानेंच देवगणांसहवर्तमान इंद्राशीं संग्राम केला. त्या महासंग्रामामध्यें जे पुरुष जखमा लागून रात्रीं पडलेले असत, त्यांना बलात्कारानें अंथरुणावरून ओढून नेऊन राक्षस मारीत असत. त्या संग्रामामध्यें दशरथ राजानें मोठें युद्ध केलें. तेव्हां त्या महापराक्रमी राजाच्या अंगाचे दैत्यांनीं शस्त्रांच्या योगानें अगदीं लचके काढिले. हें पाहून मूर्च्छित झालेल्या आपल्या पतीला तूं संग्रामांतून दूर घेऊन गेलीस; तथापि तेथेंहि असुरांनीं शस्त्रांच्या योगानें त्याच्या शरिराला क्षतें पाडिलींच. परंतु त्या प्रसंगींहि तूं त्याचें रक्षण केलें. हें पाहिल्यावर भर्ता संतुष्ट होऊन तुला त्यानें वर देऊं केले असतां, 'इच्छेस येईल तेव्हां मी हे वर मागून घेईन' म्हणून तूं त्याला सांगितलें आहेस; व तो महात्माहि त्या वेळीं 'ठीक आहे' म्हणून बोलला आहे. हे राजपत्नी, हा प्रकार मला प्रथम विदित नव्हता; परंतु तूं पूर्वीं सांगितला आहेस. ही गोष्ट तुझे ठिकाणीं प्रेम असल्यामुळें मीं मनांत धरून ठेविलेली आहे. याकरितां वरांच्या जोरावर तूं पतीला वश करून घे, आणि रामाला अभिषेक करण्याच्या तयारीपासून तूं त्याला परावृत्त कर. तात्पर्य, भरताला राज्याभिषेक आणि चौदा वर्षेंपर्यंत रामाला वनवास ह्याप्रमाणें ते दोन वर तूं आपल्या भर्त्यापासून मागून घे. चौदा वर्षें राम वनामध्यें गेला म्हणजे तुझ्या पुत्राविषयीं प्रजेच्या अंतःकरणांत प्रेम उत्पन्न होईल, आणि असें झालें असतां राज्याचे ठिकाणीं तुझा पुत्र निश्चल राहील. तस्मात्, हे अश्वपतिकन्ये, तूं आज क्रोधगृहामध्यें जा, आणि भूमीवर कांहींएक न आंथरितां मलीन वस्त्र परिधान करून पड. राजा आला असतां त्याच्याकडे तूं पाहूंहि नको आणि कांहीं भाषणहि करूं नको. राजाला पाहिल्याबरोबर तूं शोकाकुल होऊन भूमीवर रुदन करीत पडलेली रहा. तूं नेहमीं भर्त्याला प्रिय आहेस, ह्याविषयीं मला संशय नाहीं. तुझ्याकरितां तो महाराज अग्नीमध्येंहि प्रवेश करील. तुला कोप आणण्यास तो समर्थ नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु तूं क्रुद्ध असतांना तुझ्याकडे पाहण्याचेंहि त्याचें तोंड नाहीं. तुला प्रिय असलेली गोष्ट करण्याकरितां राजा प्राणांचाहि त्याग करील. तुझा शब्द खालीं पाडण्यास तो भूपति समर्थ नाहीं. तेव्हां हे मूढे, पतिप्रेमाचा केवढा जोर तुला आहे, हें समजून ऐस. मणि, मोत्यें, सुवर्ण आणि नाना-

प्रकारचीं रत्नें तुला दशरथ राजा देऊं लागेल; परंतु तूं त्यांचें ठिकाणीं आपलें मन गुंतवूं नको. हे महाभाग्यवति कैकेयी, देवदैत्यांच्या युद्धाचे वेळीं जे वर तुला दिलेले आहेत, त्यांचें तूं त्याला स्मरण कर, म्हणजे तुझा तो उद्देश अगदींच कांहीं निष्फल होणार नाहीं. जेव्हां स्वतः शय्येवरून उठून राजा तुला वर देईल, तेव्हां शपथा घालून तूं त्याला सत्यवचनांत धर. 'हे राजाधिराज, चौदा वर्षें रामाला दूर (वनांमध्यें) हांकून देऊन भरताला पृथ्वीचा राजा करावा' असा वर तूं त्याच्यापाशीं माग. चौदा वर्षें राम वनामध्यें गेला असतां तितक्या कालामध्यें तुझा पुत्र भरत चांगला वाढेल, आणि मुळें धरून राहील. सारांश, पुष्कळ वर्षेंपर्यंत परिपालन केलेला वृक्ष ज्याप्रमाणें चांगला वाढीस लागतो आणि त्याचीं मुळें पक्कीं बसतात, त्याचप्रमाणें चौदा वर्षांत राम वनवासांत गेला असतां तुझ्या पुत्राच्या राज्याला बळकटी येऊन, राज्यसंरक्षणाचें एक मुख्य साधन जें सैन्य तेंहि तितका काल लोटेपर्यंत त्याला वश होऊन राहील. असें झालें असतां राम जरी वनवासांतून परत आला तरी तुझा पुत्र राज्यापासून भ्रष्ट होणार नाहीं, आणि रामहि राज्याची आशा धरणार नाहीं. ह्यास्तव हे राजपत्नि, रामाला हांकून देणें, हाच वर तूं त्याच्यापाशीं माग. म्हणजे हे कामिनी, पुत्रासंबंधानें तुझे सर्व मनोरथ परिपूर्ण होतील. ह्याप्रमाणें रामाला हांकून लाविलें असतां तो प्रजाजनांना अप्रिय होईल, आणि शत्रु नाहींसा झालेला तुझा भरत राजा होईल. इतका काल वनवासांत घालविल्यानंतर राम जर परत येईल तर तितका काल लोटेपर्यंत तुझ्या पुत्राविषयीं प्रजाजनांचे ठिकाणीं अंतर्बाह्य दृढ प्रेम उत्पन्न होऊन राहील. इतकेंच नव्हे, परंतु विश्वासूक माणसांचा संग्रह त्याच्यापाशीं होऊन त्या जितेंद्रिय भरताच्या हिताविषयींहि प्रजाजनांचे ठिकाणीं अचल प्रेम उत्पन्न होईल. सारांश, रामाला अभिषेक करण्यापासून राजाला परावृत्त करण्याचा हाच समय आहे, असें मला वाटतें. ह्यास्तव तूं निर्भय हो, आणि वरांच्या जोरावर त्याला कचाट्यांत धरल्यावर रामाला अभिषेक करण्याच्या संकल्पापासून त्याला निवृत्त कर."

ह्याप्रमाणें त्या मंथरेनें अनर्थावह गोष्टच हिताची आहे, असें कैकेयीचे अंतःकरणांत ठसविलें असतां कैकेयीला हर्ष झाला आणि तिनें तिचा उपदेश मान्य केला. कारण अगदीं अल्पवयी शिंगरूं बरोबर येत असलें म्हणजे घोडी ज्याप्रमाणें चाबूकस्वार वर बसला असतांनाहि त्याला न जुमानतां आपल्या

शिंगराकरितां आडमार्गाला जाते, त्याप्रमाणें कैकेयी राजाचे अधीन असतांनाहि मंथरेच्या उपदेशामुळें भरताकरितां कुमार्गाला वळली, आणि तिच्याशीं बोलूं लागली.

मंथरेची प्रशंसा

कैकेयी म्हणाली:—"हितोपदेशाविषयीं कुशल व श्रेष्ठ मंथरे, मी तुझ्या बुद्धीची अवज्ञा करीत नाहीं. कार्य कोणतें आणि अकार्य कोणतें ह्याचा बुद्धिपूर्वक निश्चय करण्याविषयीं तूं पृथ्वींतील सर्व कुबड्या दासींमध्यें श्रेष्ठ आहेस, आणि तूंच माझ्या कार्याविषयीं नेहमीं तत्पर असून माझें हित इच्छिणारी आहेस. हे कुबडे, राजाचा अभिप्राय काय आहे, हें मला समजत नाहीं. अग कुबडे, आकारानें विद्रूप आणि आचरणानेंहि अत्यंत पापी अशाच दासी पुष्कळ असतात; परंतु तूं मात्र वायूनें नम्र झालेल्या कमलाप्रमाणें वांकलेली असून तुझी मुद्रा दुसऱ्याला आनंद देणारी आहे. तुझें वक्षःस्थल कुबडानें व्याप्त असल्यामुळें स्कंधापर्यंत उन्नत आहे. आणि वक्षःस्थलाच्या अधोभागीं उत्कृष्ट नाभीनें युक्त असलेलें तुझें उदर कृश असल्यामुळें वक्षःस्थलाची उन्नति पाहून लज्जित झाल्यासारखें दिसत आहे. तुझा कटिप्रदेश विस्तीर्ण असून स्तन चांगले पुष्ट आहेत. तुझें मुख निर्मल चंद्राप्रमाणें दिसत आहे व ह्यामुळें खरोखर मंथरे, तूं किती तरी झळकत आहेस. तुझा कटिप्रदेश स्वच्छ असून कमरपट्टयानें भूषित झालेला आहे, आणि तुझ्या पोटऱ्या तर लोकांच्या उपमेस पात्र झाल्या असून तुझे दोन्ही पाय विस्तीर्ण आहेत. हे सुंदरी मंथरे, तूं पैठणी नेसून माझ्यापुढें चालूं लागलीस म्हणजे लांब लांब मांडयांच्या योगानें तूं अतिशयच मनोहर दिसत असतेस. असुराधिपति शंबरापाशीं ज्या हजारों माया होत्या, त्या व इतरहि आणखी हजारों माया तुझ्या हृदयामध्यें राहिलेल्या आहेत. रथचक्राच्या तुंब्याप्रमाणें विस्तीर्ण असलेलें जें दीर्घकुबड, तें हेंच आहे. ह्या तुझ्या कुबडामध्यें मति, राजनीति आणि माया ह्यांचें वास्तव्य आहे. ह्यास्तव भरताला राज्याभिषेक होऊन राम वनामध्यें गेला म्हणजे हे मनोहर कुबडे, उत्कृष्ट व कसालाहि उत्तम उतरलेल्या सुवर्णाची आणि सोन्यांतच मढविलेली माळा मी तुझ्या ह्या कुबडाला घालीन. माझा मनोरथ परिपूर्ण होऊन मी संतुष्ट झालें म्हणजे तुझ्या कुबडाला उटी लावीन. त्याच्या मुखावर एक आश्चर्यकारक टिळा लावीन आणि जातीच्या सोन्यानें तें शुभ कुबड मढवून काढीन. तुझ्याकरितां मी चांगलीं चांगलीं भूषणें करवीन, आणि उत्कृष्ठ वस्त्रें परिधान करून तूं देवतेप्रमाणें संचार करशील. तुझा चेहेरा अप्रतिम असल्यामुळें चंद्राशीं स्पर्धा

करणाऱ्या आपल्या मुखामुळें शत्रुजनांमध्यें तूं गर्व करूं लागशील आणि श्रेष्ठता पावशील. तूं जरी कुबडी आहेस, तरी ज्याप्रमाणें तूं सर्वदा माझ्या पायांची सेवा करीत असतेस, त्याप्रमाणें सर्व प्रकारचे अलंकार धारण केलेल्या कुबडया तुझ्या पायांची सेवा करूं लागतील. ”

कैकेयीचा निश्चय.

ह्याप्रमाणें कैकेयी मंथरेची प्रशंसा करीत असतांना वेदींतील अग्नीच्या ज्वालेप्रमाणें शुभ्र शय्येवर शयन करणाऱ्या कैकेयीला ती म्हणाली, ‘ हे कल्याणि, पाणी निघून गेल्यावर कोणी बांध घालीत नसतात. ह्यास्तव ऊठ, आपलें कल्याण करून घे आणि क्रुद्ध झाली आहेस असें राजाला दाखीव. ’ ह्याप्रमाणें मंथरेनें प्रोत्साहन दिल्यावर पतिप्रेमाच्या मदानें चढून गेलेली ती विशालनयना राजपत्नी कैकेयी मंथरेसहवर्तमान क्रोधगृहामध्यें गेली. अनेक लक्षांचा मोत्यांचा हार व बहुमोल अशीं इतर उत्कृष्ठ भूषणें तिनें काढून ठेविलीं. सुवर्णासारख्या कांतीनें युक्त असलेली व कुबडीच्या बोलण्याला वश झालेली ती कैकेयी भूमीवर पडली आणि मंथरेला म्हणाली, ‘ हे कुबडे, माझ्या मनाप्रमाणें गोष्ट घडून न आल्यामुळें मी येथें मेल्याचें वर्तमान तूं राजाला सांगशील, किंवा राम वनांत जाऊन भरताला पृथ्वी प्राप्त होईल. ह्याशिवाय तिसरी गोष्ट कांहीं संभवनीय नाहीं. सुवर्ण, रत्नें व भोजनें ह्यांच्याशीं मला कांहींएक कर्तव्य नाहीं. रामाला जर अभिषेक होईल, तर हाच माझ्या जीविताचा अंत होय. ’

ह्यानंतर भरतमाता जी राजभार्या कैकेयी, तिच्या हिताचें आणि रामाच्या अहिताचें भाषण अत्यंत क्रूर शब्दांनीं त्या कुबडीनें तिच्याशीं केलें. ती म्हणाली, ‘ हे कल्याणि, रामाला जर हें राज्य प्राप्त झालें, तर पुत्रासहवर्तमान तुला ताप होईल. ह्यास्तव तुझ्या भरत नामक पुत्राला राज्याभिषेक होईल अशा रीतीनें जो यत्न करणें असेल, तो कर. ’ ह्याप्रमाणें वाग्बाणांचे वारंवार तडाके देऊन कुबडीनें अतिशय वेधून टाकिलेली ती राजभार्या कैकेयी हृदयावर हात ठेऊन, ‘राजानें माझ्याशीं अशा प्रकारें प्रतारणा केली आहे काय ?’ म्हणून अत्यंत विस्मित झाली, आणि पुन:पुन: क्रुद्ध होऊन त्या कुबडीला म्हणाली, ‘ मंथरे, रामाला जर राज्याभिषेक झाला, तर यमाच्या प्रदेशामध्यें मी येथून गेल्याचें पाहून तूं राजाला तसें सांगशील, किंवा पुष्कळ काळपर्यंत राम वनामध्यें चालता झाला तर भरताचे मनोरथ परिपूर्ण होतील. राम जर येथून वनामध्यें गेला नाहीं, तर प्रावरणें,

माळा, चंदन, अंजन, अन्न, उदक वगैरेंपैकीं मी कशाचीहि इच्छा धरणार नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु मी जीविताचीहि आशा धरणार नाहीं.'

ह्याप्रमाणें मंथरेशीं अति क्रूर भाषण करून त्या स्त्रीनें आपलीं सर्व भूषणें काढून ठेविलीं, आणि आस्तरणरहित अशा भूमीवर, पुण्यक्षयामुळें स्वर्गांतून खालीं पडलेल्या किन्नरीप्रमाणें ती पडली. सारांश, अत्यंत कोपरूप तमानें जिचें मुख व्याप्त झालेलें आहे, आणि उत्तमोत्तमहि पुष्पांचा व भूषणांचा जिनें त्याग केलेला आहे, अशी ती खिन्न झालेली राजपत्नी कैकेयी, तमानें व्याप्त आणि म्हणूनच नक्षत्ररहित अशा आकाशाप्रमाणें दिसूं लागली.

सर्ग दहावा.

कैकेयीची मनधरणी.

दुष्ट कुबडीनें राजपत्नी कैकेयीचे मनांत भलतेंच भरवून दिल्यामुळें ती विषलिप्त बाणानें विद्ध झालेल्या किन्नरीप्रमाणें भूमीवर पडली, आणि मंथरेनें उपदेशिलेलें कृत्य योग्य आहे असा मनानें निश्चय करून, 'हें सर्व चांगलें आहे' म्हणून ती बुद्धिमती स्त्री मंथरेला म्हणाली. तात्पर्य मंथरेच्या भाषणानें मोहित झालेली ती विचारी स्त्री कैकेयी नागकन्येप्रमाणें दीर्घ व ऊष्ण सुस्कारा टाकूं लागली, आणि क्षणभर विचार करून मंथरेनें सांगितलेला मार्ग आपल्या सुखाचा आहे, असें तिनें मनामध्यें आणिलें. तेव्हां कैकेयीची मैत्रीण आणि तिच्याच वैभवाची इच्छा धरणारी मंथरा, कैकेयीचा तो निश्चय पाहून मनोरथ सिद्धीस गेल्याप्रमाणें पराकाष्ठेची आनंदित झाली. तदनंतर क्रुद्ध झालेली ती राजपत्नी अबला कैकेयी मंथरेनें सांगितल्याप्रमाणें करण्याचा पक्का निश्चय करून आणि अति क्रोधामुळें भिंवया मुखाकडे करून भूमीवर निजली. तेव्हां तिनें काढून टाकिलेलीं चित्रविचित्र पुष्पें व दिव्य भूषणें हीं भूमीवरच पडलीं. नक्षत्रें ज्याप्रमाणें आकाशाला शोभा आणितात, त्याप्रमाणें तिनें टाकून दिलेल्या पुष्पांनीं व भूषणांनीं पृथ्वीला शोभा आणिली. क्रोधगृहामध्यें पडलेल्या त्या कैकेयीनें मलिन वस्त्र परिधान केलें होतें, आणि केंसांचा घट्ट अंबाडा बांधून पडलेली ती कैकेयी गतप्राण झालेल्या किन्नरस्त्रीप्रमाणें दिसत होती.

इकडे रामाभिषेकाची आज्ञा केल्यावर महाराज दशरथानें सभासदांना आपापल्या घरीं जाण्याची अनुज्ञा दिली, आणि नंतर तो स्वतः घरामध्यें गेला. तद-

नंतर आजच रामाभिषेक निश्चित झाला आहे, परंतु कैकेयीला हें वर्तमान कळलेलें नाहीं असें समजून, तो जितेंद्रिय दशरथ राजा प्रिय वार्ता ऐकविण्यास योग्य अशा कैकेयीला तें प्रिय वर्तमान सांगण्याकरितां अंत:पुरामध्यें गेला, आणि श्वेतवर्ण मेघ व राहु ह्यांनीं युक्त असलेल्या आकाशांत प्रविष्ट होणाऱ्या चंद्राप्रमाणें तो कैकेयीच्या मुख्य गृहामध्यें प्रविष्ट झाला. शुक आणि मयूर ह्यांनीं युक्त असलेल्या त्या गृहामध्यें क्रौंच व हंस पक्षी शब्द करीत होते; वाद्यांचा तेथें घोष चाललेला होता; कुबड्या आणि खुजे त्यामध्यें होते; चंपक व अशोक वृक्ष ह्यांनीं सुशोभित असलेलीं सचित्र लतागृहें तेथें होतीं; नेहमीं प्रफुल्लित व फलयुक्त असलेल्या वृक्षांनीं आणि वापींनीं त्याला शोभा आलेली असून, हस्तिदंत रजत व सुवर्ण ह्यांच्या उत्कृष्ठ आसनांनीं तें व्याप्त झालेलें होतें; नानाप्रकारचीं खाद्यपेयें, अनेक प्रकारचे भक्ष्य पदार्थ आणि मोठमोठीं मौल्यवान भूषणें त्या स्वर्गतुल्य गृहामध्यें होतीं. असो.

तो महाराज दशरथ समृद्ध अशा आपल्या अंत:पुरांत प्रविष्ट झाला असतां उत्कृष्ठ शय्येवर स्त्री कैकेयी त्या राजाच्या दृष्टीस पडली नाहीं. तेव्हां उत्कट कामवासना झाल्यामुळें रतिसुखाविषयीं उत्सुक झालेल्या त्या भूपतीनें तिची चौकशी केली, आणि तो खिन्न झाला. कारण ह्यापूर्वीं राजपत्नीनें ती वेळ कधींहि चुकविली नव्हती; आणि म्हणूनच दशरथ राजालाहि कैकेयीरहित अशा त्या गृहामध्यें प्रवेश करण्याचा कधींहि प्रसंग आलेला नव्हता. असो. त्या गृहांत गेल्यावर, कैकेयी स्वार्थलोलुप व विवेकशून्य बनली आहे, हें न जाणून द्वारावर असलेल्या दासीला 'ती कोठें आहे' म्हणून त्या राजानें पूर्वीप्रमाणें विचारिलें असतां, ती दासी भयभीत होऊन व हात जोडून म्हणाली, 'महाराज, राणी अत्यंत क्रुद्ध झाली असून क्रोधगृहामध्यें झपाट्यानें निघून गेली आहे.' हें त्या दासीचें भाषण श्रवण केल्यावर दशरथ राजाच्या मनाला फारच वाईट वाटलें. इंद्रियें अति चंचल व क्षुब्ध होऊन त्याला पुनरपि अधिकच खेद झाला. तदनंतर तसा प्रकार कधींहि न करणारी ती कैकेयी भूमीवर पडली आहे असें पाहून तो दशरथ राजा दु:खानें अगदीं संतप्त झाला. सारांश, त्या वृद्ध व निष्पाप राजानें, दुष्ट हेतु मनांत धरून राहिलेली आपली प्राणापेक्षांहि प्रिय अशी तरुण भार्या भूतलावर पडलेली पाहिली. ती कैकेयी तोडून टाकिलेली लता, स्वर्गापासून च्युत झालेली देवता, पुण्यक्षयामुळें स्वस्थानापासून पतित झालेली किन्नर स्त्री, स्वर्गापासून च्युत

झालेली अप्सरा, दुसऱ्यांनां मोह पाडण्याकरितां योजिल्यामुळें मध्येंच स्थित असलेली माया, जाळ्यामध्यें अडकून गेलेली हरिणी अथवा व्याधाचा विषलिप्त बाण लागून पडलेली हत्तीणच आहे कीं काय असें त्याला वाटलें. तेव्हां अरण्यांत पडलेल्या हत्तीणीच्या अंगावर सोंड फिरविणाऱ्या महागजाप्रमाणें मनामध्यें अतिशय त्रस्त झालेला तो कामी दशरथ राजा, अत्यंत दुःखित अशा आपल्या स्त्रीच्या अंगावर प्रेमानें हात फिरवून त्या कमलनयना स्त्रीला म्हणाला, "माझ्या संबंधानें तुला क्रोध येण्याचें कारण काय झालें आहे, हें मला विदित नाहीं. हे देवि, हे कल्याणि, ज्या अर्थी धुराळ्यांत लोळत पडण्याचें हें मला दुःखदायक कृत्य तूं करीत आहेस, त्याअर्थी तुझी कोणीं हेटाळणी केली आहे किंवा तुझा कोणीं अपमान केला आहे, तें कळूं दे. माझें मन तुझ्याविषयीं शुद्ध असून मी जिवंत असतांना तूं कशाकरितां भूमीवर पडली आहेस? भूतांनीं झपाटल्याप्रमाणें तूं भूमीवर पडली असल्यामुळें, माझें मन क्षुब्ध करीत आहेस. माझ्यापाशीं कुशल वैद्य आहेत आणि सर्व प्रकारें ते माझ्यावर संतुष्ट आहेत. तेव्हां हे स्त्रिये, तुला काय व्याधि आहे, तें मला सांग, म्हणजे ते तुला सुखी करतील. कोणाचें प्रिय करण्याचें तुझ्या मनामध्यें आहे, किंवा तुला अप्रिय असलेली गोष्ट कोणीं केली आहे, हें कळूं दे. तुला प्रिय अशा कोणाचा मनोरथ आज सिद्धीस गेला पाहिजे. किंवा तुला अप्रिय अशा कोणाला अत्यंत दुःख प्राप्त झालें पाहिजे, तें तरी समजूं दे. हे देवि, तूं रडूं नको, आणि विनाकारण आपलीं हाडें वाळवून घेऊं नको. अवध्य असूनहि कोणाचा तुझ्या मनामध्यें वध कर्तव्य आहे, वध्य असून कोण मुक्त व्हावा असें तुला वाटत आहे, कोण दरिद्री पुरुष संपन्न व्हावा असा तुझा उद्देश आहे, अथवा कोण श्रीमान पुरुष दरिद्री व्हावा अशी तुझी मनीषा आहे, तें तरी एकदां कळूं दे. मी आणि माझे लोक हे सर्व तुझे दास आहेत. आपल्या जिवावर जरी प्रसंग आला तरी तुझा कोणताहि मनोरथ हाणून पाडण्याची माझी छाती नाहीं. ह्यास्तव जें तुझ्या मनांत असेल, तें सांग. माझें प्रेम तुझ्यावर फार आहे. हें आपलें बल तूं जाणीत असूनहि माझ्याविषयीं शंका घेणें, तुला योग्य नाहीं. मी तुझें प्रिय करीन, हें मी तुला आपल्या पुण्याची शपथ घेऊन सांगत आहें. जेथपर्यंत सूर्यमंडल प्रकाशित होत आहे, तेथपर्यंत ही पृथ्वी माझी आहे. ह्यास्तव तुझा कोणताहि मनोरथ सिद्धीस नेणें मला कठीण नाहीं. द्राविड, सिंधु, सौवीर, सौराष्ट्र, दक्षिणापथ, वंग, अंग,

मगध, मत्स्य व संपन्न काशिकोसल हे देश माझ्या स्वाधीन आहेत. त्या ठिकाणीं धन, धान्य, लोंकरीचीं वस्त्रें वगैरे विपुल द्रव्य उत्पन्न झालेलें आहे. तेव्हां जें तुझ्या मनास येईल, तें तूं माग. हे भीरु, या आयासानें काय होणार आहे? हे कल्याणि, ऊठ आणि तुला कोठून भीति प्राप्त झाली आहे, तें तूं मला सांग. म्हणजे सूर्य ज्या प्रमाणें धुकें नाहींसें करितो, त्याप्रमाणें मी तुझें भय नाहींसें करीन." ह्याप्रमाणें भर्त्याशीं अप्रिय भाषण करण्यास उद्युक्त झालेल्या त्या कैकेयीचें राजानें सांत्वन केलें असतां ती भर्त्याला पुनरपि पीडा देण्यास उद्युक्त झाली.

सर्ग अकरावा.

वरयाचना.

कामबाणांनीं विद्ध आणि म्हणूनच विषयवासनेच्या तावडींत सांपडलेल्या त्या भूपतीला कैकेयी कठोर शब्दांनीं म्हणाली, 'राजा, माझी कोणीं हेटाळणी केली नाहीं व माझा कोणीं अवमानहि केला नाहीं. माझा एक उद्देश आहे, आणि तो तुझ्याकडून सिद्धीस जावा अशी माझी इच्छा आहे. तूं जर तो माझा उद्देश सिद्धीस नेण्याचें इच्छित असशील, तर तशी प्रतिज्ञा कर. म्हणजे माझा काय उद्देश आहे, तो मी तुला सांगेन.'

ह्याप्रमाणें कैकेयीनें दशरथाला सांगितलें असतां तो विषयलंपट महाराज, 'मी हिचा आज्ञाधारक असतांना भलतीच शंका घेऊन ही मला प्रतिज्ञा करण्यास लावीत आहे' म्हणून किंचित् हास्य करूं लागला, आणि भूमीवर पडलेल्या त्या कैकेयीचें मस्तक आपल्या मांडीवर ठेऊन तिला म्हणाला, "हे गर्विष्ठ स्त्रिये, पुरुषश्रेष्ठ रामाशिवाय तुझ्यापेक्षां मला कोणीहि अधिक प्रिय नाहीं, हें तूं जाणीत नाहींस का? रघुवंशजांतील मुख्य, शत्रूंनीं जिंकण्यास अशक्य आणि माझ्या जीवनाचें साधन अशा महात्म्या रामाशपथ मी तुझा उद्देश सिद्धीस नेईन. तेव्हां कैकेयि, जें तुझ्या मनांत असेल, तें सांग. जो एक क्षणभरहि दृष्टीआड झाला असतां मी निःसंशय जगणार नाहीं, आणि स्वतःपेक्षां व आपल्या इतर पुत्रांपेक्षां मी ज्या पुरुषश्रेष्ठ रामाला प्रिय समजत आहें, त्या रामाशपथ मी तुझें सांगणें शेवटास नेईन. हे कल्याणि, माझें हें अंतःकरण

तुझ्याविषयीं कसें आहे, ह्याचा विचार करून तूं ह्या दुःखापासून मला सोडीव; आणि राम सर्वांपेक्षां मला प्रिय आहे, हें लक्ष्यांत घेऊन जें तुला बरें वाटत असेल, तें सांग. पतिप्रेमरूप बल स्वतःचें ठिकाणीं असल्याचें तुला माहीत असतांना माझ्याविषयीं शंका घेणें योग्य नाहीं. मी तुला प्रिय असलेली गोष्ट सिद्धीस नेईन. जर न नेईन तर माझें सर्व पुण्य निष्फल होईल."

ह्याप्रमाणें दशरथानें सांगितलें असतां मंथरेनें सांगितलेलीच गोष्ट मनांत धरून बसलेली ती राजपत्नि, आपला उद्देश शेवटास जाण्याचा समय आला आहे असें जाणून, कोणाच्याहि मध्यस्थीची अपेक्षा न करितां हर्षानें कठोर शब्दांनीं राजाशीं बोलूं लागली. सारांश, राजाच्या त्या प्रतिज्ञेनें अतिशय आनंदित झालेली ती कैकेयी प्राप्त झालेल्या मृत्यूप्रमाणें असलेला तो आपला महा भयंकर अभिप्राय राजाला विदित करण्याचा निश्चय करून त्याशीं बोलूं लागली.

कैकेयी म्हणाली:—"प्रथम प्रिय पुत्राची आणि नंतर पुण्याची क्रमानें शपथ घेऊन तूं मला वर देत आहेस, हें इंद्रप्रभृति तेहेतीस कोटी देव ऐकून ठेवोत; आणि त्याचप्रमाणें चंद्र, सूर्य, आकाश, ग्रह, रात्री, दिवस, दिशा, जगत्, ही पृथ्वी, गंधर्व आणि राक्षस ह्यांसहवर्तमान स्वर्गांतील देवता, निशाचर प्राणी, घरांतील गृहदेवता व इतरहि प्राणी हें तुझें प्रतिज्ञेचें भाषण ऐकून ठेवोत. हा सत्यप्रतिज्ञ, महातेजस्वी, धर्मज्ञ, सत्यवक्ता आणि आचरणानें शुद्ध असा भूपति मला वर देत आहे, हें सर्व देवांनीं ऐकून ठेवावें. "ह्याप्रमाणें राजपत्नी कैकेयीनें सत्यप्रतिज्ञत्वादि गुणांविषयीं राजाची प्रशंसा करून त्याला पक्कें करून घेतलें, आणि नंतर काममोहित होऊन वर देण्यास उद्युक्त झालेल्या त्या राजाला ती म्हणाली, "राजा, पूर्वीच्या वृत्तांताचें स्मरण कर. त्या देवदैत्यांच्या संग्रामामध्यें रात्रीं युद्धाचे प्रसंगीं शंबर नामक शत्रूनें तुला अगदीं जर्जर करून टाकिलें होतें, फक्त तुझा जीव मात्र घेतला नव्हता. त्या वेळीं मीं जागृत राहून तुझें संरक्षण केलें, आणि तुझ्या जिवाकरितां मीं तडफड केली, म्हणून तूं मला दोन वर दिलेस. राजा, तूं दिलेले वर, मी तुझ्यापाशीं आजपर्यंत ठेव म्हणून ठेविले होते आणि आज मी ते मागत आहें. तस्मात् धर्माची शपथ घेऊन तूं वचन दिलें असूनहि जर मला वर देणार नाहींस, तर आपणांकडून माझा अपमान म्हणून मी आजच्या आजच प्राणत्याग करीन."

ह्याप्रमाणें कैकेयीनें केवळ आपल्या भाषणानेंच राजाला वश करून टाकिलें असतां, आपल्या घाताकरितां पाशांत सांपडणाऱ्या मृगाप्रमाणें तो दशरथ राजा

आपल्या घाताकरितां प्रतिज्ञारूप पाशामध्यें सांपडला. तदनंतर, काममोहित होऊन वर देण्यास उद्युक्त झालेल्या दशरथाला कैकेयी म्हणाली, “ हे भूपते, त्या वेळीं देऊं केलेले वर आपण मला आतां द्या. ते मी आजच मागून घेत आहें. ह्यास्तव, माझें भाषण श्रवण करा. रामाच्या अभिषेकाचा जो हा समारंभ केलेला आहे, त्याच समारंभानें माझ्या भरताला अभिषेक व्हावा. राजा, त्या देवदैत्यांच्या युद्धामध्यें आपण प्रसन्न होऊन जो वर मला देऊं केला होता, तो मागून घेण्याचा हा समय प्राप्त झाला आहे. ह्यास्तव, वल्कलें आणि अजिनें परिधान करून ज्ञानवान रामानें तापस बनून चौदा वर्षेपर्यंत दंडकारण्यामध्यें वास्तव्य करावें, आणि भरतानें आज निष्कंटक यौवराज्याचा स्वीकार करावा, हीच माझी मुख्य इच्छा आहे. आपण दिलेलाच वर मी मागून घेत आहें. ह्याकरितां राम वनामध्यें जात असलेला मी आजच पाहाणार. तूं राजाधिराज आहेस. करितां आपली प्रतिज्ञा खरी करून कुलाची, शीलाची आणि जन्माची चाड बाळग. कारण परलोकीं वास्तव्य करण्यांमध्यें पुरुषांना सत्यवचन अत्यंत हितकारक होतें, असें तपोधन म्हणत असतात. ”

सर्ग बारावा.

कैकेयीची निर्भर्त्सना व दशरथाचा विलाप.

कैकेयीचें भयंकर भाषण श्रवण केल्यावर महाराज दशरथ चिंताक्रांत होऊन क्षणभर संतप्त झाला, आणि ‘ हें का मी दिवसां पडणारें (व्यर्थ) स्वप्न पाहिलें ? का हा मला चित्तभ्रम झालेला आहे ? किंवा पिशाचानें झपाटल्याचा हा मला अनुभव आलेला आहे ? किंवा हा कांहीं मानसिक उपद्रव आहे ? ’ असें मनांत आणूं लागला; परंतु असें चिंतन करूनहि त्या राजाला बरें वाटेना. नंतर कैकेयीच्या भाषणाचें स्मरण होऊन संतप्त झालेला तो राजा सावध झाला, आणि उघड्या भूमीवर बसलेला तो भूपति, व्याघ्रीकडे दृष्टि गेलेल्या मृगाप्रमाणें कैकेयीकडे दृष्टि जातांक्षणीं व्यथित व दीन होऊन दीर्घ सुस्कारे टाकूं लागला. यंत्रमंडलामध्यें मंत्रांच्या योगानें जखडून टाकलेल्या महाविषारी सर्पाप्रमाणें कैकेयीनें जखडून टाकलेला तो भूपति, ‘अहो धिक्कार असो’ असें रागारागानें म्हणून पुनरपि मूर्च्छित झाला ! नंतर शोकानें मूर्च्छित झालेला तो राजा बऱ्याच वेळानें शुद्धीवर आला, आणि अत्यंत दुःखित व क्रुद्ध होऊन दुःखजन्य संतापानें जळफळत जळ-

फळत कैकेयीस म्हणाला, "हे क्रूरे, हे दुराचारिणि, हे कुलघातिनि, हे पापिणि, रामानें अथवा मीं तुझें काय वाईट केलें आहे? नेहमीं आपल्या जननीप्रमाणें राम तुला वागवीत असतां त्याच्या अनर्थाकरितां ह्याप्रमाणें तूं कां उद्युक्त झाली आहेस? अथवा तुला तरी दोष देण्यांत काय अर्थ आहे! तीक्ष्ण विषानें युक्त असलेली नागीण जशी एखाद्यानें न समजतां घरामध्यें आणून ठेवावी, त्याचप्रमाणें राजकन्या म्हणून मी न समजतां तुला आपल्या नाशाकरितां स्वतःच्या घरामध्यें आणून ठेविली! जगांतील सर्व लोक जर रामाच्या गुणांची प्रशंसा करीत आहेत, तर कोणत्या अपराधाचें निमित्त करून मी आपल्या प्रिय पुत्राचा त्याग करूं? कौसल्येचा, सुमित्रेचा अथवा राज्यलक्ष्मीचाहि मी त्याग करीन, परंतु जीविताचें साधन अशा पितृवत्सल रामाचा मी स्वतः होऊन कधींहि त्याग करणार नाहीं. ज्येष्ठ पुत्र अवलोकन केला म्हणजे मला परमकाष्ठेचा आनंद होत असतो. तेव्हां राम जर दृष्टीआड झाला, तर माझें चैतन्यच नाहींसें होणार. सूर्यावांचून कदाचित् जगत्हि राहील, किंवा उदकावांचून पिकेंहि कायम राहातील, परंतु रामावांचून माझ्या देहामध्यें जीव रहाणार नाहीं. तस्मात्, हे दुष्टबुद्धि कैकेयि, तूं हा आग्रह सोडून दे. ह्याकरितां हा मी आपलें मस्तकहि तुझ्या पायावर ठेवीत आहें. तूं मजवर कृपा कर. हे पापिणि, अत्यंत भयंकर असें हें आज तूं मनामध्यें कशाकरितां आणिलें आहेस? आतां भरत मला प्रिय आहे किंवा नाहीं, हें समजून घे. याकरितां जर तूं असा प्रकार केला असशील, तर पूर्वी रामासंबंधानें तूं काढलेले उद्गार एकीकडेच राहोत. तो माझा ज्येष्ठ पुत्र वैभवशाली राम धर्मानेंहि ज्येष्ठ आहे, असें जें तूं प्रिय भाषण करणारी मला पूर्वी सांगत होतीस, तें खरें नसून माझें मन वळविण्याकरितांच तूं तें सांगत होतीस, असें म्हटलें पाहिजे. अथवा महाकुलामध्यें उत्पन्न झालेल्या तुझ्या ठिकाणीं असा दुष्ट विचार येणें असंभवनीय आहे. ह्यास्तव शून्य गृहामध्यें तुला पिशाचादिकांनीं झपाटलें आहे, आणि म्हणूनच तूं दुसऱ्याच्या तावडींत सांपडल्यामुळें कमलनयन रामाच्या अभिषेकाचा वृत्तांत श्रवण करितांक्षणीं शोकानें संतप्त होऊन मलाहि अत्यंत ताप देत आहेस. हे विनयसंपन्न देवि, तुझ्या मतीलाहि ज्या अर्थी विकार झाला त्या अर्थी इक्ष्वाकूच्या कुलामध्यें हा एक अति भयंकर अनर्थच प्राप्त झाला आहे, ह्यांत संशय नाहीं. हे विशालनयने, ह्यापूर्वी तूं माझ्याशीं कोणतेंहि अयोग्य अथवा अप्रिय भाषण केलेलें नाहींस, व म्हणूनच तुझें हें भाषण मला विश्वास-

नीच वाटत नाहीं. सारांश, तुला कोणीं तरी झपाटल्यामुळें तूं असें बोलत आहेस. हे बाले, महात्मा भरत आणि राम हे तुला सारखेच आहेत, म्हणून तूं पुष्कळ वेळां माझ्यापाशीं बोलली आहेस. तस्मात्, हे देवि, हे भीरु, भरताप्रमाणेंच प्रिय असा जो धर्मात्मा व यशस्वी राम, त्यानें चौदा वर्षेंपर्यंत वनवास करावा, हें तुला कसें रुचत आहे? अत्यंत सुकुमार असून धर्माकडेच मन असलेल्या त्या रामाचें अत्यंत भयंकर अशा अरण्यामध्यें वास्तव्य तुला कसें रुचत आहे? हे शुभनयने, तुझ्या शुश्रूषेमध्यें तत्पर असणाऱ्या मनोहर रामाला अरण्यांत हांकून देणें तुला कसें रुचत आहे? भरतापेक्षां रामच नेहमीं तुझी शुश्रूषा करीत असतो. त्या रामापेक्षां भरताचें तुझे ठिकाणीं कांहींहि जास्त गौरव दृष्टोत्पत्तीस येत नाहींत. सेवा, बहुमान, विश्वास आणि सांगितलेलें करणें ह्या गोष्टी पुरुषश्रेष्ठ रामाहून अधिक कोण करणार आहे? अनेक हजारों स्त्रियांमध्यें रामाची कोणीहि निंदा करीत नाहीं, आणि अनेक सेवकांमध्येंहि रामावर कोणाचा अपवाद नाहीं. कारण पुरुषश्रेष्ठ राम शुद्ध मनानें सर्व प्राण्यांचें सांत्वन करीत असतो, आणि देशांत राहणाऱ्या लोकांना प्रिय असेल तें करून वश करून घेत असतो. सच्छीलपणामुळें लोकांना, दानाच्या योगानें द्विजांना, शुश्रूषेनें गुरूंना आणि धनुष्याच्या योगानें युद्धामध्यें शत्रूंना हा वीर राम आपल्या अधीन करून घेत असतो. सत्य वचन, दान, तप, धर्म, मित्रता, शुचिर्भूतपणा, सरलता, विद्या आणि गुरुशुश्रूषा हे गुण रामाचे ठिकाणीं अचल आहेत. तस्मात्, सरळ आणि देवतुल्य अशा त्या महर्षीसमान तेजस्वी रामाविषयीं तूं मनामध्यें कां बरें पाप आणीत आहेस? मी प्रिय भाषण करणारा आहें व लोकांना उद्देशून अप्रिय भाषण केल्याचें मला कधींहि स्मरत नाहीं. तेव्हां तुझ्याकरितां प्रिय रामला मी अप्रिय भाषण कसें करूं? क्षमा, तप, औदार्य, सत्य, धर्म, कृतज्ञता आणि प्राण्यांची अहिंसा हे गुण ज्याच्या ठिकाणीं आहेत, त्या रामावाचून मला काय बरें आधार आहे? ह्यास्तव हे कैकेयि, तूं मजवर दया कर. मीं अगदीं वृद्ध होऊन वयाच्या शेवटल्या अवस्थेला पोहोंचलों आहें, व दीन होऊन मोठ्या काकुळतीनें तुझी प्रार्थना करीत आहें. समुद्रवलयांकित पृथ्वीमध्यें जें कांहीं मिळण्यासारखें असेल, तें सर्व मी तुला देईन. तूं माझ्या मृत्यूचा आग्रह धरूं नको. अग, मी तुला हात जोडितों आणि तुझ्या पायांवरहि मस्तक ठेवितों; परंतु तूं रामाचें रक्षण करणारी हो, आणि ह्या ठिकाणीं मला अधर्माचा स्पर्श होऊं देऊं नको."

ह्याप्रमाणें दुःखानें संतप्त, शोकानें व्याप्त, मूर्च्छित, शरिराला कंप सुटून विलाप करीत असलेल्या आणि शोकसागरांतून पार पडण्याविषयीं वारंवार प्रार्थना करीत असलेल्या दशरथ राजाला कैकेयी अधिक भयंकर अशा शब्दांनीं म्हणाली, "राजा, वर देऊन संवरूनहि जर तूं पुनः पश्चात्ताप पावत आहेस, तर हे वीरा, पृथ्वीमध्यें लोकांना धार्मिकपणाबद्दल तुझी प्रशंसा कशी करितां येईल? हे धर्मज्ञा, अनेक राजर्षी तुझी भेट घेऊन मला दिलेल्या वरासंबंधानें गोष्टी बोलूं लागतील, तेव्हां तूं त्यांना काय उत्तर देशील? 'जिच्या कृपेनें मीं जिवंत राहिलों आणि जिनें माझें रक्षण केलें त्या कैकेयीला दिलेलें वचन मीं मिथ्या केलें' असेंच तुला सांगावें लागेल. ज्या अर्थी वर देऊन संवरूनहि आज पुनः भलतींच भाषणें करीत आहेस, त्या अर्थीं राजा, आपल्या कुलांतील राजांच्या नांवाला तूं कलंक लावशील. अरे, शैब्य राजानें कपोताला अभय दिलें होतें व तें आपलें अभयवचन परिपूर्ण करण्याकरितां कपोताबद्दल त्यानें आपलें स्वतःचें मांस श्येन पक्ष्याला दिलें असें श्येनकपोतीय आख्यानामध्यें सांगितलें आहे. अलर्क राजानें अंध ब्राह्मणाला वर देऊं केला, तेव्हां त्यानें 'तुझे डोळे मला दे' असा वर मागितला असतांहि, अलर्क राजा प्रतिज्ञा शेवटास नेण्याकरितां त्याला आपले नेत्र देऊन उत्तम गतीला गेला. मर्यादेचें अतिक्रमण न करण्याविषयीं देवांनीं प्रार्थना केली असतां, 'मी अतिक्रमण करणार नाहीं' असें त्यांना वचन दिल्यापासून समुद्रहि मर्यादेचें अतिक्रमण करीत नाहीं. तस्मात्, ह्या पुरातन वृत्तांताचें स्मरण करून तरी तूं आपली प्रतिज्ञा असत्य करूं नको. हे दुर्मते, धर्माचा त्याग करून आणि रामाला राज्याभिषेक करून कौसल्येसहवर्तमान नित्य रममाण होण्याची तूं इच्छा करीत आहेस. अरे, हा धर्म असो वा अधर्म असो, किंवा सत्य असो अथवा अनृत असो, तूं जें मला वचन दिलें आहेस, तें फिरणार नाहीं. रामाला जर राज्याभिषेक होईल, तर मी आजच पुष्कळसें विष भक्षण करून तुझ्यापुढें व तुझ्यासमक्ष प्राण देईन. राजमाता या नात्यानें सर्व लोकांचे मुजरे घेतांना रामाच्या मातेला पहाण्याचा जर मला प्रसंग आला, तर खरोखर मरणच मला श्रेयस्कर होणार आहे. अरे, भरताशपथ आणि आपल्या स्वतःशपथ मी तुला सांगतें कीं, रामाला हांकून देणें ह्यावांचून दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीनें मला संतोष होणार नाहीं."

इतकें भाषण करून कैकेयी स्वस्थ राहिली, आणि राजा विलाप करूं

लागला असतांहि ती त्याच्याशीं कांहीं एक बोलेनाशी झाली. तेव्हां रामाला वनवास आणि भरताला ऐश्वर्य हें कैकेयीचें अत्यंत अशुभ भाषण श्रवण केल्यावर इंद्रियें व्याकुल झाल्यामुळें कैकेयीशीं क्षणभर कांहींच न बोलतां, अप्रिय भाषण करणाऱ्या आपल्या प्रिय भार्येकडे दशरथ राजा (क्रोधानें) कांहीं वेळ टक लाऊन पाहूं लागला. कारण अंतःकरणाला अप्रिय आणि दुःख व शोक ह्याच ज्याचा परिणाम असें तें वज्रप्राय भाषण श्रवण केल्यापासून राजाला सुख झालें नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु रामाविषयीं आपल्या भार्येचा तो निश्चय आणि तिनें केलेली ती घोर शपथ मनांत आणिल्यावर अतिशय सुस्कारे टाकून छिन्न वृक्षाप्रमाणें तो एकाएकीं भूमीवर पडला, आणि भान नाहींसें झालेल्या उन्मत्त पुरुषाप्रमाणें विपरीत प्रकृति झालेल्या व्याधिग्रस्त पुरुषाप्रमाणें, अथवा तेज हरण केलेल्या सर्पाप्रमाणें तो भूपति दिसूं लागला. दीन व व्याकुल शब्दांनीं तो कैकेयीला म्हणाला, " हितकारक दिसणाऱ्या ह्या अनर्थाचा तुला कोणीं उपदेश केला आहे? आणि पिशाचानें अंतःकरण झपाटल्याप्रमाणें माझ्याशीं असें भाषण करितांना तुला लाज कशी वाटत नाहीं? ह्यापूर्वीं बालपणीं सुद्धां तुझ्या सुशीलपणावर अशी धाड आलेली मला स्मरत नाहीं. परंतु सांप्रत तुझ्या ठिकाणीं हा सगळाच प्रकार मला विपरीत दिसत आहे. भरताला राज्यावर बसवून रामाला वनवासांत पाठविण्याविषयीं तूं वर मागत आहेस, परंतु अशा प्रकारचा वर मागण्यासारखें भय तुला कोठून प्राप्त झालें आहे? भर्ता, लोक आणि भरत ह्यांना प्रिय असलेलें जर तुला कर्तव्य असेल, तर ह्या विचारापासून आणि ह्या अनृत मार्गापासून तूं परावृत्त हो. हे दुष्टे, हे क्षुद्रे, हे दुराचारिणि, हे पापिणि, तुला दुःख होण्यासारखें काय कारण अथवा कोणता अपराध माझ्या ठिकाणीं व रामाचे ठिकाणीं तुझ्या दृष्टीस पडत आहे? रामावांचून भरत कधींहि राज्यावर बसणार नाहीं. कारण, रामापेक्षांहि मी त्याला अधिक धार्मिक समजत आहें. बरें, ' वनांत जा ' असें कदाचित् मीं जरी रामाला सांगितलें, तरी तुझ्यानें त्याला कसें सांगवेल? कारण राम तुला अतिशयच प्रिय आहे. ग्रहण लागलेल्या चंद्राप्रमाणें राम वनवासांत गेल्यामुळें निस्तेज झालेली आपली मुद्रा मी आरशामध्यें कशी बरें अवलोकन करूं? आणि सुहृदांसहवर्तमान जो उत्कृष्ठ विचार मीं निश्चित केला, तो शत्रूंनीं पराजित केलेल्या सैन्याप्रमाणें परत फिरलेला मीं कसा बरें पाहूं? देशोदेशांहून जुळलेले राजे मला काय बरें म्हणतील? ' ह्या

इक्ष्वाकुवंशज दशरथ मूर्ख असतांना ह्यानें पुष्कळ दिवस राज्य तरी कसें केलें?' असेंच म्हणतील! गुणवान आणि बहुश्रुत असे अनेक वृद्ध लोक 'राम कोठें आहे?' असें मला विचारूं लागले असतां मी त्यांना काय बरें सांगूं? 'कैकेयीच्या तावडींत सांपडल्यामुळें मीं आपला पुत्र वनवासांत घालविला' असें जरी मी खरें सांगूं लागलों, तरी लोकांना तें असत्यच वाटणार. राम वनामध्यें निघाला असतां कौसल्या मला काय बरें म्हणेल? आणि अशा प्रकारची अप्रिय गोष्ट केल्यावर मी तरी तिला काय बरें उत्तर देऊं? जेव्हां जेव्हां कौसल्या दासीप्रमाणें, सखीप्रमाणें, भार्येप्रमाणें, भगिनीप्रमाणें आणि मातेप्रमाणें माझ्या शुश्रूषेमध्यें तत्पर असे, आणि जेव्हां जेव्हां ती पुत्रवत्सल व मधुर भाषण करणारी कौसल्या माझें प्रिय करण्याविषयीं नेहमीं तत्पर रहात असे, तेव्हां तेव्हां ती सत्कारास पात्र असतांनाहि तुझ्याकरितां मीं तिचा सत्कार केला नाहीं. अपथ्य पदार्थांनीं युक्त असलेलें अन्न भक्षण केलें असतां त्यापासून जशी रुग्ण मनुष्याला पीडा होते, तद्वत् तुझ्याशीं चांगल्या रीतीनें जें मीं वर्तन केलें त्याची आतां मला पीडा होत आहे. रामाचा अभिषेक हाणून पाडून त्याला वनांत पाठविल्याचें पाहून भयभीत झालेली सुमित्रा माझ्यावर कसा बरें विश्वास ठेवील? तुझ्या मनाप्रमाणें झालें असतां, मी मृत झालों, आणि राम वनवासांत गेला असे दोन खरोखर दुःखदायक व अप्रिय प्रकार सीतेला ऐकावे लागतील. हिमालय पर्वतावर पतीचा वियोग झालेल्या किन्नर स्त्रीप्रमाणें सीता माझ्याकरितां शोक करीत करीत आपले प्राण व्याकुळ करील. राम महावनामध्यें निघालेला पाहून आणि मिथिलराजकन्या सीता रुदन करीत आहे असें अवलोकन करून फार वेळ जगण्याची मला आशा नाहीं. तुला आपल्या पुत्रासहवर्तमान जर राज्य चालवावयाचें असेल, तर तुला खरोखर तें विधवा होऊनच चालवावें लागेल. दृष्टीला मनोहर भासणारी मदिरा प्याल्यावर विकार उत्पन्न झाला असतां ज्याप्रमाणें ती सविष असल्याचें समजून येतें, त्याचप्रमाणें तूं सती म्हणून जरी माझ्या मनानें अतिशय घेतलेलें होतें, तरी तूं दिसण्यांत मात्र सती असून वस्तुतः असती आहेस, हा माझा आतां निश्चय झाला. गोड गोड भाषण करणारी तूं खोट्याच मधुर शब्दांनीं माझ्याशीं आजपर्यंत बोलत आली आहेस, आणि गायनाच्या ध्वनीनें मृगाला कचाट्यांत धरून त्याचा वध करणाऱ्या पारध्याप्रमाणें तूं आज माझा वध करण्यास प्रवृत्त झाली आहेस. सुरापान करणाऱ्या ब्राह्मणाची ज्याप्रमाणें रस्त्यांतून लोक निंदा करीत असतात,

त्याचप्रमाणें, 'पुत्राचा विक्रय करून स्त्रीसुखाचा उपभोग घेणारा हा दुष्ट आहे.' म्हणून सभ्य लोक माझी निःसंशय निंदा करूं लागतील. अरेरे, काय हें दुःख! अरे, किती तरी हा दुःखाचा प्रसंग! ज्याअर्थी तुझे हे शब्द मला ऐकून घेणें भाग पडत आहे, त्याअर्थी पूर्वी कधीं केलेल्या अशुभ कर्माचें फल म्हणून अशा प्रकारचें हें अपरिहार्य दुःख मला प्राप्त झालें आहे, असें वाटतें. हे पापिणि, न कळत जसा एकाद्यानें आपल्या गळ्याला फांस लावून घ्यावा, तशी मीं पाप्यानें आपल्या नाशाकरितां तुला खरोखर पुष्कळ दिवसपर्यंत जतन करून ठेविली. हातानें कृष्णसर्पाला स्पर्श करणाऱ्या बालाप्रमाणें तुझ्या-सहवर्तमान रममाण होणाऱ्या माझ्या लक्ष्यांत तूं मृत्यु आहेस, हें आलें नाहीं. ह्यामुळें आतां ह्या पृथ्वीतील सर्व प्राण्यांनीं माझी निंदा करणेंच योग्य आहे. कारण मी दुरात्म्यानें त्या महात्म्या पुत्राला वनांत पाठवून अनाथ करण्याचा प्रसंग आणिला. 'स्त्रीकरितां पुत्राला वनांत पाठवून देणारा हा विषयासक्त दशरथ राजा खरोखर अतिशय मूर्ख आहे' अशी लोक माझी निंदा करितील. वेदाध्ययन, ब्रह्मचर्य आणि गुरुशुश्रूषा ह्यांच्या योगानें आधींच कृश झालेल्या रामाला राज्योपभोगसमयींहि पुनरपि मोठें दुःख सोसावें लागणार. माझ्या पुत्राला माझ्याशीं दुसरें भाषण कांहीं करवणारच नाहीं. 'वनांत जा' असें म्हटलें असतां तो 'ठीक आहे' एवढेंच म्हणेल. मीं 'वनांत जा' म्हणून सांगितलें असतां राम जर माझ्या विरुद्ध वागेल, तर मला प्रिय होईल. परंतु तो पुत्र तसें करणारच नाहीं. राम वनांत गेला असतां क्षमेस अपात्र आणि म्हणूनच सर्व लोकांनीं धिक्कारलेल्या मला मृत्यु यमसदनीं नेईल. मी मेल्यावर आणि पुरुषश्रेष्ठ राम वनवासांत गेल्यावर अवशिष्ट राहिलेल्या माझ्या प्रिय जनांना तूं कितीतरी दुःख देशील! माझा आणि रामाचा कौसल्येला जर वियोग झाला, आणि त्याचप्रमाणें सुमित्रेला जर माझा, रामाचा आणि आपल्या उभयतां पुत्रांचा वियोग झाला, तर त्या उभयतांनाहि दुःख सहन न होऊन त्या माझ्याच मागोमाग परलोकीं येतील. सारांश, कैकेयि, कौसल्येला, सुमित्रेला आणि तिन्ही पुत्रांसहवर्तमान मला नरकांत लोटून देऊन तूं सुखी हो. गुणांनीं अलंकृत, शाश्वत आणि क्षोभरहित असें इक्ष्वाकुकुल मीं व रामानें सोडिलें असतां तूं तें क्षुब्ध झालेलें परिपालन करशील. रामाचें वनवासांत जाणें जर भरताला प्रिय असेल, तर मी मरण पावल्यानंतर भरतानें माझें उत्तरकार्य करूं नये. पुत्रासहवर्तमान जर तुला राज्य कर्तव्य असेल, तर पुरुषश्रेष्ठ राम वनांत गेल्यामुळें मी मृत झालों

असतां तुला आतां तें विधवा झाल्यावरच करावें लागेल. हे राजकन्ये, ज्या अर्थी दुर्दैवानें तुझें वास्तव्य माझ्या घरीं झालें आहे, त्या अर्थी जगतामध्यें माझी अत्यंत अपकीर्ति व हेटाळणी निःसंशय होणार, आणि पातकी पुरुषाप्रमाणें सर्व प्राण्यांमध्यें माझी अवज्ञा होणार. रथ, गज आणि अश्व ह्यांवर नेहमीं आरूढ होऊन जाणारा माझा पुत्र प्रभु राम महारण्यामध्यें पायांनीं कसा जाईल? ज्याच्या भोजनाचा समय झाला असतां कुंडलें धारण करणारे आचारी आनंदित होऊन चढाओढीनें खाण्यापिण्याचे पदार्थ तयार करीत असतात, तो माझा पुत्र तुरट, कडू आणि तिखट कंदमुळांवर अर्थात् वन्य आहारावर कशी बरें उपजीविका करील? मोठमोठ्या मौल्यवान वस्त्रांमध्यें गुरफटून गेलेला आणि पुष्कळ दिवसपर्यंत सुखांत राहिलेला राम आज काषायवस्त्रें कशीं बरें परिधान करील? अरण्यामध्यें गमन आणि भरताला अभिषेक अशा प्रकारचें जें भयंकर भाषण आज मला ऐकणें भाग पडलें, तें खरोखर माझ्या एखाद्या अनिर्वचनीय दुष्कर्माचेंच फल होय. धिक्कार असो ह्या स्वार्थसाधु कपटी स्त्रियांना! सर्व स्त्रियांसंबंधानें माझें हें म्हणणें नाहीं. फक्त भरताच्या मातेलाच उद्देशून मी हें म्हणत आहें. अनर्थकारक गोष्ट करण्याचा उद्देश धरून स्वार्थ साधू पहाणारे हे दुष्टे, मला त्रास होण्याकरितांच परमेश्वरानें तुला माझ्या घरीं घातलें आहे, असें दिसतें. नाहीं तर जगताचें हित करण्याविषयीं तत्पर असलेल्या रामाचे ठिकाणीं माझ्यामुळें स्वतःला अप्रिय होण्यासारखें तुला काय बरें दिसत आहे? राम संकटांत सांपडल्याचें पाहून पितें पुत्रांचा व अनुरक्त भार्या पतींचाहि त्याग करतील. इतकेंच नव्हे, परंतु संपूर्ण जगत् क्रुद्ध होऊन जाईल. देवकुमाराप्रमाणें असलेला माझा पुत्र राम अलंकार धारण करून माझ्याकडे येत असल्याचें ऐकून प्रत्यक्ष पाहिल्याप्रमाणें मला आनंद होतो, आणि त्याला पाहिल्यावर तर तरुण पुरुषांप्रमाणें मी उत्साहयुक्त होत असतों. कदाचित् सूर्यावांचूनहि लोकांचा व्यवहार चालेल, आणि इंद्र जरी पर्जन्य पाडीत नसला, तरीहि कदाचित् लोकांची उपजीविका सुरू राहील, परंतु येथून राम वनांत जात असल्याचें अवलोकन करून कोणीहि जिवंत राहणार नाहीं, असें मला वाटतें. माझ्या विनाशाची व अकल्याणाची इच्छा धरून माझ्याशीं शत्रुभावानें वागणाऱ्या आणि म्हणूनच माझ्या मृत्यूप्रमाणें असलेल्या तुला मीं आपणापाशीं राहून घेतली, आणि मोहामुळें तुज महाविषारी सर्पिणीला मीं पुष्कळ दिवसपर्यंत मांडीवर ठेविली, त्यामुळें माझा घात झाला आहे. मी आणि लक्ष्मणासहवर्तमान राम ह्यांनीं रहित असलेल्या भरतानें तुझ्या-

सहवर्तमान राजधानीवर व राष्ट्रावर अंमल चालवावा, आणि बांधवांना मारून त्वां माझ्या शत्रूशीं प्रत्यक्ष भाषण करूं लागण्यास सिद्ध व्हावें. अग दुराचारिणि, संकटांत सांपडलेल्यावर प्रहार करणारे, आज तूं ह्या ठिकाणीं उद्धटपणानें भाषण करीत असूनहि तुझ्या दांतांचे हजारों तुकडे होऊन ते तुझ्या मुखांतून कसे पडत नाहींत, हें मला समजत नाहीं! रामानें आजपर्यंत अहितकारक आणि अप्रिय असें भाषण यत्किंचित्‌हि केलेलें नाहीं, व कठोर शब्द उच्चारणें तर त्याला ठाऊकच नाहीं. तेव्हां गुणांच्या योगानें सर्वांना सर्वदा संमत अशा प्रिय भाषण करणाऱ्या रामाला तूं दोष कसे लावीत आहेत? तूं संताप, जळ, मर अथवा हजारों तुकडे तुकडे होऊन पृथ्वींत मिळून जा. हे केकयराज-कलंकिनि, अत्यंत भयंकर असें हें तूं केलेलें भाषण मी कधींहि ऐकणार नाहीं. वस्तऱ्याचीच उपमा तुला योग्य आहे. तूं नेहमीं प्रिय, परंतु मिथ्या भाषण करणारी आहेस. तुझी बुद्धि फार दुष्ट आहे, आणि तूं आपल्या कुलाचा घात करणारी आहेस. ह्यास्तव प्राणांसहवर्तमान हृदय दग्ध करण्याची इच्छा करीत असल्यामुळें मनाला दुःख देणाऱ्या तुला जगवावी अशी मला मुळींच इच्छा नाहीं. राम वनवासांत गेला असतां मी जिवंतहि राहणार नाहीं, मग सुखाची गोष्ट कशाला पाहिजे? कारण, आत्मवेत्त्या पुरुषांना पुत्रांवांचून सुख कोठून असणार? ह्यास्तव हे देवि, तूं माझें अकल्याण करूं नको. मी तुझे पायहि धरितों, तूं मजवर कृपा कर."

ह्याप्रमाणें अमर्याद रीतीनें वागणाऱ्या स्त्रीच्या कचाट्यांत सांपडलेला तो दशरथ भूपति, अनाथाप्रमाणें विलाप करीत करीत आपल्या भार्येच्या पसरलेल्या पायांना स्पर्श करण्याकरितां गेला असतां पायांपर्यंत पोहोंचण्यापूर्वींच मूर्च्छित होऊन भूमीवर पडला!

सर्ग तेरावा.

दशरथाचा विलाप.

स्त्रीला प्रणाम करण्यास अपात्र आणि भूमीवर शयन करण्यास अयोग्य असतांनाहि तशा रीतीनें शयन करणारा आणि म्हणूनच पुण्याचे शेवटीं देवलोकापासून च्युत झालेल्या ययातीप्रमाणें दिसणारा जो महाराज दशरथ, त्याला त्याच वराच्या संबंधानें मूर्तिमंत अनर्थ, उद्देश सिद्धीस न गेलेली, लोका

पवादाची भीति न बाळगणारी आणि रामापासून भरताला भय होईल, असें मनांत आणणारी स्त्री कैकेयी म्हणाली, 'हे महाराज, सत्यवादी आणि स्वीकारलेलें व्रत नेटानें चालविणारा म्हणून तुझी मोठी ख्याति आहे. तस्मात् माझा हा वर कशाकरितां आपल्याकडे ऋण ठेवण्याची इच्छा करीत आहेस?'

ह्याप्रमाणें कैकेयी बोलली असतां दशरथ राजा क्रुद्ध झाला आणि क्षणभर विवळून तिला म्हणाला, "हे दुष्टे, हे शत्रुरूपिणि मी मरून पुरुषश्रेष्ठ राम वनामध्यें गेला म्हणजे आपले मनोरथ परिपूर्ण करून घेऊन तूं सुखी हो. स्वर्गामध्यें गेल्यावर 'राम कुशल आहे ना?' म्हणून देवांनीं विचारिल्यावर मी त्यांना काय बरें सांगूं? 'मी त्याला वनांत पाठविलें' असें जर सांगेन, तर 'अशा उत्कृष्ट पुत्राला तूं वनांत कसें पाठविलेंस' म्हणून जर ते विचारूं लागले, तर तें माझ्यानें ऐकवणारहि नाहीं 'कैकेयीचें प्रिय करण्याकरितां रामाला मीं वनवासांत पाठविलें' असें जर मी त्यांना खरें सांगूं लागलों, तर तें माझें बोलणें, ते असत्यच समजतील; आणि 'विषयवासनेमुळें ह्यानें अशी गोष्ट केली' असेंच ते म्हणतील. मी निपुत्रिक असतांना मोठ्या कष्टानें हा महात्मा तेजस्वी पुत्र राम मला प्राप्त झाला आहे. त्याचा त्याग कसा बरें करूं? शूर, विद्या झालेला, क्रोध जिंकलेला आणि क्षमाशील असा जो कमलनयन राम, त्याला मी कसें बरें हांकून लावावें? नीलकमलाप्रमाणें ज्याचा वर्ण आहे अशा महाबलाढ्य, आजानुबाहु व मनोहर रामाला दंडकारण्यामध्यें कसें बरें पाठवावें? मुळापासून सुखामध्येंच वाढलेल्या आणि दुःखाची कधींच संवय नसलेल्या विचारी रामाचें दुःख मी कसें बरें पाहूं? दुःखाला अयोग्य अशा रामाबद्दल दुःख न करितां जर माझें परलोकीं गमन होईल, तर मला सुख होईल. हे दुष्टे, हे पापबुद्धि कैकेयी, माझ्या अमोघ पराक्रमी प्रिय रामावर तूं कशाकरितां अप्रिय गोष्ट लादीत आहेस? असें झालें असतां लोकांमध्यें माझी कांहीं पराकाष्ठेची अपकीर्ति होईल व आजपर्यंत मिळविलेल्या कीर्तीवर तुझ्या योगानें पाणी पडेल."

ह्याप्रमाणें अंतःकरणांत मोह पडून तो दशरथ विलाप करीत असतां सूर्य अस्तास जाऊन रात्र पडली; आणि ती रात्रहि जरी चंद्रमंडलानें भूषित होती, तरी विलाप करीत असलेल्या त्या राजाला ती सुखदायक झाली नाहीं. तेव्हां एकसारखे सुस्कारे टाकून तो वृद्ध दशरथ राजा आकाशाकडे दृष्टि देऊन आर्त मनुष्याप्रमाणें दुःखानें विलाप करूं लागला कीं, 'हे नक्षत्रभूषित रात्रि, तूं

हजाडूं देऊं नको. हे कल्याणि, तूं मजवर दया कर. हे मीं तुला हात जोडिले आहेत. अथवा तूं जा लवकर. जिच्याकरितां मला हें दुःख झालें आहे, त्या निर्दय व दुष्ट कैकेयीचें फार वेळपर्यंत तोंड पहाण्याची मला इच्छा नाहीं.'

ह्याप्रमाणें विलाप करून त्या दशरथ राजानें कैकेयीपुढें हात जोडिले, आणि तो राजधर्मज्ञ दशरथ पुनरपि कैकेयीची प्रार्थना करूं लागला कीं, "हे कल्याणि, मीं सद्वर्तनानें वागणारा दशरथ आज दीन होऊन तुझ्या तावडींत सांपडलों आहें, व आतां माझ्या आयुष्याचे दिवसहि थोडकेच राहिले आहेत. करितां देवि, मी राजा आहें ह्या गोष्टीकडे विशेष लक्ष्य देऊन तूं मजवर कृपा कर. हे सुंदरि, सारासार विचार न राहिल्यामुळें मीं तुझ्याशीं हें कठोर भाषण केलें; परंतु तूं दयाळु आहेस, तेव्हां मजवर चांगली कृपा कर. हे देवि, मजवर प्रसन्न होऊन तूं रामाला राज्य दे, हे कृष्णनयने, त्याला तूं दिलेलें राज्य अक्षय प्राप्त होऊं दे, म्हणजे तुझी पराकाष्ठेची कीर्ति होईल. हे सुंदरि, हे मनोहरवदने, हे सुंदरनयने, मला, रामाला, लोकांना, वसिष्ठ-प्रभृति गुरूंना आणि भरतालाहि हीच गोष्ट प्रिय आहे."

ह्याप्रमाणें, रडून रडून ज्याच्या नेत्रांतील अश्रुहि आरक्तवर्ण झाले आहेत, व जो मनानें शुद्ध आहे, अशा त्या भर्त्याचा नानाप्रकारचा दीन विलाप श्रवण करूनहि पापबुद्धि दुष्ट कैकेयीनें त्याच्या म्हणण्याप्रमाणें केलें नाहीं. तेव्हां तो राजा पुनरपि मूर्च्छित झाला, आणि कांहींसा सावध झाल्यावर असंतुष्ट आणि विरुद्ध भाषण करणाऱ्या आपल्या प्रिय पत्नीकडे पाहूं लागला. परंतु इतकें झालें असतांहि पुत्राला वनवासांत पाठविण्याविषयीं ती आपला आग्रह सोडीत नाहीं, असें अवलोकन केल्यावर तो राजा दुःखीत व मूर्च्छित होऊन पृथ्वीवर पडला. ह्याप्रमाणें दुःखाकुल होऊन तो विचारी राजा भयंकर सुस्कारे टाकीत पडला असतां ती रात्र निघून गेली. तेव्हां मंगलगीतादिकांनीं भाट वगैरे त्याला उठवूं लागले असतां त्या राजश्रेष्ठानें त्यांना प्रतिबंध केला.

सर्ग चौदावा.

कैकेयीचा दुराग्रह.

पुत्रशोकाकुल झाल्यामुळें मूर्च्छित होऊन तडफडत असलेल्या इक्ष्वाकुवंशज दशरथ राजाला अवलोकन करून दुष्ट कैकेयी म्हणाली, "अरे, मला वर देण्याची प्रतिज्ञा करून तूं पाप केल्याप्रमाणें व्याकुल होऊन भूतलावर पडला आहेस, हें काय? सज्जनांच्या सत्यपालनरूप मर्यादेनेंच वागणें तुला योग्य आहे. धर्मज्ञ लोक सत्यालाच उत्कृष्ट धर्म म्हणतात; आणि मींहि सत्यरूप धर्माचेंच अवलंबन करून तुला वरदानाविषयीं मागणें केलें आहे. भूपति शैब्य राजा कपोताला अभय देण्याची प्रतिज्ञा केल्यावर आपलें शरीर श्येन पक्ष्याला देऊन उत्कृष्ट गतीला गेला. त्याचप्रमाणें तेजस्वी अलर्क राजानें वेदपारंगत ब्राह्मण याचना करूं लागला असतां खिन्न न होतां आपले नेत्र काढून त्याला दिले. सत्याचें अवलंबन करून असलेला समुद्र, सत्याचा त्याग होईल ह्या भीतीनें चंद्रोदयकालीं वृद्धिगत होण्याचा समय असतांहि मर्यादेचें उल्लंघन यत्किंचित्‌हि करीत नाहीं. सत्यवचन हेंच प्रणवरूप ब्रह्म होय. सत्यावरच धर्म अवलंबून आहे. अक्षय वेदहि धर्माच्याच आश्रयानें आहेत, आणि सत्य हेंच ब्रह्मस्वरूपाच्या प्राप्तीचें साधन आहे. धर्माकडे जर तुझें चित्त असेल, तर सत्याला अनुसरून वाग. हे सज्जनश्रेष्ठ, ज्या अर्थीं तूं मला वर दिला आहेस, त्या अर्थीं तो माझा वर सफल होवो. सारांश, धर्माकरितां आणि मी सांगत आहें म्हणून तूं आपल्या रामपुत्राला वनामध्यें पाठीव, हें मी तुला तीन वेळ सांगत आहें. हे आर्य, माझी ही अट जर तूं शेवटास न नेशील, तर तूं माझी उपेक्षा केलीस, म्हणून तुझ्यासमोर मी जीव देईन."

ह्याप्रमाणें निःशंकपणानें कैकेयीनें दशरथाला सांगितलें असतां, इंद्रानें टाकलेला पाश ज्याप्रमाणें बलीला सोडितां आला नाहीं, त्याप्रमाणें सत्यस्वरूपपाशाच्या बंधनापासून दशरथ राजा मुक्त होण्यास समर्थ झाला नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु जूं आणि चाक ह्यांमध्यें तडफड करीत असलेल्या बैलाप्रमाणें तो मनामध्यें गोंधळून जाऊन त्याचें मुख निस्तेज झालें, आणि अश्रूंनीं नेत्र व्याकुळ झाल्यामुळें दृष्टि अंधक झालेला तो भूपति धैर्यानें दुःख आवरून धरून मोठ्या कष्टानें कैकेयीला म्हणाला, "हे पापिणि, अग्निसंन्निध मीं जें तुझें समंत्रक पाणिग्रहण केलें आहे, तें मी सोडितों, आणि माझ्यापासून झालेला

माझा पुत्रहि तुझ्यासहवर्तमान मीं टाकून देतों. हे देवी, रात्र निघून गेली. आतां सूर्योदयाच्या वेळेला अभिषेकाकरितां जुळविलेल्या सामुग्रीनें रामाला अभिषेक करण्याकरितां लोक मला निःसंशय घाई करतील. ह्यास्तव रामाच्या अभिषेकाकरितां जुळविलेल्या वस्तूंनीं मला रामाला अभिषेक करविला पाहिजे. आतां गुरूंचाहि अवमान करून जर तुला रामाचा अभिषेक हाणून पाडावयाचा असेल, तर त्या अभिषेकसामुग्रीनें मज मृताचें उत्तरकार्यच रामाकडून मला करविलें पाहिजे. तूं आपल्या पुत्रासहवर्तमान माझें उत्तरकार्य करितां उपयोगींच नाहीं. रामाला अभिषेक होणार, हें समजल्याबरोबर लोकांचीं मुखकमलें प्रफुल्लित झालेलीं मीं अवलोकन केलेलीं आहेत. तेव्हां रामाभिषेक हाणून पाडला, म्हणून आतां हर्षरहित व आनंदरहित लोकांनीं आपलीं तोंडें खालीं घातलेलीं आज माझ्यानें पाहवणार नाहींत."

ह्याप्रमाणें तो महात्मा दशरथ भूपति त्या कैकेयीशीं बोलत आहे, तोंच चंद्र व नक्षत्रसमुदाय ह्यांनीं युक्त असलेली ती पुण्यकारक रात्र उजाडली. तेव्हां पापबुद्धीनें वागणारी आणि संभाषण करण्यामध्यें निपुण असलेली ती कैकेयी क्रोधानें अगदीं व्याप्त होऊन कठोर शब्दांनीं राजाला म्हणाली, 'राजा, विषजन्य दुःखाप्रमाणें दुःख देणारें हें तूं काय बोलत आहेस! रामाला अभिषेकाकरितां तुला खुशाल येथें आणाविणें योग्य आहे काय? माझ्या पुत्राला राज्यावर बसवून आणि रामाला वनवासांत पाठवून मला शत्रूरहित केलेंस, म्हणजे तूं कृतकृत्य होशील.'

दुःसह चाबूक मारिला असतां उत्कृष्ट अश्व ज्याप्रमाणें स्वाराच्या अधीन होतो, त्याप्रमाणें कैकेयीनें भाषणानें वश करून घेतलेला राजा म्हणाला, "धर्मसंबंधानें मी बद्ध झालों असल्यामुळें मला आतां कांहीं सुचत नाहीं. प्रिय आणि धार्मिक अशा ज्येष्ठ पुत्र रामाला पाहण्याची माझी इच्छा आहे."

तदनंतर रात्र उजाडलेली पाहून सूर्योदय झाल्यावर शुभनक्षत्रीं सुमुहूर्त प्राप्त झाला असतां शिष्यांनीं परिवेष्टित असे गुणसंपन्न वसिष्ठ मुनि अभिषेकाचें साहित्य घेऊन त्या उत्कृष्ट नगरामध्यें सत्वर प्रविष्ट झाले. त्या नगरींतील रस्ते शिंपून व झाडून काढिलेले होते. उत्तम उत्तम पताकांनीं त्या नगरीला शोभा आणिलेली होती. आंतील लोक हर्षयुक्त झालेले होते. बाजारांतून विक्रीचे पदार्थ पुष्कळ मांडून ठेविलेले होते. जिकडे तिकडे महोत्सव चाल-

लेला होता. रामाकरितां आंतील लोक उत्सुक झालेले होते आणि चंदन व अगुरु ह्यांचें चोहोंकडे धूप घातलेले होते.

अशा त्या इंद्रनगरीसमान असलेल्या नगरींत गेल्यावर श्रीमान वसिष्ठ मुनींनीं अंतःपुर अवलोकन केलें. त्या अंतःपुरामध्यें नानाप्रकारचे ध्वजसमुदाय होते. नगरींतील आणि देशांतील लोकांनीं तें गजबजून गेलेलें होतें. दंडधारी ब्राह्मणांच्या योगानें त्याला शोभा आलेली होती. आणि उत्तम प्रकारें शृंगारलेल्या उत्कृष्ठ अश्वांनीं तें भरलेलें होतें. अशा प्रकारच्या अंतःपुराशीं गेल्यावर महर्षींनीं परिवेष्टित असलेले वसिष्ठ मुनि अत्यंत प्रसन्न होऊन तेथील लोकांच्या अंगावरून जाऊं लागले असतां, ज्याचें दर्शन आल्हादकारक आहे असा अंतःपुरांतून बाहेर येत असलेला पुरुषश्रेष्ठ दशरथ राजाचा सुमंत्र नामक सारथी व मंत्री त्यांनीं अवलोकन केला. ते महातेजस्वी वसिष्ठ मुनि त्या व्यवहारज्ञ सारथ्याला म्हणाले, " मी येथें आलों आहें, हें तूं राजाला सत्वर निवेदन कर. अभिषेकाकरितां गंगाजलाचे घट आणिलेले आहेत, समुद्रांपासूनहि सुवर्णघट त्यांच्या उदकानें भरून आणिलेले आहेत, आणि अभिषेकाकरितां उंबराचें हें भद्रपीठहि आणिलेलें आहे. सर्व प्रकारचीं बीजें, गंध, नानाप्रकारचीं रत्नें, मध, दहिं घृत, लाह्या, दर्भ, पुष्पें, पय, सुंदर अशा आठ कुमारिका, मदमत्त असा उत्कृष्ठ गज, चार अश्व जोडलेला वैभवशाली रथ, खड्ग, उत्कृष्ठ धनुष्य, भोयांसहवर्तमान पालखी, चंद्रासारखें निर्मल छत्र, शुभ्रवर्ण चामरें, सुवर्णाची झारी, सोन्याच्या साखळदंडानें बांधिलेला आणि वशिंड असलेला श्वेतवर्ण बैल, विपुल केस आणि चार दाढा ह्यांनीं युक्त असलेला महाबलाढ्य व श्रेष्ठ अश्व, सिंहासन, व्याघ्रचर्म, समिधा, अग्नि, सर्व प्रकारचे वाद्यसमुदाय, वेश्या, अलंकार धारण केलेल्या स्त्रिया, आचार्य, ब्राह्मण, गायी, पवित्र पशुपक्षी, नगरांतील व देशांतील श्रेष्ठ श्रेष्ठ लोक आणि आपापल्या गणांसहवर्तमान उदमी लोक हे व इतरहि पुष्कळ प्रिय भाषण करणारे व प्रसन्न मुद्रेनें युक्त असलेले लोक राजांसहवर्तमान रामाच्या अभिषेकाकरितां वाट पहात आहेत. ह्यास्तव गुणसंपन्न अशा ह्या दिवशीं व पुष्य नक्षत्राच्या योगावर रामाला राज्याभिषेक होईल अशा रीतीनें तूं महाराज दशरथाकडून त्वरा करीव. "

वसिष्ठ मुनींचें हें भाषण श्रवण केल्यावर तो महाबलाढ्य सारथि नृपश्रेष्ठ दशरथाची स्तुति करीत करीत तो असलेल्या स्थानामध्यें गेला. तेव्हां 'ह्याला

कधींहि कोणीं आडकाठी करूं नये' असें राजानें पूर्वींच सांगून ठेविलें असल्यामुळें, राजाचें प्रिय करण्याची इच्छा करणारे व राजाला संमत असलेले द्वारपाल त्याला आडकाठी करण्यास समर्थ झाले नाहींत. आंत प्रविष्ठ झाल्यावर तो सुमंत्र राजाचे समीप उभा राहिला; परंतु कैकेयीनें करून टाकिलेली ती राजाची अवस्था समजण्यांत न आल्यामुळें अत्यंत स्तुतिपरिपूर्ण शब्दांनीं तो त्याची प्रशंसा करूं लागला. सारांश, राजा जेथें बसला होता, त्या स्थानामध्यें गेलेला तो सारथि सुमंत्र हात जोडून पूर्वींप्रमाणें पृथ्वीपति दशरथाची स्तुति करूं लागला. तो म्हणाला, 'सूर्योदय झाला असतां त्याच्या तेजानें युक्त झालेला समुद्र ज्याप्रमाणें स्नानास आलेल्या पुरुषांना आनंदित करितो, त्याप्रमाणें आपण स्वतः संतुष्ट होऊन प्रसन्न अंतःकरणानें आम्हांला आनंदित करा. ह्या सूर्योदयाचें वेळीं मातलीनें इंद्राची स्तुति केली असतां त्या इंद्रानें सर्व दानवांचा पराभव केला. तस्मात्, ज्याप्रमाणें मातली इंद्राला उठवितो, त्याप्रमाणें मी आपणाला उठवीत आहें. सांग, वेद व मीमांसा ज्याप्रमाणें स्वयंभु प्रभु ब्रह्मदेवाला सृष्टि करण्याविषयीं जागृत करितात, त्याप्रमाणें मी आपणांला जागृत करितों. आदित्य व चंद्र भूतधरा पृथ्वीला अर्थात् पृथ्वीवरच्या सर्व लोकांना जागृत करितात, त्याप्रमाणें मी आपणांस जागृत करितों. हे महाराज, आपण अभिषेकोत्सवसंबंधीं मंगलकृत्य करून नानाप्रकारचीं वस्त्रें परिधान करा, व मेरु पर्वतावर उदय पावलेल्या सूर्याप्रमाणें लोकांना आनंदित करा. रामचंद्राच्या अभिषेकाचें सर्व साहित्य तयार आहे, व त्याकरितां पुरांतले व देशांतले लोक आणि शेटसावकारहि हात जोडून उभे आहेत. भगवान वसिष्ठ मुनि ब्राह्मणांसहवर्तमान येऊन उभे राहिले आहेत. राजन्, रामास अभिषेक करण्याविषयीं सत्वर अनुज्ञा व्हावी. ज्याप्रमाणें रक्षकावांचून पशु, सेनाधिपतीवांचून सेना, चंद्रावांचून रात्रि व वृषभावांचून गायी शोभत नाहींत, त्याप्रमाणें राजावांचून राज्य शोभत नाहीं. करितां आपण उठावें."

ह्याप्रमाणें सुमंत्राचें सांत्वनपूर्वक आणि आश्चर्ययुक्त असें भाषण ऐकून राजा पुनरपि शोकानें व्याप्त झाला. नंतर पुत्रानिमित्त ज्याचा उत्साह गेला आहे व शोकानें ज्याचे नेत्र आरक्तवर्ण झाले आहेत, असा तो धार्मिक राजा त्या सुमंत्राला म्हणाला, 'सुमंत्रा, तूं आपल्या भाषणानें पुनरपि माझें मर्मोद्घाटन कां करीत आहेस?' हें त्या दीन झालेल्या राजाचें हृदयाला द्रव

येण्यासारखें भाषण श्रवण केल्यावर सुमंत्रानें हात जोडिले व तो तेथून बाजूला सरला. तदनंतर राजाचे मुखांतून स्वप्रतिज्ञापालनरूप संकटानें कांहींच शब्द निघत नाहीं असें पाहून कैकेयी आपण होऊन बोलूं लागली. ती म्हणाली, ' हे सुमंत्रा, रामाभिषेकरूप उत्साहानें राजाचा रात्रभर डोळा लागला नाहीं, व त्यामुळें हल्लीं तो निद्रावश झाला आहे. करितां हे सुमंत्रा, तुझें कल्याण असो. तूं यशस्वी राजपुत्र रामचंद्राला कांहींएक विचार न करितां सत्वर घेऊन ये. '

हें ऐकून सुमंत्र म्हणाला, ' हे कैकेयि, राजाज्ञा झाल्यावांचून रामचंद्राला आणण्याकरितां मी कसा बरें जाऊं ? ' ह्याप्रमाणें सुमंत्राचें भाषण श्रवण करितांक्षणीं दशरथ राजा मंत्र्याला म्हणाला, ' सुमंत्रा, सुंदर अशा रामाला मी अवलोकन करण्याची इच्छा करितों. ह्यास्तव त्यास तूं सत्वर घेऊन ये. ' असें राजानें सांगितलें असतां, राजा कदाचित् रामदर्शनानें संतुष्ट होऊन रामाला राज्याभिषेक करील असें वाटून सुमंत्र मनामध्यें आनंदित झाला, व तो राजाच्या आज्ञेवरून मोठ्या प्रेमानें निघाला असतां कैकेयी त्यास म्हणाली, ' हे सुमंत्रा, रामाला लवकर घेऊन ये. ' ह्याप्रमाणें पुनरपि कैकेयीचें भाषण श्रवण केल्यावर सुमंत्र मनामध्यें विचार करूं लागला कीं, कैकेयीची ही त्वरा रामाला अभिषेक करण्याकरितांच असावी काय ? हा धर्मरक्षण करणारा दशरथ राजा अगदीं थकल्यासारखा दिसत आहे. याचें बाहेर येण्याचें मान दिसत नाहीं. असा विचार करून तो महातेजस्वी सुमंत्र रामचंद्राला पहाण्याकरितां, समुद्राच्या डोहाप्रमाणें शोभणाऱ्या अंतःपुरांतून बाहेर पडला. तदनंतर पृथ्वीपति दशरथ राजाच्या अंतःपुरांतून बाहेर पडतांच, देवडीवर प्राप्त झालेले पौर व मोठमोठाले श्रीमान लोक सुमंत्रानें अवलोकन केले.

सर्ग पंधरावा.

रामाभिषेकाचें साहित्य.

राजाच्या पूर्वीच्या आज्ञेवरून उपाध्यायांसह ते वेदपारंगत ब्राह्मण ती रात्र गेल्यानंतर प्रातःकालीं राजद्वारांत आले. प्रधान, सेनाधिपति आणि व्यापाऱ्यांतील मुख्य लोक रामाच्या अभिषेकाकरितां प्रेमानें जुळले. स्पष्ट सूर्याचा उदय झाला असतां त्या वेळेस पुष्य नक्षत्र असतां आणि रामाच्या जन्मकालीं असणाऱ्या

कर्क लग्नाला लवकरच प्रारंभ होणार असतां ब्राह्मणांनीं रामाच्या अभिषेका-करितां सर्व तयारी केली. ती अशी:—सुवर्णाचे कुंभ जलानें भरून ठेविले. सिंहासन अलंकृत केलें. रथावर सुशोभित व्याघ्रचर्म घातलें. पुण्यकारक अशा गंगायमुनांच्या संगमांतून उदक आणून ठेविलें. पूर्वेकडे वाहणाऱ्या, पर्वत वगैरे आड आल्यामुळें ऊर्ध्व व वांकड्या वाहणाऱ्या, पुष्कळ पाण्यानें भरून चाललेल्या अशा ज्या नद्या आहेत, त्या नद्यांपासून आणि सर्व समुद्रांपासून उदक आणून ठेविलें. मध, दहीं, तूप, लाह्या, दर्भ फुलें आणि दूध हेहि पदार्थ आणून ठेविले. आठ रूपावती कन्या व मदोन्मत्त असा हत्ती आणून ठेविला. उदकानें भरलेले व ज्या वृक्षांना चीक येतो त्या वृक्षांच्या पल्लवानें आच्छादिलेले असे सोन्याचे व रुप्याचे घट, आणि सूर्यविकासी व चंद्रविकासी कमलानें युक्त, निर्मल उदकानें भरलेले व शोभायमान असे घट ठेविले. चंद्राच्या किरणांप्रमाणें शुभ्र व रत्नानें अलंकृत केलेली अशी उत्तम चौरी रामाला वारा घालण्याकरितां तयार करून ठेविली, आणि चंद्रबिंबासारखें शोभणारें पांढरें असें छत्रहि ठेविलें. ह्याप्रमाणें रामाला अभिषेक करण्याच्या उपयोगीं पडणारें मुख्य मुख्य साहित्य तयार केलें. शिवाय पांढरा बैल आणि पांढरा घोडाहि तयार करून ठेविला. सर्व प्रकारचीं वाद्यें तयार ठेविलीं. भाट उभे केले. इक्ष्वाकुकुलोत्पन्न पुरुषांना राज्याभिषेक करितेवेळीं जसें साहित्य पाहिजे, तसें सर्व साहित्य रामाला अभिषेक करण्याकरितां तयार केलें. राजाच्या आज्ञेवरून जुळलेले सर्व लोक त्या ठिकाणीं राजा न दिसल्यामुळें आपापसांत बोलूं लागले कीं, 'आम्ही तेथें आलों आहों, असें राजाला कोण कळवील? राजा तर येथें दिसत नाहीं. सूर्याचा उदय झाला. बुद्धिमान अशा रामाला यौवराज्याभिषेक करण्याची सर्व तयारी सिद्ध आहे.' असें ते लोक बोलत असतां राजानें सत्कार केलेला सुमंत्र, तेथें जुळलेल्या सर्व राजांना असें बोलला कीं, "राजाच्या आज्ञेवरून हा मी त्वरेनें रामाला आणण्याकरितां निघालों. तुम्ही दशरथ राजाला पूज्य आहां. त्याहीपेक्षां रामाला जास्त पूज्य आहां. ह्याकरितां आपल्या आज्ञेवरून राजाला अशी विज्ञापना करितों कीं, 'आपल्याला सुखानें निद्रा लागली होती ना?' असें राजे, ब्राह्मण वगैरे विचारीत आहेत, व 'जागा असून बाहेर न येण्याचें कारण काय?' असें राजे वगैरे विचारीत आहेत."

असें बोलून अनुभवशील असा सुमंत्र अंतःपुराच्या दरवाजांत जाण्याकरितां निघाला. ज्या अंतःपुरांत जाण्याकरितां त्याला कधींहि परवानगी लागत नसे,

त्या अंत:पुरांत तो गेला. तेथें गेल्यावर त्यानें राजाच्या वंशाची स्तुति केली, व तेथें राजाच्या शय्यागरांत पडद्याच्या आड तो अगदीं जवळ उभा राहिला. नंतर ज्यांत गुणवर्णन आहे अशी राजाची आशीर्वादपूर्वक स्तुति करूं लागला. " हे ककुत्स्थकुलोत्पन्न राजा, चंद्र आणि सूर्य, शंकर आणि कुबेर, वरुण, अग्नि आणि इंद्र हे तुला विजय देवोत. ऐश्वर्यानें शोभणारी अशी रात्र संपली व शुभ--कारक दिवसालाहि आरंभ झाला. तेव्हां हे राजश्रेष्ठा, जागा हो व कर्तव्यकर्म करण्यास आरंभ कर. ब्राह्मण, सेनाधिपति आणि पौरजन हे सर्व येथें आले आहेत व तुला भेटण्याची इच्छा करीत आहेत. तरी तूं जागा हो. "

हें बोलणें ऐकतांक्षणीं, सुमंत्र जरी पडद्याच्या आड होता, तरी त्याच्या शब्दावरून त्यास ओळखून स्तुति करणाऱ्या आणि मसलतीमध्यें निपुण असलेल्या त्या सारथ्याला राजा म्हणाला, ' हे सुमंत्रा, मीं तुला पूर्वीं रामाला आणण्याविषयीं सांगितलें असतां पुन: माघारें येण्याचें कारण काय ? तूं माझी आज्ञा उल्लंघन कां करितोस ? ज्या वेळेस मीं तुला सांगितलें त्या वेळेस मी झोंपेंत नव्हतों. असो. आतां लवकर रामाला इकडे घेऊन ये. '

ह्याप्रमाणें दशरथ राजानें रामाला आणण्याविषयीं सूताला पुन: आज्ञा केली असतां, त्या सुमंत्रानें राजाचें बोलणें ऐकून राजाला साष्टांग नमस्कार केला, आणि हें आपणाला अत्यंत प्रिय तेंच काम मिळालें आहे, असें मानून राजाच्या गृहांतून तो बाहेर निघाला. ज्या ठिकाणीं पताका उभारिल्या आहेत अशा राजमार्गावर तो प्राप्त झाला. नंतर सर्वांगावर रोमांच उभे राहिले आहेत असा आनंदित झालेला सुमंत्र मार्गांतील शोभा पहात पहात लवकर चालला असतां, त्या ठिकाणीं त्या आनंदित झालेल्या सुमंत्रानें रामाच्या अभिषेकासंबंधीं चाललेल्या सर्व लोकांच्या कथा ऐकिल्या.

राममंदिराची शोभा.

पुढें सुंदर कैलास पर्वताप्रमाणें व इंद्रगृहाप्रमाणें शोभणारें, ज्यास मोठमोठालीं कपाटें आहेत, ज्या ठिकाणीं शेंकडों ओटे आहेत, ज्याच्या पुढें सुवर्णाच्या प्रतिमा मांडिलेल्या आहेत, ज्याच्या दरवाजाच्या बाहेर रत्नांचें व पोवळ्यांचें काम केलेलें आहे व शरदृतूंतील मेघांप्रमाणें काळे दिसणारें, मेरु पर्वताच्या गुहेसारखें भासणारें, सोन्याच्या पुष्पांच्या माळांतून मध्यें लोंबणाऱ्या अशा मोठ्या रत्नांनीं अलंकृत केलेलें, चोहोंकडे मोत्यांनीं व रत्नांनीं व्यापलेलें आणि चंदन व अगुरु ह्यांनीं भूषित केलेलें असें रामचंद्राचें गृह त्या सुमंत्राच्या दृष्टीस

पडलें. ज्यांतून उत्तम प्रकारचे सुगंध निघत आहेत अशा सुगंधि चंदन-वृक्षाला धारण करणारा मलय पर्वतच की काय असें शोभणारें, शब्द करणारे, सारस आणि मोर ह्यांनीं सुशोभित, सोन्याच्या क्रीडामृगांनीं व्याप्त असलेलें, प्रतिबिंब झालेल्या सूर्याच्या किरणांनीं व्याप्त, उत्तम तेजानें सर्व लोकांच्या मनाला व नेत्राला हरण करणारें, चंद्र आणि सूर्य ह्यांच्यासारखें भासणारें, कुबेराच्या अथवा महाप्रतापी इंद्राच्या मंदिराप्रमाणें दिसणारें, अनेक पक्ष्यांनीं व्याप्त अशा मेरूच्या शिखराप्रमाणें मोठें, जुळणाऱ्या आणि हात जोडणाऱ्या अशा लोकांनीं व्याप्त, रामाच्या अभिषेकाविषयीं उत्सुक अशा नजराणा घेऊन आलेल्या देशांतल्या लोकांनीं भूषित झालेलें, मोठ्या मेघांशीं तुल्य व प्रशस्त असणारें, अत्यंत सुशोभित असणाऱ्या अनेक रत्नांनीं व्याप्त असलेलें व दास वगैरे लोकांनीं गजबजून गेलेलें, असे श्रीरामचंद्राचें गृह त्याच्या दृष्टीस पडलें.

तो सुमंत्र, ज्यांस घोडे लाविले आहेत व जो आच्छादिलेला आहे अशा रथावर आरूढ होऊन, ज्या ठिकाणीं अति गर्दी आहे अशा मार्गाला सुशोभित करीत करीत व नगरांतल्या सर्व लोकांना आनंद देत देत रामाच्या घरीं निघाला असतां, ज्या घरांत मोर व हरीण चोहोंकडे संचार करितात अशा, व अनेक वस्तु धारण करण्यास योग्य अशा इंद्राच्या गृहाप्रमाणें शोभणाऱ्या रामाच्या समृद्ध गृहाला जाऊन तो आनंदित झाला, व त्यामुळें त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले. नंतर तो योद्धा, कैलास पर्वतासारखे शोभणारे आणि अलंकारांनीं सुशोभित केलेले असे कांहीं चौक ओलांडून, रामाच्या आज्ञेमध्यें वागणारे, रामाला अत्यंत प्रिय व श्रेष्ठ अशा बहुत द्वारपालांचें उल्लंघन करून अंतः-पुरामध्यें आला. तेव्हां त्या ठिकाणीं रामाच्या अभिषेकाकरितां खटपट करणाऱ्या लोकांच्या—ज्यांत रामाच्या कल्याणाचाच अर्थ आहे अशा—वाणींना आणि इतर जुळलेल्या लोकांच्या आनंदयुक्त वाणीला ऐकतां झाला. इंद्राच्या गृहाप्रमाणें शोभणारें, मृग आणि पक्षी हे ज्या ठिकाणीं संचार करितात असें, मेरु पर्वताच्या शिखराइतकें उंच, तेजानें अत्यंत सुशोभित दिसणारें व रमणीय असें रामाचें गृह त्यानें पाहिलें. नजराणे घेऊन येऊन आपलीं रथ वगैरे वहानें एका बाजूस ठेवून व हात जोडून उभे राहिलेल्या कोट्यवधि देशांतल्या लोकांनीं व्याप्त असें दरवाजाचें स्थलहि पाहिलें. नंतर मोठमोठाले मेघ ज्या पर्वतावर उतरले आहेत अशा पर्वताप्रमाणें दिसणारा, उन्मत्त झालेला, महा-ताला अंकुशानेंहि आवरण्यास कठीण व राम नेहमीं ज्याच्यावर बसतात, आणि

ज्याचा देह फार मोठा आहे असा शत्रुंजय नामक सुंदर हत्ती त्याच्या दृष्टीस पडला. उत्तम उत्तम अलंकारांनीं युक्त असे अश्व, गज व रथ ह्यांवर आरूढ झालेले असे मुख्य मुख्य प्रधान व राजाच्या प्रीतींतले दुसरे लोक यांना मार्गांतून एका बाजूस करून तो सुमंत्र अंतःपुरांत निघाला. नंतर पर्वताच्या शिखरावर स्थिर असणाऱ्या, मेघासारखे दिसणाऱ्या व मोठमोठाल्या विमानासारख्या गृहांनीं युक्त असलेल्या अशा रामाच्या अंतःपुरांत, ज्याप्रमाणें पुष्कळ रत्नांनीं भरलेल्या समुद्रांत मकर जातो, त्याप्रमाणें प्रतिबंधरहित गेला.

सर्ग सोळावा.

श्रीरामचंद्राचें कैकेयीमंदिराकडे गमन.

तो जुना माहितगार सारथि, लोकांची गर्दी झालेलें अंतःपुराचें द्वार ओलांडून जेथें गर्दी नाहीं अशा चौकामध्यें गेला. त्या चौकामध्यें पट्टे व धनुष्यें घेऊन उज्ज्वल कुंडलें धारण केलेले, एकाग्र अंतःकरण करून रक्षणाविषयीं दक्ष असलेले आणि राजाविषयीं उत्तम प्रकारची बुद्धि असलेले तरुण लोक होते. ह्या ठिकाणीं काषायवस्त्र परिधान करून व उत्तम प्रकारचे अलंकार धारण करून हातामध्यें राजवेत्र घेतलेले वृद्ध लोक मोठ्या दक्षतेनें स्त्रियांवर देखरेख करीत असतांना त्या सारथ्यानें द्वारामध्यें अवलोकन केलें. रामाचें प्रिय करण्याची इच्छा धरणाऱ्या त्या लोकांनीं त्या सारथ्याला येतांना पाहतांच, ते सर्व लगबगीनें आपापल्या स्थानापासून उठून उभे राहिले. तेव्हां अतिशयच सरळ रीतीनें वागणारा तो नम्र सारथि, ' सुमंत्र दारामध्यें उभा आहे, हें सत्वर रामाला सांगा ' म्हणून त्यांना म्हणाला असतां, स्वामीचें प्रिय करणारे ते वेत्रधर रामाकडे गेले, आणि भार्येसहवर्तमान असलेल्या रामाला त्यांनीं तें वृत्त निवेदन केलें. तेव्हां पित्याच्या अंतरंगांतील सारथि आला आहे, असें समजतांक्षणीं पित्याचें प्रिय करण्याची इच्छा धरून रघुवंशज रामानें त्याला तेथेंच आणविलें. नंतर कुबेराप्रमाणें उत्तम प्रकारचे अलंकार धारण करून मच्छरदाणीनें युक्त असलेल्या सुवर्णमंचकावर बसलेल्या रामाला त्या सारथ्यानें अवलोकन केलें. वराहाच्या रक्ताप्रमाणें लाल शुचि आणि सुगंधि अशा उत्कृष्ट चंदनाची उटी त्या शत्रुदमन रामाला लाविलेली होती हातामध्यें विंझोणा

घेऊन सीता समीपच उभी असल्यामुळें चित्रासंज्ञक तारेनें युक्त असलेल्या चंद्राप्रमाणें तो फारच शोभत होता. असो. स्वतःच्या तेजानें युक्त असल्यामुळें सूर्याप्रमाणें प्रकाशत असलेल्या वरप्रद रामाला विनयज्ञ व विनयशील सुमंत्रानें वंदन केलें; आणि विहार, शयन, आसन वगैरेंविषयीं राजानें ज्याचा मान राखिलेला आहे, असा तो सुमंत्र सारथि हात जोडून प्रसन्नमुख असलेल्या राजपुत्राला म्हणाला, ' रामा, तुझ्यामुळें कौसल्या सुपुत्रवती झाली आहे. आतां राणी कैकेयी-सहवर्तमान तुझा पिता तुझी भेट घेण्याची इच्छा करीत आहे. ह्यास्तव विलंब न करितां तिकडे चलावें. '

याप्रमाणें सारथ्यानें पुरुषश्रेष्ठ रामाला सांगितलें असतां त्यानें आनंदानें सुमंत्राच्या सांगण्याला मान दिला. नंतर तो सीतेला म्हणाला, " हे देवी, राजा आणि राजपत्नी कैकेयी माझ्याकरितां एके ठिकाणीं जुळून निःसंशय अभिषेकासंबंधानेंच कांहीं विचार करीत आहेत. वर्तनानें अतिशय सरळ आणि राजाचें प्रिय करण्याविषयीं तत्पर असलेली ती कृष्णनयना कैकेयी रामाचा अभिप्राय जाणून त्याला कांहीं तरी सांगत आहे. माझा उद्देश सिद्धीस नेण्याविषयीं तत्पर आणि हितावह अशा माझ्या इच्छेप्रमाणें वागणारी अशी माझी माता कैकय राजाची कन्या आनंदित होऊन महाराजाला कांहीं तरी सांगत आहे. खरोखर आपल्या प्रिय पत्नीसहवर्तमान महाराजानें माझा उद्देश व इच्छा सिद्धीस नेणारा सुमंत्र दूत पाठवून दिला, ही फार चांगली गोष्ट झाली. ज्या प्रकारची त्या ठिकाणीं सभा आहे, त्याच प्रकारचा दूत येथें आला आहे. ह्यावरून राजा मला आजच यौवराज्याचा अभिषेक करणार, हें निश्चित आहे. करितां मी आतां सत्वर येथून जाऊन भूपतीची भेट घेतों. तूं आपल्या परिवारासहवर्तमान सुखानें आनंदांत रहा. "

ह्याप्रमाणें भर्त्यानें मान राखिला असतां भर्त्याचें अभीष्ट चिंतन करणारी कृष्णनयना सीता द्वारापर्यंत त्याचे मागोमाग गेली आणि म्हणाली, ' इंद्राला अभिषेक करणाऱ्या ब्रह्मदेवाप्रमाणें राजानें राजसूययागाविषयीं आपणांकडून दीक्षा घेवविणें योग्य आहे आणि राज्यामध्यें ऋषींनीं वास्तव्य केलेलें आहे. ह्यास्तव उत्कृष्ट अजिन धारण करून व मृगशृंग हातांत घेऊन व्रतस्थ, शुचिर्भूत व दीक्षा घेतलेल्या आपणाला अवलोकन करीत असतांना मी आपली सेवा करीन. वज्रपाणी इंद्र पूर्व दिशेस आपलें पालन करो, दक्षिण दिशेस यम

आपलें रक्षण करो, पश्चिम दिशेस वरुण आपलें परिपालन करो आणि उत्तर दिशेस कुबेर आपलें संरक्षण करो. '

ह्याप्रमाणें सीतेचें बोलणें झाल्यावर अभिषेकोत्सवाकरितां मंगल केलेला राम सीतेला निरोप देऊन सुमंत्रासहवर्तमान घरांतून बाहेर निघाला, आणि गिरिकंदरां-मध्यें वास्तव्य करणारा सिंह ज्याप्रमाणें पर्वतापासून निघतो, त्याप्रमाणें घरांतून निघाल्यावर त्या रामानें द्वारामध्यें नम्र होऊन व हात जोडून स्थित असलेल्या लक्ष्मणाला अवलोकन केलें. तदनंतर त्या मधल्या चौकांत आल्यावर त्यानें आपल्या मित्र मंडळींची भेट घेतली. तेथें सर्व प्रकारचे याचक पाहिल्या-वर त्यांची भेट घेऊन व त्यांची इच्छा परिपूर्ण करून अग्नीप्रमाणें तेजस्वी आणि व्याघ्रचर्मानें परिवेष्टित अशा आपल्या सुशोभित व उत्कृष्ट रथावर तो राजकुमार आरूढ झाला. त्या रथाचा ध्वनि मेघासारखा गंभीर होता; आणि त्यामध्यें जागा विस्तीर्ण होती. रत्नांनीं व सुवर्णांनीं त्याला शृंगारिलें होतें. मेरु पर्वताप्रमाणें तेजस्वी असलेला तो रथ आपल्या प्रभेनें लोकांची दृष्टि वेधून टाकीत होता. असो. हरिसंज्ञक अश्व जोडिलेल्या रथावर आरूढ होणाऱ्या इंद्रा-प्रमाणें, लहानसे हत्तीच की काय अशा रीतीनें धिप्पाड असलेल्या उत्कृष्ट अश्वांनीं युक्त अशा आपल्या शीघ्रगामी रथावर सत्वर आरूढ होऊन राज्यलक्ष्मीनें झळकत असलेला तो रघुवंशज राम आकाशामध्यें गर्जना करणाऱ्या मेघांप्रमाणें भूप्रदेश नादित करीत चालला. तेव्हां मोठ्या मेघांतून ज्याप्रमाणें चंद्र बाहेर पडतो, त्याप्रमाणें रामाचा कनिष्ठ भ्राता वैभवशाली लक्ष्मण हातामध्यें चित्र-विचित्र दंडानें युक्त असलेले चामर घेऊन आपल्या घरांतून निघाला; आणि रथावर आरूढ होऊन पृष्ठभागानें त्यानें भ्रात्याचें रक्षण करण्याचें मनांत योजिलें असतां, त्यापुढें निघालेल्या जनसमुदायामध्यें प्रचंड आनंदध्वनि झाला. तेव्हां उत्कृष्ट अश्व व पर्वतासारखे धिप्पाड असे मुख्य मुख्य गज शेंकडों हजारों रामाच्या मागोमाग चालले, व चंदन आणि अगुरु ह्यांनीं भूषित होऊन खड्ग व धनुष्य धारण केलेले रामाचे हितैषी शूर लोक सज्ज होऊन त्याच्यापुढें चालले. मार्गामध्यें वाद्यांचे व भाटांच्या स्तुतीचे ध्वनि आणि शूरांचे सिंहनाद कानीं येऊं लागले. असा समारंभ चालला असतांना अलंकार धारण केलेल्या स्त्रिया आपापल्या घरांच्या खिडक्यांमध्यें सभोंवतीं उभ्या राहून उत्कृष्ट पुष्पांच्या राशी रामावर टाकूं लागल्या. तेव्हां ज्यांच्या अवयवांमध्यें कोठेंहि नांव ठेवण्याला जागा

नाहीं अशा स्त्रिया आपापल्या घरामध्यें बसून रामाला प्रसन्न करून घेण्याच्या उद्देशानें वंदनपूर्वक उत्कृष्ट शब्दांनीं त्याची स्तुति करूं लागल्या.

त्या म्हणाल्या:—" हे मातृप्रिय, परंपरागत चालत आलेलें राज्य तुला प्राप्त होण्याचा समय आला आहे, हें पाहून खरोखर तुझ्या कौसल्या मातेला आनंद होत आहे. सर्व स्त्रियांपेक्षां सीता श्रेष्ठ आहे, आणि रामाला ती मनापासून प्रिय आहे, असें इतर स्त्रिया समजत आहेत. चंद्राचा समागम प्राप्त होणाऱ्या रोहिणीप्रमाणें जिला रामसंयोग प्राप्त झाला, त्या सीता देवीनें खरोखर पूर्वी मोठी तपश्चर्या करून ठेविली आहे. "

ह्याप्रमाणें वाड्याच्या मनोऱ्यावर बसलेल्या स्त्रियांनीं केलेलीं प्रिय भाषणें राजमार्गामध्यें असलेल्या पुरुषश्रेष्ठ रामानें ऐकिलीं; आणि त्या नगरामध्यें आनंदमय होऊन जुळलेल्या लोकांची भाषणें व नानाप्रकारचे शब्दहि त्या रघुवंशज रामानें आपल्या संबंधानें ऐकिले. कांहीं म्हणाले, 'राजाच्या कृपेनें विपुल संपत्ति प्राप्त होण्याच्या उद्देशानें हा रघुवंशज राम आज चालला आहे. आणि हा आतां आमचा अधिपति होणार असल्यामुळें आमचे सर्व मनोरथ परिपूर्ण झाले आहेत. आतां बहुतकालपर्यंत ह्याला हें राष्ट्र प्राप्त होणार आहे, हा ह्या लोकांना एक लाभच आहे. कारण, या राजाच्या कारकीर्दीमध्यें कोणत्याहि मनुष्याला दुःख पाहाण्याची पाळी येणार नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु कोणालाहि कसल्याहि प्रकारची अप्रिय गोष्ट अनुभवण्याचा प्रसंग येणार नाहीं. '

ह्याप्रमाणें लोकांचीं संभाषणें चाललीं असतांना व डंक्याचे घोडे आणि हत्ती ह्यांसहवर्तमान पुढें चाललेले जयजयकार करणारे भाट व स्तुति करणारे वंशपाठक प्रोत्साहन देत असतांना श्रेष्ठ स्तुतिपाठक ज्याची स्तुति करीत आहेत, अशा कुबेराप्रमाणें राम जाऊं लागला असतां राजमार्ग त्याच्या दृष्टीस पडला. तो राजमार्ग हत्तिणी, हत्ती, रथ आणि अश्व ह्यांनीं गजबजून गेलेला होता. मोठमोठ्या लोकसमुदायांनीं त्यांतील पटांगणें भरून गेलेलीं होतीं. नानाप्रकारच्या उत्कृष्ठ वस्तु त्या ठिकाणीं होत्या, आणि अनेक प्रकारचे विक्रीचे पदार्थ त्या ठिकाणीं जुळवून ठेविलेले होते.

सर्ग सतरावा.

श्रीरामाचा कैकेयीमंदिरीं प्रवेश.

तो राम रथावर आरूढ होऊन जाऊं लागला असतां त्याच्या मित्रमंडळींना फारच आनंद झाला. त्या वैभवशाली रामानें, मोठमोठ्या मौल्यवान अगुरूंचे ज्या ठिकाणीं धूप जळत आहेत व ज्यामध्यें जिकडे तिकडे पताका व ध्वज उभारलेले आहेत, असें नगर अवलोकन केलें; आणि ज्याच्या मध्यभागीं अगुरूंचा धूप चाललेला आहे व अभ्रतुल्य श्वेत गृहांनीं ज्याला शोभा आलेली आहे, अशा राजमार्गानें तो चालला. उत्कृष्ट चंदन व अगुरु, उत्तम सुगंधी द्रव्यें, आणि ताग व रेशीम यांचीं वस्त्रें, यांच्या समुदायांनीं, सच्छिद्र मोत्यांनीं व उत्कृष्ठ स्फटिकांनीं त्या उत्कृष्ठ व विस्तीर्ण राजमार्गाला शोभा आलेली असून नानाप्रकारचीं पुष्पें आणि उच्च नीच खाद्य पदार्थ यांनीं तो मार्ग आच्छादिलेला होता. दहीं, अक्षता, घृत, लाह्या, अगुरु व चंदन ह्यांचे धूप आणि नानाप्रकारचीं पुष्पें व सुगंधी द्रव्यें यांच्या योगानें त्या राजमार्गांतील पटागणें भूषित केलेलीं होतीं. असो.

अशा प्रकारच्या राजमार्गांतून अनेक लोकांनीं उच्चारिलेले अनेक आशीर्वाद श्रवण करीत करीत आणि सर्व लोकांना योग्यतेप्रमाणें मान देत देत तो राम चालला. तेव्हां वृद्ध लोक त्याला म्हणाले, " आज अभिषेक झाल्यावर तूं आजापणजांनीं चालविलेल्या मार्गाचें अवलंबन करून प्रजांचें परिपालन कर; आणि ज्याप्रमाणें तुझ्या पित्यानें व तुझ्या सर्व पूर्वजांनीं आमचें पोषण केलें, त्याप्रमाणें तूं आमचें पोषण कर, म्हणजे तुज रामराजाचे कारकीर्दीमध्यें आम्ही पूर्वींपेक्षांहि अधिक सुखानें राहूं. आज घरांतून बाहेर निघालेला हा राम राज्यावर बसलेला जर दृष्टीस पडेल, तर आम्ही ऐहिक विषयसुखाची व पारमार्थिक साधनांचीहि पर्वा करणार नाहीं. कारण, अत्यंत तेजस्वी रामाच्या राज्याभिषेका-पेक्षां दुसरी कोणतीहि गोष्ट आम्हांला अधिक प्रिय होणार नाहीं. "

ह्या व अशाच प्रकारच्या स्वतःच्या प्रशंसेसंबंधानें मित्रांच्या शुभ कथा श्रवण करीत करीत उदासीन वृत्तीनें असलेला राम राजमार्गानें चालला. असो. राम दूर जरी गेला, तरी कोणीहि पुरुष आपलें मन अथवा दृष्टि त्याच्यापासून परावृत्त करण्यास समर्थ झाला नाहीं. ज्यानें त्या वेळीं रामाला अवलोकन केलें नाहीं, आणि ज्याच्याकडे रामाची दृष्टि गेली नाहीं, त्याची सर्व लोकांमध्यें

निंदा होऊन त्यानें स्वतःहि आपली निंदा करून घेतली. चारी वर्णांतील सर्वहि लोकांचे ठिकाणीं तो त्यांच्या वयोमानानुरूप दया करीत असे; आणि त्यामुळें ते सर्वहि त्याच्या मनाप्रमाणें वागत असत. चौक, देवालयांचे मार्ग, प्रसिद्ध वृक्ष आणि देवस्थानें यांना उजवी घालीत घालीत तो राजकुमार गेला. राजवाड्यापाशीं आल्यानंतर इंद्राच्या निवासस्थानाप्रमाणें पृथ्वींतील श्रेष्ठ गृह जें पित्याचें निवासस्थान, त्यामध्यें तो राज्यलक्ष्मीनें झळकत असलेला राजपुत्र प्रविष्ठ झाला. त्या राजवाड्याचीं अनेक शुभ शिखरें मेघपटलाप्रमाणें मोठीं असून कैलास पर्वताच्या शिखरासारखीं उंच होतीं. आकाशाला वेष्टून टाकणाऱ्या श्वेतवर्ण विमानाप्रमाणें असलेलीं व रत्नसमुदायांनीं भूषित केलेलीं क्रीडास्थानें त्या राजवाड्यासभोंवतीं होतीं. पित्याच्या निवासस्थानाला गेल्यानंतर धनुर्धारी पुरुषांचा जेथें पहारा आहे, असे तीन चौक अश्वांसह वर्तमानच ओलांडून जाऊन तो पुरुषश्रेष्ठ दुसरे दोन चौक पायांनीं चालून गेला. ह्याप्रमाणें सर्व चौक ओलांडिल्यावर तो दशरथपुत्र राम सर्व लोकांना परत फिरवून अंतःपुरामध्यें प्रविष्ठ झाला. तो राजकुमार पित्याच्या अंतःपुरांत प्रविष्ठ झाल्यानंतर बाहेरील सर्व लोक आनंदित झाले. नंतर सागर ज्याप्रमाणें चंद्रोदयाची वाट पहात बसतो, त्याप्रमाणें तो राम त्या अंतःपुरांतून बाहेर पडण्याची ते वाट पहात बसले.

सर्ग अठरावा.

रामकैकेयीसंवाद.

अंतःपुरांत गेल्यानंतर आपला पिता दुःखित व दीन झाला असून त्याचें मुख निस्तेज झालें आहे आणि कैकेयीसहवर्तमान तो मंचकावर आहे, असें त्या रामानें अवलोकन केलें. तेव्हां प्रथम रामानें पित्याच्या चरणांना नम्रपणें अभिवंदन केलें. नंतर स्वस्थांतःकरणपूर्वक त्यानें कैकेयीचे चरणीं वंदन केलें. ह्यानंतर दशरथ राजा 'राम' एवढींच अक्षरें बोलून स्वस्थ राहिला. कारण अश्रूंनीं डोळे भरून आल्यामुळें व स्वतः दुःखित झाल्यामुळें त्याच्यानें रामाशीं अधिक बोलवेना व वर तोंड करूनहि पाहवेना. तेव्हां राजाची ती भयकारक अपूर्व मुद्रा अवलोकन करून, सर्पाला पादस्पर्श केल्याप्रमाणें रामहि भयभीत झाला. कारण इंद्रियें खिन्न होऊन त्या महाराजाचें अंतःकरण क्षुब्ध

व व्याकुल झालेलें होतें. शोक व संताप ह्यांनीं तो अगदीं जर्जर झालेला होता. स्वभावत: क्षोभरहित असूनहि लाटांनीं भरलेल्या सागराप्रमाणें तो क्षुब्ध झालेला होता. ग्रहण लागलेल्या सूर्याप्रमाणें त्याची अवस्था झालेली होती. अनृत भाषण केलेल्या ऋषीप्रमाणें त्याचें तेज नाहींसें झालेलें होतें. तेव्हां अत्यंत असंभवनीय अशा प्रकारचा तो शोक राजाला होण्याचें कारण काय, ह्याचा राम विचार करूं लागला असतां, पर्वदिवशीं अधिक क्षुब्ध होणाऱ्या समुद्राप्रमाणें तोहि पूर्वीपेक्षां अधिकच क्षुब्ध झाला. नंतर पित्याचें हित करण्याविषयीं तत्पर असलेल्या चतुर रामानें मनामध्यें आणिलें कीं, "आजच हा राजा मला अवलोकन करून माझें अभिनंदन कां करीत नाहीं? पिता जरी क्रुद्ध झाला असला, तरी मला अवलोकन करितांक्षणीं तो प्रसन्न होतो, असा नेहमींचा अनुभव आहे. तेव्हां आजच मला अवलोकन करूनहि त्याला प्रसन्न होण्याला काय आयास पडत आहेत!"

ह्यानंतर शोकाकुल झाल्यामुळें मुख खिन्न व निस्तेज होऊन राम दीनाप्रमाणें कैकेयीला अभिवंदन करून म्हणाला, "ज्या अर्थीं माझा पिता क्रुद्ध झाला आहे, त्या अर्थीं अज्ञानानें माझ्या हातून कांहीं अपराध घडला नाहीं ना? हें तूं मला सांग, आणि तूंच ह्याला प्रसन्न कर. माझ्याविषयीं नेहमीं दयाळु असलेल्या पित्याचें मन आजच कां बरें प्रसन्न नाहीं? खिन्न वदन होऊन व दीन होऊन ज्या अर्थीं तो माझ्याशीं बोलत नाहीं, त्या अर्थीं त्याचें मन प्रसन्न नाहीं हें निश्चित आहे. ह्याला कांहीं शारीरिक तापाची अथवा मानसिक व्याधीची पीडा झाली आहे कीं काय? कारण नेहमीं सुख असणें दुर्लभ आहे. ज्याचें दर्शन प्रिय आहे असा राजकुमार भरत, महाधैर्यवान शत्रुघ्न, माझ्या माता आणि मी ह्यांपैकीं कोणाचे ठिकाणीं त्याला कांहीं वाईट दिसून येत आहे कीं काय? राजा जर क्रुद्ध झाला असला, तर त्या महाराजाला संतुष्ट केल्यावांचून अथवा त्या पित्याच्या आज्ञेप्रमाणें वागल्यावांचून मी एक क्षणभरहि जिवंत राहण्याची इच्छा करीत नाहीं. ज्याच्यापासून आपला जन्म झाला हें समजत आहे, तें प्रत्यक्ष दैवत असतांना त्याच्या मनाप्रमाणें कोणता बरें पुरुष वागणार नाहीं? ज्या अर्थीं ह्यांचें मन कलुषित झालें आहे, त्या अर्थीं गर्वाच्या जोरावर रागारागानें तूं माझ्या पित्याला कांहीं कठोर भाषण केलें आहेस कीं काय, हें मीं तुला विचारीत आहें. तर हे देवि, तूं हें मला खरें खरें सांग. राजाचे ठिकाणीं हा अपूर्व विचार दृष्टोत्पत्तीस येण्याचें काय कारण असावें बरें?"

ह्याप्रमाणें महात्मा रघुवंशज राम बोलला असतां, अत्यंत निर्लज्ज बनलेली कैकेयी रामाला आपल्या हिताचें व उद्धटपणाचें भाषण करूं लागली कीं, "रामा, राजा क्रुद्ध झालेला नाहीं व ह्याच्यावर कांहीं संकटहि आलेलें नाहीं. ह्याच्या मनामध्यें कांहीं गोष्ट आहे; परंतु तुझ्या भीतीमुळें त्याच्यानें ती बोलवत नाहीं. सारांश, तूं ह्याला प्रिय असल्यामुळें तुझ्याशीं अप्रिय भाषण करण्याला ह्याची वाणी प्रवृत्त होत नाहीं. परंतु ह्यानें जें मला वचन दिलें आहे, तें तुला अवश्य शेवटास नेलें पाहिजे. ह्यानें आधीं मला वर देऊ करून त्यांच्या योगानें माझा मानहि राखिला; आणि नंतर हा राजा आतां एखाद्या प्राकृत जनाप्रमाणें पश्चात्ताप करीत बसला आहे. ह्या प्रजाधिपतीनें 'वर देईन' म्हणून जर माझ्याशीं प्रतिज्ञा केली आहे, तर आतां ह्याचें पश्चात्तापांत पडणें म्हणजे पाणी निघून गेल्यावर बांध घालण्याची ह्यानें इच्छा करण्याप्रमाणेंच निरर्थक आहे. हे रामा, सत्य हेंच धर्माचें मूल आहे, हेंच सज्जनांना विदित व अभिमत आहे. ह्यास्तव तुझ्याकरितां हा राजा क्रुद्ध होऊन त्या सत्याचा त्याग करणार नाहीं, अशी तूं व्यवस्था कर. जें सांगण्याचा राजाचा उद्देश आहे, तें शुभ अथवा अशुभ असो, तूं जर शेवटास नेणार असशील, तर मीहि पुनरपि तें तुला सांगेन. सारांश, राजाच्या अनुमतीनें मी जें तुला सांगेन, त्याप्रमाणें वागण्यास तूं जर तयार असशील तर मी तुला सांगेन. ह्याला तुझ्याशीं बोलवणार नाहीं."

हें कैकेयीनें केलेलें भाषण श्रवण करून दुःखित झालेला राम राजाचे सन्निध त्या राजभार्येला म्हणाला, "देवि, तुला धिक्कार असो. मला उद्देशून अशा प्रकारचें भाषण करणें तुला योग्य नाहीं. मी राजाच्या सांगण्यावरून अग्नीमध्येंहि उडी घालीन; तीक्ष्ण विषहि भक्षण करीन; अथवा गुरु, पिता, राजा, आणि माझ्या हितविषयीं तत्पर असलेल्या ह्यानें आज्ञा केली असतां मी सागरांतहि लोटून घेईन. तस्मात् हे देवि, जें कांहीं राजाच्या मनांत असेल तें सांग. मी तें शेवटास नेण्याची प्रतिज्ञा करीत आहें. राम दोनदां भाषण करीत नसतो."

ह्याप्रमाणें राम म्हणाला असतां सरळ रीतीनें वागणाऱ्या त्या सत्यवादी रामाला ती दुष्ट कैकेयी अत्यंत कठोर शब्दांनीं म्हणाली, "हे राघवा, पूर्वीं देव-दैत्यांच्या युद्धामध्यें ह्याला शल्य लागलें असतां तें काढून मीं ह्याचें रक्षण केलें. तेव्हां त्या महासंग्रामामध्यें ह्या तुझ्या पित्यानें मला दोन वर देऊ केले होते. भरताला राज्याभिषेक आणि तुझें आजच्या आज दंडकारण्यामध्यें गमन.

म्हणून ते दोन वर देण्याविषयीं मी राजाची प्रार्थना केली आहे. तस्मात् पित्याची व आपली प्रतिज्ञा खरी करण्याची जर तुला इच्छा असेल, तर हें माझें भाषण ऐक पित्यानें केलेली प्रतिज्ञा शेवटास नेण्याविषयीं तूं तत्पर हो. सारांश, ह्या तुझ्या पित्यानें मला वर देऊं केल्याप्रमाणें तुला चौदा वर्षें अरण्यामध्यें गेलें पाहिजे, आणि तुझ्याकरितां जी ही अभिषेकसामुग्री राजानें जुळविली आहे, त्या सर्व सामुग्रीच्या योगानें भरताला अभिषेक झाला पाहिजे. तात्पर्य, ह्या राज्याभिषेकाचा त्याग कर, आणि जटा व वल्कलें धारण करून तूं चौदा वर्षेंपर्यंत दंडकारण्याच्या आश्रयानें रहा. नानाप्रकारच्या रत्नांनीं परिपूर्ण आणि अश्व व रथ ह्यांनीं भरलेल्या ह्या कोसलदेशाधिपतीच्या पृथ्वीचें भरताला परिपालन करूं दे. अशा प्रकारचे दोन वर ह्यानें मला दिले आहेत. त्यामुळें दयेनें गहिंवरून गेलेला आणि म्हणूनच शोकामुळें खिन्नवदन झालेला हा राजा तुझ्याकडे पहाण्यास समर्थ होत नाहीं. तस्मात्, हे रघुनंदना रामा, हें राजानें दिलेलें वचन तूं शेवटास ने, आणि ह्या मोठ्या सत्यानें तूं राजाला तार."

ह्याप्रमाणें ती कैकेयी कठोर भाषण करीत असतांना रामाला वाईट वाटलें नाहीं; परंतु महाप्रभावी दशरथ राजा हा येणाऱ्या पुत्रवियोगरूप संकटामुळें संतप्त होऊन फारच दुःखित झाला.

सर्ग एकोणिसावा.

रामकैकेयी संवाद (पुढें चालू.)

शत्रूंचा घात करणारा राम तें मरणतुल्य दुःसह भाषण श्रवण करूनहि दुःखित न होतां कैकेयीला म्हणाला, "असें होण्याला मी जटा व वल्कलें धारण करून, राजाची प्रतिज्ञा शेवटास जावी ह्या उद्देशानें येथून वनामध्यें वास्तव्य करण्याकरितां जातों; परंतु ज्याच्यासमोर जाण्याची इतरांना भीति वाटते, असा हा शत्रूंचें दमन करणारा भूपति पूर्वीप्रमाणें माझें अभिनंदन कां करीत नाहीं, हें समजण्याची माझी इच्छा आहे. हे देवि, तूं क्रुद्ध होऊं नको. तूं प्रसन्न हो. मीं तुझ्या समक्ष वल्कलें व जटा धारण करून वनामध्यें जाईन. मित्र, गुरु, पिता आणि कृतज्ञ राजा असा हा मला आज्ञा करूं लागला असतां मी निःशंक होऊन ह्याला प्रिय असलेली कोणती बरें गोष्ट करणार नाहीं?

परंतु भरताला अभिषेक करण्याविषयीं राजानें मला स्वत: सांगितलें नाहीं, हें एक दु:ख माझ्या मनामध्यें आहे, व तें माझ्या अंत:करणाला जाळीत आहे. फक्त तूं जरी मला सांगितलेंस, तरी सीता, राज्य, प्रिय प्राण व संपत्ति मी आनंदानें भ्रात्या भरताला स्वत: देईन. तेव्हां तुझें प्रिय करण्याचा उद्देश धरून पित्या भूपतीनें स्वत: आज्ञा केली असतां स्वत:ची प्रतिज्ञा शेवटास नेण्याकरितां मी ही गोष्ट करीन, ह्यांत काय संशय आहे! आतां स्वत: ही गोष्ट मला सांगण्याचा संकोच वटात असल्यामुळें खालीं मान घालून बसलेल्या ह्या राजाला तूं धीर दे. हा भूपति खालीं मान घालून कां बरें हळू हळू रुदन करीत आहे? महावेगवान अश्वावर आरूढ होऊन राजाच्या आज्ञेनें भरताला मातुलगृहाहून आणण्याकरितां आजच दूत जाऊं द्या. पित्यानें केलेली आज्ञा युक्त आहे अथवा अयुक्त आहे. ह्याचा विचार न करितां हा मी चौदा वर्षेंपर्यंत वास्तव्य करण्याच्या उद्देशानें दंडकारण्यामध्यें सत्वर चालता होतों."

ह्याप्रमाणें रामाचें तें भाषण श्रवण केल्यावर कैकेयीला आनंद झाला, आणि राम आतां खचित जाणार असा विश्वास वाटून ती त्याला गमन करण्याविषयीं त्वरा करूं लागली, आणि म्हणाली, "असें होऊं दे. महावेगवान अश्वावर आरूढ होऊन भरताला मातुलगृहाहून येथें आणण्याकरितां दूत लोक जातील; परंतु रामा, वनांत जाण्याविषयीं उत्सुक झालेल्या तुला आतां विलंब लावणें मला योग्य दिसत नाहीं. तस्मात्, तूं येथून सत्वर वनामध्यें चालतां हो. हे पुरुषश्रेष्ठा रामा, लज्जित झाल्यामुळें राजाला स्वत: ही गोष्ट तुला सांगतां येत नाहीं, यांत कांहीं विशेष नाहीं. तूं आतां विलंब न करितां वनामध्यें चालता होऊन ह्याचा कोप नाहींसा कर. रामा, जोंपर्यंत ह्या नगरापासून तूं अति त्वरा करून वनामध्यें गेला नाहींस, तोंपर्यंत तुझा पिता स्नान अथवा भोजन कांहींएक करणार नाहीं."

हें कैकेयीचें भाषण श्रवण केल्यावर, 'धिक्कार असो! काय रे दु:खाचा प्रसंग हा!' असें म्हणून शोकाकुल झालेला राजा दु:खाचे सुस्कारे टाकूं लागला, आणि त्या सुवर्णभूषित मंचकावर मूर्च्छित होऊन पडला. नंतर रामानें दशरथ राजाला सावध केलें, आणि कैकेयीनें पुनरपि सांगितलें असतां चाबकानें मारलेल्या घोड्याप्रमाणें वनांत जाण्याविषयीं त्यानें त्वरा केली. अप्रिय व परिणामीं भयंकर असें तें दुष्ट कैकेयीचें भाषण श्रवण करूनहि कांहीं एक दु:ख न झालेला राम कैकेयीला म्हणाला, "हे देवि, मी संपत्तीची आशा

धरून ह्या लोकामध्यें वास्तव्य करण्याचें इच्छित नाहीं. मीं ऋषींप्रमाणें निर्मळ धर्माचें अवलंबन करून राहिलों आहें, हें तूं समजून ठेव. या राजाचें जें कांहीं प्रिय करणें मला शक्य असेल, तें सर्व प्रकारचें प्रिय प्राणत्याग करूनहि केलेंच, असें तूं समज. कारण पित्याची शुश्रूषा करणें अथवा त्याच्या आज्ञेप्रमाणें वागणें ह्यापेक्षां कोणतेंहि धर्माचरण श्रेष्ठ नाहीं. जरी ह्यानें मला सांगितलें नाहीं, तरी तुझ्या सांगण्यावरून मी निर्जन वनामध्यें चौदा वर्षेंपर्यंत वास्तव्य करीन. हे कैकेयि, स्वामिणीपेक्षांहि तूं मला अधिक असतांना ज्या अर्थी तूं राजापाशीं ही गोष्ट काढिलीस, त्या अर्थी माझे ठिकाणीं कांहींच चांगुलपणा तुला दिसत नाहीं काय? मातेचा निरोप घेऊन सीतेची समजूत घालीपर्यंत तूं धीर धर. हें झाल्यावर मी आजच्या आजच भव्य अशा दंडकारण्यामध्यें चालता होईन. भरत राज्याचें परिपालन करून पित्याच्या शुश्रूषेमध्यें तत्पर राहील, अशी तूं व्यवस्था कर. कारण पित्याची शुश्रूषा करणें हा सनातन धर्म आहे."

हें रामाचें भाषण श्रवण केल्यावर, अतिशयच दुःखित झालेला पिता दशरथ शोकामुळें बोलण्यास समर्थ न होतां मोठ्या स्वरानें रुदन करूं लागला. तेव्हां मूर्च्छित झालेल्या पित्याच्या चरणांना वंदन करून आणि दुष्ट कैकेयीच्याहि चरणांना वंदन करून महातेजस्वी राम तेथून निघाला. पित्याला व कैकेयीला प्रदक्षिणा करून त्या अंतःपुरांतून निघाल्यावर रामानें आपल्या मित्रमंडळींना अवलोकन केलें. राम अंतःपुरांतून बाहेर निघाल्यावर, अश्रूंनीं नेत्र भरून आलेला व सुमित्रेचा आनंद वृद्धिंगत करणारा लक्ष्मण अत्यंत क्रुद्ध होऊन त्याच्या मागोमाग चालला. अभिषेकाकरितां जुळविलेल्या सामुग्रीला प्रदक्षिणा करून तिकडे दृष्टि न देतां वनांत जाण्याची अपेक्षा धरून राम हळूहळू चालूं लागला. अक्षय कांतीनें युक्त असलेल्या चंद्राची शोभा ज्याप्रमाणें क्षयानें कमी होत नाहीं, त्याप्रमाणें एकाएकीं राज्याला मुकण्यानें रामाचे ठिकाणीं स्वाभाविकच असलेलें मोठें सौंदर्य कमी झालें नाहीं. जीवन्मुक्ताचे ठिकाणीं ज्याप्रमाणें चित्तविकार दृष्टोत्पत्तीस येत नाहींत, त्याप्रमाणें पृथ्वीचा त्याग करून वनामध्यें जाण्यास उद्युक्त झालेल्या रामाचे ठिकाणीं कांहींएक मनोविकार दृष्टोत्पत्तीस आला नाहीं. शुभ छत्र व चांगल्या प्रकारें भूषित केलेलीं चामरें टाकून देऊन, स्वजन, रथ व पौरजन ह्यांचा निरोप घेऊन, मनामध्यें दुःख आंवरून धरून, आणि इंद्रियांचें संयमन करून तो विचारी राम ती अप्रिय गोष्ट मातेला विदित करण्याच्या उद्देशानें तिच्या गृहामध्यें प्रविष्ट झाला.

तेव्हां अभिषेकोत्सवाकरितां भूषणें धारण करून सभोंवतीं जमलेल्या लोकांना श्रीमान व सत्यवादी रामाच्या मुखावर कसलाहि विकार दिसला नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु उज्ज्वल किरणांनीं युक्त झालेला शरदृतूंतील चंद्र ज्याप्रमाणें आपलें तेज सोडीत नाहीं, त्याप्रमाणें त्या जितेंद्रिय व महापराक्रमी रामानें आपल्या स्वाभाविक धैर्याला उचित असलेला हर्ष सोडिला नाहीं. असो. मधुर वाणीनें सर्व लोकांचा मान राखीत राखीत तो धर्मात्मा व यशस्वी राम मातेचे समीप गेला असतां, गुणांनीं त्याची साम्यता पावलेला महापराक्रमी भ्राता लक्ष्मणहि आपलें दुःख आवरून धरून त्याच्या मागोमाग चालला. मातेच्या गृहामध्यें प्रविष्ट झाल्यावर, तें गृह अत्यंत आनंदित झालेलें आहे, असें अवलोकन करून व प्राप्त झालेली ऐश्वर्यहानीहि लक्ष्यांत घेऊन कौसल्या, दशरथ वगैरे सुहृदांना कदाचित प्राणांतिक दुःख होईल, असा विचार मनांत आल्यामुळें रामानें कोणताहि विकार दर्शविला नाहीं.

सर्ग विसावा.

श्रीरामाचें कौसल्यामंदिरीं गमन.

तो पुरुषश्रेष्ठ राम हात जोडून बाहेर जाऊं लागला असतां अंतःपुरामध्यें स्त्रियांनीं एकच कल्होळ करून सोडिला. "सर्व अंतःकरणाचा आश्रय आणि रक्षणकर्ता जो राम, तो पित्यानें सांगितलें नसूनहि आज वनवासाला जाणार आहे. जननी कौसल्या हिच्या सेवेविषयीं जसा राम तत्पर असतो, तसाच आम्हांविषयींहि तो जन्मापासून तत्पर आहेच. कोणीं शिव्या दिल्या असतांहि जो रागावत नाहीं, आणि दुसऱ्याला क्रोध येण्याचीं कारणें सोडून देऊन जो नेहमीं क्रुद्ध झालेल्यांना प्रसन्न करून घेत असतो, तो राम आज प्रवासाला जाणार. प्राणिमात्रांचें आश्रयस्थान असलेल्या रामाचा त्याग करणारा आमचा हा राजा खरोखर अविचारी असून प्रजा भक्षण करण्यास उद्युक्त झाला आहे."

सारांश, वत्सरहित झालेल्या गायीप्रमाणें ज्यांची स्थिति झाली आहे, अशा त्या सर्व राजस्त्रिया पतीची निंदा करून मोठमोठ्यानें आक्रोश करूं लागल्या. तेव्हां अंतःपुरांत झालेल्या दुःखित जनांचा तो घोर शब्द श्रवण केल्यावर पुत्रशोकानें संतप्त झालेला राजा मंचकांत डोकें खुपसून पडला; परंतु स्वजनांना दुःख झाल्यामुळें अत्यंत खिन्न झालेला मनोनिग्रही राम हत्तीप्रमाणें फुसकारे

टाकीत आल्या लक्ष्मणासहवर्तमान मातेच्या अंतःपुरामध्यें गेला, तों अत्यंत वृद्ध असा एक पुरुष त्या अंतःपुराच्या द्वाराशीं बसलेला असून इतर पुष्कळ लोक उभे आहेत, असें त्याच्या दृष्टीस पडलें. ते सर्व लोक राम दृष्टीस पडतांक्षणीं उभे राहिले, आणि विजयी व श्रेष्ठ अशा रघुवंशज रामाचा जयजयकार करूं लागले. एका चौकांतून गेल्यावर दुसऱ्या चौकामध्यें राजानें मानमान्यता राखिलेले असे वैदिक वृद्ध ब्राह्मण त्यानें अवलोकन केले. त्या वृद्धांना प्रणाम करून निघाल्यावर तिसऱ्या चौकामध्यें लहानथोर स्त्रिया द्वाररक्षणाविषयीं तत्पर असलेल्या त्याच्या दृष्टीस पडल्या. रामाला अवलोकन केल्यावर त्या स्त्रियांनीं आनंदित होऊन त्याला आशीर्वाद दिले, आणि घरांत जाऊन राममातेला ती प्रिय गोष्ट त्यांनीं सत्वर निवेदन केली. राजपत्नी कौसल्येनें रात्रीं स्वस्थ राहून पुत्राचें हित व्हावें, या उद्देशानें प्रभातसमयीं विष्णूची पूजा केली, आणि सोंवळ्याचें वस्त्र नेसून, समंत्रक स्वस्तिवाचन झालेली व नेहमीं आनंदित व व्रतस्थ असणारी ती कौसल्या अग्नीमध्यें हवन करीत बसली होती. मातेच्या शुभ अंतःपुरामध्यें प्रविष्ट झाल्यावर, त्या ठिकाणीं माता अग्नीमध्यें ऋत्विजांकडून होम करवीत आहे, असें रामाच्या दृष्टीस पडलें. देवकार्याकरितां दधि, अक्षता, घृत, मोदक आणि दवि हीं द्रव्यें तेथें सिद्ध ठेविलेलीं त्यानें अवलोकन केलीं. लाह्या, श्वेत पुष्पें, पायस, तिलमिश्रित चरु, समिधा व जलपूर्ण कुंभ हीं त्या रघुनंदन रामानें अवलोकन केलीं. व्रताचरणानें कृश झालेली आपली माता इष्ट हेतु सिद्धीस नेण्याच्या उद्देशानें पांढरी पैठणी नेसून देवतेचें तर्पण करीत आहे, असें रामानें अवलोकन केल्यावर, मातेला आनंद देणारा पुत्र आलेला पाहून, घोडी ज्याप्रमाणें शिंगराकडे वळते, त्याप्रमाणें ती आनंदानें रामाचें संमुख आली. तेव्हां आपल्याकडे आलेल्या मातेला रामानें अभिवंदन केल्यावर तिनेंहि त्याला हातांनीं कवटाळून धरून त्याचें मस्तक हुंगलें. ती कौसल्या आपल्या अजिंक्य रघुवंशज पुत्राला प्रिय आणि हितावह शब्दांनीं पुत्रप्रेमामुळें म्हणाली, ' वृद्ध आणि धर्मनिष्ठ अशा महात्म्या राजर्षींचें आयुष्य, कीर्ति आणि कुलाला उचित असा धर्म हीं तुला प्राप्त होवोत. राघवा, पहा तुझा पिता भूपति कसा सत्यवचनी आहे तो ! तो धर्मात्मा आजच तुला यौवराज्याचा अभिषेक करील. आतां तूं येथेंच भोजन करून राजदर्शनाला जा. '

रामगमनामुळें कौसल्येचा विलाप.

असें म्हणून कौसल्येनें रामाला आसन दिलें; परंतु त्याव न बसतां केवल

स्पर्श करून व जोडलेले हात थोडेसे पुढें करून राम मातेशीं भाषण करूं लागला. सारांश, स्वभावतःच विनयी आणि मातेचे ठिकाणीं पूज्यबुद्धि असल्यामुळें अधिकच नम्र झालेला आणि दंडकारण्यामध्यें निघालेला तो राम मातेचा निरोप घेऊं लागला कीं, " हे देवी, खरोखर तुला कांहीं माहीतच नाहीं काय? तूं, विदेहराजकन्या आणि लक्ष्मण ह्यांच्या दुःखाकरितां हें एक मोठें भय उपस्थित झालें आहे मी दंडकारण्यामध्यें जाणार! मला ह्या आसनाचा काय उपयोग? आतां हा दर्भासनावर बसण्याचा समय मला प्राप्त झाला आहे. मी आतां मुनींप्रमाणें मिष्टान्न वर्ज करून कंद, मुळें व फळें ह्यांवर उपजीविका करीत चौदा वर्षेंपर्यंत निर्जन वनामध्यें वास्तव्य करणार. महाराज भरताला यौवराज्य देत असून मला गरिबाला दंडकारण्यामध्यें हांकून लावीत आहेत. तस्मात्, चौदा वर्षेंपर्यंत फलमूलांवर उपजीविका करून आणि वानप्रस्थांना योग्य अशा कर्मांचें अवलंबन करून मी चौदा वर्षें निर्जन वनामध्यें वास्तव्य करणार. "

पुत्राचे हे शब्द ऐकून कुऱ्हाडीनें तोडिलेली साल-वृक्षाची फांदी-जशी वनामध्यें पडते, तशी स्वर्गांतून च्युत झालेल्या देवतेप्रमाणें ती राजपत्नी कौसल्या एकाएकीं भूमीवर पडली. तेव्हां दुःख भोगण्याची संवय नसलेली आपली माता मूर्च्छित होऊन केळीप्रमाणें पडलेली अवलोकन केल्याबरोबर रामानें तिला उठविलें, आणि पूर्वी भार वाहून थकवा आल्यावर त्याचा परिहार करण्याकरितां भूमीवर लोळून उठलेल्या घोडीप्रमाणें सर्वांग धुळीनें भरलेल्या त्या दीन मातेला त्यानें हस्तानें स्पर्श केला. तेव्हां सुखाची संवय झालेली असून दुःखाकुल झालेली ती कौसल्या लक्ष्मण ऐकत असतांना समीप बसलेल्या पुरुषश्रेष्ठ रामाला म्हणाली, " हे राघवा, माझ्या शोकाकरितां जर तूं उत्पन्न झाला नसतास, तर मी वंध्या आहे ह्यापेक्षा अधिक दुःख पहाण्याची मला पाळी आली नसती. वंध्या स्त्रीच्या मनाला 'मी वंध्या आहे' येवढेंच वाईट वाटत असतें. तिला दुसरें कसलेंहि दुःख नसतें. रामा, पतीच्या प्रेमामुळें होणारें सुख आजपर्यंत मला जरी प्राप्त झालें नाहीं, आणि माझी उत्कृष्ठ वस्त्रांची वगैरे हौस जरी मला आजपर्यंत पुरवून घेतां आली नाहीं, तरी माझ्या पुत्राच्या कारकीर्दीमध्यें ह्या गोष्टी मला पाहावयास सांपडतील, असा विचार करून मीं आजपर्यंत कुडींत प्राण धरून राहिलें आहें. तेव्हां जिनें असे दिवस काढिले, तिला कनिष्ठ सवतींच्या मर्जीमध्यें राहून अंतःकरणाला घरें पाडणारीं भाषणें

ऐकून घेण्याचा आतांहि प्रसंग येणार. अरे, मला अशा प्रकारचा अक्षय शोक व विलाप करीत बसण्याचा प्रसंग आलेला आहे. ह्यापेक्षां स्त्रियांना अधिक दुःखदायक अशी कोणती बरें गोष्ट आहे? अरे, तूं जवळ असतांनाहि जर माझी सवत असा अपमान करीत असते, तर बाबा, तूं वनामध्यें गेल्यावर मला मरण येणार, हेंच निश्चित आहे. भर्त्याची मर्जी माझ्यावर कधींच नसल्या-मुळें कैकेयीच्या दासीप्रमाणें अथवा दासीपेक्षांहि कमी समजून माझा अतिशय अपमान होत असतो. जो माझी सेवा करीत असतो, किंवा जो कोणी माझ्या मनाप्रमाणें वागत असतो, तो सुद्धां कैकेयीचा पुत्र आलेला पाहून माझ्याशीं बोले-नासा होतो. तस्मात्, अशी विपन्न स्थिति मला प्राप्त झाली असतांना, नेहमींच्या रागीटपणामुळें मर्मभेदक भाषण करणारें कैकेयीचें तोंड माझ्यानें कसें रे पहावेल? बा राघवा, आपल्या दुःखाचा परिहार आज होईल, उद्यां होईल अशी वाट पहात पहात तुझ्या जन्मापासून सत्तावीस वर्षे गेलीं; आणि बाबारे, मी जरी अशी थकलेली आहें, तरी सवतीनें केलेला अपमान मला आतां सहन करावासा वाटत नाहीं. पूर्ण चंद्राप्रमाणें असलेलें तुझें मुख दृष्टीआड झालें असतां मीं बिचारीनें दुःखद रीतीनें उपजीविका करून कसें बरें दिवस कंठावे? अतिशयच परिश्रम घेऊन मीं जीं उपोषणें व देवांचीं चिंतनें केलीं, आणि अशा रीतीनें मीं भाग्य-हीन स्त्रीनें जें दुःख भोगून तुझें पोषण केलें, तें व्यर्थच झालें! वर्षाकालीं नवीन उदकाचा स्पर्श झालेल्या महानदीचे तीराप्रमाणें ज्या अर्थीं हें माझें हृदय विदीर्ण होऊन जात नाहीं, त्या अर्थीं तें मोठें कठीण आहे, असें मला वाटतें. अरे, शोक करीत बसलेल्या हरिणीला एकाएकीं उचलून नेणाऱ्या सिंहा-प्रमाणें मृत्यु मला नेण्याचें मनांत आणीत नाहीं, ह्यावरून मी अमर आहें व यमाच्या घरीं मला जागा नाहीं, हेंच खरें! खरोखर माझें हृदय ज्या अर्थीं ह्या प्रसंगीं फाटून जात नाहीं, त्या अर्थीं तें लोखंडाचें बनविल्याप्रमाणें बळकट आहे. आणि अशा प्रकारच्या दुःखानें देह व्याप्त झाला असतांनाहि ज्या अर्थीं तो विदीर्ण होऊन पृथ्वीवर पडत नाहीं, त्या अर्थीं अकालीं मरण येत नाहीं, हेंच निश्चित आहे. व्रतें, दानें व संयमनें व्यर्थ होऊन पुत्राकरितां केलेलें तपहि उखीर जमिनीमध्यें पेरलेल्या बीजाप्रमाणें अगदीं निष्फळ झालें, ही फारच दुः-खाची गोष्ट आहे. मोठ्या दुःखानें जर्जर झालेल्या एखाद्याला जर स्वेच्छेनें अकालीं मरण प्राप्त होत असतें, तर वत्साचा वियोग झालेल्या धेनुप्रमाणें तुझा वियोग झालेली मी आजच्या आजच यमाच्या घरीं चालती झालें असतें. तथापि

हे इंदुवदना, तुझ्यावांचून आज हें माझें निंद्य जीवन व्यर्थ आहे. करितां अतिशय थकलेली गायहि वात्सल्यामुळें जशी आपल्या वांसराच्या मागोमाग वनामध्यें जाते, त्याप्रमाणें मी अशी थकलेली असतांनाहि तुझ्या मागोमाग वनामध्यें येईन."

अशा प्रकारें, अतिशय दुःख सहन होईनासें होऊन, सवतीमुळें आपणाला आणखीहि मोठें दुःख प्राप्त झालें आहे, हें अवलोकन करून व आपला पुत्र राघव सत्यपाशानें बद्ध झाला आहे, हं मनांत आणून दुःखित झालेल्या किन्नरीप्रमाणें ती कौसल्या फारच विलाप करूं लागली.

सर्ग एकविसावा.

लक्ष्मणाचा कोप.

ह्याप्रमाणें विलाप करीत असलेल्या त्या कौसल्येला अवलोकन करून लक्ष्मण दीन झाला, आणि त्या समयालाच शोभणाऱ्या अशा शब्दांनीं तिला म्हणाला, " माते, राज्यलक्ष्मीचा त्याग करून राघव वनामध्यें जाणार आहे, हें मलाहि नीट दिसत नाहीं. स्त्रीच्या भाषणाला वश झालेला, विषयांच्या तावडींत सांपडलेला आणि बुद्धीला विपर्यास पडलेला हा विषयी व वृद्ध राजा, कैकेयी प्रेरणा करूं लागली असतां कोणती बरें बडबड करणार नाहीं? दशरथानें रामाला राष्ट्रांतून हांकून देऊन वनवासांत पाठवावें, अशा प्रकारचा अपराध अथवा दोष रामानें केल्याचें माझ्या दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. अपमान करून सोडलेला हाडवैरी जरी झाला, तरी रामाच्या मागें सुद्धां त्याचा दोष काढणारा पुरुष ह्या जगतामध्यें कोणी असेलसा मला दिसत नाहीं. सारांश, देवतुल्य, सुशिक्षित आणि शत्रूंनाहि प्रिय अशा पुत्राचा निष्कारण त्याग करण्यास कोण बरें धर्माकडे लक्ष्य देणारा पुरुष उद्युक्त होईल? आणि पूर्वीच्या राजांचें वर्तन लक्ष्यांत घेणारा कोणता बरें पुत्र पोरकटपणा करणाऱ्या ह्या राजाच्या वचनाला मान देईल? तस्मात् ही गोष्ट बाहेर कोणाला समजली नाहीं, तोंच माझ्या साह्याय्यानें तूं राज्यकारभार आपल्याकडे घे. राघवा, काळाप्रमाणें मी तुझ्या पाठीमागें धनुष्य घेऊन रक्षण करीत असतांना कोण बरें तुझ्याशीं अतिप्रसंग करण्यास समर्थ आहे? हे पुरुषश्रेष्ठा, ही अयोध्या जरी विरुद्ध झाली, तरी तीक्ष्ण बाणांनीं मी ती सर्व निर्जन करून टाकीन, आणि भरताच्या बाजूचा

अथवा त्याचें हित इच्छिणारा जो कोणी असेल, त्या सर्वांचा मी वध करीन. कारण मऊ सांपडलें म्हणजे लोक कोपरानें खणूं लागतात! कैकेयीनें प्रोत्साहन दिल्यामुळें तिच्यावर संतुष्ट होऊन पिता जर आमचा शत्रु झाला असेल, तर कांहींएक विचार न करितां ह्याला बांधून टाकण्याला अथवा ह्याचा वध करण्यालाहि कांहीं चिंता नाहीं. कारण, चढून जाऊन कार्याकार्यविवेक न राहिल्यामुळें उन्मार्गाला प्रवृत्त झालेल्या गुरूलाहि शासन करणें अवश्य आहे. हे पुरुषोत्तमा, न्यायानें तुला प्राप्त झालेलें हें राज्य हा राजा आज कोणाच्या जोरावर अथवा कोणता हेतु मनांत धरून कैकेयीच्या स्वाधीन करण्याची इच्छा करीत आहे? हे शत्रुदमना, तुझ्याशीं व माझ्याशीं मोठें वैर बांधून भरताला राज्यलक्ष्मी देण्याला ह्याचें काय सामर्थ्य लागून गेलें आहे? हे देवि, मी मनापासून आपल्या भ्रात्यावर प्रेम करीत आहें, हें मी तुला सत्य, धनुष्य, दान आणि यज्ञयाग ह्यांची शपथ घेऊन सांगत आहें. माते, प्रदीप्त अग्नीमध्यें अथवा अरण्यामध्यें जर राम प्रवेश करणार असला, तर त्या ठिकाणीं मी आधींच प्रविष्ठ होईन, हें तूं समजून ऐस. उदय पावलेला सूर्य ज्याप्रमाणें अंधकाराचा नाश करितो, त्याप्रमाणें मी आपल्या सामर्थ्यानें तुझ्या दुःखाचा नाश करून टाकितों. राघवाला आणि देवीला एकदां माझें सामर्थ्य दृष्टीस पडूं देच वृद्धपणामुळें विचारशून्य होऊन कैकेयीचे ठिकाणींच मन गुंतल्यामुळें पोरकटपणा धरून शोचनीय झालेल्या ह्या वृद्ध पित्याचा मी आज बंदोबस्त करितों."

महात्म्या लक्ष्मणाचें हें भाषण श्रवण करून, शोकाकुल होऊन रडत असलेली ती कौसल्या रामाला म्हणाली, "बा रामा, तुझा भ्राता लक्ष्मण बोलत असतांना तूं ऐकिलेंच आहेस. ह्याकरितां आतां ह्यानंतर जर तुला त्याचें बोलणें उचित दिसत असेल, तर तूं त्याप्रमाणें कर. माझ्या सवतीनें उच्चारिलेलें धर्मविरुद्ध भाषण श्रवण केल्यावर शोकसंतप्त झालेल्या माझा त्याग करून येथून जाणें तुला योग्य नाहीं. हे धर्मनिष्ठा, तूं धर्मवेत्ता आहेस, म्हणून आज्ञापरिपालनरूप धर्मच आचरण करण्याची जर तुझी इच्छा असेल, तर राज्याचा त्याग करून तूं येथेंच रहा, आणि माझी शुश्रूषा करून मातृशुश्रूषारूप उत्कृष्ट धर्माचें आचरण कर. बाबारे, मातेची शुश्रूषा करण्याच्या उद्देशानें स्वगृहींच शुद्ध राहून वास्तव्य करणारा काश्यप मोठ्या तपश्चर्येनें युक्त होऊन म्हणजे मोठ्या तपश्चर्येनें मातृसेवेचें फल प्राप्त होऊन स्वर्गाला गेला. ज्याप्रमाणें राजा तुला पूज्य आहे, त्याप्रमाणें श्रेष्ठपणामुळें मीहि तुला पूज्य आहें. तस्मात् मीं तुला

अनुज्ञा देत नाहीं. तूं येथून वनामध्यें जाऊं नको. तुझा वियोग झाल्यावर सुखाशीं आणि जीविताशीं तरी मला काय करावयाचें आहे ? तृण भक्षण करू-नहि तुझ्यासहवर्तमान राहण्यांत माझें कल्याण आहे. इतक्यावरहि जर तूं शोकाकुल झालेल्या माझा त्याग करून वनांत जाशील, तर मी अन्नपाणी सोडून मरणाच्या द्वारीं बसेन. तुझा वियोग झाला असतां जीव ठेवण्यास मी समर्थ होणार नाहीं. असें झालें असतां, सिंधुपति समुद्राला मातेला दुःख देणें ह्या अधर्मामुळें जसें ब्रह्महत्येचें पातक प्राप्त झालें, त्याप्रमाणें बाबारे, लोकविख्यात नरक तुला प्राप्त होईल."

कौसल्येचें व लक्ष्मणाचें सांत्वन.

ह्याप्रमाणें दीन होऊन विलाप करीत असलेल्या कौसल्या मातेला धर्मात्मा राम धर्माला अनुसरून असलेल्या शब्दांनीं म्हणाला, "पित्यानें जें सांगितलें, त्याचें उल्लंघन करण्याचें मला सामर्थ्य नाहीं. मी चरणीं मस्तक ठेवून तुझी प्रार्थना करितों. माझी वनांत जाण्याची इच्छा आहे. वनामध्यें संचार करणाऱ्या धर्मज्ञ व विचारी कंडू ऋषींनीं पित्याची आज्ञा परिपालन करण्याकरितां गोवध केला. आमच्या कुलामध्येंहि पित्या सगराच्या आज्ञेनें भूमि खणूं लागलेल्या सगरपुत्रांना अत्यंत घोर वध प्राप्त झाला; आणि पित्याच्या सांगण्यामुळें जमदग्निपुत्र परशुरामानें तर अरण्यामध्यें कुऱ्हाडीनें स्वतः आपली जननी रेणुका तोडून टाकिली! ह्यांनीं व स्वर्गांतील देवांप्रमाणें असलेल्या इतरहि पुष्कळांनीं ज्याप्रमाणें पित्याचें हित केलें, त्याप्रमाणें मीं न भितां पित्याचें सांगणें शेवटास नेऊन त्याचें हित करीन. हे देवि, मी एकटाच आज पित्याची आज्ञा परिपालन करीत आहें, अशांतली गोष्ट नाहीं. मीं जें सांगितलें ह्यांनींहि तसें केलें आहे. तुला प्रतिकूल असा कांहीं नवीन धर्म मी आज प्रवृत्त करीत नाहीं. पूर्वींच्या लोकांना अभिमत असून त्यांनीं आचरिलेल्या ह्या मार्गानेंच मी जात आहें. तस्मात्, भूलोकामध्यें करण्याला उचित असेंच पित्याचें वचन मी करीत आहें. भलतेंच कांहीं कृत्य मी करीत नाहीं. पित्याच्या सांगण्याप्रमाणें वागण्यानें कोणतीहि हानि होत नाहीं."

ह्याप्रमाणें त्या मातेला सांगून, संभाषण करणाऱ्यांमध्यें आणि सर्व धनुर्धरांमध्यें श्रेष्ठ असा राम पुनरपि लक्ष्मणाला म्हणाला, "लक्ष्मणा, माझ्या ठिकाणीं तुझें उत्कृष्ट प्रेम, पराक्रम, धैर्य आणि दुसऱ्याला सहन होण्यास अतिशयच कठीण असें तुझें तेज हीं सर्व मी जाणीत आहें. हे सुलक्षणा, सत्य आणि

शम ह्यांचें तत्त्व विदित नसल्यामुळें माझ्या मातेला मोठें अनुपम दुःख झालेलें आहे. ह्या जगतामध्यें धर्म श्रेष्ठ असून धर्माच्याच आधावर सत्य आहे, आणि माझ्या पित्याचें हें उत्कृष्ट वचनहि धर्मालाच अनुसरून आहे. करितां हे वीरा, ‘ सांगण्याप्रमाणें वागेन ’ असें पित्याला, मातेला अथवा ब्राह्मणाला वचन दिल्यावर धर्माला अनुसरून वागणाऱ्या पुरुषानें तें व्यर्थ करणें योग्य नाहीं. आज्ञेचें उल्लंघन करण्यास मी समर्थ नाहीं. हे वीरा, पित्याच्या आज्ञेवरून कैकेयीनें हें मला सांगितलें आहे. तस्मात्, ही कुबुद्धि सोडून दे, क्षत्रधर्माला उचित असा विचार मनामध्यें आण, संतप्त न होतां धर्माचें अवलंबन कर आणि माझ्या विचाराप्रमाणें वाग. ”

ह्याप्रमाणें प्रेमामुळें भ्राल्या लक्ष्मणाला सांगितल्यावर राम हात जोडून व मस्तक नम्र करून कौसल्येला म्हणाला, “हे देवि, तुला माझ्या प्राणाची शपथ आहे, तूं मला येथून वनांत जाण्याला अनुज्ञा दे, आणि कल्याणस्थानभूत असे आशीर्वाद दे. राजर्षि ययाति पूर्वी स्वर्गांतून च्युत होऊन भूमीवर पडल्यानंतर जसा पुनरपि स्वर्गाला गेला, तसा प्रतिज्ञा शेवटास नेऊन मी पुनरपि वनांतून ह्या नगरामध्यें येईन. माते, हा शोक आवरून धर. असा अमंगलकारक शोक करीत बसूं नको. पित्याची आज्ञा शेवटास नेल्यानंतर मी पुनरपि वनांतून परत येईन. तूं, मी, विदेहराजकन्या, लक्ष्मण आणि सुमित्रा ह्यांनीं पित्याच्या आज्ञेप्रमाणें वागावें, हा सनातन धर्म आहे. माते, मनामध्यें दुःख आवरून धरून आणि माझ्या वनवासाची तयारी करून वनवासासंबंधीं धर्माला अनुसरून असलेल्या ह्या माझ्या विचाराला तूं अनुमोदन दे.”

हें अत्यंत धर्मयुक्त, धैर्यसंपन्न आणि निर्भय असें त्याचें भाषण श्रवण केल्यावर, मूर्च्छित झालेली देवी कौसल्या शुद्धीवर येऊन पुनरपि रामाला म्हणाली, ‘ हे पुत्रा, ज्याप्रमाणें पिता तुला मोठा, तशी स्वधर्म आणि प्रेम हीं लक्ष्यांत घेतलीं असतां मीहि आहें. ह्यास्तव मी तुला जाण्याची अनुज्ञा देत नाहीं. मी अतिशय दुःखित असतांना माझा त्याग करून जाणें तुलाहि योग्य नाहीं. तुझा वियोग झाल्यावर जीविताशीं, जगताशीं इतर देव इत्यादिकांच्या पूजनाशीं अथवा मोक्षसाधनाशीं मला काय कर्तव्य आहे ? सर्व लोकांच्या सान्निध्यापेक्षां क्षणभर तुझ्या सन्निध असण्यांतच माझें कल्याण आहे. ”

ह्याप्रमाणें मातेचा दीन विलाप श्रवण केल्यावर, हातांत चुडी घेऊन लोक ओढूं लागले असतां रात्रीं अंधकारामध्यें शिरलेल्या महागजाप्रमाणें राम अधिकच

क्षुब्ध झाला आणि जवळ जवळ मूर्च्छित झालेल्या मातेला व सर्व प्रकारें संतप्त झालेल्या लक्ष्मणाला उद्देशून तो धर्मनिष्ठ राम धर्माला अनुसरून असें भाषण करूं लागला. तशा प्रसंगीं अशा प्रकारचें भाषण करण्याला एक तोच योग्य होता."

श्रीराम म्हणालाः—"लक्ष्मणा, तुझी भक्ति व पराक्रम मी नेहमीं जाणीत आहें; परंतु तूं माझा अभिप्राय लक्ष्यांत न घेतां मातेसहवर्तमान दुःखित होत आहेस. ह्याप्रमाणें तूं अति दुःख करूं नको. अरे, पूर्वार्जित पुण्याचें फल प्राप्त होण्याचा समय आला असतां जगतामध्यें धर्म, अर्थ आणि काम हे जे तिन्ही पुरुषार्थ धर्मफल म्हणून मन्वादिकांनीं मानिलेले आहेत, ते सर्व त्यांपैकीं एक 'धर्म' असला म्हणजे अवश्य असतातच, ह्याविषयीं मला कसलाहि संदेह नाहीं. सारांश अनुकूल अभिमत आणि पुत्रवती अशी एक भार्या असली म्हणजे धर्म, अर्थ आणि काम ह्या तिहींचीं साधनें जशी ती होते, तसा एक धर्म असला म्हणजे तो इतरांच्याहि अस्तित्वाला कारणीभूत होतो. तस्मात् धर्मच मुख्य आहे, आणि म्हणून त्याचेंच रक्षण करणें योग्य आहे. ज्या कर्मामध्यें धर्म, अर्थ आणि काम हे सर्व असंबद्ध असतात, त्या कर्माला आरंभ करूं नये. ज्याच्यापासून धर्मप्राप्ति होईल, त्याचाच उपक्रम करावा. कारण धर्माची पर्वा न करितां केवळ अर्थाकडे लक्ष्य देणाऱ्या पुरुषाचा लोकांमध्यें द्वेष होतो, आणि धर्माविरुद्ध विषयतत्परता तर अतिच निंद्य आहे. तात्पर्य, गुरु, राजा, पिता व वृद्ध इतकीं नातीं लक्ष्यांत घेतलीं असतां, तो क्रोधामुळें, हर्षामुळें अथवा विषयवासनेमुळें जें कांहीं कार्य सांगेल, तें धर्माकडे लक्ष्य देऊन कोण बरें दुर्वर्तनरहित पुत्र करणार नाहीं ? ह्यास्तव पित्याची ही प्रतिज्ञा अगदीं पाहिजे तशी पूर्ण रीतीनें सिद्धीस नेल्यावांचून माझ्यानें राहवणार नाहीं. कारण बा लक्ष्मणा, तो आपला गुरु आपणाला आज्ञा करण्याला मुखत्यार आहे, आणि भर्ता असल्यामुळें मातेचाहि आधार व धर्म तोच आहे. (भर्ता असतांना स्त्रीला पुत्रावर अवलंबून रहाणें योग्य नाहीं.) म्हणून तो धर्मराज विद्यमान असतांना आणि विशेषतः आपल्या मार्गानें वागत असतांना दुसऱ्या एखाद्या विधवा स्त्री-प्रमाणें मातेला माझ्याबरोबर येथून वनामध्यें कसें बरें येतां येईल ? ह्यास्तव हे देवी, वनांत निघालेल्या मला तूं अनुज्ञा दे, आणि आम्हांला वनामध्यें कल्याण-प्रद होतील, अशीं मंगलकृत्यें कर. म्हणजे सत्याच्या योगानें जसा ययाति राजा पुनरपि स्वर्गास गेला, तसा मी वनवास समाप्त झाल्यावर पुनरपि येथें येईन. केवळ राज्याकरितां महाफलदायक अशा यशाविषयीं मला पराङ्मुख

होतां येणार नाहीं. सारांश, माते, मनुष्याचें जीवित अल्पकालपर्यंत आहे, हें जर निश्चित आहे, तर अधर्मानें आज ही निकृष्ट पृथ्वी प्राप्त करून घेण्याची मी इच्छा करीत नाहीं."

ह्याप्रमाणें मातेचें मन वळविणारा तो पुरुषश्रेष्ठ राम पराक्रमानें दंडकारण्यामध्यें जाण्याविषयीं उद्युक्त झाला, आणि लक्ष्मणाला आपला विचार आणखी समजावून सांगून, मातेला प्रदक्षिणा केल्यावर वनवासास जाण्याचा विचार त्यानें मनामध्यें निश्चित केला.

सर्ग बाविसावा.

श्रीरामाचा लक्ष्मणाला उपदेश.

नंतर रामाच्या इतर सुहृदांपेक्षां व्यथेनें अधिकच दीन म्हणून क्रुद्ध नागराजाप्रमाणें क्रोधयुक्त, रोषानें डोळे वटारिलेला व सुहृद असा जो प्रिय भ्राता लक्ष्मण, त्याला त्याच्याकडे वळून तो मनोनिग्रही राम मन आवरून धरून धैर्यानें म्हणाला, "रोष आणि शोक आवरून धरून, केवळ धैर्याचें अवलंबन करून, हा अवमान झाला आहे, अशी समजूत टाकून देऊन व उत्कृष्ठ प्रकारचा आनंद मानून माझ्या अभिषेकाकरितां जी उत्कृष्ठ प्रकारची सामुग्री जुळविली आहे, ती सत्वर एकीकडे ठेव, आणि आपलें मुख्य कर्तव्य जें वनामध्यें गमन, तें अडथळा न येतां सिद्धीस जाण्याची बजवीज कर. लक्ष्मणा, माझ्या अभिषेकाचें सामान जितक्या त्वरेनें जुळविण्यांत आलें आहे, तितक्या त्वरेनें वनवासास जाण्याच्या सामुग्रीची तयारी झाली पाहिजे. माझ्या अभिषेकामुळें जिच्या मनाला संताप झालेला आहे, ती आपली माता कैकेयी निश्चित होईल, असें कर. लक्ष्मणा, तिच्या मनामध्यें उत्पन्न झालेल्या चिंतादुःखाची एक क्षणभरहि मी उपेक्षा करणार नाहीं. मातांना अथवा पित्याला अप्रिय असलेली क्षुल्लकहि गोष्ट समजून अथवा न समजून कधींहि केल्याचें मला स्मरत नाहीं. खरें बोलणारा, प्रतिज्ञा खरी करणारा आणि अमोघ पराक्रमी असा जो माझा पिता परलोकभीतीस्तव असत्याला भ्याला आहे, तो निर्भय होवो. हें अभिषेककृत्य जर बंद केलें नाहीं, तर कैकेयीला दिलेलें आपलें वचन सत्य होत नाहीं, म्हणून त्याच्या मनाला पीडा होईल. आणि त्याच्या पीडेमुळें मला ताप होईल. तस्मात् लक्ष्मणा, हें अभिषेकविधान एकी-

कडे सारून ह्या नगरांतून शीघ्र वनांतच जाण्याची माझी इच्छा आहे. माझ्या वनवासांत जाण्यानें राजकन्या कैकेयी कृतकृत्य होऊन आपल्या भरत नामक पुत्राला खुशाल राज्याभिषेक करवो. वल्कलें, अजिन व जटाजूट धारण करून मी अरण्यामध्यें गेलों असतां कैकेयीच्या मनाला सुख होईल. ज्यानें तिला ही बुद्धि देऊन तिचें मन स्वस्थ राखिलें, त्याला दोष देणें मला योग्य नाहीं. मी आतां विलंब न करितां वनामध्यें जाणार. पुढें आलेलें राज्य हुसकून लावून माझ्या वनवासाविषयीं प्रेरणा करणारें दैवच आहे, असें समजलें पाहिजे. कारण, तसें नसतें तर कैकेयीच्या मनांत असें आलें नसतें. यावरून हें कृत्य दैवाचेंच आहे, तिचें नाहीं. असो. हे सौम्य लक्ष्मणा, सर्व मातांचें ठिकाणीं माझी अंतःकरणवृत्ति सारखी आहे, हेंहि तुला माहीत आहे; व तीहि भरत व मी यांस सारखीच लेखीत असून, माझ्या अभिषेकाला विघ्न करून मीं वनांत जावें म्हणून फार उग्र वाक्यें बोलली, हेंहि सर्व दैवाचेंच कृत्य आहे, असें मी समजतों. नाहीं तर तशा प्रकारच्या गुणांनीं युक्त असलेली ती राजकन्या —स्वतः सत्त्वशील असतांना—एकाद्या सामान्य स्त्रीप्रमाणें आपल्या पतीसमोर कसें बरें बोलेल? मला त्रास देण्यासारखें अतर्क्य असें जें दैव, तें कोणत्याहि प्राण्याचे ठिकाणीं कुंठित होत नाहीं, हें अगदीं निश्चित आहे. तस्मात् त्या दैवामुळेंच तिच्या मनामध्यें विपरीत गोष्ट आली असून, माझ्या संबंधानें राज्य-लक्ष्मी आलेली नाहींशी होणें, हा विपरीत प्रकार झालेला आहे. लक्ष्मणा, ज्या दैवाचें स्वरूप फलावांचून दुसरें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं, त्या दैवासहवर्तमान कोण बरें युद्ध करण्याचें इच्छिणार आहे? सुख-दुःख, भय-क्रोध, लाभ-हानि आणि बंध-मोक्ष ह्यांपैकीं ज्याला जें प्राप्त होतें, तें दैवाचेंच कर्म होय. उग्र तपश्चर्या करणारे ऋषी देखील दैवानें प्रेरणा केली असतां आपल्या कडकडीत नियमांचा त्याग करितात, आणि काम व क्रोध ह्यांच्या तावडींत सांपडतात. यत्नांनीं आरंभिलेलें कार्य हाणून पाडून कधीं मनामध्येंहि न आणिलेली गोष्ट ज्या अर्थीं एकाएकीं होत आहे, त्याअर्थीं खरोखरच तें दैवाचेंच कर्म होय. यथार्थ विचार लक्ष्यांत घेऊन स्वतः मन आवरून धरिलें असल्यामुळें अभि-षेक हाणून पडला तरी सुद्धां मला वाईट वाटत नाहीं. तस्मात् संतापून न जातां तूंहि माझेंच अनुकरण कर, व अभिषेकसमारंभाकरितां धारण केलेले हे अलंकार सत्वर काढून टाक. लक्ष्मणा, अभिषेकाकरितां जुळविलेल्या ह्या सर्व कुंभाच्या योगानें तपोरूप व्रताचा संकल्प करण्याकरितां माझें व्रतग्रहणार्थ

स्नान होईल, अथवा राज्यांतील द्रव्य ज्याकरितां खर्ची पडलेलें आहे, असें हें उदक तरी मला कशाला पाहिजे? मी स्वतः आणिलेल्या उदकानेंच माझ्या व्रतग्रहणाचा संकल्प होईल. लक्ष्मणा, लक्ष्मीचा उलट प्रकार झाल्याविषयीं तूं संतापून जाऊं नको. कारण, राज्य आणि वनवास ह्यामध्यें वनवासच मोठा लाभदायक आहे. लक्ष्मणा, ह्या राज्यविघ्नाचे मुळाशीं आपली कनिष्ठ माता आहे, अशी तूं मुळींच शंका घेऊं नको. कारण, तीं माता आणि पिता हीं दोघेंहि दैवाधीन झालेलीं आहेत; आणि दैवाचाहि तसा प्रभाव असल्याचें तूं जाणीत आहेस."

सर्ग तेविसावा.

लक्ष्मणाचें वनवासगमननिषेधक भाषण.

ह्याप्रमाणें राम भाषण करूं लागला असतां लक्ष्मणानें खालीं मान घातल्यासारखें केलें. रामाच्या भाषणाचा विचार केल्यानंतर दुःख व हर्ष न होतां तो मध्येंच लोंबकळत राहिला, आणि क्रोधानें भिवया चढवून तो पुरुषश्रेष्ठ बिळांतील क्रुद्ध झालेल्या महासर्पाप्रमाणें सुस्कारे टाकूं लागला. तेव्हां क्रोधानें भिवया चढल्यामुळें त्या लक्ष्मणाचें तें मुख क्रुद्ध झालेल्या सिंहाच्या मुखाप्रमाणें पहाण्यालाहि फारच भयंकर झालें. तदनंतर हत्ती ज्याप्रमाणें आपली सोंड हालवितो, त्याप्रमाणें आपला पंजा हालवीत हालवीत, रागानें इकडे तिकडे व खालीं वर माना वेळीत वेळीत आणि नेत्रकटाक्षानें पहात पहात भ्रात्या रामाला तो म्हणाला, "पित्याची आज्ञा उल्लंघिली असतां धर्माला विरोध येईल, तो न यावा एतदर्थ लोकापवादाची फाजील भीति बाळगून वनांत जाण्याचा जो तुझे ठिकाणीं हा अतिशयच उतावीळपणा उत्पन्न झाला आहे, तो अयोग्य आहे. नाहीं तर तुझ्यासारखा निभ्रांत व समर्थ क्षत्रियश्रेष्ठ अशा प्रकारचें पोंचट भाषण कसें बरें करील? अरे, पौरुषाशीं टक्कर देण्यास असमर्थ असलेल्या भिकारड्या दैवाची तूं कशाकरितां स्तुति करीत आहेस? त्या दुष्ट स्त्रीपुरुषांसंबंधानें (अर्थात् कैकेयी व दशरथ यांच्या संबंधानें) तुझ्या मनांत शंका कशी नाहीं? हे धर्मात्मन्, धर्माचें पांघरूण घेऊन आंतून पुरुष पापासक्त असतात, हें तुला माहीत नाहीं कीं काय? कपटानें तुझा त्याग करण्याची इच्छा करणाऱ्या त्या उभयतांचा स्वार्थ तुझ्या वनांत जाण्यानें चांगला साधला आहे,

हें तूं जाणीत नाहींस काय? हे राघवा, असें जर ठरलेलें नसतें, तर प्रस्तुत जो वर पुढें आला आहे त्याची देवघेव त्यांच्यांत पूर्वीच व्हावयाला पाहिजे होती. ज्या अर्थी असें झालें नाहीं, त्या अर्थी पूर्वी वर देऊं केला होता व तो आजपर्यंत मागावयाचा राहिला होता, हें सर्व कांहीं तरी खोटें निमित्त पुढें केलें आहे. तुला टाकून दुसऱ्याला अभिषेक करण्याचा जो ह्यांनीं उपक्रम केला आहे, तो लोकनिंदेसहि पात्र असल्यामुळें सहन करण्याची माझी इच्छा नाहीं. ह्यास्तव, हे वीरा, त्याबद्दल तूं मला क्षमा कर. हे महामते, ज्याच्या योगानें तुझी बुद्धि अशी द्विधा झाली, तो धर्महि मला पसंत नाहीं. कारण, त्याच्याच-मुळें तूं असा मोह पावला आहेस. अरे, पराक्रम करण्यास तूं समर्थ असतांना, कैकेयीचा दास बनलेल्या पित्याचें धर्माला अतिशय सोडून असलेलें निंद्य बोलणें कां बरें ऐकत आहेस? अरे, हें वराचें निमित्त तुझा अभिषेक हाणून पाडण्याच्या दुष्ट बुद्धीनें जाणूनबुजून केलेलें आहे. हें इतकें स्पष्ट झालें असून-हि तुला तसें वाटत नाहीं, ह्याबद्दल मला दुःख होत आहे. खरोखर अशा प्रकारची फाजील धर्मनिष्ठा निंद्य आहे. तुझी ही धर्मनिष्ठा ह्या लोकांनाहि निंद्य वाटत आहे. अरे, मातापितर हें ज्यांना नुसतें नांव आहे, अशा ह्या अहितकारक व विषयलंपट शत्रूंचा मनोरथ तुझ्यावांचून इतर कोणी सिद्धीस नेण्याचें मनांत तरी कसें आणील? आतां, 'त्यांना जी बुद्धि झाली ती दैवा-मुळें झाली' असें जरी तुझें मत असलें, तरी तें एकीकडे ठेविलें पाहिजे. कारण तें मला पसंत नाहीं. अरे, जो भित्रा व वीर्यहीन असतो, तो दैवावर अवलंबून रहातो. वीर आणि अभूदार पुरुष दैवाची कांस धरून बसत नाहींत. आपल्या पराक्रमानें दैव हाणून पाडण्यास जो समर्थ असतो, त्याचा उद्देश दैवानें कधींहि नाहींसा होत नाहीं व तो उमेदहि सोडीत नाहीं. फार कशाला? दैव आणि पुरुष ह्यांचें बल काय आहे, हें आज लोक पहातील; आणि दैव व पुरुषप्रयत्न ह्यांचें स्वरूप आज स्पष्टपणें व्यक्त होईल. दैवामुळें तुझा राज्या-भिषेक हाणून पाडल्याचें ज्यांनीं पाहिलें आहे, तेच लोक माझ्या पराक्रमानें दैव हाणून पडल्याचें आज पहातील. अंकुशालाहि न जुमानतां साखळदंड तोडून धांवत चाललेल्या मत्त हत्तीप्रमाणें अनावर झालेल्या ह्या दैवाला मी आज आपल्या पराक्रमानें ताळ्यावर आणितों. रामा, संपूर्ण लोकपाल जरी जुळून आले, अथवा संपूर्ण तिन्ही लोक जरी एकत्र झाले, तरी तुझा अभि-षेक हाणून पाडण्याची त्यांची छाती नाहीं; मग ह्या वृद्ध पित्याची कथा काय!

हे रामा, ज्यांनीं तुझा वनवास आपापणांमध्यें ठरविला असेल, त्यांनाच त्याप्रमाणें चौदा वर्षेपर्यंत अरण्यांत रहावें लागेल. तुझा अभिषेक हाणून पाडून आपल्या पुत्राला राज्य द्यावयाचें ही जी तिची व पित्याची आशा, ती मी दग्ध करून टाकीन. माझ्याशीं विरुद्ध वागणाऱ्याला दुःख देण्यास जसें उग्र पौरुष समर्थ आहे, तसें दैवबल नाहीं. सहस्र वर्षें प्रजापालन करून तूं वनवासांत गेलास, म्हणजे तुझे पुत्र राज्य करतील. (तेव्हां सुद्धां भरतादिकांचा राज्यावर अधिकार नाहीं, मग सांप्रतची तर गोष्ट कशाला पाहिजे?) पूर्वी जे राजर्षी होऊन गेले, त्यांच्या वर्तनावरून तर पुत्रवत् परिपालन करण्याकरितां पुत्रांचे स्वाधीन प्रजा करून नंतर जें वनांत जाणें त्याला 'वनवास' म्हणतात, असें दिसतें. आतां, हे धर्मात्मन्, दशरथ राजा चित्त स्थिर नसल्यामुळें प्रतिकूल झाला असतांना त्याच्या आज्ञेला मान न देतां आपण जर राज्याचा स्वीकार केला, तर लोकांना तें रुचणार नाहीं व आपल्या हातचें राज्य जाईल, अशी शंका येऊन जर तूं स्वतःला राज्य नको असें इच्छीत असशील, तर हे वीरा, मर्यादा ज्याप्रमाणें सागराचें रक्षण करिते, त्याप्रमाणें मी तुझें राज्य रक्षण करीन. नाहीं तर वीर-लोक मला प्राप्त होणार नाहींत, ही मी प्रतिज्ञा करितों. आतां मंगलावह साधनांनीं तूं आपल्याला अभिषेक करून घे, आणि तिकडेच लक्ष्य देऊन रहा. आपल्या बलानें राजाचें निवारण करण्यास मी एकटा समर्थ आहें. अरे, हे माझे बाहु कांहीं शोभेकरितां नाहींत. हें धनुष्य कांहीं भूषण म्हणून मीं बाळगिलेलें नाहीं. ही तरवार मीं कंबरेला बांधून ठेवण्याकरितांच घेतलेली नाहीं. हे बाणहि स्वस्थ पडून राहण्याकरितां मीं धारण केलेले नाहींत. ह्या चारहि वस्तु शत्रूंचा नाश करण्याकरितां आहेत. अरे, जो अत्यंत वैरी म्हणून मला समजून आला, तो साधारण शत्रु असो किंवा साक्षात् वज्रपाणी इंद्र असो, विद्युल्लतेप्रमाणें चमकणाऱ्या ह्या तीक्ष्ण धारेच्या खड्गानें मी त्याचे तुकडे तुकडे करणार नाहीं, अशी शंकाहि कधीं माझ्या मनांत येत नाहीं. माझ्या खड्गाच्या आघातानें तुटलेल्या हत्तींच्या सोंडा, घोड्यांच्या तंगड्या आणि रथी पुरुषांचीं मस्तकें ह्यांनीं ही पृथ्वी गच्च भरून जाऊन वरून जाण्यायेण्याला अडचण पडेल. माझ्या खड्गाच्या धारेनें छिन्नभिन्न झाल्यामुळें इकडे तिकडे उडालेल्या देदीप्यमान अग्नीप्रमाणें अथवा विद्युल्लतेसहवर्तमान असलेल्या मेघाप्रमाणें आज माझे शत्रु भूमीवर पडतील. अरे, अंगुलित्राण चढवून आणि हातांत धनुष्य घेऊन मी उभा राहिलों असतां पुरुषांमध्यें एकजण तरी स्वतःला पुरुष समज-

णारा मायेचा पूत निघेल काय? पुष्कळांनीं एकाला व एका बाणानें पुष्कळ लोकांना वेध करणारा मी पुरुष, अश्व आणि गज ह्यांच्या मर्मस्थानीं बाण सोडीन. हे प्रभो, आज ह्या माझ्या अस्त्रबलाचा प्रभाव दशरथ राजाचें अप्रभुत्व आणि तुझें प्रभुत्व स्थापित करून दाखवील. रामा, आजपर्यंत जी कांहीं चंदनाची उटी लाविली, जीं कांहीं बाहुभूषणें धारण केलीं, जें कांहीं द्रव्य दान केलें आणि सुहृदांनीं आजपर्यंत जें कांहीं पालन केलें, त्याचें चीज व्हावें एतदर्थ तुझ्या अभिषेकाला विघ्न आणणाऱ्यांचें निवारण करण्यामध्यें हे माझे योग्य बाहु आज पराक्रम करून दाखवितील. आजच्या आजच तुझ्या कोणत्या शत्रूला प्राण, कीर्ति आणि मित्रगण ह्यापासून मी वेगळा करूं, तें सांग. तात्पर्य ही पृथ्वी तुझ्या अधीन होईल, अशा रीतीनें तूं मला आज्ञा कर. मी तुझा दास आहें."

ह्याप्रमाणें लक्ष्मण बोलत असतांना राघववंश वृद्धिंगत करणाऱ्या रामानें त्याचे अश्रू पुसून अनेक वेळां त्याचें सांत्वन केलें, आणि 'हे सौम्या, मातापितरांच्या आज्ञेमध्यें मी आहें व हाच सन्मार्ग आहे, असें तूं समज' असें त्याला सांगितलें.

सर्ग चोविसावा.

कौसल्येची वनवासास अनुज्ञा.

पित्याची आज्ञा परिपालन करण्याविषयीं त्या रामाचा निश्चय झाला आहे, असें अवलोकन करून अश्रूंनीं कंठ दाटून आलेली कौसल्या धर्मिष्ठ रामाला उद्देशून म्हणाली, "ह्याला आजपर्यंत कसलेंहि दुःख पाहाण्याचा प्रसंग आलेला नाहीं. हा धर्मात्मा आहे, प्राणीमात्राशीं प्रिय भाषण करणारा आहे, आणि सार्वभौम दशरथ राजापासून माझे ठिकाणीं उत्पन्न झालेला आहे. तेव्हां शेतांत पडलेले धान्यकण वेंचून हा आपली उपजीविका कशी बरें करील? ज्याचे पगारी नोकर आणि दासहि मिष्ट अन्नें भक्षण करीत असतात, तो हा राम वनामध्यें कशी बरें फलमूलांवर उपजीविका करील? राजाला अतिप्रिय आणि गुणी अशा ककुत्स्थकुलोत्पन्न रामाला वनवासांत पाठवीत आहेत हें ऐकून कोणाला बरें खरें वाटणार आहे? अथवा हें ऐकिल्याबरोबर कोणाला बरें भय वाटणार नाहीं? रामा, त्रैलोक्यामध्यें सुंदर असा तूं ज्या अर्थी वनांत जाणार, त्याअर्थीं ह्या जगतामध्यें दैवच खरोखर बलवत्तर आहे आणि तेंच सर्व कांहीं करीत आहे. माझे ठिकाणीं तुझ्या आगमनचिंतेमुळें हा अग्नि

उत्पन्न झाला आहे. तूं आतां दृष्टीस पडणार नाहींस, अशी जी माझी मनः-प्रवृत्ति, तिचेच ह्याला वायूप्रमाणें साहाय्य मिळालें आहे. विलाप आणि दुःख ह्यांच्या योगानें हा पेटत आहे. रडतां रडतां पडलेले अश्रू ह्याच आहुती ह्यांत टाकिलेल्या आहेत. चिंता आणि अश्रू हाच ह्याचा प्रचंड धूर आहे. निश्वास-रूप हालचालीनें ह्याची वृद्धि होत आहे आणि असा हा अनुपम व प्रचंड शोकाग्नी तुझा वियोग झालेल्या मला अत्यंत कृश करून ग्रीष्म ऋतूमध्यें शुष्कतृणमय प्रदेशाला जाळणाऱ्या वणव्याप्रमाणें जाळून टाकील. वत्सा, जशी पुढें चालणाऱ्या आपल्या वांसराच्या मागोमाग गाय जात असते, तशी जिकडे तूं जाशील तिकडे मी तुझ्या मागोमाग येईन."

हें मातेनें केलेलें भाषण रामानें अगदीं तिनें सांगितल्याप्रमाणें ऐकिलें. तें ऐकून घेऊन तो पुरुषश्रेष्ठ राम अत्यंत दुःखित झालेल्या आपल्या मातेला म्हणाला, "राजाला कैकेयीनें फसविलें आहे. तेव्हां मी अरण्यांत गेल्यावर तूंहि जर त्याचा त्याग केलास, तर खरोखर तो जिवंत राहणार नाहीं. शिवाय, भर्त्याचा त्याग करणें म्हणजे स्त्रीला केवळ निंद्य आहे. तेव्हां मना-मध्यें आणण्यासहि निंद्य असा भर्तृत्याग तूं करूं नको. जोंपर्यंत माझा ककु-त्स्थकुलोत्पन्न पृथ्वीपति पिता जिवंत आहे, तोंपर्यंत तूं त्याची शुश्रूषा कर. कारण, तसाच सनातन धर्म आहे."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां चांगलें कोणतें हें पहाणारी कौसल्या प्रसन्न झाली, आणि सरळ रीतीनें वागणाऱ्या रामाला 'ठीक आहे' असें म्हणाली. तदनंतर कौसल्येनें तसें म्हटल्यावर तो धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ राम अत्यंत दुःखित झालेल्या त्या आपल्या मातेला फिरून म्हणाला, "मीं आणि तूं पित्याच्या वचनाप्रमाणेंच वागलें पाहिजे. कारण राजा, भर्ता, गुरु, श्रेष्ठ आणि प्रभु इतकीं नातीं त्याचे ठिकाणीं असल्यामुळें तो आपणां सर्वांचा मुखत्यार आहे. हीं एवढीं चौदा वर्षें महारण्यांत घालविल्यावर मी मोठ्या आनं-दानें तुझ्या वचनांत राहीन."

ह्याप्रमाणें रामानें कौसल्येला सांगितलें असतां अतिशय दुःखित झालेल्या त्या पुत्रवत्सल कौसल्येचें मुख अश्रूंनीं भरून गेलें, आणि ती आपल्या प्रिय पुत्राला म्हणाली, 'रामा, ह्या सवतींच्या काचामध्यें माझ्यानें नाहीं रे राहवणार. पित्याकरितां वनांत जाण्याचा जर तुझा निश्चयच झाला असेल, तर तूं मलाहि वनांत संचार करणाऱ्या हरिणीप्रमाणें अरण्यांत घेऊन जा.' याप्रमाणें रडत

असलेल्या त्या मातेला डोळ्यांमध्यें अश्रु न आणितां राम म्हणाला, स्त्री जिवंत असतांना भर्ता हेंच तिचें दैवत आणि तिचा प्रभु आहे. तेव्हां आज हा राजा तुझा व माझा प्रभु आहे. जगत्पति विचारी राजामुळें आज आपण सनाथ आहों. भरतहि धर्मात्मा असून सर्व लोकांशीं प्रिय भाषण करणारा आहे. तेव्हां तोहि तुझ्याच अनुरोधानें वागेल. कारण तो नेहमीं धर्माविषयीं रत असतो. मी गेल्यावर राजा पुत्रशोकानें यत्किंचित्‌हि थकून जाणार नाहीं. अशा रीतीनें दक्ष राहून तूं व्यवस्था ठेव. तात्पर्य, हा भयंकर शोक ह्याच्या नाशाला कारण होणार नाहीं, अशा रीतीनें नेहमीं तूं ह्या वृद्ध राजाचें स्वस्थचित्तपूर्वक हित करीत जा. आचरणानें सर्वोत्कृष्ठ व नेहमीं व्रतें आणि उपवास करणारी अशी जरी स्त्री असली, तरी भर्त्याच्या अनुरोधानें जर ती वागत नसेल, तर तिला नरकप्राप्ति होते. वंदन व देवपूजन ह्यांचीहि पर्वा न बाळगितां फक्त पतीच्या सेवेनें स्त्रीला उत्कृष्ठ स्वर्ग प्राप्त होतो. तेव्हां भर्त्याला प्रिय आणि हितकारक असलेली गोष्ट करण्याविषयीं तत्पर राहून भर्त्याची सेवाच करावी, हा स्त्रीचा सनातन धर्म वेदामध्यें श्रुत असून स्मृतीमध्येंहि पठित आहे. हे देवि, अग्निहोत्रहोमसमयीं माझ्याकरितां पुष्पांनीं सर्वदा देवतांचें पूजन करून ब्राह्मणांचा सत्कार करीत जा. अशा रीतीनें काळ घालवीत घालवीत माझ्या आगमनाची वाट पहात रहा, आणि शुचि व मिताहारी राहून पतिसेवेविषयीं तत्पर असत जा. धर्मनिष्ठामध्यें श्रेष्ठ असलेला माझा पिता मी परत येईतोंपर्यंत जर जिवंत राहिला, तर मी आल्यावर तुला अतिशय इष्ट असलेला तुझा हेतु सिद्धीस जाईल."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां कौसल्येचे नेत्र अश्रूंनीं अगदीं भरून आले, आणि पुत्रशोकानें व्याकुळ झालेली ती कौसल्या रामाला म्हणाली, "बाळा रामा, जाण्याचा जो तूं निश्चय केला आहेस, तो फिरविण्याला मी समर्थ नाहीं. तेव्हां हे वीरा, खरोखर अनुल्लंघनीय असा काळच प्राप्त झाला आहे. हे पुत्रा, तूं दक्ष राहात जा. हे प्रभो, तुझें सर्वदा कल्याण असो. तूं पुनरपि परत आलास म्हणजे माझे क्लेश नाहींतसे होतील. सारांश, मनांत योजिलेलें व्रत संपवून व पित्याच्या ऋणांतून मुक्त होऊन कृतकृत्य झालेला तूं महाभाग्यवान परत आलास म्हणजे मला मोठ्या सुखानें झोंप येईल. राघवा, ज्या अर्थी माझ्या सांगण्याचा अव्हेर करून तुला वनांत जाण्याविषयीं काळ प्रेरणा करीत आहे, त्या अर्थी त्याची गतिच ह्या भूलोकावरील प्राण्यांना सर्वदा अतर्क्य आहे. हे महापराक्रमी पुत्रा, तूं आतां जा. पुनरपि सुखरूप परत आलास म्हणजे स्पष्ट आणि मनो-

हर अशा सांत्वनपूर्वक भाषणानें तूं मला आनंद देशील. बाबारे, जटा व वल्कलें धारण केलेल्या तुला वनांतून परत आलेला मी पाहीन अशी वेळ येईल का? "

ह्याप्रमाणें रामाचा वनवासांत जाण्याविषयीं निश्चय झाला आहे, असें अवलोकन करून देवी कौसल्येनें अगदीं मनापासून त्याच्याशीं असें शुभ भाषण केलें. नंतर ती त्याचें स्वस्तिवाचन करण्याकरितां उद्युक्त झाली.

सर्ग पंचविसावा.

श्रीरामाचें स्वस्तिवाचन.

आपला तो शोक एकीकडे ठेवून व शुद्धोदकानें आचमन करून ती विचारी माता कौसल्या रामाला उद्देशून मंगलकारक वाक्यें उच्चारूं लागली. ती म्हणाली, " हे रघूत्तमा, तुझ्या जाण्याला अडथळा आणणें शक्य नाहीं. तेव्हां आतां तूं जा. लवकर परत फीर, आणि सज्जनांच्या मार्गानें वागत जा. हे रघुवंशजश्रेष्ठा, ज्या धर्माचें तूं प्रेमानें व निश्चयानें पालन करीत आहेस, तो धर्म तुझें सर्व प्रकारें रक्षण करो. हे पुत्रा, देवालयामध्यें तूं ज्यांना प्रणाम करीत असतोस, ते देवमहर्षींसहवर्तमान वनामध्यें तुझें रक्षण करोत. विचारी विश्वामित्र मुनींनीं जीं अस्त्रें तुला दिलीं आहेत, तीं सर्वदा गुणसंपन्न असलेल्या तुझें रक्षण करोत. हे पराक्रमी पुत्रा, पितृसेवा, मातृसेवा आणि सत्य हीं रक्षण करीत असतांना तूं चिरकाल रहा. हे नरोत्तमा, समिधा, कुश, दर्भ, वेदि, देवालयें, विप्रांचीं स्थानें, पर्वत, वृक्ष, आंखूड फांद्यांचीं झाडें, सरोवरें, पक्षी, सर्प आणि सिंह तुझें रक्षण करोत. साध्य, विश्वेदेव, महर्षींसहवर्तमान मरुद्गण, विराट्, सृष्टिकर्ता, पूषा, भग आणि अर्यमा तुझें कल्याण करोत. इंद्रप्रभृति सर्व लोकपाल, सहा ऋतु, सर्व महिने, संवत्सर, रात्रि, दिवस आणि मुहूर्त हें तुझें रक्षण करोत. हे पुत्रा, श्रुति, स्मृति व धर्म तुझें सर्व बाजूंनीं रक्षण करोत. भगवान स्कंददेव, चंद्र, बृहस्पति, सप्तर्षि आणि नारद हे सर्व बाजूंनीं तुझें रक्षण करोत. सिद्ध, दिशा आणि दिक्पाल ह्यांचें मीं स्तवन केलें आहे. तस्मात् हे पुत्रा, त्या वनामध्यें ते तुझें नेहमीं सर्व बाजूंनीं रक्षण करोत. पर्वत, सर्व समुद्र, राजा वरुण, स्वर्ग, अंतरिक्ष, भूमि, चराचरांसहवर्तमान वायु, सर्व नक्षत्रें, अधिदेवता व प्रत्यधिदेवता ह्यांसहवर्तमान सर्व ग्रह, दिवस व रात्रि आणि

दोन्ही संध्या, वनाच्या आश्रयानें राहिलेल्या तुझें रक्षण करोत. सहा ऋतु, महिने, संवत्सर, कला आणि काष्ठा तुझें कल्याण करोत. तूं विचारी मुनिवेष धारण करून महावनामध्यें संचार करीत असतांना देव आणि दैत्य तुला नेहमीं सुखदायक होवोत. हे पुत्रा, घोर व क्रूरकर्मी राक्षस आणि पिशाच्च व सर्व प्रकारचे मांसभक्षक प्राणी ह्यांपासून तुला भय न होवो. वानर, वनमक्षिका, मशक, सर्प आणि कीटक गहन वनामध्यें तुझ्यासमीप न येवोत. मोठमोठे गज, सिंह, व्याघ्र, ऋक्ष, विषारी दाढांनीं युक्त असलेले प्राणी, महिष आणि क्रूर अशीं शिंगाळूं जनावरें तुझ्याशीं क्रोध न करोत. नरमांस भक्षण करणाऱ्या ज्या कांहीं म्हणून दुसऱ्या सर्व जाती आहेत, त्यांचें मीं येथें पूजन केलें आहे. ह्यास्तव त्या तुझी हिंसा न करोत. तुला मार्ग कल्याणकारक होवोत. तुझे पराक्रम सफल होवोत. सर्व प्रकारच्या अपेक्षित समृद्धि वनामध्यें तुला प्राप्त होवोत. आणि तूं कल्याणसंपन्न राहून तुझें गमन होवो. आकाश आणि पृथ्वी ह्यांत वास्तव्य करणारे प्राणी व सर्व देवता ह्यांपासून आणि तुझे जे कोणी शत्रु असतील त्यांपासून तुझें कल्याण होवो. रामा, शुक्र, चंद्र, सूर्य, कुबेर आणि यम ह्यांचें मी पूजन केलें आहे; करितां तूं दंडकारण्यामध्यें वास्तव्य करीत असतांना तुझें हे रक्षण करोत. हे रघुनंदना, अग्नि, वायु, धूम व ऋषींच्या मुखापासून निघालेले मंत्र, स्नानसमयीं तुझें रक्षण करोत. सर्वलोकाधिपति ब्रह्मा, जगत्कारण ब्रह्म आणि बाकीचे जे देव, ते वनांत वास्तव्य करणाऱ्या तुझें रक्षण करोत."

असें म्हणत म्हणत त्या विशालनयना यशस्विनी कौसल्येनें पुष्पें, गंध आणि यथायोग्य स्तुति ह्यांच्या योगानें देवगणांचें पूजन केलें. नंतर अग्नि आणून राममंगलार्थ महात्म्या ब्राह्मणांकडून तिनें यथाविधि हवन करविलें. घृत, श्वेतपुष्पें, समिधा आणि मोहऱ्या हीं द्रव्यें त्या उत्कृष्ठ स्त्री कौसल्येनें जुळविल्यावर रामाला आरोग्य प्राप्त व्हावें, या उद्देशानें उपाध्यायानें होम केला. होम करून जें हविर्द्रव्य अवशिष्ट राहिलेलें होतें, त्याचा त्यानें होमस्थानाहून बाह्य असा लोकपालादिकांना बलि केला; आणि त्यावर मध, दहीं अक्षता व घृत हीं द्रव्यें घातलीं. तदनंतर रामाचें वनामध्यें मंगल असावें, एतदर्थ ब्राह्मणांकडून तिनें पुण्याहवाचन करविलें. तेव्हां त्या यशस्वी राममातेनें त्या द्विजश्रेष्ठाला यथेष्ट दक्षिणा दिली, आणि रामाला ती म्हणाली, "सर्व देवांना मान्य अशा इंद्राला वृत्रवधसमयीं जें मंगल झालें, तें मंगल तुला होवो. अमृत आणण्याकरितां निघालेल्या गरुडाला विनतेनें पूर्वीं जें मंगल केलें, तें मंगल तुला होवो.

अमृतोत्पादन समयीं दैत्यांचा घात करणाऱ्या वज्रपाणी इंद्राला अदितीनें जें मंगल केलें, तें मंगल तुला होवो. तीन पावलें टाकतांना अतुल तेजस्वी विष्णूला जें मंगल झालें, तें मंगल तुला होवो. हे महापराक्रमी रामा, ऋषी, सागर, द्वीपें, वेद, लोक आणि दिशा तुला नुसतीं मंगलें करोत. इतकेंच नव्हे, परंतु मंगलांचेंहि मं॰ल त्यांच्यापासून तुला प्राप्त होवो."

ह्याप्रमाणें म्हणून त्या विशालनय॰ा कौसल्येनें रामाच्या मस्तकावर अक्षता टाकिल्या, आणि रामाला तिनें गंध चोपडिलें. नंतर जिच्या प्रभावाचा प्रत्यय आलेला आहे, अशी विशल्यकरणी नामक शुभ औषधि रामाचें रक्षण होण्याकरितां कौसल्येनें त्याच्या हातांत बांधून मंत्रांनीं तिचें अभिमंत्रणहि केलें. तदनंतर दुःखाच्या तावडींत सांपडलेली ती कौसल्या आनंदित झाल्यासारखी झाली. आणि रामाला कवटाळून व त्याचें मस्तक हुंगून, मनांतून जरी तसा उद्देश नव्हता, तरी केवळ शब्दमात्रानें अडखळत अडखळत त्याला म्हणाली, "हे रामा, तूं इष्टकार्याकरितां खुशाल अरण्यामध्यें जा. हे वत्सा, सर्व हेतु सिद्धीस जाऊन अयोध्येमध्यें तूं पुनरपि रोगरहित परत आलास, म्हणजे राजमार्गामध्यें प्रजाजनांनीं परिवेष्ठित झालेल्या तुला मीं अवलोकन करीन. रामा, तूं मंगलसंपन्न राहून वनवासांतून येथें परत आलास, म्हणजे स्नुषेचे व माझे उद्देश तूं सफल कर. जा आतां. हे राघवा, शिवादि देवगण, महर्षि, भूतगण, इतर देव, पन्नग व दिशा वनांत निघालेल्या तुझ्या हिताची चिरकाल इच्छा धरोत."

ह्याप्रमाणें जिचे डोळे पाण्यानें भरून आलेले आहेत, अशा त्या कौसल्येनें यथाविधि मंगल केल्यावर रामाला प्रदक्षिणा केली. आणि पुनः पुनः त्याच्याकडे पाहून तिनें त्याला कवटाळिलें. तेव्हां त्या देवीनें प्रदक्षिणा केली असतां रामानें पुनः पुनः मातेचे चरण धरिलें. आणि त्या मंगलरूप श्रीनें झळकूं लागलेल्या त्या महाकीर्तिमान रघुवंशज रामानें सीतेच्या मंदिराकडे गमन केलें.

सर्ग सव्विसावा.

सीतेला वृत्तकथन.

मातेनें मंगल केल्यानंतर अत्यंत धर्मानुरूप अशा मार्गानें वागणारा राम कौसल्येला अभिवंदन करून वनांत निघाला. जातांना प्रजाजनांनीं भरून गेलेला राजमार्ग त्यानें सुशोभित केला. आणि गुणसंपन्नतेमुळें लोकांचीं अंतः-

कारणें त्यानें विव्हळ करून टाकिलीं. इकडे बिचाऱ्या सीतेनें ह्यांतलें कांहीं ऐकिलें नव्हतें, आणि रामाला यौवराज्याचा अभिषेक होणार, हेंच तिच्या मनामध्यें घोळत होतें. राजधर्मांचें जिला ज्ञान आहे, अशी ती कृतज्ञ राजकन्या देवांचें पूजन करून रामाची वाट पहात बसली आहे, इतक्यांत आनंदित लोकांनीं गजबजलेल्या व उत्तम प्रकारें भूषित केलेल्या आपल्या मंदिरामध्यें लज्जेनें किंचित् अधोमुख झालेला राम प्रविष्ट झाला. तेव्हां सीता सत्वर उठली, आणि शोकानें संतप्त होऊन चिंतेनें मनामध्यें व्याकुळ झालेल्या आपल्या पतीकडे कांपत कांपत पाहूं लागली. तेव्हां तिला अवलोकन केल्यावर तो धर्मात्मा रघुवंशज राम मनांतील शोक आवरून धरण्यास समर्थ न झाल्यामुळें तो शोक दृष्टोत्पत्तीस आलाच. तेव्हां शोक धारण करण्यास असमर्थ दिसत असलेल्या रामाचें मुख घामानें डबडबून निस्तेज झालें आहे, असें अवलोकन करून दुःखसंतप्त झालेली सीता त्याला म्हणाली, "हे प्रभो, ह्या प्रसंगीं हें काय? हे रघुवंशज, आज चांगला गुरुपुष्ययोग आहे, आणि ह्या योगावर आपणांला राज्याभिषेक होणार, असें विद्वान ब्राह्मण सांगत आहेत. तेव्हां आपणांला खिन्न होण्याचें कारण काय? शेंकडों शलाकांनीं युक्त असलेल्या व उदकाच्या फेंसाप्रमाणें शुभ्र असलेल्या छत्रानें आपलें मनोहर मुख झांकून गेलेलें आज कोठें दिसत नाहीं; चंद्र आणि हंस ह्याप्रमाणें दिसणाऱ्या विंझोण्यांचा वारा आज आपल्या कमलासारख्या मुखावर घातला जात नाहीं; आणि हे पुरुषश्रेष्ठ, बोलके भाट, वंशस्तावक व स्तुतिपाठक हेहि आनंदित होऊन मंगलकारक शब्दांनीं आपली स्तुति करीत असल्याचें आज दृष्टोत्पत्तीस येत नाहीं; वेदपारंगत ब्राह्मण राज्याभिषेक झालेल्या आपल्या मस्तकीं मध व दहीं यथाविधि घालीत नाहींत; आणि सर्व मंत्रिमंडळ, मुख्य मुख्य सभानायक व नगरवासी आणि देशांतील लोक आपल्या मागोमाग जाण्याची इच्छा करीत नाहींत. सुवर्णाचे अलंकार घातलेले चार वेगवान अश्व ज्याला जोडले आहेत, असा आपला मुख्य पुष्परथ आपणांपुढें कां चालत नाहीं? हे वीर, कृष्णवर्ण मेघाप्रमाणें अथवा कृष्णवर्ण पर्वताप्रमाणें दिसणारा सर्वलक्षणसंपन्न वैभवशाली गज तुमच्या स्वारीमध्यें पुढें कां दिसत नाहीं? हे प्रियदर्शन, सोन्याचें काम ज्यावर केलें आहे असें भद्रासन घेऊन आपल्यापुढें जाणारा सेवक आज मला दिसत नाहीं. अभिषेकाची जर तयारी झालेली आहे, तर ह्या प्रसंगीं आपल्या मुखावर कांहीं अपूर्व वर्ण दिसत असून हर्ष मुळींच दृष्टोत्पत्तीस येत नाहीं, हें काय?"

ह्याप्रमाणें विलाप करणाऱ्या त्या सीतेला रघुनंदन राम म्हणाला, ' हे सीते, तो पिता मला वनामध्यें पाठवीत आहे. हे कुलीन धर्मवेत्ते धर्माचारिणी जानकि, कोणत्या कारणामुळें आज मला हें वनवासांत जाणें प्राप्त झालें आहे, तें ऐक. सत्यप्रतिज्ञ पित्या दशरथ राजानें माझ्या कैकेयी मातेला पूर्वी दोन वर देऊं केले होते. राजाच्या उपक्रमानें आज माझा अभिषेक होण्याचें ठरल्यावर तिनें तो पूर्वीचा संकेत पुढें करून धर्ममार्गानें राजाला वश करून घेतलें. ह्यामुळें चौदा वर्षेंपर्यंत मला दंडकारण्यामध्यें वास्तव्य केलें पाहिजे. माझ्या पित्यानें भरताला यौवराज्याचा अभिषेक करण्याचें ठरविलें आहे. ह्यास्तव निर्जन वनांत जाण्यास सिद्ध झालेला मी तुला भेटण्याकरितां आलों आहें. जनककन्ये, वैभवसंपन्न पुरुषांना दुसऱ्याची स्तुति सहन होत नाहीं. तस्मात् भरतापुढें तूं माझ्या गुणांची प्रशंसा करीत जाऊं नको. माझ्या संबंधानें तूं विशेषसें कांहीं एक बोलत जाऊं नको. भरताच्या मर्जीप्रमाणें वागून त्याच्या समीप रहाणें तुला शक्य आहे. राजानें यौवराज्य अक्षय त्याला दिलें आहे. तेव्हां हे सीते, त्याची व विशेषत: राजाची कृपा संपादन केली पाहिजे. कैकेयीपाशीं पित्यानें केलेली ती प्रतिज्ञा खरी करण्याकरितां मी आजच वनांत जाणार. करितां हे विचारी सीते, तूं स्वस्थ हो. हे कल्याणि, मुनींनीं सेवित अशा वनांत मी गेल्यानंतर तूं व्रतें व उपवास करीत रहात जा, पहांटेस उठून देवांचें यथाविधि पूजन करीत जा आणि माझ्या पित्या दशरथ राजाला वंदन करीत जा. माझी माता कौसल्या वृद्ध झाली असून दु:खानें कृश झाली आहे. तेव्हां धर्म हीच गोष्ट मुख्यत: मनामध्यें आणून तूं तिची मानमान्यता ठेवणें योग्य आहे. माझ्या इतर मातांनाहि तूं नेहमीं वंदन करीत जा. प्रेम, वात्सल्य आणि लाड पुरविणें ह्यांविषयीं सर्वहि माता मला सारख्याच आहेत. प्राणापेक्षांहि मला प्रिय असे जे भ्राते भरत व शत्रुघ्न, त्यांना विशेषत: तूं आपल्या भ्रात्यांप्रमाणें अथवा पुत्रांप्रमाणें समजून त्यांच्यावर लक्ष्य ठेवीत जा. परंतु भरताच्या मर्जीबाहेर तूं कधींहि वागत जाऊं नको. कारण हे वैदेहि, तो आपल्या देशाचा व कुलाचा राजा आहे. सुशीलपणानें राजांचें आराधन करून प्रयत्नांनीं त्यांची सेवा केली तरच ते प्रसन्न होतात, नाहीं तर क्रुद्ध होतात. अहितकारी अशा स्वत:च्या पुत्रांचाहि त्याग करून आपले उत्तम रीतीनें प्रजापालन करण्याचे हेतु सिद्धीस नेण्यास समर्थ असलेल्या तिऱ्हाईत लोकांनाहि राजे आपल्या हाताशीं धरितात. ह्यास्तव हे कल्याणि, राजा भरताच्या अनुरोधानें वागून तूं येथें रहा. धर्माचे

ठिकाणीं उत्तम निष्ठा ठेव, आणि सत्यरूप व्रताचें अवलंबन करून रहात जा. प्रिये, मी महावनामध्यें जाणार. तूं येथेंच रहा; आणि ज्या अर्थी तूं कधींहि माझें सांगणें व्यर्थ करीत नाहींस, त्या अर्थीं ह्या माझ्या सांगण्याप्रमाणें तूं वाग."

सर्ग सत्ताविसावा.

स्वतःला वनांत नेण्याविषयीं सीतेची रामाला विनंती.

प्रिय गोष्टींचा उपभोग घेण्यासच योग्य असलेल्या प्रियवादिनी वैदेहीला रामानें असें सांगितलें असतां, केवळ प्रेमामुळेंच क्रुद्ध होऊन ती भर्त्याला म्हणाली, " हे पुरुषश्रेष्ठा, मला क्षुल्लक समजून आपण हें काय भाषण करीत आहां ? आपण केलेलें हें भाषण ऐकून मला तर अतिशय हंसूच येत आहे. हे नृप, वीर, राजकुमार आणि शस्त्रास्त्रवेत्ते ह्यांना काळिमा लावणारें असें जें अयोग्य भाषण आपण केलें आहे, तें ऐकण्यासारखें नाहीं. महाराज, पिता, माता, भ्राता, पुत्र आणि स्नुषा हीं सर्व आपापल्या सुकृतांचा उपभोग घेणारीं असून आपल्याच भाग्यावर अवलंबून असतात; परंतु हे पुरुषश्रेष्ठ, एक स्त्री मात्र भर्त्याच्या भाग्यावर अवलंबून असते. तस्मात् वनामध्यें वास्तव्य करावें, ही आज्ञा मलाहि झालीच आहे. इहलोकीं आणि परलोकीं स्त्रियांना पति हाच मुख्य आश्रय आहे.—पिता, पुत्र, आत्मा, माता आणि सख्या ह्यांपैकीं कोणीहि नाहीं. हे राघव, आजच जर आपण वनांत निघाला आहां, तर दर्भ व कांटे तुडवीत मी आपल्यापुढें जाणार. ह्यास्तव ईर्ष्या आणि क्रोध सध्यां दूर ठेवा, आणि निर्जन प्रदेशामध्यें प्रवास करण्याचा प्रसंग आला असतांना पिऊन शिल्लक राहिलेलें उदक ज्याप्रमाणें लोक बरोबर घेतात, त्याप्रमाणें आपण मला निःशंकपणें वनामध्यें न्या. माझ्या मनांत पाप नाहीं. कोणतीहि अवस्था प्राप्त झाली तरी, स्त्रीनें—राजवाड्यांत राहण्यापेक्षां, विमानांत बसून फिरण्यापेक्षां अथवा सिद्धि प्राप्त झाल्यामुळें आकाशमार्गानें गमन करण्यापेक्षां—पतिचरणांच्या छायेला असणेंच अधिक श्रेयस्कर आहे. सांप्रत मीं कसें वागावें, हें कांहीं मला शिकविण्याचें कारण राहिलें नाहीं. आईबापांनीं पूर्वीच संसारांत संभवणाऱ्या अनेक प्रकारच्या अवस्था लक्ष्यांत आणून त्या मला पढवून ठेविल्या आहेत. अनेक प्रकारच्या पशुसमुदायांनीं व्याप्त व व्याघ्रांच्या कळपांनीं आश्रय केलेल्या अशा निर्जन गहन वनामध्यें मीहि जाणार. मी अगदीं माहेराप्रमाणें वनामध्यें

सुखांत राहीन. पतिसेवारूप व्रताचें चिंतन करीत असतांना त्रैलोक्यापैकीं कशा-चेंहि मला स्मरण होणार नाहीं. हे वीर, मकरंदानें सुगंधित झालेल्या वनामध्यें मी नेहमीं शुचिर्भूत व ब्रह्मचारिणी राहून आपल्या सेवेमध्यें आपणांसहवर्तमान आनंदांत दिवस काढीत जाईन. हे वीरश्रेष्ठ, एखाद्या तिऱ्हाइताचेंहि आपण वनामध्यें संरक्षण करण्यास समर्थ आहां, मग माझ्या संरक्षणाची तर गोष्ट कशाला पाहिजे? मी आपल्याबरोबर आज निःसंशय वनामध्यें येणार. हे महा-भाग्यवान, वनांत येण्यास तयार झालेल्या मला परत फिरविणें शक्य नाहीं. मी आपली नेहमीं फळें व मुळें खाऊन राहीन, ह्याविषयीं संशय नको. आपल्या-बरोबर रहात असतांना मी आपणांला दुःख देणार नाहीं. मी आपल्यापुढें चालत जाईन. माझ्याकरितां आपणांला सावकाश चालण्याची अगर थांबण्याची पाळी येणार नाहीं. आपलें भोजन झाल्यानंतर जें कांहीं उरेल, त्यांत मी भोजन करीत जाईन. पर्वत, तळीं व सरोवरें पाहण्याची माझी इच्छा आहे. आपण विचारी नाथ माझ्याबरोबर असल्यामुळें मला कोठेंहि भीति नाहीं. आपणा वीरा-बरोबर सुखानें राहून हंस व कारंडव ह्या पक्ष्यांनीं गजबजलेलीं व चांगल्या रीतीनें प्रफुल्लित झालेलीं कमलयुक्त सरोवरें पाहण्याची मला इच्छा आहे. मी त्या सरोवरांचे ठिकाणीं नेहमीं स्नान करीत जाईन. आपल्या सेवेमध्यें नेहमीं तत्पर राहीन. हे विशालनयना, आपल्यासह आनंदानें दिवस काढून मी आपणांला पराकाष्ठेचा आनंद देत जाईन. ह्याप्रमाणें आपल्याबरोबर शंभर अथवा हजार वर्षें जरी काढण्याचा प्रसंग आला, तरी मला दुःख होणार नाहीं. मला स्वर्गहि संमत नाहीं. हे राघवा, हे पुरुषश्रेष्ठा, आपल्यावांचून स्वर्गामध्यें जर माझें वास्तव्य होणें असेल, तर तें सुद्धां मला संमत नाहीं. मृग, वानर आणि हत्ती ह्यांनीं युक्त अशा अत्यंत दुर्गम वनांत मी जाईन, आणि आपल्याच चर-णांचा स्वीकार करून व आपल्या वचनांत राहून मी अगदीं माहेराप्रमाणें वास्तव्य करीन. आपल्यावांचून माझ्या मनांत दुसरी कसलीहि गोष्ट नाहीं. माझें मन आपले ठिकाणीं अनुरक्त आहे व आपला वियोग झाल्यास माझा मरणाविषयीं निश्चय झालेला आहे. तेव्हां मला वनांत घेऊन जा. *माझ्या प्रार्थ-नेला चांगला मान द्या. मी आल्यानें आपणांला कसलाहि भार होणार नाहीं."*

ह्याप्रमाणें ती धर्मवत्सल सीता म्हणत असतांनाहि पुरुषश्रेष्ठ रामानें तिला घेऊन जाण्याचें मनांत आणिलें नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु तिनें आपला आग्रह सोडावा; एतदर्थ वनवासांत होणाऱ्या दुःखासंबंधानें त्यानें पुष्कळ तिला सांगितलें.

सर्ग अठ्ठाविसावा.

सीतेला वनवासदुःखकथन.

ह्याप्रमाणें ती धर्मज्ञ सीता बोलत असतांनाहि वनांतील दुःखें मनामध्यें आणून त्या धर्मवत्सल रामानें तिला वनांत नेण्याचा विचार केला नाहीं. तिचें भाषण ऐकून घेतल्यानंतर अश्रूंनीं नेत्र दूषित झालेल्या त्या सीतेचें सांत्वन करून तो धर्मात्मा राम वनांत न येण्याविषयीं तिला म्हणाला, "हे सीते, तूं महाकुलीन असून धर्माविषयीं नेहमीं तत्पर असतेस. ह्यास्तव तूं येथेंच राहून धर्माचरण कर, म्हणजे माझ्या मनाला सुख होईल. मी सांगेन तसें तुला वागलें पाहिजे. हे अबले, वनांत राहणाऱ्याला जे क्लेश प्राप्त होत असतात, ते तूं ऐकून घे, आणि वनवासाला जाण्याचें जें हें तूं मनामध्यें आणिलें आहेस, तें सोडून दे. ज्यांत अतिशय क्लेश होतात व ज्यांत प्रवेश होणेंहि दुष्कर आहे, त्या प्रदेशाला वन असें म्हणतात. मी तुझें कल्याण व्हावें, ह्या बुद्धीनें खरोखर तुला हें सांगत आहें. वन हें सुखप्रद कधींहि नसून नेहमीं दुःखप्रदच आहे. गिरिकंदरांत राहणाऱ्या सिंहांच्या गर्जना पर्वतावरील नद्यांच्या ध्वनीनें युक्त अशा नुसत्या ऐकणेंहि दुःखप्रद आहे. तस्मात् वन हें दुःखकारकच आहे. त्याचप्रमाणें मत्त वनपशु निर्जन वनामध्यें निःशंकपणें खेळत असतात; परंतु मनुष्य दृष्टीस पडतांक्षणीं त्याला मारण्याकरितां ते त्याच्या अंगावर चालून जातात. म्हणून हे सीते, वन दुःखकारक आहे. वनामध्यें सुसरी व चिखल ह्यांनीं भरलेल्या अशा दुस्तर नद्या असतात; व त्या वनांत नेहमीं मत्त गज हिंडत असतात. म्हणून वन हें फारच दुःखदायक आहे. वनांतील मार्गामध्यें जिकडे तिकडे लता व कांटे पडलेले असतात, व मध्यंतरीं कोठेंहि उदक नसून त्या मार्गावरून जाणेंहि फार दुःखदायक असतें. म्हणून वन हें दुःखकारक आहे. दिवसा चालून श्रमानें थकून गेलेल्या मनुष्याला रात्रीं वृक्षावरून भूतलावर आपोआप गळून पडलेल्या पानांची शय्या करून शयन करावें लागतें. तस्मात् वन हें दुःखकारक आहे. वनवासांत राहणाऱ्या मनुष्यानें जितेंद्रिय राहिलें पाहिजे, आणि वृक्षावरून गळून पडलेल्या फलांवर रात्रंदिवस संतोषानें असलें पाहिजे. म्हणून हे सीते, वन हें दुःखकारक आहे. हे मैथिली, सामर्थ्याप्रमाणें तेथें उपवास केले पाहिजेत, आणि जटा धारण करून वल्कलवस्त्रें परिधान केलीं पाहिजेत. अशा स्थितींतहि देव आणि पितर ह्यांचें विधिपूर्वक

संतर्पण करून, आलेल्या अतिथींचें नेहमीं आदरातिथ्य केलें पाहिजे. वनवास करणाऱ्यांनीं वेळोवेळीं नियमानेंच वागलें पाहिजे, आणि त्रिकाळ स्नान केलें पाहिजे. तस्मात् वन हें फारच दुःखदायक आहे. स्वहस्तांनीं आणिलेल्या पुष्पांच्या योगानें स्थंडिलावर ऋषिप्रोक्त विधीनें नेहमीं देवपूजन केलें पाहिजे. म्हणून हे सीते, वन हें दुःखदायक आहे. हे मैथिलि, जें प्राप्त होईल त्यांत संतोष मानिला पाहिजे; आणि वनचरांनीं, जे पदार्थ मिळतील त्यावर उपजीविका केली पाहिजे. म्हणून वन हें दुःखदायक आहे. रात्रीं फारच वारा सुटलेला असून अतिशय अंधार पडलेला असतो; भूक ही नेहमींच लागलेली असते; आणि ह्या वनांत भयें तर मोठींच असतात. तस्मात् वन हें फारच दुःखदायक आहे. हे स्त्रिये, नानाप्रकारचे असंख्य सर्प वनांत असून ते मोठ्या तोऱ्यातोऱ्यानें मार्गावरून संचार करीत असतात. म्हणून वन हें फारच दुःखकारक आहे. गतीनेंहि नद्यांप्रमाणें वक्र असून नद्यांच्याच आश्र-याला राहणारे सर्प मार्ग अडवून बसलेले असतात. तस्मात् वन हें अतिशयच दुःखकारक आहे. पक्षी, विंचू, कीटक, रानमाशा आणि मशक हे एकसारखे कोणालाहि पीडा देत असतात. तस्मात् हे अबले, वन हें दुःखदायक आहे. हे स्त्रिये, कंटक वृक्ष, कुश आणि काश ह्यांच्या शाखांचीं अग्रें वनामध्यें एकमेकांस गुंतलेलीं असतात, म्हणून वन हें दुःखकारक आहे. अरण्यांत राहणाऱ्याला नानाप्रकारचीं भयें असून अतिशयच शारीरिक क्लेश होत असतात. म्हणून वन हें सर्वदा दुःखकारकच आहे. क्रोध आणि लोभ सोडून देऊन आपली मति तपश्चर्येकडे लाविली पाहिजे, आणि भिण्यासारखा प्रसंग आला असतांहि भितां उपयोगी नाहीं. तस्मात् वन हें दुःखकारक आहे. ह्यास्तव तुझें तें वनांत जाणें पुरे. वन तुला कल्याणकारक होणार नाहीं. विचार करून पाहूं लागले असतां वनांत असंख्य दोष असल्याचें मला दिसतें."

ह्याप्रमाणें तो महात्मा राम जेव्हां तिला वनांत नेण्याचें मनांत आणीना, तेव्हां त्याचें तें बोलणें मनास न आणितां सीता अतिशय दुःखित होऊन त्या रामाला बोलूं लागली.

सर्ग एकोणतिसावा.

स्वतःला वनांत नेण्याविषयीं सीतेची रामाला प्रार्थना.

हें रामाचें भाषण श्रवण करून दुःखित झालेल्या सीतेच्या मुखावर अश्रु गळूं लागले, आणि ती हळूहळू रामाला म्हणाली, "आपण जे वनांत वास्तव्य करण्यासंबंधानें दोष सांगितले, ते गुणच आहेत, असें आपण समजा. कारण आपल्या प्रीतीला पात्र अशी मी आहें, व आपल्या प्रेमाचें जें स्थान, तेथें कोणताहि दोष असण्याचा संभव नाहीं, अशी माझी खात्री आहे. श्वापदें, सिंह, गज, व्याघ्र व शरभ, चमर, सृमर वगैरे मृग आणि इतरहि जे कोणी वनांत संचार करणारे असतील, ते सर्व—आपलें रूप त्यांनीं पाहिलें नसल्यामुळें तें अवलोकन करितांक्षणीं—दूर निघून जातील. कारण आपणांला सर्व भितात. रामा, गुरुजनांच्या आज्ञेनें मला घेऊनच आपणांला गेलें पाहिजे. नाहीं तर हे राम, आपला वियोग झाला असतां मी येथें प्राणत्याग करीन. मी आपल्या जवळ असलें म्हणजे देवराज इंद्रहि बलात्कारानें माझा पराभव करण्यास समर्थ होणार नाहीं, मग इतरांची कथा कशास पाहिजे? ज्या स्त्रीला पतीचा वियोग झाला, तिच्यानें जीव धरून रहाणें शक्य नाहीं, आणि हे राम, अशा प्रकारें आपण स्वतः माझ्या निदर्शनालाहि आणून दिलेंच आहे. कारण भरताच्या मर्जीनें वागण्याचा जो आपण उपदेश केला आहे, त्याप्रमाणें वागणूक होणें माझ्याकडून अशक्यच असल्यामुळें, आपला वियोग झाला असतां मरण जवळ केल्यावांचून मला गत्यंतरच नाहीं. शिवाय हे महाबुद्धिमान, माझें खरोखर वनामध्यें वास्तव्य होणें आहे, असें पित्याचें घरीं असतांना ब्राह्मणांच्या मुखांतून मीं पूर्वी ऐकिलेलेंहि आहे. हे महाबलाढ्य, सामुद्रिक जाणणाऱ्या ब्राह्मणाचें हें वचन पित्याचे घरीं ऐकल्यापासून वनांत वास्तव्य करण्याविषयीं मी नेहमींच उत्सुक झालें आहें. वनवासासंबंधानें असलेला जो ईश्वरी नेमानेम, तो माझ्या हातून पार पडलाच पाहिजे. तस्मात् हे प्रिय, मी आपणांबरोबर वनांत येणार, ह्यांत अंतर पडणार नाहीं. मी आपल्याबरोबर वनांत येऊन ब्राह्मणांचें तें वचन शेवटास नेईन. तें सिद्धीस जाण्याचा हा समय प्राप्त झाला आहे. ह्यास्तव तें ब्राह्मणांचें वचन खरें होवो. हे वीरा, वनवासामध्यें जीं दुःखें नानाप्रकारांनीं होत असतात, तीं विषयाधीन पुरुषांना होत असतात, असें मी समजतें. माझ्या मातेसमोर

शमाचें अवलंबन करणाऱ्या एका भिक्षेकरिणीनें माझ्या दैवीं वनवास असल्याचें सांगितलें आहे, व तें कुमारिका असतांनाच पित्याच्या घरीं मीं ऐकिलें आहें. हे प्रभो, मीं कित्येक वेळां वनवासांत जाण्याविषयीं विनवण्या करून आपणांला प्रसन्न करून घेतलें आहे. सारांश, आपल्याबरोबर वनांत जाण्याची माझी इच्छा पुष्कळ दिवसांपासूनची आहे. हे राघव, आपलें देव बरें करो. वनांत निघण्याला मी अगदीं तयार झालें आहें. आपण शूर वनवास करीत असतांना आपली शुश्रूषा करणें माझ्या मनाला रुचत आहे. हे शुद्धबुद्धे, प्रेमभावानें भर्त्याच्या मागोमाग वनामध्यें गेलें म्हणजे मी लोकापवादापासून अलिप्त राहीन. शिवाय भर्ता हें स्त्रीचें मुख्य दैवत आहे. ह्या देहाचा त्याग करून आपण जाऊं लागलां असतांहि आपला समागम मला परलोकीं नेहमीं कल्याणकारक होणार आहे. हे महाबलाढ्य, यशस्वी ब्राह्मणांच्या मुखांतून अशा आशयाची श्रुतिहि ऐकू येत आहे कीं, ‘ स्वधर्माला अनुसरून इहलोकीं वडील माणसांनीं उदकपूर्वक जी स्त्री ज्याला दिलेली असते, तीच त्याची परलोकींहि स्त्री होते. ’ तस्मात् ह्याप्रमाणें सद्वर्तनानें राहून पातिव्रत्यानें वागत असलेल्या मला आपण कोणत्या कार्यास्तव ह्या नगरांतून घेऊन जाण्याचें मनांत आणीत नाहीं? हे ककुत्स्थकुलोत्पन्न, मला आपण वनामध्यें घेऊन जा. मी आपले ठिकाणीं अनुरक्त आहें, पतिव्रता आहें, दीन आहें व आपल्या सुखदुःखांचीहि सारखीच वांटेकरीण आहें. तस्मात् अशा प्रकारें दुःखित असलेल्या मला आपण जर वनांत नेण्याचें मनांत आणीत नसाल, तर मृत्यु येण्याविषयीं विषप्राशन करणें, अग्निकाष्ठ भक्षण करणें अथवा उदकांत उडी घालणें ह्यांपैकीं कांहीं तरी मी करणारच.”

ह्याप्रमाणें तिनें नानाप्रकारांनीं आपणांला वनांत नेण्याविषयीं रामाची प्रार्थना केली असतांहि महापराक्रमी रामानें निर्जन वनामध्यें तिला घेऊन जाण्याचें मान्य केलें नाहीं. तेव्हां तसें रामानें सांगितल्यावर सीता आपल्या नेत्रांतून गळणाऱ्या ऊष्ण अश्रूंच्या योगानें पृथ्वीला जशी कांहीं स्नानच घालूं लागली आणि चिंताक्रांत झाली. नंतर वनांत जाण्याच्या आग्रहापासून निवृत्त करण्याकरितां त्या जितेंद्रिय ककुत्स्थकुलोत्पन्न रामानें चिंताक्रांत होऊन क्रोधाविष्ट झालेल्या त्या वैदेहीचें पुष्कळ सांत्वन केलें.

सर्ग तिसावा.

वनांत येण्याविषयीं रामाची सीतेला अनुज्ञा.

जनककन्या सीतेचें राम सांत्वन करूं लागला असतां वनवासांत जाण्यासंबंधानें अनुमति मिळावी, एतदर्थ ती भर्त्याला बोलूं लागली. प्रथमतः अतिभयभीत झालेल्या त्या सीतेनें प्रेमामुळें व अभिमानानें विपुल वक्षःस्थलानें युक्त असलेल्या त्या रघुवंशज रामाची निंदा करण्यास सुरवात केली. ती म्हणाली, "हे रामा, पुरुषरूप धारण करणारा आणि वस्तुतः स्त्री असलेला जामाता मिळविल्यानें माझ्या मिथिलाधिपति पित्या जनकाला काय बरें वाटलें असेल? रामाचे ठिकाणीं जें उत्कृष्ट तेज आहे, तें ह्या प्रकाशित होणाऱ्या सूर्यामध्येंहि नाहीं, असें जर फिरून हे लोक कधीं अज्ञानानें म्हणूं लागले, तर तें असत्य आहे, असें मी समजेन. काय म्हणून आपण खिन्न झाला आहां? व आपणांला भय तरी कोठून प्राप्त झालें आहे? कारण फक्त आपणांवरच अवलंबून असलेल्या माझा त्याग करण्यास आपण उद्युक्त झालां आहां. द्युमत्सेनपुत्र वीर सत्यवानाला जशी सावित्री वश होती, तशी मी आपणांला वश आहें, असें आपण समजा. हे निष्पाप राघव, कुलाला बट्टा लावणारी एखादी स्त्री जशी परपुरुषाकडे पहात असते, तशी मी आपल्यावांचून दुसऱ्याकडे पाहण्याचें मनांतहि आणणार नाहीं. मी आपल्याबरोबर येईन. तरुण, अगदीं लहानपणापासून आपल्याबरोबर राहिलेली आणि पतिव्रता अशी मी आपली भार्या असतांना, स्त्रीवर उपजीविका करणाऱ्याप्रमाणें आपण मला परपुरुषाला देण्याची इच्छा करीत आहां. हे निष्पाप, ज्याच्या मर्जीप्रमाणें वागत जा, म्हणून आपण मला उपदेश करीत आहां, आणि ज्याच्याकरितां आपला अभिषेकसमारंभ हाणून पडलेला आहे, त्याच्या मर्जीप्रमाणें आपणच वागत जा, आणि त्याचे आज्ञाधारकहि आपणच व्हां. माझ्यानें ती गोष्ट होणार नाहीं. सारांश, मला घेतल्यावांचून वनांत निघणें आपणांला योग्य नाहीं. आपल्यासहवर्तमान मला तप, अरण्य अथवा स्वर्ग ह्यांपैकीं कांहींहि प्राप्त होवो क्रीडास्थानांतील शय्येवर पडल्यानें ज्याप्रमाणें कांहीं श्रम होत नाहींत, त्याचप्रमाणें आपल्या मागोमाग मी वनामध्यें येऊं लागलें असतां मार्गामध्यें मला कसल्याहि प्रकारचे श्रम होणार नाहींत. स्वामिन्, मी आपल्याबरोबर असलें म्हणजे, कुश, काश, शर, लव्हाळें आणि इतर जे कांहीं कंटक वृक्ष मार्गामध्यें असतील, त्या सर्वांचा स्पर्श मला

कापसाच्या अथवा कृष्णाजिनाच्या स्पर्शाबरोबर होईल. हे नाथ, मोठा वारा सुटून जी धूळ माझ्या अंगावर येऊन पडेल, तें मी अत्युत्तम चंदनच समजत आहें. वनचर बनल्यानंतर वनामध्यें मी जेव्हां कोमल तृणांत शयन करीन, तेव्हां त्या शयनापेक्षां राजवाड्यामध्यें लोंकरीच्या कापडांचीं मऊ मऊ आस्तरणें घातलेल्या मंचकावरील शयन मला जास्ती का सुखकर होणार आहे ? पानें, मुळें अथवा फळें ह्यांपैकीं जें कांहीं थोडेंबहुत आपण स्वत: मला आणून द्याल, तें मला अमृतासारखें होईल. ऋतूंना अनुसरून जीं जीं पुष्पें अथवा फळें मिळतील, त्यांचें सेवन करूं लागलें असतां मला मातेचें, पित्याचें अथवा घराचें स्मरण देखील होणार नाहीं. मी आल्यानें आपलें कांहीं अप्रिय होईल, असें आपण मुळींच मनामध्यें आणूं नका, व माझ्याकरितां आपणांला वाईट वाटण्याचेंहि कारण नाहीं. माझें पोषण करणें आपल्याला कांहीं कठीण जाणार नाहीं. आपल्याबरोबर जी स्थिति मला प्राप्त होईल, तोच माझा स्वर्ग आहे; आणि आपला वियोग होऊन कसलीहि स्थिति जरी प्राप्त होणार असली, तरी तो मला नरक आहे. हे राम, हें माझें आपल्या ठिकाणीं असलेलें पराकाष्ठेचें प्रेम जाणून, आपण मला बरोबर घेऊन वनांत जा. ह्याप्रमाणें एकनिष्ठपणानें सेवा करणाऱ्या मला जर आपण वनांत नेत नसाल, तर शत्रूच्या अधीन होऊन राहण्यापेक्षां मी आजच्या आज विषप्राशन करीन. हे नाथ, आपण माझा त्याग करून गेला म्हणजे आपल्या मागें तरी दु:खामुळे जिवंत राहणें मला शक्य नाहींच. तेव्हां आपण वनवासांत निघण्यापूर्वींच मरण येणें अधिक श्रेयस्कर आहे. कारण असें झाल्यानें वियोगदु:ख तरी मला होणार नाहीं. मला हा शोक एक क्षणभर देखील सहन होणार नाहीं, मग चौदा वर्षेंपर्यंत मी कोठून दु:खित रहाणार ? ''

ह्याप्रमाणें त्या शोकसंतप्त झालेल्या सीतेनें दीन वाणीनें अतिशय विलाप केले, आणि आपल्या जिवाला फारच त्रास करून घेऊन व पतीला वारंवार कवटाळून धरून तिनें मोठमोठ्यानें आक्रोश केला. विषलिप्त बाणांनीं विद्ध झालेल्या हत्तिणीप्रमाणें रामाच्या अनेक भाषणांनीं विद्ध झालेली ती सीता, अग्नि बाहेर टाकणाऱ्या अरणीप्रमाणें फार वेळपर्यंत दाबून ठेविलेले अश्रू ढाळूं लागली. संतापामुळें तिच्या नेत्रांतून गळूं लागलेलें तें स्फटिकासारखें स्वच्छ जल कमलां-तून गळणाऱ्या उदकाप्रमाणें दिसूं लागलें. दीर्घ नेत्रांनीं युक्त आणि पौर्णिमेच्या

निर्मल चंद्राप्रमाणें असलेलें तिचें तें मुख, अश्रूंमुळें उदकांतून बाहेर काढलेल्या कमलाप्रमाणें शुष्क दिसूं लागलें. असो.

ह्याप्रमाणें दु:खित होऊन गतप्राण झाल्याप्रमाणें पडलेल्या त्या सीतेला शुद्धीवर आणण्याकरितां हातांनीं कवटाळून धरून राम म्हणाला, " हे देवि, तुला दु:ख होत असेल तर स्वर्गाचीहि मला अभिरुचि नाहीं, आणि स्वयंभु ब्रह्मदेवाप्रमाणें मला कोठूनहि भय प्राप्त होण्याचा संभव नाहीं; परंतु हे सुमुखि, तुझा सर्व अभिप्राय न समजल्यामुळें, मी तुझें रक्षण करण्यास समर्थ असतांनाहि तुझें अरण्यांत वास्तव्य मला बरें वाटलें नाहीं. हे मैथिली, माझ्यासहवर्तमान वनवास करण्याकरितां जर तुला ब्रह्मदेवानें निर्माण केली आहे, तर—आत्मवेत्त्या पुरुषाला दयेचा त्याग करणें जसें अशक्य आहे तसेंच—माझ्या हातून तुझा त्याग होणें अशक्य आहे. हे गजगामिनि, पूर्वी सज्जनांनीं जो धर्म आचरिलेला आहे, त्याच धर्माच्या अनुरोधानें मी वागेन; आणि तूंहि सूर्याला अनुसरून वागणाऱ्या सुवर्चलेप्रमाणें मला अनुसरून वाग. हे जनककन्ये, माझें वनांत जाणें होणार नाहीं, असें होणेंच नाहीं. कारण सत्यानें युक्त असलेलें तें पित्याचें वचन मला वनांत नेत आहे. हे सुंदरी, मातापितरांच्या अधीन असणें हा धर्म आहे. तस्मात् त्यांच्या आज्ञेचें उल्लंघन करून प्राण धारण करण्याची माझी इच्छा नाहीं. माता, पिता व गुरु हें आपलें हातचें दैवत टाकून आपल्या स्वाधीन जें नाहीं, अशा दुसऱ्या दैवताची नानाप्रकारांनीं आराधना करावी तरी कशी? ज्यांचें आराधन केलें असतां धर्म, अर्थ व काम ह्या त्रिवर्गाची प्राप्ति होऊन त्रैलोक्याचें आराधन केल्याचें श्रेय येतें, त्या मातापितरांच्या सेवेसारखी दुसरी कोणतीहि पवित्र गोष्ट ह्या पृथ्वीवर नाहीं. म्हणून हे सुलोचने, मी हें करीत आहें. हे सीते, ज्याप्रमाणें पितृसेवा परलोकहितावह होते, त्याप्रमाणें सत्य, दान, मान अथवा विपुल दक्षिणेनें युक्त असा यज्ञहि होत नाहीं. वडिलांच्या मर्जीप्रमाणें वागणाऱ्याला स्वर्ग, धन, धान्य, विद्या, पुत्र आणि सुख ह्यांपैकीं कांहींच दुर्लभ नाहीं. मातापितरांच्या सेवेमध्यें तत्पर राहणाऱ्या महात्म्यांना देवलोक, गंधर्वलोक, गोलोक, ब्रह्मलोक व इतरहि शुभ लोक प्राप्त होतात. सत्य धर्माच्या मार्गानें वागणारा माझा पिता ज्याप्रमाणें आज्ञा करीत आहे, त्याप्रमाणें वागण्याची माझी इच्छा आहे. कारण तोच सनातन धर्म आहे. हे सीते, तुला दंडकारण्यांत नेण्यासंबंधानें माझें जें विरुद्ध मत होतें, तें नाहींसें झालें आहे. कारण वनांत वास्तव्य करणारच अशा दृढ निश्चयानें माझ्या मागोमाग येण्याचें

तूं निश्चित केलें आहेस. तस्मात् हे सुंदरी, हे आरक्तनयने, मी तुला वनांत येण्याची अनुज्ञा देतों. अग भित्रे, तूं माझ्याबरोबर चल आणि माझी सहधर्मचारिणी हो. सीते, तूं जो हा अत्युत्कृष्ट निश्चय केला आहेस, तो तुझ्या स्वत:च्या व माझ्या कुलाला अनुसरून असाच आहे. हे सुंदरी, आतां वनवासाला योग्य अशीं जीं कांहीं कृत्यें तुला करावयाचीं असतील, तीं कर. तुझ्यावांचून आतां मला स्वर्गहि रुचणार नाहीं. ब्राह्मणांना रत्नें दान कर, बुभुक्षित भिक्षुकांना भोजन घाल आणि निघण्याची त्वरा कर; विलंब लावूं नको. मोठीं मौल्यवान भूषणें, मोठमोठीं वस्त्रें, मनोहर अशीं क्रीडासाधनें, शय्या, वाहनें, आणि इतरहि जें जें म्हणून कांहीं असेल, तें तें ब्राह्मणांना देऊन शिल्लक राहिल्यावर आपल्या सेवकवर्गाला देऊन टाक."

असें रामानें सांगितल्यानंतर आपलें वनांत जाणें भर्त्याला इष्ट आहे, असें समजून आल्यामुळें सीता देवी तत्क्षणीं आनंदित झाली, आणि तिनें रत्नें वगैरे देण्याला आरंभ केला.

सर्ग एकतिसावा.

वनांत येण्याविषयीं लक्ष्मणाला रामाची अनुज्ञा.

ह्याप्रमाणें संवाद ऐकून, त्यापूर्वीं आलेल्या लक्ष्मणाचें मुख अश्रूंनीं भरून गेलें, आणि शोक सहन करणें त्याला अशक्य झालें. तेव्हां तो रघुनंदन लक्ष्मण भ्रात्याचे चरण घट्ट धरून अतियशस्वी सीतेसहवर्तमान महाव्रतस्थ रामाला म्हणाला, "मृग व गज ह्यांनीं युक्त असलेल्या वनांत जाण्याचा जर आपला निश्चय झाला असेल, तर धनुष्य धारण करून मी आपल्या बरोबरच वनांत जाण्याला पुढें होणार. पक्षी आणि भृंगसमुदाय ह्यांच्या योगानें आसमंतात नादित झालेल्या रम्य अरण्यामध्यें माझ्यासहवर्तमान आपण संचार करा. आपणांवांचून देवलोकाला जाण्याची, अमरपणाची अथवा त्रैलोक्याच्या आधिपत्याचीहि मला इच्छा नाहीं."

ह्याप्रमाणें बोलणाऱ्या लक्ष्मणाचा वनवासाविषयीं निश्चय झाला. तेव्हां रामानें नानाप्रकारें त्याचा निषेध केला असूनहि तो म्हणाला, "आपण जर मला पूर्वींच वनांत येण्याची अनुज्ञा दिली आहे, तर पुनरपि आतां आपण

माझें निवारण कां करितां? मी जाण्याची इच्छा करीत असतांना आपण कशाकरितां मला अडथळा करीत आहां, हें जाणण्याची माझी इच्छा आहे. कारण हे निष्पापा, मला ह्याबद्दल संशय आहे."

ह्यानंतर आपल्यापूर्वी जाण्यास तयार, समंजस आणि हात जोडून प्रार्थना करीत समोर उभ्या असलेल्या लक्ष्मणाला महातेजस्वी राम म्हणाला, "तूं माझे ठिकाणीं प्रेम करणारा, धर्माविषयीं रत, विचारी, नेहमीं सन्मार्गानें वागणारा, प्राणाप्रमाणें मला प्रिय, माझ्या अधीन व माझा आज्ञाधारक असा सखा आहेस; परंतु लक्ष्मणा, तूं आज माझ्याबरोबर त्या वनांत निघालास म्हणजे कौसल्येची अथवा यशस्विनी सुमित्रेची शुश्रूषा कोण करणार? पृथ्वीवर जलवर्षाव करणाऱ्या पर्जन्याप्रमाणें मनोरथसिद्धीची जो वृष्टि करीत असतो, तो महातेजस्वी भूपति आज कामपाशांत जखडून गेलेला आहे. तेव्हां अश्वपति राजाची कन्या ती कैकेयी हें राज्य प्राप्त झाल्यावर दुःखानें गांजलेल्या आपल्या सवतींना चांगलें करणार नाहीं. राज्य प्राप्त झाल्यावर, कैकेयीच्याच धोरणानें वागणाऱ्या भरताला कौसल्येचें अथवा अत्यंत दुःखित झालेल्या सुमित्रेचें स्मरण देखील होणार नाहीं. ह्यास्तव लक्ष्मणा, येथें राहून तूं स्वतः अथवा राजाच्या अनुग्रहानें त्या साध्वींचें आणि कौसल्येचें पोषण करून मीं सांगितल्याप्रमाणें वाग. असें केलें असतां माझे ठिकाणीं असलेलें तुझें प्रेम तूं चांगल्या प्रकारें दर्शविलेंस, असें होईल. हे धर्मवेत्त्या, वडिलांना मान देणें हा एक मोठा अनुपम धर्म आहे. तस्मात् हे रघुनंदना, माझ्याकरितां तूं असें कर. आपण टाकून गेलों म्हणजे आपल्या मातेला सुख होणार नाहीं."

ह्याप्रमाणें मधुर वाणीनें रामानें सांगितलें असतांहि, भाषण कसें करावें हें जाणणारा लक्ष्मण दुसऱ्याच्या भाषणांतील मर्म जाणणाऱ्या रामाला म्हणाला, "हे वीरा, तुझ्याच तेजाच्या योगानें भरत आत्मसंयमन करून कौसल्येला व सुमित्रेला मान देईल, ह्यांत संशय नाहीं. हे वीरा, उन्मार्गाचें अवलंबन करून दुष्टबुद्धीनें आणि विशेषतः गर्वानें ह्या प्राप्त झालेल्या राज्याचें जर भरत उत्कृष्ठ रीतीनें परिपालन न करील, तर त्या क्रूर व दुष्टमति भरताचा मी निःसंशय वध करीन. इतकेंच नव्हे, परंतु त्याच्या पक्षाचे जे कांहीं असतील, त्या सर्वांचा वध करून मी त्रैलोक्याचाहि वध करीन. शिवाय ती साध्वी कौसल्या माझ्यासारखे हजारों पोसण्याला समर्थ आहे. कारण तिच्यावर अवलंबून असलेल्या लोकांकरितां हजार गांव तिला मिळालेले आहेत. तस्मात् ती

बिचारी कौसल्या आपल्या स्वतःचें, माझ्या मातेचें आणि माझ्यासारख्या हजारोंचें पोषण करण्यास समर्थ आहे. आपण मला अनुयायी करा. ह्यांत कांहीं एक धर्मविरुद्ध होत नाहीं. तसें झाल्यानें मी कृतकृत्य होईन, आणि आपलेंहि कार्य होईल. ह्यास्तव प्रत्यंचेसहवर्तमान धनुष्य धारण करून आणि कुदळ व एक परडी बरोबर घेऊन आपणांला मार्ग दाखविण्याकरितां मी आपल्या पुढेंच जाणार. मी नेहमीं वनांतील मुळें, फळें व तपस्व्यांच्या होम-कर्माला योग्य असे इतरहि पदार्थ तुम्हांला नित्य आणून देत जाईन. तुम्ही खुशाल पर्वतावर वैदेहि सीतेसहवर्तमान क्रीडा करीत जा. तुम्ही जागे असतांना अथवा शयन करीत असतांना मी सर्व कांहीं करीन. "

लक्ष्मणाच्या ह्या सांगण्यानें राम अतिशयच प्रसन्न झाला, आणि त्याला म्हणाला, "तर मग सर्व सुहृदांचा निरोप घे आणि चल. जनकाच्या महा-यज्ञामध्यें, दिसण्यांतहि भयंकर अशीं जीं दोन धनुष्यें स्वतः जनक राजाला महात्म्या वरुणानें दिलीं होतीं, तीं दिव्य व अभेद्य कवचें, अक्षय बाणांनीं भर-लेले भाते व सुवर्णांनीं मढविलेले आणि सूर्याप्रमाणें प्रभा असलेले असे दोन निर्मल खड्ग हे सर्व सत्कारपूर्वक आचार्यांच्या घरीं ठेव, आणि सर्व आयुधें घेऊन तूं सत्वर चल."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां वनवासाला जाण्याचा निश्चय केलेल्या लक्ष्मणानें आपल्या मित्रमंडळींचा निरोप घेऊन व इक्ष्वाकुकुलांतील गुरूंकडे जाऊन त्यानें उत्कृष्ठ धनुष्य हातांत घेतलें. तदनंतर नृपश्रेष्ठ लक्ष्मणानें पुष्पांनीं भूषित आणि पूजा केलेलें असें तें सर्व आयुधांच्या ठिकाणीं असलेलें दिव्य धनुष्य रामाला दाखविलें. तेव्हां जवळ आलेल्या लक्ष्मणाला जितेंद्रिय राम प्रीतीनें म्हणाला, "हे सौम्या, मीं मनांत योजिलेल्या वेळींच तूं आला आहेस. हे शत्रु-तापना, हें जें म्हणून कांहीं माझें धन आहे, तें तपस्वी ब्राह्मणांना मी तुझ्या-सहवर्तमान देऊन टाकण्याची इच्छा करीत आहें. आपल्या गुरूंशीं दृढ प्रेमानें वागणारे आणि आपल्यावर उपजीविका करणारे ह्या सर्वांना मला आणखी दान देण्याची इच्छा झाली आहे. ब्राह्मणांमध्यें श्रेष्ठ अशा वसिष्ठपुत्र आर्य सुयज्ञाला तूं सत्वर घेऊन ये, म्हणजे त्या सर्व ब्राह्मणांचें आणि अवशिष्ट राहिलेल्या इतर-हि द्विजांचें पूजन करून मी वनामध्यें जाईन."

सर्ग बत्तिसावा.

आश्रितादिकांना द्रव्यादि दान.

तदनंतर प्रिय आणि हितावह अशी आपल्या भ्रात्याची ती आज्ञा मान्य करून लक्ष्मण सत्वर तेथून निघून सुयज्ञाच्या घरीं गेला, आणि होमशाळेंत बसलेल्या त्या विप्राला वंदन करून त्याला म्हणाला, 'हे मित्रा, पहा, अघटित कृत्य करणाऱ्या रामाच्या घरीं एकदां चल.' तदनंतर मध्यान्ह संध्या करून व लक्ष्मणाला बरोबर घेऊन तो रम्य आणि वैभवसंपन्न अशा रामाच्या गृहामध्यें गेला. तेव्हां तो वेदवेत्ता सुयज्ञ आला असतां होमकालीं पूजन केलेला अग्निच आला आहे कीं काय असें समजून राम सीतेसहवर्तमान हात जोडून त्याला सामोरा गेला. सुवर्णमय अशीं श्रेष्ठ बाहुभूषणें, शुभ कुंडलें, सोन्यांत ओंवलेल्या रत्नमाला, कडीं, आंगठ्या आणि इतरहि अनेक रत्नें ह्यांच्या योगानें सुयज्ञाचा सत्कार केल्यावर व त्याच्या भार्येला अलंकार वगैरे देण्याविषयीं सीतेनें सांगितल्यानंतर ककुत्स्थकुलोत्पन्न राम सुयज्ञाला म्हणाला, "हे सौम्या, हार आणि ही सोन्याची गळसरी तूं आपल्या भार्येकडे पाठीव. हे विप्रा, तुझ्या भार्येची ही सखी सीता कमरपट्टाहि तिला देण्याच्या विचारांत आहे. अद्भुत् बाहुभूषणें आणि उत्कृष्ट कडीं तुझ्या भार्येला तिची सखी वनांत जातांना देऊन टाकण्याच्या विचारांत आहे. नानाप्रकारच्या रत्नांनीं भूषित आणि उत्कृष्ट आस्तरणांनीं युक्त असा मंचकहि दानपूर्वक तुझ्या घरीं वैदेहि पोहोंचविणार आहे. हे द्विजश्रेष्ठ, शत्रुंजय म्हणून जो गज मला मातुलानें दिला आहे, तो मी सहस्र निष्कांसहवर्तमान तुला देतों."

ह्याप्रमाणें रामानें सांगितल्यावर सुयज्ञानें त्या दानाचा स्वीकार करून राम, लक्ष्मण आणि सीता ह्यांना कल्याणकारक आशीर्वाद दिले. तेव्हां देवराज इंद्राला ब्रह्मदेवच सांगत आहे कीं काय असा तो प्रिय राम आपल्या एकनिष्ठ व प्रिय भाषण करणाऱ्या भ्रात्या लक्ष्मणाला म्हणाला, "लक्ष्मणा, आगस्त्य आणि विश्वामित्र ह्या उभयतां द्विजश्रेष्ठांना बोलावून आणून तूं त्यांचें पूजन कर, आणि नंतर पर्जन्य ज्याप्रमाणें उदकांची पिकांवर वृष्टि करितो, त्याप्रमाणें रत्नांची वृष्टि करून तूं त्यांना तृप्त कर. हे महापराक्रमी पुरुषश्रेष्ठा, सहस्र गायी, सुवर्ण, रजत आणि मोठमोठीं रत्नें ह्यांच्या योगानें तूं त्यांचें संतर्पण कर. तैत्तिरीय शाखा म्हणणाऱ्यांचा आचार्य, सद्गुणी आणि वेदवेत्ता असा जो अनुरक्त ब्राह्मण कौसल्येची आशीर्वाद देऊन सेवा करीत असतो, त्या ब्राह्मणाला तो संतुष्ट

होईपर्यंत वाहनें, दासी आणि रेशमी वस्त्रें तूं देवीव. हा चित्ररथ नामक सारथि फार दिवस आपल्या घरीं राहिला असून सभ्य व सल्ला-मसलत देणारा आहे. तेव्हां मोठमोठीं मौल्यवान रत्नें, वस्त्रें, संपत्ति सर्व प्रकारचे पशु आणि सहस्र गायी देऊन तूं त्याला संतुष्ट कर. कठकालापशाखांचे अध्ययन करणारे असे जे पुष्कळ दंड धारण करणारे माझे मित्र नेहमीं वेदाध्ययन करण्याविषयीं तत्पर असल्यामुळें दुसरें कांहींएक करीत नाहींत, मिष्टान्नाची इच्छा करणारे असूनहि भिक्षेला वगैरे जाण्याचा ज्यांना कंटाळा आहे, आणि मोठ्या लोकांनाहि जे मान्य आहेत, त्यांना ऐशीं उंट रत्नें, हजार बैल भात, उसळीला वगैरे उपयोगीं पडणारे दोनशें बैल धान्य आणि सहस्र गायी तूं दे. लक्ष्मणा, ब्रह्मचारी लोकांचा एक मोठा समुदायच विवाहाकरितां कौसल्येकडे येत असतो. त्यांपैकीं प्रत्येकाला हजार हजार मोहरा तूं देवीव. लक्ष्मणा, आपल्या कौसल्या मातेला आनंद होईल अशा रीतीनें सर्व प्रकारें तूं त्या सर्व ब्राह्मणांचें पूजन कर. ''

तदनंतर स्वतः रामानें सांगितलेलें तें धन पुरुषश्रेष्ठ लक्ष्मणानें श्रेष्ठ ब्राह्मणांना कुबेराप्रमाणें अर्पण केलें. नंतर अश्रूंनीं ज्यांचा कंठ दाटून आलेला आहे व जे तेथें उभे राहिले आहेत अशा आपल्या आश्रितांना, उपजीविकेला पुरण्यापुरतें विपुल द्रव्य प्रत्येकाला देऊन, तो राम म्हणाला, ' मी येईतोंपर्यंत लक्ष्मणाचें घर व माझें हें घर तुम्ही एकेकजण राखीत जा. ' असें त्या तेथें जुळलेल्या सर्व दुःखित व आश्रित लोकांना सांगून ' माझ्याकडे धन घेऊन ये ' म्हणून धनाध्यक्षाला रामानें सांगितलें असतां, सर्वहि सेवक त्याच्याकडे धन घेऊन आले. तेव्हां त्या ठिकाणीं बघण्यासारखा फारच मोठा द्रव्याचा ढीग दृष्टीस पडूं लागला. तदनंतर लक्ष्मणासहवर्तमान त्या पुरुषश्रेष्ठ रामानें बालापासून तों वृद्धापर्यंत दीन ब्राह्मणांना तें द्रव्य देऊन टाकिलें. त्या ठिकाणीं वर्णानें पिंगट असा एक गार्ग्यगोत्री त्रिजट म्हणून ब्राह्मण होता. त्याच्या उपजीविकेला कांहीं साधन नसल्यामुळें खोरें, कुदळ व नांगर घेऊन तो नेहमीं वनामध्यें फिरत असे. त्या वृद्ध ब्राह्मणाकडे आपल्या लहान लहान मुलांना आणून त्याची तरुण भार्या त्याला म्हणाली, ' भर्ता हें स्त्रियांचें दैवत आहे. असें असल्यामुळें मी आपणांला सांगणें जरी योग्य नव्हे, तरी ह्या वेळीं आपण माझें ऐकाच. हें खोरें व कुदळ टाकून देऊन आपण जर धर्मज्ञ रामाची भेट घ्याल, तर आपणाला कांहीं तरी मिळेल. '

हें भार्येचें भाषण श्रवण केल्यावर, फारच जीर्ण झाला असल्यामुळें अंगावर घेण्यासहि अयोग्य असा एक पंचा त्यानें अंगावर घेतला, आणि ज्या मार्गाला रामाचें घर होतें, तिकडे तो वृद्ध ब्राह्मण निघाला. भृगु आणि अंगिरा ह्यांप्रमाणें तो त्रिजट ब्राह्मण देदीप्यमान असल्यामुळें रामाच्या वाड्यांतील पांचव्या चौकांत येइतोंपर्यंत त्याला कोणीहि आडकाठी केली नाहीं. तेव्हां रामाकडे जाऊन तो त्रिजट म्हणाला, 'हे महाबलाढ्य राजपुत्रा, मी निर्धन असून माझ्या पदरीं बरींच मुलेंबाळें आहेत व माझ्या उपजीविकेला कांहीं साधन नसून मी नेहमीं वनामध्यें हिंडत असतों. करितां माझ्याकडे कृपादृष्टी कर.'

हें ऐकून राम थट्टेनें त्याला म्हणाला, "गायींपैकीं मी अजून एक हजार गायीदेखील कोणाला दिल्या नाहींत. ह्यास्तव आपण हा दंड जितका लांब फेकाल तितक्या प्रदेशभर आपणांला गायी मिळतील." रामानें असें सांगितल्यावर त्या त्रिजटानें लगबगीनें तो पंचा कमरेभोंवतालीं गुंडाळिला, आणि सर्व सामर्थ्यानें तो दंड गरगर फिरवून वेगावेगानें फेकून दिला. त्या त्रिजटाच्या हातांतून सुटलेला तो दंड सरयू नदी ओलांडून, हजारों गायी ज्यामध्यें आहेत, अशा गोठ्यांत बैलांचे समीप जाऊन पडला. तदनंतर सरयूच्या ह्या तीरापासून दंडपतनापर्यंत असलेल्या प्रदेशामध्यें जितक्या गायी मावल्या तितक्या गायी त्रिजटाच्या आश्रमाला पोहोंचवून, धर्मनिष्ठ रामानें त्याची कडकडून भेट घेतली; आणि गार्ग्यगोत्री त्रिजटाचें सांत्वन करीत करीत राम त्याला म्हणाला, "आपण क्रुद्ध होऊं नका. खरोखर ही मीं थट्टा केला. आपलें जें हें अनुल्लंघनीय तेज, तें जाणण्याच्या इच्छेनें मी आपणांला ही गोष्ट करावयास सांगितली. आतां गायींशिवाय दुसरेंहि कांहीं पाहिजे असल्यास आपण मागावें. मी हें आपणांला खरें खरें सांगत आहें. आपण संकोच धरूं नका. माझें जें जें म्हणून धन आहे, तें ब्राह्मणांकरितां आहे. कारण आपल्याला उत्तम प्रकारें दान केल्यानें मीं मिळविलेलें द्रव्य मला यशस्कर होईल."

ह्याप्रमाणें रामानें सांगितल्यानंतर गायींचा समुदाय घेऊन तो महामुनि त्रिजट भार्येसहवर्तमान आनंदित झाला. यश, बल, आनंद व सुख वृद्धिंगत करणारे आशीर्वाद त्यानें महात्म्या रामाला दिले. नंतर महापराक्रमी रामानें धर्माला अनुसरून असलेल्या सामर्थ्यांनीं मिळविलेलें असंख्य धन मित्रांना दिलें. कारण फार दिवसांपासून ते त्याच्याशीं योग्यतेप्रमाणें मान-

मान्यतापूर्वक भाषण करीत असल्यामुळें त्यांना देणगी देण्याविषयीं त्याच्या मनांत प्रेरणा झाली होती. सारांश, योग्यतेप्रमाणें मानमान्यता, देणगी आणि आदर ह्यांच्या योगानें संतुष्ट न केलेला असा कोणीहि ब्राह्मण, मित्र, सेवक अथवा दरिद्री भिक्षेकरी तेथें नव्हता.

सर्ग तेहतिसावा.

श्रीरामाच्या वनगमनासंबंधीं लोकांचे विचार.

वैदेहीसहवर्तमान ब्राह्मणांना विपुल द्रव्य दिल्यानंतर रघुवंशज राम व लक्ष्मण त्या सीतेला बरोबर घेऊन पित्याला भेटण्याकरितां गेले. तेव्हां त्यांचीं धनुष्यें सेवकांनीं घेतलेलीं होतीं. सीतेनें पूजा केलेलीं तीं धनुष्यें पुष्पमालारूप रज्जूंनीं युक्त असल्यामुळें शोभत होतीं. राम-लक्ष्मण पित्याला भेटण्याकरितां बाहेर पडल्यानंतर उदासीन असे श्रीमान लोक घरें, वाडे आणि सात सात मजली घरांवरील गच्च्या ह्यांवर आरूढ होऊन पाहूं लागले. लोकांची अतिशय गर्दी झाल्या कारणानें रस्त्यांत जाणें शक्य नसल्यामुळें दीन लोक आपापल्या घरावर चढून तेथून रामाकडे पाहूं लागले; आणि लक्ष्मण व सीता ह्यांसहवर्तमान त्या पादचारी रामाला अवलोकन करून शोकानें ज्यांचें मन गोंधळून गेलेलें आहे, असे पुष्कळ लोक म्हणाले, ‘ जो जाऊं लागला असतां मोठें चतुरंग सैन्य मागोमाग जात असे, त्या सीतेसहवर्तमान एकाकी चालणाऱ्या रामाच्या मागोमाग आज फक्त लक्ष्मण जात आहे. ऐश्वर्याचें सुख जाणणारा असून भोग्य वस्तूंची तर मोठी खाणच कीं काय असा तो राम धर्मगौरवामुळें आपल्या पित्याचें वचन असत्य करण्याचें मनांत आणीतच नाहीं. पूर्वी जी आकाशामध्यें संचार करणाऱ्या प्राण्यांच्याहि दृष्टीस पडणें शक्य नव्हतें, त्या सीतेला आज भररस्त्यांतील लोक पहात आहेत. उटी आणि रक्तचंदन अंगाला लावण्याची जिला संवय आहे, त्या सीतेला पर्जन्यवृष्टि, ऊष्ण आणि शीत हीं तेव्हांच निस्तेज करून टाकतील. खरोखर कोणी तरी पिशाचानें झपाटल्यामुळें आज हा दशरथ असें बोलत आहे. कारण असें जर नसेल तर प्रिय पुत्राला दशरथ राजानें हांकून लावणें, हें मुळींच संभवनीय नाहीं. पुत्र गुणहीन जरी झाला तरी पित्यानें त्याला हाकून लावणें संभवेल कसें? तेव्हां केवळ आपल्या वर्तनानें ज्यानें हे लोक आपलेसे करून टाकिले आहेत, त्या रामाला हांकून

लावण्यास पित्यानें तयार होण्याची गोष्ट पाहिजे कशाला? (तस्मात् दशरथ राजाला कोणी तरी पिशाच्चानें झपाटलें असावें, हीच गोष्ट खरी.) अहिंसा, दया, शास्त्राध्ययन, सुस्वभाव, इंद्रियदमन व मनोनिग्रह हे सहा गुण पुरुषश्रेष्ठ रामाला शोभा देत आहेत. तस्मात् ग्रीष्म ऋतूमध्यें उदकाचा क्षय झाला असतां ज्याप्रमाणें जलचर प्राण्यांना अति दुःख होतें, त्याप्रमाणें त्या रामाच्या पीडेनें प्रजाजनांना पराकाष्ठेचें दुःख झालेलें आहे. सारांश मुळावरतींच कुऱ्हाड घातल्यावर ज्याप्रमाणें पुष्पफलांसहवर्तमान वृक्ष पीडित होतो, त्याप्रमाणें ह्या जगदीशाला पीडा झाल्यामुळे सर्व जगत् पीडित झालें आहे. धर्म हेंच ज्याचें सार आहे, असा हा महातेजस्वी राम प्राणिमात्रांचें मूळ असून इतर प्राणी ह्याच्या शाखा, पुष्पें, फलें व पानें आहेत. ह्यास्तव ज्या मार्गानें रघुवंशज राम जात आहे, त्या मार्गानें त्याच्या मागोमाग जाणाऱ्या लक्ष्मणाप्रमाणें आपणहि भार्या आणि बांधव ह्यांसहवर्तमान सत्वर त्याच्या मागोमाग जाऊं. बागा, शेतें आणि घरें टाकून देऊन आपण धर्मनिष्ठ रामाच्या मागोमाग जाऊं. कारण त्याचें जें दुःख तेंच आमचें दुःख असून त्याचें जें सुख तेंच आमचें सुख आहे. ज्यांतील द्रव्य काढून नेलें आहे, देवतांनींहि ज्याचा त्याग केला आहे, उंदीर ज्यामध्यें इकडे तिकडे धांवत आहेत, आणि त्यामुळेंच बिळांनीं जें व्याप्त झालेलें आहे, ज्यांतील उदक व धूम हीं नाहींतशीं झालीं आहेत, सडासंमार्जनहि ज्यांत बंद झालेलें आहे, बलिदान, पूजा, मंत्र, होम व जप ह्यांचा ज्यामध्यें नायनाट झालेला आहे, व दुष्काळामुळें मोडतोड होऊन ज्यांतील भांडींकुडीं फुटून गेलेलीं आहेत अशीं आम्हीं टाकिलेलीं घरें कैकेयीला मिळोत. ज्या अर्थी राम वनामध्यें चालला आहे, त्या अर्थी तें वन नगर होवो, आणि आम्हीं सोडिलेलें नगर वनच बनो. आम्हांला पाहून भयभीत झालेले सर्व सर्प बिळांचा, पशुपक्षी पर्वतशिखरांचा आणि गज व सिंह वनांचा त्याग करोत. आम्हीं सोडिलेलें नगर ह्या सर्पादिकांना मिळो, आणि तृण, मांस व फलें जेथें प्राप्त होतात अशा—सर्प, मृग व पक्षी ह्यांनीं युक्त असलेल्या—वनाचें आम्ही सेवन करूं लागलों असतां सर्पादि प्राणी तें सोडून जावोत. अशा प्रकारचा प्रदेश बांधव आणि पुत्र ह्यांसहवर्तमान कैकेयीला मिळो. आम्ही सर्व रघुवंशज रामासहवर्तमान वनामध्यें सुखानें वास्तव्य करूं."

ह्याप्रमाणें नानाप्रकारचीं भाषणें अनेक प्रकारचे लोक करूं लागले व तीं रामानें ऐकिलीं. तथापि त्याच्या मनाला कांहींएक विकार झाला नाहीं. मत्तगजाप्रमाणें ज्याची चालण्याची ढब आहे, असा तो धर्मात्मा राम लोकांच्या

भाषणाकडे लक्ष्य न देतां कैलास पर्वताच्या शिखराप्रमाणें असलेल्या आपल्या मातेच्या निवासस्थानाकडे चालला. नंतर ज्यामध्यें विनयशील व शूर पुरुष आहेत, अशा राजवाड्यांत प्रविष्ट झाल्यावर तेथें जवळच दीन होऊन बसलेला सुमंत्र रामाच्या दृष्टीस पडला. तेव्हां ज्याच्या चेहऱ्यावर दुःखाचें चिन्हहि नव्हतें, असा तो राम दुःखित झालेल्या तेथील लोकांना पहात पहात, पित्याची आज्ञा यथाविधि पाळण्याची इच्छा धरून त्याला अवलोकन करण्याच्या उद्देशानें चालला. राम येण्याच्या पूर्वींच दुःखित होऊन बसलेल्या दशरथ राजाकडे जाणारा तो महात्मा इक्ष्वाकुवंशज राम सुमंत्राला अवलोकन करून आपल्या आगमनाची वर्दी पित्याला देण्याकरितां दाराशींच उभा राहिला. तात्पर्य, पित्याच्या आज्ञेनें वनांत जाण्याविषयीं मनाचा निश्चय केलेला तो धर्मवत्सल रघुवंशज राम सुमंत्राला पाहून 'मी आल्याचें राजाला निवेदन कर' असें त्याला म्हणाला.

सर्ग चौतिसावा.

रामदशरथसंवाद.

उदार व कमलनयन रामाचें हें भाषण ऐकून तो सारथी सत्वर दशरथ राजाकडे गेला असतां, राजाचीं इंद्रियें संतापानें क्षुब्ध झालीं असून तो दीर्घ सुस्कारे टाकीत आहे, असें त्या सारथ्याच्या दृष्टीस पडलें; व ह्यामुळें ग्रहण लागलेला सूर्य, भस्मानें आच्छादित झालेला अग्नि अथवा उदकावांचून जलाशय ह्याप्रमाणें तो भूपति त्याला निस्तेज दिसला. तेव्हां ज्याचा जीव फारच व्याकुळ झालेला होता, व रामाकरितांच जो शोक करीत होता, अशा त्या दशरथ राजाचा प्रथमतः जयजयकार करून, तो महाज्ञानवान सारथी हात जोडून, भयामुळें अडखळत, अस्पष्ट आणि चांचरत चांचरत म्हणाला, "राजन्, हा आपला पुत्र पुरुषश्रेष्ठ राम ब्राह्मणांना व आश्रितांना सर्व द्रव्य देऊन टाकून दाराशीं उभा राहिलेला आहे. आपलें देव बरें करो. त्या अमोघ पराक्रमी रामाला आपलें दर्शन होवो. सर्व सुहृदांचा निरोप घेऊन तो आतां आपली भेट घेण्याची इच्छा करीत आहे. हे भूपते, पहा. किरणांनीं युक्त असलेल्या सूर्याप्रमाणें सर्व राजगुणांनीं युक्त असलेला तो राम घोर वनांत जात आहे."

ह्याप्रमाणें सारथ्यानें सांगितलें असतां गंभीरपणामध्यें सागराची बरोबरी करणारा व आकाशाप्रमाणें निर्लेप असलेला तो धर्मनिष्ठ व सत्यवचनी राजाधिराज दशरथ त्याला म्हणाला, "हे सुमंत्रा, माझ्या स्त्रियांना आणि जे कोणी येथें माझे असतील, त्यांना तूं घेऊन ये. कारण सर्व स्त्रियांनीं परिवेष्टित होऊन रामाला अवलोकन करण्याची माझी इच्छा आहे." ह्याप्रमाणें दशरथ राजानें सांगितल्यानंतर तो सारथी अंतःपुरामध्यें गेला. जातांक्षणीं त्या स्त्रियांना म्हणाला कीं, 'आर्य, दशरथ राजा आपणांला बोलावीत आहे. त्याच्याकडे चला. विलंब लावूं नका.' सुमंत्राच्या तोंडून राजाची ही आज्ञा ऐकतांच, भर्त्याची आज्ञा शिरसा मान्य करून त्या स्त्रिया त्याच्या मंदिराकडे चालल्या. आरक्तवर्ण नेत्रांनीं युक्त आणि व्रतस्थ अशा साडेतीनशें तरुण स्त्रिया कौसल्येच्या भोंवताली गराडा घालून हळूहळू तिकडे गेल्या. स्त्रिया आल्यावर राजानें वर पाहिलें. नंतर 'हे सुमंत्रा, माझ्या पुत्राला घेऊन ये' म्हणून त्या सारथ्याला सांगितलें. तेव्हां राम, लक्ष्मण आणि सीता ह्यांना घेऊन तो सारथी सत्वर भूपतीच्या संमुख होऊन त्याच्या जवळ गेला असतां, शिष्टाचाराप्रमाणें हात जोडून आपणांकडे येत असलेल्या पुत्राला अवलोकन करितांक्षणीं स्त्रियांनीं परिवेष्टित असलेला तो दुःखित दशरथ राजा आसनावरून सत्वर उठला, आणि राम दृष्टीस पडतांक्षणीं वेगानें त्याच्याकडे धांवला; परंतु रामापर्यंत पोहोंचण्याचे पूर्वींच तो दुःखाकुल झालेला भूपति मूर्च्छा येऊन भूमीवर पडला. तेव्हां शोकाकुल आणि दुःखामुळें अगदीं मूर्च्छित होऊन पडलेल्या त्या दशरथ राजाकडे राम व महारथी लक्ष्मण हे सत्वर धांवले. त्या वेळीं 'हे रामा, हे रामा,' असा हजारों स्त्रियांनीं राजवाड्यामध्यें एकाएकीं एकच कल्होळ करून दिला. ह्या नादांत त्यांच्या भूषणांचा ध्वनिहि मिसळला. तदनंतर सेवकजनांनीं त्या राजाला व त्या उभयतां राम-लक्ष्मणांना हातांनीं कवटाळून धरून सीतेसहवर्तमान त्यांना रडत रडत मंचकावर बसविलें. नंतर एक मुहूर्त लोटल्यावर शुद्धीवर आलेल्या आणि दुःखाश्रुसागरांत निमग्न झालेल्या दशरथ राजाला राम हात जोडून म्हणाला, "हे महाराज, मी आपला निरोप घेण्याकरितां आलों आहें. आपण आम्हां सर्वांचे प्रभु आहां. पहा, मीं दंडकारण्यांत निघालों आहें. माझ्याकडे आपण कृपादृष्टि करा. लक्ष्मणालाहि माझ्याबरोबर जाण्याची अनुज्ञा द्या, आणि सीतेलाहि माझ्या मागोमाग वनामध्यें येऊं द्या. ह्या उभयतांचा पुष्कळ खऱ्या खऱ्या कारणांनीं मीं वनांत

येण्याविषयीं निषेध केला, तरी घरीं राहण्याची त्यांची इच्छा नाहीं. ह्यास्तव हे मान्य भूपते, आपल्या सनकादि पुत्रांना ब्रह्मदेवानें ज्याप्रमाणें तपश्चर्येला जाण्याची अनुज्ञा दिली, त्याप्रमाणें शोक टाकून देऊन, लक्ष्मण, मी व सीता अशा आम्हां सर्वांना आपण अरण्यांत जाण्याची अनुज्ञा द्या."

ह्याप्रमाणें यत्किंचित्‌हि विषाद न वाटतां वनवासाला जाण्याकरितां भूपतीच्या अनुज्ञेची वाट पहाणाऱ्या रामाकडे पाहून दशरथ राजा म्हणाला, "राघवा, कैकेयीनें वरदानामुळें मला मोहित केलें आहे. तस्मात् मला बांधून टाकून तूंच आज अयोध्येमध्यें राजा हो." ह्याप्रमाणें दशरथ राजानें सांगितलें असतां संभाषणपटु आणि धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ असा तो राम हात जोडून पित्याला म्हणाला, "हे भूपते, आपण हजारों वर्षें पृथ्वीचे पति असा. मी अरण्यामध्यें वास्तव्य करीन. मला राज्याची इच्छा नाहीं. चौदा वर्षें वनवासांत हिंडून प्रतिज्ञा शेवटास गेली म्हणजे, हे प्रजाधिपते, मी पुनरपि आपले पाय धरीन."

ह्याप्रमाणें राम बोलत असतां, 'आजच्या आजच त्याला वनांत जाण्याची अनुज्ञा द्या' असें गुप्तपणें कैकेयी राजाला सांगूं लागली. तेव्हां सत्यपाशानें जखडून गेलेला व शोकाकुल झालेला दशरथ रडत रडत आपल्या प्रिय पुत्राला म्हणाला, 'ह्या तुझ्या जाण्यापासून पारमार्थिक हित आणि ऐहिक अभ्युदय साधून तुझें पुनरपि आगमन होवो. तूं दक्ष राहून निर्भय मार्गानें सुखरूप जा. बा रघुनंदना, सत्यावर तुझी भिस्त असल्यामुळें आणि धर्मसंपादनाविषयीं तुझ्या मनाचा निश्चय झाला असल्यामुळें अरण्यांत जाण्याचा हा तुझा विचार फिरविणें शक्य नाहीं. परंतु पुत्रा, कांहींहि असो, आजची रात्र तरी तूं जाऊंच नको. तुझ्या दर्शनानें एक दिवस तरी मी चांगला घालवीन मातेकडे आणि माझ्याकडे पाहून ही आजची रात्र तूं येथें वास्तव्य कर. सर्व प्रकारच्या भोग्य वस्तूंनीं आज तृप्त होऊन उद्यींक प्रभातकालीं तूं वनामध्यें जाशील. हे रघुनंदना, तूं हें सर्वस्वी दुष्कर कर्म करीत आहेस. माझ्या मर्जीकरितां तूं वनाचा स्वीकार केलास, परंतु मी तुला खरोखर शपथपूर्वक सांगतों, हें मला पसंत नाहीं. भस्मांत दडून राहिलेल्या अग्नीप्रमाणें अंतरस्थ क्रूर असलेल्या ह्या स्त्रीनें तुझ्या राज्याभिषेकापासून मला निवृत्त केलें आहे. ह्या दुराचारिणी कैकेयीनें प्रेरणा केल्यामुळें माझी जी ही फसवणूक झाली आहे, तिच्यांतून तूं मला पार पाडण्याचें मनांत आण. बाबारे, तूं माझा ज्येष्ठ पुत्र आहेस. तेव्हां आपल्या पित्याला अनृतरहित करण्याची इच्छा करीत आहेस, हें कांहीं अत्यंत आश्चर्य नव्हे."

भ्रात्या लक्ष्मणासहवर्तमान असलेला राम दुःखाकुल झालेल्या पित्याचें भाषण श्रवण केल्यावर दीन होऊन त्याला म्हणाला, " आज जे गुण मला प्राप्त होतील, ते मला उद्यां कोण देणार आहे? ह्यास्तव तेथून गमन करणें ह्यांतच माझे सर्व मनोरथ परिपूर्ण होत आहेत. करितां येथून आजच्या आज जाणें, हेंच मला पसंत आहे. राष्ट्र व लोक ह्यांनीं युक्त असून धनधान्यांनीं समृद्ध अशी ही मीं सोडिलेली पृथ्वी आपण भरताला द्या. वनवासाला जाण्याचा मीं जो निश्चय केला आहे, तो माझा आज फिरणार नाहीं. हे वरप्रद, आपण युद्धसमयीं जो कैकेयीला वर देऊं केला आहे, तो पूर्णपणें तिला द्या. हे भूपते, आपण खरे व्हा. मी आपल्या सांगण्याप्रमाणें आपल्या आज्ञेचें परिपालन करून वनचरांसहवर्तमान चौदा वर्षेंपर्यंत वनामध्यें वास्तव्य करीन. आपण आतां विचार करूं नका. भरताला पृथ्वी देऊन टाका. हे रघुनंदन भूपते, आपल्या आज्ञेप्रमाणें वागणें हें जसें माझ्या मनाला प्रिय आहे, तसें (ऐहिक) सुख मला प्रिय नाहीं, व राज्याचीहि मला इच्छा नाहीं. आपण दुःख करूं नका, आणि अश्रूंनीं नेत्र भरूं देऊं नका. तरून जाण्याला कठाण असा नद्यांचा अधिपति समुद्र कधीं मर्यादेचें अतिक्रमण करीत नसतो. राज्य, सुख, पृथ्वी, कसल्याहि प्रकारचें हें विषयसुख, स्वर्ग आणि जीवित ह्यांपैकीं कशाचीहि मला इच्छा नाहीं. हे पुरुषश्रेष्ठ, आपण खोटें न होतां सत्य व्हावें, हीच माझी इच्छा आहे. हें मी आपणांसमक्ष खरोखर पुण्याला स्मरून शपथेवर सांगत आहें. हे तात, हे प्रभो, आतां एक क्षणभरहि माझ्यानें तेथें राहवणार नाहीं. आपण हा शोक आवरून धरा. माझ्या निश्चयांत बदल होणार नाहीं. हे राघव, ' वनांत जा ' म्हणून कैकेयीनें मला विनंति केली आणि ' जातों ' म्हणून मींहि तिला सांगितलें. तस्मात् मला सत्याचेंच परिपालन केलें पाहिजे. मला येथें राहण्याची उत्कंठा नाहीं. नानाप्रकारच्या पक्ष्यांनीं नादित आणि शांत हरिणांनीं व्याप्त अशा वनामध्यें आम्ही सुखानें दिवस काढूं. हे तात, देवतांना सुद्धां पिता हेंच दैवत म्हणून म्हटलें आहे. तस्मात् पिता हेंच दैवत आहे. हीच गोष्ट मनांत आणून मी पित्याच्या आज्ञेप्रमाणें वागणार. हे नृपश्रेष्ठ, चौदा वर्षें लोटल्यावर आपण मला येथें आलेला पहाल. आतां हा संताप सोडून द्या. कांहीं प्रसंग उद्भवल्यामुळें लोकांच्या नेत्रांमध्यें अश्रू आले असतां आपणच ह्या सर्व लोकांना आवरून धरणें योग्य आहे; परंतु हे पुरुषश्रेष्ठ, असें असतांनाहि तुमच्या स्वतःचेच ठिकाणीं हा विपरीत प्रकार कसा झाला? नगर, राष्ट्र आणि संपूर्ण

पृथ्वी ह्यांचा मीं त्याग केला आहे; तीं आपण भरताला द्या. मी आपली आज्ञा परिपालन करण्याकरितां पुष्कळ दिवसपर्यंत वास्तव्य करण्यास वनामध्यें जातों. शांत अशा सीमांचे ठिकाणीं रममाण होऊन ह्या भरताला पर्वत, नगरें आणि अरण्यें ह्यांसहवर्तमान मीं सोडिलेल्या ह्या पृथ्वीचें पूर्णपणें राज्य करूं द्या. हे भूपते, आपण जसें कैकेयीला सांगितलें आहे, तसेंच होवो. हे भूपते, शिष्टसंमत अशी आपली आज्ञा परिपालन करण्याकडे जसें मी लक्ष्य देतों, तसें मोठमोठ्या भोग्य वस्तूकडे अथवा मनाला प्रिय अशा वस्तूंकडे मी लक्ष्य देत नाहीं. ह्यास्तव हे निष्पाप, माझ्याकरितां आपण दुःख करूं नका. आपल्या पदरीं खोटेपणा बांधून अक्षय राज्य, सर्व भोग्य वस्तु, पृथ्वी आणि सीता ह्यांपैकीं कशाचीहि मला इच्छा नाहीं. हें माझें खरें खरें व्रत आहे. करितां आपलें कैकेयीला दिलेलें वचन खरें होऊं द्या. वनामध्यें फळें व मुळें भक्षण करून त्यांतील पर्वत, नद्या आणि सरोवरें मी पाहूं लागलों असतां मला सुख होईल. इतकेंच नव्हे, परंतु आश्चर्यकारक वृक्षांनीं युक्त असलेल्या वनांत प्रविष्ट होतांक्षणींच मी सुखी होईन. आपण सुखी असावें."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां संकटांत सांपडून संताप व दुःख ह्यांनीं व्याकुळ होत असलेल्या त्या दशरथ राजानें पुत्राला आलिंगन दिलें; परंतु दुःखातिशयानें तो अत्यंत मूर्च्छित झाल्यामुळें भूमीवर पडला आणि मुळींच हालचाल करीनासा झाला. तेव्हां ती कैकेयी खेरीज करून तेथें जमलेल्या सर्व राजपत्न्या रडूं लागल्या, लक्ष्मणहि रडतां रडतां मूर्च्छित झाला, आणि त्याप्रमाणें तेथें एकच हाहाकार उडून गेला.

सर्ग पस्तिसावा.

सुमंत्राचें कैकेयीला मर्मभेदक भाषण.

नंतर एकाएकीं मस्तकाला हिसडा देऊन वारंवार दुःखाचे सुस्कारे टाकून व हातावर हात चोळून सुमंत्र कैकेयीवर दांत खाऊं लागला. त्याचे नेत्र क्रोधानें आरक्तवर्ण झाले. पूर्वी असलेलें त्याच्या मुखावरील तेज अदृश्य झालें, आणि क्रोधाविष्ट झालेल्या त्या सुमंत्राला एकाएकीं भयंकर संताप आला. दशरथाच्या मनाचा कल पाहून तो सुमंत्र सारथि तीक्ष्ण अशा शब्दरूप बाणांनीं कैकेयीचें हृदय कंपित करीत करीत आणि भयंकर व अनुपम अशा शब्दरूप

वज्रांनीं कैकेयीच्या सर्व मर्मांचा भेद करीत तिला म्हणाला, "सर्व स्थावरजंगमात्मक जगताचा प्रभु व प्रत्यक्ष तुझा पति अशा दशरथ राजाचा तूं स्वतः त्याग केला आहेस; ह्यापेक्षां अधिक निंद्य अशी कोणतीहि गोष्ट ह्या जगतांत नाहीं. तूं पतीचा व परिणामीं सर्व कुलाचा घात करणारी आहेस, असें मी समजतों. कारण महेंद्राप्रमाणें अजिंक्य, पर्वताप्रमाणें अचल आणि महासागराप्रमाणें अक्षोभ्य अशा दशरथ राजाला आपल्या कर्मांनीं तूं संताप आणीत आहेस. वरप्रद आणि पालन करणाऱ्या अशा आपल्या भर्त्या दशरथ राजाचा तूं अवमान करूं नको भर्त्याच्या इच्छेला अनुसरून वागणें, हें स्त्रियांना एक कोटि पुत्र प्राप्त होण्यापेक्षांहि अधिक आहे. राजांच्या मरणानंतर वयाच्या क्रमाला अनुसरून त्यांच्या पुत्रांना राज्यें प्राप्त होत असतात; परंतु हा इक्ष्वाकुकुलाचा अधिपति दशरथ जिवंत असतांनाच त्या क्रमाचा लोप करण्याची तूं इच्छा करीत आहेस. बाई, तुझा पुत्र राजा होवो. भरत पृथ्वीचें परिपालन करो. जिकडे राम जाईल तिकडे आम्ही जाऊं. तुझ्या देशामध्यें कोणीहि ब्राह्मणानें वास्तव्य करणें योग्य नव्हे. कारण अशाच प्रकारचें अमर्याद कर्म तूं करीत आहेस. रामानें स्वीकारिलेल्या मार्गानेंच खरोखर आम्ही सर्व चालते होणार. हे राजपत्नि, सर्व बांधव आणि सज्जन ब्राह्मण ह्यांनीं सर्वदा तुझा त्याग केला असतां राज्यलाभानें तुला काय बरें आनंद होणार आहे? सर्वांनीच तुझा त्याग करावा, अशाच प्रकारचें अमर्याद कर्म करण्याचें तूं आज मनामध्यें आणीत आहेस. तूं हें अशा प्रकारचें आचरण करीत असतांना एकाएकीं ही पृथ्वी विदीर्ण कशी होऊन गेली नाहीं, हें मला आश्चर्यच वाटत आहे. अग्नीप्रमाणें भस्म करून टाकण्यास समर्थ व भयंकर फळ देणारे असे मोठमोठ्या महर्षींनीं सोडिलेले धिक्कारशब्दरूप दंड, रामाला वनांत हांकून देण्याविषयीं आग्रह धरून बसलेल्या तुझा कसा नाश करीत नाहींत, हेंहि मी आश्चर्यच समजत आहें. कुठारानें आम्रवृक्ष तोडून टाकून निंबवृक्षाची जोपासना कोण करणार आहे? कारण ह्या निंबवृक्षाला जो कोणी पाणी घालील, त्याच्याकरितां तो कधीं मधुर होणार नाहीं. तुझा कुलीनपणा तुझ्या आईप्रमाणें मी समजत आहें. कारण 'लिंबाच्या झाडांतून कधीं मध पाघळत नाहीं' ही म्हण लोकांमध्यें प्रसिद्ध आहे. तुझ्या मातेची पापकर्माविषयीं आसक्ति पूर्वीं इत्थंभूत ऐकलेली मला माहीत आहे. एका वरप्रद ऋषीनें तुझ्या पित्याला अनुपम वर दिला होता. त्याच्या योगानें सर्व प्राण्यांच्या भाषेचा अर्थ त्या राजाला समजूं लागला,

व त्यामुळें सर्व पशुपक्ष्यांचें भाषण त्याला विदित झालें. पुढें कांहीं दिवसांनीं तुझा पिता केकय शय्येवर शयन करीत असतांना अतिशय तेजस्वी अशा जृंभ पक्ष्याचा अभिप्राय त्याच्या शब्दावरून त्याला विदित झाला. तो अभिप्राय विदित झाल्यानंतर त्या शय्येवर तो राजा वारंवार हंसूं लागला. तेव्हां मृत्युपाशाची इच्छा करणारी तुझी माता क्रुद्ध झाली, आणि 'हे सौम्य भूपते, तूं कां हंसलास हें जाणण्याची माझी इच्छा आहे' म्हणून त्याला म्हणाली. इतकें झाल्यावर राजा त्या राणीला म्हणाला, 'मी कां हंसलों हें जर तुला मी सांगेन, तर मला लागलींच मरण येईल, ह्यांत संशय नाहीं.' परंतु इतकें झाल्यावरहि ती तुझी माता पुनरपि तुझ्या पित्याला म्हणाली, 'तूं जग अथवा मर, हें तूं मला सांगितलेंच पाहिजे. असें झालें म्हणजे पुनरपि तूं मला हंसणार नाहींस.' ह्याप्रमाणें प्रियेनें सांगितलें असतां त्या भूपति केकयानें ती गोष्ट त्या वर देणाऱ्या ऋषीला खरी खरी निवेदन केली. तेव्हां तो वर देणारा साधु राजाला म्हणाला, 'ही मरो किंवा उठून जावो; हे भूपति, तूं हिला ही गोष्ट कधींहि सांगूं नको.' प्रसन्न अंतःकरणानें युक्त असलेल्या मुनींचे तें भाषण श्रवण केल्यावर तुझ्या मातेचा सत्वर त्याग करून तुझा पिता कुबेराप्रमाणें सुखानें राहूं लागला. सारांश, हे पापिणी, तूंहि त्याचप्रमाणें दुर्जनांनीं आचरिलेल्या मार्गाचें अवलंबन केलें आहेस; आणि राजाला मोह उत्पन्न करून तूं त्याच्याकडून हें असत्कार्य करवीत आहेस. 'पुरुष पित्याप्रमाणें होतात आणि स्त्रिया मातेप्रमाणें निपजतात' ह्या लौकिक म्हणीची ह्या तुझ्या आचरणांत तर मला अगदीं खरीखरी साक्ष पटत आहे. तर बाई, आपल्या आईसारखी होऊं नको राजानें जें हें सांगितलें आहे, तें ऐक; आणि भर्त्याच्या इच्छेप्रमाणें वागून तूं ह्या जनांचें रक्षण कर. कोणीं क्षुद्रांनीं चढवून दिल्यामुळें चढून जाऊन तूं आपल्या इंद्रतुल्य जगत्पालक भर्त्याकडून अधर्म करवूं नको हे देवि, निष्पाप व वैभवशाली असा हा कमलनयन दशरथ राजा तुला दिलेलें वचन सिद्धीस नेणार नाहीं. कारण तें थट्टेमध्यें दिलेलें आहे. तस्मात् ज्येष्ठ, उदार, कर्मनिष्ठ, स्वधर्मरक्षक आणि जगत्पालक अशा बलाढ्य रामालाच राज्याभिषेक होऊं दे. पित्या दशरथ राजाला सोडून जर राम वनांत गेला, तर लोकांमध्यें तुझी मोठी अपकीर्ति होईल. ह्यास्तव रघुवंशज रामाला आपलें राज्य करूं दे. तूं संतप्त होऊं नको. रामावांचून ह्या श्रेष्ठ नगरामध्यें वास्तव्य करणारा कोणीहि पुरुष तुला अनुकूल होणार

नाहीं. रामानें यौवराज्याचा स्वीकार केला, म्हणजे महाधनुर्धारी दशरथ राजाच पूर्वजांचें आचरण लक्ष्यांत घेऊन वनामध्यें प्रवेश करील."

ह्याप्रमाणें मृदु व तीक्ष्ण शब्दांनीं सुमंत्रानें राजसभेमध्यें कैकेयीला हात जोडून सांगून तिला क्षोभ आणण्याचा यत्न केला; परंतु त्या राजपत्नीला क्षोभ मुळींच आला नाहीं अथवा वाईटहि वाटलें नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु तिच्या चेहेऱ्यावर कसल्याहि प्रकारचा बदल दिसण्यांत आला नाहीं.

सर्ग छत्तिसावा.

सिद्धार्थ प्रधानाचें भाषण.

तदनंतर वचन दिलें गेलें असल्यामुळे व्याकुल झालेला इक्ष्वाकुवंशज दशरथ राजा अतिशय सुस्कारे टाकून अश्रू ढाळीत ढाळीत सुमंत्राला म्हणाला, "हे सूता, रामाच्या सेवेकरितां चारी प्रकारच्या सैन्यांनीं युक्त व रत्नांनीं परिपूर्ण अशी सेना लवकर रामाबरोबर पाठवा. राजकुमाराच्या सेनांचा तळ पडला असतां वेश्या, आपल्या भाषणानें दुसऱ्याचें चित्त वेधणाऱ्या स्त्रिया आणि मोठे धनाढ्य व्यापारी त्यांना शोभा आणोत. जे रामावर उपजीविका करितात, आणि वीर्यपरीक्षा करण्याकरितां ज्यांच्याबरोबर हा राम क्रीडा करीत असतो, त्यांनाहि नानाप्रकारचें द्रव्य देऊन रामाबरोबर पाठवा. मुख्य मुख्य आयुधें, नगरवासी लोक, गाडे आणि अरण्यांतील माहितगार पारधी ककुत्स्थकुलोत्पन्न रामाच्या बरोबर जाऊं द्या. श्वापदांची व गजांची शिकार करीत करीत अरण्यांतील मधाचें पान करीत करीत आणि नानाप्रकारच्या नद्या अवलोकन करीत करीत राम अरण्यांत वास्तव्य करूं लागला म्हणजे त्याला, राज्याचें स्मरण होणार नाहीं. जें कांहीं धान्याचें व द्रव्याचें भांडार माझें असेल, तें निर्जन वनामध्यें वास्तव्य करण्याकरितां जाणाऱ्या रामाच्या मागोमाग जाऊं द्या. पुण्य प्रदेशांचे ठिकाणीं राम यज्ञयाग करूं लागला, शास्त्रोक्त दक्षिणा देऊं लागला आणि ऋषींना भेटूं लागला म्हणजे वनामध्यें त्याचें वास्तव्य सुखानें होईल. महापराक्रमी भरत अयोध्येचें परिपालन करील. वैभवशाली रामाला सर्व भोग्यवस्तूंसहवर्तमान अरण्यांत पाठवा."

ह्याप्रमाणें ककुत्स्थकुलोत्पन्न दशरथ बोलूं लागला असतां कैकेयीला भय प्राप्त झालें. तिचें तोंड कोरडें पडलें व तिच्या मुखांतून शब्दहि येईनासा

झाला. तथापि खिन्न, त्रस्त व निस्तेज अशा मुखानें युक्त झालेली ती कैकेयी संमुख होऊन रामाला म्हणाली, 'सार काढून घेतलेल्या सुरेप्रमाणें, धनरहित, आणि म्हणूनच ज्यांत यत्किंचित्‌हि चव राहिली नाहीं, असें शून्य राज्य भरत स्वीकारणार नाहीं.' ह्याप्रमाणें ती कैकेयी लाज सोडून अति भयंकर भाषण करूं लागली असतां, दशरथ राजा विशाल नेत्रांनीं युक्त असलेल्या त्या कैकेयीला म्हणाला:—"हे अहितकारिणी स्त्रिये, तूं माझ्या मानेवर जूं दिलें आहेस; परंतु तें मी वहात असतांनाहि तूं मला कशाकरितां बरें पीडा देत आहेस? हे दुष्टे, आतां जें तूं हें कृत्य आरंभिलें आहेस, तें तूं पूर्वींच कां मला सांगितलें नाहींस? (सारांश भोग्य वस्तूंसहवर्तमान रामानें वनवासाला जाऊं नये, असें जें आतां म्हणत आहेस, तें तूं पूर्वीं वर मागून घेते वेळींच म्हणावयाला पाहिजे होतें. ज्याअर्थीं त्या वेळीं तूं हें मागून घेतलें नाहींस, त्याअर्थीं मी तें तुला दिलेंहि नाहीं; आणि म्हणूनच रामानें भोग्य वस्तु बरोबर नेऊं नये, असें म्हणण्याचा आतां तुझा अधिकारहि नाहीं.)

हें त्या दशरथाचें क्रोधयुक्त भाषण श्रवण केल्यावर ती श्रेष्ठ स्त्री कैकेयी दुप्पट क्रुद्ध होऊन राजाला म्हणाली, 'तुझ्याच वंशामध्यें सगरानें असमंज म्हणून प्रसिद्ध असलेल्या आपल्या ज्येष्ठ पुत्राला राज्यभोगाचा प्रतिबंध केला होता. तेव्हां त्याचप्रमाणें ह्या रामानें भोग्य वस्तु बरोबर न घेतां वनवासांत गेलें पाहिजे.' ह्याप्रमाणें कैकेयी बोलली असतां 'धिक्कार असो' येवढेंच दशरथ राजा म्हणाला, व त्याच्या योगानें कैकेयीचे सर्व सेवक लज्जित झाले; परंतु तिच्या तें गांवींहि आलें नाहीं. त्या ठिकाणीं—पवित्र, राजाला फारच संमत आणि वृद्ध असा—एक सिद्धार्थ म्हणून प्रधान होता. तो कैकेयीला म्हणाला, "असमंज हा मार्गामध्यें खेळणाऱ्या मुलांना धरून सरयू नदींत टाकीत असे, आणि अशा रीतीनें तो आपणाला करमणूक करून घेत असे. ह्यावरून तो दुष्टबुद्धि होता. त्याला अवलोकन करून क्रुद्ध झालेले सर्व नगरवासी लोक राजाला म्हणाले, 'हे राष्ट्रवर्धना, एक असमंज तरी तूं पत्कर, किंवा आमचा तरी तूं स्वीकार कर.' ह्यावर 'हें भय तुम्हांला कशाकरितां प्राप्त झालें आहे?' असें राजानें विचारिलें असतां राजानें प्रश्न केलेले ते प्रजाजन त्याला म्हणाले, 'भान न राहतां आमचीं मुलें खेळूं लागलीं म्हणजे हा सरयू नदींत त्यांना टाकून देतो, आणि ह्या मूर्खपणामुळें त्याला मोठें अनुपम सुख होत असतें.' हें प्रजाजनांचें भाषण श्रवण केल्यावर त्यांचें प्रिय

करण्याकरितां राजानें त्या आपल्या अहितकारक पुत्राचा त्याग केला. 'त्याला भार्या आणि सामानसुमान यांसहवर्तमान सत्वर गाडींत घाला आणि जन्मपर्यंत हांकून द्या' असें त्या पित्यानें त्यांना सांगितलें. तदनंतर पापकर्म करणारा तो असमंज एक फाळ व कंदमुळें वगैरे काढून ठेवण्याकरितां एक पेटारा बरोबर घेऊन पर्वतसंबंधीं गहन प्रदेशावर चारी दिशांमध्यें संचार करूं लागला, आणि भक्षणाकरितां कंदमुळें पाहूं लागला. तात्पर्य असा तो दुष्ट होता, म्हणून अत्यंत धार्मिक अशाहि सगर राजानें त्याचा त्याग केला; परंतु भोग्य वस्तु बरोबर नेण्याचा तूं प्रतिबंध करीत आहेस असें रामानें काय बरें पातक केलें आहे? ह्या रामाचे ठिकाणीं आम्हांला कोणताच दुर्गुण दिसत नाहीं. चंद्राचे ठिकाणीं मालिन्य जसें दुर्लभ आहे, तसें ह्याचे ठिकाणीं पाप दुर्लभ आहे. अथवा हे राजपत्नि, रामाचे ठिकाणीं तुला जर कांहीं दोष दिसत असेल, तर तो तूं आज खरा खरा सांग, म्हणजे रामाला हांकून देतां येईल. रामाचे ठिकाणीं दोष आहे, असें सिद्ध झाल्यावांचून त्याला हांकून देतां येणार नाहीं. सन्मार्गानें वागण्याविषयीं तत्पर आणि निर्दोष अशाचा त्याग केला असतां तो इंद्राचेंहि तेज नाहींसें करील. कारण असा त्याग धर्मविरुद्ध आहे. तस्मात् हे राजपत्नि, रामाचें राज्यवैभव हाणून पाडण्यापासून तुला कांहींएक फायदा नाहीं. तेव्हां आतां हा अट्टाहास पुरे झाला. लोकापवादाची तरी तुला लाज बाळगणें अवश्य आहे."

हें सिद्धार्थ प्रधानाचें भाषण श्रवण केल्यावर शब्द फारच खोल गेलेला दशरथ राजा शोकाकुल वाणीनें कैकेयीला म्हणाला, "हे पापिणि, हें सिद्धार्थ प्रधानाचें म्हणणें जर तूं न ऐकशील, तर तुला माझें अथवा आपल्या स्वतःचेंहि हित कळत नाहीं. कारण ह्या निंद्य मार्गाचें अवलंबन करून तूं जी ही कुचेष्टारूप चेष्टा केली आहेस, ती सन्मार्गाला सोडून आहे. राज्य, सुख आणि धन ह्यांचा त्याग करून आज मी रामाच्या मागोमाग जाईन व अयोध्येंतील सर्व लोकहि त्याच्या मागोमाग जातील. मग तूं राजा भरतासहवर्तमान सुखास येईल त्याप्रमाणें चिरकाल राज्याचा उपभोग घे."

सर्ग सदतिसावा.

वल्कलपरिधान.

प्रधानाचें भाषण श्रवण केल्यावर विनयज्ञ राम नम्रपणें दशरथाला म्हणाला "राजा, भोगांचा त्याग करून व सर्वसंगपरित्याग करून वनामध्यें वनांतीलच आहारावर उपजीविका करणाऱ्या मला लवाजम्याशीं काय कर्तव्य आहे? श्रेष्ठ गज देऊन टाकून जो त्याला बांधावयाच्या दोरीवर मन ठेवितो, त्याला उत्कृष्ठ गजाचा त्याग केल्यानंतर त्या दोरीशीं काय कर्तव्य असतें? त्याचप्रमाणें हे सज्जनश्रेष्ठ जगत्पते, आतां सेनेशीं मला काय कर्तव्य आहे? सर्व कांहीं भोग्य वस्तु मी भरताला देतों. आतां कैकेयीच्या दासींनीं मला वल्कलेंच आणून द्यावीं. दासींनो, जा व वनामध्यें चौदा वर्षें वास्तव्य करण्यास सिद्ध झालेल्या मला कुदळ आणि पेटारा हीं दोन तुम्ही आणून द्या."

ह्याप्रमाणें रामानें दासींना सांगितल्यानंतर कैकेयीनें स्वतःच वल्कलें आणिलीं. आणि 'हीं नेस' असें यत्किंचित्हि लाज न बाळगितां ती जनसमुदायामध्यें रामाला म्हणाली तेव्हां कैकेयीपासून त्या पुरुषश्रेष्ठ रामानें तीं वल्कलें घेतलीं, आणि आपलीं बारीक वस्त्रें फेंकून देऊन मुनींना योग्य अशीं तीं वस्त्रें त्यानें परिधान केलीं. लक्ष्मणानेंहि तेथेंच आपलीं चांगलीं वस्त्रें टाकून देऊन पित्याच्या समोर तपस्वी लोकांनाच योग्य असलेल्या त्या वस्त्रांचा स्वीकार केला. तेव्हां पैठणी नेसलेली सीता आपल्याला नेसण्याकरितां कैकेयीनें आणून दिलेलें वल्कल पाहून, जाळें पाहिल्यावर त्रस्त होणाऱ्या हरिणीप्रमाणें त्रस्त झाली. तथापि शुभ लक्षणांनीं युक्त असलेल्या त्या राजकन्येनें लज्जित झाल्यासारखें करून व अत्यंत खिन्न होऊन कैकेयीपासून तीं वल्कलें घेतलीं, आणि अश्रूंनीं जिचे नेत्र अगदीं भरून आले आहेत, अशी ती धर्मज्ञ व धर्माकडेच नजर देऊन वागणारी सीता आपल्या गंधर्वराजतुल्य भर्त्याला म्हणाली, 'वनवासी मुनि वल्कल बांधितात तरी कसें?' असें म्हणून वल्कल बांधण्याविषयीं अनभिज्ञ असलेली ती सीता वारंवार गोंधळूं लागली. शेवटीं एक वल्कल गळ्यांत अडकवून आणि एक हातांत घेऊन ती अडाणी जनककन्या लज्जित होऊन तेथें उभी राहिली. तेव्हां धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ असलेला राम सत्वर तिच्या समीप आला; आणि सीतेच्या पैठणीवर त्यानें स्वतः तें वल्कल बांधिलें. परंतु तें वल्कल सीतेला राम नेसवीत आहे, असें अवलोकन

करून अंतःपुरांतील स्त्रियांनीं डोळ्यांतून पाणी काढिलें; आणि अत्यंत खिन्न होऊन त्या स्त्रिया उज्ज्वल तेजानें युक्त असलेल्या रामाला म्हणाल्या, 'वत्सा, तुझ्याप्रमाणें ही विचारी स्त्री वनवासांत जाण्याचें ठरलेलें नाहीं. पित्याच्या आज्ञेला अनुसरून तूं निर्जन वनामध्यें गेल्यावर परत येईपर्यंत हिचें तरी दर्शन आम्हांला घडूं दे. हे प्रभो, अशा रीतीनें आमचें जीवित सफल होऊं दे. हे पुत्रा, लक्ष्मणालाच बरोबर घेऊन जा. तापसाप्रमाणें ह्या कल्याणीनें वनामध्यें वास्तव्य करणें उचित नाहीं. हे पुत्रा, आमचें मागणें ऐक सीता येथें राहूं दे. तूं नेहमीं धर्मानें वागणारा असल्यामुळें जरी सांप्रत येथें राहण्याची इच्छा करीत नसलास, तरी हिला आपली येथें राहूं दे.'

अशा प्रकारचीं त्यांचीं भाषणें ऐकत असतांना त्या दशरथपुत्र रामानें, आपल्यासारखाच जिचा स्वभाव आहे, अशा सीतेला वल्कल नेसविलें. तेव्हां सीतेनें वल्कलें नेसल्यावर, अश्रूंनीं नेत्र भरून आलेले राजगुरु वसिष्ठ वनवासांत जाण्याविषयीं सीतेचा निरोध करून कैकेयीला म्हणाले, "हे फाजील कैकेयी, हे दुष्टे, हे कुलकलंकिनि, राजाला फसवून तूं आतां सुद्धां प्रामाणिकपणानें वागत नाहींस. सीतेला वनवासांत पाठविण्याविषयीं तूं जर राजापाशीं मागणें मागितलेंच नाहींस, तर आतां तिच्यापुढें वल्कलें आणणें तुला उचित नाहीं. हे सच्छीलशून्य कैकेयि सीता देवि वनांत जाणार नाहीं. रामाला प्राप्त होणारें जें सिंहासन त्याचा हीच स्वीकार करून राम येईपर्यंत राज्य करील. सर्व गृहस्थाश्रमी पुरुषांचा स्त्री ही आत्मा आहे. तेव्हां ही रामाचा आत्माच असल्यामुळें तो परत येईपर्यंत पृथ्वीचें परिपालन करील. आता तुझ्या दुराग्रहामुळें सीता जर रामाबरोबर वनांत जाणारच असेल, तर आम्हींहि त्याच्या मागोमाग जाऊं व हें सर्व नगरहि जाईल. जिकडे राम हा भार्येसहवर्तमान जाईल, तिकडेच अंतःपुराचे रक्षकहि जातील. आणि धन व सामानसुमान बरोबर घेऊन हें नगर व राष्ट्रहि त्याच्या मागोमाग जाईल. इतकेंच नव्हे, परंतु ज्येष्ठ भ्राता राम वनामध्यें वास्तव्य करूं लागला असतां भरतहि शत्रुघ्नासहवर्तमान वल्कलें परिधान करून वनचर बनेल, आणि रामापाशीं राहील. नंतर प्रजाजनांच्या वाईटावर असलेली तूं एकटी दुराचारिणी शून्य आणि निर्जन अशा पृथ्वीवर व पृथ्वीवरील वृक्षांवर आपला अंमल चालीव. ज्या ठिकाणीं राम राजा नाहीं, तें राष्ट्रच होणार नाहीं. ज्या ठिकाणीं राम वास्तव्य करील, तें वनच राष्ट्र होईल. भरत जर खरोखरी दशरथ राजापासूनच झालेला असेल, तर पित्यानें न दिलेल्या पृथ्वीचें राज्य तो

इच्छिणार नाहीं, किंवा पुत्राप्रमाणें तुझ्यासमीप राहण्याचेंहि त्याच्या मनांत येणार नाहीं. फार कशाला? तूं ह्या भूतलावरून जरी आकाशांत उडून गेलीस, तरी पितृवंशांतील आचार जाणणारा तो भरत असें भलतेंच करणार नाहीं. तस्मात् पुत्राला राज्य प्राप्त होण्याचा अभिलाष धरून तूं खरोखर पुत्राला अप्रिय असलेलीच गोष्ट केली आहेस. कारण रामाला अनुसरून न वागणारा असा जगतांत कोणीहि नाहीं. मग रामाला सोडून भरत कसा राज्य करणार? हे कैकेयि, पशु, सर्प, मृग व पक्षी हे रामाबरोबर जातांना तूं आजच पहाशील. इतकेंच नव्हे, परंतु वृक्षहि त्याच्याबरोबर जाण्याकरितां उत्सुक आहेत, असें तुझ्या दृष्टोत्पत्तीस येईल. मग मनुष्यांची तर गोष्ट कशाला पाहिजे! करितां हे राजपत्नि, तें वल्कल पलीकडे करून तूं आपल्या स्नुषेला उत्कृष्ट भूषणें दे. हिला वल्कल देणें योग्य नाहीं." असें म्हणून वसिष्ठांनीं सीतेला तें वल्कल परिधान करण्याचा प्रतिबंध केला, आणि पुनरपि ते म्हणाले, "हे केकयराजकन्ये, एका रामालाच वनवास तूं मागून घेतला आहेस. ह्यास्तव नेहमीं अलंकार धारण करणाऱ्या ह्या सीतेला भूषित होऊन अरण्यामध्यें रामाबरोबर वास्तव्य करूं दे. सारांश, उत्कृष्ट उत्कृष्ट वाहनें, सेवक, सर्व प्रकारचीं वस्त्रें आणि सामानसुमान बरोबर घेऊन ही राजकन्या चांगल्या बंदोबस्तानें जाऊं दे. कारण वरप्रदानसमयीं तूं हिच्याविषयीं मागणी केलेली नाहींस."

ह्याप्रमाणें अनुपम प्रभावानें युक्त असलेले ते द्विजश्रेष्ठ राजगुरु वसिष्ठ जरी बोलत होते, तरी आपल्या प्रिय भर्त्याप्रमाणेंच अवस्था प्राप्त होण्याची इच्छा करणाऱ्या त्या सीतेनें वल्कलें परिधान करण्यापासून आपलें मन परावृत्त केलें नाहीं.

सर्ग अडतिसावा.

निरोप घेणें.

ती सीता सनाथ असूनहि अनाथाप्रमाणें वल्कल परिधान करूं लागली असतां, 'हे दशरथा, तुला धिक्कार असो' असें सर्व लोक म्हणाले. तेव्हां आक्रोशानें तो भूपति अधिकच दुःखित झाला; आणि उष्ण श्वास टाकून तो इक्ष्वाकुवंशज दशरथ त्या भार्येला म्हणाला, "ही सुकुमार व बाला असून नेहमीं हिला सुखांत राहण्याची संवय आहे. तेव्हां हिनें वनांत जाणें योग्य नाहीं, असें जें माझ्या गुरूंनीं सांगितलें आहे, तें सत्य आहे. एखादा अपरि-

चिन भिकारणीप्रमाणें वल्कल परिधान करून वनामध्यें जाण्यास निघालेली ही बिचारी नृपश्रेष्ठ जनक राजाची कन्या कोणाला कांहीं तरी अपकार करीत आहे काय? जनककन्येनें वल्कलें टाकून द्यावीं. कारण ही प्रतिज्ञा मीं पूर्वी केलेली नाहीं. ह्यास्तव सर्व रत्नें बरोबर घेऊन ही राजकन्या भरलेलीच खुशाल वनामध्यें जाऊं द्या. 'रामाला वनवासांत पाठवीन' येवढीच दुष्ट प्रतिज्ञा मीं मुमुर्षू होऊन शपथपूर्वक केलेली आहे. परंतु सीतेला वल्कलें परिधान करण्यास लावणें, हें तूं मूर्खपणामुळें आरंभिलें आहेस. करितां स्वतःचें पुष्प ज्याप्रमाणें वेळूचा नाश करून टाकितें, त्याप्रमाणें तूं आरंभिलेलें हें कृत्य तुला दग्ध न करो, म्हणजे झाले. हे पापिणि, हे अधम कैकेयि, रामानें जरी तुझा कांहीं अपराध केला असला, तरी सीतेनें येथें तुला काय अपकार केला आहे? हरिणीप्रमाणें स्वभावानें गरीब आणि प्रफुल्लित नेत्रकमलांनीं युक्त असलेली ही बिचारी जनककन्या तुला काय बरें अपकार करीत आहे? हे दुष्टे, ह्याप्रमाणें तूं रामाला वनवासांत हांकून दिलेंस, हें खरोखर संपूर्ण नरकाचा अनुभव घेण्यास पुरेसें आहे. मग आणखीहि अनिर्वाच्य दुःखदायक पातकें करून तुला काय प्राप्त करून घ्यावयाचें आहे? हे देवि, अभिषेकाकरितां राम येथें आला असतां तूं जें त्याला बोललीस, तें मी ऐकून घेऊन तेवढ्यालाच अनुमति दिलेली आहे. सीतेच्या संबंधानें मीं तुला कसल्याहि प्रकारचें वचन दिलेलें नाहीं. परंतु स्वतः जें तूं मागितलेंस, त्याचाहि अतिप्रसंग करून तूं नरकांत जाण्याची इच्छा करीत आहेस. कारण सीतेलाहि वल्कलें परिधान केलेली तुझी पहाण्याची इच्छा आहे."

ह्याप्रमाणें खालीं मान घालून बसलेला पिता दशरथ कैकेयीला बोलत असतांना वनामध्यें निघालेला राम त्याला म्हणाला, "हे धर्मनिष्ठ भूपते, ही माझी माता यशस्विनी कौसल्या वृद्ध असून क्षुल्लक स्वभावाची नाहीं व तुम्हांलाहि नांव ठेवीत नाहीं. ह्यास्तव हे वरप्रद, माझा वियोग झाल्यामुळें शोकसागरांत बुडून जाऊन आजपर्यंत कधींहि न अनुभविलेल्या दुःखांत सांपडलेल्या हिच्याकडे आपण जरा अधिक लक्ष्य देत जा. सारांश, महाराज, मीं वनांत गेल्यानंतर ही शोकानें कृश झाल्यामुळें जीविताचा त्याग करून यमसदनाला न जाईल अशा रीतीनें मला पहाण्याविषयीं अभिलाष उत्पन्न झालेल्या या माझ्या मातेची आपण व्यवस्था ठेवा."

सर्ग एकुणचाळिसावा.

रामाला पोहोंचविण्याविषयीं दशरथाची सुमंत्राला आज्ञा.

रामाचें हें भाषण श्रवण करून आणि त्याला मुनिवेष धारण केलेला पाहून भार्यासहवर्तमान दशरथ राजा मूर्च्छित झाला. अशा प्रकारें दुःखानें संतप्त झाल्यामुळें रामाकडे कांहीं वेळ तो पाहीनासा झाला. नंतर कांहीं वेळानें पाहूं लागल्यावरहि मनामध्यें खिन्न झाल्यामुळें त्याच्याशीं त्याला कांहींएक बोलवेना. अशा प्रकारें सुमारें मुहूर्तभर मूर्च्छित झाल्यानंतर दुःखित झालेला तो महापराक्रमी दशरथ राजा रामाचेंच चिंतन करून विलाप करूं लागला कीं, "खरोखर पूर्वीं मीं पुष्कळांना पुत्रहीन केलेले आहेत किंवा पुष्कळच प्राण्यांची मीं हिंसाहि केलेली आहे. म्हणून मला आतां हें दुःख प्राप्त झालें आहे. कैकेयी क्लेश देत असतांनाहि ज्याअर्थी मला मृत्यु येत नाहीं, त्याअर्थी वेळ आल्यावांचून देहांतून जीव जातच नाहीं, हें सत्य आहे. तेजानें अग्नितुल्य असा आपला पुत्र सूक्ष्म वस्त्रांचा त्याग करून तपस्व्यांनाच योग्य अशा वस्त्रांनीं आच्छादित होऊन पुढें उभा असलेला मी पहात आहें. कपटाचा आश्रय करून स्वार्थ साधण्याविषयीं धडपडणाऱ्या ह्या एका कैकेयीमुळें हे सर्व लोक अतिशय दुःखित झाले आहेत."

ह्याप्रमाणें बोलल्यानंतर अश्रूंच्या योगानें कंठ दाटून आल्यामुळें जिव्हा हलेनाशी झाली. तेव्हां 'राम' असें एकदांच उच्चारिल्यावर त्याच्या तोंडांतून शब्द निघेनासा झाला. तदनंतर एका मुहूर्तानें सावध झाल्यावर अश्रूंनीं नेत्र भरून आलेला दशरथ राजा सुमंत्राला म्हणाला, "फिरावयाला जाण्याच्या रथाला उत्कृष्ट अश्व जोडून तूं इकडे ये. आणि ह्या महाभाग्यवान रामाला ह्या देशाच्या पलीकडे नेऊन पोहोंचीव. सुशील आणि वीर अशा पुत्राला ज्या अर्थी मातापितर वनांत हांकून देत आहेत, त्या अर्थी गुणी लोकांमध्यें माझ्या गुणांचें फल म्हणजे ह्याप्रमाणें पुत्राला हांकून देणें, हेंच ठरणार!"

कौसल्येचा सीतेला उपदेश.

राजाची आज्ञा समजून घेऊन सुमंत्र तेथून सत्वर चालता झाला, आणि अलंकारयुक्त अशा रथाला अश्व जोडून तेथें घेऊन आला. नंतर 'राजकुमारांकरितां सुवर्णभूषित रथ उत्कृष्ट अश्व जोडून तयार आहे' असें हात जोडून त्या सार-

ष्यानें सांगितलें असतां, काल व देश जाणणारा आणि सर्व प्रकारें शुचिर्भूत असलेला दशरथ धनाध्यक्षाला सत्वर हांक मारून निश्चयानें म्हणाला, 'ह्या वनवासविषयक वर्षांची गणना करून उत्कृष्ट उत्कृष्ट वस्त्रें आणि मोठमोठीं भूषणें सीतेला तूं सत्वर आणून दे.' ह्याप्रमाणें राजाची आज्ञा झाल्यावर धनाध्यक्ष खजिन्यामध्यें गेला, आणि त्यानें तें सर्व आणून सत्वर सीतेला दिलें. तेव्हां वनांत जाण्याला निघालेल्या अयोनिसंभव सीतेनें त्या विचित्र भूषणांच्या योगानें सामुद्रिक शास्त्रोक्त लक्षणांनीं युक्त असलेले आपले अवयव भूषित केले; आणि किरणांनीं युक्त असलेला सूर्य उदय पावूं लागला असतां त्याची प्रभा ज्याप्रमाणें आकाशाला शोभा आणिते, त्याप्रमाणें उत्कृष्ठ प्रकारें अलंकृत झालेल्या सीतेनें त्या घराला शोभा आणिली. तेव्हां कधींहि हलकें कृत्य न करणाऱ्या सीतेच्या मस्तकीं अवघ्राण करून व तिला बाहूंनीं कवटाळून धरून सासू कौसल्या तिला म्हणाली, "नेहमीं प्रियवस्तु देऊन सत्कार केला असूनहि ज्या स्त्रिया संकटांत सांपडलेल्या भर्त्याची शुश्रूषा करण्याचें मनामध्यें आणीत नाहींत, त्यांची सर्व लोकांमध्यें असतीत्वानेंच गणना होत असते. पूर्वीं सुखाचा अनुभव घेऊन पुढें थोडी जरी विपत्ति भोगण्याचा प्रसंग आला, तरी भर्त्याला दूषण देण्यास—इतकेंच नव्हे, परंतु त्याचा त्याग करण्यासहि प्रवृत्त होणें, हा दुष्ट स्त्रियांचा स्वभावच आहे—असत्य भाषण हेंच जारिणी स्त्रियांचें शील असून उन्मार्गाला जाणें हा त्यांचा स्वभावच आहे. भर्त्याचे ठिकाणीं त्यांचें कधींच खरें प्रेम नसतें. पाप करण्याविषयीं त्यांची इच्छा असते, आणि क्षणमात्र प्रेम करणाऱ्या त्या स्त्रिया नेहमीं विकृतच असतात. दुष्ट स्त्रियांचें हृदय पापप्रवृत्तीपासून परावृत्त करण्यास कूल, उपकार, धर्माचा उपदेश, दान आणि बंधन ह्यांपैकीं कांहींहि समर्थ होत नाहीं. कारण त्यांचें चित्त अव्यवस्थित असतें. सदाचरण, सत्य वचन, गुरुजनांना उपदेश आणि मर्यादा ह्यांनाच अनुसरून वागणाऱ्या पतिव्रता स्त्रियांचें पति हेंच उत्कृष्ठ पुण्यसाधन आहे, आणि म्हणूनच स्त्रीला इतर सर्व पुण्यसाधनांपेक्षां पति अधिक आहे. तस्मात् वनांत घालविलेल्या ह्या माझ्या पुत्राचा तूं कधीं अवमान करूं नको. हा निर्धन असो अथवा सधन असो, तुला देवतुल्य आहे."

धर्म व अर्थ ह्यांनीं भरलेलें हें कौसल्येचें भाषण श्रवण केल्यावर संमुख उभी असलेली सीता हात जोडून म्हणाली, "सासूबाई जो मला उपदेश करीत आहेत, तें सर्व कांहीं मी करीन. भर्त्याशीं कसें वागावें ह्याविषयीं मी अभिज्ञ

आहे, आणि मातापितरांपासूनहि मीं तें ऐकून ठेविलेलें आहे. सासूबाईनीं दुष्ट स्त्रीशीं माझी बरोबरी करूं नये. कारण चंद्रापासून जशी प्रभा दूर होण्यास समर्थ नाहीं, तशी धर्मापासून चलित होण्यास मी समर्थ नाहीं. ज्याप्रमाणें तारेवांचून वीणा ध्वनि उत्पन्न करण्यास समर्थ होत नाहीं, अथवा ज्याप्रमाणें रथ चाकावांचून गमन करण्यास समर्थ होत नाहीं, त्याचप्रमाणें शंभर पुत्रहि असले तरी स्त्रीला पतीवांचून सुख होत नाहीं. पिता, भ्राता आणि पुत्र हे सर्व क्षणिक सुख देणारे आहेत. तेव्हां अपरिमित सुख देणाऱ्या भर्त्याचा मान कोण बरें राखणार नाहीं? तेव्हां अशा प्रकारें मी ज्ञानसंपन्न, श्रेष्ठ व स्थूल आणि सूक्ष्म धर्म श्रवण केलेली असतांना पतीचा कसा बरें अवमान करीन? अहो, भर्ता हें स्त्रीचें दैवत आहे."

ह्याप्रमाणें सीतेचें तें मनोवेधक भाषण श्रवण केल्यावर शुद्ध अंतःकरणानें युक्त असलेली कौसल्या एकाएकीं हर्षमिश्रित दुःखजन्य अश्रू ढाळूं लागली. तेव्हां मातांमध्यें जिचा अतिशय सत्कार होत आहे, अशा कौसल्या मातेकडे पाहून तो परमधर्मात्मा राम हात जोडून तिला म्हणाला, "माते, तूं दुःखित होऊं नको. माझ्या पित्याकडे तुझें लक्ष्य असूं दे. माझा वनवास लवकरच संपून जाईल. चौदा वर्षें हीं अगदीं झोंपेंतील चौदा घटकांप्रमाणें सत्वर निघून जातील, आणि सुहृदांनीं परिवेष्ठित असा मी पुनरपि भ्राता व भार्या ह्यांसहवर्तमान येथें आलेला लवकरच तूं पहाशील."

अशा प्रकारें मातेशीं निश्चित अर्थाचें भाषण करून, आपल्या साडेतीनशें मातांचें रामानें वेगळें वेगळें दर्शन घेतलें; आणि कौसल्येप्रमाणेंच दुःखित झालेल्या त्या मातांना उद्देशून त्यानें हात जोडून धर्मानें युक्त असलेलें भाषण केलें. तो म्हणाला, "सहवासामुळें मीं जें कांहीं कठोर भाषण तुमच्याशीं केलें असेल अथवा अज्ञानामुळें जें घोर कृत्य माझ्या हातून झालें असेल, त्याची तुम्ही क्षमा करा. मी तुम्हां सर्वांचा आतां निरोप घेतों."

रामाचें हें धर्मयुक्त व गंभीर भाषण श्रवण करितांच त्या सर्व स्त्रियांचें अंतःकरण शोकानें घेरून टाकिलें. ह्याप्रमाणें राम बोलूं लागला असतां दशरथ राजाच्या त्या भार्यांमध्यें क्रौंच पक्षिणीच्या ध्वनीप्रमाणें शोकध्वनि उत्पन्न झाला. मुरज, पणव व मेघ ह्या वाद्यांच्या ध्वनींनीं जें दशरथाचें गृह पूर्वीं युक्त होतें, तें विलाप आणि रोदन ह्यांनीं व्याप्त, संकटांत सांपडलेलें आणि अत्यंत दुःखित असें झालें.

सर्ग चाळिसावा.

वनगमन.

तदनंतर राम, सीता आणि लक्ष्मण ह्यांनीं हात जोडिले, आणि दीन झालेल्या त्या त्रिवर्गांनीं राजाच्या पायांवर मस्तक ठेवून त्याला प्रदक्षिणा केली. नंतर पित्याची अनुज्ञा घेऊन शोकाकुल झालेल्या त्या धर्मज्ञ रामानें सीतेसह-वर्तमान आपल्या मातेला अभिवंदन केलें. भ्रात्यानें अभिवंदन केल्याबरोबर लक्ष्मणानेंहि कौसल्येला अभिवंदन केलें. आणि तदनंतर त्यानें सुमित्रा मातेचे पाय धरिले. तेव्हां पुत्राचें हित इच्छिणारी सुमित्रा माता महापराक्रमी लक्ष्मणाचे मस्तकीं अवघ्राण करून तो वंदन करीत असतांना रडत रडत त्याला म्हणाली, 'वनवासाला जाण्याची मी तुला अनुज्ञा दिली आहे. तूं आपल्या मित्रावर चांगलें प्रेम करीत जा, आणि भ्राता राम वनांत जाऊं लागला म्हणजे तूं कधीं-हि गैरसावध रहात जाऊं नको. हे निष्पाप, संकटांत सांपडलेला असो अथवा समृद्ध असो, हा रामच तुझी गति आहे, आणि ज्येष्ठ भ्रात्याला अनुसरून वागणें हाच जगतामध्यें सज्जनांचा धर्म आहे. ज्येष्ठाला अनुसरून वागणें हें आचरण ह्या कुलाला उचित असून तें परंपरागत चालत आलेलें आहे. दान, यज्ञदीक्षा आणि युद्धामध्यें देहत्याग हे धर्महि ह्या क्षत्रियकुलाला उचित आहेत.'

राम प्रिय असल्यामुळें वनवासांत जाण्याला सिद्ध झालेल्या लक्ष्मणाला ह्याप्रमाणें सांगितल्यावर 'जा जा' असें पुनः पुनः सांगून सुमित्रा त्याला म्हणाली, 'बा लक्ष्मणा, राम हा दशरथ, जनककन्या ही मी, आणि अरण्य ही अयोध्या असें समजून तूं खुशाल जा.' तदनंतर इंद्राला ज्याप्रमाणें मातली सांगतो त्याप्रमाणें नम्र व विनयशील असा सुमंत्र सारथि हात जोडून ककुत्स्थ-कुलोत्पन्न रामाला म्हणाला, 'हे महायशस्वी राजपुत्रा, तुझें कल्याण असो. तूं रथावर आरोहण कर. रामा, जिकडे सांगशील तिकडे मी तुला सत्वर नेऊन पोहोंचवीन. ज्या अर्थीं राजपत्नी कैकेयीनें आजच वनांत जावयास सांगितलें आहे, त्या अर्थीं वनामध्यें जीं तुला चौदा वर्षें काढावयाचीं आहेत, त्यांना आजच आरंभ झाला पाहिजे.'

ह्याप्रमाणें सुमंत्र सारथ्यानें रामाला सांगितल्यानंतर सुंदरी सीता कुंकू लावून प्रसन्न मनानें त्या सूर्यासारख्या तेजस्वी रथावर आरूढ झाली. तेव्हां वनवास-संबंधीं वर्षांची गणना करून दशरथ राजानें भर्त्याच्या बरोबर जाणाऱ्या सीतेला

वस्त्रें व भूषणें दिलीं, व तीं तिनें रथामध्यें ठेविलीं; आणि त्याचप्रमाणें भ्रात्या राम लक्ष्मणांचा आयुधसमुदाय, कवचें, चर्मानें मढविलेला पेटारा व कुदळ तिनें रथावर ठेवून दिलीं. तदनंतर सुवर्णविभूषित आणि अग्निसमान तेजस्वी अशा त्या रथावर भ्राते राम लक्ष्मण सत्वर आरूढ झाले. तेव्हां सीतेसहवर्तमान ते तिघे थावर आरूढ झाले आहेत, असें पाहून वेगामध्यें वायूची बरोबरी करणाऱ्या व सर्वलक्षणसंपन्न असलेल्या अश्वांना प्रेरणा करून सुमंत्रानें रथ पुढें हांकिला.

ह्याप्रमाणें रघुवंशज राम पुष्कळ दिवस वास्तव्य करण्याकरितां महावनांत निघाल्यानंतर नगरांत असलेले सर्व लोक, अश्व, गजादि सैन्य आणि पशुपक्षी ह्या सर्वांना मूर्च्छा आली. त्या नगरामध्यें जिकडे तिकडे गडबड उडून गेली. रामाच्या मागोमाग जाण्याकरितां जिकडे तिकडे धांदल उडाली. रामाच्या वियोगामुळें आंतील मत्त गज क्रुद्ध झाले, व अश्वांच्या खिंकाळण्याचा घोष सुरू होऊन जिकडे तिकडे हलकल्लोळ उडून गेला. नंतर उन्हानें व्याकुल झालेला पुरुष जसा उदकाकडे धावतो, तशी रामवियोगदुःखामुळें अत्यंत पीडित झालेली ती नगरी बाल व वृद्ध ह्यांसहवर्तमान रामाच्या मागोमाग धांवूं लागली. सारांश, बाजूला व मागें लोंबकळून व सारथ्याकडे तोंड करून अश्रूंनीं मुख भरून गेलेले असे सर्व लोक अत्यंत आक्रोश करीत करीत त्याला म्हणाले, ' सारथ्या, अरे घोड्यांचे लगाम आवरून धर आणि हलके हलके जा. आम्ही रामाचें मुख पाहून घेतों. आतां आम्हांला त्याचें दर्शन दुर्लभ होणार आहे. खरोखर रामाच्या मातेचें हृदय निःसंशय लोखंडाचें आहे कारण आपला स्कंदासारखा पुत्र वनांत निघाला असतांहि तें फुटून जात नाहीं. छायेप्रमाणें पतीला अनुसरणारी ही वैदेहि खरोखर कृतकृत्य आहे. कारण सूर्याची प्रभा ज्याप्रमाणें मेरु पर्वताला सोडीत नाहीं, त्याप्रमाणें धर्माचे ठिकाणीं रत असलेली ही सीता आपल्या पतीला सोडून रहात नाहीं. हे लक्ष्मणा, नेहमीं प्रिय भाषण करणाऱ्या आपल्या देवतुल्य भ्रात्याची ज्या अर्थी तूं सेवा करीत आहेस, त्या अर्थी तूं कृतार्थ आहेस. ही तुझी बुद्धि मोठी प्रशंसनीय आहे. ह्यापासूनच तुझा मोठा भाग्योदय होणार आहे. ह्या रामाच्या मागोमाग जात आहेस, हाच स्वर्गाचा मार्ग आहे. '

ह्याप्रमाणें ते लोक बोलूं लागले असतां नेत्रांत भरलेले अश्रू त्यांच्यानें थांबवून धरवेनात; परंतु ते लोक तसेच त्या प्रिय इक्ष्वाकुवंशजाच्या मागोमाग चालले. तदनंतर अंतःकरणामध्यें खिन्न झालेला व दीन स्त्रियांनीं परिवेष्टित असलेला दशरथ राजा, ' प्रिय पुत्राला अवलोकन करितों ' असें म्हणत

म्हणत घरांतून बाहेर पडला. तेव्हां महागज बद्ध झाला असतां, ज्याप्रमाणें हत्तिणी आक्रोश करूं लागतात, त्याप्रमाणें तो पुढें जातांच रोदन करीत असलेल्या स्त्रियांचा प्रचंड ध्वनी कानीं येऊं लागला. पर्वदिवशीं राहूनें ग्रस्त केलेल्या पूर्ण चंद्राप्रमाणें श्रीमान पिता दशरथ खिन्न होऊन गेला. हें पाहून अचिंत्य धैर्यानें युक्त असलेल्या वैभवशाली रामानें 'लवकर हांक' म्हणून सारथ्याला सुचविलें. त्या सारथ्याला 'चल' म्हणून राम सांगूं लागला, आणि 'थांब' म्हणून लोक म्हणूं लागले. तेव्हां दोन्ही प्रकारच्या आज्ञा झालेल्या त्या सारथ्याला मार्गामध्यें त्या दोहोंपैकी कांहींच करितां येईना. महापराक्रमी राम नगरांतून जाऊं लागला असतां रथानें उडालेली भूमीवरील धूळ नगरवासी जनांच्या अश्रूंवर पडून नाहींशी झाली. रामाच्या प्रयाणसमयीं नगरांतील लोक अत्यंत कष्टी झाले. जिकडे तिकडे दुःखाश्रू सुरू होऊन कोठेंच उत्साह नाहींसा झाला. हाहाकार उडून सर्व नगरामध्यें लोक मूर्च्छित झाले. मत्स्यांच्या हालचालीनें चलित झालेल्या कमलापासून जसें पाणी गळूं लागतें, तसें स्त्रियांच्या नेत्रांतून दुःखाश्रू गळूं लागले.

ह्याप्रमाणें सर्व नगरातील लोकांचें चित्त एका दुःखामध्येंच मग्न झालेलें आहे, असें दिसून आल्यावर श्रीमान दशरथ राजा हा मुळें तोडिलेल्या वृक्षाप्रमाणें दुःखानें भूमीवर पडला. तेव्हां अत्यंत दुःखित होऊन राजा मूर्च्छित झाल्याचें पाहून रामाच्या मागें चाललेल्या लोकांमध्ये हाहाकार उडाला. आणि अंतःपुरासहवर्तमान आक्रोश करीत असलेल्या राजाला अवलोकन करून कांहीं लोक 'हे रामा' असें म्हणून व कांहीं लोक 'हे राममाते' असें म्हणून शोक करूं लागले. तेव्हां राम मागें वळून पाहूं लागला असतां, राजा व माता आपल्या मागोमाग येत असून, राजा खिन्न झाला आहे व त्याचें अंतःकरण गोंधळून गेलें आहे, असें मार्गामध्यें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें. परंतु पाशानें बद्ध झालेल्या सिंगराला जसें आपल्या मातेकडे मोकळेपणानें पहातां येत नाहीं, त्याप्रमाणें धर्मपाशानें बद्ध झालेल्या रामाला वर मान करून उघडपणें त्यांच्याकडे पहातां येईना. तेव्हां दुःखाचा ज्यांना कधींच अनुभव नाहीं, नेहमीं ज्यांनीं सुखच भोगिलेलें आहे, व रथावर आरोहण करून गमन करणेंच ज्यांना उचित आहे, असें आपले मातापितर पायानीं आपल्या मागोमाग येत आहेत, असें पाहून 'लवकर चल' म्हणून रामानें सारथ्याला सांगितलें. कारण अंकुशांनी ताडित झालेला गज ज्याप्रमाणें आपल्या पाठी-

मागें असलेली वस्तु पहाण्यास समर्थ होत नाहीं, त्याचप्रमाणें पित्याची व मातेची ती दुःखदायक मुद्रा पहाण्यास पुरुषश्रेष्ठ राम समर्थ झाला नाहीं. परंतु घरांत वासरूं बांधून ठेविलें असलें म्हणजे गाय परत येतांना वांसराकरितां जशी धांवत धांवत घरीं येते, तशी राम-माता रामाच्या मागोमाग धांवूं लागली. तेव्हां आपल्या रथाच्या मागोमाग आपली माता कौसल्या रोदन करीत करीत धांवत येत आहे; 'हे रामा, हे रामा, हे सीते, हे लक्ष्मणा' असा आक्रोश करीत आहे आणि राम, लक्ष्मण व सीता ह्यांच्याकरितां अश्रु ढाळीत ढाळीत थयथयाट करीत आहे, असें त्या रामानें अवलोकन केलें. 'थांब थांब' म्हणून दशरथ राजा सुमंत्राला ओरडून सांगूं लागला; आणि 'चल चल' असें त्याला राम म्हणूं लागला. तेव्हां त्या सुमंत्र सारथ्याचें मन एकमेकांशीं युद्ध करण्याकरितां सज्ज झालेल्या दोन सैन्यांच्या मध्यभागीं असलेल्या पुरुषाप्रमाणें उदासीन झालें तेव्हां राम म्हणाला, " 'मी थांब थांब म्हणत असतांनाहि तूं थांबत नाहींस' म्हणून राजा जरि तुला रागें भरला, तरी 'मला राजाचें म्हणणें ऐकूं आलें नाहीं' असें समजून तूं रथ पुढें हांकीत जा. कारण जाण्याला विलंब करणें हें माझ्या दुःखाचें कारण असल्यामुळें तें फारच वाईट आहे. ह्यास्तव सत्वर चल."

असें रामानें सांगितल्यानंतर रामाच्या आज्ञेप्रमाणें वागणाऱ्या त्या सुमंत्र सारथ्यानें मागोमाग येत असलेल्या त्या लोकांचा निरोप घेऊन स्वेच्छेनें जात असलेल्या अश्वांना सत्वर जाण्याकरितां इशारत दिली. तेव्हां रामाला प्रदक्षिणा करून राजकीय लोक देहानें परत फिरले; परंतु शीघ्र वेगानें युक्त असलेल्या मनानें ते परत फिरले नाहींत. रामाच्या मागोमाग चाललेला इतर मनुष्यसमूह तर देहानें व मनानेंहि परत फिरला नाहीं. 'जो फिरून परत यावा अशी आपल्याला इच्छा असेल त्याला लांब पोहोंचविण्यास जाऊं नये' असें अमात्य हे महाराज दशरथाला सांगूं लागले. तेव्हां खिन्न वदन होऊन सर्वांगाला घाम सुटलेला तो सर्वगुणसंपन्न दीन दशरथ राजा त्यांचें सांगणें ऐकून भार्येसहवर्तमान त्या आपल्या पुत्राकडे पहात उभा राहिला.

सर्ग एकेचाळिसावा.

रामगमनानंतर अयोध्येची स्थिति.

तो पुरुषश्रेष्ठ राम हात जोडून बाहेर जाऊं लागला असतां स्त्रियांच्या अंतःपुरामध्यें मोठाच आक्रोश होऊं लागला; आणि त्या आपल्याशीं म्हणाल्या, ' आम्हां बिचाऱ्या अनाथ व दुर्बलांचें जो रक्षण करीत असे, आणि कोणत्याहि प्रकारचें सुख आम्हांला प्राप्त होण्याला जो कारण असे, तो नाथ राम कोठें हो जात आहे? कोणीहि त्याच्यावर खोटा आरोप केला असतां तो क्रुद्ध होत नाहीं, व प्रजेला क्रोध उत्पन्न होईल अशीं कृत्यें वर्ज्य करून क्रुद्ध झालेल्या सर्व लोकांचें नेहमीं सांत्वन करीत असतो. असो. प्रजाजनांना दुःख झालें असतां दुःखी होणारा राम कोठें बरें जात आहे? कौसल्या मातेचे ठिकाणीं व आमचे ठिकाणीं जो सारखाच वागत असतो, तो महात्मा कोठें हो जात आहे? कैकेयी त्रास देऊं लागल्यामुळें राजानें वनांत जाण्याची आज्ञा केलेला व केवळ आमचेंच नव्हे, तर सर्व जगताचें रक्षण करणारा राम कोठें बरें जात आहे? अहो, धर्माला अनुसरून वागणाऱ्या, सत्यव्रतानें चालणाऱ्या आणि जगताला आधार असलेल्या रामाला वनवासाकरितां हांकून देणारा राजा खरोखर विचारहीन झालेला आहे. '

अशा रीतीनें वत्सरहित धेनूप्रमाणें दुःखाकुल झालेल्या त्या सर्व राजस्त्रिया रोदन करून उच्च स्वरानें आक्रोश करूं लागल्या. अंतःपुरांतील तो घोर आक्रोश श्रवण करून पुत्रशोकानें अतिशय संतप्त झालेला भूपति अतिशयच दुःखित झाला. राम चालता झाल्यावर अग्निहोत्र होम होईनातसे झाले. सूर्य आच्छादित झाला. हत्ती गवत खातनासे झाले व गायीहि वासरांना पाहितनाशा झाल्या. त्रिशंकु, मंगल, बृहस्पति, बुध व इतर सर्व ग्रह दारुण होऊन रात्रीं वक्रगतीनें चंद्रासमीप येऊन राहिले. नक्षत्रें निस्तेज झालीं. ग्रहांची कांति नाहींशी झाली व ते ग्रह आपला मार्ग सोडून आकाशामध्यें धूमयुक्त दिसूं लागले. वायूच्या वेगामुळें मेघपंक्ति आकाशांत उद्भवलेल्या सागराप्रमाणेंच दिसूं लागली. राम वनांत गेला असतां तें सर्व नगर भूकंपानें हालूं लागलें. अंधकारानें जशा कांहीं सर्व दिशा व्याप्त होऊन जाऊन ग्रह, नक्षत्रें वगैरे कांहींच प्रकाश देतनाशीं झालीं. नगरांतील सर्व लोकांना एकाएकीं दैन्य प्राप्त झालें, आणि खाण्याकडे अथवा व्यवहाराकडे कोणाचेंहि लक्ष्य लागेनासें झालें.

इतकेंच नव्हे, परंतु वारंवार शोकसंतप्त झाल्यामुळें ते एकसारखे दीर्घ उच्छ्वास टाकूं लागले; आणि ते सर्वजण भूपति दशरथाच्या नांवानें आक्रोश करूं लागले. राजमार्गामध्यें असलेल्या लोकांचीं मुखें अश्रूंनीं भरून गेलीं, आणि सर्वच शोकाकुल झाल्यामुळें आनंदित असा कोणीहि दृष्टोत्पत्तीस येईना. थंड वारा वाहीनासा झाला. चंद्र पूर्वींप्रमाणें सौम्य दिसेनासा झाला. सूर्य जगताला प्रकाशित करीनासा झाला. सारांश, सर्व ब्रह्मांडच शोकाकुल होऊन गेलें. पुत्र मातापितरांची अपेक्षा धरीतनासे झाले, भर्ते स्त्रियांची गरज बाळगीतनासे झाले आणि भ्राते भ्रात्यांचें अगत्य ठेवीतनासे झाले. तात्पर्य, सर्व लोक सर्व कांहीं सोडून देऊन रामाचें चिंतन करूं लागले. रामाचे जे सुहृद होते, त्यांचें मन अगदींच मोहित होऊन गेलें, व शोकभरानें व्याप्त झाल्यामुळें त्यांना झोंप कसली ती मुळींच येईनाशी झाली. तेव्हां मेरु व इतर पर्वत ह्यांसहवर्तमान पृथ्वी इंद्ररहित झाली असतां जशी हालूं लागते, त्याप्रमाणें महात्म्या रामानें रहित झालेली अयोध्या भय व शोक ह्यांच्या योगानें अगदीं पेटून जाऊन भयंकर रीतीनें हालूं लागली; आणि गज, योद्धे व अश्व ह्यांच्या सैन्यासहवर्तमान ती नगरी आक्रोश करूं लागली.

सर्ग बेचाळिसावा.

दशरथाचा विलाप.

राम वनांत जाऊं लागला असतां त्याच्या रथानें उडालेली धूळ जोंपर्यंत दिसत होती, तोंपर्यंत इक्ष्वाकुवंशजश्रेष्ठ दशरथ राजानें आपले नेत्र परत फिरविले नाहींत. जोंपर्यंत अत्यंत धार्मिक अशा आपल्या प्रिय पुत्राला राजा अवलोकन करीत होता, तोंपर्यंत पुत्रदर्शनाकरितां भूमीवर त्याचें शरीर जसें कांहीं वृद्धिंगतच होत होतें. (जोंपर्यंत रथानें उडालेली धूळ दृष्टीस पडण्याचा संभव होता, तोंपर्यंत दशरथ राजा पाय वर करून ती पहातच होता.) परंतु वनांत जाणाऱ्या रामाच्या रथानें उडालेली धूळ सुद्धां जेव्हां दिसेनाशी झाली, तेव्हां दशरथ भूपति व्याकुळ व खिन्न होऊन भूतलावर पडला. तेव्हां त्याला उठवून व त्याचा उजवा हात धरून कौसल्या नगरामध्यें परत आली. ती सुंदरी कैकेयी फक्त त्याच्या डाव्या बाजूला राहूनच त्याच्या बरोबर नगरामध्यें आली. कारण न्याय, धर्म व विनय ह्यांनीं युक्त असून अंतःकरणामध्यें क्षुब्ध झालेला

तो दशरथ कैकेयीला पाहून म्हणाला, "हे कैकेयि, तूं माझ्या अवयवांना स्पर्श करूं नको. हे पापनिश्चय, मला तुझें तोंड पहाण्याची इच्छा नाहीं. तूं माझी भार्या नव्हेस. इतकेंच नव्हे, परंतु लांबची कोणी नातेवाईक सुद्धां नव्हेस. तुझ्या आश्रयानें जे उपजीविका करणारे असतील, त्यांचा मी कोणी नव्हें व तेहि माझे कोणी नव्हेत धर्माचा त्याग करून केवल स्वार्थाकडे दृष्टि ठेवणाऱ्या तुझा मी त्याग करितों. मीं जें तुझें पाणिग्रहण केलें आणि तुझ्याकडून अग्नीला जी मीं प्रदक्षिणा घालविली, त्या सर्वांचा इहलोकीं व परलोकीं आतां माझ्याशीं कांहीं संबंध राहिला नाहीं. हें अक्षय्य राज्य प्राप्त झाल्यानें भरत जर संतुष्ट होईल, तर पिता असें समजून तो जें कांहीं माझें श्राद्ध वगैरे करील, तें मला न पोहोंचो."

धुळीनें भरलेल्या राजाला भूतलावरून उठविल्यावर शोकाकुल झालेली राजपत्नी कौसल्या राजासहवर्तमान परत आली असतां, तो धर्मनिष्ठ दशरथ रामाचें चिंतन करून ब्राह्मणाचा वध केल्याप्रमाणें अथवा अग्नीला हस्तस्पर्श केल्याप्रमाणें दुःख करूं लागला. ज्या मार्गानें रामाचा रथ गेला, तो मार्ग पुनः पुनः दशरथ पाहूं लागला असतां त्याला फारच क्लेश होऊं लागले. त्या वेळीं राहुग्रस्त झालेल्या सूर्याप्रमाणें त्या राजाचें रूप तेजोहीन दिसूं लागलें; आणि पुत्र नगराबाहेर गेला असें, जेव्हां त्याला समजून आलें, तेव्हां त्या प्रिय पुत्राचें स्मरण करून दुःखाकुल झालेला तो दशरथ राजा असा विलाप करूं लागला. "त्या माझ्या पुत्राला वाहून नेणाऱ्या श्रेष्ठ अश्वांचीं पाउलें मार्गामध्यें दिसत आहेत, परंतु तो महात्मा कोठें दिसत नाहीं. उत्कृष्ट अलंकार धारण केलेल्या स्त्रिया वारा घालीत असतांना चंदनाची उटी लाविलेला जो माझा उत्कृष्ट पुत्र गाद्यागिरद्यांवर पडत असे, तो आज खरोखर वृक्षमूलांचा आश्रय करून काष्ठ अथवा पाषाण उशाशीं घेऊन कोठें तरी पडेल. हत्तिणींचा पति पर्वतशिखरप्रभृति प्रदेशावरून जसा उठतो, तसा धुळीनें भरलेला तो दीन राम सुस्कारे टाकीत टाकीत पृथ्वीवरून उठेल, व तो आजानुबाहु जगत्पति राम उठून जाऊं लागला असतां खरोखर वनांत संचार करणारे लोक अनाथाप्रमाणें त्याला अवलोकन करतील. नेहमीं सुखाचा उपभोग घेण्याची संवय झालेल्या त्या प्रिय जनककन्येला कांट्यांतून चालल्यानें क्लेश होतील, आणि अशी ती आज वनामध्यें जाईल. वनाविषयीं माहिती नसलेल्या त्या जनककन्येनें गंभीर आणि अंगावर कांटा आणणारी अशी श्वापदांची गर्जना ऐकिली म्हणजे तिला खरोखर भय प्राप्त होईल. कैकयी, तुझे मनोरथ आतां परिपूर्ण होऊं दे. तूं विधवा होऊन राज्य कर. कारण, त्या पुरुषश्रेष्ठ रामावांचून मला जिवंत रहावेसें वाटत नाहीं."

ह्याप्रमाणें जनसमुदायांनीं परिवेष्ठित असलेला राजा विलाप करीत करीत मृताबद्दल स्नान करून जाणाऱ्या पुरुषाप्रमाणें दु:खित होऊन आपल्या गृहामध्यें प्रविष्ठ झाला. तात्पर्य—सर्व लोक रामाच्या मागोमाग गेले असल्यामुळें—जिच्यांतील घरांच्या पुढल्या बाजूला व मध्यभागांतहि कोणी नव्हतें, जिच्यांतील दुकानें बंद केलेलीं होतीं, जिच्यांतील लोक कष्टी, दुर्बल व दु:खी झालेले होते आणि जिच्यांतील मोठमोठे मार्गहि विशेषसे गजबजलेले दिसत नव्हते, अशी ती सर्व नगरी अवलोकन करून रामाचेंच चिंतन करणारा तो दशरथ मेघांमध्यें प्रवेश करणाऱ्या सूर्याप्रमाणें विलाप करीत करीत गृहामध्यें प्रविष्ठ झाला. त्या घरामध्यें राम, सीता व लक्ष्मण नसल्यामुळें तें घर गरुडानें आंतील सर्प नाहींतसे केल्यामुळें क्षोभरहित झालेल्या महासरोवराप्रमाणें स्तब्ध दिसूं लागलें. असो.

घरांत आल्यानंतर दु:खामुळें ज्याचा शब्द अडखळत आहे, असा तो भूपति विलाप करीत करीत अतिशयच सावकाश, फारच हळूं आणि म्हणूनच अर्थबोधरहित असा दीन वाणीनें म्हणाला, ‘राममाता कौसल्येच्या घरीं मला लवकर न्या. दुसऱ्या ठिकाणीं माझ्या अंत:करणाला बरें वाटणार नाहीं.’ ह्याप्रमाणें राजा बोलूं लागला असतां दारावरील पहारेकरी त्याला कौसल्येच्या घरीं घेऊन गेले. त्यांनीं त्याला तेथें मंचकावर नेऊन ठेविल्यानंतर तो खालीं मान घालून पडला. ह्याप्रमाणें कौसल्येच्या घरीं येऊन तो राजा शय्येवर पडला असतांहि त्याचें मन अस्वस्थच होतें. दोन पुत्र व स्नुषा ह्यांनीं रहित असलेलें तें घर चंद्ररहित झालेल्या आकाशाप्रमाणें त्याला दिसूं लागलें. तें अवलोकन केल्यावर तो वीर्यवान महराज दशरथ हात वर करून उच्च स्वरानें आक्रोश करूं लागला, ‘रामा, तूं आम्हांला टाकून जात आहेस. राम परत येईपर्यंत जे जिवंत रहातील, आणि राम परत आल्यावर त्याला कडकडून भेट देऊन जे अवलोकन करतील, तेच खरोखर सुखी व धन्य पुरुष होत.’ तदनंतर स्वत:ची कालरात्रीच कीं काय अशी ती रात्र पडल्यावर मध्यरात्रसमयीं दशरथ राजा कौसल्येला म्हणाला, ‘कौसल्ये, तूं मला दिसत नाहींस. तूं आपल्या हातानें मला चांगला स्पर्श कर. रामाकडे गेलेली माझी दृष्टि अद्यापि निवृत्त होत नाहीं.’ ह्याप्रमाणें दशरथानें सांगितल्यानंतर, रामाचेंच चिंतन करीत करीत सुस्कारे टाकीत असलेल्या दशरथ राजाला शय्येवर अवलोकन करून राजपत्नी कौसल्या जवळ येऊन बसली, आणि पूर्वींपेक्षांहि अधिक दु:खाकुल होऊन घोर विलाप करूं लागली.

सर्ग त्रेचाळिसावा.

कौसल्येचा विलाप.

तदनंतर शोकानें खिन्न होऊन शय्येवर पडलेल्या त्या राजाला अवलोकन केल्यावर पुत्रशोकाकुल झालेली कौसल्या त्याला म्हणाली, "हे पुरुषश्रेष्ठ, सर्पाप्रमाणें कुटिल गतीनें युक्त असलेली कैकेयी रामाचे ठिकाणीं आपलें कौटिल्य-रूप विष ओकून कांत टाकून दिलेल्या नागिणीप्रमाणें आतां संचार करूं लागेल. आणि रामाला हांकून देऊन मनोरथ परिपूर्ण झाल्यामुळें स्वस्थ झालेली ती भाग्यवती दुष्ट सर्पाप्रमाणें घरामध्यें मला आतां अधिकच त्रास देऊं लागेल. रामानें ह्या नगरामध्यें भिक्षा मागून घरीं रहावें, असें जर हिनें मागितलें असतें, आणि माझा पुत्र हिचा दास होवो असा जरी आपण हिला वर दिला असता, तरी सुद्धां—यांत त्याचा वियोग होणार नसल्यामुळें—मला तें इष्टच झालें असतें. स्वस्थानापासून आपल्या इच्छेप्रमाणें रामाला कैकेयीनें पदच्युत केलें आहे. पर्वदिवशीं (यागसमयीं) अग्निहोत्री ज्याप्रमाणें राक्षसांचा भाग म्हणून (कोंडा वगैरे) बाहेर टाकून देत असतात, त्याप्रमाणें वनामध्यें तिनें त्याला फेंकून दिलें आहे. सारांश, राक्षसांच्या तावडींतून सुटणें कठीणच असल्यामुळें पुनरपि त्याचें मला दर्शन होणें संभवनीय नाहीं. ज्याची चालण्याची ढब महागजाप्रमाणें आहे, असा तो अजानुबाहु, वीर धनुर्धर राम सीता व लक्ष्मण ह्यांसहवर्तमान खरोखर वनांत जात आहे ना! आपण कैकेयीला वश होऊन आजपर्यंत दुःख न पाहिलेल्या अशा ज्यांचा आपण वनवासाकरितां त्याग केला, त्यांची वनामध्यें राक्षसांच्या तावडींत सांपडल्यावाचून काय बरें दुसरी अवस्था होणार आहे! राज्योपभोग हें जें यौवनावस्थेचें फल, तें प्राप्त होण्याच्या वेळींच आपण त्या तरुणांना कोणतीहि उत्कृष्ठ वस्तु बरोबर न देतां वनामध्यें हांकून दिलें आहे, तेव्हां फलमूलांवर उपजीविका करून ते दीन कसे बरें वनामध्यें राहतील! भार्या व भ्राता ह्यांसहवर्तमान रामाला मी अवलोकन करीन अशी ती माझ्या शोकाचा नाश करणारी शुभ वेळ कधीं आतां येईल काय! वीर राम व लक्ष्मण आले आहेत असें ऐकिल्याबरोबर उंच उंच ध्वज उभारून ह्या यशस्विनी अयोध्येंतील लोक केव्हां बरें आनंदित होतील! अरण्यांतून परत आलेले पुरुषश्रेष्ठ राम-लक्ष्मण अवलोकन करून पर्वदिवशीं आनंदित होणाऱ्या समुद्राप्रमाणें ही नगरी केव्हां

बरें आनंदित होईल ! गायीला पुढें करून येणाऱ्या बैलाप्रमाणें रथामध्यें सीतेला पुढें करून आजानुबाहु वीर राम केव्हां बरें अयोध्येमध्यें प्रवेश करील ! शत्रुदमन करणारे माझे पुत्र नगरींत शिरूं लागले असतां राजमार्गामध्यें हजारों प्राणी त्यांच्यावर केव्हां बरें लाह्या उधळतील ! उत्कृष्ठ धनुष्य व खड्ग धारण केल्यामुळें सश्रृंग पर्वताप्रमाणें दिसणारे असे माझे पुत्र उत्कृष्ठ कुंडलें धारण करून अयोध्येमध्यें प्रवेश करीत असतांना मी केव्हां बरें पाहीन ? कुमारिका व द्विज ह्यांच्यापासून अनुक्रमें पुष्पें व फलें घेत घेत ते त्रिवर्ग आनंदित होऊन सर्व नगरवासी जनांच्या उत्सवाकरितां केव्हां बरें अयोध्या नगरीला प्रदक्षिणा करतील ! ज्ञानानें वृद्ध आणि वयानें देवांप्रमाणें अत्यंत तरुण असा धर्मात्मा राम वेळेवर पडणाऱ्या पर्जन्याप्रमाणें लोकांना आनंद देत देत केव्हां बरें परत येईल ! हे वीर, पूर्वी मी निःसंशय क्षुद्रवृत्तीनें वागून वत्सें स्तनपान करण्याची इच्छा करीत असतांना त्यांच्या मातांचे स्तन कापून टाकिले आहेत. म्हणून हे पुरुषश्रेष्ठ, त्या पातकामुळें, सिंह ज्याप्रमाणें पुत्रवत्सल गायीला वत्सहीन करून टाकितो, त्याप्रमाणें आपण मला वत्सहीन करून टाकिलें आहे. एखादी सिंहीण ज्याप्रमाणें बाल-वत्सांनीं युक्त असलेल्या गायीला बलात्कारानें वत्सहीन करून टाकिते, त्याप्रमाणें कैकेयीनें मला वत्सहीन करून टाकिलें आहे. सारांश, मला एकच पुत्र आहे. तेव्हां गुणसंपन्न आणि सर्वशास्त्रपारंगत अशा त्या पुत्रावांचून माझी जिवंत राहण्याची इच्छा नाहीं. कारण प्रिय पुत्र आणि महाबलाढ्य लक्ष्मण हे दोघेहि दृष्टीआड झाले असल्यामुळें जीव धरून राहण्यास माझे अंगीं कांहीं सामर्थ्यच नाहीं. प्रचंड प्रभेनें युक्त असलेला भगवान सूर्य ज्याप्रमाणें आपल्या किरणांच्या योगानें ग्रीष्म ऋतूमध्यें ही पृथ्वी तप्त करून टाकितो, त्याप्रमाणें महासर्पापेक्षांहि तीक्ष्ण असलेला हा पुत्रशोकजन्यअग्नि आज मला संतप्त करीत आहे."

सर्ग चव्वेचाळिसावा.

कौसल्येचें सांत्वन.

ह्याप्रमाणें ती उत्कृष्ठ स्त्री कौसल्या विलाप करीत असतांना धर्मानें वागणारी सुमित्रा धर्माला अनुसरून असलेलें भाषण तिच्याशीं करूं लागली कीं, "हे आर्ये, तुझा तो पुत्र सद्गुणी व पुरुषांमध्यें श्रेष्ठ आहे. तेव्हां तुझा हा

विलाप आणि अशा प्रकारें दीनपणें रोदन करणें, हें व्यर्थ आहे. हे आर्ये, महात्म्या व सत्यवादी पित्याची प्रतिज्ञा खरी करण्याकरितां राज्याचा त्याग करून जो तुझा महाबलाढ्य पुत्र गेला आहे, आणि परलोकीं ज्याचें फल नेहमीं चांगलें येतें, अशा शिष्टांनीं आचरिलेल्या धर्माविषयीं जो रत आहे, त्या श्रेष्ठ रामाबद्दल मुळींच शोक करण्याचें कारण नाहीं. निष्पाप लक्ष्मण त्याच्याशीं नेहमीं उत्कृष्ठ रीतीनें वागत आहे, व तो लक्ष्मण सर्व भूतांवर दया करणारा आहे. तेव्हां हें एक त्या महात्म्या रामाला सुखच आहे. नेहमीं सुख भोगण्याची संवय असलेली ही सीता जरी तुझ्या धर्मात्म्या पुत्राबरोबर जात आहे, तरी वनवासामध्यें जें दुःख असतें, तें जाणूनच ती जात आहे. आपली कीर्तिरूप पताका जो प्रभु नेहमीं जगतामध्यें फडकवीत आहे, त्या तुझ्या धर्मस्वरूप व सत्यव्रतनिष्ठ पुत्राला काय प्राप्त होण्याचें राहिलें आहे? रामाचा उघड उघड असलेला निर्मलपणा आणि सर्वोत्कृष्ठ मोठेपणा जाणून सूर्य त्याला आपल्या किरणांच्या योगानें ताप देणार नाहीं. सर्व कालीं वनांतून निघालेला आणि पाहिजे तसा शीत व ऊष्ण असलेला कल्याणकारक व सुखावह वायु रामाची सेवा करील. निष्पाप राम रात्रीं शयन करूं लागला असतां पिता जसा पुत्राला पोटाशीं कवटाळून धरितो, त्याप्रमाणें संताप नाहींसा करणारा शीतल चंद्रमा आपल्या किरणांनीं स्पर्श करून त्याला आनंद देईल. शंबरासुरपुत्र दैत्यराज सुबाहूचा संग्रामामध्यें वध झाल्याचें पाहून ज्या महातेजस्वी रामाला ब्रह्मदेवानें दिव्य अस्त्रें दिलीं, तो शूर, पुरुषश्रेष्ठ व आपल्या बाहुबलावरच अवलंबून असणारा राम यत्किंचित्‌हि न भितां घराप्रमाणें अरण्यांत वास्तव्य करील. ज्याच्या बाणाच्या टप्प्यांत सांपडून शत्रु नाश पावतात, त्याच्या आज्ञेंत पृथ्वी तरी कशी बरें राहणार नाहीं? रामाची शरीरकांति ज्या प्रकारची दिसत आहे, त्याचें शौर्य ज्या प्रकारचें आढळण्यांत येत आहे, आणि मनाचा चांगुलपणा त्याचे ठिकाणीं ज्या प्रकारचा दृष्टोत्पत्तीस येत आहे, त्यावरून पहातां वनवास संपून त्याला लवकरच राज्य प्राप्त होईल, असें दिसतें. सूर्याचाहि सूर्य, अग्नीचाहि अग्नि, प्रभूचाहि प्रभु, श्रीचीहि श्री, कीर्तीचीहि कीर्ति, क्षमेचीहि क्षमा, देवतेचेंहि दैवत आणि प्राण्यमध्येंहि श्रेष्ठ असा जो राम त्याला वनांत अथवा नगरांत दोषजनक अशा काय बरें गोष्टी आहेत? पृथ्वी, सीता आणि विजयलक्ष्मी ह्या तिन्ही स्त्रियांसहवर्तमान रामाला लवकरच अभिषेक होईल. ज्याला जातांना पाहून शोकातिशयानें वेडून गेलेले अयोध्येंतील

सर्व लोक दुःखाश्रू ढाळीत आहेत, आणि कुश व वल्कलें धारण करून जाणाऱ्या ज्या अजिंक्य वीरांच्या मागोमाग लक्ष्मीप्रमाणें सीता गेली आहे, त्याला काय बरें दुर्लभ आहे? धनुर्धरांमध्यें श्रेष्ठ असा लक्ष्मण बाण, खड्ग आणि अस्त्रें धारण करून ज्याच्यापुढें जात आहे, त्याला काय बरें दुर्लभ आहे? हे देवि, वनवास संपवून तो परत आलेला तूं पहाशील, हें मी तुला सत्य सांगत आहें. ह्याकरितां हे देवि, शोक व मोह ह्यांचा त्याग कर. हे निर्दोष कल्याणि, उदय पावलेल्या चंद्राप्रमाणें आल्हाददायक असा तुझा पुत्र ह्या तुझ्या चरणांना मस्तकानें प्रणाम करितांना तूं पुनरपि अवलोकन करशील, आणि पुनरपि नगरांत प्रविष्ट होऊन त्या महावैभवशाली रामाला अभिषेक झाल्याचें अवलोकन केल्यावर तूं आपल्या नेत्रांतून सत्वरच आनंदाश्रू ढाळूं लागशील. तूं शोक अथवा दुःख करूं नको. रामासंबंधानें कांहींहि अशुभ दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. सीता आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान तूं आपला पुत्र लवकरच अवलोकन करशील. हे निष्पाप, ह्या सर्व लोकांना तूंच धीर देणें योग्य असतांना सांप्रत हें मनामध्यें असें काय दुःख करीत आहेस? ज्या अर्थीं हा राम तुझा पुत्र आहे, त्या अर्थीं हे देवि, त्यांबद्दल शोक करणें तुला योग्य नाहीं. कारण सर्व जगतांमध्यें रामापेक्षां कोणीहि सन्मार्गानें वागणारा नाहीं. सुहृदासहवर्तमान तो आपला पुत्र अभिवंदन करीत असतांना अवलोकन करून वर्षाकालाच्या मेघपंक्तीप्रमाणें तूं सत्वरच आनंदाश्रूंची वृष्टि करूं लागशील. दुसऱ्याचे मनोरथ परिपूर्ण करणारा तुझा पुत्र सत्वरच अयोध्येमध्यें परत येईल, आणि कोमल व पुष्ट अशा आपल्या हातांनीं तुझे पाय धरील. सुहृदांसहवर्तमान तुझा शूर पुत्र चरणस्पर्शपूर्वक नमस्कार करूं लागला असतां पर्वताला सिंचन करणाऱ्या मेघपंक्तीप्रमाणें आनंदाश्रूंनीं तूं त्याला सिंचन करशील."

ह्याप्रमाणें संभाषणामध्यें कुशल असलेली निर्दोष व मनोहर राजपत्नी सुमित्रा धीर देण्याच्या उद्देशानें नानाप्रकारच्या शब्दांनीं रामाच्या त्या मातेला अशा प्रकारें सांगून स्वस्थ राहिली. लक्ष्मणाच्या मातेचें तें भाषण श्रवण करून रामाची माता जी राजपत्नी कौसल्या, तिच्या शरिरांतील शोक अल्प उदकानें युक्त असलेल्या शरदृतूंतील मेघाप्रमाणें तत्क्षणीं नाहींसा झाला.

सर्ग पंचेचाळिसावा.

रामाचा प्रजाजनांना उपदेश.

अमोघ पराक्रमी व महात्मा राम वनवासाकरितां अरण्यांत जाऊं लागला असतां त्याच्यावर प्रेम करणारे लोक त्याच्या मागोमाग गेले. मित्रधर्मानें अमात्यांनीं दशरथ राजाला परत फिरविलें; परंतु रामाच्या रथामागें गेलेले लोक परत फिरले नाहींत. कारण तो महायशस्वी व गुणसंपन्न राम अयोध्येमध्यें वास्तव्य करणाऱ्या पुरुषांना पूर्णचंद्राप्रमाणें प्रिय झाला होता; परंतु ते प्रजाजन परत फिरण्याविषयीं ककुत्स्थकुलोत्पन्न रामाची प्रार्थना करीत असतांनाहि पित्याला सत्य करण्याचा उद्देश मनांत धरून राम वनामध्येंच चालला आणि दृष्टीनें पानच करीत आहे कीं काय अशा रीतीनें त्या प्रजाजनांकडे सप्रेम दृष्टि देऊन आपलीं मुलेंच कीं काय अशा रीतीनें राम प्रेमपूर्वक त्यांना म्हणाला, "अयोध्यावासी लोकांचें जें माझ्यावर प्रेम असेल, व माझ्याविषयीं जो त्यांना बहुमान वाटत असेल, तें सर्व माझें प्रिय करण्याकरितां भरताचे ठिकाणीं त्यांनीं करावें. त्याचें आचरण उत्कृष्ट असून तो कैकेयीचा आनंद वृद्धिंगत करणारा आहे, आणि तो तुम्हांला प्रिय व हितावह अशा गोष्टी अगदीं पूर्णपणें करील. वयानें बाल, परंतु ज्ञानानें वृद्ध, शौर्यगुणांनीं युक्त व सौम्य असा तो भरत तुम्हांला योग्य व तुमचें भय दूर करणारा राजा होईल. माझ्यापेक्षांहि उत्कृष्ट अशा राजगुणांनीं तो युक्त आहे. त्यालाच यौवराज्याचा अभिषेक करण्याविषयीं राजानें निश्चय केला आहे. ह्यास्तव तुम्ही आपल्या राजाच्या आज्ञेप्रमाणें वागा, आणि मी वनवासांत गेल्यावर, ज्या रीतीनें हा महाराज संतप्त होणार नाहीं, त्या रीतीनें माझें प्रिय करण्याकरितां तुम्ही व्यवस्था करा."

रामाच्या मागें जाणाऱ्या लोकांचा विलाप.

ह्याप्रमाणें जसजसा दाशरथि राम धर्मालाच अनुसरून वागूं लागला, तसतसें त्या प्रजाजनांना रामच आपणांला राजा पाहिजे असें वाटूं लागलें; आणि अश्रूंनीं ज्यांचे नेत्र भरून गेलेले आहेत, अशा त्या नगरवासी दीन जनांना लक्ष्मणासहवर्तमान राम आपल्या गुणांनीं बांधून टाकून जसा कांहीं ओढूनच नेऊं लागला. तेव्हां ज्ञान, वय आणि तेज ह्या तिहीं प्रकारांनीं वृद्ध झालेले ते द्विज वय झाल्यामुळें मान हालवीत हालवीत दुरूनच म्हणाले, 'रामाला ओढून नेणाऱ्या वेगवान व जातिवंत अश्वांनो, तुम्ही परत फिरा, जाऊं नका.

आपल्या मालकाचें कल्याण करा. अरे, प्राण्यांना कान आहेत, आणि विशेषें-करून अश्वांचे कान तर अधिक तिखट आहेत. तस्मात् तुम्ही आमच्या ह्या याचनेकडे लक्ष्य देऊन परत फिरा. धर्मदृष्ट्या पाहूं गेलें असतां शुद्ध अंतः-करणानें युक्त आणि शुभ व दृढ व्रत चालविणाऱ्या तुम्ही आपल्या वीर प्रभूला नगरांतच आणणें योग्य आहे. नगरांतून तुम्हीं त्याला वनांत नेणें उचित नाहीं.'

ह्याप्रमाणें दुःखाचे विलाप करीत करीत बोलत असलेल्या त्या वृद्ध द्विजांना अवलोकन करून राम एकाएकीं रथांतून खालीं उतरला; आणि वनांत जाण्या-विषयीं तत्पर झालेला तो राम जवळ जवळ पावलें टाकून सीता व लक्ष्मण ह्यांसहवर्तमान पायानेंच चालला. कारण सदाचरणाची पर्वा बाळगणारा तो राम, पायांनीं येत असलेल्या त्या ब्राह्मणांकडे रथामध्यें बसून कृपादृष्टि कर-ण्यास समर्थ झाला नाहीं.

आपल्या प्रार्थनेकडे लक्ष्य न देतां राम पुढेंच जात आहे, असें अवलोकन करून मनामध्यें गोंधळून गेलेले ते ब्राह्मण अतिशय संतप्त होऊन त्याला म्हणाले, " हा सर्व ब्राह्मणसमूह ब्राह्मणांच्या हितविषयीं दक्ष असलेल्या तुझ्या मागोमाग येत आहे. म्हणून त्यांच्या खांद्यावर असलेल्या ह्या अग्नीलाहि तुझ्या मागोमाग येऊं दे. शरदृतूंतील मेघाप्रमाणें वाजपेय यागांत प्राप्त झालेलीं हीं आमचीं श्वेत छत्रें तुझ्या मागोमाग आलेलीं अवलोकन कर. छत्र बरो-बर नसल्यामुळें सूर्यकिरणांनीं संतप्त झालेल्या तुला ह्या वाजपेय यागसंबंधीं स्वतःच्या छत्रांनीं आम्ही छाया करूं. वत्सा, आमची मति जी नेहमीं वेद-मंत्राच्या अभ्यासाकडे असते, ती आज वनवासाकडे लाविलेली आहे. आमचें मुख्य धन जे वेद ते तर आमच्या हृदयामध्येंच आहेत; आणि पातिव्रत्य धर्म रक्षण करण्यास समर्थ असल्यामुळें आमच्या स्त्रिया घरामध्यें वास्तव्य करणार आहेत. तेव्हां तुझ्या मागोमाग येण्याला आम्हांला कसलीच अडचण नाहीं. तुझ्याबरोबर जाण्याचा आम्ही पक्का विचार केलेला आहे. आतां आमचा पुन-रपि निश्चय होणें राहिलें नाहीं. तथापि आम्ही तुला कांहीं सांगत आहों. अरे, तूंच जर धर्माची पर्वा बाळगीनासा झालास, तर धर्ममार्गानें कोण बरें वागणार आहे ? तस्मात् हे अत्यंत धर्मनिष्ठ, हंस पक्ष्याप्रमाणें ज्यांतील केंस शुभ्रवर्ण झाले आहेत, आणि भूमीवर पडल्यामुळें जीं धूलियुक्त झालेलीं आहेत अशा मस्तकांनीं आम्हीं तुझी प्रार्थना केली आहे. तेव्हां तूं परत फीर. वत्सा रामा, येथें आलेल्यांपैकीं पुष्कळ ब्राह्मणांच्या यज्ञाची समाप्ति, तुझ्या परत फिरण्यावर

अवलंबून राहिली आहे. तेव्हां यज्ञविध्वंस करून वनांत जाणें तुला योग्य नाहीं. स्थावरजंगमात्मक प्राण्यांची तुझे ठिकाणीं भक्ति आहे. तेव्हां परत फिरण्याविषयीं ते प्राणी तुझी प्रार्थना करीत असतांना तूंहि त्या भक्तांचे ठिकाणीं आपलें प्रेम दाखीव. मूळांनीं जखडून गेल्यामुळें ज्याची गति अगदीं खुंटली आहे, आणि म्हणूनच तुझ्या मागोमाग जाण्यास जे असमर्थ आहेत, असे उंच उंच वृक्ष वायूच्या योगानें जसे कांहीं परत फिरण्याविषयीं तुला ओरडून सांगत आहेत. चलनवलन व आहारार्थ गमन या दोहोंचाहि त्याग करून वृक्षरूप एकाच ठिकाणावर निश्चयानें स्थित झालेले हे पक्षीहि सर्व प्राण्यांचे ठिकाणीं दया करणाऱ्या तुझी याचना करीत आहेत. "

ह्याप्रमाणें परत फिरण्याविषयीं ते ब्राह्मण आक्रोश करीत असतांना रामाला अडथळा करण्याकरितांच आली कीं काय अशी ती तमसा नदी दृष्टीस पडूं लागली. तेव्हां सुमंत्र सारथ्यानेंहि श्रमलेले घोडे रथापासून सोडिले, आणि श्रम परिहार करण्याकरितां भूमीवर लोळून सत्वर उठल्यानंतर त्यांना पाणी पाजून व धुऊन तमसा नदीच्या जवळ त्यानें त्यांना वैरण घातली.

सर्ग सेहेचाळिसावा.

तमसातीरीं वास्तव्य.

तदनंतर तमसा नदीच्या रम्य तीराचा आश्रय केल्यावर सीतेकडे पाहून राम लक्ष्मणास म्हणाला, " लक्ष्मणा, वनवाससंबंधीं ही आज पहिलीच रात्र आली आहे. कारण आजपासून वनवासाच्या मुदतीला आरंभ झाला आहे. तस्मात् आजपासून तूं आतां उत्सुकतेमुळें अयोध्येचें स्मरण करीत जाऊं नको. आपापल्या निवासस्थानाला येणाऱ्या पशुपक्ष्यांच्या योगानें व्याप्त झालेलीं हीं शून्य अरण्यें आपल्याला पाहून-आंत पशुपक्ष्यांची किलबिल चालली असल्यामुळें-सर्व बाजूंनीं जशीं कांहीं रडत आहेत, तीं पहा. आज माझ्या पित्याची राजधानी अयोध्या नगरी स्त्रीपुरुषांसहवर्तमान वनांत गेलेल्या आपणांबद्दल शोक करील, ह्यांत संशय नाहीं. कारण हे पुरुषश्रेष्ठा लक्ष्मणा, राजा, तूं, मी आणि भरत-शत्रुघ्न ह्यांचे ठिकाणीं अनेक कारणांमुळें अयोध्येतील लोक प्रीति करीत आहेत. पिता आणि यशस्विनी माता ह्या दोहोंबद्दल

मला बाईट वाटत आहे. कारण आपणांकरितां तीं एकसारखीं रडून रडून अंध तर होणार नाहींत ना? अथवा त्यांच्याबद्दल आपण शोक करणें व्यर्थच आहे. कारण धर्म हाच ज्याचा उद्देश आहे, असा धर्मात्मा भरत इच्छेनुरूप भाषणांनीं माझ्या पित्याला व मातेला खरोखर धीर देईल. तेव्हां हे महापराक्रमी लक्ष्मणा, भरताच्या अक्रूरत्वाचा पुनःपुनः विचार केला म्हणजे पित्याबद्दल आणि मातेबद्दल मला वाईट वाटेनासें होतें. हे पुरुषश्रेष्ठा, माझ्या मागोमाग येऊन, तूं एक कामच केलें आहेस. नाहींतर सीतेच्या रक्षणाकरितां कोणाचें तरी सहाय्य घेणें भाग होतें. लक्ष्मणा, ही आजची रात्र आपण उदकावरच काढूं. कारण अनेक प्रकारचें वन्य भक्ष्य जरी आहे, तरी हेंच मला बरें वाटत आहे."

ह्याप्रमाणें लक्ष्मणाला सांगून 'सौम्या, अश्वांविषयीं सावधपणानें रहा' असें सुमंत्र सारथ्यालाहि रामानें सांगितलें. तेव्हां अश्वांना बांधून सूर्य अस्ताला गेल्यानंतर सुमंत्रानें त्यांना पुष्कळ चारण घातली. मग तो त्यांच्या अगदीं जवळ येऊन बसला. रात्र पडूं लागल्याचें आढळून आल्यावर कल्याणकारक अशी सायंसंध्या करून, लक्ष्मणासहवर्तमान सुमंत्र सारथ्यानें रामाकरितां कांहीं प्रदेशावरील धोंडे वगैरे काढून टाकून शय्या तयार केली. तेव्हां ती शय्या अवलोकन केल्यावर भार्येसहवर्तमान रामानें शयन केलें. नंतर भार्येसहवर्तमान श्रांत झालेल्या रामाला गाढ झोंप लागली आहे, असें अवलोकन करून लक्ष्मण त्या सारथ्याला रामाचे अनेक गुण सांगू लागला. त्या उभयतांनीं ती रात्र जागरणांतच काढिली. लक्ष्मण हा सारथ्याला रामाचे गुण सांगत असतांनाच सूर्योदयाचा समय प्राप्त झाला. गायींच्या कळपांनीं जिचें तीर व्याप्त झालेलें आहे, अशा तमसा नदीचे तीरीं ब्राह्मण उतरले होते. तेथून बऱ्याच दूर प्रदेशावर रामानें प्रजाजनांसहवर्तमान त्या रात्रीं वास्तव्य केलें, आणि सकाळीं उठल्यावर त्या लोकांकडे पाहून उत्कृष्ठ लक्षणांनीं युक्त असलेल्या भ्रात्या लक्ष्मणाला तो महातेजस्वी राम म्हणाला, "हे सुमित्रानंदन लक्ष्मणा, घराचीहि पर्वा न बाळगितां आमचीच अपेक्षा धरून वृक्षाच्या मुळाशीं पडलेले हे लोक सांप्रत अवलोकन कर. मला परत फिरविण्याविषयीं हे लोक कसा यत्न करीत आहेत, हें मी समजत आहें. हे प्राण सुद्धां देतील, परंतु आपला निश्चय सोडणार नाहींत. तेव्हां हे गाढ निद्रेमध्यें आहेत तोंच आपण हलकेच उठून रथावर आरूढ होऊं आणि (जिकडे हे येण्याचा संभव नाहीं अशा) निर्भय मार्गाला चालते

होऊं; म्हणजे आतां फिरून तरी माझ्यावर प्रेम करणाऱ्या ह्या अयोध्यावासी लोकांना वृक्षमूळांच्या मुळाशीं येऊन पडण्याचा प्रसंग येणार नाहीं. आपणांकरितां जर लोकांना दुःख होत असेल, तर राजकुमारांनीं त्यांना दुःखांतून मुक्त केलें पाहिजे. आपल्याकरितां लोकांना दुःख होऊं देणें खरोखर योग्य नाहीं."

ह्यानंतर धर्माची प्रत्यक्ष मूर्तिच कीं काय अशा रामाला लक्ष्मण म्हणाला, 'हे प्राज्ञ, मला तसेंच पसंत आहे. आपण सत्वर रथावर आरूढ व्हां.' नंतर राम सारथ्याला म्हणाला, 'लवकर रथ जोड, म्हणजे आपण अरण्यांत जाऊं. हे समर्थ सुमंत्रा येथून लवकर चल.' याप्रमाणें रामानें त्वरा केली असतां सारथ्यानें ते उत्कृष्ठ अश्व रथाला जोडिले, आणि हात जोडून तो रामाला म्हणाला, 'हे महापराक्रमी रथिश्रेष्ठ, हा रथ जोडून तयार आहे. आपलें देव बरें करो. सीता व लक्ष्मण ह्यांसहवर्तमान आपण सत्वर आरूढ व्हां.'

नंतर सामानसुमान बरोबर घेऊन राम रथावर आरूढ झाला. वेगानें वाहणारी व घोटाळा करणाऱ्या भोंवऱ्यांनीं युक्त असलेली तमसा नदी उतरून गेला. ती नदी उतरून गेल्यावर तो महापराक्रमी व वैभवशाली राम कल्याणकारक, कंटकरहित आणि भिऱ्या लोकांचीहि भीति घालविणाऱ्या राजमार्गाला लागला. जातांना बरोबर आलेल्या अयोध्यावासी लोकांना मोह पडावा एतदर्थ तो सारथ्याला म्हणाला, "हे सुमंत्रा, रथावर आरूढ होऊन तूं प्रथम उत्तरेकडे तोंड करून चल, आणि मुहूर्तपर्यंत तसें जाऊन पुनरपि रथ परत फिरीव. सारांश अयोध्येंतील लोकांना माझा पत्ता न लागेल अशा रीतीनें तूं दक्ष राहून व्यवस्था कर."

रामाचें भाषण श्रवण केल्यावर सारथ्यानें तसें केलें, आणि परत येऊन रथ तयार असल्याचें त्यानें पुनरपि रामाला सांगितलें. तेव्हां उत्तम रीतीनें जोडिलेल्या रथावर सीतेसहवर्तमान ते रघुवंशवर्धक राम-लक्ष्मण आरूढ झाले असतां त्या सुमंत्र सारथ्यानें रथ फिरवून आणिल्यानंतर सारथ्यासहवर्तमान महारथि दशरथपुत्र राम त्या रथावर आरूढ होऊन वनामध्यें गेला, आणि प्रयाणाला अपेक्षित असा शुभ शकुन उत्तरेस झाल्यामुळें त्याचें फल मिळावें, एतदर्थ प्रथम त्यानें रथ उदङ्मुख उभा केला. नंतर त्याच्यावर आरूढ झाल्यानंतर दक्षिणेकडे तोंड करून तो वनांत गेला.

सर्ग सत्तेचाळिसावा.

रामाबरोबर आलेल्या लोकांचा विलाप.

रात्र उजाडल्यानंतर रामावांचून असलेल्या अयोध्यावासी लोकांना कांहीं सुचेनासें झालें, आणि शोकानें घेरिल्यामुळें ते अगदीं निश्चेष्ट पडले. दुःखाश्रूंनीं खिन्न झालेले ते लोक इकडे तिकडे पाहूं लागले; परंतु त्या दुःखित लोकांना रथाची धूळ वगैरे कांहींच सुगावा रामासंबंधानें दृष्टोत्पत्तीस येईना. तेव्हां त्या विचारी रामाचा वियोग झाल्यामुळें त्यांच्या मुद्रा खिन्न व दुःखित झाल्या. आणि ते बिचारे विचारी लोक दैन्ययुक्त शब्द बोलूं लागले. ते म्हणाले, ' जिनें आमचें अंतःकरण घेरिल्यामुळें विशाल वक्षस्थलानें युक्त असलेला महापराक्रमी राम आज आमच्या दृष्टीस पडत नाहीं, त्या निद्रेला धिःकार असो. कधींहि खोटें कर्म न करणारा तो महापराक्रमी तपस्वी राम आम्हां भक्तजनांचा त्याग करून कसा हो प्रवासाला गेला ! औरस पुत्रांचें परिपालन करणाऱ्या पित्याप्रमाणें जो आमचें नेहमीं परिपालन करितो, तो रघुवंशजश्रेष्ठ राम आम्हांला टाकून अरण्यांत कसा गेला ! आतां आम्ही येथेंच प्रायोपवेशन करून मरावें अथवा मरणदीक्षापूर्वक उदङ्मुख होऊन महाप्रस्थानाला तरी जावें. कारण रामाचा वियोग झाला असतां जीवितापासून आम्हांला कोणती फलप्राप्ति होणार आहे ! येथें वाळलेलीं काष्ठें पुष्कळ व मोठमोठीं अशीं आहेत, तर त्यांनीं तयार केलेली चिता पेटवून देऊन आपण सर्व तिच्यामध्यें प्रवेश तरी करूं. अयोध्येमध्यें जाऊन आपण सांगावें तरी काय ? मत्सररहित आणि प्रिय भाषण करणाऱ्या महापराक्रमी रामाला आम्हीं वनामध्यें पोहोंचविलें असें सांगणें आम्हांला योग्य कसें होईल ! रामावांचून आम्हांला आलेले पाहून ती दीन नगरी स्त्रिया, बाल आणि वृद्ध ह्यांसहवर्तमान खरोखर दुःखित होईल. त्या महात्म्या वीराबरोबर जर आपण नगरांतून बाहेर पडलों, तर त्याच्याशिवाय आपण ती नगरी पहावी तरी कशी ! '

ह्या प्रकारें, वत्स हरण करून नेलेल्या उत्कृष्ट गायीप्रमाणें दुःखाकुल झालेले ते लोक हात वर करून नानाप्रकारचे शब्द उच्चारून विलाप करूं लागले. तदनंतर ते रथाच्या मार्गाला अनुसरून क्षणभर तिकडे गेले; परंतु पुढें मार्गच नाहींसा झाल्यामुळें ते अत्यंत खिन्न झाले; आणि ' हें काय ! आतां आम्हीं काय करावें ! आपणांला दैवानेंच पछाडिलें आहे ' असें म्हणत म्हणत रथा-

त्याच मार्गाला अनुसरून ते विचारी लोक परत फिरले. नंतर जिच्यांतील सज्जन दुःखित झाले आहेत, अशा अयोध्या नगरीला अंतःकरणामध्यें कष्टी होऊन गेलेले ते सर्वजण त्याच मार्गानें परत आले. ती नगरी अवलोकन करून हर्षनाशामुळें त्यांचीं अंतःकरणें अगदीं व्याकुल झालीं, आणि शोकपीडित होऊन नेत्रांतून ते अश्रू ढाळूं लागले व म्हणाले 'डोहांतून गरुडानें सर्प काढून नेले असतां स्तब्ध झालेल्या नदीप्रमाणें रामरहित झालेली ही नगरी चांगलीशी शोभत नाहीं.' सारांश, चंद्रहीन आकाशाप्रमाणें अथवा उदकशून्य सागराप्रमाणें आनंदशून्य झालेलें नगर त्या भांबावून गेलेल्या लोकांनीं अवलोकन केलें. हर्ष नाहींसा होऊन दुःखानें पछाडलेले ते लोक कष्टानें मोठमोठ्या मोल्यवान घरामध्यें शिरूं लागले असतां, हें घर आपलें किंवा परक्याचें हेंहि त्यांना भान नाहींसें झालें, आणि आंतील माणसें आपलीं किंवा दुसऱ्याचीं हें ते पाहूं लागले असतांहि त्यांना कळेनासें झालें.

सर्ग अठ्ठेचाळिसावा.

अयोध्येंतील स्त्रियांचा विलाप.

ह्याप्रमाणें अश्रूंनीं नेत्र भरून आलेले, शोकाकुल, खिन्न, अत्यंत दुःखित व कांहींएक सुचेनासें झालेले असे ते नगरवासी लोक रामाकडे जाऊन परत आले असतां, मरण येईल तर बरें, असें त्यांना वाटूं लागलें, व जीव गेल्याप्रमाणें ते निस्तेज झाले. घरीं गेल्यावर बायकामुलें त्यांच्या भोंवतालीं जमलीं. तेव्हां अश्रूंनीं त्यांचीं मुखें व्याप्त होऊन तीं सर्वजण रोदन करूं लागलीं. नगरामध्यें कोणाला हर्ष होईना, कोणाला आनंद वाटेना. उदमी लोक विक्रीचे जिन्नस दुकानांतून मांडून ठेवीनातसे झाले. मांडून ठेविलेले जिन्नस शोभेनातसे झाले. घरंदाज लोक स्वयंपाकहि करीतनासे झाले. नष्ट झालेली वस्तु सांपडली असतां अथवा पुष्कळ द्रव्य मिळालें असतांहि कोणाला आनंद होईनासा झाला. पहिल्याच खेपेस पुत्र झाला तरी स्त्रीला आनंद होईनासा झाला. घरोघरीं स्त्रिया रोदन करूं लागल्या. अंकुशांनीं ज्याप्रमाणें गजांना टोंचावें, त्याप्रमाणें भर्ता गृहीं आल्यावर त्या दुःखाकुल स्त्रिया शब्दांनीं त्याची निंदा करूं लागल्या. त्या म्हणाल्या, "रामाचें ज्यांना दर्शन होत नाहीं, त्यांना घरें, स्त्रिया, धन, पुत्र अथवा सुख ह्यांच्याशीं काय कर्तव्य आहे?

जगतामध्यें लक्ष्मण हाच एक सत्पुरुष आहे. कारण तो रामाची शुश्रूषा करण्याकरितां सीतेसहवर्तमान वनामध्यें त्याच्या मागोमाग गेला आहे. ककुत्स्थकुलोत्पन्न राम ज्यांच्या पवित्र उदकामध्यें स्नान करून जाईल, त्या नद्या, तीं सरोवरें आणि त्या कमलयुक्त वापी पुण्यवान होत. रम्य वृक्षसमुदायांनीं युक्त असलेलीं अरण्यें, नद्या, मोठमोठे जलमय देश आणि शिखरयुक्त पर्वत रामाला शोभा आणतील. ज्या वनामध्यें अथवा ज्या पर्वतावर राम जाईल, तीं वनें अथवा ते पर्वत प्रिय अतिथि प्राप्त झाला आहे, असें समजून त्याचें आदरातिथ्य केल्याशिवाय राहणार नाहींत. भ्रमरांच्या योगानें शोभणारे, आश्चर्यकारक पुष्पांचा तुरा लाविलेले आणि असंख्य पुष्पगुच्छ धारण करणारे वृक्ष रामाला दर्शन देतील. राम आला असतां, करुणेमुळें आपल्यावरील वृक्षांच्या द्वारानें पर्वत अकालीं सुद्धां उत्कृष्ठ पुष्पें व फळें त्याला दर्शवितील. नानाप्रकारचे अद्भुत् प्रवाह दाखविण्याकरितां पर्वत निर्मल उदकांचा स्राव करूं लागतील. पर्वतांच्या माथ्यावर वृक्ष रामाला रंजवितील. ज्या ठिकाणीं राम आहे, तेथें भय नाहीं व पराभवहि नाहीं. तो दशरथपुत्र महापराक्रमी राम अजून आपल्यापासून फारसा लांब गेला नाहीं, तोंच आपण त्याच्या मागोमाग जाऊं. तशा प्रकारच्या महात्म्या प्रभूची पादच्छाया सुखाचें साधन आहे. कारण तोच ह्या लोकांचा नाथ असून तोच आमची गति व मुख्य आधार आहे. आम्ही सीतेची सेवा करूं व तुम्ही रामाची सेवा करा. ”

अशा प्रकारें भाषण करून त्या स्त्रिया आणखी म्हणूं लागल्या, “ वनामध्यें राम तुमचा योगक्षेम चालवील, आणि आम्हां बायकामनुष्यांचा योगक्षेम सीता चालवील. असुखकारक, खेदजनक व भ्रांतिकारक असें रामाची हुरहुर लागलेल्या लोकांसहवर्तमान होणारें येथील वास्तव्य कोणाला बरें रुचणार आहे? (राजाला वचनांत गुंतवून घेऊन रामाला वनांत पाठविणाऱ्या) कैकेयीच्या हातींच जर राज्य रहावयाचें असेल, तर तें अधर्मानें युक्त आणि म्हणूनच अनाथासारखेंच होणार. अशा राज्यांत राहून आम्हांला जीवितार्शीहि कांहीं कर्तव्य नाहीं, मग पुत्रांची आणि द्रव्याची पर्वा बाळगणार कोण? ऐश्वर्याकरितां जिनें आपल्या पुत्राचा व भर्त्याचा त्याग केला, ती कुलाला कलंक लावणारी कैकेयी ऐश्वर्याकरितां दुसऱ्या कोणाचा बरें त्याग करण्याला मागेंपुढे पहाणार आहे? कैकेयी जिवंत असतांना तिनें जरी आमचें पोषण केलें, तरी जिवांत जीव आहे तोंपर्यंत आम्हांला तिच्या राज्यांत रहाणें नाहीं, हें

आम्ही आपल्या पुत्रांची शपथ वाहून सांगतों. अहो, राजाधिराज दशरथाच्या पुत्राला जी निर्दय स्त्री वनांत हांकून देते, त्या अधर्मनिष्ठ व दुराचारिणी स्त्रीशीं प्रसंग आला असतां कोण बरें सुखानें जगणार आहे? ह्या सर्व जगताला उपद्रव झालेला आहे. ह्यांत कोणी नायक नाहींसा झाला आहे. आणि येथें यज्ञयागांचाहि नायनाट झाला आहे. तेव्हां कैकेयीकरितां ह्या सर्वांचा नाश होणार. राम वनांत गेल्यावर धर्मात्मा भूपति दशरथ जिवंत राहणार नाहीं. दशरथ मेल्यानंतर सर्वांचा नाश होणें स्पष्टच दिसत आहे. तस्मात् तुम्हां पुरुषांचें आतां पुण्य संपलें आहे, आणि तुम्ही अत्यंत दुःखित झाला आहां. तेव्हां तुम्ही विष तरी वाटून प्या, रामाच्या तरी मागोमाग चालते व्हां किंवा जेथें ह्या कैकेयीचें नांव सुद्धां कानावर येणार नाहीं, अशा ठिकाणीं तरी निघून जा. हिनें भार्या आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान रामाला कपटानें हांकून दिलें आहे. खाटिकाच्या स्वाधीन केलेल्या पशूप्रमाणें हिनें आम्हांला भरतापाशीं डांबून ठेविलें आहे. पूर्ण चंद्राप्रमाणें आल्हादकारक मुखानें युक्त, श्यामवर्ण, गूढ जत्रूनें[1] युक्त, शत्रुदमन करणारा, आजानुबाहु, कमलनयन, लक्ष्मणाचा ज्येष्ठ भ्राता असून आपण होऊन पूर्वी भाषण करणारा, मधुरवचनी, सत्यवादी, महाबलाढ्य, सौम्य, सर्वांना दर्शनीय, चंद्राप्रमाणें प्रियदर्शन व मत्त गजाप्रमाणें चालणारा तो पुरुषश्रेष्ठ महारथी राम खरोखर अरण्यांना शोभा आणील."

ह्याप्रमाणें नगरामध्यें विलाप करीत असलेल्या त्या नगरवासी लोकांच्या स्त्रिया मृत्यूचें भय जवळ आल्याप्रमाणेंच कीं काय दुःखानें संतप्त होऊन आक्रोश करूं लागल्या. अशा प्रकारें त्या आपापल्या घरांतून रामाकरितां विलाप करीत असतांना सूर्य अस्तास जाऊन रात्र पडली. तेव्हां होमाकरितां सुद्धां त्या नगरीमध्यें कोणी अग्नि प्रज्वलित केला नाहीं. अध्ययन व गोष्टी हीं तर अगदीं नाहींतशीं झालीं. आणि ती नगरी अंधकारानें व्याप्त झाल्यासारखी दिसूं लागली. वाण्यांचीं दुकानें बंद झालीं, हर्ष नाहींसा झाला, लोकांचा आश्रय तुटल्यासारखा झाला, आणि अशा प्रकारें ती अयोध्या नगरी नक्षत्रशून्य आकाशाप्रमाणें निस्तेज दिसूं लागली. पुत्राला अथवा भ्रात्याला वनांत हांकून लाविल्याप्रमाणें स्त्रिया रामाकरितां दुःखित झाल्या, आणि कसलेंहि भान न रहातां विलाप करकरून रडूं लागल्या. कारण त्यांना तो राम पुत्रांपेक्षांहि अधिक प्रिय

[1] मानेचे हाड.

झाला होता. तात्पर्य, अयोध्या नगरीमध्यें गायन, उत्सव, नृत्य आणि वादन ह्यांचा अगदीं शुकशुकाट झाला, हर्ष नाहींसा झाला, दुकानें उघडून माल मांडणें बंद झालें, आणि अशा प्रकारें ती अयोध्या नगरी उदक नाहींसें झालेल्या महासागराप्रमाणें शून्य झाली.

सर्ग एकुणपन्नासावा.

मार्गक्रमण.

ब्राह्मणांना चुकविल्यानंतर जी कांहीं रात्र अवशेष राहिली होती, ती रात्र उजडेपर्यंत पुरुषश्रेष्ठ रामहि पित्याची आज्ञा लक्ष्यांत घेऊन बराच लांब गेला. त्याप्रमाणें जातां जातां ती सुखावह रात्र संपली, आणि प्रातःकाळीं कल्याणदायक प्रातःसंध्या करून तो राम आपला देश ओलांडून पुढें गेला. ज्यांच्या सीमा अगदीं एकमेकाला लागलेल्या आहेत असे गांव आणि प्रफुल्लित वनें अवलोकन करीत करीत धनुष्यापासून सुटलेल्या बाणाप्रमाणें वेगवान अशा उत्कृष्ठ अश्वांच्या योगानें राम सत्वर चालता झाला. जातांना गांव आणि खेडींपाडीं ह्यांत राहणाऱ्या लोकांचीं अशीं भाषणें त्याच्या कानावर येत होतीं कीं, 'धिक्कार असो ह्या विषयाधीन होऊन बसलेल्या दशरथ राजाला! कायेर तरी ही दुष्ट पापी कैकेयी! पापकर्म करण्याविषयीं ही तत्पर आहे, हिचें दर्शनहि भयंकर आहे; आणि मर्यादा सोडून ही घोर कर्म करण्यास उद्युक्त झाली आहे. कारण अशा प्रकारच्या धर्मनिष्ठ, महाज्ञानी, दयाळु व जितेंद्रिय राजपुत्राला ती वनवासाकरितां हांकून देत आहे. काय हो दशरथ राजा आपल्या पुत्रासंबंधानें निर्दय आहे! अहो, प्रजाजनांना प्रिय असलेल्या ह्या निरपराधी रामाचा त्याग करण्याची तो इच्छा करीत आहे.'

अशा प्रकारचीं गांवें व खेडीं ह्यांत राहणाऱ्या मनुष्यांचीं भाषणें श्रवण करीत करीत राम कोसल देश ओलांडून गेला. तदनंतर मंगलकारक उदक वाहणारी वेदश्रुति नामक नदी उतरून तो दक्षिण दिशेकडे तोंड करून चालला. नंतर बऱ्याच वेळानें शीत जलानें युक्त अशा गोमती नदीला जाऊन—गायींनीं भरलेले जलप्राय देश जिच्यामध्यें आहेत व जी सागराला जाऊन मिळालेली आहे अशी—ती गोमती नदी तो उतरून गेला. पुढें शीघ्र

गमन करणाऱ्या अश्वांच्या योगानें तो रघुवंशज राम मयूर आणि हंस ह्यांच्या ध्वनींनीं युक्त असलेली स्यंदिका नदी तरून गेला. जातांना मनुराजानें पूर्वी इक्ष्वाकूला दिलेली समृद्ध व इतर देशांनीं मर्यादित झालेली (कोशलदेशरूप) भूमि त्या रामानें सीतेला दाखविली. नंतर 'सूता' म्हणून दीर्घ स्वरानें त्या सारथ्याला वारंवार हांक मारून मत्त हंसासारख्या स्वरानें युक्त असलेला तो पुरुषश्रेष्ठ वैभवशाली राम त्याला म्हणाला, "पुनरपि स्वदेशाला परत येऊन मातापितरांची भेट झाल्यावर सरयू नदीचे तीरीं असलेल्या प्रफुल्लित वनामध्यें मी कधीं बरें मृगया करीन? सरयूच्या वनामध्यें मृगया करण्याची मला फारशी उत्कंठा नाहीं; परंतु जगतामध्यें ही क्रीडा राजर्षिगणाला संमत असल्यामुळें सर्वथाच निषिद्ध आहे असें नाहीं. ह्या जगतामध्यें राजर्षी करमणूक होण्याकरितां वनामध्यें मृगया करीत असत, आणि श्राद्धाचा वगैरे समय प्राप्त झाला असतां मनुपुत्रांनींहि तिचा स्वीकार केलेला आहे; परंतु धनुर्धाऱ्यांना इष्ट असलेल्या ह्या मृगयेची मला फारशी उत्कंठा नाहीं."

ह्याप्रमाणें वेगळ्या वेगळ्या विषयाला उद्देशून सारथ्याशीं मधुर वाणीनें भाषण करीत करीत तो इक्ष्वाकुवंशज राम त्या मार्गाचें आक्रमण करूं लागला.

सर्ग पन्नासावा.

गंगातीरापर्यंत गमन.

विस्तृत आणि रमणीय अशा कोसल देशाला गेल्यानंतर बुद्धिमान रामानें अयोध्या नगरीकडे तोंड केलें आणि तो हात जोडून तिला म्हणाला, "हे काकुत्स्थरक्षित श्रेष्ठ नगरी, मी तुझा निरोप घेतों, आणि ज्या देवता तुझें रक्षण करीत असून तुझे ठिकाणीं वास्तव्य करीत असतात, त्यांचीहि मी प्रार्थना करितों. वनवास परिपूर्ण होऊन मी भूपतीच्या ऋणांतून मुक्त झालों म्हणजे मातापितरांशीं संगत होऊन मी पुनरपि तुझें दर्शन घेईन."

नंतर अश्रूंनीं ज्याचें मुख भरून गेलें आहे आणि मनोहर व आरक्तवर्ण नेत्रांनीं जो युक्त आहे, तो दीन राम उजवा हात वर करून आपल्या दर्शनाकरितां तेथें आलेल्या स्वदेशांतील लोकांना म्हणाला, "तुम्ही योग्यतेप्रमाणें माझे ठिकाणीं आदरबुद्धि व दया केली आहे; परंतु मला पुष्कळ दिवसपर्यंत

अशुभ स्थितीचा अनुभव घेणें आहे. ह्यास्तव तुम्ही आतां जा. आम्हीहि आपला उद्देश सिद्धीस नेण्याकरितां आतां पुढें जातों."

ह्याप्रमाणें रामानें सांगितल्यानंतर त्या लोकांनीं त्या महात्म्याला अभिवंदन करून प्रदक्षिणा केली, आणि घोर विलाप करीत करीत ते लोक ठिकठिकाणीं उभे राहिले; आणि अशा प्रकारें त्याच्या दर्शनाविषयीं तृप्त न झालेले ते लोक विलाप करीत असतांना प्रदोषसमयीं ज्याप्रमाणें सूर्य दृष्टीच्या टप्प्यांतून निघून जातो, त्याप्रमाणें राम त्यांच्या दृष्टीच्या आटोक्यांतून पलीकडे गेला. नंतर धनधान्यसंपन्न, दानशूर पुरुषांनीं युक्त, कल्याणकारक, सर्वथा निर्भय, रम्य, देवताधिष्ठानभूत वृक्षांनीं व यज्ञस्तंभांनीं व्याप्त, उपवनें, आम्रवृक्षांचीं वनें आणि समृद्ध जलाशय ह्यांनीं युक्त, संतुष्ट अशा प्रजाजनांनीं व्याप्त, गायींच्या खिल्लारांनीं अतिशय गजबजून गेलेला, राजांनीं रक्षण करण्यास योग्य व वेदघोषांनीं नादित असा कोसल देश रथानें ओलांडून तो पुरुषश्रेष्ठ राम पलीकडे गेला. तो देश ओलांडिल्यावर मध्यगतीनें, धैर्यवानांमध्यें श्रेष्ठ असलेला तो राम इतर राजांच्या ताब्यांत असलेल्या आनंदित, समृद्ध व रमणीय उपवनांनीं व्याप्त अशा देशांतून चालला. अयोध्येच्या राज्यापासून दक्षिण दिशेस असलेल्या त्या देशामध्यें रामानें तीन मार्गांनीं जाणारी, दिव्य, रमणीय, ऋषींनीं सेवित, शीत उदकानें युक्त आणि शेवाळें नसलेली अशी गंगा अवलोकन केली त्या

गंगेची शोभा.

काय वर्णन करावी? तीरापासून जवळच असलेल्या भव्य आश्रमांनीं ती भूषित झालेली होती. आणि क्रीडासमयीं अप्सरा आनंदित होऊन त्या पुण्यगंगेच्या डोहाचा आश्रय करीत असत. देव, दानव, गंधर्व आणि किन्नर ह्यांच्या योगानें तिला शोभा आलेली होती, व नागपत्न्या आणि गंधर्वपत्न्या त्या शुभ गंगेचें सतत सेवन करीत होत्या. देवांच्या शेकडों क्रीडापर्वतांनीं ती नदी गजबजलेली होती. देवांच्या उपवनांनीं ती युक्त होती. देवांकरिता आकाशामध्यें गेलेल्या त्या गंगेमध्यें देवांनाच उपभोग घेण्यास योग्य अशीं सुवर्णकमलें होतीं. जलाघातरूप अट्टहासामुळें ती उग्र दिसत होती. फेनरूप निर्मल हास्यानें ती युक्त होती. कोठें कोठें आंत येऊन मिळालेल्या उदकामुळें ती वेणीसारखी दिसत होती. आणि कोठें कोठें भोंवऱ्यांनीं तिला शोभा आलेली होती. कोठें कोठें ती निश्चल व गंभीर होती. कांहीं ठिकाणीं वेगानें ती खवळून गेली होती. कोठें कोठें गंभीर ध्वनीनें ती युक्त होती, आणि

कोठें कोठें भयंकर शब्दानेंहि ती संपन्न होती. देवगण तिच्या उदकामध्यें येऊन स्नान करीत होते. निर्मल कमलांनीं ती व्याप्त झालेली होती. कोठें कोठें तिच्या तीरीं विस्तृत वाळवंटें होतीं, आणि कोठें कोठें निर्मल वाळूनें ती युक्त झाली होती. हंस व सारस पक्ष्यांनीं ती नादित झालेली होती. चक्रवाक पक्ष्यांनीं तिला शोभा आलेली होती. त्या निर्दोष गंगेचा नेहमीं मत्त असलेल्या पक्ष्यांनीं आश्रय केलेला होता. कोठें कोठें तीरावर वाढलेल्या वृक्षामुळें माळा घातल्याप्रमाणें तिला शोभा आलेली होती. कोठें कोठें प्रफुल्लित कमलांनीं ती आच्छादिलेली होती. कोठें कोठें कमलवनांनीं ती गजबजून राहिलेली होती. कोठें कोठें उमलूं लागलेल्या कमलकलिकांच्या समूहांनीं तिला शोभा आलेली होती, आणि कोठें कोठें अनेक प्रकारच्या पुष्पपरागांनीं युक्त झाल्यामुळें ती मत्त स्त्रीप्रमाणें दिसत होती. पापसमूह जिनें नाहींसा केला आहे, अशा त्या गंगेचें स्वरूप मोत्याप्रमाणें निर्मल दिसत होतें. दिग्गज, वनगज आणि सुराधिपतींनांच बसण्यास योग्य अशा इतर श्रेष्ठ गजांनीं तिच्या तीरावरील वनें नादित झालेलीं होतीं; आणि यत्नपूर्वक उत्कृष्ट भूषणांनीं भूषित केलेल्या स्त्रीप्रमाणें ती दिसत होती. कारण दिव्य,पापरहित आणि पापनाशक अशी ती विष्णूपदापासून च्युत झालेली गंगा फलें, पुष्पें, पल्लव, झुडपें आणि पक्षी ह्यांनीं व्याप्त झालेली होती. जळमाकड, मगर आणि भुजंग ह्यांनीं ती युक्त होती, आणि भगीरथाच्या तपश्चर्येमुळें शंकराच्या जटाकलापापासून ती भ्रष्ट झालेली होती.

असो. सारस व क्रौंच पक्ष्यांनीं नादित झालेली ती समुद्रपत्नी गंगा महापराक्रमी रामाला शृंगवेरपुराजवळ लागली. तेव्हां जिच्यांतील भोंवऱ्यामध्यें लाटा मिसळल्या आहेत, अशा त्या गंगेला अवलोकन करून तो महारथि राम सुमंत्र सारथ्याला म्हणाला, "आज आपण येथेंच वास्तव्य करूं. ह्या नदीच्या जवळच एक प्रचंड इंगुदी वृक्ष आहे. त्याला असंख्य पुष्पें व पल्लव आहेत. तेव्हां आपण येथेंच वास्तव्य करूं. देव, मनुष्य, गंधर्व, मृग, भुजंग आणि पक्षी ह्यांना जिचें उदक संमत आहे, अशी ही शुभ व श्रेष्ठ नदी मी अवलोकन करितों."

गुह निषादाची भेट.

ह्याप्रमाणें रामानें सारथ्याला सांगितलें असतां 'ठीक आहे' येवढेंच रामाला म्हणून लक्ष्मण व सुमंत्र अश्वांच्या योगानें त्या इंगुदी वृक्षाजवळ गेले. तेव्हां त्या रम्य वृक्षाजवळ गेल्यानंतर इक्ष्वाकुवंशज राम भार्या आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान

त्या रथांतून खालीं उतरला. नंतर सुमंत्रहि खालीं उतरला. आणि ते उत्तम अश्व सोडिल्यावर वृक्षमूलांशीं बसलेल्या रामासमीप जाऊन तो हात जोडून उभा राहिला. त्या ठिकाणीं रामाचा आत्मतुल्य मित्र असा एक गुह नामक राजा होता. तो जातीचा निषाद असून बलाढ्य, प्रख्यात आणि निषादांचा अधिपति होता. पुरुषश्रेष्ठ राम आपल्या प्रदेशाला आल्याचें ऐकून वृद्ध अमात्य आणि ज्ञातिबांधव ह्यांनीं परिवेष्टित असलेला तो गुह रामाचे समीप आला. तेव्हां निषादाधिपति आला आहे असें दुरून पाहून लक्ष्मणासहवर्तमान रामानें त्याची भेट घेतली असतां, दुःखित झालेला तो गुह रामाला कडकडून भेटल्यावर म्हणाला, 'रामा, जशी अयोध्या तसें हें नगर आपलेंच आहे, मी आपलें काय कार्य करावें ? हे महापराक्रमी रामा, अशा प्रकारच्या प्रिय अतिथीचा लाभ कोणाला बरें होणार आहे ?' असें म्हटल्यानंतर नानाप्रकारचें चांगलें चांगलें अन्न व पूजासामुग्री सत्वर आणून तो गुह रामाला म्हणाला, 'हे महापराक्रमी रामा, आपलें स्वागत असो. ही संपूर्ण पृथ्वी आपली आहे, आम्ही आपले सेवक आहों, आणि आपण आमचे प्रभु आहां. ह्यास्तव आपण खुशाल आमचें राज्य करा. हें भक्ष्य, भोज्य, पेय आणि लेह्य येथें तयार असून उत्कृष्ट शय्या व आपल्या घोड्यांना वैरण हींहि तयार आहेत.

ह्याप्रमाणें तो गुह बोलत असतांना राम त्याला म्हणाले, " तूं जो येथपर्यंत पायींच आलास, आणि हें जें प्रेम दाखविलेंस, ह्यामुळें, तूं आमचें सर्वदा पूजन केलें आहेस आणि आम्हांला हर्ष झाला आहे." असें बोलून राम त्याला कडकडून भेटले आणि म्हणाले, 'हे गुहा, बांधवांसहवर्तमान मी तुला आज सुदैवानें आरोग्यसंपन्न अवलोकन करीत आहें. राष्ट्र, मित्र व वनें ह्यांसंबंधानें तुझें ठीक आहे ना ? हें जें तूं कांहीं प्रेमानें येथें आणिलें आहेस, त्याला मान देऊन मी तें सर्व तुला परत देतों. कारण मी भोगविषयक प्रतिग्रह घेत नाहीं. मी कुश, वल्कलें आणि अजिनें धारण करून व फलमूलांवर उपजीविका करून पित्राज्ञापालनरूप धर्मविषयीं दक्ष, तापस व वनवासी बनलों आहें, असें तूं समज. अश्वांच्या खाण्यासंबंधानें अथवा दुसऱ्या कसल्याच संबंधानें मला कोणापाशींच कांहीं मागावयाचें नाहीं. तूं जें हें प्रेम दाखविलेंस, तेवढ्यानें आज माझें अतिशयच आदरातिथ्य होईल. माझ्या पित्या दशरथ राजाचे हे आवडते घोडे आहेत. तेव्हां तूं ह्या अश्वांची उत्तम तऱ्हेनें व्यवस्था लावलीस म्हणजे माझें आदरातिथ्य होईल."

ह्याप्रमाणें रामानें सांगितल्यानंतर, 'त्या अश्वांना खुराक व वैरण सत्वर द्या'

म्हणून त्या गुहानें त्याच ठिकाणीं आपल्या सेवकांना आज्ञा केली. तदनंतर सालींचेंच प्रावरण घेतलेल्या रामानें सायंसंध्या केली, आणि लक्ष्मणानें स्वतः आणिलेल्या उदकाचाच भोजनाचे ऐवजीं स्वीकार केला. तदनंतर भार्येसहवर्तमान त्या रामानें भूमीवर शयन केलें असता लक्ष्मणानें पाय धुतले, आणि तेथून उठून तो जवळच वृक्षापाशीं येऊन बसला. सुमंत्र सारथ्यासहवर्तमान धनुर्धर गुहहि रामाचें संरक्षण करण्याकरितां दक्ष राहून लक्ष्मणाशीं संभाषण करीत जागत राहिला. असो.

पूर्वीं कधींहि दुःखाचा अनुभव नसतांना सुखाचा उपभोग घेत असलेला तो यशस्वी व विचारी महात्मा दशरथपुत्र राम, तशा प्रकारें भूमीवर शयन करीत असतांना (झोंप चांगली न आल्यामुळें) ती रात्र पुष्कळ वेळानें गेल्यासारखी त्याला भासली.

सर्ग एकावन्नावा.

लक्ष्मण आणि गुह ह्यांचा संवाद.

अकृत्रिम प्रेमानें भ्रात्याच्या रक्षणाकरितां जागत बसलेल्या त्या रघुवंशज लक्ष्मणाला दुःखसंतप्त झालेला गुह म्हणाला, "बा राजपुत्रा, ही सुखकारक शय्या तुझ्याकरितां तयार केलेली आहे. तूं विश्रांति घे आणि सुख होईल त्या रीतीनें तूं खुशाल ह्या शय्येवर शयन कर. आम्हां सर्व लोकांना क्लेश भोगण्याची संवय असून तूं आजपर्यंत सुखाचाच उपभोग घेत आला आहेस. तेव्हां ककुत्स्थकुलोत्पन्न रामाच्या रक्षणाकरितां आम्ही रात्रभर जागूं. रामाशिवाय ह्या पृथ्वीमध्यें दुसरा कोणीहि मला अत्यंत प्रिय नाहीं, हें मी तुला सत्याची शपथ वाहून सांगत आहें. ह्या जगतामध्यें ह्याच्याच प्रसादामुळें फारच मोठी कीर्ति, पुण्यप्राप्ति आणि पुष्कळ अर्थ व काम ह्यांची समृद्धि हीं प्राप्त होत असतात, असें मी समजतों. तेव्हां सीतेसहवर्तमान शयन करणाऱ्या प्रिय मित्र रामाचें, मी आपल्या ज्ञातींसहवर्तमान हातांत धनुष्य घेऊन सर्व प्रकारें रक्षण करीन. नेहमीं ह्या वनांत संचार करणाऱ्या माझ्या गैरमाहितींतलें असें कांहींहि नाहीं. शत्रूचें अतिशय प्रचंड चतुरंग बल जरी असलें तरी आम्ही युद्धामध्यें तें जिंकूं."

लक्ष्मण म्हणाला, "हे निष्पाप, ह्या प्रदेशामध्यें आम्हांला कसलीहि भीति

नाहीं. कारण धर्माकडेच दृष्टि देऊन वागणारा तूं आमचें रक्षण करणारा आहेस. परंतु दाशरथि राम सीतेसहवर्तमान भूमीवर पडला असतां मला निद्रा, निर्घोर जीवित अथवा सुखोपभोग प्राप्त होणें शक्य कसें? सर्व देवदैत्यांनाहि युद्धामध्यें ज्याचा पराक्रम सहन होणें अशक्य आहे, त्या रामाला सीतेसहवर्तमान तृणावर खुशाल गाढ झोंप लागली आहे. पहा. जप, तप व मोठ्या कष्टानें केलेलीं नानाप्रकारचीं अनुष्ठानें ह्यामुळें लक्षणांनीं स्वतःसारखा असा हा अद्वितीय पुत्र दशरथाला प्राप्त झाला आहे. हा वनांत गेल्यावर राजा फार दिवस जगणार नाहीं. खरोखर सत्वरच पृथ्वी अनाथ होऊन जाईल. राजगृहांतील आणि अयोध्या नगरांतील स्त्रिया अतिशयच मोठा आक्रोश करून श्रम झाल्यामुळें स्वस्थ झाल्या असतील. बा गुहा, थकवा आल्यामुळें राजगृहांतहि विलापशब्द बंद होऊन शुकशुकाट झाला असेल, असें मला वाटतें. कौसल्या, राजा आणि त्याचप्रमाणें माझी माता हीं सर्व जिवंत राहतील, असें मला दिसत नाहीं. फार तर हीच रात्र ते सर्व जिवंत राहतील. शत्रुघ्नाकडे पाहून माझी माता कदाचित् जगेलहि. परंतु वीरमाता कौसल्या नाहींशीच होईल, व तें तर अतिशयच दुःख आहे. रामाचे ठिकाणीं प्रेम करणाऱ्या प्रजाजनांनीं गजबजलेली आणि सर्वदा सुखोत्पादक व प्रिय अशा गोष्टींनींच युक्त असलेली ती नगरी राजाच्या मरणानें दुःखित होऊन नाश पावेल. महात्मा ज्येष्ठ पुत्र दिसेनासा झाल्यावर महाराज दशरथाचे प्राण शरिराला धरून राहतील कसे? राजाचा नाश झाल्यानंतर कौसल्याहि नाश पावेल, आणि माझ्या मातेलाहि मरण येईल. रामराज्याभिषेकरूप मनोरथ प्राप्त न झाल्यामुळें 'घात झाला, घात झाला' असें म्हणत म्हणत परत आलेल्या रामाला राज्यावर न बसवितांच माझा पिता नाश पावेल. तो समय प्राप्त झाला असतां, मृत झालेल्या रघुवंशज पित्याचा ज्यांच्या हातून सर्व प्रकारच्या क्रियेसंबंधानें संस्कार होईल, ते खरोखर कृतकृत्य होत. रमणीय चव्हाटे व धर्मशाळा, परिमित अंतरावर असलेले मोठमोठे मार्ग, वाडे आणि देवालयें ह्यांनीं संपन्न, उत्कृष्ठ गणिकांनीं सुशोभित, रथ, अश्व आणि गज ह्यांनीं व्याप्त, तूर्य वाद्यांच्या ध्वनीनें नादित, सर्व प्रकारच्या कल्याणांनीं संपूर्ण, आनंदित व पुष्ट जनांनीं व्याप्त, उपवनें व बागा ह्यांनीं समृद्ध व समाजविषयक उत्सवांनीं शोभणाऱ्या माझ्या पित्याच्या राजधानीमध्यें भरतप्रभृति सुखी होऊन संचार करतील. दशरथ जिवंत राहण्याचा संभव आहे का? आम्ही परत येऊन त्या

सदाचरणसंपन्न महात्म्याला अवलोकन करूं, हें संभवनीय आहे का? सत्यप्रतिज्ञ रामासहवर्तमान आम्ही कुशल राहून हा वनवास संपल्यावर पुनरपि अयोध्येंत प्रविष्ट होण्याचा संभव आहे का?"

ह्याप्रमाणें तो महात्मा राजकुमार लक्ष्मण दुःखाकुल होऊन शोक करीत बसला असतांनाच ती रात्र निघून गेली. प्रजाजनांच्या हिताविषयीं तत्पर असलेला तो राजकुमार लक्ष्मण त्या प्रमाणें सत्य भाषण करूं लागला असतां अतिशय प्रेमामुळें तो गुह संतापानें व्याप्त झाला. दुःखाकुल झालेल्या गजाप्रमाणें रामाच्या संकटानें पीडित झालेला तो नेत्रांतून अश्रू ढाळूं लागला.

सर्ग बावन्नावा.

गंगा तरून जाण्याची तयारी.

रात्र उजाडल्यानंतर विशाल वक्षस्थलानें युक्त असलेला महायशस्वी राम शुभलक्षणसंपन्न सुमित्रापुत्र लक्ष्मणाला म्हणाला, "हा सूर्योदयाचा समय झाला. भगवती रात्र निघून गेली. बा लक्ष्मणा, हा अत्यंत कृष्णवर्ण कोकिल पक्षी शब्द करीत आहे, आणि वनामध्यें गर्जना करणाऱ्या मयूर पक्ष्यांचाहि ध्वनी कानावर येत आहे. तेव्हां हे सौम्या, वेगयुक्त व समुद्रगामिनी जान्हवी आपण तरून जाऊं."

रामाचें हें बोलणें ऐकून घेऊन मित्रांना आनंद देणारा तो सुमित्रापुत्र लक्ष्मण गुहाला व सारथ्याला रामाच्या भाषणाचें तात्पर्य सांगून आपल्या भ्रात्यापुढें येऊन उभा राहिला. तेव्हां रामाचें तें वचन ऐकून व तें शिरसामान्य करून तो निषादराज गुह सत्वर आपल्या सचिवांना हांक मारून म्हणाला, 'पाणी तोडून नाव तीराला पोहोंचविणारें सुकाणूं लावलेली, सुखानें तरून जातां येईल अशी बळकट आणि शुभ नाव सुकाणु चालविणाऱ्यांसहवर्तमान उतारावर सत्वर घेऊन या.'

ही गुहाची आज्ञा ऐकून घेऊन त्याचा एक मोठा अमात्य गेला, आणि एक मनोहर नाव समीप आणिल्यावर त्यानें तसें त्याला कळविलें. तदनंतर तो गुह हात जोडून रामाला म्हणाला, 'राजा, ही नाव तयार आहे. आतां आपलें आणखी काय कार्य मीं करावें? हे देवकुमारतुल्य पुरुषश्रेष्ठ, समुद्र-

गामिनी गंगा तुम्हांला तरून जातां येण्याकरितां ही नाव आणिलेली आहे. हे सदाचरणसंपन्न, आतां सत्वर हिच्यामध्यें बसा.'

गुहाचें हें भाषण ऐकून महातेजस्वी राम त्याला म्हणाला, "तूं आमचें मोठें काम केलें आहेस. करितां सामानसुमान नावेमध्यें सत्वर ठेऊन निघण्याची तयारी करा." इतकें झाल्यावर कवच चढवून आणि भाते व खड्ग बांधून घेऊन ज्या मार्गानें लोक नावेंत बसून गंगा तरून जात असत, त्या मार्गानें गंगा उतरून जाण्याकरितां ते धनुर्धारी राम-लक्ष्मण सीतेसहवर्तमान निघाले. ह्याप्रमाणें धर्मवेत्ता राम निघाला असतां सुमंत्र सारथी त्याच्या समीप आला, आणि 'मीं आतां काय करावें' म्हणून हात जोडून नम्रपणें त्याला म्हणाला. तेव्हां दाशरथि राम उत्कृष्ठ अशा आपल्या उजव्या हातानें त्याला स्पर्श करून म्हणाला, "सुमंत्रा, तूं पुनरपि सत्वर परत जा, आणि राजापाशीं सावधपणानें असत जा. आतांपर्यंत राजाच्या आज्ञेनें आम्ही रथांत बसून आलों. आतां मला ह्या रथाची गरज नाहीं. कारण रथ सोडून देऊन आम्हांला पायांनींच महावनामध्यें जावयाचें आहे. तस्मात् तूं आतां मनामध्यें कांहींएक न आणितां परत फिर."

रामाचें हें भाषण ऐकून, आपणांला जाण्याची अनुज्ञा झाली असें जाणून तो सुमंत्र सारथि दुःखाकुल झाला, आणि पुरुषश्रेष्ठ रामाला, 'भ्राता आणि भार्या यांसहवर्तमान ज्यानें तुला क्षुद्र जनाप्रमाणें वनांत वास्तव्य करणें भाग पाडिलें आहे, त्या ह्या दैवाचें उल्लंघन ह्या जगतामध्यें कोणत्याहि पुरुषाला करितां आलें नाहीं. ज्या अर्थी तुला हें असलें संकट प्राप्त झालें आहे, त्या अर्थी ब्रह्मचर्य, उत्कृष्ट वेदाध्ययन, दया आणि सरळपणा हीं सर्व निष्फल आहेत, असें मला वाटतें. वीरा रामा, पित्याची आज्ञा शेवटास नेण्याकरितां सीता आणि भ्राता लक्ष्मण ह्यांसहवर्तमान वनामध्यें वास्तव्य करून त्रैलोक्य जिंकिल्याप्रमाणें तुझा उत्कर्ष होईल. रामा, तूं आमचा त्याग केल्यामुळें आम्हां सर्वांचाच घात झाला आहे. आतां आम्ही दुष्ट कैकेयीच्या अधीन होऊन दुःखाचे वांटेकरी होणार.'

रामाचा सुमंत्राला बोध

ह्याप्रमाणें आपल्या नांवाला योग्य भाषण करीत करीत, राम दूर गेल्याचें पाहून तो सुमंत्र दुःखाकुल झाला, आणि पुष्कळ वेळपर्यंत रडत बसला. तदनंतर अश्रू थांबल्यावर तो पवित्र सारथि गंगोदकाचें आचमन करूं लागला

असतां राम पुनः मधुर वाणीनें त्याला म्हणाला, "इक्ष्वाकुवंशजांचा तुझ्यासारखा सुहृद मला कोणी दिसत नाहीं. ह्यास्तव दशरथ राजा माझ्याकरितां शोक न करील, असें तूं कर. त्या भूपतीचें मन शोकानें अगदीं घेरलें आहे, व तो वृद्ध झाला असून त्याचे सर्व मनोरथ भग्न झाले आहेत, म्हणून मी हें तुला सांगत आहें. कैकेयीचा प्रिय मनोरथ सिद्धीस नेण्याकरितां तो महात्मा भूपति जी जी कांहीं आज्ञा करील, ती ती तुम्ही निःशंकपणें सिद्धीस न्या. कारण कोणत्याहि कृत्यासंबंधानें आपला मनोभंग होऊं नये एतदर्थच राजे राज्य करीत असतात. तस्मात् सुमंत्रा, त्या महाराजाचा ज्या रीतीनें मनोभंग होणार नाहीं आणि ज्या रीतीनें तो शोकानें खिन्न होणार नाहीं, त्या रीतीनें तूं तजवीज ठेवीत जा; आणि वृद्ध, सभ्य, जितेंद्रिय आणि दुःखाचा अनुभव नसलेल्या राजाला माझ्याकरितां अभिवंदन करून तूं असें सांग कीं, 'आम्ही अयोध्येला मुकून वनामध्यें वास्तव्य करीत आहों, म्हणून मला अथवा लक्ष्मणाला वाईट वाटत नाहीं. चौदा वर्षे निघून गेलीं म्हणजे लवकरच परत आलेल्या लक्ष्मणाला, मला व सीतेला आपण वारंवार अवलोकन कराल.' ह्याप्रमाणें सुमंत्रा, राजाला, माझ्या मातेला, माझ्या मातेबरोबर असलेल्या इतर सर्व राजभार्यांना आणि कैकेयीला फिरून फिरून सांगून 'मी आरोग्यसंपन्न आहें' असें तूं सर्वांना सांग. माझ्या वचनावरून सीतेचा, माझा व आर्य लक्ष्मणाचा प्रणिपात माता कौसल्येला कळीव. भरताला सत्वर आणा म्हणून महाराजालाहि सांग. भरत आला म्हणजे दशरथाच्या अनुमतीनें त्याला राज्यावर बसविण्याची तजवीज होऊं द्या. तूं भरताला भेटून यौवराज्याचा अभिषेक करविलास, म्हणजे आम्हांकरितां संताप उत्पन्न होऊन तुला दुःख होणार नाहीं. भरताला माझा निरोप सांग कीं, जसा तूं राजाशीं वागत असतोस तसाच कांहींएक भेद मनांत न आणितां सर्वहि मातांशीं वागत जा. ज्याप्रमाणें तुला कैकेयी व सुमित्रा ह्यांमध्यें भेद नाहीं, त्याचप्रमाणें माझी माता कौसल्याहि तूं सारखीच समजत जा. पित्याचें प्रिय करण्याचा उद्देश धरून तूं यौवराज्याचा अंगीकार केलास, म्हणजे उभयलोकीं सर्वदा तुझें सुख वृद्धिंगत होणें शक्य आहे."

स्वतःला वनांत येऊं देण्याविषयीं सुमंत्राची रामाला प्रार्थना.

ह्याप्रमाणें सुमंत्राला परत पाठवितांना रामानें बोध केला असतां त्याचें तें सर्व भाषण श्रवण करून तो सुमंत्र प्रेमामुळें त्या ककुत्स्थकुलोत्पन्न रामाला म्हणाला, "मी तुझ्याशीं सत्कारपूर्वक भीत भीत भाषण न करितां प्रेमामुळें

निर्भयपणानें भाषण करीत आहें, परंतु मी भक्तिवान आहें, असें समजून तूं त्या भाषणाबद्दल मात्र क्षमा कर. बा रामा, तुझ्या वियोगामुळें पुत्रशोक झाल्यासारखा दु:खित झालेल्या त्या अयोध्या नगरीला तुझ्याशिवाय मी कसारे परत जाऊं! नगरांतून बाहेर निघतांना तुजसहवर्तमान माझा रथ अवलोकन करून लोक अतिशय दु:खित झाले, मग तुजवांचून रथ परत आलेला पाहून तर ती नगरी विदीर्णच होऊन जाईल. युद्धामध्यें वीरांचा वध झाल्यामुळें वीररहित झालेल्या अनाथ सैन्याप्रमाणें सारथिच त्यांत शिल्लक राहिला आहे, असा हा शून्य रथ अवलोकन करून सर्व नगरी दीन होऊन जाईल. तूं दूर रहात असतांनाहि समोर असल्याप्रमाणेंच मनामध्यें तुझें चिंतन करणारे प्रजाजन, आज खरोखर मी टाकून परत गेलों म्हणजे निराहाराचा संकल्प करून बसतील. रामा, तूं वनवासांत निघालास, त्या वेळीं तुझ्या शोकानें भांबावून गेलेल्या लोकांच्या वर्तनांत काय गडबड उडाली, ती तूं पाहिलीच आहेस. तूं प्रवासाला निघते वेळीं नगरांतील लोकांनीं जो दु:खानें आक्रोश केला, त्या आक्रोशापेक्षां रथासहवर्तमान मला अवलोकन करितांक्षणीं ते शंभरपटीनें जास्त आक्रोश करूं लागतील. मी कौसल्या देवीला तरी काय सांगू बरें? 'मी तुझ्या मुलाला आजोळीं पोहोंचविलें आहे, तूं उगीच संताप करून घेऊं नको,' असें कां मी तिला सांगूं! अशा प्रकारें बोलणें जर तिला प्रिय होणारें आहे, तरी असत्य म्हणून मी तें कधींहि बोलणार नाहीं. त्याचप्रमाणें रामाला मीं मोठ्या अरण्यांत सोडिलें, हें सांगणें जरी सत्य आहे, तरीहि पण तें अप्रिय म्हणून माझ्यानें होणार नाहीं. सारांश, मला आतां अयोध्येमध्यें परत जातां येत नाहीं. शिवाय हा रथहि मला तिकडे नेतां येणार नाहीं. कारण हे उत्कृष्ट अश्व एक मी हाकणारा असलों म्हणजेच चालणारे आहेत; आणि मी जरी हाकणारा असलों, तरी तुमच्या कुटुंबांतील माणसें जर आंत बसलेलीं असतील, तरच ते रथ ओढीत असतात. तेव्हां तुझ्याशिवाय हे अश्व रथ ओढून नेतील कसा! तस्मात् हे निष्पापा, तुझ्याशिवाय मला अयोध्येंत जातां येणें शक्य नाहीं. तेव्हां तुझ्याबरोबर वनवासाला येण्याची तूं मला अनुज्ञा दे. मी ही प्रार्थना करीत असतांनाहि तूं जर माझा त्यागच करशील, तर तूं त्याग करितांक्षणीं येथल्या येथेंच मी रथासहवर्तमान अग्नीमध्यें प्रवेश करीन. हे राघवा, वनामध्यें तुझ्या तपाला कांहीं विघ्न करणाऱ्या गोष्टी प्राप्त होण्याचा संभव आहे; तेव्हां त्या सर्वांचा मी रथाच्या साधनानें बाध करीन. तुझ्यामुळें हें रथांत बसण्याचें सुख मला प्राप्त झालें आहे.

(कारण अयोध्या नगरींतील लोकांना तुझा वियोग झाला असल्यामुळें ते अत्यंत दु:खी आहेत; परंतु मला अद्यापपर्यंत तुझा समागम असल्यामुळें तसें दु:ख नाहीं.) आतां जर मी तुला सोडून परत गेलों, तर रथांत बसण्याचें मला सुख न होतां, मोकळा रथ अयोध्येंत घेऊन गेल्यानें मी लोकांच्याहि दु:खालाच कारण होणार आहे. तेव्हां तूं मला बरोबर येण्याची अनुज्ञा दिलीस, म्हणजे दु:ख न होतां तुझ्यामुळें वनवासाचें सुखच प्राप्त होण्याची मला आशा आहे. तूं मजवर कृपा कर. मी अरण्यामध्यें तुझ्यासमीप राहण्याची इच्छा करीत आहें. 'तूं जवळ रहा' असें प्रीतीनें तूं केलेलें भाषण श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. हे वीरा, हे अश्वहि तूं वनवासामध्यें असतांना जर तुझी सेवा करतील, तर ह्यांना उत्कृष्ट गति प्राप्त होईल. वनामध्यें राहून मी अत्यंत नम्रपणानें तुझी सेवा करीत जाईन; आणि अयोध्येचाच नव्हे, परंतु देवलोकाचाहि तुझ्याकरितां मी सर्वस्वी त्याग करीन. पापकर्म केलेल्या पुरुषाचा इंद्राच्या (अमरावती) राजधानीमध्यें प्रवेश होणें जसें अशक्य आहे, तसेंच तुझ्यावांचून अयोध्येमध्यें माझा प्रवेश होणें अशक्य आहे. वनवास समाप्त झाल्यानंतर ह्याच रथानें मी तुला पुनरपि अयोध्या नगरींत घेऊन जाईन, हा माझा मनोरथ आहे. तुझ्यासहवर्तमान माझीं वनामध्यें चौदा वर्षें एका क्षणाप्रमाणें निघून जातील. नाहीं तर तीं मला शेंकडों वर्षांसारखीं होतील. सेवकांवर प्रेम करणाऱ्या रामा, आपल्या धन्याच्या पुत्रानें स्वीकारिलेल्या मार्गाचें अवलंबन करून मर्यादेनें वागत असलेल्या मज अनुरक्त सेवकाचा त्याग करणें तुला योग्य नाहीं."

सुमंत्राला परत पाठविण्याचा हेतु.

ह्याप्रमाणें अरण्यांत राहण्याविषयीं नानाप्रकारांनीं काकुळतीनें प्रार्थना करणाऱ्या सुमंत्राला सेवकांवर दया करणारा राम म्हणाला, "हे राजनिष्ठा, तुझी उत्कृष्ठ भक्ति मी समजून आहें; परंतु मी कशाकरितां तुला अयोध्या नगरीमध्यें पाठवीत आहें, तें तूं ऐकून घे. तूं नगरीमध्यें परत गेल्याचें पाहून माझ्या कनिष्ठ माता कैकेयीला 'राम वनामध्यें गेला' असा विश्वास वाटेल. नाहीं तर मी वनवासाला गेलों असतांनाहि तिला संतोष होणार नाहीं. तस्मात् 'मिथ्यावादी' म्हणून रामाविषयीं तिला भलतीच शंका न येईल, असें केलें पाहिजे-माझ्या कनिष्ठ माता कैकेयीला भरतरक्षित झालेल्या पुत्रराज्याचें सुख प्राप्त व्हावें, हा माझा तुला अयोध्या नगरीमध्यें पाठविण्याचा मुख्य उद्देश आहे. म्हणून

सुमंत्रा, तूं माझें आणि राजाचें प्रिय करण्याकरितां नगरीमध्यें जा, आणि मीं जें जें सांगितलें आहे तें तें सर्व तसें तसें तेथें सांग. "

जटाबंधन.

ह्याप्रमाणें सारथ्याला सांगून व पुन: पुन: त्याचें सांत्वन करून तो वीर राम गुहाला म्हणाला, 'हे गुहा, ज्यांत माणसें आहेत अशा वनामध्यें हें माझें वास्तव्य योग्य नाहीं, निर्जन अशा आश्रमामध्यें मला वास्तव्य करणें अवश्य आहे. तस्मात् आश्रमवासाला योग्य असा विधि आतां केला पाहिजे. सारांश, वन्य आहार, भूमीवर शयन वगैरे नेम धरून आणि तपस्वी लोकांच्या भूषणांचा स्वीकार करून सीता आणि लक्ष्मण ह्यांच्या अनुमतीनें पित्याचें हित करण्याचा माझा उद्देश आहे. तात्पर्य, मी आतां जटा धारण करून पुढें जाणार आहें, याकरितां वडाचा चीक घेऊन ये."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां गुहानें त्या राजकुमाराला तो चीक सत्वर आणून दिला, व त्याच्या योगानें त्या आजानुबाहु पुरुषश्रेष्ठ रामानें लक्ष्मणाकरितां व आपणाकरितां जटा करून जटिलत्व धारण केलें. तेव्हां वल्कलें व जटामंडल धारण केलेले ते भ्राते रामलक्ष्मण ऋषींप्रमाणें शोभूं लागले. तदनंतर वानप्रस्थाश्रमांतील धर्म स्वीकारण्याचा उद्देश धरून लक्ष्मणासहवर्तमान रामानें वानप्रस्थव्रताचा अंगीकार केला. नंतर तो राम त्या साहाय्यकर्त्या गुहाला म्हणाला, " हे गुहा, सैन्य, खजिना, किल्ले आणि देश ह्यांसंबंधानें तूं दक्ष रहात जा. कारण राज्य रक्षण करणें अतिशय कठीण आहे." असें सांगून त्या इक्ष्वाकुवंशज रामानें त्या गुहाला परत जाण्याची अनुज्ञा दिली, आणि भार्या व लक्ष्मण ह्यांसहवर्तमान तो दक्ष राम सत्वर निघाला.

गंगा तरून जाणें.

नदीचे तीरीं तयार असलेली नाव अवलोकन करून वेगानें वहाणारी गंगा तरून जाण्याच्या उद्देशानें तो इक्ष्वाकुनंदन राम लक्ष्मणाला म्हणाला, " हे पुरुषश्रेष्ठा उभी असलेली ही नाव हातानें धरून तूं विचारी सीतेला हलकेच वर चढीव, आणि नंतर लगेच तूंहि आरूढ हो." ही भ्रात्याची आज्ञा श्रवण करून त्याच्या आज्ञेविरुद्ध यत्किंचित्‌हि न वागणारा तो जितेंद्रिय लक्ष्मण सीतेला प्रथम वर चढवून नंतर आपणहि त्या नावेवर आरूढ झाला. तदनंतर तेजस्वी राम नौकेंत बसल्यावर निषादराज गुहानें आपल्या जातभाईंना जाण्याविषयीं आज्ञा केली. महातेजस्वी रामहि नावेंत आरूढ होऊन, आपलें हित

होण्याच्या उद्देशानें ब्राह्मण व क्षत्रिय ह्या उभयतांनाहि जपण्यास योग्य अशा नौकारोहणासंबंधीं मंत्राचा जप करूं लागला. नंतर यथाविधि आचमन करून सीतेसहवर्तमान रामानें व महारथि लक्ष्मणानें संतुष्ट होऊन त्या गंगेला प्रणाम केला. नंतर रामानें सुमंत्र सारथ्याला व सैन्यासहवर्तमान आलेल्या त्या गुहाला जाण्याची अनुज्ञा दिली. नावेमध्यें नीट बसून त्यानें नावाड्यांना ती हांकण्यास सांगितलें. तेव्हां सुकाणु धरणाऱ्यानें सज्ज ठेविलेली ती नाव ते नावाडी वल्हवूं लागले, आणि उत्कृष्ट सुकाणूच्या वेगानें आदळत आदळत ती नाव सत्वर पाण्यामध्यें निघाली.

सीतेचा गंगेला नवस.

त्या त्रिपथगामिनी भागीरथीच्या मध्यें ती नाव आल्यावर निर्दोष सीता हात जोडून त्या गंगेला म्हणाली, " हे गंगे, हा विचारी दशरथ महाराजाचा पुत्र तूं संरक्षण करीत असतांना ही आपल्या पित्याची आज्ञा शेवटास नेवो. हे देवि, हे भाग्यशाली गंगे, संपूर्ण चौदा वर्षें वनामध्यें वास्तव्य करून भ्राता व मी ह्यांसहवर्तमान तो पुनरपि परत येईल, तेव्हां सर्व मनोरथ परिपूर्ण होऊन मी सुखरूप परत आलें म्हणजे तुझें मोठ्या आनंदानें पूजन करीन. हे त्रैलोक्यगामिनि देवि, तूं ब्रह्मलोक व्याप्त करीत आहेस आणि महासागराची भार्या असून ह्या लोकामध्यें दृष्टोत्पत्तीस येत आहेस. हे देवि, हे कल्याणि, माझा पुरुषश्रेष्ठ भर्ता वनांतून सुखरूप परत येऊन राज्य करूं लागला म्हणजे मी तुला नमस्कार करीन, आणि तुला संतुष्ट करण्याकरितां लक्ष गोप्रदानें, वस्त्रें आणि उत्तम अन्न ब्राह्मणांना देईन. इतकेंच नव्हे, परंतु मी अयोध्या नगरीला आलें म्हणजे सहस्र घट मद्य आणि मांसमिश्र ओदन ह्यांचा तुला बलि देईन. गंगे, तूं मला प्रसन्न हो. तुझ्या तीराचे ठिकाणीं ज्या कांहीं देवता आहेत, तीर्थें आणि पुण्यस्थानें असतील, त्या सर्वांचें मी पूजन करीन. परंतु हे निष्पाप गंगे, मी आणि भ्राता लक्ष्मण ह्यांसहवर्तमान माझा निष्पाप भर्ता वनवासांतून अयोध्येंत प्रविष्ट होवो. "

ह्याप्रमाणें गंगेला उद्देशून बोलत असलेली ती निर्दोष व सरळ रीतीनें वागणारी सीता लवकरच दक्षिण तीराला जाऊन पोहोंचली, व तीर प्राप्त झाल्यानंतर नाव सोडून देऊन तो शत्रुतापन पुरुषश्रेष्ठ राम, लक्ष्मण व विदेहकन्या ह्यांसहवर्तमान पुढें निघाला. जातांना तो महापराक्रमी राम सुमित्रेचा आनंद वृद्धिंगत करणाऱ्या लक्ष्मणाला म्हणाला, " कोणताहि प्रदेश निर्जन

असो अथवा जनयुक्त असो, त्यांत तूं सीतेला संरक्षणाकरितां सावध रहात जा. निर्जन वनामध्यें माझ्यासारख्यांनीं तुमच्यासारख्यांचें रक्षण अवश्य केलें पाहिजे. ह्यास्तव लक्ष्मणा, तूं पुढें हो, सीतेला तुझ्या मागोमाग येऊं दे आणि मी सीतेचें व तुझें रक्षण करण्याकरितां तिच्या मागून येईन. हे पुरुषश्रेष्ठ, आपण एकमेकांचें रक्षण केलें पाहिजे. आजपर्यंत कोणतेंहि दुर्घट कर्म आपल्या हातून झालें नाहीं. पण आतांपासून तशा प्रकारच्या कर्मांना आरंभ झाला, असें तूं समज. आज वनवासाचें दुःख सीतेला कळून येईल. कारण ज्यांत लोकांची गडबड नाहीं आणि शेत अथवा उपवनें ह्यांचें जेथें नांव नाहीं अशा उंच, सखल व खाचखळगे असलेल्या वनामध्यें आज तिला प्रवेश करावा लागेल."

रामाचें हें बोलणें ऐकून लक्ष्मण पुढें निघाला, आणि नंतर सीतेच्या मागून रघुनंदन राम जाऊं लागला. गंगेच्या पलीकडल्या तीराला सत्वर गेलेल्या रामाकडे सुमंत्र एकसारखा पहात होता, आणि जेव्हां फारच अंतर पडलें, तेव्हां आपली दृष्टी त्याच्या मार्गापासून निवृत्त करून तो बिचारा सुमंत्र दुःखित होऊन अश्रू ढाळूं लागला. असो. लोकपालाप्रमाणें ज्याचा प्रभाव आहे असा तो महात्मा वरप्रद राम महानदी तरून गेल्यावर, एका क्षणामध्यें समृद्ध आणि उत्कृष्ठ पिकें व आनंदित प्रजा ह्यांनीं युक्त असलेल्या वत्स देशामध्यें गेला. तेथें त्या बुभुक्षित रामलक्ष्मणांनीं ऋश्य, पृषत व महारुरु (हीं तीन प्रकारचीं हरणें) आणि वराह असे चार मोठे मृग मारून त्यांच्या पवित्र मांसाचा सत्वर स्वीकार केला, आणि सायंकाळीं ते वास्तव्य करण्याकरितां एका वृक्षासमीप गेले.

सर्ग त्रेपन्नावा.

आपल्या स्थितीविषयीं रामाचें खेदयुक्त भाषण.

त्या वृक्षासमीप उतरून सायंसंध्या केल्यावर, चित्तरंजन करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ असलेला राम लक्ष्मणाला म्हणाला, "सुमंत्र सारथ्याशिवाय नगराबाहेरची आजची ही पहिलीच रात्र होय. करितां तूं आतां अयोध्येचें वगैरे स्मरण होऊं देऊं नको. आजपासून आपल्याला सावध राहून रात्रीं जागलें पाहिजे. कारण लक्ष्मणा, सीतेचा योगक्षेम आपणांवर अवलंबून आहे. लक्ष्मणा, ही रात्र आपण

कशी तरी काढूं, आणि स्वतः आणिलेलीं पानें वगैरे भूमीवर अंथरून आपण कसें तरी पडूं."

ह्याप्रमाणें लक्ष्मणाला सांगून, मोठमोठ्या मौल्यवान मंचकांवर शयन करण्याची संवय असलेला तो राम भूमीवर पडला, आणि लक्ष्मणाला शुभ गोष्टी सांगूं लागला.

श्रीराम म्हणाला:—"लक्ष्मणा, आज महाराज निःसंशय दुःख करीत शय्येवर पडले असतील. कैकेयी मात्र मनोरथ सिद्धीस गेल्यामुळें संतुष्ट असणें योग्य आहे. परंतु ती राजपत्नि कैकेयी भरत आलेला पाहून राजकारणाकरितां महाराजाला प्राणत्याग करावयाला लावल्यावांचून राहील, असें दिसत नाहीं. अनाथ, वृद्ध, माझा वियोग झालेला आणि त्यांतूनहि विषयलोलुप असल्यामुळें कैकेयीच्या तावडींत सांपडलेला पिता काय बरें करील? हें संकट आणि राजाच्या बुद्धीला पडलेला भ्रम ह्यांचा विचार केला म्हणजे अर्थ आणि धर्म ह्यांपेक्षां कामच प्रबल आहे, असें मला वाटतें. असें जर नसेल तर पित्यानें ज्याप्रमाणें माझा त्याग केला, त्याप्रमाणें कोणता बरें अज्ञानी पुरुष स्त्रीकरितां आपल्या मर्जीप्रमाणें वागणाऱ्या पुत्राचा त्याग करील? खरोखर कैकेयीचा पुत्र भरत आपल्या भार्येसहवर्तमान सुखी आहे. कारण आनंदित अशा कोशल देशाचा सार्वभौम राजाप्रमाणें तो एकटा उपभोग घेणार आहे. पिता वयातीत झाला असून मी अरण्याचा आश्रय केल्यामुळें आतां सर्व राज्यसुखाचा उपभोग तो एकटाच घेणार आहे. धर्म आणि अर्थ सोडून देऊन जो कामाचेंच अवलंबन करितो, त्याला दशरथ राजाप्रमाणें अशी सत्वर विपत्ति प्राप्त होते. हे सौम्य, दशरथाच्या मृत्यूकरितां, मला हांकून देण्याकरितां आणि भरताला राज्य प्राप्त करून देण्याकरितांच कैकेयीचा अवतार आहे, असें मला वाटतें. पति आपल्या मुठींत आहे ह्या मदानें भांबावून गेलेली ती कैकेयी अजूनसुद्धां माझ्याकरितां कदाचित् कौसल्येला व सुमित्रेला पीडा देईल, आणि आपल्याकरितां माता सुमित्रा देवीला दुःखानें दिवस कंठावे लागतील. म्हणून लक्ष्मणा, अजून वेळ निघून गेली नाहीं, तोंच तूं येथूनच अयोध्येला परत जा. सीतेसहवर्तमान मी एकटा दंडकारण्यांत जाईन. आणि तूं अयोध्येंत गेलास म्हणजे सध्यां अनाथ असलेल्या कौसल्येचें रक्षण करशील. कैकेयी निःसंशय हलकें कृत्य सुद्धां करील. हे धर्मवेत्त्या, द्वेषामुळें ती आपल्या मातांशीं अन्यायानें वागूं लागेल, आणि त्यांना विष देखील घालील. बाबारे,

माझ्या मातेनें जन्मांतरीं कांहीं स्त्रियांचा पुत्रांशीं वियोग केलेला आहे, आणि त्यामुळें आज हें पुत्रवियोगदु:ख तिला प्राप्त झालें आहे. पुष्कळ दिवसपर्यंत कौसल्येनें मला पोसून कष्टानें वाढविलें, आणि शेवटीं इतके कष्ट सोसल्याचें फल प्राप्त होण्याचा समय आला असतां तिला माझा वियोग झाला. तस्मात् धिक्कार असो मला! लक्ष्मणा, मी आपल्या मातेला अक्षय्य दु:ख देत आहें, म्हणून कोणत्याहि स्त्रीला असा पुत्र होऊं नये. माझ्या मातेनें पालन करून बोलण्याला शिकविलेली सारिका माझ्यापेक्षां माझ्या मातेचें ठिकाणीं अधिक प्रीति करणारी आहे, असें मला वाटतें. कारण 'हे शुका, शत्रूच्या पायाला दंश कर' असें तरी त्या सारिकेचें वाक्य कानावर पडत असतें; परंतु शत्रूचा पराभव करण्यासंबंधाचे तसे नुसते माझे शब्द देखील तिच्या कानावर पडत नाहींत. हे शत्रुदमना, नशीब कमी असल्यामुळें पुत्र असूनहि निपुत्रिकाप्रमाणें शोक करीत बसलेल्या माझ्या मातेला यत्किंचित्हि उपकार न करणाऱ्या मज पुत्राचा काय बरें उपयोग आहे? माझी माता कौसल्या नि:संशय दुर्दैवी आहे, आणि म्हणूनच माझा वियोग होऊन शोकसागरांत पडलेली ती सध्यां अत्यंत दु:खाकुल होऊन स्थित आहे. लक्ष्मणा, मी एकटा क्रुद्ध झालों असतां अयोध्याच नव्हे, परंतु सर्व पृथ्वी बाणांनीं जिंकून टाकीन. पण बाबारे, वीर्याचा ह्या प्रसंगीं कांहीं उपयोग नाहीं. हे निष्पापा, मी अधर्माला भीत असून परलोकांचें भय बाळगीत आहें, आणि म्हणूनच आज आपणाला अभिषेक करून घेत नाहीं."

अशा प्रकारच्या दीनपणानें त्या निर्जन वनामध्यें पुष्कळ विलाप करून अश्रूंनीं मुख व्याप्त झालेला तो दीन राम रात्रीं स्वस्थ बसला. विलाप करून स्वस्थ बसलेल्या आणि म्हणूनच ज्वालारहित झालेल्या अग्नीप्रमाणें अथवा वेगरहित झालेल्या समुद्राप्रमाणें दिसत असलेल्या त्या रामाचें लक्ष्मण सांत्वन करूं लागला कीं, "हे वीरशिरोमणे, तूं निघून गेल्यामुळें चंद्र अस्तास गेलेल्या रात्रीप्रमाणें आज अयोध्या नगरी नि:संशय निस्तेज झाली असेल. परंतु तूं असें दु:ख करून सीतेला व मला खिन्न करीत आहेस, हें योग्य नाहीं. राघवा, उदकांतून बाहेर काढलेले मत्स्य ज्याप्रमाणें जिवंत रहाणें अशक्य आहे, त्याचप्रमाणें तुझा वियोग झाला असतां सीतेला अथवा मला जिवंत रहाणें अशक्य आहे. हे शत्रुतापना, तुझ्याशिवाय पिता, शत्रुघ्न, सुमित्रा अथवा स्वर्ग हीं आज मला पहाण्याची इच्छा नाहीं."

ह्याप्रमाणें लक्ष्मणानें सांगितल्यानंतर प्रथमतः त्या वटवृक्षापाशींच बसलेले ते धर्मवत्सल सीताराम जवळच चांगली तयार करून ठेवलेली ती शय्या अवलोकन करून तिच्यावर जाऊन पडले. ह्याप्रमाणें वनवासासंबंधानें आदरपूर्वक लक्ष्मणानें केलेलें अत्यंत श्रेष्ठ भाषण श्रवण करून, आणि पुष्कळ काळ लोटेपर्यंत स्वतः वनवासधर्मानें वागण्याचें ठरवून, त्या शत्रुतापन रामानें सर्व वर्षें संपेपर्यंत लक्ष्मणाला वनवासाची अनुज्ञा दिली. तदनंतर पर्वतशिखरांवरून हिंडणाऱ्या सिंहाप्रमाणें त्या निर्जन महावनांत असलेल्या त्या महाबलाढ्य रघुवंशवर्धक राम-लक्ष्मणांना भय वाटलें नाहीं, आणि ते घाबरूनहि गेले नाहींत.

सर्ग चौपन्नावा.

भरद्वाज मुनींच्या आश्रमीं गमन.

त्या मोठ्या वृक्षासमीप ती शुभ रात्र काढून चांगला सूर्योदय झाल्यावर ते त्या प्रदेशांतून पुढें चालते झाले. फारच मोठें वन ओलांडून गेल्यावर, जेथे यमुनेचा भागीरथीशीं संगम होत आहे त्या (प्रयाग) देशाला जाण्याकरितां निघाले. पूर्वीं कधीं न पाहिलेले असे नानाप्रकारचे भूमिप्रदेश आणि मनोहर देश ठिकठिकाणीं अवलोकन करीत करीत ते यशस्वी राम-लक्ष्मण चालले, आणि नानाप्रकारचे प्रफुल्लित वृक्ष त्यांनीं यथेष्ट अवलोकन केले. जातां जातां दिवस अस्ताला जाण्याची वेळ होतांक्षणींच राम म्हणाला, " लक्ष्मणा, भगवान अग्नीचें चिन्ह असा उत्कृष्ट धूम तूं ह्या प्रयागापाशीं अवलोकन कर. ह्यावरून ह्या ठिकाणीं मुनि असावेत, असें वाटतें. खरोखर आपण गंगायमुनांच्या संगमापाशीं आलों आहों. कारण विजातीय उदकांचा संबंध झाल्यामुळें गंगा व यमुना ह्यांच्या उदकांचा ध्वनि कानावर येत आहे. वनावर उपजीविका करणाऱ्या वनचरांनीं ज्यांचीं काष्ठें तोडून नेलीं आहेत, असे हे नानाप्रकारचे तुटके वृक्षहि आश्रमांत दिसत आहेत."

ह्याप्रमाणें बोलणें चाललें आहे तोंच सूर्य कलला असतांना, सुखानें मार्ग चालून आलेले ते धनुर्धारी राम-लक्ष्मण गंगायमुनांच्या संगमासन्निध असलेल्या मुनींच्या निवासस्थानाजवळ गेले. राम आश्रमासन्निध आला असतां, त्यानें धनुष्य धारण केलें असल्यामुळें तेथील पशुपक्षी त्रस्त झाले. एक क्षण-

भर मार्ग चालून पुढें आल्यावर तो राम भरद्वाज मुनींच्या अगदीं आश्रमासमीप गेला. तदनंतर भरद्वाज मुनींच्या दर्शनाची इच्छा धरून ते वीर रामलक्ष्मण आश्रमांत येऊन दूर उभे राहिले, व ती सीताहि त्यांच्या मागोमाग गेली. पुढें आंत येण्याची अनुज्ञा मिळाल्यावर राम पर्णकुटिकेमध्यें गेला, तों शिष्यगणांनीं परिवेष्ठित असे महात्मे भरद्वाज ऋषि त्याच्या दृष्टीस पडले. त्यांचें व्रत मोठें कडकडीत होतें. तपःसामर्थ्यानें सर्व जगतांतील सर्व कालचा वृत्तांत त्यांना विदित होता. अग्निहोत्र-होम देऊन ते एकाग्र बसले होते. त्यांचें दर्शन होतांक्षणीं महाभाग्यवान रामानें लक्ष्मणासहवर्तमान हात जोडून त्यांना अभिवंदन केलें, व सीतेकडून त्यांना नमस्कार करविला. तदनंतर त्या मुनींना राम आपली हकीकत सांगूं लागला.

राम म्हणाला: -- "भगवन्, आम्ही राम-लक्ष्मण दशरथाचे पुत्र आहों. ही माझी कल्याणी भार्या वैदेहि जनक राजाची कन्या आहे. ही निर्दोष स्त्री माझ्याबरोबर निर्जन तपोवनामध्यें आली आहे. पिता मला वनवासांत पाठवूं लागला असतां हा माझा कनिष्ठ भ्राता सुमित्रापुत्र लक्ष्मणहि माझ्यासारखें व्रत धरून माझ्याबरोबर वनामध्येंच आला. भगवन्, पित्याची आज्ञा झाली असल्यामुळें आम्ही तपोवनामध्यें जाणार, आणि तेथें फलमूलांवर उपजीविका करून वानप्रस्थधर्माचेंच अवलंबन करणार."

हे त्या विचारी राजकुमाराचें भाषण श्रवण करून धर्मात्म्या भरद्वाज मुनींनीं मधुपर्ककरितां गाय, अर्घ्य आणि उदक हीं तेथें आणिलीं. वनांतील फळें व मुळें ह्यांचे तयार केलेले नानाप्रकारचे अन्नरस त्या मुनींनीं त्यांना दिले, आणि त्यांच्या वसतिस्थानाचीहि सोय केली. राम तेथें आला असतां मृग, पक्षी आणि मुनी ह्यांसहवर्तमान भरद्वाज मुनींनीं त्याचें स्वागत केलें, आणि मुनींसहवर्तमान ते त्याच्या भोंवतालीं बसले. तेव्हां त्यांच्या त्या आदरातिथ्याचा स्वीकार करून राम बसला असतां, धर्माला अनुसरून भरद्वाज मुनि त्याला म्हणाले, 'हे ककुत्स्थवंशजा रामा, बराच काल लोटल्यावर तुला मी आज येथें आलेला पहात आहें. तुला निष्कारण वनवासांत पाठविल्याचेंहि मीं ऐकिलें आहे. महानद्यांच्या संगमावर असलेला हा प्रदेश जनशून्य, पुण्य व रमणीय आहे. तेव्हां तूं येथें सुखानें रहा.'

ह्याप्रमाणें भरद्वाज मुनींनीं सांगितलें असतां, सर्वांच्या हिताविषयीं तत्पर असलेला तो राम त्यांच्याशीं असें शुभ भाषण करूं लागला कीं, "भगवन्, ह्या

आश्रमापासून नगरांतील व देशांतील लोक अगदीं जवळच आहेत; आणि ते ह्या आश्रमामध्यें माझी सहज भेट होते, असें समजून सीतेला व मला पहाण्याच्या उद्देशानें ह्या आश्रमांत येऊं लागतील, असें मला वाटतें. तस्मात् ह्या कारणामुळें येथें वास्तव्य करणें मला रुचत नाहीं. भगवन्, एकांत प्रदेशामध्यें एखादें उत्कृष्ट आश्रमस्थान असल्यास पहा, म्हणजे सुखाचा उपभोग घेत आलेली ही जनककन्या वैदेही तेथें सुखानें आनंदांत राहील."

हें शुभ वाक्य श्रवण करून महर्षि भरद्वाज राघवानें दर्शविलेला उद्देश सिद्धीस जाईल अशा रीतीनें त्याला म्हणाले, 'बा रामा, येथून दहा कोसांवर एक पर्वत आहे, त्या ठिकाणीं तूं वास्तव्य कर. त्या पुण्यपर्वताचा महर्षींनीं आश्रय केलेला आहे, व त्याचें दर्शनहि शुभकारक आहे. गायींच्या शेंपटाप्रमाणें शेंपूट असलेले गोलांगूलसंज्ञक वानर तेथें संचार करीत असतात, व इतर वानर आणि अस्वलें तेथें वास्तव्य करीत असतात. गंधमादन पर्वताप्रमाणें असलेला तो पर्वत चित्रकूट म्हणून प्रसिद्ध आहे. त्या चित्रकूट पर्वताच्या शिखराचें दर्शन झालें असतां पुरुषाच्या मनांत चांगल्याच गोष्टी येऊं लागतात. मोहाकडे त्याची प्रवृत्ति होत नाहीं. त्या ठिकाणीं अनेक ऋषी शेंकडों वर्षेंपर्यंत शंकरासहवर्तमान क्रीडा करून तपाच्या योगानें स्वर्गाला गेलेले आहेत. मला वाटतें, त्या ठिकाणीं तुझें वास्तव्य एकांतामध्यें सुखानें होईल. अथवा रामा, वनवासाकरितां तूं येथें माझ्या सन्निध रहा.'

चित्रकूटवर्णन.

तदनंतर सर्व इष्ट वस्तु अर्पण करून त्या भरद्वाज मुनींनीं भार्या सीता आणि भ्राता लक्ष्मण ह्यांसहवर्तमान त्या प्रिय अतिथि रामाचें त्याला आनंद होईल अशा रीतीनें आदरातिथ्य केलें. असो. तेव्हां प्रयागतीर्थाचे ठिकाणीं त्या महर्षींची भेट घेऊन राम अद्भुत कथा सांगत असतांना शुभकारक अशी रात्र पडली. श्रांत झालेला तो राम सीतेसहवर्तमान भरद्वाज मुनींच्या रम्य आश्रमामध्यें ती रात्र सुखानें राहिला. नंतर उजाडल्यावर अग्नीप्रमाणें तेजस्वी असलेल्या भरद्वाज मुनींकडे जाऊन तो पुरुषश्रेष्ठ राम त्यांना म्हणाला, "भगवन्, हे सत्यशील मुने, आज आपल्या आश्रमामध्यें आम्हीं वास्तव्य केलें. आतां आपण आम्हांला जाण्याची अनुज्ञा द्या." भरद्वाज म्हणाले, 'रामा, मध, मुळें आणि फळें ह्यांनीं युक्त असलेल्या चित्रकूट पर्वतावर जा. हे महाबलाढ्य, त्या ठिकाणीं तुझें वास्तव्य होणें योग्य आहे, असें मला वाटतें. त्या

पर्वतावर नानाप्रकारचे वृक्षसमुदाय आहेत. किन्नर आणि उरग तेथें वास्तव्य करीत आहेत. मयूर पक्ष्यांच्या ध्वनींनीं तो गर्जून राहिलेला आहे. मोठमोठ्या गजांनीं त्याचा आश्रय केलेला आहे. चित्रकूट म्हणून तो प्रख्यात आहे. तो पवित्र व रमणीय असून नानाप्रकारच्या फलमूलांनीं संपन्न आहे. तेव्हां त्या अशा पर्वतावर तूं जा. राघवा, त्या ठिकाणीं वनांतून गजांचे व मृगांचे कळप संचार करीत असतात, ते तूं अवलोकन करशील. लहान लहान जलप्रवाहांनीं युक्त असलेलीं पर्वतशिखरें, दऱ्या, गुहा व झरे हींहि तुझ्या अवलोकनांत येतील. सीतेसहवर्तमान तेथें तूं संचार करूं लागलास म्हणजे तुझ्या मनाला आनंद होईल.'

सर्ग पंचावन्नावा.

चित्रकूटमार्गकथन.

त्या भरद्वाज मुनींच्या आश्रमामध्यें ती रात्र काढिल्यावर ते राजपुत्र रामलक्ष्मण त्या महर्षींना अभिवंदन करून त्या पर्वताकडे निघाले असतां, ज्याप्रमाणें आपल्या पुत्रांकरितां पिता पुण्याहवाचन करितो त्याप्रमाणें त्यांनीं त्याच्याकरितां पुण्याहवाचन केलें. नंतर महातेजस्वी भरद्वाज महामुनींनीं अमोघ पराक्रमी रामाशीं भाषण करण्यास सुरवात केली कीं, 'हे पुरुषश्रेष्ठा रामा, गंगा आणि यमुना ह्यांच्या संगमापासून पश्चिम बाजूलाच जिच्या नांवानें व्यवहार चालतो, त्या यमुना नदीला अनुलक्षून तुम्ही जा; आणि ती नदी जेथें उलटी वहात आहे, तेथें अतिशय प्रचारांत असलेला नावेचा उतार दृष्टोत्पत्तीस आल्यावर त्या ठिकाणीं तुम्ही कांहीं तरी तरून जाण्याचें साधन करा आणि यमुना नदी तरून जा. नंतर ज्याचीं पानें हिरवीं आहेत, ज्याच्या सभोंवतीं अनेक वृक्ष आहेत आणि जो श्यामवर्ण असून सिद्धांनीं ज्याचा आश्रय केला आहे, असा एक मोठा वृक्ष लागला, म्हणजे सीतेनें हात जोडून त्याची प्रार्थना करावी, आणि त्या वृक्षापाशीं आल्यावर तुम्हीं तेथें रहावें अथवा पुढें जावें. तेथून एक कोसभर गेल्यानंतर सल्लकी व बदरी ह्या वृक्षांनीं युक्त व यमुनातीराला असलेल्या श्वापदांनीं संपन्न असें नीलवर्ण वन दृष्टोत्पत्तीस आलें म्हणजे तोच चित्रकूट पर्वताचा मार्ग होय. मी त्या मार्गानें पुष्कळ वेळां गेलेलों आहें. तो मोठा रमणीय व मृदु असून त्यांत कधीं वणवे लागत नाहींत.'

यमुना नदी तरून जाणें.

ह्याप्रमाणें मार्ग सांगितल्यावर महर्षि परत फिरले, व 'ठीक आहे' असें म्हणून रामानेंहि अभिवंदनपूर्वक त्यांना परत फिरविलें. मग राम लक्ष्मणाला म्हणाला, "तुझें कल्याण असो. ज्या अर्थी भरद्वाज मुनि आपणांवर दया करीत आहेत, त्या अर्थी आपण कांहीं तरी पुण्य केलें आहे." ह्याप्रमाणें विचारी पुरुषश्रेष्ठ राम-लक्ष्मण आपापसांत बोलून आणि सीतेलाच पुढें घालून यमुना नदीकडे गेले. तदनंतर शीघ्र प्रवाहानें युक्त असलेल्या यमुना नदीसमीप आल्यावर त्या नदीच्या उदकांतून लगेच तरून जाण्याची इच्छा करणाऱ्या त्या त्रिवर्गांना चिंता पडली. तेव्हां काष्ठें एकत्र बांधून त्यांनीं एक मोठासा पेटा तयार केला. वनांतील वाळलेलीं काष्ठें त्यांत घातलीं होतीं, आणि काळ्या वाळ्यानें तो मढविलेला होता. नंतर वीर्यवान लक्ष्मणानें वेतस-वृक्षांच्या व जंबु-वृक्षांच्या फांद्या तोडून आणून सुखानें बसतां येईल अशी जागा सीतेकरितां तयार केली. अचिंत्य प्रभावानें युक्त असलेली लक्ष्मीच कीं काय अशा त्या आपल्या किंचित लाजणाऱ्या प्रियेला दाशरथि रामानें पेट्यावर चढविलें, आणि त्या पेट्यावर एका बाजूला सीतेचीं वस्त्रें, भूषणें, कुदळ व पेटी हें सामान दक्ष राहून ठेवून दिलें. ह्याप्रमाणें सीतेला प्रथम पेट्यावर चढवून आणि नंतर स्वतः त्याचा स्वीकार करून ते जितेंद्रिय दशरथपुत्र आनंदानें तरून जाऊं लागले.

यमुनेच्या मध्यभागीं आल्यानंतर सीता वंदन करून तिला म्हणाली, "हे देवि, मी तुझ्यांतून तरून जात आहें, तसें माझ्या पतीनें स्वीकारलेलें व्रत पार पडावें. इक्ष्वाकुवंशजांनीं रक्षण केलेल्या अयोध्या नगरीला राम सुखरूप परत आल्यावर सहस्र गाथी व शंभर मद्यघट ह्यांच्या योगानें मी तुझें पूजन करीन."

वटवृक्षदर्शन.

ह्याप्रमाणें यमुनेची हात जोडून प्रार्थना करीत असतांनाच ती सीता नदीच्या दक्षिण तीराला जाऊन पोहोंचली. त्या तीरावरील वृक्षांमध्यें तो पेटा टाकून देऊन ते यमुनेच्या वनांतून पुढें गेले असतां हिरव्या पानांनीं युक्त, शीतल आणि श्यामवर्ण असा वटवृक्ष त्यांना लागला. त्या वटवृक्षासमीप आल्यानंतर सीता अभिवंदनपूर्वक त्याला म्हणाली, "हे महावृक्षा, तुला माझा नमस्कार असो. माझ्या पतीच्या हातून चौदा वर्षें वनवास करण्याचें व्रत शेवटास जावें, आणि कौसल्येचें व यशस्विनी सुमित्रेचें मला दर्शन व्हावें." ह्याप्रमाणें हात जोडून प्रार्थना करीत करीत त्या विचारी सीतेनें त्या वटवृक्षाला प्रदक्षिणा केली. प्रिय, आज्ञेंत वागणारी आणि निर्दोषी अशी सीता वृक्षाची प्रार्थना करीत आहे,

असें अवलोकन करून राम लक्ष्मणाला म्हणाला, " तूं सीतेला घेऊन पुढें चल. हे पुरुषश्रेष्ठ, मी धनुष्य घेऊन मागून येतों. ही राजकन्या जें जें फल अथवा पुष्प मागेल, आणि ज्या ज्या वस्तूवर हिचें मन बसेल, ती ती तूं हिला आणून दे."

ह्याप्रमाणें रामानें लक्ष्मणाला सांगितल्यानंतर वृक्ष, झुडूप अथवा पुष्पवेली असें जें कांहीं पूर्वी पहाण्यांत न आलेलें सीतेच्या दृष्टोत्पत्तीस येऊं लागलें, त्या प्रत्येकाबद्दल ती अबला रामाला वेगवेगळें विचारूं लागली; आणि सीतेनें सांगताक्षणीं लक्ष्मणहि त्वरा करून नानाप्रकारच्या रमणीय वृक्षांचे पुष्पगुच्छ तिला आणून देऊं लागला. जातां जातां आश्चर्यकारक वाळू व उदक ह्यांनीं युक्त, आणि हंस व सारस पक्ष्यांनीं नादित अशी यमुना नदी अवलोकन करून जनककन्येच्या चित्ताला आनंद होऊं लागला असो. तेथून एक कोस गेल्यावर भ्राते राम-लक्ष्मण अनेक पवित्र मृग मारून यमुनेच्या वनांत संचार करूं लागले. मयूर पक्ष्यांच्या समुदायांनीं नादित व गज अणि वानर ह्यांनीं युक्त अशा त्या शुभ वनामध्यें विहार केल्यावर सत्वर नदीच्या तीरीं येऊन ते भव्य त्रिवर्ग निवासस्थानास गेले.

सर्ग छपन्नावा.

चित्रकूट पर्वतीं गमन.

तदनंतर रात्र उजाडली असतांहि निद्रिस्थ असलेल्या लक्ष्मणाला रघुवंशज-श्रेष्ठ राम हळू हळू जागें करून म्हणाला, " लक्ष्मणा, किलबिल करूं लागलेल्या वनांतील पक्ष्यांचा शब्द तूं श्रवण कर. हे शत्रुतापना, आतां आपण चालूं लागूं. कारण निघण्याची वेळ झाली."

ह्याप्रमाणें भ्रात्या रामानें गाढ निद्रिस्थ असलेल्या लक्ष्मणाला वेळेवर जागें केलें असतां लक्ष्मणानें निद्रा व आळस ह्यांचा त्याग केला, आणि त्याला झालेल्या श्रमांचाहि परिहार झाला. तदनंतर त्या सर्वांनीं उठून यमुना नदीच्या पुण्य उदकामध्यें स्नान वगैरे केलें, आणि ऋषींनीं अवलंबन केलेल्या चित्रकूट पर्वताच्या मार्गाला ते लागले. तेव्हां प्रातःकालीं लक्ष्मणासह पुढें जाण्यास निघालेला राम कमलनयन सीतेला म्हणाला, " सीते, वसंतऋतूमध्यें स्वतःच्या पुष्पांमुळें माला धारण केल्याप्रमाणें दिसत असलेले हे सर्व बाजूंनीं प्रफुल्लित

झालेले उज्ज्वल पलाश वृक्ष तूं अवलोकन कर. पहा, हे भल्लातक वृक्ष आणि बिल्व वृक्ष फलपुष्पांनीं वांकलेले आहेत. लोकांनीं ह्यांच्या फलपुष्पांचा उपयोग केलेला नाहीं. तेव्हां आपली उपजीविका चालण्याला खरोखर पंचाईत पडणार नाहीं. लक्ष्मणा, चार चार पायली मध सांपडेल अशीं हीं मधुमक्षिकांनीं तयार केलेलीं मोहें प्रत्येक वृक्षाला लोंबत आहेत, तीं पहा. हा पाणकावळा ओरडत आहे, आणि त्याचा शब्द ऐकून पुष्पांच्या थव्यानें गच्च भरून गेलेल्या रमणीय वनप्रदेशामध्यें मोर उलट गर्जना करीत आहे. मोठमोठ्या शिखरांनीं युक्त असलेला हा चित्रकूट पर्वत अवलोकन कर. ह्याच्यावर हत्तींचे कळप असून पक्षिसमुदायांनीं हा नादित झाला आहे. बा लक्ष्मणा, अनेक वृक्षांनीं व्याप्त, रम्य, पवित्र व सपाट प्रदेशावर असलेल्या ह्या चित्रकूट पर्वताच्या वनामध्यें आपण करमणूक करूं."

नंतर सीतेसहवर्तमान ते पादचारी राम-लक्ष्मण मनोहर आणि रम्य अशा चित्रकूट पर्वताजवळ गेले, आणि अनेक प्रकारचे पक्षिसमुदाय, विपुल फळें व मुळें आणि स्वादिष्ट उदक ह्यांनीं युक्त असलेल्या त्या रम्य पर्वतापाशीं गेल्यानंतर राम लक्ष्मणाला म्हणाला, "हे सौम्या, नानाप्रकारच्या वृक्षलतांनीं युक्त आणि विपुल फलमूलांनीं संपन्न अशा ह्या मनोहर रम्य पर्वतावर उपजीविकेचें साधन चांगलेंच आहे, असें मला वाटतें. बा लक्ष्मणा, ह्या पर्वतावर महात्मे मुनी वास्तव्य करीत आहेत, तेव्हां आपणांलाहि हें निवासस्थान बरें आहे. आपण येथेंच वास्तव्य करूं."

ह्याप्रमाणें बोलणें चाललें आहे तोंच वाल्मीकि[1] मुनींच्या आश्रमासमीप येऊन सीता, राम आणि लक्ष्मण ह्या सर्वांनीं वाल्मीकि मुनींना अभिवंदन केलें. तेव्हां त्या धर्मवेत्त्या महर्षींनीं आनंदित होऊन त्यांचें पूजन केलें, आणि स्वागतप्रश्न झाल्यावर 'बसा' म्हणून त्यांना सांगितलें. तदनंतर आपण कोण हें योग्य प्रकारें त्या मुनींना निवेदन करून महापराक्रमी समर्थ राम लक्ष्मणाला म्हणाला, "लक्ष्मणा, बळकट आणि उत्कृष्ट अशीं काष्ठें घेऊन ये, आणि राहण्याला एक जागा तयार कर. ह्या ठिकाणीं वास्तव्य करण्याचें माझ्या मनाला रुचत आहे."

१ हे वाल्मीकि मुनि रामायण ग्रथित करणाऱ्या प्राचेतस् वाल्मीकि मुनींहून भिन्न होते, असें रामायणाचे टीकाकार म्हणतात, व हें त्यांचें म्हणणें कांहीं अंशीं संभवत आहे. (भा० क०).

पर्णकुटिका बांधणें.

रामाचें हें भाषण श्रवण केल्यावर शत्रुदमन लक्ष्मणानें नानाप्रकारचे वृक्ष आणून पर्णकुटिका तयार केली. तेव्हां चांगल्या रीतीनें उभारलेली आणि पाऊस आंत न येण्याकरितां गवती छपऱ्या घातलेली ता मनोहर पर्णकुटिका अवलोकन करून एकचित्तानें आपली सेवा करण्यास तत्पर असलेल्या लक्ष्मणाला राम म्हणाला, “ लक्ष्मणा, मृगमांस आणून आपण ह्या पर्णशालेची वास्तुशांति करूं. कारण चिरंजीवी होऊं इच्छिणाऱ्या पुरुषांनीं वास्तुशांति अवश्य केली पाहिजे. ह्यास्तव हे सुलोचना, तूं सत्वर मृग मारून घेऊन ये. हा विधि शास्त्रविहित आहे. धर्मशास्त्राचें स्मरण कर. ”

वास्तुशांति.

हें भ्रात्याचें भाषण ऐकून शत्रुपक्षीयवीरनाशक लक्ष्मणानें रामानें सांगितल्याप्रमाणें केलें. तेव्हां राम त्याला म्हणाला, “त्वरा कर आणि हें मृगमांस शिजीव. आपण आतांच वास्तुशांति करूं. हा सौम्य मुहूर्त आहे, आणि हा दिवस ध्रुवसंज्ञक आहे.”

नंतर प्रतापी सुमित्रापुत्र लक्ष्मणानें यज्ञाला योग्य असा कृष्णमृग मारून आणून प्रज्वलित झालेल्या अग्नीमध्यें तो टाकिला. तो पक्क झाला आहे, आणि अत्यंत तप्त होऊन त्याच्यांतील रक्तस्त्रावहि बंद झाला आहे, असें आढळून आल्यावर लक्ष्मण पुरुषश्रेष्ठ रामाला म्हणाला, ‘ हे देवतुल्य रामा, संपूर्ण अवयवांनीं युक्त असा हा सर्व कृष्णमृग मीं भाजून काढिला आहे. आतां आपण देवतांना उद्देशून याग करा. त्या कामामध्यें आपण कुशल आहां.’

इतकें झाल्यावर, जपजाप्याविषयीं अभिज्ञ, गुणवान आणि जितेंद्रिय अशा रामानें स्नान करून व यागसमाप्तिविषयक सर्व मंत्र घेऊन थोडक्यांत वास्तुशांति केली. सर्व देवगणांना उद्देशून यजन केल्यावर शुचिर्भूत रामानें त्या वास्तूमध्यें प्रवेश केला असतां अत्यंत तेजस्वी रामाच्या मनाला आल्हाद झाला. तदनंतर वास्तुदोषशमनार्थ मंगलकारक सूक्तें वगैरे ब्राह्मणांना म्हणावयाला सांगून रामानें नदीमध्यें यथाविधि स्नान केलें, आणि यथायोग्य रीतीनें जप करून विश्वेदेव, रुद्र आणि विष्णु ह्या देवतांना उद्देशून बलि दिल्यानंतर पापशमनार्थ असा दुसराहि उत्कृष्ट बलि रामानें दिला. नंतर आश्रमाला अनुरूप अशीं जीं देवालयें, पार आणि बलि नेऊन ठेवण्याच्या जागा होत्या, तेथें रामानें बली नेऊन ठेविले. पुढें देवगण ज्याप्रमाणें सुधर्मासंज्ञक सभेमध्यें प्रवेश करितात,

त्याप्रमाणें वृक्षपर्णांचें आच्छादन घातलेल्या आणि जागेच्या अदमासाप्रमाणें उत्कृष्ट रीतीनें उभारून वाऱ्याचा बंदोबस्त केलेल्या त्या मनोहर पर्णकुटिकेमध्यें त्या सर्वांनीं एकदम प्रवेश केला. ह्याप्रमाणें अत्यंत मनोहर चित्रकूट पर्वत, आणि उत्कृष्ट जलानें युक्त व पशुपक्ष्यांनीं सेवित अशी ती माल्यवती नदी प्राप्त झाल्यामुळें रामाला हर्ष झाला, आणि नगरापासून बाहेर जाण्यासंबंधाचें दुःख त्याला वाटेनासें झालें.

सर्ग सत्तावन्नावा.

सुमंत्राचें अयोध्येप्रत परावर्तन.

राम गंगेच्या दक्षिणतीराला गेल्यानंतर दुःखाकुल झालेला गुह बराच वेळपर्यंत सुमंत्र साराथ्याशीं गोष्टी सांगून आपल्या घरीं गेला. तदनंतर राम प्रयाग तीर्थावर भरद्वाज मुनींकडे गेला असतां तेथें त्यांनीं त्याचा सत्कार केला. पुढें तो चित्रकूट पर्वताला जाऊन पोहोंचला, अशी गुहाच्या हेरांकडून बातमी लागल्यावर, त्याची अनुज्ञा घेऊन सुमंत्र सारथ्यानें उत्कृष्ठ घोडे रथाला जोडिले. नंतर सावधपणानें वागणारा तो सुमंत्र सारथी अत्यंत खिन्न होऊन सुगंधि वनें, नद्या, सरोवरें, गांव आणि नगरें अवलोकन करीत करीत अयोध्या नगरीकडे चालता झाला. दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं तो अयोध्येपाशीं आला असतां ती आनंदरहित आहे, असें त्याला दिसलें. तेव्हां जिच्यामध्यें कसलीहि गडबड नाहीं, अशी ती जणुं शून्य झालेली अयोध्या नगरी अवलोकन करून आधींच अत्यंत खिन्न झालेला तो सुमंत्र शोकावेगानें अगदीं घेरून गेला. आणि 'रामविषयक संतापदुःखानें युक्त अशा शोकाग्नीनें गज, अश्व, प्रजा व राजा ह्यांसहवर्तमान ही नगरी दग्ध तर झाली नाहीं ना?' असें त्याच्या मनांत येऊं लागलें. ह्याप्रमाणें चिंताक्रांत झालेला तो सारथी शीघ्र गमन करणाऱ्या अश्वांच्या योगानें नगराच्या द्वाराशीं येऊन सत्वर आंत प्रविष्ठ झाला. तेव्हां हजारों लोक 'राम कोठें आहे' असें विचारीत विचारीत त्याच्याकडे धांवत आले. तेव्हां सुमंत्र त्यांना म्हणाला, 'गंगेच्या तीरीं गेल्यावर महात्म्या धर्मनिष्ठ रामानें मला परत जाण्याची अनुज्ञा दिली, आणि तेथें त्याला विचारून मी आलों.'

नगरवासी स्त्री-पुरुषांचा विलाप.

ह्याप्रमाणें त्यानें सांगितलें असतां ते त्रिवर्ग गंगा तरून गेले असें समजतांक्षणीं लोकांचीं मुखें अश्रुप्रवाहानें भरून गेलीं, आणि 'धिक्कार! धिक्कार!' म्हणून सुस्कारे टाकीत टाकीत 'हे रामा! हे रामा!' असा ते आक्रोश करूं लागले. टोळ्याटोळ्यांनीं मार्गामध्यें उभे राहिलेल्या त्या लोकांचें आणखीहि बोलणें त्या सुमंत्रानें ऐकिलें. ते म्हणूं लागले, 'फुटलें आमचें नशीब! राम आमच्या दृष्टीस पडत नाहीं; आणि दान, यज्ञ व विवाह हीं कृत्यें सुरू झालीं असतां मोठमोठ्या समाजांमध्यें आतां धर्मनिष्ठ राम मध्यंतरी पुनरपि आमच्या दृष्टीस पडणें नाहीं. ह्या लोकांना काय योग्य आहे, ह्यांना काय प्रिय आहे, कोणती गोष्ट ह्यांना सुखावह होणारी आहे, असा विचार करून रामानें ह्या नगराचें प्रित्याप्रमाणें परिपालन केलें होतें.'

तदनंतर तो सुमंत्र सारथि बाजारांतून जाऊं लागला असतां रामाकरितांच शोकाकुल झालेल्या स्त्रिया खिडक्यांतून उभ्या राहून विलाप करीत होत्या, तें त्याच्या कानावर आलें. राजमार्गांतून जातांना त्या सुमंत्र सारथ्यानें तोंडावर बुरखा घेतला होता. मध्यंतरीं कोठेंहि न थांबता, दशरथ राजा ज्या घरांत होता, तेथेंच तो सुमंत्र गेला. जवळ आल्यानंतर रथांतून सत्वर खालीं उतरून तो राजवाड्यांत शिरला, आणि मोठमोठ्या लोकांनीं भरलेले सात चौक ओलांडून तो पुढें गेला. रामाचें दर्शन न झाल्यामुळें कृश झालेल्या नगरवासी स्त्रिया वाडे, प्रासाद आणि सात मजली हवेल्या ह्यांतून सुमंत्र रामाशिवाय आल्याचें पाहून हाहाकार करूं लागल्या. दीर्घ, निर्मल व अश्रुप्रवाहानें परिप्लुत अशा नेत्रांनीं त्या अतिशय दुःखित झालेल्या स्त्रिया एकमेकींकडे भांबावून पाहूं लागल्या. असो. तदनंतर रामाच्या शोकानें तप्त झालेल्या दशरथस्त्रियांचें हळूहळू बोलणें प्रासादावरून सुमंत्राच्या कानीं येऊं लागलें. "रामाबरोबर नगरांतून बाहेर गेलेला हा सारथि रामावांचून येथें आला आहे. तेव्हां आतां हा आक्रोश करीत बसलेल्या कौसल्येला काय बरें सांगेल! राज्यलक्ष्मीचा त्याग करून पुत्र अरण्यांत निघून गेला असतांहि ज्या अर्थी कौसल्या जिवंत आहे, त्या अर्थी जीवन जसें दुःखदायक आहे, तसें निश्चयानें तें सुखकारक नाहीं, असें वाटतें."

हें राजस्त्रियांचें सत्य भाषण श्रवण करीत करीत शोकानें जसा कांहीं प्रदीप्त झालेला तो सुमंत्र सारथि घरांत गेला. आठव्या चौकांत गेल्यावर एका श्वेतवर्ण दिवाणखान्यामध्यें पुत्रशोकानें खिन्न, दीन व दुःखाकुल होऊन बसलेल्या

राजाला त्यानें अवलोकन केलें. तेव्हां तेथें बसलेल्या राजाकडे जाऊन व त्याला अभिवंदन करून सुमंत्रानें रामाचें भाषण त्याच्या सांगण्याप्रमाणें त्याला कळविलें. तेव्हां स्वस्थ बसून तें ऐकून घेऊन, मनामध्यें क्षुब्ध झालेला दशरथ राजा रामाच्या शोकानें व्याप्त झाल्यामुळें भूमीवर मूर्च्छा येऊन पडला. भूपति मूर्च्छित झाला असतां अंत:पुरांतील सर्व स्त्रिया दु:खित झाल्या, आणि राजा भूमीवर पडतांक्षणीं हात वर करून आक्रोश करूं लागल्या. सुमित्रेसहवर्तमान कौसल्या भूमीवर पडलेल्या आपल्या पतीला उठवून म्हणाली, "हे महाभाग्यवान भूपते, दुर्घट कर्म करणाऱ्या रामाचा हा दूत वनवासांतून येथें आला आहे, त्याच्याशीं आपण भाषण कां करीत नाहीं? हे रघुवंशज, आज हा अनर्थ केल्यामुळें आपणांला त्याच्याशीं बोलण्याची लाज का वाटत आहे? उठा, आपलें कल्याण असो. आपणच जर शोक करूं लागलां, तर आपणांला धीर कोण देणार? हे भूपते, जिच्या भीतीमुळें रामाचा वृत्तांत आपण सारथ्याला विचारीत नाहीं, ती कैकेयी येथें नाहीं. आपण निर्भयपणें त्याच्याशीं बोला.'

ह्याप्रमाणें महाराज दशरथाला सांगून, शोकाकुल झालेली व अश्रूंनीं कंठ दाटून आल्यामुळें अडखळत अडखळत भाषण करणारी ती कौसल्या एकदम भूमीवर पडली. तेव्हां विलाप करितां करितां भूमीवर पडलेल्या पतीला व कौसल्येला अवलोकन करून त्या सर्व स्त्रिया सभोंवतीं रडूं लागल्या. तदनंतर अंत:पुरांतून निघालेला तो ध्वनि कानावर येतांक्षणीं वृद्ध व तरुण असे सर्व पुरुष व सर्व स्त्रिया रडूं लागल्या, आणि पुनरपि तें नगर सर्व बाजूंनीं क्षुब्ध झालें.

सर्ग अठ्ठावन्नावा.

श्रीरामाचा निरोप.

तदनंतर मूर्च्छा जाऊन सावध झालेल्या त्या दशरथ राजानें कैकेयी येथें नाहीं अशी खात्री करून घेतल्यावर, रामवृत्तांत विचारण्याकरितां त्या सारथ्याला हांक मारिली. तेव्हां तो सारथि हात जोडून महाराज दशरथापाशीं आला. तो राजा दु:खशोकांनीं युक्त होऊन रामाकरितांच विलाप करीत होता. नवीन धरून आणिलेल्या गजाप्रमाणें तो अत्यंत संतप्त झालेला वृद्ध राजा सुस्कारे टाकीत होता, आणि आपल्या कळपांतून चुकलेल्या हत्तीप्रमाणें चिंताक्रांत होऊन बसला होता. असो.

ह्याप्रमाणें असलेला तो दशरथ राजा, मार्गावरील धुळीनें ज्याचें शरीर भरलेलें आहे, आणि ज्याचें मुख अश्रूंनीं व्याप्त झालें आहे अशा त्या समीप आलेल्या दीन सारथ्याला अत्यंत दुःखानें विचारूं लागला, "हे सारथे, वृक्षमूलांचा आश्रय करून तो महात्मा राम आतां कोठें बरें वास्तव्य करील? आणि आजपर्यंत अतिशय सुखामध्यें असलेला तो राम आतां काय बरें खाईल! सुमंत्रा, ज्याला दुःखाचा कधींहि अनुभव नाहीं. उत्कृष्ट शय्येवर शयन करण्याची ज्याला संवय आहे, तो दुःख प्राप्त झालेला राजकुमार अनाथाप्रमाणें कसा रे भूमीवर पडत असेल! जो बाहेर निघाला असतां पायदळ, रथ व हत्ती बरोबर जातात, तो राम निर्जन वनामध्यें आश्रय करून कसा बरें राहील! अजगर व श्वापदें ज्यामध्यें संचार करीत असतात, आणि कृष्णसर्प ज्यांत वास्तव्य करीत असतात, त्या वनाचा आश्रय सीतेसहवर्तमान त्या राजकुमारांनीं कसा बरें केला असेल! सुमंत्रा, बिचाऱ्या सुकुमार सीतेसहवर्तमान रथांतून उतरून ते राजकुमार कसे बरें पायांनीं अरण्यांत गेले! सूता, खरोखर तूं धन्य आहेस. कारण मंदर पर्वतावर जाणाऱ्या अश्विनीकुमारांप्रमाणें वनामध्यें माझे पुत्र प्रवेश करीत असतांना तूं पाहिलें आहेस. सुमंत्रा, वनांत गेल्यावर रामानें काय सांगितलें, लक्ष्मण काय म्हणाला आणि सीता काय म्हणाली, हें तूं मला सांग. सूता रामाचें बसणें, निजणें व भोजन करणें हें सर्व तूं मला सांग. म्हणजे स्वर्गांतून साधूंमध्यें पडलेल्या ययाति राजाप्रमाणें तुझ्यासारख्या सज्जनांमध्यें पुत्ररूप स्वर्गसुखापासून भ्रष्ट झालेला मी ह्या पुत्राचा वृत्तांत ऐकून जिवंत राहीन."

ह्याप्रमाणें रामाचा वृत्तांत सांगण्याविषयीं राजानें आज्ञा केल्यावर तो सुमंत्र सारथि अश्रूंनीं कंठ दाटून आल्यामुळें अडखळत अडखळत राजाला म्हणाला, "हे महाराजा धर्माचेंच परिपालन करणारा राम हात जोडून आणि मस्तकानें प्रणाम करून मला म्हणाला, 'हे सूता, माझ्या सांगण्यावरून तूं त्या आत्मवेत्त्या, महात्म्या व वंद्य अशा पित्याच्या पायांना माझ्या वतीनें मस्तकानें वंदन कर. आणि माझ्या सांगण्यावरून आरोग्यप्रश्नपूर्वक अंतःपुरांतील सर्व स्त्रियांना तूं भेद न करितां योग्यतेप्रमाणें माझा नमस्कार सांग. माझ्या कौसल्या मातेला कुशलप्रश्नपूर्वक प्रणाम सांग, आणि 'सावधपणानें वागत जा' असें सांगून तिला असाहि माझा निरोप सांग कीं, 'हे देवि, नेहमीं धर्माविषयीं तत्पर राहून वेळेवर होमशाळेमध्यें असत जा, आणि राजाच्या पायांचें देवांप्रमाणें परिपालन करीत जा. श्रेष्ठपणासंबंधानें अहंकार व मान सोडून देऊन

इतर मातांशीं वागत जा. जिच्या मर्जीनें राजा वागत आहे त्या कैकेयीशीं विरोध धरूं नको. राजकुमार भरताशींहि तूं राजाप्रमाणेंच आदरानें वागत जा. कारण राजे वयानें जरी लहान असले तरी ते पूज्यच आहेत. पाहिजे असल्यास तूं राजधर्माचें स्मरण करून पहा.' सूता, भरतालाहि 'मी खुशाल आहें' असें सांग, आणि 'सर्वांहि मातांचे ठिकाणीं तूं आपलें वर्तन यथान्याय ठेवीत जा' असाहि माझा त्याला निरोप कळीव. त्या इक्ष्वाकुकुलनंदन महापराक्रमी भरताला आणखी असेंहि सांग कीं, 'तूं यौवराज्याचा स्वीकार करून मुख्य राज्यावर बसलेल्या पित्याचें परिपालन कर. राजाचें वय होऊन गेलें असल्यामुळें त्याला तूं राज्यापासून पदच्युत करूं नको. त्याच्याच आज्ञेनें व्यवहार चालवून तूं यौवराज्यावरच संतोषानें रहा.' डोळ्यांमध्यें वारंवार अश्रू आणून, 'माझ्या पुत्रवत्सल मातेचा तूं आपल्या मातेप्रमाणेंच समाचार घेत जा' असेंहि आणखी भरताला कळविण्याविषयां त्यानें मला सांगितलें आहे."

सुमंत्र पुढें सांगतो:-"राजश्रेष्ठा, ह्याप्रमाणें तो महापराक्रमी, महायशस्वी व कमलनयन राम माझ्याशीं निरोप सांगत असतांना त्यानें वारंवार डोळ्यांतून पाणी काढिलें. लक्ष्मण तर अत्यंत क्रुद्ध होऊन सुस्कारे टाकीत टाकीतच मला म्हणाला, 'कोणत्या अपराधामुळें राजपुत्र रामाला वनांत हांकून दिलें आहे? खरोखर उतावीळपणानें कैकेयीला वचन देऊन राजानें ही गोष्ट बरी केलेली असो अथवा वाईट केलेली असो, पण त्यामुळें आम्हांला अतिशय संताप झालेला आहे. रामाला वनांत हांकून दिलें, हें लोभामुळें झालेलें असो अथवा कैकेयीला वरदान दिल्यामुळें झालेलें असो, राजानें ही गोष्ट सर्वस्वी वाईट केली, हें खचीत आहे. आतां ईश्वराची प्रेरणा झाल्यामुळें त्याच्या इच्छेचें उल्लंघन न करितां राजानें ती गोष्ट केली, असें म्हणावें तर रामाचा त्याग करण्याविषयीं ही सबब मला मुळींच योग्य वाटत नाहीं. ईश्वराच्या प्रेरणेनें झालेलें असो किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें हें घडून आलेलें असो, क्षुद्रबुद्धि धरून रामाला वनवासांत पाठविण्याचें जें हें धर्मशास्त्रविरुद्ध कर्म झालें आहे, तें इहलोकीं व परलोकीं दुःखदायकच होईल. इतरांचें मत कांहींहि असो, पण महाराज दशरथाचें ठिकाणीं बापाचें नातें राहिलें आहे, असें आतां मला दिसत नाहीं. माझा भ्राता, अधिपति, बांधव व पिता रामच आहे. सर्व लोकांच्या हिताविषयीं तत्पर आणि म्हणूनच सर्व लोकांना प्रिय अशा रामाचा जर त्याग केला आहे, तर या कृत्यानें सर्व लोकांची राजाचे ठिकाणीं भक्ति

राहील कशी? सारांश, सर्व प्रजेला प्रिय आणि धर्मानें वागणाऱ्या रामाला हांकून देऊन सर्व प्रजाजनांशीं विरोध संपादन करणाऱ्याला 'राजा' कसें म्हणतां येईल?"

सुमंत्र आणखी म्हणाला:–"महाराज, बिचारी जनककन्या तर भुतानें झपाटल्याप्रमाणें निरोप वगैरे सांगण्याचें सर्व कांहीं विसरून जाऊन दुःखाचे सुस्कारे टाकीत टाकीत उभी राहिली होती. पूर्वी कधींच अशा संकटाचा अनुभव नसल्यामुळें त्या दुःखानें रडत असलेली ती यशस्विनी राजकन्या मला कांहींच बोलली नाहीं. तिचें मुख निस्तेज झालेलें होतें. मी निघालों असें पाहून ती राजकन्या भर्त्याकडे दृष्टि देऊन एकाएकीं अश्रू मात्र ढाळू लागली. मी निघालों, तेव्हां लक्ष्मणानें रामाचा हात धरिला होता. रामाच्या मुखावर अश्रूंचे ओघळ आलेले होते. नंतर हात जोडून उभा असलेल्या त्या रामानें मीं आपणांला कळविल्याप्रमाणेंच मला निरोप सांगितला; परंतु बिचारी सीता कांहींएक न बोलतां रडत रडत त्या राजरथाकडे व त्याचप्रमाणें माझ्याकडे पहात होती."

सर्ग एकुणसाठावा.

देशस्थितिकथन.

सुमंत्र सांगतो:–"महाराज, राम वनामध्यें चालता झाल्यावर मी परत फिरलों असतां, दुःखाश्रू ढाळूं लागलेले अश्व मार्गावरून रथ ओढून नेण्यास उत्सुक होईनात. तथापि उभयतां राजपुत्रांना मीं हात जोडिले, आणि त्यांच्या वियोगामुळें दुःखित झालेला मी रथांत बसून निघालों; परंतु 'राम मला फिरून कदाचित् बोलावणें पाठवील' ह्या आशेनें मी निषादाधिपति गुहाबरोबर बरेच दिवस तेथेंच राहिलों होतों. असो. महाराज, आपल्या देशामध्यें वृक्ष सुद्धां अतिशय दुःखानें व्याप्त झाले असून पुष्प, अंकुर व कळ्या ह्यांसह अगदीं कोमेजून गेलेले आहेत. नद्या, तळीं व सरोवरें ह्यांतील उदक शुष्क होऊन गेलेलें आहे, आणि वनांतील व उपवनांतील वृक्षांचीं पानेंहि वाळून चाललीं आहेत. श्वापदें भक्ष्य धुंडून काढण्याकरितां बाहेर पडत नाहींत, व अजगरहि पसरत नाहींत. सारांश, रामासंबंधी शोकानें आंतील प्राणी व्याप्त

झाले असल्यामुळें मार्गांतील त्या अरण्यांत अगदीं शुकशुकाट झालेला आहे. नद्यांतील उदक कलुषित झालें असून आंत असलेल्या कमलवेलींचीं पानें आवळून मेलेलीं आहेत. त्याचप्रमाणें सरोवरांतील मासे व जलांत राहणारे पक्षी आंत लीन झाले असून त्यांतील कमलेंहि शुष्क झालीं आहेत. जलामध्यें आणि स्थलामध्यें होणारीं पुष्पें व फलें पूर्वीप्रमाणें चांगलीं दिसतहि नाहींत, व त्यांचा गंधहि अगदीं कमी झाला आहे. हे पुरुषश्रेष्ठा, पक्षी आपापल्या घरट्यांतूनच बसले असल्यामुळें येथील बागा अगदीं शून्य दिसत आहेत, आणि उपवनेंहि मला मनोहर दिसतनाशीं झालीं आहेत. मी अयोध्येमध्यें शिरलों असतां कोणालाहि चांगलें वाटत नाहीं. राम दृष्टीस पडत नसल्यामुळें लोक वारंवार सुस्कारे टाकीत आहेत. रामावांचून येथें आलेला राजरथ दुरून दृष्टीस पडतांक्षणींच राजमार्गामध्यें असलेल्या सर्व लोकांच्या मुखांवरून अश्रूंचे ओघळ येऊं लागले. रथ आलेला पाहून राम दृष्टीस न पडल्यामुळें कृश झालेल्या स्त्रिया वाडे, सात मजली हवेल्या, आणि प्रासाद ह्यांतून हाहाकार करीत आहेत; आणि अत्यंत दुःखित झालेल्या त्या स्त्रियांचे दीर्घ व निर्मल असे नेत्र अश्रूंच्या प्रवाहानें भरून गेले असल्यामुळें त्यांना एकमेकींकडे नीट पहातांहि येईनासें झालें आहे. लोक सर्वच आर्त होऊन गेल्यामुळें मित्र, शत्रू आणि उदासीन असा भेदच मला कोठें राहिलेला दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. अयोध्या नगरींतील सर्व लोक हर्षरहित झाले आहेत. गज व अश्वहि दीन होऊन गेलेले आहेत. जिकडे तिकडे विलाप, ग्लानि, दुःखाचे सुस्कारे आणि आक्रोश दृष्टोत्पत्तीस येत आहेत. महाराज, नगरीमध्यें कोठेंहि आनंद नाहीं, व आंतील सर्व लोक राम वनवासांत गेल्यामुळें दुःखित झाले आहेत. ह्यामुळें पुत्रहीन झालेल्या कौसल्येसारखी अयोध्येची स्थिति झालेली मला दिसत आहे."

सारथ्याचें हें भाषण श्रवण करून अश्रूंनीं कंठ दाटून आल्यामुळें अडखळत अडखळत अतिशयच निराशेच्या शब्दांनीं दशरथ त्याला म्हणाला, "दुष्ट कुलामध्यें व दुष्ट देशामध्यें उत्पन्न झालेल्या ह्या दुष्टबुद्धि कैकेयीनें रामाला वनवासांत पाठविण्याविषयीं मला सांगितलें असतां, सल्लामसलतीमध्यें निपुण असलेल्या वृद्धांबरोबर मीं त्याचा विचार केला नाहीं. सुहृद, अमात्य आणि नगरवासी लोक ह्यांपैकीं कोणाचाहि विचार न घेतां स्त्रीकरितां मोहामुळें मीं ही गोष्ट एकदम अविचारानें केलेली आहे. सूता, भवितव्यतेमुळें दुर्दैवानें खरोखर

ह्या कुलाच्या नाशाकरितां हा मोठा अनर्थ येऊन गुदरला आहे. बा सुमंत्रा, तुझें जर माझ्या हातून कांहीं चांगलें झालें असेल, तर तूं रामाला माझ्याकडे घेऊन ये. माझे प्राण निघून जाण्याविषयीं मला अगदीं त्वरा करीत आहेत. अद्यापपर्यंत जर माझी आज्ञा चालत असेल, तर तूं रामाला परत आण. रामावांचून मी आतां एक क्षणभरहि जिवंत रहाण्यास समर्थ होणार नाहीं. अथवा महापराक्रमी राम अजून जर दूर गेला नसेल, तर मला रथामध्यें घाल आणि सत्वर रामाकडे घेऊन जा. बा सुमंत्रा, तो महाधनुर्धारी राम कोठें रे गेला! तिकडे जाऊन सीतेसहवर्तमान त्याला अवलोकन करीपर्यंत मी जिवंत राहिलों तर भाग्यच म्हणावयाचें! अरे, ही मरणाची अवस्था प्राप्त झाली असतांनाहि इक्ष्वाकुनंदन राम येथें माझ्या दृष्टीस पडत नाहीं. तेव्हां ह्यापेक्षां आतां अधिक दुःखदायक तें काय आहे! हे रामा, हे लक्ष्मणा, हे तपस्विना सीते, मी दुःखानें अनाथासारखा मरत आहें, हें तुम्हांला समजत नाहीं काय?"

शोकसागरवर्णन.

ह्याप्रमाणें त्या दुःखामुळें यत्किंचितूहि भान न राहिलेला तो दशरथ राजा अत्यंत दुस्तर अशा शोकसागरांत बुडून जाऊन कौसल्येला म्हणाला, "रामासंबंधीं शोक हाच ज्याचा प्रचंड वेग आहे, सीतेचा विरह हेंच ज्याचें तीर आहे, दुःखाचे सुस्कारे हेच ज्यांतील लाटांनीं भरलेले मोठमोठे भोंवरे आहेत, बाष्पप्रवाहरूप नदीजलानें जो कलुषित झालेला आहे, शोकभरांत होणारे हस्तविक्षेप हेच ज्यांतील मत्स्य आहेत, आक्रोश हीच ज्याची मोठी गर्जना आहे, अस्ताव्यस्त झालेले केश हेंच ज्यांतील शेवाळ आहे, कैकेयी हाच ज्यांतील वडवानल आहे, माझ्या अश्रुप्रवाहांचा जो उत्पादक आहे, कुबड्या मंथरेचीं भाषणें हेच ज्यांतील मोठमोठे मगर आहेत, दुष्ट कैकेयीला दिलेला वर हीच ज्याची मर्यादा आहे आणि रामाला वनवासांत हांकून देणें हेंच कालकूट विष ज्यापासून निघालें आहे, अशा ह्या शोकसागरांत मी निमग्न झालों आहें. हे देवि कौसल्ये, रामावांचून हा शोकसागर मला जिवंतपणें तरून जातां येणें अशक्य आहे. लक्ष्मणासहवर्तमान रामाला अवलोकन करण्याची उत्कंठा असतांनाहि तो आज माझ्या दृष्टीस पडत नाहीं, हें एक माझें मोठें पातकच आज उभें राहिलें आहे."

अशा प्रकारें विलाप करीत करीत तो महाकीर्तिमान दशरथ राजा मूर्च्छित होऊन एकाएकीं शय्येवर पडला! दशरथाचें तें शोकपरिपूर्ण भाषण

ऐकून व तो मूर्च्छित पडलेला पाहून, ह्या पुत्रवियोगदुःखांत आणखी पतिवियोगदुःखाची भर पडते कीं काय असें मनांत आल्याकारणानें राममाता कौसल्येला दुप्पट भय वाटूं लागलें.

सर्ग साठावा.

श्रीरामादिकांचें वनांतील वर्तन.

तदनंतर गतप्राण झाल्यासारखी होऊन भूमीवर मूर्च्छित पडलेली ती कौसल्या सावध झाल्यावर पिशाचानें झपाटल्याप्रमाणें कांपत कांपत त्या सारथ्याला म्हणाली, " जिकडे राम, सीता व लक्ष्मण असतील, तिकडे मला ने. त्यांच्यावांचून एक क्षणभर देखील आज जिवंत रहाण्याला मी तयार नाहीं. रथ लवकर परत फिरीव आणि मलाहि सत्वर दंडकारण्यांत घेऊन जा. माझें जर त्यांच्याकडे जाणें होत नसेल, तर मी यमसदनाचीच वाट धरणार. "

ह्यावर तो सारथि सुमंत्र हात जोडून बाष्पप्रवाहानें कंठ दाटून आल्यामुळें अडखळत अडखळत राजपत्नी कौसल्येला धीर देण्याकरितां म्हणाला, " शोक, मोह व दुःखजन्य भ्रम तूं सोडून दे. राम दुःखाचा त्याग करून वनामध्यें रहात आहे. धर्मवेत्ता व जितेंद्रिय लक्ष्मणहि वनामध्यें रामाच्या पायांची सेवा करून परलोकसंपादन करीत आहे. निजन वनामध्येंहि होणारें वास्तव्य घराप्रमाणें समजून व रामाचेच ठिकाणीं मन ठेऊन सीता भीति न बाळगितां विश्वासानें रहात आहे. तिचें ठिकाणीं अत्यंत सूक्ष्म देखील दैन्य दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु प्रवासाची जशी काय तिला नेहमीं संवयच आहे, अशा प्रकारें मला सीता भासत आहे. नगरांतील उपवनामध्यें गेल्यावर जसें सीतेचें मन पूर्वीं रमत असे, तसेंच निर्जन वनामध्येंहि तिचें मन रमत आहे. पूर्ण चंद्राप्रमाणें आल्हादकारक मुखानें युक्त, मनोहर आणि रामाविषयीं उदार मन असलेली बाला सीता निर्जन वनामध्यें असूनहि आनंदांत रहात आहे. त्या सीतेचें मन रामाचेच ठिकाणीं खिळून गेलें असून तिचें जीवितहि रामावरच अवलंबून आहे. ह्यामुळें रामावांचून असलेली ही अयोध्या नगरी तिला वनासारखीच वाटत आहे. रामाचा समागम असल्यामुळें तें वनच तिला अयोध्येप्रमाणें भासत आहे. गांव, नगरें, नद्यांची गति आणि नानाप्रकारचे वृक्ष अवलोकन करून सीता रामाला अथवा लक्ष्मणाला त्यासंबंधाची

माहिती विचारीत असते, विचारून समजून घेत असते आणि अयोध्येपासून एका कोसावरच फिरावयाला गेली आहे कीं काय अशा उत्साहानें ती वनामध्यें असते. हे ग्राम, नगर, वृक्ष वगैरेंबद्दल विचारण्यासंबंधानें तिनें केलेलें भाषण येवढेंच काय तें मला स्मरत आहे. कैकेयीसंबंधानें ती काय बोलली, हें मला आठवत नाहीं."

ह्याप्रमाणें सारथि कौसल्येला सांगत असतांना अवधान न राहिल्यामुळें कैकेयीसंबंधाचें सीतेनें बोलणें एकाएकीं त्याच्या तोंडांत आलें होतें; परंतु ते तोंडापुढें आलेले शब्द एकाएकीं तितकेच थांबवून, कौसल्यादेवीस आल्हाद-कारक असें मधुर भाषण तो तिच्याशीं करूं लागला.

सुमंत्र म्हणाला:—" मार्ग चालून जाण्यानें, वाऱ्याचे तडाके बसल्यानें, धांदल उडाल्यानें अथवा उन्हानेंहि चंद्रकिरणांप्रमाणें असलेली सीतेची कांति कमी होत नाहीं. त्या उदार सीतेचें तें पूर्णचंद्राप्रमाणें तेजस्वी असलेलें कमलतुल्य मुख म्लान होत नाहीं. अळत्याच्या रसाप्रमाणें लाल परंतु वास्तविक तो रस न लावलेलीं अशीं तिचीं पाऊलें अद्यापि कमलकोशाप्रमाणेंच सुकुमार आहेत. नूपुरांच्या योगानें हंसादिकांच्या लीलेला जिनें मागें टाकिलेलें आहे, अशी ती सीता वनांतून विलासपूर्वक जात आहे. पतिप्रेम वृद्धिंगत करणाऱ्या भूषणांची आवड असल्यामुळें तिनें अद्यापिहि आपल्या भूषणांचा त्याग केलेला नाहीं. वनाचा आश्रय करून राहिलेली सीता रामाच्या बाहूंचा आश्रय करून असली, म्हणजे गज, सिंह अथवा व्याघ्र दृष्टीस पडले तरी भीत नाहीं. तात्पर्य, त्यांच्याबद्दल, स्वतःबद्दल अथवा राजाबद्दल तुला शोक करण्याचें कारण नाहीं. हें रामचरित्र लोकांमध्यें अक्षय्य राहील. शोकाचा त्याग करून आनंदित अंतःकरणानें युक्त असलेले ते त्रिवर्ग, ते महर्षींनीं आचरिलेल्या मार्गाचें अगदीं उत्तम रीतीनें अवलंबन करून राहिलेले आहेत. वनामध्यें त्यांचें मन रमत आहे, आणि वनांतील फळें भक्षण करून पित्याची शुभ प्रतिज्ञा ते शेवटास नेत आहेत."

ह्याप्रमाणें अत्यंत योग्य भाषण करणारा तो सारथि जरी कौसल्येला ' शोक करूं नको ' म्हणून म्हणत होता, तरी पुत्रशोकानें कृश झालेली ती कौसल्या, ' हे प्रिया, हे पुत्रा, हे रामा, ' असें म्हणतांना थांबेना.

सर्ग एकसष्टावा.

कौसल्येचें दशरथाला दोष देणें.

चित्तविनोद करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ आणि धर्माचें ठिकाणीं रत असलेला राम वनांत गेला असतां दुःखाकुल झालेली कौसल्या रडत रडत भर्त्याला म्हणाली, " महाराज, रघुवंशज दशरथ हा दयाळु, दाता आणि प्रिय भाषण करणारा आहे, अशी त्रैलोक्यामध्यें आपली कीर्ति पसरली आहे. तेव्हां हे नृपश्रेष्ठा, सीतेसहवर्तमान त्या पुत्रांचा आपण त्याग कसा केला? सुखांत वाढलेल्या त्या पुत्रांना आज दुःख प्राप्त झालें आहे; परंतु त्यांना तें दुःख सहन कसें होईल! खरोखर कौमारावस्था संपून यौवनावस्थेला प्राप्त झालेली, सुखाची संवय असलेली आणि सुकुमार अशी ती सीता ऊन व थंडी कशी सहन करील! आजपर्यंत चमचमीत चटण्या व कोशिंबिरी वगैरेंनीं युक्त असें चांगलें भोजन करून ती विशालनयना सीता वनांतील देवभाताचें अन्न कसें बरें भक्षण करील! गीत आणि वाद्य ह्यांचा ध्वनि श्रवण करून नेहमीं मंगलयुक्त असलेल्या त्या सीतेला श्वापदें आणि सिंह ह्यांचा अमंगल शब्द कसा बरें ऐकवेल! इंद्राच्या ध्वजाप्रमाणें सर्व लोकांना आल्हाद देणारा महाबलाढ्य आजानुबाहु राम आपला अडसरासारखा हात उशाशीं घेऊन कोठें बरें पडत असेल! कमलपत्रासारखा वर्ण, कमलपत्राप्रमाणें सुगंधि निःश्वास, उत्कृष्ट केश आणि कमलपत्राप्रमाणें नेत्र ह्यांनीं युक्त असलेलें रामाचें उत्कृष्ट मुख कधीं बरें दृष्टीस पडेल! खरोखर माझें हृदय वज्रासारखें कठीण आहे, ह्यांत संशय नाहीं. कारण राम माझ्या दृष्टीस पडत नसतांनाहि ह्याचे हजारों तुकडे होऊन जात नाहींत! आपण विचार न करितां जें हें शोचनीय कृत्य केलें, त्यामुळें कैकेयीनें हांकून दिलेलीं माझीं माणसें सुखोपभोगालाच योग्य असतांनाहि दीन होऊन वनामध्यें धांवत आहेत. पंधराव्या वर्षीं राम जरी परत आला, तरी भरत हा राज्य आणि खजिना सोडून देईल, असा संभव दिसत नाहीं. कांहीं लोक खरोखर चांगल्या ब्राह्मणांना श्राद्धाचें आमंत्रण देऊन आपल्या बांधवांनाच श्राद्धाला बसवून भोजन घालितात; नंतर श्राद्धकृत्य आटोपल्यावर निमंत्रित श्रेष्ठ ब्राह्मणांना इष्ट पंक्तीला भोजनास बसविण्याचा विचार करितात; परंतु त्या निमंत्रित ब्राह्मणांमध्यें जे कोणी गुणी, विद्वान व देवतुल्य ब्राह्मण असतात, ते इष्ट पंक्तीला अमृताप्रमाणें स्वादिष्ट अन्न जरी असलें तरी मान्य करीत नाहींत. सारांश,

ब्राह्मणच जरी प्रथम भोजन करून गेलेले असतात, तरी बैलांना ज्याप्रमाणें शृंगच्छेद सहन होत नाहीं, त्याप्रमाणें श्रेष्ठ ब्राह्मणांना दुसरे भोजन करून गेल्यावर अवशिष्ट राहिलेलें अन्न स्वीकारण्याचा अवमान सहन होत नाहीं.' त्याचप्रमाणें हे प्रजाधिपते, कनिष्ठ भ्रात्यानें उपभोग घेतलेलें राज्य ज्येष्ठ आणि गुणांनींहि श्रेष्ठ असा भ्राता कसें बरें स्वीकारील? ज्याप्रमाणें दुसऱ्यानें आणिलेलें भक्ष्य खाण्याची व्याघ्र इच्छा करीत नाहीं, त्याचप्रमाणें श्रेष्ठ पुरुष दुसऱ्याचें उष्टें कधीं घेत नाहीं. हवि, आज्य, पुरोडाश, कुश आणि खदिर वृक्षाचे यूप हीं एकदां यज्ञामध्यें उपयोगांत आणिलीं असतां पुनरपि यज्ञांत त्यांचा उपयोग करीत नाहींत. त्याचप्रमाणें भरतानें उपभोग घेतलेलें हें राज्य सार काढून घेतलेल्या सुरेप्रमाणें अथवा यज्ञ होऊन अवशिष्ट राहिलेल्या सोमरूप हवीप्रमाणें निरुपयोगी झालें असल्यामुळें रामाला स्वीकार करितां येईल, असें दिसत नाहीं. बलाढ्य व्याघ्राला ज्याप्रमाणें पुच्छस्पर्श सहन होत नाहीं, त्याचप्रमाणें अशा प्रकारचा अवमान रामाला सहन होणार नाहीं. महासंग्रामामध्यें देवदैत्यांसहवर्तमान जरी लोक आले, तरी ते ह्याला भयभीत करण्यास समर्थ होणार नाहींत. (तेव्हां 'माझा निग्रह करून त्यानेंच ज्याअर्थी राज्याचा स्वीकार केला नाहीं, त्याअर्थी तो तसें करण्याला असमर्थ होता' अशी मात्र शंका आपण मनांत आणूं नका. कारण) जो धर्मात्मा अधर्मनिष्ठ लोकांचीहि प्रवृत्ति धर्माकडे करीत असतो, तो स्वतः पित्याच्या आज्ञेचा अवमान करणें असला अधर्म करण्यास कसा बरें प्रवृत्त होईल? युगांतसमयीं ईश्वर ज्याप्रमाणें भूतांचा संहार करितो, त्याप्रमाणें हा महावीर्यवान व महापराक्रमी राम आपल्या सुवर्णभूषित पिसांनीं युक्त असलेल्या बाणांच्या योगानें समुद्रांनाहि दग्ध करून टाकील. परंतु मासा ज्याप्रमाणें आपल्या पुत्रालाच भक्षण करून टाकितो, त्याप्रमाणें सिंहतुल्य पराक्रमी व वृषभनयन पुरुषश्रेष्ठ पुत्र स्वतः पित्यानेंच राज्यभ्रष्ट करून टाकिला. धर्मनिष्ठ पुत्राला ज्याअर्थी आपण हांकून दिलें आहे, त्याअर्थी द्विजांनीं आचरिलेला व पुरातन लोकांना वेदामध्यें आढळलेला धर्म आपणाला संमत नाहीं, असें दिसतें. हे भूपते, स्त्रीला एक पति, दुसरी पुत्र आणि तिसरी ज्ञाति अशा तीनच गति शास्त्रानें सांगितल्या आहेत; ह्यांशिवाय चौथी गति स्त्रीला सांगितली नाहीं. त्यांपैकीं आपण जी माझी पहिली गति, ती मला नाहींच. कारण आपण माझ्या सवतीच्या अधीन आहां. रामाला आपण

वनांत पाठविलें आहे, आणि मी सभर्तृक असल्यामुळें वनांत जाण्याची माझी इच्छा नाहीं. तेव्हां दुसरी गति मला नाहींच; आणि तिसरी गति जी माहेरचीं माणसें तीं मुळींच जवळ नाहींत. तस्मात् सर्व प्रकारें आपण माझा घात केला आहे. आपणांमुळें राज्यासहवर्तमान राष्ट्राचा, मंत्र्यांसहवर्तमान सर्व स्त्रियांचा, पुत्रांसहवर्तमान माझा आणि प्रजाजनांचा घात झाला असून आपला पुत्र भरत आणि भार्या कैकेयी ह्यांना मात्र आनंद झाला आहे."

घोर शब्दांनीं युक्त असलेलें हें भाषण श्रवण करून दुःखित झालेला दशरथ राजा 'हे रामा' असें म्हणून मूर्च्छित झाला. नंतर तो शोकाकुल झाला असतां आपल्या दुष्कृत्याचें त्याला पुनरपि स्मरण झालें.

सर्ग बासष्टावा.

राजाला दोष दिल्याबद्दल कौसल्येचा पश्चात्ताप.

ह्याप्रमाणें क्रुद्ध व शोकाकुल झालेली राममाता कठोर शब्दांनीं राजाला बोलली असतां तो दुःखित झालेला राजा चिंतन करूं लागला. चिंतन करितां करितां मोहानें त्याचें मन व्याकुल झालें, व बराच काल लोटल्यावर तो शत्रुतापन दशरथ शुद्धीवर आला. शुद्धीवर येतांक्षणीं दीर्घ आणि ऊष्ण असे सुस्कारे टाकूं लागलेला तो राजा बाजूला बसलेल्या कौसल्येला अवलोकन करून विचार करूं लागला. तेव्हां त्या शब्दवेधी राजानें अज्ञानामुळें जें एक पूर्वीं दुष्कर्म केलें होतें, त्याचें त्याला चिंतन करितां करितां स्मरण झालें असतां, तो शोक आणि रामासंबंधीं शोक अशा दोन शोकांनीं तो खिन्न झालेला प्रभु दशरथ महाराज व्याकुल होऊं लागला. शोकांनीं दग्ध होत असलेला तो दुःखाकुल राजा तोंड खालीं करून आणि हात जोडून कौसल्येला प्रसन्न करून घेण्याकरितां कांपत कांपत म्हणाला, "कौसल्ये, माझ्यावर कृपा कर. हे मीं हात जोडिले आहेत, आणि तूं शत्रूंशींहि नेहमीं प्रेमानें व चांगुलपणानें वागणारी आहेस. ह्यास्तव माझ्यावर कृपा कर. हे देवी, भर्ता गुणी अथवा निर्गुणी जरी असला, तरी धर्म जाणणाऱ्या स्त्रियांचें खरोखर तो प्रत्यक्ष दैवतच आहे. तूं नेहमीं धर्माविषयीं तत्पर असून जगतांतील बऱ्यावाईट गोष्टी पाहिलेल्या आहेस. तेव्हां तूं जरी दुःखित

झाली असलीस, तरी अत्यंत दुःखित झालेल्या भर्त्याला उद्देशून असें अप्रिय भाषण करणें तुला योग्य नाहीं. "

ह्याप्रमाणें दीन दशरथ राजाचें तें करुणा आणणारें भाषण श्रवण केल्यावर, गटारांतून ज्याप्रमाणें पावसाचें पाणी वाहूं लागतें, त्याप्रमाणें कौसल्येच्या नेत्रांतून अश्रू वाहूं लागले! त्या कौसल्येनें रडतां रडतां राजाला उद्देशून हस्तकमल जोडिले, आणि भयभीत होऊन घाईघाईनें ती अत्यंत आदरपूर्वक राजाला म्हणाली, " आपण कृपा करा. मी मस्तक नम्र करून आपली प्रार्थना करीत आहें. हा मीं आपणांला साष्टांग नमस्कार घातला. हे देव, माझी प्रार्थना करण्याचा आपणांला प्रसंग आला हा माझा घातच झाला आहे. कारण पतीनें स्त्रीला हात जोडणें योग्य नव्हे. तस्मात्, माझी आपण कधींहि क्षमा करितां उपयोगीं नाहीं. दोन्ही लोकांमध्यें श्लाघ्य असलेल्या विचारी भर्त्याकडून जी हात जोडून घेणारी असेल, ती खरोखर जगतामध्यें कुलीन स्त्री समजली जात नाहीं. हे धर्मज्ञ, मला पातिव्रत्यधर्म अवगत असून आपण सत्यवचनी आहां, हेंहि मी जाणीत आहें. तात्पर्य, पुत्रशोकानें व्याकुल झाल्यामुळें तें मी कांहीं तरी बोलून गेलें. शोक धैर्याचा नाश करितो, शोकामुळें विद्या व्यर्थ होते आणि शोकामुळें सर्वांची विधुळवाट लागते. सारांश, शोकासारखा शत्रु नाहीं. शत्रूच्या हातांनीं झालेला शस्त्रप्रहार सहन करणें शक्य आहे; परंतु अतिशय सूक्ष्महि शोक प्राप्त झाला असतां तो सहन होणें शक्य नाहीं. रामाच्या वनवासाला आज पांच रात्री होऊन गेल्या. शोकानें माझा हर्ष नाहींसा झाल्यामुळें ह्या पांच रात्री मला पांच वर्षांप्रमाणें गेल्या. समुद्राला भरती आली असतां त्याचें विपुल उदक भरतीच्या वेगानें ज्याप्रमाणें आंत येऊन मिळालेल्या नद्यांच्या पात्रांतून वाहूं लागतें, त्याचप्रमाणें रामाचें चिंतन करितां करितां हा शोक माझ्या हृदयामध्यें वृद्धिंगत होत आहे. "

ह्याप्रमाणें कौसल्या शुभ भाषण करीत असतांना सूर्यकिरणांचा प्रकाश कमी होऊन रात्र पडूं लागली. तेव्हां शोकाकुल झालेल्या राजाला राजपत्नी कौसल्येनें मधुर भाषणांनीं आनंदित केलें असतां त्याला डुलकी लागली.

सर्ग त्रेसष्टावा.

दशरथाचा पश्चात्ताप.

नंतर शोकानें मूर्च्छित झालेला तो दशरथ राजा एका मुहूर्तानें जागा झाल्यावर चिंतन करूं लागला. तेव्हां राहूची छाया ज्याप्रमाणें सूर्याला घेरून टाकिते, त्याप्रमाणें त्या इंद्रतुल्य दशरथ राजाला राम-लक्ष्मणांच्या हांकून देण्यामुळें उत्पन्न झालेल्या शोकानें घेरून टाकिलें. सारांश, राम भार्येसहवर्तमान वनामध्यें निघून गेला असतां कोसलाधिपति दशरथ राजाला आपल्या दुष्कृत्याचें स्मरण झालें, आणि कृष्णवर्ण नेत्रप्रांतानें युक्त असलेल्या कौसल्येला तें सांगण्याची त्याला इच्छा झाली. राम वनामध्यें जाऊन सहावी रात्र प्राप्त झाली असतां मध्यरात्रीं त्या दशरथाला आपल्या हातून घडलेल्या दुष्कृत्याचें स्मरण झालें. आपल्या दुष्कृत्याचें स्मरण झाल्यावर पुत्रशोकानें व्याप्त झालेला तो दशरथ राजा पुत्रशोकानें घेरून टाकिलेल्या कौसल्येला म्हणाला, "हे कल्याणि, हे भद्रे, शुभ अथवा अशुभ जें कांहीं पुरुष करितो, त्याचें फल त्या कर्त्या पुरुषालाच प्राप्त होतें. ऐहिक आणि पारलौकिक कर्मांना आरंभ करिते वेळीं त्यांच्या फलासंबंधानें उत्कृष्टनिकृष्ट भाव आणि गुणदोष जो जाणीत नाहीं, त्याला मूर्ख असे म्हणतात. पुष्प पाहून तशाच प्रकारचें फल प्राप्त होईल, या आशेनें अमराई तोडून टाकून जो पळसांना पाणी घालूं लागतो, त्याला फलप्राप्तीसंबंधानें रडत बसण्याची पाळी येते. तेव्हां विचार न करितां जो उतावीळ होऊन कर्म मात्र करूं लागतो, त्याला फलप्राप्तीचे वेळीं पळसांना पाणी घालणाऱ्या पुरुषाप्रमाणें शोक करण्याची पाळी येते. सारांश, रामाचा त्याग करून कैकेयीच्या मताप्रमाणें वागण्यांत मीं अमराई तोडून पळसांना पाणी घातलें आहे. तेव्हां फलप्राप्तीचे वेळीं आता मज अविचाऱ्याला पश्चात्ताप होत आहे."

श्रावणाचें[1] वृत्त.

पुत्रशोकानें आर्त झालेला दशरथ म्हणतोः—" देवि कौसल्ये, अज राजाचा पुत्र शब्दवेधी आहे, अशी माझी ख्याति झाली होती, व मीं धनुष्य धारण करून लहानपणीं पाप केलें आहे. तेव्हां हे देवि, न समजतांहि बालानें भक्षण

१ ह्या ग्रंथांत हे नाव नाहीं, व दुसरेंहि कोठें नाहीं, परंतु प्रचारांत हेंच असल्यामुळें तशीच सदरें दिलीं आहेत.

केलेलें विष जसा त्याचा घात करितें, त्याप्रमाणें स्वतः केलेल्या त्या पापकर्माचें हें दुःखरूप फल मला आतां प्राप्त झालें आहे. ज्याप्रमाणें एखादा अज्ञानी पुरुष फल माहीत नसल्यामुळें पलाशपुष्पांनीं मोहित होऊन जातो, त्याचप्रमाणें शब्द-वेधित्व ह्या गुणाला भुलून जाऊन ह्याप्रमाणें असलेलें त्याचें क्रूर फल मीं जाणिलें नाहीं. देवि, तुझें पाणिग्रहण होण्याचे पूर्वीं मी युवराज असतांना माझी इच्छा वृद्धिंगत करणारा पर्जन्यकाल प्राप्त झाला. भूमीसंबंधीं रसांचें शोषण करून, आणि आपल्या किरणांनीं जगत् तप्त करून भगवान सूर्य घोर अशा दक्षिण दिशेला जाऊं लागला असतां एकाएकीं उष्मा नाहींसा होऊन सजल मेघ दृष्टीस पडूं लागले, आणि त्यामुळें सर्व मंडूक, चातक व मयूर पक्षी आनंदित झाले. पंखांचे वरचे भाग चिंब होऊन गेल्यामुळें तपश्चर्येकरितां स्नानें केल्याप्रमाणेंच दिसूं लागलेले पक्षी पर्जन्यकालच्या वायूनें ज्यांचे शेंडे हालत आहेत अशा वृक्षांचा आश्रय करूं लागले. पडलेल्या आणि सतत पडणाऱ्या उदकामुळें मत्त चातक पक्ष्यांनीं युक्त असलेला पर्वत जलराशीप्रमाणें दिसूं लागला. आणि पर्वतावरील धातूंमुळें कोठें श्वेतवर्ण, कोठें ताम्रवर्ण व कोठें भस्ममिश्रित असे निर्मल प्रवाह भुजंगासारख्या कुटिल गतीनें पर्वतावरून वाहूं लागले. तेव्हां त्या अत्यंत सुखकर वेळीं मृगया करण्याचा संकल्प करून मी रथ, धनुष्य व बाण ह्यांसहवर्तमान निघालों, आणि रात्रीं पाण्यावर आलेला महिष, गज, मृग अथवा दुसरें कांहीं श्वापद मारण्याची इच्छा धरून, मन स्वाधीन न ठेवितां सरयू नदीचे तीरानें चाललों. तेव्हां अंधेर पडल्यानंतर दृष्टीच्या टप्प्यांत नसलेल्या उदकामध्यें कोणी घागर भरून नेत असतांना, गर्जना करणाऱ्या गजाच्या ध्वनीप्रमाणें तो शब्द माझ्या कानीं आला. तेव्हां गजाचा वध करण्याच्या इच्छेनें मीं भात्यांतून बाण काढिला, आणि जिकडून शब्द आला होता तिकडे नेम धरून सर्पाच्या विषाप्रमाणें तीक्ष्ण असलेला तो उज्ज्वल बाण सोडिला. तेव्हां ज्या ठिकाणीं मीं तो सर्पविषतुल्य बाण सोडिला होता, त्या ठिकाणीं बाण मर्मीं लागून उदकांत पडत असलेल्या अरण्यवासी पुरुषाच्या तोंडांतून 'हाय हाय' असे शब्द स्पष्टपणें निघाले, आणि तो भूमीवर पडल्यानंतर तर चांगली मनुष्यवाणीच तेथें सुरू झाली."

श्रावणाचा विलाप.

तो म्हणालाः—"माझ्यासारख्या तपस्व्यावर शस्त्रपात कां बरें व्हावा! उदक नेण्याकरितां मी रात्रीं निर्जन नदीवर आलों असतांना मला कोणीं बरें बाण

मारिला ! मीं कोणाचा बरें अपराध केला आहे ! परपीडेचा त्याग करून ऋषी-प्रमाणें वनामध्यें वन्य आहारावर उपजीविका करणाऱ्या माझ्यासारख्याचा शस्त्रानें वध कां बरें झाला आहे ! अरे, जटाभार धारण करून आणि वल्कलें व अजिनें परिधान करून रहाणाऱ्या माझ्या वधाची कोणाला बरें गरज पडली होती ! अथवा ह्या वध करणाऱ्याचा मीं तरी काय बरें अपराध केला आहे ! ह्याप्रमाणें केवळ अनर्थालाच कारण होणारें व इहलोकींहि कांहींएक फल न देणारें असें हें कर्म कोणीं केलें आहे ? तें कर्म करणाऱ्याला, ज्याप्रमाणें मातृगमन करणाऱ्याला इहलोकीं अथवा परलोकीं कोणीहि चांगलें म्हणणार नाहीं, त्याचप्रमाणें त्याला कोणीहि चांगलें म्हणणार नाहीं. माझ्या ह्या जीविताचा क्षय झाला ह्याबद्दल मला विशेषसें वाईट वाटत नाहीं; परंतु माझा वध झाल्यामुळें माझ्या उभयतां मातापितरांबद्दल मला फार वाईट वाटत आहे. त्या उभयतां वृद्धांचें मीं पुष्कळ दिवसपर्यंत पोषण केलें आहे. तेव्हां आतां मी मृत्यु पावल्यानंतर हे आपली उपजीविका कशी करणार ? मातापितर वृद्ध असून माझा तर एकाच बाणानें वध झाला आहे. तेव्हां अजितेंद्रिय अशा कोणीं बरें महामूर्खानें आम्हां सर्वांचा वध केला आहे ! "

श्रावणाचें दशरथाला सांगणें.

दशरथ राजा सांगतो:—" कौसल्ये, हें करुणा आणणारें भाषण ऐकतांच मला दुःख झालें, आणि धर्माला अनुसरून वागणाऱ्या माझ्या हातांतून बाणासह धनुष्य गळून खालीं पडलें. विलाप करीत असलेल्या त्या ऋषितुल्य पुरुषाचे ते करुणा आणणारे शब्द रात्रीं ऐकतांक्षणीं मीं घाबरून गेलों, आणि अतिशयच दुःख झाल्यामुळें मला कांहीं सुचेनासें झालें. माझें मन दीन झालें, आणि अत्यंत खिन्न होऊन मी त्या प्रदेशावर गेलों असतां, सरयू नदीचे तीरीं बाण लागून पडलेला एक तपस्वी माझ्या दृष्टीस पडला. त्याच्या जटा विखुरलेल्या होत्या, कलशांतील उदक सांडून गेलें होतें आणि बाण लागून पडलेला तो तपस्वी धुराळ्यानें व रक्तानें शरीर भरून जाऊन जेथें लोळत होता, तेथें मीं गेलों असतां, मला पहातांच तो माझ्याशीं असें क्रूर भाषण करूं लागला कीं, जणूं काय आपल्या तेजानें तो मला जाळूनच टाकीत आहे. तो म्हणाला, "राजा, वडिलांकरितां उदक नेण्याला मी येथें आलों असतांना ज्या अर्थी तूं मला बाणानें वेध केलास, त्या अर्थी वनांत राहणाऱ्या माझ्या हातून तुझा

काय बरें अपराध झाला आहे? एक बाण मला मर्मी मारिल्याने तूं खरोखर माझी माता आणि माझा पिता अशा दोन वृद्ध अंधांचाहि घात केला आहेस. ते खरोखर दुर्बल, अंध व तृषाक्रांत असून माझी वाट पहात आहेत. इकडे काय प्रकार घडला ह्याची त्यांना वार्ताच नसल्यामुळें, इतक्यांत आपला पुत्र उदक घेऊन येईल अशी आशा धरून पुष्कळ वेळपर्यंत ते तृषा दाबून ठेवतील. मी येथें भूमीवर लोळत पडलों आहें, ही वार्ताहि पित्याला नाहीं. ह्यावरून माझ्या तपाचें अथवा विद्येचें कांहींच फल नाहीं. अथवा ही वार्ता जरी त्याला ठाऊक असली, तरी अशक्त व पंगु असल्यामुळें तो करणार काय? एक वृक्ष मोडून पडूं लागला असतां दुसरा वृक्ष त्याचें रक्षण करण्यास जसा असमर्थ असतो, तसा माझें रक्षण करण्यास तो असमर्थ आहे. तस्मात् हे रघुवंशजा, तूंच माझ्या पित्याकडे सत्वर जाऊन त्याला हा वृत्तांत कळीव. वृद्धिंगत झालेला अग्नि ज्याप्रमाणें वन दग्ध करितो, त्याप्रमाणें तो तुला क्रुद्ध होऊन दग्ध न करो. राजा, ही पाऊलवाट आहे, ह्या वाटेनें गेलें असतां माझ्या पित्याचा आश्रम लागतो. त्या पाऊलवाटेनें तूं जा आणि ज्या रीतीनें तो क्रुद्ध होऊन तुला शाप न देईल, त्या रीतीनें तूं त्याला प्रसन्न करून घे. राजा, माझ्या शरिरांत रुतलेला हा बाण काढून टाक. भुसभुशीत अशा नदीतीराला उदकाचा वेग ज्याप्रमाणें पीडा देतो, त्याप्रमाणें हा तीक्ष्ण बाण माझ्या मर्माला पीडा देत आहे."

ह्याप्रमाणें त्या तपस्व्यानें सांगितलें असतां, 'ह्याचें शल्य न काढिलें तर ह्याच्या प्राणांना क्लेश होत आहेत, आणि शल्य काढिलें तर हा मृत्यु पावेल' अशी त्याचें शल्य काढण्यासंबंधानें मला चिंता प्राप्त झाली. तेव्हां दुःखित, दीन व शोकाकुल झालेल्या माझी ती चिंता त्या ऋषितुल्य तपस्वी व निरुपद्रवी मातापितरांच्या पुत्रानें जाणली. तेव्हां शक्तिपात होऊन हालचाल करीनासा झालेला तो शास्त्रतत्त्वज्ञ, मुमूर्षु व डोळे फिरवूं लागलेला तपस्वी धैर्यानें शोक आवरून धरून मोठ्या कष्टानें दुःख करीत असलेल्या मला म्हणाला, 'माझें मन स्वस्थ आहे. ब्रह्महत्येच्या पातकासंबंधाची भीति तूं हृदयांतून काढून टाक. राजा, मी ब्राह्मण नव्हें. तुझ्या मनाला ब्रह्महत्येची रुखरुख नको. हे राजाधिराज, वैश्यापासून शूद्रस्त्रीचे ठिकाणीं मी उत्पन्न झालें आहें.'

ह्याप्रमाणें बाण मर्मी लागल्यामुळें कंप सुटून भूतलावर तडफड करीत लोळत असलेला आणि वेदना होत असलेला तो तपस्वी कष्टानें बोलूं लागला असतां मीं तो बाण उपटून काढिला. आणि बाण निघाल्यानंतर अतिशय

व्याकुळ झालेल्या त्या तपस्व्यानें माझ्याकडे पाहून प्राण सोडिले. तेव्हां उदकानें भिजलेल्या व भयंकर मर्मव्रण प्राप्त झाल्यामुळें विलाप करून आणि एकसारखें कण्हून कण्हून सरयूचे तीरीं मरून पडलेल्या त्या तपस्व्याला अवलोकन करून मी अतिशयच खिन्न झालों."

सर्ग चौसष्टावा.

दशरथाचें श्रावणपित्याच्या आश्रमीं गमन.

ह्याप्रमाणें आपल्या हातून त्या महर्षितुल्य तपस्व्याचा अयोग्य वध झाल्याचें स्मरण होऊन तो दशरथ पुत्राकरितां विलाप करीत करीतच कौसल्येला म्हणाला, "अज्ञानामुळें तें महापाप घडून आल्यावर माझीं इंद्रियें व्याकुल झालीं, आणि आतां आपलें कल्याण कसें होईल म्हणून मी एकटाच आपल्या मनानें विचार करूं लागलों. तदनंतर उत्कृष्ठ जलानें भरलेला तो घट घेऊन सांगितलेल्या मार्गानें मीं त्या आश्रमाला गेल्यावर, तेथें दुर्बल, अंध, वृद्ध व हातांत धरून नेणारा दुसरा कोणी नसल्यामुळें पंख तुटलेल्या पक्ष्यांप्रमाणें झालेले त्याचे पितर अवलोकन केले. ते कांहीं खटपटींत न पडतां त्या पुत्रासंबंधानेंच गोष्टी बोलत बसले होते, आणि वस्तुतः जरी ते माझ्यामुळें निराश झाले होते, तरी आतां आपला पुत्र उदक घेऊन येईल, अशी अनाथांप्रमाणें ते आशा धरून राहिले होते. माझें मन शोकाकुल होऊन भीतीनें मी अगदीं घाबरून गेलों होतों; आणि त्या आश्रमस्थानाला गेल्यावर तर मी अधिकच शोकाकुल झालों. माझ्या पावलांचा आवाज ऐकतांक्षणीं तो बिचारा पिता म्हणाला, 'पुत्रा, कां रे उशीर लावीत आहेस? लवकर उदक घेऊन ये. तूं आतांपर्यंत उदकामध्यें खेळत होतास, ह्यामुळें बाबा, ही तुझी माता फारच उत्सुक झाली आहे. तेव्हां तूं लवकर आश्रमांत ये. बा पुत्रा, तुझ्या मातेच्या हातून अथवा माझ्या हातून जी कांहीं गोष्ट तुझ्या मनाविरुद्ध झाली असेल, ती तपस्व्यानें मनांमध्यें ठेवूं नये. आम्हां पंगूंची गति तूंच असून आम्हां अंधांची दृष्टिहि तूंच आहेस. तुझ्यावरच आमचे प्राण अवलंबून आहेत. तेव्हां तूं आज भाषण कां करीत नाहींस?

श्रावणाच्या मातापितरांना पुत्रवधवृत्तकथन.

ह्याप्रमाणें शब्दाक्षरांचा उच्चार चांगला होत नसल्यामुळें अस्पष्टपणें व अडखळत अडखळत भाषण करीत असलेल्या त्या बिचाऱ्या वृद्धाला अव-

लोकन करून, मनांत भिऊन गेलेला मी त्याच्याशीं बोललों. इकडून तिकडून मनांतली भीति मीं आवरून धरिली, आणि बोलण्याचा नेट धरून मीं त्याला तें पुत्रमरणजन्य भय निवेदन केलें. मी म्हणालों, “ मी क्षत्रिय दशरथ आहें. आपणां महात्म्यांचा पुत्र नव्हें. सज्जनांनीं निंद्य मानिलेली अशी एक दुःखकारक गोष्ट पूर्वसंचितामुळें माझ्या हातून झाली आहे. भगवन्, उदकासमीप आलेला गज अथवा कांहीं श्वापद मारावें या उद्देशानें मी हातांत धनुष्य घेऊन सरयूतीरीं आलों असतां उदकामध्यें भरणाऱ्या कुंभाचा मीं शब्द ऐकिला, आणि हा गज असावा असें समजून मीं त्याला बाण मारिला. तदनंतर त्या तीरापाशीं गेल्यावर एक तपस्वी बाणानें हृदय फुटून जाऊन जीव जाण्याच्या बेतांत आलेला आहे, आणि भूमीवर पडला आहे, असें मीं अवलोकन केलें. तेव्हां त्यानेंच सांगितल्यावरून मी त्याच्या शेजारीं गेलों, आणि त्याला वेदना होत असतांना मी तो बाण एकदम त्याच्या मर्मापासून उपसून काढिला. तेव्हां तो बाण निघतांक्षणीं, ‘अंध मातापितरांचें आतां कोण रक्षण करील!’ असा तुम्हां उभयतां भगवंतांकरितां शोक करून तो एकदम स्वर्गाला गेला. ह्याप्रमाणें न समजतां आपल्या पुत्राचा माझ्या हातून वध झाला आहे. तेव्हां असा प्रकार झाल्यावर आतां पुढें काय करावयाचें त्याविषयीं आपण मुनींनीं मला आज्ञा करावी. ”

श्रावणाच्या पित्याचें दशरथाशीं भाषण.

असें तें दुःख निवेदन करणारें माझें भयंकर भाषण श्रवण केल्यावर तो भगवान ऋषि मला प्रचंड शाप देण्यास समर्थ होईना. तेव्हां अश्रूंनीं ज्याचें मुख भरून गेलेलें आहे, असा तो शोकानें व्याप्त झालेला महातेजस्वी वृद्ध सुस्कारे टाकीत टाकीत हात जोडून उभा राहिलेल्या मला म्हणाला, ‘राजा, हें अशुभ कर्म जर तूं स्वतः मला विदित केलें नसतेंस, तर तुझ्या मस्तकाचे शेंकडों किंवा हजारों तुकडे होऊन गेले असते. राजा, विशेषतः वानप्रस्थधर्मानें वागणाऱ्याचा समजून उमजून जर क्षत्रियानें वध केला असता तर तो वध करणारा प्रत्यक्ष जरी इंद्र असतां, तरी सुद्धां माझ्या कोपानें त्याला स्थानभ्रष्ट केलें असतें; मग तुझ्यासारख्या गरिबाची कथा काय? मातापितरसेवारूप तपश्चर्येविषयीं तत्पर व वेदवेत्त्या ब्राह्मणासमान असलेल्या त्या तशा प्रकारच्या मुनितुल्य पुरुषावर समजून उमजून शस्त्र सोडणाऱ्याच्या मस्तकाचे सात तुकडे व्हावेत; परंतु हें कृत्य अनाज्ञानें तुझ्या हातून घडल्यामुळें तूं जिवंत राहिला

आहेस. बुद्धिपूर्वक जर ही गोष्ट झाली असती, तर सर्व रघुवंशजांचें कुलच जाग्यावर राहिलें नसतें. मग तूं कोठून जगणार? राजा तूं आम्हांला त्या प्रदेशांवर घेऊन जा. रक्तानें ज्याचें शरीर भरलें आहे, आणि ज्याचीं अजिनें व वस्त्रें अस्ताव्यस्त झालेलीं आहेत, अशा त्या मृत्यूच्या अधीन होऊन भूमीवर पडलेल्या पुत्राची आज शेवटची भेट घ्यावी, अशी आमची इच्छा आहे.'

श्रावणाच्या पित्याचा विलाप.

ह्याप्रमाणें त्यानें सांगितल्यानंतर अत्यंत दुःखित झालेल्या त्या उभयतांना मी एकटा त्या प्रदेशावर घेऊन गेलों; आणि भार्येसह त्या बिचाऱ्या पित्याकडून त्या पुत्राला मीं स्पर्श करविला. तेव्हां आपल्या पुत्राच्या जवळ येऊन व त्याला स्पर्श करून ते बिचारे मातापितर त्याच्या शरीरावर पडले. पिता त्याला म्हणाला, "आज तूं मला अभिवंदन करीत नाहींस, माझ्याशीं भाषणहि करीत नाहींस व भूमीवर निजला आहेस! तेव्हां हे पुत्रा, तूं माझ्यावर रागावला आहेस कायरे? अरे, मी जरी तुला अप्रिय असलों, तरी धर्मानें वागणाऱ्या ह्या आपल्या मातेकडे तरी तूं पहा. तूं कारे आम्हांला आलिंगन देत नाहींस? हे सुकुमारा, आमच्याशीं एकदां बोलरे! अरे, शास्त्र अथवा दुसरें कांहीं म्हणत असलेल्या कोणाचें तरी मी आतां चित्तवेधक अध्ययन पहांटेस ऐकूं! संध्या करून व होम आटोपून, तुझ्याप्रमाणें शुश्रूषा करण्याविषयीं पूर्ण तत्पर असलेला असा कोणरे आतां पुत्रशोकभयानें व्याप्त झालेल्या मला उद्वर्तनपूर्वक स्नान घालील? कंद, मुळें व फळें आणून आतां निश्चेष्ट, निराधार व अनाथ अशा मला कोणरे प्रिय अतिथीप्रमाणें भोजन घालील? पुत्रा, अंध, वृद्ध, दीन आणि पुत्राकरितां हळहळणाऱ्या ह्या तुझ्या मातेचें मी आतां कसेंरे पोषण करूं? बाळा, माझ्याकरितां थांब. इतक्यांत यमसदनाला जाऊं नको. तूं माझ्यासहवर्तमान आणि आपल्या मातेसहवर्तमान उद्यां जाशील. बा पुत्रा, शोकाकुल, अनाथ, दीन आणि वनामध्यें तुझा वियोग होऊन पडलेले आम्ही उभयतां आतां सत्वरच यमसदनाला चालते होऊं. तेथें गेल्यावर धर्मराजानें माझ्या अपराधाची क्षमा करावी, आणि ह्या माझ्या पुत्रानें आतां आपल्या मातापितरांचें परिपालन करावें, अशी मी त्या यमधर्माला पाहून प्रार्थना करीन. कारण मी जर असा अनाथ आहें, तर तो महायशस्वी धर्मात्मा लोकपाल मला अभयदान देईल."

श्रावणाला त्याच्या पित्याचा आशीर्वाद.

तो वृद्ध तापस आणखी म्हणाला, "तूं निरपराधी असतांनाहि पापकर्म करणाऱ्यानें तुझा वध केला आहे, हें जर खरें असेल, तर अस्त्रयुद्धामध्यें पडणाऱ्यांना जे लोक प्राप्त होत असतात, त्या लोकांना तूं सत्वर जा. संग्रामापासून परावृत्त न होतां संमुख युद्ध करितां करितां वध पावलेल्या शूरांना जी गति प्राप्त होत असते, त्या उत्कृष्ठ गतीला तूं जा. सगर, शैब्य, दिलीप, जनमेजय, नहुष आणि धुंधुमार ह्यांना जी गति प्राप्त झाली, ती गति तुला प्राप्त होवो. प्राणिमात्रांचा आश्रय जें ब्रह्म, तें तुला प्राप्त होवो. वेदाध्ययन, तप व पृथ्वीदान करणारे, अहिताग्नि, एकपत्नीव्रतानें वागणारे, हजारों गायी देणारे, गुरुसेवा करणारे आणि महाप्रस्थादि साधनांनीं परलोकप्राप्तीकरितां देहत्याग करणारे ह्यांना जी गति प्राप्त होत असते, ती गति तुला प्राप्त होवो. आमच्या कुलामध्यें उत्पन्न झालेल्या तुला वाईट गति प्राप्त होणार नाहीं. बाबारे, ज्यानें तुझा वध केला, त्याला ती असद्गति प्राप्त होईल."

ह्याप्रमाणें करुणस्वरानें एकसारखा विलाप करणारा तो पिता तसें म्हणून आपल्या भार्येसहवर्तमान आपल्या पुत्राला संस्कारपूर्वक पाणी देण्यास तयार झाला. तो धर्मवेत्ता मुनिपुत्र तर ('अस्त्रयुद्धामध्यें पडणाऱ्यांना जे लोक प्राप्त होत असतात, त्या लोकांना तूं जा' असे शब्द पित्यानें उच्चारिल्यावर तत्क्षणींच दिव्य देह धारण करून आपल्याला नेण्याकरितां आलेल्या इंद्राबरोबर स्वर्गास गेला. नंतर इंद्रासहवर्तमान परत येऊन तो तपस्वी त्या वृद्ध मातापितराशीं बोलूं लागला. क्षणभर थांबून तो आपल्या पित्याला म्हणाला, 'तुमच्या शुश्रूषेमुळें मला मोठें स्थान प्राप्त झालें आहे, व तुम्हीहि सत्वर माझ्यासमीप याल.'

दशरथाला शाप.

दशरथ राजा म्हणतोः—"कौसल्ये, ह्याप्रमाणें सांगितल्यानंतर तो तेजस्वी व जितेंद्रिय मुनिपुत्र दिव्य विमानांत बसून स्वर्गाला गेला. इकडे तो महातेजस्वी वृद्ध तापस भार्येसहवर्तमान सत्वर पुत्राला उदक दिल्यावर हात जोडून उभा असलेल्या मला म्हणाला, 'राजा, माझा आजच वध कर. एका बाणानें तूं एक पुत्र असलेल्या मला निपुत्रिक करून टाकिलें आहेस. तेव्हां मला मरण्याची भीति नाहीं. ज्याअर्थी अज्ञानानें तूं माझ्या बालकाचा वध केलास, त्याअर्थी मीहि तुला अत्यंत दुःखद व भयंकर शाप देतों. सांप्रत ज्या-

प्रमाणें हें पुत्रमरणजन्य दुःख मला प्राप्त झालें आहे, त्याचप्रमाणें तुला पुत्रशोकानें मृत्यु प्राप्त होईल. ज्याअर्थी तूं क्षत्रियानें न समजून माझ्या मुनितुल्य पुत्राचा वध केला आहेस, त्याअर्थी हे प्रजाधिपते, तुला एकदम ब्रह्महत्येसमान पातक लागणार नाहीं. परंतु दिलेली दक्षिणा ज्याप्रमाणें दात्याला परलोकाच्या ठिकाणीं प्राप्त होते, त्याप्रमाणें तुलाहि अशाच प्रकारची प्राणनाशक घोर अवस्था एकाएकीं प्राप्त होईल."

ह्याप्रमाणें करुण स्वरानें अतिशय विलाप केल्यावर त्या स्त्रीपुरुषांनीं मला शाप दिला. आणि देह चितेवर ठेवून ते स्वर्गाला चालते झाले. सारांश, हे देवि, शब्दवेध करून नंतर शल्य करून टाकणाऱ्या माझ्या हातून मूर्खपणामुळें जें पातक घडलें आहे, त्याचें मला चिंतन करितां करितां स्मरण झालें आहे. आणि अपथ्य पदार्थांसहवर्तमान अन्नरस भक्षण केला असतां ज्याप्रमाणें त्या भक्षणाचें व्याधिरूप फल प्राप्त होतें, त्याचप्रमाणें त्या कर्माचें हें फल मला प्राप्त झालें आहे. हे कल्याणि, त्या श्रेष्ठ पुरुषाच्या त्या शापाचें हें फल मला प्राप्त झालें आहे."

दशरथाचें निधन.

ह्याप्रमाणें बोलून, मरणाच्या भीतीनें त्रस्त झालेला तो राजा पुनरपि भार्येला म्हणाला, "कौसल्ये, ज्या अर्थीं पुत्रशोकानें माझा आतां प्राण जाणार आहे, त्या अर्थीं डोळ्यांनीं मला तूं दिसत नाहींस. ह्यास्तव तूं मला स्पर्श कर. कारण यमसदनाला निघालेल्या मानवांना कांहीं दिसेनासें होतें. जर मला एकदां प्रत्यक्ष अथवा परंपरेनें राम स्पर्श करील, तर अथवा तो कोश किंवा यौवराज्य प्राप्त करून घेईल, तर मी जगेन, असें मला वाटतें. देवि, मीं जें राघवापाशीं वर्तन केलें तें मला योग्य नाहीं; परंतु त्यानें मात्र जी माझ्याशीं वर्तणूक ठेविली, ती फक्त त्यालाच योग्य आहे. पुत्र दुराचारी जरी असला, तरी कोण बरें समंजस पुरुष त्याचा त्याग करील? आणि पिता हांकून देऊं लागला असतां कोणता बरें पुत्र त्याचा द्रोह करणार नाहीं? असो. दृष्टीनें तूं मला दिसत नाहींस, व मला स्मरण राहिनासें झालें आहे. ह्यावरून कौसल्ये, यमधर्माचे हे दूत मला त्वरा करीत आहेत, असें दिसतें. सत्य, पराक्रमी व धर्मवेत्त्या रामाचें मरणसमयींहि मला दर्शन होत नाहीं, ह्यापेक्षां आणखी दुःखकारक गोष्ट ती कोणती! ज्याच्या कृतीला कोठें जोड नाहीं अशा त्या पुत्राचें दर्शन होत नसल्यामुळें उत्पन्न झालेला हा शोक, अल्प उदकाला शुष्क करून टाकणाऱ्या सूर्याच्या ताप-

प्रमाणें माझे प्राण शोषून घेत आहे. पंधराव्या वर्षी मनोहर व शुभ कुंडलांनीं युक्त असलेलें रामाचें मुख जे पुनरपि अवलोकन करतील, ते मनुष्य नव्हेत, तर त्यांची देवांतच गणना केली पाहिजे. कमलपत्राप्रमाणें नेत्र, उत्कृष्ठ भिंवया, उत्तम दांत व मनोहर नासिका ह्यांनीं युक्त असलेलें रामाचें चंद्रतुल्य मुख जे अवलोकन करतील, ते धन्य आहेत. शरदृतूंतील चंद्राप्रमाणें आल्हादकारक व फुललेल्या कमलाप्रमाणें सुगंधि असें रामाचें मुख जे अवलोकन करतील, ते धन्य होत. पूर्वी वक्री झालेला असून नंतर मार्गाला लागलेल्या शुक्राप्रमाणें, वनवास संपून अयोध्येला पुनरपि आलेल्या रामाला जे पहातील, ते सुखी आहेत. कौसल्ये, चित्ताला भ्रम झाल्यामुळें माझा धीर फारच जात चालला आहे. कानांनीं मला ऐकूं येत नाहीं, त्वगिंद्रियाला स्पर्श समजत नाहीं आणि जिव्हेला रसहि उमगत नाहींसा झाला आहे. तेल संपून गेलेल्या दिव्याचीं किरणें जशीं भस्मीभूत होऊन नाश पावतात, तशीं चित्तभ्रमामुळें सर्वच इंद्रियें नाहींशीं होत आहेत. ज्याप्रमाणें नदीचा वेग जोरानें तीराचा नाश करितो, त्याचप्रमाणें हा मानसिक शोक मूर्च्छित झालेल्या मज अनाथाचा जोराजोरानें नाश करीत आहे. हे राघवा, हे महाबाहो, हे माझें दुःख नाहींसें करणाऱ्या, हे पितृप्रिया, हे नाथा, हे पुत्रा, तूं माझा असून मला टाकून गेला आहेस रे! कौसल्ये, हे निरुपद्रवी सुमित्रे, तुम्ही मला दिसत नाहीं. हे दुष्टे, हे शत्रुरूपिणि, हे कैकेयि, हे कुलकलंकिनि, तुला धिक्कार असो!"

याप्रमाणें राममाता कौसल्या आणि सुमित्रा ह्यांचें सन्निध शोक करितां करितां मध्यरात्र उलटून गेल्यावर, प्रिय पुत्राला हांकून दिल्यामुळें आतुर, दीन व अत्यंत दुःखानें पीडित झालेला तो महाबुद्धिमान दशरथ राजा बोलतां बोलतां मृत्यु पावला.

सर्ग पासष्टावा.

दशरथनिधनविलाप.

तदनंतर रात्र निघून गेल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळींच त्या राजवाड्यामध्यें भाट आले, आणि महाविद्वान पुराणिक, उत्कृष्ठ रीतीनें वंशपरंपरा श्रवण केलेले वंशस्तावक, मागध, वादनकलेंत निपुण असणारे गवयी वगैरे वेगवेगळी

राजाची स्तुति करूं लागले. ह्याप्रमाणें उच्च स्वरानें आशीर्वाद देऊन ते राजाची स्तुति करूं लागले असतां, त्यांच्या स्तुतीचा ध्वनि प्रतिध्वनीच्या द्वारानें राजवाड्यामध्यें पसरला. तदनंतर ते सूतप्रभृति स्तुति करीत असतांच पाणिवादक हे चोहींकडे राजाच्या चरित्रांचा व अद्भुत कर्मांचा उल्लेख करून हातांनीं ताल धरूं लागले. राजवाड्यामध्यें असणारे पिंजऱ्यांतील व वृक्षाशाखांवरील पक्षी त्या ध्वनींच्या योगानें जागे होऊन शब्द करूं लागले. पौराणिकप्रभृतींनीं उच्चारिलेले मंगलदायक ध्वनि, वीण्याचे आवाज आणि गवयी लोकांचे आशीर्वादप्रधान गायन ह्यांच्या योगानें तें गृह भरून गेलें. तदनंतर स्त्रिया आणि पुढें ह्यांचीच संख्या ज्यांच्यामध्यें पुष्कळ आहे असे सेवेविषयीं निपुण व शुद्ध आचरण करणारे सेवक पूर्वीप्रमाणें तेथें आले. तसेंच स्नानविधि जाणणारे सेवक केशर घातलेलें उदक सोन्याच्या घागरींतून वेळेवर आणि योग्य प्रकारानें आणून ठेऊं लागले. ज्यांत मुलींची संख्याच पुष्कळ आहे अशा पवित्र स्त्रिया, मंगलसिद्ध्यर्थ स्पर्श करण्यास योग्य असलेल्या गायी वगैरे, मुखशुद्धीनंतर प्राशन करण्यास योग्य असलेलें नारळाचें उदक वगैरे, आणि दर्पण, वस्त्रें, भूषणें इत्यादि सामान घेऊन आल्या. सारांश, प्रातःकालीं राजाकडे मंगलसिद्ध्यर्थ आणावयाचे जे पदार्थ ते सर्व कांहीं तेथें आणून ठेविले होते. ते सर्व पदार्थ सर्व लक्षणांनीं युक्त असून यथायोग्य प्रकारें आदरपूर्वक ठेविलेले होते. ते सर्वगुणसंपन्न असून वैभवदायक होते.

तदनंतर सूर्योदयापर्यंत राजाचें दर्शन न झाल्यामुळें ते सर्वहि सेवक 'हें काय' अशी शंका येऊन मोठ्या उत्सुकतेनें उभे राहिले. नंतर कोसलराज दशरथाच्या शय्येजवळच ज्या स्त्रिया होत्या, त्या जवळ येऊन भर्त्याला उठवूं लागल्या; परंतु विनय आणि वर्तणूक ह्यांच्या योगानें ज्यांना राजाला स्पर्श वगैरे करण्याची योग्यता आलेली होती, अशा स्त्रियांनीं त्याची शय्या चांचपून पाहिली असतांहि कांहींएक हालचाल त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आली नाहीं. तेव्हां निद्रेची स्थिति जाणणाऱ्या त्या स्त्रिया चलन पावणाऱ्या नाड्या तपासून पाहूं लागल्या असतां कांहीं चलनवलन त्यांच्या आढळण्यांत येईना. तेव्हां राजाच्या प्राणांविषयीं शंका येऊन त्या थरथर कांपूं लागल्या; आणि प्रवाहाचे संमुख असलेल्या वेतसप्रभृतींच्या अग्रांप्रमाणें त्या आपला कंप दर्शवूं लागल्या. नंतर राजाकडे पाहिल्यावर तर संशययुक्त झालेल्या त्या स्त्रियांना ज्या वाईट गोष्टीची शंका आली होती, तिचा निश्चयच झाला. कौसल्या व

सुमित्रा पुत्रशोकानें व्याकुल झाल्यामुळें अगदीं मेल्याप्रमाणें झोंप लागून पडल्या होत्या, त्या जाग्या झाल्या नाहींत. शोकानें जर्जर झालेली व हातपाय पोटाशीं धरून पडलेली कौसल्या काळवंडून गेलेली होती, आणि त्यामुळें अंधकारानें व्याप्त झालेल्या तारेप्रमाणें ती निस्तेज दिसत होती. दुःखाश्रूंचे ओघळ तोंडावर आल्यामुळें राजपत्नी सुमित्रा पूर्वीप्रमाणें झळकत नव्हती. कौसल्या तर सुमित्रे-पेक्षांहि निस्तेज झाली होती. राजाच्या मुखावर तर कांहींच तेज राहिलें नव्हतें. त्या उभयतां राजपत्न्या कौसल्या आणि सुमित्रा झोंपी गेल्या असून, राजाचे तर निद्रावस्थेमध्येंच प्राण गेलेले आहेत, असें आढळून आल्यावर तें सर्व अंतःपूर कांहीं वेळ तर गतप्राण झाल्यासारखें दिसूं लागलें. तदनंतर निवास-स्थानांतून कळपाचें रक्षण करणारा महान गज नाहींसा झाला असतां हत्तिणी ज्याप्रमाणें अरण्यामध्यें आक्रोश करूं लागतात, त्याचप्रमाणें त्या अनाथ झालेल्या श्रेष्ठ स्त्रिया उच्चस्वरानें आक्रोश करू लागल्या. त्यांच्या रोदनध्वनीनें कौसल्या आणि सुमित्रा एकाएकीं दचकून जाग्या झाल्या, आणि राजाला पाहून व स्पर्श करून 'हे नाथ' अशी किंकाळी फोडून भूतलावर पडल्या. तेव्हां आकाशां-तून च्युत झालेली तारा ज्याप्रमाणें झळकेनाशी होते, त्याप्रमाणें कोसलराजकन्या कौसल्या धुळीनें भरून जाऊन भूतलावर धडपडूं लागली असतां झळकेनाशी झाली! राजा गतप्राण झाल्यानंतर भूमीवर पडलेली ती कौसल्या, मारून टाकि-लेल्या नागिणीप्रमाणें सर्व स्त्रियांना दिसूं लागली. तेव्हां राजाच्या कैकेयीप्रभृति सर्व स्त्रिया शोकाकुल होऊन रडूं लागल्या, आणि कांहीं सुचेनासें होऊन तिकडे लोटल्या. त्या मागून आलेल्या स्त्रिया आक्रोश करूं लागल्या असतां प्रथम तेथें सुरू झालेल्या प्रचंड ध्वनीमध्यें अधिक भर पडली व त्याच्या योगानें वृद्धिंगत झालेल्या त्या नादानें तें घर दणाणून गेलें त्या घरामध्यें जिकडे तिकडे प्रचंड आक्रोश होऊं लागला. आंतील सर्व लोक शोकाकुल झाले आणि रडारड ऐकिल्यामुळें भयभीत होऊन व गोंधळून जाऊन, पूर्वी काय वृत्तांत झाला आहे, हें कळण्याकरितां उत्सुक झालेल्या लोकांची तेथें गर्दी झाली. सारांश, गतप्राण होऊन पडलेल्या राजाचें तें गृह एकाएकीं आनंदरहित, दीन व भयाण असें दिसूं लागलें. तो यशस्वी राजाधिराज परलोकास गेला असें समजून आल्यावर अत्यंत दुःखित झालेल्या त्या स्त्रियांनीं त्याच्या भोंवतालीं गराडा घातला. अत्यंत करुण स्वरानें रोदन करणाऱ्या त्या स्त्रिया कपा-ळावर हात देऊन अनाथांप्रमाणें रडूं लागल्या.

सर्ग सहासष्टावा.

कौसल्येचा शोक.

विझून गेलेल्या अग्नीप्रमाणें, उदकहीन झालेल्या समुद्राप्रमाणें आणि प्रभारहित झालेल्या सूर्याप्रमाणें स्वर्गस्थ झालेल्या त्या राजाला अवलोकन करून, अश्रूंनीं नेत्र भरून आलेली व अनेक प्रकारांनीं शोकानें जर्जर झालेली कौसल्या राजाचें मस्तक मांडीवर घेऊन कैकेयीला म्हणाली, 'हे कैकेयी, आतां आपले मनोरथ परिपूर्ण करून घे. हे पापिणी, हे दुराचारिणि, राजाला मारून तूंच एकटी आतां ह्या निष्कंटक झालेल्या राज्याचा उपभोग घे. राम मला सोडून वनांत गेला, आणि माझा भर्ताहि स्वर्गाला गेला. तेव्हां पांथसमुदायांतून अरण्यांत चुकलेल्या स्त्रीप्रमाणें माझी अवस्था झाल्यामुळें मला आतां जगण्याची इच्छा नाहीं. आपलें दैवत जो भर्ता, त्याला सोडून धर्माचा त्याग केलेल्या कैकेयीवांचून इतर कोणती बरें स्त्री जिवंत रहाण्याची इच्छा करील? धनाला लुब्ध होऊन दुसऱ्याला विष घालण्यास उद्युक्त होणाऱ्याला ज्याप्रमाणें दोष समजत नाहींत, त्याचप्रमाणें राज्यवैभवाला लुब्ध होऊन रामाला वनवासांत पाठविण्याचा परिणाम काय होईल, ह्याचा विचार न करितां कैकेयीनें कुबडीच्या प्रेरणेमुळें रघुवंशाच्या कुलाचा घात केला. अयोग्य कृत्य करण्यास प्रवृत्त केलेल्या राजानें रामाला भार्येसहवर्तमान वनामध्यें हांकून दिलें, हें ऐकून जनकहि माझ्याप्रमाणेंच तळमळूं लागेल. जिवंत असूनहि नाश पावल्याप्रमाणें येथून माझ्या दृष्टिआड गेलेला तो कमलनयन धर्मनिष्ठ राम, मी आज अनाथ व विधवा झालें आहे, हें जाणीत नाहीं. दुःखाचा जिला कधीं अनुभव नाहीं, अशी ती भर्तृसेवारूप उत्कृष्ट तपश्चर्या करणारी विदेहराजकन्या सीता वनामध्यें दुःख प्राप्त झालें असतां अगदीं गांगरून जाईल; आणि भयंकर गर्जना करणारे पशुपक्षी रात्रीं गर्जना करूं लागले असतां त्यांची गर्जना ऐकून ती भयभीत होईल, आणि रामाचें अवलंबन करील. सीता हीच ज्याला संतति आहे, असा तो वृद्ध जनक सीतेविषयीं विचार करूं लागला म्हणजे शोकाकुल होईल, आणि खरोखर प्राणत्याग करील. मी तर पतिव्रता असल्यामुळें आजच मृत्यूची वाट धरणार, आणि ह्या राजशरिराला आलिंगन देऊन अग्नीमध्यें प्रवेश करणार."

ह्याप्रमाणें ती बिचारी कौसल्या अत्यंत दुःखाकुल होऊन विलाप करूं लागली असतां, राज्यव्यवहार पहाण्याकरितां नेमलेल्या अमात्यांनीं अंतःपुरांतील

स्त्रियांकडून दशरथापासून तिला सोडविलें आणि तेथून दूर नेलें. तदनंतर तेलानें भरलेल्या एका कढईमध्यें अमात्यांनीं त्या भूपतीला निजविलें, आणि वसिष्ठादिकांची आज्ञा झाल्यावर राजाच्या सर्व पुढल्या कर्मांची व्यवस्था ते करूं लागले. त्या सर्वज्ञ मंत्र्यांना पुत्रावांचून राजाचें प्रेत नेणें योग्य न वाटल्यामुळें ते त्या भूपतीला तेलाच्या कढईंत ठेवून रक्षण करीत बसले. अमात्यांनीं त्या राजाला तेलाच्या कढईंत निजविलें असें कळून आल्यावर त्या स्त्रिया 'हाय हाय! हा मृत्यु पावला' असा विलाप करूं लागल्या. त्यांच्या मुखावर अश्रूंच्या धारा चालल्या, आणि शोकाकुल व दीन झालेल्या त्या स्त्रिया हात उभारून रडत रडत करुण स्वरानें विलाप करूं लागल्या कीं, "हे महाराजा, नेहमीं प्रिय भाषण करणाऱ्या सत्यप्रतिज्ञ अशा रामाचा वियोग झाला असतांहि तूं आमचा कशाकरितां त्याग करीत आहेस! जिचा उद्देश दुष्ट आहे, अशा ह्या सवतीच्या —कैकेयीच्या समीप रामरहित झालेल्या आम्हीं विधवांनीं कसें बरें रहावें! तो राम आमचा नाथ असून आपल्या व आमच्या उभयतांच्या जीविताचा प्रभुहि तोच आहे. असें असतांनाहि ज्या अर्थी तो जितेंद्रिय व वैभवशाली राम राज्यलक्ष्मीचा त्याग करून वनामध्यें चालता झाला, त्या अर्थी कैकेयीनें तिरस्कार केलेल्या आणि शोकानें व दुःखानें मोहित झालेल्या आम्ही आपल्यावांचून आणि त्या वीरावांचून कशा बरें राहूं! राजा, राम व महाबलाढ्य लक्ष्मण ह्या त्रिवर्गाचा सीतेसहवर्तमान जिनें त्याग केला, ती दुसऱ्या कोणाचा बरें त्याग करण्यास मागें पुढें पहाणार आहे!"

ह्याप्रमाणें अतिशय शोकानें व अश्रूंनीं व्याप्त झालेल्या दशरथ राजाच्या त्या आनंदरहित श्रेष्ठ स्त्रिया तळमळ करूं लागल्या. तेव्हां महात्म्या राजानें रहित झालेली ती अयोध्या नगरी नक्षत्ररहित रात्रीप्रमाणें अथवा भर्तृरहित स्त्रीप्रमाणें शोभेनाशी झाली. सारांश, त्या नगरींतील लोक दुःखाश्रूंनीं व्याप्त होऊन गेले. कुलस्त्रिया हाहाकार करूं लागल्या. अंगणांतून व घरांतून सडासंमार्जन होईनासें झालें. आणि ह्यामुळें ती नगरी पूर्वीप्रमाणें शोभेनाशी झाली. पुत्रशोकामुळें राजा स्वर्गाला जाऊन राजस्त्रिया भूतलावर पडल्या असतांना सूर्य एकाएकीं आपला संचार आटोपून चालता झाला, आणि रात्र पडून तिनें आपला अंधकाराचा प्रचार करण्यास सुरवात केली. तेथें आलेल्या सुहृदांना पुत्रावांचून राजाचें दहन करणें बरोबर वाटलें नाहीं, म्हणून त्यांनीं त्या अचिंत्य ज्ञानवान राजाला तैलकटाहरूप शय्येवर निजविलें. त्या नगरीला महात्म्य

राजाचा वियोग झाला असतां, ज्यांच्या नेत्रांतील अश्रूंच्या धारा कंठापर्यंत आलेल्या आहेत, अशा लोकांनीं तिच्यांतील मार्ग व चवाटे गजबजून गेले. सूर्यरहित आकाशाप्रमाणें अथवा नक्षत्ररहित रात्रीप्रमाणें ती नगरी निस्तेज दिसूं लागली. त्या वेळीं अयोध्या नगरींत त्या राजवाड्यामध्यें स्त्रिया व पुरुष ह्यांच्या झुंडीच्या झुंडी लोटल्या, आणि भरताच्या मातेची निंदा करूं लागलेल्या त्यांना सुख न होतां दुःखच झालें.

सर्ग सदुसष्टावा.

अराजक राष्ट्राची स्थिति.

आक्रोशयुक्त, आनंदरहित व अश्रूंनीं कंठ दाटून आलेल्या लोकांनीं भरलेली अशी ती रात्र अयोध्येमध्यें फारच लांब वाटून शेवटीं निघून गेली. तेव्हां रात्र संपून सूर्योदय झाल्यावर राजकार्यधुरंधर द्विज जुळून सभेमध्यें आले. मार्कंडेय, मौद्गल्य, वामदेव, कश्यप, कात्यायन, गौतम आणि महायशस्वी जाबाली हे द्विज अमात्यांसहवर्तमान श्रेष्ठ राजपुरोहित वसिष्ठ मुनींकडे तोंड करून बसले, आणि राजकार्यासंबंधानें वेगवेगळीं बोलणीं बोलूं लागले. ते म्हणाले, "पुत्रशोकानें हा राजा मृत्यु पावल्यामुळें दुःखानें आम्हाला शंभर वर्षांसारखी झालेली ती रात्र एकदाची निघून गेली. महाराज दशरथ स्वर्गवासी झाला आहे, राम अरण्यांत गेला आहे, तेजस्वी लक्ष्मणहि रामाबरोबरच चालता झाला आहे, आणि उभयतां शत्रुतापन भरत-शत्रुघ्न केकय देशांतील राजधानीमध्यें रमणीय राजवाड्यांत आपल्या आजोळीं आहेत. तेव्हां इक्ष्वाकुवंशजांपैकीं आजच्या आज कोणी तरी राजा करावा. कारण हें आपलें राष्ट्र असेंच अराजक राहूं दिलें असतां नाश पावेल. अराजक देशांमध्यें विद्युल्लतारूप मालांनीं युक्त व मोठी गर्जना करणारा पर्जन्य दिव्य उदकानें पृथ्वीवर वृष्टि करीत नाहीं. अराजक राष्ट्रामध्यें मुठभर बीं देखील कोणी पेरीत नाहीं. राज्य अराजक झालें असतां पुत्र पित्याच्या अथवा स्त्री भर्त्याच्या अधीन रहात नाहीं अराजका-मध्यें धन नाहीं, आणि अराजकामध्यें भार्याहि नाहीं हें एक मोठेंच भय आहे. मग पितापुत्ररूप आणि स्त्रीपुरुषरूप सत्याला जर ठिकाण नाहीं, तर क्रयविक्रयादिरूप सत्याची गोष्ट अराजकामध्यें पाहिजे कशाला? राष्ट्र अराजक

झालें असतां लोक सभा भरवीत नाहींत, रम्य बागा तयार करीत नाहींत व आनंदित होऊन पुण्यसंपादक अशा धर्मशाळा वगैरेहि बांधीत नाहींत. अराजक देशामध्यें यज्ञयाग करणारे द्विज नाहींतसे होतात, आणि कडकडीत व्रतानें चालणारे जितेंद्रिय ब्राह्मणहि सत्रांचें अनुष्ठान करीतनासे होतात. अराजक देशांत मोठमोठ्या यागांमध्यें धनसंपन्न ब्राह्मण ऋत्विजांना शास्त्रविहित दक्षिणा देत नाहींत. अराजक देशामध्यें आनंदित नट व सूत्रधार ज्यांमध्यें आहेत असे राष्ट्राच्या अभ्युदयाला कारण होणारे देवादिकांचे उत्सव आणि समाज वृद्धिंगत होत नाहींत. अराजक राष्ट्रामध्यें कांहीं विषयाला उद्देशून लोक वादविवाद करूं लागले असतां त्यांच्या मुद्याचा निर्णय होत नाहीं, आणि कथाप्रिय लोकांनीं कथन केलेल्या कथांच्या योगानें, कथा ऐकण्याची ज्यांना गोडी आहे, अशा लोकांचें चित्तरंजन होईनासें होतें. अराजक देशामध्यें सुवर्णभूषणांनीं भूषित झालेल्या कुमारिका एकत्र जुळून सायंकाळीं बागांतून क्रीडा करण्याला जात नाहींत. अराजक देशामध्यें धनिक लोक सुरक्षित नसतात, आणि शेतकी व गोरक्षण ह्यांच्यावर उपजीविका करणाऱ्या लोकांनाहि दार उघडें टाकून बाहेर पडतां येत नाहीं. अराजक राष्ट्रामध्यें विषयी पुरुष सत्वर नेणाऱ्या वाहनांच्या योगानें स्त्रियांसहवर्तमान वनांत जात नाहींत. अराजक देशामध्यें उत्कृष्ठ दंतांनीं युक्त व घंटा बांधिलेलें असे साठ वर्षांचे—तरुण—हत्ती राजमार्गावरून फिरत नाहींत. अराजक देशामध्यें बाण व अस्त्रें ह्यांचा अभ्यास सुरू राहून एकसारखे बाण मारून पाहणाऱ्या लोकांचा तलनिर्घोष ऐकण्यांत येत नाहीं. अराजक देशामध्यें दूर प्रदेशाला निघालेले उदमी पुष्कळ माल बरोबर घेऊन मार्गानें सुखरूप जात नाहींत. अराजक देशामध्यें चालतां चालतां जेथें सायंकाळ होईल तेथें राहणारे, मनानें ब्रह्मचिंतन करणारे आणि एकटेच संचार करणारे जितेंद्रिय यति दृष्टोत्पत्तीस येत नाहींत. अराजक देशामध्यें अवश्य असलेलें मिळतहि नाहीं. व जें मिळालें असेल त्याचें रक्षणहि होत नाहीं. राज्य अराजक झालें असतां युद्धामध्यें सेना शत्रूंशीं तोंड देण्यास समर्थहि होत नाहीं. अराजक देशामध्यें आनंदित झालेले उत्कृष्ठ अश्व ज्यांना लाविले आहेत, अशा रथांनीं भूषित झालेले पुरुष एकाएकीं वनाला जात नाहींत. अराजक देशामध्यें शास्त्रामध्यें प्रवीण असलेले पुरुष वनांतून अथवा उपवनांतून बोलत उभे रहात नाहींत. अराजक देशामध्यें नियमानें वागणारे लोक देवतांच्या पूजनाकरितां पुष्पें, मोदक व दक्षिणा देत नाहींत. आणि

अराजक देशामध्यें चंदन आणि अगुरु ह्यांनीं चर्चित झालेले राजपुत्र वसंत ऋतूंतील शाल वृक्षांप्रमाणें झळकत नाहींत. उदकरहित जशा नद्या, तृणरहित जसें वन आणि गोपालरहित जशा गायी, तसेंच राजरहित राष्ट्र होय. ध्वज ज्याप्रमाणें रथाची खूण आहे, अथवा धूम ज्याप्रमाणें अग्नीची खूण आहे, त्याचप्रमाणें जे राज्य चालविणारे आहेत, त्यांची राजा ही खूण आहे. परंतु तो राजाच येथून देवलोकाला निघून गेला आहे. तेव्हां आतां आम्हांला कोणीहि मानणार नाहींत. अराजक देशामध्यें कोणाचाहि जीव स्वस्थ नसतो. कारण लोक मत्स्याप्रमाणें नेहमीं एकमेकाला खाऊं लागतात. मर्यादेचें उल्लंघन केल्यामुळें पूर्वीं राजदंड झालेले जे नास्तिक असतात, तेहि राजदंडाविषयीं निर्भय होऊन अशा वेळीं प्रभु होऊं पहातात. ज्याप्रमाणें शरिराचें हिताहित पाहण्याविषयीं दृष्टि नेहमीं तत्पर असते, त्याचप्रमाणें सत्य आणि धर्म ह्यांची प्रवृत्ति करणारा राजा राष्ट्राच्या हिताहिताविषयीं नेहमीं दक्ष असतो. सत्य, धर्म आणि कुलवानांचें कुल ह्यांचा प्रवर्तक राजाच असून माता, पिता व प्रजा ह्यांचें हित पाहणारा राजाच आहे. उदार आचरणानें युक्त असलेला राजा यम, कुबेर, इंद्र आणि महाबलाढ्य वरुण ह्यांना मागें टाकितो. अहो, बऱ्यावाईटाची व्यवस्था लावणारा राजा जर जगतामध्यें नसेल, तर हें जगत् अंधकारासारखें होऊन कशाचाच उमज पडणार नाहीं.

असो. महाराज दशरथ जिवंत असतांनाहि समुद्र ज्याप्रमाणें मर्यादेपाशीं आल्यानंतर तिचें कधींहि अतिक्रमण करीत नाहीं, त्याचप्रमाणें आम्ही आपल्या आज्ञेचें कधींहि अतिक्रमण केलेलें नाहीं. हे द्विजश्रेष्ठ वसिष्ठ मुने, आपण आमच्या म्हणण्याकडे लक्ष्य द्या, आणि इक्ष्वाकुकुलांतील एकाद्या राजपुत्राला अथवा दुसऱ्या कोणाला आजच्या आज ह्या राज्याचा अभिषेक करा. कारण राजावांचून हें राष्ट्र अरण्यवत् झालेलें आहे."

---

१ यमाचे ठिकाणीं अपराध्याला दंड करणें येवढाच गुण आहे. कुबेराचे ठिकाणीं द्रव्य देणें येवढाच गुण आहे. इंद्राचे ठिकाणीं रक्षण करणें येवढाच गुण आहे. वरुणाचे ठिकाणीं प्रजेला सदाचारामध्यें ठेवणें येवढाच गुण आहे. तेव्हां हे चारी गुण ज्याचे ठिकाणीं आहेत, तो राजा ह्या सर्वांपेक्षां श्रेष्ठ असणार, हें उघड आहे.

सर्ग अडुसष्टावा.

भरताला आणण्याकरितां दूतांचें गमन.

त्यांचें तें भाषण श्रवण करून सुमंत्रप्रभृति मित्र, मार्कंडेयप्रभृति ब्राह्मण आणि अमात्य ह्या सर्वांना वसिष्ठ म्हणाले, "ज्या अर्थी दशरथानें राज्य दिलेला भरत भ्राता शत्रुघ्नासहवर्तमान आनंदित होऊन आपल्या मातुलगृहीं अतिशय सुखानें रहात आहे, त्या अर्थी सत्वर गमन करणारे दूत त्या वीर भ्रात्यांना आणण्याकरितां अश्व घेऊन लवकर तिकडे जाऊं द्या. ह्याचा विचार करावयाचें कांहीं कारण नाहीं. कां कीं, राजानेंच भरताला राज्य देऊन ठेविलें आहे." ह्यावर 'जाऊं द्या' असें सर्वांनीं वसिष्ठांना सांगितलें असतां त्यांचें तें सांगणें ऐकून घेऊन वसिष्ठ म्हणाले, "हे सिद्धार्था, हे विजया, हे जयंता, हे अशोकनंदना, आतां काय करावयाचें, तें ऐका. मी तुम्हांला सर्वांनाच सांगतों. शीघ्र गमन करणाऱ्या अश्वांच्या योगानें केकय देशाच्या राजधानीमध्यें असलेल्या राजवाड्यांत जाऊन दूतांनीं शोकाचा त्याग करून माझ्या सांगण्यावरून भरताला म्हणावें कीं, 'पुरोहित वसिष्ठ आणि सर्व मंत्री ह्यांनीं तुला कुशल विचारिलें आहे. आतां तूं सत्वर तेथून नीघ. तुझ्याशीं मोठें जरूरीचें काम आहे.' राम वनवासांत गेला, पिता परलोकवासी झाला, आणि कैकेयीमुळें ह्या रघुकुलाचा घात झाला ह्यांतलें कांहींएक तुम्ही तेथें गेल्यावर त्याला सांगूं नका. रेशमी वस्त्रें आणि उत्कृष्ठ भूषणें केकयराजाला व भरताला देण्याकरितां घेऊन तुम्ही सत्वर चालते व्हा."

ह्याप्रमाणें वसिष्ठांनीं सांगितल्यावर मार्गांत पडणाऱ्या भोजनाकरितां त्यांच्यापाशीं त्यांनीं द्रव्य दिलें. ते दूत आपणांला पसंत अशा अश्वांवर आरूढ होऊन केकय देशाला जाण्याकरितां आपापल्या घरीं गेले. तदनंतर उरलीसुरली तयारी करून वसिष्ठ मुनींनीं अनुज्ञा दिलेले ते दूत सत्वर चालते झाले. अपरता देशाच्या पश्चिम बाजूला आणि प्रलंब देशाच्या उत्तर बाजूला असलेल्या मालती नदीवर उतरून ते त्या नदींतून पलीकडे गेले. ईशान्य दिशेस जाण्याकरितां निघालेले ते दूत पंचाल देशाला येऊन हस्तिनापुरासमीप गंगा उतरल्यावर पश्चिमेकडे वळून कुरुजांगल देशाला जाणाऱ्या मधल्या रस्त्यानें चालले. पुष्पांनीं फुललेलीं सरोवरें आणि निर्मल उदकानें युक्त असलेल्या नद्या मार्गामध्यें दृष्टीस पडत असतांनाहि ते दूत मध्यें न थांबतां जरूरीच्या कामामुळें

त्वर पुढें चालते झाले. निर्मल उदक, नानाप्रकारचे पक्षी ह्यांनीं सेवित, आणि उदकानें क्षुब्ध अशा शरदंडानामक दिव्य नदीसमीप जाऊन ते ती नदी ओलांडून पुढें गेले. शरदंडा नदीच्या पश्चिम तीरावर अभिवंदन करण्यास योग्य असलेल्या सत्योपयाचन नामक दिव्य वृक्षापाशीं गेल्यावर दूतांनीं त्याला प्रदक्षिणा केली. नंतर ते कुलिंग नामक राजधानीमध्यें प्रविष्ट झाले. तदनंतर तेजोभिभवन गांवांतून निघून अभिकाल नामक गांवाला आल्यावर इक्ष्वाकूचा पिता व पितामह यांचा जिच्याशीं संबंध आहे, अशी पवित्र इक्षूमति नदी ते तरून गेले. बाल्हीक देशांत राहणाऱ्या वेदपारंगत ब्राह्मणांनाहि सदाचाराची पर्वा न करितां ओंजळींनीं पाणी पितांना पाहून ते दूत बाल्हीक देशांतून सुदाम पर्वताला चालते झाले. तदनंतर सुदाम पर्वतावर असलेलें विष्णूचें स्थान पाहण्याचा उद्देश मनांत धरून, आणि विपाशा व शाल्मली ह्या नद्या अवलोकन करून नद्या, वापी, तळीं, सरोवरें, नानाप्रकारचे सिंह, व्याघ्र, मृग आणि गज अवलोकन करीत करीत, त्यांना पाठविणाऱ्या प्रभु वसिष्ठांची आज्ञा सिद्धीस नेण्याची इच्छा धरणारे ते दूत मोठ्या मार्गानें चालते झाले. नंतर उपद्रवरहित असा बराच लांब मार्ग चालून आल्यामुळें वाहनें श्रांत होऊन गेलेले ते दूत गिरिव्रज नामक श्रेष्ठ नगराला अनायासें त्वर गेले. सारांश, प्रभु वसिष्ठांची मर्जी संपादन करण्याकरितां, प्रजाकुल रक्षण करण्याकरितां आणि दशरथ राजाच्या वंशजांचें जें वंशपरंपरागत राज्य, त्याचा भरताकडून स्वीकार होण्याकरितां उपेक्षा न करणारे ते दूत रात्रींच्या रात्रींच त्वरेनें त्या नगराला चालते झाले.

सर्ग एकुणसत्तरावा.

भरताला पडलेलें दुःस्वप्न.

ज्या रात्रीं त्या दूतांनीं नगरीमध्यें प्रवेश केला, त्याच रात्रीं भरतानेंहि एक अप्रिय स्वप्न अवलोकन केलें. ती रात्र उजाडण्याचे सुमारासच तें अप्रिय स्वप्न अवलोकन केल्यावर राजाधिराजाचा पुत्र भरत अत्यंत चिंताक्रांत झाला. तेव्हां तो चिंताक्रांत झाला आहे, असें समजून प्रिय भाषण करणारे त्याचे मित्र स्वप्नजन्य दुःखाचा त्याला विसर पडावा, एतदर्थ सभेमध्यें नानाप्रकारच्या गोष्टी

सांगूं लागले. त्याचा खेद दूर करण्याकरितां कांहीं मित्र वाद्यें वाजवूं लागले, कांहीं वेश्यांकडून नृत्य करवूं लागले आणि कांहीं हास्यरसप्रधान अशीं नानाप्रकारचीं नाटकें कथन करूं लागले; परंतु नेहमीं वार्तांच कथन करणारे ते जरी हितकारक गोष्टी आणि हास्योत्पादक थट्टा करीत होते, तरी त्यांच्या योगानें रघुवंशज भरताला हर्ष झाला नाहीं.

तदनंतर मित्रांनीं परिवेष्टित असलेल्या त्या भरताला सुहृदांसहवर्तमान सभेमध्यें बसलेला एक प्रिय मित्र म्हणाला, 'मित्रा, आज तुला ह्या गायनानें वगैरे आनंद कां होत नाहीं?'

भरतानें उत्तर केलें, "मला हें दैन्य प्राप्त होण्याचें कारण काय, तें ऐक. मलिन व केंस मोकळे सुटलेला असा माझा पिता पर्वतशिखरापासून शेणानें भरलेल्या एका घाणेरड्या डबक्यांत पडतांना मीं स्वप्नामध्यें पाहिला. गोमयानें भरलेल्या त्या डबक्यांत तो तरंगत आहे व ओंजळीनें तेल पिऊन वारंवार हंसत आहे, असें मीं पाहिलें. तदनंतर तिलमिश्र ओदन भक्षण करून फिरून फिरून खालीं मान घालून असलेला व तेलानें सर्वांग चोपडून गेलेला तो पिता तेलांतच बुचकळ्या मारीत आहे, असें मीं पाहिलें. सागर शुष्क झाला आहे, चंद्र भूमीवर पडला आहे, पृथ्वी अंधकारानें व्याप्त होऊन असुरांनीं व राक्षसांनीं ग्रासून टाकिली आहे व राजाची स्वारी ज्याच्यावर बसून निघते त्या हत्तीच्या दांताचे तुकडे झाले आहेत, असेंहि मीं स्वप्नामध्यें पाहिलें. प्रज्वलित झालेले अग्नि एकाएकीं विझून गेले, असेंहि अवलोकन केलें. विदीर्ण झालेली पृथ्वी, शुष्क होऊन गेलेले नानाप्रकारचे वृक्ष आणि जमीनदोस्त झालेले सधूम पर्वतहि मीं पाहिले. लोखंडाच्या आसनावर कृष्णवस्त्रें परिधान करून बसलेल्या राजाला, कृष्ण वर्णाच्या व पिंगट वर्णाच्या स्त्रिया मारीत आहेत, असें पाहिलें. रक्तपुष्पांच्या माला धारण करून व रक्तचंदन अंगाला लावून तो धर्मात्मा राजा गर्दभयुक्त रथांत बसून सत्वर दक्षिणाभिमुख निघून गेला, असें अवलोकन केलें. जिचें तोंड अक्राळविक्राळ आहे व जिनें रक्तवस्त्रें परिधान केलीं आहेत अशी एक तरुण राक्षसी हंसत हंसत राजाला ओढून नेत असतांना मीं पाहिली."

दुःस्वप्नामुळें भरताच्या मनाचा खेद.

भरत म्हणतोः—"मित्रा, ह्याप्रमाणें भयंकर स्वप्न ह्या रात्रीं माझ्या दृष्टीस पडलें. तेव्हां मी, राम, राजा, अथवा लक्ष्मण कोणी तरी मृत्यु पावणार! स्वप्नामध्यें जो पुरुष गर्दभयुक्त रथांतून बसून जातो, त्याची धूमशिखा चितेवर लवकरच

दृष्टोत्पत्तीस येते. ह्याकरितां मी खिन्न झालों आहें, आणि तुमच्या भाषणाचें अभिनंदन करावेसें मला वाटत नाहीं. माझ्या घशाला जशी कांहीं कोरड पडत आहे, व माझें मन अस्वस्थ झालें आहे. भयाचें कारण तर प्रत्यक्ष मला दिसत नाहीं, परंतु भीति तर वाटत आहे. माझा शब्द खोल गेला आहे, आणि माझें तेजहि नाहींसें झालें आहे. स्वतःबद्दल मला वाईट मात्र वाटत आहे; परंतु वाईट वाटण्याचें कारण काय, हें लक्ष्यांत येत नाहीं. पूर्वी ज्याच्याबद्दल कधीं तर्कहि झालेला नाहीं, असें हें अनेक प्रकारचें दुःस्वप्न पडलेलें आठवलें, म्हणजे अचिंत्य ज्ञानवान राजाकडे लक्ष्य जाऊन माझ्या अंतःकरणांतून तें भय जात नाहीं.

सर्ग सत्तरावा.

भरताचें अयोध्येकडे प्रयाण.

ह्याप्रमाणें भरत स्वप्न सांगत आहे, तोंच ज्यांचे घोडे थकून गेलेले आहेत, असे ते दूत, उल्लंघन करण्यास अशक्य असा खंदक ज्याच्या भोंवतालीं आहे, अशा त्या नगरांत प्रविष्ट होऊन रम्य राजवाड्यापाशीं आले. तदनंतर राजाची भेट होऊन राजपुत्रानें त्यांचें आदरातिथ्य केल्यावर राजाचे पाय धरून ते त्या भरताला म्हणाले, 'पुरोहित वसिष्ठ आणि सर्व मंत्री ह्यांनीं तुला इकडे सर्व कुशल आहे, असें सांगितलें आहे. आतां सत्वर येथून नीघ. तुझ्याशीं अत्यंत जरूरीचें काम आहे. हे कमलनयना, हीं मोठमोठीं मौल्यवान वस्त्रें व भूषणें तूं घे, आणि आपल्या मातुलालाहि दे. ह्या वस्त्रांपैकीं वीस कोटींचीं वस्त्रें केकय-राजाला दिलीं असून, तुझ्या मातुलाला तब्बल दहा कोटींचीं वस्त्रें दिलीं आहेत.'

ह्याप्रमाणें दूतांनीं सांगितल्यावर सुहृदांचे ठिकाणीं अतिशय प्रेम करणाऱ्या भरतानें त्या सर्वांचा स्वीकार केला; आणि इच्छित वस्तूंनीं त्या दूतांचा मान राखून तो त्यांना विचारूं लागला, "माझा पिता दशरथ राजा कुशल आहे ना? आणि राम व महात्मा लक्ष्मण ह्यांना आरोग्य आहे ना? सभ्य, धर्मनिष्ठ, धर्मज्ञ आणि धर्माला अनुसरून भाषण करणारी अशी विचारी राममाता कौसल्या रोगरहित आहे ना? लक्ष्मण व वीर शत्रुघ्न ह्यांची माता जी मध्यम राजपत्नी धर्मज्ञ सुमित्रा, ती रोगरहित आहे ना? स्वार्थाकडेच दृष्टि देणारी, नेहमींच जलाल, क्रुद्ध आणि आपणाला शहाणी समजणारी माझी माता कैकेयीहि बरी आहे ना? तिनें मला कांहीं सांगितलें आहे काय?"

ह्याप्रमाणें महात्म्या भरतानें प्रश्न केला असतां ते दूत विनयपूर्वक आणि थोडक्यांत त्या भरताला म्हणाले, 'हे पुरुषश्रेष्ठा, ज्यांचें कुशल तूं इच्छित आहेस, ते कुशल आहेत. कमलनिवासिनी लक्ष्मी तुला वरण्यास तयार आहे. तर आतां तुझा रथ जोडून तयार असूं दे.'

ह्याप्रमाणें त्यांनीं भरताला सांगितलें असतां, 'दूत मला घाई करीत आहेत असें सांगून मी महाराज केकयाधिपतीचा निरोप घेतों' असें भरतानें त्यांना सांगून, 'सत्वर चल' म्हणून दूतांनीं प्रेरणा केलेला तो राजकुमार भरत आपल्या मातामहाला म्हणाला, 'राजन्, मी पित्याकडे जातों. दूतांनीं मला त्वरा केली आहे. जेव्हां आपणांला माझें स्मरण होईल, तेव्हां मी पुनरपि येईन.'

भरतानें असें सांगितलें असतां, त्याचा मातामह केकय-देशाधिपति त्याचे मस्तकीं अवघ्राण करून शुभ शब्दांनीं त्याला म्हणाला, "बा भरता, जा. मी तुला अनुज्ञा देतों. तुझ्या योगानें कैकेयी सुप्रजा आहे. हे शत्रुतापना, आम्ही खुशाल आहों, म्हणून आपल्या मातेला व पित्याला सांग. त्याचप्रमाणें पुरोहित व इतरहि जे कांहीं द्विजश्रेष्ठ असतील, त्यांना आणि महाधनुर्धारी राम-लक्ष्मण ह्यांनाहि कुशल सांग."

असें सांगितल्यानंतर उत्कृष्ट हत्ती, आश्चर्यकारक शंभर वस्त्रें, अजिनें आणि द्रव्य सत्कारपूर्वक केकयराजानें त्या भरताला दिलें. अंत:पुरामध्यें यत्नांनीं वाढविलेला, वीर्य आणि बल ह्यांमध्यें व्याघ्राची बरोबरी करणारा आणि मोठमोठ्या दाढांचा असा धिप्पाड कुत्रा देणगीदाखल त्याला दिला. तदनंतर दोन हजार मोहरा आणि सोळाशें घोडे इतकें धन त्या कैकेयीच्या पुत्राचा सत्कार करून केकयराजानें त्याला दिलें. त्या वेळीं बरोबर जाण्याकरितां आपणाला पसंत, विश्वासू आणि गुणी असे अमात्यहि अश्वपति केकयराजानें सत्वर भरताच्या स्वाधीन केले. ह्याप्रमाणें केकयराजानें देणगी दिल्यावर ऐरावतकुलांतील आणि इंद्रशिर नामक देशांतील असे दिसण्यांतहि मनोहर असलेले गज, आणि उत्कृष्ट रीतीचें सामानसुमान घातलेले शीघ्रगामी खर असें द्रव्य मातुलानेंहि त्याला दिलें; परंतु भरताला जाण्याची घाई असल्यामुळें केकयराजानें दिलेल्या त्या द्रव्याबद्दल त्यानें आनंद दर्शविला नाहीं. कारण दूतांच्या त्वरेमुळें आणि स्वप्न पाहिल्यामुळें त्याच्या अंत:करणाला फारच मोठी चिंता लागून राहिलेली होती.

असो. तो महावैभवशाली भरत आपल्या घरांतून बाहेर पडला; आणि पुरुष, गज व अश्व ह्यांनीं गजबजून गेलेल्या उत्कृष्ट राजमार्गावर आला. तदनंतर

आपल्या घरापासून राजवाड्यापर्यंत राजमार्गानें गेल्यावर त्यानें उत्कृष्ठ अंत:पुर अवलोकन केलें, आणि त्या अंत:पुरामध्यें तो वैभवशाली भरत मज्जाव न होतां गेला. तेथें जाऊन त्यानें मातामह व मातुल युधाजित् ह्यांचा निरोप घेतला. नंतर रथावर आरूढ होऊन तो शत्रुघ्नासहवर्तमान चालता झाला. रथ सत्वर वळवून घेण्याकरितां चार चक्रांच्या मध्यें असलेलें मंडलचक्र ज्या रथांत आहे, अशा आणखी शंभर रथांना उंट, बैल, घोडे व खेंचरें लावून अयोध्येला निघालेल्या भरताच्या मागोमाग सेवकहि चालते झाले. मातामहांनीं बरोबर दिलेले आत्मतुल्य अमात्य आणि सैन्य ह्यांनीं रक्षित असलेला तो महात्मा शत्रुरहित भरत, इंद्रलोकांतून निघणाऱ्या सिद्धाप्रमाणें शत्रुघ्नाला बरोबर घेऊन आपल्या मातामहाच्या घरांतून बाहेर पडला.

सर्ग एकाहत्तरावा.

भरताचें मार्गक्रमण.

राजगृहांतून पूर्वेकडे तोंड करून निघाल्यावर तो तेजस्वी व वीर्यवान भरत सुदामा नदी अवलोकन करून ती तरून गेला. तदनंतर जिचें पलीकडले तीर फार दूर आहे, व जिचा प्रवाह पश्चिमेकडे वहात जात आहे, अशी ऱ्हादिनी नदी, व नंतर शतद्रु नदी तो इक्ष्वाकुवंशज वैभवशाली भरत तरून गेला. नंतर ऐलधान गांवापाशीं तेथील नदी उतरून तो अपरपर्वत नामक देशाला गेला. नंतर आपल्या पात्रात पडलेली वस्तु पाषाणासारखी कठीण करून टाकणारी शिला नदी तरून जाऊन आग्नेय दिशेस असलेल्या शल्यकर्पण देशाला तो चालता झाला. तदनंतर शिलावहा नदी पहात पहात तिच्यामध्यें स्नान करून व शुचिर्भूत होऊन तो सत्यप्रतिज्ञ भरत मोठमोठे पर्वत ओलांडून चैत्ररथ वनाला गेला. नंतर तो एकदम गंगा आणि सरस्वती ह्यांच्या तीरावर—संगमस्थलीं—गेला. आणि वीरमत्स्य देशाच्या उत्तरेस असलेल्या देशांना गेल्यावर तो भारुड नामक वनामध्यें गेला. तदनंतर वेगानें युक्त आणि पर्वतांनीं व्याप्त अशी कुलिंगा नदी उतरल्यावर, यमुनेवर येऊन त्यानें आपल्या सैन्याचा तळ दिला. तेथें अश्वांचीं शरीरें उदकानें गार करून त्या श्रमलेल्या अश्वांना त्यानें विसांवा दिला. तेथें स्नानपान करून व तीर्थ-

बुद्धीनें यमुनेचें उदक बरोबर घेऊन तो पुढें चालता झाला. तदनंतर वायु ज्याप्रमाणें आकाशाचें अतिक्रमण करून जातो, त्याप्रमाणें प्रशस्त रथामध्यें बसून तो कल्याणसंपन्न राजकुमार भरत ज्या मध्यें लोक नेहमीं जात नाहींत, अशा अरण्यांतून निघून गेला. तदनंतर अंशुधान गांवापाशीं महानदी गंगा तरून जाण्याला दुर्घट आहे, असें समजून आल्यावर तो प्राग्वट म्हणून प्रसिद्ध असलेल्या नगराकडे सत्वर चालता झाला. प्राग्वट नगरासमीप गंगा उतरून तो कुटिकोष्टिका नदीसमीप गेला, आणि सैन्यासहवर्तमान ती नदी तरून गेल्यावर तो भरत धर्मवर्धन गांवाकडे चालता झाला. तोरण नामक गांवाच्या दक्षिण बाजूला असलेल्या जंबुप्रस्थ नामक गांवाला तो गेला, आणि तो दशरथपुत्र भरत वरूथ नामक रम्य ग्रामाकडे चालता झाला. तेथें रम्य वनामध्यें वास्तव्य केल्यावर प्राङ्मुख वळून, प्रियक नामक वृक्ष ज्या ठिकाणीं आहेत, अशा उज्जिहाना नामक नगरीच्या बागेंत तो गेला. प्रियक नामक वृक्षांसमीप आल्यावर शीघ्र गमन करणारे अश्व भरतानें आपल्या रथाला लाविले, आणि उज्जिहाना नगरीपासून आपला मुलूख जवळच असल्या-कारणानें भय बाळगण्याचें कारण नसल्यामुळें–तुम्ही मागून सावकाश या–अशी सैन्याला आज्ञा देऊन तो सत्वर पुढें चालता झाला. सर्वतीर्थग्रामामध्यें वास्तव्य करून तेथील उत्तरगामिनी नदी आणि इतरहि नद्या नानाप्रकारच्या डोंगरी अश्वांच्या योगानें तो तरून गेला. पुढें हस्तिपृष्ठक गांवाला आल्यानंतर कुटिका नदीहि तो ओलांडून गेला. नंतर लोहित्य गांवापाशीं कपीवती, एक-साल गांवापाशीं स्थाणुमती, आणि विनत गांवापाशीं गोमती अशा नद्या तरून तो पुरुषश्रेष्ठ भरत पुढें चालला. तदनंतर कलिंग नगरामध्यें सालवनापाशीं आल्यावर भरत सत्वर अयोध्येकडे आला असतां त्याचे घोडे अतिशय थकून गेले. तथापि तें वन रातोरातच सत्वर ओलांडून जाऊन अरुणोदयसमयीं मनु-राजानें वसविलेली अयोध्या नगरी त्यानें पाहिली.

अयोध्येच्या औदासीन्याविषयीं भरताची पृच्छा.

मार्गामध्यें सात रात्री राहिलेला तो पुरुषश्रेष्ठ भरत पुढें असलेल्या त्या अयोध्या नगरीकडे पाहून सारथ्याला म्हणाला, " हे सारथे, चांगल्या चांगल्या बागांनीं युक्त असलेली ही यशस्विनी अयोध्या मला आनंदित दिसत नाहीं. यथाविधि याग केलेल्या, गुणसंपन्न व वेदपारंगत समृद्ध ब्राह्मणांनीं जरी ही पुष्कळ अंशीं व्याप्त झालेली आहे, आणि राजर्षिश्रेष्ठांनीं जरी हिचें रक्षण केलें

आहे, तरी दुरून ती मला पांढऱ्या मृत्तिकेप्रमाणें निःसत्त्व दिसत आहे. अयोध्येमध्यें असलेल्या स्त्रीपुरुषांची पूर्वी मोठी प्रचंड गडबड सभोंवतीं ऐकूं येत असे, ती आज ऐकूं येत नाहीं. सायंकाळीं आंत प्रवेश करून व रात्रीं तेथें क्रीडा करून विसांवा घेतलेले पुरुष प्रातःकालीं इकडे तिकडे धावाधाव करूं लागले असतां त्यांच्या योगानें ज्या बागा पूर्वी सुशोभित दिसत असत, त्या आज विषयी पुरुषांनीं त्याग केलेल्या व मला पाहून रडत असल्यासारख्या दिसत आहेत. हें सर्व मला विपरीतच भासत असून ही नगरीहि मला अरण्यरूप झाल्यासारखी भासत आहे. रथ, गज अथवा अश्व ह्यांवरून आरूढ होऊन आंत जाणारे अथवा बाहेर येणारे श्रेष्ठ श्रेष्ठ लोक पूर्वीप्रमाणें ह्यांत दिसत नाहींत. लोकांच्या क्रीडा चालण्यास अत्यंत अनुकूल अशा ज्या बागा पूर्वी आनंदित भासत असत, त्या आतां सर्व प्रकारें मला आनंदरहित दिसत आहेत. इतकेंच नव्हे, परंतु त्या बागांच्या मार्गासमीप असलेले पर्णरहित वृक्षहि आक्रोश करीत असल्यासारखे दिसत आहेत. अतिशय अस्पष्ट रीतीनें अनुरागयुक्त मधुर शब्द करणाऱ्या मत्त पशुपक्ष्यांचा ध्वनि अद्यापि—सूर्योदय झाला असतांहि व आम्ही अगदीं जवळ आलों असतांहि—ऐकण्यांत येत नाहीं. चंदन आणि अगुरु ह्यांनीं मिश्र असलेला, धूपानें व्याप्त झालेला व निर्मल आणि टवटवी आणणारा असा वायु पूर्वीप्रमाणें आज कां बरें वहात नाहीं? नगारे, मृदंग आणि वीणा ह्यांचा ध्वनि पूर्वी खेदनाशक तालानें युक्त असलेला अनुभवाला येत असे, तो आज कां बरें बंद झाला आहे? अनिष्टसूचक असे नानाप्रकारचे क्रूर शकुन मला होत असून वामनेत्रस्फुरणादि अशुभसूचक चिन्हेंहि होत आहेत. ह्यामुळें माझें मन खिन्न होत आहे. सूता, माझ्या माणसांचें सर्वथा कुशल असणें दुर्लभ आहे. असें जर न म्हणावें, तर कांहींएक कारण नसतांना माझ्या मनाला कां बरें असा खेद वाटावा?"

ह्याप्रमाणें सारथ्याला सांगितल्यानंतर दीन, खिन्न, त्रस्त आणि अंतःकरण क्षुब्ध झालेला भरत इक्ष्वाकुवंशजांनीं परिपालन केलेल्या अयोध्या नगरीमध्यें सत्वर प्रविष्ट झाला. ज्याचे अश्व थकून गेले आहेत, असा तो भरत वैजयंत नामक वेशीनें नगरीमध्यें प्रवेश करूं लागला असतां, वेशींतील द्वारपालांनीं विजयप्रश्न केल्यावर तो त्यांच्याबरोबर नगरीमध्यें गेला. तदनंतर चित्त स्वस्थ नसलेला तो रघुवंशज भरत त्या द्वारपालांना सन्मानपूर्वक परत पाठवून अश्वपति केकयराजाच्या दमलेल्या सारथ्याला म्हणाला, "हे निष्पापा, कारणाशिवाय मला येथें सत्वर कां बरें आणिलें? माझ्या मनाला कांहीं अशुभाची शंका येत

असून माझें धैर्य वगैरेहि गळत चाललें आहे. कारण राजांचा नाश झाला असतां जे प्रकार होत असल्याचें मीं पूर्वी ऐकिलें आहे, ते सर्व मला दिसत आहेत. सडासंमार्जन नसल्यामुळें कुटुंबी लोकांचीं घरें भयंकर दिसत आहेत, त्यांचीं दारें अस्ताव्यस्त उघडींच पडलीं आहेत व कसल्याहि प्रकारची शोभा त्यांना राहिलेली नाहीं. ह्या घरांतून कोठें पूजाअर्चा चाललेली दिसत नाहीं. धूपांचा सुगंधहि ह्यांतून येत नाहीं. आंतील कुटुंबेंहि जेवल्यासारखी दिसत नाहींत. आंतील लोक निस्तेज दिसत आहेत, आणि म्हणूनच हीं कुटुंबी लोकांचीं घरें मला लक्ष्मीरहित वाटत आहेत. त्याचप्रमाणें पुष्पांची शोभा नाहींशी झाली असून आंतील पटांगणेंहि झाडलीं नसल्यामुळें हीं शून्य देवालयें पूर्वीप्रमाणें दिसत नाहींत. देवतांच्या पूजा बंद झाल्यासारख्या दिसत आहेत, आणि यज्ञशाळाहि यज्ञरहित दिसत आहेत. पुष्पांच्या बाजारामध्यें पुष्पांच्या वस्तु मांडिलेल्या आज दिसत नाहींत, आणि व्यापारी लोकहि पूर्वीप्रमाणें आज येथें आढळत नाहींत. खरेदीविक्री वगैरे व्यापार नाहींसा झाल्यामुळें लोकांनीं आपापलीं दुकानें लाविलेलीं आहेत, आणि मनामध्यें चिंताक्रांत होऊन दीन झालेले हे लोक देवलयांतून व पारांवरून दृष्टीस पडत असून, नगरींतील पशुपक्षीहि दीन झालेले दिसत आहेत. सारांश, स्त्रीपुरुषांसहवर्तमान नगरांतील लोक मलिन, अश्रुपूर्ण नेत्रांनीं युक्त, दीन, चिंताक्रांत व कृश दिसत असून सर्वहि प्रजाजनांना हुरहूर लागल्यासारखी दिसत आहे."

अशा प्रकारें मनामध्यें खिन्न झालेला तो भरत त्या सारथ्याला सांगून, आणि तीं अनिष्टसूचक चिन्हें अवलोकन करून राजवाड्याकडे गेला. सारांश, इंद्राच्या अमरावती नगरीप्रमाणें असलेल्या त्या आपल्या अयोध्या नगरींतील चौक, घरें, आणि मार्ग अगदीं सामसूम झाले आहेत, आणि आंतील दरवाजेहि मळानें काळवंडून गेले आहेत, असें अवलोकन केल्यावर त्या भरताला अतिशय दुःखाचें भरतें आलें. पूर्वी आपल्या नगरामध्यें कधींहि दृष्टोत्पत्तीस न आलेले असे अप्रिय प्रकार पाहून त्यानें खालीं मान घातली, आणि मनामध्यें खिन्न झालेला तो हर्षरहित महात्मा आपल्या पित्याच्या गृहामध्यें प्रविष्ट झाला.

सर्ग बहात्तरावा.

भरताला वृत्तकथन.

पितृगृहीं गेल्यावर तेथें पिता दृष्टीस पडत नाहीं असें पाहून, मातेचें दर्शन घेण्याकरितां भरत मातेच्या घरीं गेला. तेव्हां परगांवीं गेलेला आपला पुत्र परत आलेला पहातांक्षणीं कैकेयी आनंदित झाली, आणि सुवर्णमंचक सोडून देऊन त्याच्याकडे धावली. आंत प्रविष्ट होतांक्षणींच शोभारहित झालेलें मातृगृह अवलोकन करून त्या धर्मात्म्या भरतानें आपल्या मातेचे पवित्र चरण धरिले. तेव्हां त्याच्या मस्तकीं अवघ्राण करून कैकेयीनें त्या यशस्वी भरताला आलिंगन दिलें, आणि त्याला मांडीवर घेऊन ती त्याला विचारूं लागली, "आजोबांच्या घरून निघून आज तुला किती दिवस झाले? रथांत बसून धांवपळ करीत सत्वर आल्यामुळें तुला प्रवासाचे श्रम झाले नाहींत ना? तुझे आजोबा व तुझा मामा युधाजित् हे चांगले कुशल आहेत ना? तूं येथून प्रवासाला गेल्यापासून आजोळीं तुला सुख झालें किंवा नाहीं? भरता हें सर्व मला तूं सांग."

ह्याप्रमाणें कैकेयीनें विचारिलें असतां त्या कमलनयन राजकुमार भरतानें आपल्या मातेला सर्व कांहीं प्रिय वृत्तांत कथन केला. तो म्हणाला, "आजोबांच्या घरून मी निघाल्याला आज सातवा दिवस. माझे आजोबा व मामा युधाजित् हे खुशाल आहेत. शत्रुतापन केकयराजानें जें धन व रत्नें मला दिलीं होतीं, तीं ओढून आणणारीं वाहनें मार्गांत थकून गेलीं आणि म्हणून मीं पुढें निघून आलों. सारांश, राजाचा निरोप घेऊन येणाऱ्या दूतांनीं त्वरा केल्यामुळें मी आलों आहें. तेव्हां मला जें विचारावेसें वाटतें, तें मातेनें सांगावें. हा तुझा शयन करण्याचा सुवर्णभूषित पलंग आज शून्य दिसत आहे, आणि इक्ष्वाकुकुलांतील हे लोकहि आज मला आनंदित दिसत नाहींत. येथें मातेच्या घरामध्येंच प्रायः राजा असतो, परंतु आज त्याचें दर्शन घेण्याकरितां मी येथें आलों असतांना तो कोठें माझ्या दृष्टीस पडत नाहीं. मला आधीं पित्याचे पाय धरावयाचे आहेत. तेव्हां तो कोठें आहे, हें मी विचारीत आहें, तें मला सांग. ज्येष्ठ माता कौसल्येचे घरीं का तो आहे?"

ह्याप्रमाणें त्यानें विचारिलें असतां, राज्यलोभानें मोहित झालेली व सर्व कांहीं जाणीत असलेली ती कैकेयी, पूर्वीं घडलेला वृत्तांत जाणीत नसलेल्या त्या भरताला घोर आणि अप्रिय असलेलाहि तो वृत्तांत प्रिय असल्यासारखा सांगूं लागली.

ती म्हणाली, 'सर्व प्राण्यांची जी वाट होत असते, तीच वाट तेजस्वी, यज्ञशील व महात्म्या अशा तुझ्या भूपति पित्याची झाली आहे.'

मातेचे तें भाषण श्रवण करितांक्षणीं, आचरणानें पवित्र व धर्मनिष्ठ वंशांत उत्पन्न झालेला तो भरत पितृशोकाच्या वेगानें घेरून जाऊन एकाएकीं भूमीवर पडला. अशा प्रकारें 'हाय हाय! माझा घात झाला' असे करुणा उत्पन्न करणारे दीन शब्द उच्चारीत उच्चारीत तो महापराक्रमी वीर्यवान भरत हात आपटून भूमीवर पडला असतां, पितृमरणानें दुःखित झाल्यामुळें शोकाकुल होऊन अनवस्थित आणि व्याकुल चित्तानें युक्त झालेला तो महातेजस्वी भरत विलाप करूं लागला कीं, "मेघ निघून गेल्यावर चंद्राच्या योगानें रात्रीं शोभणाऱ्या निर्मल आकाशाप्रमाणें जी ही माझ्या पित्याची शय्या अत्यंत मनोहर दिसत असे, ती आज चंद्ररहित आकाशाप्रमाणें अथवा शुष्क सागराप्रमाणें निस्तेज दिसत आहे." मनामध्यें अतिशय दुःखित झालेला तो विजयिश्रेष्ठ भरत वस्त्रानें आपलें सुंदर मुख आच्छादित करून आणि रडत रडत अश्रू ढाळून ह्याप्रमाणें विलाप करूं लागला. तेव्हां कुऱ्हाडीनें तुटून जाऊन वनामध्यें पडलेल्या शाल-वृक्षाच्या खोडाप्रमाणें दुःखाकुल होऊन भूमीवर पडलेल्या देवतुल्य भरताला अवलोकन केल्यावर, गतीनें गजतुल्य आणि तेजानें चंद्रसूर्यांसमान असलेल्या आपल्या पुत्राला भूमीवरून उठवून कैकेयी त्याला म्हणाली, "हे महाकीर्तिमान राजा, ऊठ, ऊठ, असा येथें पडलास कां? अरे, सभेमध्यें संमत असलेले तुझ्यासारखे सज्जन शोक करीत नसतात. हे बुद्धिमान पुत्रा, दान व यज्ञ ह्यांकडेच असलेली तुझी बुद्धि, ज्याप्रमाणें सूर्याची प्रभा सूर्यमंडलाला अनुसरून असते, त्याप्रमाणें सद्वर्तन, विद्या व तप ह्यांना अनुसरून आहे."

ह्याप्रमाणें कैकेयीनें सांगितलें असतांहि अनेक प्रकारच्या शोकांनीं व्याकुल झालेला तो भरत पुष्कळ वेळपर्यंत रडून आणि भूमीवर लोळून आपल्या मातेला म्हणाला, "तेथें दूत जेव्हां मला त्वरेनें आणूं लागले, तेव्हां राजा रामाला राज्याभिषेक तरी करीत असला पाहिजे किंवा यज्ञ तरी करीत असला पाहिजे, असा मीं मनामध्यें संकल्प केला आणि आनंदित होऊन येथें निघून आलों; परंतु तें हें सर्वच विपरीत झाल्यामुळें माझें मन विदीर्ण होऊन गेलें आहे. कारण नेहमीं प्रिय आणि हित करण्याविषयीं रत असलेला पिता आज माझ्या दृष्टीस पडत नाहीं. माते, मी येथें नसतांना कोणत्या रोगानें राजा गेला बरें?

ज्यांनीं आपल्या पित्याचा स्वतः संस्कार केला, ते रामप्रभृति धन्य होत. त्या कीर्तिमान महाराजाची आज खरोखर वार्ताच नाहीं. नाहीं तर माझें मस्तक लववून पित्यानें सत्वर माझें मस्तकीं अवघ्राण केलें असतें. धुळीनें मी भरून गेलों असतां झाडून टाकणारा व स्पर्श झाला असतां सुखदायक वाटणारा तो उत्कृष्ठ कर्म करणाऱ्या पित्याचा हात कोठें आहे? जो माझा भ्राता, पिता व बंधु असून ज्याचा मी दास म्हणून ठरलेलें आहे, त्या उत्कृष्ठ कर्म करणाऱ्या रामाला मी आल्याचें सत्वर निवेदन कर. कारण धर्मवेत्त्या सभ्य पुरुषाचा ज्येष्ठ भ्राता हाच पिता होय. तेव्हां मी त्याचे पाय धरीन. आतां तोच माझा आधार आहे. माते, धर्मशील, महाभाग्यवान, स्वीकारिलेलें व्रत निश्चयपणें चालविणारा आणि अमोघ पराक्रमी असा माझा पिता काय म्हणाला? माझ्या संबंधानें जो कांहीं त्याने चांगला निरोप सांगितला असेल, तो श्रवण करण्याची माझी इच्छा आहे."

ह्याप्रमाणें भरतानें विचारिलें असतां कैकेयी त्याला खरें खरें सांगूं लागली कीं, "'हे रामा, हे सीते, अरे लक्ष्मणा' असा विलाप करीत करीत बुद्धिमानांत श्रेष्ठ असलेला तो महात्मा भूपति परलोकीं गेला. पाशांनीं बद्ध झालेल्या महागजाप्रमाणें मरणधर्मानें ग्रस्त झालेल्या तुझ्या पित्यानें 'सीतेसहवर्तमान आलेल्या रामाला आणि परत आलेल्या महापराक्रमी लक्ष्मणाला जे पुरुष अवलोकन करतील, ते धन्य होत' असेंहि शेवटलें भाषण केलें आहे."

हें कैकेयीचें भाषण ऐकून दुसरी अप्रिय गोष्ट तिनें सांगितल्यामुळें तो खिन्न झाला, आणि दीनवदन होऊन पुनरपि मातेला म्हणाला, "कौसल्येचा आनंद वृद्धिंगत करणारा तो धर्मात्मा राम, भ्राता लक्ष्मण आणि सीता ह्यांसह सध्यां कोठें गेला आहे?"

भरतानें असें विचारिलें असतां, आपण सांगणार ही गोष्ट भरताला मोठी प्रिय होईल, ह्या उद्देशानें त्याची माता दुसरें एक अप्रिय वृत्त त्याला यथायोग्य रीतीनें एकदम सांगूं लागली कीं, "हे पुत्रा, राजकुमार राम लक्ष्मणासहवर्तमान सीतेला बरोबर घेऊन आणि वल्कलें परिधान करून दंडक नामक महावनामध्यें गेला."

हें श्रवण करून, भ्रात्याच्या वर्तनाविषयीं शंका आल्यानें भरत त्रासून गेला. आणि आपल्या वंशाचा मोठेपणा मनांत आणून तिला विचारूं लागला, "रामानें कोणा एकाद्या ब्राह्मणाचें धन तर हरण केलें नाहीं ना?

अथवा एकाद्या निरुपद्रवी धनाढ्याचा किंवा गरिबाचा त्यानें प्राण तर घेतला नाहीं ना? किंवा एकाद्या परस्त्रीवर तर डोळा ठेविला नाहीं ना? त्या माझ्या भ्रात्या रामाला दंडकारण्यामध्यें कशाकरितां हांकून दिलें आहे?"

ह्याप्रमाणें महात्म्या भरतानें प्रश्न केला असतां, स्वतःला विनाकारण शहाणी समजत असलेली आणि उतावीळ झालेली त्याची माता कैकेयी आनंदित होऊन तें सर्व कर्म त्याला इत्थंभूत सांगूं लागली.

राज्य स्वीकारण्यविषयीं कैकेयीचा भरताला उपदेश.

ती म्हणाली:—"रामानें कोणाच्याहि ब्रह्मस्वाचा अपहार केला नाहीं. त्यानें निरपराधी अशा धनाढ्य पुरुषाचा अथवा दरिद्र्याचा प्राणहि घेतला नाहीं. परस्त्रीकडे तर राम कधीं नेत्रांनीं पहात देखील नाहीं. परंतु त्याला येथें अभिषेक होणार हें ऐकतांक्षणीं तुला राज्य आणि रामाला वनवास हे दोन वर मीं तुझ्या पित्यापासून मागून घेतले. दिलेलें वचन खरें करणें ह्या आपल्या वर्तनाचें अवलंबन करून तुझ्या पित्यानें तसें केले. म्हणून लक्ष्मण व सीता ह्यांसहवर्तमान राम दंडकारण्यांत निघून गेला. तेव्हां आपला प्रिय पुत्र दृष्टीआड झाल्यामुळें पुत्रशोकानें अगदी खंगून गेलेला तो महाकीर्तिमान भूपति मृत्यु पावला. आतां हे धमज्ञ, तूं राजपदाचा स्वीकार कर. तुझ्याचकरितां मीं हा सर्व अशा प्रकारचा खटाटोप केला आहे. आतां शोक व संताप न करितां धैर्याचें अवलंबन कर. अयोध्या नगरी आणि हें निष्कंटक राज्य हीं दोन्ही तुझ्या अधीन आहेत. तस्मात् बाबारे, शास्त्रज्ञ अशा वसिष्ठप्रभृति द्विजश्रेष्ठांसहवर्तमान तूं महात्म्या राजाचा यथाविधि और्ध्वदेहिक संस्कार कर, व आपल्याला पृथ्वीचा राज्याभिषेक करून घे.

सर्ग त्र्याहात्तरावा.

भरताचा कैकेयीवर कोप.

पित्याचें मरण आणि भ्रात्यांना वनवासांत घालवून देणें, हें ऐकून दुःखानें संतप्त झालेला तो भरत कैकेयीला म्हणाला, " पिता आणि पितृतुल्य भ्राता ह्यांचा वियोग होऊन सर्वस्वी घात झाल्यामुळें शोक करीत बसलेल्या मला आतां ह्या जगतामध्यें राज्याशीं काय कर्तव्य आहे? राजाला मारून आणि रामाला तापस बनवून तूं माझ्या दुःखावर डाग दिलेला आहेस, आणि व्रणावर क्षार

घातला आहेस. आमच्या कुलाचा घात करण्याकरितां तूं एक कालरात्रच प्राप्त झाली आहेस. तुला आलिंगन दिल्यानें, स्वतःला दग्ध करून टाकणाऱ्या अंगाराला आपण कवटाळीत आहों हें माझ्या पित्याला समजलें नाहीं. हे पापिणि, तूं माझ्या राजाला मृत्यु आणिलास. हे कुलकलंकिनि, तूं मोहामुळें ह्या कुलांतील सुखावर धाड आणिलीस. माझा सत्यप्रतिज्ञ व महाकीर्तिमान पिता दशरथ तुझें अवलंबन केल्यामुळें दुःसह दुःखानें संतप्त होऊन मृत्यु पावला. माझ्या धर्मवत्सल महाराज पित्याचा तूं कां नाश केलास! रामाला तूं कशाकरितां वनामध्यें पाठविलेंस! आणि तो तरी कां म्हणून वनामध्यें गेला! तुझ्याशीं प्रसंग पडल्यावर पुत्रशोकानें संतप्त झालेल्या कौसल्या व सुमित्रा जर जिवंत रहातील म्हणावें, तर तेंहि दुर्लभ दिसतें. खरोखर वडिलांशीं कसें वागावें हें जाणणारा धर्मात्मा श्रेष्ठ राम कौसल्या मातेप्रमाणें तुझ्याशीं उत्कृष्ट रीतीनें वागत होता; आणि ती दूरवर विचार करून पहाणारी माझी ज्येष्ठ माता कौसल्याहि धर्माचें अवलंबन करून तुझ्याशीं अगदीं बहिणीप्रमाणें वागत असते. तेव्हां हे पापिणी, तिच्या महात्म्या पुत्राला झाडाच्या सालीं व वल्कलें परिधान करावयास लावून अरण्यांत पाठविल्यानंतर तुला वाईट कसें वाटत नाहीं! वाईट गोष्ट मनामध्येंहि न आणणारा, शूर, जितेंद्रिय आणि यशस्वी अशा रामाला चीर वस्त्रें परिधान करावयाला लावून अरण्यांत हांकून दिल्यावर तुला काय बरें फलप्राप्ति दृष्टीस पडत आहे! रामाशीं माझें वर्तन कसें आहे, हे राज्यलुब्ध झालेल्या तुला समजलें नाहीं, असें मला वाटतें. खरोखर राज्याकरितां तूं हा मोठा अनर्थच उत्पन्न केला आहेस. पुरुषश्रेष्ठ राम-लक्ष्मण दृष्टीस पडत नसतांना कोणत्या शक्तीच्या प्रभावानें राज्य रक्षण करण्याचा मी उत्साह धरूं? मेरु पर्वत ज्या प्रमाणें स्वतः उत्पन्न केलेल्या मेरु वनावरच स्वरक्षणार्थ अवलंबून राहिलेला असतो, त्याचप्रमाणें धर्मात्मा महाराज त्या महातेजस्वी बलाढ्य रामावरच नेहमीं अवलंबून रहात होता. तेव्हां मोठमोठ्या धुरीच्या बैलांनीं उचलिलेलें जूं ज्याप्रमाणें वांसराच्या मानेवर ठेविलें असतां त्याला तें सहन करितां येत नाहीं, त्याचप्रमाणें हा राज्यभार मी कोणत्या बलानें सहन करूं? अथवा योगसाधनांनीं किंवा बुद्धिसामर्थ्यानें जरी मला राज्य हांकण्याची शक्ति आली, तरी पुत्राकरितां राज्याचा अभिलाष करणाऱ्या तुझा मनोरथ मी कधींहि सिद्धीस नेणार नाहीं. राम जर तुला नेहमीं मातेप्रमाणें मानीत नसता, तर दुष्ट हेतु मनांत धरून असलेल्या तुझा त्याग

करण्यास मला कधींच शंका आली नसती; परंतु राम तुला स्वतःच्या माते-प्रमाणें समजत आहे, तेव्हां तुझा मी त्याग केला असतां त्यालाहि दुःख होणार, म्हणून येथें माझा निरुपायच झाला आहे. तूं सदाचरणापासून भ्रष्ट झालेली आहेस. आमच्या पूर्वजांनीं निंद्य मानिलेला हा कनिष्ठाला राज्याभिषेक करण्याचा विचार तुझ्या मनामध्यें आला कसा? ह्या कुलामध्यें जो सर्वांमध्यें ज्येष्ठ असेल, त्यालाच राज्याचा अभिषेक होत असतो; आणि दुसरे कनिष्ठ भ्राते त्याच्या अधीन होऊन वागत असतात. चांडाळणी, तूं राजधर्म जाणीत आहेस, असें मला वाटत नाहीं. आणि राजधर्माचें निश्चित फलहि तुला विदित आहे, असें दिसत नाहीं. राजकुमारांमध्यें जो ज्येष्ठ असेल, त्यालाच नेहमीं राज्याभिषेक होत असतो, ही गोष्ट सर्व राजांना सारखीच लागू असून इक्ष्वाकुकुलांतील राजांमध्यें तर विशेषेंकरून हा नियमच आहे. केवळ धर्मा-नेंच ज्यांचें रक्षण झालेलें आहे, आणि कुलपरंपरागत आलेल्या आचारानेंच ज्यांना शोभा आलेली आहे, त्यांचा सद्वर्तनसंबंधीं गर्व तुझ्याशीं प्रसंग पड-ल्यामुळें आज नाहींसा झाला. हे महाभाग्यवती! केकयराजाच्या कुलाचा मूळ पुरुष जनेंद्र होता, तेव्हा अशा कुलामध्यें तूं उत्पन्न झाली असूनहि सज्जनांनीं निंद्य असा हा बुद्धिभ्रम तुला कसा झाला? हे दुष्टबुद्धि, मी तुझी इच्छा कधींहि परिपूर्ण करणार नाहीं. तूं माझ्या जीविताचा अंत करणारें संकट उत्पन्न केलें आहेस. हा मी आतांच्या आतांच तुझें अप्रिय करण्याकरितां स्वजनांना प्रिय असलेल्या आपल्या भ्रात्याला वनांतून परत आणितों. रामाला परत आणिल्यावर त्या उज्ज्वल तेजस्वी ज्येष्ठ भ्रात्याचा मी अगदीं स्वस्थ मनानें दास होऊन राहीन."

अप्रिय वाक्यसमुदायांनीं त्या कैकेयीला दुःख देणारा तो शोकाकुल झालेला महात्मा भरत ह्याप्रमाणें तिला बोलून मंदर पर्वताच्या गुहेंतील सिंहाप्रमाणें आणखी गर्जना करूं लागला.

सर्ग चौऱ्याहत्तरावा.

कैकेयीचा धिक्कार.

याप्रमाणें त्या मातेची निंदा केल्यावर अतिशयच क्रुद्ध झालेला तो भरत पुनरपि तिला म्हणाला, "हे कैकेयी, हे दुष्टे, हे दुराचारिणि, जा, तूं वनांत

चालती हो. धर्मानें तुझा त्याग केला आहे. तेव्हां तूं आतां मृत झालेल्या माझ्या पित्याबद्दल कधीं रडूं नको. त्याच्याशीं तुझें आतां भार्येचें नातें राहिलेलें नाहीं. ज्यांना मृत्यु आणि वनवास तुझ्याकरितां एकदम प्राप्त झाले आहेत, त्या रामानें अथवा अत्यंत धार्मिक राजानें तुझें काय वाईट केलें होतें? ह्या कुलाचा नाश केल्यामुळें तुला ब्रह्महत्येचें पातक लागलेलें आहे. तस्मात् हे कैकेयि, तूं नरकांत जा. पित्याला प्राप्त झालेल्या लोकाला जाऊं नको. घोर कर्मानें सर्व लोकांना प्रिय असलेल्या रामाचा त्याग करून हें जें ब्रह्महत्येसारखें पातक तूं केलें आहेस, त्याच्या योगानें मलाहि तूं मोठें भयच उत्पन्न करून ठेविलें आहेस. कारण रामाच्या वनवासाला आणि राजाच्या मरणाला तूंच कारण असल्यामुळें तुझ्या हातून महापातक घडलें आहे. आणि महापातक केलेल्या तुझ्या संसर्गानें मलाहि महापातकाचाच दोष लागणार आहे. तुझ्याकरितां माझा पिता मृत्यु पावला असून रामानें वनाचें अवलंबन केलें आहे, आणि ह्यामुळें ह्या जगतामध्यें तूं माझी अपकीर्ति केलेली आहेस. हे राज्याभिलाषिणि, हे दुराचारिणि, हे पतिघातिनि, मातेच्या रूपानें तूं माझ्याशीं शत्रुत्व करणारी आहेस. तूं माझ्याशीं भाषणहि करीत जाऊं नको. तुज कुलकलंकिनीशीं प्रसंग पडल्यामुळें कौसल्या, सुमित्रा आणि इतरहि माझ्या माता मोठ्या दुःखानें व्याप्त झाल्या आहेत. त्या विचारी धर्मराज अश्वपति राजाची मुलगी तूं खरी कन्याच नव्हेस. आपल्या पित्याच्या कुलाचा घात करण्याकरितां तूं राक्षसीच त्या कुलामध्यें अवतीर्ण झाली आहेस. कारण नित्य सत्यावलंबन करून असणाऱ्या धर्मनिष्ठ वीर रामाला तू वनांत घालविलेंस, आणि माझा पिताहि तूं येथून स्वर्गाला पोहोंचविलास; परंतु ज्याच्याकरिता तूं हें पातक केलेंस, त्या माझे ठिकाणीं तें तुझें पातक फलद्रूप झालें. कारण पित्याचा मला वियोग झाला, आणि भ्रात्यानींहि माझा त्याग केल्यामुळें सर्व लोकांना मी अप्रिय होऊन बसलों. हे दुष्टबुद्धि, धर्माला अनुसरून वागणाऱ्या कौसल्येला पतीचा व पुत्राचा वियोग करून आज तुला कोणता लोक प्राप्त होणार आहे? तूं नरकांत जाणार, हें दिसतेंच आहे. हे क्रूरे कैकेयि, बंधूंचा ठरीव आश्रय आणि कौसल्येचा औरस पुत्र राम माझा ज्येष्ठ भ्राता असल्यामुळें मला पित्यासमान आहे, हें तुला ठाऊक नाहीं का? अंगप्रत्यंगापासून होणारा पुत्र हृदयापासून होत असल्यामुळें मातेला तो अतिशय प्रिय असतो, आणि

बांधव हे साधारणच प्रिय असतात. सारांश, औरसपुत्राचें वियोगदुःख तिला झाल्यामुळें तें अत्यंत दुःसह आहे."

सुरभीची पुत्रवात्सल्यदर्शक गोष्ट.

भरत म्हणतो:-"असें सांगतात कीं, एकदां देवसंमत असलेल्या धर्मज्ञ सुरभीनें भान नाहींसें होऊन गेलेले आपले दोन पुत्र (बैल) पृथ्वीवर अवलोकन केले. दोन प्रहर उलटून जाईतोंपर्यंत नांगर ओढतां ओढतां थकलेले ते पुत्र भूतलावर अवलोकन केल्यावर पुत्रशोकानें अश्रूंनीं नेत्र व्याप्त होऊन ती रडूं लागली. तेव्हां महात्मा देवराज इंद्र खालून जात असतांना त्याच्या शरिरावर ते तिचे सुगंधि सूक्ष्म अश्रुबिंदु पडले. नंतर इंद्र वर पाहूं लागला तों आकाशामध्यें स्थित असलेली कामधेनु सुरभि अत्यंत दुःखित व दीन होऊन रडत बसली आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां ती यशस्विनी कामधेनु शोकाकुल झालेली पाहून उद्विग्न झालेला देवराज वज्रपाणि इंद्र हात जोडून तिला म्हणाला, 'आम्हांला कोठून मोठें भय तर प्राप्त झालें नाहीं ना? हे सर्व लोकहितैषिणि, तुझा शोक कशाकरितां आहे, तें मला सांग.'

ह्याप्रमाणें बुद्धिमान देवराजानें सुरभीला विचारिलें असतां, संभाषण करण्यामध्यें निपुण असलेली ती कामधेनु त्याला म्हणाली, 'इडापिडा टळो. हे देवराजा, तुम्हांला कोठूनहि यत्किंचित् सुद्धां भय नाहीं; परंतु संकटांत सांपडून दुःखमग्न झालेल्या दोन पुत्रांना अवलोकन करून मी शोक करीत आहें. हे माझे पुत्र (बैल) आधींच कृश व दीन झाले असून सूर्यकिरणांचा त्यांना ताप झालेला आहे, आणि दुष्ट शेतकरी त्यांना मारीत आहेत. हे माझ्या शरिरापासून उत्पन्न झालेले पुत्र मारानें पीडिल्यामुळें दुःखित झाले आहेत. त्यांना अवलोकन करून मी शोक करीत आहें. कारण पुत्रासारखा कोणी प्रिय नाहीं.'

जिच्या हजारों पुत्रांनीं हें संपूर्ण जगत् व्याप्त झालें आहे, अशी ती कामधेनु दोघां पुत्रांकरितां रडतांना पाहिल्यापासून, इंद्रालाहि पुत्रापेक्षां कांहीं अधिक आहे, असें वाटेनासें झालें. आपल्या शरिरावर झालेला तो सुगंधी अश्रुपात अवलोकन करून देवराज इंद्र जगतामध्यें त्या कामधेनूला सर्वोत्कृष्ट समजूं लागला."

भरत पुढें म्हणतो:-"सर्वांशीं सारखें असें जिचें अप्रतिम वर्तन आहे, सत्य हा जिचे ठिकाणीं मुख्य गुण आहे, व वाटेल ती कामना परिपूर्ण करण्याचें जिचें सामर्थ्य आहे, अशा त्या कामधेनूचें-जगताचें परिपालन करण्याच्या उद्देशानें सर्वमान्य असलेल्या ग्राम्यधर्मसेवनाच्या द्वारानें प्राप्त झालेले-हजारों पुत्र

असतांना ती कामधेनु सुद्धां दोघां पुत्रांकरितांहि जर शोक करिते, तर एकुलत्या एक रामाचा वियोग झालेली कौसल्या जिवंत राहील, ही गोष्ट तरी कशाला पाहिजे? जिला एकच पुत्र आहे, अशा ह्या साध्वी कौसल्येला तूं पुत्ररहित करून टाकिलें आहेस. तस्मात् इहलोकीं आणि मेल्यानंतरहि तुला नेहमीं दुःखच प्राप्त होत जाईल. कोसलदेशाधिपति महाबलाढ्य व महापराक्रमी रामाला येथें आणवून मी स्वतःच मुनींनीं आश्रय केलेल्या वनामध्यें प्रवेश करीन. अशा प्रकारें भ्रात्याच्या व पित्याच्या ह्या ऋणांतून मुक्त होऊन आपली कीर्ति वृद्धिंगत करीन, ह्यांत संशय नाहीं. परंतु हे दुष्टबुद्धे पापिणि, अश्रूंनीं ज्यांचे कंठ दाटून आले आहेत. असे नगरांतील लोक माझ्याकडे पाहूं लागले असतां तूं केलेलें हें पातक सहन करण्यास मी समर्थ नाहीं. ह्या पातकाची निष्कृति होण्याकरितां तूं हवी तर अग्नीमध्यें प्रवेश कर, पाहिजे तर स्वतःच दंडकारण्यांत चालती हो, अथवा गळ्याला फांस लावून मर. ह्यावांचून आतां तुला दुसरी गति नाहीं. कारण असल्या महापातकाला असलेंच प्रायश्चित्त अवश्य आहे. अमोघ पराक्रमी राम राज्यावर आला म्हणजे तुझ्यामुळें मला लागलेला हा कलंक नाहींसा होऊन मीहि कृतकृत्य होईन."

ह्याप्रमाणें विलाप करून बरच्या व अंकुश ज्याला टोंचले आहेत अशा अरण्यांतील गजाप्रमाणें अत्यंत क्रुद्ध झालेला तो भरत भुजंगाप्रमाणें सुस्कारे टाकीत टाकीत भूमीवर पडला. त्याचे नेत्र लाल झाले होते, वस्त्रें सैल झालीं होतीं, अंगावरील सर्व भूषणें अस्ताव्यस्त होऊन गेलीं होतीं, आणि ह्यामुळें तो शत्रुतापन राजकुमार उत्सव आटोपल्यानंतर खालीं पाडून ठेविलेल्या इंद्रध्वजाप्रमाणें दिसत होता.

सर्ग पंचाहत्तरावा.

भरतकौसल्यासंवाद.

बऱ्याच वेळानें शुद्धीवर येऊन उठल्यानंतर अश्रूंनीं भरून आलेल्या नेत्रांच्या योगानें त्या दीन मातेकडे पाहून तो भरत अमात्यांमध्येंहि आपल्या मातेची निंदा करूं लागला. तो म्हणाला, "राज्याची मला कधींहि इच्छा नाहीं, व मी आपल्या मातेशीं कधीं भाषणहि करणार नाहीं. राजानें जो माझा राज्याभिषेक

ठरविला असेल, तो मला ठाऊक नाहीं. शत्रुघ्नासहवर्तमान मी त्या वेळीं येथून दूर असलेल्या अशा प्रदेशामध्यें होतों. महात्म्या रामाच्या वनवास मी जाणीत नाहीं, आणि सीतेला व लक्ष्मणाला कां हांकून दिलें, हेंहि मला माहीत नाहीं."

ह्याप्रमाणें तो महात्मा भरत पूर्वींप्रमाणेंच आक्रोश करूं लागला असतां, त्याचा शब्द ऐकून कौसल्या सुमित्रेला म्हणाली, 'क्रूर कर्म करणाऱ्या कैकेयीचा पुत्र आला आहे, तेव्हां दूरवर विचार करणाऱ्या त्या भरताला पहाण्याची मला इच्छा आहे.'

ह्याप्रमाणें त्या सुमित्रेला सांगून, 'निस्तेज मुखानें युक्त, कृश आणि कांहीं सुचेनासें झालेली कौसल्या जिकडे भरत होता, तिकडे कांपत कांपत चालली. तेव्हां तो राजपुत्र भरतहि शत्रुघ्नासहवर्तमान कौसल्येच्या घराला जाणाऱ्या मार्गानें तिच्याकडे निघाला. तदनंतर दुःखित झालेले भरतशत्रुघ्न दुःखाकुल झाल्यामुळें मूर्च्छित होऊन मार्गामध्येंच पडलेल्या कौसल्येला कडकडून भेटले. तेव्हां रोदन करीत असलेल्या त्या भरतशत्रुघ्नांची दुःखानें भेट घेऊन ती अत्यंत दुःखित झालेली बिचारी श्रेष्ठ कौसल्या रडत रडत भरताला म्हणाली, 'कैकेयीनें क्रूर कर्म करून, राज्याचा अभिलाष धरणाऱ्या तुला हें निष्कंटक राज्य सत्वर प्राप्त करून दिलें आहे. वृक्षाच्या साली नेसावयाला लावून वनवासी बनविलेल्या माझ्या पुत्राला रानांत पाठवून क्रूर विचार मनांत आणणाऱ्या कैकेयीला कोणता बरें फायदा दिसत आहे ? सुवर्णवर्ण नाभीनें युक्त असलेला माझा महायशस्वी पुत्र जिकडे असेल, तिकडे मलाहि कैकेयीनें लवकर पाठवून द्यावें. अथवा मी स्वतःच सुमित्रेला बरोबर घेऊन आणि अग्निहोत्र व राजदेह पुढें घालून, ज्या मार्गानें राम गेला आहे, त्या मार्गानें सुखानें वनांत चालती होईन; किंवा तो माझा पुरुषश्रेष्ठ पुत्र जिकडे तप करणार असेल, तिकडे तूं स्वतःच आपल्या इच्छेनें मला नेऊन पोहोंचीव. धनधान्यांनीं समृद्ध व गज, अश्व आणि रथ ह्यांनीं भरलेलें हें विस्तीर्ण राज्य तुला त्या कैकेयीनें दिलें आहे."

रामाला वनांत पाठविणाऱ्यास भरताचे शिव्याशाप.

ह्या व अशा प्रकारच्या अनेक क्रूर वाक्यांनीं निरपराधी भरताची कौसल्येनें निर्भर्त्सना केली असतां, तीक्ष्ण व्रणावर सुई टोंचल्याप्रमाणें तो व्यथित झाला. मनामध्यें गोंधळून गेलेला तो भरत तिच्या पायां पडला, नानाप्रकारें विलाप करून मूर्च्छित झाला. नंतर कांहीं वेळानें सावध झाला. तेव्हां नानाप्रकारच्या शोकांनीं व्याप्त होऊन ह्याप्रमाणें विलाप करीत असलेल्या

कौसल्येला भरत हात जोडून म्हणाला, "हे आर्ये, मला ह्यापैकीं कांहींच माहीत नसतांना व मीं अगदीं निरपराधी असतांना तूं मला कां असे दोष देत आहेस? रामाचे ठिकाणीं असलेलें माझें पराकाष्ठेचें प्रेम तर तुला विदितच आहे. सत्यप्रतिज्ञ आणि सज्जनश्रेष्ठ असा आर्य राम ज्याच्या अनुमतीनें वनांत गेला असेल, त्याची बुद्धि गुरूंनीं शिकविलेल्या शास्त्राला अनुसरून कधींहि होणार नाहीं. ज्याच्या संमतीनें आर्य राम वनांत गेला असेल, तो पापी लोकांचा दास होईल, आणि सूर्याकडे मुख करून मूत्रकर्म केल्याचें व निद्रिस्थ गायीला लाथ मारल्याचें त्याला पातक लागेल. सेवकांकडून मोठें काम करून घेऊन त्याला कांहींएक न देणाऱ्या मालकाला जें पातक लागतें, तें पातक ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनांत गेला असेल, त्याला लागेल. प्राणिमात्रांचें पुत्रवत् परिपालन करणाऱ्या राजाचा द्रोह करणाऱ्यांना जें पातक लागतें, तें पातक ज्याच्या मतानें आर्य राम वनांत गेला असेल, त्याला लागेल. कराच्या रूपानें एकंदर उत्पन्नाचा सहावा अंश घेऊनहि प्रजांचें परिपालन न करणाऱ्या राजांना जें पातक लागतें, तें पातक ज्याच्या मतानें आर्य राम वनांत गेला असेल, त्याला लागेल. यागामध्यें तपस्वी ऋत्विजांना यागदक्षिणा देण्याचें वचन देऊनहि ती दाबून ठेवणाऱ्यांना जें पातक लागतें, तें पातक ज्याच्या मतानें आर्य राम वनांत गेला असेल, त्याला लागेल. गज, अश्व आणि रथ ह्यांची खेचाखेच होऊन शस्त्रांची गर्दी झालेल्या युद्धामध्यें जो सद्धर्मानें वागला नसेल, (पराङ्मुख न होतां शत्रूंशीं ज्यानें युद्ध केलें नसेल) त्याला लागणारें पातक, ज्याच्या अनुमतानें आर्य राम वनवासांत गेला असेल, त्याला लागेल. ज्याच्या अनुमतानें आर्य राम वनवासांत गेला असेल त्या दुरात्म्याला, विवेकी आचार्यानें यत्नपूर्वक पढविलेल्या वेदाचा त्याग केल्याचें पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनवासांत गेला असेल, त्याला विशाल बाहु व स्कंध ह्यांनीं युक्त असून चंद्रसूर्यसमान तेजस्वी असलेला राम राज्यावर बसल्याचें आढळण्यांत येणार नाहीं. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनवासांत गेला असेल, त्या निर्दयाला खीर, तिलोदन व छागमांस हीं श्राद्धादिकांवांचून भक्षण केल्याचें आणि गुरूंची अवज्ञा केल्याचें पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनवासांत गेला असेल, त्याला गायीला पादस्पर्श केल्याचें, गुरूंची निंदा केल्याचें आणि मित्राचा अतिशय द्रोह केल्याचें पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनवासांत गेला असेल, त्या दुरात्म्याला बाहेर परिस्फुटता कराव-

याची नाहीं, या विश्वासावर एकाद्याचा गुप्तपणें सांगितलेला दोष बाहेर फोडण्याचें पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनवासांत गेला असेल, त्याचा लोक द्वेष करूं लागतील, त्याच्याशीं संबंध तोडून टाकतील, तो निर्लज्ज बनेल, आणि एखाद्यावर प्रत्युपकार न करितां त्याच्याशीं कृतघ्न बनल्याचें त्याला पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनवासांत गेला असेल, त्याला पुत्र, दास आणि सेवक ह्यांनीं स्वगृहामध्यें परिवेष्टित असूनहि एकट्यानेंच मिष्टान्न भक्षण केल्याचें पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनवासामध्यें गेला असेल, त्याला योग्य स्त्रीचें पाणिग्रहण न करितां धर्मानुसार यज्ञयाग केल्यावांचून निपुत्रिकपणें मरण्याचें पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनामध्यें गेला असेल, त्याला आपल्या स्त्रीचे ठिकाणीं स्वतःची संतति पहावयाला सांपडणार नाहीं, आणि तो अल्पायुर्षीच मरण पावेल. इतकेंच नव्हे, परंतु राजा, स्त्री, बाल आणि वृद्ध ह्यांच्या वधाला जें पातक सांगितलें आहे, आणि सेवकाच्या त्यागाला जें पातक सांगितलें असेल, तें पातक त्याला लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनामध्यें गेला असेल, त्याला लाख, मद्य, मांस, लोखंड आणि विष ह्यांचा व्यापार करून नेहमीं सेवकांना पोसल्याचें पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनांत गेला असेल, त्याला शत्रुपक्षास भयंकर असा संग्राम प्राप्त झाला असतां पळतांपळतां वध पावल्याचें पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनवासामध्यें गेला असेल, तो हातांत नरकपाल घेऊन आणि वल्कलें परिधान करून उन्मत्ताप्रमाणें पृथ्वीवर भिक्षा मागत हिंडूं लागेल; अर्थात् त्याला ब्रह्महत्येचें पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनांत गेला असेल, त्याला मद्य, स्त्रिया आणि द्यूत ह्यांचे ठिकाणीं आसक्ति ठेवून नित्य काम व क्रोध ह्यांनीं व्याप्त असल्याचें पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनवासांत गेला असेल, त्याला धर्माकडे मनाची प्रवृत्ति न होतां अधर्मसेवन करून अपात्रीं दान केल्याचें पाप लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनांत गेला असेल, त्याचें नानाप्रकारचें संचित केलेलें द्रव्य चोर चोरून नेतील. दोन्ही संध्यांचे वेळीं शयन करणाऱ्याला जें पातक लागत असतें, तें पातक ज्याच्या संमतीनें आर्य राम वनांत गेला असेल, त्याला लागेल. इतकेंच नव्हे, परंतु आग लावणाऱ्याला, गुरुपत्नीशीं गमन करणाऱ्याला आणि मित्रद्रोह करणाऱ्याला जें पातक लागत असतें, तेंहि पातक त्याला प्राप्त होईल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनवासांत गेला असेल, त्याला देव, पितर आणि

मातापिता ह्यांची शुश्रूषा न केल्याचें पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनामध्यें गेला असेल तो आजच्या आज सज्जनांना प्राप्त होणाऱ्या लोकांपासून, सज्जनांच्या कीर्तीपासून आणि सज्जनांनीं केलेल्या कृत्यांपासून सत्वर भ्रष्ट होवो. आजानुबाहु व भव्य वक्षःस्थल ह्यांनीं युक्त असलेल्या आर्य रामाला वनवासांत जाण्यास ज्याची संमति असेल, त्याला मातेची सेवा सोडून देऊन स्त्रीसेवारूप अनर्थाचा आश्रय केल्याचें पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनांत गेला असेल, तो मोठा कुटुंबी होऊन दरिद्री होईल, नेहमीं ज्वररोगानें तो युक्त होऊन त्याला सतत क्लेश होतील. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनामध्यें गेला असेल, त्याला मोठ्या आशेनें तोंडाकडे पहात असलेल्या दीन याचकांची आशा सामर्थ्य असून व्यर्थ केल्याचें पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनांत गेला असेल, त्या धर्मशून्य पुरुषाला नित्य लोकांना फसविण्यांतच आनंद वाटूं लागेल. तो चहाडखोर होईल, अपवित्र राहील आणि राजाचें त्याला भय बाळगावें लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनांत गेला असेल, त्या दुरात्म्याला ऋतुकालसंबंधीं जिची मुदत गेली नाहीं अशा सन्निध असलेल्या साध्वी ऋतुस्नात भार्येशीं समागम न केल्याचें पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनांत गेला असेल, त्याला संतान नष्ट झालेल्या ब्राह्मणाचें (संतानहनाशाला कारण होणारें) पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनवासांत गेला असेल, त्याला ब्राह्मणाकरितां केलेली पूजेची तयारी हुसकून दिल्याचें, आणि मनाला मोह उत्पन्न होऊन वांसरूं लहान असतांना त्याच्यापुरतें दूध राखून न ठेवितां गायीची धार काढल्याचें पातक लागेल. ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनवासांत गेला असेल, त्याला एकट्यालाच जल दूषित केल्याचें आणि विष घातल्याचें पातक लागेल. उदक असूनहि तृषाक्रांताला तें न देणाऱ्याला जें पातक प्राप्त होतें, तें पातक ज्याच्या अनुमतीनें आर्य राम वनांत गेला असेल, त्याला प्राप्त होईल. भिन्न भिन्न मार्ग स्वीकारून भक्तीविषयीं वाद करणाऱ्या पुरुषांना (शिवभक्ति श्रेष्ठ किंवा विष्णुभक्ति श्रेष्ठ इत्यादि प्रकारचा वादविवाद करणाऱ्यांना) आणि त्यांचा तो कलह श्रवण करणाऱ्याला जें पातक लागतें, तें पातक ज्याच्या योगानें आर्य राम वनांत गेला असेल त्याला लागेल."

ह्याप्रमाणें आपल्या निरपराधीपणाविषयीं कौसल्येची खात्री करितां करितांच तो दुःखाकुल झालेला राजकुमार भरत, पति व पुत्र ह्यांचा वियोग झालेल्या

कौसल्येसमीप पडला. तेव्हां भयंकर शपथा वाहून रामाला वनवासांत पाठविण्यास संमति देणाऱ्याला शाप देत असलेल्या त्या शोकाकुल व मूर्च्छित भरताला कौसल्या म्हणाली, 'हे पुत्रा, ह्याच्या योगानें मला अधिकच दुःख होत आहे. असल्या शपथा वाहून रामाच्या वनवासाला संमति देणाऱ्याला शाप देणारा तूं अशा करण्यानें माझे प्राण व्याकुल करीत आहेस शुभ लक्षणांनीं युक्त असलेलें तुझें अंतःकरण धर्मापासून चळलें नाहीं, हें मोठें सुदैवच समजलें पाहिजे. वत्सा, तूं आपली प्रतिज्ञा खरी केलीस, तर तुला सज्जनांचे लोक प्राप्त होतील.'

असें बोलून कौसल्येनें त्या भ्रातृवत्सल महापराक्रमी भरताला मांडीवर घेतलें, आणि त्याला कडकडून भेटून अत्यंत दुःखित झालेली ती कौसल्या रोदन करूं लागली. ह्याप्रमाणें दुःखाकुल होऊन विलाप करणाऱ्या त्या महात्म्या भरताचें मन मोहामुळें व शोकाच्या अतिरेकामुळें क्षुब्ध झालें, आणि कांहींएक सुचेनासें होऊन, कसलेंहि भान न राहतां भूमीवर पडून, वारंवार दीर्घ सुस्कारे टाकीत टाकीत व अत्यंत विलाप करीत असलेल्या त्या भरताच्या शोकामध्येंच ती रात्र निघून गेली.

सर्ग शहात्तरावा.

दशरथप्रेतदहन.

ह्याप्रमाणें शोकसंतप्त झालेल्या कैकेयीपुत्र भरताला वक्त्यांमध्यें श्रेष्ठ असे वसिष्ठ ऋषि उत्कृष्ठ वाणीनें म्हणाले, 'हे महाकीर्तिमान राजपुत्रा, तुझें कल्याण असो. आतां शोक पुरे. हा प्राप्त झालेला भूपतीचा और्ध्वदेहिक संस्कार उत्कृष्ठ रीतीनें कर.'

हें वसिष्ठांचें भाषण श्रवण केल्यावर भरतानें त्यांना साष्टांग नमस्कार घातला, आणि त्या धर्मवेत्त्या भरतानें पित्याचीं सर्व और्ध्वदेहिक कर्में करण्याकरितां मंत्र्यांना सांगितलें. पीतवर्ण मुखानें युक्त, आणि निद्रिस्थाप्रमाणें दिसत असलेल्या त्या भूपति दशरथाला तेलाच्या कढईतून काढून भूमीवर बसविलें असतां, आणि नाना प्रकारच्या रत्नांनीं भूषित अशा उत्कृष्ठ मंचकावर निजविलें असतां, त्याला अवलोकन करून अत्यंत दुःखित झालेला तो पुत्र भरत विलाप करूं लागला. "राजन्, मी देशांतराला गेलों असून येथें आलों नसतांना धर्मवेत्त्या

रामाला व महाबलाढ्य लक्ष्मणाला वनांत हांकून देऊन तूं मनांत तरी काय आणिलें आहेस ! हे महाराजा, उत्कृष्ट कर्म करणाऱ्या पुरुषश्रेष्ठ रामानें रहित अशा ह्या दुःखित जनाचा त्याग करून तूं कोठें जात आहेस ! हे तात, रामानें वनाचा आश्रय केला असून तूंहि स्वर्गाला चालता झाल्यावर, तुझ्या नगरींतील प्रजाजनांचा योगक्षेम दक्षतापूर्वक कोण बरें चालवील ! राजा, तुझा वियोग झालेली ही पृथ्वी विधवा झाल्यामुळें पूर्वीप्रमाणें शोभत नाहीं, आणि ही अयोध्या नगरीहि चंद्ररहित रात्रीप्रमाणें मला निस्तेज दिसत आहे. "

ह्याप्रमाणें मनामध्यें खिन्न होऊन विलाप करीत असलेल्या भरताला महामुनि वसिष्ठ पुनरपि म्हणाले, " हे महापराक्रमी भरता, ह्या भूपतीचे जे कांहीं और्ध्वदेहिक संस्कार करावयाचे आहेत, ते तूं आतां विचार करीत न बसतां काळजीपूर्वक कर. "

ह्याप्रमाणें वसिष्ठांनीं सांगितलें असतां 'ठीक आहे' असे म्हणून त्यानें वसिष्ठांच्या त्या सांगण्याला मान दिला. ऋत्विज, पुरोहित व आचार्य ह्यांना त्यानें ते संस्कार करण्याविषयीं त्वरा केली. दशरथ राजाचे जे अग्नि होमशालेंतून बाहेर ठेविले होते, त्यांच्यामध्यें ऋत्विज आणि याजक ह्यांनीं यथाविधि हवन केलें. नंतर गतप्राण झालेल्या राजाला पालखीमध्ये ठेविल्यावर अश्रूंनीं कंठ दाटून आलेले सेवक खिन्न झाले, आणि त्याला उद्देशून विलाप करूं लागले. तदनंतर रौप्य, सुवर्ण आणि नानाप्रकारचीं वस्त्रें मार्गामध्यें उधळीत उधळीत लोक भूपतीच्या पुढें चालले. कांहीं लोक चंदन व अगुरु ह्यांचा चीक, सरल व पद्मक हीं काष्ठें, आणि देवदारु-काष्ठें अग्नीमध्यें टाकूं लागले. नंतर जेथें चिता रचिली होती, तेथे गेल्यावर लहानमोठीं इतरहि सुगंधी द्रव्यें चितेमध्यें घालून ऋत्विजांनीं त्या भूपतीला चितेवर निजविलें. तेव्हां अग्नीमध्यें हवन करून ऋत्विज अवश्य ते मंत्र जपूं लागले, आणि सामगायन करणारे त्या ठिकाणीं यथाविधि साम गाऊं लागले. योग्यतेप्रमाणें पालख्यांतून व रथांतून बसून वृद्धांनीं परिवेष्टित असलेल्या त्याच्या स्त्रिया नगरांतून तेथें निघून गेल्या. अश्वमेधांत यज्ञ केलेल्या त्या राजाला ऋत्विजांनीं उलट्या प्रदक्षिणा घातल्या. कौसल्याप्रभृति स्त्रिया त्याच्याकरितां शोकाकुल झाल्या. त्या दहनसमयीं हजारों स्त्रिया दुःखाकुल होऊन करुणस्वरानें आक्रोश करूं लागल्या असतां क्रौंच पक्षिणीप्रमाणें त्यांचा शब्द ऐकूं येऊं लागला. नंतर शोकाधीन होऊन रडत असलेल्या त्या राजस्त्रिया वारंवार विलाप करून सर-

यूचे तीरीं आपापल्या वहानांतून खालीं उतरल्या. राजाची उदकक्रिया करून अश्रूंनीं नेत्र भरून आलेले ते मंत्री, पुरोहित आणि राजस्त्रिया हे सर्व भरतासहवर्तमान नगरीमध्यें परत आले, आणि दहा दिवसपर्यंत भूमीवर पडून त्यांनीं त्याचें अशौच काढिलें.

सर्ग सत्त्याहत्तरावा.

दशरथाचें उत्तरकार्य.

नंतर बाराव्या दिवशीं प्रेतविमुक्तिदायक एकादशाह श्राद्ध करून शुचि झालेल्या भरतानें पुढलीं श्राद्धकर्में करविलीं. धन, रत्नें, विपुल अन्न, छागसमुदाय, असंख्य रौप्य आणि विपुल गायी त्यानें ब्राह्मणांना दिल्या. त्या राजाचें पारलौकिक हित व्हावें एतदर्थ दासी, दास, रथ आणि मोठमोठीं घरेंहि ब्राह्मणांना दिलीं. तदनंतर तेराव्या दिवशीं प्रभातसमयीं शोकाकुल झालेला तो महापराक्रमी भरत विलाप करूं लागला. रडून रडून घसा बसलेला तो राजपुत्र चिताभस्म पलीकडे करून भूमीची शुद्धि करण्याकरितां पित्याच्या चितेसमीप आल्यावर अत्यंत दुःखित होऊन म्हणाला, " हे तात, ज्या भ्रात्या रामाच्या स्वाधीन तूं मला केलें आहेस, तो राम वनामध्यें चालता झाल्यामुळें, तूं मला कांहीएक आधार न ठेवितां सांप्रत शून्य प्रदेशांत टाकून दिलें आहेस. ज्या अनाथ कौसल्येचा मुख्य आधार-पुत्र-तूं वनामध्यें पाठविलास, त्या कौसल्या मातेचा त्याग करून तूं कोठें रे गेलास ! "

नंतर ज्यांतील भस्म अरुणवर्ण झालें आहे, ज्यांतील अस्थि दग्ध झाल्या आहेत, आणि जेथें पित्याचें शरीर नाहींसें झालें आहे, असें तें चितास्थानमंडल अवलोकन करून अत्यंत शोक करूं लागलेला भरत खिन्न झाला. इतकेंच नव्हे, परंतु तें अवलोकन करितांक्षणीं रोदन करूं लागलेला तो दीन राजपुत्र भूतलावर पडला. लोक त्याला उठवूं लागले असतां, तो उन्नत भरत भूमीवर उभारिलेल्या यंत्रबद्ध इंद्रध्वजाप्रमाणें दिसूं लागला. पुण्यक्षयसमयीं स्वर्गांतून भूतलावर पडलेल्या ययातीकडे जसे ऋषी धांवून गेले, तसें त्या भरताचे सर्व अमात्य आचरणानें शुद्ध असलेला तो भरत भूमीवर पडला असतां त्याच्याकडे धावले. शोकाकुल झालेल्या भरताला अवलोकन करून शत्रुघ्नहि रामाचें स्मरण करीत करीत मूर्च्छित होऊन भूमीवर पडला, आणि

पित्याच्या गुणांचीं दर्शक असलेलीं तीं तीं कर्मे स्मरून तो अत्यंत दुःखित झालेला शत्रुघ्न उन्मत्त पुरुषाप्रमाणें भान नाहींसें होऊन विलाप करूं लागला. सारांश, मंथरेमुळें उत्पन्न झालेल्या कैकेयीरूप सुसरीनें व्याप्त झालेल्या, आणि वरप्रदानरूप उदकानें युक्त असल्यामुळें क्षोभरहित असलेल्या प्रचंड शोक-सागरानें त्या शत्रुघ्नाला बुडवून टाकिलें होतें.

तो म्हणाला, "हे तात, तूं ज्याचे नेहमीं लाड केलेस, त्या विलाप करीत असलेल्या सुकुमार बाल भरताला टाकून देऊन तूं कोठें बरें गेला आहेस! अरे, भोज्य, पेय, वस्त्रें आणि आभरणें ह्यासंबंधानें 'ह्यांतलें तुला काय हवें, तें घे' असें म्हणून तूं आमची इच्छा तृप्त करीत होतास, ती खरोखर आतां आज कोणरे तृप्त करील! तुज धर्मज्ञ महात्म्या राजाचा ह्या पृथ्वीला वियोग झाल्यामुळें, हा तिचा विदीर्ण होऊन जाण्याचा काल प्राप्त झाला असतांहि ती विदीर्ण होऊन जात नाहीं. पिता स्वर्गस्थ होऊन रामानेंहि अरण्याचें अवलंबन केलें असतां आतां मला जगण्याचें सामर्थ्य काय आहे? मी अग्नीमध्यें प्रवेश करीन! भ्रातृरहित व पितृरहित झालेला मी इक्ष्वाकुवंशजांनीं परिपालन केलेल्या शून्य अयोध्या नगरीमध्यें प्रवेश करणार नाहीं. तपोवनांत प्रवेश करीन!"

ह्याप्रमाणें त्या उभयतांचा विलाप श्रवण करून व त्यांचें तें दुःख पाहून, त्यांच्याबरोबर गेलेले सर्वहि लोक पुनरपि अत्यंत दुःखाकुल झाले. तदनंतर खिन्न व श्रांत झालेले ते उभयतां भरत शत्रुघ्न शिंगें मोडलेल्या बैलांप्रमाणें पृथ्वीवर लोळूं लागले. तेव्हां सत्त्वप्रकृतिसंपन्न व सर्वज्ञ असे त्यांच्या पित्याचे पुरोहित वसिष्ठ मुनि त्या भरताला उठवून म्हणाले, "हे प्रभो, तुझ्या पित्याच्या मरणाला आज हा तेरावा दिवस. तेव्हां सावशेष अस्थिसंचय करण्याला तूं आतां येथें कां विलंब लावीत आहेस? क्षुधा-तृषा, शोक-मोह आणि जरा-मरण हीं तीन द्वंद्वें प्राणिमात्रांना एकसारखींच प्राप्त होत असतात. तेव्हां तीं जर अपरिहार्य आहेत, तर तुला अशी अवस्था करून घेणें योग्य नाहीं."

ह्याप्रमाणें वसिष्ठांनीं सांगितल्यानंतर तत्त्ववेत्त्या सुमंत्रानें शत्रुघ्नाला उठवून त्याचें सांत्वन केलें, आणि प्राणिमात्रांच्या उत्पत्तिविनाशासंबंधानें त्यानें त्याला कांहीं सांगितलें. असो. ते पुरुषश्रेष्ठ यशस्वी भरत-शत्रुघ्न उठले असतां, पर्जन्य आणि ऊष्णता ह्यांनीं म्लान होऊन गेलेल्या दोन इंद्रध्वजांप्रमाणें दिसूं लागले; ज्यांचे डोळे लाल झाले आहेत, जे दीन वाणीनें भाषण करीत आहेत व जे अश्रू पुशीत आहेत, अशा त्या राजकुमारांना दुसरीं कृत्यें करण्याविषयीं अमात्य त्वरा करूं लागले.

सर्ग अठ्याहत्तरावा.

शत्रुघ्नहस्तें मंथरेची विटंबना.

तदनंतर रामाचे समीप जाण्याविषयीं विचार करणाऱ्या शोकसंतप्त भरताला लक्ष्मणाचा कनिष्ठ भ्राता शत्रुघ्न म्हणाला, "आपली तर गोष्ट पाहिजे कशाला? परंतु दुःखसमयीं सर्व प्राण्यांनाहि जो आधार, त्या धैर्यवान रामाला स्त्रीनें वनांत हांकून दिलें; पण बलाढ्य आणि वीर्यवान म्हणून जो प्रसिद्ध आहे, त्या लक्ष्मणानें पित्याचा निग्रह करूनहि रामाला कां सोडविलें नाहीं? स्त्रीला वश होऊन जो राजा कुमार्गाला प्रवृत्त झाला, त्याचा न्यायान्याय पाहून पूर्वींच निग्रह करणें योग्य होतें."

ह्याप्रमाणें शत्रुघ्न बोलत असतांना, पूर्वेकडील द्वारामध्यें सर्व प्रकारचे अलंकार धारण केलेली कुबडी मंथरा उभी होती. तिनें उत्कृष्ठ चंदनाची उटी लावून राजांना योग्य असलेलीं वस्त्रें परिधान केलेलीं होतीं. नानाप्रकारच्या भूषणांनीं ती अनेक प्रकारें सजली होती. आणि कमरपट्ट्याचे अद्भुत पदर आणि इतरहि उत्कृष्ठ भूषणें ह्यांच्या योगानें ती मंथरा पुष्कळशा दोऱ्यांनीं बांधून ठेविलेल्या वानराप्रमाणें दिसत होती.

वारंवार अनर्थ उत्पन्न करणाऱ्या त्या कुबडीला अवलोकन करितांक्षणीं तेथील द्वारपालानें निर्दयपणानें तिला धरून शत्रुघ्नाला सांगितलें, 'जिच्यामुळें राम वनवासांत गेला व जिच्यामुळें तुमच्या पित्यानें देहत्याग केला, ती ही दुष्ट पापिणि कुबडी, हिचें आपण हवें तें करा.'

हे शब्द ऐकिल्याबरोबर तो व्रतस्थ शत्रुघ्न अत्यंत दुःखित झाला, आणि अंतःपुरावरील सर्व लोकांना म्हणाला, "ज्या अर्थीं हिनें माझ्या भ्रात्यांना व पित्याला तीव्र दुःख उत्पन्न केलें आहे, त्या अर्थीं हिला आतां आपल्या दुष्कर्मांचें फल प्राप्त होऊं दे."

असें म्हणून त्या शत्रुघ्नानें सख्यांनीं परिवेष्ठित असलेल्या त्या कुबडीला बलात्कारानें एकदम धरिलें. तेव्हां तिनें तें घर दणाणून सोडिलें. हें पाहून तिच्या सर्व सख्या अतिशय घाबरून गेल्या. शत्रुघ्न क्रुद्ध झाला आहे, असें जाणून जिकडून वाट सांपडली तिकडून त्या पळून गेल्या. तदनंतर तिच्या त्या सर्व सख्या आपापसांत म्हणाल्या, 'ज्या अर्थीं ह्या शत्रुघ्नानें आरंभ केला

आहे, त्या अर्थी हा आतां आम्हांपैकीं कोणालाहि शिल्लक ठेवीलसें दिसत नाहीं. तेव्हां दयाळु, उदार, धर्मज्ञ आणि यशस्विनी अशा कौसल्येला आपण शरण जाऊं. ती आपला आधार ठरलेलीच आहे.'

इकडे शत्रूंचें शासन करणारा तो शत्रुघ्न रोषानें व्याप्त होऊन आक्रोश करीत असलेल्या त्या कुबडीला भूतलावर फरफरा ओढूं लागला असतां, तिचीं नानाप्रकारचीं चित्रविचित्र भूषणें भूमीवर अस्ताव्यस्त पडलीं. त्या भूषणांनीं तें वैभवसंपन्न विस्तीर्ण राजगृह शरदृतूंतील आकाशाप्रमाणें फारच शोभूं लागलें. असो. त्या पुरुषश्रेष्ठ बलाढ्य शत्रुघ्नानें क्रोधामुळें बलात्कारानें मंथरेला धरून कैकेयीची निर्भर्त्सना केली, आणि तिला उद्देशून कठोर भाषण केलें. तेव्हां त्या दुःखदायक कठोर भाषणांनीं अत्यंत दुःखित झालेली कैकेयी शत्रुघ्नाच्या भीतीनें गांगरून जाऊन पुत्राला शरण आली. असें झाल्यावर क्रुद्ध झालेल्या शत्रुघ्नाकडे पाहून भरत म्हणाला, "स्त्रिया सर्वहि प्राण्यांना अवध्य आहेत, म्हणून तूं क्षमा कर. अरे, धर्मनिष्ठ राम हा 'मातृघातक' म्हणून जर मला दोष देणार नसेल, तर मी ह्या दुराचारिणी दुष्ट कैकेयीचा वध करून टाकीन. परंतु ह्या कुबडीलाहि मारल्याचें जर त्याला समजलें, तर तो धर्मात्मा राम तुझ्याशीं आणि माझ्याशीं निःसंशय भाषण सुद्धां करणार नाहीं."

हें भरताचें भाषण श्रवण केल्यावर शत्रुघ्न त्या स्त्रीवधाच्या दोषापासून परावृत्त झाला, आणि मूर्च्छित पडलेल्या त्या कुबड्या मंथरेला त्यानें सोडून दिलें. तदनंतर अत्यंत दुःखित झालेली ती मंथरा कैकेयीच्या पायापाशीं येऊन पडली, आणि उस्मारून उस्मारून सुस्कारे टाकीत करुणस्वरानें विलाप करूं लागली. तेव्हां शत्रुघ्नाच्या हिसडाहिसडीमुळें बेशुद्ध होऊन गांगरून गेलेल्या व क्रौंच पक्षिणीप्रमाणें कैकेयीच्या तोंडाकडे पाहूं लागलेल्या त्या आर्त कुबडीला अवलोकन करून भरताच्या मातेनें हळूहळू तिचें सांत्वन केलें.

सर्ग एकुणऐशींवा.

भरताचा निश्चय.

तदनंतर चौदाव्या दिवशीं प्रभातकाळीं राजकार्यधुरंधर पुरुष एकत्र जुळून भरताला म्हणाले, 'आमच्या गुरूचाहि गुरु जो दशरथ, तो ज्येष्ठ राम व महाबलाढ्य लक्ष्मण ह्यांना वनवासांत पाठवून स्वर्गाला गेला. तेव्हां हे महा-

कीर्तिमान राजपुत्रा, तूं आमचा राजा हो. तूं राजा होणें प्रियाच्या आज्ञेशीं जुळत असल्यामुळें तुझ्याकडे कांहीं दोष येणार नाहीं. सांप्रत ह्या राज्याला कोणी नायक नाहीं. हे रघुवंशजा, अभिषेकाचें हें सर्व सामान घेऊन स्वजन आणि नगरवासी लोक तुझी वाट पहात आहेत. भरता, पितृपितामहपरंपरेनें चालत आलेल्या ह्या अक्षय्य राज्याचा तूं स्वीकार कर; हे पुरुषश्रेष्ठा, स्वतःला अभिषेक करून घेऊन आमचें परिपालन कर.'

ह्याप्रमाणें त्यांनीं सांगितलें असतां, अभिषेकाच्या त्या सर्व साहित्याला प्रदक्षिणा करून तो व्रतस्थ भरत तेथें जुळलेल्या सर्व लोकांना म्हणाला, "हे कुशल लोकहो, ज्येष्ठाचें राज्यत्व ही आमच्या कुलांतील पद्धत आहे. तेव्हां मला उद्देशून असें बोलणें तुम्हांला योग्य नाहीं. आमचा ज्येष्ठ भ्राता राम राजा होईल, आणि मी अरण्यामध्यें चौदा वर्षें वास्तव्य करीन. गज, रथ, घोडेस्वार आणि पायदळ अशा मोठ्या चतुरंग बलांनीं युक्त असलेली प्रचंड सेना सज्ज करा. मी ज्येष्ठ भ्रात्या राघवाला वनांतून घेऊन येतों. मी रामाकरितां हें सर्व अभिषेकाचें सामान पुढें घालून वनांत जाईन. आणि तेथेंच त्या पुरुषश्रेष्ठ रामाला अभिषेक करून, यज्ञशालेपासून अग्नि ज्याप्रमाणें घरीं आणितात त्याप्रमाणें त्याला पुढें घालून घेऊन येईन. पुत्राकरितां राज्याचा अभिलाष धरणाऱ्या ह्या स्वतःच्या मातेचा मनोरथ मी सिद्धीस नेणार नाहीं. सारांश, दुर्गम वनामध्यें मी वास्तव्य करीन, आणि राम राजा होईल. कामगार लोकांकडून मार्ग तयार करवा. ज्या प्रदेशावर चढउतार असेल, तो प्रदेश रथ जाण्याजोगा सारखा करा, आणि दुर्गम देशांतून पार पाडून नेणारे रक्षक मार्गामध्यें बरोबर असूं द्या."

ह्याप्रमाणें रामाकरितां भाषण करीत असलेल्या त्या राजकुमार भरताला तेथें जमलेले सर्व लोक शुभ आणि उत्कृष्ट अशा शब्दांनीं म्हणाले, 'ह्याप्रमाणें जो ज्येष्ठ राजपुत्राला पृथ्वी देण्याची इच्छा करीत आहेस, त्या तुझी, पद्मचिन्ह धारण करणारी लक्ष्मी सेवा करो.'

लोकांनीं उच्चारिलेलें तें उत्कृष्ट आशीर्वचन आपल्या कानावर पडलेलें पाहून राजकुमार भरताला आनंद झाला, आणि त्या लोकांना उद्देशून रघुकुलावतंस आर्य भरताच्या नेत्रांतून आनंदजन्य अश्रुबिंदु गळाले. असो. हें भरताचें भाषण श्रवण केल्यावर सभा आणि अमात्य ह्यांसहवर्तमान ते सर्व लोक अगदीं

शोकरहित होऊन आनंदित झाले, आणि त्याला म्हणाले, 'हे पुरुषोत्तमा, तुझ्याविषयीं अनुरक्त असलेल्या ह्या लोकांना तुझ्या सांगण्यावरून मार्ग तयार करण्याविषयीं आणि रक्षकांना रक्षण करण्याविषयीं आज्ञा केली आहे.'

सर्ग ऐशींवा.

रामाकडे जाण्याकरितां मार्ग तयार करणें.

तदनंतर भूप्रदेशाची माहिती असणारे, गवंडी आणि जलप्रवाह आडवून धरणारे असे आपापल्या कर्मामध्यें दक्ष असलेले शूर कारागीर लोक, मजूर, रथ वगैरे करणारे, यंत्राची माहिती असलेले लोक, सुतार, मार्गरक्षक, झाडें तोडणारे, आचारी, सफेती देणारे, बुरुड, चांभार आणि नलिकायंत्रादि साधनांनीं दूरपर्यंत पाहण्यास समर्थ असलेले असे लोक पुढें निघाले. तो प्रचंड जनसमूह हर्षानें त्या प्रदेशावरून जाऊं लागला असतां पर्वदिवशीं शोभणाऱ्या सागराच्या जलराशीप्रमाणें शोभूं लागला. मार्ग करण्यांत निपुण असलेले ते लोक आपापल्या टोळीचा आश्रय करून नानाप्रकारच्या साधनांसहवर्तमान पुढें चालूं लागले. फांद्या, वेल, झुडपें, सड आणि धोंडे एकीकडे करून आणि अनेक प्रकारचे वृक्ष तोडून त्यांनीं मार्ग तयार केला. वृक्षरहित प्रदेशामध्यें काहींनीं वृक्ष रोविले. कांहीं लोक कुऱ्हाडी, टाकया आणि कोयते घेऊन मार्गांतील झाडें तोडूं लागले व मोठमोठे धोंडे फोडून काढूं लागले. कांहीं फारच बलाढ्य लोक खोल मुळें गेलेलीं वाळयांचीं बेटें हातांनीच उपटून टाकूं लागले, आणि कांहीं लोक खोरीं, कुदळी वगैरे घेऊन दुर्गम स्थलें साफ करूं लागले. दुसरे कांहीं लोक मार्गामध्यें असलेले कूप व तशाच प्रकारचे मोठमोठे खड्डे माती टाकून भरून काढूं लागले. त्याचप्रमाणें सखल प्रदेश माती टाकून साफ करूं लागले. कांहींजण पाट वगैरे बांधून काढूं लागले. कांहीं पायाला बोंचणाऱ्या खड्यांचें पीठ करूं लागले. मार्गांतील पाणी निघून जाण्याकरितां कांहींजण पाट फोडून देऊं लागले. ह्याप्रमाणें थोडक्याच वेळांत त्या लोकांनीं ठिकठिकाणच्या अनेक प्रदेशांना नानाप्रकारचे आकार आणिले. जेथें उदकाचे प्रवाह अगदीं लहान होते, तेथें बांध वगैरे घालून त्यांनीं ते प्रवाह सागराप्रमाणें विपुल जलानें युक्त करून सोडिले. कांहीं लोकांनीं निर्जन प्रदेशांमध्यें विहिरी वगैरे नानाप्रकारचे उत्कृष्ट जलाशय खणून तयार केले. भोंवतालीं

कट्टे बांधून ते सुशोभित केले. तेव्हां विटेबंदी, फरशा, प्रफुल्लित वृक्ष व ध्वनि करणारे मत्त पक्षिसमुदाय ह्यांनीं युक्त, पताकांनीं भूषित, गंगोदक शिंपडलेला आणि नानाप्रकारच्या पुष्पांनीं भूषित असा तो देवमार्गतुल्य सैन्यमार्ग फारच शोभूं लागला. असो.

मार्ग तयार करण्याकडे नेमलेल्या अधिकारी पुरुषांनीं, आज्ञेप्रमाणें मार्ग तयार झाल्याची वर्दी दिल्यानंतर रमणीय, विपुल व स्वादिष्ट फलांनीं युक्त अशा प्रदेशांमध्यें महात्म्या भरताला जसे जसे तंबू हवे होते, तसे तसे ठिकठिकाणीं तयार करून मार्गाच्या भूषणाप्रमाणें असलेले ते त्यांनीं नानाप्रकारच्या अलंकारांनीं सुशोभित केले. नंतर प्रशस्त नक्षत्रें व मुहूर्त पाहून महात्म्या भरताचे तंबू त्यांनीं ठिकठिकाणीं उभे केले. त्या तंबूंभोंवतीं खंदकासहवर्तमान बांधलेले कोट इंद्रनील पर्वताप्रमाणें उंच उंच असून उत्कृष्ट मार्गांनीं सुशोभित झाले होते. मृत्तिकेचे असंख्य गोळे एकावर एक रचून ते तयार केलेले होते. असो. तीं सर्व शिबिरें प्रासादसमुदायांनीं युक्त होतीं, राजवाड्यासारख्या आकारांनीं व्याप्त होतीं, पताकांनीं सुशोभित केलेलीं होतीं आणि त्यांत जाण्याकरितां मोठमोठे रस्ते उत्कृष्ठ रीतीनें तयार केले होते. कपोतगृहांनीं युक्त आणि आकाशांतील वेदीप्रमाणें दिसणाऱ्या सात सात मजली उंच इमारतींनीं युक्त असलेलीं तीं शिबिरें इंद्राच्या नगरीप्रमाणें दिसत होतीं. शीतल व निर्मल उदकानें युक्त, मोठमोठ्या जलचर प्राण्यांनीं व्याप्त आणि नानाप्रकारच्या वृक्षवनांनीं संपन्न अशा जान्हवीवरूनहि गेलेला, पुढें पुढें अधिक अधिकच रम्य झालेला, आणि चांगल्या कारागिरांनीं निर्माण केलेला तो राजमार्ग—चंद्रासहवर्तमान तारागणांनीं मंडित झालेले निर्मल आकाश ज्याप्रमाणें रात्रीं शोभूं लागतें, त्याप्रमाणें शोभूं लागला.

सर्ग एक्यायशीवा.

राज्याभिषेकाचा विचार करण्याविषयीं सभा.

तदनंतर भरताला ज्या दिवशीं अभिषेक करण्याचें वसिष्ठांनीं ठरविलें होतें, त्या दिवसापूर्वींची रात्र थोडी राहिली आहे, असें अवलोकन करून स्तुतिसंबंधानें विशेष माहितगार असलेले सूत व मागध मंगलकारक स्तवांनीं भर-

ताची स्तुति करूं लागले. प्रहराप्रहरानें वाजणारी नौबद, सोन्याचीं टिपरीं वर पडूं लागलीं असतां वाजूं लागली. वाद्यें वाजविणारे लोक शंख व लहान-मोठ्या ध्वनींनीं युक्त असलेलीं इतरहि शेंकडों वाद्यें वाजवूं लागले. परंतु आकाश दुमदुमून टाकणाऱ्या त्या प्रचंड वाद्यघोषानें अधिकच शोकसंतप्त झालेल्या भरताला पुनरपि अधिक शोकग्रस्त करून टाकिलें. तेव्हां भरत जागा झाला, आणि 'मी राजा नव्हें' असें म्हणून तो वाद्यघोष बंद केल्यावर शत्रुघ्नाला म्हणाला, "शत्रुघ्ना, कैकेयीमुळें माझ्यासंबंधानें लोकांचें हें मोठें अनुचित कर्म तूं पहा. अशा प्रकारचीं दुःखें माझ्यावर सोंपवून जो राजा स्वर्गाला चालता झाला, त्या महात्म्या दशरथाची ही धर्ममूलक राज्यलक्ष्मी उदकांत भ्रमण करणाऱ्या नाविकरहित नौकेप्रमाणें सांप्रत भ्रमण करीत आहे. आमचा जो अति पूज्य प्रभु राम, तोहि ह्या मातेनें धर्माचा त्याग करून स्वतः वनामध्यें हांकून दिला आहे."

ह्याप्रमाणें भांबावून गेलेला तो भरत विलाप करीत असल्याचें अवलोकन करून सर्व अनाथ स्त्रिया गळा काढून रडूं लागल्या. तेव्हां राजधर्म जाणणारे महाकीर्तिमान वसिष्ठ मुनि इक्ष्वाकु राजाच्या सभेमध्यें प्रविष्ठ झाले. ती रमणीय सभा सुवर्णाचीच केलेली असून रत्नमय व सुवर्णमय सामानानें भरलेली होती. असो. देवसभेप्रमाणें असलेल्या त्या सभेंत ते परमतेजस्वी धर्मात्मे वसिष्ठ मुनि आपल्या शिष्यगणांसहवर्तमान प्रविष्ठ झाले; आणि स्वस्तिकाकार मंडलांनीं युक्त असलेलें आस्तरण ज्याच्यावर घातलें आहे, अशा सुवर्णमय आसनावर बसल्यानंतर त्या सर्व वेदवेत्त्या मुनींनीं दूतांना अशी आज्ञा केली कीं, 'हे स्वकार्यदक्ष दूतहो, ब्राह्मण, क्षत्रिय, योद्धे, अमात्य, सेनानायक, इतर राजकुमारांसहवर्तमान शत्रुघ्न, यशस्वी भरत, युधाजित् व सुमंत्र ह्यांना आणि जे कांहीं हित इच्छिणारे लोक असतील त्या सर्वांना तुम्ही सत्वर घेऊन या. आमचें जरूरीचें काम आहे."

ह्याप्रमाणें वसिष्ठांची आज्ञा झाल्यानंतर रथ, अश्व आणि गज ह्यांवर आरूढ होऊन लोक येऊं लागले असतां मोठा ध्वनी होऊं लागला. नंतर इंद्र येऊं लागला असतां देव ज्याप्रमाणें त्याचें अभिनंदन करूं लागतात, त्याप्रमाणें अमात्य हे दशरथाचें जसें अभिनंदन करीत होते, तसें सभेंत येऊं लागलेल्या भरताचें अभिनंदन करूं लागले. दशरथपुत्र भरतामुळें सुशोभित झालेली ती सभा, (तेजोरूप जल, चित्रांतील तिमिमत्स्य, गज, शंख, भिंतीवरील सोनेरी रंग आणि स्तंभादिकांचे ठिकाणीं असलेलीं रत्नें ह्यांनीं युक्त असल्यामुळें) तिमि-

मत्स्य व जलगज ह्यांनीं व्याप्त, तिमिंगिल जलानें युक्त आणि रत्नें, शंख व सुवर्णमृत्तिका ह्यांनीं भरलेल्या समुद्र डोहाप्रमाणें भासूं लागली. भरत हुबेहूब आपल्या त्या पित्याप्रमाणेंच असल्याकारणानें पूर्वीप्रमाणें दशरथसहित असल्यासारखी ती दिसूं लागली.

सर्ग ब्यायशीवा.

रामाला परत आणण्याकरितां वनांत जाण्याची तयारी.

ज्यामध्यें आर्यगण व वसिष्ठप्रभृति बसलेले आहेत अशी—गुरुप्रभृति श्रेष्ठ ग्रह व चंद्र ह्यांनीं युक्त असलेल्या रात्रीप्रमाणें असलेली—ती सभा बुद्धिमान भरतानें अवलोकन केली. सभ्य लोक आपापल्या आसनावर बसूं लागले असतां त्यांचीं वस्त्रें व अंगाला लाविलेली उटी ह्यांच्या प्रभेनें ती उत्कृष्ठ सभा प्रकाशित झाली. अत्यंत मनोहर अशी ती विद्वज्जनांनीं भरलेली सभा पूर्णचंद्रानें युक्त असलेल्या शरदृतूंतील रात्रीप्रमाणें दिसूं लागली. असो. भरत सभेमध्यें आल्यानंतर ते धर्मवेत्ते पुरोहित वसिष्ठ मुनि राजाच्या सर्व अमात्यांकडे पाहून मृदु स्वरानें भरताला म्हणाले, "बा भरता, सत्यपरिपालनरूप धर्मानें वागणारा तुझा पिता दशरथ राजा, धनधान्यांनीं युक्त असलेली पृथ्वी तुला देऊन स्वर्गाला गेला; आणि त्याचप्रमाणें सत्यानें वागणाऱ्या रामानें सज्जनांनीं आचरिलेल्या धर्माकडे लक्ष्य देऊन, उदय पावलेला चंद्र ज्याप्रमाणें चंद्रिकेचा त्याग करीत नाहीं, त्याप्रमाणें आपल्या पित्याच्या आज्ञेचा त्याग केला नाहीं. तस्मात् तूं आपणाला अभिषेक करून घे, आणि पित्यानें व भ्रात्यानें तुला दिलेल्या ह्या निष्कंटक राज्याचा तूं आनंदानें अमात्यांसहवर्तमान उपभोग घे. उत्तरेकडील, पश्चिमेकडील, दक्षिणेकडील व (पूर्वेकडील) बेटांतून राहणारे, समुद्रांत वास्तव्य करणारे आणि सिंहासनरहित असे राजे तुला रत्नें आणून देवोत."

हें वसिष्ठाचें भाषण श्रवण केल्यावर भरत शोकानें अगदीं उचंबळूं लागला, आणि तो धर्मज्ञ धर्माला अनुसरून वागण्याची इच्छा धरून मनामध्यें रामाचें स्मरण करूं लागला. नंतर कलहंसाप्रमाणें मधुर स्वरानें युक्त असलेला तो तरुण राजपुत्र अश्रूंनीं कंठ दाटून आल्यामुळें अडखळत अडखळत सभेमध्यें विलाप करून पुरोहित वसिष्ठांनाच रागें भरला.

तो म्हणाला, ' ब्रह्मचर्यव्रताचें परिपालन करून विद्यापारंगत झालेल्या व धर्माविषयीं तत्पर असलेल्या विवेकी रामाच्या राज्याचा अपहार करण्यास माझ्यासारखा कोण बरें उद्युक्त होईल ? दशरथापासून उत्पन्न झालेला पुत्र राज्याचा अपहार करणारा कसा बरें होईल ? राज्य आणि मी ह्या दोहोंचाहि स्वामी रामच आहे. तेव्हां आपण ह्याचा विचार करून ह्या सभेमध्यें धर्मानें बोलत जा. दिलीप आणि नहुष ह्यांची बरोबरी करणारा धर्मात्मा ककुत्स्थकुलोत्पन्न राम ज्येष्ठ व श्रेष्ठ आहे; आणि म्हणूनच दशरथाप्रमाणें त्यालाच राज्य मिळणें योग्य आहे. आर्यांनीं कधींहि न केलेलें असें स्वर्गप्रतिबंधक पापकर्म जर मीं केलें, तर मी ह्या जगतामध्यें इक्ष्वाकुवंशजांच्या कुलाला कलंक लावणारा होईन. मातेनें जें पाप केलें आहे, तेंहि मला संमत नाहीं. मी येथूनच वनरूप दुर्गम प्रदेशामध्यें राहणाऱ्या रामाला नमस्कार करीत जाईन. मी रामाच्याच मागोमाग चालता होतों. तो पुरुषश्रेष्ठ रामच ह्या राज्याचा राजा आहे. इतकेंच नव्हे, परंतु त्रैलोक्याचेंहि राज्य करण्याला तो योग्य आहे. "

धर्माला अनुसरून असलेलें हें भरताचें भाषण श्रवण केल्यावर, रामाकडे अंतःकरण लागून राहिलेल्या सर्व सभासदांच्या नेत्रांतून आनंदाश्रू गळूं लागले. तेव्हां पुनरपि भरत म्हणाला, " आर्य रामाला वनांतून परत आणण्यास जर मी समर्थ झालों नाहीं, तर लक्ष्मणाप्रमाणें मीहि तेथें वनांत राहीन. मी आपलें सर्व सामर्थ्य खर्च करून सज्जन व गुणसंपन्न अशा तुम्हां पूज्य द्विजांसमक्ष रामाला वनांतून परत आणण्याविषयीं सर्व उपाय करीन. वेठ वाहणारे आणि मजुरीचे असे सर्व मार्गशोधक व दक्ष लोक मीं आधींच पुढें पाठविले आहेत. रामाच्या मागोमाग वनांत जाणेंच मला रुचत आहे. "

ह्याप्रमाणें बोलून तो धर्मात्मा भ्रातृवत्सल भरत सल्लामसलतीमध्यें निपुण अशा समीप बसलेल्या सुमंत्र अमात्याला म्हणाला, " हे सुमंत्रा, तूं लवकर उठून जा, आणि माझ्या आज्ञेनें स्वारीच्या तयारीचा हुकूम करून सैन्य घेऊन ये."

ह्याप्रमाणें महात्म्या भरतानें सांगितलें असतां त्या सुमंत्राला आनंद झाला, आणि आपल्या इच्छेप्रमाणें असलेली ती भरताची आज्ञा त्यानें जशीची तशी कळविली. तेव्हां रामाला परत आणण्याकरितां सैन्याच्या स्वारीची तयारी करण्याविषयीं झालेली आज्ञा ऐकतांच ते अमात्य व सेनाधिपति आनंदित झाले. स्वारी निघण्याची बातमी ऐकून आनंदित झालेल्या सर्व वीरांगना घरोघरीं आपापल्या भर्त्यांना त्वरा करूं लागल्या. नंतर घोडे, बैलगाड्या आणि

मनाप्रमाणें वेगानें जाणारे १४ ह्यांवर आरूढ होऊन स्त्रिया व सेनानायक ह्यांसहवर्तमान त्या अमात्यांनीं सर्व सैन्य चालू केलें. तेव्हां तें सैन्य सज्ज झाल्याचें अवलोकन करून गुरु वसिष्ठ मुनींचे सन्निध बसलेला भरत 'माझा रथ सत्वर घेऊन ये' असें बाजूला बसलेल्या सुमंत्राला म्हणाला. हें ऐकून सुमंत्र आनंदित झाला, आणि भरताची आज्ञा मान्य करून व त्याप्रमाणें उत्कृष्ट अश्व जोडिलेला रथ घेऊन तो आला. तेव्हां सत्यनिष्ठ, प्रतापी, अतिशय योग्य भाषण करणारा, दृढ व अमोघ पराक्रम करणारा, आणि महावनांत गेलेल्या पितृतुल्य यशस्वी रामाचें मन परत येण्याविषयीं वळविण्याची इच्छा करणारा तो भरत सुमंत्राला म्हणाला, "सुमंत्रा, तूं लवकर उठून जा, आणि सैन्य जुळविण्याकरितां सेनापतींना आज्ञा कर. कारण वनामध्यें असलेल्या त्या रामाला प्रसन्न करून घेऊन जगताच्या हिताकरितां परत आणण्याची माझी इच्छा आहे."

ह्याप्रमाणें भरतानें स्पष्ट आज्ञा केली असतां, मनोरथ परिपूर्ण झालेल्या त्या सुमंत्र सारथ्यानें सर्व मुख्य मुख्य अमात्य, सेनानायक आणि सुहृद ह्यांना ती आज्ञा कळविली. तेव्हां क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि विप्र हे उठले, आणि उंटाच्या गाड्या, गर्दभ, हत्ती आणि कुलीन अश्व स्वारीला जाण्याकरितां त्यांनीं घरोघर तयार केले.

सर्ग त्र्यायशीवा.

भरतादिकांचें वनांत गमन.

नंतर भरत प्रातःकालीं उठला, आणि श्रेष्ठ रथावर आरूढ होऊन रामदर्शनाच्या उद्देशानें सत्वर चालता झाला. मंत्री आणि पुरोहित हे सर्व, अश्व जोडिलेल्या सूर्यरथासमान रथांवर आरूढ होऊन त्याच्या पुढेंच चालते झाले. तो इक्ष्वाकुकुलनंदन भरत जाऊं लागला असतां, यथायोग्य रीतीनें सज्ज केलेले नऊ हजार हत्ती त्याच्या मागोमाग गेले. तो यशस्वी राजपुत्र जाऊं लागला असतां, नानाप्रकारचीं आयुधें धारण केलेले धनुर्धारी योद्धे साठ हजार रथांवर आरूढ होऊन, आणि एक लक्ष स्वार अश्वांवर आरूढ होऊन त्याच्या मागोमाग चालते झाले. कैकेयी, सुमित्रा आणि यशस्विनी कौसल्या रामाला आणावयाचें हें ऐकून संतुष्ट झाल्या आणि उज्ज्वल रथांवर बसून

भरताबरोबर गेल्या. सभ्य लोकांचे समुदाय रामाच्याच अद्भुत गोष्टी कथन करीत करीत मनामध्यें लक्ष्मणासहवर्तमान त्याला अवलोकन करण्याकरितां आनंदित होऊन चालते झाले.

"मेघाप्रमाणें श्यामवर्ण, महापराक्रमी, बुद्धीचा स्थिर, स्वीकारिलेलें व्रत निश्चयानें चालविणारा आणि जगताचा शोक नाहींसा करणारा राम आम्ही केव्हां बरें पाहूं.? उदय पावणारा सूर्य दृष्टीस पडतांक्षणीं ज्याप्रमाणें सर्व जगताचा अंधार नाहींसा करितो, त्याप्रमाणें राम दृष्टीस पडतांक्षणीं आमचें दुःख नाहींसें करील."

ह्याप्रमाणें शुभ गोष्टी बोलत असलेले व एकमेकाला कवटाळीत असलेले ते अयोध्या नगरींतील लोक अत्यंत आनंदित होऊन चालते झाले. त्या नगरी-मध्यें जे इतर प्रसिद्ध लोक होते, आणि जे विख्यात व्यापारी होते, तेहि सर्व रामाकडे गेले. समाईक धंदा करणारे व्यापारी लोकांचे सर्व चांगले चांगले समुदायहि आनंदित होऊन रामाकडे चालते झाले. सराफ, कुंभार, साळी, शस्त्र तयार करणारे लोक, मोरांच्या पिसाचे विंझणे वगैरे करणारे, अर-कस, त्रिधारी, कांचेच्या कुप्या वगैरे करणारे, हस्तिदंती काम करणारे, सफेती देणारे, गंधी, विख्यात सोनार, सनगर, स्नान घालणारे, अंग चोळणारे, वैद्य, धूपावर उपजीविका करणारे, कलाल, धोबी, शिंपी, गांवांतून व खेडयापाडयां-तून राहणारे मोठमोठे नट, आणि नावाडी हे आपल्या स्त्रियांसहवर्तमान जाऊं लागले. स्वस्थ अंतःकरणानें युक्त आणि आचरणामुळें लोकांना मान्य असे वेदवेत्ते हजारों ब्राह्मण भरत जाऊं लागला असतां बैलगाड्यांतून बसून त्याच्या मागोमाग गेले. सारांश, शुद्ध वस्त्रें परिधान करून ताम्रवर्ण व उज्ज्वल अशी उटि अंगाला लावून आणि चांगला पोषाक करून ते सर्व निर्मल यानांवर आरूढ होऊन हळूहळू भरताच्या मागोमाग चालले.

गंगेच्या काठीं मुक्काम.

असो. रथ, गाड्या, अश्व आणि गज ह्यांवर आरूढ होऊन बराच दूर मार्ग आक्रमण केल्यानंतर ते लोक शृंगवेरपुराजवळ गंगेसमीप जाऊन पोहोंचले. त्या ठिकाणीं आपल्या जातभाईंच्या टोळ्यांनीं परिवेष्टित असलेला रामसखा वीर गुह त्या प्रदेशाचें दक्षतापूर्वक रक्षण करीत रहात होता. असो.

चक्रवाक पक्ष्यांनीं भूषित असलेल्या गंगातीराला आल्यावर भरताच्या मागोमाग जाणारें तें सैन्य उभें राहिलें. तेव्हां पुढें जाण्याविषयीं उद्युक्त नस-

लेली सेना, आणि पुण्य उदकानें युक्त असलेली ती गंगा अवलोकन करून तो वक्ता भरत सर्व सचिवांना म्हणाला, "माझ्या अभिप्रायाला अनुसरून सर्व सैन्याचा आज येथें तळ द्या. आपण विश्रांति घेतल्यावर उदयीक ही समुद्रगामिनी नदी तरून जाऊं. प्रथम आधीं गंगेमध्यें उतरून स्वर्गस्थ झालेल्या भूपतीचें परलोकप्राप्त्यर्थ तर्पण करण्याची माझी इच्छा आहे."

ह्याप्रमाणें तो भरत बोलूं लागला असतां दक्ष असलेले त्याचे अमात्य 'ठीक आहे' असें म्हणाले. आणि आपल्या इच्छेप्रमाणें त्यांनीं त्या सैन्याचा वेगवेगळा तळ दिला. सारांश, बाडबिछाईत वगैरे बरोबर घेतलेल्या सामानानें शोभणाऱ्या त्या सेनेची राहण्याची व्यवस्था करून, त्या महानदीच्या तीरीं तळ दिल्यावर, महात्म्या रामाच्या परत येण्याविषयीं चिंतन करीत करीत तो धर्मात्मा तेथें राहिला.

सर्ग चौऱ्यायशीवा.

भरत व गुह यांची भेट.

नंतर गंगेचा आश्रय करून त्या सैन्याचा तळ पडलेला पाहिल्यावर तो निषादराज गुह आपल्या सर्व ज्ञातीना म्हणाला, "ही समुद्रासारखी प्रचंड सेना ह्या गंगातीरीं उतरलेली दिसत आहे, व मनामध्यें विचार करूं लागलों असतांहि हिचा उद्देश माझ्या लक्ष्यांत येत नाहीं. ज्या अर्थीं हा प्रचंड कोविदार ध्वज रथावर दृष्टीस पडत आहे, त्या अर्थीं दुष्टबुद्धि भरतच स्वतः आला आहे, असें दिसतें. हा कदाचित् अमात्यांकडून आमच्या मुसक्या बांधवील, अथवा आम्हांला मारून टाकील. आणि नंतर पित्यानें राज्यापासून हांकून दिलेल्या दाशरथि रामाचाहि हा वध करील, असें वाटतें. त्या दशरथ राजाची अत्यंत दुर्लभ राज्यलक्ष्मी अक्षय्य प्राप्त व्हावी, अशी इच्छा धरून हा कैकेयीचा पुत्र भरत रामाचा वध करण्याकरितां जात आहे. दाशरथि राम माझा अधिपति व सखा आहे. तेव्हां त्याचें हित करण्याची इच्छा धरून तुम्ही ह्या गंगातीरीं माझ्यापाशीं उभे रहा. मांस, मुळें, फळें वगैरे आपलें खाणें बरोबर घेऊन माझ्या ताब्यांतील सर्व बलाढ्य धीवर गंगा नदीचाच आश्रय करून तिचें रक्षण करीत रहा. कोणाला नदी उतरूं देऊं नका. युद्धाच्या

तयारीनें असलेले शंभर शंभर तरुण नावाडी प्रत्येक नावेंत ठेवून पांचशें नावा तयार ठेवा." याप्रमाणें आपल्या जातभाईंना हुकूम करून तो गुह पुनः त्यांना म्हणाला, "भरत जर रामावर संतुष्ट असून येथें उतरला असेल, तर मात्र ही सेना आज सुखरूप गंगा तरून जाईल."

असें त्यांना सांगून आणि मत्स्य, मांस व मद्य हा नजराणा बरोबर घेऊन निषादराज गुह भरताकडे निघाला. तेव्हां तो गुह येत आहे, असें अवलोकन करून समय ओळखणारा प्रतापी सुमंत्र सारथि भरताला म्हणाला, "दंड-कारण्यामध्यें अधिकार चालवीत असलेला हा निषादराज वृद्ध गुह आपले हजार जातभाई बरोबर घेऊन इकडे येत आहे व हा तुझ्या भ्रात्याचा सखा आहे. तस्मात् हे ककुत्स्थकुलोत्पन्न भरता, त्या निषादराज गुहाला तुझी भेट घेऊं दे. राम-लक्ष्मण कोठें आहेत, हें ह्याला निःसंशय विदित आहे."

सुमंत्राचें हें शुभ भाषण श्रवण केल्यावर 'गुहाला सत्वर माझी भेट घेऊं दे' असें भरतानें सांगितलें. तेव्हां भेटीची अनुज्ञा मिळाल्यानंतर ज्ञातींनीं परि-वेष्ठित असलेला तो गुह आनंदित झाला. भरतासमीप येऊन नम्र झालेला तो गुह त्याला म्हणाला, "हा प्रदेश तुला अगदीं आपल्या घरच्या बागेप्रमाणें आहे. आज तूं आम्हांला अगदींच फसविलें आहेस. कारण येण्याची खबर देखील आम्हांला दिली नाहींस. खबर दिली असतीस म्हणजे आम्ही कांहीं तरी तयारी करून ठेविली असती. असो. आतां हें सर्व राज्य आम्ही तुला अर्पण करितों. आतां तूं स्वतःच्याच धीवरगृहामध्यें वास्तव्य कर. निषादांनीं स्वतः संपादन करून आणिलेलीं हीं मुळें, फळें, ओलेंकोरडें मांस आणि इतरहि बरेवाईट वन्य पदार्थ तयार आहेत. तेव्हां चांगलें भोजन करून आजची रात्र या सेनेनें येथेंच वास्तव्य करावें, आणि नानाप्रकारच्या भोग्य वस्तूंनीं मीं आदरातिथ्य केल्यावर त्वां सैन्यांसहवर्तमान उदयीक पुढें जावें, अशी माझी इच्छा आहे."

सर्ग पंचायशिवा.

भरत व गुह यांचा संवाद.

ह्याप्रमाणें गुहानें सांगितलें असतां महाबुद्धिमान भरतानें सहेतुक आणि सकारण असें भाषण निषादराज गुहाशीं केलें कीं, "हे गुरुमित्रा, माझ्या ह्या

अशा प्रकारच्या सैन्याचें आदरातिथ्य करण्याचें तूं इच्छीत आहेस. हा तुझा मनोरथ फार उत्तम आहे. असें म्हणण्यानेंच माझा सत्कार झाला आहे."

असें उत्कृष्ठ भाषण केल्यानंतर तो महातेजस्वी व वैभवशाली भरत मार्गाकडे बोट दाखवून पुनरपि त्याला म्हणाला, " कोणत्या मार्गानें मीं भरद्वाज मुनींच्या आश्रमाला जावें ? गंगातीरचा हा देश अतिशय गहन असून जाण्याला दुर्घट आहे. "

हें त्या विचारी राजपुत्राचें भाषण श्रवण केल्यावर गहन वनप्रदेशांत राहणारा गुह हात जोडून त्याला म्हणाला, " हे महाबलाढ्य राजपुत्रा, कर्तव्याविषयीं अतिशय दक्ष आणि ह्या प्रदेशांतील माहीतगार असे धीवर तुझ्याबरोबर येतील, आणि मीहि तुझ्याबरोबर येईन. परंतु उत्कृष्ठ कर्म करणाऱ्या रामाविषयीं कांहीं दुष्ट भाव मनांत धरून तर तूं जात नाहींस ना ? ह्या तुझ्या प्रचंड सेनेमुळें मला अशी शंका येत आहे. "

त्या निषादाधिपतीचें हें भाषण ऐकून आकाशाप्रमाणें निर्मळ असलेला भरत मृदु वाणीनें म्हणाला, " तुला शंका आली, तसलें पाप माझ्या मनांत येईल, अशी वेळ कधींहि न येवो. माझ्या संबंधानें तूं शंका घेऊं नको. तो राम माझा ज्येष्ठ भ्राता असून मला पित्याप्रमाणें मान्य आहे. त्या वनवासी रामाला परत आणण्याकरितां मी जात आहें. माझ्यासंबंधानें तूं दुसरा कांहींएक विचार मनामध्यें आणूं नको. गुहा, मी तुला खरें सांगत आहें. "

भरताचें हें भाषण श्रवण केल्यावर त्या गुहाचें मुख आनंदित झालें, आणि तो पुनरपि भरताला म्हणाला, " तूं धन्य आहेस. तुझ्यासारखा ह्या भूतलामध्यें मला कोणी दिसत नाहीं. कारण अनायासानें प्राप्त झालेलें राज्य टाकून देण्याची आणि संकटांत सांपडलेल्या रामाला परत आणण्याची तूं इच्छा करीत आहेस. ह्यामुळें तुझी कीर्ति लोकामध्यें अक्षय्य राहील. "

ह्याप्रमाणें गुह भरताशीं भाषण करीत असतांना सूर्य निस्तेज होऊन रात्र पडूं लागली. तेव्हां गुहानें संतुष्ट केलेल्या त्या भरतानें सैन्याची व्यवस्था लाविली, आणि शत्रुघ्नासहवर्तमान तो पुनरपि शय्येवर येऊन पडला. धर्मावर दृष्टि ठेवून वागणाऱ्या आणि दुःखाचा अनुभव नसलेल्या महात्म्या भरताला रामचिंतामय अनिर्वचनीय शोक प्राप्त झाला. दावाग्नीनें शुष्क होऊन गेलेल्या वृक्षाला आंत गुप्त असलेला अग्नि ज्याप्रमाणें दग्ध करीत असतो, त्याप्रमाणें तो शोकाग्नि भरताला अंतःस्थ दाहानें संतप्त करूं लागला. ज्याप्रमाणें

सूर्यतापानें संतप्त झालेल्या हिमालय पर्वतापासून बर्फ वाहूं लागतें, त्याप्रमाणें भरताच्या शरीरापासून घाम वाहूं लागला. रामासंबंधीं चिंता हेच ज्यांतील अभंग खडक, दुःखाचे सुस्कारे हेच ज्यांतील धातु, इंद्रियांचें दैन्य हेच ज्यांतील वृक्षसमुदाय, शोकजन्य आयास हींच ज्याचीं शिखरें, मोह हेच ज्यावरील असंख्य वनपशु, संताप हीच ज्यावरील वनस्पति आणि वेली असा जो अधोगतीला नेणारा दुःखरूप पर्वत, त्यानें कैकेयीचा पुत्र भरत घेरून टाकिला.

असो. मनाच्या हुरहुरीनें व्याकुळ, अत्यंत खिन्न व अतिशय मूर्च्छित अशा त्या दुःखाचे सुस्कारे टाकीत असलेल्या पुरुषश्रेष्ठ भरताला कळपांतून चुकलेल्या बैलाप्रमाणें चैन पडेनासें झालें. सारांश, परिवारासहवर्तमान असलेल्या त्या एकाग्रचित्त व महापराक्रमी भरताची गुहाशीं गांठ पडल्यावर तो रामासंबंधानें अतिशय खिन्न झाला; तेव्हां त्या गुहानें भरताचें सांत्वन केलें.

सर्ग शहायशीवा.

लक्ष्मणाचें भाषण भरताला सांगणें.

तदनंतर वनप्रदेशांत राहणारा गुह महात्म्या लक्ष्मणाचा चांगुलपणा सांगण्याच्या उद्देशानें अचिंत्य भरताला म्हणाला:—" अत्यंत गुणसंपन्न व श्रेष्ठ धनुर्बाण धारण करून भ्रात्याच्या रक्षणार्थ जागत बसलेल्या त्या लक्ष्मणाला मीं म्हणालों, ' बा राघवनंदना, तुझ्याकरितां ही सुखशय्या तयार केली आहे. तूं निर्धास्त रहा, आणि ह्या शय्येवर सुखानें शयन कर. ह्या आम्हां सर्व लोकांना दुःखें भोगण्याची संवय आहे, व तूं आजपर्यंत सुखाचाच उपभोग घेत आला आहेस. तस्मात् हे धर्मज्ञा, रामाच्या रक्षणार्थ आम्ही जागत असूं. रामाहून अधिक प्रिय असा ह्या पृथ्वीवर मला कोणीहि नाहीं. तेव्हां तूं त्याच्या रक्षणासंबंधानें काळजी करूं नको. मी हें तुझ्यासमोर खरें बोलत आहें. ह्या रामाच्या कृपेमुळेंच ह्या जगतामध्यें अतिशय मोठी कीर्ति आणि धर्म, अर्थ व काम ह्यांची समृद्धि हीं प्राप्त होत असतात, असें मी समजतों. तेव्हां सीतेसहवर्तमान शयन करणाऱ्या प्रिय मित्र रामाचें मी आपल्या सर्व ज्ञातींसहवर्तमान हातांत धनुष्य घेऊन रक्षण करीन. नेहमीं या वनांत संचार करणाऱ्या माझ्या गैरमाहितींतलें असें कांहींएक नाहीं. शत्रूचें चतुरंग सैन्यहि मी युद्धामध्यें जिंकून टाकीन."

निषादाधिपति गुह पुढें सांगतो:—" ह्याप्रमाणें आम्हीं सांगितलें असतां धर्मावर दृष्टि ठेवून वागणाऱ्या महात्म्या लक्ष्मणानें आमचें सर्वांचें सांत्वन केलें. तो म्हणाला, 'दाशरथि राम सीतेसहवर्तमान भूमीवर शयन करीत असतांना मला निद्रा, निर्घोर जीवित अथवा सुख प्राप्त होणें कसें बरें शक्य आहे? गुहा, सर्व देव-दैत्यांनाहि ज्याचा पराक्रम युद्धामध्यें सहन होणें अशक्य आहे, तो राम सीतेसहवर्तमान तृणावर निजला आहे, पहा. मोठें तप आणि कष्टानें केलेलीं नानाप्रकारचीं अनुष्ठानें ह्यांमुळें लक्षणानें स्वत:सारखाच असलेला हा अद्वितीय पुत्र दशरथाला प्राप्त झाला आहे. हा वनांत गेल्यावर राजा फार दिवस वांचणार नाहीं. खरोखर पृथ्वी सत्वरच विधवा होऊन जाईल. बा गुहा, राजवाड्यांतील आणि अयोध्या नगरींतील स्त्रिया अतिशयच मोठा आक्रोश करून श्रम झाल्यामुळें स्वस्थ पडल्या असतील; आणि राजवाड्यांतहि आज विलापशब्द बंद होऊन खरोखर सामसूम झालें असेल. कौसल्या, राजा आणि त्याचप्रमाणें माझी माता हे सर्व आजची रात्रसुद्धां जिवंत राहतील, असें मला दिसत नाहीं. शत्रूघ्नाकडे पाहून कदाचित् माझी माता जिवंत राहील; परंतु दु:खित झालेली वीरमाता कौसल्या तर मरण पावणारच. रामराज्याभिषेकरूप मनोरथ प्राप्त न झाल्यामुळें, 'घात झाला! घात झाला!' असें म्हणत माझा पिता परत आलेल्या रामाला राज्यावर न बसवितांच नाश पावेल. तो समय प्राप्त झाला असतां मृत झालेल्या भूपति पित्याचे ज्याच्या हातून सर्व प्रकारचे और्ध्वदेहिक संस्कार होतील, ते खरोखर धन्य होत. रमणीय चव्हाटे, धर्मशाळा, वेगवेगळे राजमार्ग, वाडे आणि देवालयें ह्यांनीं संपन्न, सर्व प्रकारच्या रत्नांनीं भूषित, गज, अश्व आणि रथ ह्यांनीं व्याप्त, तूर्यवाद्यांच्या ध्वनीनें नादित, सर्व प्रकारच्या कल्याणांनीं संपूर्ण, आनंदित व पुष्ट जनांनीं व्याप्त, उपवनें व बागा ह्यांनीं पूर्ण व समाजविषयक उत्सवांनीं शोभणारी जी माझ्या पित्याची राजधानी, तिच्यामध्यें भरतप्रभृति सुखी होऊन संचार करतील. हा वनवासाचा काल निघून गेल्यावर सत्यप्रतिज्ञ व क्षेमसंपन्न रामासहवर्तमान आम्ही सुखी होऊन अयोध्येमध्यें प्रविष्ट होण्याचा संभव आहे काय?"

गुह सांगतो:—"हे कैकेयीनंदना, ह्याप्रमाणें महात्मा लक्ष्मण शोक करीत बसला असतांना ती रात्र निघून गेली. तदनंतर प्रभातकाल होऊन स्पष्ट सूर्योदय झाल्यावर भागीरथीच्या तीरीं उभयतांनाहि जटिल करून मीं अनायासें पलीकडे तारून नेलें; आणि जटा धारण करणारा, वृक्षांच्या साली नेसणारा, हत्तींचे

कळप रक्षण करणाऱ्या महागजाप्रमाणें असलेला आणि उत्कृष्ट भाते व धनुष्य धारण करणारा तो महाबलाढ्य शत्रुतापन राम परत येण्याच्या आशेनें सीतेसहवर्तमान निघून गेला. "

सर्ग सत्यायशीवा

रामाचें वृत्त भरताला सांगणें.

अत्यंत अप्रिय असलेलें तें गुहाचें भाषण श्रवण केल्यावर भरत तेथेंच चिंताक्रांत होऊन बसला. सुकुमार, महाधैर्यवान, महापराक्रमी, स्तंभासारखे स्कंध, कमलपत्राप्रमाणें विशाल नयन व आल्हादकारक मुद्रेनें युक्त आणि तरुण असा मुहूर्तपर्यंत अत्यंत खिन्न झालेला भरत पुनरपि सावध झाला, आणि अंकुशांनीं हृदयाचें ठिकाणीं विद्ध झालेल्या गजाप्रमाणें त्याचें एकाएकीं देहभान नाहींसें झालें. तेव्हां भूकंप होऊं लागला असतां वृक्ष ज्याप्रमाणें कंपित होतात, त्याप्रमाणें भरत मूर्च्छित झालेला अवलोकन करितांक्षणीं गुहाचें मुख निस्तेज होऊन तो व्यथित झाला. शेजारींच बसलेल्या शत्रुघ्नानें भरताची तशी अवस्था झालेली पाहून त्याला कवटाळून धरिलें. आणि शोकाकुल होऊन उच्च स्वरानें रोदन केल्यावर तोहि मूर्च्छित झाला. हें पाहून उपवासानें कृश, दीन आणि पतिमरण दु:खानें जर्जर झालेल्या भरताच्या सर्व माता समीप धांवल्या आणि भूमीवर पडलेल्या भरताच्या भोंवतीं त्या गरका घालून बसल्या असतां, खिन्न झालेल्या कौसल्येनें त्याच्या समीप जाऊन त्याला कवटाळून धरिलें. नंतर आपल्या पुत्राप्रमाणें त्याला पोटाशीं धरिल्यावर ती विचारी कौसल्या रडत रडत भरताला विचारूं लागली, " बाळा भरता, तुझ्या शरिराला कांहीं व्याधि तर पीडा देत नाहीं ना ? अरे, आज ह्या राजकुलाचें जीवीत तुझ्या अधीन आहे. बाबारे, भ्रात्यासहवर्तमान राम वनांत गेला असतां तुझ्याकडे पाहून मी प्राण धारण करीत आहें व दशरथ राजा मरण पावल्यावर आतां तूंच एक आमचें रक्षण करणारा आहेस. लक्ष्मणा संबंधानें तर तूं कांहीं अप्रिय वार्ता ऐकिली नाहींस ना ? अथवा माझा एकुलता एकच पुत्र जो भार्येसहवर्तमान वनांत गेला आहे, त्याच्याविषयीं तर कांहीं अनिष्ट वृत्तांत तुझ्या कानावर आला नाहीं ना ?"

ह्याप्रमाणें कौसल्या विचारूं लागली असतां मुहूर्तभर मूर्च्छित पडलेला तो

महायशस्वी भरत सावध झाला, आणि रडत रडत कौसल्येचें सांत्वन करून गुहाला म्हणाला, " गुहा, माझा भ्राता राम रात्रीं कोठें राहिला होता ? सीता कोठें राहिली होती ? लक्ष्मण कोठें होता ? कोणत्या शय्येवर रामानें शयन केलें, आणि काय भक्षण करून त्यानें ती रात्र काढिली, हें मला सांग. "

भरताचें हें भाषण श्रवण करून, प्रिय व आपलें हित करणारा असा अतिथि—राम प्राप्त झाला असतां त्याच्याशीं जो व्यवहार केला होता, तो गुहानें आनंदित होऊन भरताला सांगितला. तो म्हणाला, " सरसनीरस अन्न, भक्ष्य पदार्थ आणि नानाप्रकारचीं फळें असें रामाच्या भोजनाकरितां मी पुष्कळ आणिलें होतें; परंतु सत्य व पराक्रमी रामानें त्याला मान देऊन तें सर्व मला परत दिलें. सत्यधर्माला स्मरून त्यानें तें घेतलें नाहीं. ' मित्रा गुहा, आम्हांला आपला प्रतिगृह करितां येत नाहीं. आम्हीं नेहमीं लोकांना द्यावें. ' अशी त्या महात्म्यानें आमची सर्वांची समजूत केली. लक्ष्मणानें जें उदक आणिलें होतें, तें महात्म्या रामानें पिऊन टाकिलें. सीतेसहवर्तमान रघुवंशज रामाला त्या रात्रीं असाच उपवास पडला. नंतर अवशिष्ट राहिलेलें उदक लक्ष्मणानें ग्रहण केलें. तदनंतर मौन धारण करून स्वस्थ चित्तानें बसलेल्या त्या त्रिवर्गानीं संध्यावंदन केलें. संध्यावंदन आटोपल्यावर सुमित्रापुत्र लक्ष्मणानें स्वत: सत्वर जाऊन दर्भ आणिले, आणि रामाकरितां उत्कृष्ठ शय्या तयार केली. त्या उत्कृष्ठ शय्येवर सीतेसहवर्तमान रामानें शयन केलें असतां, त्याचें पादप्रक्षालन केल्यावर तो लक्ष्मण तेथून पलीकडे झाला. हेंच तें इंगुदी वृक्षाचें मूळ, आणि हेंच तें तृण. ह्या ठिकाणीं राम व सीता ह्या उभयतांनीं त्या रात्रीं शयन केलें. हातामध्यें अंगुलित्राण धारण करून आणि बाणांनीं भरलेले अक्षय्य भाते आणि सज्ज केलेलें प्रचंड धनुष्य हातांत घेऊन तो शत्रुतापन लक्ष्मण रामाच्या भोंवताली सर्व रात्रभर हिंडत राहिला. तेव्हां जेथें लक्ष्मण होता, तेथें मीहि उत्कृष्ठ बाण व धनुष्य घेऊन उभा राहिलों, आणि धनुष्य घेऊन दक्ष असलेल्या ज्ञातींसहवर्तमान त्या इंद्रतुल्य रामाचें रक्षण केलें. "

सर्ग अठ्यायशींवा.

भरताचा विलाप.

गुहानें सांगितलेलें तें सर्व पूर्णपणें श्रवण केल्यानंतर मंत्र्यांसहवर्तमान तो भरत इंगुदी वृक्षाच्या मुळाशीं येऊन रामाच्या शय्येकडे पाहूं लागला, आणि सर्व मातांना म्हणाला, "ह्या ठिकाणीं त्या महात्म्यानें रात्रीं भूमीवर शयन केलें. हें त्याचें शरीर घांसटल्याचें स्थान होय. सार्वभौमकुलामध्यें महाभाग्यवान विवेकी दशरथापासून उत्पन्न झालेल्या रामानें भूमीवर शयन करणें योग्य नाहीं. मोठमोठीं अजिनें ज्याच्यावर अंथरलीं आहेत, आणि उत्कृष्ठ आस्तरणांचाच समूह ज्याचे ठिकाणीं आहे, अशा मंचकावर आजपर्यंत शयन करून पुरुषश्रेष्ठ राम आतां भूतलावर शयन कसें करीत आहे? विमानाप्रमाणें असलेल्या प्रासादावरील गृहांमध्यें आणि शेवटल्या गच्चांवरून आजपर्यंत शयन करीत असतांना हा राम आतां भूतलावर कसे शयन करीत आहे? सोन्यारुप्याच्या भुया ज्यामध्यें आहेत, उत्कृष्ठ उत्कृष्ठ आस्तरणें पसरलेलीं असल्यामुळें जे सुशोभित झाले आहेत, पुष्पांच्या राशीमुळें जे चित्रविचित्र दिसत आहेत, चंदन आणि अगुरु ह्यांचा जेथें सुवास चालला आहे, जे दिसण्यांत श्वेतवर्ण अभ्राप्रमाणें दिसत आहेत, राघूंच्या झुंडी ज्यामध्यें शब्द करीत आहेत व ज्यांतील भिंती सुवर्णाच्या केलेल्या आहेत असे जे मेरु पर्वतासारखे शीतल, सुगंधि व उत्तमोत्तम राजवाडे, त्यांमध्यें आजपर्यंत शयन केलेला हा राम आतां भूमीवर कसें शयन करीत आहे? गीत आणि वाद्य ह्यांचे ध्वनी, उत्कृष्ट भूषणांचे आवाज आणि सर्वोत्कृष्ठ मृदंगाचे शब्द ह्यांच्या योगानें जो नेहमीं जागा केला जातो, प्रभातकालीं भाट ज्याला वंदन करितात आणि योग्य अशा गद्यपद्यात्मक स्तुतींनीं असंख्य सूत व मागध ज्याची प्रशंसा करीत असतात, तो शत्रुतापन राम आज भूमीवर कसें शयन करीत आहे? ह्या लोकामध्यें ऐकिलेलें हें विश्वासास पात्र नाहीं व हें मला खरें दिसत नाहीं. तस्मात् (रामानें भूमीवर शयन केलें वगैरे जें हें तूं सांगत आहेस, त्याविषयीं) मला मोह उत्पन्न होत आहे. अथवा हा वृत्तांत ह्यांच्या तोंडून मी स्वप्नामध्यें ऐकिला असावा, असें मला वाटत आहे. कारण स्वप्नामध्यें असंभाव्य गोष्टीहि दृष्टीस पडतात. खरोखर कालापेक्षां कोणत्याहि देवाचें सामर्थ्य अधिक नाहीं, असें मला वाटतें. कारण काल प्राप्त झाला असतां त्या दाशरथि रामालाहि ह्याप्रमाणें भूमीवर शयन करण्याचा प्रसंग

आला ! जिचें दर्शनहि आल्हादकारक आहे, अशी विदेहराजकन्या दशरथाची प्रिय स्नुषा सीता ज्या कालामध्यें भूमीवर पडून राहिली, त्या कालापेक्षां कोणाचेंहि सामर्थ्य जास्त नाहीं. ही माझ्या भ्रात्याची शय्या. ह्या शुभ स्थानावर तो लोळला आणि आपल्या अवयवांच्या योगानें ह्या कठीण प्रदेशांवर त्यानें सर्व तृण चुरगाळून टाकिलें. ठिकठिकाणीं सुवर्णकण बिलगलेले दृष्टीस पडत आहेत, ह्यावरून त्या कल्याणी सीतेनें भूषणांसहवर्तमान ह्या शय्येवर शयन केलें असावें, असें वाटतें. ह्या ठिकाणीं सीतेचा शेला अडकला होता, असें स्पष्ट होत आहे. कारण चिकटून राहिलेले हे रेशमाचे तंतु येथें झळकत आहेत. ज्या अर्थी अशा प्रकारच्या शय्येवर शयन केलें असतांहि बाला, निरपराधी, सुकुमार व साध्वी अशा जनककन्येला दुःख झालें नाहीं, त्या अर्थीं भर्त्याची शय्या जशी असेल तशी स्त्रियांना सुखकरच होते, असें मला वाटतें. अरे, मी नीच आहें. मी दुष्ट आहें. कारण माझ्याकरितां राम भार्येसहवर्तमान अनाथाप्रमाणें असल्या शय्येवर शयन करीत आहे. सार्वभौमकुलामध्यें उत्पन्न झालेला, सर्व लोकांना सुखावह असलेला, सर्व लोकांचें प्रिय करणारा, नीलवर्णाप्रमाणें श्यामवर्ण असलेला, आल्हादकारक मुद्रा आणि आरक्तवर्ण नेत्र ह्यांनीं युक्त असलेला व सुखाचा उपभोक्ता असून दुःख भोगण्यास अयोग्य असलेला हा राम, उत्कृष्ठ अशा प्रिय राज्याचा त्याग करून भूमीवर कसा निजला? संकटकालीं भ्रात्या रामाबरोबर असणारा महाभाग्यवान शुभलक्षणसंपन्न असा लक्ष्मण खरोखर धन्य आहे. पतीबरोबर जी वनांत गेली, ती विदेहराजकन्या सीताहि खरोखर कृतकृत्य झाली आहे. त्या महात्म्याचा वियोग झालेले आम्ही मात्र रामाची सेवा घडेल किंवा नाहीं ह्याविषयीं संशयित आहों. रामानें अरण्याचें अवलंबन केल्यावर दशरथ राजाहि स्वर्गाला गेला असतां, नायकरहित झालेली ही पृथ्वी नाविकरहित झालेल्या नौकेप्रमाणें मला शून्य दिसत आहे. राम वनामध्यें वास्तव्य करीत असतांना त्याच्या बाहुवीर्यानें परिपालित असलेल्या ह्या पृथ्वीची माझ्यासारखा मनामध्यें तरी काय इच्छा करणार आहे? जिच्या सभोंवतीं असलेल्या कोटाचें रक्षण होत नाहीं, जिच्यांतील अश्व व गज ह्यांचें कोणी नियमन करीत नाहीं, जिचीं द्वारें कोणी लावीत नाहींत, जिच्यांतील सैन्य हर्षयुक्त नसल्यामुळें जी शून्य झालेली आहे, कोणी रक्षण करणारा नसल्यामुळें जी मोकळी पडलेली आहे, आणि जी विपन्न स्थितीमध्यें आहे अशी ती अरक्षित राजधानी—विषमिश्र भक्ष्याप्रमाणें—स्वीकारण्याचें शत्रुहि मनांत आणीत

नाहींत. (हा सर्व त्या रामाच्या बाहुबलाचाच प्रताप होय.) आजपासून मी जटा व वल्कलें धारण करून नेहमीं फलमूलांवर उपजीविका करीत जाईन, आणि भूमीवर अथवा तृणावर शयन करीत जाईन. त्या रामाचें व्रत स्वतः मीच घेईन, आणि तें परिपालन करण्यकरितां पुढचीं चौदा वर्षे वनामध्यें वास्तव्य करीन, म्हणजे आर्य रामाची ती प्रतिज्ञा मिथ्या होणार नाहीं. म्हाल्याकरितां मी वनामध्यें वास्तव्य करूं लागलों असतां शत्रुघ्नहि माझ्याबरोबर वनामध्यें वास्तव्य करील. माझा श्रेष्ठ भ्राता राम-लक्ष्मणासहवर्तमान अयोध्येचें परिपालन करील, आणि ककुत्स्थकुलोत्पन्न रामाला अयोध्येमध्यें ब्राह्मण अभिषेक करतील; परंतु हा माझा मनोरथ देवता शेवटास नेतील काय? रामाचे चरणांवर मस्तक ठेवून अनेक प्रकारांनीं मी त्याचें मन वनांतून परत येण्याविषयीं वळवीत असतांनाहि जर तो कृपा न करील, तर मीहि वनामध्यें संचार करणाऱ्या त्या राघवाबरोबर तेथेंच चिरकाल वास्तव्य करीन. तो भक्तवत्सल असल्यामुळें माझा त्याग करणार नाहीं."

सर्ग एकुणनव्वदावा.

गंगातरण व भरद्वाजांच्या आश्रमीं गमन.

त्याच ठिकाणीं गंगातीरीं रात्रीं राहिल्यावर रघुवंशज भरत पहांटेस उठून शत्रुघ्नाला म्हणाला, "शत्रुघ्ना, ऊठ, निजतो आहेस काय? तुझें देव बरें करो. निषादराज गुहाला सत्वर घेऊन ये, म्हणजे तो आपली सेना गंगेतून पलीकडे नेईल. रामाचें तसेंच चिंतन करीत करीत मी रात्रभर जागाच आहें. मला झोंप येत नाहीं."

ह्याप्रमाणें भरतानें शत्रुघ्नाला सांगितलें असतां शत्रुघ्नानेंहि त्याला तसेंच सांगितलें. अशा प्रकारें ते पुरुषश्रेष्ठ बोलत आहेत तोंच प्रातःकालीं गुह त्यांचे समीप आला, आणि त्यांना विचारूं लागला, "हे ककुत्स्थकुलोत्पन्न भरता, नदीतीरीं रात्रीं तुमचें वास्तव्य सुखानें झालें ना? आणि सैन्यासहवर्तमान तुझी प्रकृति नेहमीं बरी असते ना?"

गुहाचें हें प्रेमयुक्त भाषण ऐकून रामाच्या अधीन असलेला भरत त्याला म्हणाला, "हे विचारी निषाद राजा, ही रात्र आम्हांला सुखावह झाली, आणि

तूंहि आमचा सत्कार केलास. आतां पुष्कळ नौकांच्या योगानें धीवरांनीं आम्हांला गंगेतून पलीकडे तारून न्यावें."

ही भरताची आज्ञा ऐकतांच गुह सत्वर आपल्या नगरामध्यें गेला, आणि आपल्या ज्ञातींना म्हणाला, 'तुमचें नेहमीं कल्याण असो. उठा, जागे व्हा, आणि नावा घेऊन या. मी भरताची सेना पलीकडे पोहोंचवून देतों.'

ह्याप्रमाणें गुहानें त्यांना सांगितल्याबरोबर राजाज्ञेप्रमाणें ते सत्वर उठले, आणि चोहोंकडून पांचशें नौका घेऊन आले. ह्याशिवाय मोठमोठ्या घंटा लाविलेल्या पताका, शिडें आणि नावाडी ज्यांवर आहेत व चित्रादिकांच्या योगानें सुशोभित असून ज्यांचे सांधे बळकट आहेत, अशा स्वस्तिकसंज्ञक नावाहि ते घेऊन आले. तेव्हां पांढऱ्या बनातीनें आच्छादिलेली आणि मंगलावह वाद्यांच्या घोषानें युक्त असलेली अशी स्वस्तिकसंज्ञक शुभ नौका गुह जवळ घेऊन आला असतां, भरत, महाबलाढ्य शत्रुघ्न, कौसल्या, सुमित्रा व इतरहि राजस्त्रिया ह्यांनीं त्या नौकेवर आरोहण केलें. तदनंतर पुरोहित वसिष्ठ, गुरु, ब्राह्मण व बरोबर आलेल्या सरदारांच्या स्त्रिया त्या नौकेवर आरूढ झाल्यानंतर गाडे व सामानसुमान दुसऱ्या नौकांवर लादलें. सेनेंतील लोक आपलें रात्रींचें वसतिस्थान पेटवूं लागले असतां, नावेच्या उतारापाशीं गंगेंत शिरूं लागले असतां आणि सामानसुमान घेऊं लागले असतां, जो ध्वनि झाला, त्यानें आकाश व्यापून टाकिलें. नंतर त्या शीघ्रगामी शिडांच्या नावा एकदम चालूं लागल्या. कांहीं नावा स्त्रियांनीं भरलेल्या होत्या, कांहीं अश्वांनीं खेचलेल्या होत्या आणि कांहीं बहुमूल्यवान गाड्या ओढणारे बैल वगैरे वाहून नेत होत्या. त्या नावा पलीकडल्या तीराला पोहोंचवून आणि त्या लोकांना तेथें उतरवून परत फिरल्या असतां धीवर लोक त्यांवर आरूढ झाले, आणि उदकांतून चित्रविचित्र गतीनें येऊं लागले. माहुतांनीं प्रेरणा केलेले ध्वजांसहवर्तमान गज नावांतून तरून जाऊं लागले असतां पक्षयुक्त पर्वताप्रमाणें दिसूं लागले. परत येतांना कांहीं धीवर नावांवर बसून आले, कांहीं पेटाऱ्यांच्या योगानें तरून आले, कांहीं लहान मोठ्या घंटांचा आश्रय करून आले आणि कांहीं तर पोहूनच आले. असो.

स्वतः धीवरांनीं गंगेपलीकडे नेऊन पोहोंचविलेली ती पवित्र सेना चार घटिका दिवस आल्यानंतर मैत्रमुहूर्तावर उत्कृष्ट प्रयागवनामध्यें गेली. तेव्हां सुखानें त्या सेनेला विश्रांति देऊन आणि तिला प्रयागवनामध्यें ठेवून, मुनि-

श्रेष्ठ भरद्वाजांचें दर्शन घेण्याकरितां ऋत्विज आणि सदस्य ह्यांसहवर्तमान भरत पुढें निघाला. महात्मा देवपुरोहित जो भरद्वाज ब्राह्मण, त्याच्या आश्रमाला गेल्यावर रमणीय पर्णकुटिका, वृक्ष व प्रदेश ह्यांनीं युक्त असलेलें त्या श्रेष्ठ विप्रांचें रम्य महावन भरतानें अवलोकन केलें.

सर्ग नव्वदावा.

भरत व भरद्वाज मुनि यांचा संवाद.

भरद्वाज मुनींच्या आश्रमासमीप गेल्यानंतर सर्व लोकांना एक कोसभर दूरच ठेवून भरत आपल्या मंत्र्यांसहवर्तमान त्यांच्या दर्शनाला निघाला. तो धर्मवेत्ता भरत शस्त्रें व लवाजमा मागें ठेवून देऊन व सोंवळ्याचीं वस्त्रें परिधान करून पुरोहित वसिष्ठांना पुढें घालून पायींच निघाला. तदनंतर त्या भरद्वाज मुनींचें दर्शन घेते वेळीं मंत्र्यांना मागें ठेवून वसिष्ठ मुनींच्या मागोमाग तो भरत त्यांचेकडे जाऊं लागला. वसिष्ठ मुनींना अवलोकन करितांक्षणीं महातपस्वी भरद्वाज ' पूजासाहित्य पूजासाहित्य ' असें शिष्यांना सांगत सांगत सत्वर आसनावरून उठले; आणि वसिष्ठांची भेट झाल्यावर भरतानें अभिवंदन केलें असतां, तो दशरथाचा पुत्र म्हणून त्या महातेजस्वी भरद्वाजांना समजून आलें. तदनंतर त्या उभयतांना अर्घ्य, पाद्य आणि फलें दिल्यावर, धर्मवेत्त्या भरद्वाज मुनींनीं इक्ष्वाकुकुल, अयोध्या, सैन्य, कोश, मित्र आणि मंत्री ह्यांविषयीं क्रमानें कुशल प्रश्न केला. दशरथ मृत झाल्याचें ते योगबलानें जाणीतच असल्यामुळें त्या राजाचा त्यांनीं उल्लेखच केला नाहीं. नंतर शरीरप्रकृति, अग्नि, शिष्य, वृक्ष, मृग आणि पक्षी ह्यांसंबंधानें वसिष्ठ व भरत ह्यांनीं त्यांना कुशल प्रश्न केला असतां, ' ठीक आहे ' असें म्हणून रामाचे ठिकाणीं असलेल्या प्रेमबंधनामुळें ते महायशस्वी भरद्वाज मुनि भरताला म्हणाले, " राज्य चालवीत असतांना तुला येथें येण्याचें प्रयोजन काय, हें सर्व मला सांग. तुझ्या येण्यांतील हेतु चांगला असेलच, अशाबद्दल माझ्या मनाला विश्वास वाटत नाहीं. ज्या शत्रुनाशक व आनंदवर्धक रामाला कौसल्येनें जन्म दिला, भ्राता लक्ष्मण आणि भार्या सीता ह्यांसहवर्तमान ज्याला बहुतकालपर्यंत रहाण्याच्या उद्देशानें वनांत हांकून दिलें आणि ज्या महायशस्वी रामाला ' ह्या दंडकारण्यामध्यें चौदा वर्षेंपर्यंत रहा '

म्हणून पित्यानें स्त्रीकरितां आज्ञा केली, त्या निष्पाप रामाचें व लक्ष्मणाचें कांहीं वाईट करून निष्कंटक राज्याचा उपभोग घेण्याची तर तुला इच्छा झाली नाहीं ना?"

याप्रमाणें भरद्वाज मुनींनीं विचारिलें असतां भरताचे नेत्र अश्रूंनीं भरून आले, आणि मोठ्या दुःखानें तो अडखळत अडखळत त्यांना म्हणाला, "भगवानहि जर मला असाच समजत असतील, तर मी नीचच आहें; परंतु झालेल्या गोष्टीचा दोष माझ्याकडे नाहीं, हें मी स्वानुभवावरून जाणीत आहें. तेव्हां आपण मला असें बोलूं नका. माझ्यासंबंधानें मातेनें जें राजाला सांगितलें, तें मला इष्ट नाहीं, त्याच्या योगानें मी संतुष्टहि झालों नाहीं, आणि तिच्या सांगण्याचा मी स्वीकारहि करीत नाहीं. अयोध्येंत परत येण्याविषयीं त्या पुरुषश्रेष्ठाचें मन वळवावें, म्हणून मी त्याच्या चरणांना वंदन करण्याकरितां त्याजकडे निघालों आहें. तेव्हां असा उद्देश मनांत धरून मी आलों आहें असें समजा, आणि माझ्यावर कृपा करा. भगवन्, सांप्रत भूपति राम कोठें आहे, तें आपण मला कळवा."

ह्यानंतर भरतावर कृपा करण्याविषयीं वसिष्ठप्रभृति ऋत्विजांनींहि विनंति केली असतां भगवान भरद्वाज मुनि त्या भरताला म्हणाले, "हे पुरुषश्रेष्ठा भरता, राघववंशांत उत्पन्न झालेल्या तुझे ठिकाणीं गुरुसेवा, इंद्रियदमन आणि सज्जनांचें अनुकरण हें योग्यच आहे, हें तुझ्या मनांतील मला ठाऊकच आहे; परंतु तुझी कीर्ति अत्यंत वृद्धिंगत करण्याच्या उद्देशानें त्याचें दृढीकरण व्हावें, म्हणून मीं तुला असें विचारिलें. सीता आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान धर्मज्ञ राम कोठें रहात आहे, हें मी जाणीत आहें. तो तुझा भ्राता चित्रकूट महापर्वतावर वास्तव्य करीत आहे. तूं उद्यांक त्या प्रदेशाला जाशील. आज मंत्र्यासहवर्तमान येथें वास्तव्य कर, आणि हे अर्थकामसंपन्न अत्यंत ज्ञानवान भरता, हा माझा मनोरथ तूं परिपूर्ण कर."

ह्याप्रमाणें भरद्वाजांनीं सांगितल्यानंतर महाविचारी आणि प्रख्यात कीर्तिमान भरतानें 'ठीक आहे' म्हणून त्यांना सांगितलें, आणि त्या भरद्वाज मुनींच्याच आश्रमामध्यें वास्तव्य करण्याचें त्या राजकुमारानें मनामध्यें आणिलें.

सर्ग एक्याण्णवावा.

भरद्वाजाश्रमीं भरताचें आदरातिथ्य.

भरतानें त्या रात्रीं भरद्वाजाश्रमामध्येंच वास्तव्य करण्याचा निश्चय केला; आणि भरद्वाज मुनींनीं त्याचें आदरातिथ्य करण्याकरितां त्याला भोजनाचें निमंत्रण केलें. तेव्हां 'पाद्य, अर्घ्य वगैरे जें वनामध्यें मिळणें संभवनीय आहे, त्याच्या योगानें आपण हें आदरातिथ्य केलेंच आहे' असें भरत त्यांना म्हणाला असतां, भरद्वाज मुनि हंसत हंसत त्याला म्हणाले, "तूं माझे ठिकाणीं प्रेम करणारा आहेस, हें मीं जाणीत आहें, व ह्यामुळें तूं कशानेंहि संतुष्ट होशील अशी माझी खात्री आहे; परंतु ह्या तुझ्या सेनेला भोजन घालण्याची माझी इच्छा आहे. तेव्हां हे धर्मात्मन्, माझी जशी इच्छा आहे, तसा तिचा अंगीकार करणें तुला योग्य आहे. हे पुरुषश्रेष्ठा, सैन्य दूर ठेवून तूं येथें कशाकरितां आलास? सैन्यासहवर्तमानच तूं येथें कां आला नाहींस?"

ह्याप्रमाणें भरद्वाज मुनींनीं विचारिलें असतां भरत हात जोडून त्या तपोधन भरद्वाज महामुनींना म्हणाला, "भगवन्, भगवानांच्या आश्रमाला पीडा होईल ह्या भीतीनें मी सैन्यासहवर्तमान येथें आलों नाहीं. कारण राजानें अथवा राजपुत्रानें आपल्या देशामध्यें असलेल्या तपस्वी लोकांना पीडा देण्याचें प्रयत्नपूर्वक टाळिलें पाहिजे. भगवन्, श्रेष्ठ अश्व, मनुष्यें आणि मत्त गज हे मोठा प्रदेश व्यापून माझ्या मागोमाग येत आहेत. वृक्ष, उदक, भूमि आणि आश्रमांतील पर्णकुटिका ह्यांचा त्यांनीं नाश करूं नये, एतदर्थ त्यांना तेथें ठेऊन मीं एकटाच येथें आलों आहें"

आदरातिथ्याची तयारी करण्याकरितां देवतांना आह्वान.

ह्यावर 'येथें सेना घेऊन ये' अशी त्या महर्षींची आज्ञा होतांक्षणींच भरत परत गेला, आणि सेना घेऊन तेथें आला. नंतर अग्निशालेमध्यें प्रवेश करून आणि ओष्ठपरिमार्जनासह आचमन करून आतिथ्य करण्याकरितां भरद्वाज मुनींनीं विश्वकर्म्याला आह्वान केलें. ते म्हणाले, "सैन्याचें आदरातिथ्य करण्याची माझी इच्छा आहे. ह्यास्तव मी विश्वकर्म्याला व त्वष्ट्याला आह्वान करितों. या आदरातिथ्यासंबंधानें माझी सर्व तयारी होऊं द्या. त्याचप्रमाणें यम, वरुण व कुबेर ह्या तीन लोकपालांना, आणि इंद्रप्रभृति देवांना मी आह्वान

करितों. या सैन्याचें आदरातिथ्य करण्याची माझी इच्छा आहे. तेव्हां त्याची तयारी होऊं द्या. पूर्ववाहिन्या आणि उत्तरवाहिन्या अशा ज्या कांहीं नद्या पृथ्वीवर व आकाशामध्यें असतील, त्या सर्व आज येवोत. त्यांपैकीं कांहीं नद्या मैरेयसंज्ञक मद्याचे प्रवाह सुरू करोत. दुसऱ्या कांहीं नद्या उत्तम रीतीनें तयार केलेल्या सुरेचा प्रवाह उत्पन्न करोत. कांहीं नद्या इक्षुरसाप्रमाणें मधुर व शीत उदक वाहून नेऊं लागोत. विश्वावसु, हाहा व हूहू ह्या देव-गंधर्वांना, आणि त्याचप्रमाणें देवगंधर्वांसहवर्तमान सर्व अप्सरांना मी आह्वान करीत आहें. घृताची, विश्वाची, मिश्रकेशी, अलंबुषा, नागदत्ता, हेमा, पर्वतावर वसतिस्थान केलेली सोमा, आणि त्याचप्रमाणें इंद्र व ब्रह्मदेव ह्यांची सेवा करणाऱ्या अशा सर्व सालंकार अप्सरांना तुंबुरूसहवर्तमान मी आह्वान करीत आहें. वस्त्रें व भूषणें हींच ज्यांतील वृक्षांचीं पानें आहेत, आणि दिव्य स्त्रिया हींच ज्यांतील वृक्षांचीं फळें आहेत, असें जें उत्तरकुरुदेशामध्यें असलेलें कुबेराचें दिव्य शाश्वत चैत्ररथ वन, तेंच येथें येवो. (त्या वनांतील देवतांनाच मी येथें आह्वान केलें असल्यामुळें हें वनच तसें होवो.) भगवान सोम हा उत्कृष्ट अन्न म्हणजे नानाप्रकारचें विपुल भक्ष्य, भोज्य, चोष्य, लेह्य, सुराप्रभृति पेयें आणि नानाप्रकारचीं मांसें तयार करो. वृक्षांना आपोआप आलेलीं अद्भुत पुष्पें तयार ठेवो."

मेजवानीचा थाट

ह्याप्रमाणें अप्रतिम तेज आणि समाधि ह्यांनीं युक्त व उत्तम व्रतस्थ असलेल्या त्या भरद्वाज मुनींनीं शिक्षेंत सांगितल्याप्रमाणें वर्णोच्चारानें संपन्न असें आह्वान केलें. तेव्हा हात जोडून व पराङ्मुख होऊन ते मुनि मनामध्यें ध्यान करीत बसले असतांना त्या सर्व देवता एकेक त्यांचे समीप येऊं लागल्या. मलय आणि दर्दुर ह्या चंदनयुक्त पर्वतांना स्पर्श करून घाम नाहींसा करणारा कल्याणकारक व मनाला अत्यंत आल्हाद देणारा वारा योग्य रीतीनें सुखकारक वाहूं लागला. मेघ दिव्य पुष्पांची वृष्टि करूं लागले, आणि सर्व दिशांमध्यें देवदुंदुभि ऐकूं येऊं लागल्या. दुसरे उत्कृष्ठ वारे वाहूं लागले. अप्सरांचे समुदाय नृत्य करूं लागले. देव व गंधर्व गायन करूं लागले, आणि वीणावाद्यांचे ध्वनि होऊं लागले. तेव्हां मधुर, सम आणि मिलाफानें असलेला तो वाद्यांचा ध्वनि स्वर्ग, भूमि आणि प्राणिमात्रांचे कर्ण व्यापून राहिला. ह्याप्रमाणें मनुष्यांच्या कानाला सुखावह असा दिव्य ध्वनि सुरू झाला असतां, भरताच्या

सैन्याला विश्वकर्म्याची ती तयारी दृष्टीस पडली. आसपास पांच योजनेपर्यंत भूमि साफ झाली, आणि नील व वैदूर्य या मण्यासारख्या कोमल तृणांनीं ती आच्छादित झाली. त्या प्रदेशामध्यें बिल्व, कपित्थ, पनस, बीजपूरक, आमलक व आम्र हे वृक्ष फळांनीं भूषित झाले. दिव्य व भोग्य वस्तूंनीं युक्त असलेलें वन उत्तरकुरुदेशापासून येथें आल्यासारखें झालें, आणि तीरावरील अनेक वृक्षांनीं व्याप्त अशी सौम्य नदीहि तेथें उत्पन्न झाली. शुभ्रवर्ण चौसोपी घरें, हत्ती व घोडे यांच्या पागा आणि वाडे व प्रासाद ह्यांनीं युक्त अशा शुभ वेशी हीं तेथें उत्पन्न झालीं. त्या ठिकाणीं एक राजगृह उत्पन्न झालें. तें शुभ्रवर्ण मेघासारखें होतें. त्याला उत्कृष्ठ तोरणें लाविलेलीं होतीं. श्वेतपुष्पांनीं तें शृंगारिलेलें होतें. दिव्य चंदनाचे सडे त्यांत टाकिले होते. ते चतुरस्र होतें. शांत होतें. त्यामध्यें शय्या, आसनें व यानें हीं होतीं. सर्व प्रकारचे दिव्य रस त्यांत होते. दिव्य भोग्य वस्तु आणि वस्त्रेंहि तेथें होतीं. सर्व प्रकारचें अन्न त्यांत तयार केलेलें होतें. आंतील पात्रें धुतलेलीं व निर्मल होतीं. सर्व प्रकारचीं आसनें तेथें तयार होतीं. आणि तें सुशोभित असून उत्कृष्ठ प्रकारच्या शय्या त्यांत पसरलेल्या होत्या.

अशा प्रकारच्या त्या रत्नांनीं भरलेल्या घरामध्यें भरद्वाज महर्षींची अनुज्ञा झाल्यावर तो कैकेयीपुत्र महापराक्रमी भरत प्रविष्ट झाला. पुरोहितासहवर्तमान ते सर्व मंत्रीहि त्याच्या मागोमाग गेले, आणि तो गृहनिर्माणप्रकार अवलोकन करून आनंदित झाले. तेथें राजाला योग्य असें जें दिव्य सिंहासन, चामर व छत्र होतें, त्याला मंत्र्यांसहवर्तमान प्रदक्षिणा केली. हें रामाचें आहे, असें समजून प्रथम रामाला प्रणाम केल्यावर त्यानें त्या सिंहासनाचें पूजन केलें; आणि सिंहासनाच्या अधोभागीं सचिवांकरितां तयार केलेल्या आसनावर तो भरत चौरी घेऊन बसला. तेव्हां सर्व मंत्री व पुरोहित योग्यतेप्रमाणें तेथें बसले. तदनंतर सेनाधिपति व शिबिरक्षक हेहि तेथें येऊन बसले. नंतर एका मुहूर्तानें भरद्वाज मुनींच्या आज्ञेवरून पायसरूप कर्दमानें युक्त असलेल्या नद्या भरतासमीप येऊन तयार राहिल्या. ह्या नद्यांच्या दोन्ही तीरांवर भरद्वाज ब्राह्मणाच्या प्रसादामुळें उत्पन्न झालेलीं दिव्य व रम्य बसतिस्थानें होतीं; आणि सफेती देऊन ती तयार ठेविलेलीं होतीं. त्याच वेळीं दिव्य अलंकार घातलेल्या अशा ब्रह्मदेवानें पाठविलेल्या वीस हजार स्त्रिया तेथें आल्या. सुवर्ण, रत्नें, मोत्यें व पोंवळीं ह्यांनीं शोभित झालेल्या अशा कुबेरानें पाठविलेल्याहि वीस हजार

स्त्रिया तेथें आल्या. ज्यांनीं पुरुषाला झपाटिलें असतां पुरुष उन्माद झाल्यासारखा दिसू लागतो, असे वीस हजार अप्सरांचें समुदाय नंदनवनांतून तेथें आले. प्रभेनें सूर्याप्रमाणें असलेले नारद, तुंबुरु व गोप हे गंधर्वराज भरतापुढें गायन करूं लागले. अलंबुषा, मिश्रकेशी, पुंडरीका आणि वामना ह्या अप्सरा भरद्वाज मुनींच्या आज्ञेवरून भरतासमीप नृत्य करूं लागल्या. देवांपाशीं आणि चैत्ररथ वनामध्यें जीं पुष्पें असतात, तीं भरद्वाज मुनींच्या तपःसामर्थ्यानें प्रयागामध्यें दृष्टीस पडूं लागलीं. इतकेंच नव्हे, परंतु त्या भरद्वाज मुनींच्या तपःप्रभावानें बिल्ववृक्ष मृदंग वाजवूं लागले, बिभीतकवृक्ष शम्यासंज्ञक ताल धरूं लागले आणि अश्वत्थवृक्ष नृत्य करूं लागले. तेव्हां देवदारु, ताल, तिलक आणि तमालक हे वृक्षहि आनंदित होऊन कुब्ज व खुज ह्यांच्या रूपानें तेथें लोटले. शिंशपा, आवळ्या, जांभळ्या आणि अरण्यांतील ज्या कांहीं दुसऱ्या लता त्या सर्व स्त्रीरूप धारण करून भरद्वाजांच्या आश्रमामध्यें त्या वेळीं वास्तव्य करूं लागल्या. आणि 'सुरापान करणाऱ्यांनीं सुरापान करावें, बुभुक्षितांनीं खीर ओरपावी आणि मांसभक्षकांनीं चांगलीं पवित्र मांसें भक्षण करावीं. सारांश, ज्यांना ज्याची इच्छा असेल, त्याचा त्यांनीं स्वीकार करावा' असें म्हणूं लागल्या. मनोहर नदीतीरावर सात सात आठ आठ तरुण स्त्रिया एकेका पुरुषाला अंगाला लावून स्नान घालूं लागल्या. भव्य नेत्रांनीं युक्त असलेल्या स्त्रिया पुरुषांचे पाय चेपण्याकरितां तेथें आल्या. स्नान घातल्यामुळें आपलें भिजलेलें शरीर वस्त्रादिकांच्या योगानें भूषित करून त्या श्रेष्ठ स्त्रिया एकमेकीला मद्य वगैरे पाजूं लागल्या. अश्व, गज, गर्दभ, उष्ट्र आणि वृषभ ह्यांना वाहनसंरक्षक लोकांनीं त्यांचें त्यांचें भक्ष्य यथाविधि दिलें, आणि इक्ष्वाकूंमधील श्रेष्ठ श्रेष्ठ योध्यांच्या वाहनांना खाण्याकरितां हांकून नेणाऱ्या त्या महाबलाढ्य वाहनरक्षकांनीं इक्षु, मध आणि लाह्या वाहनांना खावयास घातल्या. मोतद्दाराला घोड्याचें भान राहिलें नाहीं, व माहुतांचें लक्ष्य हत्तीकडे राहिलें नाहीं. सारांश, त्या सैन्यांतील लोक कांहीं मादक द्रव्य सेवन केल्यामुळें मत्त झाले होते, कांहीं मद्यपानानें विवेकशून्य बनले होते, आणि कांहीं स्त्रियांच्या वगैरे उपभोगानें आनंदांत दंग होऊन गेले होते. तेव्हां सर्व इच्छा परिपूर्ण झालेले, रक्तचंदनाची उटी लाविलेले आणि अप्सरांच्या समुदायांनीं युक्त झालेले ते सैनिक म्हणाले, 'आम्ही आतां अयोध्येमध्येंहि जात नाहीं व दंडकारण्यांतहि जाणार नाहीं. भरताचें कुशल होवो, आणि रामालाहि सुख प्राप्त होवो.'

ह्याप्रमाणें पदाति, योद्धे, स्वार, माहुत आणि मोतद्दार तो आदरातिथ्याचा प्रकार प्राप्त झाल्यामुळें स्वतंत्र झाल्यासारखे होऊन असें भाषण करूं लागले. भरताच्या मागोमाग जाणार ते हजारों लोक अत्यंत हर्षित होऊन गर्जना करूं लागले व 'हा स्वर्ग आहे' असें म्हणूं लागले. पुष्पमाला धारण केलेले असे हजारों सैनिक नाचत, हंसत व गात चोहोंकडे धावूं लागले. तदनंतर ते अमृततुल्य अन्न भक्षण केलेल्या त्या सैनिकांना दिव्य भक्ष्य पदार्थ अवलोकन करून पुनरपि भोजन करण्याची इच्छा झाली. सैन्यांतील दास, दासी व स्त्रिया ह्या सर्वांनीं नूतन वस्त्रें परिधान केलेलीं होतीं, आणि त्या सर्वांना अत्यंत आनंद झालेला होता. गज, गर्दभ, उष्ट्र, वृषभ, अश्व, मृग आणि पक्षी ह्यांनीं त्या भरद्वाज महर्षींच्या आश्रमामध्यें इतकें कांहीं भक्षण केलें कीं, मुनींनीं दिलेल्या अन्नाशिवाय त्यांना दुसरें कांहींच भक्षण करण्याची इच्छा झाली नाहीं. त्या ठिकाणीं शुभवस्त्ररहित, क्षुधित, मलिन अथवा केंसांत धूळ उडालेला असा एकहि पुरुष दिसत नव्हता. बोकड व वराह एतत्संबंधीं उत्कृष्ठ मसाला घातलेलीं, फळांच्या रसांनीं तयार केलेलीं आणि स्वाद व रस ह्यांनीं युक्त असलेलीं जीं वरणें, त्यांच्या योगानें भाताच्या भोंवतीं भरून ठेविलेलीं आणि वर फुलें घातलेलीं अशीं हजारों सुवर्णादि धातूंचीं पात्रें त्या ठिकाणीं सैन्यांतील पुरुषांनीं विस्मयपूर्वक अवलोकन केलीं. त्या वनप्रदेशामध्यें पायसरूप कर्दमांनीं युक्त असलेले कूप, कामधेनु, गायी आणि मधुर रस स्रवणार वृक्ष उत्पन्न झालेले होते. मैरेयसंज्ञक मद्यानें परिपूर्ण असलेल्या वापी तेथें उत्पन्न झाल्या असून, फक्त तापवून तयार केलेल्या व खापरावर भाजून तयार केलेल्या अशा मृग, मयूर व कुक्कुट पक्ष्यांच्या रुचकर मांससमुदायांनीं त्या परिवेष्टिलेल्या होत्या. भातानें भरलेल्या सुवर्णाच्या हजारों पराती, भाज्या व कोशिंबिरी ह्यांनीं भरलेलीं सुवर्णाचीं लाखों पातेलीं आणि सुवर्णाचीं कोट्यवधि ताटें तेथें उत्पन्न झालीं होतीं. पीतवर्ण आणि सुगंधि द्रव्यांनीं युक्त अशा ताज्या मठ्ठयानें भरलेलीं व व उत्कृष्ठ रीतीनें अलंकृत केलेलीं अशीं भांडीं तेथें होतीं दह्यानें भरलेलीं तपेलीं होतीं व पाणी पिण्याचीं भांडींहि तेथें होतीं. जिरें घातलेल्या ताकाचे कांहीं डोह भरलेले होते. शुभ्रवर्ण दह्याचीं कांहीं तळीं भरलेलीं होतीं. दुधानें भरलेलीं कांहीं टाकीं तेथें होतीं, आणि साखरेचा सांठा असलेलीं कांहीं भुयारेंहि तेथें होतीं. कल्क, चूर्णें, कषाय व स्नानाकरितां नानाप्रकारचीं उदकें पात्रांतून ठेविलेलीं नदीतीरावर त्या सैन्यांतील लोकांनीं अवलोकन केलीं. निर्मळ आणि

टोंकाला कुंचली केलेले असें दंतधावनकाष्ठांचे समुदाय, पुडांतून उगाळून ठेविलेलीं शुभ्र गंधें, निर्मल आरसे, वस्त्रसमुदाय, हजारों जोडखडावा व वहाणा, काजळाच्या डब्या, फण्या, कुंचल्या, छत्रें, धनुष्यें, आश्चर्यकारक कवचें, शय्या, आसनें आणि खर, उष्ट्र, गज व अश्व ह्यांना आंतून जातां येईल अशा उतारानें युक्त, आकाशाप्रमाणें नीलवर्ण, स्वच्छ जलानें भरलेलीं आणि सुखानें स्नान करितां येण्याजोगीं जलपूर्ण सरोवरें त्यांनीं अवलोकन केलीं. पशूंनीं भक्षण करण्याकरितां नील व वैदूर्य ह्या मण्यांप्रमाणें दिसत असलेले गवताचे हजारों मृदु ढीग त्यांनीं तेथें अवलोकन केले.

अशा प्रकारें भरद्वाज महर्षींनीं केलेलें तें स्वप्नतुल्य अद्भुत आदरातिथ्य अवलोकन करून ते लोक विस्मित झाले आणि नंदनवनामध्यें रममाण होणाऱ्या देवांप्रमाणें भरद्वाज मुनींच्या रम्य आश्रमामध्येंच रममाण होणाऱ्या त्या लोकांची ती रात्र निघून गेली. तेव्हां ते गंधर्व आणि त्या दिव्य स्त्रिया हीं सर्व भरद्वाज मुनींची अनुज्ञा घेऊन आल्या मार्गानें परत गेलीं; परंतु दिव्य अगुरु आणि चंदन ह्यांची उटि ज्यांच्या अंगाला लावली आहे, असे मदिरापानानें मत्त झालेले पुरुष आणि लोकांनीं चुरगळून टाकिलेल्या व इकडे तिकडे उडविलेल्या अशा नानाप्रकारच्या उत्कृष्ट दिव्य पुष्पमाला हीं मात्र तशींच जागच्या जागीं राहिलीं.

सर्ग ब्याण्णवावा.

भरताचें चित्रकूट पर्वताकडे प्रयाण.

तदनंतर ती रात्र तेथें वास्तव्य केल्यावर परिवारासह आदरातिथ्य झालेला तो भरत रामप्राप्तीच्या इच्छेनें भरद्वाज मुनींकडे गेला. ते मुनि अग्निहोत्र आटोपून बसले होते. तेव्हां हात जोडून आलेल्या त्या पुरुषश्रेष्ठ भरताला अवलोकन करून ते म्हणाले, 'हे निष्पापा, ह्या आमच्या प्रदेशामध्यें तुझी रात्र सुखानें गेली का? आणि तुझे सर्व लोक आमच्या आतिथ्यानें तृप्त झाले काय? भरता, हें तूं आम्हांला सांग.'

ह्याप्रमाणें त्यांनीं विचारिलें असतां, आश्रमांतून बाहेर निघत असलेल्या त्या उत्कृष्ठ तेजस्वी भरद्वाज ऋषींना हात जोडून व प्रणाम करून भरत म्हणाला, "भगवन्, संपूर्ण सैन्य आणि वाहनें ह्यांसहवर्तमान सुखानें मी राहिलों,

आणि सैन्यांसहवर्तमान अत्यंत तृप्त झालों. आमचे दासहि अत्यंत सुखानें येथें राहिले. आमचे श्रम व ताप ह्यांचा परिहार झाला. अन्नपानांची आम्हांला समृद्धि झाली. आम्हाला वसतिस्थानहि चांगलें मिळालें. भगवन्, आतां मी आपली अनुज्ञा घेतों. हे ऋषिश्रेष्ठ, भ्रात्याचे समीप निघालेल्या माझ्याकडे आपण अधिकच कृपादृष्टीनें पहात जा. त्या महात्म्या धर्मनिष्ठ रामाच्या आश्रमाला कोणता मार्ग जातो व तो मार्ग किती दूर आहे, हें आपण मला सांगा."

ह्याप्रमाणें भरतानें विचारिले असता, ते महातेजस्वी व महातपस्वी भरद्वाज मुनि भ्रात्याच्या दर्शनाकरितां उत्सुक झालेल्या भरताला म्हणाले, "भरता, येथून अडीच योजनांवर निर्जन वनामध्ये रम्य पाषाण आणि अरण्य ह्यांनीं युक्त असलेला चित्रकूट पर्वत आहे. त्या पर्वताच्या उत्तरेस मंदाकिनी नदी वहात आहे. त्या नदीच्या काठीं प्रफुल्लित वृक्ष असून सभोंवती मनोहर अशीं प्रफुल्लित वनें आहेत. त्या नदीच्या पलीकडल्या बाजूला चित्रकूट पर्वत, आणि राम-लक्ष्मणाची पर्णकुटिका हीं तुझ्या दृष्टीस पडतील. त्या पर्वतावरच ते निःसंशय वास्तव्य करीत आहेत. तेव्हा यमुनेच्या दक्षिण तीरावरून जो मार्ग जातो, त्या मार्गाने तूं जा. कांहींसा दूर गेल्यावर त्या मार्गाच्या दोन बाजूनी जे दोन रस्ते जातात, त्या दोन रस्त्यांपैकीं दक्षिण दिशेला जाणारा जो डावी-कडचा रस्ता आहे, त्या रस्त्याने गज व अश्व ह्यानीं भरलेली तूं आपली सेना ने. म्हणजे हे भाग्यवंता, तुला महात्म्या श्रीरामचंद्राचे दर्शन होईल."

ह्याप्रमाणें भरद्वाज मुनींनीं सांगितल्यावर पुढें जाण्याची तयारी झाली. हें ऐकतांक्षणीं राजाधिराज दशरथाच्या स्त्रिया रथामध्ये बसून जाण्याला योग्य असतांनाहि आपापले रथ सोडून भरद्वाज मुनींना नमस्कार करण्याकरितां त्यांच्या सभोंवतीं जमल्या. प्रथम कंपयुक्त, कृश व दीन अशा कौसल्येने राज-पत्नी सुमित्रेसहवर्तमान भरद्वाज मुनींचे पाय धरिले. तदनंतर मनोरथ परिपूर्ण न झालेल्या व सर्व लोकाच्या निंदेस पात्र झालेल्या कैकयीनेंहि लज्जित होऊन त्यांचे पाय धरिले, आणि त्या भगवान महर्षींना प्रदक्षिणा करून ती मनामध्यें खिन्न झालेली कैकेयी भरताच्या जवळच उभी राहिली. तेव्हां महर्षि भरद्वाज भरताला म्हणाले, 'राघवा, तुझ्या माता संबंधानें विशेष हकीकत जाणण्याची माझी इच्छा आहे.'

ह्याप्रमाणें भरद्वाज त्याला म्हणाले असता, तो धर्मनिष्ठ व संभाषणनिपुण

भरत हात जोडून त्यांना म्हणाला, " भगवन्, शोक आणि उपवास ह्यांच्या योगानें कृश व दीन अशी जी ही देवतेप्रमाणें असलेली माझ्या पित्याची पट्टाभिषिक्त स्त्री आपण पहात आहां, त्या ह्या कौसल्येनें सिंहाप्रमाणें पराक्रमदर्शक गतीनें युक्त असलेल्या पुरुषश्रेष्ठ रामाला–विष्णूला जन्म देणाऱ्या अदितीप्रमाणें–जन्म दिला आहे. तिच्या डाव्या हाताला चिकटून जी ही खिन्न होऊन उभी राहिली आहे, ती ही सुमित्रा राजाची मध्यम स्त्री होय. ही दुःखाकुल झाली असल्यामुळें पुष्पें गळून जाऊन वनांत पडलेल्या कर्णिकार वृक्षाच्या शाखेप्रमाणें दिसत आहे. वीर, अमोघ पराक्रमी आणि देवतुल्य असे उभयतां राजकुमार लक्ष्मण व शत्रुघ्न ह्याच राजपत्नीचे पुत्र होत. जिच्याकरितां पुरुषश्रेष्ठ राम-लक्ष्मणांना मरणतुल्य विपत्ति प्राप्त झाली, आणि जिच्याकरितां दशरथ राजा पुत्रवियोग होऊन स्वर्गाला चालता झाला, ती ही क्रुद्ध, अविचारी, गर्विष्ठ, स्वतःला भाग्यवती मानणारी, ऐश्वर्यलुब्ध, सज्जनासारखी परंतु दुर्जन, दुष्ट आणि पापबुद्धि माझी माता कैकेयी असें आपण समजा. हिच्यामुळेंच स्वतःवर आलेलें संकट पहाण्याचा मला प्रसंग आला आहे. "

ह्याप्रमाणें भरत बोलत असतां त्याच्या नेत्रांतून अश्रु वहात होते, आणि त्यामुळें शब्दोच्चार अस्पष्ट होत होता. बोलणें संपल्यावर तो अगदीं क्रुद्ध होऊन सर्पाप्रमाणें सुस्कारे टाकूं लागला. तेव्हां रामाचा वनांत जाण्याचा हेतु जाणणारे महाबुद्धिमान महर्षि भरद्वाज त्या क्रोधाविष्ट झालेल्या राजपुत्राला म्हणाले, " भरता, तूं कैकेयीला ह्याबद्दल दोष देऊं नको. रामाच्या ह्या वनवासांत जाण्याचा परिणाम सुखावह होईल. कारण रामाच्या वनवासांत जाण्यावरच देव, दानव आणि जितेंद्रिय ऋषी ह्यांचें हित अवलंबून आहे. "

ह्याप्रमाणें भरद्वाज मुनींनीं सांगितल्यानंतर भरत त्यांना अभिवंदन करून जाण्याला तयार झाला; आणि प्रदक्षिणा करून व त्यांचा निरोप घेऊन ' सैन्याची तयारी करा ' म्हणून त्यानें हुकूम दिला. तेव्हां दिव्य आणि सुवर्णभूषित असे अश्वरथ तयार करून, नानाप्रकारचे लोक तेथून प्रयाण करण्याकरितां त्यांवर आरूढ झाले. सुवर्णाच्या झुली व पताका धारण केलेल्या हत्तिणी व हत्ती हे पर्जन्यकालीं गर्जना करणाऱ्या मेघाप्रमाणें गर्जना करीत करीत चालूं लागले. नानाप्रकारचे व मोठमोठे मूल्यवान लहान मोठे रथ जाऊं लागले. आणि पदाति पायांनींच चालूं लागले. रामदर्शनाची इच्छा करणाऱ्या कौसल्याप्रभृति स्त्रिया आनंदानें उत्कृष्ट रथांत बसून जाऊं लागल्या.

नुकताच उदय पावलेल्या चंद्रसूर्याप्रमाणें भासमान व वाहकांनीं युक्त अशा पालखींत बसून वैभवशाली भरत लवाजम्यासह चालला.

ह्याप्रमाणें आकाशामध्यें उत्पन्न झालेल्या मोठ्या मेघाप्रमाणें दक्षिण दिशा व्याप्त करून गजांनीं व अश्वांनीं गजबजलेली ती सेना चालती झाली. गंगेच्या पश्चिम तीरावर असलेली ती सेना पर्वतावरील व नदीतीरावरील वनें ओलांडून पुढें गेली. सारांश, आनंदित गज व अश्व ह्यांच्या पागांनीं युक्त व पशुपक्ष्यांच्या समुदायांना घाबरवून सोडणारी ती भरताची सेना त्या महावनामध्यें प्रविष्ठ होतांना शोभूं लागली.

सर्ग त्र्याण्णवावा.

भरताचा चित्रकूटाच्या पायथ्याशीं तळ.

ती प्रचंड सेना जाऊं लागली असतां वनचर आणि आपापल्या कळपांतील पुढारी त्रस्त होऊन व घाबरून जाऊन आपापल्या कळपासहवर्तमान धावूं लागले. वनप्रदेश, पर्वत व नद्या ह्यांचे ठिकाणीं असलेलीं अस्वले, मुख्य मुख्य पृषतसंज्ञक मृग, आणि रुरुसंज्ञक मृग त्रस्त झालेले दृष्टोत्पत्तीस येऊं लागले. ह्याप्रमाणें मोठ्या चतुरंग सेनेनें परिवेष्टित झालेला तो धर्मनिष्ठ दशरथपुत्र भरत प्रसन्न होऊन जाऊं लागला असतां, त्याच्या त्या सागरतुल्य सेनेनें पर्जन्यकालीं आकाश व्याप्त करणाऱ्या मेघाप्रमाणें त्या प्रदेशांतील पृथ्वी व्याप्त करून टाकिली. अश्वसमुदाय व महाबलाढ्य गज ह्यांच्या योगानें ती सेना थोडा वेळपर्यंत अदृश्य झाली. मग बराच दूर मार्ग अतिक्रमण केल्यावर वाहनें श्रांत झालेला तो वैभवशाली भरत वसिष्ठांना म्हणाला, " भरद्वाज मुनींनीं जो प्रदेश जशा प्रकारचा सांगितला आहे, आणि जशा प्रकारें आम्हीं ऐकिलें आहे, तशाच प्रकारचें ह्या प्रदेशाचें रूप दिसत आहे. ह्यावरून त्या प्रदेशांवर आपण आलों, हें अगदीं स्पष्ट होत आहे. हा चित्रकूट पर्वत असून त्याचप्रमाणें ही मंदाकिनी नदी आहे; आणि हें नीलमेघांप्रमाणें असलेलें वन दुरून दिसत आहे. सांप्रत माझे पर्वततुल्य गज चित्रकूट पर्वताचीं रम्य शिखरें तुडवीत चालले आहेत. उन्हाळा संपल्यानंतर उदक धारण करणारे नील मेघ ज्याप्रमाणें उदकाची वृष्टि करितात, त्याचप्रमाणें हे वृक्ष पर्वत शिखरावर

पुष्पांची वृष्टि करीत आहेत. शत्रुघ्ना, मगरांनीं व्याप्त झालेल्या सागराप्रमाणें अश्वांनीं सभोंवतीं गजबजून गेलेला व किन्नरांनीं आक्रमण केलेला हा प्रदेश पर्वतावर अवलोकन कर. वायूनें हांकून लाविलेले मेघसमूह ज्याप्रमाणें शरदृतूमध्यें आकाशांत भासूं लागतात, त्याचप्रमाणें सैनिकांनीं पळवून लाविलेले ते महावेगवान पशुसमुदाय दिसत आहेत. मेघतुल्य ढालांनीं युक्त असलेले हे सैनिक दक्षिणेकडील लोकांप्रमाणें फुलांचे सुवासिक तुरे मस्तकांत घालीत आहेत. पूर्वीं ध्वनिरहित आणि म्हणूनच दिसण्यांतहि भयकर असलेलें हें वन सांप्रत लोकांनीं भरलेल्या अयोध्येप्रमाणें गजबजलेलें दिसत आहे. अश्वांच्या खुरांनीं उडालेली धूळ आकाश व्याप्त करून राहिली आहे, आणि माझें प्रिय करण्याकरितांच कीं काय, वायु तिला सत्वर वाहून नेत आहे. शत्रुघ्ना, ज्यांना अश्व जोडिले आहेत व मुख्य मुख्य सारथी ज्यावर बसले आहेत, असे हे रथ वनांतून सत्वर चाललेले तूं अवलोकन कर. आणि ज्यांचें दर्शन प्रिय आहे असे हे मयूर पक्षी त्रस्त होऊन पक्ष्यांचें निवासस्थान जो पर्वत त्यावर उडून जात आहेत, तें पहा. हा प्रदेश मला फारच मनोहर दिसत आहे. तस्मात् हे निष्पापा, स्वर्गतुल्य प्रदेश तापसांचें निवासस्थान असल्याचें स्पष्ट होत आहे. मृगीसहवर्तमान असलेले हे पृषतसंज्ञक मृग, शरिरावरील बिंदूंच्या योगानें नाना प्रकारच्या पुष्पांनीं शृंगारिल्यासारखे वनामध्यें मनोहर दिसत आहेत. तस्मात् आतां सैनिकांना खुशाल पुढें जाऊं द्या, आणि ते पुरुषश्रेष्ठ राम लक्ष्मण दृष्टोत्पत्तीस येतील अशा रीतीनें वन शोधूं द्या."

हें भरताचें भाषण श्रवण केल्यावर हातांमध्यें शस्त्र घेतलेले शूर पुरुष त्या वनामध्यें प्रविष्ट झाले असतां त्यांना धूर दिसला. तेव्हां तो धूर अवलोकन करून ते भरतापाशीं आले, आणि त्याला म्हणाले, 'कोठें वणवा लागल्याचें जर प्रत्यक्ष दृष्टोत्पत्तीस येत नाहीं, तर निर्जन प्रदेशामध्यें अग्नि असण्याचा संभवच नाहीं. ह्यावरून ह्याच ठिकाणीं रघुवंशज राम-लक्ष्मण असल्याचें स्पष्ट होत आहे. अथवा ते पुरुषश्रेष्ठ शत्रुतापन राजकुमार जर तेथें नसतील, तर ह्या ठिकाणीं रामासारखे इतर तपस्वी असल्याचें उघड होत आहे.'

सज्जनांना संमत होणारें हें त्यांचें भाषण श्रवण करून शत्रुसैन्याचें मर्दन करणारा भरत त्या सर्व सैनिकांना म्हणाला, "तुम्ही येथें सज्ज होऊन रहा. येथून पुढें जाऊं नका. सुमंत्र व धृति ह्यांना बरोबर घेऊन मीच तिकडे जातों." भरतानें असें सांगितलें असतां ते सैनिक तेथेंच सभोंवतीं उभे राहिले, आणि जिकडे

तो धूम दिसत होता, तिकडे भरतानें दृष्टि दिली. असो. भरतानें उभी केलेली ती सेना निवासाकरितां पुढें भूमि पाहूं लागली, आणि प्रिय रामाशीं भरताची भेट झाल्याचें समजून आल्यामुळें ती लवकरच आनंदित झाली.

सर्ग चौऱ्याण्णवावा.

रामाचें सीतेशीं भाषण.

(चित्रकूटवर्णन.)

उत्कृष्ट पर्वतावर वास्तव्य करणें ज्याला प्रिय आहे, आणि ज्याला त्या चित्रकूट पर्वतावर राहून बरेच दिवस झाले आहेत, असा तो देवतुल्य दशरथ-पुत्र राम सीतेचा संतोष करण्याची इच्छा धरून स्वतःच्या व तिच्या चित्ताला करमणूक करण्याच्या उद्देशानें त्या आपल्या भार्येला, इंद्र ज्याप्रमाणें इंद्राणीला दर्शवितो, त्याप्रमाणें तो अद्भुत चित्रकूट पर्वत दाखवूं लागला. तो म्हणाला, "हे कल्याणि, हा रमणीय पर्वत अवलोकन करून, राज्यभ्रंश आणि सुहृदांचा वियोग ह्यांच्या योगानें माझ्या मनाला पीडा होत नाहीं. हे भद्रे, धातूंनीं युक्त असलेल्या गगनचुंबित शिखरांनीं विभूषित आणि नानाप्रकारच्या पक्षिगणांनीं संपन्न असलेला हा पर्वत पहा. धातूंनीं विभूषित झालेले ह्या श्रेष्ठ पर्वतावरील प्रदेश कांहीं रुप्यासारखे, कांहीं रक्तासारखे, कांहीं पीतवर्ण व मांजिष्ठवर्ण, कांहीं उत्कृष्ट रत्नांच्या प्रभेनें युक्त, कांहीं पुष्पराग, स्फटिक आणि केकतपुष्पें ह्यांसारखे, आणि कांहीं नक्षत्रें व पारद ह्यांसारखे दिसत आहेत. नानाप्रकारचे निरुपद्रवी[1] मृगगण आणि व्याघ्र, तरस व अस्वलें ह्यांचे समुदाय ह्यांच्या योगानें व्याप्त असलेला आणि अनेक प्रकारच्या पक्ष्यांनीं गजबजून गेलेला हा पर्वत

१ व्याघ्रादि श्वापदांना ह्या ठिकाणी 'निरुपद्रवी' म्हणजे हिंसादिदोषरहित असें जें विशेषण दिलें आहे, तें योग्यच आहे कारण ज्या प्रदेशामध्यें अहिंसासिद्धि प्राप्त झालेले तपस्वी असतात, त्या प्रदेशांतील प्राण्यांचे ठिकाणीं हिंसादोष राहत नाहीं, आणि परस्परातील वैरभाव नाहींसा होतो, असें पातंजलि योगशास्त्रामध्यें सांगितलें आहे. भगवद्-भक्त तुकाराममहाराजांनींहि आपल्या एका अभंगात हें दर्शविलें आहे. कूर्मपुराणामध्यें "कर्मणा मनसा वाचा सर्वभूतेषु सर्वदा। अक्लेशजननं प्रोक्तं त्वहिंसा परमर्षिभिः" ह्या श्लोकांत अहिंसेचें लक्षण सांगितलें असून त्याचा अर्थ काया, वाचा आणि मन ह्यांपैकीं कशानेंहि कोणत्याच प्राण्याला कधींहि पीडा न देणें ह्याला महर्षींनीं अहिंसा असें म्हटलें आहे—असा आहे. (भा. क.)

सुशोभित दिसत आहे. आंबा, जांभळी, आसणा, लोध्र, खिरणी, फणस, धव, अक्रोड, भव्य तिवस, बिल्व, टेंबुर्णी, कळक, शिवणी, निंब, वायवरणा, मोहा, तिळवा, बोरी, आंवळी, कळंब, वेत, इंद्रयव, ईडलिंबू इत्यादि प्रकारच्या फुलें पुष्पें आणि छाया ह्यांनीं युक्त असलेल्या मनोहर वृक्षांनीं व्याप्त झालेला हा पर्वत शोभा देत आहे. हे कल्याणि, रम्य पर्वतशिखरावर असलेल्या ह्या कामोद्दीपक प्रदेशांना व त्या प्रदेशावर जोड्यांनीं रममाण होत असलेल्या विचारी किन्नरांना तूं अवलोकन कर. वृक्षशाखांत लटकलेलें किन्नरांचें खड्ग, विद्याधरांच्या स्त्रियांचे मनोहर क्रीडाप्रदेश आणि त्यांचीं उत्कृष्ठ वस्त्रें तूं अवलोकन कर. उच्च प्रदेशावरून वहात येणारे धबधबे व भूमि फोडून वहात जाणारे झरे ह्यांच्या योगानें हा पर्वत मदस्राव चाललेल्या गजाप्रमाणें दिसत आहे. गुहेच्या द्वारांतून येणारा, नानाप्रकारच्या पुष्पांचे अनेक गंध वाहून नेणारा आणि घ्राणेंद्रिय तृप्त करणारा हा वायु समीप आला असतां कोणत्या वरें पुरुषाला हर्षयुक्त करणार नाहीं? हे निर्दोष स्त्रिये, ह्या ठिकाणीं तूं आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान जरी मी पुष्कळ वर्षें राहिलों तरी मला दुःख होणार नाहीं. कारण ह्या पर्वतावर विपुल पुष्पें व फलें, नानाप्रकारचे पक्षिगण आणि अद्भुत शिखरें असल्यामुळें या ठिकाणीं माझें चित्तरंजन होत आहे. ह्या वनवासाच्या योगानें मला दोन फलें प्राप्त झालीं. सत्यपरिपालनस्वरूप धर्मसंबंधानें पित्याच्या ऋणापासून मुक्तता हें एक व भरताचा मनोरथ परिपूर्ण होणें हें दुसरें. वैदेहि, काया, वाचा आणि मन ह्यांना संमत असे अनेक प्रकार अवलोकन करून चित्रकूट पर्वतावर माझ्यासहवर्तमान दिवस काढणें तुला चांगलें वाटत आहे कां? हे राजपत्नि, माझे पूर्वज जे प्राचीन राजर्षी ह्यांनीं वनांत राहणें हेंच मोक्षसाधन म्हटलें आहे. कारण वनामध्यें विधिपूर्वक वास्तव्य करणें हें देहत्यागानंतर हिरण्यगर्भस्थान प्राप्त होण्याचें साधन आहे, असें म्हणतात."

श्रीराम पुढें म्हणतात:—"हे जनककन्ये, नील, पीत, श्वेत आणि अरुण ह्या वर्णांच्या योगानें पर्वताच्या शेंकडों असंख्य विशाल शिला शोभत आहेत, आणि ह्या श्रेष्ठ पर्वतावर झळकत असलेल्या हजारों औषधी आपल्या तेजःसंपत्तीनें अग्नीच्या ज्वालांप्रमाणें भासत आहेत. ह्या पर्वतावरील कांहीं प्रदेश गृहासारखे दिसत असून कांहीं बागांसारखे दिसत आहेत. कांहीं प्रदेश तर पुष्कळ लोकांना राहतां येईल, अशा एकेकच शिलेनें युक्त असलेले दिसत

आहेत. हा चित्रकूट पर्वत पृथ्वी फोडून बाहेर निघाल्यासारखा दिसत आहे. आणि याचें हें शिखर सर्व बाजूंनीं शुभ दिसत आहे. कुष्ठ, स्थगर, पुन्नाग आणि भूर्जपत्र ह्या वृक्षांचीं पानें हींच ज्यांवरील आस्तरणें आहेत, आणि पद्मदलांनीं ज्या युक्त आहेत, अशा विषयी जनांच्या उत्कृष्ठ शय्या तूं अवलोकन कर. कमलपुष्पांच्या माला ह्या ठिकाणीं चेंगरून जाऊन इकडे तिकडे उडविलेल्या दिसत आहेत, आणि त्याचप्रमाणें नानाप्रकारचीं फलें विषयीं जनांनीं उपभोग घेऊन टाकिलेलीं दिसत आहेत. कुबेरनगरी व इंद्रनगरी ह्यांना व उत्तरकुरु देशाला मागें टाकून विपुल मुळें, फळें व उदक ह्यांनीं युक्त असलेला हा चित्रकूट पर्वत शोभत आहे. सीते, श्रेष्ठ अशा स्वकीय नियमांनीं सज्जनांच्या मार्गाचें अवलंबन करून राहिलेला हा मी, चतुर्दशसंवत्सरात्मक काल लोटेपर्यंत तूं आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान जर येथें विहार करून राहिलों, तर कुलधर्म वृद्धिंगत करणारें असें सौख्य मला प्राप्त होईल."

सर्ग पंचाण्णवावा.

रामाचें सीतेशीं भाषण.

(मंदाकिनीवर्णन.)

तदनंतर पर्वतावरून निघून तो कोसलाधिपति राम शुभ जलानें युक्त व रम्य अशी मंदाकिनी नदी सीतेला दाखवूं लागला; आणि जिचें मुख चंद्राप्रमाणें आल्हादकारक आहे, अशा त्या सुंदरी विदेहराज कन्येला म्हणाला, "हंस, आणि सारस पक्ष्यांनीं जिचा आश्रय केलेला आहे, आणि पुष्पांनीं व आश्चर्यकारक वाळवंटांनीं जी युक्त आहे, अशी ही रम्य मंदाकिनी नदी तूं अवलोकन कर. तीरावरील नानाप्रकारच्या प्रफुल्लित व फलसंपन्न वृक्षांनीं ही व्याप्त झाली असल्यामुळें, कुबेराच्या सौगंधिक सरोवराप्रमाणें दिसत आहे. मृगाचे कळप तहान भागवून गेल्यामुळें ज्यांतील उदक गढूळ झालें आहे, अशीं हीं रमणीय तीर्थें माझे ठिकाणीं आनंद उत्पन्न करीत आहेत. प्रिये, जटा व अजिनें धारण करून वल्कलें परिधान केलेले ऋषी वेळेवर मंदाकिनी नदीमध्यें स्नान करीत आहेत हे विशालनयने, निर्मल आचरणानें युक्त असलेले हे दुसरे ऋषी हात वर करून सूर्याचें उपस्थान करीत आहेत. ह्या

नदीच्या दोहों बाजूस असलेल्या वृक्षांचीं अग्रें वाऱ्यानें हालत असल्यामुळें त्यांपासून पत्रें व पुष्पें गळत आहेत, आणि त्या योगानें हा पर्वत जणूं काय नृत्य करण्याकरितांच प्रवृत्त झाल्यासारखा दिसत आहे पहा. प्रिये ही मंदाकिनी नदी पहा. हिचें उदक कोठें कोठें मोत्याप्रमाणें दिसत आहे, हिच्यामध्यें कोठें कोठें वाळवंटें दिसत आहेत आणि हिच्याकाठीं कोठें कोठें सिद्धजन बसले आहेत. हे कृशोदरि, वायूनें उडून आलेले एक आणि उदकामध्यें पुनः पुनः बुडत असलेले दुसरे पुष्पसमुदाय तूं अवलोकन कर. हे कल्याणि, मनोहर शब्द करणारे आणि शुभ शब्द उच्चारीत असलेले हे चक्रवाक पक्षी वाळवंटा-वर बसत आहेत पहा. प्रिये, चित्रकूट पर्वत आणि मंदाकिनी नदी ह्यांचें दर्शन, अयोध्या नगरींतील वास्तव्यापेक्षांच नव्हे, परंतु तुझ्या दर्शनापेक्षांहि अधिक सुखावह आहे, असें मला वाटतें. पापक्षालन झालेल्या आणि तप, दम व शम ह्यांनीं युक्त असलेल्या सिद्धांनीं जिचें उदक नेहमीं क्षुब्ध झालेलें असतें, त्या मंदाकिनी नदीमध्यें तूं माझ्याबरोबर स्नान कर. सीते, मंदाकिनी तुझी सखी आहे, असें समजून आरक्तवर्ण व श्वेतवर्ण कमलें पलीकडे करीत करीत तूं ह्या मंदाकिनी नदीमध्यें स्नान कर. तूं येथील अजगरांना नागरिक लोकांप्रमाणें समज, चित्रकूट पर्वताला अयोध्येप्रमाणें लेख आणि ह्या मंदाकिनी नदीला नेहमीं सरयूप्रमाणें मान. हे वैदेहि, धर्मात्मा लक्ष्मण माझ्या आज्ञेंत आहे. तूं मला अनुकूल असून माझे ठिकाणीं आनंद उत्पन्न करीत आहेस, आणि त्रिकाल स्नान करून स्वादिष्ट मुळें व फळें भक्षण करून तुझ्यासह-वर्तमान मी येथें राहत आहें.-ह्यामुळें अयोध्येचा अथवा राज्याचीहि मला अशा ह्या रम्य मंदाकिनी नदीमध्यें स्नान करून श्रमपरिहारपूर्वक सुखी न झालेला असा कोणीहि पुरुष नाहीं."

ह्याप्रमाणें आपल्या प्रियेशीं मंदाकिनी नदीसंबंधानें बरेंच सुसंगत भाषण करीत करीत कज्जलतुल्य, नीलवर्ण व रम्य अशा चित्रकूट पर्वतावर तो रघुवंश-वर्धक पुरुषश्रेष्ठ राम संचार करूं लागला.

प्रक्षिप्त सर्ग.

वनक्रीडा.

चित्रकूट पर्वत आणि कुबेराच्या सौगंधिक सरोवराप्रमाणें असणारी रम्य मंदाकिनी नदी सीतेला दाखविल्यानंतर रघुवंशज रामानें त्या पर्वताच्या पायथ्याशीं असलेली एक गुहा अवलोकन केली. ती गुहा मनोहर असून शिलांनीं व धातूंनीं युक्त होती; सुखावह मकरंदाचा स्राव करणाऱ्या व पुष्पभारांनीं वांकलेल्या वृक्षांनीं व्याप्त झालेली होती; आणि अगदीं एकांत प्रदेशामध्यें असून मत्त पक्षिगणांनीं संपन्न होती. तेव्हां सर्व भूतांच्या मनाला व दृष्टीला वेधून टाकणारा तो वनप्रदेश अवलोकन करून विस्मित झालेला तो ककुत्स्थकुलोत्पन्न राम सीतेला म्हणाला, "हे वैदेहि, गिरिकंदराचे ठिकाणीं तुझी दृष्टी रमत आहे का? रमत असेल तर श्रमपरिहार होण्याकरितां तूं आधीं खुशाल तेथें बैस तर खरी. गुळगुळीत आणि सारखी अशी ही शिला तुझ्याकरितां तेथें ठेविली आहे. हिच्या बाजूला परागयुक्त पुष्पांनीं व्याप्त झालेला एक वृक्ष आहे."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां जातीचीच सरळ असलेली ती सीता प्रेमामुळें स्निग्ध आणि अत्यंत मधुर अशा शब्दांनीं रामाला म्हणाली, 'हे रघुनंदन, आपल्या वचनाला मला अवश्य मान दिला पाहिजे. हा मनोरथ आपल्या अंतःकरणामध्यें आज वारंवार घोळत आहे.'

ह्याप्रमाणें रामाला सांगून निर्दोष अवयवांनीं युक्त असलेली ती सुंदरी विचारी सीता चित्तरंजन करण्याकरितां त्या शिलेसमीप गेली. तेव्हां त्याप्रमाणें ती सीता रामाशीं भाषण करीत असतांनाच राम तिला म्हणाला, "विपुल वनसंपत्तीनें व पुष्पित वृक्षांनीं युक्त असलेले रमणीय वन तर तूं पहात आहेसच; परंतु हे देवि, ह्या रम्य पर्वतावर मनोहर पुष्पांनीं अंकित, गजदंतांचीं क्षतें पडलेले व डिंकाचा स्राव करीत असलेले हे वृक्ष तूं अवलोकन कर. आसमंताद्भागीं होत असलेल्या झिल्लिकांच्या दीर्घ ध्वनीमुळें हा पर्वत रोदन करीत असल्यासारखा भासत आहे. पूर्वी माझी माता ज्याप्रमाणें मधुर व करुण स्वरानें 'पुत्रा पुत्रा' असें म्हणत होती, त्याप्रमाणें हा पुत्रवत्सल पक्षी 'पुत्रा पुत्रा' असें म्हणत आहे. शाल वृक्षाच्या स्कंधावर आरूढ झालेला हा भृंगराज पक्षी गायन करण्याकरितांच

१ ह्या सर्गावर टीका नाहीं आणि हा प्रक्षिप्त (दुसऱ्या कोणी घातलेला) आहे असें म्हणतात, म्हणून तसेंच सदर दिलें आहे.

कीं काय कोकिल पक्ष्यासहवर्तमान शब्द करीत आहे. मला वाटतें, हा पक्षी कोकिलांचा बालक असावा. कारण हा त्यांच्याप्रमाणें कांहीं सुसंबद्ध आणि कांहीं असंबद्ध असा ध्वनि करीत आहे. हे देवि, श्रम झाले असतां ज्याप्रमाणें तूं मला अगदीं चिकटून राहतेस, त्याप्रमाणें पुष्पभारानें लवलेली ही प्रफुल्लित लता खरोखर वृक्षाला लगटून राहिल्यासारखी दिसत आहे."

ह्याप्रमाणें रामानें भाषण केलें असतां प्रिय भाषण करणारी सीता प्रियाच्या मांडीवर अगदीं लगटून बसली, आणि देवकन्येप्रमाणें असलेली ती सीता रामाच्या मांडीवर बसली असतांना कामविकारानें युक्त झालेल्या रामाच्या मनाला आनंद देऊं लागली. तेव्हां निर्मल आणि उन्नत अशा मनःशिलेवर[1] आपलें बोट घांसून त्या सीतेच्या कपाळीं रामानें मनोहर तिलक लाविला. तेव्हां संधिकालाच्या अभ्रानें युक्त असलेली रात्र जशी शोभूं लागते, तशी बालसूर्यतुल्य वर्णानें युक्त आणि तेजस्वी अशा त्या कपाळीं लाविलेल्या पर्वतधातूच्या तिलकानें सीता शोभूं लागली. तेव्हां नागचाफ्याचीं फुलें आपल्या हातांनीं तोडून रामानें प्रसन्न मनानें सीतेच्या बुचड्यांत भरलीं. ह्याप्रमाणें त्या शिलेवर क्रीडा करून तो राम दुसऱ्या प्रदेशांत निघून गेला, आणि वैदेही सीताहि त्याच्या मागोमाग गेली. अशा प्रकारें नानाप्रकारच्या मृगांनीं व्याप्त झालेल्या वनामध्यें संचार करितां करितां एक हुप्या सीतेच्या दृष्टीस पडला. तेव्हां ती भयभीत झाली आणि तिनें रामाला कवटाळून धरिलें. असें झालें असतां आपणाला आलिंगन दिलेल्या सीतेला आजानुबाहु रामानेंहि आलिंगन दिलें, आणि वानराची निर्भर्त्सना करून त्या सुंदरीचें सांत्वन केलें. ह्या धांदलीमध्यें सीतेचे ललाटीं रामानें मनःशिलेचा जो तिलक लाविला होता, तो त्याच्या वक्षःस्थलावर उमटलेला दिसूं लागला. मग तो हुप्या गेल्यावर आपल्या भर्त्याच्या वक्षःस्थलावर उमटलेला तो अस्ताव्यस्त तिलक पाहून सीतेला हंसूं आलें. नंतर भय दाखवीत असलेले वानरच कीं काय अशा पुच्छगुच्छांनीं जसें कांहीं पेटून गेलेलें एक अशोकवन तिनें जवळच अवलोकन केलें. तेव्हां अशोकपुष्पें मिळण्याच्या उद्देशानें ती वैदेही रामाला म्हणाली, 'हे इक्ष्वाकुनंदन, आपण त्या वनामध्यें जाऊं.'

आपल्या प्रियेचें हें भाषण ऐकून, तिचें प्रिय करण्याविषयीं तत्पर असलेला शोकरहित राम दिव्य संपत्तीनेंच युक्त असलेल्या सीतेसहवर्तमान अशोक

१ मनःशिला हा लाल असतो.

वनामध्यें गेला, आणि पार्वतीसहवर्तमान हिमालय पर्वतावरील वनामध्यें विहार करणाऱ्या पिनाकपाणि शंकराप्रमाणें भार्येसहवर्तमान त्या वनामध्यें संचार करूं लागला. वनामध्यें विहार करूं लागल्यानंतर अनुक्रमें आरक्तवर्ण व नीलवर्ण असलेल्या त्या उभयतां स्त्री-पुरुषांनीं पल्लवयुक्त पुष्पांच्या योगानें एकमेकाला भूषित केलें. वनमाला घालून व शिरोभूषणें आणि कर्णभूषणें धारण करून त्या स्त्री-पुरुषांनीं त्या पर्वताला अतिशयच शोभा आणिली. ह्याप्रमाणें नानाप्रकारचे देश प्रियेला दाखवून तो राम अतिशय जवळ असलेल्या आणि शृंगारिलेल्या आश्रमस्थानाकडे गेला.

सीतेचा उपमर्द करणाऱ्या एका काक पक्ष्याला शिक्षा.

तो आश्रमांत जात आहे, तों अनेक प्रकारचा धर्म उत्तम रीतीनें आचरून दाखविणारा सुमित्रापुत्र व गुरुवत्सल भ्राता लक्ष्मण त्याला सामोरा आला. त्या वेळीं शुद्ध बाणानें मारिलेले दहा पवित्र कृष्ण मृग आणि रास घालून सुकत ठेविलेले आणखी कांहीं मृग रामाच्या दृष्टीस पडले. सुमित्रापुत्र लक्ष्मणाचें तें कर्म पाहून राम संतुष्ट झाला, आणि सीतेला सहज म्हणाला, 'बलि होऊं द्या.' तेव्हां प्रथम भूतांना त्यांतला भाग अर्पण केल्यावर त्या सुंदरी सीतेनें त्या उभयतां भ्रात्यांना तें मद्य व मांस अतिशय वाढिलें. शुचिर्भूत होऊन बसलेल्या त्या वीरांची तृप्ति करून नंतर त्या जनककन्येनें प्राणधारणार्थ कांहीं अवशिष्ट राहिलेलें विधिपूर्वक भक्षण केलें; आणि सुकवून ठेवण्याकरितां जें निकृष्ठ मांस शिलक होतें, त्याचें रामाच्या सांगण्यावरून ती काक पक्ष्यापासून संरक्षण करीत बसली असतां, एका कावळ्यानें सीतेला फारच त्रास दिला आहे, असें रामानें पाहिलें. तो स्वेच्छाचारी काक पक्षी तिच्या हारामध्यें संचार करीत होता, आणि अशा रीतीनें तिला फारच त्रास देत होता. त्या वेळीं भर्तृप्रेमाच्या जोरावर गर्विष्ठ झालेली सीता क्रुद्ध झाली, आणि अतिशय भयभीत होऊन घाबरून गेली. तथापि इकडून तिकडून त्या काक पक्ष्याला हांकीत असलेल्या त्या क्रुद्ध सीतेला काक पक्ष्यानें पंख, चोंच आणि नखें ह्यांच्या योगानें अधिकच कोप आणिला. तेव्हां ज्याच्यावरील ओष्ठ स्फुरण पावत आहेत, आणि भ्रुकुटींच्या योगानें जें क्रोध दर्शवीत आहे, असें तिचें मुख अवलोकन केल्यावर ककुत्स्थकुलोत्पन्न रामानें त्या कावळ्याचें निवारण केलें. तथापि धीटपणा करणारा तो पक्षी रामाच्या भाषणाकडे लक्ष्य न देतां सीतेच्या अंगावर धांवून गेलाच. हें पाहून पुरुषश्रेष्ठ वीर्यवान राम क्रुद्ध झाला.

त्यानें बाणाच्या एका काडीला ऐषीकास्त्रानें अभिमंत्रण करून त्या काक पक्ष्याला अनुलक्षून ती काडी सोडून दिली. तेव्हां त्या ऐषीकास्त्रानें पछाडिलेला तो काक पक्षी त्रैलोक्यामध्यें फिरला. पण जिकडे जिकडे तो जाऊं लागला, तिकडे तिकडे भूताप्रमाणें मागे लागलेली ती काडी त्याच्या दृष्टीस पडूं लागली. तेव्हां तो पुनरपि रामाकडे आला, आणि सीता पाहत असतांना रामाच्या मस्तकावर बसून मनुष्यवाणीनें म्हणाला, 'रामा, मजवर कृपा कर. माझे प्राण असूं दे. ह्या अस्त्राच्या प्रभावामुळें मला कोठेंहि आश्रय मिळत नाहीं.'

ह्याप्रमाणें काक पक्ष्यानें सांगितल्यावर पायांवर मस्तक ठेविलेल्या त्या काक पक्ष्याची त्या विचारी रामाला दया आली, आणि तो म्हणाला, "सीतेचें प्रिय व हित करण्याच्या उद्देशानें क्रुद्ध होऊन मीं हें अस्त्र योजून तुझ्या वधाकरितां अभिमंत्रण केलेलें आहे; परंतु ज्या अर्थी जीविताची इच्छा धरून तूं माझ्या चरणांवर मस्तक ठेविलें आहेस, त्या अर्थी तुझ्याकडेहि माझें लक्ष्य आहेच. कारण शरणागताचें रक्षण मला करणें आहे. तस्मात् तूं आपल्या एका अवयवाची आशा सोडून दे, आणि माझ्या अस्त्राचें सार्थक कर. ह्या बाणाच्या काडीनें तुझा कोणता अवयव तोडावा, तें मला सांग. फार तर इतकेंच माझ्या हातून तुझें प्रिय होणें शक्य आहे, आणि मरणापेक्षां एक अवयव कमी होऊन जिवंत राहणें बरें आहे."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां मनामध्यें विचार करून त्या विचारी काक पक्ष्यानें दोहोंपैकीं एका नेत्राचा त्याग करण्याचें ठरविलें; आणि तो रामाला म्हणाला, 'मी एका नेत्राचा त्याग करितो. हे प्रजाधिपते, तुझ्या प्रसादानें मी एकाक्षहि जिवंत राहीन."

असें त्या पक्ष्यानें सांगितल्यानंतर रामानें अनुज्ञा दिलेलें तें ऐषीकास्त्र त्या काक पक्ष्याच्या नेत्रावर जाऊन पडलें. अशा रीतीनें काक पक्ष्याचा नेत्र अस्त्रानें नाहींसा झालेला पाहून सीता विस्मयचकित झाली. तदनंतर रामाला मस्तकानें प्रणाम करून तो काक पक्षी इच्छेप्रमाणें सत्वर निघून गेला, आणि लक्ष्मणासहवर्तमान असलेल्या रामानें आपलीं पुढलीं कामें करण्यास आरंभ केला.

सर्ग शहाण्णवावा.

लक्ष्मणाचा भरतावर कोप.

ती पर्वतावरील नदी दाखविल्यानंतर वेगवेगळें मांस दाखवीत म्हणजे हें मांस पवित्र आहे, हें स्वादिष्ट आहे, हें अग्नीवर तापविलेलें आहे असें सीतेला सांगत तो धर्मनिष्ठ राम तिजसहवर्तमान बसला. इतक्यांत भरत समीप येऊं लागला असतांना त्याच्या सैन्यांतील धूळ व सैन्याचा ध्वनि उत्पन्न होऊन आकाश व्याप्त होऊं लागलें. त्या मोठ्या शब्दानें त्रस्त आणि घाबरून गेलेले असे आपापल्या कळपाचें परिपालन करणारे मस्त पशु आपला कळप सोडून पळूं लागले. तेव्हां त्या पळूं लागलेल्या पशूंना अवलोकन करून व तो मोठा शब्द श्रवण करून उज्ज्वल तेजानें युक्त असलेल्या सुमित्रापुत्र लक्ष्मणाला राम म्हणाला, " हे सुमित्रानंदना, इकडे पहा. हा भयंकर मेघगर्जनेप्रमाणें गंभीर तुमुल ध्वनि ऐकूं येत आहे, आणि हत्तींचे कळप, महिष आणि मृग एकाएकीं महावनामध्यें चारी दिशांस पळत सुटले आहेत. तेव्हां सिंहांनीं त्यांना घाबरवून सोडिलें आहे, किंवा एकादा राजा अथवा राजकुमार वनामध्यें मृगया करीत आहे, अथवा दुसरें कांहीं श्वापद आलें आहे, ह्याचा तूं शोध कर. ह्या पर्वतावर पक्ष्यांनाहि आक्रमण करितां येणें अत्यंत दुष्कर आहे. तेव्हां हें सर्व काय आहे, तें इत्थंभूत तूं समजून घे. "

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां सर्व दिशा निरखून पाहण्याकरितां लक्ष्मण त्वरेनें एका सालवृक्षावर चढला, आणि प्रथम त्यानें पूर्वेकडे दृष्टि फेकिली. नंतर उत्तरेकडे तोंड करून पाहूं लागला असतां सज्ज झालेल्या पायदळानें युक्त व गज, अश्व आणि रथ ह्यांनीं गजबजलेली प्रचंड सेना त्यानें अवलोकन केली. नंतर अश्व व रथ ह्यांनीं भरलेली आणि रथ व ध्वज ह्यांनीं भूषित असलेली ती सेना रामाला सांगून तो पुनरपि त्याला म्हणाला, ' आपण अग्नि विझवून टाका, सीतेला गुहेंत जाऊन बसूं द्या, आणि धनुष्य, बाण व कवच सिद्ध करून तयार असा. '

हें ऐकून पुरुषश्रेष्ठ राम त्याला म्हणाला, " लक्ष्मणा, हें कोणाचें सैन्य तुला वाटत आहे, हें तर पहा. " ह्याप्रमाणें रामानें आज्ञा केली असतां त्या सैन्याला दग्ध करण्यास प्रवृत्त झालेला अग्नीच कीं काय अशा रीतीनें क्रुद्ध

झालेला लक्ष्मण रामाला म्हणाला, " राज्याभिषेक प्राप्त झाल्यानंतर निष्कंटक राज्य प्राप्त करून घेण्याच्या इच्छेनें कैकेयीचा पुत्र भरत आपणांला मारण्याकरितां इकडे येत आहे, ह्यांत संशय नाहीं. कारण उज्ज्वल स्कंधांनीं युक्त असा हा जो फारच मोठा भव्य वृक्ष दिसत आहे, त्याच्या शेजारीं रथावर कोविदार ध्वज झळकत आहे. हे स्वार शीघ्रगामी अश्वांवर आरूढ होऊन स्वेच्छेनें इकडे येत आहेत. आनंदित होऊन गजांवर आरूढ झालेले हे गजारोहक झळकत आहेत. तस्मात् हे वीरा, आपण धनुष्य घेऊन पर्वताचा आश्रय करूं, अथवा आयुधें सज्ज करून येथेंच तयारीनें उभे राहूं. राघवा, कोविदार ध्वज रणामध्यें आपल्या हातीं लागून ज्याच्याकरितां मी व सीता ह्यांसहवर्तमान आपणांला हें मोठें संकट प्राप्त झालें, तो भरत माझ्या दृष्टीस पडेल, तर फार चांगलें. कारण त्याच्याचकरितां आपण अक्षय्य राज्याला मुकलां आहां. हे वीरा, हा भरत शत्रु प्राप्त झाला आहे, आणि ह्याचा वध करणें अवश्यच आहे. भरताचा वध करण्यांत मला दोष दिसत नाहीं. प्रथम जो अपकार करील, त्याचा वध केल्यानें अधर्म होत नाहीं. आणि भरत प्रथम अपकार करणारा आहे. तेव्हां त्याचा वध करण्यांत धर्मच होणार आहे. ह्याचा वध झाल्यानंतर तूं संपूर्ण पृथ्वीचें राज्य कर. राज्याचा अभिलाष धरणारी ही कैकेयी, हत्तीनें मोडून पाडिलेल्या वृक्षाप्रमाणें रणामध्यें माझ्या योगानें आपला पुत्र वध पावलेला पाहून अत्यंत दुःखित होईल. मी अनुयायी आणि बांधव ह्यांसहवर्तमान कैकेयीचा वध करीन. आज ह्या मोठ्या पापापासून ही पृथ्वी एकदां मुक्त होऊं देच. रामा, ज्याप्रमाणें गवताच्या गंजींत अग्नि टाकून द्यावयाचा, त्याप्रमाणें आजपर्यंत आवरून धरिलेला हा क्रोध आणि अपमान मी ह्या शत्रुसैन्यावर आज सोडून देतों. तीक्ष्ण बाणांनीं शत्रूंच्या शरिरांचे तुकडे करीत करीत मी आज चित्रकूट पर्वताच्या वनामध्यें रक्ताचा सडा घालून टाकितों. बाणांच्या योगानें हृदय फोडून मीं मारून टाकिलेले हत्ती, अश्व आणि मानव ह्यांना आज श्वापदें ओढून नेवोत. ह्या महावनामध्यें सैन्यासहवर्तमान भरताचा वध करून मी निःसंशय बाणांच्या व धनुष्याच्या ऋणांतून मुक्त होईन. "

सर्ग सत्याण्णवावा.

लक्ष्मणाचें सांत्वन.

भरताविषयीं अतिशय क्रोधानें व्याप्त झालेल्या आणि युद्ध करण्याकरितां फारच उतावीळ झालेल्या लक्ष्मणाचें सांत्वन करून राम म्हणाले, " महाबलाढ्य भरत मोठ्या उत्साहानें स्वतः इकडे आला असतां आपणांला धनुष्यापाशीं अथवा ढालींसहवर्तमान तरवारींशीं तरी काय कर्तव्य आहे? लक्ष्मणा, 'पित्याचें सत्य परिपालन करीन' अशी प्रतिज्ञा करून मी जर युद्धामध्यें भरताचा वध केला, तर लोकापवादानें युक्त झालेल्या राज्याशीं मला काय कर्तव्य आहे? बांधवांचा अथवा मित्रांचा नाश होऊन जें द्रव्य मिळणार असेल, त्याचा विषमय भक्ष्याप्रमाणें मी स्वीकार करणार नाहीं. लक्ष्मणा, धर्म, अर्थ, काम आणि पृथ्वी ह्या सर्वांची तुमच्याकरितांच मी पर्वा करीत आहें, हें तुला प्रतिज्ञेनें सांगून ठेवितों. बाबारे, भ्रात्यांचें उत्तम रीतीनें परिपालन करण्याकरितां व त्यांच्या सुखाकरितांच मी राज्याची पर्वा करीत आहें, हें मी हातांत आयुध घेऊन तुला सत्य सांगतों. हे सौम्या, सागररूप वस्त्र परिधान केलेली ही पृथ्वी प्राप्त करून घेणें मला कठीण नाहीं; परंतु अधर्मानें प्राप्त होणाऱ्या देवांच्या अधिपत्याचीहि मला इच्छा नाहीं. लक्ष्मणा, भरताचा, शत्रुघ्नाचा अथवा तुझा वियोग होऊन जें कांहीं सुख मला होणार असेल, त्याचें अग्नि भस्म करून टाको. मला वाटतें, मला प्राणापेक्षांहि अधिक प्रिय असा भ्रातृवत्सल भरत अयोध्येमध्यें आला, आणि ज्येष्ठ भ्रात्याचें राज्य ह्या कुलधर्माला स्मरून, जटा व वल्कलें धारण करून जानकी आणि तूं ह्यांसहवर्तमान मी वनांत गेल्याचें श्रवण केल्यावर, प्रेमानें हृदय भरून येऊन व शोकानें चित्त व्याकुल होऊन हा आपली भेट घेण्याकरितां येथें आला आहे, दुसऱ्या हेतूनें आलेला नाहीं. कैकेयी मातेवर क्रुद्ध होऊन तिला अप्रिय भाषण करणारा वैभवशाली भरत पित्याला प्रसन्न करून घेऊन मला राज्य देण्याकरितां येथें आला आहे. ह्याला वेळेवर आपली भेट होणें योग्य आहे. आपलें हा मनानें सुद्धां कांहींएक वाईट करणार नाहीं. अरे, भरतानें पूर्वी कधीं तरी कांहीं तुला अप्रिय असलेली गोष्ट केली आहे काय? मग अशा प्रकारचें भय उत्पन्न होऊन भरताविषयीं शंका येण्याचें तुला आज कारण काय? तूं भरताशीं निष्ठुर अथवा अप्रिय भाषण करूं नको. कारण भरताशीं

जर तूं अप्रिय भाषण केलेंस, तर तें माझ्याशीं केल्यासारखें होईल. लक्ष्मणा, कोणतीहि जरी विपत्ति प्राप्त झाली, तरी पुत्र पित्याचा वध कसा करील? अथवा भ्राता तरी स्वप्राणतुल्य भ्रात्याचा वध कसा करील? जर राज्याकरितां तूं ही भाषा बोलत असशील, तर भरत दृष्टीस पडतांक्षणीं 'लक्ष्मणाला राज्य देऊन टाक' असें मी त्याला सांगेन. लक्ष्मणा, 'ह्याला राज्य दे' असें मी भरताला बोलूं लागलों असतां, 'ठीक आहे' अशीच तो माझ्या भाषणाला संमति देईल."

ह्याप्रमाणें धर्मशील भ्रात्यानें सांगितलें असतां त्याच्या हिताविषयीं तत्पर असलेल्या लक्ष्मणानें लज्जेनें खालीं मान घातली, आणि 'पिता दशरथ स्वतःच तुला भेटण्याकरितां आला आहे, असें वाटतें' असें तो रामाला म्हणाला. लज्जित झालेल्या त्या लक्ष्मणाचें हें भाषण ऐकून राम त्याकडे पाहून म्हणाला, "मला वाटतें, हा आजानुबाहु दशरथ आपणांला भेटण्याकरितां येथें आला आहे; अथवा सुखाचाच अनुभव असलेल्या आपणांला वनवास कष्टदायक होणार आहे, असा विचार करून हा राजा आपणांला निःसंशय घरीं परत नेईल, असें मला वाटतें. अत्यंत सुखाचा उपभोग घेणाऱ्या ह्या वैदेहीलाहि माझा वैभवशाली पिता रघुवंशज दशरथ वनांतून घेऊन घरीं जाईल. वेगामध्यें वायूची बरोबरी करणारे असे ते हे वेगवान, मनोहर, शूर, कुलीन व उत्कृष्ठ अश्व झळकत आहेत. आपल्या विचारी पित्याचा तो हा शत्रुंजय नामक अतिशय धिप्पाड वृद्ध गज सैन्यापुढें चालत आहे. परंतु लक्ष्मणा, पित्याचें तें जगद्विख्यात, दिव्य व श्वेतवर्ण छत्र माझ्या दृष्टीस पडत नाहीं. ह्यामुळें पिताच आला आहे किंवा नाहीं ह्याविषयीं मला संशय आहे. लक्ष्मणा, आतां माझें ऐक, आणि तूं ह्या सालवृक्षाच्या अग्रापासून खालीं उतर."

ह्याप्रमाणें धर्मनिष्ठ रामानें लक्ष्मणाला सांगितलें असतां शत्रुसमूह जिंकणारा तो लक्ष्मण त्या सालवृक्षाच्या टोंकापासून खालीं उतरला, आणि हात जोडून रामाच्या बाजूला उभा राहिला. तदनंतर गर्दी होऊं नये, म्हणून भरतानें आज्ञा केलेल्या त्या सेनेनें पर्वताच्या आसमंताद्भागीं दूर तळ दिला. गज, अश्व आणि पदाति ह्यांनीं भरलेली ती इक्ष्वाकुसेना पर्वताच्या बाजूचा दीड योजन प्रदेश व्यापून राहिली. धर्माकडेच लक्ष्य देऊन व गर्व सोडून देऊन नीतिमान भरतानें रघुनंदन रामाला प्रसन्न करण्याकरितां नेलेली ती सेना चित्रकूट पर्वतावर झळकूं लागली.

सर्ग अठ्याण्णवावा.

रामाश्रमाचा शोध करणें.

या प्रभुश्रेष्ठ भरतानें सेना तेथें ठेवून गुरुशुश्रूषेविषयीं तत्पर असलेल्या रामाकडे जाण्याचें मनामध्यें आणिलें. नंतर मनाप्रमाणें सेनेची व्यवस्था लागतांक्षणीं तो भरत भ्रात्या शत्रुघ्नाला विनयपूर्वक म्हणाला, "हे सौम्या, लोकांच्या टोळ्या आणि हे गुहाचे सेवक निषाद ह्यांना बरोबर घेऊन तूं हें वन सत्वर धुंडून काढ. बाण, धनुष्य व खड्ग घेतलेल्या आपल्या ज्ञातीच्या हजार लोकांनीं परिवेष्टित असलेल्या गुहानें स्वत: ह्या वनामध्यें ककुत्स्थकुलोत्पन्न रामलक्ष्मणांना शोधून काढावें. अमात्य, नगरवासी जन आणि द्विज ह्यांसहवर्तमान असलेल्या गुरूंनीं परिवेष्टित होऊन मी स्वत: ह्या सर्व वनामध्यें पायांनी संचार करीन. जोंपर्यंत राम, महाबलाढ्य लक्ष्मण अथवा महाभाग्यवती वैदेही दृष्टीस पडणार नाहीं, तोंपर्यंत मला स्वस्थता वाटणार नाहीं. जोंपर्यंत चंद्राप्रमाणें आल्हादकारक आणि कमलपत्रासारख्या विशाल नयनांनीं युक्त असें भ्रात्याचें शुभ मुख माझ्या दृष्टीस पडणार नाहीं, तोंपर्यंत माझा जीव खालीं पडणार नाहीं. खरोखर सुमित्रापुत्र लक्ष्मण कृतकृत्य आहे. कारण चंद्राप्रमाणें निर्मल आणि कमलासारख्या विशाल नयनांनीं युक्त असें रामाचें महातेजस्वी मुख तो अवलोकन करीत आहे. राजचिन्हांनीं युक्त अशा आपल्या भ्रात्याच्या चरणांवर मस्तक ठेवीपर्यंत माझ्या मनाला स्वस्थता वाटणार नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु जोंपर्यंत राज्याचा उपभोग घेण्याला योग्य असलेला राम हा वाडवडिलांपासून चालत आलेल्या राज्यावर बसून राज्याभिषेक झाल्यामुळें उदकानें भिजला नाहीं, तोंपर्यंत माझें मन स्थिर राहणार नाहीं. समुद्रमर्यादित पृथ्वीवर भर्त्याच्या मागोमाग जाणारी महाभाग्यवती जनककन्या वैदेही कृतकृत्य आहे. नंदनवनामध्यें वास्तव्य करणाऱ्या कुबेराप्रमाणें ज्याच्यावर ककुत्स्थकुलोत्पन्न राम वास्तव्य करीत आहे, तो पर्वतराज हिमालयाची बरोबरी करणारा हा चित्रकूट पर्वत फारच पवित्र आहे. शस्त्रधरांमध्यें श्रेष्ठ असलेला महाराज राम जेथें बसत आहे, तें हें सर्पांनीं सेवित असलेलें गहन वनहि कृतकृत्य आहे."

ह्याप्रमाणें शत्रुघ्नाला सांगून तो महापराक्रमी व महातेजस्वी पुरुषश्रेष्ठ भरत पायांनींच त्या महावनामध्यें प्रविष्ट झाला. वक्त्यांमध्यें श्रेष्ठ असलेला तो भरत पर्वतशिखरावर उत्पन्न झालेल्या व प्रफुल्लित अग्रांनीं युक्त असलेल्या वृक्ष-

जालांमधून चालला. तदनंतर चित्रकूट पर्वतावरील सालवृक्षावर सत्वर आरूढ झाल्यावर रामाच्या आश्रमांत असलेल्या अग्नीचा उंच गेलेला धूर भरताच्या दृष्टीस पडला. तो धूर दिसतांच ह्या ठिकाणीं राम आहे, असें जाणून उदकाच्या पार तरून गेल्याप्रमाणें वैभवशाली भरताला बांधवांसहवर्तमान आनंद झाला. चित्रकूट पर्वतावर तपस्वी लोकांनीं युक्त असा रामाचा आश्रम आहे असें ऐकिल्यावर तो महात्मा भरत शोधण्याकरितां पाठविलेलेंहि सैन्य तेथेंच ठेवून गुहासहवर्तमान सत्वर तेथें चलाता झाला.

सर्ग नव्याण्णवावा.

रामाश्रमाकडे गमन.

सेनेचा तळ पडल्यानंतर भ्रात्याचें दर्शन घेण्याकरितां उत्सुक झालेला भरत रामाजवळ असल्याबद्दलचीं चिन्हें शत्रुघ्नाला दर्शवीत दर्शवीत चालला, आणि ‘ माझ्या मातांना सत्वर घेऊन या ’ असें वसिष्ठ ऋषींना सांगून तो गुरुवत्सल भरत सत्वर पुढें निघाला. तेव्हां सुमंत्रानें जवळच येऊन शत्रुघ्नाला गांठिलें. कारण रामाच्या दर्शनासंबंधानें भरताप्रमाणें शत्रुघ्नाला व त्यालाहि उत्कंठा प्राप्त झालेली होती. असो. जातां जातां तपस्वी लोकांच्या गृहांसहवर्तमान असलेली आपल्या भ्रात्याची पर्णकुटिका आणि एक झोपडी वैभवशाली भरतानें पाहिली. त्या पर्णकुटिकेच्या पुढें मोडलेलीं काष्ठें आणि पूजेकरितां जुळविलेलीं पुष्पें भरतानें अवलोकन केलीं. नंतर राम आणि लक्ष्मण ह्यांच्या आश्रमासमीप पोहोंचल्यावर दर्भ आणि वल्कलें ह्यांच्या योगानें वृक्षांचे ठिकाणीं मार्गाचें ज्ञान होण्याकरितां कोठें कोठें चिन्ह केलेलें त्या भरतानें पाहिलें. त्या गृहामध्यें थंडीकरितां मृग आणि महिष ह्यांच्या शेणाचे मोठमोठे संचय करून ठेविलेले त्यानें पाहिले. तो महापराक्रमी तेजस्वी भरत जातां जातां आनंदित होऊन शत्रुघ्नाला व त्या सर्व अमात्यांना म्हणाला, “ भरद्वाज मुनींनीं जो प्रदेश आपणांला सांगितला, त्या प्रदेशावर आपण आलों असें मला वाटतें. आतां येथून मंदाकिनी नदी फार दूर असेलसें वाटत नाहीं. ज्या अर्थीं वल्कलें उंच बांधलेलीं दिसत आहेत, त्या अर्थीं वेळीं अवेळीं उदक वगैरे आणण्याचा प्रसंग पडल्यास आपणांला जातां यावें, ह्या उद्देशानें लक्ष्मणानें खुणा करून ठेविलेला हा मार्ग

आश्रमालाच जात असला पाहिजे. ह्या बाजूला एकमेकाला अनुलक्षून गर्जना करणारे मोठमोठ्या दंतांचे महाबलाढ्य गज पर्वताच्या बाजूला संचार करीत असतात. तेव्हां चुकून तिकडे जाण्याचा प्रसंग न यावा, एतदर्थ मार्ग लक्ष्यांत राहण्याकरितां ह्या खुणा करून ठेविलेल्या असल्या पाहिजेत. सकाळसंध्याकाळ होम देण्याकरितां तपस्वी लोक ज्याला ठेवण्याची इच्छा करितात, त्या अग्नीचा हा अस्ताव्यस्त धूर वनामध्यें दिसत आहे. ह्याच ठिकाणीं वडिलांचा सत्कार करणाऱ्या पुरुषश्रेष्ठ सज्जन रामाला महर्षीप्रमाणें आनंदित असल्याचे मी पाहिन."

याप्रमाणें बोलत बोलत एक मुहूर्तपर्यंत चित्रकूट पर्वतावर चालून गेल्यानंतर मंदाकिनी नदीजवळ आलेला तो रघुवंशज भरत आपल्याजवळ असलेल्या त्या लोकांना म्हणाला, "पुरुषश्रेष्ठ राम पृथ्वीमध्यें लोकांचा अधिपति असूनहि आज निर्जन वनामध्यें येऊन व योगिजनांना योग्य असें वीरासन घालून तपश्चर्या करण्याविषयीं तत्पर होऊन राहिला आहे. तस्मात्, धिक्कार असो माझ्या ह्या जन्माला व जीविताला! माझ्याकरितां हा लोकाधिपति महातेजस्वी राम संकटांत सांपडला आहे, आणि सर्व भोग्य वस्तूंचा त्याग करून वनामध्यें वास्तव्य करीत आहे. तस्मात् लोकनिंदेस पात्र झालेला मी रामाला प्रसन्न करून घेण्याकरितां आज त्याच्या सीतेच्या व लक्ष्मणाच्या चरणांवर मस्तक ठेवीन."

पर्णकुटिकावर्णन.

ह्याप्रमाणें तो भरत विलाप करीत करीत जाऊं लागला असतां, एक मोठी मनोहर व पवित्र पर्णकुटिका त्याच्या दृष्टीस पडली. ती विशाल, मृदु व विस्तीर्ण पर्णकुटिका दर्भांनीं आच्छादिलेल्या यज्ञांतील वेदीप्रमाणें साल, ताल आणि अश्वकर्ण ह्या वृक्षांच्या असंख्य पानांनीं आच्छादिलेली होती. इंद्रचापतुल्य मोठें कार्य करण्याला साधनभूत, फारच बळकट, सुवर्णभूषित पृष्ठभागांनीं युक्त आणि शत्रुनाशक धनुष्यांनीं तिला शोभा आलेली होती. उज्ज्वल मुखांनीं युक्त असलेल्या सर्पांच्या योगानें शोभणाऱ्या नागलोकाप्रमाणें, सूर्यकिरणतुल्य तेजस्वी असलेल्या भात्यांतील भयंकर बाणांनीं ती सुशोभित झालेली होती. सुवर्णाच्या म्यानांतून असलेल्या खड्गांच्या योगानें ती झळकत असून, सुवर्णबिंदूंच्या योगानें चित्रविचित्र दिसणाऱ्या ढालांनीं तिला शोभा आलेली होती. मृगांना ज्याप्रमाणें सिंहाच्या गुहेमध्यें जाणें अशक्य असतें, त्याचप्रमाणें सुवर्णभूषित आणि वृक्षाला लटकलेल्या बाहुत्राणांनीं व अंगुलित्राणांनीं युक्त असलेल्या त्या पर्णकुटिकेवर शत्रुसमूहांनाहि चाल करून जातां येणें अशक्य होतें.

भरताचा विलाप व रामदर्शन.

असो. तदनंतर ज्याच्यावर अग्नि प्रदीप्त झाला आहे, असें एक पूर्वेकडे व उत्तरेकडे उतरतें असलेलें पवित्र व विशाळ स्थंडिल त्या ठिकाणीं असलेलें भरताच्या दृष्टीस पडलें. क्षणभर तिकडे दृष्टि दिल्यावर झोंपडीमध्यें जटामंडल धारण करून बसलेला ज्येष्ठ भ्राता रामहि दृष्टीस पडला. कृष्णाजिन धारण करून आणि साली व वल्कलें परिधान करून बसलेल्या अग्नितुल्य रामाला भरतानें समीपच अवलोकन केलें. सिंहासारखे स्कंध, आजानुबाहु व कमलासारखे नेत्र ह्यांनीं युक्त, समुद्रमर्यादित पृथ्वीचा अधिपति, धर्मनिष्ठ, महापराक्रमी आणि दर्भ पसरलेल्या स्थंडिलावर सीता व लक्ष्मण ह्यांसहवर्तमान अनादि ब्रह्मदेवाप्रमाणें बसलेल्या रामाला अवलोकन करितांक्षणीं त्या वैभवशाली भरताला दु:खाचें व मोहाचें भरतें आलें, आणि तो धर्मनिष्ठ कैकेयीपुत्र भरत त्याच्याकडे धांवला. राम दृष्टीस पडतांक्षणीं भरत दु:खाकुल होऊन विलाप करूं लागला. तें दु:ख आवरून धरण्यास असमर्थ होऊन अश्रूंनीं कंठ दाटून आल्यामुळें अडखळत अडखळत तो धैर्यानें म्हणाला, "राजसभेमध्यें मंत्र्यांनीं सेवा करण्यास जो योग्य आहे, तो हा माझा ज्येष्ठ भ्राता वनांतील पशूंसहवर्तमान येथें बसला आहे. पूर्वीं हजारों रुपये किमतीच्या वस्त्रांनीं जो महात्मा आपलें शरीर भूषित करीत असे, तो आज सत्यरूप धर्माचें परिपालन करण्याकरितां कृष्णाजिनें परिधान करीत आहे. अरे, नानाप्रकारच्या आश्चर्यकारक पुष्पमाला जो पूर्वीं नेहमीं धारण करीत असे, तो हा राघव हा जटाभार कसा बरें सहन करीत आहे! शास्त्रविहित आणि ऋत्विजांच्याच क्लेशांनीं साध्य अशा यज्ञांनीं ज्याचा धर्मसंचय होणें योग्य आहे, तो हा स्वतःच्या शारीरिक क्लेशांपासून प्राप्त होणाऱ्या धर्माच्या मागोमाग आला आहे. मोठ्या मूल्यवान चंदनानें ज्याच्या शरिराचा उपचार पूर्वीं होत असे, त्या सज्जनाच्या शरिराची सेवा आज मळ कशी बरें करीत आहे! सुखाचा उपभोग घेत आलेल्या रामाला माझ्याकरितां हें दु:ख प्राप्त झालें आहे. तस्मात् लोकनिंदेस पात्र झालेल्या मज दुष्टाच्या जीविताला धिक्कार असो!"

ह्याप्रमाणें मुखकमल घामानें डवडवून जाऊन विलाप करीत असलेला दीन भरत रडत रडत रामाच्या पायांपर्यंतहि जाऊन न पोहोंचतां मध्येंच पडला. दु:खानें संतप्त झालेला तो बलाढ्य राजकुमार भरत 'हे आर्य' असें एकदांच दीन स्वरानें म्हणून स्वस्थ राहिला. पुढें त्याच्या तोंडांतून कांहींच शब्द निघे-

नासा झाला. अश्रूंनीं कंठ दाटून आलेल्या भरतानें आर्य रामाकडे पाहून 'आर्य' इतकेंच म्हणून टाहो फोडिल्यावर पुढें कांहींच भाषण करण्याला तो समर्थ होईना. असो. भरतानें वंदन केल्यानंतर शत्रुघ्नानेंहि रडत रडत रामाच्या चरणांना वंदन केलें, आणि त्या उभयतांना कवटाळून धरिल्यावर रामहि अश्रू ढाळूं लागला. तदनंतर आकाशामध्यें गुरुशुक्रांचा समागम होणाऱ्या चंद्राप्रमाणें अरण्यामध्यें त्या राजकुमार राम-लक्ष्मणांचा सुमंत्र व गुह ह्यांच्याशीं समागम झाला. तेव्हां कळपांतील मुख्य मुख्य गजांवर आरोहण करण्यास योग्य असलेले ते राजकुमार महावनामध्यें एकत्र झाल्याचें पाहून वनामध्यें वास्तव्य करणाऱ्या त्या सर्व लोकांनीं हर्षाचा त्याग करून अश्रू ढाळण्याला आरंभ केला.

सर्ग शंभरावा.

श्रीरामाचे भरताला कुशलप्रश्न.

युगसमाप्तिकालीं भूमीवर पडणाऱ्या सूर्याप्रमाणें, जटा धारण करून वल्कलें परिधान केलेला व दुःखाकुल झाल्यामुळें मोठ्या कष्टानें ओळखूं येणारा भरत हात जोडून पृथ्वीवर पडलेला रामानें अवलोकन केला. मुखावरील कांति नाहींशी होऊन त्या कृश झालेल्या भरताला मोठ्या कष्टानें ओळखिल्यावर रामानें त्याचा हात धरिला. नंतर त्याचें मस्तकीं अवघ्राण करून, त्याला कवटाळून धरून आणि त्याला मांडीवर बसवून राम आदरपूर्वक म्हणाला, "बा भरता, ज्याअर्थीं तूं वनामध्यें आला आहेस, त्याअर्थीं तुझा पिता कोणीकडे गेला आहे? तो जिवंत असतांना वनांत येणें तुला योग्य नाहीं. खरोखर मोठ्या कष्टानें ओळखूं येणारा भरत दुरून ह्या अरण्यामध्यें आलेला आज मी पुष्कळ दिवसांनीं पहात आहें. बा भरता, कां रे वनामध्यें आलास? अरे, ज्याअर्थीं तूं येथें आला आहेस, त्याअर्थीं तो दीन राजा एकाएकीं परलोकीं तर गेला नाहीं ना? हे सौम्या, तुज बाळाचें अक्षय्य राज्य भ्रष्ट होण्याचा तर प्रसंग आला नाहीं ना? बा अमोघ पराक्रमी भरता, तूं पित्याची शुश्रूषा करीत असतोस ना? राजसूय आणि अश्वमेध याग करणारा व धर्माविषयीं निश्चय असलेला सत्यप्रतिज्ञ दशरथ राजा कुशल आहे ना? नेहमीं धर्मानें वागणाऱ्या त्या इक्ष्वाकुवंशजांच्या महातेजस्वी विद्वान ब्राह्मण उपाध्यायाची पूर्णपणें मान-

मान्यता राहत असते ना? बा भरता, कौसल्या, पुत्रवती सुमित्रा आणि त्याच-प्रमाणें सुखांत असलेली राजपत्नी भार्या कैकेयी आनंदांत आहे ना? विनय-संपन्न, कुलीन, बहुश्रुत, मत्सररहित आणि राजकुलाचें हित पाहणाऱ्या अशा पुरोहित वसिष्ठपुत्राचा तूं सत्कार करीत असतोस ना? अग्नींना होम देण्या-कडे तूं बुद्धिमान, सरळ व सर्व होमविधि जाणणारा ऋत्विज नेमिला आहेस ना? आणि वेळेवर होम झाल्याचें व होम होत असल्याचें तो तुला नेहमीं कळवीत असतो ना? देव, पितर, सेवक, पितृतुल्य गुरु, वृद्ध आणि विद्वान ब्राह्मण ह्यांचा तूं मान ठेवीत असतोस ना? उत्कृष्ट बाण आणि अस्त्रें सोड-ण्यामध्यें निपुण व राजनीतीमध्यें पंडित अशा सुधन्वासंज्ञक धनुर्वेदाचार्यांचा तूं मान राखीत असतोस ना? बा भरता, तूं आपले मंत्री आपणांसारखे शूर, बहुश्रुत, जितेंद्रिय, कुलीन आणि इंगित जाणणारे केले आहेस ना? राघवा, मसलत हें राजांच्या विजयाचें मूळ आहे. तेव्हां श्रेष्ठ मंत्री आणि नीतिशास्त्रज्ञ अमात्य ह्यांसहवर्तमान तुझी मसलत अगदीं गुप्तपणें चालत असते ना? तूं निद्रेच्या अधीन होत नाहींस ना? वेळेवर जागा होत असतोस ना? आणि अर्थप्राप्तीच्या उपायाविषयीं उत्तर रात्रीं चिंतन करीत असतोस ना? तूं कधीं एकटाच बेत करीत नसतोस ना? अथवा पुष्कळांनाहि बरोबर घेऊन कधीं बेत करीत नाहींस ना? आणि त्याचप्रमाणें तूं ठरविलेली मसलत अमलांत येण्यापूर्वीच राष्ट्रामध्यें विदित होत नाहीं ना? अल्प प्रयत्नानें साध्य आणि महाफलदायक अशी एखादी गोष्ट करण्याचा निश्चय झाल्यावर विलंब न करितां तूं लवकर ती करण्याला आरंभ करीत असतोस ना? मांडलिक राजांना तुझीं कृत्यें अमलांत आल्यावर अथवा अमलांत आल्यासारखीं झाल्यावरच समजत असून पुढें होणारीं तुझीं कृत्यें त्यांना समजत नाहींत ना? तुझ्या मसलती तूं अथवा तुझ्या अमात्यांनीं जरी बाहेर फोडिल्या नाहींत तरी युक्तीनें अथवा अनुमानांनीं त्या इतरांच्या समजण्यांत येत नाहींत ना? आणि त्याचप्रमाणें इतरांनीं केलेली मसलत तुला अथवा तुझ्या अमात्यांना समजत असते ना? द्रव्याच्या अडचणी आल्या असतां त्यांतून पार पडण्याचा निश्चित उपाय सांगण्यानें पंडित मोठेंच कल्याण करीत असतो. ह्यास्तव हजारों मूर्खांची पर्वा न करितां तूं एका पंडिताची इच्छा करीत असतोस ना? हजा-रोंच नव्हे, परंतु लाखों मूर्ख लोक जरी राजाजवळ असले, तरी त्यांची राजाला मदत होत नाहीं. बुद्धिमान, शूर, दक्ष व नीतिशास्त्रवेत्ता असा

एक जरी अमात्य जवळ असला, तरी तो राजाला अथवा राजपुत्राला मोठें वैभव प्राप्त करून देईल. बा भरता, मोठ्या कार्याकडे मुख्य, मध्यम कृत्याकडे मध्यम आणि क्षुल्लक कामाकडे हलक्या सेवकांची तूं योजना केली आहेस ना? वाडवडिलांपासून चालत आलेले, आचरणानें शुद्ध आणि निष्कपट अशा श्रेष्ठ अमात्यांची तूं श्रेष्ठ कार्याकडेच योजना करीत असतोस ना? भरता, क्षुल्लक अपराधाला कडक शिक्षा केल्यामुळें क्षुब्ध करून टाकिलेलें प्रजाजन व मंत्री राष्ट्रामध्यें तुझा अवमान करीत नाहींत ना? याजक ज्याप्रमाणें पतिताचा अपमान करितात, आणि बलात्कारासारखें भयंकर कृत्य करून स्त्रीचा स्वीकार करणाऱ्या कामुक पुरुषाचा स्त्रिया अपमान करितात, त्याप्रमाणें प्रजा तुझा अपमान करीत नाहीं ना? सामादि उपायांविषयीं चतुर, राजनीति जाणणारा, विश्वासू, सेवकाशीं राजाचें वांकडें आणण्याविषयीं तत्पर, शूर आणि राज्याभिलाषी सेवकाचा जो वध करीत नाहीं, त्याचाच वध होतो. धीट, शूर, धैर्यवान, बुद्धिमान, आचरणानें पवित्र, कुलीन, राजनिष्ठ आणि चतुर असा सेनापति तूं केला आहेस ना? तुझ्या सेनेंतील मुख्य लोक पराक्रमाविषयीं कसोटीला उतरलेले, बलाढ्य, युद्धाविषयीं निपुण आणि पराक्रमी असून सत्कारानें तूं त्यांची मानमान्यता राखीत असतोस ना? वेळेवरच देण्यास योग्य असा सैन्याचा भत्ता आणि पगार तूं विलंब न करितां देत असतोस ना? कारण भत्त्याची व पगाराची वेळ टळून गेली म्हणजे हातावर पोट भरणारे सेवक धन्यावर फारच क्रुद्ध होतात, आणि त्यामुळें मोठाच अनर्थ ओढवतो तुझ्या कुलांतील लोक आणि प्रधान हे सर्व तुझे ठिकाणीं अनुरक्त व तुझ्या हिताविषयीं तत्पर असून तुझ्या कार्याकरितां प्राण देण्यास तयार असतात ना? भरता, देशांतील राहणारा, विद्वान सरळ, समयसूचक, सांगितलेलाच निरोप सांगणारा आणि चतुर असा दूत तूं केला आहेस ना? (१ मंत्री, २ पुरोहित, ३ युवराज, ४ सेनापति, ५ दौवारिक, ६ अंतःपुराध्यक्ष, ७ तुरुंगावरील अधिकारी, ८ खजीनदार, ९ राजाची आज्ञा कळविणारा, १० न्यायाधीश, ११ धर्माध्यक्ष, १२ पंच, १३ सैन्याला पगार वांटणारा, १४ काम झाल्यावर पगार घेणारे, १५ नगररक्षक, १६ राष्ट्रसीमारक्षक, १७ दुष्टांना दंड करणारा अधिकारी आणि १८ जल, पर्वत, वन व स्थल येथील किल्ले राखणारे असे) शत्रुपक्षाकडील अठरा प्रकारचे अधिकारी, आणि (मंत्री, पुरोहित व युवराज हे पहिले तीन वजा करून बाकी राहिलेले) आपणांकडील पंधरा हुद्देदार या

प्रत्येकाच्या मागें परस्परांना माहीत नसलेले तीन तीन हेर ठेवून तूं शोध आणवीत असतोस ना? हे शत्रुनाशका राज्याला अपाय करणारे लोक घालवून दिल्यावर परत आले असतां ते दुर्बल आहेत, असें समजून तूं कधींहि त्यांची उपेक्षा करीत नसतोस ना? बा भरता, केवळ प्रत्यक्ष प्रमाणाचेंच अवलंबन करून चालणारे ब्राह्मण तूं जवळ ठेवीत नसतोस ना? कारण हे पंडितमान्य अनर्थ उत्पन्न करण्याविषयीं मात्र कुशल असतात; आणि मुख्य प्रमाणभूत अशीं धर्मशास्त्रें विद्यमान असतांना, शुष्क तर्कशास्त्रामुळें सुचणाऱ्या बुद्धीचें अवलंबन करून ते दुर्बुद्धि निरर्थक बडबड करीत असतात. भरता, वीरांनीं जिच्यामध्यें वास्तव्य केलें आहे, आमच्या पूर्वजांनीं जिचें नांव खरें करून दाखविलें आहे, दृढ द्वारांनीं जी युक्त आहे, गज, अश्व आणि रथ ह्यांनीं जी भरलेली आहे, जितेंद्रिय, मोठे उत्साही, सभ्य व सत्कर्माविषयीं तत्पर अशा हजारों ब्राह्मणांनीं, क्षत्रियांनीं व वैश्यांनीं जी व्याप्त झालेली आहे, अनेक आकारांच्या प्रासादांनीं जी परिवेष्टित झालेली आहे, आणि विद्वान लोकांनीं जी गजबजलेली आहे, अशा अभ्युदयावस्थेंत असलेल्या समृद्ध अयोध्येचें तूं रक्षण करीत आहेस ना? उत्तर ऋतूमध्यें अग्निचयन केलेल्या शेंकडों प्रदेशांनीं व्याप्त, फारच व्यवस्थित रीतीनें राहिलेल्या लोकांनीं खेंचिलेला, देवस्थानें पाणपोया आणि तटाक ह्यांनीं सुशोभित, आनंदित स्त्रीपुरुषांनीं युक्त, समाज आणि उत्सव ह्यांनीं सुशोभित, सीमेपर्यंत नांगरिलेल्या शेतांनीं व पशूंनीं युक्त, हिंसारहित, नद्यांच्या उदकावर पिकें येणारा, रम्य, श्वापदांनीं रहित, सर्वभयशून्य, सुवर्णादिकांच्या खाणींनीं सुशोभित, पापी लोकांनीं वर्ज केलेला आणि माझ्या पूर्वजांनीं सुरक्षित ठेविलेला असा आपला देश समृद्ध असून सुखी आहे ना? कृषिकर्म, पशुपालन वगैरेंवर उपजीविका करणारे वैश्य लोक तुला प्रिय आहेत ना? सांप्रत ह्या लोकांना आपल्या धंद्यामध्यें सुख होत आहे ना? इष्ट गोष्टींची प्राप्ति आणि अनिष्ट गोष्टींचा परिहार ह्यांच्या योगानें तूं त्या लोकांचें पोषण केलें आहेस ना? अरे, राजानें देशांत राहणाऱ्या सर्व लोकांचें धर्मानें परिपालन केलें पाहिजे. स्त्रियांचें तूं सांत्वन करीत असतोस ना? त्या तूं सुरक्षित ठेविल्या आहेस ना? त्यांच्यावर विश्वास ठेवीत नाहींस ना? आणि गुह्य गोष्टी त्यांना सांगत नाहींस ना? हत्तींचें वन तूं सुरक्षित ठेविलें आहेस ना? तुझ्यापाशीं धेनु आहेत ना? आणि हत्तिणी, अश्व व गज संपादन करण्याविषयीं तुझी तृप्ति झाली नाहीं ना? हे राजपुत्रा, प्रत्यहीं सकाळीं उठून

आणि अलंकृत होऊन तूं राजमार्गांतील लोकांना दर्शन देत असतोस ना? सर्व कामगार लोक निर्भयपणें तुझ्यासमक्ष वावरत नाहींत ना? अथवा ते सर्वहि कामगार तुझें दर्शनहि अगदीं टाळीत नाहींत ना? निर्भयपणें पुढें न येतां अथवा मुळीं दृष्टीस पडण्याचेंहि न टाळितां कामगार लोकांनीं मध्यम वृत्ति स्वीकारणें हेंच अर्थप्राप्तीचें कारण आहे. तुझे सर्व किल्ले–धनधान्य, आयुधें, उदक, यंत्रें, कारागीर आणि धनुर्धर ह्यांनीं–भरलेले असतात ना? हे रघुवंशजश्रेष्ठा, तुझा आदा मोठा असून खर्च कमी आहे ना? अयोग्य ठिकाणीं तुझा खजिना खर्च होत नाहीं ना? देवता, पितर, ब्राह्मण, अभ्यागत, योद्धे आणि मित्रवर्ग ह्यांकडेच तुझा खर्च होत आहे ना? एखाद्या शुद्ध मनाच्या सभ्य गृहस्थावर दुष्कृत्याचा आरोप आला असतां, शास्त्रनिपुण लोकांकडून त्याचा निर्णय न होतां तो शुद्ध असतांनाच लोभामुळें त्याला दंड होत नाहीं ना? हे पुरुषश्रेष्ठा, एखादा चोर धरला गेला असून तो सकारण धरला गेला आहे असें दृष्टोत्पत्तीस आलें असतांना व त्याच्या जबानीवरूनहि त्यानें चोरी केली असें निश्चित असतांना, द्रव्यलोभामुळें तो कधीं सुटून जात नाहीं ना? हे रघुवंशज भरता, एखाद्या धनाढ्य गृहस्थावर अथवा दरिद्री गृहस्थावर कांहीं खटले उपस्थित झाले असतां तुझे बहुश्रुत अमात्य निर्लोभी राहून त्या खटल्यांचा निकाल लावीत असतात ना? निष्कारण दोषारोप केलेल्या प्रजांच्या नेत्रांतून जे अश्रू पडतात, ते राज्योपभोगजन्य सुखाकडेच दृष्टि देऊन राज्य करणाऱ्या राजाच्या पुत्रांचा व पशूंचा घात करितात. हे रघुवंशजा, वृद्ध आणि बाल अशा श्रेष्ठ वैद्यांना इष्ट वस्तूचें दान, स्नेहयुक्त मन आणि माधुर्ययुक्त वाणी ह्या तीन साधनांनीं तूं आपलेसें करून घेत असतोस ना? गुरु, वृद्ध, तपस्वी, अतिथि, देवतानिवासस्थानभूत असलेले चवाठ्यावरील मोठमोठे वृक्ष, आणि जन्माचें सार्थक केलेले ब्राह्मण ह्या सर्वांना तूं वंदन करीत असतोस ना? अर्थानें धर्माला, धर्मानें अर्थाला किंवा त्या उभयतांनाहि विषयलोभरूप कामानें कधीं बाध आणीत नाहींस ना? हे विजयिश्रेष्ठ, धर्म, अर्थ आणि काम ह्या सर्वांच्या वेळा नेमून तूं त्यांचें योग्य काळीं सेवन करीत असतोस ना? हे महाज्ञानवंता, सर्व शास्त्रांमध्यें निष्णात असलेले ब्राह्मण राजधानींतील व देशांतील इतर लोकांसहवर्तमान तुझ्या सुखाची इच्छा करीत असतात ना? नास्तिकपणा, असत्य भाषण, क्रोध, हयगय, चेंगटपणा, ज्ञानवानांची भेट न घेणें, आळस, इंद्रियाधीनत्व, एकट्यानेंच राजकारणाचा विचार करणें, विपरीत समजूत असलेल्या

लोकांच्या साहाय्यानें मसलत करणें, कर्तव्य म्हणून ठरलेल्या गोष्टी करण्यास आरंभ न करणें, गुप्त मसलतींचें रक्षण न करणें, उठल्याबरोबर प्रातःकाळीं आधीं मंगलावह कृत्यांचें अनुष्ठान न करणें आणि चोहोंकडील शत्रूंवर एकदम हल्ला करणें ह्या चौदा राजदोषांपासून तूं अलग राहत असतोस ना ? हे राघवा, (मृगया, द्यूत, दिवसा निद्रा, निंदा, स्त्रीसेवा, मद, नृत्य, गीत, वाद्य आणि निष्कारण पर्यटण हा) दशवर्ग, (उदकावरील, पर्वतावरील, वृक्षावरील, उखर-प्रदेशावरील आणि माळ जमिनीवरील असे पांच प्रकारचे किल्ले हा) पंचवर्ग, (साम, दाम, भेद आणि दंड हा) चतुर्वर्ग, (स्वामी, अमात्य, राष्ट्र, किल्ले, खजिना, सैन्य आणि मित्र हा) सप्तमवर्ग, (पैशून्य, साहस, द्रोह, ईर्षा, मत्सर, अर्थदूषण, कठोर वाणी आणि कडक शिक्षा हा) अष्टवर्ग, (उत्साह-शक्ति, प्रभुशक्ति आणि मंत्रशक्ति हा) त्रिवर्ग, आणि (तीन वेद, व्यापार व नीतिशास्त्र ह्या) तीन विद्या ह्यांना तूं तत्त्वतः समजून घेऊनच अनुमोदन देत असतोस ना ? विचारपूर्वक इंद्रियदमनाचा उपाय म्हणजे योगाभ्यास, (हेर, अमात्य इत्यादिकांना यथायोग्य काम सांगणें, शत्रुदमन करण्याविषयीं उत्साह दाखविणें, तर्क करण्यांत प्रावण्य असणें, झालेल्या गोष्टीची विस्मृति न पडणें, पुढें घडणारी गोष्ट अनुमानानें जाणणें आणि नीतिशास्त्रांत निपुण असणें हे) सहा गुण, (अग्नि, जल, व्याधि, दुर्भिक्ष, मारक रोग हें) दैविक संकट, (अधिकारी, चोर, शत्रु, राजाच्या मर्जींतील लोक आणि राजाचा लोभ हें) मानुष व्यसन, (पगार न मिळालेला लोभी मनुष्य, अवमान झालेला मानी पुरुष, अकस्मात् कोपविलेला रागीट गृहस्थ आणि भिवविलेला भित्रा इसम असे चार प्रकारचे शत्रुपक्षाकडील लोक फितूर करणें हें) राजकृत्य, (बाल, वृद्ध, दीर्घरोगी, ज्ञातिबहिष्कृत, भित्रा, दुसऱ्यांना भय दाखविणारा, लुब्ध, लोकांना फसविणारा, विरक्त, अत्यंत विषयासक्त, अनेक गोष्टींकडे लक्ष्य लावून मसलत करणारा, देवब्राह्मणांची निंदा करणारा, दुर्दैवी, दैववादी, दुर्भिक्षसंकटांत सांपडलेला, महाव्यसनी, स्वदेशांत न राहणारा, अनेक शत्रु असलेला, कालानें ग्रासिलेला आणि सत्यधर्मविषयीं तत्पर असलेला हा) विंशतिवर्ग, मंत्रिमंडल, स्वारी, सैन्यरचना आणि (द्वैधीभाव व समाश्रय आणि यान व आसन ह्या) दोहोंना कारण असलेला संधि आणि विग्रह ह्यांना तूं योग्य रीतीनें अनुमोदन देत आहेस ना ? हे ज्ञानवंता, नीतिशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें चार मंत्र्यांबरोबर, तीन मंत्र्यांबरोबर, सर्व मंत्र्यांबरोबर अथवा एकमेकांबरोबर तूं मसलत करीत अस-

तोस ना? कारण दुसऱ्याच्या देखत एखादा आपल्या मनांतील उद्देश सांगत नाहीं. ह्याकरितां एकच मसलत एकट्याचा, अनेकांना आणि सर्वांचा विचार घेऊन करावी लागते. (विहित कर्मप्रवृत्तीनें) तुझे वेद सफल झाले आहेत ना? (फलप्राप्तीनें) तुझीं कर्में सफल झालीं आहेत ना? (धर्माचें अनुसरण, परोपभोग व संतति यांच्या योगानें) तुझी स्त्री सफल झाली आहे ना? आणि (विनयानें) तुझी विद्या सफल झाली आहे ना? भरता, आयुर्वर्धक, यशस्कारक आणि धर्म, अर्थ व काम ह्यांना अनुसरून असलेली ही जी सांगितलेली माझी बुद्धि आहे, तशीच तुझी आहे ना? पित्याचें जसें वर्तन आहे, आपल्या पूर्वजांचें जसें होतें, आणि सन्मार्गाला अनुसरून जें शुभ वर्तन असतें, तेंच वर्तन तुझें आहे ना? हे रघुवंशजश्रेष्ठा, तयार केलेलें मिष्टान्न कधीं एकट्यानेंच भक्षण न करितां त्याची इच्छा करणाऱ्या आपल्या मित्रांना तूं तें देत असतोस ना? बाबारे, दंड धारण करून प्रजाजनांना मर्यादित ठेवणारा पृथ्वीपति ज्ञानी क्षत्रिय, संपूर्ण पृथ्वी प्राप्त करून घेऊन व धर्मानें तिचें परिपालन करून ह्या लोकाचा त्याग केल्यानंतर स्वर्गाला जातो."

सर्ग एकशेंएकावा.

राज्य स्वीकारण्याविषयीं भरताची रामाला प्रार्थना.

आपला भ्राता भरत वडिलांविषयीं अंतःकरणामध्यें प्रेम धरणारा आहे, असें जाणून राम त्याला विचारूं लागला, "हें काय? ज्या अर्थी तूं ह्या प्रदेशाला वल्कलें, जटा आणि अजिन धारण करून आला आहेस, त्या अर्थी असें येण्याचें कारण काय, हें तुझ्या तोंडून ऐकण्याची माझी इच्छा आहे. ह्यास्तव तूं कशाकरितां राज्याचा त्याग करून व कृष्णाजिन आणि जटा धारण करून ह्या प्रदेशाला आला आहेस, तें सर्व सांग."

ह्याप्रमाणें महात्म्या रामानें कैकेयीपुत्र भरताला विचारिलें असतां, मोठ्या आयासानें पुनरपि दुःख आवरून धरून व हात जोडून तो त्याला म्हणाला, "हे आर्य, माझी कैकेयी माता जी त्याची स्त्री, तिनें प्रेरणा केल्यामुळें अत्यंत दुष्कर कर्म करून पुत्रशोकाकुल झालेला तो महापराक्रमी राजा स्वर्गाला गेला, आणि त्या माझ्या मातेनें आपल्या कीर्तीला बट्टा लावणारें हें मोठें पाप केलें!

आतां शोकानें कृश झालेली ती माझी विधवा माता राज्यफल प्राप्त न होतां महाभयंकर नरकामध्यें जाऊन पडेल. तेव्हां दासरूप बनलेल्या मजवर तूं कृपा कर, आणि आजच्या आजच इंद्राप्रमाणें स्वतःला राज्याभिषेक करून घे. हे सर्व अमात्य आणि गतभर्तृका माता ह्या तुझ्याजवळ आल्या आहेत. ह्यास्तव तूं कृपा कर. परंपरागत चालत असलेल्या पद्धतीनें ज्या अर्थी तूंच राजा होण्यास योग्य आहेस, आणि ज्या अर्थी तुलाच राज्याभिषेक होणें योग्य आहे, त्या अर्थी तूं धर्मानें राज्याचा स्वीकार करून सुहृदांचा मनोरथ परिपूर्ण कर. शरदृतूंतील रात्र ज्याप्रमाणें निर्मल चंद्राच्या योगानें सनाथ होते, त्याप्रमाणें ही संपूर्ण पृथ्वी तुज पतीमुळें सनाथ होवो. ह्या सचिवांसहवर्तमान चरणीं मस्तक ठेवून मी तुझी प्रार्थना करीत आहें. ह्यास्तव ह्या भ्रात्यावर, शिष्यावर आणि दासावर कृपा कर. हे पुरुषश्रेष्ठ, परंपरागत चालत आलेल्या आणि पूर्वजांनीं मान दिलेल्या ह्या मंत्रिमंडळाचें अतिक्रमण करणें तुला योग्य नाहीं."

श्रीरामाचें भरताला उत्तर.

ह्याप्रमाणें प्रार्थना करून डोळ्यांमध्यें अश्रू आलेल्या त्या महापराक्रमी कैकेयीपुत्र भरतानें पुनरपि रामाच्या चरणांवर मस्तक ठेविलें. तेव्हां मत्त गजाप्रमाणें वारंवार सुस्कार टाकीत असलेल्या त्या भरताला आलिंगन देऊन राम म्हणाला, "कुलीन, सत्त्वस्थ, तेजस्वी आणि व्रत ग्रहण केलेला माझ्यासारखा पुरुष राज्याकरितां पाप कसें करील? हे शत्रुनाशका, झालेल्या गोष्टीबद्दल तुझ्याकडे मला कांहीं सूक्ष्म सुद्धां दोष दिसत नाहीं; आणि वेडेपणामुळें आपल्या मातेची निंदा करणें तुला योग्य नाहीं. हे निरपराधिन्, संमत असलेल्या स्त्रियांना आणि पुत्रांना इच्छेस येईल त्याप्रमाणें आज्ञा करण्याचा वडिलांना सर्वदा अधिकार आहे. भार्या, पुत्र आणि शिष्य ह्यांची गणना ज्याप्रमाणें पित्यानें अथवा गुरूनें इच्छेस येईल ती आज्ञा करण्यास योग्य म्हणून सज्जनांनीं ह्या जगतामध्यें केलेली आहे, त्याचप्रमाणें हे सौम्या, आपणां सर्वांचें ह्या दशरथ राजाशीं नातें आहे, हें तूंहि समजून ठेव. सारांश, हे सौम्या, वल्कलें आणि कृष्णाजिनें परिधान करवून मला अरण्यांत पाठविण्याला अथवा राज्यावर बसविण्याला महाराज दशरथ मालक आहे. हे धर्मनिष्ठश्रेष्ठ, हे धर्मज्ञ भरता, लोकमान्य पित्याप्रमाणें मातेचीहि मानमान्यता ठेविली पाहिजे. तेव्हां ह्या उभयतां धर्मशील पितरांनीं 'वनांत जा' म्हणून मला आज्ञा केली असतां मी दुसरें कसें बरें करीन? अयोध्येमध्यें लोकमान्य राज्य तुला प्राप्त करून

घेतलें पाहिजे; आणि वल्कलें परिधान करून मला दंडकारण्यामध्यें वास्तव्य केलें पाहिजे. असा विभाग सर्व लोकांसमक्ष सांगून आणि 'ह्याप्रमाणें वागा' अशी आज्ञा करून महाराज दशरथ स्वर्गाला गेला आहे. आणि तोच जगत्-गुरु धर्मनिष्ठ राजा तुला प्रमाण आहे. तेव्हां पित्यानें विभागाप्रमाणें दिलेल्या राज्याचा तूं उपभोग घे. सर्व मनुष्यलोकांना मान्य अशा महात्म्या देवराजतुल्य पित्यानें जें मला सांगितलें आहे, त्यांतच माझें सर्वोत्कृष्ठ हित आहे, असें मला वाटतें. अक्षय्य स्वर्गलोकाधिपत्य मला हितकारक वाटत नाहीं."

सर्ग एकशेंदोनावा.

पित्याची उदकक्रिया करण्याविषयीं रामाला सांगणें.

रामाचें हें भाषण श्रवण करून भरत म्हणाला, "तूं विचारिलेल्या राजधर्माचा मज धर्महीनाला उपयोग काय होणार आहे? हे पुरुषश्रेष्ठा, ज्येष्ठ पुत्र विद्यमान असतांना कनिष्ठ राजपुत्र राजा होत नाहीं. हा धर्म आपणांमध्यें नेहमीं परंपरागत चालत आलेला आहे. तस्मात् राघवा, माझ्यासहवर्तमान तूं समृद्ध अयोध्येमध्यें चल, आणि ह्या आमच्या कुलाच्या अभ्युदयाकरितां तूं आपल्याला राज्याभिषेक करून घे. सर्व लोक जरी राजाला मनुष्य म्हणत असतात, तरी धर्म आणि अर्थ ह्यांला अनुसरून असलेलें आणि मनुष्याचें ठिकाणीं न संभवणारें असें ज्याचें वर्तन असल्याबद्दल लोक सांगतात, त्या राजाला मी देवच समजत आहें. मी केकय देशामध्यें असतांना, आणि तूं अरण्याचा आश्रय केला असतांना सज्जनांना संमत आणि यज्ञशील असा विचारी दशरथ राजा स्वर्गाला गेला. सारांश, सीता आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान आपण नगरांतून बाहेर पडतांक्षणीं दुःख आणि शोक ह्यांनीं घेरिलेला राजा स्वर्गाला गेला. हे पुरुषश्रेष्ठा, ऊठ आणि पित्याची उदकक्रिया कर. मी आणि शत्रुघ्नानें पूर्वींच क्रिया केलेली आहे. हे राघवा, प्रिय पुत्रानें दिलेली कोणतीहि वस्तु पितृलोकामध्यें त्या प्राण्याला अक्षय्य पोहोंचत असते, असें म्हणतात; आणि तूंच पित्याला प्रिय होतास, तुझ्याकडेच खिळून गेलेलें मन परत न फिरवितां तुझा वियोग होऊन तुझ्या शोकानें जर्जर झालेला तुझा पिता तुझ्याचकरितां शोक करीत करीत आणि तुझेंच स्मरण करीत करीत स्वर्गाला गेला."

सर्ग एकशेंतिनावा.

श्रीरामाचा विलाप.

पित्याच्या मरणासंबंधानें भरतानें केलेलें तें दीन भाषण श्रवण केल्यावर रामाला भान नाहींसें झालें. संग्रामामध्यें इंद्रानें सोडिलेल्या वज्राप्रमाणें भरतानें तोंडांतून काढिलेलें तें मनाला नीट न वाटणारें वाग्रूप वज्र कानावर पडतां-क्षणीं शत्रुतापन रामानें हात वर केले, आणि कुन्हाडीनें तोडिल्यामुळें वनामध्यें पडणाऱ्या प्रफुल्लित वृक्षाप्रमाणें तो राम भूमीवर पडला. तेव्हां नदीचें तीर पाडून टाकिल्यामुळें श्रमून जाऊन निद्रिस्थ झालेल्या गजाप्रमाणें तो महाधनु-र्धारी पृथ्वीपति राम शोकानें जर्जर होऊन पृथ्वीवर पडला असतां, सीतेसह-वर्तमान रडूं लागलेले ते तिघेहि भ्राते त्याच्या मस्तकावर पाणी शिंपिंडूं लागले. तदनतर पुनरपि शुद्धीवर येऊन नेत्रांतून अश्रू ढाळीत ढाळीत त्या ककुत्स्थ-कुलोत्पन्न रामानें दीन स्वरानें पुष्कळच विलाप करण्याला आरंभ केला. सारांश, आपला पृथ्वीपति पिता स्वर्गस्थ झाल्याचें श्रवण करून तो धर्मात्मा राम भर-ताशीं धर्माला अनुसरून असलेलें भाषण करूं लागला.

राम म्हणालाः—"दैवविहित गतीला पिता गेला असतां मी अयोध्येंत येऊन काय करूं! त्या नृपश्रेष्ठाचा वियोग झालेल्या त्या अयोध्येचें परिपालन कोण बरें करणार आहे! जो माझ्या शोकानें मरण पावला, आणि ज्याचा संस्कार माझ्या हातून झाला नाहीं, त्या महात्म्याला व्यर्थ जन्मास आलेल्या माझा काय बरें उपयोग आहे! हे निष्पापा, तूं व शत्रुघ्न हे दोघे कृतकृत्य आहां. कारण तुझ्या हातून व शत्रुघ्नाच्या हातून त्याचीं सर्व कार्यें सत्कारपूर्वक झालीं आहेत. आतां माझा वनवास जरी समाप्त झाला, तरी राजाचा वियोग झाल्यामुळें अप्रधान होऊन अनेक नायकांनीं युक्त झालेल्या अयोध्येमध्यें गमन करण्याची माझी इच्छा नाहीं. हे शत्रुतापना, पिता परलोकीं गेला असतां वनवास समाप्त करून मी अयोध्येमध्यें गेल्यावर मला कोण बरें आज्ञा करील? मी सद्वर्तनी आहें, असें अवलोकन करून पूर्वीं पिता सांत्वन करीत करीत जीं भाषणें माझ्याशीं करीत असे, तीं कर्णसुखावह भाषणें मला आतां कोठून बरें ऐकावयाला सांपडतील!"

रामहस्तें दशरथाची उदकक्रिया.

ह्याप्रमाणें भरताशीं बोलून आणि पूर्ण चंद्राप्रमाणें आल्हादकारक मुखानें युक्त असलेल्या आपल्या भार्येसमीप जाऊन शोकसंतप्त झालेला राम तिला

म्हणाला, " सीते, तुझा सासरा मरण पावला. लक्ष्मणा, तुझा पिता नाहींसा झाला. अरे, पृथ्वीपति राजाच्या स्वर्गगमनरूप दुःखाची वार्ता भरत सांगत आहे. "

ह्याप्रमाणें ककुत्स्थकुलोत्पन्न राम विलाप करूं लागला असतां त्या यशस्वी राजकुमारांच्या नेत्रांतून फारच अश्रू आले. नंतर ते तिघेहि भ्राते दुःखाकुल झालेल्या रामाचें वारंवार सांत्वन करून 'पित्याची उदकक्रिया कर' असें त्याला म्हणाले. आपला श्वशुर स्वर्गस्थ झाल्याचें श्रवण केल्यावर अश्रुपरिपूर्ण नेत्रांनीं सीता तर आपल्या प्रियाकडे पाहाण्यासहि समर्थ झाली नाहीं. तेव्हां त्या रडत असलेल्या जनककन्येचें सांत्वन करून तो दुःखित राम दुःखानें लक्ष्मणाला म्हणाला, " वाटलेल्या इंगुदीफळांचा गोळा आणि एक उत्तम नवें वल्कल तूं घेऊन ये. मी महात्म्या पित्याची उदकक्रिया करण्याकरितां जातों. सीतेला पुढें होऊं दे, तूं तिच्या मागून चाल, आणि मी तुमच्या मागून येईन. कारण शोक वगैरे करण्याचे वेळीं अशाच क्रमानें गेलें पाहिजे.[1] "

तदनंतर त्या राजकुमारांना ज्याचा स्वभाव माहीत आहे असा तो मृदु, जितेंद्रिय, मनोहर, रामाचे ठिकाणीं दृढ भक्ति करणारा आणि रामाबरोबर नित्य असणारा महाविचारी लक्ष्मण त्याच्या सांगण्याप्रमाणें इंगुदीफळांचा गोळा घेऊन आला. नंतर त्या राजकुमारांसहवर्तमान रामाचें सांत्वन केल्यावर सुमंत्रानें रामाचा हात धरून पवित्र अशा मंदाकिनी नदीमध्यें त्याला उतरविलें. नंतर जिला चांगला उतार आहे व जिचे तीरीं नेहमीं प्रफुल्लित वृक्षांचीं वनें आहेत, अशा त्या रमणीय मंदाकिनी नदीसमीप ते यशस्वी मोठ्या कष्टानें आले. कर्दमरहित, शीघ्र प्रवाहानें युक्त व पवित्र अशा उतारावर येऊन, 'हें तुला समर्पण असो' असें म्हणून त्यांनीं राजाला उदक दिलें. सारांश, भूपालराम उदकानें अंजलि भरून घेऊन आणि दक्षिणेकडे तोंड करून रडत रडत म्हणाला, " हे नृपश्रेष्ठा, हें मीं दिलेलें निर्मल उदक पितृलोकीं गेलेल्या तुला अक्षय्य प्राप्त होवो. "

तदनंतर मंदाकिनीच्या पात्रांतून तीरावर येऊन त्या तेजस्वी रामानें भ्रात्यांसहवर्तमान पित्याला उद्देशून पिंडदान केलें. बदरी-फळांनीं मिश्रित केलेला इंगुदीफळांचा गोळा दर्भास्तरणावर ठेवून अत्यंत दुःखाकुल झालेला राम रडत रडत म्हणाला, " हे महाराज, जें अन्न भक्षण करून आम्ही निर्वाह करितों, तें हें तूं स्वीकार. कारण जें अन्न पुरुष भक्षण करीत असेल, तेंच अन्न त्यानें

---

१ सर्वे कनिष्ठप्रथमा इतरे तु श्रियोऽग्रतः ।

आपल्या देवतांना द्यावें, असें आहे. तदनंतर त्याच मार्गानें नदीतीरावरून वर आल्यावर पुरुषश्रेष्ठ राम रमणीय शिखरांनीं युक्त असलेल्या त्या चित्रकूट पर्वतावर आरूढ झाला. नंतर पर्णकुटिकेच्या द्वारासमीप आल्यावर त्या पृथ्वी-पति रामानें उभयतां भरत-लक्ष्मणांना हातांत धरिलें. तेव्हां सीतेसहवर्तमान ते भ्राते रोदन करूं लागले असतां त्यांच्या रोदनाचा पर्वतावर प्रतिध्वनि होऊं लागला. तो तुमुल ध्वनि ऐकून भरताचे सैनिक त्रस्त झाले व म्हणाले, 'रामाशीं भरताची निःशंसय भेट झाली. कारण मृत पित्याबद्दल शोक करणाऱ्यांचाच हा मोठा शब्द आहे.'

सैनिकांना रामदर्शन.

तदनंतर वाहनें सोडून देऊन जिकडून तो ध्वनि येत होता, तिकडे त्या सर्वहि सैनिकांनीं तोंडें केलीं, आणि वाट सांपडली तिकडे ते एकचित्तानें धावले. कांहीं लोक अश्वांवर आरोहण करून गेले. कांहीं गजांवर बसून गेले. अत्यंत सुकुमार असलेले कांहीं लोक उत्तम रीतीनें विभूषित केलेल्या रथांमध्यें आरूढ होऊन निघाले. कांहीं लोक तर पायांनींच चालते झाले. रामाला जाऊन जरी फार दिवस झाले नव्हते, तरी त्याला वनवासाला जाऊन फारच दिवस झाले आहेत असें समजून सर्वहि लोक त्याला पाहण्याकरितां एकदम आश्रमाकडे निघाले. आणि खुर व धांवा ह्यांनीं व्याप्त झालेल्या अनेक प्रकारच्या यानांमध्यें आरूढ होऊन भ्रात्यांचा समागम पाहण्याकरितां ते सत्वर चालते झाले. तेव्हां मेघांचा समागम झाला असतां ज्याप्रमाणें आकाशामध्यें तुमुल ध्वनि होऊं लागतो, त्या-प्रमाणें अनेक यानांनीं व रथांच्या धावांनीं ताडित झालेल्या पृथ्वीतून तुमुल ध्वनि होऊं लागला असतां, हत्तिणींनीं परिवेष्टित असलेले हत्ती त्या ध्वनींनीं त्रस्त झाले, आणि आपल्या मदगंधानें दिशा सुवासिक करीत करीत ते तेथून दुसऱ्या वनामध्यें निघाले. वराह, मृग, सिंह, महिष, सृमर, व्याघ्र, गोकर्ण, गवे आणि पृषत हेहि दुसऱ्या वनामध्यें शिरले. चक्रवाक, हंस, जलकुक्कुट, प्लव-संज्ञक बक, कारंडव, कोकिल आणि क्रौंच हे पक्षी भान नाहींसें होऊन रानो-माळ भटकूं लागले. त्या शब्दाच्या योगानें त्रस्त झालेल्या पक्ष्यांनीं व्याप्त झालेलें आकाश आणि मनुष्यांनीं व्याप्त झालेली भूमि हीं दोन्ही शोभूं लागलीं.

तदनंतर यशस्वी व निष्पाप असा तो पुरुषश्रेष्ठ राम ओट्यावर बसलेला त्या लोकांच्या एकदम दृष्टीस पडला असतां मंथरेसहवर्तमान कैकेयीची निंदा करीत करीत रामासमीप आल्यावर लोकांचीं मुखें अश्रूंनीं भरून गेलीं. तेव्हां

अश्रूंनीं नेत्र भरून आलेल्या त्या अत्यंत दु:खित लोकांना अवलोकन करून तो धर्मज्ञ राम मातापितरांप्रमाणें त्यांना कवटाळूं लागला. त्या ठिकाणीं कांहीं लोकांना त्यानें कवटाळिलें, कांहीं लोकांनीं त्याला अभिवंदन केलें आणि त्या राजकुमार रामानें योग्यतेप्रमाणें भेटी घेऊन त्या सर्वांना मित्र आणि बांधव करून सोडिलें. तेव्हां रोदन करूं लागलेल्या त्या महात्म्यांचा तो ध्वनि पृथ्वी, आकाश आणि पर्वतसंबंधीं गुहांच्या सर्व बाजू एकसारख्या नादित करीत करीत मृदंगध्वनीप्रमाणें ऐकूं येऊं लागला.

सर्ग एकशेंचारावा.

कौसल्यादि स्त्रियांना रामदर्शन.

दशरथाच्या स्त्रियांना पुढें घालून रामदर्शनाकरितां उत्सुक झालेले वसिष्ठ मुनि त्या प्रदेशाकडे चालले. त्या राजपत्न्या हळू हळू जाऊं लागल्या असतां मंदाकिनीचे तीरीं राम आणि लक्ष्मण हे जेथे येऊन गेले होते, तो उतार त्यांनीं पाहिला. तेव्हां जिच्या नेत्रांतून अश्रू वहात आहेत, आणि जिचें मुख शुष्क होऊन गेलें आहे अशी ती कौसल्या दीन सुमित्रेला आणि इतरहि राजस्त्रियांना म्हणाली, "ज्यांना राज्यापासून हांकून दिलें, त्या उत्कृष्ठ कर्म करणाऱ्या अनाथांचा हा वनांतील जल वगैरे नेण्याचा निःसंशय क्लिष्ट मार्ग होय. सुमित्रे, सावध असलेला तुझा पुत्र लक्ष्मण माझ्या पुत्राकरितां येथून नेहमीं स्वतः उदक घेऊन जातो. हें हलकें काम जरी तुझ्या पुत्रानें केलें आहे, तरी तो निंदेस पात्र झाला नाहीं. कारण गुणसंपन्न भ्रात्याचें कार्य ज्याच्या योगानें होत नाहीं, तें सर्व निंदास्पद आहे. भोगाव्या लागणाऱ्या क्लेशांचा अनुभव ज्यांना नाहीं, असा हा तुझा पुत्र शत्रुघ्नहि नीच मनुष्यालाच योग्य असें दु:खजनक अनुष्ठान ज्याचें आहे तें हें प्राप्त झालेलें जल वगैरे नेण्याचें काम करूं लागू दे."

नंतर पित्याला उद्देशून रामानें भूमीवर दक्षिणाग्र दर्भ अंथरून इंगुदी फळांच्या पिठाचा जो पिंड ठेविला होता, तो अवलोकन करून राजपत्नी कौसल्या दशरथाच्या इतर सर्व स्त्रियांना म्हणाली, "रामानें आपल्या इक्ष्वाकुकुलाधिपति महात्म्या रघुवंशज पित्याला यथाविधि दिलेला हा पिंड अवलोकन करा. ज्यानें राज्यभोग भोगिले, त्या देवतुल्य महात्म्या राजाला हें भोजन मला योग्य दिसत नाहीं. चारी समुद्रांनीं मर्यादित असलेल्या पृथ्वीचा ज्या महेंद्रतुल्य भूपतीनें

उपभोग घेतला, तो भूतलावर ठेविलेला इंगुदीफळांचा पिंड कसा बरें भक्षण करीत आहे ! वैभवसंपन्न रामालाहि ज्या अर्थी पित्याला उद्देशून इंगुदीचें पीठ देण्याचा प्रसंग आला, त्या अर्थी ह्यापेक्षां ह्या जगतामध्यें मला कोणतीहि गोष्ट अधिक दुःखदायक वाटत नाहीं. अहो, रामानें पित्याला उद्देशून दिलेला हा इंगुदीपिष्टपिंड अवलोकन करून दुःखानें माझ्या हृदयाचे हजारों तुकडे कसे होत नाहींत ! जें अन्न पुरुष भक्षण करितो, तेंच अन्न त्याच्या देवतांना भक्षण करावें लागतें, ही लोकांतील म्हणच खरोखर मला सत्य वाटत आहे."

ह्याप्रमाणें दुःखाकुल झालेल्या त्या कौसल्येचें तिच्या सवतींनीं सांत्वन केलें. नंतर राम हा स्वर्गांतून च्युत झालेल्या देवाप्रमाणें आश्रमामध्यें त्यांच्या दृष्टीस पडला. भोगांचा त्याग केलेल्या त्या रामाला अवलोकन करून, शोकानें कृश झालेल्या त्या दुःखाकुल माता रोदन करीत करीत अश्रू ढाळूं लागल्या. तेव्हां पुरुषश्रेष्ठ व सत्यप्रतिज्ञ रामानें आसनावरून उठून त्या सर्व मातांचीं चरणकमलें धरिलीं. तेव्हां सुखावह स्पर्श आणि मृदु अंगुलि ह्यांनीं युक्त असलेल्या आपल्या शुभ हातांच्या योगानें त्यांनीं रामाच्या पाठीवर हात फिरवून धुराळा झाडून टाकिला. नंतर त्या सर्व मातांना अवलोकन करून दुःखाकुल झालेल्या लक्ष्मणानेंहि रामाच्या मागून हळूहळू प्रेमानें त्यांना अभिवंदन केलें. त्या सर्व स्त्रियांनीं दशरथापासून उत्पन्न झालेल्या त्या सुलक्षणी लक्ष्मणाचे ठिकाणीं रामाप्रमाणेंच वर्तन ठेविलें. नंतर दुःखाकुल झालेल्या सीतेनेंहि आपल्या सासवांचे पाय धरिले, आणि अश्रूंनीं नेत्र भरून आलेली ती सीता त्यांच्या समोर उभी राहिली. तेव्हां कन्येला कवटाळून धरणाऱ्या मातेप्रमाणें दीन व वनवास केलेल्या त्या सीतेला कवटाळून धरून दुःखाकुल झालेली कौसल्या म्हणाली, "विदेहदेशाधिपति जनक राजाच्या कन्येला, दशरथाच्या स्नुषेला आणि रामाच्या पत्नीला निर्जन वनामध्यें दुःख प्राप्त होण्याचा प्रसंग कसा बरें आला ? हे विदेहराजकन्ये, सूर्याच्या तापानें संतप्त झालेल्या श्वेतवर्ण कमलाप्रमाणें, चुरगळून गेलेल्या आरक्तवर्ण कमलाप्रमाणें, धुळीनें भरलेल्या सुवर्णाप्रमाणें अथवा मेघांनीं घेरिलेल्या चंद्राप्रमाणें असलेलें तुझें मुख अवलोकन करून दुःखरूप अरणीपासून उत्पन्न झालेला शोक घर जाळून टाकणाऱ्या अग्नीप्रमाणें माझा अतिशय दाह करीत आहे."

ह्याप्रमाणें दुःखाकुल होऊन कौसल्या माता विलाप करीत असतांना भरताग्रज रामानें समीप येऊन वसिष्ठांचे पाय धरिले, आणि देवराज इंद्र ज्याप्रमाणें बृहस्पतीचे पाय धरितो, त्याप्रमाणें अत्यंत विपुल तेजानें युक्त असलेल्या त्या

अग्नितुल्य पुरोहित वसिष्ठांचे पाय धरून रघुवंशज राम त्यांच्याचबरोबर बसला. तदनंतर आपले मंत्री, नगरांतील मुख्य मुख्य लोक, सैनिक आणि अत्यंत धर्मनिष्ठ लोक ह्यांसहवर्तमान भरत त्या ज्येष्ठ भ्रात्याच्या पृष्ठभागाचा आश्रय करून समीपच बसला. कांतीनें झळकत असलेल्या रामाकडे पाहून, शुचिर्भूत इंद्र ज्याप्रमाणें ब्रह्मदेवापाशीं बसतो, त्याप्रमाणें वीर्यवान भरत हात जोडून रामाचे जवळ बसला असतां, हा प्रणामपूर्वक व सत्कारपूर्वक रामाशीं आतां काय चांगलें भाषण करणार आहे, अशा प्रकारची तेथें जुळलेल्या सभ्य लोकांना खरोखर अगदीं पराकाष्ठेची चिंता लागून राहिली. असो. सदस्यांसहवर्तमान असलेले तीन अग्नी ज्याप्रमाणें यज्ञामध्यें शोभूं लागतात, त्याप्रमाणें सुहृदांनीं परिवेष्ठित झालेले ते त्रिवर्ग—सत्यनिष्ठ राम, महापराक्रमी लक्ष्मण आणि धर्मनिष्ठ भरत—हे शोभूं लागले.

सर्ग एकशेंपांचावा.

राज्य स्वीकारण्याविषयीं भरताची रामाला पुनः प्रार्थना.

नंतर त्या सुहृद्गणांनीं परिवेष्ठित होऊन ते पुरुषश्रेष्ठ शोक करूं लागले असतां, दुःखानें शोक करितां करितांच रात्र निघून गेली. उजाडल्यावर सुहृद्गणांनीं परिवेष्ठित असलेले ते भ्राते मंदाकिनी नदीचे तीरीं होमहवन व जपजाप्य आटोपून रामाकडे गेले आणि तेथें स्वस्थ बसले. कोणी कांहींहि बोलला नाहीं. तेव्हां भरत रामाला म्हणाला, "राजानें माझ्या मातेचें सांत्वन करून मला हें राज्य दिलें आहे, तें आतां मी तुला देतों. आणि तूंच ह्या निष्कंटक राज्याचा उपभोग घे. वर्षाकालीं मोठया जलवेगानें फुटून गेलेला बांध जसा आवरणें अशक्य आहे, तसें हें भरतखंडसंज्ञक प्रचंड राज्य तुझ्यावांचून इतरांना आवरितां येणें अशक्य आहे. हे भूपते, ज्याप्रमाणें अश्वाच्या गतीचें अवलंबन करण्यास गर्दभ असमर्थ आहे, अथवा ज्याप्रमाणें गरुडाची गति स्वीकारण्यास इतर पक्ष्याचें सामर्थ्य नाहीं, त्याचप्रमाणें तुझ्या राज्यपालनशक्तीचें अवलंबन करण्यास मी समर्थ नाहीं. रामा, ज्याच्यावर दुसऱ्यांची उपजीविका चालते, त्याचेंच जीवन चांगलें आहे; परंतु जो उपजीविकेकरितां दुसऱ्यावर अवलंबून असतो, त्याचें जीवन दुःखमय आहे. तस्मात् तूंच

राज्य करणें योग्य आहे. एखाद्या पुरुषानें लाविलेला व वाढविलेला वृक्ष शाखा फुटून, ठेंगण्या पुरुषाला सहज चढतां न येईल अशा रीतीनें मोठा होऊन आणि पुष्पांनीं युक्त होऊनहि जेव्हां फलें दाखविणार नाहीं, आणि असें झालें असतां, ज्या फलाच्या हेतूनें तो वृक्ष लाविला, त्या फलप्राप्तीचा आनंद ज्याप्रमाणें त्या लावणाऱ्याला अनुभविण्यास सांपडत नाहीं, त्याचप्रमाणें तुझी अवस्था झाली आहे. कारण हे रघुकुलतिलका, ज्या अर्थी तूं श्रेष्ठ व परिपालन करण्यास समर्थ असूनहि आम्हां सेवकांचें परिपालन करीत नाहींस, त्या अर्थी हीच उपमा तुला योग्य आहे. हे महापराक्रमी रामा, राजा दशरथाचे प्रयत्न व्यर्थ गेले, हा त्या उपमेचा अर्थहि तूं जाणीत आहेस. हे महाराजा, शत्रुदमन करणारा तूं राज्यावर बसून सूर्याप्रमाणें प्रकाशत आहेस, असें अनेक जातींच्या लोकांचे मुख्य मुख्य सर्व समुदाय पाहोत. त्याचप्रमाणें रामा, स्वारी निघाली असतां मत्त गज गर्जना करोत, आणि अंतःपुरांतील स्त्रिया मनामध्यें अतिशय स्वस्थ होऊन तुझें अभिनंदन करोत.''

श्रीरामाचें धर्मपरिपूर्ण भाषण.

ह्याप्रमाणें भरत रामाची प्रार्थना करूं लागला असतां त्याचें तें भाषण श्रवण केल्यावर 'उत्तम उत्तम' म्हणून नानाप्रकारच्या नागरिक लोकांनीं त्या भाषणाला अनुमोदन दिलें; परंतु ह्याप्रकारें यशस्वी भरत दुःखाकुल होऊन विलाप करीत आहे, असें पाहून धैर्यवान व जितेंद्रिय राम भरताचें सांत्वन करूं लागला.

तो म्हणाला:—''जीवाला स्वेच्छेनें कांहींएक करण्याचें सामर्थ्य नाहीं. कारण हा पुत्र स्वातंत्र्यरहित आहे. ह्यामुळें अंतर्यामीरूप काल हा ह्याला कर्माप्रमाणें इकडून तिकडून ओढून नेत असतो. तस्मात् माझ्या वनवासाला कैकेयी किंवा राजा ह्यांपैकीं कोणीहि कारण नसून अदृष्टच मुख्य कारण आहे. नाश हा सर्व संग्रहांचा परिणाम आहे, पतन हाच सर्व उन्नतींचा शेवट आहे, वियोग हाच सर्व संयोगांचा अंत आहे, आणि मरण हाच जीविताचा शेवट आहे. तेव्हां राजाच्या मृत्यूबद्दल अथवा राज्यापासून मी वनामध्यें आल्याबद्दल शोक करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ज्याप्रमाणें पक्व फलांना पतनावांचून दुसरें भय नाहीं, त्याचप्रमाणें जन्मास आलेल्या पुरुषांना मरणावांचून दुसरें भय नाहीं. ज्याप्रमाणें दृढ स्तंभांनीं युक्त असलेलेंहि घर जीर्ण होऊन नाहींसें होतें, त्याचप्रमाणें, लोक जरा आणि मृत्यु ह्यांच्या तावडींत सांपडून नाश पावतात. ज्याप्रमाणें जलानें परिपूर्ण असलेल्या समुद्रामध्यें जाणारी यमुना तेथून कधींहि परत

फिरत नाहीं, त्याप्रमाणें जी रात्र गेली ती फिरून परत येत नाहीं. ग्रीष्म ऋतू-मध्यें ज्याप्रमाणें सूर्यकिरणें उदक शोषून टाकितात, त्याप्रमाणें जाणारीं अहोरात्रें ह्या जगतांतील सर्व प्राण्यांच्या आयुष्यांचा सत्वर क्षय करीत असतात. तस्मात् तूं आपल्या स्वतःबद्दल शोक कर. दुसऱ्याकरितां तूं कां शोक करीत आहेस? उभा अथवा चालणारा असा कोणी जरी असला, तरी त्याचें आयुष्य कमी होतच असतें. तेव्हां अनिवार मृत्यु जवळ जवळ येत चालला, आतां माझी अवस्था काय होईल, म्हणून स्वतःबद्दल शोक करीत बसणें तुला योग्य आहे. अरे, प्राणी जाऊं लागला तरी मृत्यु त्याच्याबरोबर जातोच, तो बसला तरी मृत्यु त्याच्या-बरोबर बसतोच आणि दूर मार्ग चालून प्राणी परत फिरूं लागला तरीहि मृत्यु बरोबर चालत जाऊन त्याच्याबरोबर परत फिरतो! सारांश, मृत्यु प्राण्याचे सन्निध एकसारखा आहेच आहे. अरे, अवयवांवर सुरकुत्या पडतात, केश पांढरे होऊन जातात आणि जरेनें पुरुष जीर्ण होऊन जातो. तेव्हां कोणता उपाय करून हें सर्व टाळण्याला प्राणी समर्थ होणार आहे? पुरुष सूर्योदय झाला असतांहि आनंदित होतात आणि दिवस मावळला तरीहि आनंदितच होतात; परंतु आपल्या जीविताचा क्षय होत आहे, हें त्यांना समजत नाहीं. फिरून फिरून ऋतूला आरंभ झालेला पाहून व तो ऋतु पूर्वी कधीं न आलेला असा नवानवाच प्राप्त झाला आहे, असें वाटून प्राण्यांना हर्ष होतो; परंतु ऋतूंच्या फेऱ्यानें प्राण्यांचा नाश होत असतो, हें त्यांना समजत नाहीं. ज्या-प्रमाणें महासागरामध्यें एक काष्ठ आणि दुसरें काष्ठ ह्यांचा समागम होतो, आणि समागम झाल्यावर ज्याप्रमाणें कांहीं वेळानें त्याचा वियोग होतो, त्याच-प्रमाणें भार्या, पुत्र, ज्ञाति व संपत्ति ह्यांचा समागम होत असून नंतर ते एक-मेकांपासून दूर धावूं लागतात. कारण ह्यांचा वियोग हा ठरलेलाच आहे. ह्या संसारामध्यें कोणत्याहि प्राण्याला जन्ममरणरूपस्वभावाचें अतिक्रमण करितां येत नाहीं, व ह्यामुळेंच प्रेताकरितां शोक करीत असलेल्या कोणत्याहि प्राण्याचे ठिकाणीं प्रेतत्व नाहींसें करण्याविषयीं सामर्थ्य नाहीं. ज्याप्रमाणें एखादा तांडा जाऊं लागला असतां 'तुमच्या मागून मीहि येतों' असें मार्गामध्यें असलेला दुसरा कोणी त्या तांड्याला म्हणतो, आणि त्याच्या मागोमाग जातो, त्याचप्रमाणें पूर्वीचे वाडवडील ज्या अवश्य प्राप्त होणाऱ्या मार्गानें गेले, आणि ज्या मार्गाचें उल्लंघन करितां येत नाहीं, त्याच मार्गाला स्वतः लागलेल्या पुरुषानें पित्रा-दिकांकरितां कां बरें शोक करावा? जलप्रवाहाप्रमाणें परत न फिरतां सतत

उडत जाणाऱ्या पक्ष्यांचा नाशच होतो, हें लक्ष्यांत घेऊन आत्मा सुखसाधनरूप धर्माकडे लावावा, हें बरें. कारण सुखसाधन प्राप्त होण्याचें कारण जो जन्म, तो प्राण्यांना प्राप्त होतो, असें म्हणतात. बा भरता, सज्जनांना पूज्य असा धर्मात्मा पिता उत्कृष्ठ आणि विपुल दक्षिणांनीं युक्त असे सर्व ऋतु करून स्वर्गाला गेला आहे. तस्मात् त्याच्याकरितां शोक करणें योग्य नाहीं. कारण जीर्ण झालेल्या ह्या मनुष्यदेहाचा त्याग करून, जिच्या योगानें ब्रह्मलोकामध्यें विहार करितां येतो, अशी दैवी संपत्ति आपल्या पित्याला प्राप्त झाली आहे. तेव्हां अशा प्रकारें तुझ्यासारख्या अथवा माझ्यासारख्या कोणीहि समंजस, आत्मविद्येचें अध्ययन केलेल्या आणि बुद्धिमान अशा पुरुषानें त्याच्याकरितां शोक करणें योग्य नाहीं. कशीहि अवस्था प्राप्त झाली, तरी विचारी व धीर पुरुषानें हे नानाप्रकारचे शोक, विलाप आणि रोदन ह्यांपासून दूर राहिलें पाहिजे. सारांश, तूं स्वस्थ हो, शोक करूं नको, आणि येथून जाऊन त्या अयोध्या नगरीमध्यें रहा. कारण सत्याच्या अधीन असलेल्या पित्यानें तुला त्याप्रमाणें आज्ञा केली आहे. त्याच पुण्यकर्मी पित्यानें जिकडे माझी योजना केली आहे, त्याच कृत्यामध्यें प्रवृत्त होऊन मी आपल्या सज्जन पित्याची आज्ञा शेवटास नेईन. हे शत्रुदमना, त्याची आज्ञा मी झुगारून देणें न्याय्य नाहीं, आणि तो तुलाहि सर्वदा मान्यच आहे. कारण तोच आपला बंधु व पिता आहे. सारांश, भरता, धर्मनिष्ठांना संमत अशी त्या पित्याचीच आज्ञा वनवासरूप कर्माच्या योगानें मी परिपालन करीन हे पुरुषश्रेष्ठा, परलोकप्राप्तीची इच्छा करणाऱ्या पुरुषानें धार्मिक, सज्जन व सद्वर्तनी असलें पाहिजे. भरता, तूं सुस्वभावी आहेस. तेव्हां आपल्या पित्याला मरण चांगलें आलें आहे; (त्याला उत्तम गति प्राप्त झाली आहे) हें लक्ष्यांत आणून आपल्या हिताचा विचार कर."

ह्याप्रमाणें पित्याची आज्ञा परिपालन करण्याकरितां कनिष्ठ भ्रात्याशीं एक मुहूर्तभर अर्थपरिपूर्ण भाषण करून तो महात्मा समर्थ राम स्वस्थ बसला.

सर्ग एकशेंसहावा.

राज्य स्वीकारण्याविषयीं रामाला भरताचा आग्रह.

ह्याप्रमाणें अर्थपरिपूर्ण भाषण करून राम स्वस्थ बसला असतां प्रकृतिवत्सल रामाला अनुलक्षून धर्मनिष्ठ भरत धर्माला अनुसरून असलेलें विस्मयजनक भाषण करूं लागला.

भरत म्हणाला:—"हे शत्रुदमना, तुझ्यासारखा ह्या जगतामध्यें कोण बरें असेल ? धर्मविषयामध्यें वृद्धांना तूं संमत असतांनाहि लोकमर्यादेला अनुसरून त्यांना तूं संशयास्पद धर्म विचारीत असतोस. तेव्हां ह्याप्रमाणें तूं सर्वज्ञ असून तुझे मनोरथ परिपूर्ण झालेले असल्यामुळें दुःखदायक गोष्ट घडली असतां तुला दुःख होत नाहीं अथवा हर्षहि होत नाहीं. आनंदकारक प्रकार घडला असतां तुला देहाच्या जीवनावस्थेंत जीव हा सारखाच असून बरा अथवा वाईट कसाहि प्रसंग प्राप्त झाला तरी त्यांत भेद होत नाहीं. अशी बुद्धि ज्याची होईल त्याला कोणत्या बरें कारणांनीं दुःख होणार आहे ? हे प्रजाधिपते, तुझ्याप्रमाणें जो संसाररहित आत्मतत्त्व जाणणारा असेल, त्याला अशा प्रकारचें संकट प्राप्त झालें असतां खेद होणार नाहीं. राघवा, तूं महात्मा, सत्यप्रतिज्ञ, सर्वज्ञ, सर्वांकडे दृष्टि देणारा, बुद्धिमान आणि देवाप्रमाणें सत्त्वगुणी आहेस. तेव्हां ह्या गुणांनीं युक्त आणि उत्पत्तिविनाश जाणणाऱ्या तुला अत्यंत दुःसह दुःखहि घाबरवून टाकण्यास समर्थ होणार नाहीं. मी परदेशामध्यें गेलों असतांना माझ्याकरितां क्षुद्र मातेनें जें पातक केलें, तें मला संमत नाहीं. ह्यास्तव आपण माझ्यावर कृपा करा, आणि राज्याचा स्वीकार करा. मी धर्मरूप बंधनानें बद्ध झालों आहें. आणि म्हणूनच दंडाला योग्य अशा ह्या पापकर्म करणाऱ्या मातेचा तीक्ष्ण दंडानें मी ह्या ठिकाणीं वध करीत नाहीं. कारण महाकुलीन आणि सत्कर्मी अशा दशरथापासून उत्पन्न झालेला असून धर्म व अधर्म जाणणारा मी निंद्य कर्म कसें करूं ! पिता दशरथ राजा वृद्ध व मोठमोठे क्रतू केलेला आणि गुरु असून आतां मरण पावला आहे. म्हणून मी त्याला देव असें मानून सभेमध्यें दोष देत नाहीं. हे धर्मवेत्त्या रामा, कोणता धर्मवेत्ता पुरुष स्त्रीचें प्रिय करण्याकरितां अशा प्रकारचें धर्मार्थशून्य पापकर्म करील ? अंतकाळीं प्राण्यांना मोह होतो, ही सनातन श्रुति आम्ही ऐकत होतों; परंतु ती श्रुति असा प्रकार करणाऱ्या राजानें जगतामध्यें लोकांच्या प्रत्यक्ष पुराव्याला आणून दिली. क्रोधामुळें, मोहामुळें आणि साहसामुळें पित्याच्या हातून जें होऊन गेलें, तें चांगला युक्तायुक्त विचार करून आपण सुधारावें. पित्याच्या हातून कांहीं अतिक्रम झाला असतां जो पुत्र सुधारून घेतो, तोच अपत्य म्हणून लोकांना संमत असतो. ह्याविरुद्ध असलेला पुत्र लोकांना संमत होत नाहीं. कारण पतनाला हेतुभूत अशी गोष्ट पित्याच्या हातून घडली असतां, जो ती आपल्या आचरणानें सुधारीत नाहीं, त्याला अपत्य ही अन्वर्थक संज्ञा लागतच नाहीं. तस्मात्

आपण अपत्य व्हां. पित्याच्या दुष्कृत्याला आपण संमति देऊं नका. कारण धर्माचें अतिक्रमण करून जें कर्म दशरथानें केलें आहे, तें जगांतील विद्वान लोकांनीं निंद्य मानिलें आहे. कैकेयी, मी, पिता, सुहृद, आमचे बांधव आणि अयोध्या नगरींतील व देशांतील सर्व लोक ह्यांना तारण्याकरितां आपण माझें हें सर्व मागणें मान्य करा. अरण्यवास कोणीकडे? क्षत्रधर्म कोणीकडे? जटा धारण करणें कोणीकडे व प्रजापालन कोणीकडे? सारांश, हे धर्मनिष्ठ, अशा प्रकारचे हें घोटाळ्याचें कृत्य आपण करूं नका. राज्याभिषेक करून घेणें हाच क्षत्रियांचा मुख्य धर्म आहे. हे महाबलवान, त्याच्याच योगानें प्रजेचें परिपालन होणें शक्य आहे. तेव्हां प्रत्यक्ष सुखसाधन असलेल्या प्रजापालनरूप धर्माचा त्याग करून संशयित, सुखलक्षणरहित, अनावश्यक, आणि उत्तर वयालाच योग्य अशा धर्माचें आचरण कोणता बरें क्षत्रिय करणार आहे? आतां कष्टसाध्य धर्माचेंच आचरण करण्याची जर तुझी इच्छा असेल, तर धर्मानें चार वर्णांचें परिपालन करितांना तुला क्लेश होतील. धर्मवेत्ते लोक चारी आश्रमांमध्यें गृहस्थाश्रम श्रेष्ठ म्हणतात. तस्मात् हे धर्मज्ञा, तूं त्या आश्रमाचा त्याग करण्याचें कसें मनामध्यें आणीत आहेस? विद्येनें, नात्यानें आणि वयानेंहि मी आपल्यापेक्षां लहान आहें. तेव्हां आपण असतांना मी पृथ्वीचें पालन कसें करूं? बुद्धीनें हीन आणि नात्यानेंहि हीन असलेल्या मला आपणांवांचून जिवंत राहणेंहि शक्य नाहीं, मग राज्य चालविण्याची गोष्ट कशाला पाहिजे? तेव्हां परंपरेनें चालत आलेलें हें संपूर्ण, श्रेष्ठ व निष्कंटक राज्य बांधवांसहवर्तमान स्वधर्मानें आपण धर्मज्ञ परिपालन करा. रामा, सर्व अमात्य आणि मंत्रांमध्यें प्रवीण असलेले वसिष्ठांसहवर्तमान ऋत्विज हे एकत्र जुळून येथेंच तुला राज्याभिषेक करोत; आणि मग मरुद्गणांसहवर्तमान ज्याप्रमाणें इंद्र जातो, त्याप्रमाणें आपल्या सामर्थ्यानें शत्रुपक्षीय लोकांना जिंकून तूं प्रजेचें परिपालन करण्याकरितां आमच्या बरोबर अयोध्येमध्यें चल. तिन्ही ऋणांची फेड करीत करीत, दुष्टांचा नाश करीत करीत आणि सुहृदांना इष्ट वस्तु देऊन तृप्त करीत करीत तूंच या अयोध्येमध्यें राहून मला आज्ञा करीत जा. हे आर्य, आज तुला राज्याभिषेक होऊन तुझे सुहृद आनंदित होवोत, आणि तुला दुःख देणारे भयभीत होऊन रानोमाळ पळत सुटोत. हे पुरुषश्रेष्ठा, माझ्या मातेचें निंद्य कर्म नाहींसें करून तूं आज त्या पूज्य पित्याचें नरकापासून रक्षण कर. मी चरणीं मस्तक ठेवून तुझी प्रार्थना करीत आहें. ह्यास्तव भूतांवर कृपा करणाऱ्या महेश्वरा-

प्रमाणें तूं माझ्यावर आणि सर्व बांधवांवर कृपा कर. अथवा माझ्या प्रार्थनेकडे दुर्लक्ष्य करून आपण जर इतउत्तर वनामध्येंच जाणार असाल, तर मीहि आपणांबरोबर वनामध्यें येईन."

ह्याप्रमाणें खेद करीत करीत चरणीं मस्तक ठेवून भरत पृथ्वीपति रामाची प्रार्थना करूं लागला असतांहि, पित्याच्या आज्ञेला धरून राहिलेल्या सत्त्वशील रामानें अयोध्येला जाण्याचें मनांत आणिलें नाहीं. तेव्हां रामाचे ठिकाणीं तें अद्भुत स्थैर्य अवलोकन करून पूर्वी तेथें आलेल्या दुःखी लोकांना दुःखांबरोबर हर्षहि झाला—राम अयोध्येला येत नाहीं म्हणून त्यांना दुःख झालें, आणि त्याची दृढ प्रतिज्ञा अवलोकन करून त्यांना हर्ष झाला—असो. ऋत्विज, नागरिक लोकांच्या समुदायांतील मुख्य, आणि भान नाहींसें होऊन अश्रूंनीं नेत्र भरून आलेल्या माता ह्या सर्वांनीं तशा प्रकारें बोलत असलेल्या त्या भरताची प्रशंसा केली, आणि एकत्र जुळून त्या ऋत्विजप्रभृतींनीं अयोध्येला यण्याविषयीं रामाची प्रणामपूर्वक विनवणी केली.

सर्ग एकशेंसातवा.

भरताला श्रीरामाचें नकारात्मक उत्तर.

अशा प्रकारें पुनरपि भाषण करणाऱ्या त्या भरताला ज्ञातीमध्यें अत्यंत मान्य असलेला वैभवशाली राम म्हणाला, "ह्याप्रमाणें तूं भाषण केलेंस, हें तुला योग्यच आहे. कारण नृपश्रेष्ठ दशरथपासून कैकेयीच्या ठिकाणीं तूं झाला आहेस. भरता, पूर्वी आपल्या पित्यानें जेव्हां तुझ्या मातेचें पाणिग्रहण केलें, तेव्हां 'हिचे ठिकाणीं जो पुत्र होईल त्याला मी राज्य देईन' अशी आपल्या पित्यानें तुझ्या आजापाशीं प्रतिज्ञा केलेली आहे. सारांश, कन्येबद्दल राज्यरूप उत्कृष्ठ द्रव्य तुला देण्याची तुझ्या आजापाशीं प्रतिज्ञा करून आपल्या पित्यानें तुझ्या मातेचें पाणिग्रहण केलें होतें. शिवाय देवदैत्यांच्या संग्रामामध्यें तुझ्या मातेनें पृथ्वीपति राजाची सेवा केली असतां, त्या प्रभूनें संतुष्ट होऊन तुझ्या मातेला दोन वर देऊं केले होते. तेव्हां दोन वर देण्याची प्रतिज्ञा त्या वेळीं त्याच्याकडून करवून घेऊन स्त्रियांमध्यें श्रेष्ठ असलेल्या तुझ्या यशस्विनी मातेनें तुला राज्य आणि मला वनवास असे दोन वर त्या पुरुषश्रेष्ठ दशरथ राजापाशीं मागून घेतले; आणि वचनबद्ध झालेल्या त्या राजानें तिला ते देऊन वरप्रदान-

निमित्तक चौदा वर्षे वनामध्यें वास्तव्य करण्याविषयीं मला आज्ञा केली. तेव्हां सत्यप्रतिज्ञ धर्मात्म्या पित्याचें सत्यवचन परिपालन करण्याविषयीं स्थित व स्पर्धारहित असलेला मी, सीता आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान ह्या निर्जन वनामध्यें प्राप्त झालों. तुलाहि पित्याची राज्य करण्याविषयीं तशी आज्ञाच झालेली आहे. तेव्हां हे राजेंद्रा, स्वतः सत्वर राज्याभिषेक करून घेऊन तूं आपल्या पित्याला सत्यवचनी कर. भरता, माझ्याकरितां प्रभु राजाला तूं ऋणांतून मुक्त कर, आणि पित्याला तारून मातेचें अभिनंदन कर. बा भरता, गया प्रदेशांमध्यें यशस्वी व विचारी गयराजा याग करीत असतांना पितरांना उद्देशून त्यानें एक श्रुति अर्थरूपानें उच्चारिलेली ऐकण्यांत आहे. "पुन्नामक नरकापासून सुत ज्या अर्थी पित्याचें रक्षण करितो, त्या अर्थी त्याला पुत्र असें म्हणतात. कारण पितरांकरितां यज्ञयाग वगैरे करून तो पितरांचें सर्वस्वी रक्षण करितो. गुणी आणि बहुश्रुत असे पुष्कळ पुत्र प्राप्त होण्याची इच्छा धरावी, म्हणजे त्या सर्वांपैकीं एखादा तरी गयेला जाईल."

श्रीराम म्हणतातः—"भरता, ह्याप्रमाणें सर्व राजर्षी विश्वास धरून चाललेले आहेत. तस्मात् हे प्रभो, तूं नरकापासून पित्याचें रक्षण कर. हे वीरा, सर्व द्विजांबरोबर शत्रुघ्नाला घेऊन तूं अयोध्येला जा, आणि प्रजाजनांचें चित्तरंजन कर. सीता आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान मी आता विलंब न करितां दंडकारण्यामध्यें प्रवेश करितों. भरता, तूं स्वतः मनुष्यांचा राजा हो, आणि मीहि वनांतील पशूंचा राजाधिराज होईन. तूं आज आनंदित होऊन श्रेष्ठ नगरामध्यें जा, आणि मीहि आनंदित होऊन दंडकारण्यामध्यें प्रवेश करितों. सूर्यकिरणें निवारण करणारें छत्र तुझ्या मस्तकावर शीतल छाया करो, आणि मी देखील त्या छायेलाहि मागे टाकणाऱ्या ह्या वनवृक्षांच्या छायेचा हळू हळू आश्रय करितो. महामति शत्रुघ्न तुझा मित्र आहे, आणि सुमित्रापुत्र लक्ष्मण माझा मुख्य मित्र विदितच आहे. भरता, आपण चौघे पुत्र राजाला सत्यप्रतिज्ञ करूं. तूं खेद करूं नको."

सर्ग एकशेंआठवा.

जाबालीचें भाषण.

याप्रमाणें भरताचें सांत्वन करीत असलेल्या धर्मज्ञ रामाशीं द्विजश्रेष्ठ जाबालि धर्मविरुद्ध भाषण करूं लागला. तो म्हणाला, “हे राघवा, आर्यमति आणि तपस्वी अशा तुझी प्राकृत जनांप्रमाणें अशी निरर्थक बुद्धि होणें योग्य नाहीं. बा रामा, कोण कोणाचा बंधु आहे? आणि एकाचा दुसऱ्याशीं संबंध होऊन कोणाला काय प्राप्त होणार आहे? अरे, प्राणी हा एकटाच जन्मास येतो आणि एकटाच नाश पावतो. तस्मात् रामा, ही माता आणि हा पिता, अशा समजुतीनें जो पुरुष आसक्त होऊन राहतो, त्याला उन्मत्ताप्रमाणें जाणावें. कारण कोणी कोणाचा नाहीं. परगांवीं जाण्यास निघालेला पुरुष कोठें तरी बाहेर राहतो, आणि तें निवासस्थान सोडून दुसऱ्या दिवशीं पुढें चालता होतो. त्याचप्रमाणें रामा, पिता, माता, घर व द्रव्य हीं मनुष्यांना प्रवासी लोकांच्या निवासस्थानासारखीं आहेत, आणि म्हणूनच ह्यांचे ठिकाणीं सज्जन आसक्ति ठेवीत नाहींत. तस्मात् हे पुरुषोत्तमा, परंपरागत राज्याचा त्याग करून दुःखदायक, गहन आणि असंख्य कंटकांनीं भरलेला वनमार्ग स्वीकारणें तुला योग्य नाही. समृद्ध अयोध्येमध्यें तूं स्वतःला राज्याभिषेक करून घे. विरहचिन्हांनीं युक्त असलेली ती अयोध्या नगरी तुझी वाट पाहत आहे. तस्मात् हे राजपुत्रा, स्वर्गामध्यें विहार करणाऱ्या इंद्राप्रमाणें मोठमोठ्या राजभोगांचा अनुभव घेत घेत तूं अयोध्येमध्यें क्रीडा कर. दशरथ तुझा कोणी नव्हे व तूंहि त्याचा कोणी नव्हेस. राजा वेगळा, तूं वेगळा. तस्मात् मी सांगतों, तें कर. पिता हें प्राण्याचें केवळ निमित्त कारण आहे. ऋतुमती मातेनें गर्भामध्यें धारण केलेलें, आणि एकमेकांत मिश्र झालेलें शुक्र व शोणित हेंच इहलोकीं पुरुषाच्या जन्माचें साधन होय. राजाला जिकडे जावयाचें होतें, तिकडे तो गेला. आणि अशा रीतीनें जाण्याविषयीं प्राण्याची प्रवृत्तिच आहे. परंतु तूं मात्र विनाकारण राज्यरूप पुरुषार्थाला मुकत आहेस. प्रत्यक्ष अर्थ प्राप्त झाला असतां त्याचा त्याग करून ज्यांनीं ज्यांनीं धर्माचें अवलंबन केलेलें आहे, त्या त्या पुरुषांबद्दल मला वाईट वाटतें, इतरांबद्दल वाटत नाहीं. कारण अर्थाचा त्याग करून धर्माच्या मागें लागलेले ते लोक इहलोकीं दुःख भोगून शेवटींहि नाशच पावले आहेत. अष्टकाप्रभृति श्राद्धें करण्याकडे ह्या लोकांची

प्रवृत्ति झालेली आहे. परंतु हे लोक अशा रीतीनें अन्नाचा केवळ नाश करीत आहेत, हें तूं पहा. कारण मेल्यानंतर कोणाला काय खातां येईल? इहलोकीं एकानें केलेलें भोजन जर दुसऱ्याच्या देहामध्यें जात असेल, तर प्रवासाला निघालेल्या लोकांकरितां घरीं श्राद्ध करून लोकांना जेवावयास घालावें म्हणजे झालें. प्रवाशांबरोबर शिधा वगैरे देण्याचें कारणच नाहीं. व्यापार वगैरे करून उपजीविका करण्यांत कांहीं कष्ट करावे लागतात, असें समजून गरिबांना फसविण्याकरितां लुच्चा बुद्धिमान लोकांनीं दानाकडे लोकांची प्रवृत्ति करणारे असे हे 'यज्ञयाग करा, दान द्या, दीक्षा घ्या, तपश्चर्या करा, द्रव्यत्याग करा' वगैरे अनेक प्रकारच्या विधींनीं भरलेले ग्रंथ करून ठेविले आहेत. तेव्हां हे महामते, परलोकसाधन असे धर्म म्हणून कांहींहि नाहीं, हें तूं मनामध्यें आण. जें जें प्रत्यक्ष असेल, तें तें करीत जा. आणि परोक्ष असेल तिकडे दुर्लक्ष करीत जा. सारांश, सर्व लोकसंमत अशा प्रत्यक्षप्रमाणवादी सज्जनांच्या विचारालाच मान देऊन भरतानें प्रार्थना केल्याप्रमाणें तूं राज्याचा स्वीकार कर."

सर्ग एकशेंनववा.

राममुखें जाबालीच्या भाषणाचें खंडण.

(सत्यवर्णन.)

जाबालीचें भाषण श्रवण केल्यानंतर जाबालीनें प्रतिपादन केलेल्या अर्थाचें ग्रहण न करणाऱ्या बुद्धीनें युक्त असलेला अमोघ पराक्रमी राम श्रुतीचें अवलंबन करून म्हणाला, "प्रीतीला हेतुभूत असलेला विषयोपभोग मला प्राप्त व्हावा, एतदर्थ आपण जें येथें भाषण केलें, तें जरी योग्य भासणारें आहे, तरी वस्तुतः अयोग्य आहे; आणि दिसण्यांत जरी तें सुखकारक आहे, तरी त्याच परिणाम दुःखकारक होणार आहे. कारण शास्त्रविरुद्ध आचरण प्रतिपादन करणाऱ्या चार्वाकादिकांच्या ग्रंथांवर विश्वास ठेवून जो निर्मर्याद पुरुष पापाचरण करूं लागतो, त्याला सज्जनांमध्यें मान मिळत नाहीं. पुरुष चांगल्या कुलांतला आहे किंवा वाईट कुलांतला आहे, वीर आहे किंवा अधीर आहे आणि शुचि आहे किंवा अशुचि आहे, हें सर्व त्याच्या वर्तनावरून समजून येतें. तुमचें म्हणणें मान्य करणारा पुरुष वस्तुतः दुष्ट असून सज्जनासारखा भासत असतो, अशुचि असूनहि शुचिर्भूत दिसत असतो, लक्षणरहित असूनहि लोकांना लक्षणसंपन्न वाटतो,

आणि दु:शील असूनहि सुशीलाप्रमाणें भासमान होतो. तस्मात् धर्माच्या मिषानें मी जर लोकसंकर करणाऱ्या अधर्माचें अवलंबन करीन, आणि शुभ कर्मांचा त्याग करून विधिविरुद्ध कर्म जर मी करूं लागेन, तर सदसद्विचार करणारा कोण बरें शुद्धीवर असलेला पुरुष मज दुराचारी लोकदूषकाला बहुमान देईल ? ज्यामध्यें सत्यपालनरूप प्रतिज्ञेचा भंग होणार, अशा ह्या तुम्हीं सांगितलेल्या वृत्तानें मी वागूं लागलों असतां कोणत्या साधनानें मी स्वर्गाला जाईन ? आणि मी कोणाच्या वर्तनाचें अनुकरण करीन ? सारांश, तुम्हीं सांगितल्याप्रमाणें वागूं लागलों म्हणजे स्वर्गप्राप्तीचें साधनच राहणार नाहीं, आणि असें वर्तन कोणा सन्मार्गवर्ती पुरुषानें कधीं केलेलेंहि नाहीं. शिवाय तुमच्या सांगण्याप्रमाणें वागूं लागलों असतां मी स्वेच्छाचारी होईन, आणि मला पाहून हें संपूर्ण जगत् स्वेच्छाचारी होईल. कारण जसें राजांचें आचरण असतें तसेंच त्यांच्या प्रजाजनांचें आचरण होतें. सत्यवचन आणि भूतदया हाच राजांचा सनातन आचार होय; आणि ज्या अर्थीं राजवृत्त सत्यरूप आहे, त्या अर्थीं त्या राजांचें राज्यहि सत्यावरच अवलंबून आहे. इतकेंच नव्हे, परंतु सर्व जगत्‌हि सत्याच्या आधारावरच चाललेलें आहे. ऋषी आणि देव ह्यांनीं सत्यालाच मान दिला असून सत्यवादी पुरुषालाच इहलोकीं अक्षय्य आणि श्रेष्ठ अशा ब्रह्मलोकाची प्राप्ति होते. सूर्यापासून ज्याप्रमाणें लोक उद्विग्न होतात, त्याप्रमाणें असत्यवादी लोकांपासून होतात. सत्य ज्यामध्यें प्रधान आहे, तोच धर्म सर्वांचें मूळ होय. जगतामध्यें ईश्वर सत्य ह्याच संज्ञेनें प्रसिद्ध आहे. धर्म नेहमीं सत्याचेंच अवलंबन करून राहिलेला आहे. सर्व गोष्टी सत्यमूलकच आहेत, आणि सत्यापेक्षां कोणतेंहि स्थान श्रेष्ठ नाहीं. दिलेलें दान, केलेलें हवन आणि आचरिलेलीं तपें हीं सर्व सत्याच्याच आधारावर झालेलीं असून, वेद हे सत्याच्याच आधारावर आहेत. तस्मात् पुरुषानें सत्यनिष्ठ असावें. एक राज्याचें परिपालन करीत असतो, एक कुलाचें रक्षण करीत असतो, एक दु:खाचा अनुभव घेत असतो आणि एक सुखाचा उपभोग घेत असतो. तेव्हां ज्या अर्थीं माझ्या सत्यप्रतिज्ञ व सदाचारी पित्यानें सत्यपरिपालन करण्याकरितां माझ्याशीं सत्य भाषण केलें, त्या अर्थीं पित्याची आज्ञा मीं कां म्हणून पाळूं नये ? पित्यासमक्ष सत्यपरिपालन करण्याची प्रतिज्ञा केली असतांना मी लोभानें, विस्मरणानें अथवा अज्ञानानें मोहित होऊन सत्याच्या मर्यादेचें अतिक्रमण करणार नाहीं. असत्यवचनी आणि चंचल म्हणजे असत्यबुद्धि असलेल्या पुरुषानें

दिलेलें हव्य व कव्य देव आणि पितर घेत नाहींत, असें आम्हीं ऐकिलें आहे. जीवांना उद्देशून प्रवृत्त झालेला हा सत्यपालनरूप धर्म सर्व धर्मांमध्यें मी मुख्य समजत आहें. ह्या सत्यपालनरूप भाराचा स्वीकार सत्पुरुषांनीं केला असल्यामुळें मीहि त्याचा आदर करीत आहें. क्षुद्र, दुष्ट, लुब्ध आणि पापकर्मी पुरुषांनीं सेविलेला हा वस्तुतः अधर्म असून, धर्मासारखा भासणारा पित्राज्ञाभंगपूर्वक राज्योपभोगरूप क्षत्रधर्म मी टाकून देतों. मनामध्यें प्रथम विचार करून आणि जिव्हेनें उच्चार करून नंतर पुरुष शरिरानें पातक करीत असतो. तेव्हां क्रियारूप पाप त्रिविध पातकांचें उत्पादक आहे. भूमि, कीर्ति, यश व लक्ष्मी सत्यनिष्ठ पुरुषांची अपेक्षा करीत असतात, व शिष्ट लोकहि सत्यालाच अनुसरून वागत असतात. तस्मात् पुरुषानें सत्याचेंच अवलंबन करावें. 'राज्यच कर' म्हणून जें आपण केवळ तर्कमूलक वाक्यांनीं विचारपूर्वक माझ्याशीं उत्तम भासणारें भाषण केलें, तें अन्याय्य आहे. पित्याशीं मीं ह्या वनवासाची प्रतिज्ञा केली असून त्या पित्याच्या वचनाची पर्वा न करितां भरताच्या सांगण्याप्रमाणें मी कसा वागूं ? पित्यासन्निध मीं केलेली प्रतिज्ञा निश्चयपूर्वक केलेली आहे. देवी कैकेयीच्याहि मनाला त्या वेळीं आनंद झालेला आहे. तस्मात् पवित्र मुळें, पुष्पें आणि फळें ह्यांनीं देवपितरांचें संतर्पण करीत करीत मी नियमित आहार करून व शुचि राहून वनामध्येंच वास्तव्य करीन. इंद्रियें संतुष्ट ठेवून व सदसद्विचार करून निष्कपटपणानें श्रद्धापूर्वक मी स्वतःच्या आचरणानें पित्याचें वचन पाळण्याची प्रवृत्ति सुरू ठेवीन. ह्या कर्मभूमीमध्यें आल्यावर जें शुभ कर्म असेल, तेंच करावें. अग्नि, वायु आणि चंद्र हे शुभ कर्माच्याच योगानें आपापल्या योग्यतेला आले आहेत. इंद्र शंभर क्रतु करून स्वर्गाला गेला, आणि महर्षींनाहि उग्र तपश्चर्या करून स्वर्गप्राप्ति झाली."

नास्तिक भाषण करणाऱ्या जाबालीचें भाषण श्रवण केल्यावर तें सहन न झाल्यामुळें तो उग्र तेजानें युक्त असलेला राजकुमार राम त्याच्या भाषणाचें खंडन करीत करीत त्याला म्हणाला, " सत्य, धर्म, पराक्रम, भूतदया, प्रियवादित्व, आणि द्विज, देव व अतिथि ह्यांचें पूजन ह्यांना ज्या अर्थीं संतांनीं स्वर्गमार्ग म्हटलें आहे आणि ज्या अर्थीं त्या संतांच्या वचनावरूनच ह्याप्रमाणें मुख्य फलप्रद धर्म कोणता, तो यथायोग्य रीतीनें जाणून व त्याचा निर्णय करून लक्ष्यपूर्वक त्या धर्माचें यथाविधि पूर्णपणें आचरण करणारे विप्र उत्तम लोक प्राप्त होण्याची इच्छा करितात, त्या अर्थीं अत्यंत नास्तिक, धर्ममार्गविरुद्धदेव,

विरुद्ध बुद्धीनें युक्त आणि अशा प्रकारचें मत स्वीकारून लोकनाशाकरितां पृथ्वीवर हिंडणाऱ्या आपणांला याजक म्हणून माझ्या पित्यानें स्वीकारिलें, हें मी त्या आपल्या पित्याचें कर्म निंद्य समजत आहे. ज्याप्रमाणें चोर, त्याचप्रमाणें बौद्धमतानुयायी समजावा; आणि तथागत संज्ञक नास्तिक ह्याहि तसाच समजावा. तस्मात् लोकांमध्यें जी कांहीं अतिशय मोठी शिक्षा शक्य असेल, ती नास्तिकांना द्यावी, आणि शिक्षा देण्याचा अधिकार नसेल, तर समंजस पुरुषानें नास्तिकापासून पराङ्मुख व्हावें. आपणापेक्षां श्रेष्ठ असलेल्या लोकांनीं आणि द्विजांनीं ऐहिक व पारलौकिक फलाची अपेक्षा न धरितां, हा वेदोक्त धर्म आहे असें समजूनच पुष्कळ शुभ कर्में केलीं आहेत. तस्मात् वेद प्रमाण मानूनच जे द्विज अहिंसा, सत्य वगैरे, तप, दान, परोपकार वगैरे आणि यज्ञ वगैरे करीत असतात, आणि त्याचप्रमाणें धर्मनिष्ठ, दानरूप गुणाचें मुख्यत: अवलंबन करणारे, हिंसाशून्य, निर्मळ आणि सत्पुरुषाशीं समागम करणारे असे असतात, तेच श्रेष्ठ व तेजस्वी मुनी लोकांमध्यें मान्य होतात. तुम्हांसारखे मान्य होत नाहींत."

ह्याप्रमाणें तो महात्मा उदार राम जाबालीला उद्देशून निंदायुक्त भाषण करूं लागला असतां, तो विप्र जाबालि पुनरपि उत्कृष्ठ अर्थानें युक्त, आस्तिक आणि सत्य असें भाषण त्याच्याशीं करूं लागला. तो म्हणाला, "मी नास्तिकाची भाषा बोलणारा नाहीं, मीहि नास्तिक नाहीं आणि परलोक वगैरे कांहीं नाहीं असें माझें मतहि नाहीं. प्रसंग पाहून मी पुन: आस्तिक झालों आहें आणि प्रसंग आल्यास फिरूनहि नास्तिक होईल. तशी ही वेळ आली होती म्हणून मीं तुला वनवासांतून परत फिरविण्याकरितां नास्तिकाचें भाषण केलें, आणि आतां तुला प्रसन्न करून घेण्याकरितां मीं हें असें भाषण केलें."

सर्ग एकशेंदहावा.

वसिष्ठांचें भाषण.

(रघुवंशांतील पुरुष)

राम क्रुद्ध झालेला पाहून वसिष्ठ त्याला म्हणाले, "हे लोक परलोकीं जाऊन पुनरपि येथें येत असतात, हें जाबालिहि जाणीत आहे; परंतु वनांतून तुला परत फिरविण्याच्या उद्देशानें त्यानें असें भाषण केलें. आतां हे लोकनाथा, ही

जगदुत्पत्ति तूं माझ्यापासून श्रवण कर. पूर्वी नुसतें उदकच होतें, आणि त्या उदकामध्यें जलस्वरूप भगवानानें पृथ्वी निर्माण केली. तदनंतर ब्रह्मदेव इतर देवांसहवर्तमान उत्पन्न झाला. नंतर विराट्स्वरूप ब्रह्मदेवाच्या विष्णुरूप अंशानें वराहरूप धारण करून पृथ्वीचा उद्धार केला. त्याच विराट्पुरुषाच्या रजोगुणप्रधान अंशानें दक्षप्रभृति जितेंद्रिय पुत्रांसहवर्तमान सर्व जगत् उत्पन्न केलें. मायोपाधिक ईश्वरापासून शाश्वत, नित्य आणि अव्यय असा ब्रह्मदेव उत्पन्न झाला. त्या ब्रह्मदेवापासून मरीचि उत्पन्न झाला. मरीचीपासून कश्यप हा पुत्र उत्पन्न झाला. कश्यपापासून विवस्वान् झाला. स्वतः मनु हाच विवस्वानाचा पुत्र असून तोच पूर्वीचा प्रजापति होय. इक्ष्वाकु हा मनूचा पुत्र होय. ज्याला मनूनें पूर्वी ही समृद्ध पृथ्वी दिली, तो इक्ष्वाकु अयोध्येंतील पहिला राजा, असें तू समज. इक्ष्वाकूला कुक्षि म्हणून प्रसिद्ध असलेला एक श्रीमान पुत्र होता, आणि कुक्षीपासून विकुक्षि म्हणून पुत्र उत्पन्न झाला. प्रतापी व महातेजस्वी बाण हा विकुक्षीचा पुत्र होय; आणि महापराक्रमी व महातपस्वी अनरण्य हा बाणाचा पुत्र होय. हा सज्जनश्रेष्ठ महाराज अनरण्य राज्य करीत असतांना अनावृष्टि, दुर्भिक्ष आणि तस्कर ह्यांचा अभाव होता. हे महाराजा, अनरण्यापासून पृथु राजा झाला. त्या पृथूपासून महातेजस्वी त्रिशंकु उत्पन्न झाला. तो वीर त्रिशंकु स्वतःच्या सत्यवचनामुळें आणि विश्वामित्र मुनींच्या सत्यप्रतिज्ञेमुळें शरिरासहवर्तमान स्वर्गाला गेला. महायशस्वी धुंधुमार हा त्रिशंकूला पुत्र झाला. धुंधुमारापासून महातेजस्वी युवनाश्व उत्पन्न झाला. आणि वैभवशाली मांधाता हा युवनाश्वपुत्र झाला. मांधात्यापासून महातेजस्वी सुसंधि उत्पन्न झाला, आणि सुसंधीपासून ध्रुवसंधि व प्रसेनजित् असे दोन पुत्र उत्पन्न झाले. शत्रुनाशक यशस्वी भरत ध्रुवसंधीपासून झाला, आणि महापराक्रमी भरतापासून असित नामक पुत्र झाला. त्या असिताला हैहय, तालजंघ, शूर आणि शशबिंदु असे प्रतिपक्षी राजे म्हणजे शत्रु उत्पन्न झाले. त्या सर्वांशीं संग्रामामध्यें युद्ध सुरू करून तो राजा पराजित झाला, व त्यांनीं त्याला हांकून दिल्यावर तो राजर्षि रम्य अशा उत्कृष्ट पर्वतावर जाऊन मरण पावला. त्या वेळीं त्याच्या दोन भार्या गर्भिणी होत्या, असें ऐकण्यांत आहे. त्यांपैकीं जिचे नेत्र कमलपत्रांप्रमाणें आहेत, अशा एका महाभाग्यवती स्त्रीनें उत्कृष्ट पुत्र प्राप्त होण्याचा उद्देश मनांत धरून, देवतुल्य तेजस्वी अशा भगवान भार्गव मुनींना वंदन केलें, आणि दुसरीनें गर्भाचा नाश करण्याकरितां त्या सवतीला विष

घातलें. च्यवनभार्गव नांवाचे एक ऋषि हिमालय पर्वताचा आश्रय करून राहिले होते. त्यांच्या समीप जाऊन त्या कालिंदी नामक स्त्रीनें त्यांना अभिवंदन केलें. तेव्हां पुत्रजन्माविषयीं वरप्राप्तीची इच्छा करणाऱ्या त्या कालिंदीला ते ऋषि म्हणाले, "हे राजभार्ये, तुला महात्मा, जगद्विख्यात्, धार्मिक, फारच भयंकर, वंश चालविणारा आणि शत्रुनाशक असा पुत्र होईल."

वसिष्ठ पुढें सांगतात:—"रामा, हे त्या मुनींचें भाषण श्रवण करून त्या कालिंदी स्त्रीनें त्या मुनींना प्रदक्षिणा केली व त्यांची अनुमति घेऊन तेथून निघाली. नंतर घरीं आल्यावर त्या राजपत्नीला एक पुत्र झाला. त्याचे नेत्र कमलपत्राप्रमाणें असून कमलाच्या गाभ्यासारखी त्याची प्रभा होती. गर्भाचा नाश करण्याकरितां सवतीनें तिला गर म्हणजे विष दिलें होतें. त्यामुळें तो पुत्र गरासहवर्तमान उत्पन्न झाला, म्हणून स-गर असें त्याचें नांव पडलें. त्या सगर नामक राजानें यज्ञदीक्षा घेतली असतां पर्वदिवशीं समुद्रस्थल खणून काढिलें. तेव्हां त्या खणण्याच्या वेगामुळें ह्या प्रजा त्रस्त झाल्या. सगराला असमंजस म्हणून एक पुत्र होता, असें आमच्या ऐकण्यांत आहे. तो दुष्कृत्यें करणारा असल्यामुळें, तो पराक्रमी असतांनाहि पित्यानें त्याला हांकून दिलें होतें. त्या असमंजालाहि अंशुमान म्हणून एक वीर्यवान पुत्र झाला. दिलीप हा अंशुमानाचा पुत्र होय, आणि भगीरथ दिलीपाचा पुत्र होय. भगीरथापासून ककुत्स्थ झाला. त्याच्यामुळें त्याच्या वंशजांना काकुत्स्थ ही संज्ञा प्राप्त झाली. त्या ककुत्स्थाला रघु पुत्र झाला, व त्याच्या योगानें त्याच्या पुढील वंशजांना राघव ही संज्ञा प्राप्त झाली. रघूला जो तेजस्वी पुत्र झाला, तो प्रवृद्ध, पुरुषादक, कल्माषपाद आणि सौदास ह्या चार नांवांनीं पृथ्वीवर प्रसिद्ध आहे. शंखण म्हणून एक कल्माषपादाचा पुत्र होता, असें आमच्या ऐकण्यांत आहे. तो शंखण त्या आपल्या पित्याच्या तावडींत सांपडून सैन्यासहवर्तमान नाश पावला. श्रीमान आणि शूर असा एक सुदर्शन म्हणून शंखणाचा पुत्र होता. त्या सुदर्शनाचा अग्निवर्ण पुत्र होता, आणि अग्निवर्णाचा शीघ्रग म्हणून पुत्र होता. शीघ्रगाला मरु, मरुला प्रशुश्रुव आणि प्रशुश्रुवाला महामति अंबरीष पुत्र झाला. अमोघ पराक्रमी नहुष अंबरीषाला पुत्र झाला, आणि नहुषाला नाभाग म्हणून अत्यंत धार्मिक पुत्र झाला. अज आणि सुव्रत हे उभयतां नाभागाचे पुत्र होत. धर्मात्मा दशरथ राजा हा अजाचा पुत्र होय, आणि त्या दशरथ राजाचा तूं राम म्हणून प्रसिद्ध पुत्र आहेस. तस्मात् हे भूपते, आपल्या राज्याचा स्वीकार कर, आणि जगताचें परिपालन कर. सर्व

इक्ष्वाकुवंशजांमध्यें ज्येष्ठ पुत्रच राजा होत आलेला आहे. ज्येष्ठ पुत्र विद्यमान असतांना कनिष्ठ पुत्राला राज्याभिषेक होत नाहीं, ज्येष्ठालाच होत असतो. तस्मात् हे महाकीर्तिमान रामा, आपल्या रघुवंशजांचा सनातन कुलधर्म आज नाहींसा न करितां रत्नांनीं व राष्ट्रांनीं संपन्न असलेल्या पृथ्वीचें तूं पालन कर."

सर्ग एकशेंअकरावा.

राज्य स्वीकाराविषयीं वादविवाद.

ह्याप्रमाणें रामाशीं भाषण केल्यानंतर ते राजगुरु वसिष्ठ पुनरपि धर्मयुक्त असें दुसरें भाषण त्याच्याशीं करूं लागले. ते म्हणाले:– "हे काकुत्स्था राघवा, तेथें उत्पन्न झालेल्या पुरुषाला गुरु, आचार्य, पिता आणि माता पूज्य आहेत. हे पुरुषश्रेष्ठा, पुरुषाला पिता जन्म देतो, परंतु वेदविषयक बुद्धि आचार्य देतो. म्हणून त्याला गुरु असें म्हणतात. सारांश, हे शत्रुतापना, मी तुझाच नव्हें, परंतु तुझ्या पित्याचाहि आचार्य आहें. तस्मात् तूं माझ्या सांगण्याप्रमाणें वागूं लागलास तर सज्जनांच्या मार्गाचें अतिक्रमण करीत आहेस, असें होणार नाहीं. हे तुझे संबंधी, जनसमुदाय, बांधव आणि मांडलिक राजे आहेत. ह्यांचे ठिकाणीं रक्षणरूप धर्मानें तूं वागूं लागलास तर सज्जनांच्या मार्गाचें तूं अतिक्रमण करीत आहेस, असें होणार नाहीं. वृद्ध आणि धर्मशील मातेचें अतिक्रमण करणें तर योग्यच नाहीं, आणि हिच्या म्हणण्याप्रमाणें तूं वागूं लागलास, तर सन्मार्गाचें उल्लंघन केल्यासारखें होणारहि नाहीं. हे अमोघ पराक्रमी सत्यधर्मनिष्ठ राघवा, प्रत्यक्ष भरतच जर राज्य करण्याविषयीं तुझी प्रार्थना करीत आहे, तर स्वतःचें वचन पालटल्याचा दोष तुझ्याकडे येणार नाहीं."

ह्याप्रमाणें स्वतः गुरूनीं मधुर शब्दांनीं त्या राघवाला सांगितलें असतां तो पुरुषश्रेष्ठ त्यांना म्हणाला, "मातापितर पुत्रावर जो उपकार नेहमीं करीत असतात, त्या मातापितरांनीं केलेल्या उपकाराचा प्रत्युपकार करितां येणें अगदीं अशक्य आहे. यथाशक्ति दान, निजविणें, अंगाला लाविणें, प्रिय भाषण करणें, खेळविणें इत्यादिकांच्या योगानें मातापितरांचे झालेले उपकार पुत्राच्या हातून फिटणें अशक्य आहे. त्या माझ्या पित्या दशरथ राजानें जी मला आज्ञा केली आहे, ती असत्य होणार नाहीं."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां भरत अत्यंत खिन्न होऊन जवळच असलेल्या सारथ्याला म्हणाला, " हे आर्य, ह्या ओट्यावर अगदीं दारासमीपच दर्भ पसर, म्हणजे रामाकरितां तो मजवर प्रसन्न होईपर्यंत मी येथें दारांतच पडून राहतों. कांहीं एक न खातां आणि दुसरीकडे न पाहतां एकादा द्रव्यहीन द्विज जसें आपलें द्रव्य उगविण्याकरितां कुळाच्या दारांत धरणें घेऊन बसतो, त्याचप्रमाणें माझ्या म्हणण्याचा अंगीकार करून राम माझ्याबरोबर अयोध्येला परत निघेपर्यंत ह्या पर्णशालेमध्यें मी पुढेंच पडून राहीन. "

ह्याप्रमाणें भरतानें सांगितलें असतांहि सुमंत्र रामाच्याच तोंडाकडे पहात आहे, असें अवलोकन करून खिन्न झालेला भरत भूमीवर स्वतःच दर्भासन पसरून बसला. तेव्हां राजर्षिश्रेष्ठ व महातेजस्वी राम त्याला म्हणाला, " बा भरता, मीं काय तुझा अपराध केला आहे, म्हणून तूं येथें धरणें घेऊन पडण्याचें मनांत आणिलें आहेस? धरणें घेऊन एकाच कुशीवर पडून राहून लोकांना अडथळा करण्याचा अधिकार ब्राह्मणांना आहे; परंतु क्षत्रियांना हा धरणें घेऊन बसण्याचा प्रकार शास्त्रसंमत नाहीं. ह्यास्तव हे पुरुषश्रेष्ठा, हें भयंकर व्रत सोडून देऊन येथून ऊठ, आणि सत्वर श्रेष्ठ अयोध्या नगरीमध्यें जा. " असें राम म्हणाला असतां भरत तेथेंच बसला, आणि अयोध्या नगरींतील व देशांतील सर्व लोकांकडे पाहून म्हणाला, ' अरे, आर्य रामाला तुम्ही कां कांहीं सांगत नाहीं? ' तेव्हां त्या अयोध्या नगरींतील व देशांतील लोक म्हणाले, " काकुत्स्थाला भरत चांगलें सांगत आहे, हें आम्ही समजून आहों. परंतु हा राम पित्याची आज्ञाच धरून बसला आहे, ह्यामुळें त्याचें मन सहज फिरविण्यास आम्ही समर्थ नाहीं. "

हें त्यांचें भाषण श्रवण करून राम भरताला म्हणाला, " धर्माकडे दृष्टि देणाऱ्या सुहृदांचें हें वचन ऐक, आणि तूं केलेलें व मीं केलेलें ह्या दोहोंकडेहि लक्ष्य देऊन चांगला विचार कर. सारांश, हे महापराक्रमी भरता, ऊठ, आणि हें भलतेंच कर्म केल्याचा दोष निरसन होण्याकरितां मला स्पर्श करून आचमन कर. "

ह्याप्रमाणें रामानें सांगितल्यानंतर भरत आचमन करून म्हणाला, " सभ्यांनीं व मंत्र्यांनीं माझें म्हणणें ऐकावें. मीं राज्याकरितां पित्याची प्रार्थना केली नाहीं, असा वर माग म्हणून मातेला सांगितलें नाहीं आणि ह्याप्रमाणें ह्या परमधर्मवेत्त्या रामालाहि मीं वनांत जाण्याची अनुज्ञा दिली नाहीं. तथापि

वनामध्यें वास्तव्य करून ह्या रामाला पित्याची आज्ञाच जर शेवटास नेणें असेल, तर मीच चौदा वर्षेंपर्यंत वनामध्यें वास्तव्य करीन. "

भरताच्या ह्या वचनानें धर्मात्मा राम विस्मित होऊन नगरांतील व देशांतील लोकांना म्हणाला, " माझा पिता जिवंत असतांना त्यानें जें कांहीं कोणाला विकलें असेल, त्यानें जी कांहीं कोणापाशीं ठेव ठेविली असेल अथवा जें कांहीं किंमत देऊन विकत घेतलें असेल, तें भरताला अथवा मला नाहींसें करितां येणार नाहीं. तेव्हां वनवासासंबंधानें गौण प्रतिनिधि मला करितां येणार नाहीं. कैकेयीनें सांगितलें तें योग्यच सांगितलें आहे, आणि पित्यानेंहि जें केलें तें माझें कल्याणच केलें आहे. भरत हा क्षमाशील आणि वडिलांचा सत्कार करणारा आहे, हें मी जाणीत आहें. इतकेंच नव्हे, परंतु महात्म्या सत्यवचनी भरताचे ठिकाणीं राज्य चालविण्याला आवश्यक असे सर्व कांहीं चांगले गुण आहेत, हें मला विदित आहे. मी वनांतून परत आलों म्हणजे ह्या धर्मशील भ्रात्यासहवर्तमान पृथ्वीचा मुख्य अधिपति होईन. सारांश, कैकेयीनें राजापाशीं वर मागितला आणि मीं तें वचन मान्य केलें. तेव्हां भरता, ह्या माझ्या सांगण्याप्रमाणें वागून तूं त्या भूपति पित्याला अनृतापासून मुक्त कर. "

सर्ग एकशेंबारावा.

भरताला पादुकांची प्राप्ति.

त्या अप्रतिम तेजस्वी भ्रात्यांच्या अंगांवर रोमांच उठविणारा तो समागम अवलोकन करून गुप्तपणें तेथें जुळलेले महर्षी विस्मित झाले. गुप्तपणें तेथें आलेले ते महर्षी व मुनिगण त्या महाभाग्यवान ककुत्स्थकुलोत्पन्न उभयतां भ्रात्यांची--रामभरतांची--प्रशंसा करूं लागले. ते म्हणाले, " हे दोन्ही राजपुत्र नेहमीं धर्ममार्गानें वागणारे असून सभ्य व धर्मज्ञ आहेत; आणि ह्या उभयतांचें संभाषण ऐकून आम्ही ह्यांवर प्रसन्न झालों आहों. "

तदनंतर रावणवधाची इच्छा धरणारे ऋषिगण एकत्र जुळून नृपश्रेष्ठ भरताला सत्वर म्हणाले, " हे कुलीन, हे महाज्ञानवान्, हे सदाचरणसंपन्न, हे महाकीर्तिमान्, पित्याच्या सुखाची जर तुला अपेक्षा असेल, तर रामाच्या सांगण्याचा तूं स्वीकार कर. हा राम कधींहि पित्याच्या ऋणांत राहूं नये, अशी

आमची इच्छा आहे; आणि राम वनवासांत आल्यानें दशरथहि कैकेयीच्या ऋणांतून मुक्त झाल्यामुळें स्वर्गाला गेला आहे. "

इतकें बोलून गंधर्व, महर्षी व राजर्षी हे सर्व आपापल्या मार्गानें चालते झाले. तेव्हां त्यांच्या त्या सांगण्यानें रामाच्या मुखावर तेज आलें. नंतर आनंदित मुद्रेनें त्यानें त्या ऋषींचें अभिनंदन केलें. तेव्हां भरताचे हातपाय अगदीं मोडून गेले, आणि अडखळत अडखळत पुनरपि तो रामाला म्हणाला, " हे काकुत्स्था, कुलधर्म म्हणून नेहमीं चालत आलेल्या ह्या ज्येष्ठराज्याभिषेकरूप धर्माकडे दृष्टि देऊन माझ्या व माझ्या मातेच्या विनंतीला तूं मान दे. हे प्रचंड राज्य रक्षण करण्याला, आणि तुझे ठिकाणीं अनुरक्त असलेल्या प्रजाजनांचें रंजन करण्याला माझ्या एकट्याचें धैर्य होत नाहीं. शिवाय शेतकरी ज्याप्रमाणें पर्जन्याची वाट पहात असतात, त्याचप्रमाणें आपले बांधव, योद्धे, मित्र आणि सुहृद हे तुझ्याकडेच डोळे लावून राहिले आहेत. ह्यास्तव हे महाज्ञानसंपन्न, तूं राज्याचा स्वीकार कर, आणि मग तें कोणाला तरी देऊन टाक; म्हणजे तो लोकांचें परिपालन करण्यास समर्थ होईल. "

ह्याप्रमाणें भाषण केल्यावर भरतानें आपल्या भ्रात्याच्या चरणांवर लोटांगण घातलें, आणि रामाशीं अति प्रिय भाषण करीत करीत त्यानें वारंवार त्याची प्रार्थना केली. तेव्हां मत्त हंसाप्रमाणें ज्याचा स्वर आहे, असा तो राम त्या श्यामवर्ण व कमलनयन अशा आपल्या भ्रात्याला मांडीवर घेऊन म्हणाला, "बा भरता, ही जी विनयामुळें चौदा वर्षेपर्यंत दुःसह वनवास करण्याविषयीं स्वाभाविक बुद्धि तुझे ठिकाणीं उत्पन्न झाली, तिचा विचार केला असतां पृथ्वीचेंहि रक्षण करण्यास तूं पूर्ण समर्थ असल्याचें सिद्ध होत आहे. ह्यास्तव अमात्य, सुहृद आणि बुद्धिमान मंत्री ह्यांच्या मसलतीनें मोठमोठींहि सर्व कार्यें करवीत जा. फार तर काय, कांति चंद्राला सोडून जाईल, हिमालय पर्वतावरीलहि बर्फ नाहींसें होईल व समुद्रहि मर्यादेचें उल्लंघन करील, परंतु मी आपल्या पित्याच्या प्रतिज्ञेचा त्याग करणार नाहीं. बा भरता, प्रेमामुळें असो अथवा राज्याच्या अभिलाषामुळें असो, तुझ्या मातेनें जें हें केलें आहे, तें मनांत न ठेवितां तूं मातेप्रमाणेंच तिच्याशीं वर्तन ठेवीत जा. "

सूर्यासमान तेजस्वी आणि प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणें प्रिय मुद्रेनें युक्त असलेला कौसल्यापुत्र राम ह्याप्रमाणें बोलूं लागला असतां भरत त्याला म्हणाला,

"हे आर्य, ह्या सुवर्णभूषित पादुकांवर पाय ठेव, म्हणजे ह्या पादुकाच सर्व जगताचा योगक्षेम चालवितील."

असें भरतानें सांगितल्यावर महातेजस्वी पुरुषश्रेष्ठ रामानें पादुकांवर पाय ठेवून आणि त्यांवरून फिरून खालीं उतरून त्या पादुका महात्म्या भरताला दिल्या. नंतर आपल्याला दिलेल्या त्या पादुकांना प्रणाम करून भरत रामाला म्हणाला, "हे वीरा, जटा व वल्कलें धारण करून, फलमूलें भक्षण करून आणि सर्व राज्यकारभाराची भिस्त तुझ्या पादुकांवर ठेवून तुझ्या आगमनाची वाट पहात पहात मी नगराच्या बाहेर चौदा वर्षें राहीन; परंतु हे रघुवंशजश्रेष्ठा, चौदावें वर्ष ज्या दिवशीं संपूर्ण होईल, त्या दिवशीं जर तुझें दर्शन झालें नाहीं, तर मी अग्नीमध्यें प्रवेश करीन."

ह्यावर 'ठीक आहे' असें त्याला कबूल करून आणि आदरपूर्वक त्याला व शत्रुघ्नाला कडकडून भेटून राम म्हणाला, "कैकेयी मातेचें रक्षण कर. तिच्यावर क्रोध करूं नको. हे रघुनंदना, तुला माझी व सीतेची शपथ आहे." असें म्हणून रामानें भ्रात्या भरताला घातलेली मिठी सोडिली. त्या वेळीं श्रीरामाचे नेत्र अश्रूंनीं भरून आले होते. असो. धर्मवेत्त्या भरतानें अत्यंत उज्ज्वल आणि उत्तम प्रकारें भूषित असलेल्या त्या पादुका घेऊन रामाला प्रदक्षिणा केली, आणि त्या पादुका एका उत्कृष्ठ गजाच्या मस्तकावर ठेविल्या. तदनंतर ते लोक, गुरु, मंत्री, प्रजाजन आणि कनिष्ठ भ्राते भरतशत्रुघ्न ह्यांचा रीतीप्रमाणें अनुक्रमानें सन्मान करून, स्वधर्माचे ठिकाणीं हिमालय पर्वताप्रमाणें अचल असलेल्या रघुवंशवर्धक रामानें त्यांना निरोप दिला. दुःखामुळें अश्रूंनीं कंठ दाटून आल्या कारणानें माता त्याला विचारण्यास समर्थ झाल्या नाहींत. तेव्हां सर्व मातांना नमस्कार करून तो राम अश्रू ढाळीत ढाळीत आपल्या पर्णकुटिकेमध्यें गेला.

सर्ग एकशेंतेरावा.

भरताचें अयोध्येप्रत परावर्तन.

तदनंतर रामानें दिलेल्या पादुका मस्तकाला लावून भरत शत्रुघ्नासहवर्तमान आनंदित होऊन रथावर आरूढ झाला; आणि वसिष्ठ, वामदेव, जाबालि, दृढव्रत आणि मसलतीविषयीं मान्य असलेले सर्व मंत्री त्याच्या पुढें निघाले. चित्र-

कूट महापर्वताला उजवी घालणारे ते वसिष्ठप्रभृति प्राङ्मुख होऊन रमणीय मंदाकिनी नदीकडे गेले. नानाप्रकारचे हजारों रमणीय धातु अवलोकन करीत करीत भरत सैन्यासहवर्तमान त्या पर्वताच्या उत्तर बाजूनें चालला. नंतर चित्रकूट पर्वताच्या जवळच भरतानें भगवान भरद्वाज मुनींनीं वस्ती केलेला तो आश्रम अवलोकन केला. भरद्वाज मुनींच्या त्या आश्रमाजवळ आल्यानंतर कुलनंदन, वीर्यवान भरत रथांतून उतरला, आणि त्यानें त्या मुनींच्या चरणांना वंदन केलें. तदनंतर 'बा भरता, आपलें कर्तव्य केलेंस कां? आणि रामाची भेट झाली कां?' असें भरद्वाज मुनींनीं आनंदित होऊन भरताला विचारिलें. बुद्धिमान भरद्वाज मुनींचा तो प्रश्न ऐकून धर्मवत्सल भरत त्यांना म्हणाला, "मी व गुरु त्या अमोघ पराक्रमी रामाची प्रार्थना करूं लागलों असतां तो राघव अत्यंत प्रसन्न होऊन वसिष्ठांना म्हणाला, 'चौदा वर्षें वनवास करावयाचा ही जी माझ्या पित्याची प्रतिज्ञा, तिचेंच मी परिपालन करणार.' ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां महाज्ञानी आणि संभाषण करण्यामध्यें निपुण असलेले वसिष्ठ वक्त्या रामाला गंभीर शब्दांनीं म्हणाले, 'आनंदित होऊन तूं ह्या सुवर्णभूषित पादुका दे, आणि ह्या पादुकांच्या द्वारानें अयोध्येमध्यें राहून तूं लोकांचा योगक्षेम चालीव.' ह्याप्रमाणें वसिष्ठांनीं सांगितलें असतां रामानें पूर्वेकडे तोंड केलें, आणि सुवर्णानें मढविलेल्या त्या पादुका राज्य चालविण्याकरितां त्यानें मला दिल्या. मीहि त्या महात्म्या रामाची अनुज्ञा घेऊन तेथून परतलों. आतां त्या शुभ पादुका घेवून मी अयोध्येंतच जाणार."

हें महात्म्या भरताचें शुभ भाषण श्रवण करून भरद्वाज मुनींनीं त्याच्यापेक्षांहि उत्कृष्ठ असें भाषण भरताशीं केलें. ते म्हणाले, "टाकिलेलें उदक सखल प्रदेशांत येऊन स्तब्ध राहतें, हें जसें आश्चर्य नव्हे, तसेंच पुरुषश्रेष्ठ आणि शील व सद्वर्तन जाणणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ अशा तुझे ठिकाणीं सदाचरण असणें हेंहि कांहीं आश्चर्य नव्हे. ज्याचा तूं अशा प्रकारचा धर्मात्मा व धर्मवत्सल पुत्र आहेस, तो तुझा महापराक्रमी पिता दशरथ पितरांच्या ऋणांतून मुक्त आहे."

ह्याप्रमाणें भाषण करून ते भरद्वाज ऋषि बसले असतां त्यांचे पाय धरून आणि हात जोडून भरतानें त्यांची अनुज्ञा घेतली. नंतर पुनः पुनः भरद्वाजांना नमस्कार करून तो श्रीमान भरत मंत्र्यांसहवर्तमान अयोध्येकडे निघाला. तेव्हां रथ, गाडे, अश्व आणि गज ह्यांसहवर्तमान भरताच्या बरोबर जाणारी ती विस्तीर्ण सेनाहि पुनरपि अयोध्येकडे वळली. तदनंतर लाटांनीं भरलेली दिव्य

यमुना नदी तरून गेल्यावर पवित्र उदकानें युक्त असलेली गंगा नदीहि त्या सर्वांनीं पुनरपि अवलोकन केली. मनोहर उदकानें परिपूर्ण असलेली ती गंगा उतरून बांधव आणि सैनिक ह्यांसहवर्तमान तो भरत रमणीय अशा शृंगवेर-पुरामध्यें प्रविष्ट झाला. शृंगवेरपुरांतून निघाल्यावर त्यानें पुनरपि अयोध्या अवलोकन केली. परंतु पिता दशरथ आणि भ्राता राम ह्यांनीं रहित असलेली ती अयोध्या अवलोकन करून भरत दुःखसंतप्त झाला आणि सारथ्याला म्हणाला, "हे सारथे, पहा, उध्वस्त झालेली ही अयोध्या नगरी आतां प्रकाशत नाहीं. ही दीन अयोध्या नगरी अलंकाररहित व आनंदहीन झाली असून हिच्यांतील गडबडहि अगदीं नाहींशी झाली आहे."

सर्ग एकशेंचौदावा.

अयोध्येचा देखावा !

स्निग्ध व गंभीर घोषानें युक्त असलेल्या रथांत आरूढ होऊन जाणारा महायशस्वी प्रभु भरत सत्वर अयोध्येमध्यें प्रविष्ट झाला. त्या अयोध्येमध्यें मांजरें व घुबडें संचार करीत होतीं, लोकांचीं दारें लाविलेलीं होतीं आणि ती नगरी प्रकाशरहित झाली असल्यामुळें अंधकारानें व्याप्त झालेली कालरात्रिच कीं काय अशी भासत होती. दिव्य ऐश्वर्यानें संपन्न असल्यामुळें, उज्ज्वल तेजानें युक्त असलेली चंद्राची प्रिय पत्नी रोहिणी ज्याप्रमाणें राहूनें भर्त्याला पीडिलें असतां सहाय्यरहित असते, त्याप्रमाणें रामरहित झालेली ती अयोध्या अनाथ दिसत होती. अल्प, ऊष्ण व कलुषित उदक, सूर्याच्या तापानें संतप्त झालेले पक्षी आणि लीन झालेले मत्स्य, झष व मकर ह्यांनीं युक्त असलेल्या पर्वतावरील प्रवाह लहान झालेली नदी ह्याप्रमाणें ती दिसत होती. पूर्वीं राम असतांना जी धूमरहित असलेल्या सुवर्णवत् दिसणाऱ्या अग्नीच्या ज्वालेप्रमाणें भासत असे, ती आतां राम अरण्यांत गेल्यानंतर वर दूध शिंपडल्यामुळें नाश पावलेल्या अग्नीच्या ज्वालेप्रमाणें तेजोहीन दिसत होती. जिच्यांतील कवचांचा विध्वंस झालेला आहे, जिच्यांतील गज व अश्व जखमी होऊन रथ व ध्वज मोडून गेले आहेत, आणि जिच्यांतील मोठमोठ्या वीरांचा वध झाला आहे, अशा महा-संग्रामामध्यें विपन्नावस्थेला पोहोंचलेल्या सेनेप्रमाणें ती अयोध्या भासत होती.

समुद्रांतून निघालेली पाण्याची लाट ज्याप्रमाणें प्रचंड वायूनें उमळल्यामुळें फेनयुक्त व ध्वनियुक्त होऊन नंतर शांत वायूनें किंचित् कंपित होऊं लागली असतां ध्वनिरहित होऊन जाते, त्याप्रमाणें ती अयोध्या शब्दरहित झालेली होती. यागकाल समाप्त झाल्यावर सर्व यज्ञपात्रें आणि योग्य याजक ह्यांनीं रहित झालेली यज्ञभूमि जशी ध्वनिशून्य होते, तशी ती अयोध्या ध्वनिशून्य झालेली होती. तरुण बैलांची पत्नीच की काय अशा रीतीनें उत्सुक होऊन राहिलेली माजास आलेली गाय बैलाने सोडून दिली असतां कोमल तृणहि भक्षण न करितां जशी गोठ्यामध्यें आर्त व उत्सुक होऊन राहिलेली असते, तशी ती अयोध्या आर्त व रामाकरिता उत्सुक झालेली होती. अतिशय पाणीदार आणि उज्ज्वल अशा पद्मरागप्रभृति जातीच्या उत्कृष्ठ रत्नांनीं वियुक्त झालेल्या मोत्यांच्या नव्या माळेप्रमाणें ती अयोध्या शोभारहित दिसत होती. पुण्यक्षय झाल्यामुळें फांकणारें तेज नाहींसें होऊन व एकाएकीं स्थानापासून चलित व स्वर्गापासून भ्रष्ट होऊन पृथ्वीवर पडलेल्या ताऱ्याप्रमाणें ती अयोध्या दिसत होती. पुष्पांनीं जखडिलेली आणि म्हणूनच मत्त भ्रमरांनीं युक्त असलेली वनलता वसंताचे शेवटीं प्रचंड दावाग्नीनें होरपळल्यामुळें जशी कोमेजलेली दिसते, तशी ती अयोध्या दिसत होती. आकाश मेघांनीं व्याप्त झालें असतां चंद्र व नक्षत्रें दिसतनाशी होऊन ज्याप्रमाणें मार्गांतील रहदारी नाहींशी होते, आणि बाजारांतील दुकानें बंद होतात, त्याप्रमाणें राम वनवासांत गेल्यामुळें सर्व अयोध्येंतील मार्ग मोकळे पडून दुकानें बंद झालेलीं होतीं. मद्यपान करणाऱ्यांचा नाश होऊन मद्यरहित व भग्न पानपात्रांनीं व्याप्त व उध्वस्त झालेल्या असंस्कृत पानभूमीप्रमाणें ती अयोध्या दिसत होती. जिच्यांतील भूमीला भेगा पडलेल्या आहेत, भग्नपात्रांनीं जी व्याप्त झालेली आहे, जिच्यांतील उदक संपून गेलें आहे, आणि जी मोडून पडली आहे, अशा सखल प्रदेशावर असलेल्या पाणपोईप्रमाणें ती अयोध्या दिसत होती. बलाढ्य योध्यांच्या बाणांनीं तुटून गेल्यामुळें धनुष्यापासून भूमीवर पडलेल्या विशालपाशयुक्त आणि ताणिलेल्या दोरीप्रमाणें ती अयोध्या भासत होती. युद्धनिपुण स्वारानें बलात्कारानें पिटाळून लाविलेल्या व शत्रुसैन्यानें मारून पाडिलेल्या घोडीप्रमाणें ती अयोध्या दिसत होती.

असो. अशा प्रकारें उदास दिसणाऱ्या त्या अयोध्येंत प्रवेश केल्यानंतर रथामध्यें बसलेला श्रीमान दशरथपुत्र भरत तो श्रेष्ठ रथ हांकणाऱ्या सारथ्याला

म्हणाला, " पूर्वीप्रमाणें गायनाचा व वाद्यांचा लय लागून गेलेला गंभीर ध्वनि अयोध्येमध्यें आज कां बरें ऐकूं येत नाहीं? सुरेचा मादकगंध, पुष्पगंध आणि चंदन व अगुरु ह्यांचा गंध ह्यांनीं युक्त असलेला प्रबल वायु आसमंता-द्भागीं वहात नाहीं. राम वनवासांत गेल्यामुळें श्रेष्ठ श्रेष्ठ यानांचा घोष, उत्तम पाणीदार अश्वांचा शब्द, मत्त गजांची गर्जना आणि रथांचा मोठा ध्वनि आज ह्या नगरीमध्यें ऐकूं येत नाहीं. राम वनांत गेल्यामुळें मोठमोठ्या मूल्यवान वनमाला आणि चंदन व अगुरु ह्यांच्या गंधांचा उपभोग संतप्त झालेले तरुण पुरुष घेत नाहींत. चित्रविचित्र पुष्पमाला धारण करून लोक बाहेर फिरावयास जात नाहींत. आणि रामासंबंधीं शोकानें व्याप्त झालेल्या नगरामध्यें उत्सव सुरू नाहींत. खरोखर या नगराची ती शोभा माझ्या भ्रात्यांसहवर्तमान निघून गेली आहे. त्यामुळेंच ही अयोध्या पर्जन्यधारांनीं युक्त झालेल्या शुक्ल-पक्षांतील रात्रीप्रमाणें शोभेनाशी झाली आहे. महोत्सवाप्रमाणें आणि ग्रीष्म-ऋतूंतील मेघाप्रमाणें माझा भ्राता केव्हां बरें येऊन अयोध्येमध्यें हर्ष उत्पन्न करील? तरुण व मनोहर वेष धारण करून छाती काढून चालणाऱ्या आणि लगबगीनें जात असलेल्या तरुण पुरुषांच्या योगानें अयोध्येंतील राजमार्ग शोभत नाहींत."

अशा रीतीनें तो दुःखाकुल झालेला भरत सारथ्याशीं बोलत असतांना अयोध्येंत शिरतांक्षणीं सिंहरहित गुहेप्रमाणें त्या दशरथ राजानें रहित झालेल्या पित्याच्या वसतिस्थानामध्यें गेला. तेव्हां देवांनीं सोडून दिलेल्या स्वर्गलोका-प्रमाणें अथवा सूर्यरहित दिवसाप्रमाणें प्रभाशून्य झालेलें तें अंतःपूर सर्व ठिकाणीं संस्काररहित असलेलें अवलोकन करून तो भरत मनोनिग्रही असतांनाहि अत्यंत दुःखित होऊन अश्रू गाळूं लागला.

सर्ग एकशेंपंधरावा.

पादुकांना अभिषेक व भरताचें नंदिग्रामीं वास्तव्य.

तदनंतर स्वीकारिलेलें व्रत दृढ निश्चयानें चालविणारा तो रघुकुलनंदन कैकेयीपुत्र भरत आपल्या मातांना अयोध्येमध्यें ठेविल्यावर शोकाकुल होऊन गुरूंना म्हणाला, " मी येथें तुम्हां सर्वांचा निरोप घेऊन नंदिग्रामाला जातों. तेथें मी हें सर्व रामवियोगजन्य दुःख सोशीत बसेन. अहो, राजा तर स्वर्गाला गेला, आणि वडिलाप्रमाणें असलेला तो माझा भ्राता राम वनांत वास्तव्य करूं

लागला; परंतु मी राज्याकरितां रामाकडेच डोळे लावून बसलों आहें. कारण तोच महायशस्वी राजा आहे."

हें महात्म्या भरताचें शुभ भाषण श्रवण केल्यावर सर्व मंत्री आणि पुरोहित वसिष्ठ त्याला म्हणाले, "बा भरता, तूं जें हें भाषण केलेंस, तें अतिशयच प्रशंसनीय आहे; आणि बंधुप्रेमामुळें केलेलें हें भाषण तुला योग्य आहे. अशा भ्रातृप्रेमाचें अवलंबन करून व सन्मार्गाचा आश्रय करून बंधुजनांचें परिपालन करण्याविषयीं लुब्ध असलेल्या तुझ्या भाषणाला कोणता बरें पुरुष अनुमोदन देणार नाहीं?"

इच्छेप्रमाणें प्रिय झालेलें हें मंत्र्यांचें भाषण श्रवण केल्यावर 'माझा रथ जोड' म्हणून भरत सारथ्याला म्हणाला, आणि आनंदित मुद्रेनें युक्त होऊन सर्व मातांचा निरोप घेतल्यावर तो श्रीमान भरत शत्रुघ्नासहवर्तमान रथावर आरूढ झाला. ह्याप्रमाणें मंत्री आणि पुरोहित ह्यांनीं परिवेष्टित व अत्यंत आनंदित झालेले ते उभयतां भरत-शत्रुघ्न रथावर आरूढ होऊन सत्वर चालते झाले. वसिष्ठप्रभृति सर्व गुरु आणि इतरहि सर्व द्विज पराङ्मुख होऊन नंदिग्राम जिकडे होतें, तिकडे भरताच्या पुढें चालले. तेव्हां भरताचें सांगणें नसतांनाच गज, अश्व आणि रथ ह्यांनीं गजबजलेलें सैन्य भरत चालूं लागला असतां निघालें आणि सर्व नगरवासी लोकहि त्याच्या मागोमाग चालले. रथामध्यें बसलेला तो धर्मात्मा भ्रातृवत्सल भरत रामाच्या पादुका मस्तकीं घेऊन सत्वर नंदिग्रामासमीप गेला.

तदनंतर नंदिग्रामामध्यें सत्वर प्रविष्ट झाल्यावर रथांतून खालीं उतरून तो गुरूंना म्हणाला, "हें राज्य एक उत्कृष्ठ ठेव म्हणून भ्रात्यानें माझ्या स्वाधीन केलें आहे व ह्या सुवर्णभूषित पादुका योगक्षेम चालविणाऱ्या आहेत."

असें बोलून त्या पादुकारूप ठेवीला त्यानें प्रणाम केला, आणि दुःखसंतप्त झालेला तो भरत सर्व मंत्रिमंडळाला म्हणाला, "ह्या पादुकांवर लवकर छत्र धारण करा. ह्या पादुकांना मी आर्य रामच समजत आहें. राज्यासंबंधीं माझ्या ज्येष्ठ भ्रात्याचा धर्मव्यवहार, तो सर्व पादुकांचे ठिकाणीं आहे. (ह्या पादुकाच राज्यव्यवहार पाहणाऱ्या आहेत. तस्मात् तुम्ही ह्यांच्यावर छत्र धरा.) भ्रात्यानें प्रेमामुळें ही राज्यरूप ठेव माझ्यापाशीं ठेविली आहे. तेव्हां रामाचें आगमन होईपर्यंत मी तिचें परिपालन करीन. राम येतांक्षणीं मी पुनरपि स्वतः ह्या पादुकांचा त्याच्या चरणांशीं समागम करवीन, आणि पादुकांसहवर्तमान रामाचे ते

पाय मी अवलोकन करीन. नंतर रामाचा समागम होऊन माझी जबाबदारी संपली, म्हणजे मी त्या श्रेष्ठ रामाच्या स्वाधीन राज्य करून त्याच्याशीं गुरुतुल्य वृत्तानें वागेन. ह्या श्रेष्ठ पादुका आणि राज्य ही ठेव रामाला अयोध्येमध्यें परत दिल्यावर मी निर्वोर होईन."

ह्याप्रमाणें गुरूंना सांगितल्यावर वल्कलें, जटा आणि मुनिवेष धारण केलेला तो विचारी भरत सैन्यासहवर्तमान नंदिग्रामामध्यें राहिला; आणि केलेला सर्व कारभार त्या पादुकांना निवेदन करण्याचा क्रम ठेवून तो भरत स्वतः चामर व छत्र त्या पादुकांवर धरूं लागला. सारांश, नंदिग्रामाला गेल्यानंतर आर्य रामाच्या पादुकांना अभिषेक करून आणि नेहमीं त्यांच्या अधीन होऊन तो श्रीमान भरत राज्य करूं लागला. कांहीं राज्यविषयक कार्य उपस्थित झालें असतां, किंवा कांहीं मोठा नजराणा आणून दिला असतां तो भरत प्रथम पादुकांना निवेदन करून नंतर त्या राज्यकार्याची वगैरे यथायोग्य रीतीनें व्यवस्था लावीत असे.

सर्ग एकशेंसोळावा.

राक्षसांच्या त्रासामुळें चित्रकूटवासी मुनींचें दुसरीकडे गमन.

भरत परत गेल्यावर राम वनामध्यें वास्तव्य करूं लागला असतां, पूर्वीं चित्रकूट पर्वतावरील त्या आश्रमामध्यें जे तपस्वी रामाचा आश्रय करून आनंदानें राहत होते, ते भयभीत होऊन दुसरीकडे जाण्याकरितां उत्सुक झाले आहेत, असें त्याच्या लक्ष्यांत आलें. कारण शंकित झालेले ते तपस्वी रामाकडे पाहून एकमेकाला नेत्रांनीं व भ्रुकुटींनीं खुणावूं लागले; आणि आपापसांत कुजबुजूं लागले. तेव्हां त्यांची ती उत्सुकता पाहून रामाला स्वतःविषयीं शंका आली, आणि हात जोडून तो त्या आश्रमाधिपति ऋषींना म्हणाला, "भगवन्, माझे ठिकाणीं पूर्वीप्रमाणें राजासारखें कांहीं वर्तन अथवा तपस्व्यांना पीडा होईल, अशा प्रकारचें कांहीं विरुद्ध वर्तन आपल्या दृष्टोत्पत्तीस आलेलें नाहीं ना? प्रमादामुळें माझ्या महात्म्या कनिष्ठ भ्रात्या लक्ष्मणाचें हातून कांहीं अयोग्य आचरण घडल्याचें ऋषींच्या दृष्टोत्पत्तीस आलेलें नाहीं ना? अथवा अर्घ्यपाद्यादिकांनीं तुमची शुश्रूषा करीत असलेली सीता माझ्या शुश्रूषेविषयीं तत्पर असल्यामुळें, स्त्रियांना उचित असें तिचें योग्य वर्तन तुमचे ठिकाणीं नाहीं कीं काय?"

ह्याप्रमाणें रामानें विचारिलें असतां, वार्धक्य प्राप्त झालेले ते तपोवृद्ध ऋषी जरेनें कांपत कांपत भूतदयेविषयीं तत्पर असलेल्या धर्मनिष्ठ रामाला म्हणाले, "सुस्वभावी आणि परहिताविषयीं तत्पर अशा सीतेच्या वृत्तीमध्यें आणि विशेषतः तपस्व्यासंबंधानें तर फरक कोठून असणार? परंतु तुझ्यामुळें राक्षसांपासून हें भय तपस्वी लोकांना प्राप्त झालेलें आहे, आणि ह्यामुळें ते उद्विग्न होऊन आपापसांत बोलत आहेत. रावणाचा कनिष्ठ भ्राता खर नामक राक्षस येथें आहे. त्यानें जनस्थानामध्यें राहणारे सर्व तपस्वी उध्वस्त केले असून त्या धीट, निर्भय, दुष्ट, मनुष्यभक्षक, गर्विष्ठ आणि पापी राक्षसाला तुझें येथें राहणें सहन होईनासें झालें आहे. रामा, तूं जेव्हांपासून ह्या आश्रमामध्यें राहत आहेस, तेव्हांपासून राक्षस तपस्वी लोकांना उपद्रव देत आहेत. बीभत्स, क्रूर, भयंकर, कुरूप आणि दर्शन झालें असतां दुःख देणारीं अशीं रूपें धारण केलेले ते दृष्टीस पडतात. तपस्वी लोकांच्या अंगांवर अथवा निवासस्थानामध्यें अपवित्र व अमंगल पदार्थ आणून टाकून ते दुष्ट राक्षस कांहीं गरीब तपस्व्यांना अतिशय पीडाहि देतात. आश्रमामध्यें ठिकठिकाणीं कोणाच्या लक्ष्यांत न येतां ते दडून बसतात, आणि ते मंदबुद्धि राक्षस तपस्व्यांचा नाश करण्यांत आनंद मानितात. होम सुरू झाला असतां ते स्रुचि वगैरे यज्ञपात्रें सांडून टाकितात. अग्नीवर पाणी शिंपडतात आणि कलश फोडून टाकितात. तेव्हां त्या दुष्टांनीं व्याप्त केलेले आश्रम सोडण्याच्या उद्देशानें दुसऱ्या देशाला जाण्याकरितां ऋषी मला आज प्रेरणा करीत आहेत. तेव्हां रामा, अजून ते दुष्ट तपस्व्यांचा प्राण घेऊं लागले नाहींत, तोंच आम्ही हा आश्रम सोडून जाणार. येथून जवळच विपुल फलमूलांनीं युक्त असें मनोहर वन आहे. त्या वनांत अश्व महर्षींच्या आश्रमाचाच मी ह्या ऋषीगणांसहवर्तमान आश्रय करणार आहें. रामा, तो खर राक्षस अद्यापि तुझ्याशीं अयोग्य वर्तन करूं लागला नाहीं, तोंच तुझी इच्छा असल्यास तूं आम्हांबरोबर येथून चल. हे राघवा, अशा ठिकाणीं नेहमीं भार्येसहवर्तमान आणि धर्माविषयीं तत्पर राहणाऱ्याला भय आहे. तेव्हां तूं समर्थ जरी असलास तरी सांप्रत भार्येसहवर्तमान येथें तुझें वास्तव्य दुःखरूपच होणार आहे."

ह्याप्रमाणें ते मुनी बोलले असतां जाण्याकरितां उत्सुक झालेल्या त्या मुनींना आपल्या उत्कृष्ट भाषणांनीं थोपवून धरण्यास तो राम समर्थ झाला नाहीं. तेव्हां रामाची स्तुति करून, त्याचें समाधान करून आणि त्याचा निरोप घेऊन ते आश्रमाधिपति मुनी आपल्या ऋषीगणांसहवर्तमान तो आश्रम सोडून गेले. तेव्हां

रामानें बरोबर जाऊन ऋषीगणांना त्या प्रदेशांतून पुढें पोहोंचविल्यानंतर त्या आश्रमाधिपति ऋषींना वंदन केलें. नंतर सुप्रसन्न झालेल्या त्या ऋषींनीं परत जाण्याची अनुज्ञा देऊन तेथें न राहण्याचा उपदेश केल्यावर तो राम आपल्या पवित्र निवासस्थानामध्यें वास्तव्य करण्याकरितां परत आला. आश्रमांतून ऋषी निघून गेल्यानंतर तो प्रभु राम सीतेचें रक्षण होण्याकरिता क्षणभरहि तो आश्रम सोडून कोठें गेला नाहीं. ऋषींप्रमाणें वर्तन असलेल्या रामाचे ठिकाणीं आपलें रक्षण होण्याला अवश्य असणारे गुण आहेत, असा निश्चय धरून कांहीं तपस्वी आश्रम सोडून न जातां नेहमीं रामाच्याच बरोबर तेथें राहूं लागले.

सर्ग एकशेंसतरावा.

रामाचें अत्रिऋषींच्या आश्रमीं गमन.

तेथून सर्व ऋषी निघून गेल्यानंतर राम विचार करूं लागला असतां पुष्कळ कारणांमुळें तेथें वास्तव्य करणें त्याला रुचेना. तो मनांत म्हणाला, " ह्या ठिकाणीं भरत, माता आणि नगरवासी लोक माझ्या दृष्टीस पडले आहेत. तेव्हां त्यांच्याकरितां नेहमीं शोक करीत असलेल्या मला वारंवार तें स्मरण होतें. शिवाय त्या महात्म्या भरताच्या सैन्याचा तळ येथें पडला असल्यामुळें घोड्यांच्या लिदीनें व हत्तींच्या लेंड्यांनीं भूप्रदेश फारच अशुचि करून टाकिलेला आहे. तस्मात् दुसरीकडे जावें, हें बरें."

असा विचार करून सीता व लक्ष्मण ह्यांसहवर्तमान राम तेथून निघाला. नंतर अत्रिमुनींच्या आश्रमाला येऊन महायशस्वी रामानें त्यांना वंदन केलें असतां, भगवान अत्रिमुनींनींहि पुत्राप्रमाणें त्याचा स्वीकार केला. स्वतः त्याच्या आदरातिथ्याची आज्ञा करून व तें सर्व सत्कारपूर्वक करून, महाभाग्यवान रामाचें, लक्ष्मणाचें व सीतेचें त्यांनीं सांत्वन केलें. तदनंतर सर्वांना मान्य असलेली आपली वृद्ध पत्नी अनसूया तेथें आली असतां, सर्व भूतांच्या हिताविषयीं तत्पर असलेल्या धर्मज्ञ अत्रि मुनींनीं तिचें आव्हानपूर्वक सांत्वन केलें. आणि ' महाभाग्यवती, निरुपद्रवी व धर्मनिष्ठ अशा ह्या सीतेचा तूं स्वीकार कर ' असें त्या श्रेष्ठ ऋषींनीं अनसूयेला सांगितलें. नंतर ते परमतेजस्वी अत्रि ऋषि त्या धर्मनिष्ठ तापसी

अनसूयेचें वृत्त

रामाला सांगूं लागले. ते म्हणाले, "दहा वर्षे पर्जन्य न पडल्यामुळें लोक एकसारखे दग्ध होऊं लागले असतां, ह्या अनसूयेनें फळें व मुळें उत्पन्न करून ह्या आश्रमामध्यें गंगा आणिली. ही उग्र तपश्चर्या करणारी असून नियमांनींहि भूषित झाली आहे. दहा हजार वर्षेपर्यंत हिनें मोठें तप केलें आहे. ह्या अनसूयेच्याच व्रतांच्या योगानें ऋषींच्या तपाला येणारीं विघ्नें नाहींतशीं झालीं आहेत. देवकार्याकरितां झटत असतांना जिनें त्वरा करून दहा रात्रींची एक रात्र केली, ती ही अनसूया तुला मातेप्रमाणें आहे. तेव्हां सर्व प्राण्यांनीं नमस्कार करण्यास योग्य अशा क्रोधरहित वृद्ध तपस्वीचें दर्शन घेण्याकरितां सीतेला जाऊं दे."

ह्याप्रमाणें ते अत्रि ऋषि सांगूं लागले असतां त्यांना 'ठीक आहे' असें म्हणून आणि धर्मवेत्त्या सीतेकडे पाहून राम म्हणाला, "हे राजकन्ये, ह्या मुनींनीं काय सांगितलें, हें एकलेंस ना? तूं आपल्या कल्याणाकरितां सत्वर त्या तपस्विनीकडे जा. कर्माच्या योगानें जी अनसूया ह्या नांवानें लोकांमध्यें प्रसिद्धीला आली आहे, आणि जो समीप जाण्यास योग्य आहे, अशा त्या तपस्विनीकडे सत्वर जा."

सीतेला अनसूयेचा उपदेश.

हें रामाचें भाषण श्रवण केल्यावर जनककन्या सीता त्या धर्मवेत्त्या अत्रिपत्नीकडे गेली. त्या वृद्ध अत्रिपत्नीचीं गात्रें शिथिल झालीं होतीं, अंगावर सुरकुत्या पडल्या होत्या, जरेमुळें केश पांढरे झाले होते आणि वारा सुटला असतां हालणाऱ्या केळीप्रमाणें तिचें शरीर कांपत होतें. त्या कर्तव्यदक्ष सीतेनें आपलें नांव सांगून महाभाग्यवती पतिव्रता अनसूयेला अभिवंदन केलें. ह्याप्रमाणें त्या मनोनिग्रही तापसीला अभिवंदन केल्यावर आनंदित झालेल्या सीतेनें हात जोडून तिला आरोग्याविषयीं प्रश्न केला. तेव्हां त्या महाभाग्यवती धर्मचारिणी सीतेला अवलोकन करून ती वृद्ध अनसूया सांत्वन करीत करीत तिला म्हणाली, "धर्माकडे तुझें लक्ष्य आहे, हें मोठें सुदैवच समजलें पाहिजे. हे सीते, हे मानिनि, मानवृद्धीची आणि बांधवांची पर्वा न करितां पित्यानें वनांत जाण्याची आज्ञा केलेल्या रामाच्या मागोमाग तूं जात आहेस, हें मोठें सुदैवच आहे. नगरांत असो अथवा वनांत असो, आणि त्याचप्रमाणें अनुकूल असो अथवा प्रतिकूल असो, ज्या स्त्रियांना भर्ता प्रिय आहे, त्यांना महाफलदायक

लोक प्राप्त होतात. पति दु:शील असो, स्वेच्छाचारी असो अथवा निर्धन असो, सुस्वभावी स्त्रियांचें तेंच मुख्य दैवत होय. सीते, विचार करून पाहूं लागलें असतां भर्त्यापेक्षां इष्ट बांधव मला दुसरें कोणी आढळत नाहींत. अक्षय्य तपाचें अनुष्ठान ज्याप्रमाणें इहलोकीं आणि परलोकीं इष्टप्राप्तीचें साधन होतें, त्याचप्रमाणें भर्ताच इहलोकीं आणि परलोकीं इष्टप्राप्तीचें साधन असल्यामुळें सेवेला योग्य आहे. भर्त्यावरच अधिकार चालविणाऱ्या विषयोपभोगाकडेच मनाचा कल असलेल्या आणि स्वेच्छेनें संचार करणाऱ्या ज्या दुष्ट स्त्रिया असतात, त्या ह्या गुणदोषांकडे लक्ष्यच देत नाहींत. सीते, खरोखर निषिद्ध कर्माचेंच अधीन होऊन राहिलेल्या ज्या तशा प्रकारच्या स्त्रिया असतात, त्या धर्माला मुकून अपकीर्तीला पात्र होतात; परंतु जगांतील बऱ्या वाईट गोष्टींचा विचार करणाऱ्या तुझ्यासारख्या ज्या गुणसंपन्न स्त्रिया असतात, त्या पुण्यवान लोकांप्रमाणें स्वर्गामध्यें सचार करितात. तस्मात् ह्याप्रमाणें पति हेंच मुख्य दैवत समजून सदाचरणाला अनुसरून वागणारी आणि पतिसेवेविषयीं तत्पर असलेली तूं आपल्या भर्त्याची सहधर्मचारिणी हो, म्हणजे तुला यश व पुण्य प्राप्त होईल."

सर्ग एकशेंअठरावा.

सीतेचें भाषण.

ह्याप्रमाणें अनसूयेनें सांगितलें असतां ती अनसूया-निर्मत्सर-सीता तिच्या भाषणाची प्रशंसा करून हळूहळू बोलूं लागली कीं, "आपण जें मला सांगत आहां, तें हें सदाचरणी स्त्रीसंबंधानें पाहूं गेलें असतां कांहीं आश्चर्यकारक नाहीं. कारण स्त्रीचा गुरु पति हे आपल्या उपदेशाप्रमाणें मलाहि विदित आहे. भर्ता हा जरी दुष्ट आणि दरिद्री असला, तरी माझ्यासारख्या स्त्रीनें त्याचे ठिकाणीं एकनिष्ठेनेंच वागलें पाहिजे. तेव्हां गुणांमुळें प्रशंसेस पात्र, दयाळु, जितेंद्रिय, दृढ प्रेम करणारा धर्मात्मा आणि मातापितरांप्रमाणें माझ्या प्रीतीस पात्र असलेला जो भर्ता, त्याच्याशीं एकनिष्ठेनें वागणें अवश्य आहे, ह्यांत शंका कशाची? महाबलाढ्य राम जें कौसल्येचे ठिकाणीं आपलें वर्तन ठेवीत आहे, तेंच इतरहि राजभार्यांचे ठिकाणीं ठेवीत आहे. इतकेंच नव्हे, परंतु उपभोग्य ह्या बुद्धीनें ज्या स्त्रियांकडे दशरथ राजानें एकदां पाहिलें आहे, त्या स्त्रियांचे ठिकाणींहि हा

नृपवत्सल धर्मवेत्ता वीर अभिमान मोडून देऊन मातेप्रमाणें वर्तन ठेवीत असतो. मी निर्जल व भयंकर वनामध्यें येऊं लागलें असतां सासूने मला जो ह्याप्रमाणें उपदेश केला, तो माझ्या हृदयामध्यें अगदीं स्थिर राहिलेला आहे. पूर्वी पाणिग्रहणसमयीं अग्निसन्निध मातेनें जो मला उपदेश केला, तोहि मीं लक्षांत ठेविला आहे. हे धर्मचारिणि, माझ्या बांधवानीं जो मला आपापल्या भाषणानीं उपदेश केला आहे, त्यांपैकीं मी कांहीं एक विसरलें नाहीं. स्त्रीला पतिसेवेहून दुसरें तप विहित नाहीं. सावित्री पतिसेवा करून आता स्वर्गामध्यें पूज्य होऊन बसली आहे. त्या सावित्रीप्रमाणेंच वागणाऱ्या आपणहि पतिसेवेनें स्वर्ग हस्तगत करून घेतला आहे. सर्व स्त्रियांमध्यें श्रेष्ठ असलेली ही देवता रोहिणी चंद्रावांचून एक क्षणभरहि स्वर्गामध्यें दिसत नाहीं. सारांश, पूर्वजन्मीं एकनिष्ठपणानें पतिसेवा केल्यामुळेंच तिला हें पतिसान्निध्य प्राप्त झालें आहे. ह्याप्रमाणें अशा प्रकारच्या महापतिव्रता श्रेष्ठ स्त्रिया स्वतःच्या पुण्य–कर्मानें देवलोकामध्यें पूज्य होऊन बसल्या आहेत."

सीतेनें केलेलें हें भाषण श्रवण करून अनसूया आनंदित झाली, आणि सीतेचें मस्तक हुंगून तिला आनंद होण्याकरितां म्हणाली, "नानाप्रकारच्या नियमांनीं मीं मोठें तप संपादन करून ठेविलें आहे. तेव्हां त्या तपोबलाचा आश्रय करून तूं माझ्यापाशीं वर मागावास, अशी माझी इच्छा आहे. हे मैथिलि, तुझें भाषण अर्थयुक्त असून योग्य आहे. ह्यास्तव हे सीते, मी तुझें काय प्रिय करावें तें सांग."

तें तिचें भाषण श्रवण करून किंचित् हास्य करणारी सीता विस्मित झाली, आणि तपःसामर्थ्यानें युक्त असलेल्या त्या अनसूयेला म्हणाली, "आपल्या अनुग्रहानेंच माझें सर्व कांहीं यथास्थित आहे. मला कसलीहि उणीव नाहीं."

सीतेला अक्षय्य उटि वगैरे देणें.

ह्याप्रमाणें त्या सीतेनें सांगितलें असतां ती अनसूया तिच्यावर अधिकच प्रसन्न झाली, आणि म्हणाली "सीते, हा मी तुझा हर्ष सफल करितें. ही दिव्य श्रेष्ठ माला वस्त्र, भूषणें, उटि आणि मोठें मूल्यवान अनुलेपन मी तुला देतें. सीते, हें मीं दिलेलें तुझ्या अवयवांना शोभा आणील, आणि नेहमीं ताजें राहून तुला साजेल. हे जनककन्ये, ही दिव्य उटि तूं आपल्या अंगाला लावलीस, म्हणजे अक्षय्य विष्णूला शोभविणाऱ्या लक्ष्मीप्रमाणें तूं आपल्या भर्त्याला शोभविशील."

ह्याप्रमाणें अनसूयेनें सांगितल्यावर वस्त्र, उटि भूषणें आणि माला अशा ज्या

उत्कृष्ठ वस्तु तिनें प्रेमपूर्वक दिल्या होत्या, त्या सीतेनें घेतल्या. प्रेमानें दिलेल्या त्या वस्तु घेतल्यावर यशस्विनी व उदार सीता हात जोडून त्या तपस्विनीच्या जवळ बसली. तेव्हां तशा प्रकारें ती सीता बसली असतांना, स्वीकारिलेलें व्रत नेटानें चालविणारी अनसूया कांहीं प्रिय कथा श्रवण करण्याच्या उद्देशानें तिला विचारूं लागली, " सीते, ह्या यशस्वी रामानें स्वयंवरामध्यें तुला प्राप्त करून घेतलें, अशी गोष्ट माझ्या कानावर आली आहे. ती हकीगत सविस्तर श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. तेव्हां तूं हें इत्थंभूत वर्तमान मला पूर्णपणें कथन कर."

सीतामुखें स्ववृत्तकथन.

ह्याप्रमाणें अनसूयेनें म्हटलें असतां ती सीता त्या धर्मचारिणी तापसीला 'ऐका' असें म्हणून ती हकीगत सांगूं लागली. ती म्हणाली, " जनक म्हणून एक मिथिला नगरीचा धर्मवेत्ता वीर राजा आहे. तो क्षत्रधर्माविषयीं तत्पर असून न्यायानें पृथ्वीचें परिपालन करीत आहे. यज्ञदीक्षा घेतल्यावर तो जनक राजा हातांत नांगर घेऊन यज्ञभूमि नांगरूं लागला असतां मी भूमि भेदून वर निघालें. येवढ्याच कारणानें मी त्या जनक राजाची कन्या आहें. तेव्हां बीजमुष्टि जमिनींत टाकण्यामध्यें गढून गेलेला तो जनक राजा, धुळीनें सर्वांग भरलेल्या मला अवलोकन करून विस्मित झाला; आणि त्याला संतति नसल्यामुळें त्यानें प्रेमानें स्वतः मला मांडीवर घेऊन व 'ही माझी कन्या' असें म्हणून माझे ठिकाणीं प्रेम केलें. इतक्यांत आकाशामध्यें 'हे भूपते, ह्या तुझ्या म्हणण्याप्रमाणें न्यायानें ही तुझी कन्याच आहे' अशी मनुष्यवाणीसारखी वाणी झाली म्हणून म्हणतात. अशी आकाशवाणी झाल्यानंतर माझा पिता धर्मात्मा मिथिलाधिपति आनंदित झाला, आणि यज्ञभूमीपासून मी त्याला प्राप्त झाल्यावर त्याची मोठी अभिवृद्धि झाली. आपल्या सत्कर्मनिष्ठ आणि संतानेच्छु अशा श्रेष्ठ पत्नीचे स्वाधीन राजानें मला केलें. त्या दयाळु राजपत्नीनें मातृप्रेमानें माझें परिपालन केलें. नंतर पाणिग्रहण होण्याला योग्य असें माझें वय अवलोकन करून माझा पिता, वित्तनाशामुळें चिंताक्रांत होणाऱ्या दरिद्री पुरुषाप्रमाणें दीन होऊन चिंताक्रांत झाला. कारण कन्येचा पिता इंद्राप्रमाणें जरी पृथ्वीमध्यें असला, तरी सारख्या योग्यतेच्या अथवा कमी योग्यतेच्याहि वरपक्षाकडून त्याचा अपमान होतो; मग योग्यतेनें अधिक असलेल्या वरपक्षाची तर गोष्ट पाहिजे कशाला? तेव्हां आपल्या अपमानाचा समय जवळच आलेला पाहून चिंतासागरांत

पडलेला जनक राजा, समुद्रांत पडलेला मनुष्य तरून जाण्याचें साधन नसल्यामुळें जसा परतीराला जाऊन पोहोंचत नाहीं, तसा त्या चिंतासागरांतून पार जाईना. मी अयोनिसंभव आहें, हें लक्षांत येऊन तो भूपति विचार करूं लागला असतां, कुलीन आणि योग्यतेनें तुल्य असा पति त्याला कोणीहि आढळेना. तेव्हां एकसारखें चिंतन करितां करितां, 'क्षत्रधर्माला अनुसरून असलेलें मी आपल्या कन्येचें स्वयंवर करीन' हा विचार त्याला सुचला. दक्षयज्ञामध्यें माझ्या पित्याचा पूर्वज जो देवरात, त्याला महात्म्या वरुणानें प्रेमपूर्वक एक श्रेष्ठ धनुष्य आणि दोन अक्षय भाते दिले होते. तें धनुष्य जड असल्यामुळें मनुष्यांना प्रयत्नानेंहि हालवितां येत नव्हतें. इतकेंच नव्हे, परंतु राजे स्वप्नामध्येंहि तें धनुष्य वांकविण्यास समर्थ नव्हते. तेव्हां पूर्वी राजांना आमंत्रण करून त्या राजांच्या समाजामध्यें माझ्या त्या सत्यवादी पित्यानें तें धनुष्य घेतलें, आणि 'हें धनुष्य उचलून जो पुरुष याला प्रत्यंचा चढवील, त्याला ही माझी कन्या निःसंशय वरील' असें म्हटलें. तेव्हां जडपणामुळें पर्वतप्राय असलेलें तें श्रेष्ठ धनुष्य अवलोकन करितांक्षणीं तें तोलण्याविषयीं अगदीं असमर्थ असलेले राजे त्याला नमस्कार करून जाऊं लागले. ह्याला बराच काल लोटल्यावर हा महातेजस्वी व अमोघ पराक्रमी रघुवंशज राम भ्रात्या लक्ष्मणाला बरोबर घेऊन विश्वामित्र मुनींसहवर्तमान यज्ञ अवलोकन करण्याकरितां तेथें आला. तेव्हां माझ्या पित्यानें धर्मात्म्या विश्वामित्र मुनींचें चांगलें पूजन केल्यावर ते त्या ठिकाणीं माझ्या पित्याला म्हणाले, 'हे रघुवंशज रामलक्ष्मण दशरथ राजाचे पुत्र आहेत, व धनुष्य पहाण्याची यांची इच्छा आहे.' ह्याप्रमाणें त्या विप्र विश्वामित्रांनीं राजाला सांगितलें असतां त्यानें तें धनुष्य आणविलें, आणि तें दिव्य धनुष्य राजकुमाराला दाखविलें. तेव्हां डोळ्याचें पातें लवलें नाहीं, तोंच महाबलाढ्य वीर्यवान राघवानें तें वांकवून व प्रत्यंचा चढवून कर्णापर्यंत ओढून दाखविलें. तेव्हां वेगानें तो धनुष्य ओढूं लागला असतां मध्यें मोडून त्याचे दोन तुकडे झाले, व वीज पडल्याप्रमाणें त्याचा भयंकर आवाज झाला. तदनंतर त्या सत्यवचनी पित्यानें हातामध्यें उत्तम उदकपात्र घेऊन मला रामाला देण्याकरितां पुढें केलें; परंतु अयोध्याधिपति प्रभु पित्या दशरथ राजाचा अभिप्राय समजला नसल्यामुळें, माझा पिता जरी मला देऊं लागला, तरी राघवानें त्या वेळीं माझा स्वीकार केला नाहीं. तेव्हां माझा श्वशुर जो वृद्ध दशरथ राजा, त्याला बोलावून आणून आत्मज्ञानी रामाला पित्यानें

मला दिलें, व शुद्ध नेत्रांनीं युक्त असलेली माझी कनिष्ठ भगिनी साध्वी ऊर्मिला स्वत: माझ्या पित्यानें लक्ष्मणालाहि भार्येकरितां दिली. असो. ह्याप्रमाणें त्या स्वयंवरामध्यें मी रामाला दिलेली आहें, आणि वीर्यवानांमध्यें श्रेष्ठ असलेल्या पतीचे ठिकाणीं मी धर्मानें अनुरक्त आहें."

सर्ग एकशेंएकोणिसावा.

संकालसमयींची शोभा.

ती मोठी कथा श्रवण केल्यावर सीतेचें मस्तकीं अवघ्राण करून धर्मवेत्त्या अनसूयेनें आपल्या हातांनीं तिला कवटाळून धरिलें, आणि ती तिला म्हणाली, "स्वयंवर कसें झालें, हें तूं स्पष्ट शब्दांनीं आणि आश्चर्यकारक व मधुर वाणीनें सांगितलेंस आणि तें सर्व मीं ऐकिलें. हे मधुरभाषिणि सीते, ह्या तुझ्या कथेनें मला फारच बरें वाटत आहे; परंतु आतां तेजस्वी सूर्य शुभ रात्रीला समीप आणवून अस्ताला गेला आहे. सर्व दिवसभर आहाराकरितां संचार करून संध्यासमयीं निद्रेकरितां निवासस्थानांत जाऊन बसलेल्या पक्ष्यांचा ध्वनि कानावर येत आहे. उदकामध्यें ज्यांनीं आपलीं वल्कलें धुतलीं आहेत, आणि स्नानामुळें ज्यांचीं शरीरें आर्द्र झालेलीं आहेत, असे हे हातांत कलश घेतलेले मुनी एकत्र जुळून येत आहेत. ऋषींनीं विधिपूर्वक अग्निहोम दिल्यामुळें पारव्यांच्या कंठासारख्या वर्णाचा आणि वायूनें हालविलेला धूर दृष्टीस पडत आहे. बारीक पानांचे वृक्ष आसमंताद्भागीं सर्व बाजूंनीं अगदीं दाट झाल्यासारखे दिसत आहेत, आणि दूरचे प्रदेश दृष्टिगोचर होतनासे झाले आहेत. निशाचर प्राणी चोहोंकडे संचार करूं लागले आहेत, आणि हे तपोवनांतील मृग पुण्यक्षेत्ररूप आश्रमप्रदेशामध्यें पडले आहेत. सीते, नक्षत्रांनीं भूषित झालेली रात्र प्राप्त झाली आहे, आणि चंद्रिकारूप प्रावरणांनीं युक्त असलेला चंद्र आकाशामध्यें उदय पावलेला दिसत आहे. आतां जा, मी तुला अनुज्ञा देतें. रामाच्या शुश्रूषेमध्यें तत्पर राहा. मधुर गोष्टी सांगून तूं मलाहि संतुष्ट केलें आहेस. वत्से, माझ्यासमक्ष तूं अलंकार धारण कर, आणि दिव्य अलंकारांनीं शोभित होऊन मला आनंद दे."

ह्याप्रमाणें अनसूयेनें सांगितल्यानंतर देवकन्येसमान असलेल्या सीतेनें अलंकार घातले, आणि अनसूयेच्या चरणांना मस्तकानें प्रणाम करून ती

रामाकडे निघाली. तेव्हां ऋषिपत्नी अनसूयेनें प्रेमपूर्वक दिलेल्या अलंकारांनीं भूषित झालेल्या सीतेला अवलोकन करून वक्त्यांमध्यें श्रेष्ठ असलेल्या रामाला हर्ष झाला. तदनंतर ऋषिपत्नीनें वस्त्रें, भूषणें व पुष्पमाला प्रेमपूर्वक दिल्याचें सर्व सीतेनें रामाला निवेदन केलें. तेव्हां मनुष्यलोकामध्यें अत्यंत दुर्लभ असा सीतेचा सत्कार झालेला पाहून रामाला व महारथि लक्ष्मणाला हर्ष झाला. नंतर सर्व तपस्विजनांनीं सत्कार केलेला तो रघुनंदन प्रसन्न होऊन आणि चंद्रासारख्या आल्हादकारक मुखानें युक्त असलेल्या पवित्र सीतेला अवलोकन करून ती रात्र तेथेंच राहिला.

नंतर प्रातःकालीं स्नान करून पुढें जाण्याकरिता ते पुरुषश्रेष्ठ राम-लक्ष्मण, अग्नींना होम देऊन बसलेल्या वनांतील तपस्वी मुनींचा निरोप घेऊं लागले. तेव्हां वनामध्यें संचार करणारे ते धर्मनिष्ठ तपस्वी त्यांना म्हणाले, "ह्या वनांतील प्रदेशाला राक्षसांचा फारच उपद्रव आहे. राघवा, नानाप्रकारचे मनुष्यभक्षक राक्षस आणि रुधिरपान करणारीं श्वापदें ह्या महारण्यामध्यें वास्तव्य करीत असतात; आणि एखादा तपस्वी अथवा ब्रह्मचारी अशुचि किंवा असावध असला म्हणजे ह्या महारण्यामध्यें राक्षस त्याला खाऊन टाकितात. तेव्हां राघवा, तूं त्यांचें निवारण कर. फलें घेऊन येणाऱ्या महर्षींचा ह्या वनांतील मार्ग आहे. ह्याच मार्गानें गहन वनामध्यें जाणें तुला योग्य आहे."

ह्याप्रमाणें आशीर्वादपूर्वक तपस्वी ब्राह्मणांनीं हात जोडून रामाला सांगितलें असतां तो शत्रुतापन राम मेघमंडळांत प्रविष्ट होणाऱ्या सूर्याप्रमाणें भार्या आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान वनामध्यें प्रविष्ट झाला.

श्रीवाल्मीकिरामायण.

अ र ण्य कां ड.

सर्ग पाहिला.

आश्रमवर्णन.

ज्याच्याकडे वर डोळा करून पाहण्याची शत्रूची प्राज्ञा नाहीं, तो जितेंद्रिय राम दंडकारण्यामध्यें गेल्यावर त्यानें तपस्विजनांचा आश्रमसमुदाय अवलोकन केला. कुश आणि वल्कलें ह्यांनीं तो आश्रमसमूह भरलेला असून, वेदाभ्यास-जन्य तेजानें व्याप्त झाला असल्यामुळें सूर्यमंडळाप्रमाणें देदीप्यमान होता; आणि म्हणूनच राक्षसांना वगैरे त्याजकडे अवलोकन करण्याचेंहि सामर्थ्य नव्हतें. सर्व प्राण्यांचें तो निवासस्थान होता त्यांतील अंगणें चांगलीं झाडलेलीं होतीं. नानाप्रकारच्या मृगांनीं तो गजबजलेला होता. पक्ष्यांच्या समुदायांनीं तो व्याप्त झालेला होता आणि अप्सरांचे समुदाय समीपच नृत्य करून त्याला मान देत होते. विशाल होमशाला, स्रुक्प्रभृति यज्ञपात्रें, अजिनें, दर्भ, समिधा, उदकांनीं भरलेले कलश आणि फळें व मुळें ह्यांनीं त्याला शोभा आलेली होती. त्याच्या सभोंवतीं स्वादिष्ट फळें येणारे अरण्यांतील मोठमोठे पवित्र वृक्ष होते. वैश्वदेव, होम आणि बलिहरण ह्यांनीं त्याचा सत्कार केलेला होता, आणि वेदघोषानें तो पवित्र आश्रम नादित झालेला होता. त्यामध्यें कमलें आणि इतर पुष्पें विपुल असून वल्कलें व कृष्णाजिनें परिधान करून फलमूलांवर उपजीविका करणारे आणि सूर्य व अग्नि ह्यांप्रमाणें तेजस्वी असलेले पुष्कळ जितेंद्रिय व सनातन मुनी त्या ठिकाणीं वास्तव्य करीत होते. नियमित आहार करणाऱ्या पुण्यवान महर्षींनीं तो सुशोभित झालेला होता.

श्रीरामाचें आदरातिथ्य.

असो. वेदघोषानें नादित, वेदवेत्त्या महाभाग्यवान ब्राह्मणांनीं सुशोभित आणि ब्रह्मलोकतुल्य असें तें तपस्वी मुनींचें आश्रममंडल अवलोकन केल्यावर

महातेजस्वी राम त्या मोठ्या धनुष्याची प्रत्यंचा उतरून समीप गेला. तेव्हां ते दिव्यज्ञानसंपन्न महर्षी राम आणि यशस्विनी सीता ह्यांना अवलोकन करण्याबरोबर सुप्रसन्न होऊन त्याला सामोरे आले. उदय पावलेल्या चंद्राप्रमाणें धर्मनिष्ठ राम, लक्ष्मण आणि यशस्विनी सीता ह्यांना अवलोकन करून, स्वीकारिलेलें व्रत नेटानें चालविणाऱ्या त्या महर्षींनीं आशीर्वाद देऊन त्यांचा स्वीकार केला व रामाचा बांधा, कांति सुकुमारपणा आणि उज्ज्वल वेष पाहून वनामध्यें वास्तव्य करणाऱ्या त्या महर्षींच्या मनाला विस्मय वाटला. डोळ्याच्या पापण्याहि न लववितां सीता, लक्ष्मण आणि राम ह्या आश्चर्यकारक झालेल्या त्रिवर्गांना ते सर्व वनवासी अवलोकन करूं लागले. नंतर त्या आश्रममंडलामध्यें महाभाग्यवान आणि सर्व प्राण्यांच्या हिताविषयीं तत्पर असलेल्या त्या महर्षींनीं अतिथि रामाला पर्णकुटिकेमध्यें उतरविलें. तदनंतर रामाचें यथाविधि स्वागत करून त्या अग्नितुल्य, तेजस्वी, महाभाग्यवान व धर्मनिष्ठ महर्षींनीं रामाच्या पूजेकरितां उदक वगैरे आणिलें. नंतर मोठ्या आनंदानें युक्त झालेले व आशीर्वाद देत असलेले ते धर्मवेत्ते महर्षी महात्म्या रामाला मुळें, पुष्पें व फळें अर्पण करून आणि 'सर्व आश्रम तुझाच आहे' असें सांगून हात जोडून म्हणाले, "हे महायशस्वी रामा, तूं ह्या ऋषिजनांचा धर्मपालक व रक्षक असून ह्यांना पूज्य व मान्य आहेस. कारण तूं राजा व दुष्टांचा निग्रह करणारा असून गुरु आहेस. हे राघवा, प्रजारक्षक राजा परमात्म्या विष्णूचाच चतुर्थांश असतो. आणि म्हणूनच सर्व लोक त्याला नमस्कार करीत असून श्रेष्ठ व रम्य अशा भोग्य वस्तूंचा तो उपभोग घेत असतो. तस्मात् तुझ्या देशामध्यें वास्तव्य करणाऱ्या आमचें रक्षण तुला कर्तव्य आहे. तूं नगरांत असलास किंवा वनांत असलास तरी तूंच लोकाधिपति आमचा राजा आहेस. राजन्, आम्हीं क्रोधसंयमन व इंद्रियदमन करून प्राण्यांचा निग्रह करण्याचें सोडिलें आहे. तस्मात् माता ज्याप्रमाणें गर्भाचें रक्षण करिते, त्याप्रमाणें तुला आमचें रक्षण करणें अवश्य आहे."

असें सांगून फळें, मुळें, पुष्पें व वनसंबंधीं इतर नानाप्रकारचे भक्ष्य पदार्थ ह्यांच्या योगानें त्या महर्षींनीं लक्ष्मणासहवर्तमान रामाचें पूजन केलें. त्याचप्रमाणें न्यायानें वर्तन करणाऱ्या अग्नितुल्य तेजस्वी, सिद्ध व तपस्वी अशा इतरहि मुनींनीं त्या ईश्वरस्वरूप रामाला यथायोग्य रीतीनें तृप्त केलें.

सर्ग दुसरा.

विराधदर्शन.

आदरातिथ्य झालेला राम सूर्योदयसमयीं त्या सर्व मुनींचा निरोप घेऊन वनामध्यें प्रविष्ट झाला. तें वन नानाप्रकारच्या मृगसमुदायांनीं व्याप्त होतें. अस्वलें व वाघ त्यांत राहत होते. त्यांतील वृक्ष, लता आणि झुडपें ह्यांचा नाश झालेला होता. त्यांतील उदकस्थान कोठें आहे, हें दिसेनासें झालें होतें. त्यांतील पक्षी शब्द करीत नव्हते, फक्त चिलटांची मात्र गुणगुण तेथें चालली होती. असें तें वन लक्ष्मणासहवर्तमान रामानें अवलोकन केलें. श्वापदांनीं युक्त असलेल्या त्या वनामध्यें गर्जना करीत असलेला एक पर्वतशिखरासारखा प्रचंड राक्षस रामानें अवलोकन केला. त्याचे डोळे मोठमोठ्या कूपांसारखे खोल होते. त्याचें मुख प्रचंड होतें. त्याचें उदर विशाल, आणि मुद्रा भयंकर होती. तो विशाल, बीभत्स, ओबडधोबड व कुरूप होता. त्यानें व्याघ्रचर्म परिधान केलें होतें. तो वसेनें[1] भिजलेला होता. त्याच्या शरिरावर रक्ताचा सडा झालेला असून त्यानें आ पसरलेला होता. तो सर्व प्राण्यांना त्रस्त करून सोडणारा व सर्वांचा घात करणारा होता. त्या वेळीं तीन सिंह, चार व्याघ्र, दोन लांडगे, पृषत्संज्ञक दहा मृग आणि वसेनें चोपडलेलें व पुढल्या दांतांसकट असलेलें एक गजाचें मोठें मस्तक, इतकें सामान भक्षणाकरितां एका लोखंडाच्या सुळाला अडकवून ठेवून तो अतिशय उच्च स्वरानें गर्जना करीत होता. राम, लक्ष्मण आणि जनककन्या सीता ह्यांना अवलोकन केल्याबरोबर युगांतसमयीं क्रुद्ध होऊन काळ ज्याप्रमाणें लोकांकडे धावतो, त्याप्रमाणें तो राक्षस अत्यंत क्रुद्ध होऊन त्यांच्याकडे धावला. नंतर भयंकर गर्जना करून पृथ्वी कंपित करीत करीत तो राक्षस पुढें आला, आणि सीतेला कमरेशीं धरून व उचलून घेऊन तेथून पलीकडे गेल्यावर म्हणाला, 'बाण, धनुष्य आणि खड्ग हातांत घेऊन व जटा आणि वल्कलें धारण करून दंडकारण्यामध्यें भार्येसहवर्तमान प्रविष्ट झालेल्या तुम्हां उभयतांचें आयुष्य संपलें. अरे, तरुण स्त्रीसहवर्तमान तुम्ही तपस्वी अरण्यामध्यें कसें रे वास्तव्य करितां? या मुनिवेषाला विरुद्ध अशीं आयुधें धारण करून एकाच स्त्रीचे ठिकाणीं रत असलेले असे अधर्मनिष्ठ, पापी आणि मुनींच्या नांवाला बट्टा

---

१ मांसामध्यें असलेला स्निग्ध पदार्थ–चर्बी.

लावणारे तुम्ही कोण रे आहां? मी विराध नामक राक्षस आहें, आणि हातामध्यें आयुध धारण करून ह्या भयंकर वनामध्यें संचार करीत करीत ऋषींच्या मांसाचें भक्षण करीत असतों. वरण्यास योग्य असलेली ही स्त्री माझी भार्या होईल. मी युद्धामध्यें तुम्हां पापरूपी उभयतांचें रुधिर प्राशन करीन.'

ह्याप्रमाणें त्या दुरात्मा विराधाचें गर्वयुक्त भाषण श्रवण करितांक्षणीं जनकराजकन्या सीता भयभीत होऊन वाऱ्यानें हालणाऱ्या केळीप्रमाणें थरथर कांपूं लागली; इतक्यांत ती शुभ जानकी विराधाच्या अंकावर बसलेली पाहून शोकानें म्लानवदन झालेला राम लक्ष्मणाला म्हणाला, "बा सौम्या, राजश्रेष्ठ जनकापासून उत्पन्न झालेली, लहानपणापासूनच सुखामध्येंच वाढलेली आणि उत्कृष्ठ वर्तन करणारी अशी ही माझी भार्या म्हणून प्रसिद्ध असलेली यशस्विनी सीता विराधाच्या अंकावर असलेली तूं अवलोकन कर. लक्ष्मणा, वनामध्यें आम्हांला जें दुःख व्हावें, म्हणून कैकेयीला वाटत होतें तें, व वर प्राप्त करून जें प्रिय करून घ्यावयाचें होतें तें, हें सर्व तिचें इच्छित आजच तिला प्राप्त झालें! ती मोठी दीर्घदर्शी असल्यामुळें आपल्या पुत्राला राज्य प्राप्त झालें एवढ्यानेंच तृप्त नसून, तें त्याला चिरकाल मिळण्याकरितां आमच्या नाशाची इच्छा करीत आहे. आज सर्व प्राणिमात्रांना प्रिय असलेल्या मला वनामध्यें पाठवून देऊन, कौसल्येपेक्षां कनिष्ठ व सुमित्रेपेक्षां वडील असलेली ती माझी मधली माता–कैकेयी कृतकृत्य झाली. बा लक्ष्मणा, जरी माझ्या पित्याचा नाश झाला आहे, व मी आपल्या स्वतःच्या राज्यापासून भ्रष्ट झालों आहें, तरी सुद्धां सीतेला दुसऱ्यानें स्पर्श केलेला पाहून जें दुःख होतें, त्यापेक्षां जास्त दुसरें कसलेंहि दुःख मला होत नाहीं."

ह्याप्रमाणें ककुत्स्थकुलोत्पन्न रामाचें भाषण श्रवण केल्यावर शोकामुळें ज्याच्या नेत्रांतून अश्रुधारा वहात आहेत, असा लक्ष्मण कोंडून ठेविलेल्या सर्पाप्रमाणें फुस्कारे टाकीत रागावून बोलूं लागला, "हे ककुत्स्थकुलोत्पन्ना रामचंद्रा, तूं सर्व भूतांचा नाथ असून पराक्रमाविषयीं इंद्रासारखा असतां अनाथाप्रमाणें शोक कां करीत आहेस? तुझा सेवक मी क्रुद्ध झालों असतां या विराध राक्षसाला बाणानें प्रहार करून गतप्राण करीन, आणि त्याच्या शरीरांतून निघालेलें रक्त ही पृथ्वी प्राशन करील. वज्र धारण करणारा इंद्र ज्याप्रमाणें पर्वताला वज्राचा प्रहार करतो, त्याप्रमाणें राज्यासंबंधानें भरताविषयीं जो मला क्रोध आला आहे, तो मी या राक्ष-

सावर उगवीन. माझ्या भुजबलांच्या वेगानें ज्याला वेग प्राप्त झाला आहे, असा एक मोठा बाण त्याच्या विस्तीर्ण हृदयाचे ठिकाणीं जाऊन पडो, व त्याच्या योगानें त्याचें जीवित नाहींसें होऊन मूर्च्छा येऊन तो ह्या पृथ्वीवर पडो."

सर्ग तिसरा.

रामविराधसंवाद.

तदनंतर विराध आपल्या शब्दानें तें वन नादित करीत करीत पुनरपि 'अरे, तुम्ही कोण आहां व कोणीकडे जाणार आहां, हें मला कथन करा.'

हें श्रवण करितांक्षणीं ज्याच्या तोंडांतून ज्वाला चालल्या आहेत, अशा त्या विराध राक्षसाला महातेजस्वी राम म्हणाला, "आम्ही इक्ष्वाकुकुलामध्यें उत्पन्न झालों असून क्षत्रिय असतां कांहीं कारणानें वनामध्यें संचार करीत आहों. आतां तूं कोण आहेस व ह्या दंडकारण्यामध्यें संचार कां करीत आहेस, हें जाणण्याची आमची इच्छा आहे."

हें भाषण ऐकून तो विराध राक्षस त्या सत्य व पराक्रमी रामाला म्हणाला, 'राजा रामचंद्रा, मी आपलें वृत्त सांगतों, तें तूं श्रवण कर. मी जवनामक राक्षसाचा पुत्र असून माझी माता शतऱ्हदा होय. ह्या पृथ्वीवर सर्व राक्षस मला विराध असें म्हणतात. मी तपाच्या योगानें ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेऊन त्याच्यापासून ह्या लोकामध्यें शस्त्रानें अवध्यता, अच्छेद्यता व अभेद्यता हीं प्राप्त करून घेतलीं आहेत. तेव्हां ह्या स्त्रियेला सोडून देऊन मोठ्या त्वरेनें जसें आलां, तसें निघून जा. मी तुमचे प्राण हरण करणार नाहीं.'

त्या राक्षसाचें हें वाक्य श्रवण करून कोपानें आरक्तनेत्र झालेला राम भयंकर आकृतीच्या महापापी विराधाला म्हणाला, "हे अधमा, तुला धिक्कार असो! दुसऱ्याच्या स्त्रीला स्पर्श करण्याचें हें नीच कृत्य करून तूं आपल्याला रणांगणामध्यें मृत्यु प्राप्त करून घेत आहेस. आतां माझ्या समोर उभा राहा. माझ्या हातून तूं जिवंत सुटणार नाहींस."

विराधाशीं युद्ध.

असें बोलून रामानें धनुष्य सज्ज केलें, आणि तीक्ष्ण धारा असलेले बाण सत्वर धनुष्याला लावून त्या राक्षसाला प्रहार केला. नंतर प्रत्यंचा चढविलेल्या

धनुष्याला सोन्याचा पिसारा असलेले व गरुड आणि वायु ह्यांप्रमाणें शीघ्र गमन करणारे असे सात बाण लावून त्या राक्षसावर सोडिले. अग्निप्रमाणें उज्ज्वल असे मोराचा पिसारा असलेले ते बाण विराधाच्या शरिराचा भेद करून रक्तानें भरून पडले. ह्याप्रमाणें त्या राक्षसाला प्रहार होतांच त्यानें वैदेहिला खालीं ठेवून हातामध्यें शूल घेतला, आणि तो लक्ष्मणासहवर्तमान रामावर धावला. तेव्हां त्या राक्षसानें मोठ्यानें गर्जना करून इंद्राच्या ध्वजाप्रमाणें असलेला शूल हातामध्यें घेतला असतां, तो मुख पसरिलेल्या यमाप्रमाणें दिसूं लागला. त्याला पाहून प्रलयकालाच्या प्राणिघातक यमाप्रमाणें असलेल्या त्या विराध राक्षसावर ते दोघे भ्राते राम-लक्ष्मण दिव्य बाणांची वृष्टि करूं लागले. तेव्हां शस्त्रानें अवध्य असलेल्या माझ्यावर हे व्यर्थ बाणवृष्टि करीत आहेत, असें पाहून तो महाभयंकर राक्षस हंसला, व जांभया देत उभा राहिला. तेव्हां ते सर्व बाण त्याच्या शरिरापासून आपोआप गळून पडूं लागले. वरदानामुळें अत्यंत वेदना झाल्या असतांहि ज्याचे प्राण गेले नाहींत, असा तो विराध हातामध्यें शूल घेऊन त्या राम-लक्ष्मणाकडे धांवला. तेव्हां शस्त्र धारण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ अशा रामानें वज्राप्रमाणें कांति असलेला व अग्नीसारखा देदीप्यमान असा आकशांतून येणारा तो त्याचा शूल दोन बाणानीं तोडून टाकिला. रामाच्या बाणांनीं तुटून पडलेला तो शूल वज्रप्रहारानें छिन्न होऊन पडलेल्या मेरु पर्वताच्या शिखराप्रमाणें दिसूं लागला. तो शूल पडल्याबरोबर त्या दोघांनीं कृष्णसर्पाप्रमाणें असलेले दोन खड्ग तत्क्षणीं हातामध्यें घेऊन त्या विराध राक्षसाला प्रहार केला. ह्याप्रमाणें अतिशय प्रहार केला असतांहि युद्धामध्यें न हालणाऱ्या त्या पुरुषश्रेष्ठांना आपल्या भुजांमध्यें घेऊन पळून जाण्याची तो विराध इच्छा करूं लागला असतां त्याचा तो आशय जाणून राम लक्ष्मणाला म्हणाला, "ह्या मार्गानें हा राक्षस आपणांला पाहिजे तितकें दूर घेऊन जावो. लक्ष्मणा, ह्याची इच्छा असेल त्याप्रमाणें ह्या राक्षसाला आपणांला घेऊन जाऊं दे. ज्या मार्गानें हा राक्षस चालला आहे, तोच आपला मार्ग आहे."

तदनंतर अतिशय बलामुळें गर्विष्ठ झालेल्या त्या राक्षसानें आपल्या प्रभावानें त्या राम-लक्ष्मणांना वर उचलून धरिलें. आणि मुलांप्रमाणें खांद्यावर ठेवून दिलें. त्या रघुवंशज राम-लक्ष्मणांना ह्याप्रमाणें खांद्यावर घेतल्यानंतर तो विराध भयंकर गर्जना करीत करीत दंडकारण्याकडे तोंड करून निघाला;

आणि ज्यामध्यें नानाप्रकारचे मोठमोठे वृक्ष आहेत, अनेक प्रकारच्या पक्षि-समुदायामुळें जें चित्रविचित्र दिसत आहे, कोल्हे, इतर श्वापदें आणि मृग यांनीं गजबजलेलें असून जें मोठ्या मेघाप्रमाणें आहे, अशा वनामध्यें तो प्रविष्ठ झाला.

सर्ग चौथा.

विराधवध.

रघुवंशजश्रेष्ठ ककुत्स्थकुलोत्पन्न राम-लक्ष्मणांना विराध राक्षस घेऊन जात आहे, असें पाहतांच हात वर करून सीता उच्च स्वरानें आक्रोश करूं लागली. ती म्हणाली, "सत्यनिष्ठ, सुशील व पवित्र असलेल्या ह्या दाशरथि रामाला लक्ष्मणासहवर्तमान विराध राक्षस घेऊन जात आहे. आतां मला अस्वलें, वाघ आणि चित्ते खाऊन टाकितील. हे राक्षसश्रेष्ठा, मी तुला हात जोडितें. तूं मला ने आणि ह्या ककुत्स्थवंशजांना सोड."

सीतेचा हा आक्रोश कानीं येतांच वीर राम-लक्ष्मणांनीं त्या दुरात्म्याच्या वधाविषयीं त्वरा केली. लक्ष्मणानें त्या भयंकर राक्षसाचा डावा हात व रामानें उजवा हात जोर करून फोडिला. तेव्हां हात मोडून गेलेला तो राक्षस व्याकुल झाला, आणि वज्रानें विदीर्ण झालेल्या पर्वताप्रमाणें तो मेघतुल्य राक्षस मूर्च्छित होऊन तत्काल भूमीवर पडला. तेव्हां ते राम-लक्ष्मण बुक्क्यांनीं, चपराकांनीं आणि लाथांनीं त्या राक्षसाला मारूं लागले, आणि प्रयत्न करकरून भूमीवर अगदीं चिरडूं लागले. परंतु अनेक बाणांनीं जरी तो विद्ध झाला होता, खड्गांनीं जरी त्याच्या शरिरावर जखमा झालेल्या होत्या आणि भूमीवर जरी तो अनेक प्रकारांनीं चिरडलेला होता, तरी तो राक्षस मेला नाहीं. तेव्हां भयप्रसंगीं अभय देणारा श्रीमान राम त्या अत्यंत अवध्य असलेल्या पर्वतप्राय राक्षसाकडे पाहून म्हणाला, "हे पुरुषश्रेष्ठा लक्ष्मणा, तपश्चर्या करून ह्या राक्षसानें वर प्राप्त करून घेतला असल्यामुळें शस्त्रानें युद्धामध्यें ह्याचा पराभव होणें शक्य नाहीं. ह्यास्तव आपण ह्या राक्षसाला पुरून टाकूं. तेव्हां लक्ष्मणा, प्रचंड हत्तीला पुरण्याकरितां जसा फारच मोठा खड्डा खणावा लागतो, तसा ह्या उग्रतेजस्वी राक्षसाकरितां तूं ह्या वनामध्यें बराच मोठा खड्डा खण."

विराधाचें पूर्ववृत्त.

ह्याप्रमाणें लक्ष्मणाला सांगून वीर्यवान राम त्या राक्षसाच्या मानेवर पाय

देऊन उभा राहिला. तेव्हां तें रामाचें भाषण श्रवण करून तो विराध राक्षस पुरुषश्रेष्ठ रामाला नम्रपणें म्हणाला, 'हे पुरुषश्रेष्ठा, त्वां इंद्रतुल्य बलाढ्यानें माझा वध केला आहे. हे पुरुषोत्तमा, मीं पूर्वी मोहामुळें तुला ओळखिलें नाहीं. बा रामा, तुझ्या योगानें कौसल्या सुपुत्रवती झाली आहे. तुज रामाला, महाभाग्यवती सीतेला आणि महायशस्वी लक्ष्मणाला मीं आतां ओळखिलें. ही घोर राक्षसी तनु मला शापामुळें प्राप्त झालेली आहे. परंतु मी पूर्वी तुंबुरु नामक गंधर्व असून कुबेरानें मला शाप दिला होता. शाप झाल्यानंतर मी शापनिवृत्तीकरितां त्याची प्रार्थना करूं लागलों असतां तो महायशस्वी कुबेर म्हणाला, 'दाशरथि राम जेव्हां संग्रामामध्यें तुझा वध करील, तेव्हां तुला आपलें गंधर्वरूप प्राप्त होऊन तूं स्वर्गाला जाशील.' मी रंभेचे ठिकाणीं आसक्त होऊन गेल्या कारणानें माझ्या हातून कुबेर राजाची सेवा होईनाशी झाल्यामुळें क्रुद्ध होऊन त्यानें मला तसा शाप दिला होता, व त्याच्याच सांगण्याप्रमाणें मी आतां तुझ्या कृपेनें त्या अत्यंत भयंकर शापांतून मुक्त झालों आहें.'

विराध पुढें म्हणतो:—'रामा, आतां मी आपल्या स्वर्गलोकाला जातों. हे शत्रुतापना, तुमचें कल्याण असो. येथून सुमारें दीड योजनावर प्रतापी, धर्मनिष्ठ आणि सूर्यासारखे तेजस्वी असे शरभंग महर्षि राहत आहेत, त्यांच्याकडे तूं सत्वर जा. ते महर्षि तुझें कल्याण करितील. रामा, मला खळीमध्यें गाडून टाकून मग तूं खुशाल जा. कारण गतप्राण झालेल्या राक्षसांचा खळींत राहणें हा सनातन धर्म असून जे राक्षस खळीमध्यें पुरले जातात, त्यांना अक्षय्य लोक प्राप्त होतात."

ह्याप्रमाणें पीडित झालेला तो महाबलाढ्य राक्षस रामाला सांगून व देहत्याग करून स्वर्गाला गेला. तेव्हां तें त्याचें भाषण ऐकून रामानें पुनः लक्ष्मणाला खड्डा खणण्यास सांगितलें, आणि आपण त्या विराध राक्षसाच्या मानेवर पाय देऊन उभा राहिला. नंतर लक्ष्मणानें कुदळ घेऊन त्या विराधाच्या बाजूला एक चांगलासा खड्डा खणला व रामानें त्याच्या मानेवरून पाय काढिल्यावर शंकूप्रमाणें कठीण कर्ण व महाध्वनि ह्यांनीं युक्त असलेला तो विराध राक्षस भयंकर गर्जना करीत असतांना लक्ष्मणानें त्याला त्या खड्ड्यांत लोटून दिलें. सारांश तीक्ष्ण शस्त्रानें त्या महादैत्याचा वध होत नाहीं, असें आढळून आल्यावर युद्धामध्यें अत्यंत निपुण असलेल्या त्या उभयतां पुरुषश्रेष्ठ राम-लक्ष्मणांनीं विराधाला खड्ड्यांत पुरून त्याचा वध केला. रामाच्या हातून

इच्छिलेला जो मृत्यु त्या आपला उद्देश सिद्धीस नेणाऱ्या मृत्यूला उद्देशून अरण्यांत संचार करणाऱ्या राक्षसानें 'शस्त्रानें माझा वध होणार नाहीं' असें स्वतः रामाला निवेदन केलें. तेव्हां तेंच त्याचें भाषण ऐकून त्याला खड्डयांत टाकण्याचा त्यानें विचार केला. ते त्या राक्षसाला खड्डयांत टाकूं लागले असतां त्यानें तें वन दणाणून सोडिलें. असो. ह्याप्रमाणें त्या विराध राक्षसाला खळींत टाकून ते राम-लक्ष्मण आनंदित झाले, आणि निर्भय होऊन आकाशांतील सूर्यचंद्राप्रमाणें ते त्या महावनामध्यें कांहीं दिवस आनंदांत राहिले.

सर्ग पांचवा.

शरभंगाश्रमीं गमन.

भयंकर बलानें युक्त असलेल्या त्या विराध राक्षसाचा वध करून आणि सांत्वनपूर्वक सीतेला आलिंगन देऊन तो वीर्यवान राम उज्ज्वल तेजस्वी भ्राता लक्ष्मणाला म्हणाला, "हें वन पीडादायक व गमनाला अयोग्य असें आहे. आणि आपणांला तर आजपर्यंत वनामध्यें राहण्याचा अनुभव नाहीं. ह्यास्तव आतां आपण सत्वर तपोधन शरभंगऋषींकडे जाऊं."

इंद्रदर्शन.

असें म्हणून राम शरभंग मुनींच्या आश्रमाला गेला. तेव्हां तपश्चर्येनें ज्यांचें चित्त शुद्ध झालेलें आहे व देवांप्रमाणें ज्यांचा प्रभाव आहे, अशा त्या शरभंग मुनींच्या आश्रमासमीप रामानें एक मोठा अद्भुत प्रकार अवलोकन केला. सूर्य आणि अग्नि ह्यांप्रमाणें तेजस्वी, शरीरकांतीनें देदीप्यमान, देवरूप सेवकांनीं युक्त, अत्यंत उज्ज्वल भूषणें आणि निर्मल वस्त्रें धारण केलेला, भूमीवर उतरला असतांहि भूमीला स्पर्श न करणारा, तशाच प्रकारचीं भूषणें वगैरे धारण करून स्तुति करीत असलेल्या अनेक महात्म्यांनीं परिवेष्टित आणि श्रेष्ठ रथामध्यें आरूढ झालेला असा आकाशामध्यें देवराज इंद्र व श्यामवर्ण अश्वांनीं युक्त असून अंतरिक्षांतून चालणारा त्याचा रथ हे रामाच्या दृष्टीस पडले. त्याच्या समीपच बालसूर्याप्रमाणें तेजस्वी, श्वेतवर्ण अभ्राप्रमाणें अतिशय कांतीनें युक्त, चंद्रमंडळासारख्या प्रभेनें संपन्न आणि आश्चर्यकारक पुष्पांनीं सुशोभित असें एक निर्मल छत्र व उत्कृष्ट स्त्रियांनीं हातांत घेतलेलीं, मस्तकावर हालत अस-

केलीं आणि सुवर्णदंडांनीं युक्त असलेलीं मोठीं मूल्यवान चामरें त्यानें अवलोकन केलीं. गंधर्व, देव, सिद्ध आणि अनेक महर्षी त्या आकाशांत असणाऱ्या देवाची उत्कृष्ट शब्दांनीं स्तुति करीत होते. नंतर इंद्र शरभंग मुनींशीं भाषण करूं लागला असतां, त्या इंद्राला ओळखून राम लक्ष्मणाशीं बोलूं लागला. रथाकडे बोट करून प्रथमतः रामानें आपल्या भ्रात्याला तो अद्भुत रथ दाखविला आणि म्हटलें, " लक्ष्मणा, तेजस्वी कांतीनें युक्त, सूर्याप्रमाणें प्रकाशत असलेला आणि अंतरिक्षामध्यें गमन करणारा हा अद्भुत रथ तूं अवलोकन कर. यागाकरितां असंख्य वेळां यज्ञ करणारांनीं आव्हान केलेल्या स्वर्गाधिपति इंद्राचे अश्व जे आम्हीं ऐकिले होते, तेच हे अंतरिक्षामध्यें गमन करणारे दिव्य अश्व निःसंशय होत. लक्ष्मणा, कुंडलें धारण करून हातांत खड्ग घेतलेले जे हे शंभर शंभर तरुण पुरुष इंद्राच्या चारी दिशांना उभे राहिले आहेत, त्यांचीं वक्षःस्थलें फारच विशाल आहेत. त्यांचे हात लांब लांब आहेत. त्यांनीं रक्तवस्त्रें परिधान केलीं आहेत. ते सर्वहि समीप येणाऱ्याला व्याघ्रांप्रमाणें भयप्रद आहेत. सर्वांच्याहि वक्षःस्थलावर अग्नीसारखे उज्ज्वल हार लोंबत आहेत आणि त्यांनीं धारण केलेल्या रूपावरून त्या सर्वांचें वय पंचवीस वर्षांचें असावें, असें दिसत आहे. आल्हादकारक मुद्रेनें युक्त असलेले हे पुरुषश्रेष्ठ ज्याप्रमाणें दिसत आहेत, त्याचप्रमाणें देवांचें वय नित्य कायम असतें, हे इतिहासप्रसिद्ध आहे. लक्ष्मणा, तूं सीतेसहवर्तमान एक क्षणभर येथेंच उभा रहा. तोंवर हा कोण तेजस्वी पुरुष रथामध्यें बसला आहे, हें मी स्पष्टपणें समजून घेतों. "

इंद्राचें स्वर्गलोकीं गमन.

ह्याप्रमाणें लक्ष्मणाला सांगून काकुत्स्थ राम शरभंग मुनींच्या आश्रमाकडे गेला. तेव्हां राम येत आहे असें अवलोकन केल्यावर शचीपति इंद्र शरभंग मुनींची अनुज्ञा घेऊन देवांना म्हणाला, " हा राम इकडे येत आहे. परंतु इकडे येऊन हा माझ्याशीं भाषण करण्यापूर्वींच आपण स्वर्गाला जाऊं. पुढें ह्याला माझें दर्शन होईल, आणि रावणाला जिंकून लवकरच हा कृतार्थ झाला म्हणजे मी ह्याला अवलोकन करीन. इतरांनीं करण्यास अत्यंत दुष्कर असें मोठें कर्म ह्याच्या हातून व्हावयाचें आहे. " ह्याप्रमाणें देवांना सांगितल्यावर वज्रपाणि इंद्रानें आदरपूर्वक त्या मुनींची अनुज्ञा घेतली, आणि अश्व जोडिल्यावर रथावर आरूढ होऊन तो शत्रुदमन करणारा इंद्र स्वर्गामध्यें चालता झाला.

शरभंगमुनींचें वृत्त.

इंद्र निघून गेल्यावर लक्ष्मण व सीता ह्यांसहवर्तमान राम होमशालेमध्यें बसलेल्या शरभंग मुनीकडे गेला. समीप गेल्यावर राम, सीता आणि लक्ष्मण ह्यांनीं त्या मुनींचे पाय धरिले. नंतर त्यांनीं भोजनाकरितां वगैरे निमंत्रण केल्यावर व राहण्याच्या जागेची सोय लाविल्यावर त्यांची अनुज्ञा घेऊन ते तेथें बसले.

तदनंतर इंद्राच्या आगमनाचें प्रयोजन रामानें त्यांना विचारिलें. तेव्हां शरभंग म्हणाले, "रामा, चित्तशुद्धि न केलेल्या पुरुषांना प्राप्त होण्यास दुर्धर असा जो ब्रह्मलोक मीं उग्र तपश्चर्येनें संपादन करून ठेविला आहे, त्या ब्रह्मलोकाला मला नेण्याची हा वरप्रद इंद्र इच्छा करीत आहे; परंतु हे पुरुषश्रेष्ठा, तूं अत्यंत प्रिय अतिथि जवळच आला आहेस, असें समजून आल्यामुळें तुझें दर्शन घेतल्यावांचून मीं ब्रह्मलोकाला न जाण्याचा विचार केला. हे पुरुषश्रेष्ठा, तुज महात्म्या धर्मनिष्ठाची भेट घेऊन नंतर निकृष्ठ स्वर्गामध्यें व उत्कृष्ठ ब्रह्मलोकांमध्यें मी गमन करीन. हे पुरुषोत्तमा, मीं तपश्चर्येच्या योगानें अक्षय्य व शुभ असे ब्रह्मलोक आणि स्वर्गलोक संपादन करून ठेविले आहेत, त्या माझ्या लोकांचा तूं स्वीकार कर."

ह्याप्रमाणें शरभंग ऋषींनीं पुरुषश्रेष्ठ रामाला सांगितलें असतां तो सर्व शास्त्रपारंगत वीर त्यांना म्हणाला, "हे महामुने, मीच तपश्चर्येनें सर्व लोक संपादन करीन. आपण फक्त ह्या अरण्यामध्यें वास्तव्य करण्याकरितां एक जागा दाखवून द्यावी, एवढीच माझी इच्छा आहे."

सुतीक्ष्णाश्रमीं जाण्याविषयीं प्रेरणा.

त्या इंद्रासारख्या बलाढ्य रामानें ह्याप्रमाणें शरभंग मुनींना सांगितलें असतां ते महाज्ञानी मुनि पुनरपि त्याला म्हणाले, "रामा, ह्या अरण्यामध्यें जितेंद्रिय, धर्मनिष्ठ आणि महातेजस्वी सुतीक्ष्णऋषी आहे, तो तुझें कल्याण करील. राघवा, पुष्पसमुदाय वाहून नेणाऱ्या ह्या मंदाकिनी नदीच्या प्रवाहाचे उलट दिशेस तूं जा, म्हणजे तेथें जाशील. हे पुरुषश्रेष्ठा, हा त्या आश्रमाचा मार्ग होय. बा रामा, एक क्षणभर माझ्याकडे दृष्टि दे, म्हणजे तोंपर्यंत जीर्ण त्वचेचा त्याग करणाऱ्या सर्पाप्रमाणें मी ह्या गात्रांचा त्याग करितों."

शरभंग मुनींचें दिव्यलोकीं गमन.

ह्याप्रमाणें रामाची प्रार्थना केल्यावर त्या शरभंग मुनींनीं अग्निस्थापना केली, आणि त्यामध्यें घृतानें समंत्रक हवन करून त्या महातेजस्वी मुनींनीं अग्नी-

मध्यें प्रवेश केला. नंतर त्या महात्म्या मुनींचे रोम, केश, जीर्ण त्वचा, अस्थि, मांस आणि रक्त असें जें कांहीं होतें, तें अग्नीनें दग्ध केलें. तेव्हां त्या अग्निराशींतून ते शरभंग मुनि अग्नितुल्य तेजस्वी कुमाराच्या रूपानें बाहेर येऊन प्रकाशूं लागले. नंतर अग्निहोत्री, महर्षी व देव ह्यांच्या लोकांचें अतिक्रमण करून ते ब्रह्मलोकाला चालते झाले. तेथें गेल्यावर त्या पुण्यकर्म करणाऱ्या द्विजश्रेष्ठ शरभंग मुनींनीं सेवकांसहवर्तमान ब्रह्मदेवाला अवलोकन केलें. ब्रह्मदेवहि त्यांना पाहून आनंदित झाले, आणि 'आपलें सुस्वागत असो' असें त्या द्विजाला म्हणाले.

सर्ग सहावा.

राक्षसांपासून रक्षण करण्याविषयीं मुनींची रामास प्रार्थना.

शरभंग मुनि स्वर्गाला गेल्यावर ऋषिगण एकत्र जुळून अग्नीप्रमाणें तेजस्वी असलेल्या ककुत्स्थकुलोत्पन्न रामाकडे आले. सारांश ईश्वराच्या नखांपासून उत्पन्न झालेले–वैखानख, केसांपासून उत्पन्न झालेले–वालखिल्य, पादप्रक्षालनापासून उत्पन्न झालेले–संप्रक्षाल, सूर्यचंद्रांच्या किरणांवर उपजीविका करणारे–मरीचिप, कुटलेलें अन्न खाणारे–अश्मकुट्ट, वृक्षांच्या गलित पानांवर उपजीविका करून राहणारे–पत्राहार, दांतांवांचून कुटण्याचें वगैरे साधन जवळ न बाळगणारे–दंतोलूखली, गळ्याइतक्या पाण्यांत उभे राहून तप करणारे–उन्मज्जक, भूमीवर कांहींएक न पसरितां शयन करणारे–गात्रशय्य, कधींच निद्रा न घेणारे–अशय्य, एका पावलापेक्षां जास्त जागेची अपेक्षा न धरितां तेवढ्याच जागेवर उभे राहून तपश्चर्या करणारे–अनवकाशिक, उघड्या प्रदेशामध्यें राहणारे–आकाशनिलय, ओटा घालून त्यावर पडून राहणारे–स्थंडिलशायी, पर्वतशिखरासारख्या उच्च प्रदेशावर नेहमीं वास्तव्य करणारे–ऊर्ध्ववासी, सर्वदा अध्ययन करणारे–तपोनिष्ठ, उदकपान करून राहणारे मुनी, वायुभक्षण करून राहणारे मुनी, जितेंद्रिय, नेहमीं आर्द्र वस्त्र परिधान करणारे, नेहमीं जप करीत राहणारे आणि उन्हाळ्यामध्यें पंचाग्निसाधन करणारे पंचतपोन्वित असे सर्व ब्रह्मतेजानें युक्त असलेले व योगानें एकाग्रचित्त असलेले तपस्वी शरभंग मुनींच्या आश्रमामध्यें आले. धर्माचरण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ आणि परमधर्मज्ञ राम-

समीप जाऊन म्हणाले, " इंद्र ज्याप्रमाणें देवांचा अधिपति आहे, त्याप्रमाणें तू महारथि ह्या इक्ष्वाकुकुलाचा आणि ह्या पृथ्वीचा मुख्य अधिपति आहेस. यश आणि पराक्रम ह्यांच्या योगानें तूं त्रैलोक्यामध्यें विख्यात आहेस. पित्राज्ञापरिपालनरूप व्रतत्व, सत्यवचन आणि संपूर्ण धर्म हे तुझे ठिकाणीं आहेत. हे नाथ, धर्मज्ञ, धर्मवत्सल आणि महात्म्या अशा तुझ्याकडे कांहीं प्रार्थना करण्याकरितां आम्ही आलों आहों. आम्ही कांहीं सांगणार आहों, त्याची तूं आम्हांला क्षमा कर. हे नाथ प्राप्तीचा सहावा अंश कररूपानें घेऊनहि जो प्रजेचें पुत्रांप्रमाणें रक्षण करीत नाहीं, त्या भूपतीला फारच मोठें पातक लागतें. प्रजारक्षणाविषयीं यत्न करणारा आणि नेहमीं दक्ष राहणारा जो राजा आपल्या देशामध्यें वास्तव्य करणाऱ्या सर्व लोकांचें प्राणापेक्षांहि प्रिय असलेल्या पुत्रांप्रमाणें नेहमीं रक्षण करीत असतो, त्याला असंख्य वर्षें टिकणारी अक्षय्य कीर्ति प्राप्त होते. आणि ब्रह्मलोक प्राप्त होऊन तेथेंहि त्याची प्रशंसाच होत असते. फलमूलांवर उपजीविका करणारा मुनि जें कांहीं उत्कृष्ठ पुण्य संपादन करितो, त्याचा चौथा अंश धर्मानें प्रजारक्षण करणाऱ्या राजाला प्राप्त होतो. असो. रामा, सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, तूं ह्याचा नाथ असतांनाहि—ब्राह्मणांची संख्या ज्यामध्यें अधिक आहे, अशा ह्या वानप्रस्थांच्या मोठ्या समुदायाचा—अनाथाप्रमाणें राक्षस वारंवार घात करीत आहेत. आमच्या बरोबर ये, आणि वनामध्यें घोर राक्षसांनीं नानाप्रकारांनीं मारून टाकिलेल्या भगवच्चिंतननिष्ठ मुनींचीं शरीरें तूं अवलोकन कर. पंपा नदी, मंदाकिनी आणि चित्रकूट पर्वत ह्या ठिकाणीं वास्तव्य करणाऱ्या मुनींचा भयंकर संहार चालला आहे. ह्याप्रमाणें भयंकर कर्म करणारे राक्षस तपस्वी लोकांना वनामध्यें जें घोर दुःख देत असतात, तें आतां आमच्यानें सहन होत नाहीं. म्हणूनच रक्षणाकरितां आम्ही तुज रक्षकाकडे आलों आहों. ह्यास्तव रामा, आमचें परिपालन कर. राक्षस आमचा वध करीत आहेत. हे वीरा, ह्या पृथ्वीमध्यें तुझ्याशिवाय आम्हांला दुसरा कोणीहि त्राता नाहीं. तस्मात् हे राजपुत्रा, आम्हां सर्वांचें तूं राक्षसांपासून संरक्षण कर. "

हें त्या ऋषींचें भाषण श्रवण करून धर्मात्मा ककुत्स्थकुलोत्पन्न राम त्या सर्वांहि तपस्व्यांना म्हणाला, " माझ्याशीं आपण असें भाषण करूं नका. मी तपस्वी जनांचा सेवक आहें. आपण जें सांगत आहां, तें माझें कर्तव्यच आहे. तेव्हां केवल आपलें कर्तव्य असें समजून तरी तें करण्याकरितां मला वनामध्यें

प्रवेश करणें अवश्यच आहे. पित्याची आज्ञा परिपालन करण्याकरितां मी ह्या वनामध्यें प्रविष्ठ झालों आहें. तेव्हां ह्या कार्यांतच राक्षसांनीं आपणांला दिलेलें हें दुःख दूर करण्याचेंहि कार्य होऊन जाणार आहे.—आपलें दुःख दूर करण्याकरितां म्हणूनच मला वनामध्यें गेलें पाहिजे, अशांतली कांहीं गोष्ट नाहीं. स्वेच्छेनें मी ह्या वनामध्यें आलों आहें, आणि त्यांत आपलें कार्य करण्याकरितां आल्यासारखें होणार आहे. तस्मात् हा माझा वनवास महाफलदायक होणार आहे. असो. तपस्वी जनांचे शत्रु जे राक्षस, त्यांचा संग्रामामध्यें वध करण्याची माझी इच्छा आहे. तेव्हां आतां तपोधन ऋषींनीं भ्रात्यासहवर्तमान माझें सामर्थ्य अवलोकन करावें."

ह्याप्रमाणें तपोधन ऋषींना वचन देऊन धर्माकडेच चित्त असलेला तो वीर, लक्ष्मण व तपोधन ऋषी ह्यांसहवर्तमान सुतीक्ष्ण मुनींकडेच निघाला.

सर्ग सातवा.

सुतीक्ष्णाश्रमीं गमन.

सुतीक्ष्ण मुनींच्या आश्रमाकडे निघालेल्या त्या सर्वांना बराच मार्ग आक्रमण केल्यावर आणि ते मोठमोठ्या नद्या तरून गेल्यावर महामेरु पर्वताप्रमाणें उंच असलेला एक निर्मल पर्वत त्यांच्या दृष्टीस पडला. तदनंतर ज्यामध्यें नानाप्रकारचे वृक्ष आहेत, अशा वनामध्यें ते इक्ष्वाकुवंशजश्रेष्ठ राम-लक्ष्मण सीतेसहवर्तमान प्रविष्ठ झाले. त्या घोर वनामध्यें गेल्यावर एकांत प्रदेशामध्यें वल्कलसमूहांनीं सुशोभित आणि विपुल पुष्पांनीं व फलांनीं संपन्न असलेल्या वृक्षांनीं युक्त असा आश्रम रामानें अवलोकन केला. सर्वपापनाशार्थ पद्मासन घालून समाधि लावणारे तपोधन सुतीक्ष्ण मुनि आंत बसले असतां राम योग्य रीतीनें त्यांच्या समीप जाऊन त्यांना म्हणाला, "भगवन्, मी राम आपल्या दर्शनाकरितां आलों आहें. तस्मात् हे धर्मज्ञ, हे महर्षे, हे अमोघ तपःसामर्थ्यवान, आपण माझ्याशीं बोला."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां, धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ असलेल्या रामाकडे पाहून व त्याला कवटाळून ते ज्ञानी सुतीक्ष्ण मुनि त्याला म्हणाले, "हे रघुवंशजोत्तमा, हे धर्मनिष्ठश्रेष्ठ, तुझें स्वागत असो. तुझे पाय लागल्यामुळें आज हा आश्रम सनाथासारखा दिसत आहे. हे महायशस्वी वीरा, देहाचा त्याग

करून येथून देवलोकीं आरोहण न करितां तुझीच वाट पहात मी येथें बसलें आहें. राज्यापासून भ्रष्ट होऊन तूं जेव्हां चित्रकूट पर्वतावर येऊन राहिला होतास, तेव्हांपासूनच तूं इकडे येणार येणार म्हणून मीं ऐकिलें होतें. असो. रामा, शरभंग मुनींना ब्रह्मलोकीं जाण्याचें निमंत्रण केल्यावर देवराज इंद्र येथें आला होता. येथें आल्यावर 'पुण्यकर्मानें आपण सर्व लोक संपादन केले आहेत' असें मला त्या तेजस्वी सुरश्रेष्ठ देवराज इंद्रानें सांगितलें. तेव्हां रामा, देवर्षी ज्यामध्यें वास्तव्य करितात, असे जे लोक तपश्चर्येच्या योगानें मीं संपादन करून ठेविले आहेत, त्या लोकांचा, लक्ष्मण आणि सीता ह्यांसहवर्तमान माझ्या प्रसादानें तूंच उपभोग घे."

त्या मुनींचें हें भाषण ऐकून ब्रह्मदेवाशीं भाषण करणाऱ्या इंद्राप्रमाणें तो मनोनिग्रही राम त्या उग्रतपस्वी, सत्यनिष्ठ व तेजस्वी सुतीक्ष्ण महर्षींना म्हणाला, "हे महामुने, मी स्वतःच तपश्चर्येच्या योगानें लोक संपादन करीन. ह्या वनामध्यें आपण दर्शविलेल्या निवासस्थानाचीच मला अपेक्षा आहे. आपण सर्वस्वी कुशल असून प्राणिमात्रांच्या हिताविषयीं तत्पर आहां, असें महात्म्या गौतमकुलोत्पन्न शरभंग महर्षींनीं मला सांगितलें आहे."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां त्या जगद्विख्यात् सुतीक्ष्ण महर्षींना मोठा आनंद झाला, आणि ते मधुर शब्दांनीं त्याला म्हणाले, "रामा, हाच आश्रम सोयीचा आहे. येथें तूं आनंदानें राहा. येथें ऋषिसमुदाय राहत असून हा आश्रम नेहमीं फलमूलांनीं संपन्न असतो. ह्या आश्रमामध्यें सर्वस्वी निर्भय असलेले मृगसमुदाय मोठमोठ्यांनाहि लोभपाशांत गुंतवून त्यांचा वध न होतां ते परत जातात. मृगांशिवाय दुसरा तिसरा दोष ह्या आश्रमामध्यें कांहींएक नाहीं."

हें त्या महर्षींचें भाषण श्रवण करून तो विचारी राम त्यांना म्हणाला, "हे महाभाग्यवान मुने, ते मृगसमुदाय समीप आले असतां बाणासहवर्तमान धनुष्य घेऊन वांकड्या पेरांच्या व तीक्ष्ण अशा बाणानें मी त्यांचा वध करीन; परंतु मृगांचा वध झाला असतां आपणांला दुःख होईल. तेव्हां यापेक्षां वाईट गोष्ट ती कोणती आहे? ह्यास्तव ह्या आश्रमामध्यें फार दिवस राहण्याची माझी इच्छा नाहीं."

ह्याप्रमाणें त्या मुनींना सांगून राम संध्यावंदन करण्याकरितां निघून गेला. सायंसंध्या केल्यावर त्या सुतीक्ष्ण मुनींच्या रम्य आश्रमामध्यें सीता आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान रामानें वास्तव्य केलें. नंतर संध्याकाळ टळून रात्र पडली असें दिसून आल्यावर महात्म्या सुतीक्ष्ण मुनींनीं तपस्वी लोकांना योग्य असें अन्न स्वतः त्या पुरुषश्रेष्ठ राम-लक्ष्मणांना उत्तम सत्कारपूर्वक अर्पण केलें.

सर्ग आठवा.

सुतीक्ष्णांचा निरोप घेऊन पुढें जाणें.

सुतीक्ष्ण मुनींनीं लक्ष्मणासहवर्तमान आदरसत्कार केलेला राम त्या आश्रमामध्यें रात्र घालविल्यावर प्रभातकालीं जागा झाला, आणि सीतेसहवर्तमान योग्य वेळीं उठून कमलाच्या वासानें युक्त असलेल्या चांगल्या उदकानें त्यानें स्नान केलें. नंतर सीता आणि राम-लक्ष्मण ह्यांनीं अग्नीचें व देवांचें पूजन केलें, आणि सूर्य उदयास येत असलेला पाहून ते रामप्रभृति निष्पाप त्रिवर्ग सुतीक्ष्ण मुनींकडे जाऊन मधुर वाणीनें त्यांना म्हणाले, " भगवन्, आम्ही येथें सुखानें राहिलों, आणि आपण आम्हांस पूज्य असतांनाहि आमचा आदरसत्कार केला. आतां आम्ही आपला निरोप घेतों. कारण मुनि आम्हांला त्वरा करीत आहेत. दंडकारण्यनिवासी पुण्यशील ऋषींचा संपूर्ण आश्रमसमुदाय अवलोकन करण्याची आम्हांला त्वरा आहे. तेव्हां नित्य धर्मनिष्ठ, तपामुळें जितेंद्रिय आणि धूमरहित अग्नीप्रमाणें असलेल्या ह्या मुनिश्रेष्ठांसहवर्तमान आतां जाण्याची अनुज्ञा मिळावी अशी आमची इच्छा आहे. ह्याकरितां सूर्य अतिप्रखर होऊन—हीन कुलांत जन्मलेल्या पुरुषानें अन्यायानें ऐश्वर्य प्राप्त करून घेतल्यावर त्या प्रभूचा प्रताप ज्याप्रमाणें दुःसह होतो, त्याप्रमाणें—त्याचा ताप दुःसह झाला नाहीं तोंच येथून जाण्याची आमची इच्छा आहे."

असें म्हणून लक्ष्मण आणि सीता ह्यांसहवर्तमान रामानें त्या मुनींच्या चरणांना अभिवंदन केलें. तेव्हां त्या राम-लक्ष्मणांना उठवून व त्यांना कडकडून भेटून ते मुनिश्रेष्ठ सुतीक्ष्ण प्रेमपूर्वक म्हणाले, " रामा, छायेप्रमाणें अनुसरून वागणारी ही सीता आणि हा लक्ष्मण ह्यांसहवर्तमान तूं उपद्रवरहित निर्विघ्नपणें मार्गाला लाग. हे वीरा, तपानें ज्यांचें अंतःकरण शुद्ध झालें आहे, अशा ह्या दंडकारण्यनिवासी मुनींचे रम्य आश्रम तूं अवलोकन कर. फलमूलांची ज्यांत समृद्धि आहे, मृगांचे प्रशस्त कळप ज्यामध्यें आहेत आणि ज्यांतील पक्षिगण शांत आहेत, अशीं प्रफुल्लित वनें, प्रफुल्लित कमलसमूह व निर्मल उदक ह्यांनीं युक्त असून, करंडोल पक्ष्यांनीं गजबजून गेलेलीं सरोवरें व तडाग, दृष्टीला मनोहर दिसणारे पर्वतावरील प्रवाह आणि मयूर पक्ष्यांनीं नादित झालेलीं अरण्यें तूं अवलोकन करशील. वत्सा, जा; लक्ष्मणा, तूंहि जा. रामा, ते आश्रम अवलोकन करून तूं पुनरपि माझ्या आश्रमाला परत येच."

ह्याप्रमाणें सुतीक्ष्ण मुनींनीं सांगितलें असतां 'ठीक आहे' असें म्हणून व त्या मुनींना प्रदक्षिणा करून लक्ष्मणासहवर्तमान राम पुढें जाण्यास निघाला. तेव्हां सीतेनें त्या उभयतां भ्रात्यांना पहिल्यापेक्षां चांगले भाते, धनुष्यें आणि निर्मळ खड्ग दिलें. नंतर ते शुभ भाते पाठीशीं बांधून आणि टणत्कार करणारीं धनुष्यें हातांत घेऊन दंडकारण्यांत जाण्याकरितां ते उभयतां राम-लक्ष्मण आश्रमांतून बाहेर निघाले, आणि सुतीक्ष्ण महर्षींनीं अनुज्ञा दिल्यावर धनुष्य व खड्ग हातांत घेऊन सीतेसहवर्तमान सत्वर पुढें चालूं लागले.

सर्ग नववा.

रामाशीं सीतेचें धर्मार्थयुक्त भाषण.

सुतीक्ष्ण मुनींनीं अनुज्ञा दिल्यावर चालूं लागलेल्या भर्त्या रघुनंदन रामाला मनोहर आणि सप्रेम अशा वाणीनें सीता म्हणाली, "सूक्ष्म मार्गानें विचार करून पाहिला असतां, अति दुर्बल अशा मृगांच्या वधाची प्रतिज्ञा करून वनामध्यें आपण प्रवेश केला, तर आपल्या हातून मोठा अधर्म होणार आहे. आणि हा अधर्म कामजन्य व्यसनापासून आपण परावृत्त झाल्यास टळणें शक्य आहे. सांप्रत तीनच व्यसनें कामापासून उत्पन्न होत असतात. मिथ्या भाषण हें एक मुख्य व्यसन आहे. इतर दोन--परस्त्रीसेवन आणि वैरावांचून क्रौर्याचें अवलंबन--हीं त्याच्याहिपेक्षां भयंकर आहेत. प्रभो, ह्या तीन व्यसनांपैकीं मिथ्या भाषण आपल्या हातून आजपर्यंत झालें नाहीं व पुढेंहि होणार नाहीं. धर्मनाशक असा परस्त्रीचा अभिलाष तर कोठून असणार? हे लोकनाथ, तो अभिलाष तुम्हांला कधींच झाला नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु हे रामा, परस्त्रीचा अभिलाष ही गोष्ट आपल्या कधीं स्वप्नामध्येंहि नाहीं. हे राजकुमार, आपण नेहमीं स्वस्त्रीचेच ठिकाणीं रत आहां. आपण पित्याची आज्ञा परिपालन करणारे असून धर्मनिष्ठ व सत्यप्रतिज्ञ आहां; आणि धर्म व सत्य हें सर्व आपणांवरच अवलंबून आहे. हे शुभदर्शन, जितेंद्रिय पुरुषांच्या हातून एकपत्नीव्रताचें परिपालन होणें व सत्य भाषण हें सर्व शक्य आहे. कारण इंद्रियें आपल्या स्वाधीन आहेत. परंतु मोहानें वैराशिवाय दुसऱ्यांच्या प्राणांची हिंसा करणें हें जें रौद्रसंज्ञक तिसरें व्यसन, तें आज आपणांला

प्राप्त झालें आहे. कारण दंडकारण्यनिवासी ऋषींच्या संरक्षणाकरितां संग्रामामध्यें राक्षसांचा वध करण्याची आपण प्रतिज्ञा केली आहे. ह्याकरितां दंडक ह्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या वनामध्यें आपण भ्रात्यासहवर्तमान धनुर्बाण घेऊन निघालां. आपण निघालां असें पाहून, आणि आपला वचन खरें करून दाखविण्याचा स्वभाव लक्ष्यांत आणून मी आपल्या पारलौकिक व ऐहिक सुखाचा विचार करूं लागलें म्हणजे माझें मन व्याकुळ होतें. सारांश, हे वीर, दंडकारण्यांत जाणें मला रुचत नाहीं. मी त्याचें कारण सांगतें, तें ऐका. आपण धनुर्बाण हातांत घेऊन भ्रात्यासह वनांत गेल्यावर तेथील वनचर राक्षसांना अवलोकन करून कदाचित् बाणांचा व्यय कराल, हेंच आधीं हिंसारूप अधर्मप्राप्तीचें कारण आहे. बरें बाण न सोडितां आपण स्वस्थ बसाल म्हणावें, तरी तेंहि शक्य नाहीं. कारण ज्याप्रमाणें इंधनें अग्नीचें तेज जास्त करितात, त्याप्रमाणें क्षत्रियांचें धनुष्य ज्याच्या समीप असेल, त्या पुरुषाचें तें तेज वाढवीत असतें. हे महापराक्रमी राघवा, ज्यांतील पशुपक्षी शांत आहेत, अशा एका पवित्र वनामध्यें पूर्वी एक सत्यनिष्ठ व शुचिर्भूत तपस्वी तपश्चर्या करीत होता, असें सांगतात. त्यांच्या तपाला विघ्न आणण्याकरितां शचीपति इंद्र हातांत खड्ग घेऊन व योद्धयाचें रूप धारण करून त्यांच्या आश्रमाला आला, आणि त्यानें त्या आश्रमामध्यें पुण्यकारक तपश्चर्या करणाऱ्या त्या मुनीपाशीं तो उत्कृष्ठ खड्ग ठेव म्हणून दिला. तेव्हां तें शस्त्र प्राप्त झाल्यावर ते मुनि त्या ठेवीचें रक्षण करण्याविषयीं तत्पर राहून लोकांमध्यें असलेल्या आपल्या विश्वासाचें रक्षण करीत करीतच वनामध्यें संचार करीत असत. मुळें व फळें आणण्याकरितां जिकडे जावयाचें असेल, तिकडे ठेव राखण्याविषयीं तत्पर असलेले ते मुनी त्या खड्गावांचून जात नसत; परंतु नेहमीं शस्त्र बरोबर बाळगिल्यामुळें त्या तपोधनांचा तपाविषयीं असलेला निश्चय शिथिल होऊन त्याचे ठिकाणीं क्रूर बुद्धि उत्पन्न झाली; आणि नंतर बेफाम होऊन व अधर्मानें ग्रस्त होऊन, क्रूर कर्माविषयीं तत्पर झालेले ते मुनी शस्त्राच्या सहवासामुळें नरकाला गेले. शस्त्रसंयोगासंबंधानें अशी गोष्ट पूर्वीं घडलेली आहे. सारांश, अग्निसंयोग ज्याप्रमाणें काष्ठांचे ठिकाणीं विकृति उत्पन्न होण्याचें कारण आहे, त्याचप्रमाणें शस्त्रसंयोग हें पुरुषाच्या मनामध्यें विकृति उत्पन्न होण्याचें कारण आहे. प्रेमामुळें आणि बहुमानामुळें ह्या गोष्टीचें स्मरण देऊन मी आपणांला उपदेश करीत आहें. तस्मात् दंडकारण्यामध्यें वास्तव्य

करणाऱ्या राक्षसांचा वैरावांचून वध करण्याची ती बुद्धि हातांत धनुष्य धारण करून आपण कधींहि आणूं नका. कारण हे वीर, अपराधावांचून राक्षसांचा वध करणें लोकांना संमत होणार नाहीं. वनामध्यें वास्तव्य करणाऱ्या जितेंद्रिय आर्त जनांचें संरक्षण करणें एवढेंच वीर क्षत्रियांच्या धनुष्याचें काम आहे. शस्त्र कोणीकडे ? वन कोणीकडे ? क्षत्रधर्म कोणीकडे ? आणि तप कोणीकडे ? सारांश, आपण हा सर्व घोंटाळा करून टाकिलेला आहे. तेव्हां जो देशधर्म असेल त्यालाच मान देणें योग्य आहे. शस्त्र धारण केल्यानें पुरुषाची बुद्धि कृपणाप्रमाणें कलुषित होते. आतां आमचा क्षत्रधर्म असल्यामुळें शस्त्र धारण करणें हें आमचें कर्तव्यच आहे, असें आपण म्हणत असाल, तर अयोध्येमध्यें फिरून गेल्यावर आपण खुशाल त्या क्षत्रधर्मानें वागा. राज्याचा त्याग करून जर आपण वनामध्येंच रत होऊन मुनिवृत्तीनें नेहमीं वागाल तर माझ्या सासूसासऱ्यांना आनंद होईल. हिंसा करणें हा अधर्म असल्यामुळें ऋषिधर्मानें वागण्यांतच कल्याण आहे. कारण धर्मापासूनच अर्थप्राप्ति होते व धर्मापासूनच सुखनिष्पत्ति होते. सारांश धर्मानेंच सर्व कांहीं प्राप्त होत असून हें जगत्हि धर्माचेंच सार आहे. प्रयत्नपूर्वक नानाप्रकारच्या नियमांनीं देह कृश करून समर्थ लोकांना धर्म प्राप्त होत असतो. सुखानें कधीं सुखसाधनाची प्राप्ति होत नाहीं. तस्मात् हे सौम्य, आपण आपली मति शुद्ध ठेवून तपोवनामध्यें धर्माचें अनुष्ठान करीत जा. आपणाला सर्व त्रैलोक्याचीहि खरीखरी माहिती आहे. स्त्रियांच्या उतावीळ स्वभावामुळें माझ्या तोंडून हें भाषण निघून गेलें. कारण आपणांला धर्माचा उपदेश करण्याला कोण समर्थ आहे ? तथापि लक्ष्मणासहवर्तमान मनःपूर्वक ह्याचा विचार करून जें रुचेल, तें करण्याला आपण विलंब लावूं नका."

सर्ग दहावा.

श्रीरामाचें सीतेला उत्तर.

आपल्या ठिकाणीं अनुरक्त असलेल्या सीतेचें हें भाषण श्रवण करून धर्मनिष्ठ राम त्या जनककन्येला म्हणाला:—" हे देवि, हे धर्मवेत्ते, हे जनककन्ये, क्षत्रियांचा कुलधर्म सांगण्याच्या उद्देशानें माझे ठिकाणीं अनुरक्त असलेल्या तूं केलेलें हें भाषण हिताचें असून तुला योग्य आहे. हे देवि, ह्या तुझ्या

म्हणण्याला मी आतां काय बरें उत्तर देऊं ? रक्षण होत नसल्यामुळें लोकांना आर्त होऊन रडत बसण्याची पाळी येऊं नये, एतदर्थ क्षत्रियांनीं धनुष्य धारण करावयाचें, हें तूं सांगून टाकिलें आहेस. सीते, तीक्ष्ण व्रत आचरणारे ते मुनी दंडकारण्यामध्यें आर्त झाले आहेत, आणि स्वतः माझी भेट घेऊन ते मला रक्षक म्हणून शरण आले आहेत. अग मित्रे, फलमूलें भक्षण करून सर्व काल वनामध्यें वास्तव्य करणाऱ्या त्या मुनींना क्रूरकर्मी राक्षसांमुळें सुख प्राप्त होत नाहीं. कारण नरमांस भक्षण करणारे क्रूर राक्षस त्यांना भक्षण करीत असतात. त्यांना राक्षस भक्षण करूं लागले असतां ते दंडकारण्यनिवासी मुनी माझ्याकडे आले, आणि 'आमच्यावर अनुग्रह कर' म्हणून हे द्विजश्रेष्ठ मला म्हणाले. त्यांचें भाषण श्रवण करून आणि त्यांच्या म्हणण्याकडे लक्ष्य देण्याचा विचार करून मीं त्यांना म्हटलें, 'मी होऊनच तुम्हांकडे येणें योग्य असतांना रक्षण करण्याविषयीं विनंति करण्याकरितां अशा प्रकारच्या ब्राह्मणांना माझ्याकडे येण्याचा प्रसंग आला, ही माझी अत्यंत अपकीर्ति आहे. ह्यास्तव ह्या श्रमाबद्दल आपण मजवर कृपा करा. मीं आपलें काय कार्य करावें ?' याप्रमाणें मी बोललों. तेव्हां ते सर्व मुनी एकत्र जुळून मला म्हणाले, 'रामा, यथेष्ट रूप धारण करणाऱ्या असंख्य राक्षसांनीं आम्हांला अतिशय गांजून सोडिलें आहे. ह्यास्तव त्यांपासून तूं आमचें रक्षण कर. हे निष्पापा, होमकाल व पर्वकाल प्राप्त झाला असतां ते मांसभक्षक दुर्धर राक्षस आम्हांला ग्रासून टाकितात. राक्षसांनीं घेरिल्यामुळें त्राता शोधूं लागलेल्या आम्हां तपस्वी मुनींचा श्रेष्ठ त्राता तूंच आहेस. मनांत आणिल्यास तपःसामर्थ्यानें आम्ही त्या राक्षसांचा वध करण्यास समर्थ आहों; परंतु पुष्कळ दिवसांपासून संपादन केलेल्या तपाचा व्यय करण्याची आमची इच्छा नाहीं. कारण राघवा, तपामध्यें नेहमीं अनेक विघ्नें येत असतात, व ह्यामुळें तें होणें दुर्घट आहे. म्हणून राक्षस आम्हांला भक्षण करीत असतांनाहि आम्ही शाप देत नाहीं. तस्मात्, या दंडकारण्यांत राहणाऱ्या राक्षसांपासून आम्हांस जी पीडा होत आहे, तीपासून तूं भ्रात्यासहवर्तमान आमचें रक्षण कर. तूंच आमचा नाथ आहेस, असें समजून आम्ही वनामध्यें वास्तव्य करीत आहों."

श्रीराम सांगतातः—"सीते, हें भाषण श्रवण केल्यावर दंडकारण्यामध्यें ऋषींचें सर्वस्वी परिपालन करण्याची मीं प्रतिज्ञा केली आहे. एकदां जी मुनींशीं प्रतिज्ञा केली, त्या प्रतिज्ञेचें जिवांत जीव आहे तोंपर्यंत माझ्यानें उल्लंघन होणें

शक्य नाहीं. कारण सत्य हें मला नेहमींच इष्ट आहे. सीते, मी आपल्या जीविताचा अथवा लक्ष्मणासहवर्तमान तुझा त्याग करीन, परंतु केलेली प्रतिज्ञा-त्यांतूनहि ब्राह्मणांशीं केलेली प्रतिज्ञा–मी फिरविणार नाहीं. सारांश, कोणी सांगण्याची अपेक्षा न धरितांहि ऋषींचें परिपालन मला अवश्य केलें पाहिजे. तेव्हां प्रतिज्ञा करूनहि तें कसें बरें न करावें? सीते, माझे ठिकाणीं तुझें प्रेम असल्यामुळें आणि माझ्याविषयीं तुझें हृदय चांगलें असल्यामुळें तूं हें भाषण केलें आहेस, आणि तें ऐकून मी तुझ्यावर संतुष्ट झालों आहें. कारण जो अप्रिय असेल त्याला कोणी हिताचा उपदेश करीत नसतो. हे कल्याणि, हें तुझें भाषण तुझ्या प्रेमाला योग्य असून तुझ्या कुलालाहि शोभणारें आहे. तूं सहधर्मचारिणी मला प्राणापेक्षांहि प्रिय आहेस."

असो. मैथिलराजकन्येशीं अशा प्रकारचें भाषण करून महात्मा धनुर्धारी राम लक्ष्मणासहवर्तमान रम्य तपोवनामध्यें गेला.

सर्ग अकरावा.

पंचाप्सर सरोवरीं गमन.

राम पुढें चालले, महाकल्याणी सीता मध्यें निघाली आणि धनुष्य हातांत घेऊन लक्ष्मण मागून जाऊं लागला. नानाप्रकारचीं पर्वतशिखरें, वनें आणि अनेक प्रकारच्या रम्य नद्या अवलोकन करीत करीत ते उभयतां राम-लक्ष्मण सीतेसहवर्तमान जाऊं लागले. जातांना नद्यांच्या वाळवंटांतून राहणारे सारस व चक्रवाक पक्षी, जलामध्यें राहणाऱ्या पक्ष्यांनीं व कमलांनीं युक्त असलेलीं सरोवरें, टोळ्या करून राहणारे पृषत मृग, मदोन्मत्त झालेले दंष्ट्रायुक्त महिष, वराह, आणि वृक्षशत्रु गज त्यांच्या अवलोकनांत आले. याप्रमाणें ते बरेच दूर गेल्यावर सायंकालच्या सुमारास एक योजन औरसचौरस असें एक सरोवर त्यांच्या दृष्टीस पडलें. आरक्तवर्ण व श्वेतवर्ण कमलांनीं तें गजबजून गेलें होतें, हत्तींच्या कळपांनीं तें भूषित झालेलें होतें व सारस, राजहंस व कलहंस पक्षी आणि मत्स्यादि जलचर प्राणी ह्यांनीं तें व्याप्त झालेलें असून त्याचें उदक निर्मल होतें. त्या रम्य सरोवरामध्यें गायनाचा व वाद्यांचा सूर ऐकूं येत होता, परंतु तेथें कोणीहि दृष्टोत्पत्तीस येत नव्हतें. तेव्हां तें जाणण्याच्या उत्सु-

कतेमुळें राम व महारथि लक्ष्मण धर्मभृतसंज्ञक मुनींना विचारूं लागले, "हे महामुने, हें अत्यंत आश्चर्य श्रवण करून आम्हां सर्वांनाच मोठी उत्सुकता प्राप्त झाली आहे. ह्यास्तव हें काय, तें आपण सांगा."

पंचाप्सर सरोवराचें वृत्त.

ह्याप्रमाणें रामानें विनंति करतांच ते धर्मात्मे मुनी सांगूं लागले. ते म्हणाले, "रामा, मांडकर्णी मुनींनीं पंचाप्सर नांवाचें हें सार्वकालिक सरोवर तपानें निर्माण केलेलें आहे. त्या मांडकर्णी महामुनींनीं वायु भक्षण करून जलाशयामध्यें दहा हजार वर्षें तीव्र तप केलें. तेव्हां अग्निप्रभृति सर्व देव घाबरून गेले आणि उद्विग्न झालेले ते सर्वजण एकत्र जुळून म्हणाले, 'आपणांपैकीं कोणाचें स्थान घेण्याची तर हा मुनि इच्छा करीत नाहीं ना?' त्या मुनींच्या तपाला विघ्न करण्याकरितां चंचल विद्युल्लतेप्रमाणें तेजस्वी असलेल्या पांच श्रेष्ठ अप्सरांची सर्व देवांनीं मिळून योजना केली. त्या अप्सरांनीं ऐहिक व पारलौकिक धर्माधर्म अवगत असलेल्या त्या मुनींना देवांचें कार्य सिद्धीस नेण्याकरितां कामाधीन करून सोडिलें. त्याच पांच अप्सरा मुनींच्या पत्न्या झाल्या, व त्यांच्यासहवर्तमान क्रीडा करण्याकरितां त्या मुनींनीं त्या सरोवरामध्यें एक गुप्त गृह निर्माण केलें. त्या गुप्त गृहामध्ये वास्तव्य करणाऱ्या त्या पांच अप्सरा तपःसामर्थ्यामुळें यौवनावस्थेंतच असलेल्या त्या मुनींना यथेष्ट रमवीत आहेत, व क्रीडा करीत असलेल्या त्या अप्सरांच्याच वाद्यांचा व भूषणध्वनीनें मिश्र झालेला गायनाचा मनोहर ध्वनि कानांवर येत आहे."

याप्रमाणें त्या ऋषींनीं सांगितलें असतां राम 'आश्चर्य' इतकेंच म्हणाला. ह्याप्रमाणें तो जितेंद्रिय राम त्या मुनींशीं संभाषण करीत आहे, तों ज्यांत ठिकठिकाणीं दर्भ व वल्कलें पडलीं आहेत, आणि ब्राह्मणांच्या कृष्णाजिनप्रभृति संपत्तीनें जो व्याप्त झालेला आहे, असा एक आश्रमसमुदाय त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां जनककन्या सीता आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान ककुत्स्थकुलोत्पन्न रामानें त्या श्रीसंपन्न आश्रममंडलामध्यें प्रवेश केला. त्या ठिकाणीं महर्षींनीं त्याचा मानसन्मान केला, आणि तेथें राहिल्यावर तो अनुक्रमानें त्या मुनींचे आश्रम हिंडूं लागला. ज्या ऋषींच्या आश्रमामध्यें रामानें पूर्वीं एकदां वास्तव्य केलें होतें, त्या मुनींच्याहि आश्रमाला पुनरपि वास्तव्य करण्याकरितां तो गेला. कोठें तो दहा महिने राहिला, कोठें त्यानें एक वर्षभर वास्तव्य केलें, कोठें त्यानें चार महिने काढिले, कोठें पांच पांच, सहा सहा महिने वास्तव्य केलें,

दुसऱ्या कांहीं आश्रमांमध्यें वर्षापेक्षांहि जास्त दिवस तो राहिला. कोठें दीड वर्षापेक्षांहि अधिक दिवस काढिले. त्या राघवानें कोठें तीन तीन महिने तर कोठें आठ आठ महिने सुखानें वास्तव्य केलें.

सुतीक्ष्णाश्रमीं पुनरागमन.

ह्याप्रमाणें मुनींच्या आश्रमामध्यें राम आनंदानें राहूं लागला असतां त्याचीं दहा वर्षे सुखानें गेलीं. तेव्हां सर्व आश्रम हिंडून तो धर्मज्ञ राम सीतेसहवर्तमान पुनरपि सुतीक्ष्ण मुनींच्या आश्रमाला आला. त्या आश्रमाला आल्यावर मुनींनीं सर्व प्रकारें त्याचें आदरातिथ्य केलें. त्या ठिकाणींहि कांहीं दिवसपर्यंत तो शत्रुदमन राम राहिला. नंतर आश्रमामध्यें असलेला तो ककुत्स्थकुलोत्पन्न राम एकदां सुतीक्ष्ण महामुनींपाशीं बसला असतां विनयानें त्यांना म्हणाला, "भगवन्, मुनिश्रेष्ठ अगस्त्य ह्या अरण्यामध्यें वास्तव्य करीत असतात, असें मी कथा सांगणाऱ्या ऋषींपासून बरेंच वेळां ऐकिलें आहे; परंतु हें वन मोठें असल्यामुळें तो प्रदेश मला ठाऊक नाहीं, आणि त्या विवेकी महर्षींचें तें रम्य आश्रमस्थान कोठें आहे, हेंहि मला माहीत नाहीं. तथापि त्या भगवानांची कृपा व्हावी, एतदर्थ लक्ष्मण आणि सीता ह्यांसहवर्तमान त्या मुनींना अभिवंदन करण्याकरितां मी जाणार आहें. त्या श्रेष्ठ मुनींची एकदां आपण स्वतः सेवा करावी, हा मोठा मनोरथ माझ्या हृदयामध्यें घोळत आहे."

अगस्त्याश्रम मार्गकथन.

ह्याप्रमाणें धर्मात्म्या रामाचें भाषण श्रवण करून ते सुतीक्ष्ण मुनि त्याच्यावर प्रसन्न झाले, आणि त्याला म्हणाले, "श्रीरामचंद्रा,—'सीतेसहवर्तमान अगस्त्य मुनींकडे जा' हेंच लक्ष्मणासहवर्तमान तुला सांगण्याचा माझा उद्देश आहे. तेव्हां तूं स्वतःच ह्या गोष्टीविषयीं मला विचारीत आहेस, हें फार चांगलें आहे. रामा, महामुनि अगस्त्य कोठें राहतात, तें मी तुला सांगतों. हें पहा—ह्या आश्रमापासून चार योजनेपर्यंत तूं दक्षिणेस जा. म्हणजे अगस्त्य मुनींच्या भ्रात्याचा एक मोठा भव्य आश्रम तेथें आहे. स्वाभाविक रम्य अशा वनप्रदेशावर असलेला तो आश्रम पिप्पलीवनांनीं शोभित, नानाप्रकारच्या पक्ष्यांनीं नादित आणि विपुल फलमूलांनीं युक्त असून त्या ठिकाणीं हंस व कारंडोल पक्ष्यांनीं व्याप्त, चक्रवाक पक्ष्यांनीं सुशोभित आणि निर्मल जलानें भरलेलीं अशीं नानाप्रकारचीं कमलयुक्त सरोवरें आहेत. रामा, त्या ठिकाणीं एक रात्र वास्तव्य कर. नंतर प्रभातकालीं वनप्रदेशाच्या बाजूनें दक्षिण

दिशेचें अवलंबन करून जा. दक्षिण दिशेस एक योजनपर्यंत प्रदेश तूं चालून गेलास, म्हणजे विपुल वृक्षांनीं सुशोभित अशा रम्य वनप्रदेशामध्यें अगस्त्य मुनींचा आश्रम तुझ्या दृष्टीस पडेल. तुम्ही तेथें गेला म्हणजे तुम्हांस करमणूक होईल. कारण तो वनप्रदेश रम्य असून त्यांत वृक्षहि पुष्कळ आहेत. तेव्हां हे महामते, त्या अगस्त्य महर्षींचें दर्शन घेण्याचा जर तुझा विचार झाला असेल, तर तूं आजच जाण्याचा बेत कर. "

अगस्त्य मुनींच्या सामर्थ्याचें वर्णन.

सुतीक्ष्ण मुनींचें भाषण श्रवण करून लक्ष्मणासहवर्तमान रामानें त्यांना अभिवंदन केलें, आणि अगस्त्य मुनींकडे जाण्याचा उद्देश मनांत धरून लक्ष्मण व सीता ह्यांसहवर्तमान तो तेथून निघाला. अद्भुत वनें, मेघांसारखे पर्वत, सरोवरें आणि नद्या पाहात पाहात चालला. ह्याप्रमाणें सुतीक्ष्ण मुनींनीं सांगितलेल्या मार्गानें निर्विघ्नपणें गेल्यावर राम अतिशय आनंदित होऊन लक्ष्मणाला म्हणाला, " खरोखर त्या महात्म्या अगस्त्य मुनींच्या पुण्यवान भ्रात्याचाच हा आश्रम दिसत आहे. कारण जशा प्रकारचें वन आपण ऐकिलें होतें, तशाच प्रकारच्या फलभारानें व पुष्पभारानें लवलेले हे वृक्ष ह्या वनाच्या मार्गामध्यें हजारों दिसून येत आहेत. तिखटपणा ज्यांमध्यें आहे, असा हा पक्क पिप्पलीफलांचा गंध वायूमुळें ह्या वनांतून येत आहे. ठिकठिकाणीं काष्ठांचे ढीग घालून ठेविलेले दिसत आहेत, आणि वैदूर्य मण्याप्रमाणें तेजस्वी दर्भहि कापून नेलेले दिसत आहेत. कृष्णवर्ण मेघ आणि पर्वतशिखर ह्यांचीच उपमा ज्याला योग्य आहे, असा हा आश्रमसंबंधीं अग्नीचा धूर वनामध्यें दिसत आहे. एकांत प्रदेशावरील तीर्थामध्यें स्नान केलेले हे ब्राह्मण स्वसंपादित पुष्पांनीं पुण्यसंपादक असें देवपूजन करीत आहेत. सारांश, हे सौम्या, सुतीक्ष्णाचें सांगणें ज्याप्रमाणें मीं ऐकिलें आहे, त्याचप्रमाणें पाहातां खरोखर हा अगस्त्य मुनींच्या भ्रात्याचाच आश्रम असला पाहिजे. ह्या आश्रमांतील अधिपतीच्या भ्रात्यानें म्हणजे अर्थात् पुण्यकर्म करणाऱ्या अगस्त्य मुनींनीं, लोकांचें हित करण्याकरितां एका मृत्युतुल्य दैत्याचा स्वसामर्थ्यानें निग्रह करून ही दिशा लोकांनीं वास्तव्य करण्याला योग्य केली आहे. इतिहासामध्यें असें सांगितलें आहे कीं, ह्या ठिकाणीं एके वेळीं क्रूर वातापि आणि इल्वल असे ब्राह्मणघातकी महादैत्य भ्राते एकत्र राहात होते. तो निर्दय इल्वल ब्राह्मणाचें रूप धारण करून आणि ब्राह्मणाप्रमाणें संस्कारयुक्त भाषण करून ब्राह्मणांना श्राद्धाकरितां निमंत्रण

करीत असे. मेषरूप धारण केलेल्या आपल्या त्या वातापि भ्रात्याला शिजवून श्राद्ध-विधीनें तो त्या ब्राह्मणांना भोजन घालीत असे. नंतर त्या विप्रांचें भोजन झाल्यावर 'हे वातापे, बाहेर नीघ' असे शब्द उच्चस्वरानें उच्चारीत उच्चारीत इल्वल त्याला हांक मारी. भ्रात्याची ती हांक ऐकिल्यावर मेषाप्रमाणें शब्द करणारा तो वातापि ब्राह्मणांचीं शरीरें फोडफोडून बाहेर निघे. त्या यथेष्ट रूप धारण करणाऱ्या मांसभक्षक दैत्यांनीं नित्य एकत्र जुळून ह्याप्रमाणें हजारों ब्राह्मणांचा वध केला असतां, देवांनीं प्रार्थना केल्यावरून अगस्त्य महर्षीनीं श्राद्धाचें निमंत्रण घेऊन खरोखर तो महादैत्य भक्षण करून टाकिला. इल्वलानें अगस्त्य मुनींना, श्राद्धामध्यें भोजन झाल्यानंतर 'नित्यं श्राद्धं संपन्नं' (मीं केलेलें नित्य श्राद्ध परिपूर्ण झालें ना?) असें विचारिलें, आणि 'सुसंपन्नं' (तुझें नित्य श्राद्ध चांगल्या रीतीनें शेवटास गेलें) असें त्यांनीं सांगितल्यावर आपोशनाकरितां त्यांच्या हातावर उदक वाढून त्या इल्वलानें 'बाहेर ये' असें भ्रात्याला सांगितलें. तेव्हां त्या भ्रात्याला हांक मारणाऱ्या ब्रह्मघातकी इल्वलाला ते बुद्धिमान मुनिश्रेष्ठ अगस्त्य हंसत हंसत म्हणाले, 'अरे, मीं जिरवून टाकिल्यामुळें यमसदनाला गेलेल्या तुझ्या मेषरूप भ्रात्याचें बाहेर येण्याला आतां सामर्थ्य कोठें उरलें आहे?'

अगस्त्य मुनींचें हें भ्रात्याच्या मरणासंबंधाचें भाषण श्रवण केल्यावर त्या निशाचर इल्वलानें क्रोधानें त्या मुनींची हिंसा करण्याचा विचार केला, आणि तो त्या द्विजश्रेष्ठांच्या अंगावर धावला; परंतु त्या देदीप्यमान तेजस्वी अगस्त्य मुनींनीं आपल्या अग्नितुल्य दृष्टीनेंच त्याला दग्ध करून टाकिल्यामुळें तो मृत्यु पावला. असो. ब्राह्मणांची दया येऊन ज्यांनीं हें दुष्कर कर्म केलें, त्या अगस्त्य मुनींच्या भ्रात्याचा सरोवर व वन ह्यांनीं सुशोभित झालेला हा आश्रम आहे."

ह्याप्रमाणें राम लक्ष्मणाला सांगत आहे, तोंच सूर्य अस्तंगत होऊन संध्याकाळ झाली. तेव्हां लक्ष्मणासहवर्तमान यथाविधि सायंसंध्या करून राम त्या आश्रमामध्यें प्रविष्ट झाला, आणि त्यानें ऋषींना अभिवंदन केलें. त्या मुनींनीं त्याचें उत्तम प्रकारें स्वागत केलें, आणि मुळें व फळें भक्षण करून तो ती रात्र तेथें राहिला. नंतर ती रात्र संपून रविमंडलाचा उदय झाल्यावर राम त्या अगस्त्य मुनींच्या भ्रात्याचा निरोप घेऊं लागला. "भगवन्, मी आपणांला अभिवंदन करितों. गेल्या रात्रीं येथें माझें वास्तव्य सुखानें झालें. आतां आपली अनुज्ञा घेऊन आपल्या गुरु ज्येष्ठ भ्रात्याच्या दर्शनाकरितां मी जातों."

अगस्त्याश्रमदर्शन.

असें रामानें त्यांना विचारिल्यावर ' जा ' म्हणून त्या मुनींनीं त्याला सांगितलें. नंतर तो रघुनंदन राम सुतीक्ष्ण मुनींनीं सांगितलेल्या मार्गानें तें वन अवलोकन करीत करीत पुढें गेला. जलकदंब, फणस, सालवृक्ष, अशोक, तिवस, करंज, मोहा आणि टेंभुरणी असे प्रफुल्लित लतांनीं सुशोभित असलेले शेंकडों वनवृक्ष रामानें जातां जातां अवलोकन केले. हत्तींच्या सोंडांनीं मुरगाळिलेले, वानरांनीं सुशोभित व मत्त पक्षिगणांनीं नादित असे शेंकडों वृक्ष त्यानें पाहिले. तदनंतर जवळच असलेल्या लक्ष्मणाला कमलनयन राम म्हणाला, " ज्या अर्थी स्निग्ध पानांनीं युक्त असलेले वृक्ष आणि शांत पशुपक्षी दिसत आहेत, त्या अर्थी त्या जितेंद्रिय महर्षींचा आश्रम फार दूर नाहीं. (अगाचें म्हणजे पर्वताचें स्तंभन करणें ह्या) स्वतःच्या कर्मानें जगतामध्यें अगस्त्य म्हणून हे मुनि प्रख्यात झाले आहेत. श्रमलेल्या लोकांचे श्रम परिहार करणारा हा त्यांचा आश्रम दिसत आहे. ह्या आश्रमांतील वन विपुल धूमानें व्याप्त झालेलें आहे. वल्कलसमुदायांनीं ह्याला शोभा आलेली आहे. ह्यांतील मृगांचे कळप शांत आहेत. अनेक प्रकारच्या पक्ष्यांनीं हा आश्रम नादित झालेला आहे. ज्या पुण्यवान मुनींनीं लोकांचें हित करण्याकरितां मृत्युतुल्य दैत्याचा स्वसामर्थ्यानें निग्रह करून दक्षिण दिशा लोकांनीं वास्तव्य करण्यास योग्य केली, आणि ज्यांच्या प्रभावामुळें राक्षस अजून सुद्धां भीतीनें ह्या दक्षिण दिशेचा स्वकीय प्रदेश म्हणून उपभोग घेत नाहींत, परंतु हिच्याकडे नुसतें पाहात मात्र असतात, त्या मुनींचा हा आश्रम होय. जेव्हांपासून ते पुण्यवान मुनी ह्या दिशेमध्यें संचार करूं लागले, तेव्हांपासून येथील निशाचर प्राणी, आपल्या ठिकाणीं असलेल्या वैराचा आणि आपल्या क्रूर कर्माचा त्याग करून येथें राहिले आहेत. त्या भगवान अगस्त्य मुनींच्या केवळ नामाच्याच प्रभावानें हा दक्षिण दिशेंतील प्रदेश सरळ (दुष्टांच्या अंतःकरणांतील वैर वगैरे नाहींसा करण्यास समर्थ) झालेला आहे, आणि क्रूरकर्मी लोकांनीं जिंकण्यास अशक्य म्हणून त्रैलोक्यामध्यें प्रसिद्ध झाला आहे. मेरु पर्वताशीं स्पर्धा करून सूर्याचा मार्ग नेहमीं आडवूं पाहणारा श्रेष्ठ पर्वत विंध्याद्रि, त्या अगस्त्य मुनींची आज्ञा परिपालन करून राहिला असल्यामुळें अद्यापि वृद्धिंगत होत नाहीं. लोकांमध्यें ज्यांचें कर्म प्रख्यात आहे, अशा त्या दीर्घायु अगस्त्य मुनींचा निरुपद्रवी मृगांनीं आश्रय केलेला हा भव्य आश्रम होय. लोकांना पूज्य असलेले हे साधु सज्ज-

नांचें हित करण्याविषयीं नेहमीं तत्पर असतात. तेव्हां आपलेंहि हे कल्याण करितील. ह्या आश्रमामध्यें राहून मी त्या अगस्त्य महर्षींची सेवा करीन, आणि लक्ष्मणा, वनवासाचे अवशिष्ट राहिलेले दिवस मी येथेंच काढीन. ह्या आश्रमामध्यें गंधर्वांसहवर्तमान देव, सिद्ध आणि महर्षी पवित्र आहार करून नेहमीं अगस्त्य मुनींची सेवा करीत असतात. ह्या आश्रमामध्यें असत्य भाषण करणारा, निर्दय, शठ, दुष्ट अथवा पापी पुरुष जिवंत राहत नाहीं. कारण हे मुनिच तशा प्रकारचे आहेत. ह्या आश्रमामध्यें देव, यक्ष आणि गरुडप्रभृति पक्ष्यांसहवर्तमान सर्प, पुण्य संपादन करण्याकरितां शुद्ध आहार करून रहात असतात. ह्याच आश्रमामध्यें तपश्चर्येमुळें सिद्ध झालेले महात्मे श्रेष्ठ ऋषी जीर्ण देहांचा त्याग आणि नवीन देहांचा स्वीकार करून व सूर्यासारख्या तेजस्वी विमानामध्यें आरूढ होऊन स्वर्गाला गेले आहेत. प्राण्यांनीं ह्या आश्रमामध्यें देवांचें सत्कर्मांनीं आराधन केलें असतां ते देव त्यांना यक्षत्व, देवत्व आणि नानाप्रकारचीं राज्यें देतात. असो. लक्ष्मणा, आपण आश्रमाला येऊन पोहोंचलों. प्रथम तूं आंत प्रवेश कर, आणि सीतेसह मी आल्याचें त्या ऋषींना निवेदन कर."

सर्ग बारावा.

अगस्त्याश्रमीं गमन.

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां लक्ष्मण आश्रमांत गेला, आणि अगस्त्य मुनींच्या एका शिष्याजवळ जाऊन त्याला म्हणाला, " दशरथ म्हणून जो राजा होऊन गेला, त्याचा बलाढ्य ज्येष्ठ पुत्र राम भार्या सीतेसहवर्तमान मुनींचें दर्शन घेण्याकरितां येथें आला आहे. अनुकूल, अनुरक्त व त्याच्या हिताविषयीं तत्पर असा मी त्याचा लक्ष्मण म्हणून कनिष्ठ भ्राता आहें. मी बरेच दिवस वनवासांत आल्यामुळें तुमच्याहि ऐकण्यांत असण्याचा संभव आहे. आम्ही त्रिवर्ग पित्याच्या आज्ञेमुळें अतिशय भयंकर वनामध्यें प्रविष्ट झालों आहों. भगवानांचें दर्शन घेण्याची आम्हां सर्वांची इच्छा आहे.आपण त्यांना निवेदन करा."

तें त्या लक्ष्मणाचें भाषण श्रवण करून तो तपोधन शिष्य 'ठीक आहे' असें म्हणून अगस्त्य मुनींना कळविण्याकरितां होमशालेमध्यें गेला. आंत प्रवेश केल्यावर तपश्चर्येमुळें ज्यांच्या समोर इतरांना जाणेंहि अशक्य झालें होतें,

अशा त्या मुनिश्रेष्ठ अगस्त्यांना हात जोडून रामाच्या आगमनाची वर्दी देऊन लक्ष्मणानें सांगितल्याप्रमाणें त्यांना कळविलें. तो म्हणाला, "हे दशरथाचे पुत्र राम-लक्ष्मण रामभार्या सीतेसहवर्तमान आश्रमामध्यें प्रविष्ठ झाले आहेत. हे शत्रु-दमन करणारे राम-लक्ष्मण आपले दर्शन घेण्याकरितां आणि कांहीं वेळ आपली शुश्रूषा करण्याकरितां येथें आले आहेत. तेव्हां पुढें काय करावयाचें ह्याविषयीं आपण मला आज्ञा करा."

लक्ष्मणासहवर्तमान राम आणि महाभाग्यवती सीता प्राप्त झाल्याचें शिष्याच्या मुखें श्रवण केल्यावर अगस्त्य मुनि म्हणाले, "वनामध्यें वास्तव्य करूं लाग-ल्याला पुष्कळ दिवस झाले असून, राम आज जागा होऊन माझें दर्शन घेण्या-करितां आला आहे, ही मोठी भाग्याचीच गोष्ट म्हटली पाहिजे. ह्याच्या आग-मनाची मलाहि मनापासून इच्छा झाली होती. ह्यास्तव जा, आणि भार्या व लक्ष्मण ह्यांसहवर्तमान रामाचा सत्कार करून त्याला माझ्याजवळ घेऊन ये. तूं मला न विचारितां त्याला घेऊन कां आला नाहींस?"

ह्याप्रमाणें धर्मवेत्त्या महात्म्या अगस्त्य मुनींनीं सांगितलें असतां तो शिष्य हात जोडून अभिवंदनपूर्वक 'आज्ञेप्रमाणें करितों' असें त्यांना म्हणाला. नंतर घांदलीनें होमशाळेंतून बाहेर येऊन तो लक्ष्मणाला म्हणाला, 'कोण जो हा राम आहे, त्याला मुनींचें दर्शन घेण्याकरितां येऊं दे, आणि स्वतःच त्यांच्याकडे जाऊं दे."

असें शिष्यानें सांगितल्यानंतर राम शिष्यासहवर्तमान आश्रमामध्यें गेला, आणि त्या शिष्याला ककुत्स्थकुलोत्पन्न राम व सीता हीं लक्ष्मणानें दाखवून दिलीं. तेव्हां सत्कारास पात्र असलेल्या त्या अगस्त्य मुनींचें सप्रेम भाषण कथन करीत करीत रामाचा चांगला सत्कार करून तो शिष्य योग्य रीतीनें त्याला आंत घेऊन गेला. लक्ष्मण व सीता ह्यांसहवर्तमान शांत हरिणांनीं व्याप्त अस-लेला तो आश्रम अवलोकन करीत करीत राम आंत प्रविष्ठ झाला. जातां जातां ब्रह्मदेवाचें स्थान, रुद्राचें स्थान, विष्णूचें स्थान, इंद्राचें स्थान, सूर्याचें स्थान, सोमाचें स्थान, (स्थूलमंडलाभिमानी) भगाचें स्थान, कुबेराचें स्थान, ब्रह्मदेव आणि विश्वकर्मा ह्यांचीं स्थानें, वायूचें स्थान, हातांत पाश घेतलेल्या महात्म्या वरुणाचें स्थान, गायत्रीचें स्थान, अष्टवसूंचें स्थान, नागराजाचें स्थान, गरुडाचें स्थान, स्कंदाचें स्थान आणि यमराजाचें स्थान हीं त्याच्या दृष्टीस पडलीं.

असो. राम आल्याचें अवलोकन केल्यानंतर शिष्यगणांनीं परिवेष्ठित अस-लेले मुनीहि समोर येऊं लागले. तेव्हां मुनींच्या पुढें असलेल्या त्या उज्ज्वल-

तेजस्वी अगस्त्य मुनींना अवलोकन करून वीर राम लक्ष्मीवर्धक लक्ष्मणाला म्हणाला, " लक्ष्मणा, भगवान अगस्त्य ऋषी बाहेर येत आहेत, आणि हे तपाचें भांडारच असावें, असें त्यांच्या मोठेपणावरून मी समजत आहें. "

ह्याप्रमाणें सूर्यासारख्या तेजस्वी अगस्त्य मुनींविषयीं लक्ष्मणाला सांगून महापराक्रमी रघुनंदन रामानें त्या सामोरे येणाऱ्या अगस्त्य मुनींचे पाय धरिले; आणि त्यांना अभिवंदन केल्यावर विदेहराजकन्या सीता आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान तो धर्मात्मा राम हात जोडून उभा राहिला. तेव्हां रामाचें स्वागत करून व आसन, उदक वगैरेंनीं त्यांचा सत्कार करून कुशलप्रश्न केल्यावर ' बसावें ' म्हणून त्या अगस्त्य मुनींनीं त्यांना सांगितलें. तदनंतर वैश्वदेव करून आणि अर्घ्य वगैरेंनीं त्या अतिथींचा सत्कार करून वानप्रस्थ धर्मानें त्या अगस्त्य मुनींनीं त्यांना प्रथम भोजन घातलें. नंतर आसनावर बसून ते धर्मज्ञ मुनिश्रेष्ठ हात जोडून बसलेल्या धर्मवेत्त्या रामाला म्हणाले, " हे काकुत्स्था, अशा प्रकारें अतिथींचें पूजन न करणारा पुरुष खोटी साक्ष देणाऱ्या पुरुषाप्रमाणें परलोकीं मांस भक्षण करितो. सर्व लोकांचा राजा महारथि आणि धर्मप्रवर्तक असा तूं प्रिय अतिथि प्राप्त झाल्यामुळें मला प्रिय व मान्य आहेस. "

अगस्त्यहस्तें दिव्यायुधप्राप्ति.

ह्याप्रमाणें बोलून फळें, मुळें, पुष्पें आणि इतरहि वस्तु ह्यांच्या योगानें रामाचा स्वेच्छेप्रमाणें सत्कार केल्यावर अगस्त्य मुनि त्याला म्हणाले, " हे पुरुषश्रेष्ठा, सुवर्ण आणि हिरे ह्यांनीं भूषित असलेलें व विश्वकर्म्यानें निर्माण केलेलें हें मोठें वैष्णव दिव्य धनुष्य, व्यर्थ न जाणारा आणि सूर्याप्रमाणें तेजस्वी असा हा सर्वोत्कृष्ट ब्रह्मदत्त बाण, अग्नीप्रमाणें उज्ज्वल असलेल्या तीक्ष्ण बाणांनीं भरलेले व आंतील बाण कधींहि नाहींतसे न होणारे असे भाते, आणि सुवर्णाच्या म्यानांत असलेला व सुवर्णाची मूठ बसविलेला हा खड्ग हीं मला इंद्रानें दिलीं आहेत. ह्यास्तव रामा, पूर्वीं संग्रामामध्यें महादैत्यांचा वध करून ज्याप्रमाणें विष्णूंनीं देवांची उज्ज्वल संपत्ति परत आणिली, त्याप्रमाणें ह्या धनुष्याच्या योगानें संग्रामामध्यें महादैत्यांचा वध करून तूं उज्ज्वल लक्ष्मी संपादन कर. आणि इंद्र ज्याप्रमाणें वज्राचा स्वीकार करितो, त्याप्रमाणें तें धनुष्य, ते भाते, तो बाण आणि तो खड्ग ह्यांचा तूं जयप्राप्तीकरितां स्वीकार कर. "

ह्याप्रमाणें रामाला सांगून आणि ती संपूर्ण उत्कृष्ट आयुधें त्याला देऊन ते भगवान महातेजस्वी अगस्त्य मुनि पुनः बोलूं लागले.

सर्ग तेरावा.

राम आणि अगस्त्य यांचा संवाद.

अगस्त्य मुनि म्हणाले:—"रामा, ज्या अर्थी सीतेसहवर्तमान तुम्ही मला अभिवंदन करण्याकरितां येथें आलां आहां, त्या अर्थी तुझें कल्याण असो. मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें. आणि लक्ष्मणा, तुजवरहि मी संतुष्ट झालों आहें. मार्गांतील दगदगीमुळें बहुक्लेशकारक दुःख तुम्हांला होत आहे, आणि ही जनककन्या सीता तर विश्रांति घेण्याकरितां अगदीं उत्सुक झाल्यासारखी स्पष्टपणें दिसत आहे. आजपर्यंत दुःखांचा अनुभव नसलेली ही सुकुमार सीता, पतिप्रेमानें प्रेरणा केल्यामुळें विपुल दोषांनीं युक्त असलेल्या वनामध्यें प्राप्त झाली आहे. तेव्हां रामा ह्या आश्रमामध्यें ज्या रीतीनें सीतेला करमणूक होईल, त्या रीतीनें तूं राहण्याची व्यवस्था ठेव. तुझ्या बरोबर वनांत येणाऱ्या ह्या सीतेनें हें दुर्घट कर्म केलें आहे. कारण हे रघुनंदना, पतीचें यथास्थित असलें म्हणजे त्याचें चित्तरंजन करावयाचें, आणि त्याला विपन्नावस्था प्राप्त झाली असतां त्याची पर्वा करावयाची नाहीं, हा सृष्टीच्या आरंभापासून स्त्रियांचा स्वभाव आहे. स्त्रिया ह्या, (एके ठिकाणीं न राहण्यांत, फार दिवसांचें प्रेमबंधन तोडून टाकण्यांत आणि निंद्य कार्य करण्याला प्रवृत्त होण्यांत अनुक्रमे) विद्युल्लतांचें चांचल्य, शस्त्रांचा तीक्ष्णपणा आणि गरुड व वायु ह्यांची त्वरा स्वीकारीत असतात; परंतु तुझ्या भार्येचे ठिकाणीं हे दोष नाहींत. ह्यामुळें ज्याप्रमाणें अरुंधती देवांमध्यें प्रशंसेस पात्र आहे, त्याप्रमाणें ही प्रशंसेस पात्र असून पतिव्रतांमध्यें अग्रगण्य आहे. हे रघुकुलनंदना, तुमच्या आगमनामुळेंच हा आश्रमप्रदेश अलंकृत झाला आहे. तेव्हां ज्या ठिकाणीं ह्या सीतेसहवर्तमान आणि लक्ष्मणासहवर्तमान तूं वास्तव्य करशील, तो प्रदेश अलंकृत होईल, हें काय सांगावें?"

ह्याप्रमाणें अगस्त्य मुनींनीं सांगितलें असतां अग्नीप्रमाणें देदीप्यमान असलेल्या त्या मुनींना हात जोडून राम प्रेमपूर्वक म्हणाला, "ज्या अर्थी भ्राता आणि भार्या ह्यांसहवर्तमान माझ्यावर मुनिश्रेष्ठ गुरु संतुष्ट झाले आहेत, त्या अर्थी माझ्यावर आपला अनुग्रह झाला असून मी धन्य आहें. परंतु मला कांहीं विचारावयाचें आहें. ज्या ठिकाणीं निवासस्थान तयार करून मला आनंदानें व सुखानें राहतां येईल, असा एक उदक आणि विपुल वृक्षसमुदाय ह्यांनीं युक्त असलेला प्रदेश आपण मला सांगा."

हें रामाचें भाषण श्रवण केल्यावर क्षणभर विचार करून त्या धर्मात्म्या अगस्त्य मुनींनीं त्याच्याशीं शुभ भाषण केलें. ते म्हणाले, "रामा, येथून दोन योजनांवर पंचवटी म्हणून विख्यात असलेला एक संपन्न प्रदेश आहे. तेथें मृग पुष्कळ असून मुळें, फळें व उदक ह्यांचीहि समृद्धि आहे. त्या ठिकाणीं लक्ष्मणासहवर्तमान जाऊन तूं आश्रम तयार कर, आणि पित्याची प्रतिज्ञा त्याच्या सांगण्याप्रमाणें परिपालन करीत करीत तूं आनंदानें तेथें राहा. हे निष्पापा, दशरथाचे ठिकाणीं माझें प्रेम असल्या कारणानें तपःसामर्थ्यानें तुझा हा सर्व वृत्तांत मला कधींच विदित झालेला आहे. तपोवनामध्यें ह्या आश्रमांत माझ्यासहवर्तमान वास्तव्य करण्याचें लक्ष्मणाशीं कबूल करूनहि आतां मला एखादी वास्तव्य करण्याकरितां दुसरीकडे जागा सांगा, अशी विनंति करण्यांत तुझ्या मनांतील काय उद्देश आहे, हेंहि मीं तपश्चर्येच्या योगानें जाणिलें आहे. सारांश, राक्षसांचा वध करण्याची तूं प्रतिज्ञा केली आहेस, आणि ह्या माझ्या आश्रमामध्यें तर राक्षस येण्याचा संभव नाहीं. तेव्हां ज्या ठिकाणीं ते येतील, असें एखादें स्थान तुला अवश्य आहे, हें मी जाणून आहें; आणि म्हणूनच 'पंचवटीमध्यें जा' असें मी तुला सांगत आहें. तो वन-प्रदेश रमणीय असल्यामुळें सीता आनंदानें तेथें राहील. राघवा, गोदावरीचे समीप असलेला तो प्रशस्त देश येथून फार दूर नाहीं. तेथें सीतेच्या मनाला बरें वाटेल. रामा, विपुल मुळें, फळें आणि नानाप्रकारचे पक्षिगण ह्यांनीं युक्त असलेला तो एकांत प्रदेश पवित्र असल्यामुळें रमणीय असून तूंहि सदाचरणानें वागणारा त्याचें रक्षण करण्यास समर्थ आहेस. रामा, त्या ठिकाणीं वास्तव्य करून तूं ऋषींचें परिपालन करशील."

पंचवटीमार्गकथन.

अगस्त्य सांगतातः—"रामा, पंचवटीला जाणाऱ्यानें हें मधुवृक्षांचें (मोहाच्या झाडांचें) मोठें वन दिसत आहे, त्याच्या उत्तर बाजूनें जावें. नंतर पर्वताच्या समीपच उघड्या प्रदेशावर चढून गेले, म्हणजे नित्य प्रफुल्लित वृक्षांनीं युक्त असलेलीं वनें ज्यामध्यें आहेत, असा पंचवटी म्हणून प्रसिद्ध असलेला देश लागतो."

ह्याप्रमाणें अगस्त्य मुनींनीं सांगितलें असतां लक्ष्मणासहवर्तमान रामानें त्या सत्यवचनी ऋषींचा सत्कारपूर्वक निरोप घेतला; आणि त्यांनीं अनुज्ञा दिल्या-नंतर त्यांचें पादाभिवंदन करून संग्रामामध्यें भय न बाळगणारे व अंतःकरणांत स्वस्थ असलेले ते राजकुमार राम-लक्ष्मण भाते लटकावून आणि धनुष्यें हातांत घेऊन महर्षींनीं सांगितलेल्या मार्गानें सीतेसहवर्तमान पंचवटीला चालते झाले.

सर्ग चौदावा.

जटायुदर्शन.

पंचवटीला जातां जातां मार्गामध्यें भयंकर पराक्रम करणारा एक धिप्पाड गृध्र पक्षी रामाला आढळला. वनामध्यें असलेल्या त्या पक्ष्याला अवलोकन करून ते महाभाग्यवान राम-लक्ष्मण त्याला राक्षस समजले, आणि 'तूं कोण?' म्हणून त्यांनीं त्या पक्ष्याला विचारिलें. तेव्हां मधुर आणि सौम्य वाणीनें रामाला प्रसन्न करीत करीत तो म्हणाला, 'वत्सा, तुझ्या पित्याचा मी मित्र आहें, असें समज.'

हें त्यानें सांगितल्यावर त्याला पित्याचा सखा समजून रामानें त्याचें पूजन केलें, आणि त्याचें कुल व नाम हें लक्ष्यपूर्वक त्यानें त्याला विचारिलें. तेव्हां धर्मात्म्या रघुवंशजश्रेष्ठ श्रीरामचंद्राचें भाषण श्रवण करून त्या पक्ष्यानें आपण कोण आणि आपलें कुल कोणतें तें सांगून प्रसंगोपात

सर्व भूतांची उत्पत्ति

त्याला कथन केली. तो म्हणाला, "हे महापराक्रमी रामा, पूर्वी जे प्रजापति होऊन गेले, ते सर्व मी तुला आरंभापासून सांगतों, ऐक. त्यांपैकीं पहिला कर्दम, त्याच्यानंतर विकृत, शेष, संश्रय, वीर्यवान बहुपुत्र, स्थाणु, मरीचि, अत्रि, महाबलाढ्य क्रतु, पुलस्त्य, अंगिरा, प्रचेता, पुलह, दक्ष, विवस्वान्, अरिष्टनेमि आणि त्यांच्यांतील शेवटला महातेजस्वी कश्यप होय. हे महायशस्वी रामा, दक्षप्रजापतीला साठ यशस्विनी कन्या होत्या, म्हणून प्रसिद्धि आहे. त्यांपैकीं अदिति, दिति, दनु, कालका, ताम्रा, क्रोधवशा, मनु आणि अनला अशा आठ सुंदर कन्यांचा कश्यपांनीं प्रतिग्रह केला. नंतर ते कश्यप मुनि प्रसन्न होऊन त्या कन्यांना म्हणाले, 'तुम्हांला माझ्यासारखे त्रैलोक्याधिपति पुत्र होतील.' रामा, अदिति, दिति, दनु आणि कालका ह्यांना मात्र कश्यपाप्रमाणें पुत्र असावा, अशी इच्छा झाली; आणि इतर चौघी त्याविषयीं बेफिकीरच राहिल्या. हे शत्रुदमना, अदितीचे ठिकाणीं तेहेतीस देव उत्पन्न झाले. द्वादशादित्य, अष्टवसु, एकादश रुद्र आणि हे रघुकुलतिलका, उभयतां यशस्वी दैत्यपुत्र अश्विनीकुमार दितीला झाले. वनें व समुद्र ह्यांसहवर्तमान ही पृथ्वी पूर्वी दैत्यांचीच होती. हे शत्रुदमना, दनूला अश्वग्रीव हा पुत्र झाला. नरक आणि कालक हे दोन पुत्र कश्यपाच्या कालका स्त्रीला झाले; आणि क्रौंची, भासी, श्येनी, धृतराष्ट्री व शुकी अशा पांच जगद्विख्यात कन्या ताम्रेला झाल्या. ह्यांपैकीं क्रौंचीला

उलूक पक्षी झाले व भासीला भास पक्षी झाले. श्येनीला ससाणे व गृध्र असे महातेजस्वी पुत्र झाले. राजहंस व कलहंस हे सर्व पुत्र धृतराष्ट्रीला झाले, आणि चक्रवाक पक्षीहि त्याच स्त्रीला झाले. शुकीला नता ही कन्या झाली, आणि त्या नतेचे ठिकाणीं विनता ही कन्या उत्पन्न झाली. रामा, कश्यपाच्या क्रोधवशा नामक स्त्रीला मृगी, मृगमदा, हरी, भद्रमदा, मातंगी, शार्दूली, श्वेता, सुरभी, सर्वलक्षणसंपन्न सुरसा आणि कद्रुका अशा दहा कन्या झाल्या. हे नरोत्तमा, सर्व मृग मृगीची संतति होय, व ऋक्ष, सृमर आणि चमर हे मृगमदेचे पुत्र होत. तदनंतर भद्रमदेला इरावती म्हणून एक कन्या झाली. तिलाच ऐरावत म्हणून लोकनाथ महाराज पुत्र झाला. सिंह आणि तपस्वी वानर आणि गोलांगूल हीं हरीचीं अपत्यें असून, व्याघ्र हे शार्दूलीचे पुत्र झाले. हे पुरुषश्रेष्ठा, गज ही मातंगीची संतति होय, आणि दिग्गज हे श्वेतेचे पुत्र होत. हे ककुत्स्थकुलोत्पन्ना रामा, तुझें देव बरें करो. रोहिणी आणि यशस्विनी गंधर्वी अशा दोन कन्या सुरभी देवीला झाल्या. रोहिणीपासून गायी उत्पन्न झाल्या. गंधर्वीला अश्व हे पुत्र झाले. सुरसेला नाग, व कद्रुला सर्प असे पुत्र झाले. हे पुरुषश्रेष्ठ रामा, महात्म्या कश्यपांच्या मनु नामक स्त्रीला ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे मानवपुत्र झाले. पैकीं ब्राह्मण मुखापासून, क्षत्रिय बाहूंपासून, वैश्य मांड्यांपासून आणि शूद्र पायांपासून उत्पन्न झाले, अशा आशयाची श्रुति आहे. अनलेला सर्व चांगलीं फळें धारण करणारे वृक्ष झाले. विनता ही शुकीची नात होय, आणि कद्रु व सुरसा ह्या परस्पर भगिनी होत. पृथ्वी धारण करणारे असे सहस्र पुत्र कद्रूला झाले, आणि गरुड व अरुण असे दोन पुत्र विनतेला झाले. त्या अरुणापासून मीं उत्पन्न झालों आहें, आणि संपाति हा माझा ज्येष्ठ बंधु आहे. रामा, जटायु म्हणून मी श्येनीचा पुत्र आहें, असें तूं समज. तुझी इच्छा असेल तर निवासस्थानामध्यें मी तुला साहाय्य करणारा होईन, आणि लक्ष्मणासहवर्तमान तूं बाहेर गेल्यावर मी सीतेचें रक्षण करीत जाईन." असो. जटायूनें आपल्या पित्याशीं असलेलें पितृत्वाचें नातें वारंवार कथन केलेलें श्रवण करून जितेंद्रिय रामानें जटायूचा सत्कार केला. त्याला आनंदानें आलिंगन दिल्यावर त्याच्यापुढें तो राम नम्र होऊन उभा राहिला. नंतर मिथिलराजकन्या सीतेला रक्षणाकरितां त्या जटायूच्या स्वाधीन करून तपोवनांचें रक्षण करण्याकरितां राक्षस ह्या शत्रूंचा वध करण्याच्या उद्देशानें त्या अतिबलाढ्य पक्ष्याला बरोबर घेऊनच तो राम लक्ष्मणासहवर्तमान त्या पंचवटीमध्यें गेला.

सर्ग पंधरावा.

पंचवटीवास्तव्य.

तदनंतर नानाप्रकारचीं श्वापदें आणि मृग ह्यांनीं युक्त असलेल्या पंचवटीमध्यें गेल्यावर राम आपल्या उज्ज्वल तेजस्वी भ्रात्याला म्हणाला, " अगस्त्य मुनींनीं जो देश आपणांला सांगितला, त्या देशाला आपण आलों. लक्ष्मणा, प्रफुल्लित वनांनीं युक्त असलेला हाच तो पंचवटी प्रदेश. आतां वनामध्यें तूं एकदां चोहोंकडे दृष्टि फेंक, आणि कोणत्या स्थलावर आपल्या मनाप्रमाणें आश्रम स्थापितां येईल, तें पहा. कारण ह्या कामांत तूं चतुर आहेस. लक्ष्मणा, सीता, तूं व मी ह्या सर्वांचें मन ज्या ठिकाणीं रमेल, असा एखादा जलाशय जवळ असलेला प्रदेश हुडकून काढ. वनाचें आणि त्याचप्रमाणें जलाचें रमणीयत्व जेथें असेल, आणि ज्या ठिकाणीं काष्ठें, पुष्पें, कुश आणि उदक सन्निध असेल, असा प्रदेश शोधून काढ. "

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां लक्ष्मण हात जोडून सीतेच्या समक्ष रामाला म्हणाला, " हे काकुत्स्था, तूं असतांना मी शेंकडों वर्षें जरी तुझ्या सन्निध असलों, तरी तुझ्या अधीनच आहें. मी कधींहि स्वतंत्र होणार नाहीं. तेव्हां मनोहर प्रदेश कोणता, त्याचा स्वतःच विचार करून ' ह्या मनोहर प्रदेशामध्यें आश्रम तयार कर ' असें तूं मला सांग. "

लक्ष्मणाच्या भाषणानें महातेजस्वी राम अतिशय प्रसन्न झाला, आणि पर्यालोचन करितां करितां, सुवर्णसंपन्न असा एक प्रदेश त्याच्या मनाला पटला. नंतर आश्रमकर्माला योग्य अशा त्या मनोहर प्रदेशावर जाऊन व लक्ष्मणाचा हात धरून पुरुषश्रेष्ठ राम म्हणाला, " हा प्रदेश सपाट, टुमदार आणि प्रफुल्लित वृक्षांनीं युक्त आहे. तेव्हां ह्या ठिकाणीं तूं योग्य रीतीनें आश्रम तयार कर. पद्मशोभेनें युक्त आणि सूर्यासारख्या उज्ज्वल व सुगंधि कमलांनीं संपन्न असें हें रम्य सरोवर जवळच दिसत आहे, आणि जितेंद्रिय अगस्त्य मुनींनीं सांगितल्याप्रमाणें प्रफुल्लित वृक्षांनीं युक्त असलेली ही रम्य गोदावरी दिसत आहे. येथून फार दूरहि नाहीं व फार जवळहि नाहीं, अशा ठिकाणीं असलेली गोदावरी नदी हंस व कारंडव पक्ष्यांनीं गजबजून गेलेली आहे, चक्रवाक पक्ष्यांनीं सुशोभित झाली आहे आणि उदकपान करण्याकरितां आलेल्या मृगांच्या कळपांनीं अगदीं खेंचलेली आहे. मयूर पक्ष्यांनीं नादित, अनेक गुहांनीं युक्त आणि

प्रफुल्लित वृक्षांनीं व्याप्त असे हे उंच पर्वत रम्य व सौम्य दिसत आहेत; आणि त्याचप्रमाणें सुवर्णवर्ण, रौप्यवर्ण आणि ताम्रवर्ण अशा शुभ वृक्षांच्या योगानें ठिकठिकाणीं हे पर्वत उत्कृष्ठ तऱ्हांनीं शरिरांवर चित्रें काढून शृंगारिलेल्या गजांप्रमाणें दिसत आहेत. साल, ताल, तमाल, खर्जूर, फणस, जलकदंब, तिवस आणि नागचाफा ह्या वृक्षांनीं हे पर्वत सुशोभित झालेले आहेत. आम्र, अशोक, तिलक, केतक, चंपकपुष्पें, गुल्में आणि लता ह्यांनीं युक्त असलेले इतरहि नानाप्रकारचे वृक्ष ह्यांनीं हे पर्वत व्याप्त झाले आहेत. स्यंदन, चंदन, कदंब, फणस, ओट, सावई, धव, खदिर, शमी, पळस आणि लोध्र ह्या वृक्षांनीं हे पर्वत गजबजलेले आहेत. लक्ष्मणा, हें स्थल पवित्र आहे, रम्य आहे आणि नानाप्रकारच्या मृगांनीं व पक्ष्यांनीं युक्त आहे. तस्मात् ह्या जटायु पक्ष्यासहवर्तमान आपण येथेंच राहूं."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां लक्ष्मणानें भ्रात्याकरितां लवकरच आश्रम तयार केला. मातीच्या भिंती रचिलेली अशी एक प्रशस्त व सुशोभित पर्णशाला त्यानें तयार केली. तिला चांगले खांब लाविलेले होते आणि लांब लांब कळकाचे तिला वासे ठोकिलेले होते. शमीच्या शाखा त्या वाशांवर अंथरिलेल्या होत्या. त्या ठिकाणीं बळकट बांध घेऊन ती पर्णशाला बांधिलेली होती. कुश, काश, देवनळ आणि पानें ह्यांच्या योगानें तिच्यावर उत्तम आच्छादन केलेलें होतें, आणि तिचा तळ साफ केलेला होता. सारांश, अतिबलाढ्य लक्ष्मणानें रामाकरितां एक प्रेक्षणीय व अनुपम निवासस्थान तयार केलें होतें. असो.

ह्याप्रमाणें निवासस्थान तयार केल्यानंतर श्रीमान लक्ष्मण गोदावरी नदीवर गेला, आणि तेथें स्नान करून व कमलें घेऊन फलांसहवर्तमान पुनरपि परत आला. तदनंतर पुष्पपूजा आणि वास्तुशांत यथाविधि केल्यावर रामाला त्यानें तें तयार केलेलें आश्रमस्थान दाखविलें. तेव्हां पर्णशालेमध्यें तयार केलेला तो सौम्य आश्रम अवलोकन करून त्या सीतेसहवर्तमान रामाला पराकाष्ठेचा हर्ष झाला, आणि अत्यंत आनंदित झालेला तो राम अतिशय प्रेमानें लक्ष्मणाला गाढ आलिंगन देऊन म्हणाला, "लक्ष्मणा, मी तुझ्यावर संतुष्ट झालों आहें. तूं हें मोठें कर्म केलें आहेस. ह्याकरितां दुसरें कांहीं देण्याला मजपाशीं नसल्यामुळें गाढ आलिंगनच मीं तुला दिलें आहे. हे लक्ष्मणा, अभिप्राय जाणणारा कृतज्ञ आणि धर्मवेत्ता असा तूं पुत्र असल्यामुळें, माझा धर्मात्मा पिता मृत झालाच नाहीं, असें मला वाटतें. कारण तूंच पित्याप्रमाणें माझें परिपालन करीत आहेस."

ह्याप्रमाणें लक्ष्मणाला सांगून सुखी झालेला तो लक्ष्मीवर्धक राम विपुल फलांनीं युक्त असलेल्या त्या प्रदेशामध्यें सुखानें राहिला, आणि सीता व लक्ष्मण त्याची शुश्रूषा करीत असल्यामुळें स्वर्गलोकांत राहणाऱ्या देवाप्रमाणेंच त्याचा कांहीं काल आनंदांत गेला.

सर्ग सोळावा.

हेमंत ऋतूचें वर्णन.

तो महात्मा राम तेथें सुखानें वास्तव्य करूं लागला असतां, शरदृतु संपल्यावर प्रिय असा हेमंत ऋतु प्राप्त झाला. एकदां रात्र उजाडल्यावर तो रघुनंदन राम स्नानाकरितां रम्य गोदावरीला निघाला असतां, नम्र होऊन व हातांत कलश घेऊन सीतेसहवर्तमान त्याच्या मागोमाग जाणारा वीर्यवान भ्राता लक्ष्मण त्याला म्हणाला, "हे प्रियवादिन्, तुला जो प्रिय तो हा काल प्राप्त झाला आहे, आणि त्याच्या योगानें हा संवत्सर धान्यादिकांच्या समृद्धीमुळें भूषित झाल्यासारखा दिसत आहे. दंवामुळें लोकांचीं शरीरें खडबडींत झालीं आहेत. भूमि धान्यराशींनीं युक्त झाली आहे. जलें उपभोग घेण्यास अयोग्य झालीं आहेत, आणि अग्नि लोकांना इष्ट झालेला आहे. नवान्न भक्षण करण्याकरितां अवश्य असलेल्या आग्रयणसंज्ञक कर्मरूप पूजांच्या योगानें पितरांचें व देवांचें संतर्पण करून वेळेवर आग्रयण केल्यामुळें लोक निष्पाप झाले आहेत. देशामध्यें अन्नाची समृद्धि झालेली आहे. दुभत्याची चंगळ उडून गेली आहे, आणि विजयेच्छु राजे स्वारी करण्याकरितां संचार करीत आहेत. सूर्य दक्षिण दिशेचेंच अतिशय सेवन करूं लागल्यामुळें तिलकहीन झालेल्या स्त्रीप्रमाणें उत्तर दिशा शोभेनाशी झाली आहे. स्वभावतःच बर्फाच्या थरांनीं संपन्न असलेला हिमालय पर्वत सूर्यापासून लांब झाला असल्यामुळें सांप्रत अगदीं उघडच हिमसंपन्न होऊन यथार्थ नांवानें युक्त झाला आहे. मध्यान्हसमयीं सूर्यकिरणांचा स्पर्श होत असल्यामुळें दिवस सुखजनक झाले असून ह्या वेळीं ते संचारालाहि अतिशय सुखावहच झाले आहेत. ह्या दिवसांत सूर्याचें सेवन फारच इष्ट झालेलें आहे, आणि छाया व उदक हीं मात्र अनिष्ट झालेलीं आहेत. ह्या दिवसांमध्यें सूर्य मृदु झाल्यासारखा भासत आहे,

दंव फार पडत आहे, शैल्य शोंबत आहे, थंडीनें पानें झडल्यामुळें अरण्यें शून्य होऊन कमलांचा विध्वंस झालेला आहे, आणि स्वतः दिवसहि संकोचित झाल्यासारखे दिसत आहेत. सांप्रत ह्या दिवसांत उघड्या प्रदेशांमध्यें कोणीहि शयन करीत नाहींत. सूर्य पुष्य नक्षत्रावर मावळत असतो. बर्फामुळें प्रदेश पांढुरके दिसत आहेत. रात्री अतिशयच मोठ्या झाल्या असून त्यांत थंडीहि फार पडत आहे. ज्याचें उपभोग्यत्व सूर्याकडे गेलें आहे व बर्फाच्या तुषारामुळें ज्याचें मंडळ पांढुरकें दिसत आहे, असा चंद्र निश्वासानें मलिन झालेल्या आरशाप्रमाणें¹ प्रकाशित झालेला आहे. उन्हानें काळवंडून गेलेल्या सीतेप्रमाणें तुषारानें मलिन झालेली चंद्रिका नुसती दिसतच आहे, परंतु शोभत नाहीं. स्वभावतःच शीतल स्पर्शानें युक्त आणि सांप्रत हिमानें विद्ध झालेला पश्चिमेकडील वायु प्रातःकालीं पहिल्यापेक्षांहि दुप्पट गार वाहूं लागला आहे. सातु आणि गहूं ह्यांच्या पिकानें युक्त असलेलीं व धुक्यानें आच्छादिलेलीं अरण्यें सूर्योदय झाल्यावर किल् किल् करूं लागणाऱ्या क्रौंच व सारस पक्ष्यांच्या योगानें शोभूं लागलीं आहेत. खर्जूर पुष्पांप्रमाणें लांब व पीतवर्ण, आणि तंदुलांनीं परिपूर्ण अशा चवऱ्यांच्या योगानें किंचित् नम्र होऊन सुवर्णासारखीं दिसत असलेलीं भातें शोभूं लागलीं आहेत. सूर्याची बाहेर फांकणारीं किरणें धुकें व दंव ह्यांनीं व्याप्त झालीं असल्यामुळें दूर उदय पावलेला सूर्य त्यांच्या योगानें चंद्रासारखा भासत आहे. प्रातःकालीं ऊन पूर्णपणें घ्यावेसें वाटतें, दुपारीं त्याचा स्पर्श सुखावह होतो आणि सायंकाळीं कांहींसें पांढुरकें असलेलें तें ऊन भूमीवर पडलें असतां शोभूं लागतें. दंव पडल्यामुळे ज्याच्यांतील गवत किंचित् भिजून गेलेलें आहे, अशी वनभूमि वर कोंवळें ऊन पडलें असतां शोभत आहे. ह्या दिवसांमध्यें अत्यंत तृषित झालेलाहि वनगज प्रथम अगाध शीत उदकाला सुखानें सोंड लावितो, परंतु गार लागतांक्षणींं ती झटपट आखडून घेतो. हे जलचर पक्षी जलाचे समीप बसले असतांनाहि वयांत न आलेले पुरुष ज्याप्रमाणें संग्रामामध्यें शिरत नाहींत, त्याप्रमाणें जलामध्यें शिरत नाहींत. रात्रीं तुषाररूप तमानें जखडिलेले आणि प्रातःकालीं अंधारमय धुक्यानें आच्छादिलेले पुष्परहित वनसमुदाय निद्रिस्त झाल्यासारखे दिसत आहेत. सांप्रत नद्यांतील उदकें आंतून निघणाऱ्या वाफांनीं आच्छादित झालेलीं दिसतात; ह्यामुळें तेथें असलेले सारस पक्षी जर शब्द करूं लागले, तरच समजण्यांत येतात; आणि भोंव-

---

१ आरशावर श्वास टाकिला तर तो मलिन होतो; त्यांत रूप पाहिलें तर तें अंधुक दिसतें.

तालीं असलेलीं वाळवंटेंहि बर्फानें ओलीं झालेलीं असतात. ह्या कारणानें नद्या सांप्रत तीरांवरूनच ओळखितां येतात. बर्फ पडत असल्यानें व सूर्य सौम्य झाला असल्यानें पर्वताच्या माथ्यावरीलहि उदक शैत्यामुळें प्रायः ह्या दिवसांत पाण्यासारखेंच दिसत असतें. बर्फानें दुर्दशा करून टाकिल्यामुळें कमलाचे देंठच ज्यामध्यें अवशिष्ट राहिले आहेत, अशीं सरोवरें आतां शोभा देत नाहींत. कारण ह्या ऋतूमध्यें शैत्यानें कमलाचे पराग आणि कोश नाहींतसे झालेले असतात, आणि पानेंहि जीर्णतेमुळें झडून गेलेलीं असतात."

लक्ष्मणाचें भरतासंबंधानें भाषण.

लक्ष्मण म्हणतोः— "हे पुरुषश्रेष्ठा, ह्या कालामध्यें दुःखित असलेला धर्मात्मा भरत तुझ्या भक्तीनें नगरामध्यें तपश्चर्या करीत आहे. राज्य, मान व अनेक प्रकारच्या विपुल भोग्य वस्तु ह्यांचा त्याग करून शुद्ध आहार करणारा तो भरत शीत असलेल्या भूतलावर शयन करीत आहे. तोहि खरोखर ह्या वेळेला स्नानाला जाण्याकरितां उठत असेल आणि मंत्र्यांनीं परिवेष्टित असलेला तो नित्य सरयू नदीवर जात असेल; परंतु अत्यंत सुखामध्यें वाढलेला आणि फारच सुकुमार असा तो भरत शैत्यानें व्याकुल झाला असतां उत्तर रात्रीं त्याच्यानें स्नान कसें बरें करवत असेल? कमलपत्रासारख्या नेत्रांनीं युक्त, मेघश्याम, श्रीमान, अंगानें सडसडीत, भव्य, धर्मज्ञ, सत्यवचनी, जितेंद्रिय आणि म्हणूनच परस्त्रीविषयीं लज्जेनें मनाचें संयमन केलेला, प्रियभाषणी, मनोहर, आजानुबाहु आणि शत्रूंचें दमन करणारा तो भरत नानाप्रकारच्या सौख्यांचा त्याग करून सर्वस्वी तुमचें अनुकरण करून राहिला आहे. ज्या अर्थी वनामध्यें असलेल्याहि तुझें तापस धर्माचें अवलंबन करून भरत अनुकरण करीत आहे, त्या अर्थी तुझ्या त्या महात्म्या भरत भ्रात्यानें स्वर्ग जिंकिला आहे. मनुष्यें पित्याच्या स्वभावाचें अनुकरण न करितां मातेच्या स्वभावाचें अनुकरण करीत असतात, ही लोकांमध्यें म्हण प्रसिद्ध आहे; तथापि भरतानें ती आज खोटी केली आहे. परंतु दशरथ जिचा भर्ता आणि सज्जन भरत जिचा पुत्र, ती कैकेयी माता कां बरें तशा प्रकारची क्रूर बुद्धीची असावी!"

ह्याप्रमाणें धर्मनिष्ठ लक्ष्मण प्रेमानें बोलत असतां मातेची ती निंदा सहन न होऊन राम त्याला म्हणाला, "बा लक्ष्मणा, मधल्या मातेची यत्किंचित्‌हि निंदा न करितां त्या इक्ष्वाकुवंशाधिपति भरताची गोष्ट तूं सांग. स्वीकारिलेलें व्रत नेटानें चालवावयाचें हा माझ्या बुद्धीचा स्वभाव असून, ती बुद्धि वन-

वासाविषयीं निश्चित झाली आहे. परंतु भरताचे ठिकाणीं असलेल्या प्रेमामुळें त्याचा वियोग सहन न होऊन ती पुनरपि चंचल होत आहे. अरे, प्रिय, मधुर, मनोहर, अमृततुल्य आणि मनाला आल्हाद देणाऱ्या अशा ह्या भरताच्या भाषणाचें मला स्मरण होत आहे. तेव्हां हे रघुनंदना, तुझ्यासहवर्तमान माझी महात्म्या भरताशीं व वीर शत्रुघ्नाशीं कधीं बरें भेट होईल ? "

ह्याप्रमाणें विलाप करीत करीत गोदावरी नदीवर आल्यावर सीता आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान रामानें स्नान केलें. त्या उदकानें पितरांचें व देवांचें त्यांनीं तर्पण केलें. नंतर त्या निष्पाप असलेल्या रामप्रभृतींनीं उदय पावलेल्या सूर्याचें व देवतांचें स्तवन केलें. पार्वतीला बरोबर घेऊन स्नान करून निघालेला भगवान प्रभु रुद्र जाऊं लागला असतां ज्याप्रमाणें शोभतो, त्याप्रमाणें सीतेला बरोबर घेऊन लक्ष्मणासहवर्तमान असलेला राम स्नान करून जाऊं लागला असतां शोभूं लागला.

सर्ग सतरावा.

शूर्पणखेचें रामाश्रमीं गमन.

स्नान झाल्यावर राम, सीता आणि लक्ष्मण हीं आपल्या आश्रमाला गेलीं. आश्रमांत आल्यानंतर सकाळची स्नानसंध्या आटोपून राम लक्ष्मणासहवर्तमान बाहेर असलेल्या पर्णशालेमध्यें गेला आणि महर्षी प्रशंसा करीत असतां तो राम त्या पर्णशालेमध्यें सुखानें राहिला. तो महापराक्रमी राम सीतेसहवर्तमान पर्णशालेमध्यें बसला असतां चित्रा नक्षत्रासहवर्तमान असलेल्या चंद्राप्रमाणें शोभूं लागला, आणि लक्ष्मणाबरोबर तो नानाप्रकारच्या गोष्टी सांगूं लागला; परंतु ह्याप्रमाणें गोष्टींकडे मन व्यग्र होऊन राम बसला असतांना कोणी एक राक्षसी स्वेच्छेनें त्या प्रदेशाला आली. ती रावणाची बहीण असून तिचें नांव शूर्पणखा होतें. रामाला पाहिल्यावर तिला तो देवाप्रमाणें वाटला. इतकेंच नव्हे, पण देदीप्यमान मुख, आजानुबाहु, कमलपत्राप्रमाणें दीर्घ नेत्र, गजाप्रमाणें शौर्यदर्शक गति, सुकुमार, महाधैर्यवान, जटामंडल आणि राजलक्षणें ह्यांनीं युक्त, नीलकमलाप्रमाणें श्यामवर्ण आणि मदनासारख्या कांतीनें संपन्न अशा इंद्रतुल्य रामाला अवलोकन करून ती कामानें मोहित झाली. नंतर

विक्राळ मुख, विशाल उदर, विरूप नेत्र, ताम्रवर्ण केश, कुरूप मुद्रा, भयंकर स्वर, उग्र स्वभाव, वृद्ध वय, कुटिल भाषण, अतिशय दुष्ट वर्तन आणि उद्वेगजनक मुद्रा ह्यांनीं युक्त असलेली ती राक्षसी कामाधीन होऊन उत्कृष्ठ मुख, कृश उदर, विशाल नयन, सुंदर केश, सुरूप मुद्रा, मंजुल स्वर, सौम्य स्वभाव, तरुण वय, सरळ भाषण, न्यायाला अनुसरून असलेलें वर्तन आणि आल्हाददायक मुद्रा ह्यांनीं युक्त असलेल्या रामाशीं ती बोलूं लागली.

शूर्पणखा व राम यांचा संवाद.

ती म्हणाली:—'धनुर्बाण धारण करणारा तूं जटिल तपस्व्याचा वेष धारण करून भार्येसहवर्तमान ह्या राक्षसांनीं आश्रय केलेल्या प्रदेशामध्यें कसा बरें आलास? तूं येथें येण्याचें कारण काय, तें मला खरें खरें सांग.'

ह्याप्रमाणें शूर्पणखा राक्षसीनें विचारिले असतां तो शत्रुतापन राम सरळ स्वभावाचा असल्यामुळें सर्व सांगूं लागला. तो म्हणाला, "देवतुल्य पराक्रमी असा एक दशरथ नामक राजा होऊन गेला. त्याचा मी राम नामक ज्येष्ठ पुत्र आहें. मी लोकांना विदित आहें. हा लक्ष्मण नांवाचा माझा कनिष्ठ भ्राता असून मला अनुसरून वागत असतो. ही सीता म्हणून प्रसिद्ध असलेली विदेहराजकन्या माझी भार्या आहे. त्या पित्या राजाची आणि मातेची आज्ञा झाल्यामुळें वचनबद्ध होऊन मी धर्माभिलाषी धर्मपरिपालनार्थ वनामध्यें वास्तव्य करण्याकरितां येथें आलों आहें. आतां तुला जाणण्याची माझी इच्छा आहे. तूं कोण आहेस व कोणाची आहेस? मला तर तूं मनोहर अवयवांनीं युक्त झालेली राक्षसी भासत आहेस. तेव्हां येथें कोणत्या कारणाकरितां तूं आलीस, हें मला सत्य सांग."

हें रामाचें भाषण श्रवण केल्यावर मदनानें व्याकुल झालेली ती राक्षसी त्याला म्हणाली, "हे रामा, माझें बोलणें ऐक. मी तुला खरें खरें सांगत आहें. स्वेच्छेप्रमाणें रूप धारण करणारी मी शूर्पणखा नामक राक्षसी आहें. मी सर्वांना भय उत्पन्न करणारी असून ह्या अरण्यामध्यें एकटी संचार करीत असतें. रावण म्हणून माझा भ्राता आहे. तो कदाचित् तुझ्या कानावर आला असेल. कुंभकर्ण म्हणून एक महाबलाढ्य व नेहमींच गाढ निद्रेंत असलेला दुसरा भ्राता आहे. बिभीषण म्हणून जो तिसरा भ्राता आहे, त्याचें वर्तन राक्षसासारखें नसून तो धर्मात्मा आहे. संग्रामामध्यें ज्यांचें वीर्य प्रख्यात आहे, असे दुसरे दोन भ्राते खर व दूषण म्हणून आहेत. रामा, तुझें अपूर्व

रूप दृष्टीस पडल्यामुळें तूं पुरुषश्रेष्ठ माझा भर्ता आहेस, असें समजून त्या भ्रात्यांची पर्वा न करितां मी प्रेमानें तुझ्याकडे आलें आहें. मी प्रभावसंपन्न असून स्वेच्छेनें व सामर्थ्यानें सर्व लोकांमध्यें गमन करणारी आहें. तस्मात् तूं माझा चिरकाल भर्ता हो. सीतेचा तुला काय उपयोग आहे? ही सीता विकृत व कुरूप असल्यामुळें तुला अनुरूप नाहीं. मीच तुला अनुरूप आहें. तेव्हां भार्या ह्या नात्यानें तूं माझ्याकडे अवलोकन कर. विरूप, दुराचारिणि, अक्राळ-विक्राळ आणि पोट अगदीं खपाटीला गेलेली ही तुझी मनुष्यजातीची भार्या ह्या तुझ्या भ्रात्यासहवर्तमान मी भक्षण करून टाकीन. नंतर विषयोपभोगाची इच्छा धरून पर्वतशिखरें आणि नानाप्रकारचीं वनें पाहात पाहात तूं माझ्यासहवर्तमान दंडकारण्यामध्यें संचार करशील."

ह्याप्रमाणें तिनें सांगितलें असतां ककुत्स्थकुलोत्पन्न राम त्या धुंद झालेल्या शूर्पणखेकडे पाहून हंसला, आणि संभाषण करण्यामध्यें निपुण असलेला तो राम मदनपाशानें बद्ध झालेल्या त्या शूर्पणखेशीं विनोदानें हास्यपूर्वक मधुर भाषण करूं लागला!

सर्ग अठरावा.

शूर्पणखाविरूपकरण.

राम म्हणाला:—"बाई, माझा विवाह झाला आहे. ही माझी प्रिय भार्या आहे. तुझ्यासारख्या स्त्रियांशीं शत्रुत्व असणें मला फारच दुःखदायक आहे. हा माझा कनिष्ठ भ्राता लक्ष्मण सुशील, वीर्यवान, दिसण्यांत मनोहर, वैभवशाली आणि अविवाहित[१] आहे. ह्याला आजपर्यंत कधीं भार्येचें सुख ठाऊक नाहीं, आणि म्हणूनच ह्याला भार्येची गरज आहे. तेव्हां तरुण आणि दिसण्यांतहि मनोहर असा हा पति तुझ्या रूपाला योग्य होईल. तस्मात् हे विशाल-

१ लक्ष्मणाचा विवाह झालेला असूनहि तो अविवाहित आहे, असें रामानें शूर्पणखेला सांगितलें; परंतु राम तिच्याशीं थट्टेनें बोलू लागले, असें आरंभीच सांगितलें आहे. थट्टेमध्यें केलेलें असत्य भाषण दोषास्पद होत नाहीं. कारण

न धर्मयुक्तं वचनं हिनस्ति न स्त्रीषु राजन्न विवाहकाले।
प्राणात्यये सर्वधनापहारे पंचानृतान्याहुरपातकानि॥

असें वचन आहे.

नयने, हे सुंदरि, मेरु पर्वताची सेवा करणाऱ्या सूर्याच्या प्रभेप्रमाणें सवत नसलेली तूं ह्या माझ्या भ्रात्याचें सेवन कर. "

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां कामानें मोहित झालेली ती राक्षसी लक्ष्मणाला म्हणाली, ' मी श्रेष्ठ स्त्री तुझ्या रूपाला योग्य भार्या आहें. तूं माझ्या-सहवर्तमान सर्व दंडकारण्यामध्यें सुखानें संचार कर. "

ह्याप्रमाणें ती राक्षसी लक्ष्मणाला म्हणाली असतां संभाषण करण्यांत प्रवीण असलेला तो लक्ष्मण हास्य करून शूर्पणखेला म्हणाला, " रक्तकमलासारख्या वर्णानें युक्त असलेली तूं मज दासाची भार्या होऊन दासी बनण्याची कां बरें इच्छा करीत आहेस ? कारण मी आपल्या आर्य भ्रात्याच्या तंत्रानें वागणारा परतंत्र आहें. तेव्हां हे विशालनयने, निर्मळ कांतीनें युक्त असलेली तूं उत्कृष्ट विषयवासनेनें युक्त असलेल्या आर्य रामाची कनिष्ठ भार्या होऊन कृतकृत्य व आनंदित हो. कुरूप, ओबडधोबड, कृशोदरी, दुराचारिणी आणि वृद्ध अशा ह्या भार्येचा त्याग करून हा तुझाच उपभोग घेईल. कारण हे श्रेष्ठ स्त्रिये, हे सुंदरि, हें रूप टाकून देऊन कोण बरें विचक्षण पुरुष मनुष्यजातींतील स्त्रियां-वर मन ठेवील ? "

ह्याप्रमाणें लक्ष्मणानें सांगितलें असतां थट्टा समजण्याइतकी चतुर नसलेली ती अक्राळविक्राळ व पोट खबदाडीला गेलेली शूर्पणखा तें भाषण सत्यच मानूं लागली; आणि ज्या तेजस्वी रामापुढें इतरांना जाणेंहि अशक्य होतें, त्याला ती म्हणाली, " विरूप, दुराचारिणी, ओबडधोबड, पोट खबदाडीला गेलेली आणि वृद्ध अशी जी ही भार्या, तिचा स्वीकार करून तूं मला बहुमान देत नाहींस. तेव्हां मी आज ह्या मनुष्यजातीच्या स्त्रीला तुझ्या समक्ष भक्षण करून टाकीन. ह्याप्रमाणें सवत नाहींशी झालेली मी तुझ्याबरोबर सुखास येईल, त्याप्रमाणें संचार करीन. "

ह्याप्रमाणें बोलून रोहिणीकडे धांवणारी मोठी ज्वालाच की काय अशा रीतीनें अलातचक्रासारख्या नेत्रांनीं युक्त असलेली ती शूर्पणखा अत्यंत क्रुद्ध होऊन मृगलोचना सीतेच्या अंगावर धांवली; परंतु मृत्युपाशाप्रमाणें असलेली शूर्प-णखा अंगावर धांवून येऊं लागली असतां क्रुद्ध झालेला महाबलाढ्य राम दटा-वून लक्ष्मणाला म्हणाला, " लक्ष्मणा, क्रूर आणि दुष्ट लोकांबरोबर थट्टा कधींहि करूं नये. हे सत्त्वस्था, आपल्या थट्टेमुळें, कसा तरी जीव धरून असलेल्या

सीतेला ही राक्षसी भक्षण करण्यास प्रवृत्त झाली आहे. अधींच कुरूप, दुराचारिणी, अतिशय मत्त आणि विशाल उदराच्या ह्या राक्षसीला तूं विरूप करून टाक."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां क्रुद्ध झालेल्या महाबलाढ्य लक्ष्मणानें रामासमक्ष खड्ग उपसून तिचे कान व नाक हीं छेदून टाकिलीं. तेव्हां कान व नाक तुटलेली ती घोर शूर्पणखा भेसूर ओरडली, आणि आल्या वाटेनें वनांत पळून गेली. विरूप झाल्यामुळें अंगावर रक्ताचा सडा झालेल्या त्या महाघोर राक्षसीनें पर्जन्यकालीं गर्जना करणाऱ्या मेघांप्रमाणें नानाप्रकारच्या गर्जना केल्या, आणि अनेक प्रकारांनीं रक्ताचा स्राव करणारी व घोर मुद्रेनें युक्त असलेली ती शूर्पणखा हात वर करून गर्जना करीत करीत महावनामध्यें प्रविष्ट झाली. तदनंतर विरूप करून टाकिलेली ती शूर्पणखा जनस्थानामध्यें[1] राक्षसमुदायांनीं परिवेष्ठित असलेल्या त्या उग्र तेजस्वी भ्रात्यासमीप गेल्यावर आकाशांतून पडणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें एकाएकीं भूमीवर पडली. नंतर भय आणि मोह ह्यांनीं व्याप्त होऊन अंगावर रक्ताचा सडा झालेली ती खराची भगिनी शूर्पणखा, भार्या आणि लक्ष्मण ह्यांसहवर्तमान वनामध्यें राम आल्याचें व लक्ष्मणानें आपल्याला विरूप केल्याचें सर्व वृत्त त्याला सांगूं लागली.

सर्ग एकोणिसावा.

शूर्पणखा व खर यांचा संवाद.

अंगावर रक्ताचा सडा झालेली आणि विरूप करून टाकिलेली ती आपली भगिनी तशा प्रकारें भूमीवर पडलेली पाहून खर राक्षस तिला म्हणाला, "ऊठ, मोह व भय सोडून दे. तुला ह्याप्रमाणें अशी विरूप करून कोणी टाकिली, तें सांग. ज्याच्या दाढेमध्यें विष आहे, अशा संमुख बसलेल्या निरपराधी कृष्णसर्पाला लीलेनें कोण बरें बोटानें डवचीत आहे? ज्यानें आज तुझ्याशीं प्रसंग केला आहे, त्यानें गळ्यामध्यें कालपाश अडकवून जहर विष सेवन केलें आहे; हें मोहामुळें त्याला समजत नाहीं. मृत्यूप्रमाणें असलेली तूं बल आणि पराक्रम यांनीं संपन्न, स्वेच्छेनें गमन करणारी व यथेष्ठ रूप धारण करणारी आहेस. तेव्हां तुझी ही अशी स्थिति कोणीं केली? तुलाहि विरूप

१ पृष्ठ ५ टीप पहा.

करून हांकून देणारा असा देव, गंधर्व, इतर प्राणी आणि महात्मे ऋषी यांमध्यें कोण बरें महावीर्यवान आहे? माझी कुचाळी काढणारा असा या जगतामध्यें मला कोणी दिसत नाहीं. पाक[1] दैत्याचा वध करणाऱ्या सहस्रनयन इंद्रावांचून देवांमध्येंहि मला कोणी आढळत नाहीं. हंस पक्षी जसे पाण्यांत मिसळलेलें दूध काढून प्राशन करितात, त्याचप्रमाणें मृत्यूप्रापक बाणांच्या योगानें मी त्याचे प्राण हरण करीन. संग्रामामध्यें माझ्या हातून बाणांनीं मर्मस्थानें तुटून मरून पडलेल्या कोणाचें बरें फेनयुक्त रक्त प्राशन करण्याची पृथ्वीला इच्छा आहे? एकत्र जुळलेले बाण संग्रामामध्यें माझ्या हातून वध पावून पडलेल्या कोणाच्या बरें शरिरांतून मांस बाहेर काढून आनंदानें भक्षण करणार आहेत? महासंग्रामामध्यें माझ्या तावडींत सांपडलेल्या त्या अनाथाचें रक्षण करण्यास देव, गंधर्व, पिशाच आणि राक्षस ह्यांपैकीं कोणीहि समर्थ होणार नाहींत. तस्मात् तूं हळूहळू सावध हो, आणि ज्या उद्धटानें वनामध्यें येऊन तुला जिंकिलें, त्याचें नांव मला सांग."

ह्याप्रमाणें क्रुद्ध झालेल्या त्या भ्रात्याचें भाषण श्रवण केल्यावर शूर्पणखा अश्रू गाळीत गाळीत त्याला म्हणाली, "तरुण, रूपवान, सुकुमार, महाबलाढ्य, कमलपत्रासारख्या विशाल नेत्रांनीं आणि वल्कलें व कृष्णाजिनें ह्यांच्या वस्त्रांनीं युक्त, फलमूलांवर उपजीविका करणारे, जितेंद्रिय, तपस्वी आणि ब्रह्मचारी असे दशरथाचे पुत्र भ्राते राम-लक्ष्मण अरण्यामध्यें होते. राजचिन्हांनीं युक्त आणि गंधर्वाधिपति चित्ररथाप्रमाणें असलेले हे राम-लक्ष्मण देव असावेत किंवा दानव असावेत ह्यासंबंधानें माझा कांहीं तर्क होत नाहीं. सारांश, दशरथाचे पुत्र म्हणून त्यांनींच जरी मला सांगितलें आहे, तरी अमानुष कृत्य दृष्टोत्पत्तीस आल्यामुळें ते वस्तुतः कोण असावेत, ह्याविषयीं माझा निश्चय होत नाहीं. असो. तेथें त्यांच्यामध्यें एक उत्कृष्ट कटीनें युक्त असलेली स्त्री मीं अवलोकन केली. ती तरुण व रूपवती असून सर्व अलंकारांनीं भूषित झालेली होती. त्या तरुण स्त्रीकरितां त्या उभयतांनीं एकत्र होऊन माझी अशी अनाथ कुलटेसारखी अवस्था करून सोडिली आहे. त्या दुराचारिणी स्त्रीचें आणि त्या नीचांचें संग्रामामध्यें फेनयुक्त रक्त प्राशन करण्याची माझी इच्छा आहे. अरे, तिचें आणि त्यांचें रक्त संग्रामामध्यें मीं प्यावें, ही माझी उत्कृष्ट इच्छा तुझ्या हातून शेवटास जाईल तर बरें होईल."

---

१ एक दैत्य. याचा इंद्रानें वध केल्यावरून इंद्रास पाकशासन हें नांव आहे.

ह्याप्रमाणें ती बोलूं लागली असतां क्रुद्ध झालेला खर राक्षस मृत्यूसारख्या महाबलाढ्य राक्षसांना म्हणाला, " सशस्त्र आणि वल्कलें व कृष्णाजिनें ह्यांच्या वस्त्रांनीं युक्त असलेले जे दोन मानव तरुण स्त्रीसहवर्तमान घोर दंडकारण्यामध्यें प्रविष्ट झाले आहेत, त्यांचा आणि त्या दुराचारिणीचा वध करून तुम्ही परत या, म्हणजे ही माझी भगिनी त्यांचें रक्त प्राशन करील. राक्षसहो, तुम्ही जा, आणि आपल्या सामर्थ्यानें त्यांचा वध करून ह्या माझ्या भगिनीचा हा प्रिय मनोरथ सत्वर परिपूर्ण करा. संग्रामामध्यें त्या उभयतां भ्रात्यांचा तुम्ही वध केलेला पाहून ही माझी भगिनी हर्षानें व आनंदानें संग्रामामध्यें त्यांचें रक्त प्राशन करील."

ह्याप्रमाणें आज्ञा झालेले ते चौदा राक्षस वायूनें हलविलेल्या मेघांप्रमाणें तिकडे गेले.

सर्ग विसावा.

खरप्रेषित राक्षसांचा वध.

तदनंतर ती घोर शूर्पणखा रामाच्या आश्रमाला आली, आणि तेथें सीतेसहवर्तमान असलेल्या त्या भ्रात्या राम-लक्ष्मणांची खबर तिनें त्या राक्षसांना दिली. तेव्हां लक्ष्मण ज्याची सेवा करीत आहे, असा महाबलाढ्य राम पर्णशालेमध्यें सीतेसहवर्तमान बसलेला त्यांनीं अवलोकन केला. परंतु तिला आणि त्या आलेल्या राक्षसांना अवलोकन करितांक्षणीं वैभवशाली राम लक्ष्मणाला म्हणाला, " लक्ष्मणा, तूं क्षणभर सीतेजवळ ऐस. मी शूर्पणखेचा अभिमान धरून तिच्या पाठोपाठ येथें आलेल्या ह्या राक्षसांचा वध करितों."

रामाचें हें भाषण ऐकून लक्ष्मण 'ठीक आहे' असें म्हणाला. तेव्हां धर्मात्मा रामाहि आपल्या सुवर्णविभूषित प्रचंड धनुष्याला प्रत्यंचा चढवून त्या राक्षसांना म्हणाला, " आम्ही दशरथाचे पुत्र भ्राते राम-लक्ष्मण सीतेसहवर्तमान ह्या गहन दंडकारण्यामध्यें प्रविष्ट झालों आहों; आम्ही जितेंद्रिय, तपस्वी व ब्रह्मचारी असून ह्या दंडकारण्यामध्यें फलमूलांवर उपजीविका करून राहत आहों. तेव्हां तुम्ही कां आमचा वध करितां? सज्जनांना पीडा करणाऱ्या तुम्हां दुरात्म्यांचा महासंग्रामामध्यें वध करण्याकरितां ऋषींच्या आज्ञेनें मी धनुष्यासहवर्तमान येथें प्राप्त झालों आहें. तेव्हां तुम्ही संतुष्ट होऊन येथें उभेच

राहा, परत फिरूं नका; परंतु हे निशाचरहो, तुम्हांला जर प्राणांची अपेक्षा असेल, तर तुम्ही परत फिरा."

हें त्याचें भाषण श्रवण केल्यावर ते घोर, तीक्ष्ण, आरक्तवर्ण नेत्रांनीं युक्त, ब्रह्मघातकी, हातांत शूल घेऊन आलेले व अत्यंत क्रुद्ध झालेले चौदाहि राक्षस हर्षयुक्त होऊन ज्याचा पराक्रम अवलोकनांत आलेला नाहीं, अशा मधुरभाषणी रामाला म्हणाले, 'आमचा प्रभु जो महात्मा खर, त्याला कोप आणिल्यामुळें आज तूंच युद्धामध्यें आमच्या हातून वध पावून आतांच प्राणांचा त्याग करशील. संग्रामामध्यें युद्ध करण्याची तर गोष्टच नको, परंतु आम्हां अनेकांच्या समोर नुसतें उभें राहण्याचें तरी तुझें एकट्याचें काय सामर्थ्य आहे! आम्हीं सोडिलेल्या ह्या परिघांच्या योगानें, शूलांच्या योगानें व पट्टयांच्या योगानें तूं आपल्या प्राणांचा, वीर्याचा व हातांत घेतलेल्या धनुष्याचा त्याग करशील.'

ह्याप्रमाणें ते क्रुद्ध झालेले चौदा राक्षस आयुधें व खड्ग उगारून रामाच्याच अंगावर धावले, आणि त्यांनीं ते शूल त्या अजिंक्य रामावर फेंकिले; परंतु रामानें ते सर्व चौदाहि शूल सुवर्णभूषित अशा चौदाच बाणांच्या योगानें तोडून टाकिले. नंतर अत्यंत क्रुद्ध झालेल्या त्या महातेजस्वी रामानें राक्षसांकडे पाहात पाहात शिळेवर घांसिलेले व सूर्यासारखे तेजस्वी असे चौदा नाराच[1] बाण घेतले, आणि वज्र सोडणाऱ्या इंद्राप्रमाणें त्या राक्षसांवर नेम धरून ते सोडिले. तेव्हां ते बाण वेगानें राक्षसांचीं वक्षःस्थळें फोडून रक्तानें भरले, आणि वारुळांतून बाहेर येणाऱ्या सर्पांप्रमाणें त्यांच्या वक्षःस्थलांतून बाहेर येऊन पृथ्वीवर पडले. त्याच वेळीं त्या बाणांनीं हृदय विदीर्ण होऊन रक्तानें न्हालेले व विद्रूप होऊन गतप्राण झालेले ते राक्षसहि मुळें तुटून पडलेल्या वृक्षांप्रमाणें भूमीवर पडले. तेव्हां त्यांना भूमीवर पडलेले पाहून शूर्पणखा क्रोधानें व्याप्त झाली आणि (नाक व कान कापल्याला बराच वेळ झाल्यामुळें) जिच्या शरिरावरील रक्त किंचित् वाळलेलें आहे, अशी ती दुःखित झालेली शूर्पणखा खराजवळ जाऊन पुनरपि डिंकानें भरलेल्या वेलीप्रमाणें भूमीवर पडली!

---

1 लोखंडाचे बाण.

सर्ग एकविसावा.

खराला राक्षसमरणवृत्तकथन.

पुनरपि तेथें पडलेल्या शूर्पणखेला अवलोकन केल्यावर अनर्थ सांगण्याकरितां आलेल्या तिला खर रागारागानें स्पष्ट म्हणाला, " मीं तर आतांच त्या मांसभक्षक राक्षसांना तुझा मनोरथ परिपूर्ण करण्याकरितां रामप्रभृतींचा वध करण्याची आज्ञा देऊन पाठविलें आहे. तेव्हां तूं फिरून कां रडत आहेस ? ते राक्षस माझे भक्त आहेत, माझे ठिकाणीं अनुरक्त आहेत, नेहमीं माझें हित करणारे आहेत, त्यांचा कोणी वध करूं लागला असतां ते वध पावणार नाहींत, आणि माझी आज्ञा शेवटास न नेणें हेंहि त्यांच्यानें व्हावयाचें नाहीं. तेव्हां हें काय ? आणि ज्याकरितां पुनरपि ' हे नाथ ' म्हणून आक्रोश करीत करीत तूं सर्पाप्रमाणें पृथ्वीवर तरफडत आहेस, त्याचें कारण काय ? मी नाथ असतांना तूं कां बरें अनाथाप्रमाणें विलाप करीत आहेस ? ऊठ, नको विलाप करूं. हें दुःख करणें सोडून दे."

ह्याप्रमाणें खरानें सांत्वन केलें असतां अश्रू आलेले आपले नेत्र पुसून शूर्पणखा त्याला म्हणाली, " कान व नाक कापले गेल्यामुळें रक्तप्रवाहानें भिजलेली अशी मी नुकतीच येथें आलें होतें. तूं माझें सांत्वनहि केलें होतेंस, आणि माझा मनोरथ परिपूर्ण करण्याच्या उद्देशानें लक्ष्मणासहवर्तमान त्या घोर रामाचा वध करण्याकरितां ते चौदा शूर राक्षसहि तूं पाठविलें होतेस; परंतु शूल व पट्टे धारण केलेल्या त्या सर्व क्रुद्ध राक्षसांचा मर्मभेदक बाणांच्या योगानें संग्रामामध्यें रामानें वध केला. तेव्हां एका क्षणामध्यें ते महावेगवान राक्षस भूमीवर पडलेले पाहून आणि रामाचें तें महत्कर्म अवलोकन करून मला मोठी भीति उत्पन्न झाली आहे. हे निशाचरा, चोहोंकडे रामाचें भय वाटत असलेली मी अत्यंत उद्विग्न, खिन्न व भयभीत होऊन पुनरपि तुला शरण आलें आहे. अरे, विषादरूप नक्रांनीं वास्तव्य केलेल्या आणि भयरूप लाटांनीं युक्त असलेल्या अगाध शोकसागरामध्यें मी मग्न झालें असतांना तूं माझें कां बरें रक्षण करीत नाहींस ? माझ्या कैवारानें जे रामाशीं युद्ध करण्याकरितां गेले, ते मांसभक्षक राक्षस तीक्ष्ण बाणांच्या योगानें रामानें मारून भूमीवर पाडिले. तस्मात् माझ्याबद्दल आणि त्या राक्षसांबद्दल जर तुला कांहीं दया असेल, आणि रामाशीं युद्ध करण्याचें जर तुझ्या अंगीं सामर्थ्य अथवा तेज असेल, तर दंडकारण्यामध्यें

वास्तव्य करणाऱ्या त्या राक्षसकंटकाचा तूं वध कर. शत्रुनाशक रामाचा आज जर तूं वध केला नाहींस, तर नाक व कान छिन्न झाल्यामुळें लज्जित झालेली मी तुझ्यापुढें प्राण सोडीन! तूं चतुरंग सैन्य जरी बरोबर घेऊन गेलास, तरी रामाच्या समोर संग्राममध्यें उभा राहाण्यास समर्थ नाहींस, असें माझ्या बुद्धीला वाटतें. आपल्यावर पराक्रमाचा वृथाच आरोप करून स्वतःला शूर मानणारा तूं महासंग्राममध्यें शूर नाहींस. तस्मात् हे राक्षसकुलकलंका खरा, तूं ह्या जनस्थानांतून बांधवासहवर्तमान सत्वर चालता हो, आणि संग्राममध्यें त्या मूढांचा वध कर. त्या मानव राम-लक्ष्मणांचा वध करण्याचें जर तुला सामर्थ्य नसेल, तर निःसत्व आणि वीर्यवान असलेल्या तुझें ह्या दंडकारण्यामध्यें वास्तव्य कशा प्रकारचें होणार आहे! निश्चच! रामतेजानें ग्रस्त झालास, म्हणजे सत्वर नाश पावशील. कारण तो दशरथपुत्र राम तेजस्वी आहे; आणि ज्यानें मला विरूप केलें, तो त्याचा भ्राताहि महावीर्यवान आहे."

ह्याप्रमाणें नानाप्रकारें विलाप करून ती राक्षसी भ्रात्याचे समीप शोकाकुल होऊन मूर्च्छित झाली, व अत्यंत दुःखित होऊन हातांनीं ऊर बडवून घेऊन रडूं लागली.

सर्ग बाविसावा.

खराचें युद्धार्थ ससैन्य प्रयाण.

ह्याप्रमाणें शूर्पणखेनें शूर खराचा अवमान केला असतां तो अतिशय कठोर शब्दांनीं तिला म्हणाला, "तुझ्या अपमानामुळें उत्पन्न झालेला हा अनुपम क्रोध अतिशय खारट असलेल्या समुद्राच्या पाण्याप्रमाणें दाबून धरितां येणें शक्य नाहीं. आपल्या दुराचरणांनीं वध पावून जो आज प्राणत्याग करणार आहे, त्या आयुष्य संपलेल्या मानव रामाची स्वपराक्रमानें मी मुळींच गणना करीत नाहीं. आतां हे अश्रू आवरून धर, आणि भीति सोडून दे. मी रामाला त्याच्या भ्रात्या-सहवर्तमान यमसदनाला पाठवितों. कुऱ्हाडीचा तडाखा बसल्यामुळें गतप्राण होऊन भूमीवर पडलेल्या रामाचें ऊन ऊन रक्त तूं आज प्राशन करशील."

हें खराच्या तोंडून निघालेलें भाषण श्रवण करून त्या शूर्पणखेला पुनरपि अतिशय हर्ष झाला, आणि मूर्खपणामुळें राक्षसांमध्यें श्रेष्ठ असलेल्या आपल्या

आत्याची ती पुनरपि प्रशंसा करूं लागली. तेव्हां पूर्वी कठोर शब्द बोलून पुनरपि तिनें प्रशंसा केलेला तो खर आपल्या दूषण नामक महाबलाढ्य सेनापतीला म्हणाला, "प्राण्यांची हिंसा हीच ज्यांची क्रीडा आहे, नीलमेघांप्रमाणें ज्यांचा वर्ण आहे, संग्रामामध्यें जे कधींहि परावृत्त होत नाहींत आणि माझ्या इच्छेला अनुसरून जे वर्तन करीत असतात, असे जे भयंकर वेगवान चौदा हजार राक्षस, त्यांच्याकडून तूं सर्व प्रकारें युद्धाची तयारी करीव. हे सत्त्वशीला, माझा रथ, धनुष्यें, बाण, अद्‌भुत खड्ग आणि नानाप्रकारच्या तीक्ष्ण शक्ति तूं सत्वर येथें घेऊन ये. हे संग्रामनिपुण सेनापते, महात्म्या पौलस्त्य राक्षसांचा अग्रेसर होऊन मी उद्धट रामाचा वध करण्याकरितां जाण्याची इच्छा करीत आहें."

ह्याप्रमाणें तो खर बोलत असतांनाच चित्रविचित्र वर्णांनीं युक्त असलेले उत्तम अश्व जोडून सूर्यवर्ण महारथ तयार असल्याचें त्याला दूषणानें सांगितलें. तेव्हां मेरु पर्वताच्या शिखरासारखा आकार, उत्कृष्ट सुवर्णाचीं चक्रें आणि वैदूर्य रत्नाच्या दांड्या ह्यांनीं युक्त, मंगलकारक व पीतवर्ण मत्स्य, पुष्पें, वृक्षांचे टहाळे, पाषाणमय चंद्रकांत, पक्षिगण व तारे यांनीं व्याप्त, ध्वज आणि खड्ग ह्यांनीं युक्त, लहान लहान घंटांनीं भूषित आणि उत्कृष्ट अश्व जोडिलेल्या त्या विशाल रथावर तो खर रागारागानें आरूढ झाला; आणि रथ, ढाली, आयुधें व ध्वज ह्यांनीं युक्त असलेल्या त्या प्रचंड सैन्याला व सर्व राक्षसांना अवलोकन करून खरानें व दूषणानें त्यांना 'चला' म्हणून सांगितलें. तदनंतर भयंकर ढाली, आयुधें व ध्वज घेऊन तें राक्षसांचें सैन्य प्रचंड गर्जना करीत करीत मोठ्या वेगानें जनस्थानांतून बाहेर निघालें. मुद्गल, पट्ट, शूल, अतिशय तीक्ष्ण धारेचे फरश, खड्ग, चक्र, रथावर असलेले उज्ज्वल तोमर, शक्ति, घोर परिघ, प्रचंड धनुष्यें, गदा, तलवारी, मुसळें आणि दिसण्यांतहि भयंकर अशीं हातांत घेतलेलीं वज्रायुधें बरोबर घेऊन खराच्या इच्छेप्रमाणें वागणारे अत्यंत घोर असे चौदा हजार राक्षस जनस्थानांतून बाहेर पडले. दिसण्यांत भयंकर असलेले ते राक्षस वेगानें जाऊं लागले आहेत, असें अवलोकन केल्यावर खराचा रथहि सर्व सेना निघाली किंवा नाहीं, हें कांहीं वेळ पाहून चालूं लागला. सारांश, चालूं लागण्याविषयीं खराचा अभिप्राय समजून आल्यावर सारथ्यानें ते उत्कृष्ठ सुवर्णांनीं भूषित झालेले चित्रविचित्र अश्व हांकिले. तेव्हां त्या रथाचा भयंकर नाद होऊं लागला व त्यानें

दशदिशा नादित झाल्या. याप्रमाणें कर्कश स्वरानें युक्त असलेला तो महाबलाढ्य खर मृत्यूप्रमाणें अत्यंत क्रुद्ध होऊन शत्रूच्या वधाकरितां सत्वर निघाला, आणि पाषाणवृष्टि करणाऱ्या मेघाप्रमाणें उच्चस्वरानें गर्जना करीत करीत त्वरा करण्याविषयीं सारथ्याला सांगूं लागला.

सर्ग तेविसावा.

खराला अपशकून.

तें घोर सैन्य चालूं लागल्यानंतर गर्दभासारख्या धूसर वर्णानें युक्त अशा तुमुल ध्वनि करणाऱ्या महाभयंकर मेघानें अमंगलसूचक रक्तमिश्र उदकाची वृष्टि त्या सैन्यावर केली. पुष्पयुक्त व सपाट प्रदेशावरील राजमार्गानें जातां जातांच रथाला जोडिलेले त्या खराचे ते महावेगवान अश्व आपोआप खालीं पडले. रक्तवर्ण सीमेनें युक्त असें एक अलातचक्रासारखें श्यामवर्ण कडें सूर्याला व्यापून त्याच्या भोंवतालीं पडलें. तदनंतर एक महाभयंकर व धिप्पाड गृध्र पक्षी सुवर्णदंडाने युक्त असलेल्या उन्नत ध्वजाजवळ आला, आणि त्याच्यावर बसला. जनस्थानासमीप जे राक्षस अवशिष्ट राहिले होते, त्यांच्याजवळ कर्कश ध्वनि करणारे पशुपक्षी गेले, आणि नानाप्रकारचे भेसुर शब्द करूं लागले. प्रदीप्त झाल्याप्रमाणें दिसत असलेल्या दिशांमध्ये ओरडणारीं कोल्हीं राक्षसांना अशुभकारक असा ध्वनि करूं लागलीं. गंडस्थलांतून मदाचा प्रवाह चाललेल्या गजाप्रमाणे उदक व रक्त ह्यांची वृष्टि करणाऱ्या मेघांनीं आकाश प्रकाशरहित करून टाकिलें. अंगावर कांटा आणणारा भयंकर निबिड अंधकार पडला, आणि दिशा अथवा उपदिशा स्पष्टपणें मुळींच प्रकाशनातशा झाल्या. योग्य काल प्राप्त झाल्यावांचून रक्तानें भिजलेल्या वस्त्राप्रमाणें मेघांचे ठिकाणीं संध्या दिसूं लागली, आणि घोर पशु व पक्षी खराकडे तोंड करून ओरडूं लागले. भयसूचक कंक पक्षी, कोल्हे व गृध्र पक्षी आक्रोश करूं लागले. युद्धामध्यें नेहमीं अशुभ सुचविणाऱ्या भयप्रदर्शक शिवा, ज्यांच्यांतून ज्वाला बाहेर निघत आहेत अशा मुखांनीं सैन्याच्या पुढें ओरडूं लागल्या. सूर्यापाशीं परिघाप्रमाणें एक धूमकेतु दिसूं लागला. त्या दिवशीं अमावास्यापर्व नसतांनाच महाग्रह राहूनें सूर्याला ग्रासिलें. वारा वेगानें वाहूं लागला, आणि सूर्य निस्तेज झाला. रात्र पडल्यावांचून काजव्यासारख्या तारा आकाशांत

उगवूं लागल्या, आणि सरोवरांतील कमलें शुष्क होऊन आंतील मत्स्य व तीरावरील वृक्ष लपून बसले. वृक्ष तत्क्षणीं पुष्परहित व फलरहित झाले, आणि मेघाप्रमाणें धूसरवर्ण धूळ वाऱ्यावांचून उडूं लागली. सारिका चीची, कूची अशा प्रकारचा शब्द करूं लागल्या. निर्घोष ध्वनीसहवर्तमान भयसूचक उल्कापात होऊं लागले, आणि पर्वत, वृक्षसमुदाय व अरण्यें हालूं लागलीं. रथांत बसून गर्जना करीत असलेल्या बुद्धिमान खर राक्षसाचा डावा हात स्फुरण पावूं लागला. शब्द खोल जाऊं लागला. तो कोणीकडेहि पाहूं लागला असतां त्याच्या डोळ्यांतून अश्रू येऊं लागले, व कपाळामध्यें वेदना उत्पन्न झाल्या; तथापि तो मोहामुळें परत फिरला नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु अंगावर रोमांच उठविणारे ते मोठाले उत्पात अवलोकन करून तो त्या सर्व राक्षसांना हंसत हंसत म्हणाला, " ह्या सर्व उद्भवलेल्या मोठ्या भयसूचक उत्पातांना दुर्बलांना न जुमानणाऱ्या बलवानाप्रमाणें, मी जुमानीत नाहीं. कारण मी क्रुद्ध झालों असतां तीक्ष्ण बाणांच्या योगानें आकाशापासून ताराहि खालीं पाडीन, आणि मृत्युलाहि मारून टाकीन. बलानें गर्विष्ठ झालेल्या त्या रामाचा आणि त्याच्या भ्रात्याचा तीक्ष्ण बाणांनीं वध केल्यावांचून परत फिरण्याची माझी इच्छा नाहीं. जिच्याकरितां रामाचे ठिकाणीं व लक्ष्मणाचे ठिकाणीं क्रूर बुद्धिरूप विपर्यास दृष्टीस पडत आहे, ती माझी भगिनी आज त्यांचें रक्त पिऊन कृतकृत्य होवो. आजपर्यंत संग्रामामध्यें माझा कधींहि पराजय झालेला नाहीं, हें तुम्हांला प्रत्यक्ष विदीतच आहे. मी कांहीं असत्य भाषण करीत नाहीं. मी क्रुद्ध झालों असतां मत्त ऐरावत गजावर आरूढ होऊन जाणाऱ्या वज्रपाणि देवराज इंद्राचाहि संग्रामामध्यें वध करीन, मग त्या मानवांची कथा काय ? "

ही त्याची गर्जना ऐकून मृत्युपाशानें जखडिलेल्या त्या राक्षसांच्या मोठ्या सेनेला अनुपम हर्ष झाला. युद्ध पाहण्याच्या इच्छेनें महात्मे ऋषी, देव, गंधर्व, सिद्ध आणि चारण एकत्र जुळून तेथें आले. एकत्र जुळून आल्यावर ते पुण्यकर्म करणारे ऋषी एकमेकांना म्हणाले, " लोकांना संमत असलेल्या गोब्राह्मणांचें कल्याण असो. चक्रपाणि विष्णु ज्याप्रमाणें सर्व असुरश्रेष्ठांचा पराजय करितो, त्याप्रमाणें राम युद्धामध्यें पौलस्त्य राक्षसांचा पराजय करो. "

हें व अशाच प्रकारचें भाषण अनेक प्रकारांनीं महर्षी करूं लागले, आणि युद्ध पाहण्याची उत्कंठा उत्पन्न झाल्यामुळें देवहि विमानांत बसून तेथें आले. तेव्हां आयुष्य संपलेल्या त्या राक्षसांची सेना त्यांच्या दृष्टीस पडली. खर तर

रथांत बसून वेगानें सैन्याच्या पुढे चालला होता. आणि श्येनगामी, पृथुग्रीव, यज्ञशत्रु, विहंगम, दुर्जय, करवीराक्ष, परुष, कालकार्मुक, हेममाली, महामाली, सर्मास्य व रुधिराशन हे महावीर्यवान बारा अमात्य खराच्या भोंवतालीं राहून जाऊं लागले. महाकपाल, स्थूलाक्ष, प्रमाथ व त्रिशिरा असे चौघे सेनेच्या पुढें दूषणाच्या मागून चालले. ग्रहमाला ज्याप्रमाणें सूर्यचंद्रासमीप जाते, त्याप्रमाणें भयंकर वेगानें युक्त असलेली व संग्रामाची इच्छा करणारी ती अत्यंत भयंकर राक्षसवीरांची सेना एकदम त्या राजपुत्रांसमीप गेली.

सर्ग चोविसावा.

रणांगणीं आगमन.

भयंकर पराक्रमी खर रामाच्या आश्रमाला निघाल्यावर तेच उत्पात भ्रात्या-सहवर्तमान रामानें अवलोकन केले. प्रजांना अहितकारक असे ते महा-भयंकर उत्पात पाहून रामाचें चित्त अतिशय अस्वस्थ झालें, व तो लक्ष्मणाला म्हणाला, " हे महापराक्रमी लक्ष्मणा, सर्व प्राण्यांचा संहार सुचविणारे जे हे मोठे उत्पात राक्षसांचा संहार करण्याकरितां उद्भवले आहेत, ते तूं अवलोकन कर. भयंकर गर्जना करणारे, गर्दभांप्रमाणे धूसर वर्णानें युक्त असलेले आणि रक्ताचा वर्षाव करणारे हे घोर मेघ आकाशामध्यें फिरत आहेत. माझे सर्व बाण धूमयुक्त झाले असल्यामुळे युद्धाकरिता आनंदित झाल्यासारखे दिसत आहेत, आणि सुवर्णभूषित पृष्ठभागानीं युक्त असलेलीं धनुष्येंहि स्फुरण पावत आहेत. अशा प्रकारचे हे वनचर पक्षी येथें आपल्यापुढे शब्द करीत आहेत, यावरून आपणांला अभय असून आपल्या शत्रूंना जीविताचें भय प्राप्त होणार आहे. संहार तर मोठाच होईल, ह्यांत संशय नाहीं. हा माझा वारंवार स्फुरण पावूं लागलेला दक्षिण बाहु लवकरच आपला जय व शत्रूचा पराजय होणार असल्याचें सुचवीत आहे, आणि तुझें मुखहि सतेज व प्रसन्न दिसत आहे. लक्ष्मणा, युद्धाला उद्युक्त झालेल्या ज्या पुरुषाचें मुख निस्तेज होतें, त्याच्या आयुष्याचा क्षय होत असतो. गर्जना करीत असलेल्या राक्षसांचा आणि क्रूर-कर्मी राक्षसांनीं वाजविलेल्या दुंदुभींचा हा महाध्वनि ऐकूं येत आहे. असो. संकटाची शंका आलेल्या दूरदर्शी कल्याणेच्छु पुरुषानें भावी अनर्थ टाळण्याचा उपाय अवश्य करावा. तस्मात् धनुष्य धारण करून हातांत बाण घे, आणि

सीतेला घेऊन वृक्षांनीं गजबजलेल्या अशा एखाद्या पर्वताच्या गहन गुहेचा आश्रय कर. माझ्या ह्या सांगण्याचें विरुद्ध तूं वागावेंस अशी माझी इच्छा नाहीं. माझ्या पायांची तुला शपथ आहे. वत्सा, तूं सीतेला घेऊन जा, विलंब लावूं नको. तूं शूर व बलवान आहेस. तेव्हां तूं ह्यांचा वध करशील, ह्यांत संशय नाहीं. परंतु ह्या सर्वांहि राक्षसांचा स्वतःच वध करण्याची माझी इच्छा आहे."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां धनुर्बाण घेऊन लक्ष्मणानें सीतेसहवर्तमान पर्वताच्या एका गहन गुहेचा आश्रय केला. लक्ष्मण सीतेसहवर्तमान गुहेमध्यें प्रविष्ट झाल्यावर 'आपण म्हटलेलें सत्वर सिद्धीस गेलें' असें म्हणून रामानें कवच चढविलें, व त्या अग्नीसारख्या तेजस्वी कवचानें भूषित झालेला तो राम अंधकारामध्यें उत्पन्न झालेल्या मोठ्या अग्नीप्रमाणें दिसूं लागला. नंतर प्रचंड धनुष्य उचलून धरून आणि बाण हातांत घेऊन प्रत्यंचेच्या टणत्कारांनीं दिशा दणाणून टाकीत टाकीत तो वीर्यवान राम तेथें उभा राहिला असतां युद्ध पाहण्याच्या इच्छेनें महात्मे देव गंधर्वांसहवर्तमान, सिद्ध चारणांसहवर्तमान व त्रैलोक्यामध्येंहि श्रेष्ठ, ब्रह्मर्षी म्हणून प्रसिद्ध असलेले व पुण्यकर्म करणारे ऋषी एकत्र जुळून तेथें आले, आणि एकमेकांना म्हणाले, 'गोब्राह्मणांचें आणि तशाच प्रकारच्या लोकांचें कल्याण व्हावें, ह्या इच्छेनें आपण येथें जुळलों आहों. तेव्हां चक्रपाणि विष्णु ज्याप्रमाणे सर्व असुरश्रेष्ठांचा पराजय करितो, त्याप्रमाणें युद्धामध्ये राम पौलस्त्य राक्षसांचा पराजय करो.'

ह्याप्रमाणें बोलणें झाल्यावर एकमेकांकडे पाहून ते पुनः म्हणाले, 'एकीकडे क्रूर कर्म करणारे चौदा हजार राक्षस आहेत, आणि एकीकडे धर्मात्मा राम एकटा आहे. तेव्हां ह्यांचे युद्ध होईल तरी कसें?'

ह्याप्रमाणें युद्ध पहाण्याची उत्कंठा उत्पन्न झालेले राजर्षी, चारणांसहवर्तमान सिद्ध, द्विजश्रेष्ठ आणि देव विमानांमध्यें आरूढ होऊन तेथें उभे राहिले. तेजानें व्याप्त झालेल्या रामाला संग्रामामध्यें स्थित असलेला अवलोकन करून सर्व भूतें भयभीत झालीं. कारण अप्रतिहत पराक्रम करणाऱ्या महात्म्या रामाचें अप्रतिम रूप क्रुद्ध झालेल्या रुद्राच्या रूपाप्रमाणें दिसत होतें. असो. देव, गंधर्व आणि चारण ह्यांचें तें बोलणें चाललें असतां, गंभीर गर्जना करीत करीत भयंकर ढाली, आयुधें आणि ध्वज घेतलेलें राक्षसांचें सैन्य चोहोंकडून तेथें येऊन ठेपलें. ते राक्षस वीराला योग्य अशीं संभाषणें करूं लागले असतां, एकमेकांकडे जाऊं लागले असतां, धनुष्यें ओढूं लागले असतां, वारंवार जांभया देऊं लागले असतां,

अतिशय घोष करूं लागले असतां आणि दुंदुभि वाजवूं लागले असतां त्यांच्या त्या अतिप्रचंड ध्वनीनें तें वन भरून काढिलें. चौदा राक्षसांशीं झालेल्या संग्रामामुळें आधींच त्रस्त झालेले वनचर प्राणी त्या ध्वनीनें अधिकच त्रस्त झाले, आणि भीतीमुळें मागें न पहातां, जिकडे शब्द निघत नव्हता, तिकडे ते धावले. इतक्यांत नानाप्रकारचीं आयुधें धारण केलेलें तें सागरासारखें अगाध व महावेगवान राक्षससैन्य रामाकडे वळलें. तेव्हां तो संग्रामनिपुण राम चोहोंकडे दृष्टि देऊं लागला असतां तें खरसैन्य त्याच्या दृष्टीस पडलें. तें दृष्टीस पडल्यावर युद्ध करण्याकरितां तो त्या सैन्याच्या संमुख गेला. राक्षसांसमोर गेल्यानंतर भयंकर धनुष्य ओढून आणि भात्यांतून बाण काढून सर्व राक्षसांच्या वधाकरितां रामानें प्रचंड क्रोध आणिला असतां, युगांतकालीं प्रज्वलित झालेल्या अग्नीप्रमाणें त्या क्रुद्ध रामाकडे पहाणेंहि अशक्य झालें. तेजानें व्याप्त झालेल्या अग्नीप्रमाणें त्या रामाला अवलोकन करून वनदेवताहि भयभीत झाल्या. कारण दक्षयज्ञाचा विध्वंस करण्याकरितां उद्युक्त झालेल्या पिनाकपाणि रुद्राप्रमाणें रुष्ट झालेल्या त्या रामाचें रूप दिसूं लागलें होतें. असो. इकडे रामानें ह्याप्रमाणें क्रुद्ध मुद्रा धारण केली असतां धनुष्यें, भूषणें, रथ आणि तीं अग्नितुल्य तेजस्वी कवचें ह्यांच्या योगानें तें राक्षसांचें सैन्य सूर्योदयसमयीं दिसणाऱ्या नीलवर्ण मेघसमुदायाप्रमाणें दिसूं लागलें.

सर्ग पंचविसावा.

युद्धप्रसंग.

सेनानायकांसहवर्तमान खर राक्षस रामाच्या आश्रमाला आल्यानंतर धनुष्याचें अवलंबन करून असलेल्या त्या क्रुद्ध व शत्रुघातक रामाला त्यानें अवलोकन करितांच, भयंकर ध्वनीनें युक्त असलेलें आपलें प्रत्यंचा चढविलेलें धनुष्य उचलून घेऊन 'रामाचें संमुख रथ हांक' म्हणून सारथ्याला सांगितलें. तेव्हां महापराक्रमी राम एकटा धनुष्य हालवीत बसला होता, तिकडे त्या सारथ्यानें खराच्या आज्ञेनें घोडे हांकिले. तो खर पुढें सरसावलेला पाहून त्याचे सर्वहि मंत्री मोठी गर्जना करीत करीत त्याच्या सभोंवतीं चालूं लागले. ह्याप्रमाणें रथावर आरूढ झालेला तो खर नक्षत्रांमध्यें असलेल्या क्रूर मंगळाप्रमाणें त्या राक्षसांमध्यें

दिसूं लागला. तदनंतर अतुल सामर्थ्यवान अशा रामाला सहस्र बाणांनीं ताडण करून संग्रामामध्यें त्यानें मोठी गर्जना केली. नंतर उग्र धनुष्य धारण करणाऱ्या त्या अजिंक्य रामावर सर्व राक्षसांनीं क्रुद्ध होऊन नानाप्रकारच्या शस्त्रांचा वर्षाव केला. लोहमय मुद्गल, शूल भाले, खड्ग आणि परश ह्या आयुधांच्या योगानें क्रोधाविष्ट झालेल्या राक्षसांनीं संग्रामामध्यें शूर रामावर प्रहार केले. मेघाप्रमाणें धिप्पाड व महाबलाढ्य असलेले ते राक्षस रथ, अश्व व पर्वतशिखरांसारखे गज घेवून रामावर धावले. इतकेंच नव्हे, परंतु युद्धामध्यें रामाचा वध करण्याचा उद्देश धरून त्या राक्षसगणांनीं जलधारांच्या योगानें हिमालय पर्वतावर वर्षाव करणाऱ्या महामेघांप्रमाणें रामावर बाणांचे वर्षाव केले. त्या वेळीं भयंकर मुद्रेनें युक्त असलेल्या सर्व राक्षसांनीं परिवेष्टित झालेला तो राम प्रदोषदिवशीं पार्षद्गणांनीं परिवेष्टित झालेल्या महादेवाप्रमाणें दिसला. सागर ज्याप्रमाणें नद्यांच्या प्रवाहांचा स्वीकार करितो, त्याप्रमाणें त्या रामानें राक्षसांनीं सोडिलेल्या त्या शस्त्रांचा बाणांच्या योगानें स्वीकार केला. इतकेच नव्हे, परंतु असंख्य उज्जल वज्रेंच कीं काय अशा त्या घोरशस्त्रांनीं त्या रामाचे अवयव फुटले असतांहि, महापर्वताप्रमाणें तो यत्किंचित्‌हि डगमगला नाहीं. ह्याप्रमाणें शस्त्रांनीं विद्ध झाल्यामुळें सर्व शरीर रक्तानें माखिलेला तो राम संध्याकाळच्या मेघांनीं व्याप्त झालेल्या सूर्याप्रमाणें दिसूं लागला. असो.

अशा प्रकारें हजारों राक्षसांनीं व्यापून टाकिलेल्या एकट्या रामाला अवलोकन करून देव, गंधर्व, सिद्ध आणि महर्षी खिन्न झाले; परंतु राम अधिकच क्रुद्ध झाला, आणि आपलें धनुष्य अतिशय आकर्षणानें मंडलाकार करून कंक पक्ष्याच्या पिसांनीं युक्त, सुवर्णानें भूषित, दुःसह, अप्रतिहत आणि तीक्ष्ण असे शेंकडों, हजारों बाण राक्षसांवर टाकूं लागला. तेव्हां शत्रुसैन्यावर सहज सोडिलेल्या त्या रामाच्या बाणांनीं कालानें सोडिलेल्या पाशांप्रमाणें राक्षसांचे प्राण हरण केले. त्या महाबलाढ्य राक्षसांचें देह फोडून गेल्यामुळें रक्तानें भरलेले ते बाण अंतरिक्षामध्यें गेले असतां प्रदीप्त अग्नीसारखे तेजस्वी दिसूं लागले. ह्याप्रमाणें राक्षसांचे प्राण हरण करणारे अत्यंत उग्र बाण रामाच्या धनुर्मंडलापासून असंख्य सुटले, आणि त्या बाणांच्या योगानें धनुष्यें, ध्वजांचीं अग्रें, ढाली, कवचें, हस्तभूषणांसहवर्तमान हात आणि गजशुंडांप्रमाणें असलेल्या शेंकडों, हजारों मांड्या रामानें संग्रामामध्यें तोडून टाकिल्या. त्याचप्रमाणें सुवर्णाचें सामान घालून रथाला जोडिलेले सारथ्यांसहवर्तमान अश्व, स्वारांसहवर्त-

मान गज आणि अश्वांसहवर्तमान स्वार प्रत्यंचेपासून सुटलेल्या रामाच्या बाणांनीं छिन्नभिन्न करून टाकिले. रामानें संग्रामामध्यें पदातींनाहि मारून यमसदनाला पाठविलें. तदनंतर तीक्ष्ण अग्रांनीं युक्त असलेल्या नालीक[1] नाराच[2] आणि विकर्ण[3] ह्या बाणांच्या योगानें ते राक्षस छिन्नविछिन्न होऊं लागले असतां भयंकर आक्रोश करूं लागले. अग्नीनें शोषून टाकिलेल्या वनाप्रमाणें नानाप्रकारच्या मर्मभेदक बाणांनीं रामानें पीडित केलेल्या त्या सैन्याला सुख मिळेनासें झालें. कांहीं महाबलाढ्य शूर राक्षस पराकाष्ठेचे क्रुद्ध होऊन रामाकडे भाले, शूल आणि कुऱ्हाडी फेंकूं लागले; परंतु बाणांच्या योगानें महापराक्रमी वीर्यवान रामानें त्यांच्या शस्त्रांचें निवारण करून संग्रामामध्यें त्यांचे प्राण घेतले. तेव्हां अमृत हरण करण्याकरितां जात असतांना गरुडाच्या पक्ष्यांच्या वायूनें ज्याप्रमाणें नंदनवनांतील वृक्ष मोडून पृथ्वीवर पडले, त्याप्रमाणें ढाली व धनुष्यें छिन्नभिन्न होऊन मान तुटलेले ते राक्षस भूमीवर पडले. बाणांचे तडाखे बसलेले जे राक्षस अवशिष्ट राहिले होते, ते खिन्न होऊन आश्रयाकरितां खराकडे धावले. तेव्हां धनुष्य घेऊन आणि त्या सर्वांचें सांत्वन करून क्रुद्ध झालेल्या अंतकाप्रमाणें अत्यंत संतप्त झालेला तो दूषण रुष्ट झालेल्या रामावर धावला. तेव्हां दूषणाचा आश्रय मिळाल्यामुळें निर्भय झालेले ते राक्षस पुनरपि परत फिरले. सालवृक्ष, तालवृक्ष आणि शिला हींच आयुधें घेऊन ते रामावर धावले. शूल, मुद्गल व पाश घेऊन ते महाबलाढ्य राक्षस संग्रामामध्यें बाणांचा, शस्त्रांचा, वृक्षांचा आणि पाषाणांचा वर्षाव करूं लागले. तेव्हां रामाचें व त्या राक्षसांचें अंगावर कांटा येण्यासारखें पुनः महाघोर तुमुल युद्ध झालें. त्या क्रुद्ध झालेल्या राक्षसांनीं चोहों बाजूंनीं रामावर पुनः मारा चालविला. तदनंतर सर्व दिशा आणि उपदिशा व्याप्त झालेल्या अवलोकन करून सर्व बाजूंनीं आलेल्या राक्षसांनीं केलेल्या बाणवृष्टीच्या योगानें व्याप्त झालेल्या त्या महाबलाढ्य रामानें भयंकर गर्जना केली व राक्षसांकडे अत्यंत उज्ज्वल अशा गांधर्व अस्त्राची योजना केली तेव्हां त्याच्या धनुर्मंडलापासून हजारों बाण सुटले, आणि त्यांच्या योगानें दाही दिशा भरून गेल्या. बाणांनीं विद्ध झालेल्या त्या राक्षसांना राम घोर बाण घेतो केव्हां, आणि धनुष्याला लावितो केव्हां हें कांहींएक न दिसतां एकसारखें तो धनुष्य ओढीतच आहे, असें दिसूं लागलें. बाणांनीं झालेल्या अंधकारानें सूर्यासहवर्तमान आकाश

१ तोंडाशीच लोखंड लाविलेले. २ सर्व लोखंडी. ३ अग्राशीं अंकुशासारखे असलेले.

आच्छादित होऊन गेलें, तरी राम ते बाण तसेच सोडीत राहिला होता. तेव्हां एकदम पडणाऱ्या, एकदम वध पावलेल्या आणि एकदम पडलेल्या राक्षसांनीं सर्व पृथ्वी भरून गेली. ठिकठिकाणीं नुकतेच मारिलेले, पडल्यानंतर मेलेले, कंठीं प्राण आलेले, दोन तुकडे झालेले, मोडून पडलेले आणि विदीर्ण झालेले ते हजारों राक्षस दिसूं लागले. शिरस्त्राणांसहवर्तमान मस्तकें, बाहु-भूषणांसहवर्तमान हात, दोन दोन तुकडे होऊन पडलेल्या मांड्या व बाहु, नाना-प्रकारचीं भूषणें, तुकडे तुकडे झालेले अश्व, मुख्य मुख्य गज, रथ, चौऱ्या, मोर्चेलें, छत्रें, नानाप्रकारचे ध्वज आणि रामाचे बाण लागल्यामुळें दोन दोन तुकडे झालेले शूल व पट्टे ह्यांच्या योगानें संग्रामांतील विस्तीर्ण भूमि भयंकर दिसूं लागली. त्यांचा वध झालेला पाहून अत्यंत व्याकुल झालेले अवशिष्ट राक्षस शत्रुसमुदाय जिंकणाऱ्या रामाचे समोर जाण्यासहि समर्थ झाले नाहींत.

सर्ग सव्विसावा

दूषणाचा वध.

आपल्या सैन्याचा वध होत आहे असें अवलोकन केल्यावर महापराक्रमी दूषणानें भयंकर वेगवान, जिंकण्यास अशक्य आणि संग्रामामध्यें पराङ्मुख न होणाऱ्या अशा पांच हजार राक्षसांना आज्ञा केली. तेव्हां शूल, पट्टे, खड्ग, पाषाणवृष्टि, वृक्ष आणि बाणवृष्टि ह्यांच्या योगानें त्यांनीं त्या रामावर एकसारखा वर्षाव सुरू केला; परंतु वृक्ष आणि पाषाण ह्यांचा तो प्राणघातक वर्षावहि धर्मात्म्या रामानें तीक्ष्ण बाणांच्या योगानें अडवून धरिला. डोळे मिटून पर्जन्यवृष्टि सहन करणाऱ्या बैलाप्रमाणें त्या वृष्टीचा निरोध करून राम सर्व राक्षसांच्या वधाकरितां अत्यंत क्रुद्ध झाला; आणि क्रोधानें व्याप्त होऊन तेजानें जसा कांहीं जळूं लागलेला तो राम दूषणासहवर्तमान त्या सैन्यावर सर्व बाजूंनीं बाणवृष्टि करूं लागला. तदनंतर शत्रुनाशक दूषण सेनापति क्रुद्ध झाला, आणि वज्रतुल्य बाणांच्या योगानें तो रामाचें निवारण करूं लागला. तेव्हां वीर रामहि अतिशय क्रुद्ध झाला. क्षुरसंज्ञक बाणानें त्यानें त्या दूषणाचें संग्रामामध्यें मोठें धनुष्य तोडून टाकिलें; चार बाणांनीं चार अश्व मारिले; तीक्ष्ण बाणांनीं अश्व मारिल्यावर अर्धचंद्र बाणानें दूषणाच्या सारथ्याचें शीर उडविलें; आणि त्या दूषण राक्षसाला-

हि तीन बाणांनीं वक्षःस्थलाचे ठिकाणीं वेध केला. तेव्हां धनुष्य तुटून आणि अश्व नष्ट होऊन रथ आणि सारथि यांनीं तो हीन झाला असतां रोमांच उत्पन्न करणारा, सुवर्णाच्या पट्ट्यांनीं वेष्टिलेला, देवसेनेचें मर्दन करणारा, सर्वांगभर लोहाचे तीक्ष्ण खिळे असलेला, शत्रूंच्या अंगांतील चरबीनें माखिलेला, स्पर्शाविषयीं इंद्राच्या वज्रासारखा, शत्रूंच्या शरिराचें किंवा नगरद्वारांचें विदारण करणारा आणि पर्वताच्या शिखरासारखा असा एक परिघ त्यानें हातांत घेतला. अशा प्रकारचा तो महाभुजंगासारखा परिघ घेऊन क्रूरकर्मी दूषण राक्षस संग्रामामध्यें रामाचे अंगावर धांवला; परंतु तो दूषण अंगावर धांऊन येत असतांना रामानें दोन बाणांनीं त्याचे दोन्ही हात हस्तभूषणांसहवर्तमान तोडून टाकिले. तेव्हां हात तुटल्यानंतर त्याचा तो प्रचंड परिघ इंद्रध्वजाप्रमाणें संग्रामामध्यें पुढें पडला. हात भूमीवर अस्ताव्यस्त पडल्यानंतर दोन्ही हात पडलेल्या धैर्यवान हत्तीप्रमाणें तो दूषण भूमीवर पडला. तेव्हां संग्रामामध्यें वध पावून भूमीवर पडलेल्या त्या दूषणाला अवलोकन करितांक्षणीं सर्व प्राणी ‘ शाबास शाबास ’ म्हणून रामाची प्रशंसा करूं लागले. इतक्यामध्यें महाकपाल, स्थूलाक्ष आणि महाबलाढ्य प्रमाथी हे सैन्याच्या पुढें चालणारे तीन सेनापती मृत्युपाशानें जखडून गेल्यामुळें क्रुद्ध होऊन एका जुटीनें रामावर धावले. महाकपाल राक्षस मोठा शूल उगारून रामावर धावला, स्थूलाक्ष पट्टा घेऊन आला आणि प्रमाथीनें हातांत कुऱ्हाड घेऊन रामावर चाल केली; परंतु ते धावून येत आहेत असें अवलोकन करितांक्षणींच प्राप्त झालेल्या अतिथीप्रमाणें तीक्ष्ण अग्रांनीं युक्त अशा घांसलेल्या बाणांनीं रामानें त्यांचें स्वागत केलें. महाकपालाचें तर रामानें शिरच उडविलें. असंख्य बाणसमुदायांनीं प्रमाथीचा वध केला, आणि स्थूलाक्षाचे स्थूल नेत्र बाणांनीं भरून काढिले. तेव्हां मोठमोठ्या वृक्षांनीं युक्त असलेल्या वृक्षाप्रमाणें तो स्थूलाक्ष वध पावून भूमीवर पडला, आणि क्रुद्ध झालेल्या रामानें पांच हजार बाणांनीं दूषणाचे पांच हजार अनुयायीहि एका क्षणांत यमसदनाला पाठविले. नंतर दूषण आणि त्याचे अनुयायी ह्यांचा वध झाल्याचें ऐकिल्यावर खर क्रुद्ध झाला, आणि महाबलाढ्य सेनाध्यक्षांना म्हणाला, ‘ ह्या दूषणाचा अनुयायांसहवर्तमान संग्रामामध्यें वध झाला आहे. तेव्हां हे सर्व राक्षसहो, तुम्ही मोठी सेना बरोबर घेऊन त्या नीच मनुष्य रामाशीं युद्ध करून नानाप्रकारच्या शस्त्रांनीं त्याचा वध करा. ’

ह्याप्रमाणें त्यांना सांगून तो क्रुद्ध झालेला खर राक्षस थेट रामावरच धांवला;

आणि श्येनगामी, पृथुग्रीव, यज्ञशत्रु, विहंगम, दुर्जय, करवीराक्ष, परुष, काल-कार्मुक, हेममाली, महामाली, सर्पास्य आणि रुधिराशन हे बारा महावीर्यवान सेनाधिपतीहि उत्कृष्ठ बाण सोडीत सोडीत सैनिकांसहवर्तमान रामावरच धांवले. तेव्हां तेजस्वी रामानें त्या राक्षससैन्याचा अवशिष्ट राहिलेला तो भाग सुवर्ण व हिरे ह्यांनीं भूषित केलेल्या अग्नितुल्य बाणांच्या योगानें मारून टाकिला. सुवर्ण-भूषित पिसांनीं युक्त आणि मधून अग्नीप्रमाणें दिसणाऱ्या त्या बाणांनीं मोठ्या वृक्षांचा नाश करणाऱ्या वज्राप्रमाणें त्या राक्षसांचा वध केला. राम कर्णिकसंज्ञक शंभर बाणांनीं शंभर राक्षसांचा आणि हजार बाणांनीं हजार राक्षसांचा संग्रामा-मध्यें वध करूं लागला असतां त्या बाणांमुळें ज्यांच्या कवचांचे व भूषणांचे तुकडे तुकडे झालेले आहेत, ज्यांचीं धनुष्यें छिन्नभिन्न झालेलीं आहेत आणि ज्यांचीं शरीरें रक्तानें माखिलेलीं आहेत, असे ते राक्षस भूमीवर पडले. तेव्हां शरीर रक्तानें भरून व केंस मोकळे सुटून संग्रामामध्यें पडलेल्या त्या राक्षसांनीं आच्छादित झालेली ती संपूर्ण रणभूमि दर्भांनीं आच्छादिलेल्या महावेदीप्रमाणें दिसूं लागली. राक्षस मरून मांस व रक्त ह्यांचा खच ज्याच्यामध्यें पडला आहे, असें तें महाघोर वन तत्क्षणीं नरकलोकासारखें दिसूं लागलें. ह्याप्रमाणें मानव आणि पदाति अशा एकट्या रामानें भयंकर पराक्रम करणाऱ्या चौदा हजार राक्षसांचा वध केला असतां, त्या सर्व सैन्यांपैकीं आपापल्या मुख्य सैन्यासहवर्तमान महारथि खर व त्रिशिरा राक्षस हे आणि शत्रुनाशक राम एवढेच अवशिष्ट राहिले. बाकीचे महावीर्यवान भयंकर विक्राळ आणि अत्यंत दुःसह असे ते सर्वहि राक्षस रामानें संग्रामामध्यें मारिले.

असो. तदनंतर बलिष्ठ रामानें क्षत्रधर्माला अनुसरून महासंग्रामामध्यें मार-लेलें तें प्रचंड सैन्य अवलोकन करून, हातांत वज्र घेऊन येणारा इंद्रच कीं काय असा तो खर राक्षस मोठ्या रथावर आरूढ होऊन रामाकडे आला.

सर्ग सत्ताविसावा.

त्रिशिराचा वध.

खर रामाचे समोर जाऊं लागला असतां सेनापति त्रिशिरा राक्षस सत्वर समीप येऊन त्याला म्हणाला, 'तूं साहस करूं नको; मज पराक्रम्याला आज्ञा कर, आणि महापराक्रमी राम संग्रामामध्यें पाडिलेला पहा. मी आयुध हातांत

घेऊन तुला सत्य सांगत आहें. सर्व राक्षसांनीं वध करण्यास योग्य अशा रामाचा मी वध करीन. सारांश, संग्रामामध्यें मी तरी ह्याचा मृत्यु होईन, किंवा रणामध्यें हा तरी माझा मृत्यु होईल. ह्यास्तव संग्रामाचा उत्साह बाजूला सारून तूं एक क्षणभर प्रेक्षक होऊन राहा. रामाचा वध झाला तर आनंदित होऊन जनस्थानाला जाशील, अथवा माझा वध झाला तर युद्ध करण्याकरितां तूं रामावर चाल करून जाशील.'

ह्याप्रमाणें मृत्यूचा लोभ सुटल्यामुळेंच कीं काय, त्या त्रिशिरा राक्षसानें खराची प्रार्थना केली असतां 'जा आणि युद्ध कर' अशी खराची अनुज्ञा झाल्यावर तो रामासमीप आला. सारांश, तीन शिखरांनीं युक्त असलेल्या पर्वताप्रमाणें दिसत असलेला तो त्रिशिरा राक्षस अश्व जोडिलेल्या त्या उज्ज्वल रथांत बसून संग्रामामध्यें रामावर धावला; आणि पाण्यानें भिजलेली नौबद जशी बदबद वाजूं लागते, तशी जलधारा सोडणाऱ्या महामेघाप्रमाणें बाणरूप धारांचे समुदाय सोडणारा तो त्रिशिरा राक्षस गर्जना करूं लागला. त्रिशिरा येत आहे असें पाहून धनुष्यानें तीक्ष्ण बाण सोडीत सोडीत रामानें त्याचा सत्कार केला. तेव्हां अतिबलाढय सिंह व गज ह्यांप्रमाणें राम आणि त्रिशिरा ह्यांच्यामध्यें तुमुल युद्ध झालें. तदनंतर त्रिशिरा राक्षसानें रामाला ललाटाचे ठिकाणीं तीन बाणांनीं वेध केल्यावर तो सहन न होऊन क्रुद्ध झालेला राम त्याला म्हणाला, "पुष्पासारख्या बाणांनीं ललाटाचे ठिकाणीं मला वेध झालेला आहे. तेव्हां ह्या रणशूर राक्षसाच्या अशा प्रकारच्या बलाचा काय हो तारीफ करावी! आतां धनुष्याच्या प्रत्यंचेपासून सुटलेल्या माझ्याहि बाणांचा तूं स्वीकार कर."

ह्याप्रमाणें त्रिशिरा राक्षसाला सांगितल्यानंतर क्षुब्ध व क्रुद्ध झालेल्या रामानें त्याच्या वक्षःस्थलावर भुजंगासारखे चौदा बाण मारिले; नम्र अग्रानें युक्त असलेल्या चार बाणांनीं तेजस्वी रामानें चार वेगवान अश्व मारिले; आठ बाणांनीं रथावर बसलेला सारथि खालीं पाडिला; आणि एका बाणानें त्याचा उंच ध्वज रामानें तोडून टाकिला. नंतर विधुळवाट झालेल्या त्या रथांतून तो त्रिशिरा राक्षस उडी मारूं लागला असतां रामानें हृदयाचे ठिकाणीं त्याला बाणांनीं वेध केला; तेव्हां त्वरा करून त्याला हातामध्यें आयुध घेतां आलें नाहीं. तदनंतर अतुल सामर्थ्यानीं युक्त असलेल्या रामानें क्रोधामुळें त्या राक्षसाचीं तिन्ही मस्तकें तीन वेगवान बाणांनीं तोडून टाकिलीं. तेव्हां समरांगणामध्यें असलेला तो राक्षस रामाच्या बाणांनीं व्याकुळ झाल्यामुळें पूर्वीं पडलेल्या मस्तकाच्या द्वारानें—अर्थात् धडावर

राहिलेल्या मस्तकाच्या छिद्रांतून–धुमासहवर्तमान रक्ताच्या गुळण्या टाकीत टाकीत भूमीवर पडला. असा प्रकार झाल्यावर वध पावलेल्या सैन्यांतून अवशिष्ट राहिलेल्या खराचा आश्रय करून राहणारे राक्षस संग्रामांतून फुटले, आणि जाग्यावर न ठरतां पारध्यांनीं त्रस्त केलेल्या मृगांप्रमाणें पळत सुटले. तेव्हां धावत असलेल्या त्या राक्षसांना अवलोकन करून खर क्रुद्ध होऊन संग्रामाकडे वळला, आणि चंद्रावर चालून जाणाऱ्या राहूप्रमाणें तो रामावर चालून गेला.

सर्ग अठ्ठाविसावा.

खर व राम यांचें युद्ध.

संग्रामामध्यें त्रिशिरा राक्षसासहवर्तमान दूषणाचा वध झालेला पाहून रामाचा पराक्रम लक्ष्यांत आल्यावर खरालाहि भय वाटलें. राक्षसांचें तें महाबलाढ्य दुःसह सैन्य, दूषण व त्रिशिरा ह्यांचा एकटया रामानें वध केल्याचें अवलोकन करून आणि ज्यांतील पुष्कळ भागाचा वध झाला आहे, अशा त्या अवशिष्ट राहिलेल्या सैन्याकडे दृष्टि देऊन खिन्न झालेला तो खर इंद्राकडे जाणाऱ्या नमुचि दैत्याप्रमाणें रामाकडे गेला. प्रचंड धनुष्य आकर्षण करून त्या खरानें क्रुद्ध सर्पच कीं काय असे रक्तशोषक नाराच बाण रामावर सोडिले. नानाप्रकारांनीं धनुष्यें चाळवून, धनुर्विद्येच्या अभ्यासामुळें शरसंधानाचे वगैरे अनेक प्रकार व अस्त्रें बाणांच्या योगानें दर्शविणारा तो रथारूढ खर रणभूमीमध्यें संचार करूं लागला, आणि बाणांच्या योगानें सर्व दिशा व उपदिशा त्या महारथि खरानें भरून काढिल्या. तेव्हां जलवृष्टीच्या योगानें ज्याप्रमाणें पर्जन्य आकाश भरून काढितो, त्याप्रमाणें महाधनुर्धारी रामानेंहि अग्निकणांसारख्या दुःसह बाणांच्या योगानें आकाश गच्च भरून काढिलें. त्या वेळीं खर आणि राम ह्यांनीं सोडिलेल्या तीक्ष्ण बाणांच्या योगानें सर्व बाजूंनीं बाणमय होऊन गेलेलें तें आकाश प्रकाशशून्य झालें. एकमेकांचा वध करण्याची ईर्षा धरून ते उभयतां युद्ध करूं लागले असतां बाणसमूहांनीं व्याप्त झालेला सूर्य प्रकाशरहित झाला. तदनंतर अंकुशांनीं ज्याप्रमाणें मोठया गजाला वेध करावा, त्याप्रमाणें तीक्ष्ण अग्रांनीं युक्त अशा नालीक, नाराच आणि विकर्ण बाणांनीं संग्रामामध्यें खरानें रामाला वेध केला असतां हातांत धनुष्य घेऊन व रथावर आरूढ होऊन रणामध्यें स्थित असलेला तो खर हातांत पाश घेऊन स्थित

असलेल्या मृत्यूप्रमाणें सर्व प्राण्यांना दिसला. सर्व राक्षससैन्याचा वध करणारा महाधैर्यवान राम जरी पराक्रम करीतच होता, तरी तो श्रांत झाला आहे, असें खराला वाटलें. परंतु सिंहासारख्या शौर्यदर्शक गतीनें युक्त असलेला तो खर सिंहाप्रमाणें चालून येत आहे, असें आढळून आल्यावरहि क्षुद्र मृगाला अवलोकन करून ज्याप्रमाणें सिंह उद्विग्न होत नाहीं, त्याप्रमाणें रामहि उद्विग्न झाला नाहीं. तेव्हां अग्नीसमीप जाणाऱ्या पतंगाप्रमाणें मोठया सूर्यतुल्य तेजस्वी रथांत आरूढ होऊन खर त्या रामासमीप आला. समीप आल्यावर हस्तलाघव दर्शवीत दर्शवीत त्या खरानें महात्म्या रामाचें धनुष्य बाणासहवर्तमान हातांत धरण्याचेच ठिकाणीं तोडून टाकिलें. पुनरपि इंद्राच्या वज्राप्रमाणें सतेज असलेले सात बाण घेऊन त्या क्रुद्ध झालेल्या खरानें संग्रामामध्यें रामाच्या मर्मावर मारिले, आणि हजार बाणांनीं अतुल सामर्थ्यवान रामाला वेध करून संग्रामामध्यें खरानें मोठी गर्जना केली. तेव्हां उत्कृष्ठ पेऱ्यांनीं युक्त अशा त्या खरानें सोडिलेल्या बाणांचा भडिमार झालेलें रामाचें तें सूर्यासारखें तेजस्वी कवच खालीं पडलें. त्या वेळीं सर्व अवयवांचे ठिकाणीं बाण रुतून राहिले असतां तो क्रुद्ध राम जळत असलेल्या धूमरहित अग्नीप्रमाणें संग्रामामध्यें शोभूं लागला. तदनंतर त्या शत्रुनाशक रामानें गंभीर ध्वनीनें युक्त असलेल्या त्या मोठया धनुष्याला शत्रूचा अंत करण्याकरितां प्रत्यंचा चढविली. अगस्त्य महर्षींनीं दिलेलें तें प्रचंड व श्रेष्ठ वैष्णव धनुष्य हातांत घेऊन तो खराचे अंगावर धांवून गेला. नंतर क्रुद्ध झालेल्या रामानें सुवर्णभूषित पिसें आणि नम्र पर्वें ह्यांनीं युक्त असलेल्या बाणांच्या योगानें खराचा ध्वज संग्रामामध्यें तोडून टाकिला असतां, देवतांच्या आज्ञेनें पृथ्वीवर आलेला सूर्यच कीं काय, असा तो अनेक प्रकारांनीं दर्शनीय असलेला सुवर्णध्वज छिन्न होऊन भूमीवर पडला. तेव्हां मेघांच्या योगानें ज्याप्रमाणें हत्तीला वेध करावा, त्याप्रमाणें त्या क्रुद्ध झालेल्या मर्मज्ञ खरानें चार बाणांच्या योगानें रामाला हृदयाचे ठिकाणीं आणि इतर अवयवांचे ठिकाणीं वेध केला. ह्याप्रमाणें खराच्या धनुष्यापासून सुटलेल्या अनेक बाणांनीं विद्ध झाल्यामुळें शरिरावर रक्ताचा सडा झालेला तो राम अतिशय क्रुद्ध झाला, आणि त्या महाधनुर्धारी रामानें परीक्षा केलेले सहा बाण घेऊन खरावर सोडिले. पैकीं एका बाणानें खराच्या मस्तकाचे ठिकाणीं, दोहोंनीं बाहूंचे ठिकाणीं आणि अर्ध चंद्राकृति तीन बाणांच्या योगानें वक्षःस्थलाचे ठिकाणीं रामानें वेध केला. नंतर क्रुद्ध झालेल्या त्या महातेजस्वी

रामानें पुनरपि शिळेवर घांसलेले आणि सूर्याप्रमाणें सतेज असलेले तेरा नाराच बाण घेऊन त्यांच्या वेगानें त्या खराला वेध केला. पैकीं एका बाणानें रथाचें जूं मोडून पाडिलें, चार बाणांनीं चित्रविचित्र वर्णांचे चार अश्व मारिले, सहाव्या बाणानें खराच्या सारथ्याचें मस्तक संग्रामामध्यें छेदून टाकिलें, तीन बाणांनीं जूं बांधण्याच्या तीन दांड्या तोडून टाकिल्या, दोन बाणांनीं कण्याचे तुकडे केले, आणि बाराव्या बाणानें खर राक्षसाचें धनुष्य त्याच्या हातासहवर्तमान तोडून टाकून त्या इंद्रतुल्य रामानें हंसत हंसत वज्रासारख्या तेराव्या बाणानें खराला वक्षःस्थलाचे ठिकाणीं वेध केला. तेव्हां ज्याचें धनुष्य मोडून गेलें आहे, आणि अश्व व सारथि ह्यांचा वध होऊन जो विरथ झाला आहे, असा तो खर हातांत गदा घेऊन व रथांतून उडी मारून भूमीवर उभा राहिला.

असो. विमानाच्या अग्रभागीं बसून पहात असलेले देव आणि महर्षी आनंदित होऊन जुळले, आणि एकत्र जमून व हात जोडून प्रशंसेस पात्र असलेल्या त्या रामाची प्रशंसा करूं लागले.

सर्ग एकोणतिसावा.

राम व खर यांचा संवाद.

विरथ झाल्यावरहि हातांत गदा घेऊन संग्रामामध्यें उभा राहिलेल्या खराला मृदु, परंतु मर्मभेदक शब्दांनीं महातेजस्वी राम म्हणाला, "गज, अश्व आणि रथ ह्यांनीं व्याप्त असलेल्या प्रचंड सैन्याचा तूं अधिपति असतांना सर्व लोकांच्या निंदेस पात्र असें ब्राह्मणवधासारखें दारुण कर्म केलेंस, ह्यामुळें तुझा असा नाश झाला. कारण प्राण्यांचे ठिकाणीं उद्वेग उत्पन्न करणारा, क्रूर आणि पापकर्मी पुरुष त्रैलोक्याचा अधिपति जरी असला तरी फार दिवस राहात नाहीं. हे निशाचरा, दुष्ट सर्प आला असतां ज्याप्रमाणें त्याचा सर्व लोक वध करितात, त्याप्रमाणें लोकविरुद्ध कर्म करणाऱ्या तीक्ष्ण पुरुषाचा सर्व लोक वध करितात. परिणामाकडे दृष्टि न देतां गार खाणाऱ्या सरडाप्रमाणें लोभामुळें अथवा कामामुळें जो पापें करितो, त्याचा नाश लोक आनंदित होऊन पहातात. हे राक्षसा, दंडकारण्यामध्यें वास्तव्य करणाऱ्या धर्मनिष्ठ महाभाग्यवान मुनींचा वध करून तुला काय बरें फल प्राप्त होणार आहे ? मुळें तुटून गेलेले वृक्ष जसे फार दिवस राहात नाहींत, त्याचप्रमाणें ऐश्वर्य प्राप्त झाल्यावर पापकर्म करूं

लागलेले आणि म्हणूनच लोकनिंदेस पात्र झालेले क्रूर लोक फार दिवस राहात नाहींत. वृक्षाला ज्याप्रमाणें ऋतूला अनुसरून येणारें पुष्प प्राप्त होतें, त्याप्रमाणें समय आला म्हणजे पापकर्माचें घोर फल कर्त्याला अवश्य प्राप्त होतें. हे निशाचरा, भक्षण केलेल्या सविष अन्नाचें फल प्राप्त होण्यास जसा फार वेळ लागत नाहीं, तद्वत्च जगतामध्यें पापकर्माचें फल प्राप्त होण्यास फार वेळ लागत नाहीं. अरे, घोर पाप करून लोकांना उपद्रव देण्याची इच्छा करणाऱ्याचे प्राण हरण करण्याकरितां राजा ह्या नात्यानें माझी योजना झाली आहे. तेव्हां सुवर्णभूषणांनीं युक्त असे मीं सोडिलेले बाण आज तुझ्या शरीराचा भेद करून वारुळांत जाणाऱ्या सर्पाप्रमाणें पृथ्वीलाहि फोडून जातील. दंडकारण्यामध्यें जे धर्माचरणी पुरुष तूं भक्षण केले आहेस, त्यांच्या मागोमाग तूं आज संग्रामामध्यें सैन्यासहवर्तमान वध पावून इहलोकांतून चालता होशील. पूर्वीं ज्यांचा तूं वध केला आहेस, ते विमानांत बसलेले महर्षी बाणांनीं वध पावून नरकांत गेलेल्या आज तुला अवलोकन करितील. हे अधमकुलोत्पन्ना, तूं आपल्या इच्छेप्रमाणें माझ्यावर प्रहार कर, आणि हवा तितका तडफड कर, परंतु तालवृक्षाच्या फलाप्रमाणें मी आज तुझें शिर खालीं पाडीन."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां क्रुद्ध झालेल्या त्या खराचे डोळे लाल झाले, व तो क्रोधानें अगदीं व्याप्त होऊन हंसत हंसत रामाला म्हणाला, "हे दशरथपुत्रा, युद्धामध्यें साधारण राक्षसांचा वध करून प्रशंसेस पात्र नसलेल्याहि आपली तूं स्वतः कशी प्रशंसा करीत आहेस ? जे पुरुषश्रेष्ठ, पराक्रमी अथवा बलाढ्य असतात, ते स्वप्रशंसेसंबंधानें कांहींएक सांगत नाहींत; आणि बलाचा गर्व झालेले पुरुषहि फार प्रशंसा करीत नाहींत. रामा, तूं जशा फुशारक्या मारीत आहेस, त्याप्रमाणें जगतामध्यें जे हलकट, दुष्ट चित्तानें युक्त आणि क्षत्रियजातीला कलंक लावणारे लोक असतात, ते मात्र व्यर्थ फुशारक्या मारीत असतात. समरांगणामध्यें मृत्युसमय प्राप्त झाला असतां आपलें कुलीनत्व प्रकट करण्याकरितां कोण बरें शूर पुरुष स्वतः अप्रासंगिक स्वप्रशंसा करणार आहे ? सुवर्णासारखें दिसत असलेलें पितळ ज्याप्रमाणें धातुशोधित अग्नीनें तप्त झालें असतां लघुत्व दाखवितें, त्याचप्रमाणें स्वप्रशंसेच्या योगानें तूं आपलें सर्वस्वी लघुत्व प्रकट केलें आहेस. धातूंनीं व्याप्त झालेल्या भूधर पर्वताप्रमाणें हातांत गदा घेऊन ह्या संग्रामामध्यें निश्चल राहिलेल्या माझ्या स्वरूपाची ओळख तुला झाली नाहीं, म्हणून तुझ्या

ह्या ' फुशारक्या चालल्या आहेत; परंतु हातांत पाश घेतलेल्या मृत्यूप्रमाणें हातांत गदा धारण केलेला मी संग्रामामध्यें तुझेच नव्हे, परंतु त्रैलोक्याचेहि प्राण हरण करण्यास समर्थ आहें. खरोखर तुला आणखी पुष्कळ सांगण्यासारखें आहें, परंतु मी तें सांगत नाहीं. कारण सूर्य अस्ताला जात आहे; तेव्हां तें सांगत बसल्यानें युद्धाला अडथळा येईल. तूं ज्या चौदा हजार मुख्य मुख्य राक्षसांचा वध केला आहेस, त्यांच्या नातेवाईकांचे अश्रू तुझ्या नाशानें मी आज पुसून टाकीन."

ह्याप्रमाणें भाषण केल्यावर, अत्यंत क्रुद्ध झालेल्या त्या खरानें उज्ज्वल वज्रच कीं काय अशी ती उत्कृष्ठ सुवर्णवलयांनीं युक्त असलेली गदा रामावर फेंकिली. खराच्या हातून सुटलेली ती देदीप्यमान प्रचंड गदा वृक्ष आणि झुडपें ह्यांचें भस्म करून टाकून रामाचे समीप आली; परंतु मृत्युपाशाप्रमाणें भयंकर असलेली ती प्रचंड गदा अंतरिक्षामध्यें आहे, तोंच रामानें बाणांच्या योगानें तिचे तुकडे तुकडे केले. तेव्हां बाणांनीं विदीर्ण झाल्यामुळें तुकडे तुकडे उडालेली ती गदा मंत्र आणि ओषधि ह्यांच्या सामर्थ्यामुळें खालीं पाडिलेल्या सर्पिणीप्रमाणें भूतलावर पडली.

सर्ग तिसावा.

खराचा वध.

धर्मवत्सल राम बाणानें ती गदा फोडून टाकिल्यावर क्षुब्ध झालेल्या खराला हंसत हंसत म्हणाला, "हे राक्षसाधमा, ही आपली काय ती सामर्थ्याची पुंजी तूं दर्शविलीस. तेव्हां माझ्यापेक्षां सामर्थ्यानें अतिशयच कमी असलेला तूं गर्जना मात्र करीत आहेस. बोलण्यामध्यें मात्र केवळ प्रगल्भ असलेल्या तुझ्या विश्वासाचा घात करणारी ही तुझी गदा माझ्या बाणांनीं विदीर्ण होऊन पृथ्वीवर पडली आहे. 'नष्ट झालेल्या राक्षसांचा उतराई होईन' म्हणून जें तूं भाषण केलेंस, तेंहि तुझें भाषण मिथ्या आहे. आतां गरुडानें ज्याप्रमाणें अमृत हरण केलें, त्याप्रमाणें स्वभावानें हलकट, नीच आणि असत्याचरण करणाऱ्या तुज राक्षसाचे प्राण मी हरण करीन. माझ्या बाणांच्या योगानें विदीर्ण होऊन शिरच्छेद झालेल्या तुझें फेन व बुडबुडे ह्यांनीं भूषित झालेलें रक्त आज पृथ्वी प्राशन करील. ज्याचें सर्वांग धुळीनें भरलें आहे आणि ज्यानें स्थानभ्रष्ट झालेले आपले

दोन्ही बाहु भूमीवर ठेविले आहेत, असा तूं प्राप्त झालेल्या दुर्लभ स्त्रीप्रमाणें पृथ्वीला आलिंगन देऊन शयन करशील. राक्षसांनाहि कलंक लावणारा तूं शयन करून महानिद्रेचा अनुभव घेऊं लागलास, म्हणजे सर्व लोकांना आश्रयभूत असलेल्या तपस्व्यांना हें दंडकारण्य सुखानें वास करण्यास योग्य होईल. हे राक्षसा, माझ्या बाणांच्या योगानें तुझ्या जनस्थानांतील राक्षसांचें वास्तव्य नाहींसें झालें, म्हणजे वनामध्यें मुनी चोहोंकडे निर्भय होऊन संचार करूं लागतील. दुसऱ्यांना भयावह असलेल्या आपल्या राक्षसी बांधवांचा वध झाल्यामुळें राक्षस आज दीन होतील, आणि अश्रूंनीं मुखें आर्द्र झालीं असतांना जनस्थानांतून पळत सुटतील. ज्यांचा तूं अशा प्रकारचा पापकर्मी पति आहेस, आणि त्यामुळेंच ज्यांच्या कामादि पुरुषार्थांचा निःशेष नाश झाला आहे, अशा तुझ्यासारख्याच अधम कुलामध्यें उत्पन्न झालेल्या त्या तुझ्या पत्न्या आज शोकरस कसा असतो, तें स्वानुभावानें जाणतील. हे दुष्टस्वभावि, हे क्षुद्रा, हे ब्राह्मणकंटका, तुझ्यामुळें मुनी भयभीत होऊन अग्नीमध्यें नेहमीं हवन करीत असतात."

ह्याप्रमाणें वनामध्यें अत्यंत क्षुब्ध होऊन राम बोलूं लागला असतां अतिशय भयंकर स्वरानें युक्त असलेला खर क्रोधानें त्याची निर्भत्सना करूं लागला. तो म्हणाला, 'तूं अतिशयच गर्विष्ठ झाला आहेस, आणि ह्यामुळें भयकारक गोष्टींचेंहि तुला भय वाटेनासें झालें आहे. त्याचप्रमाणें तूं मृत्यूच्या अधीन झाला असूनहि बोलावें कोणतें आणि न बोलावें कोणतें, हेंहि तुला समजेनासें झालें आहे. जे पुरुष कालपाशानें ग्रस्त झालेले असतात, त्यांना अंतःकरण आणि पंचज्ञानेंद्रियें ह्यांनीं सोडिलें असल्यामुळें कार्याकार्याचा विचार राहात नाहीं.'

ह्याप्रमाणें रामाला बोलून आणि भिवया चढवून त्या राक्षसानें जवळच असलेल्या एका मोठ्या सालवृक्षाकडे पाहिलें. संग्रामामध्यें प्रहार करण्याकरितां चोहोंकडे पाहात असलेल्या त्या खरानें दांतओंठ खाऊन तो वृक्ष उपटिला, आणि हातांनीं गरगरां फिरवून व 'तूं मेलास' अशी मोठी गर्जना करून रामाकडे फेंकून दिला; परंतु तो वृक्ष अंगावर येऊं लागला असतां प्रतापी रामानें बाणसमुदायांनीं त्याला तोडून टाकिलें, आणि संग्रामामध्यें खराचा वध करण्याकरितां तीव्र रोष धारण केला. तेव्हां रोषानें घाम येऊन नेत्रप्रांत आरक्तवर्ण झाला असतां रामानें समरांगणामध्यें हजार बाणांनीं खराला वेध केला. तेव्हां प्रस्रवण पर्वतावरील जलधारांच्या प्रवाहाप्रमाणें त्या खराच्या शरीराला बाणांनीं पडलेल्या क्षतांतून पुष्कळच फेंसाळलेलें रक्त वाहूं लागलें. परंतु संग्रामामध्यें

बाणांच्या योगानें रामानें जरी ह्याप्रमाणें त्या खराला परवश करून सोडिलें होतें, तरी रक्ताच्या गंधानें तो मत्त होऊन पुनरपि त्या रामावरच धावला. तेव्हां रक्तानें भरून गेलेला तो राक्षस धावून येत आहे, असें अवलोकन करून बाण मारितां यावा, एतदर्थ सत्वर गमन करण्याकरितां तो कृतास्त्र राम दोन-तीन पावलें मागें सरला. तदनंतर संग्रामामध्यें खराच्या वधाकरितां प्रतिब्रह्मास्त्र कीं काय असा एक अग्नीसारखा तेजस्वी बाण रामानें घेतला, आणि बुद्धिमान देवराज इंद्रानें अगस्त्य मुनींच्या द्वारानें दिलेला तो बाण धनुष्याला लावून त्या महात्म्या रामानें सोडिला. रामानें धनुष्य आकर्षण करून सोडिलेला तो प्रचंड बाण वायूवर वायू आदळून होणाऱ्या प्रचंड ध्वनीप्रमाणें गर्जना करीत खर राक्षसाच्या वक्षःस्थलावर जाऊन आदळला. रुद्रानें दग्ध केलेला अंधकासुर ज्याप्रमाणें श्वेतारण्यामध्यें पडला, त्याप्रमाणें बाणरूप अग्नीनें जळूं लागलेला तो खर भूमीवर पडला. वज्रानें वध पावलेल्या वृत्रासुराप्रमाणें, जलफेनानें वध पावलेल्या नमुचि दैत्याप्रमाणें अथवा अशनिसंज्ञक आयुधानें वध पावलेल्या बल दैत्याप्रमाणें रामबाणानें वध पावलेला तो खर पृथ्वीवर पडला. त्या वेळीं चारणांसहवर्तमान एकत्र मिळालेले देव दुंदुभि वाजवून आनंदानें रामावर सर्व बाजूंनीं विस्मयपूर्वक पुष्पवृष्टि करूं लागले, आणि म्हणाले, "दीड मुहूर्तामध्यें रामानें तीक्ष्ण बाणांनीं यथेष्ट रूप धारण करणाऱ्या खरदूषणप्रभृति चौदा हजार राक्षसांचा महासंग्रामामध्यें वध केला. तेव्हां पराक्रमानें विख्यात झालेल्या ह्या रामाचें काय हो तरी हें महत्कर्म! अहो, ह्याचें वीर्य आणि धैर्य विष्णूप्रमाणें दिसत आहे."

असें म्हणून ते सर्वजण आले तसे निघून गेले. तदनंतर सर्व राजर्षी व महर्षी हे अगस्त्य मुनींसहवर्तमान आनंदित होऊन तेथें जुळले व रामाची प्रशंसा करून म्हणाले, "ह्याचकरितां पाक दैत्याचा वध करणारा महातेजस्वी महेंद्र शरभंग मुनींच्या पुण्य आश्रमाला आला होता. ह्या पापकर्मी राक्षस शत्रूंचा वध करण्याकरितां महर्षींनीं तुला उपाय योजून ह्या प्रदेशामध्यें आणिलें होतें. तें हें आमचें कार्य तूं शेवटास नेलें आहेस. ह्यामुळें दंडकारण्यामध्यें महर्षींना स्वधर्माचें आचरण करितां येईल." हें त्यांचें बोलणें चाललें आहे, तोंच वीर लक्ष्मण सीतेसहवर्तमान पर्वताच्या गुहेंतून बाहेर निघून आश्रमामध्यें सुखानें प्रविष्ट झाला. तदनंतर महर्षी ज्याची प्रशंसा करीत आहेत, असा तो विजयी वीर राम आश्रमामध्यें प्रविष्ट झाला असतां

लक्ष्मणानें त्याची स्तुति केली. महर्षींना सुख देणाऱ्या त्या शत्रुघातक भर्त्याला अवलोकन केल्यावर आनंदित झालेली सीता त्याला कडकडून भेटली, आणि पराकाष्ठेच्या आनंदानें युक्त झालेल्या त्या जनककन्या सीतेला राक्षसगणांचा वध होऊन राम खुशाल आहे, असें आढळून आल्यावर संतोष झाला. तदनंतर आनंदित झालेले महात्मे मुनी ज्याची प्रशंसा करीत आहेत, अशा त्या आपल्या राक्षससमुदायांचें मर्दन करणाऱ्या भर्त्याला पुनरपि आलिंगन देऊन आधींच सानंद मुद्रेनें युक्त झालेल्या जनककन्येला हर्ष झाला.

सर्ग एकतिसावा.

रावणाला जनस्थानवृत्तकथन.

नंतर युद्धांतून पळून गेलेला अकंपन राक्षस सत्वर लंकेमध्यें गेला, आणि रावणाला म्हणाला, ' राजा, जनस्थानाला असलेल्या असंख्य राक्षसांचा व खराचा संग्रामामध्यें वध झाला. मी प्रेक्षक असल्याकारणानें बाणाच्या तावडींत न सांपडल्यामुळें जीव बचून कसा तरी येथें आलों. '

ह्याप्रमाणें अकंपनानें सांगितलें असतां रावण क्रुद्ध झाला, त्याचे नेत्र लाल झाले, आणि तो अकंपनाला म्हणाला, " ज्यानें माझें भयंकर जनस्थान मारून टाकिलें आहे, तो खरोखर गतप्राण झालाच आहे, असें मी समजतों; कारण असें कर्म करणारा सर्व लोकांमध्यें जरी हिंडला, तरी प्राप्त होणारें मरण टाळण्यास तो कसा समर्थ होणार आहे ? फार कशाला ? माझी कुचाळी काढून इंद्राला, कुबेराला, यमाला अथवा विष्णूलाहि सुख प्राप्त होणें अशक्य आहे. कालाचाहि मी काल आहें. अग्नीलाहि मी दग्ध करून टाकीन. मृत्यूलाहि मारण्याचें माझें सामर्थ्य आहे. जोरानें वायूचा वेगहि नाहींसा करण्यास मी तयार आहें. क्रुद्ध झालों असतां तेजाच्या योगानें सूर्य व अग्नि ह्यांनाहि मी जाळून टाकीन. "

ह्याप्रमाणें दशानन क्रुद्ध झाला असतां अकंपनानें हात जोडून भयामुळें अडखळत अडखळत त्या रावणापाशीं अभय मिळण्याविषयीं प्रार्थना केली. तेव्हां त्या राक्षसश्रेष्ठानें त्याला अभय दिल्यावर धीर आलेला तो अकंपन निःसंदेहपणें रावणाला म्हणाला, " दशरथाचा एक राम म्हणून तरुण पुत्र आहे.

उत्कृष्ठ अवयव आणि सौंदर्य ह्यांनीं तो युक्त आहे. त्याचे स्कंध मोठमोठे आहेत. बाहु वर्तुल, विस्तीर्ण आणि दीर्घ आहेत. कांतीनें तो महायशस्वी राम श्यामवर्ण आहे. त्या श्रीमान रामाच्या बलाला व पराक्रमाला कोठेंच तोड नाहीं; त्यानेंच जनस्थानामध्यें दूषणासहवर्तमान पराक्रमी खराचा वध केला आहे." हें अकंपनाचें भाषण श्रवण केल्यावर राक्षसाधिपति रावण नागराजाप्रमाणें सुस्कारा टाकून म्हणाला, 'अकंपना, तो राम इंद्रासहवर्तमान सर्व देवांबरोबर जनस्थानामध्यें आला होता कीं काय, तें सर्व मला सांग.'

हा रावणाचा दुसरा प्रश्न ऐकून अकंपन त्या महात्म्या रामाचा पराक्रम व सामर्थ्य त्याला सांगूं लागला. तो म्हणाला, "राम म्हणजे महातेजस्वी असून सर्व धनुर्धरांमध्यें श्रेष्ठ आहे. दिव्यास्त्ररूप साधनांनीं तो संपन्न आहे, आणि युद्धामध्यें पराकाष्ठेचें शौर्य गाजविणारा आहे. त्याला योग्य असाच त्याचा लक्ष्मण म्हणून एक बलाढ्य कनिष्ठ भ्राता आहे. त्याचे नेत्र आरक्तवर्ण असून आवाज दुंदुभीप्रमाणें गंभीर आहे. पौर्णिमेच्या चंद्रासारखें त्याचें मुख आहे. अग्नीशीं संयुक्त होणाऱ्या वायूप्रमाणें तो श्रीमान राजाधिराज राम लक्ष्मणाशीं संयुक्त झाला आहे, आणि त्यानेंच जनस्थानाचा निःपात केला आहे. महात्मे देव मुळींच आले नाहींत. सुवर्णभूषित पिसांनीं युक्त असलेले बाण एकटा रामच सोडीत होता. तेच बाण पंचमुखी सर्प होऊन राक्षसांना भक्षण करीत होते. भयग्रस्त झालेले राक्षस जिकडे जिकडे जात असत, तिकडे तिकडे समोर उभा असलेला रामच त्यांच्या दृष्टीस पडे. ह्याप्रमाणें हे निष्पाप, त्यानें जनस्थानाचा नाश केला."

हें अकंपनाचें भाषण श्रवण करून रावण त्याला म्हणाला, 'मी लक्ष्मणासहवर्तमान रामाचा वध करण्याकरितां जनस्थानामध्यें जातों.' परंतु अकंपन म्हणाला, "राजा, रामाचें वर्तन, बल व पराक्रम श्रवण कर. राम क्रुद्ध झाला असतां पराक्रम करून त्याचा पराजय करणें अशक्य आहे. कारण भरून चाललेल्या नदीचाहि वेग तो बाणांच्या योगानें परत फिरवील. तारा, ग्रह आणि नक्षत्रें ह्यांसहवर्तमान आकाशहि खालीं पाडील. हा श्रीमान राम पृथ्वी रसातळाला जाऊं लागली असतां तिचाहि उद्धार करील. समुद्राची मर्यादा नाहींशी करून हा समर्थ राम लोकांना बुडवून टाकील, आणि बाणांच्या योगानें समुद्राचा वेगहि नाहींसा करून वायूलाहि उडवून देईल. इतकेंच नव्हे, परंतु स्वपराक्रमानें लोकांचा संहार करून तो महायशस्वी श्रेष्ठ पुरुष

पुनरपि प्रजा उत्पन्न करण्यास समर्थ आहे. हे दशानना, पापी लोकांना स्वर्ग प्राप्त होणें ज्याप्रमाणें अशक्य आहे, त्याचप्रमाणें संग्रामामध्यें तुझ्या हातून अथवा राक्षससमुदायांच्या हातून रामाचा पराजय होणें अशक्य आहे. सर्व देव दैत्यांच्या हातूनहि संग्रामामध्यें त्याचा वध होईल, असें मला वाटत नाहीं. त्याच्या वधाचा एक उपाय आहे. तो तूं एकचित्तानें माझ्यापासून श्रवण कर. सीता म्हणून त्याची एक अतिशय सुंदर व जगतामध्यें उत्कृष्ठ भार्या आहे. ती नेहमीं तरुण राहणारी आहे. तिच्या अवयवांची ठेवण सारखी व रेखिलेली आहे. ती रत्नांनीं भूषित झालेली असून सर्व स्त्रियांमध्यें उत्कृष्ठ आहे. देवांगना, गंधर्वस्त्री, अप्सरा अथवा नागकन्या ह्यांतहि तिच्यासारखी कोणी नाहीं, मग मनुष्यजातीची स्त्री तिच्यासारखी कोठून असणार? तेव्हां कोणत्या तरी उपायानें त्याला महावनामध्यें दूर नेववून त्याची भार्या हरण कर. कारण सीतेचा विरह झाला असतां राम जिवंत राहणार नाहीं."

हें त्याचें भाषण राक्षसाधिपति रावणाला रुचलें, आणि तो महापराक्रमी रावण विचार करून त्याला म्हणाला, "ठीक आहे. मी प्रातःकालीं सारथ्यासहवर्तमान एकटा जाईन, आणि आनंदानें ह्या मोठ्या नगरीमध्यें सीतेला घेऊन येईन."

रावणमारीचसंवाद.

ह्याप्रमाणें अकंपनाला सांगितल्यावर गर्दभ जोडिलेल्या आणि सूर्यासारखा तेजस्वी असलेल्या रथामध्यें आरूढ होऊन सर्व दिशा प्रकाशित करीत करीत तो निघाला. तेव्हां राक्षसाधिपति रावणाचा नक्षत्रमार्गानें जाणारा तो रथ, मेघांतून एकसारख्या जाणाऱ्या चंद्राप्रमाणें शोभूं लागला. तो रावण दूर असलेल्या मारीचाश्रमाला गेल्यावर ताटकापुत्र मारीचानें अमानुष प्राण्यालाच योग्य अशा भक्ष्य व भोज्य पदार्थांनीं त्याचा सत्कार केला. ह्याप्रमाणें आसन, उदक वगैरे देऊन त्याचें पूजन केल्यावर अर्थसंपन्न वाणीनें तो त्याला म्हणाला, "हे राक्षसाधिपते राजा, राक्षस लोकांचें कुशल आहे ना? ज्या अर्थीं तूं सत्वर येथें निघून आला आहेस, त्या अर्थीं मला ते कुशल आहेतसें दिसत नाहींत. मला भयाची शंका येत आहे."

ह्याप्रमाणें मारीच बोलला असतां, संभाषण करण्यामध्यें प्रवीण असलेला तो रावण त्याला म्हणाला, "बा मारीचा, अप्रतिहत पराक्रम करणाऱ्या रामानें माझ्या सीमारक्षकांचा वध केला असून युद्धामध्यें अवध्य असलेल्या त्या सर्व जन-

त्यानाचाहि निःपात करून टाकिला आहे. तेव्हां त्याची भार्या हरण करण्याकरितां तूं मला साहाय्य कर."

रावणाचें हें भाषण श्रवण केल्यावर मारीच म्हणाला, "हे राक्षसश्रेष्ठा, कोणत्या मित्ररूप शत्रूनें तुला सीता हरण करण्यास सांगितलें आहे? अरे, दानादिकांच्या योगानें तूं संतुष्ट केलेला असा कोण पुरुष तुझ्याशीं द्वेष करीत आहे? 'येथें सीतेला घेऊन ये' असें कोण म्हणत आहे, तें मला सांग. सर्व राक्षस लोकांची उन्नति नाहींशी करण्याची कोण इच्छा करीत आहे, तें एकदां मला कळूं दे. ह्या कृत्याविषयीं जो तुला प्रोत्साहन देत आहे, तो निःसंशय तुझा शत्रु आहे, आणि तुझ्याकडून सर्पाच्या मुखांतील दाढ उपटून काढण्याची तो इच्छा करीत आहे. ह्या कर्माचा उपदेश करून तुला कोणीं नाशाच्या मार्गाला लावून दिलें आहे? आणि राजा, तूं सुखानें निजला असतांना तुझ्या मस्तकावर कोणीं प्रहार केला आहे, हें मला समजूं दे. शुद्ध कुलामध्यें जन्म हीच ज्याची शुंडा, प्रताप हाच ज्याचा मद आणि बांधेसूद बाहु हेच ज्याचे दांत अशा त्या रामरूप मत्त गजाकडे संग्रामामध्यें ह्या प्रसंगीं नुसतें पहाणेंहि योग्य नाहीं, मग रावणा, युद्ध करण्याची तर गोष्ट कशाला पाहिजे? रणामध्यें असणें हेच ज्याचे संधि व केश आहेत, रणशूर राक्षसरूप मृगांचा जो वध करणारा आहे, बाणरूप अंगांनीं जो परिपूर्ण आहे, आणि तीक्ष्ण खड्गरूप दंष्ट्रांनीं जो युक्त आहे, अशा ह्या घोरत पडलेल्या पुरुषसिंह रामाला डवचणें योग्य नाहीं. हे राक्षसराजा, धनुष्य हाच ज्यांतील प्राणहारक नक्र आहे, भुजांचा वेग हाच ज्यांतील चिखल आहे, बाण ह्याच ज्यांतील लाटा आहेत व प्रचंड संग्राम हाच ज्यांतील जलप्रवाह आहे, अशा ह्या पातालपर्यंत प्रविष्ठ झालेल्या रामरूप महाभयंकर सागराच्या वडवानलरूप मुखामध्यें जाऊन पडणें योग्य नाहीं. हे लंकाधिपते, तूं प्रसन्न हो, आणि आपलें मन निर्मल करून खुशाल लंकेला जा. तूं स्त्रीचे ठिकाणीं नेहमीं रममाण होत जा, आणि रामालाहि वनामध्यें आपल्या भार्येसहवर्तमान रममाण होऊं दे."

ह्याप्रमाणें मारीचानें दशकंठ रावणाला सांगितलें असतां तो लंका नगरीला परत गेला, आणि आपल्या उत्कृष्ट गृहामध्यें प्रविष्ठ झाला.

सर्ग बत्तिसावा.

रावणाचें वर्णन.

तदनंतर एकट्या रामानें भयंकर कर्म करणाऱ्या चौदा हजार राक्षसांचा आणि दूषण, खर व त्रिशिरा ह्यांचाहि संग्राममध्यें वध केल्याचें अवलोकन करून वर्णानें मेघासारखी असलेली ती शूर्पणखा पुनरपि मोठमोठ्यानें गर्जना करूं लागली. इतरांना अत्यंत दुष्कर असें रामानें केलेलें तें कर्म अवलोकन केल्यावर अत्यंत उद्विग्न झालेली ती शूर्पणखा रावणाच्या लंकेमध्यें गेली. तेव्हां मरुद्गणांसहवर्तमान असणाऱ्या इंद्राप्रमाणें सचिवांसहवर्तमान सातमजली वाड्याच्या गच्चीवर बसलेल्या उज्ज्वल व तेजस्वी रावणाला तिनें अवलोकन केलें. ज्याच्यामध्यें पुष्कळ आज्यहोम केलेला आहे, आणि म्हणूनच जो प्रज्वलित आहे, अशा सुवर्णनिर्मित स्थंडिलावर असलेल्या अग्नीप्रमाणें, सुवर्णनिर्मित व प्रभेनें सूर्यासारख्या असलेल्या उत्कृष्ठ आसनावर बसलेला तो रावण दिसत होता. देव, गंधर्व, भूतें आणि महात्मे ऋषी ह्यांना समरांगणामध्यें अजिंक्य असलेला तो घोर रावण जबडा पसरिलेल्या मृत्यूप्रमाणें भासत होता. देवदैत्यांच्या युद्धामध्यें वज्र आणि अशनि ह्या आयुधांनीं त्याला जखमा झालेल्या होत्या, आणि ऐरावत गजाच्या दांतांचे अग्रांनीं झालेल्या खुणा त्याच्या वृक्ष:स्थलावर होत्या. वीस बाहु, दहा कंठ, दर्शनीय सरंजाम, विशाल वक्ष-स्थल आणि राजचिन्हें ह्यांनीं तो वीर युक्त होता. शरिरावर घातलेल्या वैदूर्य मण्यांप्रमाणें त्याची कांति होती. उत्कृष्ठ सुवर्णाचीं भूषणें त्यानें धारण केलेलीं होतीं. त्याचे भुज उत्कृष्ठ होते. दंत शुभ्रवर्ण होते. मुख विशाळ होतें. शरीर पर्वतासारखें धिप्पाड होतें. देवांच्या युद्धामध्यें विष्णूच्या सुदर्शन चक्राचे शेंकडों प्रहार त्याच्या अंगावर झालेले होते. महायुद्धामध्यें इतर शस्त्रांचेहि प्रहार त्याला लागलेले होते. ज्यांचे अवयव शाबूत आहेत, अशा सर्व देवांच्या शस्त्रांनीं ताडित झालेला तो रावण चपल असून कधींहि न क्षोभणाऱ्या समुद्रांनाहि क्षोभ उत्पन्न करणारा होता. तो पर्वतशिखरें फेंकून देणारा होता. देवांचें मर्दन करणारा होता. धर्माचा उच्छेदक होता, आणि परस्त्रीवर लक्ष्य ठेवणारा होता. तो सर्व दिव्य अस्त्रें योजणारा असून नेहमीं यज्ञाला विघ्न करणारा होता. त्यानें एकदा पातालामध्यें भोगावती नगरीला जाऊन आणि वासुकीचा पराजय करून तक्षकाची प्रिय भार्या जिंकून आणिली होती. त्याचप्रमाणें

कैलास पर्वतावर जाऊन आणि कुबेराला जिंकून बसणाऱ्याच्या इच्छेप्रमाणें गमन करणारें त्याचें पुष्पक विमान त्यानें हरण करून आणिलें होतें. दिव्य चैत्ररथ वन, तेथील सरोवर, नंदनवन आणि देवांच्या बागा ह्यांचा तो वीर्यवान रावण नाश करीत असे. शत्रूंना ताप देणारे महाभाग्यवान चंद्रसूर्य उदय पावूं लागले असतां पर्वतशिखराप्रमाणें असलेला तो रावण आपल्या बाहूंनीं त्यांचें निवारण करीत असे. दहा हजार वर्षें महावनामध्यें तपश्चर्या करून पूर्वीं स्वयंभु शंकराला त्या ज्ञानी रावणानें आपलीं मस्तकें अर्पण केलीं होतीं. देव, दानव, गंधर्व, पिशाच, पक्षी आणि उरग ह्यांच्याशीं संग्राम करण्यामध्यें त्याला मुळींच भय नव्हतें. मनुष्याशिवाय इतरांपासून त्याला मृत्यूचेंहि भय राहिलें नव्हतें. तो महाबलाढ्य रावण यज्ञामध्यें ब्राह्मणांनीं मंत्रांच्या योगानें स्तुति केलेल्या पवित्र सोमाचा हविर्धानसंज्ञक यज्ञशालांमध्यें नाश करीत असे, व उपस्थित झालेला यज्ञ उध्वस्त करीत असे. तो दुष्ट आणि ब्रह्मघातकी असुर क्रूर कर्म करणारा असे. इतकेंच नव्हे, परंतु निष्ठुर, निर्दय, सर्व लोकांना भय उत्पन्न करणारा आणि सर्व प्राण्यांना आक्रोश करावयाला लावणारा तो रावण लोकांच्या अहिताविषयीं तत्पर असे. असो.

अशा प्रकारचा तो महाबलाढ्य क्रूर भ्राता दिव्य वस्त्रें व भूषणें धारण करून दिव्य पुष्पमालांनीं भूषित झालेला त्या शूर्पणखा राक्षसीनें अवलोकन केला. प्रलयकालीं संहार करण्यास उद्युक्त झालेल्या कालाप्रमाणें तो पौलस्त्य कुलनंदन महाभाग्यवान राक्षसाधिपति रावण सिंहासनावर बसला असतांना भयानें विव्हल झालेली ती शूर्पणखा त्याच्या जवळ गेली, आणि मंत्र्यांनीं परिवेष्टित असलेल्या त्या शत्रुघातक रावणाला तिनें ती सर्व हकीकत कळविली. सारांश, सर्व लोकांमध्यें निर्भयपणें संचार करणारी, महात्म्या लक्ष्मणानें विरूप करून टाकिलेली आणि रामविषयक भयानें व लोभानें मोहीत झालेली ती शूर्पणखा आपली विरूपता दाखवून, देदीप्यमान आणि विशाल नेत्रांनीं युक्त असलेल्या त्या रावणाशीं फारच कठोर भाषण करूं लागली.

सर्ग तेहेतिसावा.

शूर्पणखेचें रावणाला मर्मभेदक भाषण.

तदनंतर क्रोधानें प्रदीप्त झालेली ती शूर्पणखा लोकांना आक्रोश करावयाला लावणाऱ्या रावणाला अमात्यांसमक्ष मर्मभेदक शब्दांनीं म्हणाली, "तूं विषयभोगामध्यें अत्यंत आसक्त, स्वैरवृत्ति आणि निरंकुश असल्यामुळें प्राप्त झालेलें घोर भय जाणिलें नाहींस. स्मशानांतील अग्नीला ज्याप्रमाणें स्पर्श करीत नाहींत, त्याप्रमाणें विषयभोगामध्यें आसक्त होऊन गेलेल्या स्वेच्छ राजाला प्रजाजन स्पर्श करीत नाहींत व मान देत नाहींत. जो पृथ्वीपति प्रसंगविशेषीं आपण होऊन आपलीं कामें करीत नाहीं, त्याचा तीं कार्यें आणि राज्य ह्यांसहवर्तमान नायनाट होतो. हेरांकडून माहिती न मिळविणाऱ्या, योग्य कालीं प्रजाजनांना दर्शन न देणाऱ्या व स्त्रीवश झालेल्या नराधिपाला, हत्ती ज्याप्रमाणें नदीच्या चिखलाला दूर टाकून देतात, त्याप्रमाणें लोक सोडून जातात. जे भूपति प्रथमतः आपल्या ताब्यांतून गेलेल्या देशाचें आपल्या ताब्यांत घेऊन रक्षण करीत नाहींत, ते किती जरी संपन्न असले, तथापि समुद्रांत बुडालेल्या पर्वताप्रमाणें प्रकाशमान होत नाहींत. बाह्य इंद्रियांसहवर्तमान अंतःकरणाचा जय करणाऱ्याशीं विरोध करून, आणि देव, गंधर्व व दानव ह्यांशीं वैर माजवून हेरांकडून माहिती न मिळविता चंचल वृत्ति धारण करणारा तूं राजा कसा होशील? हे राक्षसा, तूं पोरकट स्वभावाचा व बुद्धिहीन असा असून जें अवश्य जाणण्यास पाहिजे, तें जाणीत नाहींस. तेव्हां तूं राजा कसा होशील? हे शत्रुदमनश्रेष्ठा, गुप्त हेर, भांडारखाना आणि नीति हीं ज्या भूपतींच्या स्वाधीन नाहींत, ते राज्यसूत्रें चालविण्यास अयोग्य असलेल्या सामान्य दासांसारखेच होत. राजे हेररूपी चक्षूंच्या योगानें दूरदूरच्या सर्व गोष्टी जाणून घेतात, म्हणून त्यांना दीर्घचक्षु म्हणतात. तूं प्राकृत मंत्रिजनांनीं युक्त असून हेरांकडून माहिती मिळविणारा नाहींस, असें मला वाटतें. कारण आपले लोक जेथें वास्तव्य करितात, तें स्थान दुसऱ्यानें हरण केलेलें तुला माहीत नाहीं. अरे, एकट्या रामचंद्रानें भयंकर कर्म करणारे चौदा हजार राक्षस, आणि दूषणासहवर्तमान खर ह्यांचा वध करून व ऋषींना अभय देऊन दंडकारण्य सुखरूप करून टाकिलें. अप्रतिहत पराक्रम करणाऱ्या त्या रामानें जनस्थानाचा विध्वंस केला; परंतु तूं तर लुब्ध, मत्त आणि पराधीन होऊन बसला आहेस. कारण आपल्या देशामध्येंच उत्पन्न झालेल्या भयाची तुला खबर नाहीं.

तीक्ष्ण, योग्यतेपेक्षां कमी देणारा, मत्त, गर्विष्ठ आणि शठ अशा राजाकडे संकट-समयीं रक्षण करण्यास कोणीहि लोक धावून जात नाहींत. अत्यंत अभिमानी, स्वकीय जनांनाहि जवळ जाण्यास योग्य नसलेला, स्वतःलाच मोठा समजणारा, आणि विनाकारण रागावणारा असा जो पुरुष असेल, त्यावर संकट आलें असतां स्वजन सुद्धां त्याचा वध करितात. जो कर्तव्यकर्में करीत नाहीं, आणि भयंकर प्रसंग उपस्थित झाले असतां भय बाळगीत नाहीं, तो सत्वरच राज्यापासून भ्रष्ट होऊन ह्या जगतामध्यें तृणासारखा दीन होऊन जातो. कारण शुष्क काष्ठें, मातीचीं ढिंखळें व धूळ ह्यांचाहि उपयोग असतो; परंतु स्थानभ्रष्ट झालेल्या राजांचा कांहींहि उपयोग होत नाहीं. ज्याप्रमाणें वापरिलेलें वस्त्र अथवा चुरगळिलेल्या माळा निरुपयोगी होतात, त्याचप्रमाणें राज्यापासून भ्रष्ट झालेला पुरुष समर्थ असूनहि निरुपयोगी होतो. स्वकार्यदक्ष, सर्वज्ञ, जितेंद्रिय, कृतज्ञ आणि धर्मशील असा जो राजा असतो, तोच पुष्कळ दिवसपर्यंत कायम राहतो. डोळे मिटून निजला तरी न्यायदृष्टि उघडी ठेवून जो जागत असतो, आणि योग्य ठिकाणींच ज्याचा क्रोध व कृपा हीं व्यक्त होत असतात, त्याच राजाला लोक मान देत असतात; परंतु राजा, राक्षसांचा अतिशय मोठा संहारहि ज्या तुला हेरांच्या द्वारानें समजला नाहीं, तो तूं ह्या गुणांनीं रहित असून मंदमति आहेस, हें उघड आहे. तूं दुसऱ्यांचा फक्त अवमान करणारा, विषयांचे ठिकाणीं आसक्त, कोणत्या ठिकाणीं व कोणत्या वेळीं काय करावें, ह्याचें तत्त्व न जाणणारा आणि गुण अथवा दोष ह्यांचा निर्णय करण्याकडे लक्ष्य न देणारा असल्यामुळें तुझें राज्य नष्ट झाल्यासारखें असून तूंहि लवकरच नाश पावशील."

ह्याप्रमाणें तिनें उच्चारिलेले आपले दोष बुद्धिपूर्वक लक्ष्यांत घेऊन धन, गर्व आणि बल ह्यांनीं युक्त असलेला तो राक्षसाधिपति रावण पुष्कळ वेळपर्यंत विचार करूं लागला.

सर्ग चौतिसावा.

शूर्पणखेची मसलत.

शूर्पणखेचें हें मर्मभेदक भाषण ऐकून अमात्यांसहवर्तमान असलेला तो रावण क्रुद्ध होऊन विचारूं लागला, " राम कोण ? त्याचें वीर्य कसें आहे ? त्याचें स्वरूप कसें आहे ? त्याचा पराक्रम कसा आहे ? आणि अतिशय गहन अशा दंडका-

रण्यामध्यें तो कशाकरितां प्राप्त झाला आहे ? ज्याच्या योगानें संग्रामामध्यें ते चौदा हजार राक्षस खर, दूषण व त्रिशिरा ह्यांचा वध झाला, असें त्या रामाचें आयुध तरी कोणतें होतें ? हे सुंदरि, हें मला सांग, आणि तुला विरूप कोणीं केलें हेंहि मला कळीव."

ह्याप्रमाणें राक्षसाधिपति रावणानें विचारिलें असतां क्रोधानें व्याप्त झालेली ती राक्षसी यथायोग्य रीतीनें रामाची हकीकत सांगूं लागली. ती म्हणाली, "आजानुबाहु, विशालनयन, वल्कलें व कृष्णाजिनें हीं वस्त्रें, आणि मदनासारखें रूप ह्यांनीं युक्त असलेला राम दशरथाचा पुत्र आहे. सुवर्णवलयांनीं भूषित असें इंद्रधनुष्यासारखें धनुष्य आकर्षण करून महाविषारी सर्पाप्रमाणें देदीप्यमान नाराच बाण तो सोडीत असतो. संग्रामामध्यें महाबलाढ्य राम भयंकर बाण घेतो केव्हां, सोडितो केव्हां आणि धनुष्य ओढितो केव्हां, हें मला तर आढळण्यांत आलें नाहीं. इंद्रानें पाषाणवृष्टीच्या योगानें नष्ट केलेल्या पिकाप्रमाणें बाणवृष्टीच्या योगानें सैन्याचा वध होत आहे, इतकें मात्र माझ्या दृष्टीस पडत होतें. त्या एकट्या रामानें पदाति असतांनाहि तीक्ष्ण बाणांच्या योगानें भयंकर सामर्थ्यवान अशा चौदा हजार राक्षसांचा वध केला. दूषणासहवर्तमान खराचाहि वध केला, आणि इतकें कृत्य दीड मुहूर्तामध्यें आटोपून त्यानें दंडकारण्यवासी ऋषींना अभय दिलें, व दंडकारण्य सुखरूप केलें. स्त्रीवधाची भीति बाळगणाऱ्या त्या प्रख्यात पराक्रमी रामाच्या हातून मी नुसता अपमान पावूनच एकटी कशी तरी सुटलें. त्याचा लक्ष्मण म्हणून एक वीर्यवान भ्राता आहे. तो गुणांनीं त्याच्यासारखा असून त्याचे ठिकाणीं अनुरक्त, ह्याचा भक्त आणि महातेजस्वी आहे. तो तापट, पराजित होण्यास अशक्य, शत्रूंना जिंकणारा, पराक्रमी, बुद्धिमान, बलाढ्य व रामाचा उजवा हात आहे; आणि देहाबाहेर संचार करणारा रामाचा प्राणच कीं काय असा आहे. विशालनयन आणि पूर्ण चंद्रासारखें आल्हादकारक मुख ह्यांनीं युक्त असलेली रामाची प्रिय धर्मपत्नी आपल्या भर्त्याचें प्रिय आणि हित करण्याविषयीं नेहमीं तत्पर असते. उत्कृष्ट केश, सुंदर नासिका, मांड्या आणि मनोहर रूप ह्यांनीं युक्त असलेली, आणि दुसरी लक्ष्मीच कीं काय अशी भासणारी ती यशस्विनी ह्या दंडकारण्याच्या देवतेप्रमाणें शोभत आहे. विदेहराजकन्या जी सुलक्षणी सीता तिचा वर्ण तप्त सुवर्णाप्रमाणें आहे. नखें आरक्तवर्ण असून उन्नत आहेत, कटिप्रदेश उत्कृष्ट आहे, आणि उदर कृश आहे. देव, गंधर्व, यक्ष आणि किन्नर ह्या जातींतहि तशी रूपवती स्त्री आजपर्यंत भूतलावर माझ्या

पाहण्यांत आली नाहीं. सीता ज्याची भार्या होईल, आणि ज्याला ती आनंदानें आलिंगन देईल, तो कोणत्याहि काळीं आणि कोणत्याहि लोकामध्यें इंद्रापेक्षांहि अधिक सुखानें राहील. सुशील, शरिराच्या बांध्यामुळें लोकप्रशंसेस पात्र आणि रूपानें तर पृथ्वीमध्येंहि अनुपम अशी ती सीता तुला भार्या योग्य असून तूंहि तिला पति उत्कृष्ठ आहेस. विपुल कटिप्रदेश, पुष्ट व उन्नत स्तन आणि उत्कृष्ट मुख ह्यांनीं युक्त असलेली ती स्त्री तुझी भार्या व्हावी, एतदर्थ मी तिला आणण्यास उद्युक्त झालें असतांना, क्रूर लक्ष्मणानें मला विरूप करून टाकिलें. पूर्ण चंद्राप्रमाणें जिचें मुख आल्हादकारक आहे, अशा त्या वैदेहीला अवलोकन करितांक्षणींच तूं मदनबाणाच्या अधीन होऊन राहाशील. तेव्हां भार्या या नात्यानें ती आपणाला मिळावी, अशी जर इच्छा तुझ्या मनांत उत्पन्न होत असेल, तर ह्या कामांत जय येण्याकरितां तूं आपला उजवा पाय सत्वर उचल. हे राक्षसाधिपते, हें माझें सांगणें तुला रुचत असेल, तर तूं माझ्या सांगण्याप्रमाणें निःशंकपणें वाग. सारांश, हे महाबलाढ्य राक्षसाधिपा, राज्य वगैरे कांहींएक नसल्यामुळें ह्या रामादिकांची सामर्थ्यहीनता लक्ष्यांत घेऊन, मनोहर अवयवांनीं युक्त असलेली सीता भार्या ह्या नात्यानें तुला मिळेल, अशी तजवीज कर. तात्पर्य, सरळ जाणाऱ्या बाणांच्या योगानें जनस्थानांतील राक्षसांचा रामानें वध केल्याचें ऐकून, आणि खरदूषणांचा त्यानें वध केल्याचें लक्ष्यांत घेऊन, ह्या प्रसंगाला उचित असें कृत्य निश्चयपूर्वक विचार करून तूं आज कर."

सर्ग पस्तिसावा.

रावणाचें मारीचाश्रमाकडे प्रयाण.

(वनशोभा.)

तदनंतर रोमांच उठविणारें तें शूर्पणखेचें भाषण श्रवण केल्यावर त्यानें त्या कार्याविषयीं सचिवांचें अनुमोदन घेतलें, आणि तें कार्य करण्याचा निश्चय करून तो मारीचाच्या आश्रमाकडे निघाला. प्रथमतः तें कृत्य मनामध्यें आणून, पूर्णपणें त्याचा विचार करून, गुणदोषांच्या बलाबलाचा निश्चय करून आणि अशीच गोष्ट करावयाची असा आपला विचार ठरवून, बुद्धीचा पक्का निश्चय झाल्यावर तो आपल्या रमणीय रथखान्यामध्यें गेला; आणि त्यानें 'रथ जोड'

म्हणून सारथ्याला गुप्तपणें आज्ञा केली. रावणाची आज्ञा होतांच त्या चलाख सारथ्यानें एका क्षणांत त्या रावणाला संमत असा उत्कृष्ट रथ जोडून तयार केला. तेव्हां सुवर्णाचे अलंकार घातलेले आणि पिशाचांसारख्या मुखांनीं युक्त असलेले गर्दभ ज्याला जोडिले आहेत, अशा सुवर्णमय व रत्नभूषित स्वेच्छाचारी रथामध्यें आरूढ होऊन तो कुबेराचा कनिष्ठ भ्राता त्या मेघतुल्य गंभीर नादानें युक्त असलेल्या रथाच्या योगानें समुद्र तरून गेला. श्वेतवर्ण केशांचे चामर, श्वेत-वर्ण छत्र, पाणीदार वैदूर्य मण्यांसारखी कांति, उत्कृष्ट सुवर्णभूषणें, दहा मुखें, दहा कंठ, वीस हात व मनोहर सामानसुमान ह्यांनीं युक्त, देवशत्रु, मुनि-श्रेष्ठांचा वध करणारा आणि दहा मस्तकांनीं युक्त असलेला हिमालय पर्वतच कीं काय असा दिसणारा तो राक्षसाधिपति रावण, यथेष्ठ गमन करणाऱ्या रथावर आरूढ झाला असतां बलाकसंज्ञक पक्ष्यांचे समुदाय आणि विद्युन्मंडल ह्यांनीं युक्त असलेल्या आकाशांतील मेघांप्रमाणें शोभूं लागला. तो वीर्यवान रावण पर्वतांसह समुद्रतीर अवलोकन करीत करीत चालला. तें तीर नाना-प्रकारच्या पुष्पयुक्त व फलयुक्त हजारों वृक्षांनीं गजबजलेलें होतें. शीत आणि मंगलकारक उदकानें युक्त असलेलीं सरोवरें आणि स्थंडिलें ज्यांत आहेत, अशा विशाल व सुंदर आश्रमांच्या योगानें तें सभोंवतीं भूषित झालेलें होतें. केळींच्या वनांनीं त्याला शोभा आलेली होती. नारळांनीं तें सुशोभित झालेलें होतें. साल, ताल, तमाल इत्यादि प्रफुल्लित वृक्षांनी तें सुंदर दिसत होतें. अत्यंत शुद्ध आहार करणाऱ्या महर्षींनीं तें शोभविलेलें होतें. हजारों नाग, सुपर्ण, गंधर्व, किन्नर आणि जितेंद्रिय, सिद्ध, चारण, ब्रह्मपुत्र, वैखानस, वालखिल्य, मरीचिप आणि माषसंज्ञक महर्षी ह्यांनीं तें सुशोभित झालेलें होतें. क्रीडा आणि रतिधर्म ह्यांचा प्रकार ज्यांना अवगत आहे, अशा दिव्य भूषणें धारण केलेल्या आणि दिव्य रूपांनीं युक्त असलेल्या हजारों अप्सरांनीं तें व्याप्त झालेलें होतें. वैभवसंपन्न स्त्रियांनीं त्याचा आश्रय केलेला होता. देवांगनांनींहि त्याचें अवलंबन केलेलें होते, आणि अमृत भक्षण करणारे देवदैत्यांचे समुदाय तेथें संचार करीत होते. हंस, क्रौंच आणि मंडूक ह्यांनीं तें गजबजलेलें होतें. सारस पक्ष्यांनीं तें निर्मळ केलेलें होतें. वैदूर्य मण्यांसारख्या श्यामवर्ण तृणांनीं तें आच्छादित झालेलें होतें. समुद्राच्या तेजानें तें स्निग्ध व शीतळ दिसत होतें. असो. श्वेतवर्ण, विशाल व दिव्य पुष्पांनीं युक्त, वाद्यें आणि गायन ह्यांनीं संपन्न व यथेष्ठ गमन करणारीं अशीं तपश्चर्येनें उत्तम लोक संपादन केलेल्या पुरुषांचीं चोहोंकडे अस-

लेलीं विमानें व गंधर्व आणि अप्सरा ह्यांना जातां जातां त्या रावणानें अवलोकन केलें. ज्यांच्या मुळाशीं डिंक हा रस आहे, अशीं हजारों चंदनवृक्षांचीं सौम्य व घ्राणेंद्रियें तृप्त करणारीं वनें अवलोकन करीत करीत तो रावण चालला. त्याचप्रमाणें श्रेष्ठ अगुरूंचीं वनें, उत्कृष्ट तक्कोल वृक्षांचीं उपवनें, सुगंधि फलांचीं अरण्यें, तमालपुष्पें, मिऱ्याचीं झुडुपें, तीरावर सुकत पडलेल्या मोत्यांच्या राशी, पाषाणांचे ढीग, उत्कृष्ट पोंवळ्यांच्या राशी, रौप्यवर्ण व सुवर्णवर्ण शिखरें, निर्मल जलानें युक्त, आश्चर्यकारक आणि मनोहर असे प्रवाह व धनधान्यांनीं समृद्ध, स्त्रीरत्नांनीं व्याप्त, आणि हत्ती, अश्व व रथ ह्यांनीं खेंचिलेलीं नगरें अवलोकन करीत करीत जातां जातां समुद्राचे तीरीं ज्याचा स्पर्श मृदु आहे, अशा वायूनें युक्त व सर्व बाजूंनीं स्निग्ध असा तो स्वर्गतुल्य सपाट प्रदेश रावणानें पाहिला. त्या प्रदेशावर मेघतुल्य मुनींनीं व्याप्त झालेला वटवृक्ष त्या रावणानें अवलोकन केला.

सुभद्र नामक वटवृक्षाचें दर्शन.

त्या वृक्षाच्या शाखा सभोंवतीं शंभर शंभर योजनें दूर दूर गेलेल्या होत्या. प्रचंड शरिरानें युक्त असलेला गज व कूर्म भक्षणाकरितां घेऊन महाबलाढ्य गरुड त्याच वृक्षाच्या एका शाखेवर जेऊन बसला असतां, त्याची ती विपुल पानांनीं युक्त असलेली शाखा पक्षिश्रेष्ठ महाबलाढ्य गरुडानें आपल्या भाराच्या योगानें मोडून टाकिली. त्या वेळीं त्या मोडिलेल्या शाखेच्या अधोभागीं वैखानस, माष, वालखिल्य, मरीचिप, आज आणि धूम्र हे महर्षी एकत्र जुळून बसलेले होते. तेव्हां त्यांची दया आल्यामुळें शंभर योजनें लांब असलेली ती मोडकी फांदी आणि ते उभयतां गज व कूर्म ह्यांना घेऊन तो गरुड वेगानें तेथून निघाला. मध्यंतरी ती फांदी व ते गजकूर्म एका पायानें धरून आकाशांतून जातां जातां तें आमिष (गज व कूर्म) भक्षण करून, आणि त्या शाखेच्या योगानें निषाद देशाचा नाश करून व त्या महर्षींना सोडून त्या श्रेष्ठ पक्ष्याला अतुल हर्ष झाला. तेव्हां त्या हर्षामुळें ज्याच्या गतीचा जोर दुप्पट झालेला आहे, अशा त्या बुद्धिमान गरुडानें अमृत आणण्याचा विचार केला, आणि पक्ष्यांचा प्रवेश होऊं नये म्हणून वरावरून बांधिलेली लोखंडाची जाळी तोडून आणि तें श्रेष्ठ रत्नमय गृह फोडून त्या इंद्राच्या गृहांत रक्षण करून ठेविलेलें अमृत त्यानें हरण केलें. असो.

रावणाचें मारीचाश्रमीं गमन.

गरुडानें शाखा मोडून ज्याला खूण केलेली आहे, आणि महर्षीसमुदायांनीं

जो सेवित आहे, असा तो सुभद्र नामक वटवृक्ष रावणानें पाहिला. नंतर नदीपति समुद्राच्या पलीकडल्या तीराला गेल्यावर एकांत, रम्य व पवित्र अशा वनामध्यें एक आश्रम त्याच्या दृष्टीस पडला. त्या आश्रमामध्यें कृष्णाजिनें आणि जटामंडल धारण करून शुद्ध आहारावर उपजीविका करणारा मारीच नामक राक्षस त्यानें पाहिला. तेव्हां रावण तेथें आल्यावर त्या राक्षसानें अमानुष अशा सर्व भोग्य वस्तूंनीं पुनरपि त्या राजाचा यथाविधि सत्कार केल्यावर अर्थानें भरलेल्या वाणीनें मारीच राक्षसानें त्याला विचारिलें, "हे राक्षसाधिपते, तुझ्या लंकेमध्यें सर्व ठीक आहे ना? तूं कोणत्या उद्देशानें पुनरपि सत्वरच येथें आला आहेस?"

ह्याप्रमाणें मारीचानें विचारिल्यानंतर संभाषण करण्यामध्यें कुशल असलेला महातेजस्वी रावण त्याच्याशीं बोलूं लागला.

सर्ग छत्तिसावा.

सीताहरणार्थ साहाय्ययाचना.

रावण म्हणाला:—"मी काय बोलतों, तिकडे लक्ष्य दे. मी दुःखित झालों आहें. अशा दुःखित स्थितींमध्यें तूंच माझा मुख्य आधार आहेस. जनस्थान तुला माहीतच आहे. त्या ठिकाणीं माझा भ्राता खर, महापराक्रमी दूषण, माझी भगिनी शूर्पणखा, महापराक्रमी त्रिशिरा आणि इतरहि युद्धाचा उत्साह असलेले पुष्कळ शूर निशाचर माझ्या आज्ञेनें महारण्यामध्यें धर्मनिष्ठ मुनींना पीडा करण्याकरितां वास्तव्य करीत आहेत, हेंहि तुला विदितच आहे. युद्धाचा उत्साह असलेले आणि खराच्या इच्छेला अनुसरून वागणारे असे जे भयंकर पराक्रम करणारे महाबलाढ्य चौदा हजार राक्षस जनस्थानामध्यें वास्तव्य करीत होते, ते एकत्र जुळून रामाशीं युद्ध करण्यास अगदीं मनापासून तयार झाले. त्या खरप्रमुख राक्षसांपाशीं नानाप्रकारचीं शस्त्रें व आयुधेंहि होतीं. परंतु कांहींएक मर्मभेदक भाषण न उच्चारितां क्रुद्ध झालेल्या त्या रामानें संग्रामामध्यें धनुष्याची बाणांशीं योजना केली, आणि भयंकर तेजस्वी चौदा हजार राक्षस त्या पदाति मानवानें देदीप्यमान बाणांच्या योगानें मारिले. त्याचप्रमाणें संग्रामामध्यें त्यानें खराचा वध केला, दूषणाचा निःपात केला आणि त्रिशिरा राक्षसालाहि मारून दंडकारण्य निर्भय केलें. आयुष्याचा क्षय झालेल्या त्या

रामाला क्रुद्ध झालेल्या पित्यानें नगरांतून हांकून दिलें आहे. त्या सैन्याचा वध करणारा तो राम क्षत्रियांना कलंक लावणारा, दुःशील, कर्कश, तीक्ष्ण, मूर्ख, लुब्ध, अजितेंद्रिय, धर्माचा त्याग केलेला व अधर्मनिष्ठ असून प्राण्यांच्या अहिताविषयीं तत्पर आहे. त्यानेंच अरण्यामध्यें वैरावांचून केवळ शक्तीच्या जोरावर कर्ण व नासिका ह्यांचा छेद करून माझी भगिनी विरूप केली आहे. तेव्हां देवकन्येसमान असलेल्या त्याच्या सीता नामक भार्येला जनस्थानांतून मी पराक्रमानें घेऊन येणार आहें. त्याविषयीं तूं मला सहाय्य हो. हे महाबलाढ्य मारीचा, तूं एक सहाय्य करणारा माझ्या जवळ असलास, म्हणजे कुंभकर्ण-प्रभृति भ्रात्यांसहवर्तमान देवांचीहि ह्यासंबंधानें मी पर्वा करीत नाहीं. ह्यास्तव राक्षसा, तूं एक मला सहाय्य हो. तूं समर्थ आहेस. तूं वीर्यामध्यें, युद्धाविषयींच्या उत्साहासंबंधात व उपाय योजण्यांतहि तुझ्यासारखा कोणी नाहीं. कारण तूं मोठा शूर असून महामायावी आहेस. एतदर्थ मी तुझ्या समीप आलों आहें. आतां साहाय्यासंबंधानें माझ्या सांगण्यावरून तूं काय कर्म करावयाचें, तें ऐक. रौप्य बिंदूंनीं युक्त असा तूं एक सोन्याचा अद्भुत मृग हो, आणि त्या रामाच्या आश्रमामध्यें सीतेच्या पुढें चालूं लाग. म्हणजे मृगरूप धारण केलेल्या तुला अवलोकन करितांक्षणीं 'हा मृग धरा' म्हणून ती स्त्री आपल्या भर्त्याला आणि लक्ष्मणाला निःसंशय सांगेल. असें तिनें सांगितल्यानंतर ते तुझ्या मागोमाग निघून गेले, म्हणजे शून्य झालेल्या त्या आश्रमामध्यें जाऊन चंद्रप्रभा हरण करणाऱ्या राहूप्रमाणें कांहींएक अडथळा न येतां सीतेला मी सुखानें हरण करून नेईन. तदनंतर भार्येचा अपहार झाल्यामुळें राम कृश झाला असतां, मी अंतःकरणामध्यें कृतकृत्य होऊन अनायासानें गुप्तपणें रामावर प्रहार करीन."

ह्याप्रमाणें रामाशीं प्रसंग येणार असल्याचें श्रवण करून मारीचाचें तोंड सुकून गेलें, व तो भयभीत झाला. भयानें व्याकुल होऊन मृतप्राय झालेला तो मारीच डोळ्यांच्या पापण्या न हालवितां शुष्क ओठ चाटीत चाटीत रावणाकडे पाहूं लागला, आणि रामाचा पराक्रम जाणणारा असल्यामुळें ज्याचें मन त्रस्त व खिन्न झालें आहे, असा तो मारीच हात जोडून उभयतांनाहि हितकारक असें खरें खरें भाषण करूं लागला.

सर्ग सदतिसावा.

मारीचाचा रावणाला उपदेश.

मारीच म्हणाला:—" राजा, नेहमीं प्रिय भाषण करणारे पुरुष पाहिजे तितके मिळणारे आहेत; परंतु अप्रिय जरी असलें तरी हितकारक भाषण करणारा वक्ता आणि तें ऐकून घेणारा श्रोता हे दुर्लभ आहेत. तूं हेरांची योजना केलेली नाहींस आणि स्वतः अविचारी आहेस, ह्यामुळें मोठें वीर्य आणि मोठे गुण ह्यांनीं योग्यतेला चढलेल्या व इंद्रवरुणांची बरोबरी करणाऱ्या रामाला तूं खरोखर ओळखीत नाहींस. बा रावणा, तुझी ही दुर्बुद्धि पालटून सर्व राक्षसांचें कल्याण होईल का? राम क्रुद्ध झाला असतां तो राक्षसशून्य लोक करणार नाहीं का? अरे, तुझ्या जीविताच्या अंताकरितां तर जनककन्या उत्पन्न झाली नाहीं ना? आणि सीतेमुळें आपणांवर मोठें संकट गुदरणार नाहीं ना? स्वेच्छाचारी आणि निरंकुश असा तूं अधिपति असल्यामुळें, तुझ्या बरोबरच राक्षसांसहवर्तमान लंका नगरी नाहींशी होणार नाहीं ना? तुझ्यासारख्या स्वेच्छाचारी, दुःशील आणि दुष्ट मंत्र्यांचा सल्ला मिळालेला जो दुष्टबुद्धि राजा असतो, तो स्वतःचा, स्वजनांचा आणि राष्ट्राचा घात करितो. रामाचा पित्यानें त्याग केलेला नाहीं, तो मर्यादा सोडून कदापि वागणारा नाहीं, तो लुब्ध नाहीं, त्याचें शील वाईट नाहीं, व तो क्षत्रियांना कलंक लावणारा नाहीं. धर्मसंबंधीं गुणांचा त्याचे ठिकाणीं अभाव नाहीं, आणि तो प्राण्यांशीं निष्ठुरपणानें वागणारा नाहीं; परंतु कौसल्येचा आनंद वृद्धिंगत करणारा तो राम सर्व भूतांच्या हिताविषयीं तत्पर आहे. कैकेयीनें पित्याला फसविल्याचें अवलोकन केल्यावर, 'मी पित्याचें वचन खरें करीन' असा उद्देश मनांत धरून कैकेयीचा आणि पित्या दशरथाचा मनोरथ परिपूर्ण करण्याकरितां राज्य आणि भोग ह्यांचा त्याग करून तो धर्मात्मा दंडकारण्यामध्यें प्रविष्ठ झाला आहे. बा रावणा, राम निर्दय नाहीं, अविद्वान नाहीं, अजितेंद्रिय नाहीं, आणि अनृत भाषण त्यानें कधीं ऐकिलेलेंहि नाहीं. तेव्हां ह्याप्रमाणें त्याला दोष देणें योग्य नाहीं. अमोघ पराक्रमी सज्जन राम मूर्तिमान धर्म आहे; आणि इंद्र ज्याप्रमाणें देवांचा राजा आहे, त्याप्रमाणें तो सर्व लोकांचा राजा आहे. तेव्हां सूर्याच्या प्रभेप्रमाणें स्वतःच्या तेजानें सुरक्षित असलेल्या त्याच्या वैदेही भार्येला बलात्कारानें हरण करून आणण्याची इच्छा तूं कशी करीत आहेस? बाण ह्या ज्याच्या ज्वाला आहेत,

धनुष्यें व खड्ग हीं ज्याचीं इंधनें आहेत, आणि ज्याच्या समोर जाणेंहि दुर्घट आहे, अशा रामरूप प्रदीप्त अग्नींत अविचारानें प्रवेश करणें तुला योग्य नाहीं. बाणरूप ज्वालांनीं युक्त असलेलें धनुष्य हेंच ज्याचें पसरलेलें ज्वालायुक्त मुख आहे, व धनुर्बाण धारण करून शत्रुसैन्याचा जो संहार करणारा आहे, अशा रामरूप प्रचंड मृत्यूशीं, जनस्थानांतील राक्षसांचा वध सहन न झाल्यामुळें आपलें राज्य, सुख आणि प्रिय जीवित ह्यांचा त्याग करून अतिशय झगडणें तुला योग्य नाहीं. ती जनककन्या ज्याची भार्या आहे, त्याचें तेज कांहीं अतर्क्य आहे. ह्यामुळें वनामध्यें रामधनुष्याच्या आश्रयाला असलेल्या त्या सीतेचें हरण करण्यास तूं समर्थ नाहींस. सिंहासारखें ज्याचें वक्षःस्थल आहे, अशा त्या पुरुषसिंहाची ती भार्या नेहमीं त्याला अनुसरणारी असल्यामुळें, त्याला प्राणांपेक्षांहि प्रिय आहे. प्रदीप्त अग्नीची ज्वाला धरणें ज्याप्रमाणें अशक्य आहे, त्याप्रमाणें तेजस्वी रामाच्या त्या प्रिय व सौंदर्यसंपन्न भार्येवर हात टाकितां येणें शक्य नाहीं. तेव्हां हे राक्षसाधिपा, ह्या व्यर्थ उद्योग करून तुला काय प्राप्त होणार आहे? रणामध्यें तूं जर त्याच्या दृष्टीस पडलास, तर तो तुझ्या जीविताचा अंतच आहे. तस्मात् जीवित, सुख आणि अत्यंत दुर्लभ राज्य ह्यासंबंधानें बिभीषणप्रभृति सर्व धर्मनिष्ठ मंत्र्यांसहवर्तमान विचार करून, नंतर आपला निश्चय करून, गुणदोषांचें बलाबल लक्ष्यांत घेऊन आणि आपलें व रामाचें बल किती आहे हेंहि खरें मनांत आणून 'हें करणें हितावह आहे' असा निश्चय झाल्यावर मग जें योग्य असेल, तें तूं कर. कोसलदेशाधिपति दशरथ राजाच्या पुत्राशीं रणामध्यें समागम करणें तुला योग्यच नाहीं, असें मला वाटतें. हे राक्षसाधिपते, मी आणखी कांहीं तुला सांगतों, तें ऐक."

सर्ग अडतिसावा.

विश्वामित्रमखरक्षणवृत्तकथन.

मारीच म्हणतो:—"सहस्र गजांचें सामर्थ्य असलेला, नीलमेघाप्रमाणें कांति असलेला, उत्कृष्ठ सुवर्णाचीं कुंडलें धारण केलेला व परिघसंज्ञक आयुध हातांत घेऊन मस्तकीं किरीट घातलेला मी पर्वतप्राय मारीच अंगांत पाणी खेळत असल्यामुळें ह्या पृथ्वीवर पर्यटण करीत असतांना ऋषिमांस भक्षण करण्याकरितां दंडकारण्यामध्यें संचार करूं लागलों. तेव्हां मला त्रासून गेलेला

धर्मात्मा विश्वामित्र महर्षि स्वतः दशरथ राजाकडे गेला आणि म्हणाला, "पर्व-दिवशीं (यागसमयीं) ह्या रामानें दक्ष राहून माझें रक्षण करावें. राजा, मारीच राक्षसापासून मला घोर भय उत्पन्न झालें आहे."

मारीच पुढें सांगतोः—"बा रावणा, ह्याप्रमाणें त्यानें सांगितलें असतां धर्मात्मा दशरथ राजा महाभाग्यवान विश्वामित्र महर्षींना म्हणाला, "हा माझा राम अद्याप पुरा बारा वर्षांचाहि झालेला नसून अस्त्रविद्येमध्येंहि निपुण नाहीं. तेव्हां माझ्यासहवर्तमान माझें सैन्य आपल्या इच्छेप्रमाणें तिकडे जाईल. आणि चतुरंग सैन्यासहवर्तमान मी स्वतःच येऊन आपल्या इच्छेप्रमाणें त्या राक्षस-शत्रूचा वध करीन."

ह्याप्रमाणें दशरथानें सांगितलें असतां तो मुनि राजाला म्हणाला, "त्या राक्षसाचा वध करण्याला समर्थ असें रामावांचून ह्या जगतामध्यें दुसरें बल नाहीं. संग्रामामध्यें देवांचेंहि तूं रक्षण करणारा होतास, राजा, त्रैलोक्यामध्यें तूं केलेलें कर्म विदितहि आहे, आणि तुझ्यापाशीं खरोखर मोठें सैन्यहि आहे. परंतु तें तुझें सैन्य येथेंच असूं दे. हा राम जरी बाल आहे, तरी महातेजस्वी असून त्या राक्षसाचा निग्रह करण्यास समर्थ आहे. तेव्हां हे शत्रुतापना, मी रामाला घेऊन जातों. तुझें कल्याण असो."

ह्याप्रमाणें दशरथाला सांगितल्यावर तो विश्वामित्र मुनि त्या राजकुमाराला घेऊन अत्यंत आनंदानें आपल्या आश्रमाला आला. तदनंतर तो विश्वामित्र दंडकारण्यामध्यें दीक्षा घेऊन बसला असतांना राम आपलें अद्भुत धनुष्य लववीत त्याच्या समीप उभा राहिला. त्या वेळीं एकच वस्त्र, धनुष्य व झुलपें धारण करून सुवर्णमालेनें भूषित, शुभ नेत्रांनीं युक्त, व वैभवशाली आणि श्यामवर्ण असलेला तो राम बाल असल्यामुळें त्याचे ठिकाणीं श्मश्रुप्रभृति चिन्हेंहि उत्पन्न झालीं नव्हतीं. आणि आपल्या उज्ज्वल तेजानें दंडकारण्य सुशोभित करीत असलेला राम उदय पावलेल्या बालचंद्राप्रमाणें दिसत होता. असो. तदनंतर मेघतुल्य, शुद्ध सुवर्णाचीं कुंडलें धारण केलेला आणि महा-बलाढ्य असा मी देवांना अवध्य म्हणून ब्रह्मदेवाचा वर प्राप्त झाला असल्या-मुळें गर्वानें आश्रमामध्यें आलों. त्या आश्रमामध्यें एकाएकीं परिघसंज्ञक आयुध हातांत घेऊन प्रविष्ठ झालेल्या मला त्यानें प्रथम पाहिलें नाहीं. परंतु पाहतांक्षणीं त्यानें यत्-किंचितूहि न घाबरतां आपल्या धनुष्याला प्रत्यंचा चढविली. तथापि हा बालक आहे, असें समजून अज्ञानानें त्याला न जुमानितां त्वरा करून मी विश्वामित्राच्या त्या

वेदीकडे धावलों. पण त्या रामानें एक शत्रुनाशक तीक्ष्ण बाण सोडिला. त्या बाणानें मला ताडित करून समुद्रामध्यें शंभर योजनें दूर फेंकून दिलें. तेव्हां रामाच्या बाणवेगानें फेंकला गेलेला मी मूर्च्छित झालों. आणि माझा वध करण्याची त्याची केवळ इच्छा नसल्यामुळेंच त्या बाणाच्या हातून माझें रक्षण झालें. अगाध समुद्रजलामध्यें मला त्यानें पाडिल्यावर पुष्कळ वेळानें मी शुद्धीवर आलों, आणि लंका नगरीला परत गेलों. अशा प्रकारें मी मात्र त्या वेळेला सुटलों. पण अस्त्राविषयीं अनभिज्ञ आणि बाल—तथापि अप्रतिहित पराक्रम करणाऱ्या—रामानें माझ्या सहाय्याकरितां तेथें गेलेल्या त्या राक्षसांचा निःपातच केला. तेव्हां मी नको नको म्हणत असतांनाहि तूं जर रामाशीं कलह उपस्थित करशील, तर घोर विपत्ति प्राप्त होऊन तुझा सत्वरच नाश होईल. क्रीडा आणि संभोग ह्यांचे प्रकार जाणणारे आणि समाजाचे उत्सव अवलोकन करणारे जे राक्षस, त्यांच्या संतापाला व अनर्थाला तूं कारण होशील. आणि सीतेकरितां वाड्यांनी व प्रासादांनीं गजबजलेली आणि नानाप्रकारच्या रत्नांनीं भूषित असलेली लंका नगरी उध्वस्त झालेली तूं पाहशील."

रावणाला मारीचाचा उपदेश.

मारीच म्हणतो:- "रावणा, पापाचरण न करितां पुरुष स्वतः जरी शुद्ध असले, तरी पाप्यांच्या संसर्गामुळे ते सर्पयुक्त सरोवरांतील मत्स्यांप्रमाणें दुसऱ्यांच्या पापामुळेंच नाश पावतात. सारांश, ज्यामध्ये सर्प आहेत, अशा सरोवरांत राहणारे मत्स्य स्वतः जरी कसलेंहि पाप न करितां शुद्ध आचरणानें वागत असले, तरी सरोवरांतील सर्प नाहींतसे करण्याकरितां लोक प्रयत्न करूं लागले असतां त्या सर्पांबरोबर मत्स्यांचाहि ज्याप्रमाणें केवळ त्या सर्पांची संगत झाल्यामुळें नाश होतो, त्याचप्रमाणें पापी पुरुषांच्या संसर्गानें शुद्ध आचरणानें वागणाऱ्या पुरुषांचाहि नाश होतो. तात्पर्य, दिव्य चंदन ज्यांच्या अंगाला लाविलें आहे, आणि दिव्य अलंकारांनीं जे भूषित झालेले आहेत, असे राक्षस तुझ्या दोषामुळें भूमीवर मारून टाकिलेले तूं अवलोकन करशील. वध पावलेले असे जे राक्षस अवशिष्ट राहतील, त्यापैकीं कांहीं स्त्रियांचा वध झालेले आणि कांहीं सपत्नीक असे अनाथ होऊन दशदिशा पळत सुटलेले तूं अवलोकन करशील. तसेंच बाणसमूहांनीं परिवेष्टित; अग्नीच्या ज्वालांनीं व्याप्त, व दग्ध झालेल्या गृहांनीं युक्त अशी लंका तूं निःसंशय पाहशील. राजा, तुझ्या अंतःपुरामध्यें हजारों तरुण स्त्रिया आहेत, आणि परस्त्रीगमनापेक्षां अधिक असें

कोणतेंहि दुसरें महापातक नाहीं. तेव्हां तूं स्वस्त्रियांचे ठिकाणींच रत हो, आणि आपलें कुल, राक्षस, मान, मोठेपणा, राज्य व तुजला इष्ट असलेलें जीवित ह्यांचें रक्षण कर. सारांश, सौम्य स्त्रिया आणि मित्रगण ह्यांचा चिरकाल उपभोग घेण्याची जर तुला इच्छा असेल, तर तूं रामाचा अपराध करूं नको. मी—सुहृद् नको नको म्हणत असतांनाहि अविचारानें जर तूं सीतेवर हात टाकशील, तर रामबाणांच्या योगानें तुझ्या जीविताचा अंत होऊन व सैन्याचा नाश होऊन तूं बांधवादिकांसहवर्तमान यमसदनाला जाशील."

सर्ग एकुणचाळिसावा.

मारीचमुखें स्वपराजयवृत्तकथन.

मारीच सांगतोः—" रावणा, ह्याप्रमाणें त्या युद्धामध्यें मी कसा तरी त्या रामाच्या हातून सुटलों; परंतु सांप्रत लोकोत्तर अशी जी एक गोष्ट घडून आली आहे, ती तूं श्रवण कर. पूर्वी रामानें माझी तशी अवस्था केली असतांनाहि, पापकर्माचा कंटाळा न आलेला मी मृगरूप धारण केलेल्या दोन राक्षसांसहवर्तमान दंडकारण्यामध्ये प्रविष्ट झालों होतों. प्रदीप्त जिव्हा, मोठमोठ्या दाढा, तीक्ष्ण शृंगें आणि प्रचंड बल ह्यांनी युक्त असलेला मी मांसभक्षक मोठ्या मृगाचें रूप धारण करून दंडकारण्यामध्यें संचार करीत होतों. रावणा, अत्यंत घोर मृग असा मी त्या तापसांना त्रास देण्याकरितां अग्निहोत्रें, तीर्थें आणि देवताधिष्ठित वृक्ष ह्यांचे ठिकाणीं संचार करीत होतों. दंडकारण्यामध्यें धर्माचरण करणाऱ्या मुनींचा वध करून मी त्यांचें रक्त प्राशन करीत होतों, व त्यांचें मांस भक्षण करीत होतों. सारांश, ऋषिमांस भक्षण करणारा मी क्रूर मृग रुधिरप्राशनानें मत्त होऊन वनामध्यें वास्तव्य करणाऱ्या मुनींना त्रस्त करीत करीत दंडकारण्यामध्यें संचार करीत होतों. तेव्हां दंडकारण्यामध्यें संचार करितां करितां मी धर्मविध्वंसक, महारथि लक्ष्मण व महाभाग्यवती सीता ह्यां-सहवर्तमान असलेल्या व मुनिधर्माचें अवलंबन केलेल्या रामासमीप आलों. नंतर वनामध्यें आलेल्या महाबलाढ्य रामाला न जुमानितां हा तपस्वी आहे असें समजून, पूर्ववैर लक्ष्यांत घेऊन आणि तो प्रहार मनांत आणून तीक्ष्ण शृंगांनीं युक्त, अविचारी व मृगरूप धारण केलेला असा मी अत्यंत क्रुद्ध होऊन त्याचा

वध करण्याच्या उद्देशानें मृगरूप धारण केलेल्या इतर दोन राक्षसांसहवर्तमान त्याच्या अंगावर धांवलों. तेव्हां त्यानें आपलें अति प्रचंड धनुष्य आकर्षण करून शत्रूंचा घात करणारे व गरुड आणि वायु ह्यांच्याप्रमाणें शीघ्र गमन करणारे तीन तीक्ष्ण बाण टाकिले. वज्रतुल्य, अत्यंत घोर, रक्तशोषक आणि बांकदार पेऱ्यांनीं युक्त असलेले ते तिन्ही बाण एकदम आले. तेव्हां रामाचा पराक्रम जाणीत असलेला आणि पूर्वी एकदां भय अवलोकन केलेला मी शठ पलायन करून तेथून सुटलों, आणि त्या दोन्ही राक्षसांचा वध झाला. रामाच्या बाणांचे तावडींतून मी जीव धरून कसा तरी सुटलों, आणि येथें सर्व दुराचरणांचा परित्याग करून स्वस्थ अंतःकरणानें तपोनिष्ठ व जितेंद्रिय होऊन राहिलों. प्रत्येक वृक्षावर वल्कलें व कृष्णाजिन धारण करून धनुष्य घेतलेला राम हातांत पाश घेतलेल्या मृत्यूप्रमाणें मला दिसत आहे. रावणा, मी भयभीत झालों असून हजारों राम मला दृष्टीस पडत आहेत, आणि हें सर्व अरण्यच मला राममय भासत आहे. रामरहित असलेल्याहि वनामध्यें रामच मला दिसत असतो, आणि स्वप्नामध्यें रामाला पाहिलें असतां मी भिऊन जागा असल्याप्रमाणें ओरडूं लागतों. रावणा, रामाची जरब बसून गेल्यामुळें रकारानें ज्या नांवांचा आरंभ होतो, तीं नांवें देखील, उदाहरणार्थ–रत्नें, रथ वगैरे–माझे ठिकाणीं भय उत्पन्न करितात. सारांश, मला त्याचा प्रभाव विदित आहे. त्याच्याशीं युद्ध करणें तुला योग्य नाहीं. फार तर काय, बलीलाहि तो मारील, आणि नमुचि दैत्य जरी आतां उत्पन्न झाला, तरी त्याचाहि रघुनंदन राम वध करील. रावणा, संग्रामांमध्यें तूं रामाशीं युद्ध कर, किंवा क्षमेचें अवलंबन करून स्वस्थ बैस. कारण त्याच्याशीं तूं संग्रामामध्यें युद्ध केलेंस, तर एकट्या तुझाच नाश होऊन बाकीचे तरी राहतील; परंतु हें जें कृत्य तूं मनामध्यें आणिलें आहेस, त्यामुळें सर्व राक्षसकुलाचाच नाश होईल. मला जर जिवंत पाहण्याची तुझी इच्छा असेल, तर तूं रामाची गोष्ट माझ्यापाशीं काढूं नको. कारण त्याचें नांव काढणें हें आमच्या राक्षसांचें तेज नाहींसें करणारें आहे, आणि तेज नाहींसें होणें ही अवस्था मरणापेक्षांहि दुःखदायक आहे. जगतामध्यें धर्मानुष्ठान केलेले असे पुष्कळ निरुपद्रवी व जितेंद्रिय पुरुष दुसऱ्याच्या अपराधामुळें सपरिवार नाश पावलेले आहेत. तेव्हां दुसऱ्याच्या अपराधामुळें नाश पावण्याचा मला प्रसंग येणार आहे. तस्मात् रावणा, तुला जें योग्य दिसेल, तें तूं कर. मी तुझें अनुकरण करणार नाहीं. कारण राम महातेजस्वी, महाबुद्धिमान आणि महाबलाढ्य असल्या-

मुळें राक्षसांचा निःसंशय घात करून टाकील. आतां शूर्पणखेकरितां मर्यादेचें उल्लंघन करून खर पूर्वीं जनस्थानांत गेला असल्यामुळें अप्रतिहत पराक्रम करणाऱ्या रामानें त्याचा वध केला, ह्यांत रामाचा काय अपराध झाला, हें तूंच एकदां खरें खरें सांग. असो. बांधवांचें हित व्हावें ह्या उद्देशानें मी करीत असलेल्या ह्या भाषणाचा जर तूं अंगीकार केला नाहींस, तर सरळ जाणाऱ्या बाणांच्या योगानें रामाच्या हातून संग्रामामध्यें आजच वध पावून तूं बांधवां-सहवर्तमान जीविताचा त्याग करशील."

सर्ग चाळिसावा.

रावणाची मारीचाला आज्ञा.

मरणाची इच्छा करणाऱ्या पुरुषाला ज्याप्रमाणें औषध घेण्यास सांगितलें असतांहि तो घेत नाहीं, त्याप्रमाणें मारीचाचें तें भाषण योग्य व सयुक्तिक असतांहि रावणानें स्वीकारिलें नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु पथ्यकारक आणि हितावह असें भाषण करणाऱ्या मारीचाला तो राक्षसाधिपति रावण कालाची प्रेरणा झाल्यामुळें अयोग्य आणि मर्मभेदक शब्दांनीं बोलूं लागला.

रावण म्हणतोः—"मारीचा, हे कुलहीना, उखीर जमिनीमध्यें पेरिलेलें बीं ज्याप्रमाणें अगदीं निष्फल होऊन जातें, त्याप्रमाणें ज्यांतील अर्थ मुळींच अयोग्य आहे, असा हा निष्फल उपदेश तूं मला करीत आहेस. परंतु मूर्ख, दुःशील आणि विशेषतः मनुष्य असा जो राम त्याच्याशीं भार्याहरणरूप संग्राम करण्याविषयीं निश्चित झालेला मी तुझ्या भाषणांनीं त्या निश्चयापासून निवृत्त होणें शक्य नाहीं. स्त्रीचें क्षुल्लक वचन ऐकून जो सुहृद्‌ राज्य, माता आणि पिता ह्यांचा त्याग करून एकदम वनामध्यें गेला, त्या संग्रामामध्यें खराचा वध करणाऱ्या रामाची प्राणापेक्षांहि प्रिय असलेली भार्या मी तुझ्यासमक्ष हरण करणार. मारीचा, ह्याप्रमाणें मनामध्यें जो माझा पक्का निश्चय झालेला आहे, तो इंद्रासहवर्तमान देवदैत्यांच्यानींहि ढळणें शक्य नाहीं. ह्या कार्याचा निर्णय करण्यासंबंधानें दोष अथवा गुण किंवा अपाय अथवा उपाय जर मीं तुला विचारिला असतां, तर ह्याप्रमाणें सांगणें तुला योग्य होतें. ज्या विचारी सचिवाला आपल्या अभ्युदयाची इच्छा असेल, त्यानें प्रश्न झाल्यावर

हात जोडून सांगावें. राजाला शुभ, हितावह, योग्य आणि अनुकूल असेंच भाषण मार्दवपूर्वक आदरानें राजाशीं करावें लागतें. राजाचा उपमर्द करणारें आणि मानहीन असें भाषण हितकारक जरी कोणी करूं लागला, तरी मानी राजा त्याला मान डोलविणार नाहीं. अचिंत्यसामर्थ्यवान राजे, अग्नि, इंद्र, सोम, यम आणि वरुण ह्या पांच लोकपालांचीं पांच रूपें धारण करीत असतात. सारांश, हे राक्षसा, तीक्ष्णपणा, पराक्रम, सौम्यता, दुष्टनिग्रह आणि प्रसन्नता हे पांच लोकपालांचे पांच गुण महात्मे राजे धारण करीत असतात. तस्मात् कोणतीहि अवस्था प्राप्त झाली तरी राजे हे नेहमीं मान्य व पूज्य आहेत; परंतु तूं केवळ मोहग्रस्त झाल्यामुळें राजधर्म न जाणून मी आलों असतां दुष्ट स्वभावामुळें अशा प्रकारचें मर्मभेदक भाषण माझ्याशीं करीत आहेस. हे राक्षसा, माझ्या अंगीं गुणदोष काय आहेत, हें मी तुला विचारीत नाहीं. हे अमितपराक्रमी मारीचा, ह्या कृत्यामध्यें तूं साहाय्य कर, येवढेंच मीं तुला विचारिलें आहे. सहाय्य करण्यामध्यें तूं काय काम करावयाचें, हें पाहिजे तर आणखी एकदां मी सांगतों, ऐक. रौप्य बिंदूंनीं युक्त असा अद्भुत सुवर्णमय मृग होऊन तूं त्या रामाच्या आश्रमामध्यें सीतेसमोर चालूं लाग, आणि सीतेला लुब्ध करून मग वाटेल तिकडे जा. सुवर्णमृगरूप धारण केलेल्या तुज मायावी राक्षसाला अवलोकन केल्यावर सीतेला विस्मय वाटेल, आणि 'ह्या मृगाला घेऊन या' असें ती रामाला लगेच म्हणेल. नंतर राम तेथून निघून गेला असतां तूंहि दूर जाऊन 'हे सीते, हे लक्ष्मणा,' अशा रामाच्या शब्दाला जुळण्यासारख्या हांका मार; म्हणजे त्या हांका ऐकून सीता रामाच्या शोधाला जाण्याविषयीं लक्ष्मणाला सांगेल, आणि भ्रातृप्रेमामुळें लक्ष्मणहि घाबरून त्याच्या मागोमाग जाईल. ह्याप्रमाणें राम आणि लक्ष्मण तेथून निघून गेले म्हणजे शचीला हरण करणाऱ्या इंद्राप्रमाणें मी सीतेला खुशाल हरण करून आणीन. तस्मात्, अशा रीतीनें हें कार्य करून हे राक्षसा, तूं पाहिजे तिकडे जा. हे सुव्रता मारीचा, मी तुला अर्धें राज्य देईन. म्हणून हे सत्त्वस्था, ह्या कार्याच्या सिद्धीकरितां तूं निर्विघ्नपणें आतां मार्गाला लाग. मी रथासहवर्तमान तुझ्या मागोमाग दंडकारण्यामध्यें येतों. रामाला फसवून युद्धावांचूनच सीता प्राप्त झाल्यावर मी तुझ्यासहवर्तमान कृतकृत्य होऊन लंकेला परत जाईन. हे मारीचा, ह्याप्रमाणें जर न वागशील, तर मी आजच तुझा वध करून टाकितों. माझ्या बलात्कारानें कां होईना, हें कार्य तुला अवश्य केलेंच पाहिजे. कारण राजाशीं प्रतिकूल वागणा-

त्याला कधींहि सुख प्राप्त होत नाहीं. सारांश, रामाशीं प्रसंग आणिल्यानें तुझ्या जीविताचा संशय आहे; परंतु माझ्याशीं विरुद्ध वागल्यानें तर आज तुझा मृत्यु निश्चितच झाला आहे. तेव्हां ह्याचा पूर्णपणें विचार करून ह्या दोहोंपैकीं जें तुझ्या हिताचें वाटेल, तें तूं आपल्या इच्छेप्रमाणें कर.

सर्ग एकेचाळिसावा.

मारीचाचें रावणाला उत्तर.

ह्याप्रमाणें राजालाच योग्य अशी प्रतिकूल आज्ञा रावणानें केली असतां तो मारीच निःशंकपणें त्या राक्षसाधिपतीशीं पुनः मर्मभेदकच भाषण करूं लागला. "हे निशाचरा, कोणत्या पापकर्मी पुरुषानें पुत्र आणि राज्य ह्यांसहवर्तमान तुझा नाश होण्याचा तुला हा उपदेश केला आहे? राजा, तूं सुखी राहिल्यानें कोणत्या पापकर्मी पुरुषाला बरें वाटत नाहीं? अरे, उपाय म्हणून हें मृत्यूचें द्वार तुला कोणी दाखवून दिलें आहे? रावणा, तुझे कोणी शत्रू आहेत, परंतु वीर्यानें तुझ्यापेक्षां ते निःसंशय कमी असल्यामुळें बलिष्ठ शत्रूच्या तावडींत सांपडून तुझा नाश होतांना पाहण्याची ते इच्छा करीत आहेत. अरे, स्वतः योजिलेल्या उपायानें तुझा नाश होत असतांना पाहण्याची इच्छा करणाऱ्या कोणत्या दुष्टबुद्धि क्षुद्र पुरुषानें तुला उपदेश केला आहे? तूं उन्मार्गाचा स्वीकार केला असतांना सर्व प्रकारांनीं जे तुझा निग्रह करीत नाहींत, त्या सचिवांचा खरोखर वध करणेंच तुला योग्य असून तूं त्यांचा वध करीत नाहींस! राजानें स्वेच्छाचारी होऊन कुमार्गाचें अवलंबन केलें असतां चांगल्या अमात्यांनीं त्याचा सर्व प्रकारें निग्रहच केला पाहिजे; परंतु तुला ताब्यांत ठेवणें योग्य असतांनाहि कोणी अमात्य तुझा निग्रह करीत नाहींत. हे विजयिश्रेष्ठ निशाचरा, प्रभूचें आचरण शुद्ध असलें म्हणजे धर्म, अर्थ, काम आणि यश हीं सचिवांना प्राप्त होतात; परंतु रावणा, प्रभूचें आचरण जर उलट असेल, तर तें सर्व व्यर्थ होतें. इतर लोकांनाहि प्रभूच्या दोषामुळें संकट प्राप्त होतें. हे विजयिश्रेष्ठा, धर्म आणि यश हीं राजावरच अवलंबून असल्यामुळें, कोणत्याहि अवस्थेमध्यें मंत्र्यांनीं राजाचें रक्षणच केलें पाहिजे. हे निशाचरश्रेष्ठा, क्रूर, उद्धट आणि प्रजानांना फारच प्रतिकूल अशा राजाच्या हातून राज्याचें परिपालन होणें शक्य नाहीं. मंदबुद्धि सारथि ज्या रथांवर आहेत, असे रथ आडनीड प्रदेशावरून

जाऊं लागले असतां ज्याप्रमाणें सारथ्यांसहवर्तमान सत्वर नाश पावतात, त्याच-प्रमाणें तीक्ष्ण उपाय योजण्याची मसलत देणारे मंत्री त्या राजासहवर्तमान त्या मसलतीचें नाशरूप फल लवकरच भोगितात. धर्मानें वागणारे असे कित्येक निरुपद्रवी लोक ह्या जगतामध्यें दुसऱ्यांच्या अपराधामुळें बांधवादिकांसह नाश पावलेले आहेस. व्याध रक्षण करीत असतांना ज्याप्रमाणें मृग वृद्धिंगत होत नाहींत, त्याचप्रमाणें प्रतिकूल आणि उग्र असा राजा रक्षण करीत असतांना प्रजेची भरभराट होत नाहीं. रावणा, निर्दय, दुष्टबुद्धि आणि अजितेंद्रिय असा तूं ज्यांचा राजा आहेत, त्या सर्व राक्षसांचा खचित नाश होईल. सारांश, तुझ्यापासून मृत्यु येण्याचें हें घोर संकट जरी मला आज एकाएकीं प्राप्त झालें आहे, तरी जन्मास आलेला प्राणी केव्हां तरी मरावयाचाच आहे, असा विचार मनांत येऊन त्याबद्दल मला वाईट वाटत नाहीं; परंतु ह्या करण्यामध्यें सैन्यासह-वर्तमान तुझा नाश होणार, म्हणून तुझ्याबद्दल मला वाईट वाटत आहे. असो. हा राम प्रथम माझा वध करून नंतर लवकरच तुझा वध करील. तेव्हां आतां तुझ्या हातून मरण्यापेक्षां रणामध्यें ह्या शत्रूच्या हातून वध झाला असतां मी कृतकृत्य तरी होईन. रामाचें मला दर्शन झालें कीं, मी मेलोंच असें तूं समज; आणि तूं सीतेला हरण केलीस, म्हणजे तुझाहि बांधवांसहवर्तमान वध झालाच, हें तूं समजून ठेव. माझ्यासहवर्तमान तूं जर आश्रमांतून सीतेला हरण करून आणिशील, तर मीहि जिवंत राहाणार नाहीं, तूंहि कायम राहात नाहींस, लंकाहि जाग्यावर राहात नाहींत आणि राक्षसहि हयात राहात नाहींत. हे निशाचरा, तुझें हित इच्छिणारा मी तुला नको नको म्हणत असतांना ह्या माझ्या सांगण्याची तूं पर्वा करीत नाहींस. तेव्हा आयुष्य संपून मृतप्राय झालेले पुरुष सुहृदांनीं सांगितलेला हितकारक उपदेश स्वीकारीत नाहींत, हेंच सत्य आहे."

सर्ग बेचाळिसावा.

रावण व मारीच यांचें रामाश्रमीं गमन.

ह्याप्रमाणें रावणाला मर्मभेदक भाषण केल्यानंतर मारीच दीन होऊन त्या राक्षसाधिपतीच्या भीतीनें त्याला म्हणाला, " आपण जाऊं; परंतु बाण, धनुष्य आणि खड्ग धारण केलेल्या रामानें मला पुनरपि अवलोकन केलें, म्हणजे वधाकरितां शस्त्र उचलिल्या त्या रामाच्या हातून माझ्या जीविताचा

नाश होणार, हें ठरलेलेंच आहे. कारण रामावर चाल करून गेल्यानंतर कोणीहि जिवंत परत फिरत नाहीं. तेव्हां यमदंडाचा प्रहार झालेल्या तुझा हा राम प्रतियमदंडच आहे, असें मला वाटतें. तूं हा असा दुष्ट असतांना माझ्या हातून दुसरें काय होणें शक्य आहे? तस्मात् हा मी निघालों; बा निशाचरा, तुझें कल्याण असो."

ह्या मारीचाच्या भाषणानें त्या रावणाला हर्ष झाला, आणि मारीचाला अगदीं कडकडून भेटून तो म्हणाला, "माझ्या इच्छेप्रमाणें वागणाऱ्या तुझें हें भाषण वीर्याला शोभण्यासारखें आहे, व तूं आतां मारीच आहेस, असें मला दिसत आहे. पूर्वी दुसराच कोणी राक्षस तुझ्या अंगांत आला होता. आतां पिशाचा-सारख्या मुखांनीं युक्त असलेले गर्दभ ज्याला जोडिलेले आहेत, अशा ह्या रत्नविभूषित आकाशगामी रथावर माझ्यासहवर्तमान तूं सत्वर आरूढ हो. विदेहराजकन्या सीतेला लुब्ध केल्यावर मग तूं पाहिजे तिकडे जा. आश्रम शून्य झाल्यावर मी ती मिथिलाधिपतीची कन्या सीता बलात्कारानें हरण करून आणीन."

ह्याप्रमाणें रावणानें सांगितलें असतां मारीच 'ठीक आहे' असें म्हणाला. तदनंतर विमानाप्रमाणें आकाशांतून संचार करणाऱ्या त्या रथामध्यें रावण व मारीच हे आरूढ होऊन त्या आश्रममंडलांतून सत्वर निघून गेले. जातां जातां शहरें, वनें, पर्वत, सर्व नद्या, राष्ट्रें आणि राजधान्या अवलोकन करीत करीत ते चालले. नंतर दंडकारण्यामध्यें आल्यावर मारीचासहवर्तमान त्या राक्षसाधि-पति रावणानें रामाचा आश्रम अवलोकन केला. नंतर त्या रथांतून खालीं उतरल्यावर मारीचाचा हात धरून रावण त्याला म्हणाला, 'केळींनीं व्याप्त झालेला हा रामाचा आश्रम दिसत आहे. तस्मात् मित्रा, ज्याकरितां आपण येथें आलों आहों, तें कार्य कर.'

मारीचाचें मृगरूप.

हें रावणाचें भाषण श्रवण केल्यावर मारीच राक्षस मृगरूप धारण करून रामाच्या आश्रमाच्या द्वारांत संचार करूं लागला. पाहाणाऱ्याला मोठें आश्चर्य वाटावें, असें रूप त्यानें धारण केलेलें होतें. त्याच्या शृंगांचीं अग्रें उत्कृष्ट रत्नांचीं होतीं. मुखाची आकृति कोठें पांढरी व कोठें काळी होती. मुख आरक्तवर्ण व नीलवर्ण कमलासारखें होतें. कान इंद्रनील अथवा नीलकमल ह्याप्रमाणें होते. मान किंचित् वर केलेली होती. उदराची कांति इंद्रनील मण्यासारखी होती. बरगड्यांचा वर्ण मोहाच्या फुलासारखा दिसत होता. हरि-

राचा वर्ण कमलाच्या पगारासारखा होता. खूर वैदूर्य मण्यासारखे दिसत होते. पोटऱ्या बारीक होत्या. बांधा मजबूत होता. इंद्रधनुष्यासारखा ज्याचा वर्ण आहे, अशा पुच्छानें त्याला शोभा आलेली होती. शरीर मनोहर व तुळतुळीत होतें, आणि नानाप्रकारच्या रत्नांनीं तो व्याप्त झाल्यासारखा दिसत होता. सारांश, एका क्षणामध्यें तो राक्षस पराकाष्ठेचा उत्कृष्ठ मृग बनून तें रम्य वन आणि तो रमणीय रामाश्रम प्रकाशित करूं लागला. सीतेला लुब्ध करण्याकरितां वृक्षांचे अंकुर व कोमल तृण भक्षण करीत करीत तो हिंडूं लागला. नंतर वेळीच्या आश्रमांत जाऊन आणि सीता दृष्टीस पडावी ह्या उद्देशानें मंदगतीचें अवलंबन करून कमलासारख्या अद्भुत पृष्ठभागानें युक्त असलेला तो महामृग कर्णिकार वृक्षांतून इकडे तिकडे झळकूं लागला. रामाश्रमासमीप तो यथेष्ठ संचार करूं लागला. एकवार आश्रम सोडून गेल्यावर पुनरपि तो परत येऊन हिंडूं लागला. क्षणांत आश्रम सोडून जाऊन पुनरपि तो परत येऊं लागला, आणि पुनरपि क्रीडा करूं लागून पुनरपि भूमीवर बसूं लागला. आश्रमाच्या द्वाराशीं येऊन हरिणांच्या कळपांकडे जाऊं लागला, आणि पुनरपि त्या मृगांच्या कळपांसहवर्तमान परत येऊं लागला. मृगरूप धारण केलेला तो राक्षस सीतेची दृष्टि आपल्याकडे जावी, अशी इच्छा धरून आश्चर्यकारक मंडलावर उड्या मारीत मारीत हिंडूं लागला. तेव्हां त्या वनामध्यें संचार करणारे जे दुसरे मृग होते, ते सर्व त्याच्याकडे पाहून जवळ येऊं लागले, आणि वास घेऊन दशदिशा पळूं लागले. परंतु तो राक्षस जरी मृगवधाविषयीं तत्पर असे, तरी आपलें स्वरूप गुप्त राखण्याकरितां स्पर्शास्पर्श झाला असतांहि त्या वन्य मृगांना भक्षण करीत नसे.

सीतेला मृगदर्शन.

शुभ नेत्रांनीं युक्त असलेली विदेहकन्या सीता त्याच वेळीं पुष्पें तोडण्यामध्यें गर्क होऊन झाडांखालून चालली होती. आरक्तवर्ण नेत्र व सुंदर मुख ह्यांनीं युक्त असलेली ती सीता कर्णिकार, अशोक आणि आम्र ह्या वृक्षांचीं फुलें तोडीत तोडीत चालली. जातां जातां वनवासाची लहानपणापासून संवय नसलेल्या त्या उत्कृष्ठ स्त्रीनें मोत्यें आणि हिरे ह्यांच्या योगानें ज्याचें शरीर अद्भुत दिसत आहे, असा तो रत्नमय मृग अवलोकन केला. मनोहर दंत आणि ओष्ठ व रुप्याचे केश ह्यांनीं युक्त असलेल्या त्या मृगाकडे आश्चर्ययुक्त व प्रफुल्लित नेत्रांनीं ती पाहूं लागली. तेव्हां त्या रामप्रियेला अव-

लोकन केल्यावर तो मायामय मृग तें वन प्रकाशित करीतच कीं काय तेथें संचार करूं लागला. तेव्हां पूर्वी कधींहि न पाहिलेला असा तो अनेक रत्नमय मृग अवलोकन करून जनककन्या सीतेला पराकाष्ठेचा विस्मय झाला.

सर्ग त्रेचाळिसावा.

सीतेचा मृगाविषयीं हट्ट.

सुवर्ण आणि रौप्य या वर्णांनीं युक्त असलेल्या बरगड्यांनीं सुशोभित असलेल्या त्या मृगाला अवलोकन करून उत्कृष्ट कटि, निर्दोष अवयव व शुद्ध सुवर्णासारखी कांति ह्यांनीं युक्त असलेली ती सीता फुलें तोडितां तोडितां आनंदित झाली, व आयुधांसहवर्तमान लक्ष्मणाला व भर्त्या रामाला हांका मारूं लागली, आणि 'हे आर्यपुत्रा, कनिष्ठ भ्रात्यासहवर्तमान इकडे या, इकडे या' अशा हांका मारून मारून पुनरपि ती त्या मृगाकडे टक लावून पाहूं लागली. तेव्हां सीतेनें हांक मारिल्यावर पुरुषश्रेष्ठ राम-लक्ष्मण त्या प्रदेशाकडे पाहूं लागले असतां तो मृग त्यांनीं अवलोकन केला, आणि त्या मृगाला अवलोकन करितांक्षणीं लक्ष्मण साशंक होऊन म्हणाला, "हाच तो मृगरूप धारण करणारा मारीच राक्षस असावा, असें मला वाटतें. रामा, आनंदानें राजे मृगया करीत असतांना ह्याच पापरूपी दुष्टानें कपट करून त्यांचा वध केलेला आहे. हे पुरुषश्रेष्ठा, गंधर्वनगरासारखें वरून रमणीय आणि प्रकाशयुक्त असें जें यानें हें मृगरूप धारण केलें आहे, ती ही ह्या मायावी राक्षसाची माया आहे. कारण राघवा, अशा प्रकारच्या रत्नांच्या योगानें चित्रविचित्र असलेला मृग पृथ्वीमध्यें नाहीं. तस्मात् हे पृथ्वीपते, ही निःसंशय ह्याची माया आहे."

ह्याप्रमाणें ककुत्स्थकुलोत्पन्न लक्ष्मण बोलत असतांना मारीच राक्षसाच्या कपटाचें भान न राहिल्यासारखी झालेली ती सुहास्यवदना सीता आनंदित होऊन व लक्ष्मणाचा निषेध करून म्हणाली, "आर्यपुत्र, हा सुंदर मृग माझें मन हरण करीत आहे. ह्यास्तव हे महापराक्रमसंपन्न, ह्याला आपण घेऊन या. आपल्या करमणुकीला हा उपयोगी पडेल. ह्या आपल्या आश्रमामध्यें मनोहर आकृतींनीं युक्त असे चमर, सूमर वगैरे अनेक प्रकारचे मृग एकत्र संचार करीत असतात. हे महापराक्रमसंपन्न, अस्वलें, पृषत मृगांचे कळप, वानर

आणि रूपश्रेष्ठ असे महाबलाढ्य किन्नर विहार करीत असतात. हे भूपते, तेज, सौम्यपणा आणि देहकांति ह्यांच्या योगानें ह्या श्रेष्ठ मृगासारखा मृग पूर्वी मीं कधीं अवलोकन केलेला नाहीं. नानाप्रकारच्या वर्णांनीं ज्याचें शरीर चित्रविचित्र झालें आहे, असा हा रत्नमय मृग हें वन पूर्णपणें प्रकाशित करीत असून ह्याची प्रभा चंद्रासारखी आल्हादकारक आहे. कायहो हें स्वरूप, कायहो ही प्रभा, आणि किती तरी हे हा उत्कृष्ट शब्द ! चित्रविचित्र शरिरानें युक्त असलेला हा अद्भुत मृग माझें मन हरण करीत आहे. हा मृग जर जिवंत आपल्या हातीं लागेल, तर तो आश्चर्यरूप होऊन विस्मय उत्पन्न करील. वनवास संपूर्ण होऊन आपण पुनरपि राज्यावर जाऊन बसलों असतां अंतःपुरामध्यें शोभेकरितां हा मृग उपयोगीं पडेल. हे प्रभो, भरताला, आर्यपुत्राला आणि माझ्या सासवांना हें दिव्य मृगरूप विस्मय उत्पन्न करील. हे पुरुषश्रेष्ठ, हा उत्कृष्ट मृग जर जिवंत हातीं लागला नाहीं, तर ह्याचें अजिन मनोहर होईल. ह्या मृगाचा वध करून ह्याच्या सुवर्णमय अजिनावर गवती आसन पसरून त्याच्यावर बसण्याची माझी इच्छा आहे. आपल्या कामाकरितां पतीला आज्ञा करणें हें वर्तन स्त्रियांना अयोग्य व भयंकर आहे, असें जरी मी समजत आहें, तरी ह्या प्राण्याचें शरीर पाहून मला विस्मय उत्पन्न झाला आहे. कारण त्याचे केश सुवर्णाचे असून कांति नक्षत्रांनीं व्याप्त झालेल्या आकाशासारखी दिसत आहे."

रामाचें मृगहननार्थ गमन.

ह्याप्रमाणें सीतेचें भाषण श्रवण करून व तो अद्भुत मृग अवलोकन करून रामाचेंहि मन विस्मित झालें ! तेव्हां सीतेनें प्रेरणा केलेला व त्या रूपाला लुब्ध झालेला तो राम आनंदित होऊन भ्रात्या लक्ष्मणाला म्हणाला, "लक्ष्मणा, वैदेहीला उत्पन्न झालेली ही इच्छा अवलोकन कर. ह्याचें रूप श्रेष्ठ असल्यामुळें हा मृग आज जिवंत राहात नाहीं. नंदनवनामध्यें अथवा चैत्ररथ वनामध्येंहि ह्या मृगासारखा मृग नाहीं. मग लक्ष्मणा, पृथ्वीवर तर कोठून असणार ! सुवर्णबिंदूंनीं चित्रविचित्र अशा ह्या मृगाचा आश्रय करून असलेल्या उलट सुलट रोमपंक्ति मनोहर दिसत आहेत. हा जांभया देऊं लागला असतां त्याच्या मुखांतून बाहेर निघणारी, मेघांतून निघणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणें दिसणारी अग्निज्वालेसारखी देदिप्यमान जिव्हा तूं अवलोकन कर. इंद्रनील मण्याच्या पानपत्रांच्या आकृतीसारखें ज्याचें मुख आहे व शंख आणि मोत्यें ह्यासारखी ज्याच्या उदराची कांति आहे, असा हा अनिर्वचनीय मृग कोणाचें

मन लुब्ध करणार नाहीं ? सुवर्णमय कांतीनें युक्त आणि नानाप्रकारच्या रत्नांनीं भरलेलें असें हें दिव्य रूप अवलोकन करून कोणाच्या बरें मनाला विस्मय वाटणार नाहीं ? लक्ष्मणा, मांसाकरितां आणि करमणुकीकरितां धनुर्धारी राजे महावनामध्यें मृगया करीत असतांना मृगांचा वध करितात; आणि महावनामध्यें हिरे, रत्नें, सुवर्ण इत्यादिकांसहवर्तमान नानाप्रकारचे धातु हें द्रव्य राजे गोळा करीत असतात. तस्मात् लक्ष्मणा, ब्रह्मरूप बनलेल्या पुरुषाला इच्छामात्रानें सिद्ध झालेल्या सर्व भोग्य वस्तु ज्याप्रमाणें सर्व द्रव्यांपेक्षां श्रेष्ठ वाटत असतात, त्याचप्रमाणें कोशाची अभिवृद्धि करणारें हें वनांतील संपूर्ण धन पुरुषांना अत्यंत प्रशस्त वाटत असतें. अर्थ संपादन करणें हें कर्तव्यकर्म आहे, असें समजून ज्याच्या प्राप्तीकरितां अर्थेच्छु पुरुष विचार न करितांच चालता होतो, त्याला अर्थ संपादन करण्याविषयीं चतुर असलेले अर्थशास्त्रवेत्ते ‘ अर्थ ’ असें म्हणतात. तेव्हां ह्या श्रेष्ठ मृगाच्या उत्कृष्ठ सुवर्णमय अजिनावर सुंदरी सीता माझ्यासहवर्तमान बसेल. कदलीसंज्ञक मृग, प्रियकीसंज्ञक मृग, बोकड अथवा मेंढ्या ह्यांपैकीं कोणाचेंहि अजिन ह्या मृगाच्या अजिनासारखें मृदु नाहीं, असें मला वाटतें. हा श्रीमान मृग आणि आकाशामध्यें संचार करणारा मृगनक्षत्ररूप दिव्य मृग असे तारामृग व भूमृग हे दोनच दिव्य मृग आहेत. आतां लक्ष्मणा, ही राक्षसाची माया आहे, असें जें तूं मला म्हणत आहेस, त्याप्रमाणें जर हा असेल, तर ह्याचा वध मला कर्तव्यच आहे. कारण ह्या इंद्रियाधीन असलेल्या दुष्ट मारीचानें वनामध्यें संचार करितां करितां पूर्वीं मुनिश्रेष्ठांचा वध केला आहे. मृगयेमध्यें अनेक महाधनुर्धारी राजे ह्यानें प्रादुर्भूत होऊन मारिले आहेत. तस्मात् ह्या प्राण्याचा वध केलाच पाहिजे.”

राम म्हणतात:—“ लक्ष्मणा, स्वतःच्या उदरांत असलेला गर्भ ज्याप्रमाणें खेचरीचा वध करितो, त्याप्रमाणें उदरामध्यें असलेल्या वातापीनें ह्या ठिकाणीं पूर्वीं असंख्य ब्राह्मणांचा फसवून वध केला आहे. असें होतां होतां पुष्कळ दिवस झाल्यावर त्या वातापीची तेजस्वी अगस्त्य महर्षींशीं गांठ पडली, आणि तो त्यांचें भक्ष्य झाला. तदनंतर श्राद्ध समाप्त होऊन ब्राह्मण उठण्याचे वेळीं आपलें राक्षसरूप प्रकट करण्याची तो वातापि इच्छा करीत आहे, असें आढळून आल्यावर भगवान अगस्त्य मुनि किंचित् हंसून त्याला म्हणाले, ‘ हे वातापे, तूं पापाचा विचार न करितां ह्या जगतामध्यें स्वसामर्थ्यानें श्रेष्ठ ब्राह्मणांचा वध केला आहेस, आणि म्हणूनच तूं आतां जिरून गेला आहेस. ’ तेव्हां

जितेंद्रिय राहून नेहमीं धर्मानें वागणाऱ्या माझ्यासारख्यांचेंहि अतिक्रमण करणाऱ्या ह्या मारीच राक्षसाचा अगस्त्य मुनींच्या हातून वध पावलेल्या वातापीप्रमाणें माझ्या हातून वध होईल. सारांश, अगस्त्यांच्या हातून ज्याप्रमाणें वातापीचा वध झाला, त्याप्रमाणें माझ्याकडे आलेल्या ह्या मारीचाचा वध होईल. लक्ष्मणा, तूं येथें सज्ज रहा, आणि प्रयत्नपूर्वक सीतेचें रक्षण कर. हे रघुनंदना, आम्हांला जें करावयाचें आहे, तें सर्व सीतेवर अवलंबून आहे. तेव्हां मी ह्या मृगाचा वध तरी करीन, किंवा ह्याला जिवंत तरी धरून आणीन. हे सुमित्रानंदना, मी मृग आणण्याकरितां सत्वर जातों. कारण लक्ष्मणा, कृष्णाजिनासंबंधानें सीतेला इच्छा झाली आहे, तिकडे तूं लक्ष्य दे. श्रेष्ठ त्वचेमुळें आज हा मृग जिवंत राहाणार नाहीं. सीतेसहवर्तमान तूं ह्या आश्रमामध्यें राहा. मी एका बाणानें ह्या पृषतसंज्ञक मृगाचा वध करीन, आणि ह्याचें कातडें घेऊन लवकर परत येईन. फारच सरळ आणि अतिबलाढ्य अशा ह्या बुद्धिमान जटायु पक्ष्यासहवर्तमान सीतेला ताब्यांत घेऊन आणि प्रतिक्षणीं सर्व बाजूंनीं राक्षसांविषयीं शंकित होऊन तूं सावध राहा."

सर्ग चव्वेचाळिसावा.

मृगहनन.

ह्याप्रमाणें लक्ष्मणाला सांगून महातेजस्वी रामानें सोन्याची मूठ लाविलेला एक खड्ग घेतला. तदनंतर तीन ठिकाणीं बांक असलेले आणि स्वतःला भूषण असलेलें असें धनुष्य हातांत घेऊन व दोन भाते पाठीशीं बांधून तो उत्कृष्ठ पराक्रम करणारा राम निघाला. परंतु तो वनमृगांचा राजा मारीच मागोमाग येत असलेल्या त्या राजाधिराज रामाला अवलोकन करून भीतीनें वारंवार अदृश्य व दृश्य होऊं लागला. जिकडे मृग तिकडे खड्ग लटकावून व धनुष्य हातांत घेऊन राम धावत चालला असतां रूपाच्या योगानें झळकणारा मृग पुढेंच असलेला त्यानें अवलोकन केला. फिरून फिरून मागें पाहून महावनामध्यें धावत असलेल्या त्या मृगाला धनुर्धारी रामानें अवलोकन केलें. केव्हां केव्हां तो मृग उडीमुळें टप्प्यांतून गेल्यासारखा दिसत असे. केव्हां केव्हां अगदीं जवळ आल्यासारखा दिसून रामाचे ठिकाणीं लोभ उत्पन्न करीत असे. केव्हां

केव्हां बाण लागेल ह्या भीतीनें शंकित झाल्यासारखें दर्शवी. केव्हां केव्हां बेफाम होऊन आकाशामध्यें उंच उंच उड्या मारी, आणि केव्हां केव्हां कांहीं वनप्रदेशामध्यें दृश्य व अदृश्य होत असे. विस्खलित ढगांनीं व्याप्त केलेल्या शरदृतूंतील चंद्रमंडलाप्रमाणें तो मृग क्षणामध्यें दिसूं लागे, आणि क्षणामध्यें फारच दूर जाऊन वारंवार झळकूं लागे.

असो. मृगरूप धारण केलेला तो मारीच राक्षस ह्या आश्रमापासून दूर गेल्यावर वारंवार दृश्य व अदृश्य होण्याच्या योगानें त्यानें रामाला आपल्या मागोमाग दूर ओढीत नेलें. तदनंतर त्या मृगापुढें अगदीं निरुपाय होऊन कांहींएक सुचेनासें झालेला तो ककुत्स्थकुलोत्पन्न राम अतिशय क्रुद्ध झाला, आणि फारच थकून गेल्यामुळें छायेचा आश्रय करून कोमल तृणावर बसला. नंतर त्या मृगरूप राक्षसानें त्याला पुनरपि भ्रमात पाडिलें, आणि इतर मृगांनीं परिवेष्टित झालेला तो मृग लांब दृष्टीस पडूं लागला. तदनंतर तो राम आपल्याला धरणार, असें अवलोकन करून तो पुनरपि पुढें पळाला, भीतीमुळें तत्क्षणीं गुप्त झाला, आणि तेथून दूर असलेल्या वृक्षसमुदायांतून पुनरपि बाहेर पडला. तेव्हां त्याला अवलोकन करून महातेजस्वी रामानें त्याचा वध करण्याचा निश्चय केला. नंतर क्रुद्ध झालेल्या बलाढ्य रामानें सूर्यकिरणांप्रमाणें उज्ज्वल असा एक शत्रुनाशक बाण भात्यांतून काढून तो नीट धनुष्याला लावून जोरानें धनुष्य खेंचिलें, आणि देदीप्यमान सर्पाप्रमाणें असलेला तो ब्रह्मदत्त बाण उज्ज्वल व देदीप्यमान अशा ब्रह्मास्त्रानें अभिमंत्रण करून रामानें त्या मृगावर सोडिला. तेव्हां त्या वज्रप्राय उत्कृष्ठ बाणानें मृगरूप मारीच राक्षसाला अतिशय वेध करून त्याचें हृदय फोडून टाकिलें असतां अत्यंत व्याकुळ झालेला तो मारीच एक ताड उडी मारून खालीं पडला. नंतर मरणाच्या बेतांत आलेला तो मारीच पृथ्वीवर भयंकर गर्जना करूं लागला. मरतां मरतां त्या मारीचानें त्या कृत्रिम रूपाचा त्याग केला. इतक्यांत रावणाच्या भाषणाचें त्याला स्मरण झालें, व आपण कोणता उपाय योजिला असतां सीता लक्ष्मणाला इकडे पाठवून देईल, आणि शून्य आश्रमामध्यें जाऊन रावणाला तिला धरून नेतां येईल, याविषयीं त्यानें विचार केला. तेव्हां रावणाच्या भाषणाप्रमाणें वागण्याचा समय आला, असें जाणून 'हे सीते, हे लक्ष्मणा,' असा अगदीं रामासारखा सूर काढून त्यानें आरोळ्या दिल्या. नंतर त्या अनुपम बाणाच्या योगानें ज्याच्या मर्माचा भेद झाला आहे, अशा त्या मृग-

रूपाचा त्याग करून त्यानें राक्षसरूप धारण केलें. प्राण सोडितांना त्या मारीचानें आपलें शरीर फार मोठें केलें. तेव्हां भयंकर मुद्रेनें युक्त, भूमीवर पडलेला आणि रक्ताचा सडा अंगावर होऊन भूतलावर तडफड करीत असलेला तो राक्षस अवलोकन केल्यावर लक्ष्मणाच्या भाषणाचें स्मरण होऊन रामाला सीतेची आठवण झाली, आणि तो म्हणाला, "लक्ष्मणानें पूर्वी सांगितल्याप्रमाणें ही मारीच राक्षसाची माया उघडकीला आली. आज ह्या मारीचाचा माझ्या हातून वध झाला. आणि 'हे सीते, हे लक्ष्मणा,' असा उच्च स्वरानें आक्रोश करून तो हा राक्षस मृत्यु पावला तेव्हां ह्या आरोळ्या ऐकून सीतेची कशी काय अवस्था होईल? आणि महापराक्रमी लक्ष्मणाची तरी काय अवस्था होऊन जाईल." असा विचार मनांत येऊन धर्मात्म्या रामाच्या अंगावर कांटा आला, आणि खेद झाल्यामुळें त्याला फारच भीति वाटूं लागली. असो.

ह्याप्रमाणें त्या मृगरूप राक्षसाचा वध करून व मरतां मरतां त्यानें केलेली ती गर्जना ऐकून रामानें दुसरा एक पृषत मृग मारिला, आणि त्याचे मांस घेऊन तो राघव जनस्थानाकडे तोंड करून सत्वर चालला.

सर्ग पंचेचाळिसावा.

लक्ष्मणसीतासंवाद व लक्ष्मणाचें रामाकडे गमन.

भर्त्याच्या शब्दासारखा तो दीन शब्द वनामध्यें ऐकून सीता लक्ष्मणाला म्हणाली, "जा, आणि रामाचा काय वृत्तांत आहे, तो पहा. अतिशय व्याकुल होऊन आक्रोश करीत असलेल्या रामाचा शब्द वारंवार माझ्या कानीं येत आहे. ह्यामुळें माझ्या जिवांत जीव नाहीं अथवा माझें मनहि स्वस्थ नाहीं. तेव्हां वनामध्यें ओरडत असलेल्या आपल्या भ्रात्याला संकटांतून तारणें तुम्हांला योग्य आहे. ह्याकरितां त्या शरणार्थी भ्रात्याकडे तुम्ही सत्वर धाव घ्या. सिंहाच्या तावडींत सांपडलेल्या बैलाप्रमाणें तो राक्षसांचे तावडींत सांपडला आहे."

ह्याप्रमाणें सीतेनें जरी लक्ष्मणाला सांगितलें तरी भ्रात्याची आज्ञा लक्ष्यांत आणून तो तेथून गेला नाहीं. तेव्हां जनककन्या क्षुब्ध होऊन त्याला म्हणाली, "लक्ष्मणा, तूं मित्ररूपानें आपल्या भ्रात्याचा शत्रु आहेस. कारण ह्या असल्या अवस्थेमध्येंहि तूं आपल्या भ्रात्याकडे जात नाहींस. लक्ष्मणा, राम नाश पावण्याची तूं माझ्याकरितां इच्छा करीत आहेस, आणि मजविषयीं लोभ

म्हणूनच तूं खरोखर रामाकडे जात नाहींस. रामाचें संकटच तुला प्रिय आहे, असें मला वाटतें. भ्रात्याचे ठिकाणीं तुझें प्रेम नाहीं, आणि म्हणूनच तो महातेजस्वी भ्राता डोळ्यांआड झाला असतांहि तूं निःशंकपणें येथें राहिला आहेस. राम तुला मुख्य असून तूं जर येथें आला आहेस, तर तो राम संकटांत सांपडला असतां मला तरी येथें जिवंत राहून काय करावयाचें आहे?"

ह्याप्रमाणें अश्रू व शोक ह्यांनीं युक्त होऊन व हरिणीप्रमाणें त्रस्त होऊन भाषण करीत असलेल्या त्या सीतेला लक्ष्मण म्हणाला, "हे वैदेहि, पन्नग, असुर, गंधर्व, देव, दानव आणि राक्षस ह्यांच्या हातून तुझ्या भर्त्याचा पराजय होणें निःसंशय अशक्य आहे. हे देवि, देव, मनुष्य, गंधर्व, पक्षी, राक्षस, पिशाच, किन्नर, मृग आणि घोर दानव ह्यांपैकीं इंद्रतुल्य रामाशीं समरांगणामध्यें युद्ध करण्याला समर्थ असा कोणीहि नाहीं. हे कल्याणि, समरांगणामध्यें राम अवध्य आहे. तेव्हां तुला ह्या वनामध्यें एकटी टाकून जाण्याची माझी इच्छा नाहीं. बलाढ्य लोकांच्याहि सामर्थ्यानें त्याच्या बलाचा प्रतिकार होणें शक्य नाहीं. देव आणि ईश्वर ह्यांसहवर्तमान त्रैलोक्यांतील लोक तयार झाले असतांहि त्याच्या सामर्थ्याचें त्यांच्यानें निवारण होणें शक्य नाहीं. तुझें चित्त स्वस्थ असूं दे. तूं संताप सोडून दे. तो श्रेष्ठ मृग लवकरच मारून तुझा भर्ता परत येईल. त्या रामाचा हा स्वर निःसंशय नव्हे. हा कांहीं देवतांचाहि ध्वनि नव्हे. गंधर्वनगरासारखी ही त्या राक्षसाची मिथ्या माया आहे. हे विदेहराजकुलनंदिनि सीते, तूं ठेवीप्रमाणें आहेस, आणि महात्म्या रामानें तुला माझे स्वाधिन केलें आहे. ह्यास्तव तुझा त्याग करण्याची माझी इच्छा नाहीं. खराचा वध होऊन जनस्थानाचा निःपात झाला, ह्यामुळें राक्षस आमच्याशीं वैर धरून आहेत. हिंसेकरितां विहार करणारे राक्षस महावनामध्यें नानाप्रकारचे शब्द उच्चारीत असतात. तेव्हां तूं त्याचा विचार करूं नको."

ह्याप्रमाणें सांगितलें असतांहि सीता क्रुद्ध झाली, आणि डोळे लाल करून सत्यवादी लक्ष्मणाशीं मर्मभेदक भाषण करूं लागली. ती म्हणाली "सज्जनांना अयोग्य अशा दयेचें ढोंग करून माझें रक्षण करणाऱ्या दुष्टा, हे कुलदूषका, मला वाटतें, रामावर मोठें संकट येणें तुला प्रिय आहे; आणि म्हणूनच रामावर संकट आलेलें पाहून तूं अशीं भाषणें करीत आहेस. परंतु लक्ष्मणा, नेहमीं आपलें स्वरूप गुप्त ठेवून वागणाऱ्या तुझ्यासारख्या दुष्ट शत्रूचें ठिकाणीं अशी पापबुद्धि असणें, हें कांहीं आश्चर्य नव्हे. तूं अत्यंत दुष्ट आहेस, आणि माझ्याकरितां

अथवा भरतानें सांगितल्यामुळें आपलें स्वरूप गुप्त ठेवून वनामध्यें असलेल्या एकट्या रामाच्या मागोमाग तूं एकटा आला आहेस; परंतु लक्ष्मणा, तुझा अथवा त्या भरताचा तो मनोरथ सिद्धीस जाणार नाहीं. अरे, नीलकमलाप्रमाणें श्याम-वर्ण आणि कमलपत्रासारख्या नेत्रांनीं युक्त अशा भर्त्या रामाचा उपभोग घेऊन मी आतां परपुरुषाची कशी बरें इच्छा करीन? लक्ष्मणा, मी तुझ्या समक्ष निःसंशय प्राणत्याग करीन. रामावांचून एक क्षणभरहि मी भूतलावर जिवंत राहाणार नाहीं."

अशा प्रकारें अंगावर कांटा आणणारें मर्मभेदक भाषण सीतेनें लक्ष्मणाशीं केलें असतां, तो जितेंद्रिय लक्ष्मण हात जोडून सीतेला म्हणाला, "माते, तुला उत्तर देण्याची माझी इच्छा नाहीं. तूं माझें दैवत आहेस. स्त्रियांचे ठिकाणीं अयोग्य भाषण असणें हेंहि कांहीं मोठें आश्चर्य नव्हे. ह्या लोकांमध्यें स्त्रियांचा हा स्वभावच दिसत आहे. स्त्रिया म्हणजे क्रूर, चंचल, धर्माची पर्वा न बाळगणाऱ्या आणि एकमेकांत फूट पाडणाऱ्या अशा असावयाच्याच. हे जनककन्ये, दोन्ही कानांमध्यें तप्त नाराच बाणांसारखें सलत असलेलें तुझें हें अशा प्रकारचें भाषण मला सहन होत नाहीं. ज्या अर्थीं मी न्यायानें भाषण करीत असतांनाहि तूं माझ्याशीं मर्मभेदक भाषण केलें आहेस, त्या अर्थीं साक्षी असलेले सर्व वनचर प्राणी मी काय म्हणत आहें, इकडे लक्ष्य देवोत. तूं जातीची स्त्री असल्यामुळें वडिलांच्या आज्ञेप्रमाणें वागणाऱ्या माझ्याविषयीं दुष्ट स्वभावानें अशी शंका घेत आहेस, तस्मात् विनाशकाल जवळ आलेल्या तुला धिक्कार असो! हे सुमुखि, जिकडे राम असेल, तिकडे मी जातों, तुझें कल्याण असो. हे विशालनयने, संपूर्ण वनदेवता तुझें रक्षण करोत. मला भयसूचक घोर चिन्हें दृष्टीस पडत आहेत, यावरून रामासहवर्तमान परत आल्यावर तूं माझ्या दृष्टीस पडशील किंवा नाहीं ही शंकाच आहे."

लक्ष्मणाचें हें भाषण ऐकून सीता रडत रडत त्याला म्हणाली, "लक्ष्मणा, रामाचा वियोग झाला असतां मी गोदावरीमध्यें उडी घालीन, गळ्याला फांस लावून घेईन, कड्याविड्यावर उभी राहून तेथून आपला देह लोटून देईन, तीक्ष्ण विष प्राशन करीन, अथवा अग्नीमध्यें प्रवेश करीन; परंतु रामावांचून इतर पुरुषाला मी कधींहि स्पर्श करणार नाहीं."

ह्याप्रमाणें लक्ष्मणाला निश्चयपूर्वक सांगून शोकाकुल झालेली सीता रडत रडत आपल्या हातांनीं दुःखानें उदर बडवून घेऊं लागली असतां, आर्त होऊन रडत असलेल्या त्या विशालनयना सीतेला अवलोकन करून लक्ष्मणानें

तिचें सांत्वन केलें. तथापि ती त्याच्याशीं कांहींच बोलेना. तेव्हां सीतेला मनानें अभिवंदन करून व किंचित् नम्र होऊन तिच्याकडे पहात पहात तो लक्ष्मण रामाकडे जाण्यास निघाला.

सर्ग शेहेचाळिसावा.

रावणाचें रामाश्रमीं आगमन.

सीतेच्या कठोर वाणीनें रुष्ट झालेला लक्ष्मण, रामहि आपल्याशीं विरुद्ध आहे कीं काय अशी शंका आल्यामुळें रामचंद्राकडे जाण्याच्या इच्छेनें सत्वर निघाला. ही संधि साधून संन्याशाचा वेष घेतलेला दशग्रीव रावणहि अतिसत्वर त्या वैदेहीच्या जवळ आला. त्यानें मनोहर भगवीं वस्त्रें परिधान केलेलीं असून त्याला शेंडी, हातांत छत्री व पायांत जोडा होता. त्याच्या डाव्या खांद्यावर उत्तम प्रकारची काठी आणि कमंडलु हीं लटकलेलीं होतीं. अशा प्रकारचा वेष घेऊन तो अतिबलवान रावण राम व लक्ष्मण यांनीं रहित अशा आश्रमामध्यें असलेल्या सीतेकडे आला. तेव्हां सूर्यचंद्रांनीं रहित असलेल्या संध्येप्रमाणें शोभणारी, किंवा चंद्रानें रहित असलेल्या रोहिणीप्रमाणें भासणारी ती पूर्ववयस्क राजकन्या त्या केतुरूप रावणाच्या दृष्टीस पडली. त्या पापकर्म करणाऱ्या उग्र रावणाला अवलोकन करितांच जनस्थानांतील झाडें हालतनाशीं झालीं, वारा वाहिनासा झाला, वेगानें वाहाणारे पाण्याचे ओघ आरक्तवर्ण नेत्र असलेल्या त्या रावणाला पाहून हळू हळू वाहूं लागले, व त्याचप्रमाणें गोदावरी नदीहि मंद मंदच वाहूं लागली. असो. आश्रमामध्यें रामचंद्र नाहीं, असें पाहून तो भव्य दशग्रीव भर्त्याबद्दल शोक करीत असलेल्या त्या वैदेहीकडे भव्य भिक्षुरूप धारण करून आला. तेव्हां चित्रा नक्षत्राकडे येणाऱ्या शनैश्चराप्रमाणें, आणि तृणांनीं आच्छादित असलेल्या कूपाकडे जाणाऱ्या भव्य पुरुषाप्रमाणें तो रावण वैदेहीजवळ प्राप्त झाल्यावर उत्कृष्ट दंत व ओष्ठ असलेली, पौर्णिमेच्या चंद्रासारखें मुख असलेली, शोकाश्रूंनीं नेत्र भरून गेलेली, पर्णशालेमध्यें बसलेली, पद्मपत्रांप्रमाणें विस्तृत नेत्र असलेली, आणि पीतांबर धारण केलेली अशी ती कल्याणी पाहून त्याला मोठा आनंद झाला.

रावणाचें सीतेशीं भाषण.

ह्याप्रमाणें जानकीला अवलोकन करून कामबाणानें पीडित झालेल्या त्या

राक्षसाधिपति रावणानें वेदांचा उच्चार केला, व कोणी नाहीं असें पाहून म्हणाला, १
"सुंदरी जानकी, तुझा वर्ण उत्कृष्ट सुवर्णाप्रमाणें आहे. तूं पीतवस्त्र परिधान केलें आहेस व लक्ष्मीप्रमाणें कमलांची माला गळ्यांत धारण केली आहेस. तेव्हां तूं श्री, ऱ्ही, कीर्ति, लक्ष्मी, अप्सरा, उत्तम प्रकारचें मुख असलेली भूति, अथवा स्वैर वर्तन करणारी रतिच आहेस कीं काय! तुझे दंत एकसारखे, मऊ आणि पांढुरवर्ण असून, तुझे विशाल आणि स्वच्छ असे नेत्र काळ्या बाहुल्यांनीं युक्त आहेत व त्यांचे प्रांत आरक्तवर्ण आहेत. तुझा कटिपश्चाद्भाग विशाल असून तुझ्या मांड्या हत्तीच्या सोंडेप्रमाणें सरळ आहेत. हे तुझे स्तन उंच व सारखे असून वर्तुलाकृति, आलिंगन देण्यास योग्य, अंगें उंच असलेले, सुंदर, तालवृक्षाच्या फळांप्रमाणें मऊ व श्रेष्ठ श्रेष्ठ मणी ज्यांवर लोंबत आहेत असे आहेत. हे सुहास्यवदने, हे चारुनेत्रे[1], हे चारुदति[2], हे विलासिनि जानकि, ज्याप्रमाणें नदी आपल्या उदकानें आपल्या तीराला वाहून नेते, त्याप्रमाणें तूं माझें अंतःकरण ओढून नेत आहेस. तुझी कटि अंगुष्ठ व तर्जनी ह्यांमध्यें मावणारी असून, तूं देवांगना, गंधर्वस्त्री, यक्षीण अथवा किन्नरी नसावीस असें वाटतें. ह्या भूतलावर तुझ्यासारखी रूपवती स्त्री मीं पूर्वी कधीं अवलोकन केली नाहीं. ह्या लोकांमध्यें तुझें हें रूप, हा सुकुमारपणा आणि हें वय हीं अत्यंत उत्कृष्ट आहेत. अशा प्रकारचें तुझें रूप असून तूं अरण्यामध्यें वास्तव्य करीत आहेस, हें पाहून माझें मन अगदीं गोंधळून जात आहे. तस्मात् हे जानकि, तुझें कल्याण असो. तूं येथें न राहातां माझ्याबरोबर चल. इच्छेस येईल तें रूप धारण करणाऱ्या घोर राक्षसांचें हें अरण्य वसतिस्थान आहे. सुंदर सुंदर नगरांच्या, पुष्पांनीं भरलेल्या व सुगंधयुक्त अशा वनामध्यें, राजवाड्यांच्या गच्चयांवर क्रीडा करण्यास तूं योग्य आहेस. हे कृष्णनयने सुंदरि, तुझी सुंदर माला, उत्कृष्ट गंध, रमणीय वस्त्र व तुझे ठिकाणीं रममाण होणारा पति हीं सर्वश्रेष्ठ आहेत. हे सुहास्यवदने, तूं रुद्र, देव, व वसु ह्यांपैकीं कोण आहेस? मला वाटतें, तूं देवता आहेस. येथें देव, गंधर्व अथवा किन्नर हे कधींहि येत नाहींत. हें राक्षसांचें वसतिस्थान असून तूं कशी येथें प्राप्त झाली आहेस? ह्या ठिकाणीं वानर, सिंह, चित्ते, वाघ, लांडगे, अस्वलें, तरस आणि कंक म्हणून प्रख्यात असलेले पक्षी वास्तव्य करितात. ह्यास्तव त्यांपासून तुला कशी भीति वाटत नाहीं? तूं कोण आहेस? कोणाची आहेस? आणि ह्या दंडकारण्यामध्यें

१ जिचे नेत्र अतिसुंदर आहेत, अशी. २ जिचे दांत रमणीय आहेत, अशी.

कोठून व कशाकरितां प्राप्त झाली आहेस? हे कल्याणि, घोर राक्षसांनीं सेवन केलेल्या ह्या दंडकारण्यांत तूं एकटी कां संचार करीत आहेस? "

ह्याप्रमाणें रावणानें जानकीशीं आदरपूर्वक भाषण केलें असतां यतिवेषानें हा रावणच आपणाकडे आला आहे, असें अवलोकन करूनहि ज्याप्रमाणें अतिथींचा सत्कार करावयाचा, त्याचप्रमाणें त्या मैथिलीनें त्याचा सत्कार केला; आणि प्रथमतः त्याला बसावयास आसन देऊन पाद्य समर्पण केलें, आणि शुद्ध असलेलें व परिपक्व झालेलें असें अन्न तयार आहे, म्हणून सांगितलें. तदनंतर कमंडलु व भगवीं वस्त्रें परिधान करून यतिवेषानें हा रावण आला आहे, असें समजूनहि ज्या अर्थी आपण ब्राह्मण आहों, असें मुद्दाम लोकांस भासविण्याकरितां ह्यानें ब्राह्मणवेष घेतला आहे, त्या अर्थी ह्या ब्रह्मवेषाची उपेक्षा करणें योग्य नव्हे, असें वाटून ती त्याला म्हणाली, " हे द्विज, ह्या आसनावर आपण खुशाल बसून ह्या पाद्याचा स्वीकार करावा, आणि आपणांकरितां तयार केलेले हे उत्कृष्ट वन्य पदार्थ आपण येथें स्वस्थपणें सेवन करावे."

ह्याप्रमाणें त्याच्याशीं सीतेचें बोलणें चाललें असतांना त्या राजपत्नीचें भाषण संपूर्ण झालें, असें पाहून आपल्या नाशाकरितां बलात्कारानें तिला हरण करून नेण्याविषयीं रावणानें आपल्या मनाचा पक्का निश्चय केला. नंतर उत्कृष्ठ वेष धारण करून लक्ष्मणासहवर्तमान मृगयेला गेलेल्या पतीची मार्गप्रतिक्षा करीत बसलेली ती सीता निरखून पाहूं लागली असतां राम-लक्ष्मण तर नाहींतच, परंतु प्रचंड हिरवेंगार वन मात्र तिच्या दृष्टीस पडलें.

सर्ग सत्तेचाळिसावा.

सीता व रावण यांचें भाषण.

सीतेनें क्षणभर विचार केला कीं, हा ब्राह्मणरूपानें अतिथि प्राप्त झालेला आहे. तेव्हां कदाचित् आपण याच्या प्रश्नाचें उत्तर न दिल्यास हा आपणास शाप देईल. असा विचार करून यतिवेष धारण केलेल्या व आपला नाश होण्याची इच्छा करणाऱ्या रावणाला सीतेनें स्वतःविषयीं सांगितलें. ती म्हणाली, " आपलें देव बरें करो. मी महात्म्या मिथिलाधिपति राजाची कन्या असून रामाची सीता नामक प्रियपत्नी आहें. विवाहानंतर माझी बारा वर्षे इक्ष्वाकु-

श्वशुराच्या घरामध्यें, मनुष्याला योग्य अशा सर्व प्रकारच्या भोग्य वस्तूंचा उपभोग घेण्यांत आणि हवी ती इच्छा परिपूर्ण करून घेण्यांत गेलीं असतां, तेरावें वर्षी राजमंत्र्यांसहवर्तमान असलेल्या प्रभु दशरथ राजानें रामाला अभिषेक करण्याचें ठरविलें; परंतु रघुवंशज रामाच्या त्या अभिषेकाची तयारी चालली असतां मला पूज्य असलेल्या कैकेयीनें आपल्या भर्त्यापाशीं वरप्रदान मागितलें. माझ्या सासऱ्याला प्रथमतः तिनें धर्माची शपथ घातली. नंतर माझ्या भर्त्याला वनवास व भरताला अभिषेक असे दोन वर तिनें त्या आपल्या सत्यवचनी नृपश्रेष्ठ भर्त्यापाशीं मागितले. ती म्हणाली, 'मी आज कांहींएक खाणार नाहीं, कांहींएक पिणार नाहीं, आणि कधीं झोपहि घेणार नाहीं. रामाला जर अभिषेक होणार असेल, तर ही माझ्या जीविताची परिसमाप्तिच झाली, असें आपण समजा.'

ह्याप्रमाणें कैकेयी बोलूं लागली असतां माझ्या सासऱ्यानें म्हणजे दशरथ राजानें उपभोग घेण्यास योग्य अशा पुष्कळ वस्तु देऊं केल्या असतांनाहि तिनें त्याच्या विनंतीला मान दिला नाहीं. त्या वेळीं माझा महातेजस्वी पति वयानें पंचवीस वर्षांचा असून माझें वय अठरा वर्षांचें होतें. विशालनयन, महापराक्रमी, प्राणिमात्रांच्या हिताविषयीं तत्पर, सत्यवचनी, सुशील आणि पवित्र असा माझा भर्ता राम म्हणून लोकांमध्यें प्रसिद्ध आहे. तथापि कामाच्या तावडींत सांपडलेल्या स्वतः पित्या दशरथ महाराजानेंच कैकेयीची प्रिय इच्छा परिपूर्ण करण्याकरितां त्या रामाला अभिषेक केला नाहीं. असो. अभिषेकाकरितां माझा भर्ता पित्याचे समीप आला असतां कैकेयी सत्वर त्याला म्हणाली, 'हे राघवा, हें तुझ्या पित्यानें मला दिलेलें वचन तूं श्रवण कर. हें निष्कंटक राज्य भरताला द्यावयाचें असून तुला चौदा वर्षें वनामध्यें वास्तव्य करावयाचें आहे. ह्याकरितां हे ककुत्स्थकुलोत्पन्ना रामा, तूं आतां वनामध्यें चालता हो, आणि अनृतापासून आपल्या पित्याला मुक्त कर."

सीता पुढें सांगते:—" ह्यावर स्वीकारिलेलें व्रत नेटानें चालविणाऱ्या व कसल्याहि प्रकारची भीति नसलेल्या रामानें 'ठीक आहे' असें तिला उत्तर दिलें, आणि त्याचप्रमाणें केलें. ब्रह्मन्, दान द्यावें, परंतु प्रतिग्रह कधींहि करूं नये, आणि त्याचप्रमाणें भाषण सत्यच करावें, परंतु अनृत कधींच बोलूं नये हें रामाचें अत्युत्तम स्वीकृत व्रत होय. असो. रामाचा लक्ष्मण म्हणून एक बलाढ्य सापत्न भ्राता आहे. तो पुरुषश्रेष्ठ लक्ष्मण समरांगणामध्यें शत्रूचा नाश करणारा असून त्याला साहाय्य करणारा आहे. ह्यामुळें मला बरोबर घेऊन आणि हातामध्यें धनुष्य घेऊन राम वनामध्यें जाऊं लागला असतां, तो

दृढनिश्चयी भ्राता ब्रह्मचर्य व्रत स्वीकारून त्याच्या मागोमाग वनामध्यें आला. ह्याप्रमाणें जटा धारण केलेला व नेहमीं धर्माचीच अपेक्षा करणारा दृढनिश्चयी राम, कनिष्ठ भ्रात्याला बरोबर घेऊन माझ्यासहवर्तमान दंडकारण्यामध्यें प्रविष्ट झाला. तात्पर्य हे द्विजश्रेष्ठ, कैकेयीकरितां राज्याला मुकलेले ते आम्ही तिघे गहन वनामध्यें स्वसामर्थ्यानें संचार करीत आहों. येथें आपणांला राहाणें जर शक्य असेल, तर क्षणभर विश्रांति घ्या. रुरु, गोधा व वराह यांचा वध करून, बरेचसें मांस बरोबर घेऊन आणि इतरहि पुष्कळ वन्य पदार्थ घेऊन माझा भर्ता इतक्यांत येईल. आतां आपण आपलें नांव, गोत्र आणि कुल खरें खरें मला सांगा. हे द्विज, दंडकारण्यामध्यें आपण एकटे कशाकरितां संचार करीत आहां, तेंहि कथन करा. ''

ह्याप्रमाणें रामपत्नी सीता विचारूं लागली असताना तो राक्षसाधिपति महाबलाढ्य रावण तिच्या प्रश्नाला कठोर उत्तर देऊं लागला. तो म्हणाला, "सीते, ज्यानें देव, दैत्य आणि मनुष्यें ह्यांसहवर्तमान सर्व त्रैलोक्य त्रस्त करून सोडिलें आहे, तो मी रावण नामक राक्षसगणांचा राजा होय. हे सुंदरि, सुवर्णासारख्या कांतीनें युक्त असलेल्या तुला पैठणी नेसलेली अवलोकन केल्यापासून, आपल्या स्त्रियांचे ठिकाणीं माझें मन मुळींच रमेनासें झालें आहे. ह्याकरितां इकडून तिकडून ज्या मीं अनेक उत्कृष्ठ स्त्रिया हरण करून आणिल्या आहेत, त्या सर्वांमध्यें तूंच माझी पट्टराणी हो, म्हणजे तुझें कल्याण होईल. समुद्रामध्यें लंका म्हणून माझी एक नगरी आहे. तिच्या सभोंवती समुद्राचा वेढा असून पर्वताच्या माथ्यावर ती वसलेली आहे. त्या ठिकाणीं तूं माझ्यासहवर्तमान वनामध्यें संचार करूं लागलीस, म्हणजे ह्या वनांत राहाण्याची तुला इच्छाहि होणार नाहीं. सीते, तूं जर माझी भार्या होशील, तर सर्व प्रकारचे अलंकार धारण केलेल्या अशा पांच हजार दासी तुझी सेवा करीत राहातील. ''

रावणाचें हें भाषण ऐकून सीता क्रुद्ध झाली, व त्या राक्षसाचा धिक्कार करून त्याला म्हणाली, "महापर्वताप्रमाणें जो कधीं कंपित होणें शक्य नाहीं, आणि महासागराप्रमाणें जो क्षुब्ध होणें शक्य नाहीं, असा जो माझा पति महेंद्रतुल्य राम, त्यालाच अनुसरून मी वागणारी आहे. सर्वलक्षणसंपन्न आणि वटवृक्षाप्रमाणें सर्वांना आश्रयभूत अशा त्या महाभाग्यवान सत्यवचनी रामाला अनुसरून वागणें हेंच माझें व्रत आहे. महापराक्रमी, विशाल वक्षःस्थलानें युक्त, सिंहगतीनें चालणाऱ्या आणि

पराक्रमामध्यें सिंहाप्रमाणेंच असणाऱ्या पुरुषश्रेष्ठ रामालाच अनुसरून मी वागणारी आहें. पूर्णचंद्राप्रमाणें ज्याचें मुख आहे अशा महापराक्रमी, महाकीर्तिमान व जितेंद्रिय राजपुत्र रामाला अनुसरून वागणें, हेंच माझें व्रत आहे. सिंहिणीची इच्छा धरणाऱ्या कोल्ह्याप्रमाणें तूं विनाकारण माझी येथें इच्छा करीत आहेस; परंतु मी तुला मिळणें शक्य नाहीं. इतकेंच नव्हे, तर ज्याप्रमाणें सूर्याच्या प्रभेला सूर्यापासून पृथक् करून कोणाला स्पर्श करितां येत नाहीं, त्याचप्रमाणें रामाचा वियोग करून मला तुझा स्पर्श होणें शक्य नाहीं. हे भाग्यहीना, मृत्यु जवळ आल्यामुळें स्वप्नामध्यें पुष्कळ सुवर्णवृक्ष खरोखर तूं पहात असशील. हे राक्षसा, रामाच्या प्रिय भार्येची तूं इच्छा करीत आहेस; परंतु असें मनांत आणणें म्हणजे मृगाचा शत्रु आणि महाबलाढ्य अशा क्षुधित सिंहाच्या अथवा सर्पाच्या तोंडांतून दाढ काढून घेण्याची इच्छा करण्यासारखें, अथवा मंदर नामक श्रेष्ठ पर्वत हातानें उचलून नेण्याचीच इच्छा करण्यासारखें आहे. इतकेंच नव्हे, परंतु कालकूट विष भक्षण करून स्वस्तिक्षेम असण्याची तूं इच्छा करीत आहेस, आणि धार साफ लागण्याकरितां नेत्राग्रावर तूं वस्तरा घाशीत असून जिभेनें तो चाटीत आहेस. रामाची प्रिय भार्या प्राप्त होण्याची तूं इच्छा करीत आहेस, म्हणजे गळ्यामध्यें शिळा बांधून समुद्र तरून जाण्याचेंच तूं मनामध्यें आणिलें आहेस. अरे, रामाच्या प्रिय भार्येवर हात टाकण्याचें तूं मनांत आणीत आहेस, परंतु असें मनांत आणणें म्हणजे सूर्य व चंद्र ह्या उभयतांना हातांनींच ओढून आणण्याचा तूं विचार करीत आहेस. सदाचरणानें वागणाऱ्या रामाच्या भार्येला हरण करण्याची इच्छा करणारा तूं, प्रज्वलित अग्नि अवलोकन करितांक्षणीं त्याला वस्त्रांत बांधून आणण्याचें मनामध्यें आणीत आहेस. फार कशाला? रामाची अनुरूप भार्या प्राप्त करून घेण्याची इच्छा करणारा तूं खरोखर लोहाग्र-युक्त शूलांमध्येंच संचार करण्याची इच्छा करीत आहेस. सिंह आणि कोल्हा ह्यांच्यांत जें अंतर दिसून येतें, अथवा ओढा आणि समुद्र ह्यांच्यामध्यें जें अंतर दृष्टोत्पत्तीस येतें, किंवा अमृत आणि कांजी ह्यांच्यामध्यें जें अंतर अनुभवाला येतें, तें अंतर दशरथपुत्र राम आणि तूं ह्यांच्यामध्यें असल्याचें निदर्शनाला येत आहे. सुवर्ण आणि शिसें ह्या धातूंमध्यें, चंदनोदक आणि चिखल ह्यांमध्यें आणि हत्ती व मांजर ह्यांमध्यें जितकें अंतर आहे, तितकें अंतर दशरथपुत्र आणि तूं ह्यांमध्यें आहे. कावळा आणि गरुड, किंवा पाणकोंबडा आणि मोर, अथवा हंस आणि गिधाड ह्यांच्यांत जें अंतर वनामध्यें दृष्टोत्पत्तीस येतें, तें

अंतर दशरथपुत्र राम आणि तूं ह्यांच्यामध्यें निदर्शनास येत आहे. तेव्हां हातामध्यें धनुष्यबाण घेऊन तो इंद्रतुल्य पराक्रमी राम भूतलावर असतांना जरी तूं मला घेऊन गेलास, तरी माशीसह गिळिलेल्या तुपाप्रमाणें मी तुला पचणार नाहीं."

ह्याप्रमाणें स्वभावानें सरळ असलेल्या सीतेनें त्या अत्यंत दुष्ट राक्षसाला सांगितल्यावर शरिराला कंप सुटून वाऱ्यानें लटलट हालूं लागलेल्या बारीक केळीप्रमाणें तिची अवस्था झाली. नंतर कांपत असलेल्या त्या सीतेला अवलोकन करून तिला भीति घालण्याच्या उद्देशानें तो मृत्यूप्रमाणें पराक्रमी असलेला रावण आपलें कुल, बल, नांव आणि पराक्रम तिला सांगूं लागला.

सर्ग अठ्ठेचाळिसावा.

रावणाची आत्मश्लाघा.

ह्याप्रमाणें सीता निंदा करूं लागली असतां रावण क्रुद्ध झाला, आणि कपाळाला आंठ्या घालून तिला कठोर शब्दांनीं म्हणाला, "तुझें देव बरें करो. हे सुंदरि, प्रतापी आणि दशकंठ असा मी रावण म्हणून कुबेराचा सापत्न भ्राता आहे. गंधर्वांसहवर्तमान देव, पिशाच, पक्षी आणि उरग हे सर्वदा मृत्यूला भीत असलेल्या प्राण्यांप्रमाणें मला नेहमीं भिऊन पळत सुटतात. एके वेळीं कांहीं कारण उपस्थित झाल्यामुळें मी आपल्या सापत्न भ्रात्या कुबेराची रणामध्यें क्रोधामुळें गांठ घेतली, आणि पराक्रम करून त्याचा पराजय केला. तेव्हां माझ्या भयानें व्याकुल झाल्यामुळें आपल्या समृद्ध स्थानाचा त्याग करून तो नरवाहन कुबेर सांप्रत कैलास नामक श्रेष्ठ पर्वतावर वास्तव्य करीत आहे, आणि हे कल्याणि, हवें तिकडे गमन करणारें जें त्याचें पुष्पक नामक शुभ विमान, तें मीं पराक्रमानें हिसकावून घेतलें असून त्याच्याच योगानें मी आकाशामध्यें गमन करीत असतों. हे मिथिलराजकन्ये, मी क्रुद्ध झालों असतां माझी मुद्रा अवलोकन करितांक्षणींच इंद्रप्रभृति देव भयभीत होऊन पळत सुटतात. जेथें मी राहातों, तेथें वाराहि भीतभीतच वाहात असून सूर्यहि माझ्या भीतीनें शीतल किरणांनीं युक्त होत असतो. इतकेंच नव्हे, परंतु ज्या ठिकाणीं मी राहातों व हिंडतों त्या ठिकाणीं वृक्षांचीं पानेंहि हालतनाशीं होऊन नद्यांचें उदकहि हालेनासें होतें. इंद्राच्या अमरावतीप्रमाणें लंका म्हणून समुद्राच्या पलीकडे माझी एक शुभ नगरी

आहे. ती घोर राक्षसांनीं भरलेली आहे. तिच्या भोंवतीं श्वेतवर्ण तट असून वैदूर्य रत्नें जडलेल्या वेशी आहेत. त्या रम्य नगरीच्या सीमा सुवर्णाच्या असून ती त्या योगें झळकत आहे. गज, अश्व आणि रथ ह्यांनीं ती गजबजलेली असून वाद्यांच्या योगानें नादित झालेली आहे. ती कल्पवृक्षांनीं व्याप्त झालेली असून नागांच्या योगानें अतिशय भूषित झालेली आहे. तेव्हां हे राजकन्ये, त्या ठिकाणीं तूं माझ्याबरोबर राहा, म्हणजे तुला मानवी स्त्रियांचें स्मरण देखील होणार नाहीं. त्याचप्रमाणें मनुष्य आणि देव ह्या उभयतांनाहि योग्य असलेल्या भोग्य वस्तूंचा तूं उपभोग घेऊं लागलीस, म्हणजे मरणाच्या दारीं बसलेल्या मानव रामाचें तुला स्मरणहि होणार नाहीं. दशरथ राजानें आपल्या प्रिय पुत्राची राज्यावर स्थापना केली असून ज्येष्ठ पुत्राचें सामर्थ्य कमी असल्यामुळे त्यानें त्याला वनामध्यें पाठविलें आहे. ह्याकरितां राज्यापासून भ्रष्ट व मनामध्यें अस्वस्थ अशा त्या बिचाऱ्या शौर्यहीन रामाशीं तुला आतां काय बरें कर्तव्य आहे ? तस्मात् तूं संभाळ, आणि स्वतः चालून आलेल्या राक्षसाधिपतीची इच्छा कर. मदनबाणांनीं विद्ध झालेल्या मला नाकारणें तुला योग्य नाहीं. कारण अग भित्रे, पुरूरव्याला लाथ मारून उर्वशीला जसा पश्चात्ताप झाला, तसा मला नाकारिल्यामुळें तुला पश्चात्ताप होईल. बलासंबंधानें पाहूं गेलें असतां, तो मानव राम युद्धामध्यें माझ्या एका बोटाचीहि बरोबरी करणार नाहीं. ह्याकरितां हे सुंदरि, तुझ्या सुदैवानें जवळ आलेल्या माझा तूं अंगीकार कर."

ह्याप्रमाणें रावण बोलला असतां, क्रुद्ध होऊन जिचे डोळे लाल झाले आहेत, अशी रामरहित आश्रमामध्यें असलेली सीता त्या राक्षसराजाशीं कठोर भाषण करूं लागली, ती म्हणाली "सर्व देवांना पूज्य जो देव कुबेर, तो भ्राता आहे असें सांगून तूं पाप करण्याचें कसें मनामध्यें आणीत आहेस ? रावणा, कठोर, दुष्ट आणि विषयलंपट असा तूं ज्यांचा राजा आहेस, त्या सर्व राक्षसांचा अवश्य नाश होईल. अरे, वज्रपाणी इंद्राची जी अनुपम सौंदर्यसंपन्न भार्या शची, तिचा अपहार केल्यानंतरहि कदाचित् पुष्कळ दिवसपर्यंत जिवंत राहाणें शक्य आहे; परंतु बलात्कारानें मज रामभार्येला हरण करून नेल्यावर तूं जरी अमृतपान केलेंस, तरी मृत्यूपासून तुझी सुटका होणार नाहीं."

सर्ग एकुणपन्नासावा.

सीताहरण.

सीतेचें हें भाषण श्रवण करितांच प्रतापी रावणानें दोन्ही हात चोळून फारच मोठें शरीर धारण केलें, आणि तो संभाषणज्ञ रावण पुनरपि सीतेला म्हणाला, "मला वाटतें, तूं शुद्धीवर नसल्यामुळें माझें वीर्य व पराक्रम कधीं ऐकिलें नाहींस. अंतरिक्षामध्यें राहून मी दोन हातांनीं पृथ्वी उचलून घेऊन जाईन, समुद्रहि गट्ट करून टाकीन, आणि रणामध्यें उभा राहिलों असतां मृत्यूचाहि वध करीन. इतकेंच नव्हे, परंतु तीक्ष्ण बाणांनीं सूर्यालाहि दुःख देईन व भूतल सुद्धां भेदून टाकीन. विषयवासनेमुळें आणि सुरूपामुळें तूं बेफाम झाली आहेस. ह्यास्तव सीते, मनाप्रमाणें रूप धारण करणाऱ्या मजकडे पहा."

ह्याप्रमाणें तो रावण क्रुद्ध होऊन बोलूं लागला असतां त्याचे नेत्र अग्नीप्रमाणें आरक्तवर्ण होऊन नेत्रप्रांतहि हिरवे होऊन गेले. तात्पर्य त्या कुबेराच्या कनिष्ठ भ्रात्यानें एकदम सौम्य रूपाचा त्याग करून मृत्यूच्या स्वरूपाप्रमाणें असलेलें आपलें स्वतःचें रूप धारण केलें. प्रचंड क्रोधानें व्याप्त होऊन आरक्तवर्ण नेत्रांनीं युक्त झालेला तो वैभवशाली रावण राक्षस उत्कृष्ठ सुवर्णभूषणें, नीलमेघतुल्य कांति, दहा मुखें आणि वीस हात ह्यांनीं युक्त झाला. सारांश, शरिरानें धिप्पाड असलेल्या त्या राक्षसाधिपति रावणानें कपटमूलक यतिवेषाचा त्याग करून स्वतःचें रूप धारण केलें, आणि आरक्त वस्त्रें परिधान केलेला तो रावण स्त्रियांमध्यें सर्वोत्कृष्ठ असलेल्या सीतेकडे दृष्टि देऊन उभा राहिला. नंतर काळे कुळकुळित केंस, वस्त्रें व भूषणें ह्यांनीं युक्त असलेल्या व सूर्याच्या प्रभेप्रमाणें दिसणाऱ्या सीतेला तो म्हणाला, "तुला जर त्रैलोक्यविख्यात भर्ता पाहिजे असेल, तर हे सुंदरि, तूं माझें अवलंबन कर. मी तुला योग्य पति आहें. तेव्हां तूं चिरकाल माझा स्वीकार कर. मीच तुला पति उत्कृष्ठ आहें. शिवाय हे कल्याणि, मी कधींहि तुझ्या इच्छेविरुद्ध वागणार नाहीं. तस्मात्, तूं आतां आपली मनुष्यविषयक प्रीति सोडून देऊन माझे ठिकाणीं प्रेम कर. हे मूढे, तूं आपल्याला शहाणी समजत आहेस, परंतु राज्यापासून भ्रष्ट, अल्पायु आणि भग्नमनोरथ अशा रामाचे ठिकाणीं कोणत्या गुणामुळें तूं अनुरक्त आहेस! तो दुर्बुद्धि राम स्त्रीच्या

सांगण्यावरून सुहृज्जनांसहवर्तमान राज्याचा त्याग करून श्वापदांनीं वस्ती केलेल्या ह्या वनामध्यें राहात आहे."

ह्याप्रमाणें दयेला पात्र असलेल्या आणि रावणावांचून सर्वांशीं प्रिय भाषण करीत असलेल्या सीतेच्या समीप तो गेला. आकाशामध्यें ज्याप्रमाणें बुधानें विषयवासनेमुळें आपल्या रोहिणी मातेला धरावी, त्याप्रमाणें त्या अत्यंत दुष्ट व मदांध झालेल्या रावण राक्षसानें सीतेला धरिलें. सारांश, कमलनयन सीतेचे केश त्यानें डाव्या हातानें धरिले व उजवा हात कमरेखालीं घालून त्यानें तिला उचलिलें. तेव्हां प्रचंड बाहु आणि तीक्ष्ण दंष्ट्रा ह्यांनीं युक्त, स्वरूपानें मृत्यूसमान आणि पर्वतशिखराप्रमाणें धिप्पाड असलेल्या त्या रावणाला अवलोकन करितांक्षणीं वनदेवता भयभीत होऊन धावूं लागल्या. इतक्यांत कर्कश स्वर व सुवर्णाचें सामान ह्यांनीं युक्त असलेला आणि गर्दभ जोडिलेला तो रावणाचा मायामय दिव्य महारथहि दृष्टीस पडूं लागला. तदनंतर मोठी गर्जना करणाऱ्या त्या रावणानें कठोर शब्दांनीं सीतेला धमकाविलें, आणि हातांनीं उचलून धरून तिला रथावर ठेविलें. रावणानें उचलितांक्षणीं ती यशस्विनी सीता दुःखाकुल झाली, आणि दूर गेलेल्या रामाच्या नांवानें 'राम राम' म्हणून फारच आक्रोश करूं लागली. तथापि विषयाधीन झालेला रावण अनुरागरहित आणि नागराजाच्या स्त्रीप्रमाणें सुटून जाण्याकरितां तडफड करीत असलेल्या सीतेला घेऊन सत्वर चालता झाला.

ह्याप्रमाणें तो राक्षसाधिपति तिला आकाशमार्गानें घेऊन चालला असतां शोकाकुल व बेशुद्ध झालेली स्त्री ज्याप्रमाणें मनामध्यें गोंधळून जाऊन शोक करूं लागते, त्याप्रमाणें ती शोक करूं लागली. ती म्हणाली, "हे लक्ष्मणा, तूं महापराक्रमी असून वडिलांच्या मनाला आनंद देणारा आहेस. तथापि इच्छेप्रमाणें रूप धारण करणारा हा राक्षस मला घेऊन जात आहे, हें तुझ्या गांवींहि नाहीं. हे राघवा, धर्माकरितां जीवितावर, सुखावर आणि संपत्तीवर तूं लाथ मारणारा असतांनाहि मला हा रावण अधर्मानें घेऊन जात आहे, इकडे तूं ढुंकूनहि पाहात नाहींस. हे शत्रुतापना, बेफामपणानें वागणाऱ्या लोकांना तूं तर ताळ्यावर आणणारा आहेस, परंतु अशा प्रकारच्या ह्या पापी रावणाला तूं शासन करीत नाहींस, हें काय? बेफामपणानें केलेल्या कृत्याचें फल तत्काल दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. कारण धान्यें परिपक्व होण्यास ज्याप्रमाणें कालाची अपेक्षा आहे, त्याप्रमाणें कर्माचें फल प्राप्त होण्यास कालाची अपेक्षा

आहे. रावणा, कालानें तुझी बुद्धि नाहींशी केल्यामुळें तूं हें कर्म केलें आहेस. ह्यास्तव, जीविताचा नाश करणारें घोर संकट रामापासून तुला प्राप्त होईल. हूं: ! आतां मात्र आपल्या बांधवांसहवर्तमान कैकेयीचे मनोरथ परिपूर्ण झाले खरे ! कारण धर्माची अपेक्षा धरणाऱ्या यशस्वी रामाच्याच धर्मपत्नीला रावण घेऊन जात आहे. मी आतां जनस्थानाचा आणि प्रफुल्लित झालेला कर्णिकार वृक्षांचा निरोप घेतें. हे वृक्षहो, रावण सीतेला हरण करून नेत आहे, असें तुम्ही सत्वर रामाला सांगा. हंस आणि सारस पक्षी ह्यांनीं नादित असलेल्या गोदावरी नदीला मी वंदन करितें. हे पक्षिगणहो, रावण सीतेला घेऊन जात आहे, हें तुम्ही सत्वर रामाला कळवा. नानाप्रकारच्या वृक्षांनीं युक्त असलेल्या ह्या वनामध्यें ज्या कांहीं देवता असतील, त्यांना मी नमस्कार करीत आहें. अहो, देवतांनो, मला नेलें म्हणून तुम्ही माझ्या भर्त्याला विदीत करा. ह्या अरण्यामध्यें जे कांहीं नानाप्रकारचे प्राणी आणि मृगाचे व पक्ष्यांचे समुदाय असतील, त्या सर्वांना मी शरण आलें आहें. ह्यास्तव हे अरण्यवासी प्राणिगणहो, निरुपाय झालेली तुझी सीता रावणानें हरण करून नेली म्हणून तुम्ही—भर्त्याला प्राणांपेक्षांहि अधिक प्रिय अशी मी त्या मला रावण हरण करून नेत असल्याचें वर्तमान—रामाला कळवा. म्हणजे यमानें जरी मला परलोकीं नेलें असलें, तरी सुद्धां तें समजतांक्षणीं तो महापराक्रमी व महाबलाढ्य राम त्याला जिंकून मला परत आणील."

ह्याप्रमाणें ती दीर्घ नेत्रांनीं युक्त असलेली व अत्यंत दुःखाकुल झालेली सीता करुण स्वरानें विलाप करूं लागली असतां वृक्षावर बसलेला जटायु तिनें पाहिला. त्याला पाहातांक्षणीं रावणाच्या तावडींत सांपडलेली व म्हणूनच भयभीत झालेली ती सुंदरि सीता दुःखजन्य अश्रूंमुळें अस्पष्ट निघत असलेल्या शब्दांनीं त्याला ओरडून म्हणाली, " हे सज्जना जटायो, पहा, हा राक्षसाधिपति व पापकर्म करणारा रावण शोचनीय रीतीनें अनाथासारखी मला ओढून नेत आहे ! आणि ह्या क्रूर राक्षसाचें निवारणहि तुझ्यानें होणें शक्य नाहीं. कारण हा दुर्बुद्धि राक्षस बलाढ्य व सशस्त्र असून विजयी पुरुषाप्रमाणें दिसत आहे. तस्मात् हे जटायो, माझ्या नेण्यासंबंधानें सर्व कांहीं इत्थंभूत वर्तमान तूं पूर्णपणें रामाला व लक्ष्मणाला कथन कर."

सर्ग पन्नासावा.

रावणाला जटायूचा उपदेश.

निद्रिस्थ असलेल्या जटायूच्या कानावर ते शब्द येतांक्षणींच जटायू पाहूं लागला, तों रावण आणि सीता हीं त्याच्या दृष्टीस पडलीं. तदनंतर पर्वतशिखराप्रमाणें धिप्पाड व तीक्ष्ण चंचूंनीं युक्त असा तो वृक्षावर असलेला वैभवशाली श्रेष्ठ पक्षी शुभ शब्दांनीं म्हणाला, "हे दशानना, मी सनातन धर्माचें अवलंबन करीत असून आपली प्रतिज्ञा शेवटास नेणारा आहें. ह्याकरितां बाबारे, सांप्रत हें निंद्य कर्म करणें तुला योग्य नाहीं. मी जटायु म्हणून महाबलाढ्य गृध्रराज आहें, आणि इंद्र वरुणांप्रमाणें असलेला मी सर्व पृथ्वीचा राजा आहें. दशरथपुत्र राम लोकांच्या हिताविषयीं तत्पर आहे, आणि त्या लोकनाथाची ही यशस्विनी धर्मपत्नी आहे. ह्या रूपवती स्त्रीचें नांव सीता आहे. तूं तिला हरण करून नेण्याचें इच्छित आहेस. परंतु धर्माला अनुसरून वागणारा राजा परस्त्रीला कसा बरें स्पर्श करील? हे महाबलाढ्य रावणा, राजस्त्रीचें तर विशेषेंकरून रक्षण केलेंच पाहिजे. तस्मात्, तूं आपली नीच मनोवृत्ति परस्त्रीस्पर्शापासून निवृत्त कर. दुसरा ज्याला नांवें ठेवील, तें कर्म विचारी पुरुषानें कधींहि करूं नये. अरे, आपल्या स्त्रीप्रमाणेंच परस्त्रीचेंहि परपुरुषाच्या स्पर्शापासून रक्षण केलें पाहिजे. हे पौलस्त्यनंदना, शास्त्रामध्यें ज्याचा नीट बोध होत नाहीं, असा धर्म, अर्थ अथवा काम राजाचेंच आचरण पाहून शिष्ट लोक निश्चित करीत असतात. धर्म, काम आणि उत्तम वस्तूंचें उत्कृष्ठ भांडार हें सर्व राजाच आहे. कारण धर्म, पुण्य अथवा पातक हें सर्व राजमूलकच प्रवृत्त होत असतें. तस्मात् हे राक्षसश्रेष्ठा, तूं स्वभावानें दुष्ट व चंचल असतांना पातकी पुरुषाला ज्याप्रमाणें विमान प्राप्त व्हावें, त्याप्रमाणें तुला ऐश्वर्य कसें प्राप्त झालें आहे? जो पुरुष स्वभावतःच पापी असतो, तो आपला स्वभाव नाहींसा करण्यास समर्थ होत नाहीं. कारण दुष्ट पुरुषांचे घरीं कितीहि दिवस लोटले तरी पुण्यकर्म होण्याचा संभव नसतो. अरे, तुझ्या प्रदेशामध्यें अगर नगरामध्यें महाबलाढ्य व धर्मात्मा राम जर तुझा कांहीं अपराध करीत नाहीं, तर तूं कशाकरितां त्याचा अपराध करीत आहेस? आतां शूर्पणखेकरितां जनस्थानामध्यें गेलेला खर पूर्वींच अयोग्य रीतीनें वागल्यामुळें जर सत्कर्मनिष्ठ रामानें त्याचा वध केला आहे, तर ज्या पृथ्वीपति रामाची भार्या हरण करून तूं जात

आहेस, त्या रामाचा ह्यांत काय बरें अपराध आहे, हें तूंच सांग. सारांश, इंद्राच्या वज्रानें ज्याप्रमाणें वृत्रासुराला दग्ध करून टाकिलें, त्याप्रमाणें अग्निरूप बनलेल्या घोर दृष्टीच्या योगानें रामानें तुला दहन न करावें, एतदर्थ तूं सीतेला सत्वर सोडून दे. अरे, सीता हा एक विषयुक्त दंष्ट्रांनीं युक्त असलेला सर्पच पदरामध्यें बांधून तूं जात आहेस, हें तूं जाणीत नाहींस, आणि गळ्यामध्यें पडलेला कालपाश तूं अवलोकन करीत नाहींस. हे सौम्य रावणा, ज्याच्या खालीं चिरडून जाण्याची पाळी येणार नाहीं, तो भार पुरुषानें उचलावा, आणि अन्न तरी रोगोत्पत्ति न होतां, जें जिरेल तेंच खावें. अरे, जें कर्म केलें असतां धर्म, कीर्ति आणि अक्षय्य यश ह्यांपैकीं कांहींच प्राप्त न होतां शरिराला क्लेश मात्र होण्याचा संभव असतो, तें कर्म कोण बरें करील ?"

जटायूकडून रावणाला युद्धार्थ आव्हान.

जटायु म्हणतो:—"रावणा, वाडवडिलांपासून चालत आलेलें पक्षिराज्य योग्य रीतीनें चालवितां चालवितां माझ्या जन्माला साठ हजार वर्षें होऊन गेलीं. तेव्हां मी वृद्ध असून तूं तरुण आहेस; आणि धनुष्य, बाण, रथ व कवच ह्यांनीं तूं युक्त आहेस. तथापि माझ्या समक्ष सीतेला घेऊन तूं सुखरूप जाणार नाहींस. तात्पर्य, सनातन वेदश्रुतीला हेत्वाभासांच्या योगानें भलतीकडे नेण्यास ज्याप्रमाणें शास्त्री मीमांसकापुढें समर्थ होत नाहीं, त्याचप्रमाणें माझ्या समक्ष सीतेला बलात्कारानें हरण करून नेण्यास तूं समर्थ नाहींस. तस्मात् रावणा, शूर असशील तर एक क्षणभर वाट पहा आणि रामाशीं युद्ध कर. म्हणजे पूर्वी ज्याप्रमाणें खर भूमीवर मरून पडला, त्याप्रमाणें तूं भूमीवर मरून पडशील. अरे, संग्रामामध्ये ज्यानें अनेक वेळां दैत्यदानवांचा वध केला आहे, तो वल्कलें परिधान करणारा राम लवकरच युद्धामध्यें तुझा वध करील. राजपुत्र राम-लक्ष्मण तर दूर गेले आहेत. तेव्हां ह्या प्रसंगीं माझ्याच्यानें काय बरें होणार आहे ? परंतु नीचा, त्यांना भिऊन तूं लवकरच मरून जाशील, ह्यांत संशय नाहीं. कमलपत्राप्रमाणें जिचे नेत्र आहेत, अशी ही रामाची प्रिय भार्या कल्याणी सीता, मी जिवंत असतांना तुला नेतां येणार नाहीं. जीव जरी खर्ची पडला, तरी त्या महात्म्या रामाला आणि त्याचप्रमाणें दशरथाला प्रिय होणारी गोष्ट मला अवश्यच केली पाहिजे. वास्तव हे दशकंठा, थांब, एक क्षणभर धीर धर, म्हणजे देठापासून ज्याप्रमाणें फळ गळून पडतें, त्याप्रमाणें मी तुला उत्कृष्ट रथापासून खालीं पाडितों आणि युद्धरूप पाहुणचारानें तुझें यथाशक्ति स्वागत करितों."

सर्ग एकावन्नावा.

रावण व जटायु यांचें युद्ध.

ह्याप्रमाणें जटायु बोलला असतां त्या राक्षसाधिपतीला तें सहन झालें नाहीं. तेव्हां उत्कृष्ट सुवर्णाचीं कुंडलें धारण केलेला तो रावण क्रोधानें डोळे लाल करून त्या पक्षिराजावर सत्वर चालून गेला; आणि वायूनें प्रेरित झालेल्या मेघांचें ज्याप्रमाणें आकाशामध्यें परस्पराशीं युद्ध होतें, त्याप्रमाणें त्या महासंग्रामामध्यें त्या उभयतांचें तुमुल युद्ध सुरू झालें. पक्षांनीं युक्त असलेल्या दोन मौल्यवान महापर्वतांमध्यें ज्याप्रमाणें परस्पर युद्ध व्हावें, त्याप्रमाणें गृध्र आणि राक्षस ह्यांमध्यें तें अद्भुत युद्ध सुरू झालें. युद्ध सुरू झाल्यावर नालीक, नाराच आणि तीक्ष्णाग्रांनीं युक्त असलेले महाभयंकर विकर्णीसंज्ञक बाण ह्यांचा रावणानें महाबलाढ्य गृध्रराजावर वर्षाव केला; आणि त्या पक्षिराज जटायूनेंहि युद्धामध्यें रावणानें सोडिलेल्या त्या बाणसमुदायांचा स्वीकार केला. इतकेंच नव्हे, परंतु त्या महाबलाढ्य श्रेष्ठ पक्ष्यानें रावणाच्या शरिरावर आपल्या तीक्ष्ण नखांनीं अनेक तऱ्हांनीं जखमा केल्या. तेव्हां मृत्यूच्या दंडाप्रमाणें भयंकर असे दहा बाण शत्रूचा वध करण्याच्या इच्छेनें रागारागानें रावणानें हातांत घेतले आणि कानापर्यंत दोरी ताणून सोडिलेले, सरळ जाणारे, घांसिलेले, तीक्ष्ण आणि भयंकर अशा शिलीमुखसंज्ञक बाणांच्या योगानें त्या महावीर्यवान रावणानें जटायूचें शरीर भेदून टाकिलें. तथापि राक्षसाच्या रथावर अश्रूंनीं नेत्र भरून आलेल्या सीतेकडे त्याचें लक्ष्य गेल्यामुळें, त्या बाणांची पर्वा न करितां तो त्या राक्षसाच्या अंगावर धावून गेला; आणि त्या महातेजस्वी श्रेष्ठ पक्ष्यानें आपल्या पायांच्या योगानें त्याचें मोत्यें आणि रत्नें ह्यांनीं सजविलेलें धनुष्य बाणासहवर्तमान मोडून टाकिलें. तेव्हां रावण क्रोधानें व्याप्त झाला, आणि त्यानें दुसरें धनुष्य घेऊन शेंकडों, हजारों बाणांचे वर्षाव जटायूवर केले. त्यामुळें बाणांच्या योगानें युद्धामध्यें व्याप्त झालेला तो पक्षिराज घरट्यांत येऊन बसलेल्या पक्ष्याप्रमाणें दिसूं लागला. असो. त्या महातेजस्वी जटायूनें आपले पंख हालवून ते बाणसमुदाय टाकून दिले, पायांच्या योगानें त्याचें प्रचंड धनुष्य तोडिलें, आणि त्या महातेजस्वी पक्षिराजानें आपल्या पक्ष्यांच्या योगानें रावणाचें तें अग्नीप्रमाणें उज्ज्वल असलेलें कवचहि उडवून दिलें. इतकेंच नव्हे, परंतु पिशाच्चासारख्या मुखांनीं आणि सुवर्णाच्या उरस्त्राणांनीं युक्त असलेले त्या रावणाचे वेगवान व

दिव्य गर्दभहि संग्रामामध्यें त्या बलाढ्य जटायूनें मारून टाकिले. नंतर दांड्या, रत्नजडित पायऱ्या व चमत्कारिक सामान ह्यांनीं युक्त असून अग्नी-प्रमाणें तेजस्वी असलेला त्याचा महारथ त्यानें तोडून टाकिला. चामरांसहवर्तमान आणि तें संभाळणाऱ्या राक्षसांसहवर्तमान पूर्णचंद्राप्रमाणें असलेलें छत्रहि त्यानें वेगा-वेगानें खालीं पाडिलें. नंतर त्या महाबलाढ्य पक्षिराजानें त्याच्या सारथ्याचें प्रचंड मस्तकहि चोंचीच्या योगानें वेगावेगानें तोडून टाकिलें. तेव्हां ज्याचें धनुष्य भग्न झालें आहे, ज्याचा रथ नाहींसा झाला आहे, ज्याच्या अश्वांचा व सारथ्याचा वध झाला आहे, असा तो रावण सीतेला घेऊन पृथ्वीवर पडला! त्यानें डाव्या हातांत सीतेचे केश धरून आणि उजवा हात कमरेखालीं घालून तिला उचलिली होती. असो. वाहनांचा वध होऊन रावण भूमीवर पडल्याचें अवलोकन करितां-क्षणीं 'शाबास शाबास' म्हणून सर्व प्राणी गृध्रराज जटायूची प्रशंसा करूं लागले. तों इतक्यांत पक्ष्यांच्या कळपाचें रक्षण करणारा जटायु म्हातारपणामुळें थकून गेला आहे, असें अवलोकन करून रावण पुनरपि आनंदित झाला, आणि सीतेला घेऊन आकाशमार्गानें प्रयाण करूं लागला. इतर सर्व साधनें नाहींतशीं होऊन फक्त खड्गच ज्याचे जवळ शिल्लक राहिला आहे, असा तो आनंदित झालेला रावण जनककन्या सीतेला अंकावर बसवून जाऊं लागला असतां, तो महातेजस्वी गृध्रराज जटायु उड्डाण करून त्याचे अंगावर धावला, आणि त्याला अडवून धरून म्हणाला, "मूढा रावणा, प्रहारासंबंधानें ज्याचे बाण वज्राची बरोबरी करणारे आहेत, अशा रामाची ही भार्या तूं खरोखर राक्षसांच्या वधाकरितां हरण करून नेत आहेस. सारांश, तृषाक्रांत झालेला पुरुष ज्या-प्रमाणें उदक प्राशन करूं लागतो, त्याचप्रमाणें मृत्यूनें ग्रस्त झालेला तूं मित्र, बांधव, अमात्य, सैन्य आणि सेवक ह्यांसहवर्तमान हें विष प्राशन करीत आहेस. जे मूढ पुरुष आपल्या कृत्यांच्या परिणामाकडे लक्ष्य देत नाहींत, ते तुझ्याप्रमाणें सत्वरच नाश पावतात. अरे, आपल्या वधाकरितां आमिष लाविलेला गळ मुखा-मध्यें घेऊन ज्याप्रमाणें मत्स्य सुटून जाण्यास समर्थ होत नाहीं, त्याचप्रमाणें कालपाशानें बद्ध झालेला तूं कोठेंहि गेलास, तरी ह्या रामाच्या तावडींतून कसा बरें सुटशील? रावणा, तूं जो ह्या आश्रमाचा अपमान केला आहेस, तो ककुत्स्थ-कुलोत्पन्न रघुवंशज राम-लक्ष्मणांना कधींहि सहन होणार नाहीं. लोकांमध्यें निंद्य ठरणारें जें हें कृत्य तूं रामाला भिऊन केलें आहेस, तो चोरांनीं स्वीकारि-लेला मार्ग आहे, वीरांनीं अवलंबन केलेला हा मार्ग नव्हे. ह्याकरितां रावणा,

जर तूं शूर असशील तर एक क्षणभर उभा राहून युद्ध कर, म्हणजे आपल्या खर नामक भ्रात्याप्रमाणें वध पावून भूमीवर शयन करशील. मृत्यूचा समय प्राप्त झाला असतां पुरुष ज्या कर्माचें अवलंबन करीत असतो, त्या पातकावह कर्माचें अवलंबन आपल्या नाशाकरितां तूं केलें आहेस. ज्याचा परिणाम चांगला नाहीं. तें कर्म–प्रत्यक्ष लोकाधिपति भगवान ब्रह्मदेवहि जरी झाला तरी–कोणता बरें कल्याणेच्छु पुरुष करण्यास प्रवृत्त होईल ?"

जटायुमरण.

ह्याप्रमाणें भाषण करून तो वीर्यवान जटायु त्या दशकंठ राक्षसाच्या मागें एकसारखा धावूं लागला; आणि दुष्ट गजावर आरूढ झालेला महात ज्याप्रमाणें अंकुशाच्या योगानें गजाला जखमा करितो, त्याचप्रमाणें तीक्ष्ण नखांच्या योगानें त्या रावणाला धरून त्याच्या शरिरावर सर्व ठिकाणीं तो जटायु जखमा करूं लागला. नखें, पक्ष आणि मुख हींच ज्याचीं आयुधें आहेत, अशा त्या जटायूनें रावणाच्या पाठीमागें चोंच भोंसकून नखांनीं त्याला जखमी केलें, आणि त्याचे केश उपटून टाकिले. ह्याप्रमाणें गृध्रराज जटायु वारंवार क्लेश देऊं लागला असतां क्रोधामुळें ओंठ फुरफुरूं लागलेला तो रावण राक्षस थरथर कांपूं लागला, व क्रोधानें व्याप्त झाल्यामुळें त्या दुःखित रावणानें डाव्या मांडीवर सीतेला घेऊन जटायूला एक चपराक मारिली. तथापि ती सहन करून शत्रूंचें दमन करणाऱ्या पक्षिराज जटायूनें आपल्या चोंचीच्या योगानें त्याचे दहाहि डावे हात तोडून टाकिले; परंतु ह्याप्रमाणें जरी त्याचे हात तुटले गेले, तरी विषयुक्त ज्वालासमुदाय ज्यांच्या मुखांतून निघत आहेत, असे सर्प ज्याप्रमाणें वारुळांतून बाहेर निघतात, त्याचप्रमाणें त्या रावणाच्या बाहुरंध्रांतून एकाएकीं बाहु निघाले. तेव्हां वीर्यवान दशकंठ रावण सीतेला सोडून देऊन रागारागानें त्या गृध्रराज जटायूला लाथाबुक्या मारूं लागला असतां ज्याच्या सामर्थ्याला तुलना नाहीं, अशा त्या राक्षसश्रेष्ठ रावण आणि पक्षिश्रेष्ठ जटायु यांमध्यें एक मुहूर्तभर युद्ध झालें. त्या युद्धांत रामाकरितां धडपडत असलेल्या जटायूचे पंख, दोन्ही बरगड्या व पाय रावणानें तरवार उपसून तोडून टाकिले. ह्याप्रमाणें क्रूरकर्मी राक्षसानें पंख तोडून टाकिल्यामुळें तो धिप्पाड गृध्रराज कंठीं प्राण घेऊन एकाएकीं भूमीवर पडला ! जटायु पृथ्वीवर पडला आहे व त्याचें शरीर रक्तानें भरलें आहे, असें अवलोकन करितांक्षणीं ती दुःखित झालेली सीता स्वतःच्या बंधूप्रमाणें त्याच्याकडे धांवली; व नील मेघाप्रमाणें आकृति,

श्वेत वक्षस्थल आणि प्रचंड सामर्थ्य ह्यांनीं युक्त असलेला तो जटायु लंकाधिपति रावणाला शांत झालेल्या अग्नीप्रमाणें दिसूं लागला. इकडे चंद्राप्रमाणें आल्हादकारक मुखानें युक्त असलेली ती जनककन्या सीता रावणाच्या सामर्थ्यानें जर्जर होऊन भूतलावर पडलेल्या त्या पक्ष्याला पुनःपुनः कवटाळून रडूं लागली.

सर्ग बावन्नावा.

रावणाचें सीतेसह आकाशपंथें गमन.

चंद्रतुल्य मुखानें युक्त असलेली ती सीता मारिलेल्या गृध्रराज जटायूला अवलोकन करून अत्यंत दुःखित झाली, आणि आपल्याशीं विलाप करूं लागली. ती म्हणाली, " सुखाचे अथवा दुःखाचे प्रसंग यावयाचे असल्यास स्वप्न अथवा पक्ष्यांचा स्वर असें कांहीं तरी सूचक चिन्ह मनुष्यांच्या दृष्टोत्पत्तीस अवश्य येत असतें; परंतु रामा, रावणानें माझा अपहार केला आहे, हें सुचविण्याकरितां पशुपक्षी जरी धावाधाव करीत आहेत, तरी खरोखर स्वतःवर आलेलें मोठें संकट तूं जाणीत नाहींस. रामा, हा पक्षी माझें रक्षण करण्याकरितां कृपा करून येथें आला; परंतु माझ्या दुर्दैवामुळें तोहि भूमीवर मरून पडला आहे. तस्मात् हे ककुत्स्थकुलोत्पन्ना रामा, हे लक्ष्मणा, आज तुम्हीं माझें रक्षण करा."

ह्याप्रमाणें ती अतिशय त्रस्त होऊन व राम-लक्ष्मण समीप ऐकत बसले आहेत, असें समजून हळू हळू विलाप करूं लागली. जिनें धारण केलेलीं पुष्पें व भूषणें अस्ताव्यस्त झालीं आहेत, अशी ती सीता अनाथाप्रमाणें विलाप करूं लागली असतां राक्षसाधिपति रावण तिच्या अंगावर धावून गेला; तेव्हां ती सीता लतेप्रमाणें मोठमोठ्या वृक्षांना आलिंगन देऊन विळखा घालूं लागली असतां तो तिला ' सोड सोड ' असें वारंवार म्हणत तिचे समीप येऊन, रामाचा वियोग झाल्यामुळें 'राम राम' म्हणून वनामध्यें आक्रोश करीत असलेल्या सीतेचे केश, दिसण्यांत मृत्यूसारख्या असलेल्या त्या राक्षसानें आपल्या जीविताच्या नाशाकरितां धरिले. असो.

ह्याप्रमाणें रावणानें सीतेला बलात्कारानें धरिलें असतां चराचर प्राण्यांसह-वर्तमान सर्व जगत् अमर्याद होऊन निबिड अंधकारानें व्याप्त झालें. तेथें वारा वाहीनासा झाला, आणि सूर्यहि निस्तेज झाला. इकडे वैभवशाली भगवान् ब्रह्मदेव, सीतेला रावणानें धरिल्याचें अवलोकन केल्याबरोबर ' आपलें कार्य

झालें ' असें म्हणाले; आणि तेथें असलेले सर्व महर्षी आनंदित व दुःखित झाले. कारण सीतेचें संकट पाहून ते दुःख करूं लागले, आणि परिवारासह-वर्तमान रावणाचा नाश होण्याचा प्रसंग आला आहे, असें आढळून आल्यामुळे त्यांना हर्ष होऊं लागला. (कारण सीतेला रावणानें धरिलें, असें पाहून त्या दंडकारण्यनिवासी महर्षींना दुःख झालें, आणि अनायासें रावणाचा नाश होण्याचा समय आला आहे, असें आढळून आल्यामुळे त्यांना हर्ष झाला.) असो. ' रामा ! रामा ! लक्ष्मणा ! ' म्हणून ती सीता रडत असतांना तिला घेऊन राक्षसाधिपति रावण आकाशमार्गानें चालता झाला. शरिराची कांति उज्ज्वल सुवर्णभूषणांप्रमाणें असल्यामुळें, आणि स्वतः पिंवळी पैठणी नेसलेली असल्यामुळें ती राजकन्या मेघांतील विद्युल्लतेप्रमाणें दिसूं लागली. तिचें पीत वस्त्र वाऱ्यानें उडूं लागलें असतां रावणहि अग्नीच्या योगानें प्रदीप्त झालेल्या पर्वताप्रमाणें अधिकच शोभूं लागला. त्या परम कल्याणी सीतेच्या शरिरावरील आरक्तवर्ण व सुगंधीं अशीं कमळांचीं पानें रावणाचे अंगावर पडलीं. सोन्याप्रमाणें झळकत असलेलें तिचें वस्त्र आकाशामध्यें उडूं लागलें असतां तें संध्यासमयीं सूर्याच्या प्रभेनें युक्त झालेल्या ताम्रवर्ण अभ्राप्रमाणें दिसूं लागलें. रावणाच्या अंकावर असलेलें तिचें निर्मळ मुख रामाच्या वियोगामुळें आकाशामध्यें देंठ नसलेल्या कमलाप्रमाणें फारसें शोभलें नाहीं. उत्कृष्ट कपाळ, मनोहर केश, व कमलाच्या गाभ्यासारखी कांति ह्यांनीं युक्त असून व्रणरहित असलेलें तिचें मुख नील मेघाचा भेद करून त्यामध्यें उदय पावलेल्या चंद्राप्रमाणें दिसूं लागलें. तिचें मुख जरी चंद्राप्रमाणें दृष्टीला आल्हादकारक होतें, आणि सुवर्णासारखी कांति, सुंदर नासिका आणि मनोहर व ताम्रवर्ण ओष्ठ ह्यांनीं जरी तें युक्त होतें, तरी रडकें व अश्रू पुसिलेलें असल्यामुळें शोभत नव्हतें. सारांश, दिवसा उदय पावलेला चंद्र ज्याप्रमाणें शोभत नाहीं, त्याप्रमाणें राक्षसाधिपति रावणामुळें जर्जर करून टाकिलेलें तिचें शुभ मुख रामाचा वियोग झाला असल्यामुळें शोभेनासें झालें. सुवर्णासारख्या कांतीनें युक्त असलेली ती सीता नीलवर्ण राक्षसाधिपतीच्या आश्रयाला असल्यामुळें नीलगजाच्या आश्रयाला असलेल्या सुवर्णाच्या साखळदंडाप्रमाणें दिसूं लागली. कमलाच्या केसराप्रमाणें जिच्या देहाचा वर्ण आहे, सुवर्णाप्रमाणें जिची कांति आहे, आणि उज्ज्वल सुवर्णभूषणें जिनें धारण केलेलीं आहेत, अशी ती जनककन्या सीता रावणाच्या आश्रयाला असल्यामुळें मेघामध्यें प्रविष्ठ झालेल्या विद्युल्लतेप्रमाणें दिसूं

लागली. सीतेनें धारण केलेल्या भूषणांच्या ध्वनीनें राक्षसाधिपति रावण विद्युल्लतेनें युक्त असून गर्जना करणाऱ्या नील मेघाप्रमाणें दिसूं लागला.

असो. सीतेला रावण घेऊन जाऊं लागला असतां, तिच्या मस्तकामध्यें असलेल्या पुष्पांचा वर्षाव भूतलावर चोहोंकडे झाला. रावणाच्या वेगानें उत्पन्न झालेल्या वायूनें ती पुष्पवृष्टि जरी जिकडे तिकडे उडवून दिली जात होती, तरी ती एकसारखी होत असल्यामुळें पुनरपि रावणाच्या सभोंवतींच येत होती. सारांश, निर्मल नक्षत्रमाला ज्याप्रमाणें श्रेष्ठ मेरू पर्वताचे भोंवतीं फिरत असते, त्याप्रमाणें ती पुष्पवृष्टि रावणासभोंवतीं फिरत होती. जातां जातां विद्युन्मंडलाप्रमाणें तेजस्वी असलेली रत्नजडित तोरडी सीतेच्या पायांपासून सुटून भूतलावर पडली. रावण घेऊन जाऊं लागल्यामुळें अतिशयच क्रुद्ध आणि म्हणूनच वृक्षावरील नूतन पल्लवाप्रमाणें आरक्तवर्ण झालेली ती सीता, सुवर्णाची झूल ज्याप्रमाणें हत्तीला शोभा देऊं लागते, त्याप्रमाणें त्या नीलवर्ण शरिरानें युक्त असलेल्या राक्षसाधिपति रावणाला शोभा देऊं लागली. मोठ्या ज्वालेप्रमाणें आकाशामध्यें आपल्या तेजानें देदीप्यमान होत असलेल्या त्या सीतेला आकाशमार्गाचें अवलंबन करून रावण घेऊन जाऊं लागला असतां, तिच्या शरिरावर असलेलीं अग्नीसारखीं उज्ज्वल व नादयुक्त भूषणें, पुण्य क्षीण झाल्यामुळें आकाशांतून गळून पडणाऱ्या ताराकप पुण्यवान लोकांप्रमाणें गळून पडलीं. तेव्हां त्या सीतेच्या वक्षःस्थळापासून सुटलेला चंद्रासमान तेजस्वी हार खालीं पडूं लागला असतां, आकाशांतून च्युत झालेल्या गंगेप्रमाणें भासूं लागला. नानाप्रकारच्या पक्षिगणांनीं युक्त असलेल्या वृक्षांचीं अग्रें उत्पातवायूंचे तडाके बसल्यामुळें हालूं लागलीं असतां, ते वृक्ष सीतेला 'भिऊं नको' म्हणूनच सांगत आहेत कीं काय असें भासूं लागलें. रावणाच्या त्रासामुळें आंतील कमलांचा नाश होऊन मत्स्यप्रभृति जलचर प्राणी भयभीत होऊन गेले असतां सरोवरेंहि निरुत्साह झालेल्या आपल्या प्रियसखी सीतेकरितां शोकच करीत आहेत कीं काय अशीं दिसूं लागलीं. रावणविषयक क्रोधामुळें सिंह, व्याघ्र, मृग आणि पक्षी चोहोंकडून जमा होऊन सीतेच्या छायेचे मागोमाग धावूं लागले. जलप्रवाहरूप अश्रूंच्या ज्यांच्या मुखावरून धारा चालल्या आहेत, असे श्रृंगयुक्त पर्वत, सीतेला रावण घेऊन लागला असतां, आपले बाहू वर करून आक्रोश करीत आहेत, असें दिसूं लागले. सीतेला रावण नेत आहे असें अवलोकन करितांक्षणीं सूर्य दीन

झाल्यामुळें निस्तेज दिसूं लागला, आणि कांतिमान असूनहि तेजोहीन अशा पांडुरवर्ण मंडलानें तो युक्त झाला. 'अहो! ज्या अर्थीं रावण विदेही राजकन्या सीतेला हरण करून नेत आहे, त्या अर्थीं धर्म, सरळपणा आणि दया हीं राहिलींच नाहींत; मग सत्याची गोष्ट पाहिजे कशाला!' असें म्हणून सर्व प्राणी ज्ञातींचा एकत्र संघ जुळवून शोक करूं लागले, आणि त्रस्त होऊन गेलेले मृगबालकहि दीनवदन करून रोदन करूं लागले. मधुर स्वरानें युक्त असलेली सीता अशा प्रकारें दुःखांत पडली असून 'हे लक्ष्मणा! हे रामा!' असा शोक करीत आहे, आणि वारंवार भूतलाकडे पहात आहे, असें दृष्टोत्पत्तीस आल्या कारणानें भयामुळें विलक्षण झालेल्या नेत्रांनीं वारंवार वर पाहून वनदेवतांच्या शरिराला फारच कंप सुटला. जिचे केशाग्र अस्ताव्यस्त झाले असून तिलक पुसून गेलेला आहे, अशी ती बिचारी सीता आपल्या नाशाकरितां रावणानें हरण करून नेली. तेव्हां मनोहर दंत व पवित्र हास्य ह्यांनीं युक्त असलेली ती मिथिलराजकन्या स्वजनांचा वियोग झाल्यामुळें भयाच्या भाराखालीं खचून गेल्यासारखी झाली. उभयतां राम-लक्ष्मण कोठेंहि तिला दिसेनातसे झाल्यामुळें तिचें मुखहि अगदीं निस्तेज झालें.

सर्ग त्रेपन्नावा.

सीतामुखें रावणाची निर्भर्त्सना.

रावणाला आकाशमार्गानें चाललेला अवलोकन करून मोठ्या संकटांत सांपडलेली जनककन्या सीता अत्यंत उद्विग्न व दुःखित झाली. तिला तो घेऊन जाऊं लागला असतां क्रोधानें आणि रोदनामुळें जिचे नेत्र आरक्तवर्ण झाले आहेत, अशी ती सीता भयंकर नेत्रांनीं युक्त असलेल्या त्या राक्षसाधिपति रावणाला दीन वाणीनें म्हणाली, "नीचा रावणा, मी एकटी आहें असें समजून आल्यामुळें तूं माझा अपहार करून जात आहेस, ह्या कर्माची तुला लाज कशी वाटत नाहीं? अरे दुष्टा, राम-लक्ष्मणांची भीति वाटत असल्यामुळें तूंच माझा अपहार करण्याची इच्छा धरून कपटानें मृगरूप धारण केलेंस, आणि माझ्या भर्त्याला येथून दूर नेलेंस. इतकेंच नव्हे, परंतु माझ्या श्वशुराचा मित्र वृद्ध गृध्रराज माझें रक्षण करण्याकरितां उद्युक्त झाला असतांना त्याचाहि तूं वध

केलास. हे राक्षसाधमा, आपलें नांव महाशूर करून युद्धामध्यें तूं मला जिंकिलेंस, हें खरोखर तुझें मोठेंच सामर्थ्य माझ्या दृष्टोत्पत्तीस येत आहे! हँ:! अरे नीचा, स्त्रीचा अपहार—आणि त्यांतूनहि एकांत स्थळामध्यें परस्त्रीचा अपहार—अशा प्रकारचें निंद्य कर्म करण्यास तुला लाज कशी वाटत नाहीं? अरे, स्वतःला शूर समजत असलेल्या तुझें हें निंद्य कर्म अत्यंत निर्दयपणाचें व अतिशय पातकमय आहे, म्हणून लोक जगतामध्यें सांगतील. माझा अपहार करण्याचे पूर्वी तूं ज्या आपल्या शौर्याची व सामर्थ्याची माझ्यापाशीं प्रशंसा केलीस, त्या तुझ्या शौर्याला आणि सामर्थ्याला धिक्कार असो! आणि कुलाला कलंक लावणाऱ्या ह्या अशा प्रकारच्या तुझ्या वर्तनालाहि धिक्कार असो! अरे, ज्या अर्थी तूं अगदीं वेगावेगानेंच धावत चालला आहेस, त्या अर्थी अशा स्थितींत तुझा काय प्रतिकार करणें शक्य आहे? परंतु जर तूं शूर असशील, तर एक क्षणभर तरी धीर धर, म्हणजे तूं जिवंत परत जाणार नाहींस. अरे, त्या राजकुमारांच्या दृष्टीच्या टप्प्यांत आल्यावर तूं सैन्यासहवर्तमान जरी असलास, तरी एक क्षणभरहि जिवंत राहाण्यास समर्थ होणार नाहींस. फार कशाला? वनामध्यें प्रज्वलित झालेल्या अग्नीचा स्पर्श ज्याप्रमाणें पक्षी सहन करण्यास समर्थ नसतो, त्याचप्रमाणें त्यांच्या बाणांचा स्पर्श सहन करण्यास तूं कोणत्याहि प्रकारें समर्थ नाहींस. ह्यास्तव रावणा, आपल्या कल्याणाकडे लक्ष्य देऊन तूं बऱ्या विचारानें मला सोडून दे. कारण तूं जर मला न सोडशील, तर बलात्कारानें माझा अपहार झाल्यामुळें भ्रात्यासहवर्तमान क्रुद्ध झालेला माझा पति तुझ्या नाशाची तजवीज करील. हे नीचा, ज्या उद्देशानें तूं माझा बलात्कारानें अपहार करण्याची इच्छा करीत आहेस, तो तुझा उद्देश व्यर्थ होईल. कारण तो देवतुल्य भर्ता माझ्या दृष्टीआड असतांना शत्रूचे अधीन झालेल्या मला फार वेळपर्यंत प्राण धारण करून राहाण्याची इच्छा नाहीं. स्वतःला कोणती गोष्ट तत्काल अथवा परिणामीं सुखावह होणारी आहे, ह्याचा विचार तूं मुळींच करीत नाहींस. मृत्यु समीप आला असतां ज्याप्रमाणें मर्त्य जन विपरीत कृत्याचें अवलंबन करूं लागतो, त्याप्रमाणें तूं करीत आहेस. मरण जवळ आलेल्या सर्वांनाच जें हितकर असेल, तें रुचत नाहीं. तेव्हां ज्या अर्थी तूं असें हें निंद्य कर्म करीत आहेस, त्या अर्थी कालपाशाचा वेढा तुझ्या गळ्याभोंवतीं दृढ बसला आहे, असें मला वाटतें. चांडाळा, भय बाळगण्यासारखें हें कृत्य असतांनाहि ज्या अर्थी तूं भीत नाहींस, त्या अर्थी मृत्युसूचक सुवर्णमय वृक्ष तूं स्वप्नामध्यें अवलोकन

करीत असल्याचें स्पष्ट होत आहे. रावणा, रक्ताचे लोट वाहून नेणारी अशी घोर वैतरणी नदी, आणि खड्गरूप पानांनीं युक्त असलेलें भयंकर वन तूं अवलोकन करीत आहेस. लोखंडी काट्यांनीं भरलेला व उज्ज्वल सुवर्णपुष्पांनीं आणि उत्कृष्ट वैदूर्य रत्नरूप पानांनीं युक्त असलेला शाल्मलिसंज्ञक तीक्ष्ण वृक्ष तूं अवलोकन करूं लागशील. हे निर्दया, विष प्राशन केल्यावर ज्याप्रमाणें फार वेळ जीव धरून राहातां येणें शक्य नाहीं, त्याचप्रमाणें त्या महात्म्या रामाचा अशा प्रकारचा अपराध करून तुला फार वेळ जिवंत राहातां येणार नाहीं. रावणा, तूं खरोखर निवारण होण्यास अशक्य अशा कालपाशानें बद्ध झाला आहेस. माझ्या भर्त्याचा अपराध केल्यावर तूं कोठें जरी गेलास, तरी तुला सुख कोठून प्राप्त होणार आहे ? अरे, फक्त एका निमिषांतच भ्रात्याच्या मदतीवांचून युद्धामध्यें ज्यानें चौदा हजार राक्षसांचा वध केला, तो सर्व अस्त्रांमध्यें निपुण व बलाढ्य असलेला रघुवंशज वीर राम प्रिय भार्येचा अपहार करणाऱ्या तुझा तीक्ष्ण बाणांनीं कसा बरें वध करणार नाहीं ? "

असो. रावणाच्या तावडींत सांपडलेली सीता भय आणि शोक ह्यांनीं व्याकुळ होऊन करुण स्वरानें विलाप करूं लागली, आणि सुटून जाण्याकरितां धडपड करूं लागली; तथापि रावण तिला घेऊन गेलाच !

सर्ग चोपन्नावा.

रावणाचें सीतेसह लंकेंत गमन.

सीतेला रावण घेऊन चालला असतां कोणीहि त्राता जेव्हां तिच्या दृष्टीस पडेना, तेव्हां एका पर्वतशिखरावर बसलेले पांच श्रेष्ठ वानर तिनें अवलोकन केले. तेव्हां तिनें जातां जातां सुवर्णाप्रमाणें झळकत असलेला शेला आणि शुभ्र भूषणें त्या वानरांमध्यें टाकून दिलीं. हेतु हा कीं, हे तरी रामाला ही बातमी कळवितील ! परंतु शरिरावरून वस्त्र काढून सीतेसहवर्तमान त्या वानरांमध्यें टाकून दिलें, हें कृत्य लगबगीमुळें रावणाला समजलें नाहीं. ज्यांच्या नेत्रांचा वर्ण पिंगट आहे, असे ते श्रेष्ठ वानर त्या आक्रोश करीत असलेल्या सीतेकडे डोळ्याचें पातेंहि न लववितां टक लावून पाहूं लागले, व तो राक्षसाधिपति रावण रोदन करीत असलेल्या सीतेला घेऊन पंपा सरोवर ओलांडिल्यावर लंका नगरीकडे तोंड करून चालला. तीक्ष्ण दंष्ट्रा आणि जळाळ विष ह्यांनीं युक्त

असलेल्या नागिणीला कडेवर घेऊन जाणाऱ्या पुरुषाप्रमाणें रावण आपल्या मृत्युरूप सीतेला अतिशय आनंदित होऊन घेऊन गेला. धनुष्यापासून सुटलेल्या बाणाप्रमाणें तो रावण सत्वरच वनें, नद्या, पर्वत आणि सरोवरें आकाशमार्गानें ओलांडून चालता झाला; आणि तिमि नामक मत्स्य आणि नक्र ह्यांचें वसतिस्थान, वरुणाचें अक्षय्य निवासस्थान आणि नद्यांचें आश्रयस्थान असा सागर ओलांडून गेला; परंतु सीतेला घेऊन तो जाऊं लागला असतां, समुद्र गोंधळून गेल्यामुळें, त्यांत पूर्वींप्रमाणे लाटा होतनाशा झाल्या, आणि आंत असलेले मत्स्य व महोरगहि स्तिमित झाले. अंतरिक्षामध्यें असलेले चारण व सिद्ध आपापल्यांत बोलूं लागले कीं, 'ह्या कृत्यामुळें रावणाचा अंत होणार!'

असो. सुटून जाण्याकरितां तडफड करीत असलेल्या त्या सीतेला म्हणजे अर्थात् आपल्या मूर्तिमंत मृत्यूला कडेवर घेऊन रावण लंका नगरीमध्यें प्रविष्ट झाला, आणि मोठमोठे रुंद मार्ग व पुष्कळ लोकांची जेथें गर्दी झाली आहे, अशा वेशी ह्यांनीं युक्त असलेल्या आपल्या विशाल नगरीमध्यें गेल्यावर रावण आपल्या अंतःपुरामध्यें प्रविष्ठ झाला. नंतर कृष्णवर्ण नेत्रप्रांतांनीं युक्त असून शोक व मोह यांनीं युक्त झालेली ही सीता रावणानें राक्षसी माया ठेवणाऱ्या मयासुराप्रमाणें तेथें ठेविली. दिसण्यांतहि भयंकर अशा ज्या राक्षसी तेथें होत्या, त्यांना तो म्हणाला, "माझ्या आज्ञेवांचून ही सीता कोणत्याहि पुरुषाच्या अथवा स्त्रीच्याहि दृष्टीस पडणार नाहीं, अशा रीतीनें तुम्ही हिचें रक्षण करा. मोत्यें, रत्नें आणि सुवर्ण ह्यांचीं भूषणें व वस्त्रें ह्यांपैकीं ज्याची ज्याची इच्छा हिला होईल, तें तें तुम्ही त्याच वेळेस हिला देत जा, अशी माझी तुम्हांला आज्ञा आहे. समजून उमजून अथवा चुकून जी कोणी सीतेशीं अप्रिय भाषण करील, तिला आपलें जीवित प्रिय नाहीं, असें समजावें."

गुप्त हेरांची जनस्थानीं योजना.

ह्याप्रमाणें त्या राक्षसींना सांगून तो त्या अंतःपुरांतून बाहेर पडला, आणि 'आतां काय करावें' म्हणून चिंतन करूं लागला; तों मोठे बलाढ्य व मांसभक्षक असे आठ राक्षस त्यानें अवलोकन केले. त्यांना अवलोकन करितांच ब्रह्मदेवाच्या वरदानामुळें मोहित झालेला तो महावीर्यवान रावण बल व वीर्य ह्यांसंबंधानें त्यांची प्रशंसा करून त्यांना म्हणाला, "नानाप्रकारचीं आयुधें घेऊन तुम्ही सत्वर येथून जनस्थानाकडे जा. कारण तें पूर्वीं खराचें निवास-

स्थान असून सांप्रत रामानें निर्जन करून टाकिलें आहे. तुम्ही शरीरबलाचें अवलंबन करून भीति दूर सोडून द्या, आणि राक्षसांचा वध झाल्यामुळें शून्य झालेल्या जनस्थानांत जाऊन राहा. अहो, जनस्थानामध्यें महापराक्रमी असें पुष्कळच सैन्य ठेविलेलें होतें; तथापि दूषण आणि खर ह्यांसहवर्तमान तें सैन्य रामबाणांच्या योगानें युद्धामध्यें मरण पावलें. त्या दिवसापासून धैर्यापेक्षांहि माझे ठिकाणीं एकसारखा अपूर्व क्रोध वृद्धिंगत होत आहे, आणि रामासंबंधानें फारच भयंकर असें अतिप्रचंड वैर माझ्या मनामध्यें उत्पन्न झालें आहे. ह्या प्रबल शत्रूसंबंधानें मनामध्यें असलेल्या त्या वैराचा शेवट करण्याची माझी इच्छा आहे, आणि ह्यामुळें युद्धामध्यें शत्रूचा वध केल्यावांचून मला निद्रा येणें शक्य नाहीं. तस्मात्, धनप्राप्ति झाली असतां निर्धनाला ज्याप्रमाणें सुख होतें, त्याप्रमाणें खर आणि दूषण ह्यांचा घात करणाऱ्या रामाचा आतां वध केल्यावर मला सुख होईल. तेव्हां राम काय करीत आहे, अशा प्रकारची त्याच्यासंबंधानें असलेली खरी खरी बातमी जनस्थानामध्यें राहून तुम्ही माझ्याकडे पाठवीत जा. सर्व राक्षसांनीं बेसावध न होतां तिकडे जावें, आणि रघुवंशज रामाच्या वधाविषयीं नेहमीं यत्न करावा. अरे, संग्रामामध्यें पुष्कळ वेळां तुमचें बल माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें आहे, म्हणूनच आतां ह्या जनस्थानांत मीं तुमची योजना केली आहे."

ह्याप्रमाणें गंभीर अर्थानें युक्त असलेल्या त्या प्रिय भाषणाला आठहि राक्षसांनीं मान दिला, आणि रावणाला अभिवंदन करून व लंका सोडून कोणाच्या दृष्टीस न पडतां एकत्र जुळून ते जनस्थानाकडे चालते झाले. असो. सीता हातीं आल्यावर तिला घरांत नेऊन ठेविल्यामुळें रावणाला अतिशय हर्ष झाला, आणि ह्यामुळें रामाशीं जरी त्या रावणानें अनिर्वचनीय वैर संपादन केलें होतें, तरी मोहामुळें तो त्यांत आनंदच मानूं लागला.

सर्ग पंचावन्नावा.

सीतेची मनधरणी.

ह्याप्रमाणें त्या आठ महाबलाढ्य घोर राक्षसांना आज्ञा केल्यावर रावण बुद्धिभ्रंशामुळें स्वतःला कृतकृत्य मानूं लागला. कामबाणांनीं व्याकुल झाल्यामुळें सीतेचें चिंतन करीत करीत तो तिला अवलोकन करण्याकरितां त्वरेनें

त्या रम्य गृहामध्यें गेला. त्या गृहांत प्रविष्ट झाल्यावर त्या राक्षसाधिपति रावणानें त्या राक्षसींमध्यें असलेली सीता अवलोकन केली. त्या वेळीं ती केवळ दुःखाचाच आश्रय करून राहिलेली होती. अश्रूंच्या योगानें तिचें मुख भरून गेलेलें होतें. ती अगदीं दीन झालेली होती. शोकाच्या भरानें अगदीं खचून गेल्यामुळें वायुवेगानें ग्रस्त आणि म्हणूनच समुद्रामध्यें मग्न होत असलेल्या नावेप्रमाणें तिची अवस्था झालेली होती. हरणांच्या कळपांतून चुकल्यामुळें कुत्र्यांनीं घेरिलेल्या हरिणीप्रमाणें ती दिसत होती, आणि मान खालीं घालून ती बसली होती. असो. तो राक्षस तिचे समीप गेला, व त्यानें पराधीन व शोकाकुल झाल्यामुळें दीन झालेल्या त्या सीतेला बलात्कारानें देवगृहाप्रमाणें असलेलें आपलें गृह दाखविलें. त्या गृहाच्या भोंवतालीं श्रीमंत लोकांच्या वाड्यांची व राजवाड्यांची गर्दी झालेली होती. हजारों स्त्रियांनीं त्याचा आश्रय केलेला होता. नानाप्रकारचे पक्षिसमुदाय तेथें राहात होते. तऱ्हेतऱ्हेचीं रत्नें त्यामध्यें होतीं. हिरे व वैदूर्य मणी जडलेले असल्यामुळें चित्रविचित्र आणि म्हणूनच दृष्टीलाहि रम्य अशा हस्तिदंति, सुवर्णमय, स्फटिकमय व रौप्यमय स्तंभांनीं तें युक्त होतें. दिव्य दुंदुभींचा घोष तेथें चालला होता, आणि सुवर्णाच्या अलंकारांनीं तें सजविलें होतें. अशा प्रकारचें आपलें घर सीतेला दाखविल्यानंतर तिच्यासहवर्तमान तो त्यांतील एक अद्भुत सोनेरी जिना चढून वर गेला. त्या घराला असलेल्या हस्तिदंति व रुप्याच्या खिडक्या दिसण्यांत मनोहर होत्या, आणि त्याच्याभोंवतीं असलेल्या राजवाड्यांच्या ओळी सुवर्णमय जाळ्यांनीं आच्छादित झालेल्या होत्या. असो. सफेती आणि रत्नें ह्यांच्या योगानें विचित्र दिसत असलेले आपल्या घरांतील सर्व भूप्रदेश रावणानें सीतेला दाखविले. त्याचप्रमाणें नानाप्रकारच्या पुष्पांनीं व्याप्त झालेल्या पुष्करणी व वापीहि त्यानें दाखविल्या.

ह्याप्रमाणें आपलें तें सर्व उत्कृष्ट गृह सीतेला दाखविल्यावर तो पापबुद्धि रावण सीतेला लुब्ध करून टाकण्याच्या इच्छेनें म्हणाला, "वृद्ध व अल्पवयी राक्षसजन सोडून दिले, तरी दुसरे बत्तीस कोट राक्षस येथें आहेत, आणि क्रूर कर्म करणाऱ्या त्या सर्व राक्षसांचा मी अधिपति आहें. इतकेंच नव्हे, परंतु माझ्या कार्याविषयीं पुढाकार घेणारे हजार हजार राक्षस त्या बत्तीस हजारांपैकीं प्रत्येक राक्षसाच्या हाताखालीं आहेत. हे विशालनयने, राज्यासंबंधीं जें जें म्हणून कांहीं आहे, तें सर्व तुझ्या अधीन असून माझें जीवितहि तुझ्याच अधीन आहे. कारण तूं मला माझ्या प्राणापेक्षांहि श्रेष्ठ आहेस. हे प्रिये सीते, तूं माझी भार्या

हो, आणि माझ्या भार्या म्हणून ज्या कांहीं इतर पुष्कळ उत्कृष्ठ स्त्रिया आहेत, त्यांची मालकीण हो. ह्याशिवाय भलतीच गोष्ट मनांत आणून तुला कांहींएक उपयोग होणार नाहीं. तस्मात् हितकारक अशा माझ्या भाषणाला तूं मान दे, माझा अंगीकार कर आणि मदनानें संतप्त झालेल्या मजवर तूं कृपा कर. शंभर योजनें लांब असलेली ही लंका समुद्रानें परिवेष्टित असल्यामुळें इंद्रासहवर्तमान देवदैत्य जरी आले, तरी त्यांच्यानेंहि हिच्यावर हल्ला होणें शक्य नाहीं; मग राम तर येथें येण्याची गेष्ट पाहिजे कशाला? देव, यक्ष, गंधर्व, ऋषी आणि मानव ह्यांमध्यें वीर्यानें माझी बरोबरी करणारा मला कोणीहि दिसत नाहीं. तेव्हां राज्यापासून भ्रष्ट, दीन, शोचनीय, अशक्त आणि पादचारी अशा मानव रामाशीं तुला काय कर्तव्य आहे? सीते, तूं माझाच अंगीकार कर. मी तला योग्य पति आहें. अग भित्रे, यौवन अस्थिर आहे. ह्यास्तव, तूं आतां व्यर्थ काल-क्षेप न करितां ह्या ठिकाणीं माझ्यासहवर्तमान रममाण हो. हे सुमुखि, रघुवंशज रामाच्या दर्शनाची इच्छा करूं नको. कारण सीते, मनो-रथांच्या योगानें तरी येथें येण्याचें त्याचें काय सामर्थ्य लागून गेलें आहे? महा-वेगवान वायूला आकाशामध्यें पाशांनीं बद्ध करणें, अथवा देदीप्यमान अग्नीच्या निर्मल ज्वाला धरून ठेवणें ज्याप्रमाणें अशक्य आहे, त्याचप्रमाणें रामाचें आगमन येथें होणें अशक्य आहे. हे कल्याणि, माझ्या बाहूंच्या योगानें तूं सुरक्षित असतांना पराक्रम करून तुला घेऊन जाणारा त्रैलोक्या-मध्येंहि मला कोणी दिसत नाहीं. लंकेच्या ह्या अति विस्तीर्ण राज्याचें तूंच परिपालन कर. तूं जर माझा अंगीकार करशील, तर माझ्यासारखे तुझे दास होतील व देवहि तुझ्या आज्ञेत राहातील. इतकेंच नव्हे, परंतु सर्व चराचर जगत् तुझें दास्यत्व पत्करून राहील. तूं आतां अगदीं सुकून गेली आहेस. तेव्हां श्रमनिवृत्ति व्हावी, एतदर्थ न्हाण्याकरितां आणिलेल्या उदकानें आर्द्र हो, आणि संतुष्ट राहून माझ्याशीं रममाण हो. पूर्वीं जें कांहीं पातक तुझ्या हातून झालें होतें, त्याचें अनिष्ट फल वनवासाच्या योगानें संपून गेलें आहे. तुझ्या हातून जें कांहीं पुण्यकर्म घडलें असेल, त्याच्या फलाचा आतां येथें उपभोग घे. हे मिथिलराजकन्ये, दिव्य दिव्य गंधांनीं युक्त असलेलीं सर्व प्रकारचीं पुष्पें आणि मुख्य मुख्य भूषणें येथें आहेत, त्यांचा तूं माझ्यासहवर्तमान उपभोग घे. हे सुंदरि, मी आपल्या वैश्रवण नामक भ्रात्याचें सूर्यासमान तेजस्वी असलेलें पुष्पक नामक विमान संग्रहामध्यें स्वसामर्थ्यानें जिंकून आणिलें

आहे; आणि तें विमान विस्तृत व रमणीय असून त्याची गति मनाप्रमाणें शीघ्र आहे. ह्यास्तव सीते, त्या विमानामध्यें तूं माझ्यासहवर्तमान यथेष्ट क्रीडा कर. हे सुंदरि, हे सुमुखि, कमलतुल्य व निर्मल असल्यामुळें दिसण्यांतहि मनोहर असलेलें तुझें मुख शोकाकुल झाल्या कारणानें झळकेनासें झालें आहे.

ह्याप्रमाणें तो रावण भाषण करूं लागला असतां तोंडावर पदर घेऊन सीता हळू हळू अश्रू ढाळूं लागली. तेव्हां शोकानें अस्वस्थ व काळजीनें निस्तेज झालेली ती सीता चिंताक्रांत होऊन बसली असतां रावण तिला म्हणाला, "सीते, स्वभर्तृत्यागपूर्वक परपुरुषस्वीकाररूप धर्मलोपामुळें उत्पन्न झालेली लज्जा आतां पुरे. हे देवि, तुझा माझा जो हा संबंध झाला आहे व होणार आहे, तो वेदमूलकच आहे. कारण बलात्कारानें स्त्री हरण करून आणणें हा राक्षसविधि विवाहविधीमध्यें उक्त आहे. तुझ्या ह्या तुळतुळीत पायांवर मीं आपलीं मस्तकें ठेविलीं आहेत. ह्यास्तव तूं मजवर सत्वर कृपा कर. मी तुझ्या हुकुमाप्रमाणें वागणारा तुझा दास आहें. तेव्हां कामपीडित होऊन मी जे हे शब्द बोललों आहें, ते व्यर्थ न होतील असें कर. रावण मस्तकानें कोणत्याहि स्त्रीला प्रणाम करणार नाहीं."

ह्याप्रमाणें तो रावण राजकन्या सीतेला म्हणाला, आणि मृत्यूचे तावडींत सांपडला असल्यामुळें 'ही माझी आहे' असें म्हणूं लागला.

सर्ग छपन्नावा.

सीतामुखें रावणाचा धिक्कार.

ह्याप्रमाणें रावणानें शोकाकुल झालेल्या सीतेशीं भाषण केलें असतां, ती सीता तृण आड धरून निर्भयपणें रावणाला म्हणाली, "धर्माचा अचल सेतुच कीं काय असा दशरथ म्हणून एक राजा होऊन गेला. त्याचा तो राम पुत्र असून सत्यवचनी म्हणून प्रसिद्ध आहे. तो धर्मात्मा राम आजानुबाहु व विशाल-नयन असून त्रैलोक्यामध्यें प्रसिद्ध आहे; आणि तोच माझा पति व दैवत आहे. इक्ष्वाकुकुलामध्यें तो उत्पन्न झाला आहे. त्याचे स्कंध सिंहासारखे विशाल आहेत तो महातेजस्वी आहे, आणि भ्रात्या लक्ष्मणासहवर्तमान तोच तुझे प्राण हरण करील. त्याच्या समक्ष जर तूं बलात्कारानें माझ्यावर हल्ला केला असतास,

तर जनस्थानामध्यें वध पावलेल्या खरा .माणें तूं युद्धामध्यें वध होऊन पडला असतास. तूं जे हे राक्षस भयंकर व महाबलाढ्य म्हणून सांगितलेस, ते सर्व, गरुडाची गांठ पडली असतां निर्विष होणाऱ्या सर्पाप्रमाणें रामाची गांठ पडली असतां निरुपद्रवी होतील; आणि त्याच्या प्रत्यंचेपासून सुटलेले सुवर्णभूषित बाण, ज्याप्रमाणें लाटा गंगेचें तीर उडवून देतात, त्याप्रमाणें तुझें शरीर उडवून देतील. रावणा, दैत्यांच्या हातून अथवा देवांच्या हातून जरी तुझा वध होणें शक्य नसलें, तरी रामाशीं तूं फार मोठें वैर उत्पन्न केलें असल्यामुळें त्याच्या हातून तूं जिवंत सुटणार नाहींस. तो बलाढ्य राम तुझ्या अवशिष्ट राहिलेल्या जीविताचा अंत करणारा आहे. सारांश, यज्ञस्तंभाला बद्ध झालेल्या पशूच्या जीविताप्रमाणें तुझें जीवित दुर्लभ आहे. अरे, क्रोधाग्नीनें प्रदीप्त झालेली त्या रामाची दृष्टि जर तुझ्यावर गेली, तर रुद्राच्या योगानें जळून खाक झालेल्या मदनाप्रमाणें तूं पूर्णपणें दग्ध होऊन जाशील. अरे, प्रसंग पडला असतां जो चंद्राला आकाशापासून भूमीवर पाडील, किंवा त्याचा नाशहि करील, अथवा समुद्र शुष्क करून टाकील, तो येथें असलेल्या सीतेचीहि सुटका करीलच करील. तुझें वैभव, बल, इंद्रियें आणि प्राण हीं सर्व नष्ट होऊन तूं केलेल्या अपराधामुळें लंका वैधव्ययुक्त होईल. ज्या अर्थी बलात्कारानें तूं पतीपासून माझा वियोग केला आहेस, त्या अर्थी तुझ्या ह्या पापकर्माचा परिणाम चांगला होणार नाहीं. केवळ वीर्याचें अवलंबन करून तो माझा महातेजस्वी भर्ता निर्जन अशा दंडकारण्यामध्यें माझ्या दिरासहवर्तमान निर्भयपणें वास्तव्य करीत आहे. तो युद्धामध्यें बाणवृष्टीच्या योगानें तुझ्या शरिरापासून तुझा पराक्रम, शरिरबल, मद आणि अमर्यादपणा हीं सर्व काढून टाकील. जेव्हां कालाच्या प्रेरणेप्रमाणें प्राण्यांचा नाश होण्याचा समय दिसत असतो, तेव्हां कालाच्या अधीन झालेल्या लोकांची बुद्धि कर्तव्यासंबंधानें विपरीत होत असते. हे राक्षसाधमा, माझ्याशीं अतिप्रसंग करून ज्या अर्थी तूं येथें राहिला आहेस, त्या अर्थी तूं स्वतः आणि तुझें अंतःपुर ह्या सर्वांचा नाश होण्याचा तो हा समय आला आहे. कारण ज्याप्रमाणें स्रुचिप्रभृति पात्रांनीं भूषित आणि ब्राह्मणांनीं म्हटलेल्या मंत्रांनीं पवित्र झालेल्या यज्ञामधील वेदीला चांडालाचा स्पर्श होणें शक्य नसतें, त्याचप्रमाणें नित्य धर्माचेंच अवलंबन करून असलेल्या रामाची जी मी पातिव्रत्यरूप दृढ व्रत धारण करणारी धर्मपत्नी, तिला तुज पाप्याचा स्पर्श होणें शक्य नाहीं. कारण कमलाच्या समुदायांमध्यें नेहमीं राजहंसाबरोबर क्रीडा करणारी जी

हंसी, ती तृणामध्यें बसलेल्या पाणकोंबड्याला कोठून अवलोकन करणार? हे राक्षसा, तूं ह्या जड शरिराला बांध अथवा मारून टाक. ह्या शरिराचें रक्षण मला कर्तव्य नाहीं. तेव्हां ह्याचें कांहीं जरी झालें, तरी पृथ्वीवर सीता गैरचालीची निघाली, अशा प्रकारची आपली निंदा होऊं देणें मनाला योग्य नाहीं."

ह्याप्रमाणें क्रोधामुळें रावणाशीं फारच कठोर भाषण करून सीता स्वस्थ बसली. पुन: तिनें त्याच्याशीं कांहींएक भाषण केलें नाहीं. असो. शरिरावर रोमांच उठविणारें असें भाषण श्रवण केल्यावर रावण भयदर्शक शब्दांनीं तिला म्हणाला, " सीते, माझें म्हणणें ऐक. मी बारा महिनेपर्यंत वाट पाहीन; आणि इतक्या वेळामध्यें जर तूं माझा अंगीकार न करशील, तर न्याहारीकरितां आचारी तुझे तिळाएवढाले तुकडे करून टाकतील."

शत्रूंना रडविणारा तो क्रुद्ध रावण ह्याप्रमाणें सीतेशीं कठोर भाषण करून राक्षसींना म्हणाला, " राक्षसस्त्रियांनो, मांस व रक्त सेवन करणाऱ्या आणि दिसण्यामध्येंहि भयंकर असून अक्राळविक्राळ असलेल्य तुम्ही हिच्या गर्वाचा सत्वरच परिहार करा."

सीतेला अशोकवनांत ठेवणें.

असो. त्यानें असें सांगितलें असतां त्याच्या सांगण्याप्रमाणेंच दिसण्यांतहि भयंकर असलेल्या त्या अतिक्रूर राक्षसस्त्रिया रावणाकडे हात जोडून व सीतेच्या भोंवतीं गराडा देऊन उभ्या राहिल्या. तेव्हां तो राजा रावण दोन तीन पावलें चालला, आणि जोराजोरानें पावलें उचलिल्यामुळें पृथ्वी विदारणच करून टाकीत आहे कीं काय अशा रीतीनें भासूं लागलेला तो रावण उग्र स्वरूप धारण करणाऱ्या त्या राक्षसस्त्रियांना म्हणाला, " सीतेला अशोक वनामध्यें नेली पाहिजे, आणि तेथें तुम्ही एकसारखा हिच्याभोंवतीं गराडा देऊन हिचें अगदीं गुप्तपणें रक्षण केलें पाहिजे. सारांश, अरण्यांतील हत्तिणीला ज्याप्रमाणें हस्तगत करून घेतात, त्याप्रमाणें त्या ठिकाणीं भयंकर धमक्या देऊन आणि चुचकारून चुचकारून तुम्ही हिला वश करून घ्या."

ह्याप्रमाणें रावणानें त्या राक्षसींना आज्ञा केल्यावर त्या राक्षसी सीतेला घेऊन अशोक वनामध्यें गेल्या. नानाप्रकारचीं पुष्पें व फलें धारण करणाऱ्या कल्पवृक्षांनीं तें वन व्याप्त झालें असून सर्वदा मत्त असलेल्या पक्ष्यांनीं त्याचा आश्रय केलेला होता. असो. रामवियोगामुळें व्याकुल झालेली सीता राक्षसींच्या तावडींत सांपडली असतां वाघिणींच्या तावडींत सांपडलेल्या हरिणीप्रमाणें

तिची स्थिति झाली. प्रचंड शोकानें ती अगदीं त्रस्त झाली, आणि जाळ्यांत अडकलेल्या हरिणीप्रमाणें भीतियुक्त झालेल्या त्या सीतेला कशापासूनहि सुख होईनासें झालें. सारांश, भयंकर नेत्रांनीं युक्त असलेल्या राक्षसस्त्रिया तिला अतिशयच धमक्या देऊं लागल्या असतां सीतेला त्या ठिकाणीं सुख कसलें तें मिळालेंच नाहीं. इतकेंच नव्हे, परंतु प्रिय पति आणि दीर ह्यांचें स्मरण होत असल्यामुळें भय व शोक ह्यांनीं व्याप्त झालेल्या त्या सीतेला भानहि नाहींसें झालें.

प्रक्षिप्त सर्ग.

इंद्रदत्तपायसभक्षण.

रावण सीतेला लंकेमध्यें घेऊन गेला असतां संतुष्ट असलेल्या देवराज इंद्राला ब्रह्मदेव म्हणाला, "त्रैलोक्याच्या कल्याणाकरितां आणि राक्षसांच्या अकल्याणाकरितां दुरात्म्या रावणानें सीतेला लंकेमध्यें नेलें आहे. ती महाभाग्यवती पतिव्रता नेहमीं सुखामध्यें वाढलेली आहे. तथापि सांप्रत भर्ता तिच्या दृष्टोत्पत्तीस न येतां राक्षसस्त्रियाच ती अवलोकन करीत आहे. कारण पतीच्या दर्शनाविषयीं उत्सुक असलेल्या त्या सीतेला राक्षसस्त्रियांनीं घेरून टाकिलें आहे. बरें लंका पाहावी तर समुद्राचे तीरीं वसलेली आहे. तेव्हां त्या ठिकाणीं असलेल्या त्या निर्दोष सीतेची बातमी रामाला कशी लागेल? एकसारखें दुःखच मनामध्यें आणीत असलेली ती सीता जीव जगण्यास अवश्य असलेलें अन्नपानहि सेवन न करितां निःसंशय प्राणत्याग करील, आणि म्हणूनच रामाला सर्वस्वी दुर्लभ होईल. ह्यास्तव ज्या अर्थी सीतेचे प्राण जातात कीं काय असा संशय पुनरपि उत्पन्न झाला आहे, त्या अर्थी तूं येथून निघून जाऊन शुभ मुखानें युक्त असलेल्या सीतेला अवलोकन कर, आणि लंका नगरीमध्यें प्रवेश करून तिला उत्कृष्ट हवि अर्पण कर."

ह्याप्रमाणें ब्रह्मदेवानें देवराज इंद्राला सांगितलें असतां भगवान इंद्र निद्रेला बरोबर घेऊन त्या रावणरक्षित लंका नगरीमध्यें आला, आणि निद्रेला म्हणाला, 'तूं जा, आणि राक्षसांना मोह पाड.' ह्याप्रमाणें इंद्रानें सांगितलें असतां निद्रादेवीला अत्यंत हर्ष झाला, आणि देवांचें कार्य शेवटास जावें एतदर्थ तिनें

१ पृष्ठ ४२५ टीप पहा.

राक्षस मोहित केले. इतक्यामध्यें इंद्र अशोकवनामध्यें असलेल्या सीतेसमीप जाऊन तिला म्हणाला, "हे सुहास्यवदने, तुझें कल्याण असो. मी देवराज इंद्र असून ह्या ठिकाणीं मुद्दाम आलों आहें. देवांचें कार्य सिद्धीस नेण्याकरितां महात्म्या रघुवंशज रामाला साह्याय्य करण्याची मी तजवीज करीन. ह्यास्तव हे जनककन्ये, तूं शोक करूं नको. माझ्या प्रसादामुळें तो राम सैन्यासहवर्तमान समुद्र तरून जाईल. हे कल्याणि, ह्या ठिकाणीं असलेल्या राक्षसस्त्रियांना मींच मोह पाडिलेला आहे. हे विदेहराजकन्ये सीते, मी तुझ्याकरितां हें हविष्यान्न स्वतः घेऊन निद्रेसहवर्तमान येथें आलों. हे कल्याणि, जर तूं हें भक्षण करशील, तर लाखों वर्षें लोटली तरी तुला क्षुधेपासून अथवा तृषेपासून पीडा होणार नाहीं."

ह्याप्रमाणें इंद्रानें सांगितलें असतांहि संशययुक्त असलेली ती सीता त्याला म्हणाली, "तूं येथें शचीपति इंद्रच आला आहेस, हें मीं कशावरून समजावें? हे देवाधिपते, तूं जर स्वतः देवराज असशील, तर राम-लक्ष्मणांसमीप जीं देवांचीं चिन्हें माझ्या दृष्टोत्पत्तीस आलेलीं आहेत, तीं तूं स्वतःचे ठिकाणीं असलेलीं दाखीव."

हें सीतेचें भाषण श्रवण करितांक्षणीं इंद्रानें तसें केलें. त्याच्या पायांचा पृथ्वीला स्पर्श होईनासा झाला. नेत्रांच्या पापण्या लवेनातशा झाल्या. त्याचें वस्त्र निर्मळ झालें, व पुष्पेंहि टवटवीत झालीं. ह्या लक्षणांवरून तो इंद्र आहे, असें जेव्हां सीतेला समजून आलें, तेव्हां तिला अतिशय हर्ष झाला. नंतर भगवान रघुवंशज रामासंबंधानें ती रडत रडत त्याला म्हणाली, "सुदैवानें भ्रात्यासहवर्तमान पतीची वार्ता माझ्या कानावर आली आहे. माझा पति आज आपल्यामुळें सनाथ झाला आहे. ह्यास्तव माझे श्वशुर दशरथ महाराज अथवा मिथिलाधिपति जनकराज ह्यांचेंच आगमन आज येथें झालें, असें मी समजत आहें. हे देवराज, रघुवंशजांचें कुल वृद्धिंगत करणारें असें हें आपण दिलेलें दुग्धरूप हविष्यान्न आपल्या आज्ञेनें मी भक्षण करीन."

असें म्हणून तिनें तें पायस इंद्राच्या हातांतून घेतलें. प्रथमतः तें मनानें आपल्या भर्त्याला व लक्ष्मणाला अर्पण केलें, आणि नंतर भ्रात्यासहवर्तमान 'माझा महाबलाढ्य भर्ता जर जीवमान असेल, तर हें पायस त्याला अर्पण होवो' असें म्हणून त्यांच्या भक्तीनें तिनें तें पायस ग्रहण केलें. ह्याप्रमाणें तिनें तें हविष्यान्न भक्षण केल्यावर क्षुधा व तृषा ह्यासंबंधानें दुःखाचाहि त्याग केला,

आणि ककुत्स्थकुलोत्पन्न राम-लक्ष्मणांची वार्ता इंद्रापासून समजल्यामुळें त्या जनककन्येच्या मनाला आनंद झाला. असो.

ह्याप्रमाणें सीतेनें तें पायस भक्षण केल्यानंतर संतुष्ट झालेला इंद्रहि रघुवंशज रामाच्या हातून होणारें कार्य सिद्धीस नेण्याकरितां स्वर्गाकडे निघाला, आणि सीतेचा निरोप घेऊन तो महात्मा निद्रेसहवर्तमान स्वस्थानीं गेला.

सर्ग सत्तावन्नावा.

अपशकुनांमुळें सीतेविषयीं रामाचे तर्क.

इकडे यथेष्ट रूप धारण करणाऱ्या मृगरूप मारीचाचा वध करून राम परत फिरला. परंतु सीतेच्या भेटीची इच्छा धरून तो त्वरेनें परत येऊं लागला असतां क्रूर शब्द करणारें एक खोकड त्याच्या मागें ओरडलें. तेव्हां त्याचा तो अंगावर रोमांच उठविणारा भयंकर ध्वनि श्रवण करून सीतेच्या रक्षणाविषयीं आधींच शंकित असलेल्या रामाला खोकडाच्या शब्दासंबंधानें शंका आली, आणि तो म्हणाला, "ज्या अर्थीं म्हातारें कोल्हें ओरडत आहे, त्या अर्थीं हें कांहीं तरी अशुभ चिन्ह आहे, असें मला वाटतें. अरे, सीतेचें कुशल असेल ना? राक्षसांनीं तिला भक्षण करून तर टाकिलें नसेल ना? मी कसा ओरडत असतों, हें लक्ष्यपूर्वक समजून घेऊन मृगरूप धारण केलेल्या मारीचानें आम्हांला अपकार करण्याकरितां 'हे सीते, हे लक्ष्मणा,' असा जो आक्रोश केला, तो जर लक्ष्मणाच्या कानावर गेला असेल, तर सुमित्रापुत्र लक्ष्मण ध्वनि कानावर येतांक्षणीं त्या मिथिलराजकन्येला सोडून देईल, आणि तिनेंच पाठविल्यामुळें सत्वर माझे समीप येईल. खरोखर राक्षसांनीं एकत्र जमून सीतेचा वध करण्याचें मनामध्यें आणिलें आहे. कारण प्रथमतः मारीच राक्षसानें सुवर्णमृग बनून मला आश्रमांतून बाहेर काढिलें. तेथून दूर नेल्यावर मीं जेव्हां बाणानें त्याला वेध केला, तेव्हां तो मारीच राक्षस बनला; आणि मरणसमयीं 'हे लक्ष्मणा, माझा वध झाला रे झाला!' असेंहि तो म्हणाला. ह्यावरून आम्ही दोघे वनामध्यें नसतांना तेथें सर्व कुशल असेल ना? कारण जनस्थानाकरितां राक्षसांनीं माझ्याशीं वैर धरिलें आहे, आणि आज भयंकर चिन्हें पुष्कळच दृष्टोत्पत्तीस येत आहेत."

खोकडाचा शब्द ऐकतांक्षणीं अशा प्रकारें चिंता करूं लागलेला व परत फिरलेला तो जितेंद्रिय राम त्वरेनें आश्रमामध्यें आला. तेव्हां मनामध्यें खिन्न

व शरीरानें म्लान होऊन गेलेल्या त्या रामासमीप पशुपक्षी आले, आणि त्या महात्म्याला डावी घालून भयंकर शब्द करूं लागले. ह्याप्रमाणें महाभयंकर चिन्हें अवलोकन केल्यावर निस्तेज होऊन येत असलेला लक्ष्मण रामाचे दृष्टीस पडला. तदनंतर खिन्न व दुःखित झालेला तो लक्ष्मण त्याच्याचप्रमाणें खिन्न व दुःखित झालेल्या रामाला अगदीं जवळ येऊन भेटला असतां राक्षसांचें वास्तव्य असलेल्या निर्जन वनामध्यें सीतेला टाकून आलेल्या लक्ष्मणाला अवलोकन करितांक्षणीं भ्राता राम त्याची निंद करूं लागला. सारांश रामानें लक्ष्मणाचा डावा हात धरिला, आणि परिणामीं सुखकर होणाऱ्या कठोर शब्दांनीं एखाद्या भयभीत झालेल्या पुरुषाप्रमाणें तो त्याला म्हणाला, " लक्ष्मणा, सीतेला टाकून येथें आलास, हें तूं फारच निंद्य कर्म केलेंस. कारण हे सौम्या, आपणांपैकीं तेथें कोणी नसतांना सीतेचें कुशल असेल काय? हे वीरा, जनककन्या सीतेचा सर्वस्वी नाश तरी झाला असला पाहिजे, अथवा वनामध्यें संचार करणाऱ्या राक्षसांनीं तिला भक्षण करून तरी टाकिलें असलें पाहिजे. लक्ष्मणा, ज्या अर्थीं पुष्कळ अशुभ चिन्हें मला होत आहेत, त्या अर्थीं सीता जिवंत असून तिचें कुशल वृत्त आपणांला समजेल काय? मृगांचे कळप, खोंकड व पक्षी प्रदीप्त झालेल्या दिशेकडे तोंड करून भयंकर शब्द करीत आहेत. तेव्हां लक्ष्मणा, त्या राजकन्येचें कुशल असेल ना? मृगाप्रमाणें भासणारा हा राक्षस मला लुब्ध करून दूर निघून गेला, आणि मोठ्या श्रमानें कसा तरी मीं जेव्हां त्याचा वध केला, तेव्हां मरतां मरतांच मात्र त्यानें आपलें राक्षसरूप धारण केलें. ह्या ठिकाणीं माझें मन खिन्न व हर्षरहित झालेलें आहे, आणि माझा डावा डोळा लवत आहे. ह्यावरून सीता निःसंशय आश्रमांतून नाहींशी झालेली आहे. मग तिला कोणी हरण करून नेलेली असो, ती कोठें मरून पडलेली असो, किंवा कोठें तरी मार्गांत असो!"

सर्ग अठ्ठावन्नावा.

लक्ष्मणाला दोष देणें.

सीतेला टाकून आलेल्या त्या दीन व खिन्न लक्ष्मणाला अवलोकन केल्यावर तो दशरथपुत्र राम त्याला म्हणाला, " लक्ष्मणा, मी दंडकारण्यामध्यें निघालों असतां जी माझ्या मागोमाग आली, व जिचा त्याग करून तूं येथें आला

आहेस, ती सीता कोठें आहे ? अरे, राज्याला मुकल्यामुळें दीन होऊन दंडकारण्यामध्यें भटकत फिरणाऱ्या मला दुःखामध्येंहि साहाय्य करणारी ती सुंदरी विदेहराजकन्या कोठें आहे ? हे वीरा, जिच्यावांचून एक क्षणभरहि जिवंत राहाण्याची माझी इच्छा नाहीं, ती देवकन्येप्रमाणें सुंदर व माझ्या प्राणांची मैत्रीण असलेली सीता कोठें आहे ? लक्ष्मणा, पृथ्वीचें व देवांचें आधिपत्य जरी मला प्राप्त झालें, तरी सुवर्णासारख्या उज्ज्वल कांतीनें युक्त असलेल्या त्या जानकीचा वियोग होत असेल, तर मला त्याची इच्छा नाहीं. हे वीरा, मला प्राणांहूनहि प्रिय असलेली विदेहराजकन्या सीता जिवंत असेल कां ? अरे, चौदा वर्षेपर्यंत वनामध्यें वास्तव्य करण्याची जी मीं प्रतिज्ञा केली आहे, ती सीतेचें जीवित नाहींसें झाल्यास माझेंहि जीवित कायम राहाणें संभवनीय नसल्यामुळें, असत्य तर होणार नाहीं ना ? हे सुमित्रापुत्रा, सीतेकरितां मला मरण येऊन तूं एकटा अयोध्येमध्यें परत गेल्यावर तरी त्या कैकेयीचे मनोरथ परिपूर्ण होऊन ती सुखी होईल काय ? अरे, पुत्र मेल्यामुळें दीन झालेली कौसल्या, मनोरथ परिपूर्ण होऊन पुत्र व राज्य ह्यांसहवर्तमान असलेल्या कैकेयीची सामोपचारानें सेवा करील ना ? लक्ष्मणा, विदेहराजकन्या जर जिवंत असेल, तर मी आश्रमामध्यें पुनः जाईन; परंतु ती जर मृत झाली असेल, तर मी प्राणत्याग करीन. मी आश्रमांत जातांक्षणीं समोर येऊन सीतेनें जर माझ्याशीं भाषण केलें नाहीं, तर मी नाश पावणार ! लक्ष्मणा, सीता जिवंत आहे कीं नाहीं ? अरे, गाफिलपणानें तूं येथें निघून आल्यामुळें त्या बिचारीला राक्षसांनीं भक्षण करून टाकिलें कीं काय ? ती विदेहराजकन्या सुकुमार व अद्यापि लहान असून नेहमीं सुखामध्येंच राहाणारी आहे. तेव्हां माझ्या वियोगामुळें निःसंशय ती खिन्न होऊन कोठें तरी शोक करीत असेल. 'हे लक्ष्मणा' म्हणून अतिशय उच्च स्वरानें आरोळी ठोकणाऱ्या त्या अत्यंत दुष्ट व कुटिल राक्षसानें तुझे ठिकाणींहि निःसंशय भय उत्पन्न केलें असावें, असें मला वाटतें. माझ्यासारखा जो त्यानें स्वर काढिला, तो सीतेनें ऐकिला; आणि तिनें भयभीत होऊन तुला पाठविल्यामुळें तूं मला पाहाण्याकरितां सत्वर येथें आला आहेस, असें मला वाटतें. अरे, सीतेला वनामध्यें टाकून येथें आलास, ही गोष्ट तूं सर्वस्वी वाईट केलीस. कारण दुष्ट राक्षसांना आपला सूड उगविण्याची ही तूं संधीच आणून दिलीस. खराचा वध झाल्यामुळें त्या मांसभक्षक राक्षसांना दुःख झालें होतें. तेव्हां त्या घोर राक्षसांनीं सीतेचा वध केला असेल, ह्यांत संशय नाहीं. हे शत्रुनाशका, मी सर्वस्वी संक-

टांत बुडून गेलों आहें. आतां काय करावें ? अरे, अशा प्रकारचें प्राप्त होणारें दु:ख आपणांला अनुभवावें लागणारच, अशी मला शंका येते. "

ह्याप्रमाणें सुंदरी सीतेसंबंधानेंच मनामध्यें चिंतन करीत असलेला तो रघुवंशज राम लक्ष्मणासहवर्तमान सत्वर जनस्थानामध्यें परत आला. आश्रमाचे सन्निध असलेला प्रदेश सीतेनें विरहित आहे, असें अवलोकन करून रामाचें मुख निस्तेज झालें. तो मनामध्यें खिन्न झाला, व दु:खाचे सुस्कारे टाकूं लागला. क्षुधा, तृषा व श्रम ह्यांच्या योगानें व्याकुल झालेल्या आपल्या कनिष्ठ भ्रात्याची तो निंदा करूं लागला. तदनंतर आपल्या आश्रमामध्यें प्रविष्ठ झाल्यावर तो तेथील कांहीं क्रीडास्थानांकडे गेला, आणि तेथेंहि सीता नाहीं असें आढळून आल्यावर, निवासस्थानामध्यें अमुक अमुक क्रीडा ज्या ठिकाणीं आपण केली, तेंच हें ठिकाण असें स्मरण होतांक्षणीं त्याच्या अंगावर रोमांच उठले, आणि तो फारच दु:खाकुल झाला.

सर्ग एकुणसाठावा.

राम-लक्ष्मणसंवाद.

सीतेच्या सांगण्यावरून आश्रमांतून निघून मार्गामध्यें आपल्यासमीप आलेल्या लक्ष्मणाला राम दु:खानें म्हणाला, "मी तुझ्या विश्वासामुळें सीतेला वनामध्यें सोडून आलों होतों. तर तिला सोडून तूं कशाकरितां येथें आलास ? मारीच राक्षस जेव्हां माझ्यासारखी आरोळी देऊं लागला, तेव्हां फारच वाईट गोष्ट घडल्याची जी शंका येऊन माझें मन व्याकुल झालें होतें, ती सीतेला सोडून तूं आला आहेस, असें पाहतांक्षणींच खरी ठरली. कारण लक्ष्मणा, सीतेविरहित असलेल्या तुला मार्गामध्यें दूर अवलोकन करितांच माझा डावा डोळा लवूं लागला, आणि डावा बाहुटा व हृदयाचा डावा भाग हे स्फुरण पावूं लागले."

ह्याप्रमाणें शुभलक्षणसंपन्न लक्ष्मणाला राम बोलला असतां, अधिकच दु:खाकुल झालेला तो लक्ष्मण दु:खित झालेल्या रामाला म्हणाला, "मी स्वत: आपल्या इच्छेनें तिचा त्याग करून येथें आलों नाहीं. दु:सह शब्द उच्चारून तिनेंच आज्ञा केल्यामुळें मी येथें आपल्या समीप आलों आहें. 'हे लक्ष्मणा, रक्षण कर' म्हणून अतिशय भयंकर गळा काढून तुमच्यासारखी जी आरोळी कोणीं दिली, ती सीतेच्या कानांवर गेली, तेव्हां तो आर्त शब्द कानांवर

पडतां क्षणींच, आपल्या ठिकाणीं सीतेचें प्रेम असल्यामुळें ती भीतीनें गांगरून जाऊन 'जा, सत्वर जा' असें रडत रडत मला म्हणाली. ह्याप्रमाणें 'जा, जा' म्हणून वारंवार जेव्हां ती मला जाण्याविषयीं आग्रह करूं लागली, तेव्हां तिचा विश्वास बसेल अशा रीतीनें मी उलट भाषण तिच्याशीं केलें. मीं म्हटलें, 'रामाला भीति उत्पन्न करणारा असा कोणीहि राक्षस माझ्या आढळण्यांत येत नाहीं. तूं स्वस्थ राहा. ही आरोळी रामाची नव्हे. दुसऱ्यानेंच कोणी तरी ही आरोळी दिली आहे. कारण सीते, प्रसंग पडला असतां देवांचें सुद्धां जो रक्षण करील, तो आर्य राम, क्षत्रियाला अयोग्य आणि म्हणूनच निंद्य असे 'रक्षण कर' हे शब्द कसे उच्चारील? कांहीं तरी वाईट हेतु मनामध्यें धरून कोणी भलत्यानेंच माझ्या भ्रात्याच्या ध्वनीचें अवलंबन करून, 'हे लक्ष्मणा, मला तार' असें वाक्य दुःखित स्वरानें उच्चारिलें आहे. सारांश, हे कल्याणि, भयभीत झाल्यामुळें 'त्राहि त्राहि' हे शब्द कोणी राक्षसानेंच उच्चारिले आहेत. तेव्हां निंद्य स्त्रियांनाच योग्य असलेलें दुःख करण्याचें तुला कारण नाहीं. तुझें खिन्न होणें आतां पुरे. तूं स्वस्थ हो. कांहींएक काळजी करूं नको. कारण त्रैलोक्यामध्यें सांप्रत असलेल्या आणि पुढें उत्पन्न होणाऱ्या प्राण्यांपैकीं संग्रामामध्यें रघुवंशज रामाचा पराजय करणारा असा कोणीहि नाहीं. राम युद्धामध्यें इंद्रप्रभृति देवांनाहि अजिंक्यच आहे."

लक्ष्मण पुढें सांगतो:—"देहभान नाहींसें झालेल्या सीतेला ह्याप्रमाणें मीं सांगितलें असतां अश्रू ढाळीत ढाळीत कठोर शब्दांनीं ती मला म्हणाली, 'भ्रात्याचा नाश झाल्यावर मीं तुझ्या हस्तगत व्हावें, अशी माझ्यासंबंधानें अतिशयच पापबुद्धि दुर्दैवानें तुझ्या अंतःकरणामध्यें प्रवृत्त झाली आहे; परंतु मी तुझ्या हातीं लागणार नाहीं. राम तुझ्या नांवानें अतिशय ओरडत असतांनाहि ज्या अर्थीं तूं त्याच्याकडे जात नाहींस, त्या अर्थीं भरताशीं कांहीं तरी निंद्य संकेत करून तूं रामाच्या मागोमाग वनामध्यें आला आहेस; परंतु हा तुझा मनोरथ सिद्धीस जाणार नाहीं. कपटानें वागणारा तूं वस्तुतः शत्रुच माझा अपहार करण्याच्या इच्छेनें रामाचे बरोबर आला आहेस; आणि राम दृष्टीआड होण्याची वाट पहात आहेस; परंतु हा तुझा मनोरथ परिपूर्ण होणार नाहीं.' ह्याप्रमाणें सीता मला बोलली असतां मी क्षुब्ध झालों, क्रोधानें माझे डोळे लाल होऊन ओंठ स्फुरण पावूं लागले, व रागारागानेंच मी त्या आश्रमांतून बाहेर निघालों."

ह्याप्रमाणें सुमित्रापुत्र लक्ष्मण सांगत असतांना दुःखामुळें मोहित झालेला राम त्याला म्हणाला, "हे विनयसंपन्न लक्ष्मणा, सीतेवांचून तूं येथें आलास ही गोष्ट तूं अयोग्य केलीस. राक्षसांचें निवारण करण्यास मी समर्थ आहें, असें जाणीत असूनहि सीतेच्या ह्या क्रोधमूलक भाषणावरून तूं आश्रमांतून बाहेर पडलास, हें नीट नाहीं. क्रुद्ध झालेल्या स्त्रीचें कठोर भाषण श्रवण केल्यावर त्या सीतेचा त्याग करून ज्या अर्थी तूं येथें आला आहेस, त्या अर्थी ह्या तुझ्या करण्यापासून मला संतोष होत नाहीं. सीतेनें रागारागानें सांगितल्यामुळें तूंहि क्रोधाच्या अधीन होऊन माझ्या आज्ञेप्रमाणें वागला नाहींस, हा सर्वस्वी तुझा अपराध आहे. असो. ज्यानें मृगरूप धारण करून मला आश्रमांतून दूर नेलें, तो हा राक्षस मीं टाकिलेल्या बाणांमुळें वध पावून येथें पडला आहे. मीं धनुष्य ओढून त्याला बाण लाविला, आणि तें धनुष्य विशेष आकर्षण न करितांच सहज तो बाण त्या मृगावर सोडिला. तेव्हां तो बाण लागतांक्षणीं मृगरूपाचा त्याग करून तो बाहुभूषणें धारण करणारा राक्षस बनला, आणि दुःखाच्या आरोळ्या ठोकूं लागला. बाण लागतांक्षणीं फारच लांब ऐकूं जाईल, अशा रीतीनें माझ्या स्वराचें अवलंबन करून व्याकुल वाणीनें त्या राक्षसानें फारच भयंकर शब्द उच्चारिले, व त्यामुळेंच तूं सीतेचा त्याग करून येथें आलास."

सर्ग साठावा.

श्रीरामाचा विलाप.

राम आश्रमाकडे येऊं लागला असतां त्याचा डावा डोळा खालच्या बाजूला अतिशयच लवूं लागला, चालतांना तो अडखळूं लागला, आणि त्याच्या शरीरालाहि कंप सुटूं लागला. अशा प्रकारचीं अशुभ चिन्हें वारंवार अवलोकन केल्यावर, 'सीतेचें कुशल असेल काय?' असे शब्द तो उच्चारूं लागला. सीतेच्या दर्शनाकरितां उत्सुक झालेला राम त्वरेत्वरेनें आश्रमासमीप आला, आणि त्या निवासस्थानामध्यें सीता नाहीं असें आढळून आल्यावर मनामध्यें उद्विग्न झाला. हातवारे करून तो रघुनंदन राम इकडे तिकडे हिंडूं लागला, आणि सीता असेल ह्या आशेनें तो त्या पर्णकुटिकेंतील प्रदेश सर्व बाजूंनीं पाहूं लागला. नंतर हेमंत ऋतूंमध्यें कमलांचा विध्वंस झाल्यामुळें शोभारहित अस-

लेल्या सरोवराप्रमाणें सीतेनें रहित असलेली ती पर्णकुटिका रामानें अवलोकन केली, आणि त्याचप्रमाणें आश्रमहि अवलोकन केल्यावर तो वारंवार विलाप करूं लागला. कारण त्यांतील पुष्पें, पशु व पक्षी हीं सर्व निस्तेज झाल्या कारणानें वृक्षांच्या योगानें त्याला शोभा न येतां उलट तो रडतच आहे कीं काय असा भास होत होता. विध्वंस झाल्यामुळें त्यांत, शोभा कसली ती राहिली नव्हती. वनदेवताहि त्याला सोडून गेल्या होत्या. कृष्णाजिनें व दर्भ अस्ताव्यस्त पडले होते. दर्भासनें व चटया फाटून गेलेल्या होत्या, आणि आंतील पर्णकुटिकांतून कोणीहि नव्हतें.

अशा प्रकारचा तो आश्रम अवलोकन केल्यावर विलाप करूं लागलेला तो राम आपल्याशीं म्हणाला, "सीतेला कोणीं तरी नेली असेल, ती मेली असेल, तिचा पत्ता नाहींसा झाला असेल, कोणीं तिला भक्षण करून टाकिली असेल, ती भित्री कोठें तरी दडून राहिली असेल, किंवा तिनें कदाचित् वनाचें अवलंबन केलें असेल. पुष्पें आणि फळें गोळा करण्याकरितां कदाचित् ती गेली असेल, किंवा उदकाकरितां सरोवराकडे अथवा नदीकडे ती गेली असेल."

अशा प्रकारें तर्क करून राम प्रयत्नपूर्वक तिला शोधूं लागला असतांहि जेव्हां वनामध्यें ती प्रिया त्याला मिळाली नाहीं, तेव्हां शोकानें नेत्र आरक्तवर्ण झाल्यामुळें तो वैभवशाली राम उन्मत्तासारखा दिसूं लागला. शोकरूप चिखलानें युक्त असलेल्या दुःखसागरामध्यें बुडून गेलेला तो राम विलाप करीत करीत ह्या वृक्षापासून त्या वृक्षाकडे धावूं लागला, आणि पर्वत, नद्या व नद हिंडूं लागला. "हे कदंबवृक्षा, माझ्या त्या प्रियेला कदंबवृक्ष प्रिय आहेत, तेव्हां ती तुझ्या कोठें दृष्टीस पडत आहे? अरे तुला जर ठाऊक असेल, तर ती सुमुखी सीता कोठें आहे, हें मला सांग. स्निग्ध पल्लवाप्रमाणें जिचें शरीर कोमल आहे, आणि जी पिवळी पैठणी नेसली आहे, ती सीता कोठें आहे, हें मला सांग. अरे बेलफळाचीच उपमा देण्यास योग्य असे जिचे स्तन आहेत, ती सीता जर तुझ्या दृष्टीस पडली असेल, तर मला सांग. अथवा हे अर्जुनवृक्षा, अर्जुनवृक्ष जिला प्रिय आहेत, अशी ती माझी प्रिया कोठें आहे, हें तूं तरी मला सांग. अरे, ती जनककन्या सुंदरी सीता जिवंत आहे किंवा नाहीं, हें काय तें मला कळूं दे. सीतेच्या मांड्या ककुभवृक्षाप्रमाणें तुळतुळीत आहेत. तेव्हां ह्या ककुभवृक्षाला ती कोठें आहे, हें निःसंशय माहीत असेलच. ज्या अर्थी लता, पल्लव आणि पुष्पें ह्यांनीं हा वृक्ष समृद्ध दिसत आहे,

त्या अर्थी ह्याला सीतेची माहिती आहेच आहे. कारण, त्यावांचून ह्याचे ठिकाणीं अशी शोभा कोठून राहाणार? अरे, तूं वृक्षांमध्यें श्रेष्ठ असल्यामुळें भ्रमर तुझ्यासमीप गुंजारव करीत आहेत, पण माझी सीता कोठें आहे, हें तरी मला सांग. छेः सीतेला तिलकवृक्ष प्रिय आहेत. तेव्हां ह्या तिलकवृक्षाला तिची हकीकत निःसंशय माहीत आहे. हे अशोका, हे शोकनाशका, शोकामुळें मला कांहीं सुचेनासें झालें आहे. ह्यास्तव माझी प्रिया मला दाखवून देऊन तूं मला तुझ्या अन्वर्थक नांवानें युक्त कर, म्हणजे अ-शोक करून टाक. हे तालवृक्षा, परिपक्व तालफळाप्रमाणें जिचे स्तन आहेत, अशी ती सीता तुझ्या तरी कोठें दृष्टीस पडली आहे का? माझी जर तुला कांहीं दया येत असेल, तर ती सुंदरी कोठें आहे, हें मला सांग. हे जंबुवृक्षा, सुवर्णासारख्या कांतीनें युक्त असलेली सीता तुझ्या तरी दृष्टीस पडली आहे काय? अरे, माझ्या प्रियेचा वृत्तांत जर तुला कांहीं ठाऊक असेल, तर तो असेल तसा तूं निःशंकपणें मला कथन कर. ओहो! हे कर्णिकारवृक्षा, तूं आज फारच प्रफुल्लित झालेला दिसत आहेस. तेव्हां माझी प्रिया तुझ्या दृष्टीस पडली आहे काय? अरे, कर्णिकाराचीं पुष्पें जिला प्रिय आहेत, त्या साध्वीची वार्ता तूं मला सांग."

ह्याप्रमाणें महायशस्वी राम आम्र, नीप, महासाल, फणस, कुरर आणि दाडिम हे वृक्ष अवलोकन करून सीतेची बातमी विचारण्याकरितां त्यांचेहि समीप गेला, आणि त्याचप्रमाणें बकुल, पुन्नाग, चंदन व केतक ह्या वृक्षांना विचारीत विचारीत वनामध्यें भटकत असलेला तो राम उन्मत्त पुरुषाप्रमाणें दिसूं लागला. 'अथवा हे मृगा, हरिणाच्या बछड्याप्रमाणें जिचे डोळे आहेत, ती सीता तुला तरी ठाऊक आहे काय? कारण हरिणाक्षी स्त्री हरिणीबरोबरच असली पाहिजे. हे गजा, गजशुंडेप्रमाणें जिच्या मांड्या आहेत, ती सीता तुझ्या दृष्टीस पडली असेल; ती तुला माहीत आहेच, असें मला वाटतें. करितां हे श्रेष्ठ गजा, तूं मला तिची हकीकत सांग. हे व्याघ्रा, चंद्रासारख्या आल्हादकारक मुखानें युक्त असलेली ती प्रिया मिथिलराजकन्या जर तुझ्या दृष्टीस पडली असेल, तर तूं निर्धास्त राहून मला सांग, माझ्यापासून तुला भय नाहीं. हे प्रिये, तूं धावाधाव कां करीत आहेस? हे कमलनयने, खरोखर आतां मीं तुला पाहिलेंच. ह्या वृक्षाच्या आड लपून तूं माझ्याशीं कां बरें भाषण करीत नाहींस? हे सुंदरि, थांब, थांब! तुला माझी कांहीं दया येत नाहीं काय? तुझा स्वभावहि फार थट्टेखोर नाहीं. मग असें असतांना तूं आतां कां बरें माझी

उपेक्षा करीत आहेस ! हे श्रेष्ठ स्त्रिये, पिवळ्या पैठणीवरून तर मीं तुला ओळखिलेंच आहे; आणि धावतां धावतांहि तूं माझ्या दृष्टीस पडली आहेस. तेव्हां माझे ठिकाणीं जर कांहीं तुझें प्रेम असेल, तर थांब ! छे ! खरोखर ती सीता नव्हेच. त्या सुहास्यवदनेचा खास कोणीं तरी वध केला आहे ! कारण ती जर येथें असेल, तर अशा प्रकारें मी संकटांत पडलों असतांना माझी गरज बाळगीलच बाळगील. माझा विरह झालेल्या त्या बालेला तिच्या सर्व अवयवांचे तुकडे तुकडे करून मांसभक्षक राक्षसांनीं निःसंशय भक्षण केलें आहे. शुभ दंत व ओंठ, उत्कृष्ठ नासिका आणि शुभ कुंडलें ह्यांनीं ती युक्त असून पूर्ण चंद्राप्रमाणें उज्ज्वल असलेलें तिचें मुख माझ्या वियोगामुळें निस्तेज झालें असतां खरोखर राक्षसांनीं तें भक्षण करून टाकिलें आहे. माझ्याकरितां विलाप करीत बसलेल्या त्या कांतेचीं कंठभूषणें नेहमीं धारण करण्याची संवय असलेली ती चंदनासारखी गौरवर्ण, शुभ व कोमल मान राक्षसांनीं भक्षण करून टाकिली आहे. तसेच पल्लवाप्रमाणें कोमल, इकडे तिकडे चलनवलन करणारे व हस्तभूषणें, बाहुभूषणें आणि कांपरें भरलेलीं बोटें ह्यांनीं युक्त असलेले ते तिचे हातहि खरोखर राक्षसांनीं खाऊन टाकिले आहेत ! पुष्कळ नातेवाईक असूनहि ज्याप्रमाणें अरण्यामध्यें जनसमुदायानें त्याग केलेल्या स्त्रियेला राक्षसांनीं भक्षण करून टाकावें, त्याप्रमाणें राक्षसांच्या भक्षणाकरितां मी त्या बालेला टाकून गेलों. हे महापराक्रमी लक्ष्मणा, तूं कोठें प्रियेला अवलोकन करीत आहेस काय ? हे प्रिये, हे कल्याणि, हे सीते, कोठें ग गेलीस ! ”

ह्याप्रमाणें वारंवार विलाप करूं लागलेला राम ह्या वनापासून त्या वनांत धावाधाव करूं लागला असतां कोठें कोठें उड्या मारूं लागला आणि कोठें कोठें शोकबलामुळें घिरट्या घालूं लागला ! भार्येचा शोध लावण्यामध्यें गढून गेलेला तो राम कांहीं वेळ उन्मत्त पुरुषाप्रमाणें भासूं लागला. सारांश, एक क्षणभरहि कोठें न ठरतां वेगावेगानें तो अरण्य, नद्या, पर्वत, पर्वतावरील जलप्रवाह आणि कुंजवनें हिंडूं लागला. हिंडतां हिंडतां तो मोठ्या प्रचंड वनामध्यें गेल्यावर मैथिलीकरितां तो बाजूंनीं हिंडला, आणि निराश जरी झाला, तथापि पुनरपि प्रियेच्या शोधाकरितां तो पराकाष्ठेचे श्रम घेऊं लागला.

सर्ग एकसष्टावा.

दुःखित श्रीरामाचें सांत्वन.

दशरथकुमार राम आश्रमांत गेला असतां तेथें कोणी नाहीं, पर्णशालेमध्येंहि कोणी नाहीं, व आसनें अस्ताव्यस्त पडलीं आहेत, असें त्याला आढळून आलें. सर्व बाजूंनीं पाहिलें असतांहि जेव्हां सीता तेथें दृष्टीस पडेना, तेव्हां आपले मनोहर हात उभारून आणि आक्रोश करून राम म्हणाला, "लक्ष्मणा, सीता कोठें आहे? येथून कोणत्या प्रदेशाला ती गेली आहे? हे सुमित्रापुत्रा, तिला कोणी घेऊन गेला आहे कीं काय? अथवा ती प्रिया कोणीं भक्षण केली आहे कीं काय? हे सीते, झाडाच्या आड लपून जर तूं माझी थट्टा करीत असशील, तर ही तुझी थट्टा आज पुरे. अतिशयच दुःखित झालेल्या माझा तूं स्वीकार कर. हे विनयसंपन्न सीते, नेहमींच्या सहवासामुळें निर्भरत झालेल्या ज्या हरिणबालकांबरोबर तूं क्रीडा करीत होतीस, त्या हरिणबालकांचे नेत्र तुझा वियोग झाल्यामुळें अश्रूंनीं कलुषित झाले असून हे तुझें चिंतन करीत आहेत. लक्ष्मणा, सीतेवांचून मी जिवंत राहाणार नाहीं. माझा पिता महाराज दशरथ खरोखर सीताहरणजन्य शोकानें ग्रस्त झालेल्या मला परलोकीं अवलोकन करील. सीतेच्या रक्षणार्थ मीं तुझी योजना केली असतां तूं माझ्याशीं प्रतिज्ञा केली असूनहि तितका कालपर्यंत सीतेचें रक्षण न करितां तूं माझ्यासमीप येथें आलास, ह्यामुळें माझा पिता परलोकीं तुला स्वेच्छाचारी, दुष्ट अथवा असत्यवादी म्हणेल. किंवा 'तुला धिःकार असो' असें तरी खचित म्हणेल. हे सुंदरि, धैर्यहीन, शोकसंतप्त, दीन, मनोरथ भग्न झालेला, आणि म्हणूनच दयेला पात्र असलेल्या माझा, कुटिल पुरुषाचा त्याग करून जाणाऱ्या कीर्तीप्रमाणें त्याग करून तूं कोठें जात आहेस? हे कृशोदरि, तूं मला सोडून जाऊं नको. तुझा विरह झाला असतां मी आपल्या जीविताचा त्याग करीन"

ह्याप्रमाणें सीतेच्या दर्शनाकरितां उत्सुक असलेला तो राम विलाप करूं लागला, आणि अत्यंत दुःखित झाला. तथापि ती जनककन्या त्याच्या दृष्टीस पडली नाहीं. तेव्हां अतिशय खोल चिखल झाल्यामुळें आंत रुपून जाणाऱ्या गजाप्रमाणें, सीता प्राप्त होत नसल्यामुळें शोकाकुल होऊन तो राम शोकसागरांत फारच मग्न होऊं लागला असतां, त्याच्या हिताची इच्छा धरून लक्ष्मण त्याला म्हणाला, "हे महाबुद्धे, तूं खेद करूं नको. माझ्यासहवर्तमान तिला शोध-

ण्याचा यत्न कर. हे वीरा, हा श्रेष्ठ पर्वत नानाप्रकारच्या गुहांनीं सुशोभित झालेला आहे, आणि सीतेला वनामध्यें संचार करणें फार प्रिय आहे. तेव्हां वन अवलोकन करून जर ती हर्षयुक्त झाली असेल, तर ती एखाद्या वनामध्यें किंवा प्रफुल्लित झालेल्या सरोवरामध्यें प्रविष्ट झाली असेल. कदाचित् मत्स्य आणि वेतस ह्यांनीं युक्त असलेल्या एखाद्या नदीकडे ती गेली असेल, किंवा आपल्याला घाबरवून टाकण्याकरितां ती कदाचित् कोठें तरी वृक्षसमूहामध्यें दडून बसली असेल. हे पुरुषश्रेष्ठा, आपण तिचा शोध करितों किंवा नाहीं ह्याबद्दल तुझी व माझी परीक्षा करण्याकरितां कोठें तरी ती लपून बसली आहे. ह्यास्तव हे वैभवशाली रामा, तिला हुडकून काढण्याविषयीं आपण सत्वर यत्न करूं. रामा, ज्या ठिकाणीं ती सीता आहे, असें तुला वाटत असेल, तें सर्व वन आपण धुंडून काढूं; परंतु तूं शोक करण्याचें मनामध्यें आणूं नको."

ह्याप्रमाणें प्रेमामुळें लक्ष्मणानें भाषण केलें असतां तो राम स्थिर झाला, आणि त्या लक्ष्मणाला बरोबर घेऊन तिला हुडकूं लागला. ते उभयतां वनें, पर्वत, नद्या व सरोवरें अगदीं पूर्णपणें धुंडाळूं लागले, आणि तेथें असलेल्या त्या पर्वतांचीं टेंकाडें, कडे व शिखरेंहि संपूर्णपणें ते हुडकूं लागले; तथापि त्यांना तिची भेट झाली नाहीं.

अशा प्रकारें सर्व बाजूंनीं पर्वत शोधून काढिल्यावर राम म्हणाला, "लक्ष्मणा, मला ती पवित्र सीता पर्वतावर दृष्टीस पडत नाहीं." तेव्हां दुःखाकुल झालेला लक्ष्मणहि दंडकारण्यामध्यें संचार करितां करितां त्याला म्हणाला, 'हे महाबुद्धिमंता, महापराक्रमी विष्णूला ज्याप्रमाणें ही पृथ्वी बलीला बद्ध केल्यानंतर प्राप्त झाली, त्याप्रमाणें जनककन्या सीता तुला प्राप्त होईल.'

ह्याप्रमाणें वीर लक्ष्मणानें सांगितलें असतां दुःखानें मन व्याकुल झालेला तो राम दीन वाणीनें त्याला म्हणाला, "लक्ष्मणा, सर्व वन सूक्ष्म रीतीनें शोधिलें, प्रफुल्लित कमलांनीं युक्त असलेलीं सरोवरें हुडकिलीं, आणि अनेक गुहांनीं व जलप्रवाहांनीं युक्त असलेला हा पर्वतहि धुंडाळिला; परंतु प्राणांपेक्षाहि अधिक असलेली ती वैदेही माझ्या कोठेंहि दृष्टीस पडत नाहीं."

सीतेचा अपहार झाल्यामुळें कृश, दीन व शोकाकुल झालेला राम अशा प्रकारें विलाप करितां करितां क्षणभर अगदीं विव्हल झाला. त्याचे सर्व अवयव गळून गेले, भान नाहीसें होऊन तो निश्चेष्ट पडला. नंतर दुःखाचा दीर्घ सुस्कारा टाकून तो दीन व व्याकुल झालेला राम खेद करूं लागला. ह्याप्रमाणें

वारंवार लांब लांब सुस्कारे टाकून तो कमलनयन राम एकसारखा अश्रूंनीं कंठ दाटल्यामुळें अस्पष्ट स्वरानें ' हे प्रिये ' असा आक्रोश करूं लागला असतां शोकाकुल व विनयसंपन्न असलेल्या लक्ष्मणानें हात जोडून त्याचें नानाप्रकारें सांत्वन केलें. तथापि सीता जेव्हां दृष्टीस पडेना, तेव्हां त्या भाषणालाहि न जुमानितां तो राम फिरून फिरून सीतेकरितां आक्रोशच करूं लागला.

सर्ग बासष्टावा.

श्रीरामाचा विलाप.

सीता दृष्टीस पडेनाशी झाल्या कारणानें शोकामुळें बुद्धीला भ्रंश पडलेला तो धर्मात्मा महापराक्रमी राम विलाप करूं लागला; आणि वास्तविक जरी सीता त्याच्या दृष्टीस पडत नव्हती, तरी व्याकुल झालेला तो राम भ्रमांत असल्यामुळें ती दृष्टीस पडत आहे, असें समजून विलापयुक्त आणि म्हणूनच अस्पष्ट असें भाषण तिला उद्देशून करूं लागला. तो म्हणाला, " हे प्रिये, पुष्पें तुला अतिशय प्रिय आहेत, म्हणून तूं अशोकाच्या प्रफुल्लित शाखांनीं आपलें शरीर आच्छादित करीत आहेस; आणि त्यामुळें माझा शोक मात्र वृद्धिंगत करीत आहेस. हे देवि, केळीच्या खुंटाप्रमाणें असलेल्या तुझ्या दोन्ही मांड्या केळीनें झांकून गेलेल्या मला दिसत आहेत; ह्यामुळें तूं स्वतःला दडवून ठेवण्यास समर्थ नाहींस. हे कल्याणि, हे देवि, माझी थट्टा करण्याकरितां तूं हे कर्णिकारांच्या वनाचें अवलंबन करीत आहेस; परंतु मला दुःख देणारी ही तुझी थट्टा आतां पुरे. प्रिये, तुझा स्वभाव थट्टेखोर आहे, हें मी जाणतों; परंतु विशेषतः आश्रमामध्यें ही थट्टा प्रशस्त नाहीं. ह्यास्तव हे विशालनयने, तूं ये. ही तुझी पर्णकुटिका शून्य आहे ! छेः ! राक्षसांनीं सीतेला भक्षण करून टाकिलें आहे, अथवा त्यांनीं तिला कोठें तरी नेलें आहे, ह्यांत मुळींच संशय नाहीं. कारण लक्ष्मणा, मी विलाप करीत असतांना ती माझ्यापाशीं येत नाहीं. लक्ष्मणा, ह्या हरिणांच्या कळपांचे नेत्र अश्रूंनीं भरून गेले आहेत. यावरून देवी सीतेला राक्षसांनीं भक्षण केल्याचेंच ते मला सांगत आहेत. हे सदाचरणसंपन्न साध्वि, हे सुंदरि, कोठें गेलीस? हाय ! हाय ! देवि, आज माझ्या कैकेयीचा मनोरथ परिपूर्ण होईल. सीतेबरोबर नगरांतून बाहेर पडलेला

मी, सीतेवांचून परत नगरांत गेलों असतां त्या शून्य अंतःपुरामध्यें कसा बरें प्रवेश करूं? 'हा राम वीर्यहीन आणि निर्दय आहे' असें सर्व लोक मला म्हणतील. माझ्यापासून सीतेला हरण करून नेल्यामुळें माझा भित्रेपणा तर उघडच सिद्ध होत आहे. वनवास संपून मी परत गेलों, म्हणजे मिथिलाधिपति जनक राजा मला कुशल प्रश्न करूं लागला असतां त्याच्याकडे माझ्यानें पहावेल तरी कसें? मी त्या सीतेवांचून आलों आहें, असें अवलोकन करण्याबरोबर तो विदेहराज जनक कन्येच्या नाशामुळें संतप्त होऊन मोहाचे अधीन होईल! अथवा इतकी पंचाईत कशाला? भरतानें रक्षण केलेल्या त्या अयोध्या नगरीमध्यें मी जाणारच नाहीं! कारण तिच्यावांचून स्वर्गहि जरी असला, तरी मी तो शून्यच समजत आहें. तस्मात् लक्ष्मणा, तूं आपला आतां मला वनामध्यें सोडून त्या शुभ अयोध्या नगरीमध्यें चालता हो. कांहीं केलें तरी त्या सीतेवांचून मी जिवंत राहाणार नाहीं. तूं भरताला कडकडून भेट आणि माझ्या आज्ञेवरून त्याला सांग कीं, 'पृथ्वीचें परिपालन कर' अशी रामानें तुला अनुज्ञा दिली आहे. प्रभो लक्ष्मणा, माझी माता कैकेयी, सुमित्रा आणि त्याचप्रमाणें कौसल्या ह्यांना तूं रीतीप्रमाणें माझ्या आज्ञेनें अभिवंदन कर, आणि मीं चांगलें सांगितल्याप्रमाणें वागून तूं प्रयत्नपूर्वक त्यांचें रक्षण कर. हे शत्रुनाशका लक्ष्मणा, सीतेच, म्हणूनच माझा हा असा नाश झाल्याची हकीकत तूं माझ्या मातेला सविस्तर निवेदन कर."

असो. उत्कृष्ठ केशांनीं युक्त असलेली सीता जेथें नाहीं, त्या वनामध्यें आल्यावर राम दीन होऊन ह्याप्रमाणें विलाप करूं लागला असतां, लक्ष्मणाचेंहि मुख भयानें निस्तेज झालें, आणि मनामध्यें कळवळून तोहि फारच व्याकुल झाला.

सर्ग त्रेसष्टावा.

श्रीरामाचा विलाप.

प्रियेचा वियोग झाल्यामुळें शोकानें व मोहानें व्याकुळ होत असलेला तो राजकुमार राम दुःखित होऊन भ्रात्या लक्ष्मणाचे ठिकाणीं विषाद उत्पन्न करूं लागला, आणि आपणहि अतिशय खिन्न झाला. नंतर शोकामध्यें मग्न झालेल्या त्या लक्ष्मणाला स्वतःहि अपार शोकामध्यें मग्न झालेला तो राम ऊष्ण व

दीर्घ सुस्कारा टाकून रडत रडत म्हणाला, " मला वाटतें, माझ्यासारखा दुष्कर्म करणारा दुसरा कोणीहि पुरुष ह्या पृथ्वीमध्यें नाहीं; आणि म्हणूनच माझें हृदय व मन विदीर्ण करणारा हा शोकामागून शोक एकसारखा माझ्याकडे येत आहे. खरोखर पूर्वी माझ्या हातून जाणून बुजून वारंवार पापकर्मे घडलेलीं आहेत, आणि त्यांपैकींच कांहीं पातकांचें फळ परिपक्क होऊन आज मला प्राप्त झालें आहे. ह्यामुळेंच मला ही दुःखपरंपरा अनुभवावी लागत आहे. लक्ष्मणा, राज्यभ्रंश, स्वजनांचा वियोग, पित्याचा नाश आणि मातेचा वियोग हीं सर्व मनामध्यें आलीं असतां मला शोकवेगाचें भरतें आणितात. लक्ष्मणा, वनामध्यें आल्यावर माझ्या शरिराला जरी क्लेश झाले होते, तरी सीता समीप असल्यामुळें माझें तें सर्व दुःख शमलें होतें; परंतु काष्ठांच्या योगानें ज्याप्रमाणें अग्नि एकाएकीं प्रदीप्त होतो, त्याप्रमाणें सीतेच्या वियोगामुळें हें दुःख एकाएकीं वृद्धिंगत झालें आहे. ती माझी सुशील परंतु भित्री सीता राक्षसानें हरण केली असल्यामुळें, आकाशामध्यें प्रविष्ठ झाल्यावर स्वाभाविक मृदुभाषणी असूनहि भयामुळें एकसारखी कर्कश स्वरानें आक्रोश करून राहिली असेल. दिसण्यांतहि मनोहर अशा उत्कृष्ठ केशराचीच सर्वदा संवय असलेले ते माझ्या प्रियेचे वर्तुल स्तन सांप्रत रक्तमिश्रित चिखलानें भरून गेले असतांहि मला मृत्यु येत नाहीं. मधुर, अत्यंत मनोहर मृदु भाषणांनीं युक्त व कुरळ्या केशांनीं संपन्न असलेलें तें तिचें मुख, ती राक्षसाच्या तावडींत सांपडली असतां राहुग्रस्त चंद्राप्रमाणें खरोखर शोभेनासें झालें असेल. ज्याला नेहमीं हाररूप मालेचीच संवय आहे, असा तो माझ्या पतिव्रतेचा कंठ निर्जन वनामध्यें रक्तप्राशन करणाऱ्या राक्षसांनीं चिरून खरोखर त्यांतील रक्त प्राशन केलें असेल ! निर्जन वनामध्यें मजविरहित असलेल्या त्या सीतेला राक्षस सभोंवतीं गराडा देऊन जेव्हां ओढून नेऊं लागले असतील, तेव्हां दीर्घ व मनोहर नेत्रांनीं युक्त असलेल्या त्या बिचाऱ्या सीतेनें कुररीप्रमाणें शब्द काढिला असेल. लक्ष्मणा, मनोहर हास्य आणि उदार स्वभाव ह्यांनीं युक्त असलेली ती सीता पूर्वी माझ्यासहवर्तमान ह्या धोंड्यावर बसून हंसत हंसत तुझ्याशीं पुष्कळच बोलत बसत असे. नद्यांमध्यें श्रेष्ठ असलेली ही गोदावरी माझ्या प्रियेला सर्वदा प्रिय आहे. तेव्हां ती येथेंच कोठें तरी गेली असेल, असेंहि एकदां माझ्या मनांत येतें. परंतु छेः ! ती एकटी कधींहि बाहेर जात नाहीं. बरें जिचें मुख कमलासारखें असून नेत्र कमलपत्राप्रमाणें आहेत, अशी ती

सीता कदाचित् कमळें आणण्याकरितां बाहेर गेली असेल; परंतु तसें होणें शक्य नाहीं. कारण माझ्यावांचून ती कधींहि कमळें आणण्याकरितां जात नाहीं. प्रफुल्लित वृक्षसमुदाय आणि नानाप्रकारचे पक्षिगण ह्यांनीं युक्त असलेल्या ह्या वनामध्येंच खरोखर ती गेली असेल; परंतु छेः ! तेंहि जुळत नाहीं. कारण एकटी कोठें बाहेर जाण्यास ती भित्री अतिशय भीत असते. हे सूर्यनारायणा, लोकांनीं केलें काय आणि न केलें काय हें सर्व तूं जाणत असून लोकांचीं खरीं खोटीं कर्मे तूं अवलोकन करीत असतोस. ह्यास्तव माझी ती प्रिया कोठें गेली आहे, किंवा तिला कोणी हरण करून नेलें आहे, हें सर्व मला सांग. मी अगदीं शोकाकुल झालों आहें. हे वायो, तुला नेहमीं विदित होत नाहीं, अशी कोणतीहि गोष्ट सर्व त्रैलोक्यामध्येंहि नाहीं. तेव्हां आपल्या पवित्र वर्तनानें कुलाचें रक्षण करणाऱ्या त्या प्रियेसंबंधीची वार्ता तूं मला सांग. अरे, ती मेली आहे, अथवा तिला कोणीं हरण करून नेलें आहे, किंवा ती कोठें तरी मार्गामध्यें आहे, हें मला कळूं दे."

ह्याप्रमाणें शोकानेंच ज्याचा देह ग्रस्त झाला आहे, असा तो राम उन्मत्तपणें अतिशय प्रलाप करीत असतांना, उदार अंतःकरणानें युक्त असून न्यायानें वागणारा तो लक्ष्मण समयोचित शब्दांनीं त्याला म्हणाला, " शोक सोडून दे, धैर्य धर, आणि सीतेचा शोध करण्याविषयीं उत्साह असूं दे. कारण अत्यंत दुष्कर कृत्यें प्राप्त झालीं असतांनाहि जगतामध्यें उत्साही लोकांचें धैर्य कधींहि खचत नाहीं."

ह्याप्रमाणें तो उत्कृष्ठ पराक्रमी लक्ष्मण दुःखाकुल होऊन सांगूं लागला असतांनाहि रघुवंशजश्रेष्ठ रामानें त्याचा विचार न करितां धैर्य सोडिलें, आणि त्यामुळें पुनरपि पूर्वीपेक्षांहि मोठें दुःख त्याला प्राप्त झालें.

सर्ग चौसष्टावा.

श्रीरामाचें दक्षिण दिशेस गमन.

राम दीन वाणीनें म्हणाला, " लक्ष्मणा, ह्या गोदावरीकडे जाऊन तूं सीतेचा शोध कर. कारण कदाचित् ती कमळें आणण्याकरितां गोदावरीवर गेली असेल."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां लक्ष्मण पुनरपि लवकर लवकर पाऊल उचलून मनोहर अशा गोदावरी नदीकडे गेला, आणि उतार असलेली ती

नदी धुंडाळून तो रामाला म्हणाला, " उतारांचे ठिकाणीं ही सीता माझ्या दृष्टीस पडत नाहीं, आणि मी आक्रोश करीत असतां माझें ऐकतहि नाहीं. तेव्हां दर्शन झालें असतां आमचे क्लेश नष्ट करणारी ही विदेहराजकन्या सीता कोणत्या तरी प्रदेशाला गेली आहे? रामा जिकडे ती सुंदरी गेली असेल, तो प्रदेश मला माहीत नाहीं. "

हें लक्ष्मणाचें भाषण श्रवण करून दीन व संतापामुळें मोहित झालेला राम स्वतः गोदावरी नदीकडे चालला आणि त्या नदीला गेल्यावर सीता कोठें आहे, असें तिला विचारूं लागला. तथापि वधालाच पात्र अशा राक्षसाधिपति रावणानें तिला नेलें आहे, हें जाणीत असूनहि तेथील प्राण्यांनीं आणि त्याचप्रमाणें गोदावरी नदीनेंहि रामाला तिच्यासंबंधानें बातमी सांगितली नाहीं. तदनंतर 'तूं ह्या रामाला ह्याची प्रिया कोठें आहे, हें सांग' असें तेथील प्राण्यांनीं गोदावरी नदीला सांगितलें असतांनाहि आणि शोक करणाऱ्या रामानें तिला विचारिलें असतांनाहि त्या दुरात्म्या रावणाचें तें कर्म आणि रूप मनामध्यें आणून भयामुळें त्या गोदावरी नदीनें विदेहराजकन्येची हकीकत रामाला कळविली नाहीं. तेव्हां सीतेच्या दर्शनाविषयीं त्या नदीनें निराश करून टाकिलेला व सीतेची भेट न झाल्यामुळें कृश झालेला तो राम लक्ष्मणाला म्हणाला, " हे विनयसंपन्न लक्ष्मणा, ही गोदावरी कांहींएक उत्तर देत नाहीं. ह्यास्तव सीतेच्या पित्याची आणि मातेची गांठ पडली असतां तिच्यावांचून मी त्यांना काय बरें अप्रिय वृत्त कथन करूं? राज्यापासून भ्रष्ट होऊन वनामध्यें वन्य पदार्थांवर उपजीविका करणाऱ्या माझा सर्व शोक जिनें दूर केला, ती विदेहराजकन्या सीता कोठें बरें गेली असेल? ज्ञातिवर्गाचा वियोग होऊन सीतेलाहि अवलोकन न करणाऱ्या मला आतां निद्रा येत नसल्या कारणानें रात्रीं मोठ्या होतील, असें वाटतें. सीता जर सांपडत असेल, तर मंदाकिनी नदी, जनस्थान व हा प्रस्रवण पर्वत हीं सर्व मी हिंडून पाहीन. हे वीर महामृग वारंवार माझ्याकडे पहात आहेत, आणि ह्यांना कांहीं तरी माझ्याशीं बोलावयाचें आहे, अशा प्रकारचे ह्यांचे हावभाव माझ्या दृष्टोत्पत्तीस येत आहेत. "

असें म्हणत म्हणत रामानें त्यांच्याकडे पाहिलें, आणि एकसारखी त्यांच्याकडे दृष्टि देऊन, अश्रूंनीं कंठ दाटून आल्यामुळें अस्पष्ट उच्चार होत असलेल्या वाणीनें 'सीता कोठें आहे' म्हणून त्यांना विचारिलें. ह्याप्रमाणें पुरुषश्रेष्ठ रामानें मृगांना प्रश्न केला असतां ते एकाएकीं उठले, आणि सर्वहि दक्षिणा-

भिमुख होऊन आकाश दाखवूं लागले. कारण रावण त्याच दिशेकडे सीतेला घेऊन गेला होता. सारांश, त्या दक्षिण दिशेकडील मार्गानें जातां जातां ते मृग प्रजाधिपति रामाकडे वरचेवर पहात पहात आपला उद्देश रामाला कळण्याकरितां वारंवार आकाशमार्गाकडे दृष्टि देत. साफ चालतां यावें, एतदर्थ पायांखालील भूप्रदेश दिसण्याकरितां वारंवार भूमीकडेहि पहात असत, आणि गर्जना करीत करीत पुनरपि त्या दिशेकडे जात.

अशा प्रकारें आपला उद्देश व्यक्त करणारे ते मृग लक्ष्मणानें अवलोकन केले, आणि त्यांचें तें चलनवलनरूप भाषणहि त्यानें जाणिलें. तदनंतर तो बुद्धिमान लक्ष्मण दुःखित पुरुषालाच योग्य अशा शब्दांनीं आपल्या ज्येष्ठ भ्रात्याला म्हणाला, "सीता कोठें आहे, असें तूं विचारितांक्षणीं ज्या अर्थी एकाएकीं उठून मला हे मृग भूमि आणि दक्षिण दिशा दाखवीत आहेत, त्या अर्थी राजा, राक्षसांनीं आश्रित असलेल्या ह्या दिशेकडे आपण गेलों, तर बरें होईल. कारण कदाचित् तिकडे तिचा कांहीं थांग लागण्याचा अथवा ती दृष्टीस पडण्याचा संभव आहे." ह्यावर 'ठीक आहे' असें म्हणून राम लक्ष्मणाबरोबर दक्षिण दिशेकडे निघाला, आणि पृथ्वीकडे दृष्टि देऊं लागला.

ह्याप्रमाणें एकमेकांशीं बोलत बोलत ते उभयतां भ्राते जाऊं लागले असतां पृथ्वीवर पडलेल्या पुष्पांनीं युक्त असा एक मार्ग त्यांच्या आढळण्यांत आला. तेव्हां भूप्रदेशावर पुष्पवृष्टि पडलेली पाहून दुःखित झालेला तो वीर राम दीन वाणीनें लक्ष्मणाला म्हणाला, "लक्ष्मणा, अरण्यामध्यें मीं दिलेलीं पुष्पें सीतेनें आपल्या बुचड्यामध्यें घातलीं होतीं, तींच हीं मीं ओळखिलीं. मला वाटतें यशस्विनी पृथ्वी, सूर्य आणि वायु हें माझें प्रिय करण्याकरितां पुष्पाचें रक्षण करीत आहेत."

ह्याप्रमाणें लक्ष्मणाला सांगून तो महापराक्रमी धर्मात्मा राम जलप्रवाहांनीं गजबजून गेलेल्या प्रस्रवण पर्वताला विचारूं लागला, "हे पर्वतराज, रम्य वनप्रदेशामध्यें माझा वियोग झालेली सर्वांगसुंदरी व मनोहर सीता तुझ्या कोठें दृष्टीस पडली आहे काय?" ह्याप्रमाणें रामानें विचारिलें असतांहि जेव्हां तो पर्वत कांहींच बोलेना, तेव्हां एखाद्या क्षुद्र मृगाशीं सिंहच भाषण करीत आहे कीं काय अशा रीतीनें क्षुब्ध होऊन राम म्हणाला, "हे पर्वता, तुझ्या सर्व शिखरांचा मी विध्वंस केला नाहीं, तोंच तूं आपला बऱ्या विचारानें ती सुवर्णवर्ण व सौंदर्यसंपन्न सीता कोठें आहे, हें मला दाखीव."

रावणाचा मोडलेला रथ वगैरे पाहून श्रीरामाचा कोप.

ह्याप्रमाणें तो राम पर्वताला म्हणाला असतां, तो पर्वत रामाला (पुढें सांगितल्याप्रमाणें) सीता गेल्याच्या खुणा दर्शवूं लागला. परंतु साक्षात् वाणीनें शब्द उच्चारून त्यानें त्याला सीता दाखविली नाहीं. तेव्हां दशरथपुत्र राम त्या पर्वताला म्हणाला, "माझ्या बाणरूप अग्नीनें दग्ध झाल्यामुळें आज तुझें भस्म होऊन जाईल, आणि सर्व बाजूंनीं तुझ्यावरील तृण, वृक्ष व पल्लव हीं नाहींतशीं होऊन तुझा कोणीहि आश्रय करणार नाहीं. अथवा लक्ष्मणा, पूर्णचंद्रासारख्या आल्हादकारक मुखानें युक्त असलेली सीता कोठें आहे, हें जर ही नदी मला न सांगेल, तर आज मी हिला शुष्क करून टाकितों." ह्याप्रमाणें क्रुद्ध होऊन, जें समोर येईल तें दृष्टीनें दग्ध करण्यास प्रवृत्त झालेल्या त्या रामानें भूमीवर उमटलेलें राक्षसाचें मोठें पाऊल अवलोकन केलें, व रावणाचें जटायूशीं युद्ध चाललें असतांना, राक्षसाच्या मागोमाग जाण्यास भाग पडलेली आणि भयभीत झालेली ती सीता रामदर्शनाची इच्छा धरून इकडे तिकडे धावूं लागली असतां तिचीं जीं पावलें उमटलीं होतीं, तींहि रामानें अवलोकन केलीं. ह्याप्रमाणें सीतेचीं व राक्षसाचीं पावलें पाहून व जटायूशीं युद्ध करितां करितां मोडलेलें धनुष्य, भाते आणि अनेक तुकडे होऊन अस्ताव्यस्त पडलेला तो रावणाचा रथ अवलोकन करून मनामध्यें गोंधळून गेलेला तो राम आपल्या प्रिय भ्रात्याला म्हणाला, "लक्ष्मणा, भूषणांतील सोन्याचे तुकडे सीतेनें फेंकून दिले आहेत, आणि त्याचप्रमाणें नानाप्रकारचीं पुष्पें तिनें इकडे तिकडे टाकिलीं आहेत. पहा, लक्ष्मणा, सुवर्णबिंदूंप्रमाणें दिसत असलेल्या अद्भुत रक्तबिंदूंच्या योगानें सर्व बाजूंनीं व्याप्त झालेलें हें भूतल तूं अवलोकन कर. ह्यावरून, लक्ष्मणा, यथेष्ट रूप धारण करणाऱ्या राक्षसांनीं जनककन्या सीता तोडतोडून वांटून घेतली असावी, अथवा भक्षण करून टाकिली असावी असें वाटतें. हे लक्ष्मणा, त्या सीतेकरितां कलह करणाऱ्या दोन राक्षसांचें ह्या ठिकाणीं घोर युद्ध झालें आहे, असा अजमास होतो. मोत्यें व रत्नें लाविलेलें रम्य व अलंकृत असें हें प्रचंड धनुष्य कोणाचें बरें भूमीवर मोडून पडलें आहे? वत्सा, हें धनुष्य राक्षसांचें अथवा देवांचें असलें पाहिजे. बालसूर्याप्रमाणें तेजस्वी व वैदूर्य मण्यांनीं अलंकृत असें हें भूमीवर तुकडे तुकडे होऊन पडलेलें सुवर्णाचें कवच कोणाचें बरें असावें? त्याचप्रमाणें शेंकडों कड्यांनीं युक्त व दिव्य पुष्पांनीं सुशोभित असलेलें हें कोणाचें बरें छत्र दांडा मोडून भूमीवर

पडलें आहे ? पिशाचासारख्या मुखांनीं युक्त, भयंकर, धिप्पाड व सुवर्णाची झूल घातलेले असे संग्रामामध्यें मारून टाकिलेले हे गर्दभ कोणाचे बरें असावे ? देदीप्यमान, अग्नीप्रमाणें उज्ज्वल, तेजस्वी आणि संग्रामामध्यें आपल्या यजमानाचें अस्तित्व व्यक्त करणारा असा हा उलथून पाडून मोडून टाकिलेला संग्रामसंबंधीं रथ कोणाचा बरें असावा ? रथाच्या कण्याइतके लांब, आणि सुवर्णभूषणांनीं युक्त असे प्रतिपक्षावर टाकिलेले, आणि म्हणूनच इकडे तिकडे पडलेले हे दिसण्यांतहि भयंकर असलेले बाण कोणाचे बरें असावेत ? लक्ष्मणा, पहा, बाणांनीं भरलेले हे भाते उध्वस्त होऊन पडले आहेत. चाबूक आणि लगामाच्या दोऱ्या ज्याच्या हातामध्यें आहेत, असा हा मारून टाकिलेला सारथि कोणाचा बरें आहे ? निःसंशय हा मार्ग कोणत्या तरी राक्षसाचा असला पाहिजे. राक्षसांशीं ह्यापूर्वीं जें माझें वैर होतें, त्यापेक्षां आतां कोणी माझा कैवार घेऊन ह्यांच्याशीं युद्ध केल्याचें दिसत असल्यामुळें, तें शेंकडोंपट ज्यास्त झालें असून जीविताचा नाश करणारें आहे, असें तूं समज. हे विनयसंपन्न लक्ष्मणा, ज्यांचीं अंतःकरणें फारच कठोर आहेत, अशा यथेष्ट रूप धारण करणाऱ्या राक्षसांनीं त्या बिचाऱ्या सीतेला हरण करून नेल्यामुळें ती मृत झाली असेल, किंवा त्यांनीं तिला भक्षण करून टाकिलें असेल ! अरेरे ! राक्षस सीतेला हरण करून नेऊं लागले असतांना महावनामध्यें धर्महि तिचें रक्षण करण्यास समर्थ होत नाहीं. हे लक्ष्मणा, सीतेला राक्षसांनीं भक्षण केलें असलें किंवा ते कोठें तिला घेऊन गेले असले, तरी जगतामध्यें माझें प्रिय करण्यास देव तरी कोणते समर्थ होणार आहेत ? लोकांचा उत्पादक आणि शूर असा शंकरहि जर दयार्द्र दृष्टीनें स्वस्थ बसूं लागला, तर त्याचा सुद्धां सर्व प्राणी अवमान करतील; मग माझी कथा कशाला पाहिजे ? प्राण्यांना सौख्य देण्याविषयीं उद्युक्त आणि म्हणूनच स्वभावतः गरीब असा मी इंद्रियदमन करून दयेमुळें स्वस्थ राहात असल्या कारणानें इंद्रप्रभृति स्वर्गाधिपति खरोखर मला वीर्यहीन समजत आहेत; आणि म्हणूनच त्यांनीं सीतेचें रक्षण केलें नाहीं. लक्ष्मणा, मृदुपणा वास्तविक गुण असूनहि तो माझे ठिकाणीं दोष बनला आहे. तस्मात्, हा मृदुपणा सोडून मी आतां पौरुषाचें अवलंबन करितों. चंद्रप्रकाशासारख्या माझ्या गुणांना लुप्त करून आजच सर्व राक्षसप्राण्यांच्या नाशाकरितां रवीसारखें माझें तेज प्रकाशत आहे, हें तूं अवलोकन कर. लक्ष्मणा, यक्ष, गंधर्व, पिशाच, राक्षस, किन्नर आणि मनुष्य ह्यांपैकीं कोणालाहि आतां सुख प्राप्त

होणार नाहीं. लक्ष्मणा, धनुष्यापासून सुटलेल्या बाणांनीं आकाश परिपूर्ण झालेलें तूं अवलोकन कर. आज मी त्रैलोक्यामध्यें संचार करणाऱ्या सर्व प्राण्यांचे व्यवहार बंद पाडीन. सारांश, त्रैलोक्यांतील ग्रहणांचा प्रचार मी बंद करीन. चंद्रालाहि आच्छादित करून टाकीन. अग्नि, वायु व सूर्य ह्यांचें तेज नाहींसें करून मी हें त्रैलोक्य अंधकारानें व्याप्त करून टाकीन. जलाशय शुष्क करून टाकीन. वृक्ष, लता व झुडपें ह्यांचा विध्वंस करून टाकीन, आणि समुद्राचाहि नायनाट करीन. तात्पर्य ह्या त्रैलोक्याचा मी आज नाश करीन. सीतेला हरण करून नेणारे जरी समर्थ असले, तरी ते जर आज सीता मला सुखरूप परत न देतील, तर ह्या घटकेस माझा पराक्रम काय आहे, तो ते अवलोकन करितील. लक्ष्मणा, पृथ्वीवरील सर्व प्राणी कांहीं आकाशांत उडून जाणार नाहींत. सीतेला हरण करून नेणारे प्राणी भूतलावरच कोठें तरी असतील. तेव्हां आज हें जगत् क्षुब्ध व विकृत झालेलें तूं पहाशील. कोणत्याहि प्राण्याला ज्याचें निवारण करितां येणार नाहीं, अशा कर्णापर्यंत प्रत्यंचा ओढून सोडिलेल्या बाणांच्या योगानें सीतेकरितां मी हें जगत् पिशाचरहित आणि राक्षसशून्य करून टाकीन. क्रोधानें सोडिल्यामुळें दूर जाणाऱ्या माझ्या बाणांचें सामर्थ्य आज देव अवलोकन करितील. माझ्या क्रोधामुळें त्रैलोक्याचा नाश झाला असतां देव, दैत्य, पिशाच व राक्षस ह्यांपैकीं कोणीहि राहाणार नाहीं. देव, दानव, यक्ष आणि राक्षस ह्यांचे गण बाणसमुदायांनीं अनेक प्रकारें तुकडे तुकडे होऊन पृथ्वीवर पडतील. लक्ष्मणा, सीतेला नेणारे बलाढ्य प्राणी जर मला सीता हरण केलेली अथवा मेलेली न देतील, तर बाणांच्या योगानें मी आजच सर्व त्रैलोक्य क्षुब्ध करून टाकीन. तशा प्रकारच्या माझ्या प्रिय सीतेला जर कोणी आणून न देतील, तर नुसत्या जगताचाच नव्हे, परंतु चराचर प्राण्यांसहवर्तमान सर्व त्रैलोक्याचाहि मी नाश करून टाकीन, आणि तिचें दर्शन होईपर्यंत मी बाणांच्या योगानें सर्वांना असेंच संतप्त ठेवीन.''

ह्याप्रमाणें लक्ष्मणाला सांगितल्यावर क्रोधानें नेत्र आरक्तवर्ण होऊन दोन्ही ओंठ स्फुरण पावूं लागलेल्या त्या रामानें परिधान केलेलीं वल्कलें व अजिनें सांवरून बांधून जटाभारहि सांवरून बांधिला. तो राम तशा प्रकारें क्रुद्ध झाला असतां पूर्वी त्रिपुरासुराचा वध करण्याची इच्छा धरणाऱ्या रुद्राप्रमाणें दिसूं लागला. तदनंतर रामानें लक्ष्मणापासून धनुष्य घेऊन तें हातामध्यें घट्ट धरिलें. सर्पाप्रमाणें भयंकर असलेला एक उज्ज्वल बाण त्यानें हातामध्यें घेतला.

नंतर शत्रुसमुदाय जिंकिणाऱ्या त्या वैभवशाली रामानें तो बाण त्या धनुष्याला लाविला. इतकेंच नव्हे, परंतु प्रलयकालच्या अग्नीप्रमाणें क्रुद्ध झालेला तो राम लक्ष्मणाला म्हणाला, "लक्ष्मणा, जरा, मृत्यु, काल आणि दैव हीं प्राप्त झालीं असतां ज्याप्रमाणें कोणत्याहि प्राण्याचे ठिकाणीं त्यांचें निवारण होत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. त्याचप्रमाणें मी क्रोधसंयुक्त झालों असतां माझें कोणाच्याहि हातून निःसंशय निवारण होणार नाहीं. पूर्वीप्रमाणें मनोहर दंतांनीं युक्त व निर्दोष असलेली मिथिलराजकन्या सीता जर तिचे अपहार करणारे मला न देतील, तर देव, गंधर्व, मनुष्य, पन्नग व पर्वत ह्यांसहवर्तमान मी सर्व जगत् उलथून टाकीन."

सर्ग पासष्टावा.

क्रोधाविष्ट श्रीरामाचें सांत्वन.

सीतेचा अपहार झाल्यामुळें म्लान वदन होऊन शोक करीत असलेला तो राम, प्रलयकालच्या अग्नीप्रमाणें लोकांच्या नाशाला उद्युक्त झाला आहे, प्रत्यंचा चढविलेल्या धनुष्याकडे पहात आहे, वारंवार सुस्कारे टाकीत आहे, प्रलयसमयीं जगत् दग्ध करून टाकण्यास उद्युक्त होणाऱ्या रुद्राप्रमाणें सर्व जगत्च दग्ध करून टाकण्याची इच्छा करीत आहे, आणि पूर्वीं कधींहि पहाण्यांत न आलेला अशा रीतीनें क्रुद्ध झालेला आहे. असें अवलोकन करण्याबरोबर लक्ष्मणाचें मुख निस्तेज झालें, आणि हात जोडून तो त्याला म्हणाला, "आपण पूर्वीं इंद्रियनिग्रहि आणि प्राणिमात्रांच्या हिताविषयीं तत्पर होतां. तेव्हां सांप्रत क्रोधाच्या अधीन होऊन आपल्या स्वभावाचा त्याग करणें तुम्हांला योग्य नाहीं. चंद्राचे ठिकाणीं कांति, सूर्याचे ठिकाणीं प्रभा, वायूचे ठिकाणीं गति व पृथ्वीचे ठिकाणीं क्षमा हीं जशीं नित्यसिद्ध आहेत, तशीच आपले ठिकाणीं अनुपम कीर्ति नित्यसिद्ध आहे. ह्यास्तव एकाच्या अपराधाकरितां सर्व लोकांचा वध करणें आपणाला योग्य नाहीं. हा अपराध एकाचाच आहे, हें मी जाणीत आहे. कारण सामान व आयुधें ह्यांसहवर्तमान हा कोणाचा तरी एकाचाच संग्रामासंबंधीं रथ मोडून पडलेला आहे, हें उघडच दिसत आहे; परंतु हा रथ कोणीं मोडिला आहे, व काय कारणाकरितां मोडिला आहे, ह्याची मात्र अटकळ मला होत

नाहीं. हे राजपुत्रा, अश्वांच्या खुरांनीं व चाकांच्या धांवांनीं खळग्या पडलेल्या ह्या अतिभयंकर प्रदेशांवर रक्तबिंदूंचा सडा झालेला आहे. ह्यावरून येथें संग्राम झालेला असावा, असें दिसतें. रामा, हा संग्राम एकेकट्यांचाच झालेला आहे, अनेकांचा झालेला नाहीं. कारण मोठ्या सैन्याचीं पावलें उमटलेलीं येथें दिसत नाहींत. तस्मात्, एकाकरितां त्रैलोक्याचा नाश करणें, तुला योग्य नाहीं. पृथ्वीच्या अधिपतींनीं शांत व मृदु राहून अपराधाप्रमाणेंच दंडाचें अवलंबन केलें पाहिजे. सर्व प्राण्यांचें रक्षण करणारा तूंच असून सर्वांचा मुख्य आश्रयहि तूंच आहेस. तेव्हां रामा, तुझ्या पत्नीचा नाश होणें कोणालाहि बरें वाटणार नाहीं. यज्ञदीक्षा घेतलेल्या यजमानाचे इच्छेविरुद्ध ज्याप्रमाणें ज्ञानी ऋत्विज वागत नाहींत, त्याचप्रमाणें नद्या, समुद्र, पर्वत, देव, गंधर्व आणि दैत्य ह्यांपैकीं कोणीहि तुझ्या मर्जीविरुद्ध वागण्यास समर्थ नाहींत. राजा, हातामध्यें धनुष्य घेऊन व साहाय्य करणाऱ्या श्रेष्ठ ऋषींसहवर्तमान मला बरोबर घेऊन ज्यानें सीतेचा अपहार केला आहे, त्याला तूं हुडकून काढ. समुद्र, पर्वत, वनें, नानाप्रकारच्या घोर गुहा आणि नाना प्रकारचीं सरोवरें आपण धुंडून काढूं. इतकेंच नव्हे, परंतु तुझ्या भार्येचा अपहार करणाऱ्याचा पत्ता लागेपर्यंत आपण लक्ष्यपूर्वक देवलोक आणि गंधर्वलोकहि शोधून काढूं. ह्याप्रमाणें सामोपचारानें स्वर्गाधिपति देव जर तुला तुझी पत्नी परत न देतील, तर मग समयाला योग्य असें काय हवें तें तूं कर. रामा, गरिबी, सामोपचार, विनय आणि नीति ह्यांच्या योगानें जर तुला सीता प्राप्त न होइल, तर इंद्रवज्रतुल्य आणि सुवर्णाच्या पिसांनीं युक्त अशा बाणसमुदायांनीं तूं त्रैलोक्याचा नाश करून टाक."

सर्ग सहासष्टावा.

श्रीरामाचें कोपशमन.

याप्रमाणें शोकसंपन्न, खिन्न, अत्यंत मोहित व भानरहित झालेला तो राम अनाथाप्रमाणें विलाप करूं लागला असतां एक क्षणभरहि वाट न पहातां सुमित्रापुत्र लक्ष्मणानें रामाचे पाय धरिले, आणि धीर देऊन तो त्याला म्हणाला, "देवांना ज्याप्रमाणें अमृत प्राप्त झालें, त्याप्रमाणें मोठी तपश्चर्या आणि मोठें कर्मानुष्ठान केल्यामुळें दशरथ राजाला तूं प्राप्त झालेला असून, त्या पृथ्वीपति

राजाला तूं आपल्या गुणांनींच स्वाधीन करून घेतलें असल्या कारणानें तुझ्याच वियोगामुळें तो स्वर्गवासी झाल्याची हकीकतहि तूं भरतापासून इत्थंभूत श्रवण केलीच आहेस. रामा, हें प्राप्त झालेलें दुःख जर तूं सहन न करशील, तर कमी धैर्याचा असा दुसरा कोण बरें साधारण पुरुष प्रसंग पडला असतां दुःख सहन करील ? कारण श्रेष्ठांचेंच अनुकरण इतर लोक करीत असतात. तस्मात् हे पुरुषश्रेष्ठा, तूं धीर धर. प्रत्येक प्राण्यावर संकटें येऊन तीं त्याला अग्नी-प्रमाणें चटका लावीतच असतात; परंतु धैर्याचें अवलंबन केलें असतां तीं एका क्षणामध्यें नाहींतशींहि होतात. अरे, प्रपंचांत दुःख होणें हा जगताचा स्वभा-वच आहे. नहुषपुत्र ययाति इंद्रलोकीं गेला असतां त्यालाहि कांहीं दिवस स्वर्गच्युतिरूप दुःख भोगावें लागलें. आपल्या पित्याचे पुरोहित जे महर्षी, त्यांना शंभर पुत्र झाले व एका दिवसांतच विश्वामित्रानें ते सर्व मारून टाकिले. हे कोसलाधिपते, सर्व लोकांना पूज्य अशा ह्या जगज्जननी पृथ्वीचेंहि चलन दृष्टोत्पत्तीस येतें. धर्मप्रवर्तक जगन्नियंते आणि सर्वांना आधारभूत असे जे महा-बलाढ्य सूर्यचंद्र, त्यांनाहि ग्रहण लागत असतें. हे पुरुषश्रेष्ठा, प्राणी कितीहि मोठे असले, तरी ते अथवा देवहि दैवाच्या कचाट्यांतून सुटत नाहींत; मग देह धारण कर-णारे सामान्य सर्व प्राणी त्याच्या कचाट्यांतून सुटत नाहींत, हें कशाला सांगावयास पाहिजे ? हे पुरुषश्रेष्ठा, इंद्रादि देवांचे ठिकाणींहि सुखदुःख असल्याचें ऐकण्यांत येतें. ह्यास्तव शोक करणें तुला योग्य नाहीं. फार तर काय, परंतु हे वीरा, सीता नाहींशी झाली असतां किंवा ती मेली असतांहि एखाद्या साधारण पुरुषा-प्रमाणें तिच्याबद्दल शोक करणें, तुला योग्य नाहीं. रामा, नेहमीं सर्व गोष्टींकडे लक्ष्य पुरविणारे आणि खिन्न मुद्रेनें कधींहि युक्त न होणारे तुझ्यासारखे श्रेष्ठ लोक मोठमोठीं संकटें आलीं असतांहि दुःख करीत बसत नाहींत. हे पुरुष-श्रेष्ठा, तूं बुद्धिपूर्वक एकदां तत्त्वदृष्टीनें युक्तायुक्ततेचा विचार कर. कारण बुद्धीनें युक्त असलेले महाज्ञानी लोक शुभाशुभ जाणीत असतात. ज्यांतील गुणदोष प्रत्यक्ष दृष्टोत्पत्तीस येत नाहींत, अशीं जीं नश्वर कर्में त्यांची निष्पत्ति पुरुषव्यापारावांचून होत नाहीं. परंतु स्वतःच्या खटपटीनें झालेलीं जीं कर्में, त्यांच्यापासून परिणामीं सुख अथवा दुःख प्राप्त होतच असतें. तेव्हां काय प्राप्त होईल, तें सहन केलेंच पाहिजे. हे वीरा, ह्याप्रमाणें पूर्वीं तूंच मला अनेक वेळां उपदेश केला आहेस. बाकी साक्षात् बृहस्पतीहि तुला उपदेश करण्यास समर्थ नाहीं, मग दुसऱ्याची तर गोष्ट पाहिजे कशाला ? हे महा-

ज्ञानवान रामा, तुझ्या ज्ञानाचें आकलन देवांनाहि करितां येणें शक्य नाहीं. तथापि शोकानें तें तुझें ज्ञान आज आच्छादित झाल्यासारखें दिसत असल्यामुळें मी तें तुझ्याच उपदेशानें पुनरपि आवरणरहित करितों. हे इक्ष्वाकुवंशजश्रेष्ठा, देवांना व मनुष्यांना उचित अशा आपल्या पराक्रमाचा विचार करून तूं शत्रूच्या वधाविषयीं प्रयत्न कर. सर्वांचा नाश करून तुला काय उपयोग होणार आहे ? ज्यानें तुझ्या भार्येला नेलें असेल, त्याच दुष्ट शत्रूला ओळखून काढून तूं त्याचीं पाळेंमुळें खणून काढ. "

सर्ग सदुसष्टावा.

मरणोन्मुख जटायूची भेट.

ह्याप्रमाणें लक्ष्मणानें ज्येष्ठ भ्रात्या रामाला चांगल्या शब्दांनीं उपदेश केला असतां सार ग्रहण करणाऱ्या रघुवंशज रामानें त्यांतील मुख्य सार ग्रहण केलें. नंतर पराकाष्ठेला पोहोंचलेला आपला क्रोध आवरून धरून व अद्भुत धनुष्य हातांत घेऊन तो महापराक्रमी राम लक्ष्मणाला म्हणाला, " वत्सा लक्ष्मणा, आपण आतां काय करावें ? आपणांला कोणत्या उपायानें येथें सीता प्राप्त होईल, ह्याचा तूं विचार कर. "

ह्याप्रमाणें तो राम दुःखाकुल झाला असतां लक्ष्मण त्याला म्हणाला, " हें जनस्थानच तूं शोधून काढ. नानाप्रकारच्या वृक्षांनीं व लतानीं युक्त असलेलें हे जनस्थान असंख्य राक्षसांनीं व्याप्त झालेलें आहे. ह्या ठिकाणीं जाण्यास अशक्य असे पर्वतप्रदेश, धबधबे, दऱ्या आणि अनेक प्रकारच्या भयंकर गुहा नानाप्रकारच्या मृगगणांनीं व्याप्त असून किन्नरांचीं निवासस्थानें व गंधर्वांचीं घरेंहि आहेत; तीं तूं मला बरोबर घेऊन शोधून काढ. तुझ्यासारखे बुद्धिमान व महात्मे पुरुषश्रेष्ठ वायुवेगाला दाद न देणाऱ्या पर्वताप्रमाणें संकटसमयीं घाबरे होत नाहींत. "

ह्याप्रमाणें लक्ष्मणानें सांगितल्यावर तो क्रुद्ध राम वस्तऱ्यासारखा तीक्ष्ण व घोर बाण धनुष्याला लावून लक्ष्मणासहवर्तमान त्या सर्व वनामध्यें संचार करूं लागला. तेव्हां पर्वतशिखराप्रमाणें धिप्पाड असलेला महाभाग्यवान पक्षिश्रेष्ठ जटायु रक्तानें भरून गेलेला व भूमीवर पडलेला त्यानें अवलोकन केला.

पर्वतशिखराप्रमाणें धिप्पाड असलेल्या त्या पक्ष्याला अवलोकन केल्यावर राम लक्ष्मणाला म्हणाला, "ह्यानेंच विदेहराजकन्या सीता भक्षण करून टाकिली, ह्यांत संशय नाहीं. निःसंशय हा गृध्ररूप राक्षस अरण्यामध्यें संचार करीत आहे. तस्मात्, विशाल नेत्रांनीं युक्त असलेल्या सीतेला यथेष्ट भक्षण करून ज्या अर्थी हा स्वस्थ बसलेला आहे, त्या अर्थी उज्ज्वल अग्रांनीं युक्त व सरळ जाणाऱ्या घोर बाणांनीं मी ह्याचा वध करितों."

असें म्हणून रामानें धनुष्याला क्षुरसंज्ञक बाण लाविला, आणि समुद्रवलयांकित पृथ्वी कंपित करीतच कीं काय तो क्रुद्ध राम त्या पक्ष्याला पहाण्याकरितां त्याच्या अंगावर धावून गेला. तेव्हां फेंसासहवर्तमान रक्त ओकीत असलेला तो पक्षी अत्यंत दीनवाणीनें त्या दशरथपुत्र रामाला म्हणाला, "हे चिरंजीवी रामा, संजिवनी ओषधीप्रमाणें तूं जिचा वनामध्यें शोध करीत आहेस, ती सीता आणि माझे प्राण हीं दोन्ही रावणानें हरण करून नेलीं. हे रघुवंशजा रामा, तूं आणि लक्ष्मण ह्यांपैकीं कोणीच बरोबर नसून सीतादेवीला महाबलाढ्य रावण घेऊन चालला आहे, असें जेव्हां मीं अवलोकन केलें, तेव्हां तिचें रक्षण करण्याच्या उद्देशानें मी त्याच्या पुढें गेलों; आणि संग्रामामध्यें रावणाच्या रथाचा व छत्राचा विध्वंस करून मीं त्याला भूतलावर पाडिलें. रामा, हें त्याचें धनुष्य मोडून पडलें असून हे त्याचे बाण पडले आहेत; आणि त्याचप्रमाणें रणामध्यें त्याचा हा संग्रामसंबंधीं रथहि मोडून पडला आहे. इतकेंच नव्हे, परंतु माझ्याच पंखांच्या योगानें हा त्याचा सारथीहि भूमीवर मरून पडला आहे. तथापि युद्ध करून मी श्रांत झालों असतां रावणानें खड्ग घेऊन माझे पंख तोडिले, आणि विदेहराजकन्या सीतेला घेऊन तो आकाशमार्गानें चालता झाला. ह्यास्तव राक्षसानें पूर्वींच मारून टाकिलेल्या माझा वध करणें तुला योग्य नाहीं."

ह्याप्रमाणें त्यानें सांगितलेली ती सीतेसंबंधानें प्रिय कथा श्रवण केल्याबरोबर आपल्या हातांतील मोठें धनुष्य टाकून देऊन राम त्या गृध्रराज जटायूला कडकडून भेटला, आणि स्वतः इतरांपेक्षां धैर्यवान असून सुद्धां जटायूचाहि वध झाल्याचें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आल्या कारणानें द्विगुणित दुःखानें व्याकुल झाल्यामुळें कांहींएक सुचेनासें होऊन तो लक्ष्मणासहवर्तमान भूमीवर पडून रोदन करूं लागला. तदनंतर शोक करितांकरितां लक्ष्मणाला ऊर्ध्व होऊन तो एकटा एकसारखा दीर्घ श्वास टाकीत आहे, असें अवलोकन केल्यावर तो दुःखित

राम म्हणाला, "राज्य नाहींसें झालें, वनामध्यें वास्तव्य करण्याचा प्रसंग आला, सीतेचा ठिकाण नाहीं आणि कैवारी पक्षीहि मरून गेला! अशा प्रकारची ही माझी आपत्ति अग्नीलाहि जाळून टाकील. हा दुःखसंताप शमन होण्याकरितां संपूर्ण महासागरामध्यें जर मी आज उडी घातली, तर तो सागरहि माझ्या आगीनें खरोखर शुष्क होऊन जाईल. ज्या मला हें प्रचंड दुःखजाल प्राप्त झालें आहे, त्या माझ्यापेक्षां ह्या चराचर जगतामध्यें अधिक भाग्यहीन प्राणी कोणीहि नाहीं! अरे, माझ्या पित्याचा मित्र हा महाबलाढ्य गृध्रराजहि माझें नशीब फिरल्यामुळें भूमीवर मरून पडला आहे."

ह्याप्रमाणें रामानें लक्ष्मणासहवर्तमान नानाप्रकारांनीं विलाप केला, आणि पितृप्रेम दर्शविण्याच्या उद्देशानें जटायूला त्यानें वारंवार आलिंगन दिलें. असो. ह्याप्रमाणें पंख तुटून शरीर रक्तानें भरलेल्या त्या गृध्रराजाला आलिंगन दिल्यावर, 'प्राणांप्रमाणें असलेली माझी प्रिया मिथिलराजकन्या सीता कोठें गेली!' असा हंबरडा फोडून रघुवंशज राम भूमीवर पडला.

सर्ग अडुसष्टावा.

जटायुमुखें सीतावृत्तकथन.

घोर राक्षसानें भूमीवर मारून पाडिलेल्या त्या गृध्राला अवलोकन करून राम सर्वांशीं मित्रत्वानें वागणाऱ्या लक्ष्मणाला म्हणाला, "खरोखर माझ्याकरितांच हा पक्षी धडपड करूं लागला असतांना राक्षसानें युद्धामध्यें ह्याचा वध केला आहे, व हा आतां माझ्याकरितां प्राण सोडीत आहे. लक्ष्मणा, ह्याचे प्राण अगदीं गुदमरून गेल्याचें दिसत आहे, व ह्याच्या तोंडांतून उच्चारहि निघत नसून हा डोळे फिरवीत आहे. हे जटायो, तुझ्यानें जर बोलवत असेल, तर पुनरपि एकदां सीतेची हकीकत सांग. देव तुझें बरें करो. स्वतःच्या वधाचाहि वृत्तांत तूं मला कथन कर. साध्वी सीता रावणानें कशाकरितां बरें हरण करून नेली? माझी प्रिया सीता रावणानें हरण करून नेण्यासारखा मीं त्याचा काय बरें अपराध केला? नेते वेळीं सीतेचें तें चंद्रतुल्य मनोहर मुख कसें झालें होतें, आणि त्या वेळीं सीतेनें काय शब्द उच्चारिले, हें तूं मला कथन कर त्याचप्रमाणें बा जटायो, त्या राक्षसाचें वीर्य कसें आहे, त्याचें स्वरूप कसें आहे, त्याचें कर्म

कसें आहे, आणि त्याचें वसतिस्थान कोठें आहे, हें मी तुला विचारीत आहें, तें तूं मला कथन कर."

ह्याप्रमाणें तो राम अनाथासारखें भाषण करूं लागला असतां, त्याच्याकडे पाहून तो धर्मात्मा जटायु अडखळत अडखळत म्हणाला, "वायु व मेघपटल ह्यांनीं युक्त असलेल्या प्रचंड मायेचें अवलंबन करून त्या दुरात्म्या राक्षसाधिपति रावणानें सीता हरण करून नेली. मी त्याच्याशीं युद्ध करून थकलों असतां, माझेहि पंख त्यानें तोडून टाकिले; आणि विदेहराजकन्या सीतेला घेऊन तो राक्षस दक्षिणेकडे तोंड करून चालता झाला. रामा, आतां माझे प्राण व्याकुल होत असून माझी नजर ठरेनाशी झाली आहे. मरणकाल समीप आल्यामुळें नलदरूप केसांनीं युक्त असे सुवर्णवृक्ष माझ्या दृष्टीस पडूं लागले आहेत. असो. ज्या मुहूर्तावर रावण सीतेला घेऊन गेला, त्या मुहूर्तावर जें द्रव्य नाहींसें झालेलें असेल, तें मालकाला सत्वर परत मिळत असतें. हे ककुत्स्थकुलोत्पन्ना रामा, त्या वेळीं हा विंद नामक मुहूर्त होता, ही गोष्ट त्या रावणाच्या लक्ष्यांत आली नाहीं. तस्मात् हे सीतापते, ज्या अर्थी तो ह्या मुहूर्तावर सीतेला घेऊन गेला आहे, त्या अर्थी आमिषाचा स्वीकार करणाऱ्या मत्स्याप्रमाणें त्याचा सत्वरच नाश होईल. जनककन्येसंबंधानें तूं मुळींच काळजी करूं नको. संग्रामामध्यें त्या राक्षसाचा वध करून तूं लवकरच विदेहराजकन्येशीं रममाण होशील."

जटायुप्रेतदहन.

ह्याप्रमाणें तो शुद्धीवर असलेला गृध्रपक्षी रामाला सांगूं लागला असतां, मरणोन्मुख झाल्यामुळें त्याच्या तोंडांतून मांसासहवर्तमान रक्त वाहूं लागलें, आणि रावण कोण हें सांगण्याचा उद्देश मनांत धरून 'विश्रवस मुनींचा प्रत्यक्ष पुत्र व कुबेराचा भ्राता' इतकेंच बोलून त्या पक्षीराजानें दुर्लभ प्राण सोडिले! सारांश, 'सांग, सांग' असें राम हात जोडून त्याला म्हणत असतांनाहि शरीराचा त्याग करून त्या गृध्रपक्ष्याचे प्राण आकाशामध्यें निघून गेले. तात्पर्य, मस्तक भूमीवर टाकून देऊन, त्याचप्रमाणें पाय लांब करून आणि आपलें शरीर अस्ताव्यस्त टाकून देऊन तो भूतलावर मरून पडला! तेव्हां ताम्रवर्ण नेत्रांनीं युक्त असलेला पर्वतप्राय गृध्रपक्षी गतप्राण झाल्याचें अवलोकन करून फारच दुःख झाल्यामुळें दीन झालेला राम लक्ष्मणाला म्हणाला, "राक्षसांचें निवासस्थान असलेल्या ह्या दंडकारण्यामध्यें पुष्कळ वर्षेंपर्यंत सुखानें वास्तव्य कर-

१. वाळा.

णाऱ्या ह्या पक्ष्याला शेवटीं येथेंच मरण आलें! पुष्कळ वर्षांचा म्हणजे चिरंजीवी असलेला हा पक्षी ज्या अर्थी आज मरून पडला आहे, त्या अर्थी कालाचें अतिक्रमण होणें दुर्घट आहे, हीच गोष्ट खरी! लक्ष्मणा, पहा माझ्यावर उपकार करणारा हा गृध्रपक्षी सीतेची मुक्तता करण्याकरितां प्रवृत्त झाला असतां, बलाढ्य रावणाच्या हातून ह्याचा वध झाला. आपल्या वाडवडिलांपासून चालत आलेल्या गृध्रराज्याचा त्याग करून ह्या पक्षीराजानें माझ्याकरितां प्राण सोडिला. लक्ष्मणा, शूर व शरण जाण्यास योग्य असे धर्मानें वागणारे साधुजन खरोखर सर्वत्र म्हणजे तीर्यग्योनि प्राप्त झालेल्या प्राण्यांतहि दृष्टोत्पत्तीस येतात. हे विनयसंपन्न शत्रुतापना, माझ्याकरितां गृध्रपक्ष्याचा नाश झाला, ह्याबद्दल जसा माझ्या मनाला चटका लागून राहिला आहे, तसा सीतेचा अपहार झाल्यामुळें होणाऱ्या दुःखाचा चटका लागून राहिलेला नाहीं. वैभवशाली व महाकीर्तिमान दशरथ राजा जसा मला पूज्य व मान्य होता, तसाच हा पक्षिराज मला पूज्य व मान्य आहे. तस्मात् लक्ष्मणा, काष्ठें घेऊन ये, म्हणजे मी मंथन करून अग्नि काढीन; नंतर माझ्याकरितां प्राणाला मुकलेल्या ह्या पक्षिराजाचें दहन करीन. लक्ष्मणा, क्रूर राक्षसानें वध केलेल्या ह्या पक्षिगणांच्या राजाला मी चितेवर ठेवून दहन करीन. हे महाशय गृध्रराजा, माझ्या हातून तुझा और्ध्वदेहिक संस्कार होत असल्यामुळें यज्ञशील, अग्निहोत्री, युद्धापासून परावृत्त न होणारे आणि भूमिदान करणारे ह्यांची गति तुला क्रमाक्रमानें प्राप्त झाल्यावर माझ्या अनुज्ञेनें तुला सर्वोत्कृष्ठ असे क्रममुक्तिदायक लोक प्राप्त होतील."

असें बोलून रामानें त्या पक्षिराजाला प्रदीप्त चितेवर ठेविलें, आणि दुःखाकुल होऊन त्या धर्मात्म्यानें स्वतःचा बांधवच कीं काय असें समजून त्याचें दहन केलें. नंतर लक्ष्मणाला बरोबर घेऊन वनामध्यें गेलेल्या त्या वीर्यवान रामानें मोठमोठे स्थूल मृग मारून आणिले. तदनंतर त्या पक्ष्याला उद्देशून पिंडदान करण्याकरितां त्यानें भूमीवर तृण पसरिलें. मृगमांस बाहेर काढून व त्याचे पिंड करून महाकीर्तिमान रामानें रम्य अशा त्या हिरव्या तृणावर ते पक्ष्याला अर्पण केले; आणि मृत झालेल्या मनुष्याला स्वर्गप्राप्ति व्हावी, ह्या उद्देशानें जे मंत्र ब्राह्मण सांगत असतात, त्या स्वर्गप्रापक मंत्रांचा रामानें सत्वर जप केला. इतकें झाल्यावर ते उभयतां राजपुत्र गोदावरी नदीचे तीरीं गेले, आणि त्यांनीं त्या गृध्रराजाचें तर्पण केलें. सारांश, शास्त्रोक्त विधींचें अवलंबन

करून जलाचा आश्रय केल्यावर त्या उभयतां रघुवंशजांनीं त्या गृध्राच्या उद्देशानें स्नान केलें, आणि नंतर त्या गृध्रराजाला जलांजली दिली.

असो. कीर्ति वृद्धिंगत करणारें असें अत्यंत दुष्कर कर्म करून संग्रामांत वध पावलेल्या त्या गृध्रराजाचा महर्षीतुल्य रामानें और्ध्वदेहिक संस्कार केल्यामुळें त्याला केवळ पुण्यानेंच प्राप्त होणारी व सुस्वरूप असलेली अशी आत्मगति प्राप्त झाली. इकडे उत्तरक्रियेसंबंधीं उदककर्म आटोपल्यावर त्या श्रेष्ठ पक्ष्याविषयीं आपली पूज्य बुद्धि अचल कायम ठेवून आणि पुनरपि सीतेच्या प्राप्तीकडे आपलें मन लावून, देवाधिपति विष्णु व इंद्रच कीं काय असे ते रामलक्ष्मण वनामध्यें प्रविष्ठ झाले.

सर्ग एकुणसत्तरावा.

कबंधदर्शन.

ह्याप्रमाणें जटायूला जलांजली दिल्यावर तेथून वनामध्यें निघालेले ते रघुवंशज राम-लक्ष्मण सीतेला शोधण्याकरितां पश्चिम दिशेकडे चालते झाले. नंतर जरा दक्षिण दिशेकडे वळल्यावर, धनुर्बाण व खड्ग धारण केलेले ते उभयतां संचाररहित अशा मार्गाला लागले. झुडुपें, वृक्ष आणि नानाप्रकारच्या लता ह्यांनीं परिवेष्ठित असलेला तो वनरूप मार्ग सर्व बाजूंनीं आच्छादित, जाण्यास कठीण व दिसण्यांतहि भयंकर होता. तथापि दक्षिण दिशेचें अवलंबन करून वेगावेगानें ते त्या मार्गांतून पार पडले. नंतर ते महाबलाढ्य रामलक्ष्मण अतिशयच भयंकर अशा त्या महारण्यामध्यें प्रविष्ठ झाले. तदनंतर जनस्थानापासून तीन कोस गेल्यावर ते महासामर्थ्यवान रघुवंशज राम-लक्ष्मण क्रौंचारण्यसंज्ञक गहन वनामध्यें प्रविष्ठ झाले. अनेक मेघांच्या समुदायाप्रमाणें श्यामवर्ण असलेलें तें वन, अनेक वर्णांच्या शुभ पुष्पांनीं व पशुपक्ष्यांच्या समुदायांनीं युक्त असल्यामुळें सर्व बाजूंनीं आनंदित झाल्यासारखें दिसत होतें.

असो. सीतेचा अपहार झाल्यामुळें दुःखित झालेले ते राम-लक्ष्मण सीतेला शोधण्याचा उद्देश मनामध्यें धरून जागोजाग थांबले, आणि त्यांनीं तें वन धुंडून काढिलें. तदनंतर त्या क्रौंचारण्यसंज्ञक वनांतून निघाल्यावर पूर्व दिशेकडे ते तीन कोस गेले असतां, मार्गामध्यें मतंग मुनींचा आश्रम त्यांनीं अवलोकन केला.

भयंकर अशा असंख्य पशुपक्ष्यांनीं युक्त, नानाप्रकारच्या वृक्षांनीं व्याप्त व गहन वृक्षांनीं गजबजलेला असा तो घोर मतंगाश्रम अवलोकन केल्यावर तेथील पर्वतावर पातालाप्रमाणें खोल व अंधकारानें नेहमीं व्याप्त असलेली एक दरी त्या राम-लक्ष्मणांनीं अवलोकन केली. त्या दरीच्या शेजारींच ते पुरुषश्रेष्ठ बसले असतां अक्राळविक्राळ मुखानें युक्त असलेली एक फारच मोठी राक्षसी त्यांच्या दृष्टीस पडली. ती निंद्य कर्म करणारी राक्षसी दिसण्यांतहि भयंकर असून अशक्त प्राण्यांना भयप्रद होती. तिचें उदर लांब होतें, दाढा तीक्ष्ण होत्या, शरीर उन्नत होतें, त्वचा कठीण होती, आकार फारच स्थूल होता, केंस मोकळे सोडिलेले होते, आणि भयंकर मृगांनाहि ती भक्षण करीत होती. अशा प्रकारची ती राक्षसी त्या भ्रात्या राम-लक्ष्मणांनीं अवलोकन केल्यावर ती त्या वीरांचे समीप आली, आणि भ्रात्याचे अग्रभागीं संचार करीत असलेल्या लक्ष्मणाला 'ये, आपण रममाण होऊं' असें म्हणून तिनें आलिंगन दिलें. इतकेंच नव्हे, परंतु लक्ष्मणाला मिठी मारिल्यावर ती त्याला म्हणाली, "माझें नांव अयोमुखी असून मी तुला लाभरूपच आहें; आणि तूं माझा प्रिय भर्ता आहेस. ह्यास्तव नाथा, हे वीरा, पर्वतसंबंधीं दुर्गम प्रदेश आणि नद्यांचीं वाळवंटें ह्या ठिकाणीं माझ्यासहवर्तमान तूं चिरकाल रममाण हो."

ह्याप्रमाणें तिनें सांगितलें असतां लक्ष्मण क्रुद्ध झाला, आणि त्या शत्रुनाशकानें तरवार उपसून तिचे कान, नाक व स्तन कापून काढिले. तेव्हां कान व नाक तुटल्यावर तिनें भयंकर गर्जना केली. नंतर दिसण्यांतहि भयंकर असलेली ती राक्षसी आल्या मार्गानें पळून गेली. ती गेल्यावर शत्रूंचा वध करणारे ते भ्राते राम-लक्ष्मण जोरानें चालतां चालतां एका गहन वनामध्यें आले. तेव्हां सत्यनिष्ठ, सुशील, शुचि व महातेजस्वी लक्ष्मण हात जोडून उज्ज्वल कांतीनें युक्त असलेल्या भ्रात्याला म्हणाला, "माझा वाम बाहु अतिशयच स्फुरण पावत असून माझें मनहि उद्विग्न झाल्यासारखें झालें आहे; व ह्याप्रमाणें प्राय: भयसूचक चिन्हेंच माझ्या दृष्टोत्पत्तीस येत आहेत. तस्मात् हे आर्य, तूं सज्ज हो. माझें ऐक. कारण आतांच भय प्राप्त होईल, असें हीं चिन्हें मला सुचवीत आहेत. हा महाभयंकर वंचुलक नांवाचा पक्षी गर्जना करून युद्धामध्यें आपला विजय होईल, असें सुचवीत आहे."

ह्याप्रमाणें स्वसामर्थ्यानें ते सर्व वन शोधीत असतांना, तें वन मोडूनच टाकीत आहे कीं काय असा एक मोठा ध्वनि उत्पन्न झाला. सारांश, वायूनें

तें वन अतिशय व्याप्त झाल्यासारखें झाल्यामुळें सर्व वन दणाणून टाकणारा असा शब्द त्या वनामध्येंच उत्पन्न झाला. तेव्हां तो शब्द होण्याचें कारण काय म्हणून राम हातामध्यें तरवार घेऊन आपल्या कनिष्ठ भ्रात्यासहवर्तमान विचार करूं लागला असतां, विशाल वक्षस्थलानें युक्त असा एक अतिप्रचंड राक्षस त्यांनीं अवलोकन केला; व संमुखच उभा राहिलेल्या त्या राक्षसाकडे ते उभयतां गेले. त्याचें शरीर फारच वाढलेलें होतें. मुख उदरामध्येंच असल्यामुळें मस्तक व कंठ ह्यांनीं रहित असलेला तो राक्षस कबंध ह्या नांवाला अगदीं योग्य झालेला होता. निशित म्हणजे तीक्ष्ण रोमांनीं युक्त असलेला तो राक्षस उन्नत अशा महापर्वताप्रमाणें दिसत होता. त्या भयंकर राक्षसाची कांति नीलवर्ण मेघाप्रमाणें असून स्वरहि मेघगर्जनेप्रमाणेंच होता. त्याच्या कपाळावर अग्नीच्या ज्वालेसारखा एक देदीप्यमान डोळा होता. त्याचा वर्ण पिंगट होता. तो विशाल व दीर्घ होता. त्याची दृष्टी उत्तम होती, आणि तो भयंकर डोळा, मस्तकाचा भागच सर्व आंत गेलेला असल्यामुळें, उरःप्रदेशाचे ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येत होता. अशा प्रकारचा डोळा व मोठमोठ्या दाढा ह्यांनीं युक्त असलेलें आपलें प्रचंड मुख तो राक्षस चाटीत होता. महाभयंकर अस्वलें, सिंह, मृग व पक्षी तो भक्षण करीत होता. एकेक योजन म्हणजे चार चार कोस लांब असलेले आपले दोन्ही भयंकर हात तो इकडे तिकडे हालवीत होता. नानाप्रकारचे पक्षिगण, अस्वलें व मृग हातांनीं धरून तो आपल्याकडे ओढीत होता. आपापल्या कळपांचें रक्षण करणारे असे अनेक मृग आपल्यापासून पलीकडेहि ओढून तो टाकीत होता. मार्गानें जात असलेल्या त्या उभयतां भ्रात्यांचा मार्ग व्याप्त करून तो उभा राहिला होता. तेव्हां त्याच्या मिठीमध्यें न सांपडतां ते राम-लक्ष्मण दूर जाऊन उभे राहिले असतां शरीरानें तो राक्षस एक कोसपर्यंत असल्याचें त्यांनीं अवलोकन केलें. धिप्पाड, क्रूर, भयंकर बाहूंच्या योगानें प्राण्यांना घेरणारा आणि दिसण्यांतहि अतिशयच भयंकर असलेला तो कबंध राक्षस मस्तक उदरांत असल्यामुळें आकृतीनेंहि कबंधच होता. दीर्घ हातांनीं युक्त असलेल्या त्या कबंध राक्षसानें रघुवंशज राम-लक्ष्मणांना आवळून टाकण्याच्या उद्देशानें आपले दीर्घ हात लांब करून एकदम धरिलें, व ते राम-लक्ष्मण जरी महाधनुर्धारी, प्रचंड तेजस्वी, महापराक्रमी, महाबलाढ्य व हातांत तरवारी घेतलेले असे होते, तथापि तो राक्षस त्यांना ओढूं लागला असतां ते निरुपाय होऊन त्याच्या मिठींत सांपडलेच ! त्या उभयतां-

पैकीं रघुवंशज शूर राम धैर्यामुळें भयभीत झाला नाहीं; परंतु लक्ष्मण बाल-बुद्धीमुळें आणि धैर्याचा आधार नसल्यामुळें भयभीत झाला. इतकेंच नव्हे, परंतु रामाच्या मागून जन्मास आलेला तो लक्ष्मण खिन्न होऊन रामाला म्हणाला, "हे वीरा, निरुपाय होऊन राक्षसाच्या तावडींत सांपडलेल्या मला अवलोकन कर. मज एकट्याची राक्षसाच्या बलिदानीं योजना करून तूं आपली सुटका करून घे. सारांश रामा, राक्षसाला माझा बलि देऊन तूं आपला खुशाल पळून जा. म्हणजे तुला विदेहराज-कन्या लवकरच प्राप्त होईल, असें मला वाटतें. हे ककुत्स्थकुलोत्पन्ना रामा, वाडवडिलांपासून चालत आलेली पृथ्वी प्राप्त होऊन तूं राज्यावर बसलास, म्हणजे नेहमीं माझी आठवण करीत जा." लक्ष्मणानें ह्याप्रमाणें सांगितलें असतां राम त्याला म्हणाला, "हे वीरा तूं भिऊं नको, तुझ्यासारखा पुरुष धैर्य सोडीत नाहीं." हें उभयतांचें बोलणें चाललें आहे तोंच तो क्रूर व दीर्घ बाहूंनीं युक्त असलेला राक्षसश्रेष्ठ कबंध त्या भ्रात्या राम-लक्ष्मणांना म्हणाला, "बैलासारखे ज्यांचे खांदे आहेत व मोठमोठे खड्ग व धनुष्यें ज्यांनीं धारण केलीं आहेत, असे तुम्ही कोण, सुदैवानें ह्या घोर प्रदेशामध्यें येऊन मला दृग्गो-चर झालां आहां? तुमचें येथें काय काम आहे, व तुम्ही येथें कशाकरितां आला आहां, हें मला सांगा. अरे, बाण, धनुष्य व खड्ग धारण केल्यामुळें तीक्ष्ण शृंगांनीं युक्त असलेल्या बैलांप्रमाणें दिसत असलेले तुम्ही क्षुधेनें व्याकुल होऊन येथें असलेल्या माझ्या ह्या प्रदेशावर प्राप्त झालां असून लगेच माझ्या समीपहि आलां आहां, ह्यामुळें तुमचें जीवित दुर्लभ आहे." हें त्या दुरात्म्या कबंध राक्षसाचें भाषण ऐकून रामाच्या तोंडचें पाणी पळून तो लक्ष्मणाला म्हणाला, "अमोघ पराक्रमी लक्ष्मणा, अत्यंत दुःसह असें राज्यभ्रंशरूप भयंकर दुःख प्राप्त झालें असूनहि न डगमगतां आजपर्यंत कायम राहिलेल्या आपणांला आज सीता प्राप्त न होतांच जीविताचा अंत होईल, अशा प्रकारचें हें संकट प्राप्त झालें आहे. तस्मात् लक्ष्मणा, सर्व प्राण्यांचे ठिकाणीं काळाचें अति मोठें सामर्थ्य दृष्टोत्पत्तीस येतच असतें. हे पुरुषश्रेष्ठा लक्ष्मणा, पहा, तूं व मी असे दोघेहि संकटांनीं गांगरून गेलों आहों. ह्यावरून कोणीहि प्राणी असला तरी त्याचे ठिकाणीं पराक्रम गाजविण्यास दैवाला मुळींच जड जात नाहीं. कारण शूर, बलाढ्य व अस्त्रनिपुण असेहि लोक वेळ आली म्हणजे वाळूच्या बंधाऱ्याप्रमाणें समरांगणामध्यें नाश पावतात."

ह्याप्रमाणें बोलणाऱ्या त्या महाकीर्तिमान, प्रतापी आणि प्रचंड व अमोघ पराक्रम करणाऱ्या दशरथपुत्र रामानें सुमित्रानंदन लक्ष्मणाकडे पाहिलें, आणि स्वतः त्या महापराक्रमी रामानें आपलें मन मुळींच खिन्न न होऊं देतां अचल केलें.

सर्ग सत्तरावा.

कबंधलक्ष्मणसंवाद.

बाहुपाशानें घेरिले गेलेले ते राम-लक्ष्मण तसेच तेथें उभे आहेत, असें अवलोकन करून कबंध राक्षस त्यांना म्हणाला, "हे क्षत्रियश्रेष्ठहो, क्षुधेनें व्याकुळ झालेल्या मला अवलोकन करूनहि तुम्ही स्वस्थ कसले उभे राहात आहां? अरे, अकल गुंग झालेल्या तुमचा नेमणूक दैवानें माझ्या आहाराकडे केलेली आहे." प्रथमतः भयभीत झालेल्या लक्ष्मणानें तें राक्षसाचें भाषण श्रवण करितांक्षणीं पराक्रमाविषयीं निश्चय केला, आणि समयाला योग्य व हितावह असें भाषण तो रामाशीं करूं लागला. तो म्हणाला, "हा राक्षसाधम आधीं तुला व मला सत्वर आवळून टाकील. तस्मात् तरवारींनीं आपण ह्याचे मोठमोठे हात तोडून टाकूं. शरीरानें धिप्पाड, हातांनीं पराक्रम करणारा आणि भयंकर असा हा राक्षस सर्व पृथ्वीचा पराजय करून ह्या ठिकाणीं आपलाहि वध करण्याची इच्छा करीत आहे; परंतु हे रघुकुलोत्पन्ना राजा, यज्ञामध्यें आणिलेल्या निश्चेष्ट पशूप्रमाणें क्षत्रियाचा वध हालचाल न करितां होणें निंद्य आहे." हें त्यांचें संभाषण ऐकून तो राक्षस क्रुद्ध झाला, आणि आपला भयंकर जबडा पसरून त्यांना भक्षण करण्यास प्रवृत्त झाला. तेव्हां देश व काळ जाणणारे ते उभयतां रघुवंशज राम-लक्ष्मण अतिशय आनंदित झाले, आणि तरवारींनीच त्यांनीं त्याचे दोन्ही हात खांद्यापाशीं तोडून टाकिले. समर्थ रामानें त्याचा लुळा पडलेला उजवा हात तरवारीच्या योगानें झटपट तोडून टाकिला, आणि वीर लक्ष्मणानें डावा हात उतरून टाकिला तेव्हां मोठी गर्जना करणारा व पूर्वी दीर्घ हातांनीं युक्त असलेला तो कबंध हात तुटल्यामुळें मेघाप्रमाणें आकाश, पृथ्वी व दिशा नादित करीत करीत खालीं पडला. रक्तप्रवाहानें भरून गेलेला तो दीन कबंध राक्षस आपले हात तुटलेले पाहतांक्षणीं 'तुम्ही कोण' म्हणून त्या वीरांना विचारूं लागला ह्याप्रमाणें तो विचारीत असतांना शुभ लक्षणांनीं युक्त असलेल्या महाबलाढ्य

लक्ष्मणानें त्या कबंधाला ककुत्स्थकुलोत्पन्न रामाची हकीकत प्रथम निवेदन केली. तो म्हणाला, "हा इक्ष्वाकूंचा वारस आहे, व राम म्हणून लोकांना विदित आहे. त्याचाच कनिष्ठ भ्राता लक्ष्मण मी आहें, असें तूं समज. सापत्न मातेनें राज्य हाणून पाडून रामाला वनामध्यें पाठविलें. आणि तेव्हांपासून हा आपल्या भार्येसहवर्तमान व माझ्यासहवर्तमान महावनामध्यें संचार करीत आहे. हा देवतुल्य पराक्रमी राम निर्जन वनामध्यें वास्तव्य करीत असतांना राक्षसानें त्याची भार्या हरण करून नेली आहे, व तिचा शोध लावण्याकरितां आम्ही येथें आलों आहों. आतां कबंधासारखा असलेला तूं कोण आणि वक्षस्थलाचे ठिकाणीं दृश्य असलेल्या मुखानें युक्त व पोटऱ्यांमध्यें मोडलेला असा तूं आज कशाकरितां वनामध्यें तडफड करीत उभा राहिला आहेस, हें सांग." ह्याप्रमाणें लक्ष्मणानें विचारिलें असतां कबंध संतुष्ट झाला आणि त्या इंद्राच्या वचनाचें स्मरण होऊन त्याला उत्तर देऊं लागला कीं, "हे पुरुषश्रेष्ठहो, तुमचें स्वागत असो. आज सुदैवानें तुमचें मला दर्शन झालें आणि तुम्ही हे माझे बाहुरूप पाश तोडून टाकिले, हीहि मोठी भाग्याची गोष्ट आहे. आतां हे पुरुषश्रेष्ठ, मला उद्धटपणामुळें क्रूर देह कसा प्राप्त झाला, तें मी तुला सांगतों, तूं श्रवण कर."

सर्ग एकाहत्तरावा.

कबंधाचें पूर्ववृत्त.

कबंध सांगतो:—"रामा, प्रचंड बल व पराक्रम ह्यांनीं युक्त असून त्रैलोक्यामध्यें प्रसिद्ध व सूर्य, चंद्र आणि इंद्र ह्यांच्या शरिराप्रमाणें दिव्य असें अचिंत्य रूप पूर्वीं माझें होतें; परंतु मी लोकांना भीतिप्रद होणारें प्रचंड राक्षसरूप धारण करून वनांतील ऋषींना ठिकठिकाणीं भय दाखवूं लागलों. असें होतां होतां एकदां स्थूलशिरा नांवाच्या महर्षीला मी क्रोध आणिला. कारण नानाप्रकारचे वन्य पदार्थ तो गोळा करीत असतांना मी ह्या रूपानें त्याच्या अंगावर चालून गेलों. तेव्हां घोर शाप देणारा तो ऋषि मला म्हणाला, 'हें ह्याप्रमाणेंच तुझें निंद्य व दुष्ट शरीर होवो.' त्यावर "मी आपल्यावर चालून आल्यामुळें आपण दिलेल्या ह्या माझ्या शापाचा अंत व्हावा!" म्हणून मी त्या मुनींची प्रार्थना केली असतां ते म्हणाले, "राम जेव्हां निर्जन वना-

माझे हात तोडून तुझें दहन करील, तेव्हां तुला स्वतःचें भव्य व शुभ रूप प्राप्त होईल.' लक्ष्मणा, संपत्तीनें झळकत असलेला मी दनूचा पुत्र आहें, असें तूं समज. आतां इंद्रशापामुळें हें रूप मला समरांगणामध्यें कसें प्राप्त झालें, तें मी कथन करितों. मी उग्र तपश्चर्या करून ब्रह्मदेवाला संतुष्ट केलें असतां त्यानें मला दीर्घायुष्य दिलें, व त्यामुळें मला गर्व झाला. 'मला दीर्घ आयुष्य प्राप्त झालें आहे, तेव्हां इंद्र माझें काय करणार!' असा विचार मनामध्यें आणून मी समरांगणामध्यें इंद्राच्या अंगावर चालून गेलों. तेव्हां शेकडों धारांनीं युक्त असलेलें वज्र त्या इंद्रानें मजवर सोडिलें असतां त्याच्या योगानें माझ्या मांड्या वै मस्तक शरिरामध्यें घुसलें. शेवटीं मी प्रार्थना केल्यामुळें यमसदनीं माझी रवानगी न करितां 'तें ब्रह्मदेवाचें भाषण सत्य होवो' असें तो मला म्हणाला. परंतु मांड्या, मस्तक व मुख भग्न झाल्यामुळें मला आहार करितां येणार नाहीं. तेव्हां 'आहाररहित आणि त्यांतूनहि आपला तडाका बसलेला मी दीर्घकालपर्यंत जिवंत राहाण्याला कसा समर्थ होणार?' म्हणून मी प्रश्न केला असतां इंद्रानें मला एकेक योजन लांब असे बाहु दिले. तीक्ष्ण दंष्ट्रांनीं युक्त असें मुख मला उदरामध्यें निर्माण करून दिलें. तेव्हांपासून ह्या वनामध्यें कोणत्याहि बाजूला संचार करणारे सिंह, चित्ते, मृग आणि व्याघ्र आपल्या दीर्घ हातानीं धरून मी भक्षण करीत आहें. असो. 'लक्ष्मणासहवर्तमान राम जेव्हां समरांगणामध्यें तुझे हात तोडून टाकील, तेव्हां तूं स्वर्गामध्यें परत जाशील' असें इंद्रानें मला सांगितलें असल्यामुळें बा नृपश्रेष्ठा, ह्या शरिरानें युक्त असलेल्या माझ्या ह्या वनामध्यें जें जें दृष्टीस पडतें, तें तें सर्व ग्रहण करणें मला बरें वाटूं लागलें. कारण राम कोणता हें मला ठाऊक नाहीं. तेव्हां आपण असा क्रम सुरू ठेविला असतां राम केव्हां तरी माझ्या हातीं येईल, असें मला वाटलें. आणि हाच विचार मनामध्यें आणून मी ह्या आपल्या देहाचा रामाच्या हातून त्याग करण्याविषयीं यत्न करूं लागलों. तो राम तूंच आहेस. तुझें कल्याण असो. हे राघवा, दुसऱ्याच्या हातून माझा वध होणें शक्य नाहीं, असें त्या महर्षीनीं मला एक तत्त्व सांगून ठेविलें होतें. हे पुरुषश्रेष्ठा, तुम्ही अग्नीच्या योगानें माझा और्ध्वदेहिक संस्कार केला, म्हणजे मी एक युक्ति सांगून आपलें मित्रत्वाचें सार्थक करीन, आणि तुला एक मित्रहि सांगेन."

याप्रमाणें त्या दनु नामक राक्षसानें सांगितलें असतां धर्मात्मा राम लक्ष्म-

णाचे समक्ष म्हणाला, "मी जनस्थानांतून भ्रात्यासहवर्तमान खुशाल बाहेर गेलों असतांना माझी यशस्विनी भार्या सीता रावणानें हरण करून नेली. त्या राक्षसाचें नांव मात्र मला ठाऊक आहे; परंतु त्याचें रूप कसें आहे, त्याचें निवासस्थान कोणतें व त्याचा प्रभाव काय आहे, हें आम्हांला माहीत नाहीं. ह्याकरितां अनाथ व शोकाकुल होऊन ह्याप्रमाणें भटकत असलेल्या व तुजवर उपकार करणाऱ्या आम्हांवर योग्य अशी कांहीं कृपा कर. हे वीरा, योग्य वेळीं हत्तींनीं मोडून टाकिलेली शुष्क काष्ठें आणून तयार केलेल्या मोठ्या खड्डयामध्यें आम्ही तुझें दहन करूं; परंतु सीतेला कोणी नेलें, हें तूं आम्हांला सांग. तुला जर खरोखर माहीत असेल, तर आम्हांला अत्यंत हितावह असलेली ही गोष्ट कर."

ह्याप्रमाणें राम त्याला म्हणाला असतां त्या कुशल व वक्त्या दनूनें उत्तर दिलें, "मला दिव्य ज्ञान नाहीं. ह्यामुळें सीता कोणीकडे आहे, हें मला ठाऊक नाहीं. परंतु माझें दहन करून स्वतःचें रूप मला प्राप्त झाल्यावर सीतेची बातमी जी लागेल, ती मी तुला कथन करीन. सारांश रामा, सीतेला हरण करून नेणाऱ्या राक्षसाला जो जाणीत आहे, तो मी तुला दहनानंतर कथन करीन. हे प्रभो, ज्यानें सीता हरण करून नेली, तो महावीर्यवान राक्षस कोण, हें समजण्याची दग्ध झाल्यावांचून माझी शक्ति नाहीं. कारण राघवा, शापदोषामुळें माझें मोठें ज्ञान भ्रष्ट झालें असून स्वतः केलेल्या अनुचित कर्माच्या योगानें हें लोकनिंद्य रूप मला प्राप्त झालें आहे. तेव्हां रामा, वाहनें श्रांत होऊन रवि अस्ताला गेला नाहीं तोंच खड्डयामध्यें तूं माझें यथाविधि दहन कर. हे रघुनंदना, खड्डयामध्यें तूं माझें यथाविधि दहन केल्यावर त्या राक्षसाला जाणणारा कोण, तो मी तुला सांगेन. राघवा, न्यायानें वागणाऱ्या त्याच्याशीं तूं सख्य कर. म्हणजे तुला तो साहाय्य करील. राघवा, तिन्ही लोकांत त्याला अज्ञात असें कांहींहि नाहीं. कारण कांहीं निमित्त उपस्थित झाल्यामुळें तो पूर्वी सर्व लोक हिंडून आलेला आहे."

सर्ग बहात्तरावा.

सीताशुद्धीचा उपाय सांगणें.

ह्याप्रमाणें कबंधानें त्या प्रजाधिपति वीर रामलक्ष्मणांना सांगितलें असतां, त्याला एका पर्वताच्या खड्ड्यांत नेऊन टाकून आणि सर्व बाजूंनीं काष्ठें घालून त्यांनीं अग्नि दिला. प्रज्वलित अशा मोठमोठ्या ज्वालांनीं लक्ष्मणानें सर्व बाजूंनीं ती चिता पेटविली, व ती चोहोंकडून जळूं लागली. मेदानें भरलेला तो राक्षस जळूं लागला असतां, घृतपिंडाप्रमाणें असलेल्या त्याच्या त्या प्रचंड शरीराला अग्नि सावकाश जाळूं लागला. तदनंतर चिता ढासळून देऊन तो धूमरहित अग्नीप्रमाणें चितेबाहेर निघाला. तेव्हां तो महाबलाढ्य निर्मळ वस्त्रें व दिव्य माला धारण केलेला असा दिसूं लागला. सारांश, उज्ज्वल, निर्मल वस्त्रानें युक्त आणि अंगुलिप्रभृति सर्व बारीकसारीक अवयवांचे ठिकाणींहि अलंकार धारण केलेला असा तो आनंदित झालेला कबंध चितेपासून वेगावेगानें बाहेर निघाला; आणि हंसयुक्त, यशस्कारक व उज्ज्वल अशा विमानामध्यें बसून आपल्या प्रभेच्या योगानें तो महातेजस्वी दशदिशा प्रकाशित करूं लागला. तदनंतर अंतरिक्षामध्यें असलेला तो कबंध रामाला म्हणाला, "राघवा, सीता तुला कशी प्राप्त होईल, हें मी तुला खरें खरें सांगत आहें, तूं श्रवण कर. रामा, संधि, विग्रह, यान, आसन, द्वैतभाव आणि समाश्रय ह्या सहा युक्ति जगतामध्यें आहेत; व त्यांच्याच योगानें सर्व कांहीं राजाला विचारानें प्राप्त होत असतें. परंतु जो ग्रहदशेच्या फेऱ्यांत सांपडलेला आहे, त्याला ग्रहदशेच्या फेऱ्यांत सांपडलेल्यांचीच मदत होत असते, अशी नीति असल्यामुळें सहाव्याच युक्तीचें तुला अवलंबन केलें पाहिजे. रामा, ज्या अर्थीं तूं लक्ष्मणासहवर्तमान राज्यापासून भ्रष्ट झाला आहेस, त्या अर्थीं सांप्रत तूं ग्रहदशेच्या फेऱ्यांत सांपडला आहेस, ही गोष्ट सिद्ध आहे. आणि ह्याच कारणामुळें भार्यापहाररूप संकट तुला प्राप्त झालें आहे. ह्यास्तव हे मित्रश्रेष्ठा, ग्रहदशेच्या फेऱ्यात सांपडलेला तोच मित्र तुला अवश्य केला पाहिजे. विचार करून पाहिलें असतां त्याला मित्र केल्यावांचून तुझा मनोरथ परिपूर्ण होईल, असें मला वाटत नाहीं. रामा, मी सांगतों, तें ऐक. सुग्रीव नामक वानराला क्रुद्ध झालेल्या इंद्रपुत्र भ्रात्या वालीनें हांकून दिलें आहे; आणि तो जितेंद्रिय वीर सुग्रीव चार वानरांसहवर्तमान, पंपा नामक पुष्करिणीच्या योगानें आसमंताद्भागीं सुशोभित असलेल्या

ऋष्यमूक पर्वतावर वास्तव्य करीत आहे. तो वानरराज महावीर्यवान, तेजस्वी, अतुल प्रभेनें युक्त, सत्यप्रतिज्ञ, विनयसंपन्न, धैर्यवान, विचारी, महात्मा, दक्ष, गंभीर, कांतिमान, महाबलाढ्य व महापराक्रमी असून त्याच्या महाबलाढ्य भ्रात्यानें राज्याकरितां त्याला हांकून लाविलें आहे. रामा, तो सीतेच्या शोधाकरितां तुझा मित्र व साहाय्यकर्ता होईल. तूं आतां आपलें मन शोकाकुल करून घेऊं नको. हे इक्ष्वाकुवंशजश्रेष्ठा, जें होणार तें कधींहि ह्या जगतामध्यें टळणें शक्य नाहीं. कारण कालाचें अतिक्रमण होणें दुर्घट आहे. हे वीरा, तूं येथून त्या महाबलाढ्य सुग्रीवाकडे सत्वर जा. येथून गेल्यावर विलंब न करितां आजच्या आजच त्याला मित्र करून घे. एकमेकांनीं एकमेकांचा द्रोह करावयाचा नाहीं, ह्या उद्देशानें तुम्ही एकत्र जुळा, आणि अग्नि प्रज्वलित झाला असतांना त्याच्या समक्ष एकमेकांशीं सख्य करा. त्या वानरराज सुग्रीवाचा तूं अपमान करूं नको. तो यथेष्ट रूप धारण करणारा वीर्यवान वानरराज साहाय्य मिळण्याची इच्छा करीत असून कृतज्ञ आहे, व तुम्हीहि त्यानें मनांत योजिलेलें कार्य करण्यास आज समर्थ आहां. त्याचा मनोरथ सिद्धीस गेल्यानंतर अथवा सिद्धीस जाण्याचे पूर्वींहि तो तुझें कार्य करील. कारण तो ऋक्षरजाचा (क्षेत्रज) पुत्र आहे, व भयभीत होऊन पंपा नामक पुष्करणीवर संचार करीत आहे. सूर्याचा तो औरस पुत्र आहे, व वालीशीं त्याचें वैर पडलेलें आहे. ह्याकरितां आयुधाची शपथ घेऊन त्या ऋष्यमूक पर्वतावर वास्तव्य करणाऱ्या वनचारी वानरराजाला तूं सत्यानें सत्वर मित्र कर. कारण ह्या जगतामध्यें नरमांसभक्षक राक्षसांचीं जीं कांहीं स्थानें आहेत, तीं सर्व तो कपिश्रेष्ठ निपुणतेमुळें पूर्णपणें जाणीत आहे. राघवा, जगतामध्यें त्याला विदित नाहीं, असें कांहींहि नाहीं. हे शत्रुतापना, हजारों किरणांनीं युक्त असलेला सूर्य जितका प्रदेश प्रकाशित करीत आहे, तितक्या प्रदेशावरील नद्या, मोठमोठे पर्वत, पर्वतांवरील दुर्गम स्थानें, आणि गुहा वानरांसहवर्तमान धुंडून काढून तो तुझ्या पत्नीचा शोध लावील. राघवा, दिशा धुंडून काढण्याकरितां तो शरिरानें धिप्पाड असलेले वानर चोहोंकडे पाठवून देईल. तुझ्या वियोगामुळें शोक करीत बसलेल्या त्या मिथिलराजकन्या सुंदरी सीतेला रावणाच्या घरीं तो शोधून काढील. सारांश, तुझी निर्दोष प्रिया जरी मेरु पर्वताच्या शिखरावर असली, किंवा पातालांत नेऊन ठेविलेली असली, तरी तेथेंहि प्रवेश करून व राक्षसांचा वध करून तो वानरराज सुग्रीव तुला ती परत आणून देईल."

सर्ग त्र्याहात्तरावा.

पंपासरोवरमार्गकथन.

सीतेचा शोध लावण्याविषयीं रामाला उपाय दर्शवून, तो व्यवहारज्ञ कबंध अन्वर्थक शब्दांनीं त्याला पुनरपि म्हणाला, "रामा, पश्चिम दिशेचा आश्रय करून जिकडे हे मनोहर व प्रफुल्लित वृक्ष प्रकाशत आहेत, तिकडून हा सुखकारक मार्ग ऋष्यमूक पर्वताकडे चालला आहे. जांभळी, चार, फणस, वट, पिंपरी, पिंपळ, कर्णिकार, आंबे आणि इतरहि वृक्ष ह्या मार्गावर आहेत. धावडा, नागकेशर, तिळवा, करंज, नील, अशोक, कळंब व कण्हेर हे प्रफुल्लित वृक्ष ह्या मार्गाला असून, बिल्वा, लाल अशोक आणि बाळंतलिंब असेहि आणखी वृक्ष आहेत. त्यांवर चढा अथवा त्यांना भूमीवर पाडा, आणि त्यांचीं अमृततुल्य फळें भक्षण करून तुम्ही पुढें चालते व्हा. हे ककुत्स्थकुलोत्पन्ना रामा, प्रफुल्लित वृक्षांनीं युक्त असलेलें तें वन ओलांडिल्यावर उत्तरकुरुदेशाप्रमाणें असलेल्या दुसऱ्या एका नंदनतुल्य वनामध्यें तुम्ही जाल. ज्यांतून मधुर रसाचा स्राव चालला आहे व ज्यांना नेहमीं फळें येत आहेत, असे वृक्ष त्या वनामध्यें असून कुबेराच्या चैत्ररथ वनाप्रमाणें ह्याहि वनांत सर्व ऋतूंतील प्रकार आहेत. मोठमोठ्या फांद्या ज्यांवर आहेत, असे मेघांप्रमाणें आणि पर्वतांप्रमाणें दिसणारे वृक्ष फळांच्या भारानें वांकलेले सर्व बाजूंनीं शोभत आहेत. त्यांवर आरोहण करून अथवा खुशाल त्यांना भूमीवर पाडून त्यांचीं अमृततुल्य फळें लक्ष्मण तुला देईल. ह्या पर्वतावरून त्या पर्वतावर व ह्या वनांतून त्या वनांत ह्याप्रमाणें श्रेष्ठ श्रेष्ठ पर्वत व वनें हिंडतां हिंडतां तुम्ही पंपा सरोवरावर जाल. रामा, त्या पुष्करिणीचें ठिकाणीं खड्डे नाहींत, शेवाळें नसल्यामुळें निसरडें नाहीं, उदक शांत आहे, आंत वाळू आहे, आणि नानाप्रकारच्या कमळांनीं ती सुशोभित आहे. राघवा, त्या पुष्करिणीच्या उदकामध्यें राहणारे हंस, क्रौंच व कुरर हे पक्षी आणि बेडूक त्या ठिकाणीं मधुर ध्वनि करीत असतात; आणि पूर्वी तेथें कोणाचा वध झाल्याचें त्यांना माहीत नसल्यामुळें मनुष्यांना पाहून ते भीतहि नाहींत. तेव्हां घृतपिंडतुल्य असलेल्या त्या स्थूल पक्ष्यांना तुम्ही भक्षण करा. हे रघुवंशजश्रेष्ठा, त्या पुष्करिणींतील चक्रतुंड, नीलवर्ण, स्थूल आणि अनेक कंटकांनीं युक्त असे

श्रेष्ठ श्रेष्ठ रोहितसंज्ञक मत्स्य बाणांनीं मारून, लोखंडाच्या शुळावर भाजून आणि त्यांचीं त्वचा व पंख काढून टाकून तुझे ठिकाणीं प्रेम करीत असलेला लक्ष्मण तुला देईल. ते मत्स्य तूं पाहिजे तितके खाऊं लागलास, म्हणजे पुष्प-समुदायामध्यें असलेले त्या पंपा पुष्करिणीचें कमलगंधानें युक्त, मंगलकारक, सुखावह, गार, निरोगी, स्वस्छ आणि रुप्याप्रमाणें अथवा स्फटिकाप्रमाणें तेजस्वी उदक कमलपत्रानें लक्ष्मण तुला पाजील. रामा, पर्वताच्या गुहेमध्यें निद्रा घेणारे वनचर वानर सायंकाळीं संचार करितां करितां लक्ष्मण तुला दाखवील; आणि जलपान केल्यामुळें उदकाचा लोभ सोडून परत फिरलेले, व बैलाप्रमाणें गर्जना करणारे ते स्थूल वानर पंपा पुष्करिणीवर तूंहि अवलोकन करशील. मंगलकारक उदक दृष्टीस पडल्यावर तुझें मानसिक दुःख नाहींसें होईल. त्या ठिकाणीं तिळवे व करंज फुलांनीं भरलेले असून नील कमलें व इतर कमलेंहि प्रफुल्लित झालेलीं असतात. राघवा, तेथील पुष्पें घेऊन कोणीहि पुरुष धारण करीत नाहीं, तीं कोमेजतहि नाहींत आणि नाशहि पावत नाहींत. अत्यंत समाधानी असे मतंगशिष्य ऋषी तेथें होते. ते गुरूकरितां वनांतील काष्ठांचीं वगैरे ओझीं आणतांना थकले असतां त्यांच्या शरिरांतून जे घामाचे बिंदु भराभर भूमीवर पडले, तीं मुनींच्या तपश्चर्येमुळें पुष्पें झालीं. राघवा, घर्मबिंदूंपासून उत्पन्न झालेलीं तीं पुष्पें नाहीतशीं होत नाहींत. ते मुनी जरी निघून गेले आहेत, तथापि त्यांची दासी कोणी शबरी नामक चिरंजीवी स्त्री अद्यापि तेथें दृष्टीस पडते. रामा, धर्माला अनुसरून वागणारी ती शबरी सर्व प्राण्यांना पूज्य व देवतुल्य अशा तुझें दर्शन घेऊन स्वर्गलोकीं गमन करील. तदनंतर पंपा पुष्करिणीच्या पश्चिम तीराचा आश्रय केल्यावर, एक गुह्य व अनुपम आश्रमस्थान तूं अवलोकन करशील. त्याच आश्रमामध्यें प्रवेश करण्याला गज समर्थ होत नाहींत. हे रघुनंदना, त्या मतंग ऋषींच्या प्रभावामुळें तें वनहि मतंगवन म्हणूनच प्रसिद्ध आहे. रामा, देवांच्या उपवनाप्रमाणें अथवा इंद्राच्या नंदनवनाप्रमाणें नानाप्रकारच्या पक्षिगणांनीं गजबजून गेलेल्या त्या वनामध्यें तूं सुखी होऊन रममाण होशील. पंपा पुष्करिणीच्या समोरच प्रफुल्लित वृक्षांनीं युक्त असा ऋष्यमूक पर्वत आहे. त्यावर आरोहण करणें फारच कठीण असून बाल नागांनीं त्याचें रक्षण केलेलें आहे. रामा, पूर्वी सृष्टिकालीं ब्रह्मदेवानें तो उदार पर्वत निर्माण केलेला आहे. ह्यामुळें त्या पर्वतावर निद्रिस्थ असलेला पुरुष जो स्वप्नामध्यें द्रव्य प्राप्त करून घेतो, त्याला जागृत झाल्यावर

तें द्रव्य मिळतें. जो दुराचारी व पापकर्मी पुरुष ह्या पर्वतावर आरोहण करितो, तो निद्रिस्थ होतांक्षणीं त्याला राक्षस धरून तेथेंच मारितात. रामा, मतंगाश्रमासन्निध वास्तव्य करणारे बाल गज पंपा पुष्करिणीमध्यें क्रीडा करूं लागले असतां त्यांची मोठी गर्जना तेथेंहि ऐकूं येते. ताम्रवर्ण मदधारांनीं लिप्त झालेले कांहीं श्रेष्ठ गज एकत्र मिळून संचार करीत असतात, आणि मेघवर्ण व सामर्थ्यवान असे कांहीं गज वेगळाले वेगळाले फुटून संचार करीत असतात. स्पर्श झाला असतां अत्यंत सुखदायक, सर्व प्रकारच्या सुगंधानें युक्त, निर्मल, मनोहर व पवित्र असें उदक तेथें पिऊन ते वनचर गज परत फिरतात, आणि अरण्यामध्यें जातात. रामा, नील रत्नाप्रमाणें कोमल कांतीनें युक्त असून हिंसा न करणारे व्याघ्र, अस्वलें आणि मनुष्याला पाहून पळून जाणारे रुरुसंज्ञक मृग दृष्टीस पडले असतां तुझें मानसिक दुःख राहाणार नाहीं. रामा, त्या पर्वतावर शिळेनें आच्छादून टाकिलेली अशी एक मोठी गुहा शोभत आहे. त्या गुहेमध्यें प्रवेश होणें कठीण आहे. त्या गुहेच्या पूर्वद्वाराशीं शीत जलानें युक्त असें एक मोठें सरोवर आहे. तें रम्य सरोवर नानाप्रकारच्या वृक्षांनीं गजबजून गेलें असून असंख्य फलमूलांनीं भरलेलें आहे. त्या गुहेमध्यें धर्मात्मा सुग्रीव वानरांसहवर्तमान वास्तव्य करीत असतो, आणि कधीं कधीं तो त्या पर्वताच्या शिखरावरहि राहात असतो."

ह्याप्रमाणें त्या उभयतां राम-लक्ष्मणांना सांगितल्यावर तो वीर्यवान कबंध माला धारण करून सूर्यतुल्य कांतीनें युक्त झालेला असा आकाशामध्यें झळकूं लागला. तेव्हां त्यानें सांगितलेल्या मार्गाकडे निघालेले ते उभयतां राम-लक्ष्मण समीपच आकाशामध्यें असलेल्या त्या महाभाग्यवान कबंधाला म्हणाले, 'तूं पुण्यलोकाप्रत गमन कर.' तेव्हां 'कार्यसिद्धीकरितां तुम्हीं जावें' म्हणून त्यानेंहि त्यांना सांगितलें. ह्याप्रमाणें अत्यंत प्रसन्न झालेल्या त्या राम-लक्ष्मणांना जाण्याची अनुज्ञा देऊन तो कबंध चालता झाला. असो. तें रूप प्राप्त झाल्यावर कांतीनें युक्त झालेल्या त्या कबंधाचा सर्व देह तेजस्वी झाला, आणि आकाशामध्यें असलेला तो कबंध मार्ग वगैरे दाखवितां दाखवितां रामाकडे पाहून 'सुग्रीवाशीं सख्य कर' असें त्याला म्हणाला.

सर्ग चौऱ्याहत्तरावा.

शबरीची भेट.

वनामध्यें कबंधानें दाखविलेल्या त्या मार्गाचें अवलंबन करून ते राजकुमार पंपा सरोवराला जाण्याच्या उद्देशानें पश्चिम दिशेकडे चालते झाले. मध, पुष्पें व फळें ह्यांनीं भरलेले अनेक वृक्ष पर्वतांचे ठिकाणीं अवलोकन करीत करीत ते राम-लक्ष्मण सुग्रीवाची भेट घेण्याकरितां निघाल्यावर पर्वताचे पृष्ठभागीं वास्तव्य करून ते रघुनंदन राघव पंपेच्या पश्चिम तीराला जाऊन पोहोंचले. पंपा सरोवराच्या पश्चिम तीराला गेल्यावर शबरीचा रम्य आश्रम त्यांनीं तेथें अवलोकन केला. असंख्य वृक्षांनीं व्याप्त असलेल्या त्या अत्यंत मनोहर आश्रमाला गेल्यावर वनसौन्दर्य पाहात पाहात ते शबरीसमीप गेले. तेव्हां त्यांना अवलोकन करितांक्षणीं सिद्ध झालेल्या त्या शबरीनें उठून हात जोडिले, आणि रामाचे व बुद्धिमान लक्ष्मणाचे पाय धरून तिनें पाद्य, आचमनीय वगैरे सर्व यथाविधि त्यांना अर्पण केलें. तदनंतर राम त्या धर्मनिष्ठ तपस्विनी स्त्रीला प्रश्न करूं लागला, "तपाला विघ्न आणणाऱ्या कामादि षड्रिपूंचें तूं दमन केलें आहेस ना? तुझ्या तपाचा उत्कर्ष आहे ना? कोपाचा निग्रह झाला आहे ना? हे तपोधने, तूं आहार स्वाधीन ठेविला आहेस ना? नियमांनीं वागत आहेस ना? तुझ्या मनाला सुख आहे ना? आणि हे मनोहरभाषिणी, तुझी गुरुशुश्रूषा सफल आहे ना?"

ह्याप्रमाणें सिद्धांना अभिमत असलेल्या त्या सिद्ध तापसीला रामानें प्रश्न केल्यावर सन्मुख उभी राहिलेली ती वृद्ध शबरी रामाला म्हणाली, "तुझ्या दर्शनामुळें आज माझ्या तपाची सिद्धि मला प्राप्त झाली. आज माझा जन्म सफल झाला. उत्कृष्ठ रीतीनें गुरुशुश्रूषा केल्याचें आज सार्थक झालें. आचरिलेलें तप आज सफल झालें. हे पुरुषोत्तमा रामा, तुज शूर पुरुषश्रेष्ठाचें माझ्या हातून पूजन झाल्यामुळें मला आतां स्वर्गप्राप्तीहि होईल. हे सन्मानास्पद व विनयसंपन्न रामा, तुझ्या सौम्य दृष्टीनें मी आज पवित्र झालें आहें. हे शत्रुदमना, तुझ्या प्रसादामुळें मला अक्षय्य लोक प्राप्त होणार आहेत. तूं चित्रकूट पर्वताला येतांक्षणीं, अतुल प्रभेनें युक्त असलेल्या विमानांच्या योगानें ह्या आश्रमांतून मी सेवा केलेले तपस्वी लोक स्वर्गाला चालते झाले. जातां जातां ते धर्मवेत्ते महाभाग्यवान महर्षी मला म्हणाले, 'ह्या तुझ्या महापुण्यदायक आश्रमामध्यें राम येईल, आणि लक्ष्मणासहवर्तमान तो अतिथि

राम आला असतां तूं त्याचें स्वागत कर. कारण त्याचें दर्शन झाल्यानें तुला अक्षय्य असे उत्तम लोक प्राप्त होतील.' ह्याप्रमाणें हे पुरुषश्रेष्ठा रामा, त्या महाभाग्यवान मुनींनीं मला सांगितलें असतां तुझ्याकरितां पंपेच्या तीरावरील नानाप्रकारचे वन्य पदार्थ मी जुळवून ठेविले आहेत."

ह्याप्रमाणें शबरीनें सांगितलें असतां तो धर्मात्मा राघव भूतभविष्य जाणणाऱ्या त्या शबरीला म्हणाला, "तुझ्या त्या महात्म्या गुरूंचा प्रभाव दनूनें जो मला वस्तुतः कथन केला आहे, तो दर्शविण्याची तुझी इच्छा असल्यास प्रत्यक्ष अवलोकन करण्याची माझी इच्छा आहे."

रामाचें हें भाषण श्रवण करितांक्षणीं शबरी तें मोठें वन त्या उभयतांना दाखवूं लागली; आणि म्हणाली, "सजल मेघाप्रमाणें असलेलें, पशुपक्ष्यांनीं व्याप्त झालेलें, आणि मतंगवन म्हणून प्रसिद्ध असलेलें हें वन तूं अवलोकन कर. हे महातेजस्वी रामा, मनःसंयमन केलेल्या त्या माझ्या गुरूंनीं वेदमंत्रांनीं पूजित असा समंत्रक यज्ञ ह्या ठिकाणीं केला. ही प्रत्यक्स्थली नामक वेदी. ह्या वेदीचे ठिकाणीं मला अत्यंत पूज्य असलेले ते गुरु आपल्या कंपयुक्त हातांनीं मोठ्या कष्टानें देवतांना पुष्पें अर्पण करीत असत. हे रघुवंशजश्रेष्ठा, त्यांच्या तपःसामर्थ्यामुळें अनुपम प्रभेनें युक्त झालेली ही वेदी आपल्या कांतीनें सर्व दिशा अद्यापि प्रकाशित करीत आहे. उपवासजन्य श्रमांमुळें सुस्त होऊन दूर जाण्यास असमर्थ झालेल्या त्या मुनींनीं ध्यान केलें असतां त्यांच्याकरितां येथें जुळून आलेल्या ह्या सप्तसागरांना तूं अवलोकन कर. हे रघुनंदना, स्नान केल्यावर ह्या आश्रमांतील प्रदेशामध्यें त्यांनीं जीं वल्कलें वृक्षांवर वाळत टाकिलीं आहेत, तीं अद्यापीहि कोरडीं होत नाहींत. देवपूजेच्या उद्देशानें नीलकमलासहवर्तमान जीं पुष्पें त्यांनीं येथें आणून ठेविलीं आहेत, तीं त्यांच्या तपःसामर्थ्यामुळें अद्यापि कोमेजून जात नाहींत. असो. हें संपूर्ण वन तूं आतां पाहिलें असून, जें ऐकावयाचें होतें, तेंहि तूं माझ्यापासून ऐकिलें आहेस. आतां तुझी अनुज्ञा घेऊन ह्या देहाचा त्याग करावा, अशी माझी इच्छा आहे. कारण ज्या मुनींचा हा आश्रम आहे, आणि ज्यांची मी दासी आहें, त्या जितेंद्रिय मुनींसमीप जाण्याची माझी इच्छा आहे."

शबरीचें दिव्यलोकीं गमन.

हें अत्यंत धर्मानुसारी भाषण श्रवण केल्यावर लक्ष्मणासहवर्तमान रामाला अनुपम हर्ष झाला, आणि 'आश्चर्य आहे' असें तो म्हणाला. तदनंतर उग्र

तप केलेल्या त्या शबरीला राम म्हणाला, "हे कल्याणि, तूं माझें पूजन केलें आहेस. आतां अनायासें तुझा मनोरथ परिपूर्ण होईल."

वल्कलें व कृष्णाजिनें परिधान केलेल्या तपस्विनी शबरीला ह्याप्रमाणें सांगून रामानें अनुज्ञा दिल्यावर तिनें अग्नीमध्यें आपलें हवन केलें. नंतर उज्ज्वल अग्नीप्रमाणें देदीप्यमान असलेली ती शबरी स्वर्गाला चालती झाली. जातां जातां दिव्य अलंकार, दिव्य पुष्पें, दिव्य चंदन आणि दिव्य वस्त्रें ह्यांनीं ती युक्त झाली. तिचें दर्शन इतरांना प्रिय झालें, आणि सौदामनी विद्युल्लतेप्रमाणें तो प्रदेश प्रकाशित करणारी ती शबरी, ते कृतार्थ झालेले महर्षी जेथें विहार करीत होते, त्या पवित्र स्थानाला समाधीच्या योगानें चालती झाली.

सर्ग पंचाहत्तरावा.

पंपासरोवराकडे गमन.

स्वतःच्या तेजानें ती शबरी स्वर्गाला गेल्यावर, भ्रात्या लक्ष्मणासहवर्तमान राम विचार करूं लागला, आणि महात्म्याचा तो प्रभाव लक्ष्यांत आणून धर्मात्मा राघव एकनिष्ठपणें आपल्या हिताकरितां झटणाऱ्या लक्ष्मणाला म्हणाला, "हे विनयसंपन्न लक्ष्मणा, त्या कृतार्थ मुनींचा अतिआश्चर्यांनीं युक्त असलेला आश्रम मीं अवलोकन केला. ह्या आश्रमांतील मृग व व्याघ्र निर्भय असून नानाप्रकारचे पक्षी ह्याच्या आश्रयाला आहेत. लक्ष्मणा, लोकांवर उपकार करण्याकरितां त्यांनीं स्थापिलेल्या सप्तसागर तीर्थामध्यें मीं यथाविधि स्नान करून पितरांचेंहि तर्पण केलें. ह्यामुळें आपलें जें कांहीं नष्टचर्य होतें, तें नाहींसें होऊन आपलें कल्याण होण्याची वेळ जवळ आली आहे; आणि सांप्रत हें माझें मन आनंदित झालें आहे. हे पुरुषश्रेष्ठा, कांहींतरी शुभ गोष्ट दृष्टीस पडेल, असें माझ्या अंतःकरणाला वाटत आहे. ह्याकरितां इकडे ये. दिसण्यांतहि मनोहर असलेल्या त्या पंपासरोवराकडे आपण जाऊं. तेथून जवळच ऋष्यमूक पर्वत झळकत असून त्या पर्वतावर तो सूर्यपुत्र धर्मात्मा सुग्रीव चार वानरांसहवर्तमान नेहमीं वास्तव्य करीत आहे. कारण वालीच्या भयानें तो घाबरून गेलेला आहे. त्या वानरश्रेष्ठ सुग्रीवाला पाहण्याची तर मला त्वरा झाली आहे. कारण सीतेचा शोध लावणें हें माझें कार्य त्याच्यावर अवलंबून आहे."

ह्याप्रमाणें तो वीर राम बोलत असतांना लक्ष्मण त्याला म्हणाला, "आपण सत्वर तिकडे जाऊं. माझ्याहि मनाला तिकडे जाण्याची त्वरा झाली आहे." तदनंतर तो प्रजाधिपति राम त्या आश्रमांतून निघाला. नंतर लक्ष्मणा-सहवर्तमान तो समर्थ राम वन पहात पहात पंपासरोवराकडे गेला. तें वन प्रफुल्लित झालेलें होतें. सर्व बाजूंनीं मोठमोठे वृक्ष त्यामध्यें होते. टिट्टिभ पक्ष्यांनीं युक्त असलेले अर्जुनवृक्ष, शेंकडों पानांनीं भरलेले कीचकसंज्ञक कळक व इतरहि पुष्कळ वृक्ष ह्यांच्या योगानें तें महावन नादित झालेलें होतें. असो.

सरोवरशोभा.

सीताविरहामुळें संतप्त झालेला तो राम नाना प्रकारचे वृक्ष व सरोवरें अवलोकन करीत करीत त्या उत्कृष्ठ सरोवराकडे चालला, आणि समीपच वहात असलेल्या त्या पंपा नामक नदीवर गेल्यावर त्या मतंगसरस नामक सरोवरामध्यें त्यानें स्नान केलें. सीतेचा शोध लावण्याविषयीं तत्पर आणि स्वस्थ असे ते रघुवंशज राम-लक्ष्मण तेथें गेल्यानंतर तो दशरथपुत्र राम शोकाकुल होऊन त्या सरोवरामध्यें प्रविष्ठ झाला. तें सरोवर रम्य असून कमलांनीं गच्च भरलेलें होतें. तिलक, अशोक, पुन्नाग, बकुल व उद्दाल ह्या वृक्षांच्या योगानें त्याला शोभा आलेली होती. रम्य उपवनांनीं तें गजबजून गेलेलें होतें. त्यांतील मनोहर उदक क्षुब्ध झालेलें होतें. मृदु वाळू तेथें पसरलेली होती, आणि आंतील जल स्फटिकासारखें स्वच्छ होतें; मासे व कांसवें ह्यांची तेथें गर्दी झालेली होती. तीरावरील वृक्षांमुळें त्याला शोभा आलेली होती, आणि तें लतांनीं परिवेष्टित झालें असल्यामुळें सखीसहवर्तमान असलेल्या स्त्रीप्रमाणें दिसत होतें. किन्नर, उरग, गंधर्व, यक्ष आणि राक्षस ह्यांनीं त्याचा आश्रय केलेला होता. तें शुभ सरोवर नानाप्रकारच्या वृक्षांनीं व लतांनीं व्याप्त झालेलें असून शीतोदकाचें एक भांडारच होतें. आरक्तवर्ण कमलांच्या योगानें तें कोठें कोठें आरक्तवर्ण दिसत असून श्वेतकमलांमुळें श्वेतवर्ण दिसत होतें. तसेंच नीलकमलांच्या समूहामुळें तें कोठें कोठें नीलवर्णहि भासत होतें. सारांश, अनेक वर्णांच्या कमलांनीं युक्त असलेलें तें सरोवर अनेकरंगी वाकळे-प्रमाणें दिसत होतें. अरविंद, उत्पल, पद्म, सौगंधिक इत्यादि नानाप्रकारच्या कमलांनीं व फुलून गेलेल्या आम्रवनांनीं तें सरोवर युक्त असून मयूर पक्ष्यांच्या गर्जनेमुळें नादित झालेलें होतें.

असो. रामानें लक्ष्मणासहवर्तमान ती पुष्करणी अवलोकन केली, आणि लगेच तो दशरथपुत्र विलाप करूं लागला. कारण तिळवा, महाळुंग, वड, लोध, प्रफुल्लित कण्हेर, फारच प्रफुल्लित पुन्नाग, मालत्या व कुंद ह्यांचीं झांकरें, शिरसू, तिवस, अशोक, सातवण, केवडा, कुसरी आणि इतरहि नानाप्रकारचे वृक्ष ह्यांनीं ती पुष्करिणी युक्त असल्यामुळें अनेक अलंकार धारण केलेल्या तरुण स्त्रीप्रमाणें दिसत होती. "पूर्वी कबंधानें सांगितलेला पर्वत ह्या पुष्करिणी-चेच तीरीं असून हा नानाप्रकारच्या धातूंनीं भूषित झालेला आहे. ऋष्यमूक म्हणून हा प्रसिद्ध आहे, आणि चित्रविचित्र प्रफुल्लित वृक्षांनीं हा युक्त आहे. असो. त्या महात्म्या ऋक्षरज नामक वानराचा पुत्र एक वानर ह्या पर्वतावर वास्तव्य करीत आहे, आणि तो महावीर्यवान असून सुग्रीव ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्यास्तव हे पुरुषश्रेष्ठा, तूं वानरराज सुग्रीवाकडे जा" असें पुनरपि सत्यपराक्रमी रामानें लक्ष्मणाला सांगितलें, आणि "लक्ष्मणा, सीतेवांचून जिवंत राहाणें मला कसें बरें शक्य होईल?" इतकेंच भाषण लक्ष्मणाशीं करून मद-नानें पीडित झालेला, आणि सीतेशिवाय मनामध्यें दुसरें कांहींच नसलेला राम आपलें तें सांचलेलें पराकाष्ठेचें दुःख प्रकट करीत करीत त्या कमलांनीं युक्त असलेल्या मनोहर पंपासरोवरामध्यें प्रविष्ट झाला सारांश, क्रमाक्रमानें वन अवलोकन करीत करीत, जिच्या तीरीं असलेल्या वनांचें दर्शनहि शुभ आहे, आणि नानाप्रकारच्या पक्ष्यांनीं जी गजबजून गेलेली आहे, अशी पंपा पुष्करिणी रामानें अवलोकन केली, आणि लक्ष्मणासहवर्तमान त्यानें त्या पुष्करिणीमध्यें प्रवेश केला.



श्रीवाल्मीकिरामायण

कि ष्किं धा का ण्ड.

सर्ग पहिला.

श्रीरामाचा पंपातीरीं विलाप.

नीलकमलें, श्वेतकमलें आणि मत्स्य ह्यांनीं गजबजून गेलेल्या त्या पुष्करिणीसमीप लक्ष्मणासहवर्तमान राम गेला, आणि अंतःकरण व्याकुल झाल्यामुळें शोक करूं लागला. परंतु ती पुष्करिणी दृष्टीस पडतांक्षणीं त्याला हर्ष होऊन त्याचीं इंद्रियें थरथरूं लागलीं. तेव्हां मदनाचे अधीन होऊन तो सुमित्रापुत्र लक्ष्मणाला म्हणाला, "लक्ष्मणा, नानाप्रकारच्या वृक्षांनीं अलंकृत, प्रफुल्लित श्वेतकमलांनीं युक्त आणि वैदूर्य रत्नासारख्या निर्मल उदकानें भरलेली ही पंपा पुष्करिणी शोभा देत आहे. लक्ष्मणा, ज्याचें दर्शन शुभावह आहे, असें हें पंपेच्या तीरावरील वन तूं अवलोकन कर. ह्या वनांतील वृक्ष उच्च उच्च शाखांनीं युक्त असल्यामुळें शिखरयुक्त पर्वताप्रमाणें दिसत आहेत. परंतु सीतेच्या अपहाराचें आणि जटावल्कलादि धारण केल्यामुळें भरताला होत असलेल्या दुःखाचें स्मरण झालें, म्हणजे शोकाकुल झालेल्या मला मानसिक व्यथा पीडा देऊं लागतात. असो. मी जरी शोकाकुल झालों आहें, तरी अद्भुत वनांनीं युक्त, नानाप्रकारच्या पुष्पांनीं भरलेली आणि शीत जलानें परिपूर्ण असलेली ही कल्याणकारक पंपा मला सुखावह होत आहे. हिचें तीरीं सर्प आणि श्वापदें संचार करीत असून ही जरी पशुपक्ष्यांनीं गजबजून गेली आहे, आणि कमलांनीं आच्छादित झाली आहे, तरी हिचें दर्शन फारच कल्याणकारक आहे. वृक्षावरील नानाप्रकारच्या पुष्पराशींनीं युक्त असल्यामुळें नीलवर्ण आणि पीतवर्ण बनलेला हा हिरवागार प्रदेश फारच शोभा देत आहे. पुष्पभारांनीं परिपूर्ण झालेलीं वृक्षांचीं अग्रें, प्रफुल्लित अग्रांनीं

युक्त झालेल्या लतांनीं चोहोंकडून व्यापून टाकिलेलीं आहेत. लक्ष्मणा, हा वसंतकाल कामोद्दीपक असून कामी पुरुषाला गर्वयुक्त करणारा आहे. ह्यामध्यें वाराहि सुखावह वाहात आहे, आणि हा मधुमास असून ह्या वेळीं वृक्षांनाहि पुष्पें व फलें आलेलीं आहेत. लक्ष्मणा, जलवृष्टि करणाऱ्या मेघांप्रमाणें पुष्पांचे वर्षाव करणाऱ्या आणि पुष्पांच्या योगानें सुशोभित झालेल्या वनांची शोभा तूं अवलोकन कर. सपाट व रम्य प्रदेशावर असलेले नानाप्रकारचे वनवृक्ष वायूच्या वेगानें हालत असल्यामुळें पृथ्वीवर पुष्पांचा वर्षाव करीत आहेत. लक्ष्मणा, पडलेल्या, पडणाऱ्या आणि वृक्षांवरच असलेल्या पुष्पांच्या योगानें हा वायु पहा जसा कांहीं आसमंताद्भागीं क्रीडा करीत आहे. पुष्पांनीं भरलेल्या वृक्षांच्या अनेक शाखा हालवून सोडणाऱ्या ह्या वायूच्या ध्वनीच्या मागोमाग स्थलांतर केलेले भृंग गायन करीत आहेत. मत्त कोकिल पक्ष्यांच्या ध्वनीच्या योगानें हा वायु वृक्षांना जसा कांहीं तालसुरावर नृत्य शिकवीत असल्यासारखा दिसत आहे; आणि पर्वताच्या गुहांतून बाहेर निघालेला हा वायु स्वतःच गायन करीत असल्यासारखा भासत आहे. इकडे तिकडे संचार करणाऱ्या वायूच्या योगानें वृक्षांचीं शाखाग्रें एकमेकांत गुंतून गेल्यामुळें हे वृक्ष एकत्र बांधून टाकिल्यासारखे दिसत आहेत. तोच हा वायू स्पर्श झाला असतां सुख देणारा आहे, चंदनाप्रमाणें थंड आहे, श्रम दूर करणारा आहे, आणि आपल्याबरोबर पवित्र गंध वाहून नेणारा आहे. मधाच्या वासानें युक्त असलेले हे वृक्ष वायूनें चलित झाल्यामुळें त्यांच्या आश्रयाला असलेले भृंग गुंजारव करूं लागल्या कारणानें गर्जना करीत असल्यासारखे दिसत आहेत. आसमंताद्भागीं प्रफुल्लित झालेले हे कर्णिकार पहा, कसे पीतांबर धारण करून सुवर्णभूषणांनीं आच्छादित झालेल्या पुरुषांप्रमाणें दिसत आहेत. लक्ष्मणा, अनेक पक्ष्यांच्या गर्जनेनें युक्त असलेला हा वसंत सीतेचा वियोग झालेल्या माझा शोकच वृद्धिंगत करीत आहे. मदनहि शोकग्रस्त झालेल्या मला अतिशय ताप देत आहे, आणि हा बोलका कोकिल पक्षी हंसत हंसत जसें कांहीं मला आव्हानच करीत आहे. लक्ष्मणा, वनांतील रम्य झऱ्यावर असलेला हा पाणकोंबडा आनंदित होऊन गर्जना करीत आहे, आणि त्यामुळें कामाधीन झालेल्या मला दुःख देत आहे. पूर्वीं ह्या पाणकोंबड्याचा शब्द ऐकतांक्षणीं आश्रमांत असलेली माझी आनंदित प्रिया मला हांक मारून आपला आनंद अतिशयच प्रकट करून दाखवीत असे. सारांश, ह्याप्रमाणें

नानाप्रकारचे ध्वनी करणारे हे चित्रविचित्र पक्षी सर्व बाजूंनीं वृक्ष, गुल्म व लता ह्यांवर उडून बसत आहेत, हें तूं पाहा. लक्ष्मणा, पतींनीं युक्त झालेल्या पक्षिस्त्रिया ह्या ठिकाणीं आपापल्या जातिसमूहामध्यें आनंदित झालेल्या आहेत. भृंगराजाचा समागम झाल्यामुळें आनंदित झालेल्या भृंगस्त्रियाहि ह्या ठिकाणीं मधुर स्वर करीत आहेत; आणि ह्या पंपेच्या तीरीं कळपांनीं राहात असलेले पक्षीहि आनंदित झालेले आहेत. पाणकोंबड्यांचे रतिक्रीडाविषयक शब्द आणि कोकिल पक्ष्यांचे ध्वनि ह्यांच्या योगानें जसें कांहीं गर्जना करीत असलेले हे वृक्ष माझे ठिकाणीं कामोद्दीपन करीत आहेत. अशोकगुच्छरूप अंगार, भृंगध्वनिरूप शब्द आणि पल्लवरूप आरक्तवर्ण ज्वाला ह्यांनीं युक्त असलेला वसंतरूप अग्नि मला दग्ध करण्याच्या बेतांत आहे. जिच्या नेत्रांच्या पापण्या सूक्ष्म आहेत, जिचे केंश उत्कृष्ठ आहेत, आणि जिचें भाषण मृदु आहे, अशी ती सीता माझ्या दृष्टीस पडत नसल्यामुळें आतां मला जिवंत राहण्याचें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं. हे निष्पापा, ह्या वसंतामध्यें कोकिल पक्ष्यांनीं सर्व सीमाप्रदेश व्याप्त करून टाकिले असून वनेंहि मनोहर झालीं आहेत; आणि त्यामुळें हा काल त्या माझ्या प्रियेला इष्ट वाटणारा आहे. कामपीडेमुळें उत्पन्न झालेला आणि मंदवायु, प्रफुल्लित वनें इत्यादि वसंतगुणांनीं प्रज्वलित झालेला हा शोकरूप अग्नि लवकरच मला दग्ध करून टाकील. ती स्त्री दृष्टीस न पडतां मनोहर वृक्षच अवलोकनांत येत असल्यामुळें माझा काम वृद्धिंगतच होत राहील. अदृश्य असलेली सीता ह्या ठिकाणीं माझा शोक वृद्धिंगतच करीत असून, दृश्य असलेला वसंत कामविकारजन्य घामामुळें मला मलीन करून टाकीत आहे. हरिणाच्या बछड्याप्रमाणें जिचे नेत्र आहेत, अशी ती सीता चिंता व शोक ह्यांच्या योगानें मला मुद्दाम पीडा देत आहे; आणि लक्ष्मणा, चैत्रमासांतील हा क्रूर वनवायूहि मला संतप्त करीत आहे. हे इकडे तिकडे नाचत असलेले मयूर, स्फटिकाच्या जाळ्याप्रमाणें दिसणाऱ्या आणि वायूनें उडविलेल्या आपल्या पंखांच्या योगानें शोभत आहेत; आणि मयूर पक्षिणींनीं परिवेष्टित झालेले ते हे मदमत्त मयूर, मदनानें ग्रस्त केलेला माझा काम अधिकच वृद्धिंगत करीत आहेत. लक्ष्मणा, पहा, ही मदनानें व्याकुल झालेली लांडोर पर्वतशिखरावर नृत्य करीत असलेल्या आपल्या भर्त्यासमीप नृत्य करीत आहे; आणि आपले मनोहर पंख पसरून, शब्दांनीं उपहासच करीत आहे कीं काय, असा तो मयूर पक्षीहि मनापासून त्या

आपल्या मनोहर प्रियेच्या मागेमाग धावत आहे. राक्षसानें माझी प्रिया खरोखर मयूरवनांतुन नेली नाहीं, म्हणूनच हा मयूर रमणीय वनामध्यें आपल्या कांते-सहवर्तमान नृत्य करीत आहे. लक्ष्मणा, सीतेवांचून चैत्रमासांत हें वनामध्यें वास्तव्य मला अत्यंत दुःसह झालें आहे. पशुपक्ष्यांच्या जन्मास आलेल्या प्राण्यांमध्येंहि कसें प्रेम आहे, तें पहा. सांप्रत ही कामवासनेमुळें आपल्या भर्त्याशीं लगटत आहे, आणि विशालनयना सीतेला जर राक्षसानें नेलें नसतें, तर तीहि मदनाच्या योगानें घाबरी होऊन मला ह्याचप्रमाणें बिलगली असती. लक्ष्मणा, पुष्पभारांची समृद्धि असलेल्या वनांतील पुष्पें वसंत ऋतूमध्यें मला निष्फल होत आहेत. वृक्षांच्या अतिशय सौंदर्यामुळें मनोहर दिसत असलेलीं हीं पुष्पें भृंगसमुदायासहवर्तमान व्यर्थ पृथ्वीवर येत आहेत. कळपाकळपानें असलेले हे पक्षी आनंदित झाले असून एकमेकाला हाक मारीत असल्याप्रमाणेंच कीं काय, इच्छेनुरूप अस्पष्ट व मधुर ध्वनि करीत आहेत, आणि त्यामुळें ते मला कामोद्दीपक झाले आहेत. माझी प्रिया सीता जेथें वास्तव्य करीत आहे, तेथेंहि जर हा वसंतकाल असेल, तर तीहि पराधीन असल्यामुळें माझ्याप्रमाणेंच खरोखर शोक करीत असेल. जेथें ती आहे, त्या प्रदेशामध्यें खरोखर जरी वसंत नसला, तरी नीलकमलासारख्या नेत्रांनीं युक्त असलेली ती सीता माझ्यावांचून कशी बरें जिवंत राहील? अथवा जेथें माझी प्रिया आहे, तेथें वसंत हा असेलच; परंतु तो जरी असला, तरी शत्रूंनीं पीडिलेल्या त्या सुंदरीशीं त्याचें कांहींएक चाला-वयाचें नाहीं. सारांश शत्रूंच्या पीडेचें दुःख सोशीत असलेल्या स्त्रीला मदनाची बाधा होण्याचा संभव नाहीं. नित्य यौवन, कमलपत्रांसारखे नेत्र आणि मृदु भाषण ह्यांनीं युक्त असलेली माझी प्रिया वसंत प्राप्त झाल्यावर खरोखर प्राण-त्याग करील. साध्वी सीतेला माझा वियोग झाला असल्यामुळें ती जिवंत राह-ण्यास समर्थ नाहीं, असें माझ्या मनानें पक्कें घेतलें आहे. सीतेचें खरें खरें प्रेम माझ्यावर जडलें असून माझेंहि प्रेम सर्व प्रकारें सीतेवर जडलें आहे. आपल्या-बरोबर पुष्पें उडवून नेणारा थंडगार वारा जरी स्पर्श झाला असतां सुखदायक होणारा आहे, तरी मी त्या कांतेचें चिंतन करीत असल्यामुळें मला तो अग्नि-तुल्य झाला आहे. सीतेसहवर्तमान असतांना ज्याला मी पूर्वीं नेहमीं सुखकारक समजत होतों, तो वायु ती सीता नसल्यामुळें आज माझ्या शोकोत्पत्तीला कारण झालेला आहे. त्या वेळीं ह्या आकाशगामी पक्ष्यानें गर्जना केली, आणि तिच्या योगानें सीतेचा वियोग झाल्याचें मला ह्यानें सुचविलें; परंतु आतां

तोच काक पक्षी वृक्षावर बसून आनंदानें शब्द करीत आहे, आणि सीतेचा समागम होणार असल्याचें मला सुचवीत आहे. हा पक्षी त्या ठिकाणीं सीतेला अतिशय पीडा होत असल्याचें सुचवीत असून, मला मात्र त्या विशालनयनेचे समीप नेणार आहे. लक्ष्मणा, प्रफुल्लित अग्रांनीं युक्त अशा वृक्षांचे ठिकाणीं किलबिल किलबिल शब्द करीत असलेल्या पक्ष्यांचा कामोद्दीपक ध्वनि ऐक. वायूनें चलित झालेल्या ह्या तिलक-मंजरीकडे हा भ्रमर एकाएकीं येत आहे, आणि विषयांध होऊन अडखळत अडखळत चालू लागलेल्या आपल्या प्रियेकडे जाणाऱ्या कामी पुरुषाप्रमाणें तो दिसत आहे. हा अशोक कामी जनांचा शोक अतिशय वृद्धिंगत करणारा आहे, आणि वायूनें वर उडालेल्या पुष्पगुच्छांच्या योगानें जसा कांहीं मला दटावीतच येथें उभा राहिला आहे. लक्ष्मणा, मोहोरामुळें सुशोभित झालेले हे आम्रवृक्ष शृंगारानें मन प्रफुल्लित झालेल्या व शरिराला उटी लाविलेल्या पुरुषां-प्रमाणें दिसत आहेत. हे पुरुषश्रेष्ठा, पंपेच्या तीरीं असलेल्या ह्या चित्रविचित्र वनसमुदायामध्यें किन्नरींसहवर्तमान किन्नर इकडे तिकडे संचार करीत आहेत. लक्ष्मणा, हीं सुगंधि रक्तकमलें जलामध्यें सर्व प्रकारें बालसूर्याप्रमाणें प्रकाशत आहेत, पहा. निर्मल उदक आणि श्वेतवर्ण, नीलवर्ण व रक्तवर्ण कमलें ह्यांनीं युक्त असलेली ही पंपा, हंस व कारंडव पक्ष्यांनीं गजबजून गेलेली आहे. भ्रमरांनीं ज्यांतील पराग उदकामध्यें पाडिले आहेत, अशा बालसूर्यतुल्य आरक्त-वर्ण कमलांनीं सर्व बाजूंनीं ही व्याप्त झाली असल्यामुळें शोभा देत आहे. चक्रवाक पक्ष्यांनीं ही नेहमीं युक्त आहे. अद्‌भुत प्रदेशांनीं युक्त असलेलीं आणखी दुसरींहि वनें हिचे तीरीं आहेत. आणि जलपान करण्याच्या इच्छेनें आलेल्या गजांच्या व मृगांच्या कळपांनीं हिला शोभा आलेली आहे. वायूचा तडाखा बसल्यामुळें ज्यांच्यामध्यें वेग उत्पन्न झाला आहे, अशा लाटांनीं ताडित होत असलेलीं कमलें निर्मल उदकांत झळकत आहेत. पद्मपत्रांप्रमाणें विशाल नेत्रांनीं युक्त असून नित्य कमलांची आवड असलेली सीता दृष्टीस पडत नसल्यामुळें मला जगावेंसें वाटत नाहीं. अहो! कायहो हा मदनाचा कुटिल-पणा! अत्यंत कल्याणकारक भाषण करणारी कल्याणी सीता दूर गेली असतां-हि आणि म्हणूनच मला आतां दुर्लभ असतांहि हा आपला मला तिची स्मृति देत आहे! प्रफुल्लित वृक्षांनीं युक्त असलेला वसंत जर मला अधिक प्रहार न करील, तर हा प्राप्त झालेला कामहि धारण करणें मला शक्य होईल. अरे,

जनकनंदिनी सीतेसहवर्तमान असतांना ज्या गोष्टी मला रमणीय होत होत्या, त्याच तिचा वियोग झाल्यामुळें रमणीय होत नाहींत. लक्ष्मणा, कमलकोशाचीं दलें सीतेच्या पापण्यांसारखीं आहेत, म्हणून दृष्टीला तीं पहावींशीं वाटतात. दुसऱ्या वृक्षांतून बाहेर पडून कमलकेसराचा संसर्ग झालेला वायु सीतेच्या निःश्वासाप्रमाणें मनोहर वहात आहे. लक्ष्मणा, पंपेच्या दक्षिणेस पर्वतशिखरांवर असलेली कर्णिकार वृक्षाची प्रफुल्लित व अत्यंत सुशोभित काठी तूं अवलोकन कर. हा ऋष्यमूक नामक श्रेष्ठ पर्वत धातूनें भूषित असून वायुवेगानें उडालेली पुष्कळच चमत्कारिक धूळ फेंकीत आहे. लक्ष्मणा, सर्व बाजूंनीं प्रफुल्लित, पर्णरहित आणि चोहोंकडून रमणीय अशा पलाशवृक्षांच्या योगानें पर्वतशिखरें जशीं कांहीं पेटल्यासारखीं दिसत आहेत. पंपेच्या तीरीं असलेले मालती, मोगरी, कमल व कन्हेर हे सुगंध वृक्ष जलसिंचनानें वाढलेले असून प्रफुल्लित झालेले आहेत. केतकी, निर्गुडी व कुसरी हीं झाडें प्रफुल्लित झालीं असून ह्या पंपेच्या तीरीं महाळुंगाचे वृक्ष फलांनीं भरलेले आहेत, व कुंदांचीं झांकरेंहि सर्वस्वी पुष्पांनीं भरलेलीं आहेत. करंज, मोहा, तिवस, बकुल, चांफा, तिळवा आणि नागचाफा हे वृक्ष प्रफुल्लित झालेले आहेत. पद्मक, नील, अशोक आणि सिंहांचे आयाळ ज्यांच्या योगानें पिंजरवर्ण झालेले आहेत, असे लोध्र वृक्ष पर्वताच्या माथ्यावर प्रफुल्लित झालेले असून शोभत आहेत. पिस्ते, पिवळ्या कोरांटया, सांबरी, मंदार, आम्र, गुलाब आणि कांचन प्रफुल्लित झालेले आहेत. मुचकुंद, अर्जुन, केतक, भोंकरी, शिरसू, शिसवा आणि धावडा हेहि वृक्ष पर्वतशिखरावर दृष्टीस पडत आहेत. सांवऱ्या, पळस, तांबड्या कोरांट्या, तिवस, करंज, चंदन, स्पंदन, हिंताल, तिलक आणि नागचाफे हेहि वृक्ष प्रफुल्लित दिसत आहेत. लक्ष्मणा, ह्या पंपेच्या तीरीं प्रफुल्लित अग्रांनीं युक्त असलेल्या लतांनीं परिवेष्टित आणि मनोहर असे हे पुष्कळच प्रफुल्लित वृक्ष तूं अवलोकन कर. वायूच्या योगानें ज्यांच्या फांद्या अस्ताव्यस्त होऊन ज्यांची एकमेकामध्यें गुंतागुंत झालेली आहे, अशा ह्या वृक्षांना मत्त झालेल्या श्रेष्ठ स्त्रियांप्रमाणें लता चिकटून रहात आहेत. ह्या वृक्षावरून त्या वृक्षावर, ह्या पर्वतावरून त्या पर्वतावर, आणि ह्या वनांतून त्या वनांत वहात जाणारा वायु अनेक रसांच्या आस्वादामुळें हर्षयुक्त झाल्यासारखा दिसत आहे. कांहीं सुगंधि वृक्ष विपुल पुष्पांनीं युक्त आहेत, व कांहीं पुष्पकलिकांनीं परिवेष्टित असलेले वृक्ष श्यामवर्ण दिसत आहेत. हें मधुर, हें स्वादिष्ट

व हें प्रफुल्लित असें समजून आरक्तवर्ण मधुमक्षिका पुष्पांमध्येंच लीन आहेत. पुष्पांत लीन झाल्यावर ही मधुलुब्ध मधुमक्षिका पुनरपि उडून एका-एकीं पंपातीरीं असलेल्या वृक्षावरच दुसरे ठिकाणीं जात आहे. ह्या भूमीवर आपोआप पडलेल्या पुष्पराशींचे थर झालेले असल्यामुळें, शयन करण्याकरितां बिछाने पसरलेल्या भूमीप्रमाणें ही सुखकर झालेली दिसत आहे. लक्ष्मणा, नानाप्रकाच्या पुष्पांचे थर पर्वतशिखरावर झाले असल्यामुळें विस्तीर्ण, पीतवर्ण व रक्तवर्ण असे नानाप्रकारचे बिछाने तयार करून ठेविल्यासारखे दिसत आहेत. लक्ष्मणा, थंडी संपतांक्षणीं वृक्षांचे ठिकाणीं झालेला हा पुष्पप्रादुर्भाव तूं अवलोकन कर. ह्या चैत्र महिन्यामध्यें वृक्ष जसे कांहीं एकमेकाच्या ईर्षेनेंच प्रफुल्लित झालेले आहेत. लक्ष्मणा, भृंगांनीं नादित असल्यामुळें हें वृक्ष एकमेकांना आह्वान करीत असल्यासारखे दिसत आहेत; आणि फांद्या पुष्पांनीं भरलेल्या असल्यामुळें ते फारच शोभत आहेत. हा कारंवड पक्षी शुभ उदकामध्यें प्रविष्ठ होऊन माझे ठिकाणीं कामोद्दीपन करण्याकरितांच कीं काय आपल्या कांतेसहवर्तमान रममाण होत आहे. गंगेप्रमाणें पंपेचें हें रूप मनोहर असल्यामुळें, जगतामध्यें हिच्या उत्कृष्ठ गुणांची जी ख्याति झालेली आहे, ती अगदीं योग्य आहे. लक्ष्मणा, ती साध्वी स्त्री जर दृष्टीस पडेल, आणि तिच्यासहवर्तमान जर आमचें ह्या ठिकाणीं वास्तव्य होईल, तर अयोध्येचीच नव्हे, परंतु इंद्रपदाचीहि मी जरूर बाळगणार नाहीं. कारण ह्याप्रमाणें रमणीय असलेल्या ह्या हिरव्यागार प्रदेशावर मी तिच्यासहवर्तमान रममाण होऊं लागलों असतां मला कसलीहि चिंता रहाणार नाहीं, आणि दुसऱ्या गोष्टी माझ्या मनांतहि येणार नाहींत. नानाप्रकारच्या पर्णांनीं युक्त असलेले हे वृक्ष, ह्या वनामध्यें सीतेवांचून असलेल्या मला नानाप्रकारच्या पुष्पांनीं चिंताक्रांत मात्र करून टाकीत आहेत. लक्ष्मणा, शीत जलानें परिपूर्ण व कमलांनीं भरलेली ही पुष्करिणी तूं अवलोकन कर. चक्रवाक पक्षी हिचे तीरीं संचार करीत असून कारंडव पक्षी हिचा आश्रय करून राहिलेले आहेत. हे सुमित्रानंदना, बेडकांनीं व क्रौंच पक्ष्यांनीं ही भरलेली आहे, आणि मोठमोठ्या मृगांनीं हिचा आश्रय केलेला आहे. ही पंपा शब्द करणाऱ्या पक्ष्यांमुळें तर अधिकच शोभत आहे. पद्मपत्रांप्रमाणें नेत्र व चंद्राप्रमाणें आल्हादकारक मुख ह्यांनीं युक्त असलेल्या माझ्या नित्य तरुणी प्रियेची आठवण देऊन, हे आनंदित झालेले नानाप्रकारचे पक्षी माझे ठिकाणीं कामोद्दीपन करीत आहेत. अद्भुत शिखरांवरून मृगीसहवर्त-

मान असलेल्या मृगांना तूं अवलोकन कर; आणि बालहरिणासारखे जिचे नेत्र आहेत, त्या सीतेचा वियोग झालेल्या माझ्याकडेहि दृष्टि दे. इकडे तिकडे संचार करीत असलेले हे मृग माझ्या चित्ताला दुःख मात्र देत आहेत. मत्त पक्षिगणांनीं गजबजून गेलेल्या ह्या रमणीय पर्वतशिखरावर जर ती कांता माझ्या दृष्टीस पडेल, तरच माझी धडगत आहे. सारांश लक्ष्मणा, ती सुंदरी वैदेही जर माझ्याबरोबर ह्या पंपातीरावरील शुभ वायूचें सेवन करील, तरच खरोखर मी जिवंत राहीन. लक्ष्मणा, श्वेत कमळें व रक्त कमळें ह्यांचा गंध वाहून नेणाऱ्या अशा ह्या मंगलकारक व रोगनाशक पंपातीरावरील वनवायूचें जे सेवन करितात, ते धन्य आहेत. कमलपत्रांप्रमाणें जिचे नेत्र आहेत, व जी नेहमींच तरुण आहे, अशी ती जनककन्या प्रिया माझा वियोग होऊन शत्रूचे अधीन झाली असतांना कसा बरें प्राण धारण करील? सीता कोठें आहे, म्हणून लोकांच्या सभेमध्यें जनकानें मला प्रश्न केला, तर त्या धर्म-वेत्त्या व सत्यवादी राजाला मी आतां काय बरें कुशल वृत्तांत कथन करूं? अरे, पित्यानें मला वनांत पाठविलें असतां जी धर्माचें अवलंबन करून हळू हळू माझ्या मागोमाग आली, ती प्रिया सीता कोठें आहे? लक्ष्मणा, राज्या-पासून च्युत आणि मनामध्यें खिन्न झालेल्या माझ्या मागोमाग जी आली, तिचा वियोग झाल्यामुळें दीन झालेला मी कसा बरें प्राण धारण करूं? मनो-हर आणि प्रशंसेस पात्र अशा कमलतुल्य नेत्रांनीं युक्त, शुभ, कसलाहि वण नसलेलें आणि सुगंधि असें तिचें मुख दृष्टीस पडत नसल्यामुळें माझें धैर्य अगदीं खचत आहे. लक्ष्मणा, मधून मधून किंचित् हास्यानें युक्त, मधुर, हित-कारक आणि गुणसंपन्न असें सीतेचें अनुपम भाषण माझ्या आतां कधीं बरें कानीं पडेल? वनामध्यें दुःख प्राप्त झालें असूनहि ती तरुणी साध्वी दुःख नाहींसें झाल्यासारखी स्वतःला भासवीत होती, आणि जशी कांहीं हर्षयुक्त होऊन मदनानें जर्जर केलेल्या माझ्याशीं चांगलें भाषण करीत होती. 'हे राजकुमारा, ती माझी स्नुषा कोठें आहे' म्हणून विचारी कौसल्या मला विचारूं लागली असतां, मी तिला अयोध्येमध्यें काय सांगूं व कसें सांगूं? लक्ष्मणा, तूं जा आणि भ्रातृवत्सल भरताला भेट. मी आतां त्या जनककन्येवांचून जिवंत राहण्यास समर्थ नाहीं."

ह्याप्रमाणें महात्मा राम अनाथासारखा विलाप करूं लागला असतां भ्राता लक्ष्मण योग्य व व्यर्थ न होणारें असें भाषण त्याच्याशीं करूं लागला. तो

म्हणाला, "रामा, शोक आवरून धर. हे पुरुषोत्तमा, तुझें देव बरें करो. तूं शोक करूं नको. तुझ्यासारख्या निर्मल मनाच्या पुरुषाची मति अशी कधीं गुंग होत नाहीं. प्रिय वस्तूसंबंधानें वियोगजन्य दुःख अवश्य ठेविलेलेंच आहे, हें लक्ष्यांत आणून प्रियजनाचे ठिकाणीं असलेलें प्रेम तूं आतां सोडून दे. कारण अतिस्नेहाचा संबंध झाल्यामुळें भिजलेली वातहि जळूं लागते. रामा, रावण पाताळांत जावो, किंवा त्याच्यापेक्षांहि अधिक दुर्गम प्रदेशावर जावो, त्यानें कांहीं केलें, तरी तो आतां जिवंत राहणार नाहीं. तस्मात् त्या पापी राक्षसाची बातमी आपणांला प्रथम मिळविली पाहिजे; म्हणजे सीतेला सोडून देणें तरी त्याला भाग पडेल, किंवा मरावें तरी लागेल. फार कशाला? सीतेला घेऊन रावण जरी दितीच्या गर्भांत गेला, तरी सुद्धां तो सीतेला परत न देईल तर मी त्याचा तेथेंहि वध करीन. हे कल्याणसंपन्न पुरुषश्रेष्ठा, धैर्याचें अवलंबन कर, आणि हे असले धीर खचविणारे विचार सोडून दे. कारण नष्ट झालेली वस्तु ज्यांना अवश्य मिळावयाची आहे, त्यांना ती यत्नावांचून कधींहि मिळत नाहीं. हे सज्जना, उत्साहाचें सामर्थ्य ज्यास्त आहे. उत्साहापेक्षां श्रेष्ठ बल दुसरें नाहीं; आणि म्हणूनच उत्साही पुरुषाला त्रैलोक्यामध्यें कोणतीहि वस्तु दुर्लभ नाहीं. उत्साही पुरुष दुर्घट कार्य प्राप्त झालें असतांहि खचून जात नाहीं. ह्यास्तव आपणहि केवळ उत्साहाचेंच अवलंबन करून जानकी परत मिळवूं. शोकाला मागें टाकून तूं ही विषयाधीनता सोडून दे. तूं स्वतः महात्मा व कृतार्थ आहेस, हें तुला समजत नाहीं काय ?"

ह्याप्रमाणें त्या लक्ष्मणानें रामाला समजाविलें असतां चित्त शोकाकुल झालेल्या रामानें शोकाचा व मोहाचा त्याग करून धैर्याचें अवलंबन केलें. नंतर तो अचिंत्य पराक्रमी राम वायूनें चंचल झालेल्या वृक्षांनीं युक्त, अत्यंत मनोहर व रम्य अशी ती पंपा सोडून सावधपणानें पुढें चालला. सारांश, दुःखाकुल आणि म्हणूनच मनामध्यें उद्विग्न झालेल्या त्या रामानें लक्ष्मणासहवर्तमान विचार केला, आणि तें सर्व वन, झरे व गुहा अवलोकन करीत करीत तो महात्मा एकाएकीं पुढें चालता झाला. तो राम जाऊं लागला असतां मत्त गजाप्रमाणें झुलत झुलत चालणाऱ्या आणि इष्ट व्यापारांचेंच अवलंबन करणाऱ्या महात्म्या लक्ष्मणानें सावध राहून धर्मानें व बलानें त्याचें रक्षण केलें.

नंतर ऋष्यमूक पर्वताचे समीप संचार करणारा महाबलाढ्य वानरराज सुग्रीव हिंडतां हिंडतां अद्भुत व दर्शनीय अशा त्या राम-लक्ष्मणांना अवलोकन करितां-

क्षणीं भयभीत होऊन हूं कीं चूं देखील करीनासा झाला ! तात्पर्य तेथें हिंडत असलेल्या त्या राम-लक्ष्मणांना अवलोकन करितांक्षणीं गजाप्रमाणें मंदगतीनें चालणारा तो सुग्रीव पराकाष्ठेचा खिन्न झाला, आणि चिंताक्रांत होऊन अतिशय भयामुळें त्याचा उत्साहहि नाहींसा झाला. पुण्यप्रद, सुखावह, आश्रय करण्यास योग्य व वानरांनीं वास्तव्य केलेल्या सीमांनीं युक्त अशा त्या आश्रमाला प्राप्त झालेल्या महाबलाढ्य राम-लक्ष्मणांना अवलोकन करितांक्षणीं इतर वानरहि तेथून चालते झाले.

सर्ग दुसरा.

राम-लक्ष्मणदर्शनानें सुग्रीवाला भयप्राप्ति.

धनुर्धारी व वीर असे ते महात्मे भ्राते राम-लक्ष्मण अवलोकन करून तो वानरराज सुग्रीव चिंताक्रांत झाला. त्याचें अंतःकरण उद्विग्न झालें. तो चोहोंकडे पाहूं लागला, आणि कोणत्याहि प्रदेशावर ठरेनासा झाला. महाबलाढ्य राम-लक्ष्मणांवर दृष्टि गेल्यामुळें एके ठिकाणीं स्थिर राहण्याचा विचार मनामध्यें मुळींच न येतां, अत्यंत भयभीत झालेल्या त्या वानराचें चित्त अगदीं गोंधळून गेलें. नंतर तेथें राहणें आणि तेथून चालतें होणें, ह्यांत बरें वाईट कोणतें, हें स्वतः लक्ष्यांत आणून आणि वानरांसहवर्तमान त्याचा विचार करून तो त्या सर्वांसह पराकाष्ठेचा उद्विग्न झाला. तदनंतर राम-लक्ष्मण दृष्टीस पडत असल्यामुळें अत्यंत उद्विग्न झालेला तो वानरराज आपल्या मंत्र्यांना म्हणाला, "कपटानें वल्कलें धारण करून हिंडत हिंडत येथें आलेले हे पुरुष निःसंशय ह्या दुर्गम वनामध्यें वालीनें पाठविले आहेत."

हें भाषण ऐकिल्यावर ते महाधनुर्धारी राम-लक्ष्मण सुग्रीवाच्या मंत्र्यांनीं अवलोकन केले; आणि लगेच ते त्या पर्वताच्या कड्यापासून निघून त्याच पर्वताच्या दुसऱ्या उत्कृष्ठ शिखराकडे चालते झाले. नंतर आपल्या कळपाचें रक्षण करणारे ते वानर त्यांच्यामध्यें श्रेष्ठ असलेल्या कपिश्रेष्ठ सुग्रीवाकडे सत्वर गेले, आणि त्याच्याभोंवतीं गराडा घालून उभे राहिले. तात्पर्य एकसारखीच अवस्था झालेले ते सर्वहि वानर वेगानें पर्वतांचीं शिखरें कंपित करीत करीत ह्या पर्वतापासून त्या पर्वतावर उड्या मारूं लागले, आणि त्यांनीं तेथील दुर्गम प्रदेशावर असलेले

प्रफुल्लित वृक्ष मोडून टाकिले. चोहोंकडून त्या महापर्वतावर ते श्रेष्ठ वानर उड्या मारूं लागले; आणि हरिणें, मांजरें व व्याघ्र ह्यांना भाति उत्पन्न करीत करीत चालते झाले. तदनंतर धैर्याचें अवलंबन केलेले सुग्रीवाचे कांहीं मंत्री त्या श्रेष्ठ पर्वतावर जाऊन त्याजकडे गेले, आणि हात जोडून उभे राहिले. तेव्हां वालीच्या पोटांत कांहीं किल्मिष येऊन त्यानें ह्या उभयतांना पाठविलें आहे, अशी शंका आल्यामुळें भयभीत झालेल्या सुग्रीवाला संभाषणज्ञ हनुमान म्हणाला, "वालीकरितां जो हा सर्वांचा मोठा चित्तक्षोभ झालेला आहे, त्याचा त्याग केला पाहिजे. हा श्रेष्ठ पर्वत मलय आहे; आणि ह्या ठिकाणी आपणांला वालीपासून भीति नाहीं. हे वानरराजा, ज्यामुळें चित्त उद्विग्न होऊन तूं ऋष्यमूक पर्वतापासून पळून आलास, तो क्रूर मुद्रा धारण करणारा दुष्ट वाली मला दिसत नाहीं. सारांश, हे विनयसंपन्न सुग्रीवा, ज्या पापकर्मी ज्येष्ठ भ्रात्यापासून तुला भय उत्पन्न झालें आहे, तो दुष्टात्मा वाली येथें नाहीं; आणि म्हणूनच मला वाटतें, तुला भीति नाहीं. सुग्रीवा, चंचल अंतःकरणामुळें तूं ज्या अर्थी बुद्धीचा दृढ निश्चय करीत नाहींस, त्या अर्थी तुझें वानरत्व व्यक्तच झालें आहे. बुद्धि आणि ज्ञान ह्यांनीं संपन्न होऊन इंगितांच्या योगानें तूं सर्व कांहीं करीत जा. कारण, बुद्धीचें अवलंबन न केलेला राजा आपल्या ताब्यांतील कोणत्याहि प्रजेवर अंमल चालविण्यास समर्थ होत नाहीं."

हनुमानाचें हें उत्तम भाषण ऐकून तो वानरश्रेष्ठ सुग्रीव हनुमानाला म्हणाला, "आजानुबाहु, विशाल नयन आणि बाण, धनुष्य व खड्ग धारण करणाऱ्या ह्या देवकुमारतुल्य उभयतांना अवलोकन केल्यावर कोणाला बरें भय उत्पन्न होणार नाहीं? वालीनें ह्या पुरुषश्रेष्ठांना पाठविलें आहे, असा मला संशय येतो. कारण राजेलोकांना पुष्कळ मित्र असतात. तेव्हां हेहि कोणी वालीचे मित्रच असतील. तस्मात् ह्यांच्याविषयीं विश्वास धरून राहणें योग्य नाहीं. कपटानें संचार करणारे शत्रू मनुष्यानें ओळखिले पाहिजेत. कारण ते विश्वासघातकी विश्वासानें स्वस्थ राहिल्याचें छिद्र पाहून प्रहार करितात. आपले मनोरथ सिद्धीस नेण्याविषयीं वाली मोठा बुद्धिमान आहे; आणि प्रतिपक्षाला फसविण्याचे अनेक उपाय राजे लोक जाणीत असून ते संधि साधून शत्रूवर प्रहार करीत असतात. ह्यास्तव सामान्य लोकांकडून त्यांचा पत्ता लावविला पाहिजे. तस्मात् हनुमंता, उदासीन पुरुषाप्रमाणें तूं जाऊन त्यांची नानाप्रकारची हालचाल, मुद्रा आणि बोलण्याची ढब ह्यांच्या योगानें परीक्षा

करून ये. तूं त्यांच्या मनाचा कल पाहा; आणि तूं समीप गेल्यावर बोलण्या-चालण्यांत जर त्यांचें मन संतुष्ट झालेलें तुझ्या दृष्टीस पडलें, तर प्रशंसा-बोधक शब्दांनीं आणि माझा अभिप्राय दर्शविणाऱ्या हावभावांनीं माझ्याविषयीं त्यांचे मनांत तूं विश्वास उत्पन्न कर. हे वानरश्रेष्ठा, धनुष्य धारण करून ह्या वनामध्यें प्रवेश करण्याचें प्रयोजन काय, हें माझ्या संमुख उभा राहून तूं त्यांना विचार. हे वानरा, त्यांचीं मनें शुद्ध आहेत कीं काय, हें तूं समजून घे, व ते दुष्ट असल्यास त्यांचा दुष्टपणाहि भाषणावरून अथवा आकारावरून तुला ओळखितां येईल."

ह्याप्रमाणें वानरराज सुग्रीवानें आज्ञा केली असतां वायुपुत्र हनुमानानें त्या राम-लक्ष्मणाकडे जाण्याचें मनांत आणिलें; आणि वालीनें गाठण्यास अशक्य-परंतु अत्यंत भयभीत झालेल्या त्या सुग्रीवाच्या भाषणाला 'ठीक आहे' म्हणून मान देऊन, तो महाप्रभावी हनुमान, जेथें अतिबलाढ्य राम लक्ष्मणा-सह होता, तेथें गेला.

सर्ग तिसरा.

हनुमानाचे राम-लक्ष्मणांना प्रश्न.

महात्म्या सुग्रीवानें सांगितलेलें लक्ष्यांत घेऊन हनुमान ऋष्यमूक पर्वतापासून राघवांकडे चालता झाला. प्रथमतः मनाला विश्वास न वाटल्यामुळें, वायुपुत्रानें वानररूपाचा त्याग करून सामान्य तापशाचें रूप धारण केलें. नम्रपणें त्या राघवांसमीप जाऊन व त्यांना प्रणिपात केला नंतर मधुर व मनोहर शब्दांनीं त्या वीरांशीं भाषण करून, त्यांची त्यानें यथायोग्य रीतीनें प्रशंसाहि केली. नंतर तो वानरश्रेष्ठ हनुमान त्या सत्यपराक्रमी राम-लक्ष्णांना मृदु शब्दांनीं आपल्याला अपेक्षित असलेलें विचारूं लागला. तो म्हणाला, "निर्मल तपश्चर्या करणारे तुम्ही तपस्वी राजर्षी अथवा देव ह्यांप्रमाणें दिसत आहां. तेव्हां तुम्ही श्रेष्ठ ब्रह्मचारी ह्या प्रदेशांवर कशाकरितां आलां आहां? तुमच्यामुळें मृगगणांना आणि वनांत संचार करणाऱ्या इतरहि प्राण्यांना त्रास होत आहे. कांहीं वस्तु शोधण्याच्या उद्देशानें तुम्ही पंपेच्या तीरावरील वृक्षांकडे चोहोंकडून निरखून पहात आहां, व शुभ जलानें युक्त असलेल्या ह्या नदीला तुम्ही शोभा

आणीत आहां. तस्मात् बलवान, धैर्यवान, सुवर्णासारख्या कांतीनें युक्त, आजानुबाहु आणि वल्कलें परिधान केलेले असे तुम्ही कोण आहां, व दुःखाचे सुस्कारे कां टाकीत आहां? आणि आपल्या मुद्रेनें ह्या वनसंबंधीं प्रजाजनांना पीडा कां देत आहां? तुमची मुद्रा सिंहासारखी दिसत असून तुम्ही महाबलाढ्य व महापराक्रमी वीर आहां, आणि तुम्ही इंद्रधनुष्यासारखीं धनुष्यें घेतलीं असल्यामुळें शत्रूचा वध करण्याचा तुमचा उद्देश दिसत आहे. तुम्ही श्रीमान व रूपवान असून तुमची चालण्याची ढब उत्कृष्ठ बैलाप्रमाणें आहे. तुमचे बाहु गजशुंडेप्रमाणें असून तुम्ही पुरुषश्रेष्ठ तेजस्वी आहां. हा पर्वतराजहि तुमच्या प्रभेनें झळकूं लागला आहे. तेव्हां राज्यालाच पात्र असलेले तुम्ही देवतुल्य ह्या प्रदेशाला कसें आलां? तुमचे नेत्र कमलपत्रांप्रमाणें विशाल असून तुम्हीं वीरांनीं जटामंडल धारण केलें आहे, व तुम्ही उभयतांहि वीर एकमेकांसारखे असून देवलोकांपासून येथें आलां आहां, असें मला वाटतें. पृथ्वीवर तुम्ही चंद्रसूर्य सहज आलां आहां, असें मला वाटत आहे. विशाल वक्षःस्थलांनीं युक्त असलेले तुम्ही वीर जरी मनुष्य आहां, तरी तुमचें रूप देवांप्रमाणें आहे. तुमचे स्कंध सिंहासारखे असून तुम्ही आनंदित झालेल्या तरुण वृषभांप्रमाणें मोठे उत्साहि दिसत आहां. अडसराप्रमाणें असलेले तुमचे बाहु अत्यंत वर्तुल व दीर्घ असून सर्व अलंकार धारण करण्यास योग्य आहेत; परंतु ते तुम्ही कशाकरितां भूषित केले नाहींत? विंध्य, मेरु इत्यादि पर्वतांनीं विभूषित असून सागर वनें ह्यांनीं युक्त असलेल्या ह्या संपूर्ण पृथ्वीचें रक्षण करण्यास तुम्ही उभयतां योग्य आहां, असें मला वाटतें. चित्रविचित्र शिडकाव टाकिलेली हीं तुमचीं लकलकित अद्भुत धनुष्यें इंद्राचीं सुवर्णभूषित वज्रेंच कीं काय अशीं दिसत आहेत. शुभ आकारानें युक्त असलेले तुमचे भाते, दग्ध करण्यास उद्युक्त झालेल्या सर्पांप्रमाणें प्राणनाशक अशा भयंकर व तीक्ष्ण बाणांनीं भरलेले आहेत. प्रमाणानें मोठे, रुंद व सुवर्णभूषणांनीं युक्त असे हे खड्ग कांत टाकिलेल्या सर्पांप्रमाणें झळकत आहेत. अरे, मी ह्याप्रमाणें तुमच्याशीं बोलत असतांना तुम्ही माझ्याशीं कां भाषण करीत नाहीं?"

हनुमान पुढें म्हणतोः—"सुग्रीव म्हणून कोणी एक धर्मात्मा व वीर वानरश्रेष्ठ आहे, आणि त्याला भ्रात्यानें हांकून लाविलें असल्यामुळें तो दुःखित असा जगतावर भ्रमण करीत आहे. त्या वानरश्रेष्ठाधिपति महात्म्या सुग्रीवानें पाठविल्यावरून मी हनुमान नामक वानर येथें आलों आहे. तो धर्मात्मा सुग्रीव तुम्हां-

सहवर्तमान सख्य करण्याची इच्छा करीत असून, मी वायुपुत्र वानर त्याचा मंत्री आहें, असें तुम्ही समजा. सुग्रीवाचें प्रिय करण्याकरितां मीं तापसरूप धारण केलें आहे, व मीं इच्छेस येईल त्याप्रमाणें वागणारा व मनास वाटेल तिकडे जाणारा असून, ऋष्यमूक पर्वतापासून येथें आलों आहें."

रामसुखें हनुमानाची प्रशंसा.

ह्याप्रमाणें ह्या वीर राम-लक्ष्मणांना सांगितल्यानंतर बोलण्यामध्यें कुशल असलेला तो संभाषणज्ञ हनुमान पुनरपि कांहींएक बोलला नाहीं. तेव्हां त्याचें भाषण श्रवण करून आनंदित मुद्रेनें युक्त झालेला वैभवशाली राम समीपच असलेल्या भ्रात्या लक्ष्मणाला म्हणाला, " हा वानरराज महात्म्या सुग्रीवाचा मंत्री त्याच्याचकरितां येथें माझ्यासमीप आला आहे. ह्याकरितां लक्ष्मणा, प्रेम-युक्त, शत्रूंचें दमन करणारा आणि संभाषणज्ञ अशा त्या सुग्रीवमंत्री वान-राशीं मधुर शब्दांनीं तूं कांहीं तरी बोल. ज्यानें ऋग्वेदाचा अभ्यास केलेला नाहीं, ज्यानें यजुर्वेद धारण केलेला नाहीं, आणि जो सामवेद जाणीत नाहीं, त्याला असें भाषण करितां येणें शक्य नाहीं. खरोखर संपूर्ण व्याकरण ह्यानें अनेक वेळां ऐकिलेलें आहे. कारण हा जरी पुष्कळ बोलत होता, तरी कांहींहि अशुद्ध ह्याच्या तोंडांतून निघालेलें नाहीं. मुख, नेत्र, ललाट, भिवया आणि इतरहि सर्व अवयव ह्यांपैकीं कोठेंहि ह्याचे ठिकाणीं दोष दृष्टोत्पत्तीस आला नाहीं. ह्याच्या भाषणांत उगीच पाल्हाळ नाहीं. तें संदिग्ध नाहीं, अस्खलित आहे. ऐकणाऱ्याला कंटाळा आणण्यासारखें नाहीं, आणि मनामध्यें उत्कृष्ठ रीतीनें येऊन नंतर कंठविवरापासून तें श्रोत्यांच्या कानांवर पडत असल्यामुळें त्याचा उच्चार मध्यम स्वरानें होत आहे. सारांश, त्या त्या वर्णाचे संस्कार क्रमानें अंतःकरणावर ठसविण्यास समर्थ, त्वरारहित, विलंबशून्य आणि म्हणूनच हृदयाला आनंद देणारी अशी शुभ वाणी हा उच्चारीत आहे. ऊर, कंठ आणि शिर ह्या तिन्ही ठिकाणीं अभिव्यक्त होणाऱ्या ह्या अद्भुत वाणीनें खड्ग उपसून तयार असलेला शत्रू जरी झाला, तरी कोणाचें बरें चित्त अनुकूल होणार नाहीं ! हे निष्पापा, ह्या प्रकारचा दूत ज्या राजापाशीं नसेल, त्याचीं कृत्यें सिद्धीस कशीं जाणार ? ह्या प्रकारच्या गुणसमुदायांनीं युक्त असलेले कार्यसाधक ज्याच्यापाशीं असतील, त्याचे दूतांच्या भाषणानें बोधित केलेले सर्वहि मनोरथ सिद्धीस जातील. "

ह्याप्रमाणें रामानें सुमित्रापुत्र लक्ष्मणाला सांगितलें असतां तो संभाषणज्ञ

लक्ष्मण वायूपुत्राला म्हणाला, "हे ज्ञानसंपन्न महात्म्या, सुग्रीवाचे गुण आम्हांला माहीत आहेत, व त्या वानरराज सुग्रीवालाच आम्ही शोधीत आहों. तस्मात् हे सज्जनश्रेष्ठ हनुमाना, सुग्रीवाच्या आज्ञेवरून जसें तूं आम्हांला सांगशील, तसें आम्ही करूं."

हें त्या लक्ष्मणाचें भाषण पूर्णपणें श्रवण केल्यावर तो वायुपुत्र आनंदित झाला, आणि सुग्रीवाचा विचार मनामध्यें आणून त्या राम-लक्ष्मणाशीं सख्य करण्याचें त्यानें मनामध्यें आणिलें.

सर्ग चौथा.

लक्ष्मणमुखें हनुमानाला स्ववृत्तकथन.

तदनंतर सुग्रीवासंबंधानें रामाचें सौम्य भाषण श्रवण करून व सुग्रीवाचें रामाचें कांहीं कार्य आहे, असें जाणून सुग्रीवाचा मनोरथ आतां परिपूर्ण होईल, असें मनामध्यें आल्यामुळें हनुमानाला हर्ष झाला, आणि तो मनामध्यें म्हणाला, "त्या महात्म्या सुग्रीवाला राज्यप्राप्ति अवश्य होणार. कारण हा महापुरुष कांहीं कार्याच्या उद्देशानें येथें आला आहे."

नंतर अत्यंत हर्षयुक्त झालेला तो वानरश्रेष्ठ हनुमान संभाषणनिपुण रामाला फिरून म्हणाला, "पंपेच्या तीरावरील वनांनीं भूषित असून नानाप्रकारच्या श्वापदांनीं व मृगांनीं युक्त असल्यामुळें दुर्गम झालेल्या ह्या घोर वनामध्यें कनिष्ठ भ्रात्यासहवर्तमान आपण कशाकरितां आलां?"

हें त्याचें भाषण श्रवण केल्यावर रामानें सांगितल्यावरून लक्ष्मणानें दशरथ-पुत्र महात्म्या रामाविषयीं त्याला हकीकत सांगितली. तो म्हणाला, "दशरथ म्हणून एक तेजस्वी व धर्मवत्सल राजा होऊन गेला. तो नेहमीं स्वधर्मानें चारी वर्णांचें सर्व प्रकारें परिपालन करीत असे. त्याचा द्वेष करणारा कोणीहि नव्हता, व तोहि कोणाचा द्वेष करीत नसे. पालक ह्या नात्यानें सर्व प्राण्यांना तो दुसरा ब्रह्मदेवच कीं काय असें वाटत असे. योग्य दक्षणांनीं युक्त असे अग्निष्टोमप्रभृति ऋतु त्यानें केले होते. त्याचा हा ज्येष्ठ पुत्र राम म्हणून लोकांमध्यें प्रसिद्ध आहे. हा दशरथाचा ज्येष्ठ पुत्र इतर पुत्रांपेक्षां गुणांनीं श्रेष्ठ असून पित्याची आज्ञा पार पाडणारा आहे, आणि प्राणिमात्रांनीं

आश्रय करण्यास योग्य आहे. हा राजचिन्हांनीं युक्त असून राज्यवैभवानेंहि युक्त असतांना, राज्यापासून च्युत होऊन वनामध्यें वास्तव्य करण्याकरितां माझ्यासहवर्तमान येथें आला आहे. हे महाभाग्यवान हनुमाना, सायंकाळीं महातेजस्वी सूर्याचे मागोमाग ज्याप्रमाणें प्रभा जाते, त्याप्रमाणें ह्या जितेंद्रिय रामाचे मागोमाग त्याची भार्या सीता अरण्यांत चालती झाली. मी ह्याचा कनिष्ठ भ्राता असून ह्याच्या गुणांमुळें ह्या कृतज्ञ व सर्वज्ञ रामाचा दास बनलों आहें, व लक्ष्मण ह्या नांवानें मी प्रसिद्ध आहें. सुखोपभोग घेण्यासच पात्र, महायोग्य, प्राणिमात्रांच्या हिताविषयींच मनाची प्रवृत्ति असलेल्या, आणि ऐश्वर्यहीन झाल्यामुळें वनवासच रुचत असलेल्या ह्या रामाची भार्या आम्ही जवळ नसतांना राक्षसानें हरण करून नेली. ज्यानें ह्याची पत्नी हरण करून नेली त्या राक्षसाचा पत्ताहि लागत नाहीं. दनु म्हणून एक दितीचा पुत्र शापामुळें राक्षस बनलेला होता. त्यानें वानरराज सुग्रीव समर्थ आहे, म्हणून सांगितलें. ‘ तो महावीर्यवान सुग्रीव तुझ्या भार्येचा अपहार करणाऱ्याचा शोध लावील ’ असें सांगून तेजानें झळकत असलेला तो दनु स्वर्गास जाण्याकरितां आकाशमार्गानें निघून गेला. तूं प्रश्न केल्यावरून हें सर्व इत्थंभूत वर्तमान तुला मीं कळविलें आहे; आणि मी व राम असे उभयतां सुग्रीवाला शरण आलों आहों. ह्या रामानें पूर्वीं ब्राह्मणांना द्रव्यदान करून उत्कृष्ट कीर्ति संपादन केलेली आहे, आणि पूर्वीं हा लोकांचा नाथहि झालेला आहे. तथापि दैवगतीमुळें सुग्रीव आपला नाथ असावा, अशी ह्याला इच्छा झाली आहे. सीता ज्याची स्नुषा होती, त्या शरण जाण्यास योग्य असलेल्या दशरथाचा धर्मवत्सल व इतरांनीं शरण जाण्यास योग्य असा पुत्र राम सुग्रीवाला शरण आला आहे. जो माझा गुरु धर्मात्मा राघव सर्व लोकांनीं शरण जाण्यास पूर्वीं योग्य होता, तो आज सुग्रीवाला शरण आला आहे. ज्याच्या प्रसादामुळें नेहमीं ह्या प्रजा संतुष्ट रहावयाच्या, तो राम आज वानरराजाच्या कृपेची इच्छा करीत आहे. पृथ्वींतील सुवर्णसंपन्न अशा संपूर्ण राजांना ज्या दशरथ राजानें नेहमीं मान दिला, त्याचा त्रैलोक्यविख्यात जेष्ठ पुत्र राम आज वानरराज सुग्रीवाला शरण आला आहे. सारांश, शोकग्रस्त झालेला राम शोकाच्या अगदीं अधीन होऊन जर शरण आला आहे, तर सुग्रीवानें आपल्या सेनापालकांसहवर्तमान त्याच्यावर कृपा करणेंच योग्य आहे. ”

ह्याप्रमाणें अश्रु ढाळीत ढाळीत सुमित्रापुत्र लक्ष्मण हृदयद्रावक भाषण

करीत असतांना तो संभाषणनिपुण हनुमान त्याला म्हणाला, " अशा प्रकारचे बुद्धिमान, जितेंद्रिय, क्रोध जिंकिलेले आणि वानरराजानें भेट घेण्यास योग्य अशांचें दर्शन झालें, ही सुदैवाचीच गोष्ट आहे. तो सुग्रीव भ्रात्या वालीशीं वैर बांधून असल्यामुळें राज्यापासून भ्रष्ट झालेला आहे, व स्त्रीचा अपहार करून भ्रात्यानें त्याला अत्यंत दुःख दिलें असल्यामुळें तो आतां त्रस्त होऊन वनामध्यें वास्तव्य करीत आहे. तस्मात्, तो सूर्यपुत्र सुग्रीव सीतेच्या शोधासंबंधानें आम्हां सहवर्तमान तुमचें साहाय्य करील. "

राम-लक्ष्मणांचें ऋष्यमूक पर्वतीं गमन.

ह्याप्रमाणें मधुर शब्दांनीं लक्ष्मणाशीं चित्तवेधक भाषण केल्यावर हनुमान रामाला म्हणाला, " फार उत्तम आहे, आपण सुग्रीवाकडे जाऊं. " तेव्हां हनुमानाचें हें बोलणें ऐकून लक्ष्मणानें त्या धर्मात्म्याच्या भाषणाला योग्य रीतीनें मान दिला. तो रामाला म्हणाला, " हे रघुवंशजश्रेष्ठा रामा, हा वायुपुत्र वानर आनंदित होऊन सांगत आहे, त्याप्रमाणे त्या सुग्रीवाचेंहि कार्य व्हावयाचें आहे, ह्यामुळें आपलें कार्य झाल्यासारखेंच आहे. ह्याचा चेहरा प्रसन्न दिसत असून हा आनंदानें स्पष्ट भाषण करीत आहे, ह्यावरून हा वायुपुत्र वीर हनुमान अनृत भाषण करणार नाहीं, असा अदमास दिसतो. "

ह्याप्रमाणें रामाला लक्ष्मणानें सांगितलें असतां तो महाबुद्धिवान वायुपुत्र हनुमान त्या रघुवंशज वीरांना बरोबर घेऊन वानरराजाकडे गेला. सारांश, भिक्षुरूपाचा त्याग करून हनुमानानें वानररूप धारण केलें, आणि त्या उभयतां वीरांना आपल्या पाठीवर घेऊन तो श्रेष्ठ कपि सुग्रीवाकडे चालता झाला. तात्पर्य महाकीर्तिमान, कार्यसिद्धि झालेल्या पुरुषाप्रमाणें आनंदित, महापराक्रमी आणि बुद्धीनें चांगला असा तो वायुपुत्र वानरश्रेष्ठ हनुमान राम-लक्ष्मणांसहवर्तमान श्रेष्ठ अशा ऋष्यमूक पर्वतावर चालता झाला.

सर्ग पांचवा.

राम-सुग्रीवांचें अग्निसाक्षिक सख्य.

हनुमंतानें राम-लक्ष्मणांना ऋष्यमूक पर्वतावर ठेवून तेथून तो त्या मलय पर्वतावर गेला. नंतर त्यानें वानरराज सुग्रीवाला त्या वीर रघुवंशज राम-लक्ष्मणांविषयीं हकीकत निवेदन केली. तो म्हणाला, " हे महाबुद्धिमान, हे महापराक्रमी, हा

राम भ्रात्या लक्ष्मणासहवर्तमान येथें आला आहे, व हा सत्यपराक्रमी आहे. इक्ष्वाकुवंशजांच्या कुलामध्यें उत्पन्न झालेल्या ह्या दशरथपुत्र रामाला स्वसत्यपरिपालनरूप धर्माविषयीं पित्याची प्रेरणा झाली आहे; आणि म्हणूनच हा त्या आपल्या पित्याची आज्ञा शेवटास नेण्यास उद्युक्त झाला आहे. राजसूय आणि अश्वमेध ह्या यागांनीं ज्यानें अग्नि संतुष्ट केला, त्याचप्रमाणें शेकडों व हजारों गाई ज्यानें दक्षिणा म्हणून दिल्या, आणि ज्यानें तपाचें व सत्य भाषणाचें अवलंबन करून पृथ्वीचें परिपालन केलें, त्या दशरथाच्या स्त्रीकरितां हा राम अरण्यामध्यें आला आहे. इतकेंच नव्हे, परंतु तो हा महात्मा जितेंद्रिय राम अरण्यामध्यें वास्तव्य करीत असतांना रावणानें ह्याची भार्या हरण करून नेली आहे, ह्यामुळें हा तुला शरण आला आहे. तस्मात्, ज्या अर्थीं ते भ्राते राम लक्ष्मण तुझ्याशीं सख्य करण्याची इच्छा करीत आहेत, त्या अर्थीं तूं ह्यांची भेट घेऊन अत्यंत पूज्य अशा ह्या उभयतांचें पूजन कर. "

हें हनुमाचें भाषण श्रवण केल्यावर वानरराज सुग्रीव केवळ इच्छेच्याच जोरानें अत्यंत दर्शनीय बनून प्रेमानें रामाला म्हणाला, " आपण धर्मसंबंधानें सुशिक्षित असून महातपस्वी व सर्वांवर दया करणारे आहां; आणि वायुपुत्र हनुमानानें मला आपले गुण खऱ्या रीतीनें कथन केले आहेत. तस्मात् मज वानराशीं ज्या अर्थीं आपण मैत्री जोडण्याची इच्छा करीत आहां, त्या अर्थीं माझा हा सत्कार झालेला असून मला मोठा लाभच झालेला आहे. ह्याकरितां माझ्याशीं सख्य होणें जर आपणांस बरें वाटत असेल, तर हा हात पुढें केला आहे. आपल्या हातानें हा माझा हात धरा, आणि एकमेकांचें कार्य शेवटास नेण्याविषयीं कधींहि न फिरणाऱ्या अशा निश्चयाची विचारपूर्वक प्रतिज्ञा होऊं द्या."

हें सुग्रीवाचें उत्कृष्ठ रीतीनें झालेलें भाषण श्रवण करून राम अतिशय आनंदित झाला, आणि त्याचा हात घट्ट धरून आनंदित झालेल्या त्या रामानें प्रेमाचें अवलंबन करून त्याला गाढ आलिंगन दिलें. तदनंतर सुग्रीवाकडे जाते वेळीं पुनरपि धारण केलेल्या भिक्षुरूपाचा त्याग करून, आणि आपलें स्वतःचें रूप धारण करून, शत्रुदमन करणाऱ्या हनुमानानें दोन काष्ठांपासून अग्नि उत्पन्न केला, आणि त्या देदीप्यमान अग्नीचें सत्कारपूर्वक पुष्पांनीं पूजन केल्यावर, मनामध्यें अतिशय स्वस्थ असलेल्या व अत्यंत आनंदित झालेल्या त्या हनुमानानें राम आणि सुग्रीव ह्या दोघांच्या मध्यें त्या अग्नीची स्थापना केली. तदनंतर त्या देदीप्यमान अग्नीला त्या उभयतांनीं प्रदक्षिणा केली, आणि सुग्रीव

व राम ह्यांनीं अशा रीतीनें एकमेकांची मैत्री संपादन केली. ते उभयतां राम व सुग्रीव अत्यंत प्रसन्न झाले, आणि एकमेकांकडे एकसारखे पाहूं लागले; तथापि त्यांची परस्पर दर्शनाविषयीं तृप्ति झाली नाहीं. 'माझ्या अंतःकरणाला प्रिय असा तूं माझा मित्र आहेस, व आपलें उभयतांचें सुखदुःख एकच आहे' असें सुग्रीव आनंदित झाल्यासारखें दर्शवून रामाला म्हणाला. नंतर पक्ष्यांनीं गजबजलेली व अत्यंत प्रफुल्लित अशी एक सालवृक्षाची शाखा तोडून व ती खालीं पसरून तो सुग्रीव रामासहवर्तमान तिच्यावर बसला; आणि अत्यंत हर्षयुक्त झालेल्या वायुपुत्र हनुमानानें फारच प्रफुल्लित झालेली अशी एक चंदन वृक्षाची शाखा लक्ष्मणाला बसण्याकरितां दिली.

सुग्रीवाची रामाला भयनाशार्थ प्रार्थना.

नंतर हर्षानें ज्याचे नेत्र विकसित झालेले आहेत, असा तो अतिशय आनंदित झालेला सुग्रीव मधुर शब्दांनीं रामाशीं चित्तवेधक भाषण करूं लागला कीं, "रामा, भ्रात्यानें माझा अगदीं पराजय केलेला आहे, व मी भयभीत होऊन येथें संचार करीत आहें. इतकेंच नव्हे, परंतु माझ्या भार्येचाहि त्यानें अपहार केला आहे. ह्यामुळें मी त्रस्त होऊन वनामध्यें ह्या दुर्गमस्थानाचा आश्रय करून राहिलों आहें. सारांश, हे रघुवंशजा, त्रस्त व भयभीत झाल्यामुळें चित्तालाहि भ्रम पडलेला असा मी वनामध्यें वास्तव्य करीत आहें. भ्रात्या वालीनें माझा पराजय केलेला आहे, आणि मीं त्याच्याशीं वैर बांधिलेलें आहे. तस्मात्, हे ककुत्स्थकुलोत्पन्ना महाभाग्यवान रामा, भयग्रस्त झालेल्या मला वालीपासून फिरवून भीति न राहील अशा रीतीनें आपण माझ्या भयाचा नाश करा."

वालिवधाची प्रतिज्ञा.

ह्याप्रमाणें सुग्रीवानें सांगितलें असतां धर्मवेत्ता व धर्मवत्सल असा तो ककुत्स्थकुलोत्पन्न तेजस्वी राम सुग्रीवाला हंसत हंसत म्हणाला, "हे महावानरा, उपकाररूप फल प्राप्त करून देणाऱ्याला मी मित्र समजत असतों. तस्मात्, तुझी भार्या हरण करून नेणाऱ्या त्या वालीचा मी वध करीन. सूर्यासारखे तेजस्वी असे हे माझे कधींहि व्यर्थ न जाणारे सांठवून ठेविलेले बाण वेगयुक्त होऊन त्या दुराचरणी वालीवर पडतील. कंक पक्ष्याच्या पिसांनीं आच्छादित, तीक्ष्ण अग्रें आणि सरळ पेरें ह्यांनीं युक्त व इंद्रवज्रतुल्य असलेले हे बाण क्रोधयुक्त भुजंगासारखे दिसत आहेत. ह्यास्तव सर्पतुल्य

तीक्ष्ण बाणांच्या योगानें वध पावून कोसळलेल्या पर्वताप्रमाणें भूमीवर पसर-लेल्या वालीला तूं आज अवलोकन कर."

स्वतःला हितकारक असें तें रघुवंशज रामाचें भाषण श्रवण केल्यावर सुग्रीवानें अतिशय संतुष्ट होऊन आपला मुख्य मनोरथ रामाला निवेदन केला. तो म्हणाला, "हे पुरुषश्रेष्ठा वीरा, तुझ्या कृपेमुळें प्रिया व राज्य हीं मला प्राप्त होतील. ह्यास्तव हे प्रजाधिपते, मला पुनरपि तो दुःख न देईल अशा रीतीनें त्या माझ्या वैरी ज्येष्ठ भ्रात्याची आपण व्यवस्था लावा." असो. ह्याप्रमाणें सुग्रीव व राम ह्यांचें सख्य चाललें असतां सीता, वाली आणि राक्षस ह्यांचें अनुक्रमें कमलासारखे, सुवर्णासारखे व अग्नीसारखे असलेले वामनेत्र एकदम स्फुरण पावूं लागले.

सर्ग सहावा.

सीतेनें टाकिलेले अलंकार रामाला दाखविणें.

पुनरपि सुग्रीव संतुष्ट होऊन रघुनंदन रामाला म्हणाला, "हे रामा, मंत्र्यांमध्यें श्रेष्ठ असा हा माझा सेवक हनुमान, तूं कोणत्या कारणाकरितां निर्जन वनामध्यें आला आहेस, हें मला सांगत आहे. भ्रात्या लक्ष्मणासहवर्तमान तूं वनामध्यें वास्तव्य करीत असतांना जनककन्या मैथिली—तुझी भार्या—राक्षसानें हरण करून नेली. त्या वेळीं तूं व बुद्धिमान लक्ष्मण ह्यांपैकीं कोणीहि समीप नसल्यामुळें राक्षसांचे अधीन झालेली ती रोदन करीत होती. सारांश, संधि पाहात असलेल्या त्या राक्षसानें जटायु गृध्राचा वध केला, आणि भार्यावियोगजन्य दुःख तुला प्राप्त करून दिलें. परंतु हें तुझें भार्यावियोगजन्य दुःख लवकरच नाहींसें होईल, कारण ब्रह्मज्ञानाला साधनीभूत असलेली श्रुति मधुकैटभांनीं हरण करून नेली असतांनाहि जशी विष्णूंनीं परत आणिली, तशी सांप्रत नाहींशीं झालेली ती तुझी भार्या मी आणीन. हे शत्रुदमना, तुझी भार्या रसातलामध्यें असली, किंवा आकाशामध्यें जरी असली, तरी ती मी तुला आणून देईन. हे रघुवंशजा रामा, हें माझें भाषण सत्य आहे, असें तूं समज. हे महापराक्रमी रामा, विषमिश्रित अन्नाप्रमाणें इंद्रासहवर्तमान देवदैत्यांनाहि ती तुझी भार्या जिरणें शक्य नाहीं. ह्यास्तव हे महापराक्रमी रामा, शोकाचा त्याग कर. ती तुझी कांता मी आणून देईन. क्रूरकर्मी

राक्षस घेऊन जात असतांना 'रामा, रामा, लक्ष्मणा,' म्हणून भयंकर आक्रोश करीत असलेली आणि रावणाचे हातामध्यें नागराजाच्या स्त्रीप्रमाणें तडफड करीत असलेली जी माझ्या दृष्टीस पडली, ती निःसंशय मैथिलीच असावी, असें माझें अनुमान आहे. माझ्यासहवर्तमान पांच असामी पर्वतावर बसल्याचें पाहून तिनें आपलें उत्तरीय वस्त्र व शुभ भूषणें टाकून दिलीं. रामा, तीं आम्ही ठेवून घेतलीं आहेत. आतां तीं मीं येथें आणितों. तूं तीं कोणाचीं, तें ओळख."

हें ऐकून त्या प्रिय भाषण करणाऱ्या सुग्रीवाला राम म्हणाला, "मित्रा, तर मग आण लवकर, विलंब कशाकरितां करीत आहेस?" ह्याप्रमाणें त्या ककुत्स्थकुलोत्पन्न रामानें म्हटलें असतां, त्याचें प्रिय करण्याकरितां सुग्रीव सत्वर पर्वताच्या गहन गुहेमध्यें शिरला, आणि उत्तरीय वस्त्र व तीं भूषणें घेऊन, 'हें पहा' म्हणून रामाला त्या वानरानें तीं दाखविलीं. तदनंतर तें उत्तरीय वस्त्र व तीं शुभ भूषणें घेतल्यावर धुक्यानें ज्याप्रमाणें चंद्रमा आच्छादित होतो, त्याप्रमाणें रामाचें मुख अश्रूंनीं आच्छादित होऊन गेलें. सीतेवर असलेल्या प्रेमामुळें गळूं लागलेल्या अश्रूंच्या योगानें दूषित झालेला तो राम 'हे प्रिये' म्हणून धैर्य सोडून रोदन करूं लागला, व पृथ्वीवर पडला! इतकेंच नव्हे, परंतु ते उत्कृष्ट अलंकार वारंवार आपल्या हृदयावर ठेवून क्रोधयुक्त झालेल्या बिळांतील सर्पाप्रमाणें तो एकसारखे सुस्कारे टाकूं लागला. नेत्रांतून एकसारखा अश्रूंचा प्रवाह चालला असतांना बाजूस असलेल्या लक्ष्मणाकडे पाहून तो दीन वाणीनें शोक करूं लागला. तो म्हणाला, "लक्ष्मणा, सीतेला राक्षस घेऊन जात असतांना शरिरापासून भूषणें आणि त्याचप्रमाणें हें उत्तरीय वस्त्र तिनें भूमीवर टाकिलें आहे, हें तूं पहा. राक्षस घेऊन चालला असतांना कोमल तृणानें युक्त असलेल्या भूमीवर तिनें टाकिलेलीं हीं भूषणें जशींच्या तशींच दिसत आहेत."

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां लक्ष्मण म्हणाला, "सीतेचीं बाहुभूषणें मला ठाऊक नाहींत व कुंडलेंहि माहीत नाहींत; परंतु नित्य पादाभिवंदनाचा प्रसंग येत असल्यामुळें तोरड्यांची मात्र मला ओळख पटत आहे." मग राम सुग्रीवाला म्हणाला, "सुग्रीवा, माझी प्राणप्रिया क्रूर रूप धारण करणाऱ्या राक्षसानें हरण करून नेली आहे. तेव्हां कोणत्या प्रदेशावर तो हरण करून नेत असतांना ती तुझ्या दृष्टीस पडली, हें मला सांग. अथवा मला मोठ्या संकटांत पाडणारा तो राक्षस कोठें वास्तव्य करीत आहे, तें तरी कथन कर.

म्हणजे त्याच्याकरितां मी आज सर्व राक्षसांचा नाश करून टाकीन. मैथिलीला हरण करून ज्यानें मला कोपविलें आहे, त्यानें निःसंशय आपल्या जीविताचा अंत होण्याकरितां मृत्यूचें द्वार उघडून ठेविलें आहे. अत्यंत प्रिय अशी ती माझी भार्या ज्या राक्षसानें वनांतून फसवून नेली आहे, तो माझा शत्रु तूं मला सांग, म्हणजे आज मी त्याला यमाचे सन्निध पोहोंचवितों."

सर्ग सातवा.

श्रीरामाचें सांत्वन.

ह्याप्रमाणें आर्त झालेल्या त्या रामानें सुग्रीवाला सांगितलें असतां, अश्रूंनीं कंठ दाटून आलेला तो सुग्रीव हात जोडून अश्रू ढाळीत ढाळीत म्हणाला, "त्या पापी राक्षसाचें वसतिस्थान, सामर्थ्य, पराक्रम किंवा दुष्कुलामध्यें उत्पन्न झालेल्या त्या राक्षसाचें कुल मला मुळींच माहीत नाहीं. परंतु हे शत्रुदमना, सीता तुला प्राप्त होईल अशा रीतीनें मी यत्न करीन, हें मात्र मी खरें खरें प्रतिज्ञेवर सांगतों. तूं वाईट वाटूं देऊं नको. अनुयायीगणांसहवर्तमान रावणाचा वध करून आणि तुझ्या संतोषाला पात्र अशा स्वतःच्या पौरुषाचें अवलंबन करून, तूं ज्या रीतीनें प्रसन्न होशील, त्या रीतीनें मी लवकरच तजवीज करीन. आतां खेद पुरे झाला. धैर्याचें अवलंबन करून स्वतःसंबंधानें कांहीं तरी स्मर. तुझ्यासारख्यांना अशा प्रकारचा हा बुद्धीचा कोतेपणा योग्य नाहीं. भार्याविरहामुळें मलाहि मोठें संकट प्राप्त झालेलें आहे; परंतु मी ह्याप्रमाणें शोक करीत बसत नाहीं, व धैर्यहि सोडीत नाहीं. मी यःकश्चित् वानर असतांनाहि त्या प्रियेबद्दल शोक करीत नाहीं; मग महात्मा, सुशिक्षित, धैर्यवान आणि उदार अशा तुझी गोष्ट पाहिजे कशाला? तस्मात्, आलेले अश्रू धैर्यानें तूं आवरून धर. सत्त्वगुणी लोकांची धैर्यरूप मर्यादा सोडून देणें तुला योग्य नाहीं. इष्टवियोगामुळें संकट आलें असतां, धनाचा नाश झाला असतां अथवा जीविताचा नाश करणारें असें भय प्राप्त झालें असतांहि स्वतःच्या बुद्धीनें विचार करणारा धैर्यवान पुरुष मनामध्यें खचत नाहीं. जो बालिश पुरुष मनामध्यें नेहमीं खेद करीत बसतो, तो ओझ्यानें जर्जर झालेली नौका ज्याप्रमाणें जलामध्यें बुडते, त्याप्रमाणें निरुपाय होऊन शोकामध्यें बुडून जातो. हे मी हात जोडिले आहेत, आणि प्रेमामुळें मी तुझी प्रार्थना

करीत आहें. ह्यास्तव पौरुषाचें अवलंबन करून शोकाला थारा देऊं नको. जे शोकाचें अवलंबन करितात, त्यांना सुख प्राप्त होत नसून त्यांचें तेजहि नाहींसें होत जातें. तस्मात्, शोक करणें तुला योग्य नाहीं. शोकाकुल झालेल्याच्या जीविताविषयीं संशय उत्पन्न होत असतो. तस्मात् हे राजाधिराज, शोकाचा त्याग करून तूं केवळ धैर्याचें अवलंबन कर. मित्रभावामुळें मी तुला हिताची गोष्ट सुचवीत आहें. मी कांहीं उपदेश करीत नाहीं. तेव्हां माझ्या मित्रत्वाला मान देऊन शोक करणें तुला योग्य नाहीं."

ह्याप्रमाणें मधुर शब्दांनीं त्या सुग्रीवानें सांत्वन केलें असतां, अश्रूंनीं भिजून गेलेलें आपलें मुख रामानें वस्त्राच्या टोंकानें पुसून काढिलें, आणि सुग्रीवाच्या सांगण्यावरून मूळ स्वभावाचें अवलंबन करून तो प्रभु ककुत्स्थकुलोत्पन्न राम सुग्रीवाला आलिंगन देऊन म्हणाला, "सुग्रीवा, हितकारक आणि प्रेमयुक्त मित्राचें अनुरूप व योग्य असें जें कांहीं कर्तव्य आहे, तें तूं केलें आहेस. मित्रा, तूं सांत्वन केल्यामुळें मी आतां सावध झालों आहें. खरोखर विशेषेंकरून अशा वेळीं अशा प्रकारचा बंधु दुर्लभ आहे. सीतेच्या आणि दुरात्म्या क्रूर रावणाच्या शोधाविषयीं तूं यत्न कर, आणि मी काय करावें तेंहि तूं निःशंकपणें सांगून टाक. पर्जन्यकालीं चांगल्या जमिनीमध्यें पेरिलेल्या बीजाप्रमाणें तुझें सर्व कांहीं कृत्य सफल होईल. मी अभिमानामुळें जें कांहीं भाषण केलें आहे, तें खरें आहे, असें तूं समज. ह्यापूर्वींहि मीं कधीं अनृत भाषण केलें नाहीं, व पुढेंहि कधीं करणार नाहीं, हें तुला प्रतिज्ञेवर सांगून मी सत्याची शपथ घेतों."

ह्याप्रमाणें रामाचें भाषण श्रवण केल्यानंतर आणि विशेषतः त्याची प्रतिज्ञा श्रवण केल्यानंतर, वानरमंत्र्यांसहवर्तमान सुग्रीवाला मोठा हर्ष झाला. ह्याप्रमाणें एकांतामध्यें परस्परांशीं सख्य केलेले ते उभयतां नरवानर परस्परांना योग्य अशा सुखदुःखांच्या गोष्टी बोलूं लागले; आणि त्या महाप्रभावी राजाधिराज रामाचें भाषण श्रवण केल्यावर तो श्रेष्ठ वानरवीर समंजस सुग्रीव आपलें कार्य झालेंच, असें मनामध्यें समजूं लागला.

सर्ग आठवा.

राम-सुग्रीवसंवाद.

त्या भाषणानें सुग्रीव संतुष्ट व हर्षयुक्त झाला, आणि लक्ष्मणाच्या त्या शूर ज्येष्ठ भ्रात्याला म्हणाला, " ज्या अर्थी तुझ्यासारखा गुणी मित्र मला प्राप्त झाला आहे, त्या अर्थी देवतांची सर्वस्वी मजवर कृपा आहे, ह्याबद्दल मुळींच शंका नाहीं. हे निष्पापा रामा, तुझ्यासारखा साहाय्यकर्ता असला म्हणजे देव-राज्यहि प्राप्त होणें शक्य आहे, मग स्वराज्याची ती कथा काय? अग्नीसमक्ष राघववंशज मित्र ज्याला प्राप्त झाला, तो मी बंधूंच्या व मित्रांच्या मानाला पात्र आहें. मी तुला योग्य असाच मित्र आहें, हें हळू हळू तुला समजून येईल. आपल्या गुणांचा उच्चार तुझ्यापाशीं करण्यास मी समर्थ नाहीं. हे स्वावलंबी पुरुषश्रेष्ठा, तुझ्यासारख्या मनोनिग्रहि महात्म्यांची प्रीति व धैर्य अधिकच निश्चल होत असतात. असो. मित्रासंबंधानें रुपें, सोनें अथवा शुभ भूषणें ह्यांविषयीं आपपरभाव मित्र मनामध्यें आणीत नाहींत. मित्र संपन्न असो, दरिद्री असो, दुःखी असो, निर्दोष असो, अथवा सदोष असो, तोच मुख्य आश्रय आहे. हे निष्पापा, तशा प्रकारचें प्रेम दृष्टोत्पत्तीस आलें, म्हणजे धनाचा, सुखाचा व देशाचाहि त्याग मित्राकरितां होत असतो."

तदनंतर कांतीनें युक्त असलेला तो राम इंद्रतुल्य विचारी लक्ष्मणासमोर प्रियदर्शन सुग्रीवाला 'ठीक आहे' असें म्हणाला. तेव्हां राम व महाबलाढ्य लक्ष्मण उभे राहिलेले पाहून सुग्रीवानें आपली चंचल दृष्टि वनामध्यें सर्व ठिकाणीं फिरविली असतां, प्रफुल्लित, थोडक्याशा पानांनीं युक्त आणि भ्रमरांनीं सुशोभित असा एक तालवृक्ष जवळच त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां पानांनीं भरलेली व सुशोभित अशी एक त्या वृक्षाची फांदी तोडून रामाकरितां त्यानें खालीं पसरली, आणि रामासहवर्तमान तो सुग्रीव त्या फांदीवर बसला. तदनंतर त्या उभयतांना बसलेले पाहून हनुमानानेंहि दुसरी एक वृक्षाची फांदी मोडिली, आणि विनयसंपन्न लक्ष्मणाला त्यानें तिच्यावर बसविलें. नंतर तालपुष्पांनीं आच्छादित झालेल्या त्या श्रेष्ठ पर्वतावर राम प्रसन्न सागराप्रमाणें सुखानें बसला आहे, असें पाहून त्या कपिश्रेष्ठ सुग्रीवाला हर्ष झाला; आणि आनंदाच्या भरामुळें जिव्हेंतील अक्षरांचा उच्चार अस्पष्टपणें होत आहे, अशा सौम्य व शुभ वाणीनें तो सुग्रीव स्नेहामुळें रामाला म्हणाला, " भ्रात्यानें पराजित केलेला, आणि भार्येचा अपहार झाल्यामुळें अत्यंत

दुःखित झालेला मी भयग्रस्त होऊन ऋष्यमूक पर्वतावर संचार करीत आहें. राघवा, भ्रात्या वालीनें वैर धरून मला दुःख दिलें असल्यामुळें मी त्रस्त झालों असून भयामध्यें मग्न झालों आहें, आणि चित्तक्षोभ होऊन वनामध्यें फिरत आहें. तस्मात्, हे सर्व लोकांना अभय देणाऱ्या रामा, वालीमुळें भयभीत झालेल्या मज अनाथावर तूं कृपा कर."

ह्याप्रमाणें सुग्रीवानें सांगितलें असतां तेजस्वी, धर्मवेत्ता आणि धर्मवत्सल असा तो ककुत्स्थकुलोत्पन्न राम हंसत हंसत सुग्रीवाला म्हणाला, "उपकार हें मित्रापासून प्राप्त होणारें फल असून अपकार हें शत्रूचें चिन्ह आहे. ह्यास्तव तुझी भार्या हरण करणाऱ्या त्या वालीचा मी आजच वध करीन. हे महाभाग्यवान सुग्रीवा, पिसें व तीक्ष्ण तेज ह्यांनीं युक्त असलेले हे माझे सुवर्णभूषित बाण कार्तिकेयाच्या वनामध्यें उत्पन्न झालेले आहेत. कंक पक्ष्याच्या पिसांनीं हे आच्छादित झालेले आहेत. ह्यांचीं अग्रें फारच तीक्ष्ण आहेत, आणि महेंद्राच्या वज्राप्रमाणें असलेले हे बाण क्रुद्ध झालेल्या भुजंगासारखे शत्रुनाशक आहेत. तात्पर्य, तुझा अपराध केलेला जो वाली नांवाचा तुझा भ्रातृरूप शत्रु, तो बाणाच्या योगानें वध पावून पर्वताप्रमाणें भूमीवर पसरलेला तूं अवलोकन कर."

हें रामाचें भाषण श्रवण केल्यावर त्या वानरसेनाधिपति सुग्रीवाला अनुपम हर्ष झाला व तो म्हणाला, "शाबास, शाबास. रामा, मी शोकग्रस्त झालों आहें, व शोकग्रस्तांचा तूं आश्रय आहेस. ह्यास्तव मित्र असें समजून मी तुझ्यापाशीं आपलें दुःख निवेदन करीत आहें. हातावर हात देऊन अग्नीचे समक्ष मी तुला मित्र केला आहे, व प्राणापेक्षांहि तूं मला अधिक संमत आहेस, हें मी शपथेवर खरें सांगतों. जें अंतर्गत दुःख माझ्या मनाला नेहमीं क्षुब्ध करीत आहे, तें मित्र असें समजून मी निःशंकपणें तुला सांगतों."

हें बोलत असतां सुग्रीवाचा कंठ दाटून आल्यामुळें त्याच्या तोंडांतून अक्षरहि निघेना. तथापि नदीच्या वेगाप्रमाणें एकाएकीं उसळलेला तो अश्रूंचा वेग सुग्रीवानें धैर्यानें आवरून धरिला, आणि तो वेग आवरून धरून व शुभ नेत्रांतील अश्रू पुसून आणि दीर्घ श्वास टाकून तो तेजस्वी सुग्रीव पुनरपि रामाला म्हणाला, "रामा, पूर्वीं वालीनें स्वराज्यापासून मला भ्रष्ट केलें, आणि कठोर शब्द ऐकवून त्या बलाढ्यानें माझी निर्भर्त्सना केली. प्राणांहूनहि प्रिय अशी माझी भार्या त्यानें हरण करून नेली, आणि जे माझे मित्र होते, तेहि त्यानें कारागृहामध्यें अडकवून ठेविलें. राघवा, माझ्या नाशाकरितां त्या दुरात्म्याचे प्रयत्न चाललेलेच अस-

तात, व माझ्या वधाकरितां त्यानें पाठविलेले पुष्कळ वानर मीं आजपर्यंत मारिलेलेहि आहेत. तेव्हां रामा, तुलाहि अवलोकन करून माझ्या वधाकरितां त्यानें पाठविलेल्यांपैकींच तूं आहेस कीं काय, अशी शंका येत असल्यामुळें मी भीतिग्रस्त होऊन तुझ्या समीप येत नाहीं. कारण कांहीं भय प्राप्त झालें असतां कोणीहि झाले तरी भीतच असतात. हनुमान ज्यांतील प्रमुख आहे, असे हेच काय ते माझे केवळ मित्र आहेत; आणि मी संकटांत सांपडलों असतांनाहि ह्यांच्या-मुळें आज प्राण धारण करून राहिलों आहें. हे वानर माझ्यावर प्रेम करणारे असून सर्व बाजूंनीं माझें रक्षण करीत असतात. मला कोठें जावयाचें असल्यास सर्वहि माझ्या बरोबर येतात, आणि मी बसलों असतांनाहि ते नेहमीं उभे असतात. रामा, ही मीं संक्षेपानें आपली हकीकत तुला सांगितली आहे. कारण सविस्तर सांगून तुला तरी काय उपयोग होणार आहे ? तो ज्येष्ठ भ्राता वाली माझा शत्रु असून त्याचा पराक्रम विख्यात आहे. तस्मात्, त्याचा नाश झाल्यानंतरच माझ्या दुःखाचें परिमार्जन होणारें असून माझें सुख व जीवित हींहि त्याच्याच नाशावर अवलंबून आहेत. रामा, हा माझें दुःख नाहींसें होण्याचा उपाय मीं शोकग्रस्तानें तुला निवेदन केला आहे. कारण दुःखी अथवा सुखी असला, तरी मित्रच नेहमीं मित्राचा आधार आहे. "

हें भाषण श्रवण करून राम सुग्रीवाला म्हणाला, "तुमचें वैर कशामुळें पडलें, हें खरें खरें श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. हे वानरा, तुझ्या वैराचें कारण श्रवण करून व बलाबलांचा विचार करून नंतर मी तुझ्या सुखाची तजवीज करीन. तुझा अवमान झाल्याचें ऐकून हृदयाला कंपित कर-णारा माझा प्रबल क्रोध पर्जन्यकालच्या जलवेगाप्रमाणें वृद्धिंगत होत आहे. तस्मात्, तूं हर्षयुक्त होऊन व माझ्यावर विश्वास टाकून तो वाली कोठें आहे, हें मला सांग. म्हणजे लगेच धनुष्याला प्रत्यंचा चढवून व बाण सोडून मीं तुझ्या शत्रूचा वध केलाच, असें तूं समज. "

ह्याप्रमाणें महात्म्या कुकुत्स्थकुलोत्पन्न रामानें सुग्रीवाला सांगितलें असतां चारी वानरांसहवर्तमान त्या सुग्रीवाला अनुपम हर्ष झाला. नंतर प्रसन्न मुखानें युक्त झालेला तो सुग्रीव रामाला खरें खरें वैराचें कारण सांगूं लागला.

सर्ग नववा.

सुग्रीवाचें वृत्त.

सुग्रीव म्हणाला.—" हे कुकुत्स्थकुलोत्पन्ना रामचंद्रा, वाली म्हणून माझा ज्येष्ठ भ्राता आहे तो शत्रूचें निर्दलन करणारा असून पित्याला नेहमीं संमत असे, व मीहि त्याचप्रमाणें पूर्वीं त्याला मोठा मान देत असें. पुढें तो पिता निवर्तल्यावर हा ज्येष्ठ पुत्र आहे, असें समजून वानरांचा राजा म्हणून लोकांना अतिशय संमत असलेल्या त्या वालीला मंत्र्यांनीं राज्यावर बसविलें. वाडवडिलांपासून चालत आलेलें प्रचंड राज्य तो चालवीत असतांना मी नेहमीं दासाप्रमाणें त्याचेपाशीं नम्र होऊन उभा राहात असें. दुंदुभीचा मायावी म्हणून एक तेजस्वी ज्येष्ठ पुत्र होता. त्याच्याशीं त्या वालीचें पूर्वीं स्त्रीकरितां मोठें वैर पडलें होतें. एके समयीं रात्रीं लोक निद्रिस्थ झाल्यावर तो किष्किंधेच्या वेशीपाशीं आला, व फारच क्षुब्ध होऊन गर्जना करूं लागला. तेव्हां संग्रामामध्यें वालीला त्यानें आव्हान केलें. त्याची ती भयंकर गर्जना निद्रिस्थ असलेल्या असलेल्या त्या माझ्या भ्रात्यानें ऐकिल्यावर ती त्याला सहन झाली नाहीं. ह्यामुळें तो वेगावेगानें तेथून निघाला. त्या श्रेष्ठ असुराचा वध करण्याकरितां रागानें तो वाली बाहेर पडूं लागला असतां सर्व स्त्रिया व मी नम्रपणानें त्याचें निवारण करूं लागलों; परंतु माझ्यासहवर्तमान त्या सर्व स्त्रियांना झिडकारून देऊन तो महाबलाढ्य वाली चालता झाला. तेव्हां मीहि बंधुप्रेमामुळें वालीबरोबर निघालों असतां तो मायावी असुर, माझा भ्राता व मी दूर उभे असल्याचें अवलोकन करून भयभीत झाला, आणि अतिशयच पळत सुटला. तो त्रस्त होऊन धावूं लागला असतां आम्हीहि त्यापेक्षां त्वरेनें त्याच्या अंगावर धावून गेलों, व इतक्यांत उदय पावणाऱ्या चंद्रानें मार्गहि प्रकाशित केला. तेव्हां त्याच्या पाठोपाठ धावून जाऊन आम्ही उभे राहिलों असतां तो दैत्य वेगावेगानें तृणांनीं आच्छादित व प्रवेश करण्यास कठीण अशा एका मोठ्या भूविवरामध्यें प्रविष्ट झाला. तें पाहून वाली अंतःकरणामध्यें क्षुब्ध होऊन क्रोधाचे अधीन झाला, आणि मला म्हणाला, " सुग्रीवा, ह्या ठिकाणीं बिळाच्या द्वाराशीं तूं आज सावधपणानें उभा रहा, म्हणजे मी इतक्यांत आंत प्रवेश करून संग्रामामध्यें त्या शत्रूचा वध करितों. "

सुग्रीव सांगतोः—“ रामा, हें भाषण श्रवण केल्यावर मला बरोबर नेण्याविषयीं मी त्या शत्रुतापन वालीची प्रार्थना केली. तथापि आपल्या पायांची मला शपथ घालून तो एकटाच बिळामध्यें प्रविष्ट झाला. तो बिळांत शिरून एक संपूर्ण संवत्सर लोटलें, तरी तो काल लोटेपर्यंत मी त्या बिळाच्या द्वाराशींच उभा राहिलों होतों. तेव्हां तो नाहींसा झाला, असें जाणून प्रेमामुळें मला भय उत्पन्न झालें; आणि भ्राता दृष्टीस पडत नसल्यामुळें माझ्या मनामध्यें त्याच्या मृत्यूविषयीं वाईट शंका येऊं लागली. ह्या गोष्टीलाहि बरेच दिवस लोटल्यावर त्या बिळांतून फेंसासहवर्तमान रक्त बाहेर आलें, व तें अवलोकन करितांक्षणीं तर मला अतिशय दुःख झालें. गर्जना करणाऱ्या असुरांचा शब्द माझ्या कानांवर आला. परंतु संग्रामाविषयीं तत्पर असलेला तो माझा पूज्य ज्येष्ठ भ्राता आक्रोश करीत असतांनाहि त्याचा शब्द माझ्या कानावर आला नाहीं. तेव्हां भ्रात्याचा वध झाला, असा त्या चिन्हांवरून मीं तर्क केला, व एका पर्वतप्राय शिलेनें त्या बिळाचें द्वार झांकून टाकिलें. नंतर शोकाकुल होऊन भ्रात्याचें उत्तरकार्य केलें, आणि किष्किंधा नगरीला परत आलों. तेव्हां खरी गोष्ट जरी मी लपवून ठेवीत होतों, तरी प्रयत्नांमुळें मंत्र्यांनीं ती समजून घेतलीच. नंतर ते एकत्र जुळून माझ्यापाशीं आले, आणि मला त्यांनीं राज्याभिषेक केला. असो. राघवा, मी त्याचें राज्य न्यायानें चालवूं लागलों असतां तो वानर असुररूप शत्रूचा वध करून परत आला, आणि मला राज्याभिषेक झाल्याचें अवलोकन करितांक्षणीं क्रोधानें डोळे लाल करून आणि माझ्या मंत्र्यांनाहि बांधून टाकून त्यांच्याशीं कठोर भाषण करूं लागला; परंतु मी त्याचा निग्रह करण्यास समर्थ असूनहि भ्रात्याबद्दल वाटत असलेल्या मोठेपणानें जखडून गेलेलें माझें मन त्या पाप्याचा निग्रह करण्यास प्रवृत्त झालें नाहीं. असो. शत्रूचा वध करून तो माझा भ्राता किष्किंधा नगरीमध्यें प्रविष्ट झाल्यावर त्या महात्म्याला मान देऊन मीं रीतीप्रमाणें त्याला अभिवंदन केलें. परंतु त्यानें मनामध्यें संतुष्ट होऊन मला आशीर्वाद दिले नाहींत. तेव्हां नम्र होऊन मी आपल्या मुकुटानें त्याच्या पायांना स्पर्शहि केला. तथापि क्रोधामुळें वालीनें मजवर कृपा केली नाहीं. ”

सर्ग दहावा.

सुग्रीवाचें वृत्त. (पुढें चालू)

सुग्रीव म्हणाला:–" हे रघुवंशजश्रेष्ठा, नंतर क्रोधानें व्याप्त होऊन व क्षुब्ध होऊन आलेल्या त्या भ्रात्याची स्वहितबुद्धीनें मी विनवणी करूं लागलों कीं, ' हे आनंदायक प्रभो, शत्रूचा वध करून तूं कुशल परत आलास, ही फारच आनंदाची गोष्ट आहे; आणि मज अनाथाचा तूंच एक नाथ आहेस. उदय पावलेल्या पूर्णचंद्राप्रमाणें आल्हादकारक व अनेक शलाकांनीं युक्त असें हें तुझें छत्र जें मीं मोर्चेलांसहवर्तमान धारण केलें होतें, तें तूं परत घे. राजा, त्या बिळाच्या द्वाराशीं मी आर्त होऊन तुझी मार्गप्रतीक्षा करीत करीत एक संवत्सरपर्यंत उभा राहिलों; आणि बिळांतून बाहेर आलेलें रक्तहि जेव्हां मीं अवलोकन केलें, तेव्हां माझें हृदय शोकानें उद्विग्न होऊन चित्त व्याकुल झाले असतां, पर्वतशिखराच्या योगानें तें बिळद्वार झांकून टाकून मी त्या प्रदेशांतून निघालों, आणि पुनरपि किष्किंधा नगरीमध्यें दु:खानें प्रविष्ट झालों. तेव्हां मला अवलोकन करून, तूं निवृत्त झालास ह्या समजुतीवर नगरवासी जनांनीं व मंत्र्यांनीं निरुपाय होऊन मला अभिषेक केला; मला राज्याची इच्छा झाल्यामुळें त्यांनीं तो केलेला नाहीं, ह्यास्तव तूं मला क्षमा कर. सन्मानास पात्र असा राजा तूंच आहेस, व मी पूर्वींप्रमाणेंच सर्वदा तुझा दास आहें. अमात्य आणि नगरवासी जन ह्यांसहवर्तमान उपद्रवरहित असलेलें सर्व नगर तसेंच कायम रहावें, ह्याकरितां मंत्र्यांनीं तुझा वियोग झाल्यामुळें राज्याचे ठिकाणीं ही माझी योजना केली होती. तस्मात् ठेव ह्या नात्यानें असलेलें हें तुझें राज्य मी आज तुझ्या स्वाधीन करीत आहें. हे दयाशील शत्रुनाशका, मजवर क्रुद्ध होऊं नको. राजा मस्तक नम्र करून मी तुझी प्रार्थना करीत आहें, व तुझ्यापुढें हे मीं हात जोडिले आहेत. मंत्री आणि नगरवासी जन ह्यांनीं एकत्र जुळून, राजरहित झालेला प्रदेश जिंकण्याची इतरांना इच्छा होऊं नये, एतदर्थ बलात्कारानें माझी ह्या राज्यावर योजना केलेली आहे.'

सुग्रीव पुढें सांगतो:–"रामा, ह्याप्रमाणें मी सप्रेम भाषण करीत असतांनाहि त्या वानरानें माझी निर्भर्त्सना केली, आणि 'तुला धिक्कार असो' असें मला म्हणून आणखीहि पुष्कळच तो मला बोलला. इतकेंच नव्हे, परंतु आपली प्रजा व आपणाला संमत असलेले मंत्री बोलावून आणून मित्रमंडळींमध्यें फारच

निंच. असें भाषण त्यानें माझ्याशीं केलें. तो म्हणाला, 'महामायावी दैत्य क्रुद्ध होऊन रात्रीं युद्धाच्या इच्छेनें मला पूर्वी आह्वान करीत असे, हें तुम्हांला विदितच आहे.' त्याचें तें भाषण श्रवण करून मी राजवाड्यांतून बाहेर पडलों असतां हा अतिक्रूर भ्राताहि सत्वर माझ्या मागोमाग आला; परंतु भ्रात्याला बरोबर घेऊन मी आलों आहें, असें अवलोकन करितांक्षणीं तो महाबलाढ्य असुर रात्रींच भयभीत होऊन पळून गेला, आणि पाठोपाठ आम्ही आलेले पाहिल्यावर वेगावेगानें धाव मारून तो एका मोठ्या बिळामध्यें शिरला. तेव्हां फारच प्रचंड व अतिभयंकर अशा बिळामध्यें तो प्रविष्ट झाला असें समजून आल्यावर दिसण्यांतहि क्रूर असलेल्या ह्या भ्रात्याला मी म्हणालों, 'शत्रूचा वध केल्यावांचून नगरीला परत जाणें, मला शक्यच नाहीं. ह्यास्तव मी त्याचा वध करीपर्यंत तूं ह्या बिळाच्या द्वाराशीं माझी प्रतीक्षा करीत रहा.' ह्यानंतर हा तेथें उभा आहे, असें समजून मी त्या दुर्गम बिळामध्यें प्रविष्ठ झालों असतां त्या दैत्याला हुडकितां हुडकितां माझें एक वर्ष तेथें गेलें. शेवटीं एक वर्षपर्यंत कंटाळा न आणितां शोध चालला असतांनाहि दृष्टोत्पत्तीस न आल्यामुळें भयावह झालेला तो शत्रु माझ्या दृष्टीस पडला. तेव्हां मी तत्क्षणींच त्याच्या सर्व बांधवांसहवर्तमान त्याचा वध केला. तेव्हां पाताळामध्यें तो राक्षस गर्जना करूं लागला असतांना त्याच्या शरिरापासून निघालेल्या रक्ताच्या प्रवाहानें ते दुर्गम बिळ भरून गेलें. असो. त्या पराक्रमी शत्रूचा अनायासें वध केल्यावर पाहतो तों मला बाहेर पडण्याचा मार्ग दिसेनासा झाला. कारण तें बिळाचें द्वार झांकून टाकिलेलें होतें. तदनंतर 'सुग्रीवा' म्हणून मी वारंवार आरोळ्या मारूं लागलों असतांहि जेव्हां प्रत्युत्तर येईना, तेव्हां तर मला अतिशयच दुःख झालें. पुष्कळ लाथा मारून मीं तें आच्छादन खालीं पाडिलें, आणि त्या मार्गानें बाहेर पडून मी आपल्या नगराला आलों. सारांश आपणाला राज्य मिळावें ह्या इच्छेनें ह्या दुष्ट सुग्रीवानें भ्रातृप्रेम विसरून जाऊन मला त्या बिळामध्यें अडकवून ठेविलें."

सुग्रीव सांगतोः—"रामा, असें त्या मित्रमंडळींमध्यें मला बोलून मनामध्यें कांहींएक न आणितां त्या वालीनें एका वस्त्रानिशीं मला हांकून लाविलें. सारांश, राघवा, त्यानें मला हांकून लाविलें असून माझ्या भार्येचा अपहार केला असल्यामुळें त्याच्या भीतीनें वनें व पर्वत ह्यांसहवर्तमान ह्या पृथ्वीचें मीं पर्यटण केलें; आणि भार्येचा अपहार झाल्यामुळें दुःखित असलेला मीं शेवटीं

कांहीं कारणामुळें वालीचा प्रवेश होण्यास अशक्य झालेल्या ह्या ऋष्यमूक नामक श्रेष्ठ पर्वतावर आलों. असो. वैर पडण्याचें हें मुख्य कारण मीं तुला सर्व निवेदन केलें आहे. सर्व लोकांचें भय दूर करणाऱ्या राघवा, मी निरपराधी असतांनाहि त्या वालीच्या भीतीमुळें मला कसें संकट प्राप्त झालें आहे, तें तूं अवलोकन कर, आणि त्याचा निग्रह करून तूं मजवर कृपा कर."

ह्याप्रमाणें सुग्रीवानें रामाला सांगितलें असतां तो तेजस्वी धर्मवेत्ता राम सुग्रीवाशीं हंसत हंसत धर्माला अनुसरून असलेलें भाषण करूं लागला. तो म्हणाला, "सूर्यासारखे तेजस्वी, तीक्ष्ण व क्रोधयुक्त असे हे माझे कधींहि व्यर्थ न जाणारे बाण त्या दुराचारी वालीवर जाऊन पडतील. तुझ्या भार्येचा अपहार करणारा तो पापी व दुर्वर्तनी वाली माझ्या दृष्टीस पडला नाहीं, तोंपर्यंतच जिवंत राहील. स्वतःच्या स्थितीवरून पाहातां तूं शोकसागरामध्यें मग्न झाला आहेस, असें माझें अनुमान होतें. तस्मात् मी तुला ह्या शोकसागरापासून तारीन, व भार्या व विपुल राज्य हींहि तुला प्राप्त होतील."

ह्याप्रमाणें हर्ष व पौरुष वृद्धिंगत करणारें तें ककुत्स्थकुलोत्पन्न रामाचें भाषण श्रवण करून सुग्रीवानें त्या भाषणाची वाखाणणी करून रामाची प्रशंसा केली, आणि तो रामाशीं फारच मोठें भाषण करूं लागला.

सर्ग अकरावा.

वालीच्या हातून दुंदुभीचा वध.

सुग्रीव म्हणाला:—"हे रघुवंशजश्रेष्ठा, तूं क्रुद्ध झाल्यास मर्मभेदक, तीक्ष्ण व प्रज्वलित अशा बाणांच्या योगानें प्रलयकालच्या सूर्याप्रमाणें निःसंशय त्रैलोक्य दग्ध करून टाकशील. तथापि वालीचें पौरुष, वीर्य आणि धैर्य हें सर्व एकाग्र अंतःकरण करून तूं ऐकून घे, आणि नंतर तुला काय कर्तव्य असेल तें कर. ब्राह्ममुहूर्तावर उठून सूर्योदय होण्याचे पूर्वींच वाली यत्किंचित्हि श्रम न होतां पश्चिम समुद्रापासून पूर्व समुद्रापर्यंत आणि दक्षिण समुद्रापासून उत्तर समुद्रापर्यंत प्रत्यही फेरी करीत असतो. पर्वतांच्या माथ्यावर आरोहण करून तो वीर्यवान वाली वेगानें उंच उड्डाण करीत असतो, आणि चेंडूप्रमाणें पर्वतांचीं मोठमोठीं शिखरें हातांत घेत असतो. आपलें सामर्थ्य

गजविण्याकरितां त्या वालीनें वनामध्यें नानाप्रकारचे पुष्कळच बळकट वृक्ष जोरानें मोडून टाकिले आहेत. कैलास पर्वताच्या शिखरासारख्या प्रभेनें युक्त आणि महिषरूप धारण केलेला असा एक दुंदुभी म्हणून दैत्य होता, व त्या वीर्यवान दैत्याला सहस्र गजांचें बल होतें. वरप्रदानामुळें मोहित होऊन वीर्याच्या गर्वानें दुरात्मा बनलेला तो धिप्पाड राक्षस नदीपति समुद्राकडे गेला, आणि लाटांनीं युक्त असलेल्या त्या रत्नाकर सागराची मर्यादा न राखितां ' माझ्याशीं युद्ध कर ' म्हणून तो त्या महासागराला म्हणाला. तेव्हां महाबलाढ्य धर्मात्मा समुद्र उठला, आणि काळाची प्रेरणा झालेल्या त्या असुराला म्हणाला, " हे युद्धनिपुण, मी तुझ्याशीं युद्ध करण्यास समर्थ नाहीं. तुझ्याशीं युद्ध कोण करील, तें मी तुला सांगतों, श्रवण कर. महारण्यामध्यें तपस्वी जनांचें मुख्य आश्रयस्थान आणि शंकराचा श्वशुर असा एक हिमवान ह्या नांवानें विख्यात असलेला पर्वतराज आहे. मोठमोठ्या जलप्रवाहांनीं, अनेक गुहांनीं व झऱ्यांनीं युक्त असलेला तो पर्वतराज तुझ्याशीं युद्ध करण्यास समर्थ असून युद्धाच्या योगानें तुझा अनुपम मनोरथ परिपूर्ण करील. "

ह्याप्रमाणें समुद्रानें सांगितलें असतां तो भ्याला आहे, असें समजून धनुष्यापासून सुटलेल्या बाणाप्रमाणें तो असुरश्रेष्ठ दुंदुभी वेगावेगानें हिमालय पर्वतसंबंधीं वनामध्यें गेला. नंतर त्या पर्वतावरील मोठमोठ्या गजांसारख्या श्वेतवर्ण शिला भूमीवर नानाप्रकारांनीं फेंकून देऊन तो दुंदुभी गर्जना करूं लागला. तेव्हां श्वेतवर्ण मेघासारख्या आकारानें युक्त, आनंददायक मुद्रा धारण केलेला व दिसण्यांतहि सौम्य असलेला हिमवान पर्वत स्वतःच्याच शिखरावर उभा राहून त्याला म्हणाला, ' हे धर्मवत्सल दुंदुभे, तूं मला क्लेश देऊं नको. तपस्विजनांना आश्रयभूत असलेला मी रणकर्मामध्यें प्रवीण नाहीं. '

हें त्या विचारी पर्वतराजाचें भाषण श्रवण केल्यावर क्रोधानें डोळे लाल झालेला दुंदुभी त्याला म्हणाला, ' तूं जर युद्ध करण्यास असमर्थ असशील, किंवा माझ्या भीतीमुळें निश्चेष्ट झाला असशील, तर मज युद्धेच्छूशीं युद्ध करणारा कोण, तो मला सांग. '

हें भाषण श्रवण केल्यावर त्या वेळेपर्यंत युद्ध करणारा असा ज्याला कोणीं सांगितलाच नव्हता, त्या असुरश्रेष्ठाला रागारागानें तो धर्मात्मा हिमवान म्हणाला, " हे महाबुद्धिमान दुंदुभे, वाली म्हणून एक प्रतापी व वैभवशाली इंद्रपुत्र वानर अतुलप्रभेनें युक्त असलेल्या किष्किंधा नगरीमध्यें वास्तव्य करीत

आहे. तो महाबुद्धिमान वाली युद्धामध्यें निपुण असून नमुचीशीं युद्ध करण्यास समर्थ असलेल्या देवराज इंद्राप्रमाणें तुझ्याशीं द्वंद्वयुद्ध करण्यास समर्थ आहे. तस्मात्, ह्या भूतलावर जर तुला युद्ध करण्याची इच्छा असेल, तर तूं सत्वर तिकडे जा. तो नेहमींच क्रुद्ध असून संग्रामकर्मामध्यें शूर आहे."

हें हिमवान पर्वताचें भाषण श्रवण केल्यावर दुंदुभी क्रुद्ध झाला, आणि वालीच्या किष्किंधा नगरीमध्यें गेला. जातांना त्यानें महिषाचा वेष धारण केला असल्यामुळें तो तीक्ष्ण शृंगांनीं युक्त होऊन भयावह झाला होता, आणि पर्जन्यकालीं आकाशामध्यें असलेल्या जलपूर्ण महामेघाप्रमाणें दिसत होता. असो.

नंतर तो महाबलाढ्य दुंदुभी किष्किंधा नगरीच्या द्वारापाशीं आला, आणि भूमि कंपित करीत करीत दुंदुभीप्रमाणें गर्जना करूं लागला. इतकेंच नव्हे, परंतु समीप असलेले वृक्ष मोडूं लागला, खुरांनीं पृथ्वी विदीर्ण करूं लागला, आणि गर्वामुळें शृंगांच्या योगानें तें द्वार हत्तीप्रमाणें उखळून टाकूं लागला. तेव्हां तो शब्द ऐकिल्यावर अंतःपुरामध्यें असलेला वाली क्रुद्ध झाला, आणि तारांनीं युक्त असलेल्या चंद्राप्रमाणें स्त्रियांसहवर्तमान बाहेर पडला. नंतर वनामध्यें संचार करणाऱ्या सर्व वानरांचा अधिपति तो वाली, ज्यांतील अक्षरांचा व शब्दांचा उच्चार स्पष्ट आहे, असें मितभाषण दुंदुभीशीं करूं लागला. तो म्हणाला, 'दुंदुभे, हें नगराचें द्वार अडवून धरून तूं कशाकरितां गर्जना करीत आहेस? हे महाबलाढ्य दुंदुभे, तूं मला विदित आहेस. आपल्या प्राणांचें संरक्षण कर.'

हें त्या विचारी वानरराजाचें भाषण श्रवण करून, क्रोधानें नेत्र आरक्तवर्ण झालेला दुंदुभी त्याला म्हणाला, "हे वीरा, स्त्रियांचे संनिध असें भाषण करणें तुला योग्य नाहीं. आज तूं माझ्याशीं युद्ध कर, म्हणजे तुझें काय सामर्थ्य आहे, तें आढळून येईल. अथवा ही रात्र संपेपर्यंत मी आपला क्रोध आवरून धरीन. हे वानरा, सूर्योदयापर्यंत तुला काय विषयांचा उपभोग घेणें असेल तो खुशाल घे, दान दे, मित्रांचाहि निरोप घे, आणि वानरांना भेट. कारण सर्व वानरांचा तूं राजा आहेस. किष्किंधा नगरी एकदा चांगली पाहून घे. त्या राजधानीमध्यें कोणी आपल्यासारखा राजा नेमून टाक, आणि स्त्रियांसहवर्तमान क्रीडा करून घे. सूर्योदय झाला म्हणजे मी तुझा दर्प नाहींसा करीन. कारण मत्त, बेसावध, भग्न, आयुधादिकांनीं शून्य, कृश अथवा तुझ्यासारख्या मदमोहित पुरुषाचा जो वध करितो, त्याला ह्या जगतामध्यें भ्रूणहत्येचें पातक लागतें."

ह्यानंतर त्या सर्व ताराप्रभृति स्त्रिया सोडून देऊन, व किंचित् हास्य करून वाली रागारागानें त्या असुराधिपतीला म्हणाला, "युद्धाविषयीं जर तुला भय नसेल, तर हा मत्त झाला आहे असें तूं समजूं नको. हा मद जरी स्त्रीसान्निध्या-मुळें आलेला आहे, तरी तुझ्याशीं होणाऱ्या ह्या युद्धामध्यें मन उत्साहयुक्त होण्याकरितां केलेल्या वीरपानाचा हा परिणाम आहे, असें तूं समज."

ह्याप्रमाणें त्या असुराला बोलून, अत्यंत क्रुद्ध झालेला तो वाली पित्या इंद्रानें दिलेली सुवर्णमाला गळ्यांत घालून युद्धाकरितां उभा राहिला; आणि महिषरूप धारण करणाऱ्या त्या पर्वतप्राय दुंदुभीचीं शिंगें धरून, गर्जना करीत करीत त्या वानरराजानें त्याला फेंकून दिलें. सारांश, वालीनें उच्च स्वरानें गर्जना करून त्याला खालीं पाडिलें. तेव्हां पडतां पडतां त्याच्या कानांतून रक्तस्राव होऊं लागला. तात्पर्य, परस्परांना जिंकिण्याची इच्छा करणाऱ्या त्या उभयतांमध्यें क्रोधाच्या आवेशामुळे घोर युद्ध झालें. इंद्रतुल्य पराक्रमी वालीनें त्या दुंदुभीला मुष्टी, गुडघे, लत्ता, पाषाण व वृक्ष ह्यांनीं प्रहार केला. ह्याप्रमाणें ते दैत्य-वानर एकमेकांना प्रहार करूं लागले असतां दैत्याचा पक्ष कमी पडून इंद्रपुत्र वालीची सरशी झाली. शेवटीं वालीनें त्या दुंदुभीला उचलून भूमीवर पाडिलें, आणि ह्याप्रमाणें त्या प्राणनाशक युद्धामध्यें दुंदुभीचा नाश झाला. दुंदुभी पडतां पडतां त्याच्या नासिकाप्रभृति द्वारांतून अतिशयच रक्त वाहूं लागलें, व तो महापराक्रमी दुंदुभी पृथ्वीवर पडून मृत्यु पावला! तेव्हां गतप्राण होऊन निचेष्ट पडलेल्या त्या दुंदुभीला अजमावून पहाण्याकरितां तोलून धरून वेगवान वालीनें एका हिसक्याबरोबर एक योजनपर्यंत दूर फेकून दिलें. तेव्हां त्याच्या मुखापासून निघालेले रक्तबिंदु वाऱ्यानें उडून मातंग मुनींच्या आश्रमांत जाऊन पडले. तेव्हां त्या असुराचे ते रक्तबिंदु तेथें पडलेले पाहून मातंग क्रुद्ध झाले, आणि 'हा कोण' म्हणून विचारूं लागले. 'ज्या दुरात्म्यानें एकाएकीं रक्ताचा स्पर्श केला, असा अविचारी, उल्लू, मूर्ख व दुरात्मा कोण आहे?' असा विचार करून ते श्रेष्ठ मुनि बाहेर पडले असतां, एक पर्वतप्राय महिष गतप्राण होऊन पृथ्वीवर पडलेला त्यांनीं पाहिला. हें काम वानराचें आहे, असें तपःसामर्थ्यानें जाणून, त्या महिषाला फेंकून देणाऱ्या वानराला उद्देशून त्या मुनींनीं मोठा शापहि दिला. ते म्हणाले, "ज्यानें हें कृत्य केलें त्यानें ह्या ठिकाणीं प्रवेश करितां उपयोगी नाहीं. माझ्या आश्रमाला असलेलें हें वन रुधिर-स्रावाच्या योगानें ज्यानें दूषित केलें, तो येथें प्रविष्ठ झाल्यास त्याचा वध होईल.

असुराचा देह फेंकून देतांना ज्यानें हे वृक्ष मोडून टाकिले, तो ह्या माझ्या आश्रमाच्या आसपास एक संपूर्ण योजनपर्यंत जर येईल, तर तो दुर्बुद्धि निःसंशय जिवंत राहणार नाहीं. त्याचप्रमाणें जे कोणी त्याचे मंत्री माझ्या वनाचा आश्रय करून राहिले असतील, त्यांनींहि येथें वास्तव्य न करितां हें माझें भाषण ऐकून इच्छेस येईल तिकडे सुखानें चालतें व्हावें. ते जर येथें राहतील, तर मी त्यांनाहि निःसंशय शाप देईन. पुत्राप्रमाणें नेहमीं सर्वस्वी संभाळिलेल्या माझ्या वनामध्यें वानरांचें आगमन पानें, अंकुर, फळें व मुळें ह्यांच्या नाशाकरितांच होत असतें. ह्यास्तव माझ्या शापाला हा आजचाच दिवस काय तो अवधि आहे; परंतु वालीशीं संबंध असलेला असा जो वानर उद्यीक येथें माझ्या दृष्टीस पडेल, तो पुष्कळ वर्षेंपर्यंत पर्वत होऊन पडेल."

ह्याप्रमाणें मुनींनीं उच्चारिलेली ती शापवाणी श्रवण केल्यावर तेथें असलेले ते वानर त्या वनांतून चालते झाले असतां, त्यांना अवलोकन करून वाली म्हणाला, "मातंग मुनींच्या वनामध्यें वास्तव्य करणारे तुम्ही सर्वजण माझ्यासमीप कशाकरितां आलां आहां? तुम्हां वनचरांचें कुशल आहेना?"

श्रीरामाच्या सामर्थ्याविषयीं सुग्रीवाला शंका.

असें वालीनें विचारिलें असतां सुवर्णमाला धारण केलेल्या त्या वालीला मतंग मुनींनीं दिलेला शाप व त्याचें सर्व कारण त्या संपूर्ण वानरांनीं कथन केलें. तें श्रवण करून वाली त्या महर्षींकडे गेला, आणि हात जोडून प्रार्थना करूं लागला; तथापि त्याची पर्वा न करितां मतंगमुनि आश्रमामध्यें गेले, व शापविषयक दोष समजून आल्यामुळें भयभीत झालेला वाली अंतःकरणामध्यें अगदीं विव्हल होऊन गेला. तेव्हांपासून शापाच्या भयाला भीत असलेला तो वाली ऋष्यमूकसंज्ञक महापर्वतावर प्रवेश करीत नाहीं, अथवा तो पर्वत पाहण्याचेंहि मनामध्यें आणीत नाहीं. तस्मात् रामा, ह्या महावनामध्यें त्याचा प्रवेश होणें नाहीं असें समजून कसलीहि भीति न बाळगितां मी अमात्यांसहवर्तमान येथें संचार करीत असतों. वीर्याचा गर्व झाल्यामुळें फेंकला गेलेल्या त्या दुंदुभीचा हा अस्थींचा पर्वतप्राय मोठा ढीग पडला आहे. हे जे मोठमोठ्या शाखांनीं युक्त असलेले प्रचंड सात सालवृक्ष आहेत, ते वाली शेजारून गेला असतां सर्वेहि एकदम त्याच्या वेगानें कंपित होऊन पर्णरहित होणारे आहेत. सारांश रामा, हें त्याचें अतुल वीर्य मीं तुला उघड करून

सांगितलें आहे. तस्मात् रामा, समरांगणामध्यें त्या वालीचा वध करण्यास तूं कसा बरें समर्थ होशील ?"

ह्याप्रमाणें सुग्रीव बोलत असतांना "काय केलें म्हणजे वालीचा वध रामाचे हातून होण्याविषयीं तुला विश्वास येईल ?" म्हणून लक्ष्मणानें हंसत हंसत त्याला विचारिलें. तेव्हां सुग्रीव म्हणाला, "पूर्वी एके वेळीं ह्या सातहि सालवृक्षांची वाली नेहमीं अशी दुर्दशा करीत असे. ह्यास्तव ह्या वृक्षांपैकीं एक वृक्ष जरी एका बाणानें रामानें विदीर्ण करून टाकिला, तरी सुद्धां ह्या रामाचा पराक्रम अवलोकन करून मी वालीचा वध झाला, असेंच समजेन. त्याचप्रमाणें लक्ष्मणा, वध पावलेल्या ह्या महिषरूप दुंदुभीच्या अस्थींचा ढीग एका पायानें उचलून आपल्या सामर्थ्यानें जर दोनशें धनुष्येंपर्यंत रामानें फेंकून दिला, तरीहि मी वालीचा वध झाला, असें समजेन."

ह्याप्रमाणें लक्ष्मणाला बोलून आरक्तवर्ण नेत्रप्रांतांनीं युक्त असलेला तो सुग्रीव कुकुत्स्थकुलोत्पन्न रामाविषयीं क्षणभर विचार करून पुनरपि म्हणाला, "वालीचें सामर्थ्य व पौरुष प्रख्यात असून स्वतःला शूर समजणारा तो शूर व महाबलाढ्य वानर युद्धामध्यें अजिंक्य आहे; आणि देवांच्याहि हातून होण्यास दुर्घट अशीं ह्याचीं कृत्यें माझ्या दृष्टोत्पत्तीस येत आहेत. तीं मनांत आणून मी भयभीत झालों असल्यामुळें ऋष्यमूक पर्वताचा आश्रय करून राहिलों आहें. सारांश, त्या क्रुद्ध वानरराजाचा पराजय होणें अथवा त्याच्यावर हल्ला होणेंहि अशक्य आहे, असें समजून आणि ऋष्यमूक पर्वतावर त्याचा प्रवेश होणें नाहीं, हें लक्ष्यांत आणून मी नेहमीं उद्विग्न व सशंक राहून ह्या महावनामध्यें माझे ठिकाणीं प्रेम करणाऱ्या ह्या हनुमत्प्रभृति श्रेष्ठ श्रेष्ठ अमात्यांसहवर्तमान संचार करीत असतों. हे मित्रवत्सला, आतां मला प्रशंसेस पात्र असा सन्मित्र प्राप्त झाला आहे, आणि हिमालय पर्वताप्रमाणें निश्चल असलेल्या तुझा आश्रय करून मी राहिलों आहें. तथापि त्या बलाढ्य दुष्ट भ्रात्याचें बल मला विदित असून, समरांगणामध्यें तुझें वीर्य माझ्या अवलोकनांत आलेलें नाहीं. ह्यामुळें तुझी त्याच्याशीं तुलना करण्याचा, तुझा अवमान करण्याचा अथवा तुझे ठिकाणीं भीति उत्पन्न करण्याचा जरी माझा उद्देश नाहीं, तरी त्या वालीच्या भयंकर कर्मांमुळें मला भीति उत्पन्न झालेली आहे. राघवा, तुझी प्रमाणभूत वाणी, धैर्य व मुद्रा हीं भस्मानें आच्छादित झालेल्या अग्नीप्रमाणें तुझे ठिकाणीं उत्कृष्ट तेज असल्याचें खरोखर सुचवीत आहेत."

हें महात्मा सुग्रीवाचें भाषण श्रवण केल्यावर राम हास्यपूर्वक त्या सुग्रीवाला म्हणाला, " पराक्रमासंबंधानें जर आमच्याविषयीं तुला विश्वास नसेल, तर समरांगणामध्यें प्रशंसेस पात्र होणारी अशी प्रतीति मी तुला आणून देतों. "

ह्याप्रमाणें सुग्रीवाला सांगून, त्याचें सांत्वन करण्याकरितां रघुवंशज रामानें पायाच्या अंगठ्यानें तें दुंदुभीचें शरीर सहज तोलून धरिलें; आणि नंतर अजमाऊन पाहून, त्या वीर्यवान पराक्रमी रामानें दैत्याचें तें शुष्क शरीर पायाच्या अंगठ्यानें दहा योजनें लांब फेंकून दिलें. तें पाहून सूर्याप्रमाणें परम तेजस्वी असलेल्या वीर रामाला, वानर व लक्ष्मण यांसमक्ष अर्थपरिपूर्ण वाणीचें अवलंबन करून सुग्रीव म्हणाला, " रामा, आर्द्र, मांसपरिपूर्ण व ताजा असा देह पूर्वी श्रांत व मत्त झालेल्या माझ्या भ्रात्या वालीनें फेंकून दिला होता; परंतु सांप्रत मांसरहित झालेला हा देह तृणासारखा हलका झालेला आहे, आणि म्हणून ह्याप्रमाणें तो आनंदानें तुला फेंकून देतां आला आहे. तस्मात्, ह्यावरून ताडून पाहूं लागलें असतां तुझें बल जास्त अथवा वालीचें जास्त हें समजणें शक्य नाहीं. कारण राघवा, आर्द्र आणि शुष्क हें अंतर फारच मोठें आहे. बा रामा, तुझें व त्याचें बल किती आहे, ह्याविषयीं संशय पूर्वीप्रमाणें अद्यापहि मला आहेच. ह्यास्तव, सात सालवृक्षांपैकीं एकाचा भेद झाल्यानें बलाबलांविषयीं फोड होणार आहे. तस्मात्, दुसरी गजशुंडाच कीं काय असें धनुष्य सज्ज करून व कानापर्यंत ताणून तूं मोठा बाण सोड. तूं सोडिलेला बाण ह्या सालवृक्षाला विदीर्ण करून टाकील, ह्याविषयीं मला संशय नाहीं. ह्यास्तव, विचार न करितां माझा मनोरथ निःसंशय परिपूर्ण कर. तुला माझी शपथ आहे. अरे, तेजस्व्यांमध्यें जसा रवि सदैव श्रेष्ठ आहे, महापर्वतांमध्यें जसा हिमालय श्रेष्ठ आहे, तसाच पराक्रमासंबंधानें पाहूं गेलें असतां पुरुषांमध्यें तूं श्रेष्ठ आहेस. "

सर्ग बारावा.

सुग्रीवाला रामसामर्थ्यप्रतीति.

उत्कृष्ट रीतीनें उच्चारिलेलें सुग्रीवाचें हें भाषण श्रवण केल्यावर, त्याला विश्वास येण्याकरितां महातेजस्वी रामानें धनुष्य घेतलें, आणि त्या मानी रामानें एक बाण हातीं घेतल्यावर, प्रत्यंचेच्या टणत्कारानें दशदिशा नादित करीत

करीत सालवृक्षाला उद्देशून तो बाण सोडिला. बलाढ्य रामानें सोडिलेला तो सुवर्णभूषित बाण सात साल व त्या सालांना आधारभूत असलेलें पर्वतशिखर भेदून रसातलामध्यें प्रविष्ठ झाला. इतकेंच नव्हे, परंतु तो महावेगवान बाण एका क्षणामध्यें सात साल भेदून रसातलामध्यें गेल्यावर पुनरपि उड्डाण करून त्याच भात्यामध्यें प्रविष्ठ झाला. तेव्हां ते सात सालवृक्ष रामाच्या बाणवेगानें विदीर्ण झालेले अवलोकन करितांक्षणीं वानरराज सुग्रीवाला पराकाष्ठेचा विस्मय झाला, व भूषणें धारण केलेल्या त्या सुग्रीवानें अत्यंत आनंदित होऊन रामाला शिरसाष्टांग नमस्कार घातला. नंतर हात जोडून व त्या कृत्यानें हर्षयुक्त होऊन सर्व अस्त्रवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ व शूर अशा तेथें स्थित असलेल्या धर्मवेत्त्या रामाला तो म्हणाला, "हे पुरुषश्रेष्ठा, इंद्रासहवर्तमान सर्व देवांचाहि बाणांच्या योगानें समरांगणामध्यें वध करण्यास तूं समर्थ आहेस. मग हे प्रभो, वालीची ती कथा काय? हे ककुत्स्थकुलोत्पन्ना रामा, ज्यानें प्रचंड सात सालवृक्ष, पर्वत आणि भूमि हीं एका बाणानें विदीर्ण करून टाकिलीं, त्या तुझ्याशीं समरांगणामध्यें कोण बरें सामना करणार आहे! इंद्रवरुणतुल्य असलेला तूं मित्र प्राप्त झाल्यामुळें माझ्या दुःखाचा आज परिहार झाला असून, मला पराकाष्ठेचें सुख झालें आहे. तस्मात्, हे ककुत्स्थकुलोत्पन्ना रामा, माझें प्रिय करण्याकरितां माझ्या भ्रातृरूप वालीसंज्ञक वैऱ्याचा आपण आजच वध करा मीं हे आपणांपुढें हात जोडिले आहेत."

सुग्रीवाचें वालीशीं युद्ध आणि त्याचा पराजय.

तदनंतर लक्ष्मणाप्रमाणें प्रिय म्हणून स्वीकारिलेल्या आणि म्हणूनच दर्शनाच्या योगानें आनंद देणाऱ्या सुग्रीवाला कडकडून भेटून महाबुद्धिमान राम म्हणाला, "सुग्रीवा, आपण ऋष्यमूक पर्वतापासून किष्किंधा नगरीला जाऊं. तूं सत्वर पुढें जा. पुढें गेल्यावर भ्राता ह्या संज्ञेला व्यर्थ पात्र झालेल्या वालीला आव्हान कर."

असें रामानें सांगितल्यानंतर ते सर्वहि वालीच्या किष्किंधा नगरीमध्यें सत्वर गेले, आणि वृक्षांच्या आड आपले देह छपवून ते गहन वनामध्यें उभे राहिले. तेव्हां वालीला आव्हान करण्याकरितां वस्त्रानें कंबर घट्ट खेंचून आरोळ्यांनीं गगनमंडल विदीर्ण करीतच कीं काय, सुग्रीवानेंहि भयंकर गर्जना केली. भ्रात्याची ती गर्जना श्रवण करून महाबलाढ्य वाली क्रुद्ध झाला, आणि मनामध्यें अतिशय क्षुब्ध होऊन अस्ताचलापासून स्वल्प कालामध्यें उदयाचलाला येणाऱ्या सूर्या-

प्रमाणें तो वेगानें तेथें येऊन पोहोंचला. तदनंतर आकाशामध्यें बुध व मंगळ या ग्रहांच्या घोर युद्धाप्रमाणेंच कीं काय, वाली व सुग्रीव ह्यांमध्यें तुमुल युद्ध झालें. त्या युद्धांत वज्रप्राय हस्ततल आणि मुष्टी ह्यांच्यायोगानें त्या क्रोधानें व्याप्त झालेल्या भ्रात्यांनीं एकमेकांना प्रहार केले. नंतर राम धनुष्य हातांत घेऊन त्या उभयतांकडे पाहूं लागला असतां देव अश्विनीकुमारांप्रमाणें असलेले ते उभयतां वीर एकसारखे दिसूं लागले. ह्यामुळें वाली कोणता व सुग्रीव कोणता ह्याचा उमजच रामाला पडला नाहीं; आणि म्हणूनच त्यानें वालीचा अंत करणारा बाण सोडण्याचें मनामध्यें आणिलें नाहीं. इतक्यांत त्या वालीनें सुग्रीवाला पराजित केलें. तेव्हां नाथ राघव दृष्टीस न पडल्यामुळें तो सुग्रीव ऋष्यमूक पर्वताकडे धांवूं लागला, आणि रागारागानें वाली पाठोपाठ धांवत असतांहि तो महावनामध्यें प्रविष्ट झाला. त्या वेळीं सुग्रीव फारच श्रमला होता. त्याच्या शरिरावर रक्ताचा सडा झालेला होता, आणि प्रहाराच्या योगानें तो अगदीं जर्जर झालेला होता.

सुग्रीवाचें दीन भाषण.

असो. तो वनामध्यें प्रविष्ट झाल्याचें अवलोकन करून शापभीतीमुळें वाली त्या सुग्रीवाला 'तूं सुटलास' असें म्हणाला, आणि महाबलाढ्य वाली तेथून परत फिरला. इतक्यांत भ्राता लक्ष्मण व हनुमान ह्यांच्या बरोबर, जेथें सुग्रीव वानर होता, त्या वनामध्यें रामहि आला. तेव्हां लक्ष्मणासहवर्तमान आलेल्या त्या रामाला अवलोकन करून लज्जित झालेला सुग्रीव मान खालीं घालून भूमीकडे पहात पहात दीन वाणीनें म्हणाला, "वालीला आव्हान कर, असें मला सांगून प्रत्यय येण्याकरितां मला पराक्रम दर्शवून आणि माझ्याकडून त्या वैऱ्याची कुचाळी काढून सांप्रत हें तूं काय केलेंस ? राघवा, वालीला मी मारणार नाहीं, असें त्याच वेळीं तूं मला खरें खरें सांगावयाचें होतेंस, म्हणजे मी येथून गेलों नसतों."

बाणप्रक्षेप न करण्याचें कारण.

ह्याप्रमाणें तो महात्मा सुग्रीव अंतःकरणाला करुणा येण्यासारख्या दीन वाणीनें बोलूं लागला असतां राम पुनरपि त्याला म्हणाला, "बा सुग्रीवा, क्रोध सोडून दे, आणि मीं हा बाण न सोडण्याचें कारण काय, तें ऐक. सुग्रीवा, अलंकार, वेष, शरिराची ठेवण आणि चालण्याची ढब ह्यांसंबंधानें तूं व वाली हे उभयतां अगदीं एकमेकांसारखे आहां. इतकेंच नव्हे, परंतु स्वर, कांति,

पहाणें, चालणें आणि भाषण ह्यांसंबंधानें तुम्हां उभयतांमध्यें मला भेद मुळींच दृष्टीस पडत नाहीं. तस्मात्, उभयतांचें रूप अगदीं सारखें असल्यामुळें तूं कोणता आणि वाली कोणता ह्याविषयीं मला मोह पडून मीं प्राणनाशक व शत्रुघातक असा महावेगवान घोर बाण सोडिला नाहीं. तात्पर्य उभयतांचें सादृश्य असल्यामुळें वाली कोणता व तूं कोणता ह्याविषयीं मला शंका आली, आणि बाण सोडिला असतां कदाचित् तो तुला लागून आपणां उभयतांचा समूळ घात होण्याचा प्रसंग येईल, ह्याकरितां मीं बाणप्रक्षेप केला नाहीं. हे वीरा, अज्ञानामुळें आणि घाईमुळें जर माझ्या हातून तुझा नाश झाला असता, तर माझ्या मूढपणाची व बालिशपणाची मात्र सर्व जगतांत ख्याति होऊन राहिली असती. इतकेंच नव्हे, परंतु ज्याला अभय दिलें, त्याचा वध हातून घडला असता, म्हणजे दत्ताभयवधसंज्ञक मोठें अद्भुत पातक मला लागलें असतें. मी, लक्ष्मण व सुंदरी सीता असे आम्ही सर्व तुझ्या अधीन आहों, आणि ह्या वनामध्यें तूंच आमचा आश्रय आहेस. तस्मात् वानरश्रेष्ठा, तूं पुनरपि युद्ध कर, आणि मजविषयीं कसलीहि शंका घेऊं नको. आतांच्या आतांच युद्धामध्यें माझ्या हातून एका बाणानें वालीचा नाश होऊन तो भूतलावर तडफड करीत असलेला तूं अवलोकन करशील परंतु हे वानरराज, तूं स्वतः-विषयीं कांहीं तरी ओळखितां येण्यासारखी खूण करून ठेव, म्हणजे द्वंद्वयुद्धा-मध्यें गुंतलेल्या तुला मी ओळखून काढीन. लक्ष्मणा, शुभ लक्षणांनीं युक्त अशी ही प्रफुल्लित झालेली नागपुष्पी लता उपटून तूं ह्या महात्म्या सुग्रीवाच्या कंठामध्यें घाल."

असें रामानें सांगितलें असतां पर्वताचे तटावर उगवलेली ती प्रफुल्लित नागपुष्पी लता उपटून लक्ष्मणानें त्याच्या गळ्यांत घातली. तेव्हां तो श्रीमान सुग्रीव संध्यारागासहवर्तमान असलेला मेघ बगळ्यांच्या मालिकेनें ज्याप्रमाणें शोभतो, त्याप्रमाणें कंठगत लतेनें शोभूं लागला. नंतर रामाच्या सांगण्यावरून अंतःकरणामध्यें स्वस्थ झालेला व शरिरानें झळकत असलेला तो सुग्रीव रामासह पुनरपि किष्किंधा नगरीमध्यें गेला.

सर्ग तेरावा.

किष्किंधेकडे पुनः गमन.

तो धर्मात्मा राम ऋष्यमूक पर्वतावरून सुग्रीवासहवर्तमान वालीच्या पराक्रमानें सुरक्षित असलेल्या किष्किंधा नगरीमध्यें गेला. जातांना आपलें सुवर्णभूषित प्रचंड धनुष्य उचलून धरून समरांगणामध्यें विजय देणारे व प्रभेनें सूर्यासारखे असलेले बाण त्यानें बरोबर घेतले. त्या महात्म्या रामाच्या व लक्ष्मणाच्याहि पुढें दृढ कंठानें युक्त असलेला महाबलाढ्य सुग्रीव चालूं लागला. वानरसेनाधिपतींच्या समुदायाचें रक्षण करणारा, महातेजस्वी व सामर्थ्यवान असा हनुमान, आणि नल, नील व तार हे वीर मागून चालले. जातां जातां पुष्पभारानें नम्र झालेले वृक्ष व निर्मल जल वाहणाऱ्या समुद्रगामी नद्या त्यांच्या अवलोकनांत आल्या. त्याचप्रमाणें ज्यांची मुद्रा उत्कृष्ठ आहे, असे ते हनुमत्प्रभृति वीर जाऊं लागले असतां मंदिरांच्या आकाराचीं पर्वतविवरें, गुहा, उत्कृष्ठ शिखरें आणि दऱ्या त्यांनीं अवलोकन केल्या; आणि वैडूर्य मण्यांसारख्या निर्मल उदकानें आणि किंचित् उमललेल्या कमलपुष्पांनीं सुशोभित झालेले सजल तडाग अवलोकन करीत करीत ते चालले. कारंडव, सारस, हंस, वंजुल, पाणकोंबडे, चक्रवाक आणि इतरहि पक्षी ज्यांचा शब्द ऐकून प्रतिशब्द करीत आहेत, व मृदु अशा तृणांकुरांवर ज्यांची उपजीविका आहे, अशीं निर्भय हरिणें संचार करणाऱ्या वनचरांच्या स्थानांचे ठिकाणीं चोहोंकडे जातां जातां त्यांच्या दृष्टीस पडत होतीं. असो. शुभ्र दंतांनीं भूषित, एकाएकी संचार करणारे, नद्यांचीं तीरें पाडणारे आणि म्हणूनच तटाकांचे शत्रू असलेले, भयंकर, मदमत्त आणि पर्वतावर गर्जना करणारे असून आकृतीनें फारच धिप्पाड असल्यामुळें संचार करणाऱ्या पर्वतांप्रमाणेंच भासणारे वन्य गज, पृथ्वीवरील धुळीनें व्याप्त झालेले गजतुल्य वानर, इतरहि वनचर प्राणी आणि आकाशांत संचार करणारे पक्षी वनामध्यें अवलोकन करीत करीत ते सुग्रीवाच्या आज्ञेंत वागणारे वीर सत्वर चालते झाले. ते जाऊं लागले असतां वृक्षसमूहानें युक्त असलेलें एक वन अवलोकन करून राम सुग्रीवाला म्हणाला, " आकाशांतील मेघांप्रमाणें हा वृक्षसमूह झळकत आहे. मेघसमूहाप्रमाणें विपुल आणि सभोंवतीं कदलीवृक्षांनीं व्याप्त असलेले हें काय आहे, तें जाणण्याची माझी इच्छा आहे. मित्रा, हें समजण्याविषयीं मला

फार उत्कंठा लागलेली आहे, आणि ही उत्कंठा तुझ्याकडून तृप्त करवावी अशी माझी इच्छा आहे."

सप्तजनाश्रमदर्शन.

हें महात्म्या रामचंद्राचें भाषण श्रवण केल्यावर सुग्रीव जातां जातांच त्या प्रचंड वनाविषयीं रामाला सांगूं लागला. तो म्हणाला, "राघवा, बागा व उपवनें ह्यांनीं समृद्ध आणि मधुर मुळें, फळें व उदक ह्यांनीं युक्त असा हा श्रमनाशक विस्तीर्ण आश्रम आहे. ह्या आश्रमामध्यें प्रशंसेस पात्र असें व्रतानुष्ठान करणारे सप्तजन नामक सात मुनी मस्तक खालीं ठेवून, पाय वर करून आणि नेहमीं जलामध्यें राहून तपश्चर्या करीत होते. सात दिवस लोटल्यानंतर आहाराकरितां केवळ वायूचेंच एकवार सेवन करणारे ते पर्वतनिवासी सप्तजन मुनी सातशें वर्षांनीं देहासहवर्तमान स्वर्गाला गेले. त्यांच्या प्रभावामुळें, वृक्षरूप प्राकारानें परिवेष्टित असलेल्या ह्या आश्रमावर इंद्राचें साहाय्य असलेल्या देवदैत्यांचाहि हल्ला होणें अत्यंत दुर्घट झालें आहे. पक्ष्यांनीं आणि त्याचप्रमाणें इतर वनचर प्राण्यांनीं हा आश्रम वर्ज्य केला असून मोहामुळें जे ह्यांत प्रवेश करितात, ते पुनरपि परत येत नाहींत. मधुर शब्दांनीं युक्त असे अप्सरांच्या भूषणांचे ध्वनी येथें कानांवर येत असून वाद्यें व गायन ह्यांचे ध्वनीहि कर्णपथावर येत असतात. त्याचप्रमाणें दिव्य सुगंधहि येथें येत असतो. इतकेंच नव्हे, परंतु अग्निहोत्रसंबंधीं अग्निहि येथें प्रज्वलित असतात. कपोत पक्ष्याच्या शरिराप्रमाणें धूसर वर्ण असून मेघाप्रमाणें भासणारा हा धूम वृक्षांचीं अग्रें व्याप्त करीत असल्यासारखा दिसत आहे. मस्तकांचे ठिकाणीं धूमाचा संपर्क झालेले हे वृक्ष मेघसमूहांनीं आच्छादित झालेल्या वैदूर्यरत्नमय पर्वतासारखे दिसत आहेत. हे धर्मात्मन्, भ्रात्या लक्ष्मणासहवर्तमान हात जोडून तूं नम्र हो, आणि त्या मुनींना उद्देशून प्रणाम कर. कारण रामा, त्या जितेंद्रिय मुनींना उद्देशून जे प्रणाम करितात, त्यांच्या शरिराचे ठिकाणीं कांहींहि अशुभ राहात नाहीं."

ह्याप्रमाणें सुग्रीवानें सांगितल्यानंतर भ्रात्या लक्ष्मणासहवर्तमान रामानें हात जोडिले, आणि त्या महात्म्या ऋषींना उद्देशून अभिवंदन केलें. नंतर राम, लक्ष्मण, सुग्रीव आणि इतर वानर ह्या सर्वांच्या मनाला आनंद झाला, व ते पुढें चालते झाले. असो.

त्या सप्तजन मुनींच्या आश्रमापासून बराच दूर मार्ग चालून गेल्यावर पराजय होण्यास अशक्य अशी ती वालीनें रक्षण केलेली किष्किंधा नगरी त्यांनीं अवलोकन केली. तदनंतर उत्कृष्ठ व उग्र तेजानें युक्त झालेला राम, लक्ष्मण व वानर शस्त्रें घेऊन इंद्रपुत्र वालीच्या सामर्थ्यानें सुरक्षित असलेल्या नगरीमध्यें शत्रूचा वध करण्याकरितां पुनरपि प्रविष्ठ झाले.

सर्ग चौदावा.

वालीला युद्धार्थ आव्हान.

किष्किंधा नगरीला गेल्यावर ते सर्व वृक्षांच्या आड लपून गहन वनामध्यें उभे राहिले असतां मोठ्या कंठानें युक्त असलेला वनप्रिय सुग्रीव वनामध्यें चोहोंकडे दृष्टि फेंकिल्यावर अत्यंत क्रुद्ध झाला. ज्याच्या अग्रभागीं वायूचा वेग आहे, अशा महामेघाप्रमाणें परिवारांनीं परिवेष्ठित असलेला तो सुग्रीव गर्जना करूं लागला, आणि ध्वनीच्या योगानें आकाशमंडलाचा भेदच करीत आहे कीं काय अशीं भयंकर गर्जना करून त्यानें वालीला युद्धार्थ आव्हान केलें. नंतर वर्णानें व प्रतापानें बालसूर्याची बरोबरी करणारा आणि मत्त सिंहाप्रमाणें चालणारा सुग्रीव सत्कर्मतत्पर रामाकडे पाहून म्हणाला, "वानररूप जाळ्यानें व्याप्त, सुवर्णभूषणांनीं युक्त आणि ध्वजयंत्रांनीं समृद्ध अशा वालीच्या नगरीला आपण आलों आहों. तेव्हां हे वीरा, प्राप्त झालेला ऋतु ज्याप्रमाणें लता फलयुक्त करितो, त्याप्रमाणें वालीच्या वधाविषयीं पूर्वी जी तूं प्रतिज्ञा केली होतीस, ती सत्वर सफल कर."

ह्याप्रमाणें सुग्रीवानें धर्मात्म्या रामाला सांगितलें असतां तो शत्रुनाशक राम त्या सुग्रीवालाच म्हणाला, "ह्या नागपुष्पी लतेच्या योगानें तूं मला ओळखूं येण्याचें चिन्ह धारण केलेलें आहेस. लक्ष्मणानें ही लता उपटून तुझ्या कंठामध्यें घातलेली आहे, आणि आकाशामध्यें नक्षत्रमालेनें परिवेष्ठित असलेला सूर्य ज्याप्रमाणें शोभतो, त्याप्रमाणें गळ्यामध्यें घातलेल्या ह्या लतेच्या योगानें तूं अधिकच शोभत आहेस. असो. सुग्रीवा, वालीमुळें प्राप्त झालेलें तुझें भय व वैर हीं मी आज युद्धामध्यें एकच बाण सोडून नाहींतशीं करून टाकितों. ह्या भ्रातृरूप वैऱ्याला मला दाखीव, म्हणजे लगेच तो वाली वध होऊन वनामध्यें

धुळींत तडफडूं लागेल. माझ्या दृष्टीच्या टप्प्यांत येऊन तो वाली जर जिवंत परत गेला, तर मी तत्क्षणीं तुझ्या दूषणाला व निंदेला पात्र होईन अरे, तुझ्यासमक्ष मीं सात तालवृक्ष एका बाणानें विदीर्ण केले आहेत. तेव्हां त्या माझ्या सामर्थ्याच्या बलानें वाली रणामध्यें वध पावून पडलेला आजच तुझ्या आढळण्यांत येईल. पुष्कळ दिवसपर्यंत संकटांत असतांनाहि धर्मसेवनेच्या इच्छेनें अंतःकरण व्याप्त झाल्यामुळें मीं कधीं पूर्वीं अनृत भाषण केलेलें नाहीं. तात्पर्य उगवलेलें भाताचें शेत वृष्टीच्या योगानें ज्याप्रमाणें इंद्र सफल करितो, त्याप्रमाणें मी आपली प्रतिज्ञा सफल करीन. तूं भीति सोडून दे. सुग्रीवा, सुवर्णमाला धारण केलेल्या वालीला आव्हान करण्याकरितां तूं एकदा गर्जना कर, म्हणजे तो वानर येथें धावत येईल. सारांश, निर्भय व विजयाची इच्छा करणाऱ्या त्या वालीला संग्रामप्रिय असल्यामुळें, तुझें आव्हान होताक्षणीं विलंब न करितां तो आपल्या नगरांतून धावत येईल. कारण, शत्रूचें संग्रामामध्यें आव्हान श्रवण केल्यावर स्वतःच्या वीर्याबद्दल खात्री असलेल्या वीरांना—विशेषतः स्त्रियांचे समक्ष—तें सहन होत नाहीं."

सुवर्णासारख्या वर्णानें युक्त असलेल्या सुग्रीवानें तें रामाचें भाषण श्रवण केल्यावर, आकाश विदीर्ण करीतच कीं काय अशा क्रूर स्वरानें गर्जना केली. तेव्हां त्या गर्जनेच्या योगानें मोठमोठे बैल भयभीत व निस्तेज झाले, आणि पालन न करणें ह्या राजाच्या दोषामुळें शत्रूंनीं हस्तगत करून घेतलेल्या कुलस्त्रिया ज्याप्रमाणें इकडे तिकडे धावत सुटतात, त्याप्रमाणें ते धावाधाव करूं लागले. इतकेंच नव्हे, परंतु संग्रामामध्यें दाणादाण उडून गेलेल्या अश्वाप्रमाणें मृग सत्वर धावूं लागले, आणि पुण्य संपल्यामुळें आकाशांतून भ्रष्ट होणाऱ्या देवांप्रमाणें पक्षीहि भूमीवर पडूं लागले.

असो. तदनंतर रामाच्या शौर्याविषयीं खात्री वाटत असलेल्या व मेघाप्रमाणें पूर्वीं गर्जना केलेल्या त्या सूर्यपुत्र सुग्रीवानें पुनरपि तशीच गर्जना केली, आणि वायूनें ज्यांतील लाटा उचंबळूं लागल्या आहेत, अशा सागराप्रमाणें पराक्रम करण्याविषयीं त्याचें तेज वृद्धिंगत झालें.

सर्ग पंधरावा.

युद्धोत्सुक वालीचा निषेध.

भ्रात्याची ती गर्जना अंतःपुरांत असलेल्या वालीला सहन झाली नाहीं. ह्यामुळें प्राणिमात्रांना कंपित करणारा तो सुग्रीवाचा शब्द श्रवण केल्याबरोबर वालीचा मद तत्क्षणीं नाहींसा होऊन त्याला प्रचंड क्रोध चढला, आणि सुवर्णासारख्या कांतीनें युक्त असलेला तो वाली क्रोधानें व्याप्त झाल्यामुळें ग्रहण लागलेल्या सूर्याप्रमाणें एकाएकीं निस्तेज झाला. दंष्ट्रांच्या योगानें अक्राळविक्राळ दिसत असून क्रोधानें प्रदीप्त अग्नीप्रमाणें नेत्र लाल झालेला तो वाली कमलें उध्वस्त झाल्यामुळें शोभारहित होऊन केवळ कमलनालांनीं व्याप्त झालेल्या सरोवराप्रमाणें निस्तेज दिसूं लागला.

सुग्रीवाचा तो दुःसह शब्द श्रवण करितांक्षणीं वेगानें पावलें टाकीत असल्यामुळें पृथ्वी जशी कांहीं विदीर्णच करीत करीत तो वानर वाली तेथून उडाला. तेव्हां पूर्वींपासून जिनें प्रेम दर्शविलें आहे, अशी भयभीत व क्षुब्ध झालेली तारा त्या वालीला प्रेमानें आलिंगन देऊन परिणामीं हितावह होणारें भाषण त्याच्याशीं करूं लागली. ती म्हणाली "हे वीरा, तूं प्रातःकालीं झोंपेंतून उठल्यावर ज्याप्रमाणें पूर्वरात्रीं उपभोग घेतलेल्या पुष्पमालेचा त्याग करतोस, त्याप्रमाणें नदीच्या वेगाप्रमाणें एकाएकीं प्राप्त झालेल्या ह्या क्रोधाचा तूं बऱ्या विचारानें त्याग कर. हे वानरा, तूं ह्या सुग्रीवाशीं उदयीक प्रातःकालीं संग्राम कर. हे वीरा, जरी तुला शत्रु पुष्कळ नाहींत, आणि तुझे ठिकाणीं कसलीहि न्यूनता नाहीं, तरी एकाएकीं हें तुझें युद्धार्थ बाहेर जाणें मला रुचत नाहीं. मी कशाकरितां तुझें निवारण करीत आहे, तें ऐक. पूर्वीं रागारागानें येऊन तुला एकदां त्यानें युद्धाकरितां आह्वान केलें होतें, परंतु तूं सत्वर जाऊन त्याचा पराजय केलास, व तोहि मार खातां खातां वाट फुटेल तिकडे चालता झाला; तथापि तूं त्याला जिंकून विशेषतः पीडा दिली असतांनाहि ज्या अर्थीं तो पुनरपि येथें येऊन तुला आह्वान करीत आहे, त्या अर्थीं ह्या त्याच्या आह्वानामुळें माझ्या मनांत भय उत्पन्न झालें आहे. गर्जना करणाऱ्या त्या सुग्रीवाचा गर्व, युद्धाविषयीं औत्सुक्य, आणि गर्जनेचा जोर जो दृष्टीस पडत आहे, त्याचा विचार केला असतां, ह्याच्या मुळाशीं कांहीं क्षुल्लकच कारण असेल, असें मला वाटत

नाहीं. कोणी साहाय्यकर्ता बरोबर आल्यावांचून तो सुग्रीव येथें आला आहे असें मला वाटत नाहीं. त्यानें कोणा तरी साहाय्यकर्त्या पुरुषाचें अवलंबन केलें आहे, व त्याचाच आश्रय केला असल्यामुळें हा गर्जना करीत आहे. शिवाय सुग्रीव जात्याच कुशल व बुद्धिमान असल्यामुळें, ज्याच्या वीर्याचा कधीं प्रत्यय आलेला नाहीं, त्याच्याशीं तो कधीं सख्य करणार नाहीं. हे वीरा, पूर्वीच कुमार अंगद सांगत असतांना जें भाषण मीं श्रवण केलें आहे, तेंच हितावह भाषण मी आज तुला सांगतें. अंगद एकदां वनामध्यें गेला असतां हेरांनीं त्याला जो वृत्तांत कळविला, तो त्यानें मला कथन केला आहे. इक्ष्वाकूंच्या कुलामध्यें उत्पन्न झालेले अयोध्याधिपति, समरांगणामध्यें अजिंक्य असलेले दशरथाचे शूर पुत्र राम-लक्ष्मण वनामध्यें गेलेले आहेत, आणि सुग्रीवाचें प्रिय करण्याकरितां ते अजिंक राम-लक्ष्मण तेथें प्राप्त झालेले आहेत. सारांश, प्रलयकाळीं उत्पन्न झालेल्या अग्नीप्रमाणें शत्रुसैन्याचा विध्वंस करणारा, आणि संग्रामकर्मामध्यें विख्यात असलेला तो राम तुझ्या भ्रात्याला साहाय्य करणारा आहे. तो साधु-रूप पक्ष्यांचा निवासवृक्ष असून शरण आलेल्यांचा मुख्य आश्रय आहे. दुःखि-तांचा आधार आहे. यशाचें परम निधान आहे. ब्रह्मज्ञान आणि धर्मज्ञान ह्यांनीं संपन्न असून पित्याची आज्ञा परिपालन करण्याविषयीं तो तत्पर आहे, आणि धातूंची खाण असलेल्या गिरिराज हिमालय महापर्वताप्रमाणें तो गुणांची एक मोठी खाणच आहे. तस्मात्, दुर्जय व युद्धकर्मासंबंधानें अतुल अशा त्या महात्म्या रामाशीं विरोध करणें तुला योग्य नाहीं. हे वानरश्रेष्ठा, तुझा मत्सर न करितां मी कांहीं तुला सांगतें. ह्यास्तव, मी जी तुझ्या हिताची गोष्ट तुला सांगेन, ती ऐकून घेऊन त्याप्रमाणें तूं वाग. अरे, सुग्रीवाला तूं बऱ्या विचा-रानें सत्वर यौवराजाचा अभिषेक कर. हे वीरा, कनिष्ठ भ्रात्याशीं तूं युद्ध करूं नको. त्या बलाढ्य रामाशीं सख्य व सुग्रीवाचे ठिकाणीं प्रेम करणेंच तुला योग्य आहे, असें मला वाटतें. ह्या कनिष्ठ भ्रात्याचें तुला लालनच केलें पाहिजे. अरे, तो दूर असला किंवा येथें असला, तरी सर्वस्वी तुझा बंधूच आहे, व त्याच्यासारखा तुझा बंधु ह्या भूतलावर मला कोणी आढळत नाहीं. ह्यास्तव, ह्या वैराचा त्याग करून दान, मान इत्यादि सत्कारांच्या योगानें तूं त्याला स्वाधीन करून घे. तो तुझ्या संनिध उभा राहो. प्रचंड ग्रीवेनें युक्त असलेला सुग्रीव हाच मुख्य बंधु म्हणून तुला अनुमत असून, भ्रातृप्रेमाचें अवलं-बन केल्याशिवाय ह्या प्रसंगीं तूं संकटांतून पार पडण्याचा दुसरा कांहींएक

उपाय नाहीं. तस्मात्, जर तुला माझें प्रिय कर्तव्य असेल, आणि हित करणारी म्हणून जर तूं मला समजत असशील, तर मला प्रिय असलेली गोष्ट करण्याविषयीं मी प्रार्थना करीत आहें, त्याप्रमाणें तूं माझा उत्कृष्ठ उपदेश ऐक. अरे, मजवर कृपा कर, आणि मीं केलेला हितकारक उपदेश ऐकून घे. माझ्यावर रागावणें तुला योग्य नाहीं. खरोखर कोसलदेशाधिपतीच्या इंद्रतुल्य तेजस्वी पुत्राशीं युद्ध करणें तुला योग्य नाहीं.

ह्याप्रमाणें त्या वालीला तारेनें हितावह व पथ्यकारक असा उपदेश केला असतांहि, मृत्यूनें ग्रासिलेल्या त्या वालीचा विनाशकाल आला असल्यामुळें त्याला तो उपदेश रुचला नाहीं.

सर्ग सोळावा.

तारेचा निषेध करून वालीचें युद्धार्थ गमन.

ताराधिपति चंद्रासारख्या आल्हादकारक मुखानें युक्त असलेली ती तारा ह्याप्रमाणें उपदेश करीत असतांना वाली निर्भर्त्सना करून तिला म्हणाला, "हे सुंदरि, गर्जना करीत असलेल्या ह्या भ्रात्याची आणि विशेषतः शत्रूची ही गडबड सहन करण्याचें मला काय कारण आहे ? अग भित्रे, ज्यांच्यावर कधीं कोणीं चाल केलेली नाहीं, आणि युद्धामध्यें जे कोणी परावृत्त होत नाहींत, अशा शूर लोकांना कोणी आह्वान केलें असतांना तें निमूटपणें सहन करणें हें मरणापेक्षांहि अधिक दुःखदायक आहे. संग्रामामध्यें युद्धाची इच्छा धरणाऱ्या व भूषणरहित कंठानें युक्त असलेल्या सुग्रीवाची गर्जना व उद्धटपणा सहन करण्यास मी समर्थ नाहीं. रामासंबंधानें तूं माझ्याकरितां मुळींच दुःखी होऊं नको. कारण, धर्मवेत्ता व कृतज्ञ जो राम, तो पाप कसें करील ? आतां इतर स्त्रियांबरोबर तूं परत जा. फिरून फिरून कशाकरितां तूं माझ्या मागोमाग येत आहेस ? तूं आपलें प्रेम दर्शवून माझे ठिकाणीं असलेली भक्ति प्रकट केलीस, ही पुरे आहे. मी सुग्रीवाकडे जाऊन त्याच्याशीं युद्ध करीन, आणि त्याचा गर्व नाहींसा करीन. तूं भय बाळगूं नको. तो कांहीं माझ्या हातून प्राणाला मुकणार नाहीं. सारांश, संग्रामामध्यें स्थित असलेल्या ह्या सुग्रीवाची व्यवस्था मी तुझ्या इच्छेप्रमाणेंच करीन; म्हणजे वृक्ष आणि मुष्टिप्रहार ह्यांनीं

ताडित होऊन तो परत जाईल. त्या दुष्टाला माझा गर्व आणि दृढ प्रयत्न सहन होणार नाहीं. तारे, तूं मला मदत केली असून माझे ठिकाणीं आपलें प्रेमहि दर्शविलें आहेस. ह्यास्तव, इतर स्त्रियांसहवर्तमान तूं परत जा. तुला माझ्या प्राणाची शपथ आहे. ह्या भ्रात्याचा संग्रामामध्यें केवळ पूर्ण पराजय करूनच मी परत फिरेन."

ह्यानंतर प्रिय भाषण करणाऱ्या तारेनें वालीला आलिंगन दिलें, आणि स्वभावानें सरळ असून हळू हळू रडत असलेल्या त्या तारेनें त्याला प्रदक्षिणाहि केली. नंतर भर्त्याच्या विजयाची इच्छा करणाऱ्या त्या मंत्रवेत्या तारेनें वालीचें स्वस्त्ययन केलें, आणि शोकाकुल होऊन स्त्रियांसहवर्तमान ती अंतःपुरामध्यें गेली.

वाली व सुग्रीव यांचे युद्ध.

स्त्रियांसहवर्तमान तारा स्वस्थानीं प्रविष्ठ झाल्यावर, क्रुद्ध झालेल्या महाभुजंगाप्रमाणें सुस्कारे टाकीत टाकीत वाली नगराच्या बाहेर पडला, आणि प्रचंड क्रोधानें व पराकाष्ठेच्या वेगानें युक्त असलेला तो सुस्कारे टाकून शत्रु दृष्टीस पडावा ह्या हेतूनें चोहोंकडे दृष्टि फेकूं लागला. तेव्हां त्या वैभवशाली वालीनें सुग्रीवाला अवलोकन केलें. त्या सुग्रीवाचा वर्ण सुवर्णासारखा पिंवळा होता, कंबर बांधून तो तयार होता, युद्धाच्या इच्छेनें तो रणभूमीमध्यें धैर्यानें उभा राहिलेला होता, आणि अग्नीप्रमाणें तो दैदिप्यमान दिसत होता. असो. रणभूमीमध्यें युद्धाकरितां स्थित असलेल्या त्या सुग्रीवाला अवलोकन करून महाकोपी व महापराक्रमी वालीनें आपलें वस्त्र घट्ट केलें, आणि वस्त्र आवळून युद्धाकरितां तयार झालेला तो वीर्यवान वाली मूठ उगारून सुग्रीवाचे सन्मुख गेला. तेव्हां सुवर्णमाला धारण केलेल्या वालीला उद्देशून सुग्रीवहि घट्ट वळलेली मूठ उगारून वालीपेक्षां अधिकच जोराजोरानें त्याच्याकडे गेला असतां, संग्रामनिपुण आणि क्रोधामुळें डोळे लाल झालेला तो सुग्रीव मोठ्या वेगानें आपल्या अंगावर धावून येत आहे, हें अवलोकन करून वाली म्हणाला, "बोटें चांगलीं जुळून घट्ट आवळलेल्या ह्या प्रचंड मुठीचा मीं वेगानें प्रहार केला असतां तो तुझे प्राण घेतल्यावांचून राहणार नाहीं."

ह्याप्रमाणें वालीनें भाषण केलें असतां सुग्रीव क्रुद्ध होऊन त्याला म्हणाला, "ही माझी मूठ तुझे प्राण हरण करण्याकरितां तुझ्या मस्तकावर पडो." नंतर वालीनें वेगावेगानें त्या क्रुद्ध सुग्रीवाजवळ येऊन त्याला ताडण केलें असतां तो

सुग्रीव रक्ताच्या गुळण्या टाकू लागल्यामुळें झऱ्यांनीं युक्त असलेल्या पर्वताप्रमाणें दिसूं लागला. तथापि सुग्रीवानें निःशंकपणें जोराजोरानें एक सालवृक्ष उपटून वालीच्या शरीरावर मारिला. तेव्हां वज्राचा प्रहार झालेल्या महापर्वताप्रमाणें तो वाली शोभूं लागला; आणि वृक्षाच्या योगानें जेरीस आलेला व—अतिशय ओझें लादलेली नौका ज्याप्रमाणें आंतील व्यापाऱ्यांच्या तांड्यासहवर्तमान समुद्रामध्यें बुडूं लागते त्याप्रमाणें—सालवृक्षाच्या ताडनानें विव्हल झालेला तो वाली मनामध्यें खचूं लागला. भयंकर बल, प्रचंड पराक्रम, गरुडासारखा वेग व घोर शरीर ह्यांनीं युक्त असलेले ते शत्रुघातक भ्राते सुग्रीव आणि वाली एकमेकाचें छिद्र पाहाण्याविषयीं दक्ष राहून निकरानें युद्ध करूं लागले असतां, आकाशामध्यें चंद्रसूर्यच युद्ध करीत आहेत कीं काय असें दिसूं लागलें. नंतर बल व वीर्य ह्यांनीं युक्त असलेल्या वालीची सरशी होऊं लागली आणि महावीर्यवान सूर्यपुत्र सुग्रीवाचा पराभव होऊं लागला. तेव्हां वालीनें गर्व नाहींसा केल्यामुळें पराक्रमांतहि कमी झालेला सुग्रीव वालीवर क्रुद्ध झाला, आणि आपला उतरता पाया आहे, असें तो रामाला दर्शवूं लागला. नंतर शाखांसहवर्तमान वृक्ष, पर्वतशिखरें, वज्रप्रहार, नखें, मुष्टि, गुडघे, लाथा व बाहु ह्यांच्या योगानें त्या उभयतांमध्यें वृत्रासुर आणि इंद्र ह्यांच्या युद्धाप्रमाणें घोर युद्ध झालें. सारांश, रक्तानें माखलेले ते उभयतां वनचर मेघांप्रमाणें मोठमोठ्या गर्जना करून एकमेकाला दटावीत दटावीत युद्ध करूं लागले. इतक्यांत वानरराज सुग्रीवाचा पक्ष कमी होऊन तो वारंवार इकडे तिकडे पाहात आहे, असें रामाच्या दृष्टोत्पत्तीस आलें.

वालीवर बाणप्रहार.

अशा प्रकारें सुग्रीव भयभीत झाला आहे, असें अवलोकन करितांक्षणीं तो महातेजस्वी वीर राम वालीचा वध करण्याच्या इच्छेनें बाण पाहूं लागला. नंतर सर्पासारखा एक प्राणनाशक बाण धनुष्याला लावून, मृत्युच कालचक्राचें आकर्षण करीत आहे कीं काय, अशा रीतीनें त्यानें तें धनुष्य ताणिलें. तेव्हां त्याच्या प्रत्यंचेच्या टणत्कारानें मोठमोठे पक्षी व मृग त्रस्त व प्रलयकालाप्रमाणें मोहित होऊन धावूं लागले. इतक्यांत वज्रासारख्या गर्जनेनें युक्त आणि उज्ज्वल विद्युल्लतेप्रमाणें तेजस्वी असा रामानें सोडिलेला प्रचंड बाण वालीच्या वक्षःस्थलावर पडला, व त्या बाणाचा वेगानें तडाका बसला असतां तो महातेजस्वी वानरराज मरणोन्मुख व निश्चेष्ट होऊन भूतलावर पडला. पडतां

पडतां अश्रूंनीं कंठ दाटून आलेला तो वाली भयभीत होऊन हलके हलके रडूं लागला. सारांश, मुखासमीप असलेल्या ललाटस्थ नेत्राच्या योगानें शंकरानें सोडिलेला सधूम अग्निच कीं काय अशा रीतीनें सुवर्णभूषणानें झळकत असलेला तो शत्रुघातक, मृत्युतुल्य व देदीप्यमान उत्कृष्ठ बाण कालाप्रमाणें दिसत असलेल्या पुरुषश्रेष्ठ रामानें सोडिला असतां, रक्तरूप जलस्रावानें सिंचित झालेला तो इंद्रपुत्र वाली पर्वतावर उगवलेल्या प्रफुल्लित अशोक वृक्षाप्रमाणें दिसूं लागला, आणि उत्सव समाप्त झाल्यानंतर खालीं उतरलेल्या इंद्रध्वजाप्रमाणें तो निश्चेष्ट होऊन समरांगणामध्यें भूतलावर पडला!

सर्ग सतरावा.

श्रीरामाची निंदा.

वानरसमाज आणि अस्वलांचा समुदाय ह्यांचा तो अधिपति भूमीवर पडला असतां भूमि चंद्ररहित आकाशाप्रमाणें शोभेनाशी झाली; परंतु तो महात्मा भूमीवर पडला असतांहि कांति, तेज, पराक्रम व प्राण हीं त्याच्या देहाला सोडून गेलीं नाहींत. कारण इंद्रानें दिलेल्या रत्नभूषित उत्कृष्ठ सुवर्णमालेनें त्या वानरश्रेष्ठाचें तेज, कांति व प्राण धारण केले होते, आणि त्या सुवर्णमालेच्या योगानें तो वानरसेनांचें रक्षण करणारा वीर वाली, संध्याकाळच्या आरक्तवर्ण प्रकाशानें ज्याच्या कडा युक्त झालेल्या आहेत अशा मेघांप्रमाणें दिसूं लागला. सारांश, तो खालीं पडला असतांना त्याची कांति माला, देह आणि मर्मघाती बाण ह्या तीन ठिकाणीं विभागून राहिल्यासारखी शोभूं लागली. रामाच्या धनुष्यापासून सुटलेल्या त्या स्वर्गमार्गदर्शक बाणानें त्या महावीर्यवान वीराला उत्कृष्ठ गति दिली.

असो. प्रतिपक्ष्यांनीं चाल करून जाण्यास इंद्रासारखा अशक्य, विष्णूसारखा दुःसह आणि सुवर्णमाला, विशाल वक्षःस्थल, दीर्घ बाहु, उज्ज्वल मुख व पीतवर्ण नेत्र ह्यांनीं युक्त असलेला इंद्रपुत्र वाली ज्वालारहित अग्नीप्रमाणें, पुण्यक्षय झाला असतां देवलोकापासून च्युत झालेल्या ययातिप्रमाणें, अथवा प्रलयसमयीं कालानें भूतलावर पाडिलेल्या सूर्याप्रमाणें, समरांगणामध्यें पडलेला अवलोकन करितांक्षणीं लक्ष्मणासह त्या वीराला बहुमान देऊन महावीर्यवान भ्राते राम-लक्ष्मण त्याच्यासमीप गेले. बाणाचा प्रहार झाल्यामुळें तेज व प्राण

क्षीण होऊन भूमीवर निश्चेष्ट पडलेला तो वाली, रणाविषयीं गर्व चढलेल्या परंतु विनयसंपन्न व धर्मयुक्त असलेल्या रामाला आणि महाबलाढ्य लक्ष्मणाला अवलोकन करून, अर्थपरिपूर्ण वाणीनें कठोर भाषण करूं लागला. तो म्हणाला, " अरे, युद्धाकरितां मी दुसऱ्यावर क्षुब्ध झालों असतांना तुझ्याकरितां मी प्राणाला मुकलों आहें. तेव्हां मी तुझ्या सन्मुख नसतांना माझा वध करून तूं कोणता बरें पुरुषार्थ संपादन केलास ? अरे, राम कुलीन, सत्त्वशील, तेजस्वी, व्रतस्थ, परदुःख जाणणारा, प्रजेच्या हिताविषयीं तत्पर, दयाळु, मोठा उत्साहवान, काळवेळ जाणणारा आणि स्वीकारिलेलें व्रत नेटानें चालविणारा असा आहे, म्हणून सर्व प्राणी पृथ्वीवर तुझी कीर्ति सांगत असतात. राजा, दम, शांति, क्षमा, धर्म, धैर्य, सत्त्व, पराक्रम आणि उपद्रव देणाऱ्यांना दंड हे राजांचे गुण आहेत. तेव्हां ते गुण तुझ्यापाशीं आहेत; आणि तुझें कुल मोठें आहे, असें समजून तारेनें निषेध केला असतांनाहि मी सुग्रीवाशीं येऊन भिडलों. सारांश, मी दुसऱ्याशीं भिडलों असतां आणि असावध असतां तूं मला वेध करणार नाहींस, असें तुझ्यासंबंधानें तूं दृष्टीस पडण्याचे पूर्वी मला वाटलें होतें; परंतु तृणांनीं आच्छादित झालेल्या कूपाप्रमाणें धर्माचें ढोंग करून तूं लोकांचा घात करणारा असा दुराचारी, अधर्मनिष्ठ व आत्मघातकी आहेस, असें मला आतां कळून आलें. अरे, धर्माच्या मिषानें व्याप्त होऊन सज्जनांचा वेष धारण करणारा तूं वस्तुतः पापी असून गुप्त अग्नीप्रमाणें घात करणारा आहेस, हें पूर्वी माझ्या लक्ष्यांत आलें नाहीं. तुझ्या देशामध्यें अथवा नगरामध्यें जर मीं कांहीं पाप केलें नाहीं, आणि तुझी अवज्ञा सुद्धां जर केली नाहीं, तर मज निरपराध्याचा तूं कशाकरितां वध केला आहेस ? नेहमीं फलमूलांवर उपजीविका करणारा असा मी वानर तुझ्याशीं युद्ध करीत नसून दुसऱ्याशीं भिडलों असतांना तूं कशाकरितां माझा वध केलास ? अरे, तूं राजपुत्र असून दिसण्यांत मोठा मनोहर व विश्वासूक आहेस; आणि जटा व वल्कलें हें धर्माचें चिन्हहि तुझ्या ठिकाणीं दृष्टीस पडत आहे. क्षत्रिय कुलामध्यें उत्पन्न झालेला, आणि बहुश्रुत असल्यामुळें धर्माविषयीं कसलाहि संशय न राहिलेला असा कोण बरें धर्माचें कातडें पांघरून क्रूर कर्म करण्यास प्रवृत्त होईल ? राघवकुलामध्यें उत्पन्न झालेला तूं धर्मवान म्हणून जरी प्रसिद्ध असलास, तरी हलकट आहेस. तेव्हां नम्रवेष धारण करून तूं कशाकरितां भटकत आहेस ? राजा, साम, दान, क्षमा, धर्म, सत्य, धैर्य, पराक्रम आणि अपकार करणाऱ्यांना

दंड हे राजांचे गुण आहेत. रामा, फलमूलांवर उपजीविका करून वनामध्यें संचार करणारे आम्ही मृग आहों, व हा आमचा स्वभावच आहे; आणि तूं तर पुरुष आहेस. सारांश, मनुष्यानें एखाद्याचा निग्रह करण्याला भूमि, सुवर्ण आणि स्त्रीरूप हीं कारणें होत असतात. तेव्हां वनसंबंधानें अथवा माझ्या उपजीविकेच्या फलासंबंधानें तुला कसला लोभ उत्पन्न झाला आहे? न्याय, विनय आणि निग्रह व अनुग्रह हे गुण राजाचे वर्तनांत अवश्य असल्यामुळें, राजाची वागणूक कधींहि घोंटाळ्याची नसते. सारांश, राजे स्वेच्छाचारी नसतात. परंतु तूं धर्म व अर्थ ह्यांची पर्वा बाळगणारा नसून मुख्यतः कामाच्याच मागें लागलेला, क्रोधशील, अव्यवस्थित, बाण सोडण्याविषयींच तत्पर, आणि राजनीतीसंबंधानें अनियमित आहेस. हे ककुत्स्थकुलोत्पन्ना रामा, धर्माविषयीं तुझी पूज्य बुद्धि नाहीं व अर्थाकडेहि तुझें लक्ष्य नाहीं. तूं कामी असल्यामुळें इंद्रियाधीन झालेला आहेस. हे ककुत्स्थकुलोत्पन्ना, मज निरपराध्याचा बाणानें वध करून म्हणजे अर्थात् निंद्य कर्म करून तूं सज्जनांमध्यें काय बरें सांगशील? अरे, राजघातकी, ब्रह्मघातकी, गोघातकी, चोर, प्राण्यांच्या वधाविषयीं तत्पर, नास्तिक आणि ज्येष्ठ भ्रात्याचे पूर्वी विवाह करणारा हे सर्व नरकाला जाणारे आहेत. चहाडखोर, कृपण, मित्रघातकी आणि गुरुपत्नीशीं रत होणारा ह्यांना पाप्यांना प्राप्त होणारा लोक प्राप्त होत असतो, ह्यांत संशय नाहीं. अरे, माझें चर्म सज्जन धारण करीत नसून माझे केश व अस्थिहि सज्जनांनीं वर्ज केल्या आहेत; आणि तुझ्यासारखे धर्मनिष्ठ माझें मांसहि भक्षण करीत नाहींत. राघवा, शल्यक[1], श्वाविध[2], गोधा[3] शश[4] आणि पांचवा कूर्म हे पांचच पांच नखांच्या प्राण्यांपैकीं ब्राह्मण व क्षत्रिय याचें भक्ष्य आहेत. तात्पर्य, माझ्या चर्माला व अस्थींना ज्ञानी लोक स्पर्शहि करीत नसून, माझें मांसहि त्यांना अभक्ष्यच आहे. तथापि असें असतांनाहि मज पांचनखी प्राण्याचा तूं वध केलास. अरे, सर्वज्ञ तारेनें सत्य व हितकारक असा उपदेश मला केला असतांनाहि, मोहानें त्याची पर्वा न करितां मी कालाच्या तावडींत सांपडलों. हे रघुवंशजा, अधर्मचारी पतीच्या योगानें जशी सुशील स्त्री वस्तुतः सनाथ होत नाहीं, तशी ही पृथ्वी तूं नाथ असल्यामुळें वस्तुतः सनाथ झालेली नाहीं. अरे, महात्म्या दशरथापासून शठ, उपद्रवी, क्षुद्र आणि मन विनयसंपन्न आहे असें खोटेंच दर्शविणारा तूं पापी कसा उत्पन्न झालास? सज्जनांच्या धर्माचें

१ साळू, साळ. २ साळूचीच एक विशिष्ट जात. ३ नक्र. ४ ससा.

अतिक्रमण करणाऱ्या, सद्वर्तनरूप मर्यादा नाहींशीं करणाऱ्या, आणि धर्मरूप अंकुशाला न जुमानणाऱ्या रामरूप हत्तीनें माझा वध केला आहे. अशुभ, अयोग्य आणि सज्जनांनीं निंदित अशा प्रकारचें हें कर्म करून सज्जनांची गांठ पडली असतां तूं त्यांना काय बरें सांगशील? रामा, आम्ही उदासीन असतांना तूं आमचे ठिकाणीं हा आपला पराक्रम गाजविला आहेस; परंतु तुझा अपराध करणाऱ्यांचे ठिकाणीं अर्थात् तुझी भार्या हरण करणाऱ्या राक्षसाचे ठिकाणीं तूं अशा प्रकारचा पराक्रम करशील, असें मला वाटत नाहीं. हे राजपुत्रा, समरांगणामध्यें माझ्या दृष्टीस पडून जर तूं माझ्याशीं युद्ध केलें असतेंस, तर आज माझ्या हातून वध पावल्यामुळें यमदेवाचेंच दर्शन घेण्याची तुला पाळी आली असती! परंतु अदृश्य असलेला सर्प ज्याप्रमाणें निद्रिस्थ झालेल्या पापी मनुष्याचा वध करितो, त्याप्रमाणें संग्रामामध्यें अदृश्य राहून, प्रत्यक्ष युद्धामध्यें अजिंक्य असलेल्या माझा तूं वध केलास. अरे, सुग्रीवाचे हातून आपलें प्रिय करून घेण्याच्या इच्छेनें तूं माझा वध केला आहेस; परंतु ही गोष्ट तूं मला पूर्वींच सांगतास, तर एका दिवसांत मी मैथिली तुझ्याकडे आणून दिली असती, आणि तुझ्या भार्येचा अपहार करणारा तो दुरात्मा राक्षस संग्रामामध्यें गळ्याला बांधून मी जिवंत तुझ्या हवालीं केला असता! अरे, श्वेतवर्ण खेचरीचें रूप धारण केलेली श्रुति मधुकैटभांनीं पातालामध्यें नेली असतांहि ज्याप्रमाणें हयग्रीवानें पुनरपि ती भूतलावर आणिली, त्याप्रमाणें समुद्राच्या उदकामध्यें अथवा पातालामध्यें जरी सीतेला रावणानें नेऊन ठेविली असती, तरी मी तुझ्या आज्ञेनें तिला परत आणून दिली असती. अरे, मी स्वर्गाला गेल्यानंतर सुग्रीवाला राज्य प्राप्त व्हावें, हें योग्य आहे; परंतु रणामध्यें तूं माझा अधर्मानें वध केलास हें मात्र अयोग्य आहे. अरे, अशा प्रकारचा प्राणी कोणीहि झाला तरी त्याला मृत्यु हा यावयाचाच असतो; परंतु पुढें मागें तुला राज्य प्राप्त झाल्यावर, माझ्या वधासंबंधानें तुला लोकांनीं प्रश्न केला असतां त्या प्रश्नाचें तुला योग्य उत्तर काय देतां येईल, ह्याचा तूं चांगला विचार कर."

असो. बाणाच्या प्रहारामुळें विह्वल होऊन तोंड कोरडें पडलेला तो महात्मा वानरराज वाली ह्याप्रमाणें बोलून व रवितुल्य रामाला अवलोकन करून स्वस्थ राहिला.

सर्ग अठरावा

श्रीरामाचें उत्तर.

वस्तुत: कठोर परंतु दिसण्यांत हितावह, विनययुक्त आणि धर्म व अर्थ ह्यांना धरून असलेलें भाषण मूर्च्छित झालेल्या मुमुर्षु वालीनें रामाला अनुलक्षून केलें. तेव्हां निस्तेज सूर्याप्रमाणें, वृष्टि केलेल्या मेघाप्रमाणें अथवा विझलेल्या अग्नीप्रमाणें दिसत असलेला तो वानरराज सर्वोत्कृष्ट वाली रामाची निंदा करून स्वस्थ बसला असतां धर्म व अर्थ ह्या गुणांनी युक्त असलेलें भाषण रामानें त्याच्याशीं केलें.

श्रीराम म्हणाले:—"धर्म, अर्थ, काम आणि लौकिक व्यवहार जाणिल्याशिवाय तूं मूर्खपणामुळे आज माझी कां बरें येथें निंदा करीत आहेस ? हे वानरा, आचार्य म्हणून संमत असलेल्या ज्ञानवान वृद्धांना न विचारितां तूं चपलतेमुळें माझ्याशीं अशा प्रकारचें सौम्य भाषण बोलण्याचें मनामध्यें आणिलेंस, परंतु हें तुझें भाषण योग्य नाहीं. कारण मनूनें पर्वत, वनें व अरण्यें ह्यांसहवर्तमान ही भूमि इक्ष्वाकुवंशजांना दिलेली असून पशु, पक्षी व मनुष्यें ह्यांच्यावर अनुग्रह आणि ह्यांचा निग्रह करण्याचा अधिकारहि त्यानें दिलेला आहे; आणि त्याचप्रमाणें दुष्टांचा निग्रह व सज्जनांवर अनुग्रह करण्याविषयीं तत्पर, धर्म, अर्थ व काम ह्यांचें तत्त्व जाणणारा, सत्यनिष्ठ, सरळ आणि धर्मात्मा भरत ह्या पृथ्वीचें परिपालन करीत आहे. न्याय, नियम, सत्य आणि पराक्रम हीं त्या भारताचे ठिकाणीं अक्षय असल्याचें अनुभवसिद्ध आहे; व देश आणि काल जाणणारा तो भरत सांप्रत सर्व पृथ्वीचा राजा आहे. धर्मसंरक्षणार्थ त्यानें आमची व इतर राजांची योजना केलेली आहे. आम्हीहि धर्मवृद्धीची इच्छा धरून संपूर्ण पृथ्वीवर संचार करीत आहों. अरे, तो धर्मवत्सल नृपश्रेष्ठ भरत संपूर्ण पृथ्वीचें परिपालन करीत असताना धर्मनाश करण्यास कोण बरें उद्युक्त होईल ? सारांश, सर्वोत्कृष्ट अशा स्वधर्माविषयीं तत्पर असलेले आम्ही भरताची आज्ञा शिरसा मान्य करून मार्गाला सोडून जात असलेल्याचा यथायोग्य विचार करीत असतों; आणि तूं तर कृतीनें लोकनिंदेस पात्र, कामाच्याच मार्गे लागलेला, आणि धर्मवंचक आहेस; व म्हणूनच राजमार्गाला अनुसरून चालतहि नाहींस. अरे, ज्येष्ठ भ्राता, पिता आणि जो विद्या देतो तो, हे तीन धर्ममार्गानें चालणाऱ्यांचे पिते आहेत असें समजलें पाहिजे. त्याचप्रमाणें कनिष्ठ भ्राता, औरस पुत्र व

गुणी शिष्य ह्या तिघांना पुत्रांप्रमाणेंच समजलें पाहिजे, आणि धर्म हेंच त्याचें कारण होय. वानरा, सज्जनांचा धर्म सूक्ष्म असल्यामुळें तो इतरांना समजण्यास अत्यंत अशक्य आहे. प्राणिमात्राच्या हृदयामध्यें वास करणारा परमात्मा मात्र पापपुण्य जाणीत आहे. सारांश, एखाद्या जन्मांधानें दुसऱ्या जन्मांधाबरोबर एखादी वस्तु अवलोकन करण्यास उद्युक्त व्हावें, त्याप्रमाणें स्वभावतः चपल असलेला तूं तुझ्यासारख्या चपल व अशिक्षित वानरांसहवर्तमान खलबत करणारा आहेस. तेव्हां तुला धर्म कोठून समजणार? हें भाषण मी तुला स्पष्ट करून सांगतों. केवळ रागानें माझी निंदा करणें तुला योग्य नाहीं. मीं तुझा कशाकरितां वध केला, ह्याचें कारण लक्ष्यांत आण. अरे, सनातन धर्माचा त्याग करून तूं आपल्या भ्रात्याच्या भार्येचा अभिलाष धरिलेला आहेस. सारांश, हा महात्मा सुग्रीव जिवंत असतांना, वस्तुतः तुला स्नुषेप्रमाणें असलेली जी त्याची भार्या रुमा, तिचा अभिलाष तूं करीत आहेस; आणि म्हणून अर्थात्च तूं पापकर्म करणारा आहेस. तेव्हां हे वानरा, धर्माला सोडून स्वेच्छाचारानें वागत असलेल्या तुला ह्या भ्रातृभार्योपभोगरूप पातकाबद्दल मीं हा दंड केलेला आहे. हे वानरसेनानायका, लोकमर्यादा सोडून लोकविरुद्ध वर्तन करणाऱ्या तुझा निग्रह वधदंडावांचून दुसऱ्या रीतीनें करणें मला बरोबर दिसत नाहीं. तात्पर्य, मी कुलीन क्षत्रिय असल्यामुळें तुझ्या पापाची कधींहि उपेक्षा करणार नाहीं. कन्येशीं, भगिनीशीं अथवा कनिष्ठ भ्रात्याच्या भार्येशीं जो पुरुष विषयवासनेनें रत होतो, त्याला वध हाच दंड शास्त्रामध्यें सांगितला आहे. अरे, भरत पृथ्वीचें परिपालन करणारा असून आम्ही त्याच्या आज्ञेप्रमाणें वागणारे आहों; आणि तूं तर धर्माचें अतिक्रमण केलेलें आहेस. तेव्हां श्रेष्ठ जो धर्म, त्यापासून भ्रष्ट झालेल्या तुझी उपेक्षा आमच्या हातून होणें कसें बरें शक्य होईल? राजनीति जाणणारा भरत धर्मानें वागणाऱ्यांचें परिपालन धर्मानेंच करीत असून, कामाच्याच मार्गे लागलेल्यांचा निग्रह करण्याविषयीं तत्पर असतो. आणि आम्हीहि भरताची आज्ञा शिरसा मान्य करीत असून, मर्यादा सोडून वागणाऱ्या तुझ्यासारख्यांचा निग्रह करण्याविषयीं उद्युक्त आहों. शिवाय लक्ष्मणाप्रमाणें सुग्रीवाशीं माझें सख्य आहे, आणि भार्या व राज्य प्राप्त होण्याकरितां त्यानें माझें हित करण्याविषयीं प्रतिज्ञा केलेली असून मींहि वानरांसमक्ष त्याच्या मनाप्रमाणें वागण्याचें त्याला वचन दिलेलें आहे. तेव्हां दिलेलें वचन न पाळणें माझ्यासारख्याच्या हातून कसें बरें शक्य होईल? तस्मात्, हीं सर्व कारणें महत्वाचीं

व धर्माला अनुसरून असल्यामुळें, तुला जें योग्य शासन केलें आहे, तें तुला मान्य असावें. तुझा जो मीं निग्रह केला, हा सर्वस्वी धर्मच झाला आहे, असें तूं समज. धर्माकडे दृष्टि देऊन वागणाऱ्यानें मित्रावर उपकार केलाच पाहिजे. तूं जर धर्माला अनुसरून वागणारा असतास, तर मीं जी गोष्ट केली ती तूंहि केली असतीस. तात्पर्य, ज्याप्रमाणें मीं तुला शासन केलें आहे, त्याप्रमाणें तूंहि अशा प्रकारचें पातक करणाऱ्या पुरुषाधमाला शासन केलें असतेस. हे वानरश्रेष्ठा,

राजभिर्धृतदण्डाश्च कृत्वा पापानि मानवाः।
निर्मलाः स्वर्गमायान्ति सन्तः सुकृतिनो यथा॥
शासनाद्वापि मोक्षाद्वा स्तेनः पापात्प्रमुच्यते।
राजा त्वशासन्पापस्य तदवाप्नोति किल्बिषम्॥[१]

असे हे सद्वर्तनप्रतिपादक दोन श्लोक मनूंनीं सांगितलेले माझ्या ऐकण्यांत आहेत; आणि धर्मनिष्ठांनीं त्यांचा स्वीकार केला असून तुझा वध करण्यांत मीहि त्यांना अनुसरूनच वर्तन केलेलें आहे."

श्रीराम पुढें म्हणाले, "हे वानरश्रेष्ठा, पूर्वीं तुझ्यासारखें एका बौद्ध यतीनें पातक केलें असतां, मांधाता ह्या नांवाच्या माझ्या पूर्वजानेंहि त्याला योग्य असलेला असाच भयंकर दंड केलेला होता; आणि त्याचप्रमाणें मदमत्त झालेल्या पुरुषांनीं केलेल्या पापाबद्दल इतरहि भूपालांनीं असाच दंड केलेला आहे. पापी लोक पश्चात्ताप झाला असतां, आपल्या पातकाच्या क्षालनार्थ नुसत्या राजदंडावरच अवलंबून रहात नसून धर्मशास्त्रविहित प्रायश्चित्तहि करीत असतात; आणि त्याच्या योगानें त्यांचें पातक नाहींसें होत असतें. तस्मात्, तुझा संताप आतां पुरे. हे वानरश्रेष्ठा, धर्मानेंच तुझा वध झालेला आहे, आणि आम्ही स्वतंत्र नसून धर्माधीन आहों. असो. हे वानरश्रेष्ठा, तुझ्या वधाचें आणखीहि एक कारण मी सांगतों, तें श्रवण कर. हे वीरा, तें महत्त्वाचें कारण श्रवण केल्यानंतर माझ्यावर क्रोध करणें तुला योग्य होणार नाहीं. तुझा परोक्ष रीतीनें वध केल्याबद्दल माझ्या मनाला पश्चात्तापहि झालेला नाहीं, आणि क्रोध हेंहि माझ्या हातून तुझा वध होण्याचें कारण नाहीं; लोक दृश्य अथवा गुप्त राहून जाळ्यांनीं अथवा कष्टयुक्त उपायांनीं पुष्कळ मृग धरीत असतात;

१ पुरुषांच्या हातून पातकें झाली असतां राजांनीं त्यांना दंड केला म्हणजे ते निष्पाप होतात, आणि पुण्यवान सज्जनांप्रमाणें ते स्वर्गाला जातात. राजाला विदित झाल्यानंतर त्यानें शासन केल्यास अथवा सोडून दिल्यास पातकी पातकापासून मुक्त होतो; परंतु पापी पुरुषाला शासन न करणाऱ्या राजाला मात्र त्याचें पातक लागतें.

आणि मृग धावत असतांना, त्रस्त झाले असतांना, स्वस्थ बसले असतांना मृगांशीं निकरानें युद्ध करीत असतांना, आणि तसेंच गैरसावध असतांना किंवा पराङ्मुखहि असतांना मांसभक्षक पुरुष आड लपून अगर उघड रीतीनें त्यांना वेध करीत असतात. तात्पर्य, कोणत्याहि रीतीनें मृगाचा वध करण्याला दोष नाहीं. धर्मवेत्ते राजर्षी मृगयेला जात असतात. हे मृगवध निर्दोष असण्याला प्रमाण आहे, व म्हणूनच तूं प्रतिपक्ष्याशीं युद्ध करीत असून माझ्याशीं जरी युद्ध करीत नव्हतास, तरी शाखामृग असल्यामुळें मीं तुझा युद्धामध्यें बाणानें वध केला आहे. हे वानरश्रेष्ठा, प्रजेला राजेच दुर्लभ धर्म, जीवित आणि अभ्युदय प्राप्त करून देणारे आहेत, ह्यांत संशय नाहीं. त्या राजांची संग्रामावांचून हिंसा करूं नये, निंदा करूं नये, त्यांचा अवमान करूं नये आणि त्यांना अप्रिय असलेलीहि गोष्ट करूं नये. कारण हे देवच मनुष्यरूपानें भूतलावर संचार करीत असता। . तूं धर्माविषयीं मुळींच अज्ञानी असतांना केवळ क्रुद्ध होऊन वाडवडिलांपासून चालत आलेल्या मज धर्मानें वागणाऱ्याला दूषण देत आहेस."

वालीचा पश्चात्ताप.

ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां, रामाला विनाकारण दोष लाविल्याबद्दल वाली अत्यंत दुःखित झाला, आणि धर्म कोणता याविषयीं त्याला निश्चित ज्ञान झाल्यामुळें, रामाचे ठिकाणीं दोषारोप करण्याचें त्यानें पुनरपि मनामध्यें आणिलें नाहीं. तदनंतर वानराधिपति वाली हात जोडून रामाला म्हणाला, "हे पुरुषश्रेष्ठा, तूं म्हणतोस त्याप्रमाणेंच आहे, ह्यांत संशय नाहीं. कारण श्रेष्ठाच्या पुढें निकृष्ट उत्तर देण्यास समर्थ होणार नाहीं. प्रमादामुळें मीं जें पूर्वी आपणांला अप्रिय असें भाषण केलें, त्याबद्दल आपण मला दोष देऊं नका. कारण, आपण धर्मादिकांचें तत्त्व स्वानुभवानें जाणणारे असून प्रजेच्या कल्याणाविषयीं दक्ष आहां; आणि कार्य कोणतें व कारण कोणतें ह्या गोष्टींचा निश्चय करण्यामध्यें आपलें अंतःकरण निर्दोष व निर्मल आहे. तस्मात्, धर्मातिक्रमण करणाऱ्यांमध्यें अग्रगण्य म्हणून प्रसिद्ध असलेल्या माझें धर्मयुक्त उपदेशानें आपण परिपालन करा."

अंगदाचें रक्षण करण्याविषयीं वालीची रामाला प्रार्थना.

असें म्हणतां म्हणतां वालीचा कंठ अगदीं दाटून आला, आणि चिखलांत रुतलेल्या हत्तीप्रमाणें कांहीं सुचेनासें झालेला तो वाली रामाकडे पाहून रडत रडत हळू हळू त्यांना म्हणाला, "ज्याप्रमाणें सुवर्णबाहुभूषणांनीं युक्त आणि

गुणांनीं वरिष्ठ अशा अंगद नामक पुत्राबद्दल मला वाईट वाटत आहे, त्याच-प्रमाणें स्वतःसंबंधानें वाटत नाहीं. तारेकरितां मी दुःख करीत नाहीं, व बांध-वांविषयींहि मला विषाद वाटत नाहीं. बालपणापासून मीं अंगदाचें लालन केलें असल्यामुळें मी दिसेनासा झाल्यावर तो दीन होऊन उदक संपून गेलेल्या तडागाप्रमाणें शुष्क होऊन जाईल. तस्मात् रामा, बाल आणि बुद्धीनेंहि पोक्त नसलेला असा जो माझा तारेचे ठिकाणीं झालेला एकुलता एक महाबलाढ्य व प्रिय पुत्र अंगद, त्याचें आपण रक्षण करा. सारांश, सुग्रीवाविषयीं आणि त्याचप्रमाणें अंगदाविषयीं आपलें मन चांगलें असूं द्या. कारण, कर्तव्य केल्या-बद्दल रक्षण आणि अकार्य केल्याबद्दल शासन करणारेहि आपणच ठरलेले आहां. हे प्रजाधिपते, भरत आणि लक्ष्मण यांच्याशीं जशी आपली वागणूक आहे, तशीच सुग्रीव आणि अंगद ह्यांच्याशीं ठेवण्याचें मनामध्यें असावें; आणि माझ्या अपराधामुळें अपराधी ठरलेल्या त्या बिचाऱ्या तारेचा सुग्रीव अवमान न करील अशा रीतीनें आपण व्यवस्था ठेवावी. तुमच्या अधीन राहून तुमच्या मनाप्रमाणें वागणारा जो तुमच्या मर्जींतला असेल, त्याला राज्य चालविणें, स्वर्ग-प्राप्ति होणें आणि पृथ्वीचें परिपालन करणें ह्या गोष्टी शक्य आहेत. तुमच्या हातून वध व्हावा, ह्या इच्छेनें तारा 'नको नको' म्हणत असतांहि भ्रात्या सुग्रीवासहवर्तमान मीं द्वंद्वयुद्ध केलें."

इतकें रामाला सांगून तो वानरराज स्वस्थ बसला असतां, ज्ञान प्राप्त झा-लेल्या त्या वालीचें सज्जनांना संमत आणि धर्मतत्त्वविषयकअर्थानें युक्त अशा वाणीनें रामांनीं सांत्वन केलें. ते म्हणाले, "वानरश्रेष्ठा, तुला आम्हांविषयीं अथवा स्वतःविषयीं काळजी करण्याचें कारण नाहीं. धर्मशास्त्रासंबंधानें तुझ्यापेक्षां आम्ही कार्याकार्यनिश्चय करण्यांत अधिक प्रवीण आहों. जो अपराध्याला दंड करितो, आणि ज्या अपराध्याला दंड होतो, ते दोघेहि दंडास पात्र असणें आणि दंड करविणें ह्यांच्या योगानें परलोकप्राप्तीचें साधन प्राप्त करून घेत असल्यामुळें हानि पावत नाहींत. तस्मात्, हा वधरूप दंड तुला प्राप्त झाल्या-मुळें तूं पापरहित होऊन, दंडबोधक शास्त्रोक्त मार्गानें आपल्या धर्माला अनु-सरून असलेल्या शुद्ध स्वभावाप्रत प्राप्त झाला आहेस. ह्यास्तव, अन्तःकरणां-तील भय, शोक व मोह ह्यांचा तूं त्याग कर. हे वानरश्रेष्ठा, प्राक्तनकर्मामुळें जें होणार, तें तुला टाळितां येणें शक्य नाहीं. हे वानरराजा, अंगद ज्याप्रमाणें

मीहि तुझ्याशीं वागतो, त्याचप्रमाणें तो सुग्रीवाशीं व माझ्याशींहि वागेल, ह्यांत संशय नाहीं."

ह्याप्रमाणें रणामध्यें प्रतिपक्ष्याचा नाश करणाऱ्या त्या महात्म्या रामाचें धर्ममार्गाला अनुसरून असलेलें मधुर व विचारयुक्त भाषण श्रवण करून वानर-वालीनेंहि रामाशीं योग्य भाषण केलें. तो म्हणाला, "हे प्रभो, हे इंद्रतुल्य भयंकर पराक्रमी रामा, बाणानें संतप्त झाल्यामुळें कांहीं सुचेनासें होऊन अज्ञानानें मीं जें हें आपणाला उद्देशून भाषण केलें, त्याबद्दल मला क्षमा असावी. मजवर कृपा होण्याविषयीं मीं आपली प्रार्थना केली आहे."

सर्ग एकोणिसावा.

तारेचें युद्धभूमीवर आगमन.

रामबाणानें व्यथित झाल्यामुळें भूतलावर पडलेल्या त्या वानरांच्या सार्वभौम राजाला सहेतुक भाषणानें उत्तर मिळालें असतां, त्यानें कांहींएक प्रत्युत्तर दिलें नाहीं. नंतर पाषाणांनीं शरीर फुटून गेलेला, वृक्षांनीं अत्यंत ताडित झालेला आणि रामबाणानें जर्जर झालेला तो वाली प्राणप्रयाणसमयीं मूर्च्छित झाला. तेव्हां रामानें सोडिलेल्या बाणानें वानरश्रेष्ठ वालीचा युद्धामध्यें वध झाला, हें तारेनें श्रवण केलें; आणि भर्त्याचा वध हें भयंकर अप्रिय वर्तमान श्रवण करितांक्षणीं आपल्या पुत्रासहवर्तमान अत्यंत उद्विग्न होऊन ती त्यासह त्या पर्वतगुहारूप किष्किंधा नगरीपासून बाहेर निघाली. अंगदाभोंवतीं जे बलाढ्य वानर होते, तेहि धनुष्य धारण केलेल्या रामाला अवलोकन करितांक्षणीं भयभीत होऊन पळूं लागले. तेव्हां समाजरक्षकाचा वध होऊन कळपापासून दूर झालेल्या मृगांप्रमाणें, भयभीत होऊन सत्वर पळत सुटलेल्या त्या वानरांना तिनें अवलोकन केलें; आणि जसे कांहीं रामाचे बाणच मागें लागले आहेत कीं काय अशा रीतीनें भयभीत होऊन दुःखित झालेल्या त्या वानरांसमीप गेल्यावर ती दुःखाकुल झालेली ती साध्वी तारा त्यांना म्हणाली, "हे वानरहो, ज्या श्रेष्ठ राजाच्या पुढें तुम्ही चालणारे आहां, त्याला सोडून तुम्ही संकटांत सांपडल्यामुळें अत्यंत भयभीत होऊन कशाकरितां पळत आहां? लांबून वेध करणाऱ्या व दूर उभें राहून रामानें सोडिलेल्या बाणांनीं जर क्रूर

आल्या सुग्रीवानें राज्याकरितां त्या भ्राज्याचा वध केला असेल, तर पळून काय उपयोग ? त्याच्या सेवेनेंच तुमचा निभाव लागणारा आहे. "

हें त्या वानरपत्नीचें भाषण श्रवण केल्यावर, यथेष्ट रूप धारण करणारे वानर समयोचित अशा स्पष्ट शब्दांनीं तिला म्हणाले, "हे पुत्रवति स्त्रिये, तूं परत फीर, आणि आपल्या पुत्राचें रक्षण कर. रामरूपानें अंतकच वालीला मारून यमसदनीं नेत आहे. वेगावेगानें जाणाऱ्या वृक्षांनीं व प्रचंड शीलांनीं वालीनें प्रतिपक्ष्याला वेध केला असूनहि, वज्रतुल्य बाणांच्या योगानें त्याचा वध झाला आहे, आणि तो वज्रानेंच झाला आहे कीं काय, असें वाटत आहे. सांप्रत पराभव पावलेलें हें सर्व वानरसैन्य पळत सुटलें आहे. तस्मात्, तेजानें इंद्रतुल्य असलेला हा वानरराज वध पावला असतांना शूर वानरांच्या योगानें नगरीचें रक्षण करून अंगदाला अभिषेक करावा. कारण वालीचा पुत्र राज्यावर बसला असतां वानर त्याची सेवा करूं लागतील. अथवा वानर आजच किष्किंधा नगरींतील दुर्गम स्थानांमध्यें प्रवेश करतील. ते प्रविष्ट झाले असतां अपत्नीक आणि सपत्नीक असे जें दुसरे वनचर वानर येथें आहेत, तेहि त्यांच्या मागोमाग प्रवेश करतील; आणि त्या राज्यलुब्ध व पूर्वीं आमचे हातून फसले गेलेल्या सुग्रीवपक्षीय वानरांपासून आम्हांला फारच मोठें भय प्राप्त होईल."

समीपच असलेल्या वानरांचें हें भाषण श्रवण केल्यावर, मनोहर हास्यानें युक्त असलेली तारा आपल्याला योग्य असें भाषण करूं लागली. ती म्हणाली, "तो महाभाग्यवान वानरश्रेष्ठ भर्ता मृत्यु पावला असतांना पुत्राशीं, राज्याशीं अथवा स्वतःचे देहाविषयीं तरी मला काय कर्तव्य आहे ? जो हा माझा भर्ता रामानें सोडिलेल्या बाणाच्या योगानें सुग्रीवानें संग्रामामध्यें पाडिला आहे, त्या महात्म्या भर्त्याच्याच पायांपाशीं मी जातें. "

असें बोलून ती शोकाकुल झालेली तारा रडत रडत आणि दुःखानें मस्तक व ऊर बडवून घेत घेत धावूं लागली. जातां जातां भूमीवर पडलेला भर्ता तिनें अवलोकन केला. संग्रामामध्यें परावृत्त न होणाऱ्या वानरराजांचा वध करण्यास तो समर्थ असे. वज्रें फेंकण्यास समर्थ असलेल्या इंद्राप्रमाणें संग्रामामध्यें मोठमोठे पर्वत फेंकण्यास समर्थ, प्रचंड वायूप्रमाणें रणामध्यें ज्याला आवेश येई असा, मोठमोठ्या समुदायांप्रमाणें गर्जना करणारा, इंद्रतुल्य पराक्रमी, जडवृष्टि करून शांत झालेल्या मेघाप्रमाणें स्वस्थ राहिलेला, गर्जना करणाऱ्या योद्ध्याप्रमाणें भयंकर गर्जना करणारा, शूर मांसाकरितां व्याघ्रानें मारिलेल्या

मोठ्या मृगाप्रमाणें शूराच्या हातून वध पावलेला, सर्व लोकांना पूज्य, आणि आंत असलेले सर्प भक्षण करण्याकरितां गरुडानें स्थानासहवर्तमान उद्ध्वस्त करून टाकिलेल्या मार्गावरील वारुळाप्रमाणें, ध्वजासहवर्तमान रामानें उलथून पाडिलेला आपला भर्ता तिनें अवलोकन केल्यावर, धैर्य धरून हातामध्यें प्रचंड धनुष्य धारण करणाऱ्या रामाला, लक्ष्मणाला आणि त्याचप्रमाणें भर्त्याच्या कनिष्ठ भ्रात्यालाहि तिनें अवलोकन केलें. नंतर त्यांना पाहून पुढें गेल्यावर रणामध्यें वध पावून पडलेल्या भर्त्यासमीप ती आली, आणि त्याला पहातांक्षणीं दुःखाकुल व मूर्च्छित होऊन ती भूमीवर पडली. तदनंतर झोपेंतून उठलेल्या स्त्रीप्रमाणें पुनरपि सावध झाल्यावर मृत्युपाशांनीं बद्ध झालेल्या पतीला अवलोकन करून 'हे आर्यपुत्रा' असें म्हणत म्हणत ती रडूं लागली. तेव्हां कुररीप्रमाणें आक्रोश करीत असलेल्या तारेला आणि जवळ असलेल्या अंगदाला अवलोकन करून सुग्रीवाला मोठें दुःख झालें.

सर्ग विसावा.

तारेचा विलाप.

चंद्रासारख्या आल्हादकारक मुखानें युक्त असलेल्या तारेनें रामाच्या धनुष्यापासून सुटलेल्या प्राणघातक बाणाच्या योगानें भूमीवर वध होऊन पडलेल्या वालीला अवकोकन केलें. गजासारखा धिप्पाड असलेला तो वाली बाणाच्या योगानें वध पावलेला पाहून ती त्याच्या समीप जाऊन त्याला कडकडून भेटली. तेव्हां शोकानें मन संतप्त झालेली ती तारा दुःखाकुल होऊन, महापर्वताप्रमाणें दिसणाऱ्या आणि उपटून पडणाऱ्या वृक्षाप्रमाणें समरांगणांत पडलेल्या त्या वानराकरितां शोक करूं लागली. ती म्हणाली, "हे रणामध्यें भयंकर पराक्रम करणाऱ्या महावीरा, हे वानरश्रेष्ठा, सांप्रत मीं मर्यादेचें अतिक्रमण केलें आहे, असें समजून तूं माझ्याशीं भाषण करीत नाहींस काय? हे वानरश्रेष्ठा, ऊठ, आणि उत्कृष्ट शय्येवर शयन कर. अरे, तुझ्यासारखे नृपश्रेष्ठ भूमीवर शयन करीत नाहींत. हे पृथ्वीपते, पृथ्वी तुला खरोखर अतिशयच प्रिय आहे. कारण तूं सांप्रत गतप्राण झाला असूनहि मला सोडून तिचेंच आपल्या अवयवांच्या योगानें सेवन करीत आहेस. वीरा, धर्मानें युद्ध

करून तूं आज स्वर्गसाधनभूत रणभूमीमध्यें किष्किंधा नगरीप्रमाणें दुसरी एक नगरी निर्माण केली आहेस. असें नसेल तर किष्किंधा नगरी सोडून तूं येथें कशाकरितां शयन करीत आहेस ? मधुगंधानें युक्त असलेल्या वनामध्यें आमच्यासहवर्तमान ज्या तूं क्रीडा केल्यास, त्यांची ह्या वेळीं तूं परिसमाप्तिच केली आहेस. मोठमोठ्या वानरसेनानायकांच्याहि समुदायांचें संरक्षण करणारा तूं मृत्यु पावल्यामुळें मी आनंदशून्य व निराश होऊन शोकसागरामध्यें अगदीं मग्न झालें आहें. खरोखर माझें हृदय फारच बळकट आहे. कारण भूमीवर पडलेल्या तुला अवलोकन करूनहि शोकसंतप्त होऊन त्याचे अद्यापि हजारों तुकडे होऊन जात नाहींत. हे वानरराजा, सुग्रीवाच्या भार्येचा अपहार करून त्याला जें तूं हांकून लाविलेंस, त्याचें हें फल आज तुला प्राप्त झालें आहे. हे वानरराज, तुझ्या हिताची इच्छा धरून व तुझ्या कल्याणाविषयीं तत्पर राहून मीं तुला हिताची गोष्ट सांगितली असतांनाहि मोहानें तूं माझी निंदा केलीस. हे मानी राजा, हे आर्या, सौन्दर्य आणि यौवन ह्यांच्या योगानें गर्विष्ठ झालेल्या चतुर अप्सरांचीं अंतःकरणें खरोखर तूं क्षुब्ध करून टाकशील. खरोखर तुझ्या जीविताचा अंत करणारा हा कालच निःसंशय प्राप्त झाला आहे, आणि म्हणूनच दुसऱ्यांना आपल्या ताब्यांत ठेवणाराहि तूं त्या कालाच्या योगानें निरुपाय होऊन सुग्रीवाच्या तावडींत सांपडलास ! अरे, वाली दुसऱ्याशीं युद्ध करीत असतांना त्याचा वध करून म्हणजे अर्थात् अत्यंत निंद्य कर्म करूनहि कुकुत्स्थकुलोत्पन्न रामाला पश्चात्ताप होत नाहीं, हें अयोग्य आहे. पूर्वी मला कधीं दुःख भोगण्याचा प्रसंग आला नसूनहि सांप्रत अत्यंत दैन्यावस्थेस पोहोंचलेल्या मला, अनाथाप्रमाणें राहून वैधव्यांत व शोकसंतापांतच दिवस काढण्याचा प्रसंग आला आहे. सुकुमार, सुखाचीच संवय असलेला, आणि मीं लाड केलेला हा वीर अंगद क्रोधसंतप्त झालेल्या चुलत्यापाशीं कोणत्या स्थितीमध्यें राहील ? बाळा अंगदा, आपल्या धर्मवत्सल पित्याला एकदा चांगलें पाहून घे. कारण वत्सा, आतां त्याचें दर्शन तुला दुर्लभ होईल. हे वानरराजा, तूं आतां प्रवासाला निघाला आहेस. ह्यास्तव माझ्या पुत्राचें सांत्वन कर, आणि कर्तव्याचा उपदेश कर. तुझा वध करून रामानें तर मोठेंच कर्म केलें आहे. कारण, सुग्रीवाशीं केलेल्या प्रतिज्ञेसंबंधानें तो आतां त्याचा अनृणी झाला आहे. सुग्रीवा, आतां तुझे मनोरथ परिपूर्ण होऊं दे. तुला आतां रुमा प्राप्त होईल. तूं निःशंकपणें राज्याचा उपभोग घे. कारण तुझा शत्रु जो तुझा भ्राता, त्याचा आतां वध झाला आहे. हे वानरराजा,

ह्याप्रमाणें मी तुझी प्रिया विलाप करीत असतांनाहि तूं माझ्याशीं कां बरें भाषण करीत नाहींस ? येथें आलेल्या ह्या आपल्या अनेक श्रेष्ठ भार्यांकडे तरी पहा."

हा तिचा विलाप श्रवण केल्यावर चोहोंकडून जुळलेल्या दीन व दुःखाकुल वानरस्त्रिया अंगदाला कवटाळून धरून आक्रोश करूं लागल्या. नंतर तारा म्हणाली, " भूषणांनीं भूषित व वीरघातक बाहूंनीं युक्त असलेल्या वानरराजा, अंगदाला सोडून तूं कां बरें दीर्घ प्रवासाला निघाला आहेस ? अरे, प्रिय व मनोहर रूप धारण करीत असून गुणांनींहि तुजसमान असलेल्या पुत्राला सोडून देऊन ह्याप्रमाणें निघून जाणें तुला योग्य नाहीं. हे महापराक्रमी वानरसेनाधिपते, अविचारानें माझ्या हातून जर कांहीं आपल्या मर्जीविरुद्ध गोष्ट घडली असेल, तर आपण मला क्षमा करा. हे वीर, मी आपल्या चरणीं मस्तक ठेवितें."

ह्याप्रमाणें वानरींसहवर्तमान भर्त्याचे समीप दीन स्वरानें तारा रोदन करूं लागली, आणि उत्कृष्ठ कांतीनें युक्त असलेल्या त्या तारेनें, ज्या भूमीवर वाली पडला होता, त्या भूमीसमीप असलेल्या भूमीवर अन्न ग्रहण न करितां प्राण सोडण्याचा निश्चय केला.

सर्ग एकविसावा.

हनुमत्मुखें तारेचें सांत्वन.

तदनंतर आकाशांतून च्युत झालेल्या तारेप्रमाणें भूमीवर पडलेल्या त्या तारेचें वानरसेनाधिपति हनुमान हळके हळके सांत्वन करूं लागला. तो म्हणाला, " गुणदोषांमुळें जें प्राण्याच्या हातून स्वर्गनरकादि फलसाधनरूप कर्म घडलेलें असतें, त्याचें सर्व बरेंवाईट फल मरणानंतर स्वस्थ असलेल्या त्या प्राण्याला प्राप्त होतें. वास्तविक तूं शोचनीय असतांना शोचनीय अशा दुसऱ्या कोणाकरितां शोक करीत आहेस ? आणि स्वतःच दीन असून दुसऱ्या कोणा दीनाकरितां तुला कळवळा येत आहे ! बुडबुड्याप्रमाणें असलेला हा देह नाहींसा झाल्यावर खरोखर कोण बरें कोणाच्या शोकास पात्र होणार आहे ! कुमार अंगदाकडे पाहून ह्या वालीच्या मरणोत्तरसमयीं कोणतीं कृत्यें करण्यास योग्य आहेत, ह्याचा तूं पुत्रवतीनें विचार केला पाहिजे. प्राण्यांचें जन्ममरण ह्याप्रमाणें अनियमित असल्याचें तुला विदितच आहे. तस्मात् हे समंजस राजपत्नि,

ह्या प्रसंगीं लौकिकी रोदन वगैरे न करितां भर्त्याला परलोकीं सुखावह होणारें जें कांहीं असेल, तेंच तुला केलें पाहिजे. जो जिवंत असतांना शेंकडों, हजारों, लाखों वानरांची मनाप्रमाणें उपजीविका चालत असे, तो आज मृत्यु पावला आहे. ज्या अर्थी ह्यानें नीतिशास्त्ररूप तत्त्वाला अनुसरून राज्य चालविलें आहे, आणि ज्या अर्थी साम, दान व क्षमा ह्यांविषयीं तत्पर राहूनच इतर वानरांशीं हा वागत असे, त्या अर्थी धर्मानें पृथ्वी जिंकणाऱ्या राजांचें स्थान ह्याला प्राप्त होईल. ह्याच्याविषयीं शोक करण्याचें तुला कारण नाहीं. हे निर्दोष राजपत्नि, सर्व वानरश्रेष्ठ, हा तुझा पुत्र अंगद, आणि वानर व ऋक्षगण ह्यांचा अधिपति जो वाली त्याचें राज्य, हीं सर्व तुझ्यामुळेंच सनाथ होणारीं आहेत. तस्मात् हे राजपत्नि, शोकाकुल झालेल्या ह्या उभयतां चुलत्या-पुतण्यांना तूं उत्तरकार्य करण्याची अनुज्ञा दे, आणि तूं हातीं धरलेल्या ह्या अंगदाला पृथ्वीचें परिपालन करूं दे. शास्त्रामध्यें संततीचें जें कर्तव्य सांगितलें आहे, आणि राजासंबंधानें जें कर्तव्य करणें सध्यां प्राप्त झालें आहे, तें सर्व केलें पाहिजे. शोक करीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कालानें अवश्य घडणारीच गोष्ट ही झालेली आहे. तस्मात्, वानरराज वालीचें उत्तरकार्य होऊन अंगदाला राज्याभिषेक झाला पाहिजे, म्हणजे आपल्या पुत्राला सिंहासनावर बसलेला पाहून तुझ्या मनाला स्वस्थता वाटेल."

तारेचें हनुमंताला उत्तर.

हें त्याचें भाषण श्रवण केल्यावर, पति मरणानें दुःखित झालेली तारा समीप उभ्या असलेल्या हनुमानाला म्हणाली, "अंगदासारखे शंभर पुत्र एका बाजूला घालून वध पावलेल्या ह्या वीराच्या देहाला आलिंगन देणें हें जर दुसऱ्या बाजूला घातलें, आणि सुखाची तुलना करून पाहिली, तर वध पावलेल्याहि ह्या वीराच्या देहाला आलिंगन देणेंच मला जास्त सुखावह आहे. आतां वानरराज्यालाहि मी योग्य नाहीं, आणि अंगदाचीहि मी मालकीण नाहीं. संप्रत सर्व गोष्टींविषयीं त्याचा चुलता सुग्रीवच त्याला माझ्यापेक्षां जवळ आहे. हनुमंता, अंगदाला मीं अभिषेक करावा, असा विचार तूं मनामध्येंहि आणूं नको. कारण हे वानरश्रेष्ठा, पितृतुल्य असलेला सुग्रीवच माझ्या पुत्राला सुख देण्याविषयीं अधिकारी आहे, मज मातेचा तो अधिकार नाहीं. सारांश, वानरराज वालीच्या आश्रयापेक्षां इहलोकीं अथवा परलोकीं अधिक योग्य असें

मला कांहींही नाहीं. संग्रामामध्यें परावृत्त न होतां वध पावलेल्या ह्या वीरानें स्वीकारिलेल्या या शय्येचेंच सेवन करणें मला योग्य आहे."

सर्ग बाविसावा.

वालीचा सुग्रीवाला उपदेश.

सर्व प्रकारें मुमुर्षु होऊन हलके हलके श्वासोच्छ्वास करणारा वाली इकडे तिकडे पाहूं लागला असतां, प्रथमतः कनिष्ठ भ्राता सुग्रीवच त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां विजयी झालेल्या त्या वानरराज सुग्रीवाला हांक मारून तो स्पष्ट वाणीनें प्रेमपूर्वक त्याला म्हणाला, "सुग्रीवा, तूं मला दोष लावूं नको. कारण, प्राक्तनकर्माच्या प्रभावामुळें अवश्य होणाऱ्या बुद्धिभ्रमाच्या तावडींत मी माझे इच्छेविरुद्ध सांपडल्यामुळें अशा गोष्टी घडून आल्या. बा सुग्रीवा, आपणां उभयतांना एकदम सुख होणें आपल्या नशिबीं लिहिलेलेंच नव्हतें, असें मला वाटतें. आणि म्हणूनच आपल्या ह्या बंधुविषयक प्रेमाचा परिणाम विपरीत झाला, असें मी समजत आहें. आतां ह्या वनचर वानरांच्या राज्याचा तूं आजच स्वीकार कर, आणि मीहि आजच यमसदनीं जात आहें, असें समज. जीवित, राज्य, विपुल संपत्ति आणि निष्कलंक यश ह्या सर्वांचा त्याग करून हा मी सत्वर चालता होत आहें. राजन्, ह्या अवस्थेमध्यें जें कांहीं मी सांगत आहें, तें जरी करण्यास कठीण असलें, तरीहि तूं करच. सुखाला पात्र, सुखामध्यें वाढलेला आणि बाल असूनहि बुद्धीनें बालिश नसलेला हा अंगद अश्रूंनीं मुख व्याप्त होऊन भूमीवर पडलेला तूं अवलोकन कर; आणि प्राणापेक्षांहि मला अधिक प्रिय असलेल्या परंतु मीं सोडिलेल्या ह्या माझ्या गुणसंपन्न पुत्राचें तूं औरस पुत्राप्रमाणें सर्व प्रकारें परिपालन कर. हे वानरराजा, माझ्याप्रमाणें तूंच आतां ह्याचा पिता, दाता, परित्राता आणि भय प्राप्त झालें असतां सर्व प्रकारें अभय देणारा असा आहेस. तारेपासून झालेला हा माझा वैभवशाली पुत्र पराक्रमामध्यें तुझी बरोबरी करणारा आहे. तेव्हां रामाशीं विरोध धरणाऱ्या राक्षसांचा वध करण्याविषयीं हा तुझ्या पुढें होईल. हा बलाढ्य, तरुण व तेजस्वी तारापुत्र संग्रामामध्यें पराक्रम करून आपल्याला अनुरूप अशीं कर्में करील. ही सुषेणकन्या ताराहि सूक्ष्म गोष्टींचा निर्णय करण्याविषयीं आणि नानाप्रकारचीं संकटें आलीं असतां त्यांतून पार पडण्याचे

उपाय जाणण्याविषयीं सर्व प्रकारें अतिशयच समर्थ आहे. हा जें चांगलें म्हणेल, तें तूं निःसंशय करीत जा. तारेनें योग्य ठरविलेली कोणतीहि गोष्ट विपरीत होत नाहीं. रघुवंशज रामाचेंहि जें कांहीं कार्य कर्तव्य असेल, तें तूं निःशंकपणें कर. तें न करण्यांत तुझा अधर्म होणार असून, त्याचा अपमान झाल्यामुळें तुझाहि तो वध करील. सुग्रीवा, ही दिव्य सुवर्णमाला तूं धारण कर. कारण हिचे ठिकाणीं असलेली प्रशस्त जयश्री मी मृत झाल्यावर हिला सोडून जाईल."

ह्याप्रमाणें भ्रातृप्रेमामुळें वालीनें सुग्रीवाला सांगितलें असतां, हर्षाचा त्याग करून पुनरपि ग्रहण लागलेल्या चंद्राप्रमाणें तो दीन झाला. वालीच्या त्या भाषणामुळें सुग्रीवाच्या मनांतील वैरबुद्धि नाहींशी झाली, व त्यानें केलेल्या योग्य उपदेशाप्रमाणें लक्ष्यपूर्वक वागण्याचें मनांत धरून वालीच्या अनुज्ञेनें त्यानें ती सुवर्णमाला स्वीकारिली.

वालीचा अंगदाला उपदेश.

असो. सुग्रीवाला ती सुवर्णमाला देऊन व तेथें असलेल्या आपल्या पुत्राकडे पाहून, मरण्याविषयीं निश्चित झालेला तो वाली प्रेमानें अंगदाला म्हणाला, "देशकालाकडे लक्ष्य देऊन, प्रिय व अप्रिय प्रकार सहन करून, आणि प्रसंग असतां सुखदुःख सोसून तूं आजपासून सुग्रीवाच्या मतानें वागत जा. हे महापराक्रमी पुत्रा, मीं ज्याप्रमाणें नेहमीं तुझें लालन केलें, त्याप्रमाणें जर तूं वागूं लागलास, तर सुग्रीव तुझी विशेषशी पर्वा करणार नाहीं. हे शत्रुदमना, ह्याच्या अनुपकाऱ्याशीं अथवा ह्याच्या शत्रूशीं कधींहि सख्य न करितां जितेंद्रिय व स्वामी अशा सुग्रीवाच्या कार्याविषयीं तत्पर राहून तूं नेहमीं त्याच्या मर्जीप्रमाणें वागत जा. ह्याच्याशीं तूं फार लगटपणाहि करूं नको, आणि ह्यापासून दूरदूरहि रहात जाऊं नको. कारण हीं दोन्हीहि मोठीं अनर्थावह आहेत. तस्मात्, तूं मध्यम मार्गाकडे लक्ष्य देऊन वागत जा."

वालीचें प्राणोत्क्रमण.

ह्याप्रमाणें अंगदाला सांगितल्यावर रामबाणामुळें अतिशयच व्यथित झालेला तो वाली डोळे फिरवूं लागला, आणि भयंकर असे आपले दांत वासून गतप्राण झाला. तेव्हां सेनानायक वध पावल्यामुळें वानर आक्रोश करूं लागले, आणि तेथें असलेले ते सर्वहि वानरश्रेष्ठ शोक करूं लागले. ते म्हणाले, "महापराक्रमी असा हा वानरराज वाली स्वर्गाला जातांक्षणीं आज ही किष्किंधा नगरी,

उपवनें, पर्वत व अरण्यें हीं सर्व शून्य दिसत आहेत; आणि वानरश्रेष्ठ वालीचा वध झाल्यामुळें आम्ही सर्व वानर निस्तेज झालों आहों. अहो, महात्म्या व महापराक्रमी गोलभ गंधर्वाशीं ज्यानें पंधरा वर्षेपर्यंत रात्रीं अथवा दिवसां न थांबतां मोठें युद्ध करून सोळावें वर्षी त्याचा वध केला, आणि त्या दुष्ट गंधर्वाचा वध केल्यावर दंष्ट्रांच्या योगानें भयंकर दिसणाऱ्या ज्या वालीनें आम्हां सर्वांचें भय नाहींसें केलें, त्याच ह्या वालीचा आज कसा बरें वध झाला!"

असो. गायींच्या अधिपतीचा वध झाला असतां ज्याप्रमाणें वनांत संचार करणाऱ्या गायींना सिंहयुक्त महावनामध्यें स्वस्थता वाटत नाहीं, त्याचप्रमाणें वानरराज वीर वालीचा वध झाल्यावर वध करणाऱ्या रामचंद्रानें युक्त असलेल्या त्या वनामध्यें वानरांना स्वस्थता वाटेनाशी झाली; आणि ह्याप्रमाणें वाली गतप्राण झाल्यानंतर दुःखसागरांत निमग्न झालेल्या तारेनें भर्त्याच्या मुखाकडे पाहून त्याला कवटाळून धरिलें, व महावृक्षाच्या आश्रयाला असलेली लता ज्याप्रमाणें तो वृक्ष तुटून पडला असतां भूमीवर पडते, त्याप्रमाणें ती भूमीवर पडली!

सर्ग तेविसावा.

ताराविलाप.

तदनंतर वानरराज वालीचें तें मुख हुंगीत हुंगीत ती जगविख्यात तारा आपल्या मृत पतीला म्हणाली, "हे वीरा, माझ्या सांगण्याप्रमाणें न वागल्यामुळें विषम पाषाणांनीं व्याप्त आणि म्हणूनच अत्यंत दुःखदायक अशा ह्या भूतलावर तूं दुःखानें शयन करीत आहेस. हे वानरराजा, खरोखर पृथ्वीच तुला माझ्यापेक्षां जास्त प्रिय आहे. कारण तिला कवटाळून धरून तूं शयन करीत आहेस; आणि माझ्याशीं नुसतें भाषणहि करीत नाहींस. हे साहसप्रिया, हा रामरूप विधाताच सुग्रीवाचे अधीन झाला आहे. तस्मात्, सुग्रीवालाच पराक्रमी समजलें पाहिजे. मोठमोठ्या अस्वलांनीं व वानरांनीं तुज बलाढ्याची सेवा केलेली आहे. तेव्हां त्यांचा व शोक करणाऱ्या अंगदाचा दुःसह विलाप आणि माझे हे शब्द श्रवण करून तूं कां बरें जागा होत नाहींस! ज्या ठिकाणीं पूर्वी तूंच आपल्या शत्रूंचा वध करून त्यांना निजविलेंस, तीच ही वीरशय्या होय; आणि त्याच शय्येवर तूं आज युद्धामध्यें वध पावून शयन

करीत आहेस. हे युद्धप्रिया, मी तुला प्रिय असून तूं शुद्धसात्त्विक कुलामध्यें उत्पन्न झालेला आहेस. तेव्हां हे मान्या, मला एकटीला अनाथ सोडून देऊन तूं गेलास, हें काय बरें ? खरोखर विचारी पुरुषानें आपली कन्या शूराला कधींहि देऊं नये. पहा—मी शूरभार्या असल्यामुळें एकाएकीं मला वैधव्य येऊन माझा घात झाला आहे ! आज माझी मानमान्यता नाहींशी होऊन माझ्या शाश्वत सुखाचीहि परिसमाप्ति झाली आहे ! आणि अगाध अशा शोकसागरामध्यें मी बुडून गेलें आहें. खरोखर हें माझें बळकट हृदय अभेद्य पाषाणाचेंच केलेलें आहे. कारण वध ' पावलेल्या भर्त्याला पाहूनहि ह्याचे आज शेंकडों तुकडे झालेले नाहींत. स्वभावतःच मला प्रिय असलेला हा माझा मित्ररूप भर्ता शूर असून शत्रूला प्रहार करण्याविषयीं पराक्रमी असतांनाहि वध पावला ! पतिहीन झालेली स्त्री खुशाल पुत्रवती असो, किंवा तिच्याजवळ धनधान्यांची समृद्धि असो, ज्ञानी लोक तिला ' विधवा ' असें म्हणतात. हे वीरा, इंद्रगोपप्रभृति कीटकांसारखा रंगीत पलंगपोस जिच्यावर अंथरला आहे, अशा स्वतःच्या शय्येवर ज्याप्रमाणें तूं शयन करीत होतास, त्याप्रमाणें स्वतःच्याच शरिरापासून उत्पन्न झालेल्या ह्या रक्ताच्या थारळ्यांत तूं शयन करीत आहेस. हे वानरश्रेष्ठा, धूळ आणि रक्त ह्यांनीं चोहोंकडून व्याप्त झालेल्या ह्या तुझ्या शरिराला मला हातांनीं आलिंगन देतां येत नाहीं. त्या अतिभयंकर वैरामध्यें सुग्रीव आज कृतकृत्य झाला ! कारण, रामानें सोडिलेल्या एका बाणाच्या योगानें आज त्याचें भय नाहींसें झालें. तूं मृत्यु पावल्यामुळें तुझ्या मुखाकडे निरखून पहात असलेल्या मला, तुझ्या हृदयामध्यें खिळून राहिलेल्या बाणामुळें तुझ्या शरिराला आलिंगन देतां येत नाहीं. ”

हें तिचें भाषण श्रवण केल्यावर, तेथें असलेल्या नीलानें, पर्वताच्या गुहेमध्यें लीन होऊन राहिलेल्या देदीप्यमान सर्पाप्रमाणें त्याच्या शरिरामध्यें खिळून राहिलेला तो बाण बाहेर काढिला. तो बाण रक्तानें भरला असल्यामुळें, बाहेर निघतांना त्याचें तेज अस्ताचलाशीं किरणें संयुक्त झालेल्या सूर्याप्रमाणें दिसूं लागलें, व त्याच्या शरिराला झालेल्या जखमांतून सर्व बाजूंनीं रक्ताचे प्रवाह, ताम्र व गैरिक ह्या धातूंनीं युक्त अशा पर्वतावरील जलधारांप्रमाणें वाहूं लागले ! नंतर रणभूमींतील धुळीनें व्याप्त झालेल्या भर्त्याच्या देहावरील धूळ झाडूं लागलेल्या तारेनें, रामबाणानें वध पावलेल्या आपल्या शूर भर्त्याला अश्रूंनीं स्नान घातलें; आणि सर्वांगावर रक्ताचा सडा होऊन मरून पडलेल्या त्या पतीला

अवलोकन करून, पिंगटवर्ण नेत्रांनीं युक्त असलेल्या अंगद नामक पुत्राला ती तारा म्हणाली, " वत्सा, अत्यंत भयंकर अशी ही पित्याची शेवटली अवस्था अवलोकन कर. प्राक्तनपापकर्मामुळें उत्पन्न झालेल्या वैराचा अंत झाला ! बाळा, बालसूर्याप्रमाणें उज्ज्वल शरिरानें युक्त असलेल्या ह्या आपल्या यमसदनाला गेलेल्या वानरराज मान्य पित्याला अभिवंदन कर."

ह्याप्रमाणें तारेनें सांगितलें असतां अंगद उठला, आणि 'मी अंगद आहें' असें म्हणत म्हणत त्यानें आपल्या पुष्ट व वर्तुल हातांनीं पित्याचे चरण धरिले. तेव्हां वाली कांहींच बोलत नाहीं असें पाहून तारा म्हणाली, " अंगद आपणांला अभिवंदन करीत असतांना आपण पूर्वींप्रमाणें त्याला 'दीर्घायु हो' असा आशीर्वाद कां बरें देत नाहीं ? सिंहानें एकाएकीं मारून टाकिलेल्या वृषभाचे समीप स्थित असलेल्या सवत्स गायीप्रमाणें मी पुत्राला घेऊन गतप्राण झालेल्या आपल्या शेजारीं उभी आहें. आपण संग्रामयोग करून त्या अवभृथामध्यें रामबाणरूप उदकानें मज पत्नीशिवाय कसें बरें स्नान केलें ? देवराज इंद्रानें युद्धामध्यें संतुष्ट होऊन जी प्रिय सुवर्णमाला आपणांला दिली होती, ती माझ्या कां बरें दृष्टीस पडत नाहीं ? अस्ताचलास जाणाऱ्या सूर्याची प्रभा ज्याप्रमाणें त्या पर्वतराजाला सोडून जात नाहीं, त्याप्रमाणें आपण गतप्राण झालां असूनहि आपले ठिकाणीं असलेलें राजतेज आपणांला सोडून अद्यापि गेलें नाहीं. माझें तें हितकारक भाषण आपण ऐकिलें नाहीं, आणि म्हणूनच आपलें निवारण करण्यास मी समर्थ झालें नाहीं. ह्यास्तव, युद्धामध्यें आपला वध झाल्यामुळें माझाहि पुत्रासहवर्तमान घात झाला असून, ही राजलक्ष्मी आपणांबरोबर माझाहि त्याग करीत आहे."

सर्ग चोविसावा.

सुग्रीवाचा दुःखमूलक वैताग.

अतिवेगवान, दुस्तर व प्रचंड शोकसागरामध्यें मग्न झालेल्या तारेला अवलोकन करून, बलाढ्य सुग्रीवाला आपल्याला अयोग्य अशा भ्रातृवधाचें दुःख होऊं लागलें. त्याचें मुख अश्रूंनीं भरून गेलें, आणि मनाला खेद वाटून दासांनीं परिवेष्टित आणि शोक करीत असलेला तो विचारी सुग्रीव क्षणभर तिच्याकडे पाहून हलके हलके रामासमीप गेला, आणि राजचिन्हें व सर्पतुल्य

भयकर बाण ह्यांनीं युक्त असून हातामध्यें धनुष्य धारण केलेल्या यशस्वी व व उदार रामाला म्हणाला, " राजन्, प्रतिज्ञा केल्याप्रमाणें तूं हें दृष्ट फलानें युक्त असलेलें कर्म केलें आहेस; परंतु हे राजपुत्रा, जीवितहि व्यर्थ झालेल्या माझें मन भोग्य वस्तूंपासून आज परावृत्त झालें आहे. रामा, ही राजपत्नी अतिशय रडत असल्यामुळें, किष्किंधा नगर दुःखसंतप्त होऊन अतिशय आक्रोश करीत असल्यामुळें, आणि राजाचा वध झाल्या कारणानें अंगदाचें जीवितहि पितृवियोगानें संशयित झाल्याचें दिसत असल्यामुळें, राज्याचे ठिकाणीं माझें मन रमत नाहीं. हे इक्ष्वाकुवंशजश्रेष्ठा, भ्रात्यानें माझा अतिशयच पराभव केला असल्या कारणानें, क्रोधामुळें व असहिष्णुतेमुळें पूर्वी मला त्याचा वध होणें बरें वाटलें होतें; परंतु हा वानरसेनानायक वध पावल्यावर आतां मला अत्यंत दुःख होत आहे. स्वजातीला उचित असें वर्तन करून कशाहि रीतीनें वर्तन ठेवण्याचा प्रसंग आला, तरी त्या ऋष्यमूक नामक श्रेष्ठ पर्वतावर वास्तव्य करणें आज श्रेयस्कर आहे, असें मला वाटतें; परंतु त्याचा वध करून स्वर्ग प्राप्त झाला तरी तो नको. ' मी तुझा घात करणार नाहीं, तूं चालता हो ' असे जें हा विचारी महात्मा मला म्हणाला, तें त्याचें म्हणणें त्यालाच योग्य असून, हें माझें वधरूप कर्म, व तो वध घडवून आणणारें भाषण मात्र मलाच योग्य आहे. कोणीहि भ्राता जरी कितीही विषयलंपट असला, तरी राज्यप्राप्तीचें सुख आणि भ्रातृवधामुळें होणारें दुःख ह्यांचा सारासार विचार करूं लागल्यावर गुणवान भ्रात्याचा वध करणें माझ्याप्रमाणें त्याला कसें बरें रुचेल? स्वतःची अपकीर्ति होण्याचा प्रसंग येईल, ह्या भयामुळें वालीला माझा वध अभिमत नव्हता, तरी माझी बुद्धि दुष्ट असल्यामुळें माझ्या हातून मात्र हा भ्रात्याचे प्राण जाण्यास कारणीभूत होणारा अन्याय झालेला आहे. वृक्षशाखेचा तडाका बसल्यामुळें पलायन करण्याचा प्रसंग येऊन मी जेव्हां तुझ्या नांवानें एक मुहुर्तभर आक्रोश करीत बसलों, तेव्हां ' तूं असें फिरून करूं नको ' एवढेंच ह्या वालीनें सांत्वनपूर्वक मला सांगितलें. सारांश बंधुत्व, मोठेपणा आणि धर्म हीं ह्यानें पाळिलीं, व मीं मात्र काम, क्रोध व वानरस्वभाव हीं दर्शविलीं. मित्रा, विश्वरूपाचा वध केल्यामुळें जसें इंद्राला पातक प्राप्त झालें, तसें विचार करण्यास, मनामध्यें आणावयास आणि अवलोकन करण्यासहि अयोग्य असें हें पातक भ्रात्याच्या वधामुळें मला प्राप्त झालें आहे. इंद्राचें पातक पृथ्वी, उदक, वृक्ष आणि स्त्रिया ह्यांनीं खुशाल स्वीकारिलें; परंतु हे वानराचें पातक घेण्याची

कोणाला इच्छा आहे? आणि तें घेण्यास समर्थ तरी कोण आहे! राघवा, कुलाचा नाश ज्याच्या योगानें होईल, अशा प्रकारचें हें धर्मविरुद्ध कर्म माझ्या हातून घडल्यामुळें मी प्रजेच्या सन्मानास अथवा यौवराज्यासहि पात्र नाहीं. तेव्हां मी राज्याला पात्र कोठून होणार? इहलोकीं निंद्य, परलोकींहि परमार्थाच्या आड येणारें आणि क्षुद्र प्राण्यालाच योग्य असलेलें पातक माझ्या हातून घडलें असल्यामुळें, पर्जन्यवृष्टीच्या उदकाचा प्रवाह जसा सखल प्रदेश व्याप्त करून टाकितो, तसा हा प्रचंड शोक मला व्यापून टाकीत आहे. सहोदर भ्रात्याचा वध हेच ज्याचे दुसरे अवयव व केश आहेत, आणि संताप हेंच ज्याचें डोकें, सोंड, मस्तक व दांत आहेत, असा हा पापमय प्रचंड हत्ती मद-दत्त होऊन नदीच्या तीराप्रमाणें मला धडका मारीत आहे. हे पुरुषश्रेष्ठा राघवा, निस्तेज आणि म्हणूनच अग्नीमध्यें तापत घातलेलें सुवर्ण जसें मळ नाहींसा करून टाकितें, तसें हें माझ्या मनाला लागून राहिलेलें दुःसह पातक माझें जन्मांतरार्जित पुण्य नाहींसें करीत आहे. राघवा, महाबलाढ्य वानरसेनाधिपतीचें हें कुल, माझ्याकरितां आणि ह्या अंगदाच्या शोकतापामुळें अर्धवट मेल्यासारखें झालें आहे, असें मला वाटतें. पित्याला पुन्नामक नरकापासून तारणारा सज्जन, आणि पित्याच्या आज्ञेत वागणारा असा अंगदासारखा पुत्र प्राप्त होणें सुलभ नाहीं; आणि जेथें सहोदर भ्रात्याची गांठ पडेल, असा कोणता प्रदेशहि येथें विद्यमान नाहीं. हा श्रेष्ठ वीर अंगद आज जिवंत राहील, असें मला वाटत नाहीं. तथापि हा जर जिवंत राहिला, तर त्याचें परिपालन करण्याकरितां त्याची माताहि जिवंत राहील; परंतु शोकामुळें दीन झालेली ही तारा पुत्रा-वांचून मात्र जिवंत राहणारच नाहीं, असें मला निश्चित वाटत आहे. तस्मात्, भ्रात्याशीं व त्याच्या पुत्राशीं सख्य व्हावें एतदर्थ मी अत्यंत प्रदीप्त अग्नीमध्यें प्रवेश करितों. हे श्रेष्ठ वानर तुझ्या आज्ञेमध्यें वागणारे आहेत, व हे सीतेचा शोध लावितील. हे राजपुत्रा, मी परलोकीं गेल्यावरहि हें तुझें संपूर्ण कार्य सिद्धीस जाईल. ह्यास्तव रामा, कुलघातकी आणि म्हणूनच जिवंत राहाण्यास अयोग्य अशा मज पाप्याला तूं अग्निप्रवेश करण्याविषयीं अनुज्ञा दे."

तारेचा वैताग.

ह्याप्रमाणें दुःखित होऊन सुग्रीवानें केलेलें भाषण श्रवण केल्यावर, शत्रु-पक्षीय वीरनाशक रघुवीर रामाच्याहि नेत्रांमध्यें अश्रु आले, आणि क्षणभर

त्याला कांहीं सुचेनासेंहि झालें. तो त्याच वेळीं दुःखामध्यें मग्न झाल्यामुळें रोदन करणारी तारा अत्यंत उत्सुक, वारंवार इकडे तिकडे पहाणाऱ्या, जगत्पालक व पृथ्वीसारख्या क्षमाशील रामाच्या दृष्टीस पडली. सुंदर नेत्रांनीं युक्त असलेली ती वानराधिपतीची स्वामिनी व वानरराज वालीची उदार पत्नी पतीला कवटाळून भूमीवर पडली असतां, श्रेष्ठ मंत्र्यांनीं तिला उठविलें. तेव्हां भर्त्याला कवटाळण्याकरितां तडफडत असलेल्या त्या तारेला ते मुख्य मुख्य मंत्री भर्त्यापासून दूर नेऊं लागले असतांना, स्वतःच्या तेजानें सूर्यासारखा प्रकाशमान होत असलेला राम हातामध्यें धनुर्बाण घेतलेला तिनें अवलोकन केला; व राजलक्षणांनीं संपन्न, मनोहर नेत्रांनीं युक्त, आणि पूर्वीं कधींच पहाण्यांत न आलेला असा तो पुरुषश्रेष्ठ अवलोकन केल्याबरोबर, हा काकुत्स्थ आहे, असें त्या मृगनयनेनें पक्कें जाणिलें. तेव्हां संकटांत सांपडल्यामुळें दुःखित झालेली ती कुलीन तारा विवळत विवळत तत्काल त्या इंद्रतुल्य व अजिंक्य अशा महापराक्रमी रामाचे समीप गेली; आणि शोकामुळें देहभानावर नसलेली ती बिचारी तारा, शुद्ध अंतःकरणानें युक्तच संग्रामांत लक्ष्यभेद करण्याविषयीं सर्वांपेक्षां अधिक अशा त्या रामाला म्हणाली, "आरक्तवर्ण नेत्रांनीं युक्त असलेला तूं योगिजनांनाहि प्राप्त होण्यास अशक्य आहेस, जितेंद्रिय आहेस व उत्कृष्ट धर्मानें चालणारा आहेस. तुझें ज्ञान होणें दुर्घट आहे. तुझी कीर्ति कधींहि क्षीण होणारी नाहीं व तूं पृथ्वीप्रमाणें क्षमाशील असून ज्ञानी आहेस. हातामध्यें धनुर्बाण धारण केलेला तूं महाबलाढ्य असून, तुझें शरीरहि बांधेसूद आहे; व तुझ्याच हस्तें वध पावलेला वाली मनुष्यदेहामध्यें प्राप्त होणाऱ्या सुखाचा त्याग करून दिव्य देहानें प्राप्त होणाऱ्या सुखाचा उपभोग घेत आहे. यास्तव हे वीरा, ज्या बाणाच्या योगानें माझ्या प्रिय पतीचा वध झाला, त्याच बाणाच्या योगानें तूं माझा वध कर, म्हणजे मी तत्काल त्याचे समीप जाईन. त्या वालीला माझ्यावांचून चैन पडावयाचें नाहीं. हे निर्मलकमलपत्राक्षा, स्वर्गामध्यें नानाप्रकारच्या रक्तपुष्पांचे गजरे मस्तकामध्यें घालून अद्भुत वेष धारण केलेल्या अप्सरांचा जरी त्याला समागम झाला, तरी तो मला पाहूं लागेल, आणि मी त्याच्या दृष्टीस पडलें नाहीं, म्हणजे त्या अप्सरांचाहि तो उपभोग घेणार नाहीं. सारांश हे वीरा, ज्याप्रमाणें सीतेचा विरह झाल्यामुळें ऋष्यमूक पर्वताच्या तटासमीप असलेल्या रम्य प्रदेशामध्येंहि तूं शोकाकुल व निस्तेज झाला आहेस, त्याचप्रमाणें तो वाली स्वर्गामध्येंहि माझा विरह झाल्यामुळें शोक-

ग्रस्त व निस्तेज होईल! तात्पर्य स्त्रीचा वियोग झाला असतां तरुण पुरुषाला कसें दुःख होतें, हें तूं तर जाणीत आहेस. तेव्हां हें लक्ष्यांत आणून तूं माझा वध कर, म्हणजे माझ्या विरहामुळें वालीला दुःख होणार नाहीं. हे राजपुत्रा, आपल्याला स्त्रीवधाचा दोष लागेल, असें जर तुज महात्म्याला वाटत असेल, तर तेंहि बरोबर नाहीं. ही तारा वालीचा आत्माच आहे, असें समजून तूं माझा वध कर, म्हणजे स्त्रीहत्येचा दोष तुला लागणार नाहीं. अरे, शास्त्रविहित अनुष्ठानाचा पतीसहवर्तमान अधिकार असल्यामुळें, आणि स्त्री हा पतीचा अर्धा आत्मा आहे, अशा अनेक श्रुती असल्यामुळें स्त्री वस्तुतः पुरुषाहून भिन्न नाहीं. शिवाय स्त्रीदानासारखें दुसरें दानहि ज्ञानवानांच्या दृष्टीनें ह्या जगतामध्यें नाहीं. ह्यास्तव, तूंहि धर्माकडे लक्ष्य देऊन मला त्या माझ्या प्रियाचे स्वाधीन कर. कारण हे वीरा, तुझ्या हातून हें दान झालें म्हणजे माझ्या पतीच्या वधाचें तुला पातक लागणार नाहीं. मी अनाथ व दुःखाकुल झालें असून सांप्रत मला आपल्या पतीपासून हे श्रेष्ठ मंत्री दूर नेत आहेत. तेव्हां अशा अवस्थेमध्यें असलेल्या माझा वध न करणें तुला योग्य नाहीं. गजाप्रमाणें विलासी, गतीनें युक्त, श्रेष्ठांना योग्य अशी उत्कृष्ट सुवर्णमाला धारण करणारा आणि वानरांमध्यें श्रेष्ठ असा जो माझा विचारी पति वाली त्याच्यावांचून मी फार दिवस जिवंत राहाण्यास समर्थ नाहीं."

ह्याप्रमाणें तारेनें विनंति केली असतां, तिचें सांत्वन करून तो महात्मा प्रभु राम तिच्याशीं हितावह भाषण करूं लागला. तो म्हणाला, "हे वीरपत्नि, तूं असें भलतेंसलतें मनामध्यें आणूं नको. हें सर्व जगत् विधात्यानें निर्माण केलें असून, यांत भोगावें लागणारें हें सर्व सुखदुःखहि त्या विधात्यानेंच केलें आहे, असें श्रुतीनें सांगितलें आहे; आणि म्हणूनच त्रैलोक्यांतील प्राणी त्याच्या अधीन असून त्यानें जें ठरविलें असेल, तें टाळण्यास समर्थ होत नाहींत. तुझ्या पुत्राला यौवराज्य प्राप्त होईल, आणि तें प्राप्त झालें म्हणजे तुलाहि पहिल्याप्रमाणेंच पराकाष्ठेचा आनंद होईल. हे राजपत्नि, शूरांच्या स्त्रिया कधीं शोक करीत बसत नाहींत. ही जी गोष्ट झाली, ती तशीच व्हावयाची म्हणून विधात्यानें ठरविलें होतें."

ह्याप्रमाणें त्या महात्म्या, शत्रुतापन व महाप्रभावी रामानें तिचें सांत्वन केलें असतां, उत्कृष्ट वेष व रूप ह्यांनीं युक्त असलेली ती तारा आपलें सुरू असलेलें तोंड बंद करून स्वस्थ राहिली!

सर्ग पंचविसावा.

राममुखें सर्वांचें सांत्वन.
(कालसामर्थ्यवर्णन.)

लक्ष्मणासहवर्तमान असलेला तो ककुत्स्थकुलोत्पन्न राम त्यांच्याचप्रमाणें शोक करूं लागला, आणि सुग्रीवाचें व अंगदासहवर्तमान तारेचें सांत्वन करण्याकरितां म्हणाला, "शोकसंतापामुळें मृताला कधींहि सुगति प्राप्त होत नाहीं. तस्मात्, आतां ह्यानंतर जें कांहीं कर्तव्य असेल, तें तुम्ही करा. लोकव्यवहाराप्रमाणें वागलेंच पाहिजे, आणि त्याप्रमाणें तुम्ही अश्रुहि ढाळिलेतच; परंतु आतां मरणानंतर जें कांहीं कर्तव्य असेल, तें करा. वेळ निघून गेली म्हणजे कोणतेंहि सत्कर्म करितां येत नाहीं. जगतामध्यें सर्व कांहीं कालावरच अवलंबून असून कर्मेंहि कालवरच साध्य होत असतात; आणि त्याचप्रमाणें धर्माचा अधिकार असलेल्या प्राण्यांना विहित असलेले जे ज्योतिष्टोमादि याग, ते होण्याचाहि कालच कारण आहे. कोणतेंहि कर्म कालाचा आश्रय असल्यावांचून कोणालाहि करितां येत नाहीं, व कालाचा आधार असल्यावांचून विहित कर्म करण्यालाहि पुरुष समर्थ होत नाहीं लोकव्यवहार हा प्राक्तनकर्मावर अवलंबून आहे, आणि त्या कर्माला कालाचाच मुख्य आश्रय आहे. कालामुळें अवश्य घडणाऱ्या गोष्टी घडण्याला कधीं कालातिक्रमण होत नाहीं, व त्या कधीं आधींहि घडून येत नाहींत. सारांश, प्राक्तनकर्माच्या कचाट्यांत सांपडलेल्या कोणत्याहि प्राण्याला अवश्य घडणारी गोष्ट टाळितां येत नाहीं. ह्या कालस्वरूप ईश्वराच्या ठिकाणीं कोणाविषयींहि पक्षपात नाहीं. तो टाळण्याकरितां कोणताहि उपाय चालत नाहीं. त्याच्यापुढें कसल्याहि पराक्रमाची मात्रा चालत नाहीं. मित्र आणि ज्ञातिसंबंध ह्यांचाहि कांहीं उपयोग होत नाहीं, आणि तो भगवान काल कोणाच्या इच्छेप्रमाणेंहि वागणारा नाहीं. सुखदुःखादि प्राप्त होणें हें सर्व कालाधीन असलेल्या आपापल्या कर्माचेंच फल आहे, असें विवेकी पुरुषानें मनांत जाणावें. कारण धर्म, अर्थ आणि काम हे कालाला अनुसरून प्राप्त होत असतात. साम व दान ह्यांनीं संपादन केलेल्या ऐश्वर्याच्या योगानें शुभ कर्माचें फल जो राज्याचा उपभोग, तो वानरराज वालीला इहलोकीं प्राप्त झाला होता, आणि सांप्रतहि त्याला स्वकर्माचेंच फल प्राप्त झालें आहे. सारांश, स्वधर्मामुळें त्या महात्म्यानें इहलोकीं स्वर्ग संपादन करून

ठेविला होता, आणि सांप्रत युद्धामध्यें प्राणाला मुकल्यामुळें त्याला तो प्राप्तहि झाला आहे. ही कालकृत व्यवस्था अपरिहार्य आहे, आणि तीच वानरसेनाधिपति वालीला प्राप्त झाली आहे. तस्मात्, आतां शोक पुरे झाला. समयाला उचित असें जें कर्म, तें आतां होऊं द्या."

वालीचें और्ध्वदेहिक.

हें रामाचें भाषण संपल्यावर, देहभानावर नसलेल्या सुग्रीवाला शत्रुदमन लक्ष्मण म्हणाला, "सुग्रीवा, मरणानंतर कर्तव्य असें ह्या वालीचें और्ध्वदेहिक कर्म तूं कर, आणि तारा व अंगद ह्यांसहवर्तमान तूं वालीला दहन करण्याच्या उद्योगाला लाग. वालीचा संस्कार करण्याकरितां तूं पुष्कळ शुष्क काष्ठें व दिव्य चंदन जमविण्याची आज्ञा कर, व मनामध्यें खिन्न झालेल्या ह्या दीन अंगदाचें तूं सांत्वन कर. असा पोरकट विचार मनामध्यें आणूं नको. हें किष्किंधा नगर तुझ्या अधीन आहे. पुष्पें, नानाप्रकारचीं वस्त्रें, घृत, तेल, सुगंधि द्रव्यें आणि इतरहि आवश्यक साहित्यें हीं सर्व अंगद घेऊन येईल. हे तार, सत्वर लगबगीनें जा, आणि तेवढी पालखी घेऊन ये. कारण ह्या प्रसंगीं योग्य त्वराच फायदेशीर होणारी आहे. पालखी वाहून नेण्याचा सराव असलेले समर्थ व बलाढ्य वानर तयार होऊं द्या, म्हणजे ते वालीला घेऊन जातील."

सुमित्रेचा आनंद वृद्धिंगत करणारा व शत्रुपक्षीय वीरांचा घात करणारा लक्ष्मण सुग्रीवाला ह्याप्रमाणें सांगून आपल्या भ्रात्यासमीप उभा राहिला. नंतर लक्ष्मणाचें भाषण श्रवण केल्यावर अंतःकरणाची धांदल उडून गेलेला तार पालखी आणण्याचा उद्देश मनांत धरून सत्वर गुहेमध्यें गेला, आणि पालखी घेऊन परत फिरला. वाहाण्याचा सराव असलेले शूर वानर ती पालखी घेऊन येत होते. ती दिव्य शिबिका रथासारखी असून राजाला उचित अशा मोठ्या मूल्यवान आसनानें ती युक्त होती. तिच्या आसमंताद्भागीं पक्ष्यांचीं चित्रें काढलेलीं होतीं. नानाप्रकारच्या वृक्षांच्या चित्रांनीं तिला शोभा आणिलेली होती. पायदळांच्या चित्रांनीं ती व्याप्त झालेली होती. सर्व बाजूंनीं तिची रचना उत्तम प्रकारें केलेली होती, आणि जाळ्या व खिडक्या ह्यांनीं युक्त असून ती सिद्धांच्या विमानाप्रमाणें दिसत होती. तिच्या रचनेची योजना फार उत्कृष्ठ होती. ती विशाल असून कारागिरांनीं उत्तम प्रकारें बनविलेली होती. काष्ठनिर्मित क्रीडापर्वतांनीं ती युक्त होती. मोहक असें काम तिच्यावर केलेलें होतें. उत्कृष्ठ भूषणें व माळा ह्यांनीं ती संपन्न असून चित्रविचित्र पुष्पांच्या योगानें

सुशोभित केलेली होती. वर पिंजरी घालून आच्छादित केलेली होती. आरक्त-वर्ण चंदनानें ती भूषित केलेली होती. पुष्पसमुदायांनीं ती व्याप्त झालेली होती. आणि बालसूर्यासारखा ज्यांचा वर्ण आहे, अशा उज्ज्वल कमलमालांनीं ती आच्छादित झालेली होती.

अशा प्रकारची ती शिबिका अवलोकन करून राम लक्ष्मणाला म्हणाला, "वालीला सत्वर न्या, आणि त्याचा और्ध्वदेहिक संस्कार करा." ह्याप्रमाणें रामानें सांगितलें असतां, अंगदासहवर्तमान आक्रोश करीत असलेल्या सुग्रीवानें गतप्राण झालेल्या त्या वालीला नानाप्रकारच्या अलंकारांनीं, पुष्पांनीं व वस्त्रांनीं भूषित करून पालखींत ठेविलें; आणि "नदीच्या तीराजवळ ह्याचें और्ध्व-देहिक करा" म्हणून आज्ञा करून तो म्हणाला, "नानाप्रकारचीं असंख्य रत्नें उधळीत उधळीत वानरांनीं पुढें जावें, आणि त्यांच्या मागून पालखी जावी. सारांश, ह्या भूतलावर राजांच्या संपत्ति ज्या प्रकारच्या दृष्टीस पडतात, त्या प्रकारच्या संपत्तींच्या योगानें वानरांनीं राजाचें क्रियाकर्म करावें."

सुग्रीवाच्या ह्या आज्ञेप्रमाणें वानरांनीं वालीचा और्ध्वदेहिक संस्कार सत्वर केला. नंतर बंधुवध झालेले ताराप्रभृति सर्व वानर अंगदाला सत्वर कवटाळून आक्रोश करीत करीत वालीकडे चालते झाले. तदनंतर वालीचे अधीन असलेल्या सर्व वानरस्त्रिया एकत्र जमल्या, आणि 'हे वीरा, हे वीरा,' असें म्हणून त्या आपल्या प्रिय पतीविषयीं अधिकच करुणस्वरानें आक्रोश करीत करीत मागोमाग चालल्या. तेव्हां त्या वानरस्त्रियांच्या रोदनस्वराच्या योगानें वनामध्यें प्रतिध्वनि निघूं लागल्या-मुळें वृक्षसमुदाय आणि पर्वत चोहोंकडून आक्रोशच करीत आहेत कीं काय असा भास होऊं लागला. पर्वतावरून वहात येणाऱ्या एका नदीच्या निर्जन व जलानें परिपूर्ण अशा वाळवंटावर असंख्य वनचर वानरांनीं चिता तयार केली. नंतर श्रेष्ठ श्रेष्ठ वानरांनीं आपल्या खांद्यांवरून पालखी खालीं उतरली, आणि शोकाकुल झालेले ते सर्व वानर एकांत स्थलाचा आश्रय करून उभे राहिले. पालखींत पडलेल्या पतीला अवलोकन करितां क्षणीं तारेला अत्यंत दुःख झालें, आणि त्या वालीचें मस्तक आपल्या मांडीवर ठेवून ती विलाप करूं लागली.

तारा म्हणाली:—"हे मजवर प्रेम करणाऱ्या वानरमहाराजा, हे नाथा, हे महामान्य, हे महापराक्रमी, हे प्रिया, माझ्याकडे पहा. अरे, शोकानें व्याप्त झालेल्या ह्या स्त्रियांकडे तूं कां बरें पहात नाहींस! हे मान्य, गतप्राण झालेल्याहि

तुझें मुख जिवंत असलेल्या पुरुषाप्रमाणें आनंदित व अस्ताचलाला गेलेल्या सूर्याप्रमाणें आरक्तवर्ण दिसत आहे. हे महाराजा, रामाच्या रूपानें हा काळच तुला परलोकीं ओढून नेत आहे, आणि रणामध्यें एकाच बाणाच्या योगानें तुझा वध करून यानें आम्हां सर्वांना विधवा करून टाकिलें आहे. हे राजाधिराज, ज्यांना उड्या मारितां येत नाहींत, अशा या तुझ्या वानरस्त्रिया तुझ्याकरितां पायांनीं चालत चालत फारच दूर आल्या आहेत, हें तुझ्या गांवीं सुद्धां कसें येत नाहीं? खरोखर चंद्रासारख्या आल्हादकारक मुखांनीं युक्त असलेल्या ह्या तुझ्या प्रिय भार्या आहेत; परंतु हे वानराधिपते, तूं सांप्रत ह्यांच्याकडे अथवा सुग्रीवाकडे कां बरें पहात नाहींस? राजा, हे तुझे तारप्रभृती मंत्री आले आहेत, आणि हे नगरवासी लोक तुझ्याभोंवतीं गराडा देऊन खेद करीत आहेत. तस्मात् हे शत्रुदमना, तूं ह्या मंत्र्यांना जाण्याची अनुज्ञा दे, म्हणजे आम्ही सर्वहि पूर्वीप्रमाणें तुझ्यासह वनामध्यें क्रीडा करूं."

ह्याप्रमाणें पतीच्या शोकानें व्याप्त झालेली तारा विलाप करीत पडली असतां शोकाकुल झालेल्या वानरस्त्रियांनीं तिला उठविलें. तदनंतर शोकानें ज्याचें अंतःकरण ग्रस्त झालें आहे, अशा त्या अंगदानें रडत रडत आपल्या त्या पित्याला सुग्रीवाच्या साहाय्यानें चितेवर ठेविलें. नंतर यथाविधि अग्नि देऊन अंतःकरणामध्यें व्याकुळ झालेल्या त्या अंगदानें फारच दूर मार्गाला लागलेल्या आपल्या पित्याला एक उलटी प्रदक्षिणा केली, आणि त्या वालीचा यथाविधि संस्कार करून त्याला उदक देण्याकरितां श्रेष्ठ श्रेष्ठ वानर शुभ जलानें युक्त असलेल्या पवित्र नदीवर गेले. तदनंतर अंगदाला पुढें करून सुग्रीव आणि तारा ह्यांसहवर्तमान तेथें एकत्र जुळलेल्या वानरांनीं वालीच्या नांवानें पाणी सोडिलें. तेव्हां दीन सुग्रीवाप्रमाणें दीन होऊन त्याच्याचप्रमाणें शोक करूं लागलेल्या महाबलाढ्य ककुत्स्थकुलोत्पन्न रामानें वालीचे और्ध्वदेहिक संस्कार करविले. असो. नंतर इक्ष्वाकुवंशज श्रेष्ठ रामाच्या बाणानें उघडपणें वध पावलेल्या त्या महापराक्रमी व प्रदीप्त अग्नीप्रमाणें तेजस्वी असलेल्या वालीचें दहन करून सुग्रीव लक्ष्मणासहवर्तमान असलेल्या रामासमीप गेला.

सर्ग सव्विसावा

सुग्रीवाला राज्याभिषेक.

तदनंतर आर्द्र वस्त्रानें युक्त व शोकसंतप्त झालेल्या सुग्रीवाभोंवतीं गराडा देऊन वानरसेनेचे अधिपति उभे राहिले, आणि ब्रह्मदेवासमीप जाऊन उभे राहाणाऱ्या ऋषींप्रमाणें, महापराक्रमी व सरळ रीतीनें वागणाऱ्या रामापाशीं जाऊन सर्वहि हात जोडून स्थित झाले. तदनंतर बालसूर्याप्रमाणें आरक्तवर्ण मुखानें युक्त व सुवर्णाचा पर्वतच कीं काय असा धिप्पाड असलेला वायुपुत्र हनुमान हात जोडून म्हणाला, " श्रीरामा, उत्तम दंष्ट्रा आणि समृद्ध बल ह्यांनीं युक्त असलेल्या महात्म्या वानरांना प्राप्त होण्यास अतिदुर्घट असलेलें हें वाडवडिलांपासून चालत आलेलें प्रचंड राज्य आपल्या प्रसादामुळें प्राप्त झालें आहे. आतां आपली अनुज्ञा झाल्यावर शुभ नगरामध्यें प्रवेश करून सुग्रीव सुहृद्गणांसहवर्तमान सर्व कार्य उरकून टाकील, आणि स्नान करून हा नानाप्रकारचे सुगंध, औषधि, पुष्पें आणि रत्नें ह्यांच्यायोगानें विशेषेंकरून तुझें यथाविधि पूजन करील. ह्यास्तव ह्या पर्वताच्या रमणीय गुहेमध्यें तूं जा, आणि स्वामी ह्या नात्यानें सुग्रीवाचा वानरांशीं संबंध घडवून आणून तूं त्यांना आनंद दे. "

ह्याप्रमाणें हनुमानानें सांगितलें असतां राम हनुमानाला म्हणाला, " हे विनयसंपन्न हनुमाना, चौदा वर्षें संपूर्ण होत तोंपर्यंत मी ग्रामामध्यें अथवा नगरामध्यें प्रवेश करणार नाहीं. कारण मी पित्याची आज्ञा शेवटास नेणारा आहें. ह्यास्तव ह्या वानरश्रेष्ठ वीर सुग्रीवानें अत्यंत समृद्ध अशा दिव्य गुहेमध्यें प्रवेश करावा, आणि ह्यालाच सत्वर यथाविधि राज्याभिषेक व्हावा. "

ह्याप्रमाणें हनुमानाला सांगितल्यानंतर, सदाचार जाणणारा राम सदाचार-संपन्न आणि महाबलाढ्य व महापराक्रमी अशा हनुमानाला म्हणाला, " अंगदालाहि यौवराज्याचा अभिषेक करीव. कारण हा वीर, ज्येष्ठ जो वाली त्याचा ज्येष्ठ पुत्र असून पराक्रमानें त्याची बरोबरी करणारा आहे, आणि म्हणूनच यौवराज्याला पात्र आहे. हे विनयसंपन्ना, हे वर्षाकालचे चार महिने आहेत; पैकीं पर्जन्यानें युक्त असा हा वर्षाकालसंबंधीं श्रावण मास दोन ऋतूं-पैकीं पहिल्याच ऋतूंतला आहे. तस्मात्, हा उद्योगाचा समय नव्हे. तूं शुभ नगरीमध्यें प्रवेश कर, आणि मी लक्ष्मणासहवर्तमान तोंपर्यंत ह्या पर्वतावर वास्तव्य करीन. हे विनय सुग्रीवा, ही पर्वताची गुहा रमणीय, विशाल व

हवाशीर असून कमलपुष्पांची आणि उदकाची हिच्यामध्यें समृद्धि आहे. तेव्हां मी ह्या गुहेमध्यें वास्तव्य करीन. कार्तिक लागल्यावर तूं रावणाच्या वधाविषयीं यत्न कर. हा आपला संकेत ठरला आहे. आतां तूं स्वस्थानाप्रत जा. अंगदाला यौवराज्याचा अभिषेक कर, आणि सुहृदांना आनंद दे."

ह्याप्रमाणें रामानें अनुज्ञा दिल्यावर वानरश्रेष्ठ सुग्रीव वालीनें रक्षण केलेल्या रमणीय किष्किंधा नगरीमध्यें प्रविष्ठ झाला. तेव्हां हजारों वानर त्या वानरराजाच्या मागोमाग गेले, आणि सर्व बाजूंनीं त्याच्या भोंवतीं उभे राहिले. नंतर सर्व मंत्र्यांनीं वानरगणाधिपति सुग्रीवाला अवलोकन 'करितांक्षणीं मस्तकानें त्याला प्रणाम करून साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां स्वस्थ अंतःकरणानें युक्त असलेल्या त्या मंत्र्यांना उठवून व त्यांच्याशीं संभाषण करून तो वीर्यवान व महाबलाढ्य सुग्रीव भ्रात्याच्या शांत अंतःपुरामध्यें प्रविष्ठ झाला. तो भयंकर पराक्रम करणारा वानरश्रेष्ठ सुग्रीव प्रविष्ठ झाल्यावर इंद्राला अभिषेक करणाऱ्या देवांप्रमाणें सुहृदांनीं त्याला अभिषेक केला. ज्यावर सुवर्णाचें काम केलेलें आहे, असें श्वेत छत्र वानरांनीं त्याच्याकडे आणिलें; आणि त्याचप्रमाणें सुवर्णदंडांनीं युक्त व यशस्कारक अशा शुभ्र चौऱ्या, सर्व प्रकारचीं बीजें, औषधि व चिकाळू वृक्षांच्या पारंब्या, पुष्पें, शुभ्र वस्त्रें, श्वेतवर्ण अनुलेपनें, सुगंधि पुष्पें, भूमीवर येणारीं कमलें, दिव्य चंदन, नानाप्रकारचीं पुष्कळ सुगंधि द्रव्यें, अक्षता, सुवर्ण, वाघंटीं, मध, तूप, दहीं, व्याघ्रचर्म आणि उत्कृष्ठ पादुका हें सामानहि ते घेऊन आले; आणि गोरोचन व मनशीळ हें अनुलेपनद्रव्य बरोबर घेऊन आनंदित झालेल्या सोळा श्रेष्ठ कन्याहि तेथें आल्या. तदनंतर त्यांनीं वानरश्रेष्ठ सुग्रीवाला यथाविधि अभिषेक करण्याकरितां नानाप्रकारच्या वस्त्रांनीं व भक्ष्य पदार्थांनीं द्विजश्रेष्ठ ब्राह्मणांना संतुष्ट केलें. दर्भाचीं परिस्तरणें घालून प्रज्वलित केलेल्या अग्नीमध्यें मंत्रवेत्त्या लोकांनीं घृताचा समंत्रक होम केला. राजवाड्यांतील हेमप्रतिष्ठान नांवाच्या रम्य, उत्कृष्ठ आस्तरणें घातलेल्या आणि चित्रविचित्र पुष्पांनीं सुशोभित केलेल्या गच्चीवर एक श्रेष्ठ आसन घालून त्यावर सुग्रीवाला मंत्र म्हणून यथाविधि प्राङ्मुख बसविलें. नद्या व नद आणि आसमंताद्भागीं असलेलीं तीर्थें ह्यांपासून उदक आणून, आणि त्याचप्रमाणें सर्व समुद्रांपासूनहि निर्मळ जल आणून वानरश्रेष्ठांनीं सुवर्णकुंभामध्यें ठेविलें. अष्टवसूंनीं ज्याप्रमाणें सहस्रनयन इंद्राला अभिषेक केला, त्याचप्रमाणें बैलाचीं पवित्र शिंगें व सुवर्ण-

कलश ह्यांमध्यें तें निर्मल व सुगंधि उदक घालून महर्षींनीं सांगितल्याप्रमाणें शास्त्रोक्त पद्धतीनें गज, गवाक्ष, गवय, शरभ, गंधमादन, मैंद, द्विविध, हनुमान आणि जांबुवान ह्यांनीं सुग्रीवाला अभिषेक केला.

अंगदाचा यौवराज्याभिषेक.

ह्याप्रमाणें सुग्रीवाला राज्याभिषेक झाल्यावर वानरश्रेष्ठ आनंदित होऊन गर्जना करूं लागले. नंतर रामाची आज्ञा शेवटास नेण्याकरितां वानराधिपति सुग्रीवाला आलिंगन देऊन त्याला यौवराज्याचा अभिषेक केला. तेव्हां सर्व महात्म्या सदय वानरांनीं 'शाबास, शाबास' म्हणून सुग्रीवाची प्रशंसा केली. अशा प्रकारचें वर्तमान त्या किष्किंधा नगरींत घडल्यामुळें सर्वहि संतुष्ट होऊन महात्म्या रामाची व सुग्रीवाची वारंवार स्तुति करूं लागले. तेव्हां पर्वताच्या गुहेमध्यें असलेली व पताका आणि ध्वज ह्यांनीं सुशोभित झालेली ती रमणीय किष्किंधा नगरी तुष्ट व पुष्ट जनांनीं व्याप्त दिसूं लागली.

असो. ह्याप्रमाणें झालेल्या महाभिषेकाचें वर्तमान महात्म्या रामाला निवेदन करून, आणि आपली भार्या रुमा प्राप्त करून घेऊन, देवराज्याचा स्वीकार करणाऱ्या इंद्राप्रमाणें त्या वानरसेनाधिपति वीर्यवान सुग्रीवानें वानरराज्याचा स्वीकार केला.

सर्ग सत्ताविसावा.

श्रीरामाचें प्रस्रवण पर्वतीं वास्तव्य.

सुग्रीव गुहेमध्यें प्रविष्ट होऊन त्याला राज्याभिषेक झाल्यावर, भ्रात्यासहवर्तमान राम प्रस्रवण पर्वताकडे आले. तो पर्वत व्याघ्र व मृग ह्यांनीं नादित झालेला होता. भयंकर गर्जना करणाऱ्या सिंहांनीं व्याप्त झालेला होता. नानाप्रकारच्या झांकरांनीं व वेलींनीं तो अगदीं झांकला गेलेला होता. अनेक वृक्षांनीं तो गजबजलेला होता. ऋक्ष, वानर, गोपुच्छ व मार्जार ह्यांनीं त्याचा आश्रय केलेला होता. तो मेघसमुदायाप्रमाणें दिसत होता, आणि सर्वदा कल्याणकारक व पुण्यवर्धक असा होता. त्या पर्वताच्या शिखरावर एक मोठी विस्तीर्ण गुहा वास्तव्य करण्याकरितां लक्ष्मणासहवर्तमान रामानें स्वीकारिली. सुग्रीवाशीं बेत केल्यावर तो निष्पाप रघुनंदन विनयसंपन्न आणि लक्ष्मीवर्धक अशा आपल्या भ्रात्या लक्ष्मणाशीं समयोचित व भारदस्त भाषण करूं लागला. तो म्हणाला,

"ही पर्वताची गुहा रमणीय, विशाल व हवाशीर आहे. तस्मात्, लक्ष्मणा, पर्जन्यकाल संपेपर्यंत आपण ह्या गुहेमध्यें वास्तव्य करूं. हें पर्वतशिखर रमणीय व उत्कृष्ठ असून श्वेतवर्ण, कृष्णवर्ण आणि ताम्रवर्ण शिलांनीं हें भूषित झालेलें आहे. हें नानाप्रकारच्या धातूंनीं व्याप्त झालेलें आहे. नदीसंबंधीं बेडूक ह्या ठिकाणीं आहेत. नानाप्रकारच्या वृक्षसमुदायांनीं हें सुंदर दिसत आहे. चित्रविचित्र लतांनीं हें युक्त आहे. अनेक प्रकारच्या पक्ष्यांचा येथें किलबिलाट चाललेला आहे. उत्कृष्ठ मयुरांच्या शब्दांनीं हें नादित झालेलें आहे. मालतीचीं व कुदाचीं झांकरें, निर्गुडी, शिरस व प्रफुल्लित कळंब, अर्जुनसांदडा आणि साल ह्या वृक्षांनीं हें सुशोभित झालेलें आहे. लक्ष्मणा, प्रफुल्लित कमलांच्या योगानें भूषित झालेलें हें रमणीय सरोवर आपल्या गुहेपासून फारसें लांब नसेल. ईशान्येच्या बाजूस सखल असलेल्या प्रदेशावर असलेली ही गुहा सुखसाधनच होईल; आणि पश्चिमेच्या बाजूनें किंचित् चढ असलेली ही गुहा निवाऱ्याचीहि असेल. लक्ष्मणा, गुहेच्या दाराशीं पसरलेल्या कज्जलपर्वताप्रमाणें विस्तृत, कृष्णवर्ण, सपाट व सुखावह अशी एक शिळा आहे. बा लक्ष्मणा, आकारानें विदीर्ण झालेल्या कज्जलपर्वतासारखें दिसत असून आकाशांत आलेल्या ढगा-प्रमाणें भासणारें असें हें शुभ पर्वतशिखर उत्तरेच्या बाजूला तूं अवलोकन कर, आणि त्याचप्रमाणें दक्षिण दिशेस असलेलें दुसरें एक शिखर पहा. नानाप्रकारच्या धातूंनीं झळकत असलेलें, आणि श्वेत वस्त्रासारखें भासमान होत असलेलें हें शिखर कैलासशिखराची बरोबरी करणारें आहे. चित्रकूटा-चलावर असलेल्या जान्हवीतुल्य मंदाकिनीप्रमाणें अत्यंत निर्मल अशी पूर्व-वाहिनी नदी गुहेसभोवतीं असलेली तूं अवलोकन कर. चंदन, तिळवा, साल, तमाल, कस्तुरी, मोगरा, पद्मक, सरल आणि अशोक ह्यांच्या योगानें ही सुशोभित झालेली आहे. देवनळ, तिमिद, बकुल, केतक, हिंताळ, तिवस, कळंब, वेत आणि बाहवा अशा अनेक प्रकारच्या तीरावरील वृक्षांनीं सुशोभित असल्यामुळें वस्त्रें व भूषणें ह्यांनीं युक्त व अलंकार धारण केलेल्या स्त्रीप्रमाणें ही दिसत आहे. शेंकडों पक्षिगणांमुळें नानाप्रकारच्या ध्वनींनीं ही नादित झालेली असून, परस्परांवर प्रेम करणाऱ्या चक्रवाक पक्ष्यांच्या योगानें ही भूषित झालेली आहे. अत्यंत रमणीय वाळवंटांनीं ही युक्त असून हंस व सारस पक्ष्यांनीं हिचा आश्रय केलेला आहे, आणि नानाप्रकारच्या रत्नांनीं युक्त असलेली ही नदी हास्य करीत असल्यासारखी दिसत आहे. कोठें कोठें

नील कमलांनीं, कोठें कोठें आरक्त कमलांनीं व कांहीं ठिकाणीं श्वेतवर्ण व दिव्य कमलकलिकांनीं ही आच्छादित झाल्यासारखी दिसत आहे. शेंकडों जलचर पक्ष्यांनीं व मुनिगणांनीं आश्रय केलेली ही सौम्य व रमणीय नदी मयूर आणि क्रौंच पक्ष्यांच्या ध्वनीनें नादित झालेली आहे. चंदनवृक्षांच्या अत्यंत रमणीय रांगा तूं अवलोकन कर, आणि मनाप्रमाणें उगवलेल्या अशा ह्या ह्या ककुभ वृक्षांच्या रांगा दिसत आहेत, त्याहि तूं पहा. हे शत्रुनाशका, हा प्रदेश अत्यंत रमणीय आहे. आपणांला येथें करमणूक होईल. तेव्हां आपण खुशाल येथें वास्तव्य करूं. अद्भुत वनांनीं युक्त असलेली ही सुग्रीवाची रमणीय किष्किंधा नगरी येथून फार लांब नाहीं. कारण मृदंग आणि आडंबर[1] ह्यांसहवर्तमान गायनोपयुक्त वाद्यांचा व गर्जना करीत असलेल्या वानरांचा ध्वनि येथें ऐकूं येत आहे. ह्यावरून भार्या प्राप्त होऊन वानरश्रेष्ठ सुग्रीवाला राज्यहि मिळालें आहे, आणि प्रचंड ऐश्वर्य प्राप्त झाल्यामुळें सुहृदांनीं परिवेष्टित असलेला तो सुग्रीव निःसंशय आनंद करीत आहे."

ह्याप्रमाणें बोलून, अनेक उत्कृष्ठ वस्तूंनीं भरलेल्या दऱ्या व कुंजवनें ज्यावर आहेत, अशा त्या प्रस्रवण पर्वतावर लक्ष्मणासहवर्तमान तो रघुवंशज राम वास्तव्य करूं लागला. परंतु अत्यंत सुखावह आणि सुखसाधनभूत अनेक द्रव्यांनीं युक्त असलेल्या त्या पर्वतावर वास्तव्य करीत असलेल्या रामाचें यत्किंचित्‌हि चित्तरंजन झालें नाहीं. कारण विशेषतः उदयाचलावर असलेला चंद्र दृष्टीस पडला असतां प्राणापेक्षांहि अधिक प्रिय असलेली जी रावणानें नेलेली भार्या, तिचें स्मरण होत असल्यामुळें रात्रीं शय्येवर पडला असतांना त्याला कधींहि निद्रा येत नसे; आणि त्या वियोगजन्य शोकामुळें नेत्र अश्रूंनीं भरून येऊन त्याच्या मनाला मुळींच चैन पडत नसे. तेव्हां नेहमीं दुःखपरायण होऊन शोक करीत असलेल्या त्या ककुत्स्थकुलोत्पन्न रामाला समदुःखी भ्राता लक्ष्मण नम्रपणानें म्हणाला, "हे वीरा, आतां हें दुःख करणें पुरें झालें. तुझ्यासारख्याला शोक करणें हें प्रशस्त नाहीं. कारण शोक करीत असलेल्या पुरुषाचे सर्वहि मनोरथ जागच्या जागींच राहातात, हें तुला विदितच आहे. हे रघुनंदना, तूं जगतामध्यें उद्योगतत्पर, देवकार्यार्थ वाहिलेला, आस्तिक, धर्मशील व व्यवसायी म्हणून प्रसिद्ध आहेस; आणि पराक्रम दर्शविण्याचें स्थान जो संग्राम, त्यामध्यें विशेषतः कपटाचें अवलंबन करणाऱ्या त्या शत्रु राक्षसांचा वध करण्यास तूं

१ ढोल, रणढोल.

उद्योगशील बनल्यावांचून समर्थ होणार नाहींस. तस्मात्, शोक सोडून देऊन तूं आतां एकसारखा उद्योग सुरू ठेव, म्हणजे तूं त्या राक्षसाचा सपरिवार वध करण्यास समर्थ होशील. इतकेंच नव्हे तर उद्योगाचें अवलंबन केल्यावर समुद्र, वनें व पर्वत ह्यांसहवर्तमान पृथ्वीहि उलथीपालथी करण्यास तूं समर्थ होशील. मग त्या रावणाचा वध करण्यास तूं समर्थ होशील, ह्याविषयीं संशय तो कसला? सांप्रत हा पर्जन्यकाल आलेला आहे. ह्यास्तव शरदृतु येईपर्यंत वाट पहा. शरदृतु प्राप्त झाल्यावर तूं राष्ट्र व परिवार ह्यांसहवर्तमान रावणाचा वध करशील. भस्मामध्यें आच्छादित होऊन राहिलेल्या अग्नीला योग्य वेळीं उद्दीपक आहुतींच्या योगानें ज्याप्रमाणें होमकालीं ऋत्विज प्रदीप्त करितात, त्याचप्रमाणें तुझे ठिकाणीं निद्रिस्थ असलेलें वीर्य खरोखर मी जागृत करीत आहें."

ह्याप्रमाणें त्या लक्ष्मणाच्या हितकारक व शुभ भाषणाला मान देऊन शुद्ध अंतःकरणानें युक्त असलेल्या भ्रातृवत्सल लक्ष्मणाला राम म्हणाला, "अनुरक्त, स्नेहयुक्त, हितकारक आणि अमोघ पराक्रमी अशा भ्रात्यानें जें कांहीं सांगण्यासारखें आहे, तें तूं सांगितलें आहेस. ह्यास्तव, सर्व कार्यांचा नाश करणारा हा शोक मीं सोडून दिला असून, पराक्रमसमर्थी अकुंठित असलेलें नैसर्गिक तेज मी आतां वृद्धिंगत करितों. मी तुझ्या सांगण्याप्रमाणें वागण्यास तयार झालों असून, सुग्रीवाचें मन शांत होण्याची आणि नद्यांचें उदक निर्मळ होण्याची अर्थात् शरदृतूची वाट पाहात आहें. कोणीं उपकार केला असतां वीर पुरुष त्याच्यावर प्रत्युपकार अवश्य करीतच असतो. कारण दुसऱ्याचा उपकार झाला असतां जो कृतघ्न बनून त्याच्यावर प्रत्युपकार करीत नाहीं, त्याची उपकार करणाऱ्या सामर्थ्यवानाशीं मैत्री राहात नाहीं."

ह्याप्रमाणें रामानें केलेल्या भाषणाला मान देऊन, आणि तेंच योग्य आहे असा विचार करून लक्ष्मणानें हात जोडिले, आणि आपला सुविचार रामाला दर्शविण्याच्या उद्देशानें तो मनोहर मुद्रेनें युक्त असलेल्या रामाला म्हणाला, "राजन्, तुझ्या म्हणण्याप्रमाणें हा तुझा सर्वहि मनोरथ सुग्रीव वानर लवकरच शेवटास नेईल. शत्रूचा निग्रह करण्याविषयीं आपला निश्चय झालेला आहे; तथापि हा पर्जन्यकाल संपेपर्यंत धीर धर. सारांश, क्रोध आवरून धर, शरदृतूची वाट पहा, वर्षाकालाचे हे चार महिने लोटत तोंपर्यंत थांब, आणि शत्रूचा वध करण्याविषयीं समर्थ असलेला तूं शरदृतूपर्यंत कालक्षेप करीत करीत सिंहांनीं आश्रय केलेल्या ह्या पर्वतावर माझ्यासहवर्तमान वास्तव्य कर."

सर्ग अठ्ठाविसावा.

वर्षाऋतुवर्णन.

वालीचा वध करून सुग्रीवाला अभिषेक केल्यानंतर माल्यवान पर्वतावर वास्तव्य करीत असलेला राम लक्ष्मणाला म्हणाला, "तो हा काल म्हणजे वर्षाऋतु सांप्रत प्राप्त झाला आहे. कारण पर्वतप्राय मेघांनीं व्याप्त झालेलें आकाश तूं अवलोकन कर. सूर्याच्या किरणांच्या योगानें मेघोदक शोषून घेऊन, कार्तिकप्रभृति नऊं महिनेपर्यंत धारण केलेला व रसायनाप्रमाणें लोकांच्या जीवनास कारण होणारा जलरूप गर्भ आकाशरूप स्त्री टाकून देत आहे. मेघरूप जिन्यांच्या समुदायांनीं आकाशावर चढून जाऊन कुडे आणि अर्जुनवृक्ष ह्यांच्या मालांच्या योगानें सूर्याला भूषित करणें शक्य आहे, असें वाटतें. संध्याकाळच्या आरक्तवर्णानें युक्त झाल्यामुळें ताम्रवर्ण आणि शेवटीं श्वेतवर्ण असून जलसंबंधामुळें स्निग्ध (ओलसर) दिसत असलेल्या अभ्ररूप फडक्यांनीं आकाश जसें कांहीं जखम बांधलेल्या पुरुषाप्रमाणें दिसत आहे. मंद मंद वहात असलेला वायु हाच ज्याचा निःश्वास आहे, संध्यारूप केशर ज्याला चोपडिलेलें आहे, आणि सभोंवतीं श्वेतवर्ण असलेले मेघ हेच ज्याचे पांडुरवर्ण झालेले गाल आहेत, असें हें आकाश कामातुर पुरुषाप्रमाणें दिसत आहे. सूर्याच्या तेजानें संतप्त होऊन नवीन उदकानें परिप्लुत झालेली ही भूमि, शोकसंतप्त सीता ज्याप्रमाणें अश्रु ढाळीत असेल, त्याप्रमाणें वाफ बाहेर सोडीत आहे. मेघांतून बाहेर पडल्यामुळें कर्पूरवृक्षाच्या पानांप्रमाणें शीतल होऊन केवडयाच्या सुवासानें युक्त झालेले वायु ओंजळीनें पितां येतील कीं काय असे भासत आहेत. प्रफुल्लित अर्जुनवृक्षांनीं युक्त व केतकवृक्षांच्या योगानें सुगंधयुक्त झालेल्या ह्या पर्वताला शत्रूचा नाश झालेल्या वानरश्रेष्ठ सुग्रीवाप्रमाणें जलधारांनीं अभिषेक होत आहे. मेघरूप कृष्णाजिन आणि पर्जन्यधारारूप यज्ञोपवीत धारण करणारे हे पर्वत वायुप्रपूरित गुहांनीं युक्त असल्यामुळें अध्ययन सुरू केलेल्या विद्यार्थ्याप्रमाणें भासत आहेत. पीतवर्ण विद्युल्लतांनीं ताडित झालेलें हें आकाश अंतर्गत मेघगर्जनारूप ध्वनीनें युक्त झाल्यामुळें, सोन्याच्या चाबुकांनीं ताडित झाल्या कारणानें अंतस्थ वेदना सोशीत असलेल्या उत्कृष्ठ अश्वाप्रमाणें भासत आहे. नील मेघाचा आश्रय करून स्फुरण पावणारी ही विद्युल्लता रावणाच्या अंकावर तडफड करणाऱ्या बिचाऱ्या सीतेप्रमाणें मला

भासत आहे. कामशांतिसाधनरूप स्त्रियांनीं युक्त असलेल्या पुरुषांना सुखकर होणाऱ्या ह्या धुंद झालेल्या दिशा मेघांनीं व्याप्त झाल्या असल्यामुळें त्यांतील ग्रह व चंद्र हे दिसेनातसे झाले आहेत. लक्ष्मणा, जमिनींतून निघणाऱ्या वाफांनीं व्याप्त, प्रफुल्लित, पर्जन्यकाल प्राप्त झाल्यामुळें आनंदित आणि मज शोकग्रस्ताचे ठिकाणीं कामोद्दीपन करणारे कुटजवृक्ष कोठें पर्वतशिखरावर असलेले तूं अवलोकन कर. सांप्रत वातावरणांतील धूळ नाहींशी झाली आहे, वायु शीतल आहे, ग्रीष्मऋतूंतील उष्णताप्रभृति दोषांचा प्रसार नाहींसा झाला आहे, राजांच्या स्वाऱ्या बंद झाल्या आहेत, प्रवासी लोक स्वदेशास जात आहेत, मानस सरोवरावर वास्तव्य करण्याविषयीं उत्सुक असलेले चक्रवाक पक्षी सांप्रत ह्या सरोवराकडे निघाले आहेत, व एकसारख्या पर्जन्याच्या उदकानें बिघडून गेलेल्या मार्गांवरून रथादि यानें चालेनातशीं झालीं आहेत. शांत झालेल्या महासागराचें रूप ज्याप्रमाणें कोठें कोठें पर्वतांनीं व्याप्त झालेलें दिसतें, त्याचप्रमाणें ज्यांत इकडे तिकडे मेघ पसरले आहेत, असें हें आकाश कोठें उज्ज्वल आणि कोठें प्रकाशरहित दिसत आहे. शाल व कदंब ह्यांच्या पुष्पांनीं मिश्रित व पर्वतावरील धातूंच्या योगानें ताम्रवर्ण असें नवीन उदक पर्वतावरील नद्या फारच सत्वर वाहून नेत आहेत, आणि त्या शीघ्र जाणाऱ्या उदकाबरोबरच मयूर पक्ष्यांचा ध्वनि लांब जात आहे. भ्रमराप्रमाणें कृष्णवर्ण झालेलीं जांबळें वनचर यथेष्ठ खात आहेत, आणि नानाप्रकारच्या वर्णांनीं युक्त झालेलीं परिपक्व आम्रफळें वाऱ्याचा धक्का लागतांक्षणीं भूमीवर पडत आहेत. विद्युल्लतारूप पताकांनीं व बगळ्यांच्या रांगांनीं युक्त असून पर्वताच्या शिखरांप्रमाणें दिसत असलेले मेघ समरांगणामध्यें स्थित असलेल्या मत्त गजेंद्रांप्रमाणें उच्च स्वरानें गर्जना करीत आहेत. पर्जन्याच्या उदकामुळें ज्यांतील तृण वृद्धिंगत झालें आहे, ज्यांच्यांतील मयूर पक्षी नृत्यरूप उत्साह करण्यास प्रवृत्त झाले आहेत, आणि ज्यांमध्यें मेघांनीं अतिशय वृष्टि केलेली आहे, अशीं अपराण्णकालीं शोभूं लागणारीं वनें अवलोकन कर. बगळ्यांनीं युक्त, गर्जना करणारे व उदकांचें प्रचंड ओझें वाहून नेणारे मेघ पर्वतांच्या मोठमोठ्या शिखरांवर वारंवार विश्रांति घेत घेत जात आहेत. गर्भधारणेकरितां मेघांची इच्छा धरून आकाशामध्यें संचार करणारी, आणि म्हणूनच आनंदित झालेली ही बगळ्यांची माळका मनोहर आकाशाला घातलेली व वायूनें हालत असलेली श्वेत कमलांची दीर्घ मालाच कीं काय अशी भासत आहे. लहान लहान इंद्रगोप-

इंद्रगोपक कीटकांनीं मधून मधून चित्रविचित्र झालेल्या हिरव्यागार गवतानें युक्त झालेली भूमि लाक्षाबिंदुयुक्त अशी पोपटी रंगाची शालजोडी अंगासरशीं पांघरून बसलेल्या स्त्रीप्रमाणें दिसत आहे. निद्रा हळू हळू केशवाकडे जात आहे, नदी सागराकडे सत्वर चालली आहे. आनंदित झालेली बगळ्यांची रांग मेघाकडे निघाली आहे, आणि कामवासना उत्पन्न झालेली स्त्री आपल्या प्रियाकडे गमन करीत आहे. वनप्रदेशामध्यें मयूर पक्ष्यांचीं नृत्यें सुरू झालीं आहेत, कदंब वृक्ष प्रफुल्लित शाखांनीं युक्त झालेले आहेत, आणि पिकांमुळें व वनांमुळें भूमि मनोहर बनली आहे. नद्या वाहूं लागल्या आहेत. मेघांनीं वर्षाव सुरू केला आहे. मत्त गजांनीं गर्जना करण्यास सुरुवात केली आहे. वनप्रदेशामध्यें शोभा येत चालली आहे. प्रिय स्त्रियांचा वियोग झालेले पति चिंताक्रांत होऊं लागले आहेत. मयूर पक्षी नृत्य करण्यास प्रवृत्त झाले आहेत, आणि सुग्रीवाला राज्य प्राप्त झाल्या कारणानें वानरांनाहि धीर येऊं लागला आहे. केतकीपुष्पांचा वास घेऊन आनंदित झालेले, आणि धबधब्याच्या ध्वनींनीं गोंधळून गेलेले मोठमोठे मत्त गज मयूर पक्ष्यांसहवर्तमान वनांतील जलप्रवाहामध्यें गर्जना करीत आहेत. जलधारांनीं ताडित होत असलेल्या व कदंबवृक्षांच्या शाखांवर लोंबत असलेल्या भृंगांचा उत्साहामुळें प्राप्त व पुष्परसाच्या आस्वादानें वृद्धिंगत झालेला मद हळू हळू कमी होत आहे. कृष्णवर्ण राखेच्या पुंजक्याप्रमाणें दिसत असलेलीं आणि रसानें भरलेलीं टपोरीं फळें जंबुवृक्षांच्या शाखांना लटकलेलीं आहेत, आणि त्यामुळें शाखांतील रस शोषून घेण्याकरितां मृगसमुदायच ठिकठिकाणीं त्यांना लगटून राहिलेले आहेत, असें दिसत आहे. विद्युल्लतारूप पताकांनीं विभूषित आणि मोठ्या गंभीर गर्जनेनें युक्त असलेल्या मेघाच्या मुद्रा युद्धाला उत्सुक झालेल्या वानरांच्या मुद्रांप्रमाणें दिसत आहेत. पर्वतावरील वनामध्यें संचार करणारा मत्त गजेंद्र आपल्या मार्गानें जात असतांना, मेघगर्जना कानांवर आल्यामुळें कोणीं प्रतिपक्षी गजानेंच गर्जना केली आहे, अशी शंका घेऊन त्याच्याशीं युद्ध करण्याकरितां परत फिरला आहे. भृंगसमुदायांच्या योगानें कोठें कोठें गायनयुक्त, मयूर पक्ष्यांच्या योगानें कोठें कोठें जसें कांहीं नृत्य करण्यास प्रवृत्त, आणि गजेंद्रांच्या योगानें कोठें कोठें जसे कांहीं मत्त झालेले वनप्रदेश गायन, नृत्य इत्यादि अनेक कलांनीं युक्त असल्यासारखे दिसत आहेत. कळंब, शाल, अर्जुन आणि स्थलकमल ह्यांच्या पुष्पांनीं समृद्ध झालेली, व मधुतुल्य जलानें परिपूर्ण झालेली ही

वनभूमि मयूर पक्ष्यांच्या मत्तावस्थेंतील गर्जना आणि नृत्य ह्यांच्या योगानें पानभूमीप्रमाणें भासत आहे. कारण पानभूमीवरहि पुष्पांचा सडा, मद्याची समृद्धि, मत्त जनांचा शब्द आणि नृत्य इतक्या गोष्टी होत असतात. पर्जन्य-वृष्टीमुळें पंखांच्या रंगांत फेरबदल झालेले तृषाक्रांत पक्षी, पडतां पडतां वृक्षांच्या पानांवर चिकटून राहिलेलें आणि मोत्यांप्रमाणें दिसत असलेलें अत्यंत निर्मळ असें इंद्रदत्त जल आनंदित होऊन पीत असतात. वनामध्यें गायन सुरू झाल्यासारखें दिसत आहे. कारण भृंग गुंजारव करीत असल्यामुळें तंतु-वाद्यांच्या मधुर ध्वनीचा भास होत आहे. बेडूक शब्द करीत असल्यामुळें कोणी गवईच आपल्या कंठांतून तालसूर काढीत असल्यासारखें भासत आहे, आणि मेघांची गर्जना चालू असल्यामुळें मृदंगवादनच सुरू असल्याचा भास होत आहे. मस्तकावरील तुरा व पिसारा ह्या भूषणांनीं युक्त असलेले मयूर पक्षी कोठें कोठें नृत्य करीत असल्यामुळें, कोठें उच्च स्वरानें गर्जना करीत असल्यामुळें आणि कोठें प्रेक्षक म्हणूनच कीं काय वृक्षांवर बसले असल्यामुळें वनामध्यें संगीतच सुरू झाल्यासारखें दिसत आहे. नानाप्रकारचे आकार, वर्ण व ध्वनि ह्यांनीं युक्त असलेले बेडूक मेघांच्या ध्वनीमुळें फार वेळपर्यंत प्राप्त झालेल्या निद्रेचा त्याग करून जागे झाले आहेत, आणि नवीन उदकांच्या धारांनीं ताडित झाल्यामुळें गर्जना करीत आहेत. मदमत्त झालेल्या नदीरूप कामातुर स्त्रिया आपले चक्रवाकरूप स्तन उन्नत करून, आणि भर्त्याकडे जाण्याला आडकाठी आणणाऱ्या तटरूप वृद्ध स्त्रियांना लोटून देऊन, विषयाचा उपभोग परिपूर्ण घेतां यावा, एतदर्थ पुष्पादि नवीन शेले पांघरून मोठ्या उत्सुकतेनें आपल्या समुद्र भर्त्याकडे जात आहेत. दावाग्नीनें दग्ध झालेल्या पर्वताचे ठिकाणीं दावाग्नीनें दग्ध झालेले पर्वत चिकटून राहिले असतां ते जसे मुळें खोल गेल्यामुळें उभे राहिल्यासारखे दिसतील, तसे नीलमेघाचे ठिकाणीं आसक्त झालेले व नूतन जलानें परिपूर्ण असलेले हे नीलमेघ मुळें धरून राहिल्यासारखे दिसत आहेत. मदमत्त झालेले मयूर पक्षी ज्यामध्यें गर्जना करीत आहेत, इंद्रगोपसंज्ञक कीटकांच्या योगानें ज्यांतील हिरवेंचार गवत भरून गेलेलें आहे, आणि कदंब व अर्जुन ह्या वृक्षांच्या पुष्पांनीं जीं सुवासिक झालेलीं आहेत, अशा अत्यंत रमणीय वनामध्यें गज संचार करीत आहेत. पर्जन्याच्या धारांमुळें ज्यांतील पराग वाहून गेले आहेत, अशा कमलपुष्पांना सद्य सोडून आनंदित झालेले भ्रमर परागयुक्त नूतन कदंबपुष्पांतील मकरंदाचें पान करीत

आहेत. वनामध्यें जिकडे तिकडे गजेंद्र मत्त झालेले आहेत, मोठमोठे वृषभ आनंदित झालेले आहेत, सिंह आपला पराक्रम जास्त जास्तच गाजवूं लागले आहेत, मोठमोठे पर्वत रमणीय दिसूं लागले आहेत, राजे लोक उद्योग सोडून स्वस्थ बसले आहेत, आणि देवराज इंद्र मेघांच्या योगानें क्रीडा करीत बसला आहे. समुद्राच्या गर्जनेलाहि ज्यांनीं मागें टाकिलें आहे असे गगनाचा आश्रय करून राहिलेले मेघ आपल्या प्रचंड जलप्रवाहांच्या योगानें नद्या, तडाग, सरोवरें, वापी आणि ही संपूर्ण पृथ्वी जलानें परिपूर्ण करून टाकीत आहेत. उदक-वर्षाव अतिशय होत आहे, वायु फारच सोसाट्यानें वहात आहे आणि नद्यांचीं तीरें ढांसळून जाऊन त्यांचें उदक वेगानें वाहूं लागलें आहे, व त्या नद्यांनीं लोकांचे मार्ग बंद पाडिले आहेत. लोक राजांना अभिषेक करूं लागले असतां ज्याप्रमाणें ते राजे आपलें निर्मल रूप व सौंदर्य प्रकट करितात, त्याप्रमाणें देवराजानें दिलेल्या व वायूनें जवळ आणिलेल्या अशा मेघोदकपरिपूर्ण कलशां-च्या योगानें अभिषिक्त होत असलेले महापर्वत जसे कांहीं आपलें निर्मल स्वरूप व सौंदर्य प्रकट करीत आहेत. आकाश मेघांनीं व्याप्त झालें असल्यामुळें नक्षत्रें व सूर्य हीं दिसेनातशीं झालीं आहेत. नूतन जलप्रवाहांनीं भूमि भरून गेली आहे, आणि दिशा अंधःकारानें व्याप्त झाल्यामुळें प्रकाशरहित झाल्या आहेत. जलधारांच्या योगानें धुपून गेलेलीं पर्वतांचीं प्रचंड शिखरें, उंचवट्यावरून पडत असल्यामुळें लोंबणाऱ्या मोत्यांच्या सरांप्रमाणें दिसणाऱ्या मोठमोठ्या असंख्य धबधब्यांच्या योगानें फारच शोभूं लागलीं आहेत. पर्वतांवरील पाषाणांमुळें ठिकठिकाणीं ज्यांच्या वेगाला अडथळा होत आहे, असे अनेक धबधबे गर्जना करणाऱ्या मयूर पक्ष्यांनीं युक्त असलेल्या उत्कृष्ट पर्वतांच्या गुहांमध्यें जसे कांहीं तुटून पडत असलेल्या हारांप्रमाणें दिसत आहेत. पर्वतशिखरांवरील प्रदेश ज्यांनीं धुऊन काढिले आहेत, अशा सत्वर वाहणाऱ्या व मोत्यांच्या हारांप्रमाणें दिसणाऱ्या पर्वतावरील असंख्य धबधब्यांना पडतां पडतांच मोठमोठ्या गुहां-तील उन्नत प्रदेश धारण करीत आहेत. सर्व दिशांस आसमंताद्भागीं पडत असलेल्या अनुपम धारा स्वर्गनिवासी स्त्रियांच्या हारांतील रतियुद्धामध्यें तुटलेल्या आणि म्हणूनच खालीं गळत असलेल्या मोत्यांप्रमाणें भासत आहेत. पक्षी आपआपल्या घरट्यांत जाऊं लागले असल्यामुळें सूर्यविकासी कमलें मिटूं लाग-ल्यामुळें, आणि मालती विकसित होऊं लागल्यामुळें, सूर्य अस्ताचलास गेल्याचें अनुमान होत आहे. राजांच्या स्वाऱ्या तहकूब झाल्या आहेत, सेना

मार्गांतच तळ देऊन राहिली आहे, आणि अंत:करणांत धुमसत असलेलें वैर आणि मार्ग ह्यांना उदकांच्या योगानें एकसारखाच अडथळा आलेला आहे. भाद्रपद महिना जवळ आल्यामुळें वेदाध्ययन करणाऱ्या सामवेदी ब्राह्मणांच्या श्रावणीचा हा काल जवळच आला आहे. निवासस्थानाची शाकारणी वगैरे करून, आणि वर्षाकालापुरती बेगमी करून ठेवून, आषाढी पौर्णिमा लागल्यावर कोसलदेशाधिपति भरत खरोखरच चातुर्मास्यासंबंधीं कांहीं तरी नेम करून बसला असेलच. उदकाची भर पडत असल्यामुळें, सरयू नदीचा वेग खरोखरच—येत असलेल्या मला पाहून अयोध्यावासी जनांच्या स्वराप्रमाणें—वर्द्धिगत होत आहे. शत्रूंना पादाक्रांत करून मोठ्या राज्यावर आरूढ झालेल्या सुग्रीवाला ह्या पावसाळ्यांत पीकपाणी चांगलें असल्यामुळें, पत्नीसहवर्तमान सुख होत असेल. परंतु लक्ष्मणा, स्त्रीचा अपहार झाल्यामुळें आणि मोठ्या राज्याला मुकावें लागलें असल्यामुळें, माझी मात्र भिजून गेलेल्या नदीच्या तीराप्रमाणें दैना झाली आहे. माझा शोक तर पुष्कळ वृद्धिंगत झाला आहे. पर्जन्यकालाचे दिवस फार असल्यामुळें ते पार पडणें फारच दुर्घट झालें आहे, आणि प्रचंड शत्रु रावणहि मला अजिंक्य भासत आहे. सुग्रीव जरी नम्र होऊन माझ्या आज्ञेची वाट पहात होता, तरी सांप्रत प्रवास बंद पडल्याचें पाहून, आणि मार्गहि अत्यंत दुर्गम झाल्याचें अवलोकन करून मीं त्याला सीतेचा शोध लावण्याच्या संबंधानें वगैरे कांहीं एक सांगितलें नाहीं. शिवाय, माझें कार्य थोडक्या वेळांत न उरकण्यासारखें असल्यामुळें, अतिशय क्लेश सोसून पुष्कळ दिवसांनीं स्त्रीची गांठ पडलेल्या सुग्रीव वानराला काम सांगण्याचें मीं मनामध्यें आणिलें नाहीं. पर्जन्यकाल संपेपर्यंत विश्रांति घेतल्यानंतर प्राप्त झालेला प्रवासकाल स्वतःच जाणून सुग्रीव माझा उपकार जाणील, ह्यांत संशय नाहीं. तस्मात् हे शुभलक्षणसंपन्न लक्ष्मणा, सुग्रीवाचें मन स्वस्थ होऊन नद्यांचें जल निर्मल होण्याची इच्छा धरणारा मी प्रस्थानकालाची वाट पहात राहिलों आहें. कोणीं उपकार केला असतां वीर पुरुष त्याच्यावर प्रत्युपकार अवश्य करीतच असतो. कारण, दुसऱ्याचा उपकार झाला असतां जो कृतघ्न बनून त्याच्यावर प्रत्युपकार करीत नाहीं, त्याची उपकार करणाऱ्या सामर्थ्यवानाशीं मैत्री राहात नाहीं."

ह्याप्रमाणें रामांनीं लक्ष्मणाला सांगितलें असतां, त्याच्या भाषणाला मान देऊन व तें लक्ष्यांत आणून लक्ष्मणानें हात जोडिले, आणि आपला सुविचार

दर्शविण्याच्या उद्देशानें तो म्हणाला, " राजा, ह्या म्हणण्याप्रमाणें आपला सर्व मनोरथ थोडक्याच दिवसांनीं वानरराज सुग्रीव सिद्धीस नेईल. तेव्हां शत्रूचा निग्रह करण्याचा निश्चय करून आपण शरदृतूची प्रतीक्षा करीत रहा, आणि एवढा हा पर्जन्यकाल संपेपर्यंत धीर धरा. "

सर्ग एकोणतिसावा.

हनुमंताची रामकार्याविषयीं सुग्रीवाला सूचना.

ज्यांतील विद्युल्लता व मेघ नाहींतसे झाले आहेत, जेथें सारस पक्ष्यांच्या समुदायांचा ध्वनि सुरू झाला आहे, आणि रमणीय चंद्रिकेचा थर ज्यामध्यें बसून राहिलेला आहे, असें निर्मल आकाश अवलोकन करून हनुमान सुग्रीवाकडे गेला. त्या सुग्रीवाचा मनोरथ परिपूर्ण झालेला होता. धर्म आणि अर्थ ह्यांचा संग्रह करण्याकडे त्याचें विशेषसें लक्ष्य नव्हतें. कामप्रवृत्तिरूप दुर्जनमार्गाचें अवलंबन तो अतिशयच करीत होता. विषयोपभोगाला योग्य अशा एकांत प्रदेशाचे ठिकाणीं त्याचें चित्त अगदीं वेधून गेलेलें होतें. कार्यसिद्धि होऊन राज्यप्राप्तीचाहि त्याचा उद्देश सिद्धीस गेलेला होता. इतकेंच नव्हे, तर दुसरेहि त्याचे सर्व इष्ट मनोरथ परिपूर्ण झालेले होते. तो सर्वदा तरुण स्त्रियांचेच ठिकाणीं रममाण होऊन राहिलेला होता. योग्य व इष्ट अशी स्वतःची स्त्री व तारा त्याला प्राप्त झालेली होती. कृतकृत्य झाल्यामुळें निश्चित होऊन तो अहोरात्र क्रीडा करण्यामध्येंच दंग झालेला होता, आणि म्हणूनच गंधर्व व अप्सरा ह्यांच्या समुदायासहवर्तमान क्रीडा करीत असलेल्या देवराज इंद्राप्रमाणें तो भासत होता. मंत्र्यांवर त्यानें सर्व कामें सोंपविलेलीं होतीं. इतकेंच नव्हे, तर मंत्र्यांची तो कधीं भेटहि घेईनासा झाला होता. राज्याविषयीं सर्व प्रकारची भीति नाहींशी झाली असल्यामुळें विषयलंपट पुरुषाप्रमाणें त्याची अवस्था झालेली होती. तेव्हां भाषणाचें सार जाणणाऱ्या वानरराज सुग्रीवाचें मन मुद्देसूद आणि मनोहर अशा नानाप्रकारच्या भाषणांनीं वळवून, सर्व शास्त्रार्थाविषयीं निश्चय झालेला, कोणत्याहि गोष्टीचें तत्त्व जाणणारा आणि कालाला अनुसरून असणारे विशेष धर्म जाणणारा संभाषणज्ञ वायुपुत्र हनुमान, विनय आणि प्रेम ह्यांनीं संपन्न असून स्वतःचें वचन खरें करण्याविषयीं निश्चित असलेल्या वानरराज सुग्रीवाचे समीप गेला, आणि तत्काल व

परिणामींहि हितकारक, सत्य, साम, धर्म, अर्थ आणि नीति ह्यांनीं भरलेलें भाषण त्याच्याशीं करूं लागला.

हनुमान म्हणाला:—" राज्य व यश प्राप्त झालें असून कुलपरंपरागत वैभवहि आपण वाढविलें आहे. आतां फक्त मित्राचा संग्रह उरलेला आहे. ह्यास्तव तेवढें कार्य आपण सांप्रत करावें. जो प्रसंग जाणणारा पुरुष मित्राशीं नेहमीं चांगल्या रीतीनें वागतो, त्याचें राज्य, कीर्ति व प्रताप ह्यांची अभिवृद्धि होत असते; आणि त्याचप्रमाणें खजिना, सैन्य, मित्र आणि मन हीं ज्याचीं एकसारखीं स्वाधीन असतात, त्याला मोठें राज्य प्राप्त होत असतें. तस्मात्, ज्या अर्थी आपण सदाचारसंपन्न असून निर्भय मार्गाचें अवलंबन करणारे आहां, त्या अर्थी मित्राकरितां केलेली प्रतिज्ञा योग्यरीतीनें आतां आपण शेवटास न्यावी. कारण, सर्व कामें एका बाजूला ठेवून मित्रकार्याकरितां विशेष उत्साह धरून जो सत्वर झटत नाहीं, तो संकटानें घेरून जात असतो. मित्रकार्याची वेळ निघून गेल्यावर जो ती सिद्धीस नेण्याकरितां झटतो, त्याच्या हातून मोठमोठीं कार्यें झालीं असतांहि मित्रकार्य सिद्धीस नेल्याचें फल त्याला प्राप्त होत नाहीं. ह्यास्तव हे शत्रुदमना, हें आपलें मित्रकार्य करण्याची वेळ निघून जाणार आहे. तस्मात्, सीतेचा शोध लावणें हें राघवाचें कार्य आतां केलें पाहिजे. काळवेळ जाणणाऱ्या व तुझ्या स्वाधीन असलेल्या त्या रघुकुलवंशजश्रेष्ठ रामचंद्राला जरी स्वतःचें काम सिद्धीस नेण्याची त्वरा आहे, तरी तो एखाद्याला ओळखून चालणारा असल्यामुळें, कार्याचा समय निघून जात असल्याविषयीं तुला सूचना करणार नाहीं. रघुवंशज रामाचा स्वभाव अतुल असून तो स्वतःहि गुणांनीं अप्रतिम आहे. इतकेंच नव्हे, पण तुझा तर तो नेहमीं कायम रहाणारा बंधु असून तुझ्या मोठ्या कुलाच्या अभिवृद्धीला कारण होणारा आहे. शिवाय त्यानें तुमचें कार्य आधींच केलेलें आहे. ह्यास्तव त्याचें कार्य आपण आतां करा, आणि रामचंद्राची आज्ञा होण्याचे पूर्वी तें सिद्धीस नेण्याविषयीं श्रेष्ठ श्रेष्ठ वानरांना आपण आज्ञा करा. कार्य करण्याविषयीं पुनरपि जोंपर्यंत सूचना झाली नाहीं, तोंपर्यंत त्या कार्याची वेळ निघून गेली, असें म्हणतां येणार नाहीं. कार्य करण्याविषयीं फिरून सूचना झाली म्हणजे मात्र कालातिक्रम होईल. हे वानरराज, अनुपकारी पुरुषाचेंहि आपण कार्य करणारे आहां, मग वालीचा वध करून आणि राज्य प्राप्त करून देऊन ज्यानें आपणांवर उपकार केला, त्याचें कार्य आपणांला केलेंच पाहिजे, हें सांगण्याची काय बरें आवश्यकता आहे. हे वानरकुलाधीश, हे ऋक्षगणाधि-

पते, आपण शक्तिमान असून अतिशय पराक्रमी आहां. तेव्हां दशरथपुत्र रामाची प्रीति संपादण्याकरितां आपण त्याच्या आज्ञेची कां बरें वाट पहात आहां ! खरोखर दशरथपुत्र रामचंद्र देव, दैत्य आणि महोरग ह्या सर्वांना बाणांच्या योगानें जिंकण्याला अगदीं समर्थ आहे; परंतु तो फक्त आपली प्रतिज्ञा शेवटास जाण्याची वाट पहात आहे. वालीच्या वधाविषयीं युक्तायुक्ततेची शंका मनामध्यें न आणिल्यानें त्यानें तुझा मोठा मनोरथ सिद्धीस नेला आहे. ह्याकरितां आपण त्याची भार्या विदेहराजकन्या सीता ही पृथ्वीमध्यें किंवा आकाशामध्यें जरी असली तरी शोधून काढूं. देव, दानव, गंधर्व, असुर, मरुद्गण आणि यक्ष हे सर्व मिळूनहि त्याला भीति उत्पन्न करण्यास समर्थ नाहींत, मग राक्षसांची गोष्ट कशाला पाहिजे? तस्मात् हे वानरराजा, पूर्वींच तुझ्यावर उपकार केलेल्या आणि ह्याप्रमाणें सामर्थ्यवान असलेल्या रामाचें तुला अगदीं मनापासून प्रिय केलें पाहिजे. हे वानराधिपते, तुझा हुकूम झाला असतां तो बजाविण्याला आमच्यापैकीं ज्याच्या हातून विलंब होईल, त्याला पाताळ, पृथ्वी, जळ आणि आकाश ह्यांमध्यें कोठेंहि थारा मिळणार नाहीं. तस्मात्, कोणी कोठून तुझें काय करावें, ह्याविषयीं तूं आज्ञा कर. हे निष्पापा, संख्येनें कोट्यवधीपेक्षांहि जास्त असे अजिंक्य वानर आज तुझ्या पदरीं आहेत."

सेना जमविण्याविषयीं सुग्रीवाची आज्ञा.

हें कालाला उचित झालेलें त्याचें भाषण श्रवण करून सत्त्वगुणसंपन्न सुग्रीवानें मनामध्यें उत्कृष्ट विचार आणिला, आणि त्या अत्यंत विचारी सुग्रीवानें नेहमीं उद्योगशील असलेल्या नीलाला चोहोंकडील सर्व सेना जमविण्याविषयीं आज्ञा केली. तो म्हणाला, "माझ्या सर्व सेना आणि सर्व सेनापती विलंब न करितां मुख्य सेनापतीसहवर्तमान येथें येतील, अशी व्यवस्था कर. सरहद्दीचें रक्षण करणारे जे कोणी उद्योगी व शीघ्रगामी वानर असतील, तेहि सत्वर माझ्या आज्ञेवरून येथें येवोत; आणि नंतर काय करावयाचें ह्याची तजवीज तूं स्वतःच ठेव. पंधरा दिवसांनंतर जो वानर येथें येईल, त्याला प्राणांतिक दंड होईल, ह्याविषयीं मुळींच संशय घेण्याचें कारण नाहीं. निश्चयपूर्वक केलेल्या ह्या माझ्या आज्ञेला अनुसरून तूं अंगदासहवर्तमान वृद्ध वृद्ध वानरांकडे जा." अशी व्यवस्था करून तो वानरश्रेष्ठांचा अधिपति वीर्यवान सुग्रीव घरामध्यें गेला.

सर्ग तिसावा.

श्रीरामाचे सीतेविषयीं विचार.

सुग्रीव घरांत शिरल्यावर आणि वर्षाकाल संपूर्ण झाल्यामुळें आकाश मेघनिर्मुक्त झाल्यावर, इकडे पर्वतावर वास्तव्य करीत असलेला राम कामातुर व शोकाकुल झाला. शुभ्रवर्ण आकाश, निर्मल चंद्रमंडल आणि चंद्रिकारूप अनुलेपन यांनीं युक्त असलेली शरदृतूंतील रात्र अवलोकन करून, आणि त्याचप्रमाणें सुग्रीव स्वेच्छाचारी झाला आहे, जनककन्येचा पत्ता लागत नाहीं, व सेना जमविण्याचीहि वेळ जात चालली आहे, हें लक्ष्यांत आणून अत्यंत दु:खित झालेल्या त्या रामाला कांहीं सुचेनासें झालें. नंतर थोड्या वेळानें मन स्वस्थ झाल्यावर तो रघुवंशज भूपाल मनामध्येंच वास्तव्य करणाऱ्या सीतेविषयीं चिंता करूं लागला. विद्युल्लता व मेघ नाहींतसे झाल्यामुळें निर्मल, आणि सारस पक्ष्यांच्या ध्वनीनें नादित असें आकाश दृष्टीस पडतांक्षणीं आर्त वाणीनें तो विलाप करूं लागला. सुवर्णवर्ण धातूंनीं भूषित असलेल्या पर्वतशिखरावर तो बसला असतांना, शरदृतूंतील निर्मल आकाशाकडे दृष्टि जाऊन त्याला प्रियेची आठवण झाली, आणि तो म्हणाला, "सारस पक्ष्याप्रमाणें शब्द करणारी जी माझी प्रिया सारस पक्ष्यांच्या नादामुळें आश्रमामध्यें रममाण होत असे, तिचें चित्तरंजन आज कसें बरें होत असेल! कांचनपुष्पाप्रमाणें निर्मल असलेले प्रफुल्लित असनवृक्ष अवलोकन करून, मी दृष्टीस पडत नसल्यामुळें तिच्या मनाला कशी बरें करमणूक होत असेल! जी मधुर भाषण करणारी सर्वांगसुंदरी माझी प्रिया पूर्वीं कलहंसाच्या शब्दानें जागी होत असे, ती आज कशी बरें करमणूक करून घेत असेल! भार्येसहवर्तमान संचार करणाऱ्या चक्रवाक पक्ष्यांचा स्वर कानीं पडला असतां, कमलांप्रमाणें विशाल नेत्रांनीं युक्त असलेल्या ह्या प्रियेची काय बरें अवस्था होईल! हरिणबालकांसारखे जिचे नेत्र आहेत, अशा त्या प्रियेवांचून मला सरोवरें, नद्या, वापी, अरण्यें आणि वनें हिंडतां हिंडतां सांप्रत सुख होत नाहीं. शरदृतूंतील निर्मल आकाशप्रभृति गोष्टीमुळें एकसारखा प्रवृत्त असलेला काम, सुकुमारपणा आणि माझा वियोग ह्या दोन कारणांमुळें त्या माझ्या स्त्रीला अतिशयच पीडा देईल."

अशा प्रकारें इंद्रापासून उदक प्राप्त होण्याची आशा धरून राहिलेला तृषाक्रांत चातक ज्याप्रमाणें विलाप करीत रहातो, त्याप्रमाणें तो राजकुमार

विलाप करीत बसला. तदनंतर रमणीय पर्वतशिखरावर फलांकरितां हिंडून हिंडून वैभवशाली लक्ष्मण परत आला असतां, ज्येष्ठ भ्रात्याकडे त्याची दृष्टि गेली, आणि तो खेद करीत बसला आहे, असें त्याला आढळून आलें. तेव्हां दुःसह चिंतेनें घेरिल्यामुळें कांहीं एक सुचेनासें होऊन व दीन होऊन निर्जन प्रदेशामध्यें एकाकी बसलेल्या त्या रामाला पहातांच तो लौकर लौकर त्याजकडे आला आणि म्हणाला, " हे आर्य, कामाधीन झाल्यानें आणि त्यामुळें स्वतःचें पौरुष व्यर्थ झाल्यानें आपलें कोणतें कार्य सिद्धीस जाणार आहे ? शोकामुळें हें आपलें चित्तस्वास्थ्य नाहींसें होत आहे. अशा स्थितीमध्यें समाधीच्या योगानें कोणतेंहि दुःख निवृत्त होणार नाहीं काय ? कर्मानुष्ठान आणि मनाची प्रसन्नता ह्यांचें अवलंबन करून तूं आपला वेळ समाधियोगामध्येंच घालवीत जा. धैर्य न सोडितां आपल्या पौरुषवृद्धीला कारण होणारें आणि मित्रलाभ करून देणारें स्वकर्म करीत जा. हे मनुवंशाधिपते, तुझ्यामुळें सनाथ झालेली जानकी इतराला प्राप्त होणें सुलभ नाहीं. कारण, हे महामान्य वीरा, प्रज्वलित असलेल्या अग्नीच्या ज्वालेसमीप आल्यावर कोणी दग्ध होत नाहीं, असें कधीं घडत नाहीं. "

सुग्रीवावर रामाचा कोप.

(शरदृतुवर्णन.)

ह्याप्रमाणें लक्ष्मणानें सांगितलें असतां, राजलक्षणांनीं युक्त असलेल्या त्या अजिंक्य लक्ष्मणाला राम म्हणाले, " तुझें हें भाषण तत्काल व परिणामींहि हितावह, स्वाभाविक, राजनीतीनें युक्त आणि साम, धर्म व अर्थ ह्यांनाहि धरून आहे. तस्मात्, तूं जें कर्तव्य सांगितलेंस, तें तर निःसंशय केलेंच पाहिजे, आणि कर्मयोगाचेंहि अनुष्ठान केलेंच पाहिजे. हे राजकुमारा, कर्म आणि ज्ञान ह्यांची पर्वा न करितां वृद्धिंगत आणि म्हणूनच अत्यंत प्रबल झालेलें जें कर्म, त्याच्या फलाची अपेक्षा धरितां उपयोगी नाहीं. "

नंतर कमलपत्रांप्रमाणें विशाल नेत्रांनीं युक्त असलेल्या मैथिलीचें पुनरपि स्मरण झालें असतां रामाचें मुख निस्तेज झालें, आणि तो लक्ष्मणाला म्हणाला, " उदकानें पृथ्वी तृप्त झाल्यामुळें, आणि धान्यें उत्पन्न केल्यामुळें, इंद्र आपलें काम आटोपून बसला आहे. हे राजकुमारा, पर्वतसमुदय आणि वृक्षगण ह्यांचें अवलंबन करणारे आणि दीर्घ व गंभीर घोषानें युक्त असलेले मेघ जलवृष्टि

करून शांत झाले आहेत. नीलकमलांच्या पाकळ्यांप्रमाणें श्यामवर्ण असलेले मेघ दशदिशा श्यामवर्ण करून मदरहित झालेल्या गजांप्रमाणें सांप्रत वेगरहित झालेले आहेत. हे विनयसंपन्न लक्ष्मणा, ज्यांच्या उदरांमध्यें उदक आहे, असे मोठमोठे मेघ आणि कुडा व अर्जुनवृक्ष ह्यांच्या पुष्पगंधानें आणि वृष्टीनें युक्त झालेले वायु वर्षाकालीं प्रवृत्त झाले असतांहि चोहोंकडे संचार करून सांप्रत स्वस्थ झाले आहेत. सारांश, हे निष्पापा, मेघ, वानर, मयूर आणि जलप्रवाह ह्यांचा ध्वनि एकाएकीं बंद झाला आहे. अद्भुत शिखरांनीं युक्त असलेले पर्वत मोठमोठ्या मेघांची वृष्टि झाल्यामुळें निर्मल झाले असून चंद्रकिरणांनीं चोपडिल्यासारखे भासत आहेत. सप्तवर्णवृक्षांच्या[1] शाखा, सूर्य, चंद्र व तारा ह्यांच्या प्रभा आणि उत्कृष्ठ गजांच्या लीला ह्यांचे ठिकाणीं सौन्दर्य वांटून देऊन सांप्रत शरदृतु प्रवृत्त झाला आहे. अनेक पदार्थांच्या आश्रयाला राहाणारी जिची अद्भुत शोभा आहे, अशी ही सौन्दर्यलक्ष्मी सांप्रत शरदृतूंतील गुणांनीं संपन्न असून सूर्याच्या पहिल्या किरणांनीं प्रफुल्लित झालेल्या सरोवरांचे ठिकाणीं अतिशय झळकत आहे. सप्तपर्णसंज्ञक वृक्षांच्या पुष्पांतील गंधानें युक्त, आणि म्हणूनच वायूचें अनुकरण करणारा हा शरदृतु गुंजारव करणाऱ्या भृंगांनीं युक्त झाल्यामुळें व मत्त गजांचा मद वृद्धिंगत करण्यास व जल शुष्क करण्यास उद्युक्त झाल्यामुळें शोभा देत आहे. सुंदर व विशाल पक्षांनीं युक्त, मदनप्रिय, कमलपरागांनीं व्याप्त व स्वतःबरोबर मानस सरोवरापासून आलेल्या आणि महानद्यांच्या वाळवंटांवर जुळलेल्या चक्रवाक पक्ष्यांसहवर्तमान हंस क्रीडा करीत आहेत. नानाप्रकारांनीं विभागून गेलेली सौन्दर्यलक्ष्मी–मदामुळें गंभीर झालेले गज, मदमत्त झालेले गोसमुदाय आणि निर्मल उदकानें युक्त झालेल्या नद्या–ह्यांचे ठिकाणीं झळकत आहे. आकाश मेघनिर्मुक्त झालेलें अवलोकन करून पिच्छरूप भूषणाचा त्याग केल्यामुळें शोभारहित झालेले उत्साहशून्य मयूर पक्षी प्रियांविषयीं आसक्ति सोडून देऊन वनामध्यें ध्याननिष्ठ झालेले आहेत. मनोहर गंध व सुवर्णासारखा गौरवर्ण ह्यांनीं युक्त असल्यामुळें दृष्टीला रमणीय भासणाऱ्या आणि पुष्पभारांच्या योगानें नम्र अशा शाखांनीं युक्त झालेल्या मोठमोठ्या सालवृक्षांच्या योगानें वनें जशीं कांहीं प्रकाशित झालेलीं आहेत. सरोवरें व वनें ज्यांना प्रिय आहेत, असे प्रियांसहवर्तमान असलेले व पुष्पांचा सुवास घेण्यास प्रवृत्त झालेले जे श्रेष्ठ गज त्यांचा मद उत्कट झाल्यामुळें ते

१ सांतवण.

विषयवासनेनें युक्त झाले आहेत, आणि म्हणूनच सांप्रत त्यांच्या गती मंद झाल्या आहेत. घांसून लकलकीत केलेल्या शस्त्राप्रमाणें आकाशाचा वर्ण अगदीं निर्मल झालेला आहे. नद्यांच्या उदकांचे प्रवाह कमी झालेले आहेत. वायु कमलपुष्पांच्या योगानें थंडगार वाहूं लागले आहेत, आणि दिशा अंधकारापासून मुक्त झाल्यामुळें स्वच्छ झाल्या आहेत. सूर्याचें ऊन पडूं लागल्यामुळें भूमीवरील चिखल नाहींसा झाला असून, पुष्कळ दिवसांनीं तिच्यावर घट्ट धूळ दृष्टीस पडत आहे; आणि एकमेकांशीं वैर बांधून राहिलेल्या राजांच्या चळवळींचा काल समीप आला आहे. शरदृतूंतील गुणांमुळें ज्यांच्या स्वरूपाची शोभा वृद्धिंगत झाली आहे, व ज्यांचीं शरीरें धुळीनें भरलीं आहेत, असे मदमत्त झालेले युद्धलुब्ध बैल मोठ्या आनंदानें गायींच्या मध्यें डरकण्या फोडीत आहेत. कामवासना, अत्यंत प्रेम, मंद गति आणि स्वतःचा परिवार ह्यांनीं युक्त असलेली हत्तीण मदमत्त होऊन वनामध्यें चाललेल्या आपल्या भर्त्याला वेढून टाकून त्याच्या मागोमाग चालली आहे. नदीतीरावर असलेले मयूर पक्षी स्वतःचें भूषण असलेलीं उत्कृष्ठ पिसें टाकून देऊन, सारस पक्ष्यांच्या कळपाकडून निंदा होऊं लागल्यामुळें कीं काय मनामध्यें खिन्न व दीन होऊन जात आहेत. ज्यांच्या गंडस्थलांतून मद चालला आहे, असे मोठमोठे गज आपल्या प्रचंड गर्जनांनीं कारंडव आणि चक्रवाक पक्ष्यांना त्रासवून सोडून विकसित कमलांनीं युक्त असलेल्या सरोवरामध्यें ढवळून ढवळून पाणी पीत आहेत. वालुका, निर्मल उदक, गायींचे कळप आणि सारस पक्षी ह्यांनीं युक्त असून त्या पक्ष्यांच्या ध्वनीनें नादित व पंकरहित झालेल्या नद्यांकडे हंस आनंदित होऊन धांवत आहेत. नदीजल, मेघोदक, ओढ्यांचें पाणी, प्रचंड वायु, मयूर पक्षी व आनंदरहित झालेले बेडूक ह्यांचे ध्वनी सांप्रत अगदीं पूर्णपणें नाहींतसे झाले आहेत. नवीन मेघ प्रकट होतांक्षणीं उपजीविकेचें साधन नाहींसें झाल्यामुळें मृतप्राय बनलेले व भयंकर विषानें युक्त असलेले रंगीबेरंगी सर्प पुष्कळ दिवसपर्यंत आंत राहिले असून आतां बिळांतून बाहेर पडूं लागले आहेत. सुशोभित चंद्रकिरणांचा समुदाय हाच एक कोणी प्रियपतीचा हात व त्याचा स्पर्श झाल्यामुळें जिला हर्ष झालेला आहे, आणि म्हणूनच नक्षत्ररूप नेत्रतारका जी किंचित् प्रकट करूं लागली आहे, अशी ही रक्तवर्णरूप अनुरागानें युक्त असलेली संध्यारूप कामुक स्त्री आपोआपच आकाशरूप वस्त्राचा त्याग करीत आहे. चंद्ररूप प्रसन्न व सौम्य मुखानें, तारागणरूप उघड-

लेल्या मनोहर नेत्रांनीं, आणि चंद्रिकारूप वस्त्रानें युक्त असलेली रात्र शुभ्र शेला पांघरिलेल्या स्त्रीप्रमाणें भासत आहे. परिपक्क झालेलीं भाताचीं लोंबरें खाऊन आनंदित झालेली सारस पक्ष्यांची मनोहर रांग वाऱ्यानें उडालेल्या पुष्पगुंफित मालेप्रमाणें मोठ्या वेगावेगानें आकाशामध्येंहि चालली आहे. निद्रिस्थ हंस पक्ष्यांनीं व कमलांनीं युक्त असलेलें मोठ्या सरोवरांतील उदक रात्रीं पूर्णचंद्रानें युक्त होऊन नक्षत्रगणांनीं व्याप्त झालेल्या मेघशून्य आकाशाप्रमाणें दिसत आहे. उत्कृष्ट वापींची शोभा भूषित झालेल्या उत्कृष्ट स्त्रियांप्रमाणें सांप्रत अधिकच भासत आहे. कारण, इकडे तिकडे असलेले हंस पक्षी हेच त्याचे रत्नांनीं गजबजून गेलेले कमरपट्टे आहेत; आणि विकसित कमलें ह्याच कमलपुष्पांच्या माला त्यांनीं धारण केलेल्या आहेत. कीचकसंज्ञक वेणूंचा ध्वनि हाच एक कोणी स्पष्ट वाद्यघोष, व त्यांच्या योगानें मिश्र झालेले, आणि प्रातःकाळीं वायूमुळें प्रवृत्त होऊन आसपासचा प्रदेश व्यापून राहिलेले, पर्वतसंबंधीं गुहांचे व बैलांचे शब्द परस्परांना वृद्धिंगत करीत आहेत. मंद वायूनें कंपित, नूतन व विकाररहित अशा पुष्पभारांनीं युक्त, आणि धुऊन स्वच्छ केलेल्या शालूप्रमाणें भासणाऱ्या काशसंज्ञक तृणांच्या योगानें नद्यांचीं तीरें सुशोभित झालीं आहेत. मधुपान करण्यामध्यें निपुण, आणि कमलपुष्पांतील व असनपुष्पांतील परागांमुळें पीतवर्ण झालेले वनांतील प्रचंड भृंग, प्रियांनीं युक्त असल्यामुळें आनंदित व मत्त होऊन गंधलोभानें वाऱ्याच्या मागोमाग चालले आहेत. स्वच्छ उदक, पुष्पविकासानें व क्रौंच पक्ष्यांच्या ध्वनीनें युक्त होऊन परिपक्क दशेस आलेलें भाताचें शेत, मंद वायु, आणि निर्मल चंद्र हीं पर्जन्यरहित असा शरत्काल प्राप्त झाल्याचें सुचवीत आहेत. प्रिय पतींनीं उपभोग घेतल्यामुळें आळसत आळसत चालणाऱ्या कामिनी स्त्रियांचे वेग ज्याप्रमाणें प्रभातकालीं मंद झालेले असतात, त्याप्रमाणें मत्स्यरूप कमरपट्टा दृष्टोत्पत्तीस आणूं लागलेल्या नदीरूप स्त्रियांचे वेग सांप्रत मंद झालेले आहेत. चक्रवाक पक्षी व शेवाळें ह्यांनीं युक्त असून काशसंज्ञक तृणांनीं आच्छादित झालेलीं नद्यांचीं मुखें, केशराचा वगैरे रंग लावून वर वेलबुट्टी काढिलेल्या आणि शेल्यांनीं आच्छादिलेल्या स्त्रियांच्या मुखांप्रमाणें दिसत आहेत. प्रफुल्लित कोन्हांच्या आणि ससाणे ह्यांच्या योगानें चित्रविचित्र होऊन आनंदित भृंगांच्या गुंजारवानें युक्त झालेल्या वनामध्यें कामानें प्रचंड धनुष्य धारण करून त्याच्या योगानें सांप्रत विरही जनांना दंड करण्यास आरंभ केला आहे. योग्य वृष्टीनें

लोक संतुष्ट, नद्यांचीं तीरें उदकानें परिपूर्ण, आणि पृथ्वी धान्यानें युक्त केल्यावर मेघ आकाशाचा त्याग करून नाहींतसे झाले आहेत. लक्ष्मणा, चक्रवाक पक्ष्यांच्या समुदायांनीं व्याप्त आणि कुरर पक्ष्यांनीं नादित होऊन निर्मल जलानें युक्त झालेले जलाशय रमणीय दिसत आहेत. हे राजकुमारा, राजांच्या स्वाऱ्यांचा हा समय प्राप्त झाला असून सुग्रीव माझ्या दृष्टीस पडत नाहीं; आणि तशा प्रकारचा त्याचा कांहीं उद्योगहि माझ्या आढळण्यांत येत नाहीं. असाणे, सांतवण, कांचन आणि तमाल हे वृक्ष पर्वतशिखरांवर प्रफुल्लित झालेले दिसत आहेत. हंस, सारस, चक्रवाक आणि कुरर ह्या पक्ष्यांच्या योगानें सर्व बाजूंनीं गजबजून गेलेलीं नद्यांचीं वाळवंटें तूं अवलोकन कर. अरे,सीता दृष्टीआड झाल्यामुळें शोकाकुल झालेल्या मला पर्जन्यकालाचे हे गेलेले चार महिने शेकडों वर्षांप्रमाणें झाले आहेत. कारण, दंडकारण्यसंज्ञक गहन वन उपवन आहे, असें समजून भर्त्याच्या मागोमाग जाणाऱ्या चक्रवाक पक्षिणीप्रमाणें माझ्या मागोमाग ती आली होती. लक्ष्मणा, राज्याचा अपहार होऊन अरण्यांत हांकून लाविलेल्या, आणि त्यांतूनहि प्रियेचा वियोग झाल्यामुळें दुःखाकुल झालेल्या माझ्यावर राजा सुग्रीव दया करीत नाहीं. 'राज्याचा अपहार झाल्यामुळें हा अनाथ झालेला आहे. रावणानें ह्याचा अपमान केलेला आहे. ह्याचें घर दूर राहिलें आहे, आणि हा विषयवासनेनें ग्रस्त झाल्यामुळें दीन बनून मला शरण आला आहे.' अशा प्रकारचीं कारणें दुरात्म्या वानरराज सुग्रीवाच्या मनांत येत असल्यामुळें, मी शत्रूंना ताप देणारा असूनहि माझी तो पर्वा करीत नाहीं. अमुक अमुक दिवस लोटले म्हणजे सीतेचा शोध लावावयाचा, अशा रीतीनें कालगणनापूर्वक सुग्रीवानें माझ्याशीं ठराव केला असूनहि, कृतकृत्य झाल्यामुळें आतां त्या दुष्टाला त्याची ओळख राहिलेली नाहीं. ह्यास्तव तूं किष्किंधा नगरीमध्यें जा, आणि विषयसुखाचे ठिकाणीं आसक्त झालेल्या त्या मूर्ख सुग्रीवाला माझ्या आज्ञेनें असें सांग कीं, "पूर्वी ज्यांनीं आपल्यावर उपकार केला आहे, आणि नंतर कांहीं इच्छा परिपूर्ण होण्याच्या आशेनें जे आपणाकडे आलेले आहेत, त्यांची इच्छा परिपूर्ण करण्याचें वचन देऊन जो त्यांच्या आशेचा विघात करितो, तो पुरुष जगतामध्यें अधम होय. तोंडांतून काढिलेलें बरें वाईट भाषण जो खरें करून दाखवितो, तोच वीर पुरुषांमध्यें उत्कृष्ट होय. आपला मनोरथ सिद्धीस गेला असूनहि, मनोरथ परिपूर्ण न झालेल्या मित्रांच्या कार्याकरितां जे झटत नाहींत, ते कृतघ्न मृत झाले असतां त्यांना श्वापदेंहि खात

नाहींत. सुवर्णपृष्ठानें युक्त व प्रत्यंचा चढवून ताणिलेल्या अशा माझ्या धनुष्याचें विद्युत्समुदायतुल्य स्वरूप संग्रामामध्यें पहाण्याचीच तुला खरोखर इच्छा झाली आहे! संग्रामामध्यें क्रुद्ध झालेल्या माझ्या प्रत्यंचेचा वज्राच्या ध्वनीप्रमाणें भयंकर टणत्कार पुनरपि श्रवण करण्याची तुला हांव सुटली आहे!' वीरा लक्ष्मणा, इतकें झालें असूनहि म्हणजे तुझें साहाय्य असलेल्या माझा पराक्रम माहीत झाला असूनहि, सुग्रीवाच्या मनाला त्याबद्दल कांहींच दिक्कत वाटूं नये, हें खरोखर आश्चर्य आहे. हे शत्रुसमूहविजयी लक्ष्मणा, ज्याच्याकरितां ही खटपट केली, त्याविषयीं केलेल्या प्रतिज्ञेचें ह्या कृतकृत्य झालेल्या वानरराजाला भान राहिलें नाहीं. पावसाळा निघून गेला, म्हणजे उद्योगाला लागावयाचें अशी संकेतविषयक कालाची प्रथम प्रतिज्ञा करूनहि, क्रीडा करण्यामध्यें दंग झालेल्या त्या वानरराजाला चार महिने लोटून गेल्याचें भान राहिलेलें नाहीं. अरे, मंत्रिमंडळासहवर्तमान क्रीडा करण्यांत दंग झालेला हा सुग्रीव मद्यपानच करीत बसला आहे.—शोकामुळें दीन झालेल्या आम्हांवर तो दया करीत नाहीं. ह्यास्तव वीरा लक्ष्मणा, जा, आणि माझ्या क्रोधाचें स्वरूप सुग्रीवाला निवेदन करून त्याला आणखी असेंहि सांग कीं, 'वाली वध पावून ज्या मार्गानें गेला, तो मार्ग कांहीं अगदीं संकुचित नाहीं. वाली जात असतांना तुलाहि त्याच्याबरोबर जातां येईल, इतका तो मोठा आहे. तस्मात्, आपल्या वचनाविषयीं खबरदार रहा, आणि वालीच्या मार्गाला जाऊं नको. अरे, संग्रामामध्यें बाणाच्या योगानें वालीचा एकट्याचाच वध मीं केला; परंतु तूं सत्यापासून भ्रष्ट झाल्यामुळें मी तुझा मात्र बांधवांसहवर्तमान वध करीन." हे पुरुषश्रेष्ठ लक्ष्मणा, उपस्थित झालेल्या कार्यासंबंधानें जें जें कांहीं त्याला व आपणांला हितावह असेल, तें तें तूं त्याला सांग आणि त्वरा कर. कारण कालातिक्रम होत आहे. सारांश, 'हे वानरराजा, सनातन धर्म लक्ष्यांत आणून मला दिलेलें आपलें वचन खरें कर. माझ्या बाणांनीं विद्ध होऊन तूं आज प्रेत बनूं नको, आणि यमाच्या घरीं जाऊन वालीची भेट घेऊं नको.' इतकें तूं सुग्रीवाला सांग."

ह्याप्रमाणें प्रचंड व वृद्धिंगत झालेल्या क्रोधानें युक्त होऊन भाषण करीत असलेल्या आपल्या दीन श्रेष्ठ भ्रात्याकडे पाहून, मनुवंशाची कीर्ति वृद्धिंगत करणाऱ्या महातेजस्वी लक्ष्मणानें वानरराज सुग्रीवाविषयीं भयंकर विचार मनामध्यें आणिला.

सर्ग एकतिसावा.

लक्ष्मणाचा सुग्रीवावर कोप.

मनाचा उदार, परंतु विषयासक्त झाल्यामुळें दीन होऊन शोकाग्रस्त झालेल्या आणि उत्कृष्ठ कामवासनेनें युक्त झालेल्या आपल्या ज्येष्ठ भ्रात्याला लक्ष्मण म्हणाला, " वानर सज्जनाप्रमाणें वागणारा नाहीं; आणि म्हणूनच कोणाच्या पराक्रमामुळें हीं निष्कंटक राज्यभोगादि फलें त्याला प्राप्त झालीं आहेत, हें त्याच्या गांवींहि नाहीं. तस्मात्, ज्या अर्थी झालेलें सख्य रक्षण करण्याकडे त्याचें फारसें लक्ष्य नाहीं, त्या अर्थी वानरसंबंधीं राज्यवैभवाचा उपभोग तो घेणार नाहीं. तुमच्या प्रसादामुळें विचारमूढ बनून ग्राम्य सुखांविषयीं आसक्त झालेल्या ह्या वानराचे ठिकाणीं प्रत्युपकारबुद्धि राहिलेली नाहीं. ह्यास्तव असल्या गुणहीनाला राज्य देणें योग्य नाहीं. माझ्या हातून वध पावून आज ज्येष्ठ भ्राता वीर वालीशींच ह्याची भेट होऊं दे. ह्या अनावर झालेला कोप आवरून धरण्यास मी समर्थ नाहीं. ह्या सत्यभ्रष्ट सुग्रीवाचा मी आजच वध करणार. वानरश्रेष्ठांसहवर्तमान वालिपुत्र अंगद राजकन्या जानकीचा शोध लावील. "

ह्याप्रमाणें सुग्रीवाच्या वधाची प्रतिज्ञा केल्याचें कळवून, संग्रामविषयक प्रचंड शोकानें युक्त झालेल्या आणि धनुष्य घेऊन झपाट्यानें चालूं लागलेल्या लक्ष्मणाशीं परवीरघातक राम सांत्वनपूर्वक व समयोचित भाषण करूं लागले. ते म्हणाले, " तुझ्यासारख्यानें अशा प्रकारचें पाप करूं नये. उत्कृष्ठ विवेकाच्या योगानें जो कोणाचा घात करितो, तोच ह्या जगतामध्यें वीर व श्रेष्ठ गुरु होय. लक्ष्मणा, त्वां सद्वर्तनी पुरुषानें ह्या प्रसंगीं असें मनामध्यें आणितां उपयोगीं नाहीं. सुग्रीवाचे ठिकाणीं तूं पूर्वींप्रमाणेंच प्रेम ठेव, आणि त्याच्याशीं जें आपलें पूर्वीं सख्य झालें आहे, त्याची आठवण ठेव. कठोर शब्द न उच्चारितां कालातिक्रमण होत आहे, एवढेंच तूं सुग्रीवाला सौम्य भाषेनें सांग. "

लक्ष्मणाचें किष्किंधेकडे गमन.

अशा प्रकारें ज्येष्ठ भ्रात्यानें यथायोग्य उपदेश केला असतां, लक्ष्मण किष्किंधा नगरीकडे निघाला. सारांश, काल व अंतक ह्यांप्रमाणें भयंकर असें इंद्रचापतुल्य आणि पर्वतशिखरासारखें धनुष्य हातांत घेतल्यामुळें शिखरयुक्त मंदर पर्वताप्रमाणें तो दिसूं लागला. रामचंद्राच्या आज्ञेप्रमाणें वागणारा आणि

बुद्धीनें बृहस्पतीची बरोबरी करणारा तो लक्ष्मण, आत्याच्या मनोरथाचा विघात झाल्यामुळें उत्पन्न झालेल्या क्रोधाग्नीनें व्याप्त झाल्या कारणानें क्षुब्ध झाला; आणि आपण सुग्रीवाशीं काय भाषण करावयाचें, व त्यानें उत्तर दिल्यानंतर त्याला पुनरपि प्रत्युत्तर काय द्यावयाचें ह्याचा विचार करून तो वायुवेगानें चालला. तो वेगवान लक्ष्मण साल, ताल व अश्वकर्ण हे वृक्ष चालण्याच्या वेगानें उलथून पाडूं लागला. पर्वतशिखरें व इतर वृक्ष स्वसामर्थ्यानें अस्ताव्यस्त करूं लागला. पायांच्या योगानें शिळांचे तुकडे तुकडे करूं लागला, आणि जरूरीचें काम असल्यामुळें जलद चालणाऱ्या गजाप्रमाणें एकेक ढांग लांब लांब टाकून सत्वर चालता झाला. नंतर प्रवेश होण्यास दुर्घट, सैन्यानें गजबजलेली व पर्वताप्रमाणें असलेली ती वानरराजाची महानगरी किष्किंधा अवलोकन केल्यावर, सुग्रीवाविषयीं क्रोध उत्पन्न झाल्यामुळें ओंठ स्फुरण पावूं लागलेल्या लक्ष्मणानें किष्किंधेमध्यें बाहेर हिंडणारे भयंकर वानर अवलोकन केले. तेव्हां पर्वतामध्यें वास्तव्य करणाऱ्या व आकारानें गजतुल्य असलेल्या त्या सर्व वानरांनीं त्या पुरुषश्रेष्ठ लक्ष्मणाला अवलोकन करितांक्षणीं शेंकडों पर्वतशिखरें व मोठमोठे वाढलेले वृक्ष हातांत घेतले. तेव्हां हातांमध्यें आयुधें घेतलेल्या त्या सर्व वानरांना अवलोकन करितांच विपुल इंधनांनीं युक्त झालेल्या अग्नीप्रमाणें लक्ष्मण दुप्पट क्रुद्ध झाला. तेव्हां काल, मृत्यु अथवा युगांतकालीं संहार करण्यास उद्युक्त झालेला रुद्र ह्यांप्रमाणें क्षुब्ध झालेल्या त्या लक्ष्मणाला पाहातांक्षणीं ते वानर भीतीनें लट्लट् कांपूं लागले, आणि चहूंकडे पळून गेले. त्यांनीं सुग्रीवाकडे जाऊन लक्ष्मणाचें आगमन व क्रोध त्याला निवेदन केला. परंतु ग्राम्यसुखाविषयीं तारेसहवर्तमान आसक्त होऊन राहिलेल्या त्या विषयलंपट सुग्रीवानें त्या श्रेष्ठ वानरांच्या सांगण्याकडे लक्ष्य दिलें नाहीं. तदनंतर सुग्रीवाला वर्तमान कळवून त्याच्या अनुमतीनें लक्ष्मणाला आम्ही आंत घेऊन येईपर्यंत तुम्ही लक्ष्मणाचा प्रवेश नगरींत होऊं देऊं नका, अशी हनुमान वगैरे मंत्र्यांची आज्ञा झाल्यावर, आकारानें पर्वत, गज व मेघ ह्यांसारखे असलेले आणि म्हणूनच पाहाणाऱ्याच्या अंगावर कांटा उठविणारे ते वानर नगरांतून बाहेर पडले. त्या सर्वांहि वीर वानरांचें स्वरूप उग्र असून सर्वांच्या दाढा व्याघ्रासारख्या होत्या. नखें व दाढा ह्या स्वाभाविकच आयुधांनीं ते सर्व वानर युक्त होते. त्यांपैकीं कांहींना दहा दहा हत्तींचें सामर्थ्य असून कांहीं तर त्यांच्याहिपेक्षां दसपट सामर्थ्यवान होते; आणि कांहींचें बळ तर सहस्र

गजांच्या बळाची बरोबरी करणारे होते. असो. तदनंतर हातांमध्यें वृक्ष घेऊन सज्ज झालेल्या त्या महाबलाढ्य वानरांनीं व्याप्त आणि म्हणूनच प्रवेश होण्यास अशक्य झालेली ती किष्किंधा नगरी अतिशय क्रुद्ध झालेल्या लक्ष्मणानें अवलोकन केली; आणि ते सर्व वानरहि कोटाच्या भोंवतीं असलेल्या खंदकांतून निघून उघडपणें बाहेर येऊन उभे राहिले. तेव्हां सुग्रीवाचा प्रमाद, वानरांचा अडथळा आणि ज्येष्ठ भ्रात्याचें कार्य ह्यांचा विचार करून तो वीर लक्ष्मण पुनरपि क्रोधाधीन झाला. त्याचे नेत्र कोपानें लाल झाले. तो दीर्घ, उष्ण व भयंकर सुस्कारे टाकूं लागला; आणि त्यामुळें तो धूमयुक्त अग्नीप्रमाणें भासूं लागला. बाणशल्यरूप चंचल जिव्हेनें व चापरूप वेटोळ्यानें युक्त असलेला, आणि तेजोरूप विषानें व्याप्त झालेला तो लक्ष्मण पंचमुखी भुजंगाप्रमाणें दिसूं लागला. तेव्हां कालाग्नीप्रमाणें प्रदीप्त व नागराजाप्रमाणें क्रुद्ध झालेल्या त्या लक्ष्मणाची गांठ पडल्यावर अंगद भीतीमुळें पराकाष्ठेचा दुःखित झाला. इतक्यांत क्रोधानें ज्याचे नेत्र आरक्तवर्ण झाले आहेत, असा तो महाकीर्तिमान लक्ष्मण अंगदाला म्हणाला, "वत्सा, सुग्रीवाला माझ्या आगमनाची वर्दी दे, आणि त्याला सांग कीं, 'हे शत्रुदमना, हा रामाचा कनिष्ठ भ्राता लक्ष्मण तुझ्याकडे आला आहे. तो भ्रात्याच्या दुःखामुळें संतप्त झाला असून दाराशीं उभा आहे. तेव्हां मर्जी असेल तर त्याच्या म्हणण्याप्रमाणें आपण वागा.' वत्सा, ह्याप्रमाणें सुग्रीवाला चांगलें सांग, आणि असें सांगितल्यानंतर तो काय सांगतो, तें ऐकून घेऊन तूं सत्वर इकडे ये."

लक्ष्मणाच्या त्या अत्यंत तीक्ष्ण वाणीमुळें मनामध्यें गोंधळून गेलेला, आणि म्हणूनच अत्यंत दीनवदन झालेला अंगद तेथून निघाला; आणि राजा सुग्रीवाचे अंतःपुरांत जाऊन त्यानें प्रथम त्याचे आणि नंतर रुमेचे चरण वंदिले. नंतर त्यानें आपल्या मातेचे पाय धरिले, आणि लीन होऊन त्या अंगदानें तो लक्ष्मणाचा वृत्तांत निवेदन केला. तथापि निद्रेनें जर्जर व व्याप्त करून टाकिलेल्या त्या वानरानें त्याच्याकडे लक्ष्य दिलें नाहीं. कारण तो विषयवासनेनें मोहित व मदमत्त झालेला होता!

अंगद सुग्रीवाकडे गेल्यानंतर त्या क्रुद्ध लक्ष्मणाला अवलोकन करितांक्षणीं वानर भीतीमुळें मनामध्यें अगदीं गांगरून गेले, आणि लक्ष्मणाची कृपा संपादन करण्याकरितां किलकिलाट करूं लागले. सारांश, त्यांनीं लक्ष्मणाला अवलोकन केल्यावर, त्याच्यासमीपच महाप्रवाहासारखा आणि वज्र व विद्युल्लता

ह्यांच्यासारखा एकदम सिंहनाद केला. तेव्हां मदनानें विव्हल करून टाकिलेला, आरक्तवर्ण नेत्रांनीं युक्त असलेला, कांहीं सुचेनासें झालेला आणि पुष्पमाला धारण केलेला तो सुग्रीव त्या प्रचंड ध्वनीनें देहभानावर आला! तदनंतर अंगदाचें भाषण श्रवण करून त्याच्याच बरोबर त्या वानरराजाचे दोन मंत्री त्या वानरराजाकडे आले. ते उभयतांहि त्या सुग्रीवाला संमत असून उभयतांचीहि मति उत्कृष्ट होती. असो. अर्थ व धर्म ह्यांसंबंधानें कांहीं बरावाईट प्रकार राजाला कळविण्याकरितां प्राप्त झालेल्या लक्ष्मणाची, त्या यक्ष व प्रभाव ह्या नांवाच्या मंत्र्यांनीं प्रशंसा केली. प्रथमतः निश्चित अर्थानें संपन्न असलेल्या भाषणांनीं सुग्रीवाचें मन प्रसन्न करून घेऊन मरुद्गणाधिपति इंद्राप्रमाणें बसलेल्या त्या सुग्रीवाचे समीप ते बसले, आणि म्हणाले, " त्रैलोक्याचें राज्य करण्यास पात्र असूनहि तुला राज्य अर्पण करणारे, मनुष्यरूप धारण केलेले, सत्यवचनी आणि महाभाग्यवान राम-लक्ष्मण अरण्यामध्यें आहेत; व त्या उभयतांपैकीं एक लक्ष्मण हातामध्यें धनुष्य घेऊन किष्किंधा नगरीच्या द्वारापाशीं उभा आहे, आणि त्यालाच भिऊन लटूलट् कांपूं लागलेले वानर आरोळ्या मारीत आहेत. रामाच्या आज्ञेवरून हा त्याचा भ्राता लक्ष्मण निश्चयरूप रथावर आरूढ होऊन रामवचनरूप सारथ्यासहवर्तमान येथें प्राप्त झाला आहे. इतकेंच नव्हे, परंतु हे निष्पाप राजा, तारेचा हा प्रिय पुत्र अंगद लक्ष्मणानें तुझ्यासमीप पाठविला आहे. सारांश हे वानराधिपते, क्रोधानें ज्याचे नेत्र व्याप्त झालेले आहेत, असा तो हा वीर्यवान लक्ष्मण आपल्या दृष्टीच्या योगानें वानरांना दग्ध करीतच कीं काय द्वाराशीं उभा आहे. त्याच्याकडे तूं पुत्र व बांधव ह्यांसहवर्तमान सत्वर जाऊन त्याला मस्तकानें प्रणाम कर. हे महाराजा, त्याचा क्रोध आजच्या आज शांत होऊं दे. राजन्, धर्मात्मा राम सांगेल, त्याप्रमाणें तूं स्वस्थांतःकरणपूर्वक वाग, आणि स्वतः जो संकेत तूं त्याच्याशीं केला आहेस, त्याला धरून राहून आपली प्रतिज्ञा खरी कर. "

सर्ग बत्तिसावा.

सुग्रीवाची गाळण.

मंत्र्यांसहवर्तमान असलेला विचारी सुग्रीव, अंगदाचें भाषण श्रवण करून लक्ष्मण क्रुद्ध झाल्याचें ऐकतांच आसनावरून सरला. नंतर मसलतीविषयीं निपुण असलेला आणि सल्लामसलतींना धरून चालणारा तो सुग्रीव, बऱ्याबाईटपणाचा विचार करून मंत्र्यांना म्हणाला, " मीं कांहीं अनुचित भाषण केलें नाहीं, व कांहीं अयोग्य कृत्यहि माझ्या हातून झालेलें नाहीं. तेव्हां राघवभ्राता लक्ष्मण कां क्रुद्ध झाला, ह्याविषयीं मला विचार पडला आहे. नेहमीं माझें छिद्र पहाण्यास टपून बसून माझा अपकार करणाऱ्या माझ्या शत्रूंनीं माझे नसते दोष खरोखर राघवाच्या कनिष्ठ भ्रात्याला सांगितले आहेत. ह्यास्तव सर्वांनींच आपापल्या बुद्धीप्रमाणें योग्य विचार करून लक्ष्मणाच्या कोपाचें कारण काय, हें विचारपूर्वक चांगल्या रीतीनें ठरविलें पाहिजे. वास्तविक विचार केला असतां, माझ्या हातून कांहीं अपराध घडल्यामुळें लक्ष्मणापासून अथवा रामापासून आज मला भीति उत्पन्न झालेली नाहीं. मित्र विनाकारण क्रुद्ध झाला आहे, ह्यामुळें मात्र मला भीति उत्पन्न झाली आहे. मित्र संपादन करणें सुलभ आहे, परंतु त्याच्याशीं सख्य कायम राखणें मात्र सर्व प्रकारें कठीण आहे. कारण, अंतःकरणें स्थिर नसल्यामुळें, शत्रूंनीं अल्पस्वल्प जरी कांहीं मित्राच्या कानांत सांगितलें, तरी सुद्धां उभयतांतील प्रेमाला व्यत्यय येतो. ह्यामुळें मी भयभीत झालों आहें. रामाचा माझ्या हातून कांहीं अपराध घडला असेल, आणि त्यामुळें तो क्रुद्ध झाला असेल, असें समजून मी भयभीत झालों नाहीं. माझ्या हातून रामाचा अपराध होईल कसा? कारण, महात्म्या रामानें जो माझ्यावर उपकार केला आहे, त्याची फेड माझ्या हातून होणें शक्य नाहीं."

हनुमंताचें भाषण.

ह्याप्रमाणें सुग्रीवानें भाषण केलें असतां, वानरश्रेष्ठ हनुमान स्वतःच्या तर्कानें वानरमंत्र्यांमध्यें म्हणाला, " हे वानरगणाधिपते, रामचंद्रानें केलेला चांगला उपकार तूं विश्वासघातकीपणानें विसरत नाहींस, हें कांहीं आश्चर्य नव्हे. वीर राघवानें वालीच्या पराक्रमाची भीति यत्किंचित्हि न बाळगितां तुझें प्रिय करण्याकरितां त्या इंद्रतुल्य पराक्रमी वीराचा वध केला आहे. ह्यावरून

तो राघव खास प्रेमामुळें क्रुद्ध झाला असून त्यानें आपला लक्ष्मीवर्धक भ्राता लक्ष्मण तुझ्याकडे पाठविला आहे, ह्यांत संशय नाहीं. कारण, मदमत्त झाल्यामुळें तुला कालाचें भान राहिलें नाहीं. प्रफुल्लित सप्तच्छदवृक्षांच्या योगानें श्यामवर्ण प्रदेशांनीं युक्त असलेला शुभ शरदृतु जवळ जवळ निघून गेल्यासारखाच आहे. आकाशांतील मेघ नाहींतसे झाले असून ग्रह व नक्षत्रें निर्मळ झालीं आहेत. त्याचप्रमाणें सर्व दिशा, नद्या व सरोवरें स्वच्छ झालीं आहेत. हे वानरश्रेष्ठा, उद्योगसमय प्राप्त झाल्याचें तूं जाणीत नाहींस. तेव्हां तूं मदमत्त झाला आहेस, असें स्पष्ट समजून हा लक्ष्मण येथें आला आहे. तस्मात्, भार्येचा अपहार झाल्यामुळें दुःखाकुल झालेल्या महात्म्या रघुवंशज रामाचें दुसऱ्याच्या द्वारानें झालेलें हें कठोर भाषण तुला सहनच केलें पाहिजे. प्रतिज्ञा केल्याप्रमाणें योग्य वेळीं हजर न राहाण्याचा तुझ्या हातून अपराध झाला असल्यामुळें हात जोडून लक्ष्मणाची कृपा संपादन करण्याशिवाय तुला गत्यंतर नाहीं, असें मला वाटतें. हितोपदेशाविषयीं नेमिलेल्या मंत्र्यांनीं जें कांहीं हित असेल, तें राजाला अवश्य सांगितलें पाहिजे. आणि म्हणूनच मी भय न बाळगितां निश्चित भाषण करीत आहें. रामानें क्रुद्ध होऊन हातामध्यें धनुष्य घेतलें असतां देव, असुर आणि गंधर्व ह्यांसहवर्तमान हें सर्व जगत् आपल्या अधीन ठेवण्यास तो समर्थ आहे. ज्याची पुनरपि कृपा संपादन करण्याचा प्रसंग यावयाचा असेल, त्याला क्रोध आणणेंच योग्य नाहीं. आणि विशेषतः स्वतःवर पूर्वी झालेला उपकार स्मरणाऱ्या कृतज्ञ पुरुषानें तर ही गोष्ट करितांच उपयोगी नाहीं. ह्यास्तव राजा, तूं त्याला मस्तकानें प्रणाम कर, आणि आपल्या संकेताला धरून राहून, भार्या ज्याप्रमाणें भर्त्याच्या अधीन होऊन राहाते, त्याप्रमाणें पुत्र व सुहृद्गण ह्यांसहवर्तमान तूं त्याच्या अधीन होऊन रहा. हे वानरराजा, राम आणि रामाचा कनिष्ठ भ्राता लक्ष्मण ह्यांच्या आज्ञेची उपेक्षा करण्याचें मनामध्यें आणणेंहि तुला योग्य नाहीं. कारण रघुवंशज लक्ष्मणासहवर्तमान असलेल्या ह्या इंद्रतुल्य पराक्रमी रामाचें अमानुष सामर्थ्य तुला ठाऊक आहेच."

सर्ग तेहेतिसावा.

लक्ष्मणाचा किष्किंधेंत प्रवेश.

(नगरशोभा.)

तदनंतर अंगदानें परत निरोप सांगितला असतां लक्ष्मण रामाच्या आज्ञेनें रमणीय अशा त्या किष्किंधा नगरीमध्यें गेला. त्या ठिकाणीं देवडीवर असलेले सर्व धिप्पाड व महाबलाढ्य वानर लक्ष्मणाला अवलोकन करितांक्षणीं हात जोडून उभे राहिले; क्रुद्ध होऊन दीर्घ सुस्कारे टाकूं लागलेल्या त्या दशरथपुत्र लक्ष्मणाला अवलोकन करितांक्षणीं वानर भिऊन गेल्यामुळें, किष्किंधा नगरीमध्यें शिरण्यास त्याला कोणीहि आडकाठी केली नाहीं. तेव्हां प्रफुल्लित वनांनीं युक्त, रत्नांनीं व्याप्त व उत्कृष्ट वस्तूंनीं भरलेली अशी ती दिव्य, रमणीय व प्रचंड गुहा लक्ष्मणानें अवलोकन केली. ती गुहा नानाप्रकारच्या रत्नांनीं सुशोभित झालेली होती. धनिक लोकांच्या निवासस्थानांनीं व राजवाड्यांनीं गजबजून गेलेली होती. सर्वदा मनोरथानुरूप फलांनीं युक्त असलेल्या प्रफुल्लित वृक्षांनींहि तिला शोभा आलेली होती. दिव्य पुष्पें आणि वस्त्रें धारण करीत असल्यामुळें ज्यांचें दर्शन प्रिय झालेलें आहे, अशा यथेष्ट रूप धारण करणाऱ्या देवपुत्र व गंधर्वपुत्र वानरांच्या योगानेंहि ती सुशोभित झालेली होती. चंदन, अगरु व पद्मक ह्यांच्या गंधांमुळें आणि उसांच्या रसापासून व मोहापासून तयार केलेल्या मद्यसमुदायामुळें त्या नगरीत जिकडे तिकडे सुवास सुटलेला होता. आंतील राजमार्गावर तर जिकडे तिकडे सुवासाचा कडेलोटच झालेला होता. विंध्याचल व मेरु ह्या पर्वतांसारख्या अनेक मजली उंच उंच राजवाड्यांनीं ती नगरी भरलेली होती.

असो. प्रथमतः पर्वतावरील निर्मल नद्या रघुवंशज लक्ष्मणानें अवलोकन केल्या, व नंतर अंगदाचें रम्य गृह त्यानें पाहिलें. तदनंतर मैंद, द्विविद, गवय, गवाक्ष, गज, शरभ, विद्युन्माली, संपाति, सूर्याक्ष, हनुमान, वीरबाहु, सुबाहु, महात्मा नल, कुमुद, सुषेण, तार आणि जांबवान, दधिवक्त्र, नील आणि सुपाटल व सुनेत्र ह्यांहि महात्म्या वानरश्रेष्ठांचीं मोठीं मजबूत व उत्कृष्ठ गृहें राजमार्गामध्यें लक्ष्मणानें अवलोकन केलीं. हीं गृहें श्वेतवर्ण अभ्राप्रमाणें प्रकाशणारीं असून सुगंधि द्रव्यांनीं व पुष्पांनीं भरलेली होतीं; आणि त्याचप्रमाणें विपुल धनधान्यांनीं तीं संपन्न असून सर्वोत्कृष्ठ स्त्रियांनीं सुशोभित झालेलीं होतीं.

राजगृहाची शोभा.

तर केवळ अनुपम होती. तें इंद्रभुवनासारखें रम्य होतें. श्वेत पर्वतानें तें परिवेष्ठित असल्यामुळें त्यांत दुसऱ्याचा प्रवेश होणेंहि कठीण होतें. कैलास पर्वताच्या शिखरांप्रमाणें शुभ्रवर्ण असलेल्या राजवाड्यांच्या शिखरांनीं आणि सर्वदा मनोरथानुरूप फलें देणाऱ्या प्रफुल्लित वृक्षांनीं तें सुशोभित झालेलें होतें. दिव्य पुष्पें व फलें आणि शीतल छाया ह्यांनीं युक्त असून आकारानें नीलमेघाप्रमाणें असलेल्या इंद्रदत्त मनोहर भव्य वृक्षांनीं त्याला शोभा आलेली होती. हातामध्यें शस्त्रें घेतलेल्या बलाढ्य वानरांनीं त्याच्या द्वारांचें रक्षण केलेलें होतें. असें तें शुभ्रवर्ण गृह दिव्य पुष्पांनीं व्याप्त झालेलें असून उत्कृष्ट सुवर्णाच्या तोरणांनीं युक्त होतें.

अंतःपुरशोभा.

असो. मोठ्या मेघामध्यें प्रविष्ट होणारा सूर्यच कीं काय अशा रीतीनें कोणाचीहि आडकाठी न होतां महाबलाढ्य लक्ष्मण सुग्रीवाच्या रम्य गृहामध्यें प्रविष्ट झाला. रथ व बैठकी ह्यांनीं गजबजून गेलेले सात चौक ओलांडून गेल्यावर त्या महात्म्या लक्ष्मणानें फारच विस्तीर्ण व सुरक्षित असें मोठें अंतःपुर अवलोकन केलें. त्या अंतःपुरांत सोन्यारुप्याचे अनेक पलंग ठिकठिकाणीं ठेविलेले असून, मोठमोठ्या मूल्यवान चादरी ज्यांच्यावर पसरलेल्या आहेत, अशीं सिंहासनेंहि ठिकठिकाणीं ठेविलेलीं होतीं. अशा प्रकारच्या त्या अंतःपुरामध्यें शिरतां शिरतांच ताल व शब्दांतील अक्षरें ह्यांचा ज्यांत मेळ आहे, असा एकसारखा तेथें सुरू असलेला व विण्याच्या स्वरानें युक्त असलेला मधुर ध्वनि त्याच्या कानीं पडला. सौंदर्याच्या व तारुण्याच्या तोऱ्यांत असलेल्या व नानाप्रकारच्या आकारांनीं युक्त असलेल्या अनेक स्त्रिया सुग्रीवाच्या अंतःपुरामध्यें त्या महाबलाढ्य लक्ष्मणानें अवलोकन केल्या. कुलीन, पुष्पमाला धारण केलेल्या, उत्कृष्ट माला गुंफण्यामध्यें गढून गेलेल्या, आणि उत्तम भूषणांनीं भूषित झालेल्या स्त्रिया तेथें अवलोकन केल्यावर संतुष्ट, विशेष गडबडींत नसलेले आणि साधारणच पोषाख व अलंकार घातलेले सुग्रीवाचे सेवकहि लक्ष्मणानें अवलोकन केले. तदनंतर तोरड्यांचा छुम् छुम् शब्द व कमरपट्ट्यांचा ध्वनि कानीं पडल्यामुळें वैभवशाली सुमित्रापुत्र लक्ष्मण लज्जित झाला. भूषणध्वनि कानांवर आल्यामुळें अधिकच रोष चढलेला तो वीर लक्ष्मण, धनुष्याच्या ध्वनीनें दशदिशा नादित करीत करीत प्रत्यंचेचा टणत्कार

करूं लागला. सुग्रीवाचे हातून रामकार्य होत नसल्या कारणानें क्रुद्ध झालेला तो महापराक्रमी वीर, सदाचार लक्ष्यांत आणून अंतःपुरामध्यें प्रवेश न करितां परत फिरला; आणि स्त्रीजनरहित अशा एका प्रदेशामध्यें प्रत्यंचेचा टणत्कार करीत करीत उभा राहिला. तेव्हां लक्ष्मणाचें आगमन झालें आहे, असें त्या ध्वनीवरून वानरराज सुग्रीवानें जाणिलें, आणि त्या ध्वनीनें त्रस्त होऊन तो आपल्या सिंहासनापासून दूर झाला. 'अंगदानें पूर्वी मला कळविल्याप्रमाणें निःसंशय हा भ्रातृवत्सल सुमित्रापुत्र प्राप्त झाला आहे' असा तो आपल्याशीं विचार करूं लागला. तें समजतांक्षणीं त्याच्या तोंडचें पाणी पळालें! तदनंतर भीतीमुळें मनाची धांदल उडून गेलेला तो वानरश्रेष्ठ दुसऱ्या कामाकडे गुंतून न राहतां मनोहर मुद्रेनें युक्त असलेल्या तारेला आपल्या हिताची गोष्ट विचारूं लागला.

तो म्हणाला, "हे सुभ्रु, स्वभावतः सौम्य मनानें युक्त असलेल्या पुरुषाला राग येण्याचें काय बरें कारण असावें? हा रामाचा कनिष्ठ भ्राता लक्ष्मण कोणत्या कारणामुळें येथें क्रुद्ध होऊन आल्यासारखा दिसत आहे? हे निर्दोष स्त्रिये, ह्या राजपुत्राच्या रोषाचें कारण तुझ्या लक्ष्यांत काय येत आहे? खरोखर हा पुरुषश्रेष्ठ कधींहि विनाकारण क्रोधाचें अवलंबन करणार नाहीं. ह्यास्तव आमच्या हातून जर कांहीं ह्याचा अपराध झाला असेल, तर तो कोणता झाला आहे, हें तूं विचार करून सत्वर ठरीव, आणि त्याला प्रसन्न करून घेण्याचा उपायहि मला सत्वर सांग. अथवा तूं स्वतःच त्याची भेट घेऊन सांत्वनयुक्त भाषणांनीं त्याची कृपा संपादन कर. शुद्ध मनानें युक्त असलेला हा लक्ष्मण तूं दृष्टीस पडल्यावर रागावणार नाहीं. कारण महात्मे कधींहि स्त्रियांवर विनाकारण क्रुद्ध होत नाहींत. तूं सौम्य शब्दांनीं त्याच्याशीं संभाषण करून त्याचीं क्षुब्ध झालेलीं इंद्रियें व मन हीं स्वस्थ केलींस, म्हणजे मी त्या शत्रुदमन कमलनयन लक्ष्मणाची भेट घेईन."

तारामुखें लक्ष्मणकोपसांत्वन.

ह्याप्रमाणें सुग्रीवानें सांगितलें असतां, मद्यपानाचा मद चढल्यामुळें जिची दृष्टि धुंद झाली आहे, जिचा कमरपट्टा व तो आवळण्याची सोन्याची सांखळी हीं दोन्हीं लोंबत आहेत, आणि स्तनभारामुळें जिचें शरीर नम्र झालेलें आहे, अशी ती सुलक्षणी[1] तारा अडखळत अडखळत लक्ष्मणासमीप गेली असतां, त्या

---

१ जिच्या भिवया सुंदर आहेत अशी.

वानरराजाच्या पत्नीला अवलोकन करितांक्षणीं तो महात्मा लक्ष्मण उदासीन-पणानें स्तब्ध राहिला. इतकेंच नव्हे, परंतु स्त्री जवळ आल्यामुळें क्रोधाचा त्याग करून तो राजपुत्र वर पाहीनासा झाला. स्वतः मद्यपान केलें असल्यामुळें, आणि राजकुमार लक्ष्मणाची मुद्रा प्रसन्न दिसल्यामुळें ती तारा सौम्य शब्द व महत्त्वाचा अर्थ ह्यांनीं भरलेलें आणि मैत्री कायम राख-ण्यास समर्थ असें भाषण त्याच्याशीं करूं लागली. ती म्हणाली, "हे राज-कुमारा, तुझ्या क्रोधाचें कारण काय? तुझ्या आज्ञेमध्यें कोण वागत नाहीं? अरे, शुष्कवृक्षांनीं युक्त असलेलें वन दग्ध करून बसलेल्या दावाग्नीवर कोण बरें निःशंकपणें बसणार आहे?"

मैत्री कायम राखणें हा ज्यांतील मुख्य उद्देश आहे, असें तें तिचें सांत्वन-पूर्वक भाषण श्रवण केल्यावर लक्ष्मण निर्भयपणें तिला म्हणाला, "भर्तृ-हिताविषयीं तत्पर असणारे स्त्रिये, धर्म व अर्थ संपादन करण्याचें मुळींच सोडून देऊन हा तुझा भर्ता कामाच्याच मागें लागलेला आहे, हें तूं जाणीत नाहींस काय? तारे, अमात्य व इतरहि सभासद ह्यांसहवर्तमान हा केवळ राज्याच्या स्थैर्याकरितांच झटणारा असून कामाचेंच सेवन करीत आहे, व शोकाकुल अस-लेल्या आमची गोष्टहि मनामध्यें आणीत नाहीं. चार महिन्यांनीं येण्याचा ह्यानेंच ठराव केला असून, ते लोटून गेले तरी मदमत्त होऊन क्रीडा करण्यामध्यें दंग झालेल्या ह्या सुग्रीवाच्या तें गांवींहि नाहीं. धर्म व अर्थ सिद्धीस जाण्याकरितां केवळ मद्यपानच करून राहणें प्रशस्त नाहीं. मद्यपानामुळें धर्म, अर्थ व काम ह्या सर्वांचाच ऱ्हास होतो. उपकार करणाऱ्यावर प्रत्युपकार न करणें ही आधीं मोठीच धर्महानि होत असून, गुणवान मित्राची मैत्री नाहींशी होणें ही मोठीच अर्थहानि होत आहे. मित्रकार्यसंपादन आणि सत्यधर्माविषयीं तत्परता हे दोन गुण मित्राचे ठिकाणीं असणें अवश्य आहे; परंतु तुझ्या भर्त्यानें ह्या दोन्ही गुणांचा त्याग केला असून मैत्रिपरिपालनरूप धर्माचेंहि त्यानें अवलंबन केलेलें नाहीं. तस्मात् हे कार्यतत्त्वज्ञ तारे, सांप्रत अशी गोष्ट झाली अस-तांना आमचें ह्यानंतर कर्तव्य काय, तें तूं कथन कर." धर्म व अर्थ ह्यांना धरून असलेलें आणि स्वभावतःच मधुर असलेलें त्याचें तें भाषण श्रवण केल्या-वर, सुग्रीवाच्या हातून सिद्धीस न गेलेलें राजकार्य शेवटास नेण्याविषयीं निश्चय करून राहिलेल्या त्या लक्ष्मणाला ती तारा पुनरपि म्हणाली, "हे राजपुत्रा, क्रोधाचा हा समय नव्हे, आणि स्वजनाचे ठिकाणीं कोप करणेंहि योग्य नाहीं.

हे वीरा, तुझाच मनोरथ सिद्धीस नेण्याची इच्छा धरणाऱ्या ह्या सुग्रीवाचा प्रमादहि सहन करणें तुला योग्य आहे. हे राजकुमारा, गुणांनीं श्रेष्ठ असलेला पुरुष क्षुद्र प्राण्यावर कसा बरें कोप करील? सत्त्वगुणानें व्याप्त आणि म्हणूनच केवळ तपाचें स्थान असलेला कोण बरें तुझ्यासारखा पुरुष क्रोधाधीन होईल? वानरवीर सुग्रीवाचा मित्र जो राम, त्याच्या कोपाचें कारण काय, हें मी जाणीत आहें. त्याचें कार्य होण्याला विलंब लागला आहे, ही गोष्ट माझ्या लक्ष्यांत आहे. तूं जें आमचें कार्य केलें आहेस, तेंहि मी समजून आहें. ह्यासंबंधानें आम्हीं प्रत्युपकार काय केला पाहिजे, तोहि मला माहीत आहे. हे पुरुषश्रेष्ठा, कामाचें दुःसह सामर्थ्यहि मी ओळखून आहें, आणि त्याचप्रमाणें सांप्रत सुग्रीवाचें दुसरीकडे लक्ष्य नसून कामवासनेमुळें तो कोणाचे ठिकाणीं आसक्त होऊन राहिला आहे, हेंहि मला ठाऊक आहे. तूं क्रोधाधीन झाल्याचें दिसत आहे, ह्यावरून कामाचा प्रभाव तुला माहीत नाहीं, अशी माझी अटकळ होत आहे. अरे, कामासक्त झालेल्या मनुष्याला देशकालाचें भान राहात नसून धर्म व अर्थ ह्यांचीहि पर्वा राहात नाहीं, हें प्रसिद्ध आहे. ह्यास्तव, कामाधीनतेमुळें लाज सोडून माझ्याजवळ असणारा आणि कामाच्याच मागें लागणारा जो तुझा वानरवंशाधिपति भ्राता, त्याला सांप्रत क्षमा कर. अरे, धर्म व तपश्चर्या ह्यांचे ठिकाणींच सर्वस्वीं तत्पर राहाणारे महर्षीहि विषयवासनेनें युक्त झाल्यामुळें स्त्रियांचे ठिकाणीं मोहानें आसक्त होऊन राहिलेले असतात. तेव्हां जातीनेंच चंचल असलेला हा वानर—आणि त्यांतूनहि राजा असतांना—विषयसुखाविषयीं कसा बरें आसक्त होणार नाहीं?"

अतर्क्य लक्ष्मणाशीं गंभीर अर्थानें भरलेलें असें हें भाषण केल्यानंतर मद चढल्यामुळें जिचे डोळे धुंद झाले आहेत, अशी ती तारा भर्त्याला हितावह असें हें खेदपूर्वक भाषण पुनरपि लक्ष्मणाशीं करूं लागली. ती म्हणाली, "हे पुरुषश्रेष्ठा, सुग्रीव जरी कामाचा दास होऊन राहिला आहे, तरी तुझें कार्य सिद्धीस नेण्याचा उद्योग सुरू करण्याविषयीं त्यानें कधींच आज्ञा केलेली आहे; आणि त्याप्रमाणें नानाप्रकारच्या पर्वतांवर वास्तव्य करणारे व यथेष्ट रूप धारण करणारे महावीर्यवान वानर लाखों क्रोडों आलेले आहेत. तस्मात्, हे महापराक्रमी लक्ष्मणा, तूं आंत ये. एकाएकीं अंतःपुरांत प्रविष्ट न होण्यानें तूं आपलें ब्रीद निष्कलंकपणें राखिलें आहेस. कारण, कामविकार मनामध्यें न आणितां मित्रबुद्धीनेंच परदारा अवलोकन करणें, हेंच सज्जनांचें ब्रीद आहे."

लक्ष्मणाचा सुग्रीवाच्या अंतःपुरीं प्रवेश.

ह्याप्रमाणें तारेनें अनुज्ञा दिल्यामुळें, आणि रामाची आज्ञा सत्वर सिद्धीस नेण्याविषयींहि उत्सुक झाल्यामुळें, तो महापराक्रमी लक्ष्मण अंतःपुरामध्यें प्रविष्ट झाला. तेव्हां मोठें मूल्यवान आस्तरण ज्यावर घातलें आहे, अशा सुवर्णाच्या उत्कृष्ट सिंहासनावर बसलेला सूर्यासारखा तेजस्वी सुग्रीव त्याच्या दृष्टीस पडला. दिव्य अलंकारांनीं ज्याचें शरीर भूषित झालेलें आहे, दिव्य पुष्पें आणि वस्त्रें ज्यानें धारण केलेलीं आहेत, ज्याचें रूपहि दिव्य आहे, आणि इंद्राप्रमाणें जो अजिंक्य आहे, असा तो यशस्वी सुग्रीव दिव्य अलंकार व माला धारण केलेल्या तरुणी स्त्रियांनीं आसमंताद्भागीं परिवेष्ठित असल्याचें अवलोकन करून, लक्ष्मणाचे नेत्र अधिकच क्षुब्ध व आरक्तवर्ण दिसूं लागले, आणि तो साक्षात् मृत्यूप्रमाणेंच भासूं लागला! असो.

तारा लक्ष्मणाला आंत घेऊन आली, तरी उत्कृष्ट सुवर्णासारखी कांति आणि विशाल नेत्र ह्यांनीं युक्त असलेला तो वीर रुमेलाच दृढ आलिंगन देऊन सिंहासनावर बसला होता व त्यानें तेथूनच विशालनयन महाशय लक्ष्मणाला अवलोकन केलें.

सर्ग चौतिसावा.

लक्ष्मणाचें सुग्रीवाशीं क्रोधयुक्त भाषण.

कोणाचीहि आडकाठी न होतां आंत प्रविष्ट झालेल्या त्या पुरुषश्रेष्ठ क्रुद्ध लक्ष्मणाला अवलोकन करून सुग्रीवाची गाळण उडून गेली. तेजानें जसा कांहीं प्रदीप्त असून, भ्रात्याच्या दुःखानें संतप्त झाल्यामुळें सुस्कारे टाकीत असलेल्या त्या क्रुद्ध दशरथपुत्राला अवलोकन करितांक्षणीं, उत्तम प्रकारें भूषित केलेल्या प्रचंड इंद्रध्वजाप्रमाणें दिसत असलेला तो वानरश्रेष्ठ सोन्याचें सिंहासन सोडून देऊन उठला. तेव्हां आकाशामध्यें असलेल्या पूर्णचंद्राचे मागोमाग जाणाऱ्या नक्षत्रपंक्तीच कीं काय अशा त्या रुमाप्रभृति स्त्रियाहि त्याच्या मागोमाग खालीं सिंहासनावरून पटापट उड्या टाकूं लागल्या. आरक्तवर्ण नेत्रांनीं युक्त असलेला तो वैभवशाली सुग्रीव खालीं उतरतांक्षणीं हात जोडून लक्ष्मणाचे संमुख आला असतां, लक्ष्मण मोठ्या कल्पवृक्षाप्रमाणें तेथें तसाच उभा राहिला, आणि

तारांनीं युक्त असलेल्या चंद्राप्रमाणें रुमेसहवर्तमान स्त्रियांच्यामध्यें असलेल्या सुग्रीवाला तो क्रुद्ध लक्ष्मण म्हणाला, "सत्त्वस्थ, कुलीन, दयाळु, जितेंद्रिय, कृतज्ञ आणि सत्यवादी असा जो राजा असेल, त्याची जगतामध्यें मानमान्यता होत असते. जो राजा अधर्माचें अवलंबन करून राहिलेला असतो, आणि उपकार करणाऱ्या मित्रांशीं केलेली प्रतिज्ञा शेवटास नेत नाहीं, त्यापेक्षां अधिक दुष्ट कोण बरें आढळणार आहे ? एका अश्वाकरितां असत्य भाषण केलें असतां शंभर अश्वांचा वध केल्याचें, आणि एका गाईकरितां अनृत भाषण केलें असतां सहस्र गायींचा वध केल्याचें पातक पुरुषाला लागत असतें. दुसऱ्या पुरुषाशीं केलेली कांहीं प्रतिज्ञा शेवटास न नेली, तर प्रतिज्ञा करणारा पुरुष स्वतःच्या व स्वजनांच्या उत्तम गतीचा विघात करितो. हे वानरराजा, मित्रांच्या हातून पूर्वी स्वतःचें कार्य झालें असतांनाहि त्यांच्यावर जो प्रतिज्ञा केल्याप्रमाणें प्रत्युपकार करीत नाहीं, तो कृतघ्न असून सर्व लोकांना वध्य आहे. हे वानरा,

> गोघ्ने चैव सुरापे च चौरे भग्नव्रते तथा।
> निष्कृतिर्विहिता सद्भिः कृतघ्ने नास्ति निष्कृतिः ॥

हा सर्व लोकांना मान्य असलेला एक श्लोक, कृतघ्नाला अवलोकन करून क्रुद्ध झालेल्या जगत्पित्या ब्रह्मदेवानें उच्चारिलेला आहे. तेव्हां हे वानरश्रेष्ठा, रामानें पूर्वी तुझें कार्य केलें असतांहि ज्या अर्थी तूं त्याची बोलल्याप्रमाणें फेड करीत नाहींस, त्या अर्थी तूं कृतघ्न व असत्यवादी आहेस. अरे, रामाच्या हातून जर तुझें कार्य झालेलें आहे, तर प्रत्युपकार करण्याची इच्छा धरून सीतेचा शोध लावण्याविषयीं तूं यत्न करणें खरोखर अवश्य असतांना, खोटी प्रतिज्ञा करणारा तूं ग्राम्य अशा विषयोपभोगाचे ठिकाणीं आसक्त होऊन राहिला आहेस; परंतु बेडूक पकडण्याकरितां त्याच्यासारखा शब्द करणाऱ्या सर्पाप्रमाणें तूं वंचक आहेस, ही गोष्ट रामाला ठाऊक नाहीं. अरे, तूं वास्तविक पापी व दुष्ट असूनहि, परदुःख जाणणाऱ्या महाभाग्यवान महात्म्या रामानें तुला वानरांचें राज्य प्राप्त करून दिलें आहे. तेव्हां महात्म्या राघवाचा उपकार जर तूं जाणणार नाहींस, तर तीक्ष्ण बाणांच्या योगानें वध पावून तूं आतांच्या

---

१ गोवध करणाऱ्याला, सुरापान करणाऱ्याला, ब्राह्मणाचें सुवर्ण हरण करणाऱ्याला आणि व्रतभंग करणाऱ्यालाहि धर्मवेत्त्या सज्जनांनीं निष्कृति सांगितलेली आहे, परंतु कृतघ्नाला प्रायश्चित्त सांगितलेलें नाहीं.



तारेचें लक्ष्मणाशीं सांत्वनयुक्त भाषण. [पृ. ११३.

आतांच वालीची भेट घेशील. वाली वध पावून ज्या मार्गानें चालता झाला, तो मार्ग कांहीं अगदींच संकुचित नाहीं. वालीच्या बरोबर तुलाहि जातां येईल, इतका तो विस्तीर्ण आहे. तात्पर्य, वालीचा वध करण्याला ज्याप्रमाणें मुळींच वेळ लागला नाहीं, त्याप्रमाणें तुझाहि वध होण्याला कांहीं वेळ लागेल, ही गोष्ट तूं सोडून दे. तस्मात् सुग्रीवा, तूं जो संकेत केला आहेस, त्याला अनुसरून वाग, आणि वालीच्या मार्गाचें अवलंबन करूं नको. अरे, इक्ष्वाकु-वंशजश्रेष्ठ रामाच्या धनुष्यापासून सुटलेले वज्रतुल्य बाण खरोखर तुझ्या दृष्टीस पडले नाहींत, म्हणूनच तूं खुशाल चैनी बनून विषयसुखाचा उपभोग घेत पडला आहेस, व रामकार्य करण्याचें मनांतहि आणीत नाहींस!"

सर्ग पस्तिसावा.

तारेचें लक्ष्मणाशीं सांत्वनयुक्त भाषण.

तेजानें जसा कांहीं जळत असलेला तो सुमित्रापुत्र लक्ष्मण तशा प्रकारें भाषण करीत असतांना, चंद्रासारख्या आल्हादकारक मुखानें युक्त असलेली तारा त्याला म्हणाली, " लक्ष्मणा, ह्या वानरराजाशीं तूं ह्याप्रमाणें कठोर भाषण करूं नको. कठोर भाषण ऐकून घेण्याला—आणि त्यांतूनहि विशेषतः तुझ्या मुखांतून निघालेलें कठोर भाषण ऐकून घेण्याला—हा पात्र नाहीं. हे वीरा, वानरराज सुग्रीव कृतघ्न नाहीं, शठ नाहीं, क्रूर नाहीं, असत्य भाषण करणारा नाहीं आणि गैरमार्गानें चालणाराहि नाहीं. हे वीरा, संग्रामामध्यें इतरांना दुर्घट असें जें कार्य रामानें केलें आहे, तो झालेला रामाचा उपकार हा वीर मुळींच विसरला नाहीं. हे शत्रुतापना, रामाच्या प्रसादामुळेंच कीर्ति, रुमा, मी आणि अक्षय्य वानरराज्य हीं सुग्रीवाला इहलोकीं प्राप्त झालेलीं आहेत. पूर्वीं अतिशयच दुःख भोगि-लेल्या ह्या सुग्रीवाला हें उत्कृष्ठ सुख मिळाल्यामुळें विश्वामित्र मुनींप्रमाणें हा ग्राम्य सुखांत दंग झाला आहे, आणि म्हणूनच ह्याला प्रतिज्ञा शेवटास नेण्याचा समय प्राप्त झाल्याचें भान राहिलेलें नाहीं. लक्ष्मणा, घृताची नामक अप्सरेचे ठिकाणीं आसक्त होऊन राहिलेल्या धर्मात्म्या विश्वामित्र महामुनींना दहा वर्षें लोटलेलीं एका दिवसाप्रमाणें भासलीं. सारांश कालवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ अस-लेल्या महातेजस्वी विश्वामित्र मुनींना जर प्राप्त झालेल्या कालाचें भान राहिलें नाहीं, तर जो बोलूनचालून क्षुद्र योनींतील सुग्रीव त्याची अशी अवस्था

झाली, ह्यांत आश्चर्य तें काय? लक्ष्मणा, विषयोपभोगाविषयीं तृप्त न झाल्यामुळें कामशांतिरूप देहधर्मामध्यें गढून राहिलेल्या ह्या खिन्न सुग्रीवाला रामानें क्षमा करावी. बा लक्ष्मणा, खरी गोष्ट समजून न घेतां ज्याप्रमाणें एखादा साधारण मनुष्य क्रोधाधीन होतो, त्याप्रमाणें तूं क्रोधाधीन होऊं नको. कारण हे पुरुषश्रेष्ठा, तुझ्यासारखे सत्त्वगुणसंपन्न पुरुष विचार केल्यावांचून एकाएकीं क्रोधाच्या तावडींत सांपडत नाहींत. तस्मात् हे धर्मवेत्त्या, सुग्रीवाचें हित करण्याविषयीं तत्पर असलेली ही मी तुझी प्रार्थना करीत आहें. ह्यास्तव ह्या क्रोधजन्य प्रचंड क्षोभाचा तूं त्याग कर. रामाचें प्रिय करण्याकरितां रुमा, मी, अंगद, राज्य, धन, धान्य व पशु ह्या सर्वांचाहि सुग्रीव त्याग करील, असें मला वाटतें. त्या राक्षसाधमाचा वध करून, रोहिणीसंगत झालेल्या चंद्राप्रमाणें सुग्रीव रामाचा सीतेशीं समागम करवून देईल. एक महापद्म, तीन लक्ष आणि नव्याण्णव हजार सहाशें इतके राक्षस लंकेमध्यें आहेत. तेव्हां त्या यथेष्ट रूप धारण करणाऱ्या अजिंक्य राक्षसांचा वध केल्यावांचून सीतेचा अपहार केलेल्या रावणाचा वध होणें शक्य नाहीं. लक्ष्मणा, संग्रामामध्यें कोणाचें सहाय्य नसेल, तर रामाच्या हातून त्या राक्षसांचा वध होणें शक्य नाहीं; आणि रावणहि क्रूरकर्मा आहे. तस्मात्, रामाला सुग्रीवाच्या मदतीची विशेषच जरूर आहे. ह्याप्रमाणें मला वालीनें सांगितलें होतें. तो वानरराज माहितगार होता. ह्या प्रकार मला कांहीं पुरतासा माहीत नाहीं. त्या वालीपासून ऐकिलें असल्यामुळें मी सांगत आहें. तुला सहाय्य करण्याकरितां म्हणजे रावणाशीं होणाऱ्या युद्धामध्यें तुझ्या बाजूला मोठमोठे असंख्य वानर आणण्याकरितां वानरश्रेष्ठ बाहेर पाठविले आहेत, आणि रामाचा मनोरथ परिपूर्ण व्हावा, एतदर्थ त्या अत्यंत महाबलाढ्य व पराक्रमी वानरांची हा वानरराज सुग्रीव प्रतीक्षा करीत आहे; व म्हणून इतक्यांतच हा बाहेर पडत नाहीं. लक्ष्मणा, सुग्रीवानें ज्याप्रमाणें वानर येथें येण्याची कालमर्यादा करून ठेविली आहे, त्याप्रमाणें ते सर्वहि महाबलाढ्य वानर आज येथें येतील. हे शत्रुदमना, हजार कोट ऋक्ष आणि शेंकडों गोलांगूल आज तुझ्याकडे येतील. तूं क्रोधाचा त्याग कर. हे ककुत्स्थकुलोत्पन्ना, उज्ज्वल तेजानें युक्त असे कोटयावधि वानर सुग्रीवाचे ताब्यांत आहेत. हें तुझें मुख आणि कोपामुळें रक्तासारखे लाल झालेले हे तुझे नेत्र दृष्टीस पडल्यापासून मोठमोठ्या वानरस्त्रियांचीं मनें अस्वस्थ झालेलीं आहेत. कारण वालीचा वधरूप जें कृत्य

तुझ्या ज्येष्ठ भ्रात्यानें केलें आहे, तें लक्ष्यांत आणून आम्ही सर्वहि भयभीत झालों आहों; आणि सुग्रीवाचीहि तुझ्या हस्तून तीच अवस्था होईल कीं काय, अशी आम्हांला शंका वाटत आहे."

सर्ग छत्तिसावा.

लक्ष्मण व सुग्रीव यांचें प्रेमयुक्त भाषण.

ह्याप्रमाणें धर्माला अनुसरून असलेलें व विनययुक्त असें तें तारेचें भाषण सौम्यस्वभावी लक्ष्मणाला मान्य झालें, असें पाहून अंगावरील ओलें वस्त्र ज्या-प्रमाणें टाकून देतात त्याप्रमाणें लक्ष्मणाचें जें अतिशय भय वाटत होतें, तें सुग्रीवानें टाकून दिलें. तदनंतर कंठामध्यें असलेली मोठी व अनेक पदरी अद्भुत पुष्पमाला त्यानें तोडून टाकिली. त्यामुळें त्याचा विषयमद लगेच नाहींसा झाला. तेव्हां सर्व वानरांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या सुग्रीवानें भयंकर शक्तीनें युक्त असलेल्या लक्ष्मणाला हर्ष उत्पन्न करीत करीत विनययुक्त शब्दांनीं भाषण केलें. तो म्हणाला, "लक्ष्मणा, वैभव, कीर्ति आणि अक्षय्य वानर-राज्य हें सर्व नाहींसें झालें होतें; परंतु रामाच्या कृपेमुळें मला हें पुनरपि प्राप्त झालें. तेव्हां हे राजकुमारा, स्वपराक्रमानें प्रख्यात असलेल्या त्या देवावतारी रामाच्या उपकाराची तशा प्रकारें फेड अंशतः तरी करण्यास कोण समर्थ आहे? माझें एक नांवाला मात्र साहाय्य त्याला होणारें आहे; परंतु वास्तविक विचार केला असतां तो धर्मात्मा रघुवंशज राम स्वतःच्याच तेजानें रावणाचा वध करील आणि सीता प्राप्त करून घेईल. अरे, ज्यानें एकाच बाणानें सात प्रचंड वृक्ष, पर्वत व पृथ्वी हीं विदीर्ण केलीं, त्याला दुसऱ्याच्या साहाय्याचा खरोखर काय बरें उपयोग होणार आहे? लक्ष्मणा, जो धनुष्य ओढूं लागला असतां त्याच्या ध्वनीनें भूमि पर्वतांसहवर्तमान कंपित झाली, त्याला इतर साहाय्य कर-णाऱ्यांची काय बरें गरज आहे? तथापि हे पुरुषश्रेष्ठा, युद्धामध्यें पुढारीपणा करणाऱ्या इतर राक्षसांसहवर्तमान शत्रु रावणाचा वध करण्यास राजा राम निघाला असतां त्याच्या मागोमाग मी येणार. ह्यास्तव, हा स्वभावाचा सौम्य आहे, ह्या विश्वासामुळें किंवा सलगीमुळें ह्या दासाचा जर कांहीं अपराध झाला असेल, तर तो क्षमा करावा. कारण ज्याच्या हातून अपराधच घडणार नाहीं, असा कोणीहि नाहीं."

ह्याप्रमाणें तो महात्मा सुग्रीव बोलूं लागला असतां लक्ष्मण संतुष्ट झाला, आणि प्रेमानें त्याला म्हणाला, " हे वानरराज सुग्रीवा, तूं नाथ–आणि विशेषतः विनयसंपन्न नाथ–प्राप्त झाल्यामुळें माझा भ्राता राम खरोखर आज सर्व प्रकारें सनाथ झालेला आहे. सुग्रीवा, तुझा प्रभाव आणि अशा प्रकारचें तुझें हें निर्मळ आचरण लक्ष्यांत घेतलें असतां, तूं वानरराज्याच्या अनुपम उपभोग घेण्यास योग्यच आहेस. बाबारे, तुझें साहाय्य मिळाल्यामुळेंच राम प्रतापी होईल, आणि संग्राममध्यें लवकरच शत्रूंचा वध करील, ह्यांत शंका नाहीं. सुग्रीवा, धर्मज्ञ, कृतज्ञ आणि समरांगणांतून परत न फिरणाऱ्या तुला हें सयुक्तिक भाषण योग्यच आहे. माझा ज्येष्ठ भ्राता आणि तूं ह्यांशिवाय दुसरा कोण बरें समंजस पुरुष दुसऱ्याच्या सामर्थ्याविषयीं प्रशंसा करणार आहे ? हे वानरश्रेष्ठा, बल व पराक्रम ह्यांनीं तूं रामाची बरोबरी करणारा आहेस, आणि आणि देवतांनीं तुला चिरकाल साहाय्यकर्ता म्हणून रामाचे स्वाधीन केलेला आहे. तथापि हे वीरा, माझ्या बरोबर तूं येथून लवकर बाहेर नीघ, भार्येचा अपहार झाल्यामुळें दुःखित झालेल्या आपल्या मित्राचें सांत्वन कर, आणि शोकाकुल झालेल्या रामाचें भाषण लक्ष्यांत आणून मी जे कठोर शब्द तुला उद्देशून उच्चारिले, त्याची मला क्षमा कर. "

सर्ग सदतिसावा.

वानरसैन्य बोलाविणें.

ह्याप्रमाणें महात्म्या लक्ष्मणानें सुग्रीवाशीं भाषण केलें असतां, शेजारी असलेल्या हनुमानाला सुग्रीव म्हणाला, " महेंद्र, हिमालय, विंध्य व कैलास ह्यांचीं शिखरें आणि श्वेतवर्ण शिखरांनीं युक्त असलेला मंदर ह्या पांच पर्वतांवर जे आहेत, बालसूर्यासारख्या आरक्तवर्ण व समुद्राच्या तीरीं पश्चिम दिशेला नेहमीं झळकत असलेल्या पर्वताचे ठिकाणीं जे वास्तव्य करीत आहेत, सायंकालसमयीं पश्चिम दिशेस दिसणाऱ्या अभ्राप्रमाणें आरक्तवर्ण असलेल्या उदयाचलावर ज्यांचें वास्तव्य आहे, पद्माचलाच्या वनाचा आश्रय करून जे भयंकर वानरश्रेष्ठ राहिलेले आहेत, कांतीनें नीलमेघांप्रमाणें असून गजेंद्राप्रमाणें महाबलाढ्य असलेले जे वानर अंजन पर्वतावर राहत आहेत, सुवर्णासारखे देदीप्यमान असे जे वानर

मोठमोठ्या पर्वतांच्या गुहांमध्यें वस्ती करून राहिलेले आहेत, मेरु पर्वतासमीप जे रहात आहेत, धूम्र पर्वताचा ज्यांनीं आश्रय केलेला आहे, कांतीनें बाल-सूर्याप्रमाणें असून प्रचंड वेग धारण करणारे असे जे वानर मैरेय मद्य पीत महारुण पर्वतावर राहिले आहेत, आणि अत्यंत रमणीय व सुगंधी अशा मोठ-मोठ्या वनांतून व तापशांच्या आश्रमामुळें मनोहर बनलेल्या वनप्रदेशांतून सर्व बाजूंनीं ज्यांनीं तळ दिलेला आहे, अशा पृथ्वींतील ठिकठिकाणच्या सर्व वान-रांना तूं येथें सत्वर जमीव. पूर्वी पाठविलेल्या वानरांपेक्षां शीघ्र गमन करणारे दुसरे वानर पाठवून, आणि सामदानप्रभृति योग्य उपाय योजण्याविषयीं त्यांना सांगून, या सर्व वानरांना येथें आणविण्याची तूं तजवीज कर. मोठे वेगवान म्हणून जे मला माहीत होते, ते भीं प्रथम पाठविलेच आहेत. तेव्हां आतां त्यांना त्वरा करण्याकरितां तूं आणखीहि श्रेष्ठ श्रेष्ठ वानर तिकडे पाठवून दे. विषयोपभोगविषयीं आसक्त आणि चेंगट असे ज कोणी असतील, त्या सर्व वानरश्रेष्ठांना तूं सत्वर इकडे घेऊन ये. दहा दिवसांत माझ्या आज्ञेप्रमाणें जे येणार नाहींत, त्या राजाज्ञाभंग करणाऱ्या दुष्टांचा वधच केला पाहिजे. हुकुमांत असलेले शेंकडों, हजारों, क्रोडों वानरश्रेष्ठ माझ्या आज्ञेनें चालते होऊं द्या. शरीरानें मेघ व पर्वत ह्यांच्यासारखे असल्यामुळें, जातांना जसे कांहीं आकाश आच्छादन करणारे आणि दिसण्यांतहि भयंकर असलेले वानरश्रेष्ठ माझ्या आज्ञेनें येथून चालते होऊं द्या. शीघ्र गति म्हणजे काय, हें समजणारे ते सर्व वानर माझ्या आज्ञेनें येथून चालते होऊन पृथ्वींतील सर्व वानर माझ्या हुकुमावरून सत्वर घेऊन येवोत."

ह्याप्रमाणें त्या वानरराजाचें भाषण श्रवण केल्यावर वायुपुत्र हनुमानानें सर्व दिशांस पराक्रमी वानर पाठवून दिले. तेव्हां पक्षी व नक्षत्रें ह्यांच्या मार्गानें गमन करणारे असे ते राजानें पाठविलेले वानर एका क्षणांत आकाशामध्यें उडून गेले; आणि समुद्र, पर्वत, वनें आणि सरोवरें ह्या ठिकाणीं जाऊन तेथील सर्व वानरांना त्यांनीं रामाकरितां सुग्रीवाकडे जमण्यास सांगितलें. तेव्हां मृत्यूची अथवा कालाचीच उपमा ज्याला योग्य आहे, अशा त्या राजाधिराज सुग्रीवाची आज्ञा श्रवण करितांक्षणीं त्याचें भय बाळगून वानर सुग्रीवाकडे आले. सारांश, कांतीनें कज्जलासारखे असलेले तीन कोट महाबलाढ्य वानर अंजन पर्वतापासून निघून रामाकडे आले. जिकडे सूर्याचा अस्त होतो, त्या श्रेष्ठ पर्वताचे ठिकाणीं क्रीडा करणारे आणि कांतीनें तप्त सुवर्णाप्रमाणें अस-

केलें आहे दहा कोट वानर त्या अस्ताचल पर्वतापासून निघाले. सिंहाच्या आयाळाप्रमाणें ज्यांची कांति आहे, असे सहस्र कोटि वानर कैलास पर्वताच्या शिखरापासून आले. फलमूलांवर उपजीविका करून जे हिमालय पर्वताचा आश्रय करून राहिले होते, असे एक शंकु वानर तेथून निघाले. अग्नीसारखे तेजस्वी आणि पराक्रमानें व आकृतीनेंहि भयंकर असे हजारों कोट वानर विंध्य-पर्वतापासून सत्वर निघाले. क्षीरसमुद्राच्या तीरीं वास्तव्य करणारे, तमालवनामध्यें राहणारे आणि नारिकेलवनांत वसति करणारे वानर किती आले, त्यांची गणतीच नाहीं. सारांश वनें, पर्वताच्या गुहा आणि नद्या ह्यांपासून महाबलाढ्य वानर निघाले. ती वानरसेना सूर्याला गिळूनच टाकीत आहे कीं काय, अशा रीतीनें आकाशांत उड्डाण करीत करीत तेथें येऊन थडकली. सर्व वानरांना त्वरा करण्याकरितां मागाहून जे वीर वानर गेले होते, त्यांनीं हिमालय-पर्वतावर एक अतिप्रसिद्ध महावृक्ष अवलोकन केला. त्या पवित्र व श्रेष्ठ पर्वतावर पूर्वी अत्यंत मनोहर असा माहेश्वर यज्ञ झाला; व त्याच्या योगानें सर्व देवतांचें मन संतुष्ट झालें. होमद्रव्यांच्या स्रावापासून उत्पन्न झालेलीं व अमृतासारखीं मधुर असलेलीं मुळें व फळें वानरांनीं तेथें अवलोकन केलीं. त्या होमद्रव्यापासून झालेलीं दिव्य व मनोहर फळेंमुळें जो कोणी एकदा खातो, तो एक महिनाभर तृप्त राहतो. तीं दिव्य फळें व मुळें आणि दिव्य औषधें, फळांवर उपजीविका करणाऱ्या वानरश्रेष्ठांनीं घेतलीं, आणि सुग्रीवाला संतुष्ट करण्याकरितां त्या यज्ञस्थलापासून वानरांनीं सुगंधि पुष्पेंहि आणिलीं. नंतर पृथ्वींतील सर्व वानरांना येण्याची आज्ञा कळवून ते येण्याच्या पूर्वींच ते शीघ्रगामी वानर किष्किंधेंत येऊन पोहोंचले. नंतर सर्व औषधि, फळें व मुळें घेऊन आलेल्या त्या वानरांनीं सुग्रीवाला तीं अर्पण केलीं, आणि ते म्हणाले, "सर्व पर्वत, नद्या व वनें आम्हीं धुंडाळिलीं. पृथ्वींतील सर्व वानर आपल्या आज्ञेप्रमाणें इकडे येत आहेत."

त्यांचें हें भाषण श्रवण करितांक्षणीं वानरराज सुग्रीवाला हर्ष झाला, आणि संतुष्ट होऊन त्यानें त्यांच्या सर्व नजराण्यांचा स्वीकार केला.

सर्ग अडतिसावा.

सुग्रीवाचें रामचंद्राकडे गमन.

अशा प्रकारें पराक्रम गाजविलेल्या त्या हजारों वानरांनीं आणिलेला तो सर्व नजराणा घेऊन व त्यांचें सांत्वन करून सुग्रीवानें त्या सर्वांना तत्काळ जाण्यास निरोप निरोप दिला, आणि तो आपल्याला व महाबलाढ्य रामाला कृतार्थ मानूं लागला. (उभयतांचेंहि काम झालेंच, असें समजूं लागला.) नंतर प्रचंड बलानें युक्त असून सर्व वानरांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या विनयसंपन्न सुग्रीवाला हर्ष उत्पन्न करीत करीत तो लक्ष्मण म्हणाला, "हे विनयसंपन्न सुग्रीवा, तुला बरें दिसत असल्यास किष्किंधा नगरींतून तूं आतां बाहेर चल." हें लक्ष्मणाचें उत्कृष्ठ भाषण श्रवण करून सुग्रीव अत्यंत संतुष्ट झाला, आणि म्हणाला, "ठीक आहे, आम्ही चलतों. मला तुझ्या आज्ञेप्रमाणें वागलेंच पाहिजे."

याप्रमाणें सांगून शुभ लक्षणांनीं युक्त असलेल्या लक्ष्मणाला आणि ताराप्रभृति स्त्रियांना सुग्रीवानें जाण्यास सांगितलें. नंतर उच्च स्वरानें 'इकडे या' म्हणून त्या मुख्य मुख्य वानरांना त्यानें हांक मारिली. तेव्हां स्त्रिया दृष्टीस पडण्यास ज्यांना हरकत नव्हती, असे खासगीपैकीं जे कांहीं वानर तेथें होते, ते त्याची हांक ऐकतांक्षणीं लगेच हात जोडून तेथें आले. तेव्हां सूर्यासमान तेजस्वी सुग्रीव त्यांना म्हणाला, 'वानरहो, माझी पालखी लवकर तयार करा.' ही त्याची आज्ञा श्रवण करितांक्षणीं शीघ्रगामी वानरांनीं दिसण्यांत मनोहर असलेली पालखी तेथें आणिली. पालखी आणिलेली पाहून तो वानरराज सुग्रीव लक्ष्मणाला म्हणाला, 'लक्ष्मणा, सत्वर आरोहण कर.' असें लक्ष्मणाला सांगितल्यानंतर तो सुग्रीव लक्ष्मणासहवर्तमान अनेक वानरांनीं युक्त अशा त्या सूर्यासारख्या तेजस्वी वाहनामध्यें आरूढ झाला; व मस्तकीं धारण केलेलें श्वेत छत्र, सभोंवतीं वारल्या जाणाऱ्या शुभ्र चवऱ्या, शंख व भेरी ह्यांचे ध्वनि आणि भाट ह्यांच्या योगानें आनंदित झालेला व अशा प्रकारें अनुपम राज्यवैभव प्राप्त झालेला तो सुग्रीव किष्किंधा नगरींतून निघाला, आणि जिकडे राम होता तिकडे गेला. रामानें आश्रय केलेल्या त्या श्रेष्ठ प्रदेशावर आल्यानंतर तो महातेजस्वी सुग्रीव लक्ष्मणासहवर्तमान पालखींतून खालीं उतरला आणि रामाजवळ जाऊन हात जोडून उभा राहिला. तो हात जोडून उभा राहिल्यावर बरोबर आणिलेले वानरहि त्याच्याचप्रमाणें हात जोडून उभे राहिले. तेव्हां कमलकलिकांनीं भरलेल्या

गेलेल्या तटाकाप्रमाणें वानरांचें तें प्रचंड सैन्य अवलोकन करून, आणि त्या सुग्रीवालाहि पाहून राम त्याच्यावर संतुष्ट झाला.

राम-सुग्रीवसंवाद.

नंतर चरणीं मस्तक ठेविलेल्या त्या वानरराजाला उठवून बहुमानपूर्वक धर्मात्म्या रामानें त्याला सप्रेम आलिंगन दिलें, आणि 'बैस' म्हणून सांगितलें. नंतर तो म्हणाला, "धर्म, अर्थ व काम ह्यांचें जो योग्य वेळीं नेहमीं कालविभागपूर्वक सेवन करितो, तो खरा राजा होय; परंतु धर्म व अर्थ ह्यांची पर्वा न करितां जो कामाचेंच सेवन करितो, तो वृक्षाग्रावर झोंपीं गेलेला पुरुष ज्याप्रमाणें खालीं पडल्यावर जागा होतो, त्याप्रमाणें ऐश्वर्यापासून भ्रष्ट झाल्यानंतर शुद्धीवर येतो. शत्रूच्या वधाविषयीं तत्पर, मित्र जुळविण्याविषयीं दक्ष, आणि धर्म, अर्थ व काम ह्या त्रिवर्गांच्या फलाचा उपभोग घेणारा असा जो पुरुष असेल, तोच धर्मदृष्ट्या राजा होणें योग्य आहे. हे शत्रुनाशका, हा उद्योगाचा समय प्राप्त झाला आहे. तेव्हां तूं आपल्या मंत्र्यांसहवर्तमान काय तो विचार कर."

ह्याप्रमाणें रामचंद्रांनीं सांगितलें असतां सुग्रीव त्यांना म्हणाला, "हे महापराक्रमी रामा, वैभव, कीर्ति आणि अक्षय्य वानरराज्य हें सर्व नाहींसें झालें असूनहि तुझ्या प्रसादामुळें मला पुनरपि प्राप्त झालें आहे. हे देवा, हे विजयिश्रेष्ठा, तुझ्या व तुझ्या भ्रात्याच्या कृपेमुळें माझ्यावर जे उपकार झाले आहेत, त्यांविषयीं कृतज्ञता न बाळगणारा जो असेल, तोच सर्व पुरुषांमध्यें धर्मनाशक समजला पाहिजे. हे शत्रुनाशका, हे शेंकडों श्रेष्ठ श्रेष्ठ वानर पृथ्वींतील सर्व बलाढ्य वानरांना घेऊन येथें आले आहेत. राघवा, अरण्यांतील आणि वनांतील दुर्गम प्रदेशांचे माहितगार व दिसण्यांत भयंकर असे हे शूर ऋक्ष, वानर व गोलांगूल येथें आले आहेत; आणि त्याचप्रमाणें यथेष्ट रूप धारण करणारे देवपुत्र व गंधर्वपुत्र वानर आपापल्या सैन्यांनीं परिवेष्टित असल्यामुळें मार्गमध्येंच तळ देऊन आहेत. हे शत्रुतापना वीरा, वानरसेनाधिपति वानर शंभराशंभरांच्या, लाखालाखांच्या, दहा दहा हजारांच्या, शंकूशंकूंच्या, अब्जाअब्जांच्या, खर्वाखर्वांच्या आणि निखर्वानिखर्वांच्या टोळ्यांनीं परिवेष्टित झालेले आहेत; आणि अशा सैन्यांनीं परिवेष्टित झालेले सेनाधिपति अब्ज व महापद्म ह्या संख्यांनीं मोजितां येण्यासारखे आहेत. राजा, मेरु व विंध्य ह्यांवर ठाणें देऊन राहिलेले, पराक्रमानें इंद्राची बरोबरी करणारे आणि शरीरानें मेघ व पर्वत ह्यांप्रमाणें असलेले वानर तुझ्याकडे येतील. सारांश, समरांगणामध्यें राक्षसांशीं

युद्ध करण्याकरितां ते तुझ्याबरोबर येतील, आणि युद्धांत रावणाचा वध करून सीतेला तुझ्याकडे आणून देतील."

ह्याप्रमाणें सुग्रीवानें सांगितल्यानंतर आपल्या आज्ञेप्रमाणें वागणाऱ्या त्या वानरश्रेष्ठ सुग्रीवाचा उद्योग अवलोकन करून हर्षामुळें त्या वीर्यवान राजकुमाराची मुद्रा विकसित झालेल्या नीलकमलासारखी आल्हादकारक दिसूं लागली.

सर्ग एकुणचाळिसावा.

वानरसेनापतींचें ससैन्य आगमन.

ह्याप्रमाणें हात जोडून भाषण करणाऱ्या सुग्रीवाला कडकडून भेटल्यावर धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ असलेले राम त्याला म्हणाले, "अरे, इंद्रानें जर पर्जन्यवृष्टि केली, किंवा हजारों किरणांनीं युक्त असलेल्या ह्या सूर्यानें आकाश अंधकाररहित केलें, किंवा चंद्रानें आपल्या प्रभेच्या योगानें रात्र निर्मल करून टाकिली, किंवा तुझ्यासारख्यानें मित्रांवर प्रेम केलें, तर कांहीं आश्चर्य म्हणतां येणार नाहीं. सारांश, हे विनयसंपन्न सुग्रीवा, प्रत्युपकार करण्याकरितां तूं जें हें आपलें उत्कृष्ठ आचरण दाखविलें आहेस, हेंहि कांहीं तुझ्यासंबंधानें आश्चर्य नव्हे. सुग्रीवा, तूं नेहमीं प्रिय भाषण करणारा आहेस, हें मी जाणीत आहें. मित्रा, तुझ्याच योगानें मी सनाथ झालों असून, तुझ्याच साहाय्यानें मी संग्रामामध्यें सर्व शत्रूंना जिंकणार आहें; आणि माझा सुहृद् व मित्र काय तो तूंच आहेस. ह्यास्तव तूं मला साहाय्य कर. शचीच्या पित्याला फसवून स्वतःच्या नाशाकरितां पुलोमकन्या शचीचा अपहार करणाऱ्या अनुल्हादाप्रमाणें ज्या राक्षसाधमानें सीता हरण केली, त्या रावणाचा, शत्रुघातक इंद्रानें ज्याप्रमाणें गर्वानें चढलेल्या शचीच्या पित्याचा व अनुल्हादाचा वध केला, त्याप्रमाणें मी तीक्ष्ण बाणांच्या योगानें लवकरच वध करीन."

असें रामचंद्राचें बोलणें चाललें आहे तोंच वायधूळ उठली, आणि तिनें अंतरिक्षामध्यें असलेल्या सूर्याच्या उष्ण व तीव्र प्रभेला आच्छादन करून टाकिलें. त्या अंधारानें दिशा भरून गेल्यामुळें ही कोणची व ती कोणची हें समजेनासें झालें; व पर्वत, वनें आणि अरण्यें ह्यांसहवर्तमान सर्व पृथ्वी डळमळूं लागली. इतक्यांत तीक्ष्ण दंष्ट्रांनीं युक्त व नृपतुल्य अशा महाबलाढ्य असंख्य

वानरांनीं सर्व भूमि व्यापून गेली. नंतर एका क्षणांतच शतबली नांवाचा वैभवशाली वीर वानर दृष्टीस पडूं लागला. तो वानर प्रसिद्ध प्रसिद्ध वानर-सेनानायकांनीं व शेंकडों कोट परिवार बरोबर असलेल्या दुसऱ्याहि वानर-सेनाधिपति वानरांनीं परिवेष्टित झालेला होता; आणि त्याचप्रमाणें नद्या, पर्वत व समुद्र ह्या ठिकाणीं वास्तव्य करणारे महाबलाढ्य वानर व मेघांसारखी गर्जना करणारे दुसरेहि अरण्यवासी वानर त्याला वेढून राहिलेले होते. इतकेंच नव्हे, परंतु दुसरेहि एक निखर्व वानर त्याच्या भोंवतीं होते. त्यांपैकीं कांहींचा वर्ण बालसूर्याप्रमाणें होता, कांहीं चंद्रासारखे गौरवर्ण होते, कांहींचा वर्ण कमलांतील परागाप्रमाणें होता, आणि कांहीं श्वेतवर्ण असून हिमालय पर्वतावर घर करून राहिलेले होते. असो. शतबली वानर आल्यानंतर सुवर्णपर्वतासारखा असलेला तारेचा बलाढ्य पिताहि हजारों कोट वानरांनीं परिवेष्टित असलेला दृष्टीस पडूं लागला. त्याचप्रमाणें दुसरे एक खर्व वानर बरोबर घेऊन रुमेचा समर्थ पिता म्हणजे सुग्रीवाचा श्वशुर प्राप्त झाला. नंतर कांतीनें व मलपरागा-प्रमाणें असलेला व बालसूर्यासारखा तेजस्वी मुखानें युक्त असलेला सर्व वानरां-मध्यें उत्कृष्ठ आणि वानरश्रेष्ठ असा वैभवशाली बुद्धिमान केसरी म्हणजे हनु-मानाचा पिता हजारों वानर बरोबर घेऊन आलेला दृष्टीस पडूं लागला. गोलांगूल-संज्ञक वानरांचा अधिपति जो भयंकर पराक्रमी गवाक्ष तो एक खर्व वान-रांनीं परिवेष्ठित असलेला दृष्टीस पडला. प्रचंड वेग धारण करणारे दोन खर्व ऋक्ष बरोबर घेऊन शत्रुनाशक धूम्र पुढें आला. प्रचंड पर्वताप्रमाणें धिप्पाड असे तीन कोट भयंकर वानर बरोबर घेऊन महावीर्यवान पनस नामक वानर-सेनाधिपति तेथें आला. आकारानें नील पर्वतासारखा असलेला नील नामक धिप्पाड वानरसेनाधिपति दहा कोट वानरांनीं परिवेष्ठित असलेला दिसूं लागला. तदनंतर सुवर्णपर्वताप्रमाणें दिसत असलेला महावीर्यवान गवय नामक सेनाधिपति पांच कोट वानरांसहवर्तमान तेथें आला. एक खर्व वानरांनीं परिवेष्ठित असलेला दरिमुख नामक बलाढ्य सेनाधिपति तेथें आला, व सुग्रीवाजवळ येऊन उभा राहिला. नंतर मैंद व द्विविद हे उभयतां महाबलाढ्य अश्विनीकुमारांचे पुत्र एक एक खर्व वानर बरोबर घेऊन तेथें आलेले दृष्टीस पडूं लागले. नंतर सुग्रीवाच्या आज्ञेत असलेला जांबवान नांवाचा महातेजस्वी ऋक्षराज दहा कोट वानर बरोबर घेऊन तेथें आला. रुमण नामक तेजस्वी व महाबलाढ्य वानर एक अब्ज सैन्य बरोबर घेऊन सत्वर तेथें आला. तो पराक्रमी वानरांनीं परिवेष्ठित

झालेला होता. नंतर त्याच्या मागोमाग निघालेला गंधमादन एक शंकु व एक महापद्म वानर बरोबर घेऊन तेथें आला. तदनंतर हजार पद्म व शंभर शंकु वानर बरोबर घेऊन पित्यासारखा पराक्रमी युवराज अंगद प्राप्त झाला. तदनंतर नक्षत्रासारखा तेजस्वी तार भयंकर पराक्रम करणाऱ्या पांच कोट वानरांसह- वर्तमान लांबून दिसूं लागला. नंतर ज्ञानी आणि वीर असा इंद्रजानु नामक सेनाधिपति दृष्टीस पडूं लागला. तो अकरा कोट वानरांचा अधिपति असून त्यांनीं परिवेष्टित झालेला होता. तदनंतर माध्यान्हकाळच्या सूर्याप्रमाणें प्रखर तेजानें युक्त असलेला रंभ तेथें आला. त्याच्या बरोबर शंभर, हजार आणि दहा हजार अशा वानरांच्या तीन टोळ्या होत्या. तदनंतर वीर व बलाढ्य असा दुर्मुख नामक सेनाधिपति दोन कोट वानरांनीं परिवेष्टित असलेला दृष्टीस पडूं लागला. नंतर आकारानें कैलासशिखराप्रमाणें असलेला भयंकर पराक्रमी व एक खर्व वानर घेऊन आलेला हनुमान दृष्टीस पडला. वृक्षांवर वास्तव्य करणाऱ्या वान- रांची एक अब्जाची, एक हजाराची आणि एक शंभराची अशा तीन टोळ्या बरोबर घेऊन महावीर्यवान नळ तेथें आला. दहा कोट वानरांनीं परिवेष्टित असलेला श्रीमान दरीमुख[१] गर्जना करीत करीत त्या महात्म्या सुग्रीवासमीप आला. नंतर शरभ, कुमुद, वन्हि आणि रंभ हेहि वानर तेथें आले. शिवाय दुसरेहि यथेष्ट रूप धारण करणारे, आणि पृथ्वी, पर्वत व वनें व्याप्त करून राहिलेले जे पुष्कळच सेनाधिपति वानर तेथें आले, त्यांची तर गणनाच करितां येत नाहीं. तात्पर्य, पृथ्वीमध्यें वास्तव्य करून राहिलेले सर्व उड्या मार- णारे वानर लहानमोठ्या उड्या टाकीत टाकीत व गर्जना करीत करीत तेथें आले; आणि मेघसमुदाय ज्याप्रमाणें सूर्याला आच्छादून टाकितात, त्याप्रमाणें ते सुग्रीवाच्या भोंवतीं गराडा देऊन उभे राहिले. दूरदूरच्या प्रदेशांतून अनेक प्रकारच्या गर्जना करीत आलेले पराक्रमी वानर मस्तकें नम्र करून राजा सुग्री- वाला आपण आल्याचें निवेदन करूं लागले. दुसरे श्रेष्ठ श्रेष्ठ वानर यथा- योग्य रीतीनें सुग्रीवाची भेट घेऊन पलीकडे झाले, व दुसरे कांहीं सुग्रीवाची भेट झाल्यावर तेथेंच उभे राहिले.

नंतर धर्मवेत्त्या सुग्रीवानें त्वरा करून सत्वर आलेल्या त्या वानरांची रामाला खबर दिली. तो जवळच तेथें हात जोडून उभा राहिला, व सेनापतींना

---

१ या नांवाचे दोन अधिपति होते.—एक हा आणि दुसरा, मागें सांगितलेला एक खर्व वानर घेऊन आला होता, तो.

विचारूं लागला, " हे वानरसेनानायकहो, पर्वत, जलप्रवाह व सर्व वनें ह्या ठिकाणीं योग्य रीतीनें आपापल्या सैन्याचा तळ देऊन कोण आला आणि कोण आला नाहीं, हें जाणणारा असा तुमच्यामध्यें सैन्यांतील खडानूखडा माहीत असलेला असा कोण आहे, तो मला सांगा. "

सर्ग चाळिसावा.

सीताशुद्ध्यर्थ वानरांना पूर्व दिशेस पाठविणें.

ज्याचा सैन्य जुळविण्याचा उद्देश सिद्धीस गेला आहे, असा तो वानराधिपति सुग्रीव शत्रुसैन्यनाशक पुरुषश्रेष्ठ रामाला म्हणाला, " वाटेल तिकडे गमन करणारे असे जे इंद्रतुल्य व बलाढ्य श्रेष्ठ श्रेष्ठ वानर माझ्या राज्यांत राहणारे आहेत, ते सर्व आले असून आपापल्या गोटामध्यें उतरले आहेत. इतकेंच नव्हे, परंतु अनेक वेळां पराक्रम गाजविलेले असे महापराक्रमी बलाढ्य वानर बरोबर घेऊन दैत्य व दानव ह्यांप्रमाणें भयंकर असलेले ते हे वानर येथें आले आहेत. युद्धामध्यें ज्यांचें शौर्य गाजलेलें आहे, ज्यांना ग्लानि ठाऊक नाहीं, आणि पराक्रमासंबंधानें ज्यांची ख्याति असून उद्योगांतहि जे श्रेष्ठ आहेत, असे बलाढ्य वानर येथें आले आहेत. राजा, समुद्रांतील बेटांत राहाणारे आणि त्याचप्रमाणें नानाप्रकारच्या पर्वतांवरून वास्तव्य करणारे हे तुझे दास वानर कोटीकोटींच्या टोळ्यांनीं येथें आले आहेत. हे शत्रुदमना, स्वामीहिताविषयीं तत्पर असे हे सर्व आज्ञेप्रमाणें वागणारे आहेत, आणि तुझा मनोरथ सिद्धीस नेण्याला समर्थ आहेत. सारांश, दैत्य व दानव ह्यांसारखे भयंकर असलेले हे वानर, दुसरेहि अनेक प्रकारचे महापराक्रमी हजारों वानर बरोबर घेऊन येथें आले आहेत. तस्मात् हे पुरुषश्रेष्ठा, जें कार्य करण्याचा आतां समय असेल, त्याची आज्ञा व्हावी. हें सैन्य तुझें असून तुझ्या अधीन आहे. तेव्हां ह्याला काय ती आज्ञा कर. सीतेचा शोध लावणें हें कार्य जरी खरोखर मला वास्तविक ठाऊक आहे, तरी त्यासंबंधानें यथायोग्य जी कांहीं आज्ञा कर्तव्य असेल, ती तूं कर. "

ह्याप्रमाणें सुग्रीव बोलूं लागला असतां दशरथपुत्र राम त्याला म्हणाला, " हे विनयसंपन्न महाबुद्धिमान सुग्रीवा, सीता जिवंत आहे किंवा नाहीं ह्याचा,

आणि रावण कोणत्या प्रदेशांत राहतो, ह्याचा शोध लागला पाहिजे. सीतेजवळ आणि रावणाच्या निवासस्थानाकडे गेल्यावर त्या वेळीं जें समयाला उचित असेल, तें मी तुझ्या मदतीनें करीन. हे वानरराजा, वानरांना आज्ञा करण्याचें जें हें काम तें करण्यास मी अथवा लक्ष्मण समर्थ नाहीं. हे वानराधिपते, ह्या कार्याचा उत्पादक तूंच असून तें करण्यास समर्थहि तूंच आहेस. तेव्हां कर्तव्यासंबंधानें झालेला माझा निश्चय काय आहे, तो लक्ष्यांत आणून तूंच ह्या सैन्याला आज्ञा कर. हे वीरा, तूं माझें कार्य जाणीत आहेस, ह्यांत संशय नाहीं. पराक्रमी, समंजस, विशेष प्रसंग जाणणारा, विचारी, आप्त आणि माझा उद्देश काय आहे, हें सर्वोत्कृष्ट रीतीनें जाणणारा आणि आमच्या हिताविषयीं दक्ष, असा तूं माझा दुसरा मित्र आहेस."

ह्याप्रमाणें रामचंद्रांनीं सांगितल्यावर राम आणि बुद्धिमान लक्ष्मण ह्यांचे समीपच असलेला सुग्रीव शरीरानें पर्वततुल्य असून मेघांप्रमाणें गर्जना करणाऱ्या व चंद्रसूर्यासारखे वानर बरोबर घेऊन आलेल्या वानराधिपति विनत नामक सेनापतीला म्हणाला, " हे वानरश्रेष्ठा, देश, काल व राजनीति ह्यांनीं तूं संपन्न असून काय करण्याचा निश्चय झालेला आहे, हेंहि तूं जाणीत आहेस; आणि वेगवान असे शेंकडों, हजारों वानर तुझ्याबरोबर आहेत. ह्याकरितां पर्वत व अरण्यें ह्यांसहवर्तमान जो कांहीं पूर्व दिशेला प्रदेश आहे, तिकडे तूं जा; आणि तेथें पर्वतसंबंधीं दुर्गम प्रदेश, वनें व नद्या ह्यांचे ठिकाणीं विदेहराजकन्या सीतेच्या व रावणाच्या निवासस्थानाचा शोध लाव. त्याचप्रमाणें पापनाशिनी भागीरथी नदी, रम्य अशी सरयू, कौशिकी, कलिंद पर्वतापासून निघालेली रमणीय यमुना आणि त्या यमुनेचें उगमस्थान असलेला तो महापर्वत कलिंद, सरस्वती, सिंधु, रत्नाप्रमाणें तेजस्वी उदकानें युक्त असलेला शोणनद, मही आणि पर्वत व अरण्यें ह्यांनीं सुशोभित झालेली कालमही ह्या नद्या; त्याचप्रमाणें ब्रह्ममाल, विदेह, मालव, काशीकोसल, मागध, महाग्राम, पुंड्र व अंग हे देश; आणि त्याचप्रमाणें रेशीम उत्पन्न करणाऱ्या किड्यांची जेथें जोगवणूक होते असा प्रदेश; व ज्या ठिकाणीं रुप्याच्या खाणी आहेत, असा प्रदेश हे सर्व तुम्ही आक्रमण करा, आणि सर्वप्रकारें शोध लावा. सारांश, दशरथाची स्नुषा आणि रामाची प्रिय भार्या जी सीता तिचा शोध लावा. समुद्रांतील पर्वत, शहरें आणि मंदर पर्वताचें शिखर ह्या प्रदेशांचे ठिकाणीं जे गांव

वसलेले आहेत, ते तुम्ही शोधा. नंतर कर्णप्रावरण[1], श्रेष्ठकर्ण[2], घोर असे लोहमुख[3], वेगवान असे एकपादक[4] आणि बलाढ्य अक्षय[5], त्याचप्रमाणें मनुष्यमांसभक्षक, ज्यांच्या शेंडीचे केश तीक्ष्ण आहेत आणि ज्यांची मुद्रा सौम्य असून कांति सुवर्णासारखी आहे असे किरात, अपक्व मत्स्य भक्षण करीत असलेल्या बेटांत राहणारे किरात, आणि खालची आकृति माणसाप्रमाणें असून वरची व्याघ्राप्रमाणें असल्यामुळें नरव्याघ्र म्हणून प्रसिद्ध असलेले भयंकर जलचर प्राणी ह्यांचीं सर्व सिद्धस्थानें तुम्ही शोधून काढा. त्याचप्रमाणें ज्या देशांना पर्वतांतून जावें लागतें, ज्या ठिकाणीं उड्या मारूनच जावें लागतें, आणि जेथें नौका वगैरेंनीं जातां येतें, ते सर्व प्रदेश तुम्ही धुंडा. तुम्ही प्रयत्नशील व्हा, आणि सप्तराज्यांनीं सुशोभित झालेलें यवद्वीप, सुवर्णाच्या खाणींनीं भूषित झालेलें सुवर्णद्वीप व रुप्यकद्वीप तुम्ही धुंडाळून काढा. यवद्वीप ओलांडून गेलें म्हणजे शिशिर म्हणून एक पर्वत आहे. त्याचीं शिखरें स्वर्गमंडलापर्यंत गेलीं असून देवदानवांनीं त्याचा आश्रय केलेला आहे. ह्या द्वीपांतील पर्वतसंबंधीं गहन प्रदेश, कडे आणि वनें ह्या ठिकाणीं तुम्ही सर्वजण एकनिश्चय करून यशस्विनी रामभार्या आहे किंवा नाहीं, हें शोधून काढा. तदनंतर समुद्र ओलांडून गेल्यावर शीघ्र प्रवाहानें व आरक्तवर्ण जलानें युक्त असून सिद्धचारणांनीं आश्रय केलेल्या शोण नामक नदाला तुम्ही जा. त्या नदाचे तीरीं उताराचीं जीं ठिकाणें आहेत, तेथें असलेल्या रम्य व चित्रविचित्र वनांमध्यें सीतेसहवर्तमान रावणाचा तुम्ही ठिकठिकाणीं शोध करा. भयंकर आणि अनेक उपवनप्रदेशांनीं युक्त अशा पर्वतांपासून निघालेल्या नद्या, त्याचप्रमाणें गुहांनीं युक्त असलेले पर्वत व वनें तुम्ही हुडका. तदनतर फारच घोर अशीं समुद्रांतील बेटें तुम्ही अवलोकन करा. समुद्राच्या लाटा आदळत असल्यामुळें जसें कांहीं एकसारखें गर्जना करीत असले महाभयंकर अनिलोद्धत बेट तुम्ही शोधा. त्या ठिकाणीं मोठमोठे धिप्पाड दैत्य नेहमीं तेथून जाणाऱ्या प्राण्यांना छायेच्या योगानें आकर्षण करीत असतात. ते नेहमीं बुभुक्षितच असून ब्रह्मदेवानें त्यांना छायेच्या योगानें आकर्षण करून घेतलेले प्राणी भक्षण करण्याची अनुज्ञा दिली आहे. असो. महोरगांनीं आश्रय केलेला, नीलमेघाप्रमाणें दिसत अस-

१ वस्त्राप्रमाणें ज्यांचे कान विशाल आहेत असे. २ ओंठापर्यंत ज्यांचे कान लांब लांब आहेत असे. ३ लोखंडाप्रमाणें ज्यांचें मुख कठीण व कृष्णवर्ण आहे असे. ४ ज्यांना एकच पाय आहे असे. ५ ज्यांच्या संततीचा कधींहि विच्छेद होत नाहीं असे.

लेला आणि प्रचंड गर्जनेनें युक्त असलेला तो मोठा इक्षुसागर उपायानेंच ओलां-डून गेल्यानंतर आरक्तवर्ण जलानें युक्त अशा लोहित नामक सागराला तुम्ही जा, म्हणजे त्या ठिकाणीं तो मोठा कूटशाल्मलीचा (काळ्या सांवरीचा) वृक्ष तुमच्या दृष्टीस पडेल. त्याचप्रमाणें नानाप्रकारच्या रत्नांनीं भूषित असें जें कैलास पर्वतासारखें गरुडाचें गृह विश्वकर्म्यानें निर्माण केलें आहे, तेंहि तुमच्या दृष्टीस पडेल. तेथें मंदेह नामक पर्वततुल्य, क्रूरकर्मी व भयंकर राक्षस नानाप्रकारचीं रूपें धारण करून पर्वतशिखरांचे ठिकाणीं अधोमुख होऊन लोंबत असतात. सूर्योदयसमयीं ते नेहमीं ऊर्ध्वमुख होऊन सूर्याशीं युद्ध करूं लागतात; आणि सूर्यमंडलगत ब्रह्मतेजानें तप्त होऊन व प्रत्यहीं द्विजांच्या हातून होणारीं जीं अर्घ्यदानादि कर्में त्यांच्या सामर्थ्यानें वध पावून उदकामध्यें पडत असतात, व पुनरपि सूर्यास्त झाल्यावर जिवंत होऊन पर्वतशिखरांचे ठिकाणीं लोंबकळूं लागतात. तदनंतर श्वेतवर्ण मेघाप्रमाणें दिसत असलेल्या क्षीरसागराकडे जा, आणि लाटांमुळें मोत्यांच्या हारांनीं भूषित झाल्याप्रमाणें भासत असलेल्या त्या सागराला तुम्ही अवलोकन करा. त्या सागरामध्यें ऋषभ म्हणून एक मोठा श्वेत पर्वत आहे. तो दिव्यगंधांनीं युक्त व प्रफुल्लित असून ठिकठिकाणीं भूप्रदेश व्यापून राहिलेल्या वृक्षांनीं परिवेष्टित झालेला असतो. राजहंसांनीं गजबजून गेलेलें असें एक सुदर्शन नामक प्रसिद्ध सरोवरहि तेथें आहे, व तें पीतवर्ण परागांनीं युक्त अशा उज्ज्वल श्वेतकमलांनीं भरलेलें आहे. देव, चारण, यक्ष, किन्नर आणि अप्सरांचे समुदाय आनंदित होऊन क्रीडा करण्याच्या उद्देशानें त्या सरोवरावर येत असतात. असो. क्षीरसागर ओलांडि-ल्यावर सर्व प्राण्यांना भय उत्पन्न करणारा असा एक नेहमीं चंचल असलेला जलसमुद्र तुमच्या दृष्टीस पडेल. त्या जलसमुद्रामध्यें और्व ब्रह्मर्षीच्या कोपा-पासून ब्रह्मदेवानें एक घोडीच्या मुखासारखें प्रचंड तेज करून ठेविलें आहे. हें अद्भुत व महावेगानें युक्त असलेलें सर्व स्थावरजंगमात्मक जगत् त्या तेजो-रूप मुखाचें प्रलयसमयीं भक्ष्य होत असतें. वडवामुख दृष्टीस पडतांक्षणीं त्यांत पडूं कीं काय या भीतीनें आक्रोश करूं लागलेल्या दुर्बल जलचर प्राण्यांचा ध्वनि कानावर येत असतो. शुद्धजलसमुद्राच्या उत्तर तीरावर तेरा योजनेंपर्यंत लांब असलेला एक जातरूपशील म्हणून फारच मोठा सुवर्णासारखा उज्ज्वल पर्वत आहे. त्या पर्वतावर चंद्रासारखा श्वेतवर्ण व कमलपत्रांप्रमाणें विशाल नेत्रांनीं युक्त असा धरणीधर नाग अवलोकन कराल. सर्व देवतांना पूज्य, सहस्र मस्तकें

धारण करणारा आणि नील वस्त्र परिधान करणारा तो अनंत देव पर्वताचे अग्रभागीं बसलेला असतो. त्या प्रचंड पर्वताच्या अग्रभागीं तीन खोडांनीं युक्त असा जो सुवर्णवर्ण ध्वजाप्रमाणें तालवृक्ष स्थापित केला आहे, तो खालच्या पारासहवर्तमान झळकत असतो. स्वर्गाधिपति देवांनीं पूर्व दिशेला तें एक- ओळख पडण्याकरितां स्थापित केलेल्या शंकूप्रमाणें—पूर्व दिशेचें प्रमाण म्हणून निर्माण केलेलें आहे. त्याच्यापुढें सुवर्णमय व भव्य असा उदयपर्वत आहे. शंभर योजनें उंच असलेलें त्या पर्वताचें सुवर्णमय दिव्य शिखर स्वर्गाला स्पर्श करून खालच्या आधारभूत पर्वतासहवर्तमान झळकत राहिलेलें आहे. साल, ताल, तमाल, प्रफुल्लित कर्णिकार आणि सूर्यासारखे उज्ज्वल असे दुसरेहि सुवर्णमय दिव्य वृक्ष ह्यांनीं तें शिखर शोभत आहे. त्या उदयगिरीच्या शंभर योजनें उंच असलेल्या शिखरावर एक योजन रुंद आणि दहा योजनें उंच असें एक सौमनस नामक सुवर्णमय अचल शिखर आहे. पूर्वीं तीन पादांनीं त्रैलोक्य व्यापून टाकण्याचे वेळीं पुरुषश्रेष्ठ विष्णूंनीं त्या सौमनस शिखरावर पहिलें पाऊल ठेवून दुसरें पाऊल मेरु पर्वताच्या शिखरावर ठेविलें होतें. उत्तरेच्या बाजूनें जंबुद्वीपाला जाऊन त्या फार उंच असलेल्या सौमनस शिखरा- वर गेलें असतां जंबुद्वीपवर्ती प्राण्यांना सूर्य पुष्कळ दृग्गोचर होतो. त्या ठिकाणीं कांतीनें सूर्यासमान व तपस्वी असे वैखानस नामक वालखिल्य महर्षि प्रकाशत असलेले दृष्टीस पडत असतात. त्यांच्यापुढें हें सुदर्शन बेट झळकत आहे, व त्या सौमनस शिखरावर सूर्याचा उदय झाला असतां सर्व प्राणी सतेज होत असून त्यांचे नेत्र प्रकाशमान होऊं लागतात. त्या पर्वताच्या पृष्ठभागा- वर त्याच्या गुहांतून आणि वनांतून सीतेसहवर्तमान रावणाचा ठिकठिकाणीं शोध केला पाहिजे. सुवर्णपर्वत आणि महात्मा सूर्य ह्यांच्या तेजानें सकाळीं सूर्योदयसमयीं आरक्तवर्ण झालेली पूर्व दिशा प्रकाशत असते. सूर्योदय अव- लोकन करून वरील लोकांना पृथ्वीमध्यें प्रवेश करण्याचें आणि पृथ्वींतील लोकांना ब्रह्मलोकामध्यें प्रवेश करण्याचें हें उदयगिरिरूप द्वार पूर्वीं केलेलें आहे. ह्यामुळें हिला पूर्व दिशा असें म्हणत असतात. त्या उदयाचलाचे पृष्ठ- भाग, जलप्रवाह आणि गुहा ह्यांमध्यें रावणासहवर्तमान सीतेचा ठिकठिकाणीं शोध केला पाहिजे. त्याच्यापुढें देवतांनीं व्याप्त झालेल्या त्या पूर्व दिशेस जातां येणार नाहीं. कारण तेथें चंद्रसूर्यांचा प्रकाश नसल्यामुळें ती अंधकारानें व्याप्त असून अदृश्य असते. असो. ते पर्वत, गुहा आणि नद्या ह्यांमध्यें व मीं ज्यांचा

उल्लेख केला नाहीं, असेहि जे कांहीं प्रदेश राहिले असतील, त्यांमध्यें जानकीचा शोध केला पाहिजे. हे वानरश्रेष्ठहो, येथपर्यंत वानरांचें गमन होणें शक्य आहे. सूर्याचा प्रकाश ज्या ठिकाणीं नाहीं, आणि जेथें कसली मर्यादा नाहीं, असा त्याच्या पुढला प्रदेश आम्हांला ठाऊक नाहीं. रावणाच्या वसतिस्थानामध्यें जाऊन व सीतेची भेट घेऊन तुम्ही एका महिन्यांत उदयपर्वतावर जाऊन फिरा. महिन्यापेक्षां जास्त वेळपर्यंत बाहेर राहातां उपयोगीं नाहीं. जो राहील, त्याचा माझ्या हातून वध होईल. ह्याकरितां सीतेचा शोध लावून अर्थात् कार्यसिद्धि करून तुम्ही इतक्या मुदतींत परत फिरा, आणि रघुवंशज रामाची प्रिय सीता प्राप्त करून घेऊन सुखी व्हा."

सर्ग एकेचाळिसावा.

सीताशुद्ध्यर्थ वानरांना दक्षिण दिशेस पाठविणें.

ह्याप्रमाणें तें प्रचंड वानरसैन्य पूर्वदिशेला पाठविल्यानंतर अग्निपुत्र नील, हनुमान वानर, महाबलाढ्य ब्रह्मपुत्र जांबवान, सुहोत्र, शरारी, शरगुल्म, गज, गवाक्ष, गवय, सुषेण, वृषभ, मैंद, द्विविद, दुसरा सुषेण, गंधमादन, अग्निपुत्र उल्कामुख व अनंग आणि महावेगवान व महापराक्रमी असे अंगदप्रभृति वीर हे शोधण्याला योग्य असलेले आणि कार्य करण्यास समर्थ म्हणून ठरलेले वीर त्या वानराधिपति सुग्रीवानें दक्षिण दिशेस पाठविले. आणि त्या सर्वांवर अंगदाला मुख्य नेमून त्या दिशेला जे कांहीं अत्यंत दुर्गम प्रदेश आहेत, ते सर्व त्यानें त्या वानरश्रेष्ठांना सांगून दिले. तो म्हणाला, "हजारों शिखरांनीं आणि नानाप्रकारच्या वृक्षांनीं व लतांनीं युक्त असलेला विंध्याद्रि, महोरगांनीं आश्रय केलेली रमणीय नर्मदा नदी, रम्य गोदावरी, महानदी, कृष्णवेणी, मेखल व उत्कल देश, दशार्ण देशांतील शहरें आब्रवंती आणि अवंती हीं सर्व तुम्ही पहा. ऋष्टिक, रम्य माहिषक, मत्स्य, कलिंग आणि कौशिक हेहि देश सर्व बाजूंनीं तुम्ही धुंडून काढा. पर्वत, नद्या व गुहा ह्यांसहवर्तमान दंडकारण्य व गोदावरी नदी शोधून तुम्ही सर्व कांहीं हुडका. त्याचप्रमाणें आंध्र, पुंड्र, चोल, पांड्य आणि केरल हे देश धुंडून काढा. धातूंनीं भूषित असलेल्या अयोमुख पर्वतावर गेलें पाहिजे; आणि अद्भुत शिखरें, मनोहर

प्रफुल्लित वनें, आणि उत्कृष्ठ चंदनवृक्षांच्या वनांनीं संपन्न असलेले प्रदेश ह्यांनीं युक्त असलेला तो भव्य महापर्वत शोधून काढिला पाहिजे. तदनंतर निर्मल जलाशयांनीं जी युक्त आहे, आणि अप्सरांचे समुदाय जिचे ठिकाणीं क्रीडा करीत असतात, ती दिव्य कावेरी नदी तुम्ही अवलोकन कराल. त्या महातेजस्वी मलय पर्वताच्या अग्रभागीं सूर्यतुल्य ऋषिश्रेष्ठ अगस्त्य बसलेले तुम्ही पहा, आणि त्या सुप्रसन्न महात्म्यांची अनुज्ञा झाल्यावर मकरांनीं युक्त असलेली महानदी ताम्रपर्णी तुम्ही तरून जा. जिच्यांतील बेटें व उदक हीं अद्भुत चंदनवनांनीं आच्छादित झालेलीं आहेत, अशी ताम्रपर्णी नदी, वस्त्रादिकांनीं शरीर आच्छादिलेली तरुणी स्त्री ज्याप्रमाणें आपल्या प्रियपतीला आलिंगन देते, त्याप्रमाणें समुद्राला आलिंगन देत आहे. तदनंतर मोत्यें व रत्नें ह्यांनीं भूषित केलेलें व किल्ल्याला जखडिलेलें असें पांड्य देशाचें सुवर्णमय दिव्य द्वार तुम्ही अवलोकन करा. नंतर समुद्रापाशीं गेल्यावर तो तरून जाण्याविषयीं तुम्ही आपल्या सामर्थ्याचा विचार करून काय तें करा. त्या समुद्रामध्यें अगस्त्य मुनींनीं श्रेष्ठ पर्वत महेंद्र स्थापित केलेला आहे. अद्भुत शिखरें व वृक्ष ह्यांनीं युक्त असलेला तो सुंदर व भव्य पर्वत सुवर्णमय असून त्याची एक बाजू समुद्रांत गेलेली आहे. नानाप्रकारच्या प्रफुल्लित वृक्षांनीं व लतांनीं आणि श्रेष्ठ श्रेष्ठ देव, ऋषी आणि यक्ष व अप्सरा ह्यांच्या योगानें सुशोभित, आणि सिद्ध व चारण ह्यांच्या समुदायांनीं गजबजलेला असा जो अत्यंत मनोहर महेंद्र पर्वत, त्यावर नेहमीं प्रत्येक पर्वदिवशीं इंद्र येत असतो. त्याच्या पश्चिम तीराला मनुष्यांनीं जाण्यास अशक्य असें एक उज्ज्वल बेट शंभर योजनें विस्तृत आहे. तें सर्व बाजूंनीं शोधून काढा. तेथें सर्व प्रकारानें विशेषेकरून तुम्ही सीतेचा शोध लाविला पाहिजे. कारण तो प्रदेश म्हणजे तेजानें इंद्रतुल्य असलेला जो दुरात्मा राक्षसाधिपति वध्य रावण, त्याचें निवासस्थान आहे. दक्षिण समुद्रामध्यें त्या रावणाची एक राक्षसी आहे. ती अंगारका ह्या नांवानें विख्यात असून, वरून जाणाऱ्या प्राण्यांना खालीं पडलेल्या त्यांच्या छायेच्या योगानें ओढून घेऊन खात असते. ह्याप्रमाणें जेथें जेथें म्हणून सीता असण्याचा संशय आहे, ते सर्व देश धुंडाळून निःसंशय केल्यावर, ती आहे किंवा नाहीं ह्याचा काय तो तुम्ही निश्चय करा; आणि तेथें नाहीं असें ठरल्यानंतर तें लंका बेट ओलांडून तुम्ही त्या महातेजस्वी राजपत्नीचा शोध लांवा. त्या बेटाच्या पलीकडे शंभर योजनें समुद्रप्रदेश

आक्रमण केल्यावर सिद्ध व चारण ह्यांनीं आश्रय केलेला असा एक पुष्पितक नांवाचा सुंदर पर्वत तुम्हांला लागेल. त्याची प्रभा चंद्रसूर्यांच्या किरणांप्रमाणें असून, त्याला समुद्राच्या उदकाचा आश्रय आहे. आणि आपल्या विपुल शिखरांच्या योगानें आकाश विदीर्ण करीतच कीं काय तो झळकत राहिलेला आहे. त्या पर्वताच्या ज्या एका सुवर्णशिखरासमीप सूर्य नेहमीं असतो, तें शिखर कृतघ्न, दुष्ट व नास्तिक ह्यांच्या दृष्टीसहि पडत नाहीं. तेव्हां त्या पर्वताला मस्तकानें प्रणाम करून तुम्ही तो शोधून काढा. जेथें कोणाचेंहि चालावयाचें नाहीं, असा तो पर्वत ओलांडून गेल्यावर सूर्यवान म्हणून दुसरा एक पर्वत तुम्हांला लागेल. त्याचा मार्ग फारच कठीण आहे, व तो पर्वत चौदा योजनें आहे. तो पर्वत ओलांडिल्यानंतर सर्वकाल मनोहर अशा कल्प-वृक्षांनीं युक्त असलेला एक वैद्युस नामक पर्वत तुम्हांला लागेल. त्या ठिकाणीं उत्कृष्ट मुळें व फळें भक्षण करून, आणि तेथें असलेले मध पिऊन तुम्ही पुढें चालते व्हा. तेथें नेत्रांना व मनाला सुंदर दिसणारा असा एक कुंजर नामक पर्वत आहे. त्या पर्वतावर विश्वकर्म्यानें अगस्त्य मुनींचें गृह निर्माण केलेलें आहे. त्या घराची लांबीरुंदी चार कोस असून उंची चाळीस कोस आहे. तें सुवर्णमय दिव्य गृह नानाप्रकारच्या रत्नांनीं भूषित केलेलें आहे. तेथें सर्पांचें निवासस्थान अशी एक भोगवती नामक नगरी आहे. तिच्यांतील रस्ते रुंद आहेत, आणि सर्व बाजूंनीं ती सुरक्षित असल्यामुळें तिच्यावर शत्रूंचा हल्ला होणें अशक्य आहे. तीक्ष्ण दंष्ट्रा आणि प्रचंड विष ह्यांनीं युक्त असलेल्या भयंकर भुजंगांनीं तिचें संरक्षण केलेलें असून महाभयंकर सर्पराज वासुकी तिच्यामध्यें वास्तव्य करीत आहे. त्या नगरीमध्यें तुम्ही जा, आणि ती नगरी व तिच्या आसपास असलेले जे कांहीं इतर सुरक्षित प्रदेश तेहि सर्व तुम्ही शोधून काढा. तो प्रदेश ओलांडिल्यानंतर मोठ्या बैलाप्रमाणें ज्याचा आकार आहे असा एक ऋषभ नामक भव्य आणि सर्व रत्नांनीं परिपूर्ण असलेला पर्वत तुम्हांला लागेल. त्या पर्वतावर गोशीर्षक, पद्मक व हरिश्याम असा तिन्ही प्रकारचा दिव्य चंदन उत्पन्न होत असतो, व त्याचें तेज अग्नीसारखें असतें. तुम्ही त्या चंदनाला स्पर्श करूं नका. कारण रोहित नामक गंधर्व त्या घोर वनाचें रक्षण करीत असतात. शैलूष, ग्रामणी, शिक्ष, शुक व बभ्रु असे पांच सूर्यासारखे तेजस्वी गंधर्वाधिपति तेथें असतात. ऋषभ पर्वताच्या पलीकडे—पृथ्वीचे शेवटीं पुण्य-वान लोकांचें निवासस्थान आहे. त्यांच्या शरिराची कांति सूर्य, चंद्र व अग्नि

ह्यांप्रमाणें आहे. स्वर्गप्राप्ति झालेले लोकच त्या ठिकाणीं वास्तव्य करीत असतात. त्यांच्या समीप जाणें शक्य नाहीं, व म्हणूनच त्यांच्यापुढें असलेला जो अतिभयंकर पितृलोक तिकडेहि तुम्हांला जाण्याचें प्रयोजन नाहीं. कारण ती दुःसह अंधकारानें व्याप्त झालेली यमाची राजधानी आहे. वानरश्रेष्ठहो, येथपर्यंतच तुमचें जाणें व तुमच्या हातून शोध लागणें शक्य आहे. भूतलावर गमन करण्यास समर्थ असलेल्या प्राण्यांचें ह्याच्यापुढें गमन होणें शक्य नाहीं. तेव्हां हें सर्व पाहून दुसरें कांहीं शक्य आहे, तेंहि तुम्ही धुंडाळा. नंतर सीतेचा पत्ता लागल्यावर परत फिरा. जो एक महिन्याचे आंत पुढें येऊन 'सीता दृष्टीस पडली' असें सांगेल, त्याचें वैभव माझ्यासारखें होईल, आणि तो सुखानें विषयांचा उपभोग घेईल. त्यापेक्षां अधिक प्रिय असा मला कोणीहि नाहीं. प्राणापेक्षांहि तो मला विशेष होईल, आणि त्याच्या हातून जरी वारंवार अपराध झालेले असले, तरी तो माझा बंधु होईल. यास्तव अपरिमित बल व पराक्रम ह्यांनीं युक्त असलेले तुम्ही ज्या अर्थी बहुगुणसंपन्न कुलांमध्यें जन्मास आलेले आहां, त्याअर्थी राजकन्या सीता प्राप्त होईल, अशा प्रकारचा उत्कृष्ट प्रयत्न सुरू करा."

सर्ग बेचाळिसावा.

सीताशुध्यर्थ वानरांना पश्चिम दिशेस पाठविणें.

ह्याप्रमाणें दक्षिण दिशेस वानरांना पाठविल्यानंतर तारेचा पिता आणि आपला श्वशुर जो भयंकर पराक्रमी सुषेण, त्याच्याकडे जाऊन वानरराज सुग्रीवानें त्याला प्रणाम केला, आणि हात जोडून त्याच्याशीं संभाषण केलें. नंतर शूर वानरश्रेष्ठांनीं परिवेष्ठित, इंद्रासारखा तेजस्वी, गरुडासारखा कांतिमान आणि बुद्धि व पराक्रम ह्यांनीं संपन्न असा जो मरीचि महर्षींचा पुत्र महाकपि अर्चिमान, त्याला इतरहि अर्चिर्माल्य संज्ञक महाबलाढ्य मरीचि ऋषींच्या पुत्रांना आणि त्याचप्रमाणें इतर सर्व ऋषीपुत्रांना त्यानें पश्चिम दिशेस जाण्यास सांगितलें. तो म्हणाला, "हे सुषेणप्रभृति वानरश्रेष्ठहो, तुम्ही दोन लक्ष वानर बरोबर घेऊन सीतेचा शोध लावा. बाल्हीकासहवर्तमान सौराष्ट्र देश, समृद्ध व रमणीय असा चंद्र, चित्र देश, मोठमोठीं नगरें, पुन्नाग वृक्षांनीं भरलेला आणि बकुळाच्या व

भोंकरीच्या झाडांनीं गजबजलेला कुक्षि नामक प्रदेश, आणि त्याचप्रमाणें केतक वृक्षांचीं वनें तुम्ही धुंडाळा. हे वानरश्रेष्ठहो, पश्चिमाभिमुख वाहणाऱ्या व शीत जलानें युक्त असलेल्या पवित्र नद्या, तपस्व्यांचीं अरण्यें, गहनप्रदेशयुक्त पर्वत, व त्या पर्वतावर जवळ जवळ निर्जल असलेलीं ठिकाणें आणि अतिशय उंच व शीतल शिला हींहि सर्व तुम्ही शोधून काढा. ह्याप्रमाणें पर्वतसमूहानें परिवेष्ठित असलेली दुर्गम पश्चिम दिशा शोधून काढिल्यावर, तुम्ही किंचित् पश्चिमेस गेलां असतां समुद्र तुमच्या दृष्टीस पडेल. वानरहो, जरा पश्चिमेला गेल्यावर तिमिसंज्ञक मत्स्य व मगर ह्यांनीं ज्याचें उदक व्याप्त झालेलें आहे, असा समुद्र तुमच्या दृष्टीस पडणारच. नंतर केतक वृक्षांचीं वनें, तमालवृक्षांचीं अरण्यें आणि नारिकेलवृक्षांचीं वनें ह्यांतून तुमच्या सैन्यांतील वानरांना विहार करूं द्या. तेथें सीतेच्या व रावणाच्या निवासस्थानाचा तुम्ही शोध करा. समुद्राचे कांठीं असलेले पर्वत व वनें ह्यांतूनहि तुम्ही शोध करा, आणि मुरचीपत्तन, रम्य जटापूर, अवंती आणि अंगलेपा ह्या नगऱ्या, आलक्षित वन व त्याचप्रमाणें ठिकठिकाणीं असलेलीं विशाल राष्ट्रें व नगरें हीं सर्व तुम्ही धुंडून काढा. सिंधु व सागर ह्यांच्या संगमाचे ठिकाणीं असलेल्या सोमगिरि नांवाच्या पर्वतावर शतशृंग म्हणून एक मोठा वृक्ष आहे. त्या पर्वताचा आश्रय केलेले सिंह तेथील रम्य अशा कड्यांवर असलेल्या गुहांमध्यें तिमिसंज्ञक मासे व गज ह्यांना नेऊन ठेवीत असतात. पर्वतशिखरावर वास्तव्य करणारे जे सिंह आहेत, त्यांचींहि निवासस्थानें त्या रमणीय शिखरावरूनच आहेत. मदमत्त व तृप्त असून मेघाप्रमाणें गर्जना करणारे गज ह्या जलपरिपूर्ण विशाल शिखरांवर संचार करीत असतात. त्या सोमगिरीला अद्भुत वृक्षांनीं युक्त असें एक आकाशांत गेलेलें सुवर्णशिखर आहे. तें सर्व यथेष्ट रूप धारण करणाऱ्या वानरांनीं सत्वर शोधून काढिलें पाहिजे. त्या ठिकाणीं समुद्रामध्यें एक शंभर योजनें उंचीचें—दृष्टीस पडण्यालाहि अशक्य असलेलें—पारियात्र पर्वताचें शिखर आहे. तें तुम्ही तेथें जाऊन अवलोकन करा. त्या शिखरावर अग्नितुल्य तेजस्वी, भयंकर व संहार करणारे चोवीस कोट तपस्वी गंधर्व आहेत. ते गंधर्व अग्नीच्या ज्वालेप्रमाणें कडक असून, तपश्चर्या करण्याकरितां चोहोंकडून तेथें जुळलेले आहेत. भयंकर पराक्रमी वानरांनीं त्यांचें अतिक्रमण करितां उपयोगी नाहीं, आणि त्या प्रदेशापासून कोणतेंहि फल वानरांनीं घेतां उपयोगी नाहीं. कारण त्या धैर्यवान, भयंकर, पराक्रमी व बलाढ्य वीर गंधर्वांचा परा-

जय होणें अशक्य आहे. ते त्या शिखरावरील फलांचें व मुळांचें रक्षण करीत असतात. त्या ठिकाणीं यत्न करून जानकीचा शोध लाविला पाहिजे. त्या गंधर्वांपासून वानरांना यत्किंचित्‌हि भय नाहीं. तेथें एक वज्र नामक महापर्वत आहे. त्याची कांति वैदूर्य मण्यासारखी असून वज्रासारख्या दृढ आकृतीनें तो युक्त आहे, आणि नानाप्रकारच्या वृक्षांनीं व लतांनीं तो व्याप्त झालेला आहे. इतकेंच नव्हे, परंतु शंभर योजनेंपर्यंत तो भव्य पर्वत एकसारखा पसरलेला आहे. त्या पर्वताच्या गुहा प्रयत्नपूर्वक शोधून काढिल्या पाहिजेत. समुद्राच्या एका चतुर्थांशावर चक्रवान ह्या नांवाचा पर्वत आहे, व त्या पर्वतावर विश्वकर्म्यानें एक हजार पाकळ्यांचें चक्र निर्माण केलें आहे. त्या पर्वतावर पंचजन नामक हयग्रीव दानवाचा वध करून पुरुषोत्तमानें शंख व चक्र हीं घेतलीं. त्या पर्वतावरील रमणीय शिखरांवरून आणि विशाल गुहांतून सीतेसहवर्तमान रावणाचा ठिकठिकाणीं शोध केला पाहिजे. त्या अगाध समुद्रामध्येंच सुवर्णशृंगांनीं युक्त असा एक फारच मोठा वराह नामक पर्वत आहे. व तो चौसष्ट योजनें आहे. त्या पर्वतावर प्राग्ज्योतिषपुर नामक सुवर्णमय नगर असून, त्या नगरामध्यें दुरात्मा नरक नामक दानव वास्तव्य करीत आहे. त्याहि पर्वतावरील रमणीय शिखरांवरून, आणि विशाल गुहांतून सीतेसहवर्तमान रावणाचा ठिकठिकाणीं शोध केला पाहिजे. त्या महापर्वताच्या पलीकडे गेल्यानंतर दुसरा एक सुवर्णपर्वत तुमच्या दृष्टीस पडेल. कारण त्या महापर्वताच्या पलीकडे, सर्व बाजूंनीं सुवर्णाचा आणि धबधब्यांनीं व जलप्रवाहांनीं युक्त असा एक पर्वत आहे. त्या पर्वतावरील शब्दानें मदमत्त झालेले गज, वराह, सिंह आणि व्याघ्र हे सर्व बाजूंनीं नेहमीं त्याच्या संमुख गर्जना करीत असतात, त्या पर्वतावर हरिसंज्ञक अश्वांनीं युक्त असलेल्या वैभवशाली पाकशासन इंद्राला देवांनीं राज्याभिषेक केला होता. तो पर्वत मेघ ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. त्या इंद्राक्षित महापर्वताला ओलांडून गेल्यानंतर साठ हजार पर्वतांकडे तुम्ही जाल. ते सर्व पर्वत कांतीनें बालसूर्याप्रमाणें असून सर्व बाजूंनीं झळकणारे आहेत, आणि सुवर्णमय प्रफुल्लित वृक्षांनीं सुशोभित झालेले आहेत. त्या पर्वतांच्या मध्यभागीं मेरु म्हणून एक श्रेष्ठ पर्वत त्यांचा राजा आहे, व त्या पर्वताला सूर्यानें प्रसन्न होऊन पूर्वीं वर दिलेला आहे. सूर्य त्या पर्वतराजाला असें म्हणाला कीं, ‘ तुझ्या आश्रयाला राहणारे सर्व, रात्रंदिवस माझ्या प्रसादामुळें सुवर्णमय होतील, आणि तुझ्यावर जे देव, गंधर्व आणि दानव वास्तव्य करतील, तेहि माझे भक्त होतील,

व त्याची कांति सुवर्णासारखी होईल.' विश्वदेव, वसु आणि मरुद्गण हे त्या उत्कृष्ठ मेरु पर्वतावर संध्याकाळीं येऊन सूर्याची उपासना करीत असतात, व त्यांनीं पूजन केलें असतां सर्व प्राण्यांना अदृश्य असलेला सूर्य अस्ताचलास जातो. दहा हजार योजनें असलेल्या त्या पर्वताचें उल्लंघन एका अर्ध्या मुहूर्तांत करून सूर्य सत्वर चालता होतो. त्या पर्वताच्या शिखरावर सूर्यासारखें तेजस्वी असें एक मोठें दिव्य मंदिर विश्वकर्म्यानें निर्माण केलेलें आहे. तें मोठमोठ्या वाड्यांच्या समुदायांनीं गजबजून गेलेलें आहे. नानाप्रकारच्या पक्षिगणांनीं व्याप्त झालेल्या अद्भुत वृक्षांनीं तें सुशोभित झालेलें आहे, आणि पाश धारण करणाऱ्या महात्म्या वरुणाचें तें निवासस्थान आहे. मेरु आणि अस्ताचल ह्यांच्यामध्यें दहा स्कंधांनीं युक्त असा एक मोठा सुवर्णमय तालवृक्ष आहे, व तो सौंदर्यसंपन्न वृक्ष अद्भुत पारानें युक्त असून झळकत राहिलेला आहे. असो. ते सर्व दुर्गम प्रदेश, सरोवरें आणि नद्या ह्या ठिकाणीं सीतेसहवर्तमान रावणाचा जेथें तेथें शोध केला पाहिजे. त्या मेरु पर्वतावर, स्वतःच्या तपःसामर्थ्यानें सुरक्षित असलेला व मेरुसावर्णि म्हणून प्रसिद्ध असलेला एक धर्मवेत्ता आहे. तो योग्यतेनें ब्रह्मदेवाची बरोबरी करणारा आहे. त्या सूर्यतुल्य मेरुसावर्णी महर्षीला साष्टांग प्रणिपात करून सीतेसंबंधी वार्ता विचारावी. येथपर्यंत ह्या जीवलोकावरील सर्व प्रदेश, रात्र समाप्त झाल्यावर प्रकाशित करून सूर्य अस्ताचलाला जात असतो, आणि येथपर्यंतच वानरांचें गमन होणें शक्य आहे. सूर्यरहित आणि मर्यादारहित असा ह्याच्या पुढला प्रदेश आम्हांला माहीत नाहीं. रावणाच्या निवासस्थानामध्यें व सीतेसमीप जाऊन, आणि अस्ताचल पर्वताकडे गमन करून एका पूर्ण महिन्यांत तुम्ही परता. एक महिन्याच्या मुदतीपेक्षां अधिक कालपर्यंत बाहेर राहातां उपयोगीं नाहीं. जो राहील तो माझ्या हातून वध पावण्यास पात्र होईल. तुमच्याबरोबरच माझा शूर श्वशूरहि जाईल. आज्ञेप्रमाणें वागणारे तुम्ही ह्याचें सर्व कांहीं ऐका. हा महापराक्रमी व महाबलाढ्य श्वशूर मला पितृस्थानीं आहे. तुम्हीहि सर्व पराक्रमी असून कर्तव्याकर्तव्यसंबंधानें इतरांना प्रमाणभूत आहां. तथापि ह्या सुषेणाला मुख्य प्रमाणभूत समजून तुम्ही पश्चिम दिशा अवलोकन करा. असो. ह्याप्रमाणें रामचंद्रानें जें आमचें कार्य केलें आहे, त्याबद्दल आमच्या हातून प्रत्युपकार झाला असतां आम्ही कृतकृत्य होऊं. ह्यास्तव हें कार्य शेवटास नेण्याकरितां दुसरेंहि जें कांहीं करणें इष्ट असेल, तेंहि देशकालानुरूप आहे, असें समजून तुम्हांला केलें पाहिजे."

ह्याप्रमाणें सुग्रीवानें सांगितलें असतां सुषेणप्रभृति वानरांनीं त्याची अनुज्ञा घेतली, आणि ते सर्व वानराधिपति त्या वरुणरक्षित पश्चिम दिशेकडे चालते झाले.

सर्ग त्रेचाळिसावा.

सीताशुध्यर्थ वानरांना उत्तरदिशेस पाठविणें.

ह्याप्रमाणें स्वशुराला पश्चिम दिशेस पाठविल्यानंतर शतबल नामक वीर वानराशीं आपल्याला व रामालाहि हितावह असें भाषण तो सर्वज्ञ सुग्रीव करूं लागला. तो म्हणाला, " हे महापराक्रमी शतबला, स्वतःसारखे एक लक्ष अरण्यवासी वानर मदतीला असतांना यमपुत्र सर्व मंत्र्यांसहवर्तमान हिमालय पर्वतरूप कर्णभूषणानें युक्त असलेल्या उत्तर दिशेला जा, आणि यशस्विनी राजपत्नीला तुम्ही सर्व बाजूंनीं शोधा. हें कार्य होऊन दशरथपुत्र रामाचा मनोरथ परिपूर्ण झाला असतां आपण ऋणमुक्त व कृतकृत्य होऊं. महात्म्या रघुवंशज रामानें आपला मनोरथ परिपूर्ण केला आहे. त्याची फेड जर आपल्या हातून झाली, तर आपलें जीवित सफल होईल. वास्तविक विचार केला असतां, ज्याच्या हातून आपलें कांहींएक कार्य झालेलें नाहीं अशा अडलेल्या पुरुषाचेंहि कार्य जो करितो, त्याचा जन्म सफल होतो. पूर्वी ज्यानें उपकार केला, त्याच्या-वर प्रत्युपकार करणाऱ्याची कांहीं विशेष मातब्बरी नाहीं. हा विचार मनांत आणून, आणि आमचें प्रिय व हित होण्याची इच्छा धरून, ज्या रीतीनें सीता दृग्गोचर होईल, त्या रीतीनें तुम्ही वागा. हा शत्रुसमुदाय जिंकणारा पुरुषश्रेष्ठ राम सर्व भूतांना मान्य असून आमच्यावर प्रीति करीत आहे. ह्यास्तव हीं अनेक दुर्गम स्थलें, नद्या व भिन्न भिन्न पर्वत बुद्धीच्या व पराक्रमाच्या जोरावर तुम्ही शोधून काढा. म्लेंछ, पुलिंद, शूरसेन, प्रस्थल, भरत, कुरु, मद्र, कांबोजयवन व वरद हे देश आणि शकांचीं नगरें हुडकिल्यावर तुम्ही हिमालय पर्वत शोधा. हिमालय पर्वतावरील लोध्र, पद्मक आणि देवदारु ह्या वृक्षांच्या वनामध्यें सीतेसहवर्तमान रावणाचा ठिकठिकाणीं शोध केला पाहिजे. तदनंतर देवगंधर्वांनीं आश्रय केलेल्या सोमाश्रमाला गेल्यावर मोठमोठ्या शिखरांनीं युक्त असलेल्या त्या काल नामक पर्वताकडे तुम्ही जा, आणि त्या पर्वताच्या शेजारीं जे आणखी मोठमोठे पर्वत व गुहा आहेत, त्यांतूनहि तुम्ही महाभाग्यवती

निष्कलंक रामपत्नीचा शोध करा. ज्याच्या अंतर्भागामध्यें सुवर्ण आहे, व पर्वतांमध्यें जो श्रेष्ठ आहे, असा तो महागिरी ओलांडून गेल्यानंतर सुदर्शन नामक पर्वताला तुम्ही जा. तदनंतर पक्ष्यांचें निवासस्थान असलेला देवसखा ह्या नांवाचा पर्वत तुम्हांला लागेल. तो नानाप्रकारच्या वृक्षांनीं भूषित झालेला असून अनेक प्रकारच्या पक्ष्यांनीं गजबजून गेलेला असतो. त्याच्या सुवर्ण-प्रदेशांत आणि दऱ्यांतून व गुहांतून सीतेसहवर्तमान रावणाचा तुम्ही ठिक-ठिकाणीं शोध करा. तो पर्वत ओलांडिल्यावर चौरसचौरस शंभर योजनें असलेला एक शून्य प्रदेश तुम्हांला लागेल. त्या प्रदेशांत पर्वत, नदी अथवा वृक्ष मुळींच नसून एकहि प्राणी तेथें वास्तव्य करीत नाहीं. तेव्हां शरीरावर रोमांच उठविणाऱ्या त्या अरण्यांतून तुम्ही सत्वर पलीकडे गेलां, म्हणजे श्वेतवर्ण कैलास पर्वत तुम्हांला लागेल. त्यावेळीं तुम्ही आनंदित व्हाल. त्या कैलास पर्वतावर श्वेतवर्ण मेघासारखें दिसत असलेलें आणि सोन्याचें काम केलेलें असें एक विश्वकर्म्यानें निर्माण केलेलें रम्य कुबेरगृह आहे. त्या ठिकाणीं अप्सरांच्या समुदायांनीं सेवित, हंस व कारंडव पक्ष्यांनीं व्याप्त आणि नानाप्रकारच्या कमलांनीं भरलेलें असें एक विशाल सरोवर आहे. तेथें सर्वलोकमान्य यक्षाधि-पति श्रीमान कुबेर गुह्यकांसहवर्तमान क्रीडा करीत असतो. त्या कैलास पर्वताला लागून असलेल्या चंद्रासारख्या शुभ्र पर्वतांवरून व गुहांतून सीतेसहवर्तमान रावणाचा तुम्हांला ठिकठिकाणीं शोध केला पाहिजे. क्रौंच पर्वतासमीप गेल्यावर प्रवेश करण्यास अत्यंत कठीण असें एक त्याला विवर आहे. त्या विवरामध्यें तुम्ही सावध राहून प्रवेश करा. तें विवर आंत प्रवेश होण्यास अशक्य म्हणून प्रसिद्ध आहे. त्या ठिकाणीं, देवांनीं उत्तम प्रकारें प्रार्थना केल्यामुळें सूर्या-सारखे तेजस्वी आणि देवरूप धारण करणारे महात्मे देवर्षी वास्तव्य करीत आहेत. क्रौंच पर्वताच्या इतरहि ज्या कांहीं गुहा, सपाट प्रदेश, शिखरें, कडे व दऱ्या असतील, त्या तुम्ही सर्व बाजूंनीं शोधून काढा. कामदेवानें ज्या ठिकाणीं तपश्चर्या केली, असा एक मानस नामक पर्वत आहे. तो पक्ष्यांचें स्थान असून वृक्षरहित आहे. त्या ठिकाणीं सामान्य प्राण्यांची, देवतांची व राक्षसांचीहि गति नाहीं. असो. सपाट प्रदेश, शिखरें आणि भोंवतीं असलेले लहान लहान पर्वत ह्यांसहवर्तमान तो क्रौंच पर्वत तुम्ही सर्व मिळून शोधून काढा. क्रौंच पर्वत ओलांडिल्यावर मैनाक नामक पर्वत लागेल. तेथें मयासुरानें स्वतः निर्माण केलेलें गृह आहे. तो पर्वत सपाट प्रदेश, शिखरें व गुहा

ह्यांसहवर्तमान शोधून काढिला पाहिजे. अश्वमुखी स्त्रियांचें वसतिस्थानहि ठिकठिकाणीं त्याच पर्वतावर आहे. तो प्रदेश ओलांडिल्यानंतर सिद्धांनीं आश्रय केलेल्या अशा एका आश्रमाला तुम्ही जाल. त्या ठिकाणीं सिद्ध, वैखानस, तपस्वी, वालखिल्य आणि तपश्चर्येच्या योगानें पापरहित झालेले इतरहि सिद्ध आहेत. त्यांना तुम्ही वंदन करा, व विनयसंपन्न होऊन सीतेची बातमी विचारा. सुवर्णकमलांनीं आच्छादित असें एक वैखानस नामक सरोवर तेथें आहे. त्या सरोवरावर बालसूर्याप्रमाणें तेजस्वी असलेले मंगलकारक हंस संचार करीत असतात. सार्वभौम म्हणून प्रसिद्ध असलेला कुबेराचा बसावयाचा हत्ती हत्तीणींबरोबर नेहमीं त्या प्रदेशामध्यें फिरत असतो. तें सरोवर ओलांडिल्यावर सूर्यचंद्राच्या प्रकाशाची जेथें मातब्बरी नाहीं, आणि नक्षत्रसमुदायालाहि जेथें कोणी विचारीत नाहीं, असा एक मेघरहित व शब्दरहित प्रदेश तुम्हांला लागेल. तो प्रदेश सूर्यकिरणांनीं प्रकाशित होणाऱ्या इतर प्रदेशांप्रमाणें देवतुल्य महर्षींच्या स्वतःच्या किरणांच्या योगानें प्रकाशित झालेला असतो. कारण तेथें विश्रांतीकरितां राहिलेले महर्षी स्वयंप्रकाश असून ते तपश्चर्येच्या योगानें सिद्ध झाले आहेत. तो प्रदेश ओलांडिल्यानंतर शैलोदा नांवाची एक नदी तुम्हांला लागेल. तिच्या दोन्ही तीरांवर कीचक नांवाचे वेळू आहेत. त्यांच्या योगानें नदीच्या परतीराला जातां येत असून सिद्धांकडे परतहि येतां येतें. पुण्यवान लोकांचें वसतिस्थान बनून राहिलेला उत्तरकुरु प्रदेश तिकडेच आहे. त्या देशामध्यें सुवर्णकमलांनीं युक्त असलेल्या सरोवरामुळेंच लोकांचें उदकसंबंधीं कार्य होतें. कांतीनें नील आणि वैदूर्य ह्या मण्यांप्रमाणें दिसत असलेल्या पानांची समृद्धि ज्यांत आहे, अशा हजारों नद्या तेथें असून आरक्त कमलांच्या रमणीय वनांनीं त्या भूषित झालेल्या आहेत. सुवर्णवर्ण परागांनीं युक्त असलेलीं कमलपुष्पें, आणि मोठमोठीं मूल्यवान रत्नें व माणकें यांच्या योगानें तेथील वापी, तडाग वगैरे जलाशय बालसूर्यासारखे तेजस्वी दिसत असतात. अद्भुत [1]नीलकमलांचीं वनें, वर्तुल मोत्यें, आणि मोठमोठीं मूल्यवान माणकें ह्यांच्या योगानें तो प्रदेश सर्व बाजूंनीं व्याप्त झालेला आहे. सर्व रत्नें व सुवर्ण ह्यांनीं परिपूर्ण, अग्नितुल्य तेजस्वी आणि म्हणूनच आश्चर्यकारक अशा उत्कृष्ठ पर्वतांनीं तेथील नद्या व्याप्त झालेल्या आहेत. त्यांचीं वाळवंटें सुवर्णयुक्त झालेलीं आहेत. नित्य येणारीं पुष्पें व फळें ह्यांनीं युक्त असलेले

1 पोकळ कळक.

तेथील वृक्ष पक्ष्यांनीं गजबजून गेलेले असतात; आणि दिव्य गंध, रस व स्पर्श ह्यांनीं ते वृक्ष युक्त असून सर्व भोग्य वस्तु ते देत असतात. दुसरे कांहीं उत्कृष्ट वृक्ष, नानाप्रकारचीं वस्त्रेंच फळें म्हणून देत असतात. मोत्यें आणि वैदूर्य मणि यांनीं युक्त असल्यामुळें, मनोहर स्त्रियांना व पुरुषांना ते अनुरूप आणि कोणत्याहि ऋतूमध्यें धारण केलीं असतां सुखावह अशां भूषणें तेथील कांहीं वृक्षांपासून प्राप्त होत असतात. मोठमोठ्या मूल्यवान रत्नांनीं व चित्रविचित्र आणि मनोहर आस्तरणांनीं युक्त अशा शय्या दुसऱ्या कांहीं उत्कृष्ट वृक्षांपासून प्राप्त होत असतात. दुसरे कांहीं वृक्ष मनोहर पुष्पें धारण करीत असतात; आणि कांहीं वृक्ष उत्कृष्ट पेयें, नानाप्रकारचीं भक्ष्यें आणि सौंदर्य व यौवन ह्यांनीं युक्त असून गुणांनीं संपन्न असलेल्या स्त्रिया देत असतात. तेजानें झळकत असलेले गंधर्व, किन्नर, सिद्ध, नाग आणि विद्याधर नेहमीं स्त्रियांसहवर्तमान तेथ रममाण होत असतात. ते सर्व पुण्यकर्मी असून रतिक्रीडेविषयीं तत्पर असतात, आणि द्रव्य व भोग्य वस्तु ह्यांनीं संपन्न असून स्त्रियांसहवर्तमान वास्तव्य करीत असतात. उत्कृष्ट हास्यध्वनीसहवर्तमान प्राणिमात्रांचें मन रमविणारा असा गायनाचा व वाद्यांचा घोष तेथें सतत कानावर येत असतो. त्या ठिकाणीं आनंदरहित अथवा प्रिय वस्तु जवळ नसलेला असा कोणीहि नाहीं. तेथें चित्तवेधक गोष्टींची प्रत्येक दिवशीं वृद्धिच होत असते. तो महापर्वत ओलांडून गेल्यावर उत्तर समुद्र लागेल. त्या समुद्रामध्यें सोमगिरी म्हणून एक सुवर्णमय प्रचंड पर्वत आहे. तो प्रदेश जरी सूर्यरहित आहे, तरी तो त्या पर्वताच्या प्रभेमुळें सूर्यप्रभेप्रमाणेंच प्रकाशित झालेला असतो. सूर्याच्या प्रभेनें युक्त असलेल्या देशाला जशी शोभा आलेली असते, तशी त्याला आलेली असते. एकादश मूर्तींनीं युक्त व ब्रह्मर्षींनीं परिवेष्टित असलेला जगदात्मा, जगत्स्रष्टा आणि षड्गुणैश्वर्यसंपन्न असा देवाधिदेव शंकर त्या सोमागिरीवर वास्तव्य करीत असतो. कुरु देशाचे उत्तरेस तुम्ही कांहीं झालें तरी जाऊं नका. इतर प्राण्यांचीहि गति तेथें कुंठितच होत असते. तो सोमगिरी देवांनाहि दुर्गम आहे. ह्यास्तव तो दृष्टीस पडतांक्षणीं तेथून सत्वर परत फिरा. हे वानरश्रेष्ठहो, येथपर्यंत वानरांनीं जाणें शक्य आहे. मर्यादा आणि सूर्य ह्यांनीं रहित असलेलें त्याच्या पलीकडील स्थळ आम्ही जाणीत नाहीं. मीं जें हें सांगितलें, तें सर्व शोधून काढा; आणि मीं न सांगितलेलेंहि जें कांहीं राहिलें असेल, तेथेंहि सीतेला शोधण्याचा विचार करा. वानरहो, तुम्ही वायु आणि अग्नि

ह्यांच्या उपमेला पात्र आहां. सीता दृष्टीस पडण्याकरितां केलेला प्रयत्न सफल झाला असतां दशरथपुत्र रामाचा मोठा मनोरथ सिद्धीस नेल्यासारखें होईल; आणि त्याचा मोठा मनोरथ सिद्धीस गेल्यामुळें माझाहि मनोरथ सिद्धीस गेल्यासारखें होईल. सीतेचा शोध लागला असतां सर्व प्रकारच्या मनोहर योग्य वस्तूंनीं तुमच्या बांधवासहवर्तमान मी तुम्हां सर्वांचें पूजन करणार असल्यामुळें तुम्ही कृतकृत्य व्हाल, आणि शत्रुरहित होऊन आपापल्या प्रिय स्त्रियांसहवर्तमान पृथ्वीवर संचार करूं लागाल."

सर्ग चव्वेचाळिसावा.

हनुमंताला अंगठी देणें.

सुग्रीवानें विशेषतः जो कांहीं आपला उद्देश सांगावयाचा होता, तो हनुमानाजवळ सांगितला. कारण कार्यसिद्धीविषयीं सुग्रीवाला त्या वानरश्रेष्ठासंबंधानें फारच खात्री होती. ह्यास्तव तो अत्यंत संतुष्ट होऊन त्या महापराक्रमी वायुपुत्राला म्हणाला, "हे वानरश्रेष्ठा, पृथ्वी, अंतरिक्ष, मेघमार्ग, स्वर्ग आणि उदक ह्यांपैकीं कोठेंहि तुझी गति कुंठित होत असल्याचें माझ्या कधीं दृष्टोत्पत्तीस आलेलें नाहीं. असुर, गंधर्व, नाग, मनुष्य, देवता, सागर आणि पर्वत ह्यांसहवर्तमान सर्व लोक तुला विदित आहेत. हे महावानरा, हे वीरा, महाबलाढ्य वायु जो तुझा पिता, त्याच्याचप्रमाणें तुझी गति, वेग, तेज आणि त्वरा आहे. तेजानें तर तुझी बरोबरी करणारा प्राणी ह्या भूतलावर कोणीहि नाहीं. तस्मात्, सीता कशी प्राप्त होईल, ह्याचा विचार तूंच कर. हे नीतिनिपुणा, बल, बुद्धि, पराक्रम, युक्ति आणि देशकालानुरूप वर्तन हें सर्व तुझ्याच ठिकाणीं आहे."

ह्याप्रमाणें सुग्रीवानें हनुमानाला सांगितल्यावर सुग्रीवाच्या सांगण्यावरून हनुमानाच्या हातून सीतेचा शोध लावण्याचें कार्य शेवटास जाईल, असें रघुवंशज रामाला समजून आल्यावर, त्याच्या हातून कार्य शेवटास जाईल, अशी खात्री बाळगून राम आपल्याशीं विचार करूं लागले कीं, "सुग्रीवाला तर हनुमानाच्या हातून कार्यसिद्धी होण्याची सर्वस्वी खात्री आहे, आणि आपल्या हातून कार्य शेवटास जाईल, ह्याविषयीं स्वतः हनुमानाला तर त्याच्याहिपेक्षां जास्त खात्री वाटत आहे. तेव्हां हातून कार्य झाल्यामुळें परीक्षेस उतरलेला, आणि

मुद्रिकादान.



धन्याकडून श्रेष्ठ म्हणून समजला गेलेला हा वीर सीतेच्या शोधाकरितां गेला असतां ह्याच्या हातून कार्यसिद्धी होणार, हें निश्चित ठरलेलेंच आहे."

असा विचार मनांत आणून, कार्यसिद्धि करण्याविषयीं अतिशय उद्युक्त झालेल्या त्या हनुमानाकडे पाहून महातेजस्वी रामचंद्र कृतार्थ झाल्यासारखे आनंदित झाले. त्यांची इंद्रियवृत्ति व मनोवृत्ति प्रफुल्लित झाली, आणि संतुष्ट होऊन त्यांनीं आपल्या नांवानें सुशोभित झालेली एक अंगठी राजकन्या सीतेच्या खुणेकरितां त्या हनुमानाच्या स्वाधीन केली. ते म्हणाले, "हे वानर-श्रेष्ठा, ह्या चिन्हाच्या योगानें ती जनककन्या सीता—तूं माझ्याकडून आला आहेस, असें समजून कांहींएक भीति मनामध्यें न धरितां—तुझ्याकडे पाहील. हे वीरा, तुझी ही उद्युक्तता, धैर्ययुक्त पराक्रम आणि मनांत खात्री बाळगून सुग्रीवानें तुला केलेली आज्ञा ह्यांवरून तुझ्या हातून कार्यसिद्धि होणार असें मला वाटत आहे."

ह्याप्रमाणें रामचंद्रांनीं सांगितल्यावर वानरश्रेष्ठ हनुमानानें त्या अंगठीचा स्वीकार केला, आणि मस्तकीं हात जोडून व रामचंद्राच्या चरणांना वंदन करून तो वानरश्रेष्ठ चालता झाला.

ह्याप्रमाणें तें वानरांचें प्रचंड सैन्य बरोबर घेऊन निघालेला तो वायुपुत्र वीर, नक्षत्रगणांनीं सुशोभित आणि आकाश मेघनिर्मुक्त झाल्यामुळें शुद्ध मंड-लानें युक्त असलेल्या चंद्राप्रमाणें शोभूं लागला. तो जातां जातां राम आणि सुग्रीव हे उभयतां त्याला म्हणाले, "हे अतिबलाढ्य, हे वानरश्रेष्ठ, हे पराक्रमी वायुपुत्रा, तुझ्याच सामर्थ्यावर सर्व अवलंबून आहे. ह्यास्तव मोठमोठे पराक्रम करून त्या जनककन्येचा शोध लागेल, अशा रीतीनें व्यवस्था कर."

सर्ग पंचेचाळिसावा.

वानरांचें प्रयाण.

नंतर वानरश्रेष्ठ सुग्रीव रामकार्य सिद्धीस जाण्याकरितां सर्व वानरांना बोला-वून आणून म्हणाला, 'तुम्हीं सर्व वानरश्रेष्ठांनीं ह्याप्रमाणें हें जगत् शोधून काढिलें पाहिजे.'

ही धन्याची कडकडीत आज्ञा समजून येतांक्षणीं ते वानर टोळाप्रमाणें

पृथ्वी आच्छादित करून जाऊं लागले. इकडे सीतेचा शोध लावण्याविषयीं जो महिना मुदत म्हणून ठरविलेला होता, त्या महिन्यामध्यें सुग्रीवाची प्रतीक्षा करीत करीत लक्ष्मणासहवर्तमान रामचंद्र त्या प्रस्रवण पर्वतावरच राहिले होते. हिमालय पर्वतानें व्यापून टाकिलेल्या रमणीय उत्तर दिशेस शतबलि नामक वीर वानर एकदम चालता झाला. वानरसेनाधिपति विनत पूर्व दिशेस निघून गेला. तार, अंगद इत्यादिकांसहवर्तमान वानरसेनाधिपति वायुपुत्र हनुमान वानर अगस्त्य मुनींनीं आश्रय केलेल्या दक्षिण दिशेस गेला. वानरश्रेष्ठ व वानरराज सुषेण ह्याणानें संरक्षण केलेल्या घोर पश्चिम दिशेस निघून गेला. ह्याप्रमाणें सर्व दिशांस योग्य रीतीनें वानर पाठविल्यानंतर, वानरसेनाधिपति वीर सुग्रीव सुखी होऊन आनंदानें क्रीडा करूं लागला. ह्याप्रमाणें राजा सुग्रीवाची आज्ञा झालेले ते सर्व वानरसेनाधिपती त्वरेचें अवलंबन करून आपापल्या दिशेकडे चालते झाले. कोणी सामान्य शब्द करूं लागले, कोणी उच्चस्वरानें ओरडूं लागले, कोणी गर्जना करूं लागले आणि कोणी महाबलाढ्य वानर गर्जना व माकडचेष्टा करीत करीत इकडे तिकडे धावूं लागले. ह्याप्रमाणें सर्व वानरसेनाधिपतींना राजा सुग्रीवाची आज्ञा झाली असतां, 'आम्ही सीतेला आणूं व रावणाला मारून टाकूं' असे उद्गार त्यांनीं काढिले. एक म्हणाला, 'समरांगणामध्यें प्राप्त झालेल्या रावणाचा मी एकटाच वध करीन, आणि एकाएकीं त्याचा वध केल्यावर सीतेला घेऊन येईन.' ह्यावर दुसरा म्हणाला, 'तुम्ही स्वस्थ रहा. तुमच्या श्रमाची आज जरूर नाहीं. भीतीनें थरथर कांपत असलेली जानकी पातालांतून सुद्धां मी एकटाच घेऊन येईन.' हें ऐकून आणखी एकजण म्हणाला, 'मी वृक्ष उडवून देईन, पर्वताचे तुकडे तुकडे करून टाकीन, पृथ्वी विदीर्ण करीन, सागर क्षुब्ध करीन.' ह्यावर दुसरा एकजण म्हणाला, 'मी योजनेंच्या योजनें उड्या टाकीत जाईन, ह्याविषयीं मुळींच संशय नाहीं.' हें ऐकून दुसरा म्हणाला, 'अरे जा! शंभर योजनेंच नव्हे, परंतु शंभरांपेक्षांहि जास्त योजनें मी उडी मारीन.' हें ऐकून दुसरा म्हणाला, 'पुरे! पुरे! पृथ्वी, सागर, पर्वत, वनें आणि पाताळ ह्यांमध्य माझी गति कोठाह कुंठित होत नाहीं.' ह्याप्रमाणें स्वसामर्थ्याचा गर्व वाहणारे वानर राजा सुग्रीवाचे समीप एकएकटे बोलूं लागले.

सर्ग शेहेचाळिसावा.

सुग्रीवाचें भूमंडलपर्यटनवृत्त.

वानरश्रेष्ठ गेल्यावर रामचंद्र सुग्रीवाला म्हणाले, " सर्व भूमंडल तुला कसें माहीत आहे ? "

ह्यावर विनयसंपन्न सुग्रीव त्यांना म्हणाला, " माझें म्हणणें ऐका. मी सर्व सविस्तर सांगतों. जेव्हां महिष रूप धारण करणाऱ्या दुंदुभि नामक दानवाकडे वाली मलय पर्वतावर धावून गेला, तेव्हां महिषरूपी दानव मलय पर्वताच्या गुहेमध्यें शिरला असतां वालीहि त्याचा वध करण्याच्या उद्देशानें त्या मलय पर्वतामध्येंच प्रविष्ठ झाला. आंत जातांना वालीनें मला गुहेच्या द्वाराजवळ गोंडीगुलाबीनें ठेविलें; परंतु आंत जाऊन एक संवत्सर लोटला, तरी वाली बाहेर येईना. एक वर्ष झाल्यानंतर रक्ताच्या प्रवाहानें तें बीळ अगदीं भरून गेलें. तेव्हां तें अवलोकन करून मी विस्मित झालों, आणि भ्रात्याकरितां अतिशय शोकाकुल झालों. नंतर पितृसमान असलेला ज्येष्ठ भ्राता वाली निःसंशय वध पावला, असें समजून महिषरूप धारण करणाऱ्या त्या दानवाला बाहेर येण्याची अडचण पडून तो आंतल्या आंतच मरून जावा, ह्या उद्देशानें एक पर्वतप्राय शिला गुहेच्या द्वाराशीं मीं लावून ठेविली. नंतर त्या वालीच्या जीविताविषयीं मी निराश होऊन किष्किंधा नगरीला परत आलों, आणि अतिशय मोठें वानरराज्य व रुमेसहवर्तमान तारा प्राप्त झाल्यावर त्या वालीच्या मित्रांसहवर्तमान मी निर्भय होऊन तेथें राहूं लागलों. पुढें त्या दानवाचा वध करून वानरश्रेष्ठ वाली परत आला असतां गुरुबुद्धीमुळें मी भयभीत झालों, आणि राज्य त्याच्या स्वाधीन केलें. परंतु अंतःकरणामध्यें क्षुब्ध झालेल्या दुरात्म्या वालीनें माझा वध करण्याचें मनांत आणिलें; आणि सचिवांसहवर्तमान मी धावूं लागलों असतां तो माझा पाठलाग करूं लागला. तेव्हां तो वाली पाठलाग करीत असतांना नानाप्रकारच्या नद्या, वनें व नगरें अवलोकन करीत करीत मी पुढें चाललों. ह्याप्रमाणें हिंडतां हिंडतां, गाईचें पाऊल ओलांडून जाण्याप्रमाणें कांहींएक आयास न पडतां मीं सर्व पृथ्वीभर पर्यटन केलें. मी फार वेगानें जात असल्यामुळें पृथ्वी मला वेगानें फिरत असलेल्या अलातचक्रासारखी भासली, आणि प्राण्यांमध्यें असलेल्या सर्व कांहीं गोष्टी माझ्या प्रत्यक्ष अनुभवाला आल्यामुळें

पृथ्वी हा एक सर्व वस्तूंचें प्रतिबिंब दर्शविणारा आरसा आहे कीं काय असें मला वाटूं लागलें. प्रथमतः पूर्व दिशेला गेल्यावर नानाप्रकारचे वृक्ष, नानाप्रकारचीं सरोवरें आणि दऱ्यांसहवर्तमान रम्य रम्य पर्वत मीं अवलोकन केले. धातूंनीं भूषित असलेला उदयाचल, आणि अप्सरांचें नेहमींचें निवास्थान असलेला क्षीरसागर हे मीं त्या दिशेसच पाहिले. परंतु वाली पाठलाग करीत असतांना, मी पळतां पळतां एकदम वळून जाऊं लागलों, आणि ती दिशा सोडून देऊन विंध्याचलावरील वृक्षांनीं व्याप्त आणि चंदनवृक्षांनीं सुशोभित अशा दक्षिण दिशेकडे चालता झालों. नंतर वृक्षांच्या अथवा पर्वतांच्या पलीकडे वालीला पहात पहात मी दक्षिण दिशा सोडून वाली तसाच पाठलाग करीत असतांना पश्चिम दिशेकडे धावूं लागलों. तेव्हां नानाप्रकारचे देश आणि श्रेष्ठ अस्ताचल पर्वत पहातां पहातां शेवटीं मी त्या श्रेष्ठ अस्ताचलावर आलों, आणि तेथून उत्तरेकडे पळालों. हिमालय पर्वत, मेरु पर्वत आणि उत्तर समुद्र जरी मी हिंडलों, तरी वाली मागोमाग धावत येत असल्यामुळें आपणांला कोठेंहि आश्रय मिळत नाहीं, असें जेव्हां माझ्या लक्ष्यांत आलें, तेव्हां बुद्धिमान हनुमंत मला म्हणाला, " हे राजा, आतां मला स्मरण झालें. 'ह्या आश्रमामध्यें जर वाली प्रवेश करील, तर त्याच्या मस्तकाचे शेंकडों तुकडे होतील.' असा मतंग ऋषींनीं वानरराज वालीला त्या वेळीं शाप दिलेला आहे. ह्यास्तव, त्या मतंगाश्रमामध्यें आपलें वास्तव्य निर्भय व सुखावह होईल."

सुग्रीव पुढें सांगतोः—" रामचंद्रा, असें हनुमानानें सांगितल्यावर ऋष्यमूक पर्वतावर जाऊन मी राहिलों असतां, मतंग मुनींच्या भयामुळें वाली माझ्यासमीप येण्यास समर्थ झाला नाहीं. सारांश राजा, ह्याप्रमाणें त्या वेळीं सर्व भूमंडल मीं प्रत्यक्ष अवलोकन केलें, आणि शेवटीं ऋष्यमूक पर्वताच्या गुहेचा आश्रय करून राहिलों."

सर्ग सत्तेचाळिसावा.

सीताशुद्धीस गेलेल्या वानरांचें पुनरागमन.

सीतेच्या शोधाकरितां वानरराज सुग्रीवानें चोहोंकडे जाण्यास आज्ञा केलेले ते वानरश्रेष्ठ आज्ञेप्रमाणें लगेच चालते झाले; आणि सरोवरें, नद्यांचीं तीरें,

मैदानें, नगरें, आणि नद्यांच्या प्रवाहामुळें जाण्यास दुर्गम झालेले प्रदेश चोहोंकडे शोधूं लागले. सारांश, सुग्रीवाची आज्ञा झालेले ते सर्व वानरसेनाधिपती पर्वत, वनें आणि अरण्यें ह्यांसहवर्तमान तिकडील देश शोधूं लागले. ते सर्वजण वानर दिवसां शोधीत असत, आणि रात्रीं निद्रा घेण्याकरितां पृथ्वीवर पडत असत. ज्या ज्या देशांत वानर सीतेचा शोध लावण्याकरितां गेले, त्या त्या देशांत जिकडे तिकडे त्यांना प्रत्यहीं सर्व ऋतूंतील फलें धारण करणारे वृक्ष आढळूं लागले, आणि ते वानर रात्रीं निद्रा घेऊं लागले. तो निघण्याचा दिवस पहिला धरून प्रस्रवण पर्वतावर सीतेला शोधण्याकरितां गेलेले वानर एक महिन्याची मुदत भरूं लागतांक्षणीं निराश होऊन परत फिरले, आणि वानरराज सुग्रीवासमीप येऊन राहिले. सुग्रीवानें आज्ञा केल्याप्रमाणें सचिवांसह वर्तमान पूर्व दिशेस गेलेला महाबलाढ्य विनत सर्व पूर्व दिशा शोधल्यावरहि सीतेचा शोध लागत नाहीं, असें पाहून परत आला. सर्व उत्तर दिशा धुंडाळून महाकपि शतबलीहि मुदतीला भिऊन सैन्यासहवर्तमान परत आला. वानरांसहवर्तमान गेलेला सुषेणहि पश्चिम दिशा धुंडाळून महिना पूर्ण होतांक्षणीं सुग्रीवाकडे परत आला, आणि रामासहवर्तमान प्रस्रवण पर्वतावर बसलेल्या सुग्रीवाकडे येऊन अभिवंदनपूर्वक त्याला म्हणाला, "सर्व पर्वत, गहन वनें, नद्या, समुद्रांतील बेटें आणि सर्व प्रदेश धुंडाळून काढिले. आपण सांगितल्याप्रमाणें सर्व गुहा शोधून काढिल्या, लतांच्या वेलांनीं सर्व बाजूंनीं व्याप्त झालेलीं लतागृहें हुडकिलीं, गहन प्रदेशांमध्यें आणि दुर्गम असलेल्या अवघड ठिकाणींहि जाऊन अत्यंत बलाढ्य प्राण्यांचीं स्थलें धुंडाळून त्यांचा वधहि केला, आणि जे म्हणून कांहीं गहन प्रदेश, तेहि आम्हीं फिरून फिरून शोधून काढिले. आतां हे वानरराजा, मनानें उदार आणि महाकुलीन असा जो हनुमान, तोच सीतेचा पत्ता लावील. कारण, ज्या दिशेला सीता गेली आहे, त्याच दिशेला तो वायुपुत्र हनुमान गेला आहे."

सर्ग अठ्ठेचाळिसावा.

हनुमत्प्रभृतींचा शोध.

तार आणि अंगद ह्यांसहवर्तमान हनुमान सुग्रीवाच्या आज्ञेप्रमाणें उद्दिष्ट प्रदेशाकडे एकदम जाण्यास निघाला. त्या वानरश्रेष्ठांसह दूर जाऊन विंध्य

पर्वताच्या गुहा आणि वनें व त्याचप्रमाणें पर्वतांवरील नद्यांमुळें दुर्गम झालेले प्रदेश, मोठमोठ्या वृक्षानीं भरलेलीं वनें, नानाप्रकारचे पर्वत आणि अरण्यांतील वृक्षहि त्यानें धुंडाळून काढिले. सारांश, हनुमान आणि त्याच्या बरोबर गेलेले ते सर्व वानर नानाप्रकारचीं मुळें व फळें यांवर उपजीविका करून सर्व दक्षिण दिशा शोधीत होते. तथापि त्या वीरांना जनककन्या सीतेचा शोध लागला नाहीं. निर्जल, निर्जन आणि म्हणूनच शून्य व दिसण्यांतहि भयंकर असें वन, आणि त्याच्याच सारखीं निर्जल व निर्जन असलेलीं शून्य अरण्येंहि त्यांनीं शोधून काढिलीं. 'गुहा आणि अरण्यें ह्यांनीं युक्त असलेला जो जो मोठा प्रदेश शोधून काढण्याला कठीण असे, तो तोहि त्यांनीं शोधून काढिला; आणि हे सर्व शोधून काढिल्यानंतर, त्या देशाचा त्याग करून ते सर्व वानरसेनाधिपति कसल्याहि प्रकारची भीति न बाळगितां प्रवेश होण्यास कठीण अशा दुसऱ्याच एका प्रदेशामध्यें गेले. त्या ठिकाणचे वृक्ष हे फळें, पुष्पें व पानें ह्यांनीं रहित असून नद्याहि निर्जल झालेल्या होत्या, व मुळें-पाळेंहि अत्यंत दुर्लभ होतीं. महिष, मृग, गज, व्याघ्र, पक्षी अथवा दुसरेहि वनामध्यें रहाणारे प्राणी तेथें नव्हते. वृक्ष, ओषधि, वृक्षाच्या आश्रयानें रहाणाऱ्या वेली, आणि स्निग्ध पर्णांनीं युक्त अशा भूमीवरहि पसरलेल्या वेली तेथें मुळींच नसून, कमळें प्रफुल्लित झाल्यामुळे प्रेक्षणीय, सुगंधयुक्त आणि भ्रमरांनीं व्याप्त झालेलीं सरोवरेंहि तेथें नव्हतीं. अशा त्या वनप्रदेशामध्यें कंडु म्हणून एक महाभाग्यवान सत्यवादी तपोधन महर्षि रहात होते. ते फारच रागीट होते, आणि तपश्चर्येसंबंधीं नियमांमुळें त्यांच्यासमोर दुसऱ्यांनीं जाणेंहि अशक्य झालें होतें. त्या वनामध्यें त्यांचा एक दहा वर्षांचा मुलगा मृत्यु पावला होता, आणि त्यामुळें ते महर्षि क्रुद्ध झाले होते. इतकेंच नव्हे, तर त्या धर्मात्म्या महर्षींनीं हें प्रचंड वन मृगरहित व पक्षिरहित होऊन कोणालाहि आश्रय करण्याला उपयोगीं पडणार नाहीं, व ह्यांत प्रवेश करणेंहि अत्यंत कठीण होईल, असा शापहि देऊन टाकिला होता. त्या प्रदेशांतीलहि वनें, पर्वतांच्या गुहा आणि नद्यांचे उगम त्यांनीं लक्ष्य लावून शोधिले. तथापि सुग्रीवाच्या मर्जीप्रमाणें वागणाऱ्या त्या महात्म्यांना तेथें सीतेचा अथवा तिचा अपहार करणाऱ्या रावणाचाहि पत्ता लागला नाहीं.

नंतर लता व झांकरें ह्यांनीं व्याप्त झालेल्या त्या भयंकर प्रदेशामध्यें प्रवेश केल्यावर, उग्र कर्म करणाऱ्या आणि देवांची मुळींच भीति नसलेल्या एका

असुराला त्यांनीं तेथें अवलोकन केलें. इतकेंच नव्हे, परंतु त्या पर्वतप्राय असुराला अवलोकन करितांक्षणीं ते सर्व वानरसेनाधिपति चांगल्या तयारीनें राहिले, आणि तो बलाढ्य असुरहि 'मेलांत' असें त्या सर्व वानरांना म्हणाला, व क्रुद्ध होऊन व मूठ वळलेला एक हात उगारून त्यांच्या अंगावर धावला. परंतु तो एकाएकीं धावून येत असतांना, हा रावण आहे, असें समजून वालिपुत्र अंगदानें त्याला एक चपराक लगावली. चपराक बसतांक्षणीं तोंडांतून रक्ताच्या गुळण्या टाकीत टाकीत तो असुर फेंकून दिलेल्या पर्वताप्रमाणें भूमीवर पडला. ह्याप्रमाणें तो निश्चेष्ट पडला असतां ते सर्व विजयी वानर त्या देशांतील बहुतेक पर्वत व गुहा शोधूं लागले. तो सर्व प्रदेश शोधून निघाला असें समजून आल्यानंतर, ते सर्व वनवासी वानर दुसऱ्याच एका पर्वतावरील घोर अरण्यामध्यें शिरले; आणि तें शोधून काढिल्यावर पुनरपि सीतेचा शोध लागत नाहीं म्हणून ते खिन्न झाले, आणि उड्या टाकीत टाकीत एकांत प्रदेशामध्यें सर्व एकत्र जुळून एका वृक्षाखालीं खिन्न होऊन बसले.

सर्ग एकुणपन्नासावा.

पुनः शोध.

नंतर शोधून शोधून थकून गेलेला महाबुद्धिमान अंगद सर्व वानरांना धीर देऊन हलके हलके म्हणाला, "वनें, पर्वत, नद्या, दुर्गम प्रदेश, अरण्यें, दऱ्या आणि पर्वतावरील गुहा हें सर्व आपण चोहोंकडून शोधिलें. ठिकठिकाणीं आपण एकत्र जुळून शोध केला, तरी जानकीचा शोध लागत नाहीं, आणि त्याचप्रमाणें त्या सीतेचा अपहार करणारा पापी राक्षसहि दृष्टीस पडत नाहीं. काळ तर आपला पुष्कळ गेला, आणि सुग्रीवाची आज्ञा तर फारच कडक पडली. तेव्हां तुम्ही आतां एका जुटीनें चोहोंकडे शोध करा. आळस, प्रवासामुळें होणारें दुःख आणि निद्रा ह्यांची पर्वा न करितां जनककन्या सीता दृष्टीस पडेल अशा रीतीनें आतां आपण शोध करूं. खेदराहित्य, दक्षता आणि मनाच्या उत्साहाचा भंग न होऊं देणें हीं कार्यसिद्धि करणारीं आहेत, आणि म्हणूनच मी तुम्हांला हें सांगत आहें. हें दुर्गम वन वानरांनीं अद्यापि शोधून काढिलें पाहिजे. सारांश, मनामध्यें खेद न बाळगितां सर्व वन तुम्ही शोधून काढा. वानर प्रयत्न करूं लागले असतां त्या प्रयत्नकर्माचें फल अवश्य दृष्टीस

पडणारच. ह्याकरितां मनामध्यें खिन्न होऊन उद्योग सोडून देणें योग्य नाहीं. शिवाय वानरहो, राजा सुग्रीव रागीट असून त्याचें शासन फार कडक आहे. तेव्हां त्याची व त्याचप्रमाणें महात्म्या रामाची आपणांला नेहमीं भीति बाळगिली पाहिजे. मीं हें हिताकरितां तुम्हांला सांगितलें आहे. तुम्हांला रुचल्यास ह्याप्रमाणें करा. अथवा हें माझें सांगणें जर रुचत नसेल, तर वानरहो, ह्या प्रसंगीं सर्वांना काय योग्य आहे, तें तरी एकदां कळूं द्या. "

हें अंगदाचें भाषण ऐकून तृषा व श्रम ह्यांच्यामुळें स्वरानें हळू, पण स्पष्ट अशा वाणीनें गंधमादन म्हणाला, " अंगदानें सांगितलेलें करणें तुम्हांला योग्य आहे, तें हितकारक आहे, आणि अनुकूल आहे. ह्यास्तव ह्याचें ऐकिलें पाहिजे. महात्म्या सुग्रीवानें सांगितल्याप्रमाणें पुनरपि पर्वत, गुहा, टेंकड्या, शून्य वनें आणि पर्वतावरील जलप्रवाह आपणांला शोधिले पाहिजेत. ह्याकरितां एकजूट होऊन सर्वांनीं वन आणि पर्वतसंबंधीं दुर्गम प्रदेश धुंडाळिले पाहिजेत. "

असें गंधमादनानें सांगितल्यानंतर ते महाबलाढ्य वानर तेथून उठले, आणि विंध्यपर्वतासंबंधीं वनांनीं व्याप्त झालेल्या दक्षिण दिशेमध्यें हिंडूं लागले. प्रथमत: शिखरें आणि दऱ्या ह्यांनीं युक्त आणि शरत्कालच्या मेघाप्रमाणें भासणाऱ्या भव्य रजतपर्वतावर ते गेले. सीतेचा शोध लावण्याची इच्छा धरणारे ते वानरश्रेष्ठ, त्या पर्वतावरील रमणीय लोध्रवन व संतपर्ण वृक्षांचीं वनें शोधूं लागले. त्या पर्वताच्या माथ्यावर चढलेले ते महापराक्रमी वानर शोधून शोधून जरी थकले, तरी सुद्धां रामाची प्रिय पट्टराणी सीता त्यांच्या दृष्टीस पडली नाहीं. अनेक गुहांनीं युक्त असलेला तो पर्वत जितका म्हणून त्यांना दृग्गोचर होता, तितक्यावर आरूढ होऊन ते वानर चोहोंकडे शोधूं लागले. नंतर खालीं उतरल्यावर भांबावून गेलेले व कांहीं एक सुचेनासें झालेले ते एका वृक्षाजवळ येऊन मुहूर्तभर तेथें बसले. एक मुहूर्त विश्रांति घेतल्यानंतर किंचित् श्रमपरिहार झाला. तेव्हां पुनरपि ते सर्व दक्षिण दिशा शोधून काढण्यास तयार झाले, आणि हनुमान आदिकरून शोध करण्याकरितां निघालेले ते सर्व वानरश्रेष्ठ, विंध्यपर्वतच शोधून काढण्याचें प्रथम मनामध्यें योजून त्या पर्वतावर चोहोंकडे संचार करूं लागले.

सर्ग पन्नासावा.

ऋक्षबिळदर्शन.

तार व अंगद ह्यांच्याशीं मिळून हनुमान वानर विंध्यपर्वताच्या गुहा व वनें धुंडाळूं लागला. सिंहव्याघ्रांनीं भरलेल्या अशाहि त्या श्रेष्ठ पर्वतावरील गुहा तो शोधूं लागला, आणि क्लेशदायक असलेल्या मोठमोठ्या ओढ्यांतूनहि तो शोध करूं लागला. शेवटीं त्या पर्वताच्या नैर्ऋत्य भागाला ते वानर गेले, आणि तेथेंच वास्तव्य करीत असतांना त्यांची परत येण्याची मुदत भरून गेली. तो प्रचंड प्रदेश गुहा व अरण्यें ह्यांनीं युक्त असल्यामुळें जरी धुंडाळण्यास फारच अशक्य होता, तरी वायुपुत्र हनुमानानें तो सर्व पर्वत शोधून काढण्याचा क्रम सुरू ठेविलाच होता. एकमेकांपासून विशेष दूर न राहातां वेगळे वेगळे होऊन गज, गवाक्ष, गवय, शरभ, गंधमादन, मैंद, द्विविद, हनुमान, जांबवान, युवराज अंगद आणि वनामध्यें हिंडणारा तार, हे पर्वत समुदायांनीं युक्त असलेले प्रदेश शोधून काढून दक्षिण दिशा ठिकठिकाणीं हुडकूं लागली असतां एक आच्छादित विवर त्यांनीं अवलोकन केलें. तें विवर आंत प्रवेश करण्याला कठीण असून ऋक्षबिल असें त्याचें नांव होतें; आणि एका दानवानें त्याचें रक्षण केलेलें होतें.

असो. क्षुधा व तृषा ह्यांनीं व्याप्त होऊन श्रांत झालेल्या त्या उदकार्थी वानरांनीं लता व वृक्ष ह्यांनीं गजबजून गेलेलें तें मोठें बीळ अवलोकन केलें. त्या बिळांतून क्रौंच, हंस, सारस आणि कमलपुष्पांच्या परागामुळें शरीर रंगून गेलेले व उदकानें आर्द्र झालेले चक्रवाक पक्षी बाहेर पडत होते. अशा प्रकारें ओलांडून जाण्यास अशक्य असलेल्या त्या सुगंधि बिळाजवळ येऊन वानरश्रेष्ठ मनामध्यें विस्मयचकित झाले; आणि येथें उदक असेल अशी त्यांची अटकळ झाल्यामुळें ते आनंदित होऊन अगदीं त्या बिळाजवळ गेले. दैत्यराज बलीच्या निवासस्थानासारखें (पाताळासारखें) असलेलें तें विवर नानाप्रकारच्या प्राण्यांनीं भरलेलें होतें. त्या घोर विवराकडे पहाण्याची सोय नव्हती, आणि त्यांत प्रवेश करणें तर फार अशक्यच होतें. तदनंतर आकृतीनें पर्वतशिखराप्रमाणें असलेला आणि अरण्यें व वनें ह्यांच्याविषयीं माहितगार असलेला वायुपुत्र हनुमान घोर वानरांना म्हणाला, "पर्वतसमुदायांनीं व्याप्त झालेले देश धुंडाळितां धुंडाळितां

सर्व दक्षिण दिशा हुडकून आपण सर्व अगदीं थकून गेलों. तथापि सीतेचा आपल्याला पत्ता लागत नाहीं. ह्या विवरांतून हंस, सारस पक्ष्यांसहवर्तमान क्रौंच आणि चक्रवाक असे पक्षी उदकानें आर्द्र होऊन सर्व बाजूंनीं बाहेर पडत आहेत. ह्यावरून येथें उदकयुक्त कूप अथवा सरोवर हें खास असलेंच पाहिजे. शिवाय ह्या विवराच्या द्वाराशीं असलेले हे वृक्षहि टवटवीत दिसत आहेत."

ऋक्षबिळप्रवेश.

ह्याप्रमाणें हनुमानानें सांगितलें असतां ते सर्व वानर त्या अंधकारानें व्याप्त झालेल्या विवरामध्यें प्रविष्ट झाले; आणि चंद्रसूर्यप्रकाशरहित व म्हणूनच अंगावर कांटा आणणारें असें तें विवर पाहूं लागले. असो. त्या विवरांतून सिंह आणि नानाप्रकारचे पशुपक्षी बाहेर पडत असलेले अवलोकन केल्यावर अंधकारानें व्याप्त अशा त्या विवरामध्यें ते श्रेष्ठ श्रेष्ठ वानर प्रविष्ट झाले असतां त्यांची दृष्टि, प्रभाव आणि पराक्रम ह्यांचें तेथें कांहींहि चालेना. ह्यामुळें त्यांची गति वायूप्रमाणें होती, तरी दृष्टीच अंधकारामध्यें कुंठित झाल्या कारणानें एकमेकांचे हात धरूनच त्या वानरश्रेष्ठांना वेगावेगानें त्या विवरामध्यें प्रवेश करणे भाग पडलें. अशा प्रकारें नानाप्रकारच्या वृक्षांनीं व्याप्त झालेल्या त्या भयंकर विवरामध्यें एकमेकांचे हात वगैरे घट्ट धरून सुमारें एक योजनभर ते गेले असतां, तृषाक्रांत आणि म्हणूनच उदकार्थी बनलेले ते वानर अतिशय गोंधळून गेले, आणि त्यांना कांहींएक सुचेनासें झालें. सारांश, कांहीं वेळपर्यंत ते सावध राहून त्या विवरामध्यें चालत राहिले. परंतु शेवटीं चालतां चालतां अतिशय थकून जाऊन दीनवदन व कृश झालेले ते वीर जीविताविषयीं निराश झाले असतां त्यांना प्रकाश दिसूं लागला.

ऋक्षबिळशोभा.

तदनंतर जेथें अंधकाररहित वन आहे, अशा त्या प्रदेशाला आल्यावर प्रदीप्त अग्नीसारखे तेजस्वी असे सुवर्णवृक्ष त्या विनयसंपन्न वानरांनीं अवलोकन केले. साल, ताल, तमाल, पुन्नाग, वंजुल, धव, चंपक, नागवृक्ष आणि प्रफुल्लित कर्णिकार वृक्ष त्यांनीं अवलोकन केले. सुवर्णमय आणि आश्चर्यकारक अशा झुबक्यांनीं, आरक्तवर्ण नूतन पल्लवांनीं, पुष्पगुच्छरूप गजऱ्यांनीं आणि लतांनीं युक्त, सुवर्णालंकारांनीं भूषित, बालसूर्याप्रमाणें तेजस्वी, वैदूर्यरत्नमय आधारप्रदेशांनीं युक्त व आकृतीनें देदीप्यमान असे सुवर्णमय वृक्ष त्यांनीं पाहिले. नील आणि वैदूर्य ह्या रत्नांप्रमाणें ज्यांचा वर्ण आहे, पक्षी आणि बालसूर्या-

प्रमाणें तेजस्वी असे मोठमोठे सुवर्णवृक्ष ह्यांनीं जीं व्याप्त आहेत, सुवर्णमय मत्स्यांनीं आणि त्याचप्रमाणें मोठमोठ्या कमलपुष्पांनीं जीं भरलेलीं आहेत, आणि निर्मल उदकानें जीं युक्त आहेत, अशीं कमलयुक्त सरोवरें त्यांनीं अवलोकन केलीं. सुवर्णाच्या खिडक्यांनीं युक्त आणि मोत्यांच्या सरांनीं व्याप्त अशीं सोन्याचीं व रुप्याचीं विमाने त्यांच्या दृष्टीस पडलीं. सुवर्ण, रजत आणि मृत्तिका ह्यांच्या योगानें तयार करून वैदूर्य मण्यांनीं भूषित केलेलीं श्रेष्ठ गृहें सर्व बाजूंनीं त्या वानरांच्या अवलोकनांत येऊं लागलीं. फलांनीं व पुष्पांनीं भरलेले, सुवर्ण-वर्ण भ्रमरांनीं गजबजलेले आणि कांतीनें पोंवळ्याप्रमाणें असलेले वृक्ष, मध, रत्नें व सुवर्ण ह्यांच्या योगानें आश्चर्यकारक झालेलीं नानाप्रकारचीं मोठमोठीं आसनें आणि शय्या हीं त्यांनीं चोहोंकडे अवलोकन केलीं. सुवर्ण, रौप्य व कांस्य ह्या धातूंच्या भांड्यांच्या राशी, दिव्य अगुरु आणि चंदन ह्यांचे पवित्र ढीग, पवित्र व भक्षण करण्यास योग्य अशीं मुळें व फळें पालखी वगैरे मोठीं मूल्यवान यानें, माधुर्ययुक्त मध, मोठमोठ्या मूल्यवान दिव्य वस्त्रांचे ढीग व अद्भुत ऊर्णावस्त्रांच्या अजिनांच्या राशी हीं त्यांनीं पाहिलीं.

स्वयंप्रभादर्शन.

पुढे ठिकठिकाणीं धुंडाळितां धुंडाळितां त्या महातेजस्वी शूर वानरांनीं विवरामध्यें जवळच कोणी एक स्त्री अवलोकन केली, आणि वल्कल व कृष्णा-जिन परिधान केलेली व शुद्ध आहार करून तेजानें झळकत असलेली ती तपस्विनी अवलोकन करितांक्षणीं ते वानर अगदीं विस्मयचकित झाले. नंतर शरिरानें पर्वतप्राय असलेल्या हनुमानानें हात जोडिले, आणि अभिवंदन करून तिला विचारिलें, " तूं कोण ? व हें गृह, हीं रत्नें आणि हें विवर कोणाचें ? "

सर्ग एकावन्नावा.

ऋक्षबिळवृत्त.

वल्कल व कृष्णाजिन परिधान केलेल्या त्या महाभाग्यवती धर्मचारिणी तपस्वी स्त्रीला ह्याप्रमाणें विचारिल्यानंतर हनुमान तिला म्हणाला, " अंधकारानें व्याप्त झालेल्या विवरामध्यें आम्ही विचार न करितां प्रविष्ठ झालों असून क्षुधेनें व्याकुल झाल्यामुळें सर्व प्रकारें खिन्न झालों आहों; आणि अशा रीतीनें ह्या

नानाप्रकारच्या अद्भुत गोष्टी पाहून आम्ही अगदीं गोंधळून गेलों आहों, व व्याकुल झाल्यामुळें आम्हांला भानहि राहिलें नाहीं. तेव्हां बालसूर्याप्रमाणें तेजस्वी असलेले हे सुवर्णवृक्ष, पवित्र व भक्षण करण्यास योग्य अशीं मुळें व फळें, सोन्याचीं विमानें, सुवर्णाच्या खिडक्यांनीं युक्त व रत्नसमुदायांनीं व्याप्त असलेलीं रुप्याचीं घरें आणि पुष्पें, फळें व सुगंध ह्यांनीं युक्त असलेले हे सुवर्णमय वृक्ष कोणाचे आहेत, निर्मल उदकामध्यें सुवर्णकमलें कोणाच्या प्रभावानें उत्पन्न झालीं आहेत, आणि सुवर्णमय कूर्म आणि मत्स्य कसे दृष्टीस पडत आहेत, हें तूं आम्हांला सांग. तात्पर्य, हें तुझ्या स्वतःच्याच प्रभावामुळें झालेलें आहे, किंवा हें दुसऱ्या कोणाच्या तपाचें बल आहे, हें कांहींच माहीत नसलेल्या आम्हां सर्वांना तूं सर्व कथन कर."

ह्याप्रमाणें हनुमान तिला म्हणाला असतां, प्राणिमात्रांच्या हिताविषयीं तत्पर असलेली ती धर्मचारिणी तपस्विनी स्त्री त्यास म्हणाली, "हे वानरश्रेष्ठा, मय म्हणून एक महातेजस्वी मायावी आहे, आणि त्यानें मायेच्या योगानें हें सर्व सौवर्ण वन निर्माण केलें आहे. पूर्वीं श्रेष्ठ श्रेष्ठ दानवांचा तो शिल्पी होता, हें प्रसिद्ध आहे; आणि त्यानेंच दिव्य व सर्वोत्कृष्ट असें हें वसतिस्थान तयार केलें आहे; मोठ्या अरण्यामध्यें हजारों वर्षें तपश्चर्या केल्यावर ब्रह्मदेवापासून त्याला वर प्राप्त झाला, आणि त्यामुळें उशन महर्षींनीं ग्रथित केलेलें सर्व शिल्पशास्त्र त्याला मिळालें. हवा तो भोग्य पदार्थ उत्पन्न करण्याचें सामर्थ्य असलेला तो बलाढ्य मय हें सर्व निर्माण करून त्या महावनामध्यें कांहीं वेळपर्यंत सुखानें राहिला होता. तो दानवश्रेष्ठ हेमा नामक अप्सरेच्या ठिकाणीं लंपट झाला असल्यामुळें देवराज इंद्रानें वज्र हातांत घेऊन युद्धामध्येंच त्याचा वध केला; आणि ह्याप्रमाणें त्याचा वध झाल्यावर ब्रह्मदेवानें हें उत्कृष्ठ वन, अक्षय्य भोग्य पदार्थ आणि हें सुवर्णमय वसतिस्थान त्या हेमा नामक अप्सरेला दिलें. असो. हे वानरश्रेष्ठा, मी मेरुसावर्णीची स्वयंप्रभा कन्या आहें, आणि हें त्या हेमा अप्सरेचें वसतिस्थान संभाळीत आहें. नृत्य आणि गायन ह्यांमध्यें निष्णात असलेली ती हेमा माझी प्रिय सखी आहे, आणि रक्षणसामर्थ्याविषयीं तिनें मला वर दिला असल्यामुळें मी ह्या प्रचंड गृहाचें रक्षण करीत आहें."

"असो; भक्षण करण्यास योग्य अशीं पवित्र मुळें व फळें भक्षण करून जलप्राशन केल्यावर तुमचें काय कार्य आहे, तुम्ही कशाकरितां अरण्यांत हिंडत आहां, आणि हें दुर्गम वन तुमच्या कसें दृष्टीस पडलें, हें सर्व तुम्ही मला कथन करा."

सर्ग बावन्नावा.

हनुमान व स्वयंप्रभा यांचें संभाषण.

फळें व मुळें भक्षण केल्यानंतर श्रमपरिहार झालेल्या त्या सर्व वानरश्रेष्ठांना ती स्वकार्यदक्ष धर्मचारिणी तपस्विनी म्हणाली, "हे वानरहो, फलभक्षणानें तुमचा थकवा जर गेला असेल, आणि हें जर मीं तुम्हांला विचारिलेलें ऐकण्या-सारखें असेल, तर तुमची सर्व हकीकत श्रवण करण्याची माझी इच्छा आहे."

हें तिचें भाषण श्रवण करून वायुपुत्र हनुमान सरळपणानें तिला इत्थंभूत वर्तमान सांगूं लागला. तो म्हणाला, "इंद्र व वरुण ह्यांच्याच उपमेस पात्र असलेला सर्व लोकांचा राजा दशरथपुत्र वैभवशाली राम, भार्या सीता आणि भ्राता लक्ष्मण ह्यांसहवर्तमान दंडकारण्यामध्यें प्रविष्ट झाला असतां त्याची भार्या रावणानें जनस्थानांतून बलात्कारानें हरण करून नेली. वानरश्रेष्ठांचा राजा जो सुग्रीव नामक वीर, तो त्या राजाचा सखा असून त्यानें आम्हांला पाठविलें आहे; आणि म्हणूनच अगस्त्य मुनींनीं स्वीकारिलेल्या व यमानें रक्षण केलेल्या दक्षिण दिशेस ह्या अंगदप्रभृति श्रेष्ठ वानरांसहवर्तमान आम्ही आलों आहों. सारांश, यथेष्ठ रूप धारण करणाऱ्या रावण राक्षसाचा आणि विदेहराजकन्या सीतेचा तुम्ही सर्वजण मिळून शोध लावा, अशी त्याची आम्हांला आज्ञा झाली आहे. त्याप्रमाणें सर्व वनें व समुद्र ह्यांसहवर्तमान दक्षिण दिशा धुंडाळिल्यावर आम्ही सर्व बुभुक्षित होऊन एका वृक्षाखालीं बसलों होतों. आम्हां सर्वांचीं मुखें निस्तेज झालीं होतीं, आणि चिंतारूप महासागरामध्यें आम्ही मग्न झालों असून ह्या महासागरांतून कसें पार पडावें, हें कांहीं सुचत नसल्यामुळें आम्ही सर्वजण विचार करीत बसलों होतों. तों इतक्यांत इकडे तिकडे दृष्टि फेंकितां फेंकितां अंधकारानें व्याप्त आणि लतावृक्षांनीं गजबजलेलें मोठें विवर अवलोकन केलें. ह्या विवरांतून जलबिंदूंनीं युक्त असे ज्याचे पंख झालेले आहेत, आणि ज्यांचीं शरीरेंहि जलानें आर्द्र झालेलीं आहेत, असे हंस, कुरर व सारस पक्षी बाहेर पडले. तेव्हां 'येथें आपण खुशाल प्रवेश करावा' असें मीं वानरांना सांगितलें असतां, उदकाच्या संभवाविषयीं हें माझें अनुमान त्याहि सर्वांना पटलें, आणि कार्याची त्वरा असल्यामुळें ह्याविषयीं सर्वांचें एकमत झालें. नंतर एकमेकांचे हात घट्ट धरून गुहेमध्यें आल्यावर, अंधकारानें व्याप्त झालेल्या त्या विवरामध्यें आम्ही एकदम प्रविष्ट झालों. सारांश,

सीतेचा शोध लावणें हें आमचें कार्य आहे, आणि ह्याच कार्याकरितां आम्ही अरण्यामध्यें आलों आहों. आम्ही सर्वजण बुभुक्षित व खिन्न होऊन तुझ्या समीप आलों आहों ह्याचें तरी कारण हेंच. आम्ही अतिथि असें समजून तूं आम्हांला दिलेलीं मुळें व फळें क्षुधेनें व्याकुळ झाल्यामुळें आम्हीं भक्षण केलीं. तस्मात्, क्षुधेनें आम्ही मृत्युपंथाला लागलों असतांना ज्या अर्थी तूं सर्व वानरांचें रक्षण केलें आहेस, त्या अर्थी ह्या उपकाराची फेड होण्याकरितां वानरांनीं तुझें काय काम करावें हें तूं सांग."

ह्याप्रमाणें, हनुमानाला पुढें करून त्या सर्व वानरांनीं तिला सांगितलें असतां, ती सर्वज्ञ स्वयंप्रभा त्या सर्व वानरसेनाधिपतींना म्हणाली, "सर्व बलाढ्य वानरांवर मी प्रसन्न झालें आहें. धर्मानें वागत असलेल्या मला कोणाच्याहि हातून कसलेंहि कार्य करून घेण्याचें उरलें नाहीं."

ऋक्षबिलांतून बाहेर येणें.

हें त्या तपस्विनीनें धर्माला अनुसरून असें शुभ भाषण हनुमानाशीं केलें असतां, मनोहर नेत्रांनीं युक्त असलेल्या त्या तपस्विनीला हनुमान म्हणाला, "आम्ही सर्व तुज धर्मचारिणीला शरण आलों आहों. महात्म्या सुग्रीवानें जी आम्हांला मुदत दिली होती, ती विवरामध्यें असतांनाच संपून गेली. ह्यास्तव तूं ह्या विवरांतून आम्हांला सुखरूप पार पाड. सुग्रीवाच्या आज्ञेबाहेर गेलेल्या आणि म्हणूनच आयुष्याचे दिवस भरलेल्या आम्हां सर्वांचें तूं रक्षण कर. सुग्रीवाची आम्हांला भीति बसून गेली आहे. हे धर्मचारिणी, आम्हांला मोठें कार्य कर्तव्य आहे, परंतु ह्या विवरामध्यें वास्तव्य झाल्यामुळें आमचे हातून तें कार्य झालें नाहीं."

ह्याप्रमाणें हनुमानानें प्रार्थना केली असतां ती तपस्विनी म्हणाली, "ह्या विवरामध्यें प्रविष्ठ झालेला प्राणी जिवंत बाहेर पडणें फार कठीण आहे, असें मला वाटतें. तथापि नियमांच्या योगानें संपादन केलेला जो तपाचा महाप्रभाव, त्याच्या योगानें मी तुम्हां सर्व वानरांना ह्या विवरांतून पार पाडून नेईन. हे वानरश्रेष्ठहो, तुम्ही सर्वजण डोळे मिटा. कारण डोळे मिटल्यावांचून ह्या विवरांतून पार पडणें शक्य नाहीं."

ह्याप्रमाणें तिनें सांगितल्यावर बाहेर जाण्याची उत्कंठा असल्यामुळें त्या सर्व वानरांनीं आनंदित होऊन डोळे मिटले, आणि हातांनीं ते भरभर गच्च

आवळूनहि धरिले. ह्याप्रमाणें त्या महात्म्या वानरांनीं डोळे झांकिले असतां, त्या तपस्विनी स्त्रीनें डोळ्याचें पातें लवलें नाहीं, तोंच त्या विवरांतून त्यांना पार पाडिलें. विवराच्या बाहेर आल्यावर ती धर्मचारिणी त्या भयंकर विवरांतून पार पडलेल्या त्या सर्व वानरांना धीर देऊन म्हणाली, "नानाप्रकारच्या वृक्षांनीं व लतांनीं सुशोभित व सौंदर्यानें युक्त असा हा विंध्य पर्वत आहे. हा प्रस्रवण पर्वत आहे, आणि विपुल उदकाचें भांडार असलेला हा सागर आहे. हे वानरश्रेष्ठहो, तुमचें कल्याण असो. मी आतां स्वस्थानीं परत जातें." असें म्हणून ती स्वयंप्रभा त्या भव्य विवरामध्यें प्रविष्ट झाली.

सर्ग त्रेपन्नावा.

वानरांच्या मनाचा खेद.

तदनंतर भयंकर लाटांनीं व्याप्त होऊन गर्जना करीत असलेला असा जो अपार व घोर वरुणनिवासस्थानरूप सागर, तो त्यांनीं अवलोकन केला. मयासुरानें मायेच्या योगानें निर्माण केलेलें तें ऋक्षबिळसंज्ञक पर्वतसंबंधीं गहन स्थान धुंडाळण्यामध्येंच राजा सुग्रीवानें नेमून दिलेला त्यांचा महिना निघून गेला. तेव्हां प्रफुल्लित वृक्षांनीं युक्त असलेल्या विंध्याद्रीच्या पायथ्याशीं बसून ते महात्मे चिंताक्रांत झाले. नंतर पुष्पांच्या अतिशय भारांनीं युक्त अशीं ज्यांचीं अग्रें झालीं आहेत, आणि शेंकडों लतांनीं जे व्याप्त झालेले आहेत, असे वसंत ऋतूच्या सुमाराला प्रफुल्लित होणारे वृक्ष अवलोकन केल्यावर तर ते भयभीत झाले; आणि वसंतसमय जवळ आला असें एकमेकाला सांगून, वेळेवर होण्याला योग्य असलेलें राजकार्य शेवटास न गेल्यामुळें ते भूतलावर निश्चेष्ट पडले. तेव्हां त्यांतील वृद्ध वानरांना आणि इतरांनाहि मधूर वाणीनें मानमान्यतापूर्वक हांक मारून सिंह अथवा वृषभ ह्यांच्या सारख्या स्कंधांनीं आणि पुष्ट व दीर्घ बाहूंनीं युक्त असलेला महाबुद्धिमान युवराज अंगद म्हणाला, "वानरराजाच्या आज्ञेवरून आपण सर्व बाहेर पडलों; परंतु आपण विवरामध्यें असतांनाच मुदतीचा महिना पूर्ण होऊन गेला, हें तुमच्या गांवीं देखील नाहीं कीं काय? आश्विन महिना संपल्यावर जी मुदत ठरवून आपण बाहेर पडलों, तीहि मुदत निघून गेली. ह्यास्तव आतां पुढें काय करावें? राजाची आज्ञा समजून घेऊन, नीतिमार्गामध्यें

निष्णात व स्वामीला हितावह असें कोणतेंहि कृत्य करण्याविषयीं दक्ष असलेल्या तुह्मांला राजानें पाठविलें, व चोहोंकडे पराक्रमासंबंधानें प्रख्यात आणि अप्रतिम कर्म करणारे असे तुह्मी सर्व सुग्रीवाच्या आज्ञेप्रमाणें मला पुढें घालून बाहेरहि निघालां; परंतु सांप्रत कार्यसिद्धि न झालेल्या आपणांला निःसंशय मरणेंच अवश्य आहे. कारण, वानरराजाच्या आज्ञेप्रमाणें न वागून कोणाला बरें सुख होणार आहे? सुग्रीवानें स्वतः ठरविलेली ही मुदत जर निघून गेली आहे, तर सर्व वानरांनीं अन्नपाणी न घेतां प्राणत्याग करणेंच योग्य आहे. सुग्रीव हा जातीचाच क्रूर आहे, व त्यांतूनहि तो सांप्रत राजा झालला आहे. ह्यास्तव अपराध करून आपण त्याच्या पुढें गेलों असतां, तो आपणांपैकीं कोणालाहि क्षमा करणार नाहीं. सीतेची बातमी न लागल्यामुळें तो आपला घातच करील. तस्मात् पुत्र, भार्या, द्रव्य आणि गृह ह्यांची आशा सोडून येथें आजच्या आजच प्राणत्यागाकरितां अन्नपाणी सोडून बसणें बरें. येथून आपण गेलों असतां राजा सुग्रीव अनुपम रीतीनें आपला निःसंशय वध करील. ह्यास्तव येथेंच मृत्यु येणें आपणांला श्रेयस्कर आहे. सुग्रीवानें मला यौवराज्याचा अभिषेकहि केला नाहीं. महापराक्रमी राम राजानें मला अभिषेक केला आहे. तस्मात्, पूर्वींपासून माझ्याशीं वैर बांधून असलेला सुग्रीव, आज्ञेचें उल्लंघन माझ्या हातून झालें आहे, असें अवलोकन करितांक्षणीं मनाचा पक्का निश्चय करून भयंकर शासनानें माझा घात करील. ह्यास्तव राजाज्ञेमुळें जीव जाण्याचा प्रसंग येऊन ठेपला असतां, माझें संकट अवलोकन करणाऱ्या सुहृदांशीं तरी मला काय कर्तव्य आहे? तस्मात्, येथेंच मी पवित्र अशा समुद्रतीरीं प्राणत्यागाकरितां अन्नपाणी सोडून बसतों."

हें युवराज अंगदाचें भाषण श्रवण केल्यावर ते सर्व वानरश्रेष्ठ करुणस्वरानें त्याला म्हणाले, "सुग्रीव जातीचाच उग्र असून राम आपल्या प्रियेविषयीं अनुरक्त आहे. ह्यास्तव, ती मुदत टळून गेली असूनहि सीतेचा पत्ता न लावितां परत गेलेल्या आपणांला अवलोकन करितांक्षणीं, आपल्या हातून कार्य झालें नाहीं, हें लक्ष्यांत आणून रामाचें प्रिय करण्याकरितां तो निःसंशय आपला वध करील. तस्मात्, हातून अपराध झालेल्यांनीं मालकाच्या सन्निध जाणें योग्य नव्हे; आणि त्यांतूनहि येथें आलेले आपण सुग्रीवाचे मुख्य सेवक पडलों. ह्यास्तव येथेंच सीतेला अवलोकन करून अथवा तिची बातमी तरी काढून आपण त्या वीराकडे जाऊं, आणि असें न झालें तर येथेंच यमसदनाच्या मार्गाला लागूं."

भयभीत झालेल्या त्या वानराचें हें भाषण श्रवण करून तार वानर म्हणाला, "आतां खेद करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तुम्हांला रुचत असेल, तर स्वयंप्रभेच्या विवरामध्यें जाऊन आपण वास्तव्य करूं. कारण मायेच्या योगानें निर्माण केलेल्या त्या विवरामध्यें पुष्पें, उदक आणि भोज्य पेय पदार्थ ह्यांची समृद्धि आहे, आणि त्या विवरामध्यें दुसऱ्याचा प्रवेश होणेंहि अत्यंत कठीण आहे. ह्याकरितां आपण त्या विवरांत राहिलों, म्हणजे आपणांला इंद्रापासून, रामापासून अथवा वानरराज सुग्रीवापासून मुळींच भय नाहीं."

ह्याप्रमाणें अंगदाचें व विशेषतः ताराचें अनुकूल भाषण श्रवण केल्यावर सर्व वानरांना कांहींसा धीर आला, आणि ते सर्व त्याला म्हणाले, "ज्या रीतीनें आपला वध न होईल, अशी कांहीं तरी आपणांसंबंधानें तजवीज विलंब न होतां आजच्या आजच होऊं द्या."

सर्ग चौपन्नावा.

हनुमंताचें भाषण.

चंद्राप्रमाणें तेजस्वी असलेला तार त्याप्रमाणें बोलूं लागला असतां अंगदाला राज्य प्राप्त झालें, अशी हनुमानाला खात्रीच वाटूं लागली. वालिपुत्र अंगद हा शुश्रूषा, श्रवण, ग्रहण, धारण, ऊह[1], अपोह[2], अर्थज्ञान आणि तत्त्वज्ञान ह्या आठ गुणांनीं युक्त असलेल्या बुद्धीनें; साम, दान, भेद व दंड ह्या चार उपायांनीं प्राप्त होणाऱ्या बलानें, आणि देशकालज्ञता, दार्ढ्य, सर्वक्लेशसहिष्णुता, सर्वज्ञता, दक्षता, बल, गुप्त मसलत, मागल्या पुढल्या स्वतःच्या वर्तनाचा मेळ, शौर्य, भक्तिज्ञत्व, कृतज्ञता, शरण आलेल्यांविषयीं दया, क्रोधराहित्य व स्थैर्य ह्या चौदा गुणांनीं युक्त आहे, असें हनुमानाला वाटलें. नंतर शुक्लपक्षाचे आरंभीं शोभेनें वृद्धिंगत होणाऱ्या चंद्राप्रमाणें तेज, बल व पराक्रम ह्यांच्या योगानें एकसारखा जो वृद्धिंगत होत आहे, बुद्धीनें बृहस्पतीची बरोबरी करणारा असून पराक्रमामध्यें जो पित्याची बरोबरी करणारा आहे, बृहस्पतीची शुश्रूषा करणाऱ्या इंद्राप्रमाणें जो ताराची शुश्रूषा करीत आहे, आणि स्वामी-

१ तर्क करणें, तर्कप्रबंध. २ निषेध करणें. ('ऊह' आणि 'अपोह' हेच शब्द मिळून 'ऊहापोह' हा शब्द झाला आहे, व त्याचा अर्थ—साधकबाधक प्रमाणांनीं एखाद्या गोष्टीचा विचार करणें—असा आहे.)

कार्याकरितां जो सर्व प्रकारें श्रांत झाला आहे, अशा त्या अंगदाला हनुमानानें तारप्रभृतींपासून वेगळा काढण्याचा उपक्रम केला. प्रथमतः साम, दान, भेद व दंड ह्या चार उपायांपैकीं भेदाची प्रशंसा करण्याकरितां त्या हनुमानानें आपल्या भाषणाच्या जोरावर त्या सर्व वानरांना विचारदृष्ट्या अंगदापासून फोडिलें. आणि ह्याप्रमाणें त्या सर्वांचें मत अंगदाहून भिन्न केल्यावर, चौथा उपाय जो दंड त्यानें युक्त अशा नानाप्रकारच्या भीतिजनक वाक्यांनीं अंगदाला तो भय उत्पन्न करूं लागला. तो म्हणाला, "हे तारापुत्रा अंगदा, तूं पित्याची बरोबरी करणारा असल्यामुळें युद्धामध्यें सुग्रीवापेक्षां निःसंशय जास्त आहेस; आणि म्हणूनच सर्व वानर जर तुझ्या अनुरोधानें वागूं लागतील, तर पित्याप्रमाणें वानरांचें राज्य चांगल्या रीतीनें चालविण्यास तूं समर्थ आहेस. परंतु हे वानरश्रेष्ठा, तूं स्वयंप्रभेच्या विवरांत राहूं लागलास, तर बायकामुलांचा अवश्य वियोग होणार असल्यामुळें नेहमीं अस्थिर मनाचे असलेले वानर तुझी आज्ञा मान्य करणार नाहींत. सारांश, बायकामुलांना सोडून हे तुझ्या मर्जीप्रमाणें वागण्यास तयार होणार नाहींत, हें मी तुला हवें तर अगदीं प्रत्यक्ष स्पष्ट करून सांगतों. उदाहरणार्थः—हा जांबवान, नील, महाकपि सुहोत्र व मी ह्या सर्वांना साम, दान, भेद आणि दंड ह्यांपैकीं कोणत्याहि उपायानें सुग्रीवापासून परावृत्त करण्यास तूं समर्थ नाहींस. दुर्बलाशीं वाद उपस्थित करून बलाढ्य पुरुषानें राहाणें शक्य आहे. परंतु बलाढ्याशीं स्पर्धा करून दुर्बलाला राहातां येणें शक्य नाहीं, असें म्हणतात. ह्यास्तव स्वतःच्या रक्षणाची इच्छा असणाऱ्या दुर्बल पुरुषानें बलाढ्याशीं स्पर्धा करूं नये. ह्या गुहेमध्यें रक्षण होईल, असें जें तुझें म्हणणें आहे, तेंहि बरोबर नाहीं. कारण जें हें ऋक्षबिळ निर्भय म्हणून तार वानरापासून ऐकिलें आहेस, त्याचें विदारण करणें हें कार्य लक्ष्मणाच्या बाणासंबंधानें पाहूं गेलें असतां अगदीं क्षुल्लक आहे. पूर्वीं इंद्रानें वज्र फेंकून त्या विवरामध्यें मयासुराचा वध केला, त्यांत कांहींच नाहीं. लक्ष्मण आपल्या तीक्ष्ण बाणांच्या योगानें हें विवरच पानाच्या द्रोणासारखें फोडून टाकील. इंद्राच्या वज्रासारखें अथवा मेघांतील विद्युल्लतेसारखे तीक्ष्ण व पर्वताचाहि भेद करणारे नाराच बाण लक्ष्मणापाशीं पुष्कळ आहेत. तस्मात्, हे शत्रुतापना, ज्या वेळेला तूं विवरामध्यें राहूं लागशील, त्याच वेळेला सर्व वानर पक्का निश्चय करून तुला सोडून जातील. बायकामुलांचा वियोग होऊन दुःखामध्यें रात्रीच्या रात्री काढण्याचा प्रसंग आला म्हणजे ते त्रासून जातील.

नेहमीं उद्विग्न झालेल्या त्या वानरांना बायकामुलांचें स्मरण झालें असतां, ते उत्सुक होऊन तुझा त्याग करतीलच. ह्याप्रमाणें सुहृद् व हित इच्छिणारे तुझे बंधु ह्यांचा तुला वियोग झाला, म्हणजे जरा कोठें काडी हालली तरी सुद्धां राम आला कीं काय अशी शंका घेऊन तूं फारच भयभीत होशील. अत्यंत उग्र वेगानें व प्रचंड सामर्थ्यानें युक्त, आणि सहन होण्यास अत्यंत अशक्य असे लक्ष्मणाचे घोर व तीक्ष्ण बाण रामकार्यापासून परावृत्त झालेल्या तुझा वध करतील; परंतु आम्हांबरोबर येऊन जर तूं नम्रपणानें सुग्रीवापाशीं उभा राहिलास, तर तुला तो रीतीप्रमाणें राज्यावर बसवील. तुझा चुलता तुझ्याशीं प्रेमानें वागण्याची इच्छा धरणारा आहे, स्वीकारिलेलें व्रत नेटानें चालविणारा आहे, आचरणानें शुद्ध आहे, प्रतिज्ञा खरी करणारा आहे आणि धर्मानें चालणारा राजा आहे. तो तुझा घात कधींहि करणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर तुझ्या मातेच्या मर्जीप्रमाणें वागणारा असून त्याचें जीवितहि तिची प्रीति संपादन करण्याकरितांच आहे. शिवाय त्याला स्वतःला दुसरें अपत्यहि नाहीं. तस्मात् अंगदा, तूं आमच्याबरोबर तिकडे चल."

सर्ग पंचावन्नावा.

वानरांचें प्रायोपवेशन.

विनय, धर्म आणि राजाविषयीं आदरबुद्धि ह्यांनीं युक्त असें हनुमानाचें भाषण श्रवण करून अंगद म्हणाला, "स्थैर्य, स्वतःच्या मनाची शुद्धता, सज्जनता, सरळपणा, पराक्रम आणि धैर्य हीं सुग्रीवाचे ठिकाणीं असण्याचा संभवच नाहीं. अहो, ज्येष्ठ भ्रात्याची प्रिय भार्या जी पट्टराणी, ती धर्मानें माता असूनहि जो पापी तो जिवंत असतांनाच[1] ती स्वीकारितो, तो धर्माची पर्वा कोठून करणार? युद्धाकरितां बिळामध्यें प्रवेश करणाऱ्या भ्रात्यानें बिळाच्या रक्षणार्थ नेमिलें असतांना ज्या दुष्टानें त्या विवराचें तोंड बंद केलें,

१ दैत्याचा वध करण्याकरितां वाली गुहेंत गेला असतां, त्याची वाट पाहून कंटाळलेला सुग्रीव तें बिळद्वार बंद करून किष्किंधेंत आला. तेव्हां मंत्र्यांनीं त्याला आग्रहानें राज्यावर बसविलें असतां, रुमा व तारा यांचा तो उपभोग घेऊं लागला. त्या वेळच्या आचरणाला उद्देशून हें भाषण आहे. मागें सर्ग शेहेचाळीसमधील सुग्रीवाचें भूमंडलपर्यटनवृत्त, या सदरांतील सुग्रीवाचें भाषण पहा.

इतकेंच नव्हे—पण हातावर हात मारून प्रतिज्ञापूर्वक ज्यानें ह्याला मित्र म्हटलें—व ज्यानें ह्याचें कार्य केलें, त्या महाकीर्तिमान राघवालाच जो विसरला, तो कोणाचा उपकार स्मरणार आहे? अधर्माचें भय यत्किंचित्‌हि न बाळगितां केवळ लक्ष्मणाच्या भीतीनेंच ज्यानें ह्या भूतलावर सीतेचा शोध लावण्याविषयीं आम्हांला आज्ञा केली, त्याचे ठिकाणीं धर्म असणार कसा? पापी, कृतघ्न, उपकाराचें स्मरणहि नसलेला आणि चंचल अशा त्या सुग्रीवावर कोण सज्जन पुरुष—आणि विशेषतः त्याच्या कुळांतील पुरुष—कधीं विश्वास ठेवण्यास तयार होणार आहे? सुग्रीव सद्‌गुणी असो अथवा दुर्गुणी असो, तो कसाहि असला तरी शत्रुकुलामध्यें उत्पन्न झालेल्या मला पुत्र म्हणून राज्यावर बसवून तो कधींहि जगविणार नाहीं. बिळामध्यें प्रवेश करण्यांत जर मीं त्याच्या आज्ञेचा भंग केला आहे, आणि म्हणूनच जर मीं त्याचा अपराधी बनलों आहें, आणि हनुमानाच्या सांगण्याप्रमाणें सुग्रीवापेक्षां ज्याला वानरांचें साहाय्यहि अगदीं कमी मिळणारें आहे, असा मी अनाथ व दुर्बल किष्किंधा नगरीमध्यें गेलों असतां जगणार कसा? सारांश, सुग्रीव हा शठ, क्रूर आणि दुष्ट असल्यामुळें राज्याकरितां बंधनरूप गुपचूप दंडानें माझी व्यवस्था लावून टाकील. तस्मात्, बंधनापासून जें मला दुःख होणार, त्यापेक्षां अन्नपाणी सोडून देऊन येथें प्राणत्याग करणें फार चांगलें. ह्यास्तव, मला तसें करण्याची अनुज्ञा देऊन तुम्ही सर्व आपापल्या घरीं जा. मी तुम्हांला प्रतिज्ञेनें सांगतों कीं, मी किष्किंधा नगरीला परत जाणार नाहीं. मी येथेंच उपवास करीत बसणार. कारण, मरणच मला श्रेयस्कर आहे. तुम्ही अभिवंदनपूर्वक राजाला माझें कुशल वर्तमान सांगा, आणि बलाढ्य रामलक्ष्मणांनाहि अभिवंदनपूर्वक तसेंच कळवा. माझा धाकटा चुलता जो वानराधिपति सुग्रीव, त्याला तर विशेषतः आरोग्यपूर्वक माझें कुशल वर्तमान कळवून, मला मातेसमान असलेली जी रुमा तिलाहि तुम्ही तसेंच कळवा; आणि माझी माता जी तारा तिचेंहि तुम्ही सांत्वन करा. कारण, स्वभावतःच तिला मी प्रिय पुत्र असून ती बिचारी दयाळु असल्यामुळें माझा येथें नाश झाल्याचें ऐकतांक्षणीं निःसंशय जीविताचा त्याग करील."

इतकें बोलून, आणि त्या वृद्ध कपींना अभिवंदन करून दुर्मुखलेला अंगद दर्भांमध्यें शिरून भूमीवर पडला. ह्याप्रमाणें तो तेथें पडला असतां श्रेष्ठ श्रेष्ठ वानर रडूं लागले, आणि दुःखित होऊन नेत्रांतून अश्रु ढाळूं लागले. सारांश, सर्व वानर सुग्रीवाची निंदा सुरू करून वालीची प्रशंसा करूं लागले, आणि

अंगदाभोंवतीं जमून सर्वांनीं प्रायोपवेशनाविषयीं निश्चय केला. तात्पर्य, वालि-पुत्र अंगदाचें तें भाषण श्रवण करितांक्षणीं त्या सर्वांनीं स्नान केलें, आणि ते पूर्वेकडे तोंड करून बसले. दक्षिणेकडे अग्रें करून पसरिलेल्या दर्भांवर उत्तर तीराचें अवलंबन करून व मरणाचा निश्चय करून बसलेले ते वानर 'हें अंगदाचें म्हणणें योग्य आहे' असें म्हणूं लागले; आणि रामाचा वनवास, दशरथाचा मृत्यु, जनस्थानांतील राक्षसांचा वध, जटायूचा वध, सीतेचा अपहार, वालीचा वध आणि रामाचा कोप ह्यासंबंधानें गोष्टी चालतां चालतां वानरांना दुसरेंच एक भय प्राप्त झालें.

असो; मोठमोठे व पर्वतशिखरांप्रमाणें धिप्पाड असलेले ते असंख्य वानर तेथें बसून अतिशय गर्जना करूं लागले असतां, मेघांच्या योगानें नादित होणाऱ्या आकाशाप्रमाणें त्या पर्वतावरील जलप्रवाहाचीं तीरें नादित होऊं लागलीं.

सर्ग छपन्नावा.

संपातीची भेट.

ज्या पर्वतप्रदेशावर ते सर्व वानर प्रायोपवेशन करण्याकरितां बसले होते, तिकडे गृध्रराज येऊं लागला. तो संपाति ह्या नांवाचा एक चिरंजीवी पक्षी असून जटायूचा भ्राता होता. तो उदार असून बल व पराक्रम ह्यांसंबंधानें प्रख्यात होता. विंध्य नामक महापर्वताच्या गुहेंतून निघाल्यानंतर बाहेरच्या बाजूला बसलेल्या वानरांना अवलोकन करितांक्षणीं आनंदित होऊन तो म्हणाला, "खरोखर ह्या जगतामध्यें कर्माचें फल पुरुषाला प्राक्तनानुसार येत असतें, असें जे म्हणतात, तें अगदीं खरें आहे. कारण प्राक्तनानें ठरलेलें हें भक्ष्य आज मला पुष्कळ दिवसांनीं आपोआप प्राप्त झालें आहे. प्रायोपवेशना-करितां ओळीनें बसलेल्या ह्या वानरांमध्यें जो जो मरेल, तो तो मी भक्षण करून टाकीन."

ह्याप्रमाणें तो संपाती त्या वानरांना अवलोकन करून आपल्याशीं बोलूं लागला असतां, त्या भक्ष्यलुब्ध पक्ष्याचें तें भाषण श्रवण करून अंगद अति-शय खिन्न झाला, आणि हनुमानाला म्हणाला, "पहा–गृध्ररूपानें हा प्रत्यक्ष यमच वानरांच्या नाशाकरितां येथें प्राप्त झाला आहे. रामाचेंहि कार्य आपल्या

हातून झालें नाहीं, आणि राजा सुग्रीवाची आज्ञाहि आपल्या हातून शेवटास गेली नाहीं. अशा प्रकारें कोणतीहि गोष्ट सिद्धीस न जातां वानरांच्या कधीं मनांतहि नसलेली ही विपत्ति एकाएकीं प्राप्त झाली आहे. असो. विदेहराजकन्या सीतेचें प्रिय करण्याची इच्छा धरून गृध्रराज जटायूनें जें कर्म तिकडे मार्गामध्यें केलें, तें सर्व तुम्हीं ऐकिलेंच आहे. सारांश, आपल्याप्रमाणेंच सर्व तिर्यग्योनींतील प्राणीसुद्धां प्राणत्याग करून रामाचें प्रिय करीत असतात. प्रेम आणि दया ह्यांनीं व्याप्त झालेले प्राणी एकमेकांवर उपकार करीत असतात. ह्यास्तव त्या रामावर उपकार करण्याकरितां ज्या अर्थी आपण प्रवृत्त झालों आहों, त्या अर्थीं आतां मनापासून जिवाची आशा सोडा. पूर्वीं गृध्रराज जटायूनें जर रामावर उपकार करण्याकरितां आपले प्राण खर्चीं घालण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं, तर ह्या प्रसंगीं आपणांला ह्या पक्ष्याच्या हातून मरण येत आहे, हेंहि योग्यच आहे. धर्मवेत्त्या जटायूनें प्राणत्याग करून रामाचें प्रिय केलें, आणि आपणहि त्या रामाकरितां सर्वस्वीं थकून जाऊन प्राणत्याग करण्यास उद्युक्त झालों आहों. आपण अरण्यें हिंडलों, परंतु मिथिलराजकन्या सीता आपल्या दृष्टीस पडली नाहीं. तेव्हां सीतेला अवलोकन करून संग्रामामध्यें रावणाच्या हातून वध पावलेला तो गृध्रराज जटायु सुखी खरा. कारण तो सुग्रीवाच्या भयांतून मुक्त होऊन रामाच्या अनुग्रहानें उत्तम गतीला तरी गेला असेल. जटायूला व त्याचप्रमाणें दशरथ राजाला मृत्यु आल्यामुळें, आणि वैदेहीचा अपहार झाल्यामुळें वानरांवर आज संकट आलें आहे. ह्यांपैकीं एखादी गोष्ट जर न होती, तर आपणांवर हें संकट येण्याचें कारणच नव्हतें. सीतेसहवर्तमान राम-लक्ष्मणाचे अरण्यामध्यें वास्तव्य, त्याचप्रमाणें रामाच्या बाणानें वालीचा वध, आणि तसाच रामाच्या कोपामुळें सर्व राक्षसांचा वध हा सर्व अनर्थ कैकेयीला दशरथ राजानें वर दिल्यामुळें झाला आहे."

अंगदानें केलेलें हें दुःखदायक भाषण श्रवण करून आणि भूमीवर पडलेले ते वानर अवलोकन करून महाबुद्धिमान गृध्रराज संपाती मनामध्यें एकदम चकित झाला आणि दीन वाणीनें बोलूं लागला, "माझें मन कंपित करीत करीत, प्राणापेक्षांहि प्रिय असलेल्या त्या माझ्या भ्रात्या जटायूच्या वधाची वार्ता कोण बरें कथन करीत आहे ? अरे, जनस्थानामध्यें राक्षस रावण आणि गृध्र जटायु ह्याचें युद्ध झालें तरी कसें ? आज बऱ्याच दिवसांनीं हें भ्रात्याचें नांव माझ्या कानीं आलें आहे.

पर्वतावरील ह्या दुर्गम प्रदेशापासून तुम्हीं मला खालीं उतरावें, अशी माझी इच्छा आहे. गुणग्राहि व पराक्रमामुळें प्रशंसेस पात्र असा जो माझा भ्राता, त्याचा वृत्तांत पुष्कळ दिवसांनीं ऐकावयाला सांपडल्यामुळें मी संतुष्ट झालों आहें. तस्मात् हे वानरश्रेष्ठहो, त्या जनस्थानवासी भ्रात्या जटायूचा नाश कसा झाला, हें ऐकण्याची माझी इच्छा आहे. व त्याचप्रमाणें गुरुजनांना प्रिय असलेला श्रेष्ठ राम ज्याचा प्रिय पुत्र, तो दशरथ त्या माझ्या भ्रात्याचा सखा कसा, हेंहि समजून घेण्याची माझी मनीषा आहे. वानरहो, सूर्यकिरणांनीं माझे पंख दग्ध होऊन गेले असल्यामुळें मला उड्डाण करितां येत नाहीं. ह्यास्तव, ह्या पर्वतापासून तुम्हीं मला खालीं उतरावें, अशी माझी इच्छा आहे."

सर्ग सत्तावन्नावा.

अंगदाचें संपातीशीं भाषण.

शोकाच्या योगानें त्या गृध्रराज संपातीचा शब्द जरी खोल गेला होता, तरी आयास न पडतां वानरमांस भक्षण करितां यावें एतदर्थ हा शोकाकुल झाल्याचें कांहीं ढोंग करीत आहे, अशी शंका येऊन वानरसेनाधिपतीचा त्याच्या भाषणावर विश्वास बसेना. प्रायोपवेशनानें प्राणत्यागाचा निश्चय करून ते वानर बसले असतांना गृध्र दृष्टीस पडतांक्षणीं, 'हा आम्हां सर्वांना भक्षण करून टाकील' असा भयंकर विचार त्यांच्या मनामध्यें आला. तथापि 'प्रायोपवेशनाचा निश्चय करून बसलेल्या आह्मांला जर हा भक्षण करून टाकील, तर आमचा मनोरथ लवकरच सिद्धीस जाणार असल्यामुळें आह्मी सर्वस्वी कृतकृत्य होऊं' असा विचार त्यांनीं मनामध्यें आणिला, आणि पर्वताच्या शिखरापासून त्या गृध्राला खालीं उतरवून अंगद म्हणाला, "हे पक्ष्या, ऋक्षराज म्हणून एक प्रतापी वानराधिपति राजा माझा आजा होता. सुग्रीव आणि वाली हे त्याचे दोन महाबलाढ्य पुत्र होत. माझा पिता वाली पराक्रमानें जगतामध्यें प्रख्यात असा वानरांचा राजा होऊन गेला. पित्याची आज्ञा पाळण्याविषयीं तत्पर असून, धर्ममार्गाचें अवलंबन करणारा जो संपूर्ण जगताचा व इक्ष्वाकुवंशाचा राजा दशरथपुत्र वैभवशाली राम, तो, भ्राता लक्ष्मण आणि भार्या वैदेही ह्यांसहवर्तमान दंडकारण्यामध्यें प्रविष्ट झाला असतां रावणानें त्याची भार्या जनस्थानापासून बलात्कारानें हरण करून

नेली. विदेहराजकन्या सीतेला रावण आकाशमार्गानें घेऊन जात आहे, असें रामाच्या पित्याचा मित्र जो गृध्रराज जटायु, त्यानें अवलोकन केलें. तेव्हां रावणाला विरथ करून त्या गृध्रराजानें मैथिलीलाहि भूमीवर ठेवविलें; परंतु युद्ध करितां करितां श्रांत झाल्यामुळें त्या वृद्धाचा संग्रामामध्यें रावणानें वध केला. ह्याप्रमाणें त्या बलाढ्य रावणानें गृध्राचा वध केला असतां, रामानें त्याचा और्ध्वदेहिक संस्कारहि केला, व त्यामुळें तो गृध्र उत्तम गतीला गेला. तदनंतर माझ्या सुग्रीव नामक पितृव्यानें रामाशीं सख्य केलें असतां, माझ्या पित्यानें सचिवांसहवर्तमान सुग्रीवाला राज्यांत येण्याची बंदी केली होती. ह्यामुळें रामानें त्याचा वध करून सुग्रीवाला राज्याभिषेक केला. ह्याप्रमाणें सुग्रीवाला सर्व वानरश्रेष्ठांचा राजा बनविल्यावर त्यानें आम्हांला सीतेचा शोध लावण्याकरितां बाहेर पाठविलें. ह्याप्रमाणें रामाची आज्ञा आम्हांला झाली असतां, आम्ही ठिकठिकाणीं विदेहराजकन्या सीतेचा शोध करूं लागलों; परंतु रात्रीं ज्याप्रमाणें कितीहि शोध केला असतां सूर्याची प्रभा सांपडत नाहीं, त्याचप्रमाणें विदेहराजकन्या सीतेचा आम्हांला शोध लागत नाहीं. प्रथमत: मोठ्या दक्षतेनें राहून आम्हीं दंडकारण्य शोधिलें, आणि गैरमाहितीमुळें आम्ही पृथ्वीच्या एका आच्छादित असलेल्या विवरामध्यें प्रविष्ठ झालों. मायेच्या योगानें निर्माण केलेलें तें मयासुराचें विवर होतें; आणि तें शोधितां शोधितांच राजानें आम्हांला दिलेली महिन्याची मुदत तेथें संपून गेली. तात्पर्य, वानरराज सुग्रीवाच्या वचनाप्रमाणें वागणाऱ्या आमच्या हातून त्यानें केलेली मुदत टळून गेल्या कारणानें, आम्ही सर्व त्याच्या भीतीमुळें प्रायोपवेशन करण्याचा निश्चय करून येथें बसलों आहों. कारण, तो सुग्रीव आणि लक्ष्मणासहवर्तमान ककुत्स्थकुलोत्पन्न राम मुदत टळल्यामुळें क्रुद्ध झाले असतां, तेथें जरी आम्ही गेलों, तरी आमच्यापैकीं कोणीहि जिवंत राहाणार नाहीं."

सर्ग अट्ठावन्नावा.

संपातीचें भाषण.

ह्याप्रमाणें जीविताची आशा सोडून वानरांनीं दीन वाणीनें भाषण केलें असतां, प्रचंड स्वरानें युक्त असलेला तो गृध्र डोळ्यांत अश्रु आणून म्हणाला, "वानरहो, बलाढ्य रावणानें युद्धामध्यें ज्याचा वध केला म्हणून तुम्ही सांगत

आहां, तो जटायु माझा कनिष्ठ भ्राता होय. मी वृद्ध व पक्षहीन झालों असल्यामुळें हें दुःसह वृत्त कानावर येत असूनहि मला तें सहन करणें भाग पडत आहे. कारण, भ्रात्याच्या वैराची फेड करण्याला आज माझी शक्ति नाहीं. पूर्वी वृत्रासुराचा इंद्रानें वध केला असतां, आम्ही उभयतां त्याला जिंकण्याची इच्छा धरून किरणसमुदायांनीं युक्त असलेल्या सूर्याचे समीप गेलों. आकाशमार्गानें वेगावेगानें आम्ही वर जाऊन इंद्राला अगदीं घेरून टाकिलें; परंतु उड्डाण करितां करितां सूर्य मध्यान्हीं आल्यामुळें जटायूचा धीर सुटूं लागला. तेव्हां सूर्यकिरणांनीं दग्ध होऊन जाण्याची पाळी आल्यामुळें अत्यंत विव्हल झालेल्या त्या भ्रात्याला अवलोकन करून मीं आपल्या पंखांनीं त्याच्यावर छाया केली. ह्यामुळें माझे पंख जळून जाऊन मीं विंध्यपर्वतावर पडलों. तेव्हांपासून मी ह्या पर्वतावर वास्तव्य करीत आहें, आणि तेव्हांपासून माझ्या जटायू भ्रात्याची हकीकत कांहींएक मला समजली नाहीं."

ह्याप्रमाणें संपातीनें सांगितलें असतां महाबुद्धिमान युवराज अंगद त्याला म्हणाला, " तूं जर जटायूचा भ्राता आहेस, तर मीं जें कांहीं बोललों, हें तूं ऐकिलेंच आहेस. तेव्हां त्या राक्षसाचें वसतिस्थान तुला विदित असेल, तर तूं आम्हांला सांग. अदूरदर्शी राक्षसाधम रावण जवळ अथवा दूर असल्याचें जर तूं जाणीत असशील, तर आम्हांला सांग."

तो जटायूचा महातेजस्वी ज्येष्ठ भ्राता अंगदाचें हें भाषण श्रवण करून, वानरांना आनंदित करीत करीत स्वतःला योग्य असें भाषण त्यांच्याशीं करूं लागला. तो म्हणाला, "वानरहो, माझे पंख जळून गेल्या कारणानें मी आतां वीर्यहीन झालों आहें; तथापि वाणीनेंहि मी रामाला उत्कृष्ट साहाय्य करीन. वारुणलोक, विष्णूनें त्रिविक्रमावतारीं व्याप्त केलेले पृथ्वीप्रभृति लोक, देवदैत्यांचीं युद्धें आणि अमृताकरितां झालेलें समुद्रमंथन हें सर्व मी जाणीत आहें. रामाचें जर हें कार्य असेल, तर तें मी प्रथमच करणें अवश्य आहे; परंतु जरेच्या योगानें माझें तेज नाहींसें झालें असून सांप्रत माझे प्राणहि व्याकुल झाले आहेत. सर्व अलंकारांनीं भूषित व सौंदर्यसंपन्न अशी एक तरुण स्त्री दुरात्मा रावण घेऊन जात असतांना मीं पाहिली आहे. ती स्त्री 'रामा, रामा, लक्ष्मणा' असा आक्रोश करीत होती, आणि सुटण्याकरितां तडफड करीत असून आपल्या शरीरावरील भूषणें खालीं टाकीत होती. पर्वताच्या शिखरावर ज्याप्रमाणें सूर्याची प्रभा दिसत असते, अथवा आकाशामध्यें मेघपटलाचे ठिकाणीं ज्याप्रमाणें विद्युल्लता झळकत असते,

त्याप्रमाणें त्या उत्कृष्ट राक्षसाचे ठिकाणीं तिची पिंवळी पैठणी झळकत होती. रामनामाचा उच्चार तिच्या मुखांतून चालला असल्यामुळें तीच जनककन्या असावी, असें मला वाटतें. असो. आतां त्या राक्षसाचें वसतिस्थान मी सांगतों, तें श्रवण करा. विश्रवस् मुनींचा प्रत्यक्ष पुत्र आणि कुबेराचा भ्राता रावण नामक राक्षस लंका नगरीमध्यें रहात आहे. येथून तब्बल शंभर योजनांवर समुद्रांतील बेटामध्यें विश्वकर्म्यानें निर्माण केलेली ती लंका नामक रम्य नगरी आहे. सुवर्णाचीं द्वारें, आणि सुवर्णाच्या जोत्यांनीं युक्त असलेले मोठमोठे सुवर्णाचे अद्भुत वाडे ह्यांच्या योगानें तिला चांगली शोभा आणिलेली आहे; आणि सूर्यासारख्या तेजस्वी प्रचंड कोटांनीं ती युक्त आहे. त्या लंकेमध्यें पैठणी नेसलेली विदेहराजकन्या सीता दीन होऊन वास्तव्य करीत आहे. रावणाच्या अंत:पुरामध्यें तिला अडकवून ठेविली असून राक्षसींनीं तिचे चांगल्या प्रकारें रक्षण केलें आहे. तस्मात्, राजा जनकाची कन्या जी मैथिली, ती त्या लंका नगरीमध्यें तुमच्या दृष्टीस पडेल. ज्ञानाच्याच योगानें मी तिला अवलोकन करीत आहें, व तुम्हीहि तिला पाहून परत या. असो; आकाशामध्यें, चिमण्या व इतरहि जे कांहीं धान्यावर उपजीविका करणारे पक्षी आहेत, ते पहिल्या मार्गांत संचार करीत असतात; कावळे आणि वृक्षांच्या फलांवर उपजीविका करणारे पक्षी दुसऱ्या मार्गामध्यें हिंडत असतात; क्रौंच, कुरर आणि भास हे पक्षी तिसऱ्या मार्गामध्यें उड्डाण करीत असतात; श्येन पक्षी चौथ्या मार्गाचें अवलंबन करीत असतात; गृध्र पक्षी पांचव्या मार्गामध्यें गमन करीत कसतात; बल, वीर्य, रूप आणि यौवन ह्यांनीं संपन्न असलेल्या हंसांचा सहावा मार्ग होय; विनतापुत्र गरुडाची गति त्यांच्याहिपेक्षां पलीकडे आहे; आणि वानरश्रेष्ठहो, विनतापुत्र अरुणापासूनच आम्हां सर्वांची उत्पत्ति झाली आहे. असो. ज्या रावणानें हें निंद्य कर्म करून माझ्या भ्रात्याचा वध केला, त्या राक्षसाचा भ्रात्याकरितां मी आपला सूड तुमच्या द्वारानें लवकरच उगवून घेईन. मला येथून रावण व जनककन्या सीता दिसत आहे. आम्हांला चक्षुष्मती विद्येनें प्राप्त होणारें दिव्य दृष्टिसामर्थ्य आहे, आणि त्यामुळें आहाराच्या सामर्थ्यानें व जातिधर्मानें आम्हांला नेहमीं शंभर योजनापेक्षांहि लांबची वस्तु दृष्टीस पडत असते. जातिधर्मानेंच आमची उपजीविका लांब दिसणाऱ्या भक्ष्यावर ठरलेली आहे, आणि कुक्कुटादिकांची उपजीविका वसतिस्थानभूत वृक्षांचे समीपच विधात्यानें ठरवून टाकिलेली आहे. असो. क्षारजलानें युक्त असलेल्या समुद्राच्या उल्लंघनाविषयीं कांहीं

उपाय शोधून काढा, आणि सीतेची भेट झाल्यावर कृतकृत्य होऊन तुम्ही परत चालते व्हा. तुम्हीं मला वरुणालय समुद्राकडे घेऊन जावें, अशी माझी इच्छा आहे. कारण स्वर्गाला गेलेल्या महात्म्या भ्रात्याला उद्देशून तर्पण करण्याचा माझा विचार आहे."

ह्याप्रमाणें संपातीनें सांगितलें असतां, त्या महाबलाढ्य वानरांनीं पंख जळून गेलेल्या त्या संपातीला समुद्रतीरीं त्यानें सांगितलेल्या प्रदेशावर नेऊन ठेविलें, आणि सीतेची बातमी लागल्यामुळें ते वानर आनंदित झाले.

सर्ग एकुणसाठावा.

सीताहरणवृत्तकथन.

तदनंतर अमृताप्रमाणें मधुर असलेलें तें गृध्रराचाचें भाषण श्रवण करून ते वानरश्रेष्ठ आनंदित झाले, आणि तेच बोलूं लागले. वानरश्रेष्ठ जांबवान इतर सर्व वानरांसहवर्तमान भूतलावर एकदम उडी मारून गृधराज संपातीला म्हणाला, "सीता कोठें आहे, तिला कोणीं पाहिलें आहे, व तिला कोण हरण करून नेत आहे, हें सर्व तूं आम्हांला सांग आणि आम्हां वानरांना जीवदान दे. अरे, वज्राप्रमाणें वेगावेगानें पडणाऱ्या दशरथपुत्र रामाच्या बाणांचे आणि त्याचप्रमाणें स्वतः लक्ष्मणानें सोडिलेल्या बाणांचें सामर्थ्य कोण बरें लक्ष्यांत आणीत नाहीं ?"

ह्यानंतर प्रायोपवेशनाचा बेत रहित केलेल्या आणि सीतेची वार्ता कानीं पडल्यामुळें मनामध्यें स्वस्थ झालेल्या वानरांना पुनरपि धीर देण्याकरितां तो गृध्रराज संतुष्ट होऊन म्हणाला, "विदेहराजकन्या सीता रावणानें हरण करून नेण्याचें मीं कसें ऐकिलें, मला तें कोणीं सांगितलें, आणि दीर्घ नेत्रांनीं युक्त असलेली ती सीता कोठें आहे, हें तुम्ही श्रवण करा. अनेक योजनें लांब असलेल्या ह्या दुर्गम पर्वतावर शक्तीचा व पराक्रमाचा ऱ्हास होऊन मी वृद्ध पडल्याला पुष्कळ दिवस झाले. ह्याप्रमाणें अवस्था मला प्राप्त झाली असतांना सुपार्श्व म्हणून प्रसिद्ध असलेला एक श्रेष्ठ पक्षी वेळोवेळीं आहाराच्या योगानें माझें पोषण करीत असे. गंधर्वाची कामवासना, सर्पांचा कोप आणि मृगांचें भय ज्याप्रमाणें तीक्ष्ण असतें, त्याचप्रमाणें आम्हां गृध्र पक्ष्यांची क्षुधा तीक्ष्ण

असते. एकदां क्षुधेनें व्याकुल होऊन मी आहाराची वाट पाहात असतां, सूर्योदयसमयीं भक्ष्य आणण्याकरितां गेलेला तो माझा पुत्र सायंकाळीं मांस न आणितां रिकाम्या हातींच परत आला. तेव्हां भक्ष्य न मिळाल्यामुळें मीं त्याला बोलून बोलून बरेंच दुःख दिलें. त्या वेळीं तो आनंदवर्धक माझी क्षमा मागून खरें खरें माझ्याशीं बोलूं लागला. तो म्हणाला, " संपाते, मांसाकरितां मी वेळेवर आकाशामध्यें उड्डाण केलें होतें, आणि महेंद्र पर्वताचें दार रोखून मी स्वस्थ राहिलों होतों. सागरासमीप संचार करणाऱ्या हजारों प्राण्यांचा मार्ग रोखण्याचा निश्चय करून मी एकटा अधोमुख होऊन बसलों होतों. इतक्यांत उदयकालच्या सूर्याप्रमाणें जिची प्रभा आहे, अशी एक स्त्री घेऊन कज्जलपर्वताप्रमाणें दिसणारा कोणी एक पुरुष जातांना माझ्या दृष्टीस पडला. तेव्हां त्या उभयतांना अवलोकन करितांक्षणीं ह्यांनाच पित्याच्या आहाराकरितां घेऊन जावें, असा मीं निश्चय केला; परंतु त्यानें नम्र होऊन दीन वाणीनें ' मार्ग दे ' म्हणून माझी प्रार्थना केल्यामुळें मीं त्याला सोडून दिलें. कारण गरिबीनें वागणाऱ्यांचा घात करणारा नीचांमध्येंहि कोणी ह्या जगतांत सांपडणार नाहीं, मग माझ्यासारख्याची गोष्ट कशाला पाहिजे ? असो. मीं सोडून दिल्यावर तेजानें आकाश व्याप्त करीतच कीं काय तो पुरुष सत्वर चालता झाला. तो गेल्यानंतर आकाशामध्यें संचार करणाऱ्या सिद्धचारणादिकांनीं माझ्यासमीप येऊन त्या उभयतांना जीवदान दिल्याबद्दल माझी प्रशंसा केली. ते म्हणाले, " सीता तुझ्या हातून जिवंत राहिली, हें फारच चांगलें झालें; व कसा तरी रावण रामभार्येसहवर्तमान जिवंत निघून गेला, ह्याबद्दल तुझें निःसंशय कल्याण होईल. " ह्याप्रमाणें त्या परमश्रेष्ठ सिद्धांनीं मला सांगितलें, आणि स्त्रीला घेऊन जाणारा तो राक्षसांचा राजा रावण होता, असें मला कळविलें. त्या वेळीं दशरथपुत्र रामाची भार्या सीता शोकावेगानें व्याकूल झालेली होती. तिच्या शरिरावरील भूषणें वस्त्रासहवर्तमान अस्ताव्यस्त झालेलीं होतीं, आणि तिचे केंस मोकळे सुटले असून राम-लक्ष्मणांच्या नांवानें ती आक्रोश करीत चालली होती. हें पहाण्यांत गुंतल्यामुळें मला येण्याला इतका उशीर झाला, आणि रिकाम्या हातीं परत येण्याचें कारण तरी हेंच. "

गृध्रराज संपाति पुढें सांगतो:—"ह्याप्रमाणें वक्त्यांमध्यें श्रेष्ठ असलेल्या सुग्रीवानें हा सर्व वृत्तांत मला निवेदन केला; परंतु तो ऐकूनहि पराक्रम गाजविण्याविषयीं माझ्या मनांत कांहींएक विचार आला नाहीं. कारण पंख नाहींतसे झालेला

पक्षी कांहीं पराक्रमाचें कृत्य करण्यास प्रवृत्त होणार कसा ? वाणी आणि बुद्धि ह्यांच्या गुणांवर अवलंबून असलेल्या माझ्या हातून जें होणें शक्य आहे, तें तुम्ही श्रवण करा. तें होणें तुमच्या पराक्रमावर अवलंबून आहे. मी फक्त वाणी व मति ह्यांच्या योगानें तुम्हां सर्वांचें प्रिय करीन. दशरथपुत्र रामाचें जें कार्य आहे, तें माझेंच आहे, ह्यांबद्दल संशय नाहीं. शिवाय वानरराज सुग्रीवानें पाठविलेले तुम्ही श्रेष्ठ, बलाढ्य व विचारी असून देवांनाहि अजिंक्य आहां; आणि कंक पक्ष्यांच्या पंखांनीं युक्त असलेले राम-लक्ष्मणांचे धनुष्यापासून सुटलेले बाण त्रैलोक्याचें रक्षण व निग्रह करण्यास समर्थ आहेत. तेव्हां दशकंठ रावण जरी तेजस्वी व बलाढ्य आहे, तरी तुम्हां समर्थांना कांहींच कठीण नाहीं. तस्मात् आतां कालविलंब पुरे. सीतेचा शोध लावण्याविषयीं तुम्ही आपल्या मनाचा निश्चय करा. अरे, तुमच्यासारखे बुद्धिमान पुरुष योग्य कृत्यांना आळस करीत नाहींत."

सर्ग साठावा.

संपातीचें पूर्ववृत्त.

तदनंतर स्नान करून व भ्रात्याच्या नांवानें पाणी सोडून तो संपाति गृध्र रमणीय पर्वतावर बसला असतां वानरसेनाधिपति त्याच्या सभोंवती गराडा देऊन बसले. तेव्हां त्या सर्व वानरांनीं परिवेष्टित असलेला अंगद तेथें बसला असतांना विश्वास आल्यामुळें संपाती आनंदानें पुनरपि त्याला म्हणाला:—"कांहींएक गडबड न करितां वानरांनीं माझें म्हणणें ऐकून घ्यावें. मिथिलराजकन्या सीतेचा पत्ता मला कसा लागला, हें मी खरें खरें सांगतों. हे निष्पापा अंगदा, सूर्याच्या तापानें व्याकूळ होऊन सूर्यकिरणांनीं दग्ध झाल्यामुळें पूर्वीं मी ह्या विंध्यपर्वताच्या शिखरावर पडलों. अगदीं मूर्च्छित होऊन मी विवळत पडलों असतां, सहा दिवसांनंतर मी शुद्धीवर आलों, आणि चोहोंकडे पाहूं लागलों, तों माझ्या कांहींच ओळखीचें दिसेना. तदनंतर सागर, पर्वत, सर्व नद्या, सरोवरें, वनें आणि प्रदेश अवलोकन केल्यावर माझी मति चालूं लागली, आणि आनंदित पक्षिसमुदायांनीं व्याप्त, गुहा व शिखरें ह्यांनीं युक्त आणि दक्षिण समुद्राच्या तीरीं असलेला हा विंध्याद्रि अशी माझी खात्री झाली. ह्या ठिकाणीं देवांनाहि अत्यंत पूज्य असा एक पवित्र आश्रम होता. त्या आश्रमामध्यें उग्र तपश्चर्या करणारा एक निशा-

कर नामक ऋषि रहात असे. तो धर्मज्ञ निशाकर स्वर्गाला गेल्यानंतर त्या ऋषीवांचून ह्या पर्वतावर वास्तव्य करीत असतांना, माझीं आठ हजार वर्षें लोटलीं. मी येथें येऊन पडल्यानंतर मोठ्या संकटानें व दुःखानें हळू हळू विंध्यशिखरापासून खालीं उतरून तीक्ष्णाग्र दर्भांनीं युक्त असलेल्या पृथ्वीवर पुनरपि येऊन पोहोंचलों. अत्यंत दुःखित झालेल्या मला त्या ऋषींचें दर्शन घेण्याची इच्छा प्राप्त झाली होती. कारण, जटायूनें व मीं त्यांची पुष्कळ वेळां सेवा केलेली होती. त्यांच्या आश्रमस्थानासमीप सुगंधि वायु वहात असत, आणि पुष्परहित अथवा फलरहित असा एकहि वृक्ष तेथें दृष्टीस पडत नसे. असो. त्या पवित्र आश्रमासमीप मी एका वृक्षाखालीं भगवान निशाकर मुनींच्या दर्शनाची वाट पहात बसलों. तेव्हां उज्ज्वल तेजानें युक्त असे ते ऋषि स्नान करून व उत्तरेकडे तोंड करून वळलेले मी दूर अवलोकन केले. ते ऋषि फारच तेजस्वी असल्यामुळें अनोळखी प्राण्यानें त्यांच्यासमोर जाणेंहि अशक्य होतें. तथापि उदार पुरुषाचे भोवतीं गराडा देऊन ज्याप्रमाणें याचक लोक जात असतात, त्याचप्रमाणें ऋक्ष, सृमर, व्याघ्र, सिंह आणि नानाप्रकारचे सर्प त्याला गराडा देऊन चालले होते. तदनंतर राजा राजवाड्यामध्यें प्रविष्ट झाला असतां, ज्याप्रमाणें अमात्यांसहवर्तमान सर्व सैन्य परत फिरतें, त्याप्रमाणें ते निशाकर ऋषि आश्रमांत प्रविष्ट होतांच सर्व प्राणी परत गेले. येतां येतां मला अवलोकन करितांक्षणीं ते ऋषि संतुष्ट होऊन आश्रमामध्यें गेले; परंतु एका क्षणांत पुनरपि बाहेर येऊन मला त्यांनीं कार्याविषयीं प्रश्न केला. ते म्हणाले, ' हे विनयसंपन्न गृध्रा, केंस विकल झालेले पाहिल्यावर तुझी एकाएकीं ओळख पटत नाहीं. तुझे पंख अग्नीनें दग्ध झालेले असून तुझे प्राणहि दग्ध झाल्यासारखेच झाले आहेत. वेगामध्यें वायूची बरोबरी करणारे असे दोन सामान्य गृध्रच नव्हत, परंतु यथेष्ट रूप धारण करणारे उभयतां भ्राते असलेले गृध्रांचे राजे पूर्वीं माझ्या अवलोकनांत होते. संपाते, त्यांतील तूं ज्येष्ठ आहेस, हे मीं ओळखिलें. जटायु हा तुझा कनिष्ठ भ्राता होय. तुम्ही मनुष्यरूप धारण करून माझे पाय धरीत होतां. तुला काय व्याधि उत्पन्न झाली आहे, तुझे पंख कशानें झडले आहेत, अथवा हा कोणीं प्रहारच तुझ्यावर केला आहे कीं काय, हें सर्व तूं मला कथन कर."

सर्ग एकसष्टावा.

संपातीचें पूर्ववृत्त. (पुढें चालू.)

तदनंतर इंद्रासहवर्तमान युद्ध करणें हें जें दुष्कर व भयंकर कर्म अविचारामुळें झालें होतें, तें आणि त्याचप्रमाणें सूर्यासमीप जाणें, हें सर्व कृत्य मीं त्या मुनींना कथन केलें. मी म्हटलें, "भगवन्, इंद्राशीं झालेल्या युद्धामध्यें वज्रप्रहारानें मला जखमा लागल्यामुळें मी थकून गेलों आहें; आणि पंख नाहींतसे होण्यासारखें अनुचित कर्म केल्याची लाज वाटत असल्यामुळें माझ्या मनाला कांहीं सुचेनासें झालें आहे. ह्या कारणामुळें जरी मी कांहीं भाषण करण्यास समर्थ नाहीं, तरी कांहीं कांहीं सांगतों. मी व जटायु गर्वानें मोहित होऊन स्पर्धेनें आकाशामध्यें गेलों, आणि 'जो लांब उडून जाईल तो श्रेष्ठ' असा पण लावून आपलें सामर्थ्य किती आहे, हें पाहूं लागलों. कैलास पर्वताच्या शिखरावर, सूर्य अस्ताचलाला जाण्याचे पूर्वींच त्याला गांठावयाचें, असा मुनींच्या समक्ष पण करून आम्हीं एकदम आकाशामध्यें उड्डाण केलें असतां, भूतलावरील वेगवेगळीं नगरें रथांच्या चाकांप्रमाणें आम्हांला दिसूं लागलीं; आणि वर-वर जातांना कोठें वाद्यांचा घोष, व कोठें भूषणांचा ध्वनि कानीं पडूं लागला असून, कोठें कोठें रक्तवस्त्र परिधान केलेल्या पुष्कळ स्त्रिया गात असतांना आम्हीं अवलोकन केल्या. एकदम आकाशामध्यें उडून सूर्यमंडलासमीप आम्ही जाऊं लागलों असतां, गवतानें भरलेलें वन जसें दिसतें, तसें देशांनीं भरलेलें भूतल आम्हांला दिसूं लागलें. सारांश, भूतलावरील प्रदेश तृणासारखे आम्हांला सूक्ष्म दिसूं लागले. पर्वतांनीं आच्छादित असलेली ही भूमि लहान लहान धोंड्यांनीं आच्छादित झाल्यासारखी दिसूं लागली, आणि त्याचप्रमाणें पृथ्वी वास्तविक नद्यांनीं व्याप्त झाली असतांना ती सुतांनीं व्याप्त झाल्यासारखी दिसूं लागली. हिमालय, विंध्य आणि सर्वांत मोठा असा मेरु पर्वत हे सर्व, जलाशयामध्यें क्रीडा करीत असलेल्या गजांप्रमाणें दिसूं लागले. वर जातां जातां, मध्यान्हसमय आला असतां आम्हांला फारच उष्मा भासूं लागला. आम्ही अतिशय थकून गेलों. भयहि अतिच वाटूं लागलें. पूर्व कोणती व पश्चिम कोणती हें कांहींएक समजेनासें झालें, आणि नंतर मूर्च्छाहि आली. दक्षिण दिशा कोणती तें समजेना. आग्नेय कोणती हें ओळखूं येईना. पश्चिम कोणती ह्याचीहि अटकळ होईना. सारांश, जगताचा दाह प्रलयकालीं व्हावयाचा, हें जरी ठरलेलें आहे, तरी जगत् अग्नीनें दग्ध झाल्याचा आम्हांला तेव्हां

अनुभव येऊं लागला. माझ्या मनाला तर कांहींच सुचेनासें झालें. मनाचाच आधार असा डळमळीत झाल्यावर दृष्टीचीहि गति खुंटली. तथापि मोठ्या यत्नानें ह्या सूर्यासंबंधानें मन व दृष्टि स्थिर करण्याचा आम्हीं यत्न केला, व आणखी एकदा पाहिलें, तों सूर्य आम्हांला पृथ्वीएवढा मोठा दिसूं लागला. जटायु मला कांहींएक न सांगतां भूमीवर पडला. तो पडल्याचें अवलोकन करितांक्षणीं मीहि त्याच्या रक्षणाकरितां पंख पसरून आपलें अंग सोडून दिलें. जटायूचें मी पंखांनीं रक्षण केलें असल्यामुळें तो दग्ध झाला नाहीं; परंतु आकाशांतून पडतां पडतां निष्काळजीपणामुळें मी मात्र दग्ध होऊन गेलों. जटायु जनस्थानामध्यें पडला असावा, असा माझा अदमास आहे. मी तर पंख जळून गेल्यामुळें ह्या विंध्यपर्वतावर जड गोळा होऊन पडलों. सांप्रत मी राज्यापासून भ्रष्ट झालों असून भ्रात्याचा मला वियोग झाला आहे; आणि पंख नाहींतसे झाले असून माझे ठिकाणीं पराक्रमहि राहिलेला नाहीं. ह्यास्तव, सर्वथा मरणाचीच इच्छा धरून मी ह्या पर्वतशिखरावरून खालीं उडी घेतों."

सर्ग बासष्टावा.

संपातीचें पूर्ववृत्त.

(पुराणकथा.)

संपाति पुढें सांगतो:—"ह्याप्रमाणें अत्यंत दुःखित होऊन मी त्या मुनिश्रेष्ठांना सांगितलें, व मी रोदन करूं लागलों. तेव्हां क्षणभर विचार करून भगवान निशाकर मुनि मला म्हणाले, 'तुला मुख्य पक्ष व उपपक्ष पुनरपि दुसरे फुटतील; आणि त्याचप्रमाणें चक्षु, प्राण, पराक्रम व बल हींहि तुझीं उत्कृष्ट होतील. पुराणामध्यें पुढें होणारें एक फारच मोठें कार्य मीं श्रवण केलें आहे. ज्याप्रमाणें पुराणांत श्रवण करून तें कार्य मला विदित झालें आहे, त्याप्रमाणें तपश्चर्येच्या योगानेंहि तें मीं अवलोकन केलें आहे. इक्ष्वाकुकुलाची कीर्ति वृद्धिंगत करणारा कोणी दशरथ म्हणून राजा होईल, आणि त्याला राम ह्या नांवाचा महातेजस्वी पुत्र होइल. तो अमोघ पराक्रमी राम पित्याची आज्ञा झाल्यावरून भार्या सीता व भ्राता लक्ष्मण यांसहवर्तमान अरण्यामध्यें जाईल. देवदानवांना अवध्य आणि राक्षसांचा अधिपति रावण नामक राक्षस त्याची भार्या जनस्थानांतून हरण करून नेईल, आणि घरीं नेल्यानंतर

भोग्य वस्तु, भक्ष आणि भोज्य पदार्थ ह्यांच्या योगानें तो तिचें मन वळविण्याचाहि प्रयत्न करील. तथापि दुःखामध्यें मग्न झालेली ती महाभाग्यवती यशस्विनी रामपत्नी कांहींएक खाणार नाहीं. तदनंतर, विदेहराजकन्या सीता क्षुधित आहे, असें जाणून अमृततुल्य आणि देवांनाहि दुर्लभ असें परमान्नसंज्ञक अन्न इंद्र तिला देईल. इंद्रापासून हें प्राप्त झालें, असें समजून सीता तें अन्न स्वीकारील; आणि प्रथमतः त्यांतील कांहीं अंश काढून रामाच्या उद्देशानें ती भूतलावर अर्पण करील. तें भूतलावर अर्पण करितांना, माझा भर्ता आणि देवर लक्ष्मण जर जिवंत असतील, किंवा देवत्व पावले असतील, तर त्यांना हें अन्न प्राप्त होवो' असें ती म्हणेल. येथें सीतेच्या शोधाकरितांपाठविलेले रामदूत वानर येतील. त्यांना रामपत्नी सीता कोठें आहे, तें तूं निवेदन कर. सारांश, कांहीं जरी झालें, तरी तुला तेथून जातां उपयोगी नाहीं. तूं अशा प्रकारचा असतांना कोठें जाशील? देश आणि काल ह्यांची तूं वाट पहा, म्हणजे आपोआप तुला पंख प्राप्त होतील. तुला आजच्या आजच पक्षयुक्त करण्याचा माझा उद्देश आहे, परंतु पक्ष प्राप्त झाल्यावर तूं हें स्थान सोडून जाण्याचा संभव असल्यामुळें, कदाचित् देवकार्य तुझ्या हातून होणार नाहीं. ह्यास्तव सांप्रत मी तसें करीत नाहीं. तूं येथें राहूनच लोकांना हितावह असें कृत्य करशील. तें कार्य साधारण लोकांचेंच नसून श्रेष्ठ ब्राह्मण, मुनि, इंद्र आणि ते राजकुमार राम-लक्ष्मण ह्यांचेंहि आहे; आणि तें तुझ्या हातून होण्यास योग्य आहे. भ्रात्या राम-लक्ष्मणांना अवलोकन करण्याची माझीहि इच्छा आहे; परंतु इतका दीर्घ काल लोटेपर्यंत प्राण धारण करून राहाण्याची माझी इच्छा नाहीं. म्हणून मी आतां लवकरच ह्या देहाचा त्याग करीन."

सर्ग त्रेसष्टावा.

वानरांचें समुद्रतीरीं गमन.

संपाती सांगतो:—"वानरहो, ह्या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या पुष्कळ वाक्यांनीं माझी प्रशंसा करून आणि मला निरोप देऊन भगवान निशाकर मुनि आपल्या निवासस्थानामध्यें प्रविष्ट झाले. नंतर मी हळू हळू पर्वताच्या गुहेपासून बाहेर निघालों व विंध्याचल शिखरावर आरूढ होऊन तुमची वाट पहात बसलों. आज त्या गोष्टीला शेंकडों वर्षें लोटून गेलीं आहेत. तेव्हांपासून मी त्या मुनींचें वचन मनांत धरून तुम्ही केव्हां व कोठें दृष्टीस पडतां, ह्याची वाट

पहात बसलों आहें. महाप्रस्थानाचें अवलंबन करून निशाकर मुनि स्वर्गाला चालते झाल्यानंतर, अनेक विचारांनीं व्याप्त झालेल्या माझ्या अंगाचा एक-सारखा संतापामुळें दाह होत आहे; आणि प्राण देण्याचा जो विचार माझ्या मनांत आला होता, तो त्या मुनींच्या शब्दांवरून मी रहित करून बसलों आहें. अग्नीची उज्ज्वल ज्वाला ज्याप्रमाणें अंधकाराचा नाश करिते, त्याप्रमाणें माझ्या प्राणरक्षणाकरितां त्या महर्षींनीं जी मला बुद्धि दिली, ती माझ्या दुःखाचा परिहार करीत आहे. दुरात्म्या रावणाचें सामर्थ्य माझ्या पुत्राच्या सामर्थ्यापेक्षां कमी आहे, हें मला ठाऊक असल्यामुळें, 'तूं मैथिलीचें रक्षण कसें केलें नाहीस?' म्हणून मी पुत्राची चांगलीच खरडपट्टी काढिली. तथापि 'राम, रामा, लक्ष्मणा' अशा प्रकारचा तिचा विलाप श्रवण करून, आणि अर्थात्‌च सीतेचा त्यांना वियोग झाला आहे, असें ऐकून, दशरथाचे ठिकाणीं असलेल्या प्रेमामुळ मला प्रिय अशी जी अवश्य कर्तव्य गोष्ट ती माझ्या पुत्रानें केली नाहीं."

ह्याप्रमाणें एकत्र जमलेल्या वानरांसहवर्तमान तो संपती भाषण करीत असतांना, त्या वानरांसमक्ष त्याला पंख फुटले. तेव्हां आपलें शरीर नूतन फुटलेल्या अरुणवर्ण पक्षांनीं युक्त झालें आहे, असें अवलोकन करून त्या संपातीला अनुपम हर्ष झाला, आणि तो वानरांना म्हणाला, "अपरिमित सामर्थ्यवान निशाकर ऋषींच्या प्रसादानें सूर्यकिरणांनीं दग्ध झालेले पंख मला पुनरपि फुटले. त्यामुळें यौवनावस्थेमध्यें असतांना माझ्या ठिकाणीं जो पराक्रम वसत होता, तोच पराक्रम व सामर्थ्य आज मला प्राप्त झालें आहे, असें मला वाटतें. ह्यास्तव तुम्ही सर्व प्रकारें यत्न करा, म्हणजे सीतेचा शोध लागेल. कारण, ज्या गोष्टी निशाकर महर्षींनीं सांगितल्या, त्यांपैकीं मला पंखांचा लाभ झाला, ही गोष्ट तुमचा प्रयत्न सिद्धीस जाईल, असा विश्वास तुमचे ठिकाणीं उत्पन्न करण्यासारखी झाली आहे."

ह्याप्रमाणें त्या सर्व वानरांना सांगून आकाशामध्यें संचार करणारा तो पक्षिश्रेष्ठ संपाती आपणांला पूर्वीप्रमाणें गति प्राप्त झाली आहे किंवा नाहीं, हें पाहण्याकरितां विंध्याचलाच्या शिखरापासून उडून गेला. तेव्हां त्याचें भाषण श्रवण करून मनामध्यें संतुष्ट झालेले ते वानरश्रेष्ठ प्रयत्नसाध्य जो सीताप्राप्तिरूप अभ्युदय तो प्राप्त करून घेण्याविषयीं उद्युक्त झाले. सारांश संपातीचें भाषण श्रवण केल्यानंतर गतीनें वायूची बरोबरी करणारे आणि त्याच्या भाषणामुळें धैर्य आलेले ते वानरश्रेष्ठ जनककन्येचा शोध लावण्याविषयीं उत्सुक होऊन अभिजित् नक्षत्राचे संमुख असलेल्या दक्षिण दिशेकडे चालते झाले.

सर्ग चौसष्टावा.

समुद्रोल्लंघनाविषयीं चिंता.

गृध्रराज संपातीनें सीतेचा वृत्तांत सांगितला असतां, आनंदित झालेले ते सिंहासारखे पराक्रमी वानर उड्या मारून एकत्र जुळले आणि गर्जना करूं लागले. संपातीचें भाषण श्रवण करितांक्षणीं रावणक्षयाचा उद्देश मनांत धरून सीतेच्या दर्शनाची इच्छा करणारे ते वानर आनंदित होऊन समुद्राकडे गेले, आणि त्या सागरतीररूप प्रदेशाला जाऊन पोहोंचल्यानंतर ज्या ठिकाणीं चंद्रसूर्य-प्रभृति ग्रहांसहवर्तमान सर्व द्युलोकाचें[1] पूर्णपणें प्रतिबिंब पडलेलें असतें, तो समुद्र त्या भयंकर पराक्रमी वानरांनीं अवलोकन केला. नंतर त्या महाबलाढ्य वानर-वीरांनीं दक्षिण समुद्राच्या उत्तर तीरावर तळ दिला. कोठें कोठें लाटा मुळींच नसल्यानें तो समुद्र गाढ निद्रिस्थ झाल्यासारखा भासत होता, कोठें कोठें लाटा उसळत असल्यामुळें क्रीडा करीत आहेत, असा दिसत होता, कोठें कोठें पर्वत-प्राय जलतरंगांनीं व्याप्त झालेला दिसत होता, आणि कोठें कोठें पातालनिवासी दानवाधिपतींनीं तो गजबजून गेलेला होता; अशाप्रकारें शरिरावर रोमांच उठ-विणारा तो समुद्र अवलोकन करितांक्षणीं ते वानरश्रेष्ठ मनामध्यें खिन्न झाले. आकाशाप्रमाणें तो दुस्तर सागर अवलोकन करून खिन्न झालेले ते सर्व वानर एकत्र जुळले, व ' पुढें काय करावें ' म्हणून एकमेकांशीं बोलूं लागले. तेव्हां समुद्र अवलोकन करितांक्षणीं वानरसेना खिन्न झालेली पाहून त्या भयभीत झालेल्या वानरांना वानरश्रेष्ठ अंगद धीर देऊं लागला. तो म्हणाला, " तुम्ही खेद करूं नका. खेद हा फार वाईट आहे. कारण क्रुद्ध झालेला सर्प ज्या-प्रमाणें बालकाचा घात करितो, त्याप्रमाणें खेद हा पुरुषाचा घात करितो. परा-क्रम करण्याचा प्रसंग प्राप्त झाला असतां, जो पुरुष विचार न करितां खिन्न होऊन बसतो, त्या तेजोहीन पुरुषाचा मनोरथ कधींहि सिद्धीस जात नाहीं. "

असो. ती रात्र निघून गेल्यानंतर वृद्ध वृद्ध वानरांसहवर्तमान अंगद पुन-रपि मसलत करूं लागला. सारांश, मरुद्गणांच्या सैन्यामध्यें बसलेला इंद्रच कीं काय अशा रीतीनें शोभत असलेल्या अंगदाचे भोंवतीं गराडा देऊन वानरांची ती सर्व सेना बसली. कारण वालिपुत्र अंगद आणि हनुमान ह्यांवांचून ती वानरांची सेना आंवरून धरण्याला दुसरा कोण बरें समर्थ झाला असता? असो.

---

१ स्वर्गाचें.

तदनंतर त्या वृद्ध वृद्ध कपींचें आणि त्या सैन्याचें अनुमोदन घेऊन शत्रूला जेरीस आणणारा वैभवशाली अंगद मुद्देसूद भाषण करूं लागला. तो म्हणाला, " ह्या वेळेस कोण महातेजस्वी वानर समुद्राचें उल्लंघन करील ? आणि शत्रु-दमन करणाऱ्या सुग्रीवाला सत्यप्रतिज्ञ कोण करील ? कोणता बरे वीर शंभर योजनें समुद्र ओलांडून जाईल ? आणि ह्या सर्व वानरसेनाधिपतींना मोठ्या भया-पासून कोण बरें मुक्त करील ? येथून मनोरथ परिपूर्ण होऊन परत गेल्यावर कोणाच्या बरें प्रसादामुळें आपण भार्या, पुत्र व गृहें सुखानें अवलोकन करूं ? कोणाच्या बरें प्रसादामुळें आम्हांला आनंदानें महाबलाढ्य राम, लक्ष्मण आणि वनचर सुग्रीव यांचे समीप जातां येईल ? तुम्हांपैकीं जर कोणी समुद्राचें उल्लं-घन करून जाण्याविषयीं समर्थ असेल, तर त्यानें येथल्या येथें आम्हांला सत्वरच पवित्र अशी अभयदक्षिणा द्यावी. "

हें अंगदाचें भाषण श्रवण केल्यावर कोणी कांहींएक बोलेना. ती सर्व वानरसेना तेथें जशी कांहीं स्तिमित होऊन राहिली. तेव्हां पुनरपि वानरश्रेष्ठ अंगद त्यांना म्हणाला, " तुम्ही सर्वजण बलवानांमध्यें श्रेष्ठ असून महापराक्रमी आहां. इतकेंच नव्हे, परंतु सर्वजण निष्कलंक कुलांमध्यें उत्पन्न झालेले असून पराक्रमासंबंधानें तुम्ही सर्व वारंवार प्रशंसेसहि पात्र झालां आहां. तात्पर्य, तुम्हां-पैकीं कोणाचीहि गति कधींहि कुंठित होत नाही. ह्यास्तव, मार्ग उल्लंघन करून जाण्याविषयीं आपापल्या सामर्थ्याला अनुसरून तुम्ही काय तें सांगा. "

सर्ग पांसष्टावा.

समुद्रोल्लंघनाविषयीं वाटाघाट

(वानरसामर्थ्य.)

अंगदाचें भाषण श्रवण केल्यावर ते सर्व वानरश्रेष्ठ गतीसंबंधानें अनुक्रमें आपापलें सामर्थ्य कथन करूं लागले. गज, गवाक्ष, गवय, शरभ, गंधमादन, मैंद, द्विविद, अंगद आणि जांबवान ह्यांनीं आपआपलें सामर्थ्य कथन केलें. पैकीं गज म्हणाला, ' मी दहा योजनें उडी मारीन. ' गवाक्ष म्हणाला, ' मी वीस योजनें मारीन. ' हें ऐकून शरभ वानर तेथें जुळलेल्या वानरांना म्हणाला, ' वानरहो, मी तीस योजनें उड्डाण करीन. ' तदनंतर ऋषभ वानर

म्हणाला, 'मी एका उडीसरसा चाळीस योजनें निःसंशय जाईन.' नंतर महातेजस्वी गंधमादन म्हणाला, 'मी पन्नास योजनें उडी मारीन, ह्यांत संशय नाहीं.' नंतर मैंद म्हणाला, 'माझ्या अंगीं साठ योजनें उल्लंघून जाण्याचें सामर्थ्य आहे.' तें ऐकून महातेजस्वी द्विविद म्हणाला, 'मी सत्तर योजनें उडी मारीन, ह्यांत संदेह नाहीं.' तेव्हां महातेजस्वी व धैर्यवान वानरश्रेष्ठ सुषेण म्हणाला, 'गमनाविषयीं ऐशीं योजनांची तर मी प्रतिज्ञाच करितों.'

ह्याप्रमाणें ते वानर सांगत असतांना त्या सर्वांना अनुमोदन देऊन त्यांतील सर्वांत श्रेष्ठ जांबवान म्हणाला, "पूर्वी आमच्याहि अंगांत बरीच लांब उडी मारण्याचा कांहीं पराक्रम होता; परंतु सांप्रत आमच्या वयाची अगदीं पराकाष्ठा झालेली आहे. असा जरी प्रकार आहे, तरी ज्या कार्याकरितां वानरराज सुग्रीव आणि राम ह्यांचा निश्चय झालेला आहे, त्या ह्या कार्याची उपेक्षा करणें योग्य नाहीं. तस्मात्, सांप्रतकाळीं गमनाविषयीं आमचें काय सामर्थ्य आहे, हें तुम्ही ऐकून घ्या. मी आद्यापीहि नव्वद योजनें उडी मारीन, ह्यांत संशय नाहीं."

ह्यानंतर त्या सर्व वानरश्रेष्ठांना जांबवान पुनरपि म्हणाला, "गमनाविषयीं माझें सामर्थ्य कांहीं एवढेंच नव्हतें. विरोचनपुत्र बलि यज्ञ करण्यास उद्युक्त झाला असतांना, जयशील असा जो विष्णु, तो पूर्वी जेव्हां तीन पायांनीं त्रैलोक्य व्याप्त करूं लागला, तेव्हां मीं त्याला प्रदक्षिणा केलेली आहे. परंतु सांप्रत मी वृद्ध झालों असल्यामुळें गमनाविषयीं माझें सामर्थ्य कमी झालें आहे. त्या वेळीं यौवनावस्थेमध्यें माझे ठिकाणीं मोठें अप्रतिम सामर्थ्य होतें. सांप्रत एका उडीसरसें काय तें नव्वद योजनेंच उल्लंघून जाण्याचें माझें सामर्थ्य आहे. परंतु एवढ्यानें ह्या कार्याची सिद्धि होणार नाहीं."

ह्यानंतर ज्ञानी अंगद महाकपि जांबवानाचें म्हणणें मान्य करून म्हणाला, 'मीहि प्रचंड शंभर योजनें उडून जाईन; परंतु फिरून परत येण्याला माझे अंगीं सामर्थ्य राहील किंवा नाहीं ह्याची खात्री वाटत नाहीं."

ह्यावर संभाषण करण्यामध्यें निपुण असलेला जांबवान वानरश्रेष्ठ अंगदाला म्हणाला, "हे ऋक्षवानरश्रेष्ठा, गमनाविषयीं तुझें सामर्थ्य किती आहे, हें मीं जाणीत आहें. तूं शंभर अथवा हजार योजनेंहि जाऊन परत येण्यास समर्थ आहेस; परंतु असें करणें योग्य नाहीं. कारण बा अंगदा, दुसऱ्यांना पाठविणारा जो स्वामी, त्यालाच इतरांनीं पाठविणें योग्य नाहीं. हे वानरश्रेष्ठा, हा सर्व वानरसमुदाय तुझा सेवक आहे. स्वामी ह्या नात्यानें असलेला तूं आम्हांला

भार्येच्या स्थानीं आहेस. अर्थात्, जिवंत जीव आहे, तोंपर्यंत पतीनें ज्याप्रमाणें भार्येचें रक्षण करणें योग्य आहे, त्याप्रमाणें आम्ही सर्व वानरांनीं जिवंत जीव आहे, तोंपर्यंत तुझें रक्षण करणें योग्य आहे. हे शत्रुदमना, स्वामी हाच सैन्याचा आधार आहे. तें कार्य सिद्धीस जाण्याला मुख्य आधार तूंच आहेस. तस्मात्, हे अंगदा, भार्येप्रमाणें आम्हांला तुझें सर्वदा रक्षण केलें पाहिजे. कोणत्याहि गोष्टीचें मूळ रक्षण करून ठेविलें पाहिजे, असा कार्यवेत्त्या पुरुषांचा न्याय आहे. कारण मूळ जर कायम असेल, तर इतर सर्व किरकोळ गोष्टी सिद्धीस जातात. तस्मात् हे अमोघ पराक्रमी अंगदा, बुद्धि आणि पराक्रम ह्यांनीं संपन्न असलेला तूंच आमचा गुरु असून गुरुपुत्रहि आहेस; आणि म्हणूनच तुझा आश्रय धरून आम्ही कोणतीहि गोष्ट सिद्धीस नेण्यास समर्थ आहों."

ह्याप्रमाणें महाबुद्धिमान जांबवान अंगदाशीं भाषण करून स्वस्थ बसला असतां, वालिपुत्र अंगदानें त्याला उत्तर केलें, "मी जर गेलों नाहीं, तर समुद्र उल्लंघून जाण्यास समर्थ असा दुसरा कोणीहि वानरश्रेष्ठ नाहीं. तेव्हां पुनरपि हें प्रयोपवेशनच आम्हांला करणें भाग येईल. कारण, त्या विचारी वानरराज सुग्रीवाची आज्ञा आपल्या हातून शेवटास गेली नाहीं, तर प्राणांचें रक्षण होण्याचा संभव मला दिसत नाहीं; आणि लंकेमध्यें जरी मी गेलों, तरी पुनरपि परत येण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें प्राण रक्षण होईल, असें मला वाटत नाहीं. सारांश एखाद्यावर कृपा करण्याविषयीं आणि एखाद्यावर अत्यंत क्रुद्ध होण्याविषयीं तो सुग्रीव समर्थ आहे. तेव्हां त्याच्या आज्ञेचें उल्लंघन करून आपण किष्किंधा नगरींत गेलों असतां, आपला घात हा होणारच. तात्पर्य हें समुद्र-उल्लंघनरूप कार्य सिद्धीस जाईल, अशा रीतीनें तूंच अनुभवी असल्यामुळें काहीं उपाय शोधून काढावास, हें योग्य आहे."

ह्याप्रमाणें अंगदानें त्या वीर वानरश्रेष्ठ जांबवानाला सांगितलें असतां, जांबवानानें अंगदाशीं उत्कृष्ठ भाषण केलें. तो म्हणाला, "हे वीरा, तुझ्या ह्या कार्यांत काहीं कमी पडणार नाहीं. हें कार्य जो सिद्धीस नेणार आहे, तो हा मी आतांच सांगतों."

ह्याप्रमाणें अंगदाला सांगितल्यानंतर जिच्यामध्यें अनेक लक्ष वीर आहेत अशी ती खिन्न झालेली वानरसेना अवलोकन करून, उडी मारणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ म्हणून कसोटीला उतरलेल्या, आणि एकांत स्थलाचा आश्रय करून स्वस्थ बसलेल्या वानरश्रेष्ठ हनुमानाशीं वानरवीर जांबवान भाषण करूं लागला.

सर्ग सहासष्टावा.

हनुमंताला प्रेरणा.

(हनुमानाचें जन्मवृत्त.)

जांबवान म्हणाला:—"वीरश्रेष्ठा हनुमंता, तूं सर्व शास्त्रवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ असतांना एकांताचा आश्रय करून स्वस्थ बसला आहेस, आणि वानरांच्या कर्तव्यासंबंधानें कांहींच भाषण करीत नाहींस, हें काय? अरे, तेज आणि बल ह्यांच्या योगानें तूं वानरराज सुग्रीव आणि राम-लक्ष्मण ह्यांची बरोबरी करणारा आहेस. काश्यपाचा पुत्र जो महाबलाढ्य वैनतेय गरुड ज्याप्रमाणें सर्व पक्ष्यांमध्यें श्रेष्ठ आहे, त्याप्रमाणें तूं सर्वोत्तम म्हणून विख्यात आहेस. तो महापराक्रमी व महाबलाढ्य गरुड भुजंगांना उचलून सागर ओलांडून जात असतांना मी अनेक वेळां पाहिला आहे; आणि त्याच्या पंखांचे ठिकाणीं जें सामर्थ्य आहे, तेंच सामर्थ्य तुझ्या बाहूंच्या ठिकाणीं आहे. तस्मात्, पराक्रम आणि तेज ह्यांसंबंधानें तूं त्या गरुडापेक्षां कमी नाहींस. हे वानरश्रेष्ठा, बल, बुद्धि, तेज आणि धैर्य हीं तुझे ठिकाणीं असल्यामुळें, सर्व प्राण्यांमध्यें श्रेष्ठ असलेला तूं समुद्रोल्लंघनाविषयीं कां बरें सज्ज होत नाहींस? अप्सरांमध्यें श्रेष्ठ आणि पुंजिकस्थला ह्या नांवानें विख्यात अशी जी अप्सरा होती, तीच केसरी वानराची अंजना ह्या नांवाची पत्नी होती. ती रूपानें सर्व पृथ्वींत अप्रतिम असून त्रैलोक्यामध्यें विख्यात होती. बा हनुमाना, ऋषीच्या शापामुळें तिला जरी वानरीचा जन्म प्राप्त झाला होता, तरी त्या वानरजन्मामध्येंहि तिला स्वेच्छेप्रमाणें रूप धारण करण्याचें सामर्थ्य होतें. महात्म्या कुंजर नामक वानराधिपतीची ती कन्या एकदां मनुष्यरूप धारण करून पर्जन्यकाळच्या मेघांप्रमाणें दिसत असलेल्या पर्वतशिखरावर संचार करीत होती. रूप आणि यौवन ह्यांच्या योगानें ती झळकत होती. अद्भुत पुष्पें आणि भूषणें तिनें धारण केलीं होतीं, आणि ती पैठणी नेसली होती. ह्याप्रमाणें ती विशालनयना पर्वतशिखरावर असतांना, आरक्तवर्ण दिशांनीं युक्त व शुभ असें तिचें पीत वस्त्र हळू हळू वायूनें उडविलें; आणि नंतर तिच्या चांगल्या घट्ट व गरगरीत मांड्या, पुष्ट आणि एकमेकाला लागलेले स्तन व आकृतीनें उत्कृष्ठ आणि दिसण्यांतहि सुंदर असें मुख त्यानें अवलोकन केलें. जिचा जघनप्रदेश विस्तृत आहे, जिचा मध्यभाग कृश आहे आणि जिचे सर्व अवयव उत्कृष्ठ आहेत, अशा त्या स्त्रीला अवलोकन करितांक्षणीं वायु

मदनानें अतिशयच मोहित झाला. इतकेंच नव्हे, परंतु आपल्या दीर्घ बाहूंनीं त्यानें तिला आलिंगनहि दिलें. मदनानें ज्याचें सर्व शरीर अगदा व्याप्त झालें आहे, अशा वायूनें त्या निर्दोष स्त्रीच्या ठिकाणीं आपलें तेज स्थापन केलें. तेव्हां ती पतिव्रता स्त्री गोंधळून गेली, आणि म्हणाली, 'माझें हें पातिव्रत्य भ्रष्ट करण्याची कोण इच्छा करीत आहे?' हें अंजनेचें भाषण श्रवण करून वायु म्हणाला, "हे सुंदरी, मी तुझा घात करीत नाहीं. तूं मनामध्यें भय बाळगूं नको. हे यशस्विनी, तुला आलिंगन देऊन ज्या अर्थी मीं मानसिक भोगाच्याच योगानें तुझ्या ठिकाणीं आपलें तेज ठेविलें आहे, त्या अर्थी तुला वीर्यवान आणि बुद्धिमान पुत्र होईल. तो पुत्र महावीर्यवान, महातेजस्वी, महाबलाढ्य व महापराक्रमी होऊन मार्ग उल्लंघून जाण्यांत आणि उडी मारण्यांत माझी बरोबरी करील."

जांबवान पुढें म्हणतो:—"हे महावानरा, ह्याप्रमाणें वायूनें तुझ्या मातेला सांगितलें असतां ती संतुष्ट झाली, आणि गुहेमध्यें ती तुला प्रसवली. नंतर महावनामध्यें सूर्य उदयाचलास आलेला पाहतांक्षणीं, हें फल आहे असें समजून तें तुज बालाला घेण्याची इच्छा झाली. आणि उडी मारून तूं तें घेण्याकरितां स्वर्गामध्यें गेलास. अरे, तीनशें योजनें जरी तूं उडी मारून अंतरिक्षांत गेला होतास, आणि रवीच्या तेजानें जरी ग्रस्त झाला होतास, तरी वायूच्या सामर्थ्यामुळें तुला ग्लानि आली नाहीं. तूं अंतरिक्षामध्यें प्राप्त झाला आहेस, असें अवलोकन करून, तुझ्या तेजानें क्रुद्ध झालेल्या इंद्रानें तुझ्या शरिरावर वज्र फेंकीलें. तेव्हां पर्वताच्या उच्च शिखरावर तुझा डावा हनु म्हणजे गुडघा मोडला, आणि म्हणूनच तेव्हांपासून 'हनुमान' असें तुझें नांव लोकांनीं ठेविलें. तदनंतर तुला वज्रप्रहार झाल्याचें पाहून गंध वाहाणारा वायु स्वतः अत्यंत क्रुद्ध झाला, आणि त्रैलोक्यामध्यें संचार करीनासा झाला. तेव्हां त्रैलोक्य क्षुब्ध झालें असतां भुवनाधिपति सर्व देव अगदीं घाबरून गेले, आणि क्रुद्ध झालेल्या वायूला प्रसन्न करून घेऊं लागले. बा अमोघ पराक्रमी हनुमाना, ह्याप्रमाणें देवानीं वायूला प्रसन्न करून घेतलें असतां, 'समरांगणामध्यें शस्त्राच्या योगानें तुझा वध होणार नाहीं' असा ब्रह्मदेवानें तुला वर दिला. त्याचप्रमाणें वज्रप्रहार झाला असतांहि तुला कांहींएक इजा झाली नाहीं, असें अवलोकन करून इंद्राचें मन प्रसन्न झालें, आणि 'तूं इच्छामरणी होशील' असा त्यानें तुला उत्कृष्ठ वर दिला. सारांश, भयंकर पराक्रम करणारा तूं केसरीचा क्षेत्रज पुत्र असून वायूचा औरस पुत्र आहेस, व तेजानेंहि त्याची बरोबरी करणारा आहेस. वत्सा,

आम्ही आज मेल्यासारखेच आहों, आणि सांप्रत आम्हांमध्यें दक्षता व पराक्रम ह्यांनीं संपन्न असलेला दुसरा वानरराज सुग्रीवच कीं काय असा तूं आहेस. बा हनुमाना, त्रिविक्रमावतारसमयीं मीं पर्वत, वनें व अरण्यें ह्यांसहवर्तमान पृथ्वीला एका सपाट्यासरशा एकवीस प्रदक्षिणा केल्या होत्या, व त्या वेळेला देवांच्या आज्ञेवरून आम्हीं पुष्कळ ओषधी जमा केल्या होत्या. त्यांच्याच योगानें समुद्रमंथन करून देवांना अमृत प्राप्त झालें. सारांश, त्या वेळीं आमचें सामर्थ्य मोठें होतें; परंतु आतां मी वृद्ध झालों असून माझ्या अंगीं पराक्रम मुळींच राहिला नाहीं. सांप्रत काळीं आम्हांमध्यें तूंच सर्वगुणसंपन्न आहेस. तस्मात्, हे पराक्रमी हनुमाना, स्वतःचे अंगीं जें काय बल असेल, तें तूं प्रकट कर. उडी मारणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ तूंच आहेस, आणि सर्व वानरसेना तुझें सामर्थ्य अवलोकन करण्यास उत्सुक झाली आहे. तस्मात्, हे वानरश्रेष्ठा, ऊठ, आणि महासागर उल्लंघन कर. हनुमाना, सर्व प्राण्यांपेक्षां तुझी गति अधिक आहे. बाबारे, सर्व वानर खिन्न होऊन बसले आहेत. आतां तूं कां बरें यांचा अंत पहातोस? हे महावेगवान हनुमाना, विष्णूनें ज्याप्रमाणें तीन पावलें टाकिलीं, त्याप्रमाणें तूं आतां गतीचें अवलंबन कर."

ह्याप्रमाणें वानरश्रेष्ठ जांबवानानें हनुमानाला प्रेरणा केली असतां, स्वतःच्या वेगासंबंधानें खात्री असलेल्या त्या वायुपुत्र कपीनें त्या वानरवीराच्या सेनेला हर्ष उत्पन्न करीत करीत प्रचंड रूप धारण केलें.

सर्ग सदुसष्टावा.

समुद्रोल्लंघनाची तयारी.

(हनुमंताचे भाषण.)

शंभर योजनें समुद्र उल्लंघून जाण्याकरितां वृद्धिंगत होऊं लागलेल्या, आणि वेगावेगानें एकाएकीं अंतरिक्ष व्याप्त करूं लागलेल्या त्या वानरश्रेष्ठ हनुमानाला अवलोकन करितांक्षणीं दुःखाचा एकदम त्याग करून ते वानर हर्षयुक्त झाले, आणि गर्जना करून महाबलाढ्य हनुमानाची स्तुति करूं लागले. आनंदित व विस्मित झालेले ते वानर त्रैलोक्य व्याप्त करण्याकरितां उद्युक्त झालेल्या त्रिविक्रमावतारधारी नारायणाकडे पाहूं लागलेल्या लोकांप्रमाणें सर्व बाजूंनीं

त्याच्याकडे पाहूं लागले. वानर हनुमानाची स्तुति करूं लागले असतां, तो महाबलाढ्य हनुमान जास्त जास्तच वाढूं लागला, आणि हर्षानें शेंपूट आपटूं लागला असतां, त्याचें सामर्थ्य अधिकाधिकच वृद्धिंगत होऊं लागलें. सारांश, वृद्ध वृद्ध वानरश्रेष्ठ त्याची स्तुति करूं लागले असतां तेजानें व्याप्त होणाऱ्या त्या हनुमानाचें रूप अनुपम झालें. पर्वताच्या उघड्या गुहेमध्यें सिंह ज्याप्रमाणें जांभया देऊं लागतो, त्याप्रमाणें तो वायूचा औरस पुत्र हनुमान त्या वेळीं जांभया देऊं लागला. तेव्हां त्याचें मुख पेटलेल्या भट्टीप्रमाणें शोभूं लागलें, आणि तो स्वतः धूमरहित अग्नीप्रमाणें दिसूं लागला. नंतर शरिरावर रोमांच उठलेला तो हनुमान वानरांमधून उठला आणि वृद्ध वानरांना अभिवंदन करून म्हणाला, " आकाशामध्यें संचार करणारा वायु अतर्क्य, बलाढ्य, गमनशील व पर्वतशिखरें फोडून टाकणारा असून अग्नीचा सखा आहे; आणि त्या शीघ्र वेगानें युक्त व शीघ्रगामी महात्म्या वायूचा मी औरस पुत्र असून उडी मारण्यांत त्याची बरोबरी करणारा आहें. गगनचुंबित मेरु पर्वताला कोठेंहि न थांबतां एकदम हजारों प्रदक्षिणा करण्यास मी समर्थ आहें. बाहूंच्या वेगामुळें सागर क्षुब्ध करून टाकून त्याच्या योगानें पर्वत, नद्या व सरोवरें ह्यांसहवर्तमान सर्व जगत् बुडवून टाकण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य आहे. माझ्या मांड्यांच्या व पोटऱ्यांच्या वेगानें वरुणालय समुद्र मर्यादेचें अतिक्रमण करून जाईल, आणि त्यांतील मोठमोठे मकर क्षुब्ध होऊन जातील. आकाशामध्यें उड्डाण करणाऱ्या सर्पभक्षक पक्षिराज गरुडापेक्षां एकदम हजारोपट गमन करण्यास मी समर्थ आहें. किरणसमुदायांनीं युक्त असलेला उज्ज्वल सूर्य उदयाचलापासून निघाल्यानंतर अस्ताचलाला जाण्याचे पूर्वींच मी तेथून जाऊन त्याला स्पर्श करण्यास समर्थ आहें. इतकेंच नव्हे, परंतु सूर्याला स्पर्श केल्यानंतर पुनरपि भूमीपर्यंत येऊन तिला स्पर्श न करितां मोठ्या प्रचंड वेगानें मी पुनरपि सूर्याला स्पर्श करण्यास समर्थ आहें. आकाशामध्यें दिसणाऱ्या सर्व ग्रहनक्षत्रादिकांचे उल्लंघन करण्यास मी समर्थ आहें, आणि वेळ पडली असता सागर शुष्क करून पृथ्वीहि विदीर्ण करणारा मी आहें. मी वानर उड्या मारूं लागलों असतां, पर्वताचें चूर्ण करून टाकीन, आणि उडी मारितां मारितां आपल्या मांड्यांच्या वेगानें महासागरालाहि मागोमाग ओढून नेईन. मी आज आकाशमार्गानें उड्डाण करूं लागलों असतां, लता व वृक्ष ह्यांचीं नानाप्रकारचीं पुष्पें माझ्या मागोमाग येऊं लागतील; आणि असें होऊं लागलें असतां आकाशामध्यें असलेल्या स्वातीच्या मार्गाप्रमाणे माझा मार्ग

दिसूं लागेल. वानरहो, सर्व प्राणी भयंकर रूप धारण करणाऱ्या मला आज मार्गामध्यें संचार करीत असतांना, आकाशामध्यें उड्डाण करीत असतांना आणि समुद्राच्या पैलतीरावर उतरत असतांना अवलोकन करतील. मी आज आकाश व्याप्त करून जाऊं लागलों असतां, आकाश ग्रस्त करणारा प्रचंड मेरु पर्वतच कीं काय असा तुम्हांला दिसेन. मी मन स्वस्थ करून उड्डाण करूं लागलों असतां, मेघ उडवून देईन, पर्वत कंपित करीन आणि सागर शुष्क करून टाकीन. हें सामर्थ्य गरुडाचे ठिकाणीं, माझ्या अंगीं अथवा वायूपाशींच आहे. मी उडी मारिली असतां माझ्या मागोमाग येणारा गरुडाशिवाय अथवा महाबलाढ्य वायूशिवाय दुसरा कोणीहि मला दिसत नाहीं. मेघापासून निघालेल्या विद्युल्लतेप्रमाणें एका निमेषामध्यें मी निराधार आकाशांत एकदम उडून जाईन. मी सागराचें उल्लंघन करूं लागलों असतां, तीन पावलांनीं त्रैलोक्य व्याप्त करण्यास उद्युक्त झालेल्या विष्णूप्रमाणें माझें रूप होईल. तुम्हीं आनंदित व्हा. मी सीतेचा शोध लावीन. कारण, माझ्या बुद्धीला तसें वाटत असून माझ्या मनाचाहि कल तसाच दिसत आहे. वेगामध्यें वायूची व गरुडाची बरोबरी करणारा मी एकदम दहा हजार योजनेंहि उडीसरसा निघून जाईन, असें मला वाटतें. वज्रपाणि इंद्राच्या अथवा स्वयंभू ब्रह्मदेवाच्या हातांत जर अमृत असेल, तर मी आपला पराक्रम गाजवून तें एकाएकीं येथें घेऊन येईन, आणि कदाचित् लंकाहि उपटून चालता होईन, असें मला वाटतें."

ह्याप्रमाणें तो अतुल तेजस्वी वानरश्रेष्ठ हनुमान गर्जना करीत असतांना, तेथें असलेले सर्व वानर आनंदित व विस्मित होऊन त्याच्याकडे पाहूं लागले; आणि जातभाईंच्या दुःखाचा परिहार करणारें ते त्याचें भाषण श्रवण करून वानराधिपति जांबवानाला फारच हर्ष झाला. तो म्हणाला, "बा वेगयुक्त वीरा, हे वायुनंदना केसरीपुत्रा, त्वां जातभाईंचें प्रचंड दुःख नाहींसें केलें. तुझा मनोरथ सिद्धीस जाण्याकरितां येथें जुळलेले मुख्य मुख्य मंगलप्रिय वानर तुझें मंगल करितील. ऋषींचा प्रसाद, वानरवृद्धांचा आशीर्वाद आणि गुरुजनांची कृपा यांच्या योगानें तूं महासागर उल्लंघून जाशील. तूं परत येईपर्यंत आम्ही अगदीं एका पायावर तुझी वाट पहात उभे राहूं. सर्व वानरांचे प्राण तुझ्यावर अवलंबून आहेत."

तदनंतर वानरश्रेष्ठ हनुमान त्या वनवासी वानरांना म्हणाला, "उड्डाण करीत असतांना वेगानें माझी बरोबरी करणारा जगतामध्यें कोणीहि नाहीं. शिलासमुदायांनीं युक्त असलेल्या ह्या महेंद्र पर्वताचीं हीं शिखरें मोठीं मोठीं

असून अचल आहेत. नानाप्रकारच्या वृक्षांनीं व्याप्त आणि धातुसमुदायांनीं सुशोभित असलेल्या ह्या महेंद्र पर्वताच्या शिखरावर मी वेगानें गमन करीन. कारण, तेथून शंभर योजनें जरी उडी मारिली, तरी हीं प्रचंड शिखरें मी उडी मारीत असतांना माझा वेग सहन करितील."

महेंद्र पर्वतावर आरोहण.

असें सांगितल्यानंतर तो वायुतुल्य व वायुपुत्र शत्रुनाशक हनुमान त्या महेंद्र नामक श्रेष्ठ पर्वतावर आरूढ झाला. तो पर्वत नानाप्रकारच्या पुष्पांनीं व्याप्त झालेला होता. तेथील तृणयुक्त प्रदेशावर मृगांनीं वास्तव्य केलेलें होतें. लता व पुष्पें ह्यांनीं तो गजबजलेला होता, आणि नेहमीं प्रफुल्लित व फलयुक्त असणाऱ्या वृक्षांनीं तो भरून गेलेला होता, सिंह व व्याघ्र ह्यांनीं तो युक्त होता. मत्त गजांनीं त्याचा आश्रय केलेला होता. मदमत्त पक्षिगणांनीं तो नादित करून टाकिलेला होता, आणि झऱ्यांच्या योगानें तो गजबजून गेलेला होता. असो. तो इंद्रतुल्य पराक्रमी, महाबलाढ्य व उन्नत वानरश्रेष्ठ हनुमान महेंद्र पर्वताच्या मोठमोठ्या शिखरांवरून संचार करूं लागला. सिंहाचा तडाखा बसला असतां मोठा मत्त गज ज्याप्रमाणें गर्जना करितो, त्याप्रमाणें त्या महात्म्यानें आपल्या बाहूंनीं तो महापर्वत आवळून धरिला असतां प्राण्यांच्या द्वारानें तो आक्रोश करूं लागला. इतकेंच नव्हे, परंतु हनुमानानें तो पर्वत आवळून धरितांक्षणीं त्याच्यावरील पाषाणसमुदाय अस्ताव्यस्त पडले, मृग व गज अगदीं त्रस्त होऊन गेले, मोठमोठे वृक्ष कंपित होऊं लागले, आणि शेवटीं त्या पर्वतापासून जलप्रवाहहि वाहूं लागले. पान आणि विषयोपभोग ह्यांविषयीं अत्यंत आसक्त असलेलीं गंधर्वांचीं अनेक जोडपीं, उड्डाण करणारे पक्षी, आणि विद्याधरांचेहि समुदाय त्या पर्वतावरील मोठमोठीं शिखरें सोडून जाऊं लागलीं, मोठमोठे भुजंग दडून बसूं लागले, आणि त्या महापर्वतावरील शिखरें व शिला ह्यांचेंहि पतन होऊं लागले. बिळांतून अर्धवट बाहेर निघून सुस्कारे टाकू लागलेल्या भुजंगांच्या योगानें तो पर्वत पताकांनीं युक्त असल्यासारखा दिसूं लागला. त्रासानें गोंधळून गेलेले ऋषि त्या पर्वताला सोडून जाऊं लागले असतां तो पर्वत प्रचंड अरण्यांत तांड्यांतून चुकलेल्या मार्गस्थाप्रमाणें खिन्न दिसूं लागला. असो. चलाख आकृतीनें युक्त आणि शत्रुपक्षीय वीरनाशक असा जो महापराक्रमी, विचारी, वेगवान आणि वानरश्रेष्ठ हनुमान, त्याचें मन स्वस्थ ठेऊन लंकेचें स्मरण केलें.